अस्मिता महाराष्ट्राची

मराठा मंदिर
रौप्य महोत्सवी ग्रंथ

मराठा-मंदिर
रौप्यमहोत्सवी
ग्रंथ

अस्मिता महाराष्ट्राची

अर्वाचीन महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे वेधक चित्र

संपादक : डॉ. भीमराव कुलकर्णी

मराठा मंदिर प्रकाशन २

मराठा मंदिर, डॉ. आनंदराव नायर रोड, मुंबई ८

पहिली आवृत्ती : नोव्हेंबर १९७१

प्रकाशक : **गं. गो. गावडे**
कार्यकारी उपाध्यक्ष, मराठा मंदिर
डॉ. आनंदराव नायर रोड, मुंबई ८

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय,
'शिव-पार्वती', टिळक रोड, पुणे ३०

किंमत वीस रुपये

मंदिराचे मनोगत

"स्वतःचा शोध घ्या!" असा संदेश पौरस्त्य व पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांनी माणसाला दिला आहे. हा उपदेश परमेश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न करून, थकून निराश झालेल्या माणसाला केलेला असो किंवा विशुद्ध जीवनासाठी तळमळणाऱ्या, मनःशांतीसाठी धडपडणाऱ्या व्यक्तीस केलेला असो, तो आत्मोन्नतीसाठी नेहमीच उपयुक्त ठरला आहे खास. स्वतःचा शोध घेण्याचे हे तत्त्व व्यक्तिगत अभ्युदयास जेवढे हितावह ठरेल तेवढेच ते राष्ट्रीय व सामाजिक उन्नयनासाठी प्रेरक ठरू शकेल.

म्हणून विकासाचा मार्ग शोधणाऱ्या समाजाने प्रथम आत्मपरीक्षणास सिद्ध झाले पाहिजे. आपल्या अस्मितेची ओळख करून घेतली पाहिजे. ती तपासून पाहिली पाहिजे. आपल्या सामाजिक जीवनाचा पुनः पुन्हा प्रत्ययास येणारा स्थायीभाव कोणता, आपल्या अस्तित्वाचे स्वतंत्र अधिष्ठान कोणते, त्याच्या प्रेरणा कोणत्या, निष्ठा कोणत्या, आपले सत्त्व घडविणाऱ्या शक्ती कोणत्या, त्या सत्त्वांचा अविष्कार ज्या पद्धतीने व मार्गांने होतो ती पद्धती व मार्ग कोणते, सर्वांना एकत्रित असणारे भावनिक बंध कोणते, संकटकाळी उफाळून येणाऱ्या प्रवृत्ती कोणत्या, विशिष्ट भौगोलिक परिस्थितीने व इतिहासाने घडविलेली आपली खास वैशिष्ट्ये कोणती...इत्यादी गोष्टींचा प्रयत्नपूर्वक मागोवा घेणे आवश्यक आहे.

हा मागोवा घेण्याच्या इच्छेतून प्रस्तुत ग्रंथाची योजना जन्मास आली. मराठी अस्मितेचा आविष्कार वेगवेगळ्या काली, भिन्न भिन्न रीतीने झाला आहे. गेल्या तीस चाळीस वर्षांत, विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या अस्मितेचा विलास नाना रंगांनी, रूपांनी सिद्ध झाला. अनेक स्थित्यंतरे घडून आली, काही जुने विचार, काही जुन्या पद्धती, उपजीविकेची काही जुनी साधने, काही जुन्या संस्था निस्तेज होऊन मागे पडल्या. ती पोकळी भरून काढण्यासाठी नवे विचार, नवे आचार, नवी साधने पुढे सरसावली. काही पुरातन श्रद्धा व निष्ठा भंग पावल्या. त्यांच्या जागी नवीन श्रद्धा व निष्ठा आल्या व येत आहेत. या स्थित्यंतरांची दिशा कोणती, जी प्रगती वा अधोगती झाली तिचे नैतिक व सामाजिक मूल्य काय, आपण कोणत्या मार्गांने आलो, सध्या कुठे उभे आहोत आणि आपला पुढचा मार्ग कोणता इत्यादी प्रश्नांचा साकल्याने विचार झाला तर तो समाजोन्नतीस पोषक होऊ शकेल.

आणि म्हणून प्रस्तुत ग्रंथाचा आवाका व्यापक ठेवणे क्रमप्राप्त झाले. धर्म, तत्त्वज्ञान, न्याय, वाङ्मय, चित्रकला, नृत्य, संगीत, शिक्षण, वृत्तपत्रे, मुद्रण, वैद्यकीय विकास, औद्योगीकरण, कृषिविकास, सामाजिक सुधारणा, राजकीय प्रगती, अल्पसंख्याकांच्या समस्या, इत्यादी अनेक क्षेत्रांचे अवलोकन केल्यानंतर महाराष्ट्राच्या अलीकडील स्थितिगतीचे, सत्प्रवृत्तींचे वा अपप्रवृत्तींचे, प्रगतीचे वा परागतीचे चित्र स्पष्ट होईल. या चित्रातूनच मराठी अस्मितेचे स्थूल दर्शन घडू शकेल आणि मग तदनुषंगाने आपले पुढील कार्य व उद्दिष्टे निश्चित करणे सोयीचे होईल असे आम्हांला वाटते.

हा ग्रंथ आयोजित करण्यामागे आमची भूमिका आहे ही अशी.

आमची ही योजना साकार होण्यात आम्हांला अनेकांचे अनेक प्रकारे साहाय्य लाभले आहे. या ग्रंथासाठी आम्ही सिद्धहस्त लेखकांना लेखनसाहाय्यासाठी विनंती केली. त्यांनी ती तत्परतेने मान्य करून आम्हांला उत्तेजन दिले. महाराष्ट्र राज्याच्या साहित्य आणि संस्कृति मंडळाने आमच्या योजनेचे स्वागत करून ग्रंथप्रकाशनासाठी रु. १०,००० चे अनुदान मंजूर केले. आमच्या संस्थेचे माजी विद्यार्थी प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी संपादनाची अवघड जबाबदारी स्वेच्छेने स्वीकारली आणि त्यांनी ती समर्थपणे पार पाडली. कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. चिं. स. लाटकर यांनी ग्रंथाचे मुद्रण सुबक व देखणे व्हावे म्हणून परोपरीने प्रयत्न केले. श्री. शं. पी. शेटके यांनी गेली दीड दोन वर्षे या ग्रंथाच्या उभारणीसाठी अपार परिश्रम घेतले. या सर्वांचे आणि ज्या इतरांनी आम्हांला अन्य प्रकारे साहाय्य केले त्यांचे आम्ही सदैव ऋणी आहोत.

"अस्मिता महाराष्ट्राची" हे मंदिराचे दुसरे प्रकाशन होय. कै. त्र्यं. शं. शेजवलकरकृत "श्रीशिवछत्रपति" हा आमचा पहिला ग्रंथ. त्याला साहित्य अकॅदमीने रौप्य करंडक व रु ५००० चे पारितोषिक देऊन आणि भारत सरकारने सुंदर छपाई व सजावटीबद्दल राज्यपुरस्कार श्रेष्ठता प्रमाणपत्र देऊन त्याचा गौरव केला. चोखंदळ वाचकांनी, टीकाकारांनी व विद्वानांनी त्याची प्रशंसा केली. आमच्या ह्या नव्या प्रकाशनाचे असेच सर्वांकडून स्वागत होईल अशी आम्हांला आशा आहे.

२९-१-१९७१
मुंबई

कार्यकारी उपाध्यक्ष
मराठा मंदिर

संपादकीय

गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात 'मराठा मंदिर'चे श्री. शं. पी. शेटके यांचे तातडीने मुंबईस येण्याबद्दल मला पत्र आले. महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या हीरक-महोत्सवसमारंभाच्या अविरत परिश्रमातून बाहेर पडलो होतो, अशा वेळी श्री. शेटके यांनी माझ्यापुढे 'मराठा मंदिर'च्या रौप्य महोत्सवसमारंभाची कल्पना मांडली. रौप्य महोत्सवानिमित्त केवळ समारंभ साजरे करण्यापेक्षा काही तरी चिरस्थायी स्वरूपाचे कार्य करून दाखवावे या हेतूने, मी अशा प्रकारच्या ग्रंथनिर्मितीचे श्रेय 'मराठा मंदिर'ने घ्यावे, अशी त्यांना सूचना केली. कारण 'मराठा मंदिर'चे कर्तबगार व महत्त्वाकांक्षी सरचिटणीस (आता कार्यकारी उपाध्यक्ष) श्री. गं. गो. तथा बाबासाहेब गावडे यांच्या ध्येयवादी दृष्टिकोणाची मला कल्पना होती. कै. त्र्यं. शं. शेजवलकरांसारख्या अव्वल दर्जाच्या आणि मुलखावेगळ्या इतिहाससंशोधकाला शिवचरित्र लिहिण्यास प्रवृत्त करून त्यांनी मराठी अस्मितेच्या एका उदात्त प्रतिमेला साकार करण्याचे एक मोठे स्वप्न पाहिले. दुर्दैवाने शेजवलकरांच्या हातून संकल्पित शिवचरित्राचे कार्य पुरे होऊ शकले नाही. परंतु त्यासाठी त्यांनी साधनांची जमवाजमव केली, संकल्पित चरित्राचा आराखडा मांडला आणि प्रदीर्घ, पल्लेदार प्रस्तावना लिहून ठेवली. 'मराठा मंदिर'ने ते सारे काही संशोधनशुद्ध पद्धतीने आणि देखण्या स्वरूपात प्रसिद्ध केले. मराठी संशोधनात्मक वाङ्मयात साधनांची जुळवाजुळव आणि मांडणी या दृष्टीने एक नमुनेदार ग्रंथ म्हणून या ग्रंथाची वाहवा झाली. साहित्य अकादमीने मरणोत्तर पारितोषिक देऊन त्या ग्रंथाची कदर केली नि गौरव केला. गावडेसाहेबांचे स्वप्न प्रत्यक्षात आले असते तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक पहिल्या दर्जाचे कार्य केल्याचे समाधान किंवा श्रेय त्यांना मिळाले असते. ते श्रेय जरी अल्पांशानेच मिळाले तरी, स्वप्ने पाहण्याची जिद्द आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असलेली दूरदृष्टी व व्यावहारिक दृष्टी असलेल्या कर्तबगार पुरुषांत त्यांची गणना व्हायची राहिली नाही. अशा या व्यक्तीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेकांच्या सहकार्याने उभ्या केलेल्या संस्थेचा रौप्यमहोत्सव जवळ आला होता आणि म्हणूनच त्या शिवचरित्राचे कार्य लक्षात घेऊन त्या कार्यात शोभेशा अशा ग्रंथाची योजना मी त्यांच्यापुढे मांडली. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ती तत्परतेने उचलली व माझ्या पाठीवर थाप मारून 'आगे बढो'चा आदेश दिला.

हे काम स्वीकारून श्री. शेटके यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रंथाचा प्राथमिक आराखडा मी तयार केला आणि कामाला लागलो, तेव्हा अनेकांनी मला एकच प्रश्न वारंवार विचारला, 'मराठा मंदिरा'चे हे काम तुमच्याकडे कसे आले? त्यांनी असा प्रश्न मला विचारणे अगदी साहजिक होते. आता त्याबद्दल मला इथे प्रकट खुलासा केला पाहिजे.

मराठा मंदिरचे गेल्या पंचवीस वर्षांतील शैक्षणिक कार्य लक्षणीय आहे. त्यांनी चालविलेल्या जत (जि. सांगली) येथील श्रीरामराव विद्या मंदिर हायस्कूलचा मी विद्यार्थी. ही जतची शाळा ज्यांच्या आगमनाने नावारूपाला आली आणि ज्यांचे नाव जत तालुक्याच्या परिसरात अद्यापही अत्यंत आदराने घेतले जाते ते श्री. शं. पी. शेटके हे माझे अत्यंत आवडते व आदरणीय शिक्षक. ते हेडमास्तर म्हणून जतला आले आणि त्यांनी तेथील विद्यार्थ्यांना आपल्या व्यासंगाने व जिव्हाळ्याने भारून टाकले. त्यांनी माझ्यासारख्या विद्यार्थ्यांवर लेखनवाचनाचे जे संस्कार घडविले, त्यामुळेच या क्षेत्रात काही धडपड करण्याची प्रेरणा मला झाली. आणि म्हणूनच त्यांनी ज्या वेळी मला हाक मारली त्या वेळी मला फार आनंद झाला. माझ्या हाती अनेक महत्त्वाची कामे होती. त्यांच्या सबबीवर या कामात लक्ष घालण्याजोगी परिस्थिती नसतानाही अशी सबब सांगण्याचे माझ्या मनात देखील आले नाही. वडील माणसांबद्दल श्रद्धा, आदरभाव बाळगण्याचे त्यांनीच, एका खेडेगावातील शाळेतल्या आम्हा सामान्य मुलांना जे शिकविले होते ते वाया जाण्यासारखे नव्हते. या माझ्या पितृतुल्य शिक्षकाबद्दल आदरांजली व्यक्त करण्याची व ज्या संस्थेच्या शाळेत मी शिकलो, त्या संस्थेबद्दल ही अल्पशी कृतज्ञता व्यक्त करण्याची मी ही मोठी संधी घेतली आहे. मला ठाऊक आहे की, त्यांना हे आवडणार नाही. जत, अक्कलकोट, ठाकुरद्वार व वरळी या ठिकाणच्या शाळा श्री. शेटके यांनी निष्ठेने पुढे आणल्या. इंग्रजी भाषा, इंग्रजी वाङ्मय, नाट्यलेखन, चित्रकला, यांत गती असूनही आपल्या संस्थेसाठी निरलसपणे ते झगडत राहिले. आयुष्यभर प्रसिद्धिपराङ्मुख राहण्याचेच जणू त्यांनी व्रत घेतले आहे. एकेकाळी 'संग्राम' या दैनिकामध्ये ते संपादक-साहाय्यक होते. त्याच व्यवसायात ते राहते तर आजच्या मुंबईच्या प्रमुख दैनिकांच्या संपादकपदी ते निःशंकपणे विराजमान झाले असते. त्यांच्या लेखणीमध्ये तसे सामर्थ्य आहे हे मला ठाऊक आहे.

ग्रंथ पुरा होऊन तो वाचकांच्या हाती देताना मला फार आनंद होतो आहे. त्याची जमवाजमव व जुळवाजुळव करताना वर्षे कसे गेले ते कळलेच नाही. ग्रंथामध्ये मराठी अस्मितेच्या विविध अंगांवर त्या त्या क्षेत्रांतील मान्यवर व अधिकारी व्यक्तींनी प्रकाशझोत टाकलेले आहेत. अर्वाचीन महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे व्यापक चित्र त्यांतून उभे राहावे, हा हेतू आहे. अशा-

सारख्या ग्रंथाची योजना होऊन लेखनसाहाय्य मागितले जाते परंतु संपूर्ण सिद्धता होऊन असे ग्रंथ क्वचितच बाहेर पडतात, असा अलीकडे मोठ्या प्रमाणात अनुभव येत असल्याने अशा प्रकारच्या ग्रंथास लेखनसाहाय्य करण्यास तज्ज्ञ मंडळी नाराज असतात. तरी पण संस्थेचे बळ आणि पुण्याई मागे असल्याने परिश्रमाने आणि चिकाटीने हे सारे लेखनसाहाय्य मिळविण्यात यश प्राप्त झाले आहे. हे यश संतोषजनक असले तरी तेवढ्याने मला समाधान नाही. आज महाराष्ट्रातील, स्वराज्यप्राप्तीनंतरच्या काळातील इतिहास व वाङ्मय-संशोधनाचे कार्य अतिशय निराशाजनक आहे. संशोधनासाठी उभ्या राहिलेल्या मोठमोठ्या संस्था कर्त्या पुरुषांच्या आणि व्यासंगी संशोधकांच्या अभावी पोरक्या झाल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात आर्थिक अनुकूलता असताही छत्रपती शिवाजीमहाराजांचे एखादे शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टिकोणातून चरित्र लिहिले जाण्याची क्षमता आपल्यामध्ये असू नये, याची खंत वाटते. असे एखादे शिवचरित्र मराठा मंदिरच्या प्रेरणेने लिहिले जावो, की ज्याच्यामध्ये उपलब्ध अशा साऱ्या ऐतिहासिक साधनांना छेद देऊन शास्त्रशुद्ध रीतीने त्या युगपुरुषाचे खरेखुरे दर्शन घडेल आणि महाराष्ट्रातील आबालवृद्धांनाही ते वाचनीय ठरेल.

हे कार्य कधी होईल तेव्हा होवो, परंतु सध्या हाती घेतलेले कार्य ज्यांच्या ज्यांच्या मदतीने साकार झाले आहे त्या साऱ्यांबद्दल ऋणभाव व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. श्री. गावडेसाहेब, श्री. शेटके व मराठा मंदिरचे अन्य कार्यकर्ते यांचा उल्लेख मी केलाच आहे. श्री. शेटके यांनी सबंध वर्षभर या कार्यात मला मार्गदर्शन केले आहे. त्यांच्याविना हे काम तडीस गेले असते असे वाटत नाही. ग्रंथाच्या आराखड्यासंबंधी पु. ल. देशपांडे, डॉ. वाळिंबे, प्र. वि. जठार, डॉ. मालशे, यांच्याशी केलेल्या चर्चेचा मला फार उपयोग झाला. साहित्य संस्कृति मंडळाच्या काही सदस्यांनीही बहुमोल सूचना केल्या. ग्रंथातील लेखकांशी त्यांच्या त्यांच्या लेखाच्या स्वरूपाबद्दलही वेळोवेळी विचारविनिमय केला, त्याने मोठ्या प्रमाणात पुनरुक्ती टळण्यास मदत झाली. श्री. पु. ल. देशपांडे यांनी पुरस्कारार्थ ‘ स्वागतपर गद्य ’ लिहून मराठी संस्कृतीचे मोठे मार्मिक दिग्दर्शन केले आहे आणि या ग्रंथाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे.

ग्रंथाची सूची करण्याचे कार्य श्री. म. श्री दीक्षित यानी केले आहे. या सर्व साहाय्यकर्त्यांचा मी अतिशय ऋणी आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात अधिकारी व्यक्तींकडून लेखनसाहाय्य मिळाले, ते केवळ माझ्या धडपडीमुळे नसून संस्थेबद्दलच्या प्रेमाने, याची मला जाणीव आहे.

पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे हाती आलेले काही लेख या ग्रंथात छापता आले नाहीत. त्यामुळेच आणखी काही लेख हाती येण्याची शक्यता असताही त्यांचा

जाणूनबुजून पाठपुरावा केला नाही. मोठ्या प्रमाणात सर्व अंगे प्रकटली आहेत, त्यामुळे एखादद्दुसऱ्या विषयावर लेख नसला तरी त्याकडे दुर्लक्ष करावे लागले.

शेवटी कल्पना मुद्रणालयाचे धडाडीचे चालक माझे मित्र श्री. चिंतामणराव लाटकर यांचे आभार मानल्याखेरीज हे दोन शब्द पुरे होणार नाहीत. त्यांनी आत्मीयतेने विशेष लक्ष दिले आहे हे मुद्दाम सांगितले पाहिजे.

१ जानेवारी १९७१

भीमराव कुलकर्णी

अनुक्रमणिका

स्वागतपर गद्य

पु. ल. देशपांडे

'अस्मिता महाराष्ट्राची' हा काही एका विशिष्ट हेतूने तयार केलेला ग्रंथ आहे. 'मराठा मंदिर' ह्या संस्थेचा रौप्यमहोत्सव यंदा साजरा होत आहे. व्यक्तींचा वाढदिवस साजरा होत असताना आत्मपरीक्षणाला मानले तर महत्त्व असते. थोर व्यक्ती असे दिवस आत्मचिंतन वगैरे करण्यात घालवतात. सामान्य माणसे आप्तेष्टांच्या मेळाव्यात मौज करतात. सार्वजनिक संस्थेचा वाढदिवस करमणुकीच्या कार्यक्रमांनी आणि प्रीति-भोजनाने साजरा होत असतो, परंतु त्याबरोबर ज्या कार्यक्षेत्रांशी ती संस्था निगडित असते त्यात तिची वाटचाल कधी झाली हे पाहणे आणि पुढल्या विकासाच्या दृष्टीने पद्धतशीर विचार करणे, त्यासाठी तज्ज्ञांची मते घेणे, त्यांचा सल्ला घेणे हाही एक उत्सवाचाच भाग असतो. 'महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास' हेच मुळी 'मराठा मंदिर' ह्या संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. 'मराठा तेतुका मेळवावा' हे समर्थांचे स्वप्न डोळ्यांपुढे आहे. आपल्या राष्ट्रगीतात महाराष्ट्राचा उल्लेख पंजाब, गुजरात यांच्या जोडीला महाराष्ट्र असा नसून 'मराठा' असा आहे. त्या दृष्टीने 'मराठा मंदिर' म्हणजे सारा महाराष्ट्र देश हेच घर मानून त्या साऱ्या वास्तूच्या अंतर्बाह्य विकासाचा विचार करणे, त्याप्रमाणे आचार करणे आणि महाराष्ट्रात अशी विचार-आचाराची एकत्र आणणारी क्षेत्रे तयार करण्याचा प्रचार करणे हे ध्येय मनात ठेवून कार्य करणारी संस्था. 'मराठा' ह्या शब्दाची व्याप्ती आता जातिवाचक न ठेवता प्रांतवाचक व्हावी अशी महाराष्ट्रातल्या सर्वच विचारवंतांना ओढ आहे. बहुजनसमाज आणि महाजनसमाज यांना एकमेकांपासून दूर ठेवणाऱ्या भिंती, नव्या युगात आपोआप पडत असल्या तरी, शतकानुशतकांचे संस्कार, स्वार्थ, अंधश्रद्धा, बुद्धिनिष्ठ वैचारिक संवादाविषयीची अनास्था ह्यामुळे, या पडलेल्या भिंतींपलीकडे नजर टाकण्याचीही मनाची तयारी नाही. अशा वेळी नव्या जीवनाचे बदललेले दृश्य सामान्यांच्या डोळ्यांपुढे आणणे, त्यांचे लक्ष तिथे वेधून घेणे हे समाजातल्या विचारवंतांचेच नव्हे तर कलावंतांचेही कर्तव्य ठरते. ह्या कर्तव्याच्या जाणिवेने एकत्र आलेल्या लेखकांनी, मराठा मंदिराच्या ह्या रौप्यमहोत्सवप्रसंगी जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांविषयी आपले विचार ह्या ग्रंथात मांडले आहेत.

'अस्मिता महाराष्ट्राची' ह्या ग्रंथाच्या नावावरून पहिली प्रतिक्रिया होते ती ही की, महाराष्ट्राची म्हणून काही निराळी अस्मिता आहे का ? एका संघराज्यातल्या एका घटकाला त्या साऱ्या राष्ट्रापेक्षा निराळे असे काही व्यक्तिमत्त्व असते का ? एकाच भारताचे आपण नागरिक असताना गुजरातची किंवा हिमाचल प्रदेशाची अस्मिता आणि महाराष्ट्राची अस्मिता असे बोलल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडा तर नाही ना जात ? असा राष्ट्रीय पातळीवरून प्रश्न विचारला जाणे शक्य आहे. तर आपण सारी ईश्वराचीच लेकरे मग त्यात भेदाभेद कशाला मानायला हवा अशी आध्यात्मिक किंवा मानवतावादी पातळीवरूनही शंका घेतली जाईल. स्वतःला महाराष्ट्रीय म्हणवणे हे संकुचित वृत्तीचे तर लक्षण नाही ना ? अशी भीतीही वाटणे अशक्य नाही. मराठी माणूस म्हणजे काही इतर माणसाहून निराळा आहे का ? काम, क्रोध, लोभ, मोहादी षड्रिपूंनी युक्त असा माणूस इथून तिथून सारखाच ! 'तुका म्हणे एका देहाचे अवयव' यासारखी वचनेही आपल्यावर फेकून हा संकुचितपणा दाखवण्याचा प्रयत्न होईल. अशा वेळी 'महाराष्ट्राची अस्मिता' काय भारतीयांच्या किंवा त्याहूनही व्यापक अशा साऱ्या मानवतेच्या अस्मितेपेक्षा काही निराळी आहे का ? ह्या प्रश्नाचे उत्तर थोडेसे कै. तात्यासाहेब केळकरांसारखे – 'म्हटलं तर आहे आणि म्हटलं तर नाही' असेच द्यावे लागेल. कारण शेवटी महाराष्ट्रीय याची व्याख्या 'जो स्वतःला महाराष्ट्रीय मानतो तो' अशीच करावी लागेल आणि त्यानंतरच तो महाराष्ट्रीय का मानतो याची कारणे शोधावी लागतील. आणि मग त्यातून जे काही समान संदर्भ आढळतात त्यांतून 'महाराष्ट्रीय' नावाचे एक व्यक्तिचित्र तयार होईल. त्याच्या फार तपशिलात जाऊ नये. चित्राच्या ब्लॉकमध्ये तसे पाहिले तर टिंबे टिंबे असतात. प्रत्येक टिंब निराळे असेल. काचेच्या भिंगातून पाहिले तर एक असंबद्ध टिंब. परंतु एका अंतरावरून टिंबांचा तो समूह पाहिला तर एक चित्र दिसायला लागते. चित्रकलेच्या कसल्या तरी रेषाकृतींच्या नात्याने ती टिंबे स्वतंत्र असूनही संबंधित असतात. त्याचप्रमाणे चित्रकार जरा लांब अंतरावरून आपले चित्र पाहून जवळ जाऊन इष्ट फेरफार करतो तसे थोड्याशा अंतरावरून ह्या महाराष्ट्रात राहणाऱ्या मनुष्यांच्या समुदायाकडे पाहिले की, पिढ्यापिढ्यांच्या बऱ्यावाईट संस्कारांतून घडलेल्या मराठी पिंडाचे चित्र डोळ्यांपुढे येते. त्यात भौगोलिक भिन्नत्वामुळे झालेला भौतिक परिणाम आणि वैचारिक भिन्नत्वामुळे, विशेषतः भाषा आणि कला ह्यातून झालेला आध्यात्मिक परिणाम, ह्यातून ही निराळी अस्मिता घडत असते. हे एक स्थूल चित्र आहे. असंख्य अपवाद असूनही एक साम्य असणारे, पिंडापिंडांत भिन्न मती असूनही त्या भिन्न पिंडाचा जेव्हा समुदाय होतो त्या वेळी सामुदायिक पिंड तयार होतो आणि त्या पिंडाचा स्वतंत्र स्वभाव तयार होतो. एरवी कुत्र्याला

देखील 'हाड' न म्हणणारा गरीब कारकून किंवा सालस शेतकरी मोर्च्यांत सुद्धा जोरजोरात घोषणा देतो. ह्यालाच समुदायाचे मानस म्हणतात. मराठी समुदायाचे असे काय निराळे मानस आहे? त्या मानसातले पाणी नवा प्रकाश घेते आहे का? की पूर्वपरंपरा, रूढी यांच्या शैवालाने प्रकाशाला पारखे झाले आहे? तळीचा चिखल उपसला जातो आहे का? पाण्याला प्रवाहित होता येत आहे का? जुने झरे सुकून पाणी नुसतेच साठून गढूळले आहे का? की नवे झर फुटून खळाळते आहे? मानससरोवराप्रमाणेच मराठी लोकमानसाचे हे सरोवर निर्मळ आहे, की त्याचे डबके झाले आहे. त्याचा शोध घेण्याचा ह्या ग्रंथात निरनिराळ्या क्षेत्रांतल्या चिंतनशील लेखकांनी प्रयत्न केला आहे. हे काही आजच्या महाराष्ट्राविषयी दिलेले अंतिम निवाडे नाहीत. इथे मतभेदांना खूप वाव आहे. एवढेच नव्हे तर एकाच संग्रहात निरनिराळी निदाने केली गेली आहेत. निरनिराळी पथ्ये सुचविली गेली आहेत. डॉ. सांकलियासारख्या मानव-वंशशास्त्रवेत्त्यापासून ते शास्त्रीय आणि तर्कशुद्ध विचारांची शिस्त नसणाऱ्या माझ्यासारख्या ललित लेखकांपर्यंत अनेकांनी इथे प्रकटपणाने चिंतन केले आहे. अशा प्रकारचा परिसंवाद कुठल्याही समाजाच्या विकासाला आवश्यक आहे. हा केवळ विरंगुळा म्हणून वाचायचा ग्रंथ नाही. हे विचार-चक्राला गती देणारे इंधन म्हणून वापरावे. मतामतांचा गलबला घातक असला तरी, मतामतांचे सुसूत्रपणाने केलेले प्रकटन मेलडीच्या जोडीला कॉंट्रामेलडी घालून केलेल्या पाश्चात्त्य वृंदवादनासारखी परिणामकारक होते. महाराष्ट्राची अस्मिता सांगणारा हा ग्रंथ केवळ आत्मगौरवाचा भाग नाही तर इथे आत्म-निर्भर्त्सनाही आहे. आत्मसंतोषाइतकाच असंतोषाचा अनिर्वेदाचाही इथे पुष्कळ भाग आहे. आपण कुठे कुठे पुढे आहोत याच्या जोडीला कुठे कुठे मागे आहोत हेही इथे सांगितले आहे.

हे कार्य अत्यंत बिकट आहे. तिथे आजच्या विसाव्या शतकातही आदिम अवस्थेत, सरंजामी विचारात, मध्ययुगीन जमान्यात राहणारे मनुष्यसंघ आहेत. केवळ आर्थिकच नव्हे तर बौद्धिक विषमतेची संवेदनशीलता आणि बथ्थडपणा यांच्या इथे भयानक दऱ्या आहेत. एका महाराष्ट्रातच कोणी पुणेरी आहे, कोणी वऱ्हाडी आहे, कोणी कोकणी आहे. त्यातही नाना पेठा आणि आळ्या. सात-पुड्याच्या जंगलात आदिवासी आहेत, आणि मुंबईच्या गगनचुंबी इमारतीत अद्यवासी आहेत. परंपरेची सोवळी गुंडाळलेली माणसे आहेत आणि ती फेकून दिलेली माणसे आहेत. नाना प्रकारचे पूर्वग्रह आहेत. राजकीय स्वार्थासाठी बुद्धिवादी विचारसरणीचे वावडे नसूनही डोळ्यांवर कातडे ओढून मते मिळ-विण्यासाठी आंधळे रूढाचार पाळणारे नेते आहेत. बुद्धिवादाचा वांझोटा अहंकार आहे. अंधश्रद्धेची कवचे आहेत. त्या साऱ्या गुंत्यातून 'महाराष्ट्रीय'

नावाचे एक व्यक्तिमत्त्व शोधून ते अधिक तेजस्वी व्हावे, पुरुषार्थी व्हावे, विज्ञान युगात जगायला समर्थ व्हावे यासाठी ही धडपड आहे. मागिलांचे ऋण मान्य करून त्यांचा आदरपूर्वक निरोप घेऊन पुढे जायचे आहे आणि एक-विसाव्या शतकाकडची वाटचाल नव्या आत्मविश्वासाने करावयाची आहे. त्याची पूर्वतयारी करण्याची जबाबदारी टाळून चालता येण्यासारखे नाही. " पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाल " हा आपला आशीर्वाद झाला. ही सदिच्छा झाली. इच्छेला योग्य कर्माची जोड हवी. मग ती इच्छा संगीताच्या क्षेत्रातली असो वा कृषी उद्योगातली असो.

आपले ' स्वत्व ' नेमके कशात दडून आहे हे सतत हुडकावे लागते. नुसत्या आयत्या घोषणा वापरून चालत नाही. गौरवांची गंजलेली बिरुदे लावून भागत नाही. शिवरायाचा प्रताप हा नवा प्रताप करण्यासाठी आठवा-यला हवा. ते न घडता जर पुतळे आणि उत्सव यांतच त्या सप्ताहाची समाप्ती होत असेल तर ते आठवणे विसरण्याच्याच लायकीचे आहे. शिवाजीमहाराज, लोकमान्य, महात्मा फुले, आगरकर, लोकहितवादी ही माणसे आता समाजाचे कल्याण करणाऱ्या कालसापेक्ष विचारांची प्रतीके आहेत. त्यांच्या नामस्मरणा-तच जर आपण धन्यता मानून राहू लागलो तर केवळ खोट्या अहंकाराने आपण आंधळे होऊ. जादूने आंगठी काढून देणारा सत्यसाईबाबा हा ज्याला गुरू मानायचा आहे त्याने सत्याचा शोध घेणाऱ्या फुल्यांचे नावसुद्धा घेण्याचा हक्क गमावला आहे हे ध्यानात यायला हवे. ज्योतिबा फुले आणि हे बाबालोक एका ठिकाणी नांदू शकत नाहीत. एखाद्या गोष्टीला चमत्कार म्हणणे हे अज्ञानाचेच द्योतक मानले पाहिजे. आकाशातून उडणारे विमान हे विमानोड्डाणाचे विज्ञान अवगत नसलेल्या माणसाला चमत्कारासारखेच असते. जादूचा प्रयोग समजेपर्यंत चमत्कार. तो समजून घेतला की चमत्कार संपतो. पण तो चमत्कार मानण्यातच जर माणूस धन्यता मानू लागला तर तो माणूस मनाने थांबला असे म्हटले पाहिजे. आणि माधव जूलियन म्हणतात त्याप्रमाणे जो " थांबला तो संपला. "; असे आम्हांला संपून जायचे नाही. आम्हाला चालायचे आहे. हे चालताना सतत विचारचक्रही चालले पाहिजे. धर्मचक्र-परिवर्तन हे सारे विचारचक्रपरिवर्तनच असते. वैदिकांचे विचारचक्रपरिवर्तनाचे कार्य थांबले म्हणूनच बुद्धाला आपल्या विचारांनी त्या चक्राला नवी गती आणि नवी दिशा द्यावी लागली. बौद्ध विचारांतही जेव्हा स्थितिस्थापकत्व आले त्या वेळी आद्य शंकराचार्यांना नवा धक्का देऊन ते चक्र चालवावे लागले. त्यांच्या मागून पुन्हा हे चक्र थांबले. विवेकानंद आले आणि त्यांनी पाश्चात्त्य देशांतून आलेले नवे विज्ञानाचे वारे आणि आळसामुळे धूळ साचून लुप्त झालेले शाश्वत सुंदर जीवनाला सामोरे जाणारे वेदकालीन ऋषींचे विचार ह्यातून ह्या परिवर्तनाला

पुन्हा गती देण्याचा प्रयत्न केला. आपल्याला विसाव्या शतकाकडून एकविसाव्या शतकाकडे जायचे आहे. पुन्हा सतराव्या शतकातल्या शिवकालात नव्हे. शिवाजीमहाराज हे त्यांच्या काळातील 'अद्ययावत' नेते होते. आपल्याला आपल्या काळाचा विचार करायला हवा.

हा विचार जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात व्हायला हवा. आणि म्हणून एखाद्या प्रांतातल्या माणसांची जीवने ज्या एका वाटेने आलेली आहेत, ऐतिहासिक घटनांचे ज्या पद्धतीचे आघात त्या लोकांनी सोसले आहेत, त्यांचा अभ्यास करूनच त्यांच्या पिंडाच्या खोडी पाहायला हव्यात. इतिहास मग तो राजकीय असो वा सांस्कृतिक जसा मिटून चालणार नाही तद्वत त्यातच डोके खुपसून भागणार नाही.

ज्यांनी ज्यांनी अशी शहामृगी वृत्ती स्वीकारली त्यांची वाताहात झाली. इंग्रजी आक्रमणानंतर एका निराळ्याच संस्कृतीशी आपला परिचय झाला. आजवर भारताला अपरिचित असणाऱ्या एका भाषेने नव्या विचारांची, जगण्याच्या निराळ्या तऱ्हेची, वैज्ञानिक प्रगतीची दारे उघडून आतल्या नव्या नव्या दालनांचे दर्शन घडवले. ते एक राजकीय आक्रमण होते हे खरेच; परंतु त्या आक्रमणातून भारतात एक संक्रमणही घडून आले. आध्यात्मिक आणि वैचारिक परिवर्तन जाऊ दे, केवळ आधिभौतिक परिवर्तनामुळे आपली जीननपद्धतीच बदलली. आंधळ्या श्रद्धांचे बुरुज कोसळले. श्री. के. क्षीरसागरांनी याच पुस्तकात एके ठिकाणी म्हटले आहे ते अगदी खरे आहे, की आगरकरांच्या निबंधांनी झाली नाही एवढी सामाजिक क्रांती आगगाडी आणि हॉटेलांनी केली. शिवाशिव, सोवळेओवळे ह्या कल्पनांच्या ठिकऱ्या उडाल्या. पण खानावळी निघाल्यानंतर देखील त्यांत ब्राह्मण खानावळ आणि मराठा खानावळ असा पंक्तिप्रपंच होता. परंतु बारा बलुती कोसळल्यावर पोटासाठी मुंबईतल्या गिरण्या आणि कचेऱ्यातून आलेल्या माणसांची निराळीच संस्कृती तयार झाली. उत्पादनाची साधने बदलली की, समाज बदलतो ह्या मार्क्सच्या तत्त्वाचे खरेपण अनुभवाला यायला लागले. दुसऱ्या महायुद्धाने तर जुन्या जगाचा जगभरच अंत पाहिला. त्याच शतकात युरोपात भांडवलशाही, हुकूमशाही आणि मजूर-शाही अशा तीन राजकीय तत्त्वप्रणालींचे संघर्ष सुरू होऊन रशियासारखे एक बलाढ्य मजूरशाही राष्ट्र मातबर होऊन बसले. मार्क्सवादाने 'कामगार' नावाचा आजवरचा उपेक्षित माणूस संघशक्तीच्या बलावर किती बलाढ्य होतो याचे दर्शन घडवले. भूतदया म्हणून नव्हे तर प्रत्येक माणसाला मानाने जगण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे या विचाराकडे मानवी समाज जाऊ लागला.

ह्या साऱ्यांचा परिणाम आज आफ्रिकेतल्या जंगलात जंगली जनावराप्रमाणे राहणाऱ्या जमातींपर्यंत जाऊन जिथे पोहोचला तिथे महाराष्ट्रावर त्याचा काहीच

संस्कार झाला नाही असे मार्क्सवादाचा कट्टर शत्रूही म्हणणार नाही. मार्क्सवादी विचारसरणीने प्रचंड विजय पाहिले तसे प्रचंड पराजयही पाहण्याची पाळी त्या तत्त्वज्ञानावर आली आहे आणि भांडवलशाही देशांनी देखील 'ट्रेड युनियन' पद्धतीचा स्वीकार केलाच आहे. वैयक्तिक 'मालकी' ह्या कल्पनेतला अमर्याद-पणा आता अमेरिकेतही संपला आहे. कोट्याधीश मालकांना आता अमेरिकेतले कामकारसंघ संपाच्या शस्त्राने दाती तृण धरायला लावीत आहेत. माणसांच्या संघटनांचे हे सारे स्वरूपच बदलल्यानंतर एके काळी खेड्यात 'वृत्ति'वैचित्र्यावर आधारित असणाऱ्या जातिसंघाचे अस्तित्वच मुळी संपले आहे. मी माझी बुद्धी वापरणार नाही. वस्तुस्थितीकडे पाहणार नाही. ह्या हट्टापलीकडे आता धर्मजात ह्या गोष्टींना कसलाही अर्थ उरला नाही. विनोबासारख्यांनी देखील आता जगात फक्त विज्ञान आणि अध्यात्म राहील, धर्मांचे दिवस संपले, असे सांगितले आहे. रस्ता रुंद करायचा असला की, आपण विरोधाला न जुमानता देऊळ आणि मशिद उचलतो. विज्ञानाने दिलेल्या वाहनांच्या वाहतुकीला आपण आता 'टॉप प्रायॉरिटी' दिली आहे. अजूनही राजकीय मते अंधश्रद्धांकडून मिळणे किफायतशीर असल्यामुळे उचललेल्या मंदिरांना आणि मशिदींना दुसरीकडे जमीन दिली जाते. पुढल्या शतकात तीही चिंता बाळगण्याचे कारण राहणार नाही. वाहतुकीची अडचण जशी हिंदू आणि मुसलमान ह्या दोघांनाही मोठ-मोठ्या शहरांत तितकीच तापदायक त्याचप्रमाणे विज्ञान मार्गाच्या प्रवासाला जाताना आपला चालण्याचा रस्ता मी जुनाच ठेवीन म्हणणेही तापदायक ठरणार आहे. सुदैवाने हिंदू समाजात वैचारिक क्रांती होते आहे. मुसलमान त्या मानाने सारे काही कुराणात आहे म्हणून झापडे लावून बसले आहेत. ते त्यांनाच घातक ठरणार आहे. आज ह्यातून काही तात्कालिक राजकीय स्वार्थ साधल्यासारखे त्यांना वाटत असले तरी सनातनी आणि गतिहीन समाजाचा संताप ओढवून घेऊन आपला मार्ग काढणारा महात्मा फुल्यांसारखा सत्यशोधक त्या समाजातही निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. कारण नव्या जगात त्यांच्याच समाजाला अधिकाधिक हाल सोसावे लागतील. समाजाच्या प्रगतीला कोणी भारभूत होऊन त्याची गती रोखण्याचा प्रयत्न करील तर त्याला समाज खपवून घेत नाही. हिंदूंचे धर्मगुरू जसे काळाची परिवर्तने पाहायला असमर्थ ठरल्यामुळे निःसत्त्व दंडधारी बनले तसेच मुसलमानांचेही गुरू ठरतील. कालचक्राला भलत्या ठिकाणी क्षमा मंजूर नाही. मुंबईत नवऱ्याला पोटासाठी सकाळी कारखान्यात जावे लागल्या-बरोबर घरच्या बायकांना गोषातून बाहेर पडून दूधकेंद्राच्या रांगेत येऊन उभे राहावे लागते. हिंदूंच्या बायकांना आठ आठ आणि दहा दहा बाळंतपणाच्या आणि तितक्या पोरवड्याच्या संगोपनाच्या जाचातून मुक्ती मिळाल्याचे दृश्य दिसत असताना मुसलमान बाई फार काळ गप्प राहणार नाही.

स्त्रिया, वैश्य आणि शूद्र ह्यांना सद्‌गती देणाऱ्या भगवन्ताच्या भूतदयेच्या आश्वासनापेक्षा सर्वच दलितांनी आता आम्ही कुणाच्या मेहेरबानीवर जगू इच्छित नाही हे बजावून आपले हिरावून नेलेले हक्क मिळवायला सुरुवात केली आहे. ह्याच पुस्तकात श्री. कृ. भा. बाबर यांचा एक लेख आहे. त्यात त्यांनी आपला एक मार्मिक अनुभव सांगितला आहे. एका खेड्यातल्या शाळेत मुली शिकायला आलेल्या दिसेनात. तेव्हा त्यांनी विचारले, " हे असे का ? " कुणी तरी सांगितले की शिकलेल्या मुलीला किंमत कमी येते. काही समाजात लग्नात मुलीच्या बापाला हुंडा मिळतो. शिकलेली मुलगी कोणी पत्करत नसे. कारण ती गोठ्यातली गाय व्हायला राजी असणार नाही ही भीती. आज तसल्याच ग्रामीण संस्कृतीतून येणाऱ्या स्त्रिया ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंत पुरुषांच्या जोडीने राजकीय जीवनात हिरीरीने भाग घेऊ लागल्या आहेत.

उपेक्षित जीवनाकडे साहित्यातही आजवर भूतदयेने पाहिले जायचे. कारण पाहणारे ते जीवन एका निराळ्या उंचीवरून पाहात होते. आज बाबूराव बागूलांसारखा ते जीवन भोगलेला माणूस ती दुःखे वेशीवर आणून टांगू लागल्याबरोबर केवळ आशयच नव्हे तर सगळी मराठी भाषा बदलू लागली. शिवीगाळ, मारामारी, खून, रक्तपात ही जिथे साध्या जगण्यासाठी द्यावी लागणारी रोजची किंमत आहे अशा जीवनाचे दर्शन घडवताना त्या माणसांच्या वेदना ज्या भाषेतून प्रकटल्या जातात ती भाषा अपरिहार्यपणाने साहित्यात आली. त्यामुळे श्लीलाश्लीलतेविषयी विदग्ध समाजात रूढ असलेल्या कल्पना घेऊन जगणाऱ्यांना आणि ह्या दरिद्री दुनियेकडे सोयिस्कर डोळेझाक करणाऱ्या किंवा नुसताच सहानुभूतीचा साहित्यिक उसासा टाकणाऱ्या शिष्टांना झिणझिण्या आल्या. 'शील' देखील आर्थिक दृष्ट्या परवडावे लागते. येईल त्या गिऱ्हाइकाला शेजेवर घेऊन चूल पेटवणारी आई हेच ज्या मुलाला मातेच्या शीलाचे दर्शन झाले त्याला स्त्रियांच्या शीलाविषयीच्या गोडगोड कथा नकली वाटायला लागल्या. आजवर ही मुले वाऱ्यावर उधळली जात. पण सगळीकडे शाळा झाल्या. शिक्षण फुकट मिळू लागले. त्यातली काही पोरे शिकली. कॉलेजात गेली आणि त्यांनी जेव्हा हे विश्वरूपदर्शन घडवले तेव्हा लटपटत्या अर्जुनाच्या अंगांना घाम फुटला. 'भडव्या आणि भोसडीच्या' हे शब्द जिथे सतत 'बाळ आणि सोन्या' ह्याऐवजीच बाळपणी कानांवर गेले त्या शब्दांना जणू जीवनात अस्तित्वच नाही हे कसे मान्य होणार ?

हरिभाऊ आपट्यांपासून ना. सी. फडक्यांपर्यंतच्या कादंबऱ्यांच्या जगात हे असले काही दिसले नव्हते. ते साहजिक होते, कारण त्यांच्या अनुभूती निराळ्या होत्या. ह्याहून काही एक निराळे जग आहे, तिथेही भावनांचे नाना कल्लोळ आहेत, तिथेही कुणीतरी कुणावर तरी जीव ओवाळून टाकते आहे, याची आम्हाला जाणीव

नव्हती आणि एका अंतरावरून असली तरी ही मंडळी साहित्याच्या दिवाणखान्यात वस्तीला येतील अशी कल्पना नव्हती. परंतु आज, धुवट समाजाला कळकट, अभद्र वाटावे अशा प्रकारचे ते जीवन साहित्यात ओजस्वी होऊन प्रकटले आहे. केवळ प्रचाराच्या हट्टाने नव्हे तर उत्तम कलेचे स्वरूप धारण करून. बी. कवींनी ' नव्या उमेदी नवे जिव्हाळे, नव्या मराठ्याचे ' दाखवणारे ' नवे कवन ' हवे म्हटले होते. परंतु जिथली सारी उमेद खचली आहे, जिथे जिव्हाळा परवडत नाही अशा ह्या 'मराठ्यां'चे जीवन कथा, काव्य, कादंबऱ्यांतून आणून संवेदनाशील परंतु जन्माने तथाकथित उच्चवर्णीय समाजातल्या लोकांमध्ये, दलित समाजातल्या लेखकांनीच खरे नवे जिव्हाळे निर्माण केले आहेत.

निरनिराळी नवी नाती जोडण्याचा हा काळ आहे. सुशिक्षित वैज्ञानिकांनी आपल्या विज्ञानाचा ग्रामीण जीवनातल्या कृषी किंवा तत्सम उद्योगधंद्यांच्या विकासासाठी उपयोग करून घ्यायला हवा. ह्या दृष्टीने ह्या ग्रंथात ग्रामीण जीवनात कार्य करणाऱ्या जिल्हा परिषदा आणि ग्रामीण शिक्षण इत्यादी विषयांवरचे विचारमंथन झाले आहे. यंत्राने घाऊक उत्पादनाचा आरंभ केला आणि हस्तव्यवसायाचा अंत झाला. महाराष्ट्रात एक स्वस्तिक रबर कारखाना निघतो आणि हजारो मराठी चांभारांचा परंपरागत उद्योग संपतो. ऑटोरिक्षा येतात आणि टांगेवाले संपतात. हे अपरिहार्य आहे. त्याला उत्तर परत एक एक पायताण करणाऱ्या चांभाराची पुन्हा प्रतिष्ठा करणे किंवा पुन्हा ' टांगे ' सुरू करणे हे नव्हे. महाराष्ट्रातल्या उद्योगक्षेत्रातल्या अर्थपंडितांनी आणि योजनातज्ज्ञांनी हे नवे आव्हान स्वीकारायला हवे. व्यापाराची महाराष्ट्रीयांना रुची कमी. परंतु नफेखोर व्यापाऱ्यांनी जीवन असह्य केल्यावर आता महाराष्ट्रीयांनी परप्रांतीय व्यापाऱ्यांऐवजी आपण नफेखोर व्यापारी होणे हा त्यावर उपाय नसून व्यापारात आणि उत्पादनात ' सहकारी चळवळ आणून ' नफेखोरी ह्या समाजविघातक आर्थिक पद्धतीला आळा घालणे हा उपाय आहे.

इंग्रजांनी रूढ केलेल्या शिक्षणपद्धतीचे वैय्यर्थ्य लक्षात आल्यावर ग्रामीण विभागात स्थापन झालेल्या कॉलेजांनीही त्या जुन्याच शिक्षणपद्धतीचे प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांनी अनुकरण करणे म्हणजे हजारो नवे निरुपयोगी पदवीधर निर्माण करून समाजावर नवा भार टाकणे आहे. उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण झाल्याखेरीज शहरांकडला ओघ थांबणार नाही. खेडी त्याच गतानुगतिकतेच्या अंधारात राहतील हे जाणून महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या भागात महाराष्ट्र सरकारने औद्योगिक वसाहती काढल्या आहेत. कोल्हापूर भागाने ह्या क्षेत्रात खूप आघाडी मारली आहे. महाराष्ट्राच्या इतर भागात हवा तसा प्रतिसाद मिळत नाही म्हणतात. तिथेही महाराष्ट्राबाहेरचे लोक येऊन ह्या सवलतींचा फायदा घेतात. भारतीय म्हणून त्यांचा स्वीकार करावा हे मान्य करूनही मराठी लोकांनी

ह्या योजनांचा फायदा का घेऊ नये याची खंत वाटतेच. ह्या नव्या जीवनात उपयुक्त ठरणाऱ्या शिक्षणाचा विचार होणे आवश्यक आहे.

विज्ञानयुगाचा सूर्य उगवून किती तरी वर आला पण त्याची किरणे आमच्या मनःपटलाला अजून उजळीतच नाहीत. श्री. यदुनाथ थत्ते यांचा 'विज्ञानयुगातली मराठी' अस्मिता आणि श्री. मधुकर ना. गोगटे यांचा 'विज्ञानाभिमुख महाराष्ट्र' हे दोन्ही लेख अत्यंत महत्त्वाचे आहेत. ' विज्ञानातले पांडित्य म्हणजे वैज्ञानिक दृष्टी नव्हे ' हा श्री. गोगटे यांचा विचार फार मोलाचा आहे. मी जीवनातली कोडी बुद्धीने आणि अभ्यासाने जाणून घेईन, ही जिद्द आणि मला ती जाणता येतील हा आत्मविश्वास म्हणजे वैज्ञानिक दृष्टी. माणसाला अज्ञात अशा असंख्य गोष्टी आहेत. परंतु त्या अज्ञानाचा भेद करून ते मी ज्ञात करून घेईन, ह्या धडाडीने निसर्गाचे विराट स्वरूप जाणून घेणे हे वैज्ञानिकांचे कार्य आणि ते वैयक्तिक साक्षात्काराच्या समाधानात न राहता त्या ज्ञानाभोवती कसलीही गूढ वलये आणि ढोंगधत्तुरा किंवा बुवाबाजी न करता ते ज्ञानसोपान स्वच्छपणाने ग्रंथातून दाखवणारे वैज्ञानिक हे जगाचे खरे उपकारकर्ते आहेत. वैयक्तिक मोक्षाकडून सामाजिक मोक्षाकडे नेणारे विज्ञान हे जपतप-अनुष्ठानापेक्षा अधिक तारक आहे. विठ्ठलाला अठ्ठावीस युगांत हटवता न आलेला पंढरपुरातला कॉलरा विज्ञानाने हटवला. शस्त्रक्रिया होत असताना रोग्याला होणाऱ्या प्राणांतिक वेदना मंत्राने थांबल्या नाहीत. मूल चिकित्सा किंवा 'ॲनेस्थेसिया'चे विज्ञान शिकलेल्या डॉक्टरांनाच त्या हमखास थांबवता येतात. मानवी देहातल्या पेशींचे, त्या पेशीत शिरणाऱ्या कीटाणूंचे सूक्ष्मदर्शकातून पत्ते शोधले, त्यांच्या हालचाली शोधल्या, आणि सैन्याशी लढावे तसे हे वैज्ञानिक रोगांशी लढले. हे सारे दिसत असताना 'श्रद्धा' ह्या भोंगळ कल्पनेने आंधळे होऊन जर हिंदू लोक सिद्धिविनायक शोधीत राहतील, मुसलमान मशिदी उठवीत बसतील आणि ख्रिश्चन लोक व्हर्जिन मेरीला मेणाचे हात, पाय वाहात राहतील तर विज्ञानाने दिलेल्या वरदानाला पारखे होतील. श्रद्धा हवी कर्मावर.

आम्ही त्यागी आहोत, बुद्धिवादी आहोत – हा एक आमचा सोयिस्कर गैरसमज आहे. रँग्लर परांजपे यांनी माफक वेतन घेऊन शिक्षणसंस्थेत आजीव सेवा केली. हा त्याग झाला. पण त्या शिक्षणसंस्थेत आणि तत्सम इतर शिक्षणसंस्थांतून काम करणाऱ्या अनेक शिक्षकांना त्या संस्थांतून मिळणाऱ्या वेतनापेक्षा अन्यत्र रुपयाभर तरी अधिक मिळाला असता की नाही याची शंका आहे. त्यांनी उगीच त्यागाबिगांच्या गप्पा मारू नयेत. जी गोष्ट त्यागाची तीच बुद्धिवादाची. बुद्धिवादी महाराष्ट्रातले वरपिते हुंड्याला अडून बसतात – खाजगी आणि सार्वजनिक सत्यनारायणात साधुवाण्यासारखी आपलीही संसारनौका तो सूड काढणारा सत्यनारायण बुडवेल म्हणून प्रसाद खातात. जवळजवळ

सगळ्या मराठी साप्ताहिकांतून भविष्ये येतात. गणपती बाप्पांची तर खूपच चलती आहे. दहांतल्या पाच मराठी लोकांच्या बोटांत शंकर, विठ्ठल वगैरे देवांच्या नव्हे, चमत्कार करणाऱ्या बुवांच्या आंगठ्या असतात. कुठल्याही राजकीय पुढाऱ्याने ह्या दैववादाचा कडाडून निषेध केलेला नाही. ज्या भिक्षुकशाहीवर ज्योतिबांनी रास्तपणाने कडाडून हल्ला केला, त्यांच्या नावाने प्रासंगिक गर्हिवर काढणारे आमच्या बहुजनसमाजातले नेते भटजीबुवांच्या 'मम म्हणा' ला मम म्हणत सहकारी साखर कारखान्यांचे किंवा ग्रामीण विद्यालयांच्या इमारतींचे भूमिपूजन करतात. अशा वेळी ज्योतिबा फुल्यांचे पुण्य संपले आणि तिथी उरली असेच वाटते. समाजाचा अभ्युदय हा योजनापूर्वक केलेल्या भौतिक अभ्युदयातच आहे यावर श्री. पां. वा. गाडगीळ यांनी ह्याच ग्रंथात केलेले विवेचन अत्यंत उद्बोधक आहे. एकदा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणाले होते की, आम्ही इहलोकवासी असूनही मनाने परलोकवासीच असतो.

भौतिकावर भर दिला की 'माणूस फक्त रोटीवरच जगत नाही' हे सूत्र आठवणे साहजिक आहे. पण रोटीवरच जगत नसला तरी रोटीशिवाय अजिबात जगू शकणार नाही. बहुतेक सामाजिक प्रश्न मुख्यतः भुकेचेच आहेत. पृथिवी सस्यशालिनी झाल्याखेरीज देश क्षोभरहित होत नाही, आणि विचारवन्त निर्भय होत नाहीत. भुकेने व्याकुळ झालेल्या शिष्याला शेवटी 'ब्रह्म' अन्नातच सापडले. ते मिळाले नाही की ब्रह्मचौर्य सुरू होते. दंगे होतात, गोळीबार होतात. गुंडांचे फावते.

आज मराठी माणूस म्हणून जगताना प्रथम ह्या आपल्या प्रान्तातील माणसे माणूस म्हणून किमान गरजा भागवून जगतात की नाही हा विचार अग्रहक्काचा मानायला हवा. छत्रपती, लोकमान्य वगैरे त्यानंतर! माणूस म्हणून जगायला अन्न वस्त्र निवारा आणि जगण्याला साहाय्य करणारी विद्या किंवा कारागिरी हे किमान आवश्यक घटक आहेत. हे न मिळता अर्धपोटी जगणारे आणि फूटपाथवर झोपणारे लोक जोपर्यंत प्रचंड संख्येने आपल्याभोवती दिसत आहेत तोपर्यंत आपल्या मराठी अस्मितेलाच लागलेला हा डाग मानायला हवा. मुंबईच्या फूटपाथवर पंजाबी बिऱ्हाड नाही. एका भाषेने बांधलेले लोक एवढाच धागा घेऊनही जरी जगावयाचे ठरवले तरीही नव्या युगातले नवे संदर्भ घेऊनच जगावे लागेल. हे सारे संदर्भ भौतिक आहेत. महाराष्ट्रातल्या पांडुरंगाच्या जत्रेला गर्दी किती जमली यापेक्षा मराठी साक्षरांची संख्या यंदा किती वाढली हा विचार महाराष्ट्राच्या अभिमानाचे अधिक चांगले द्योतक आहे. अल्लामियासाठी किंवा भगवन्तासाठी कितीजण तडफडताहेत यापेक्षा महाराष्ट्रात पाण्यावाचून इथे कोणीही तडफडत नाही ह्या अनुभवाने अधिक मोठा आध्यात्मिक आनंद वाटला पाहिजे. चार चार मैलांवरून पाण्याचे घडे भरून डोक्यावरून

ते वाहून आणणाऱ्या बायका आणि बायकांना ह्या कामाला लावून आपण पिंपळाच्या पारावर चकाट्या पिटत बसणारे मर्द पाहिले की ग्रामीण बायकांच्या देखील सहनशीलतेचा अंत होऊन बंगाली नक्षालांसारख्या त्या असल्या ऐदी पुरुषांचे खून करतील असे मला वाटू लागते. खेड्यापर्यंत मुलींच्या शाळा आता आताशीच पोहोचताहेत. आज ना उद्या त्यातून ज्योतिबांच्या तपश्चर्येचे फल होऊन आलेली ज्योतिर्मयी ह्या पुरुषप्रधान संस्कृतीत होणाऱ्या स्त्रियांच्या-विशेषतः ग्रामीण प्रदेशातील स्त्रियांच्या-पिळवणुकीविरुद्ध बंड उगारल्याशिवाय राहणार नाही. उद्या तिथली स्त्री शिकून प्रगल्भ झाली, आंधळ्या अनुकरणाऐवजी स्वतः विचार करावयाची तिची शक्ती वाढली म्हणजे पातिव्रत्य, कुलाभिमान, नवऱ्याच्या लाथा खात जगायचे सौभाग्य ह्या आंधळ्या संस्कारांना ती झुगारून देईल. हे भोग केवळ आपल्याच ग्रहयोगामुळे नाहीत तर हजारो स्त्रियांना हेच दुःख भोगावे लागते याची सामाजिक जाणीव तिला होईल. डॉ. आंबेडकरांनी पूर्वसुकृत, गेल्या जन्मीचे पाप असल्या भाकड भोळेपणातून अस्पृश्यांना नवी दृष्टी दिली आणि चार-आठ दिवसांपूर्वी ज्या देवांच्या तसबिरीपुढे ते आंधळेपणाने हात जोडून उभे होते, ज्यांना परलोकातल्या शासनाच्या भीतीने घाबरत होते त्या देवांच्या तसबिरी त्यांनी उकिरड्यावर फेकून दिल्या. आमचे शंकराचार्य त्या वेळी पाद्यपूजा घेत बसले होते. ज्या देवांनी ह्या अस्पृश्यांना इहलोकातच नरकयातना भोगायला लावल्या होत्या, असल्या सूडबुद्धीच्या देवाची परलोकात तो आपली बरी सोय करील ही कुणी खात्री सांगावी? विचाराच्या परिसाचा स्पर्श झाला म्हणजे जीवनाला हे असे सुवर्णमूल्य लाभते. आमच्या मराठी बायका, मग त्या हिंदू असोत वा मुसलमान, जर बहुसंख्य प्रमाणात दलितच राहिल्या, तर त्याही आपल्या पतिदेवांना ह्या देवांना मिळाला तसलाच धडा शिकवतील. भिक्षुकांनी आणि पाद्री-मौलवींनी वारंवार पुरुषांच्या सोयीसाठी बांधलेल्या झापडांनी आणि वैधव्य वगैरे कल्पनांच्या भीतीने त्या बिचाऱ्या आंधळ्या राहिल्या आहेत. आता साऱ्या जगातल्या ज्ञानाचे किरण विज्ञान त्यांच्या दाराशी आणते आहे. त्यातल्या काही मुली कॉलेजात जातील. विज्ञान-पंडिता होतील. समाजशास्त्रवेत्त्या होतील. राजकीय पुढारी होतील. सत्तेच्या स्थानावर येतील. स्त्रियांना 'मूल' निसर्गाने दिले असले तरी 'चूल' पुरुषांनी दिली. स्वैपाक करणे हा काही स्त्रियांचा निसर्गधर्म नव्हे. काही कामे बायकांना करताच येणार नाहीत अशी कल्पना होती. मी जर्मनीत बायकांना ट्राम चालवताना पाहिले आहे. पॅरिससारख्या शहरात बायका टॅक्सी ड्रायव्हर आहेत. आपल्या देशात गुढगा गुढगा चिखलात बाया पुरुषांच्या जोडीने शेतात राबतात. उत्तम डॉक्टर आहेत. सर्जन आहेत. पराक्रमाचे असे एक क्षेत्र नाही की जिथे युरोपीय आणि अमेरिकन देशांत 'स्त्री' नाही. आपल्या देशात

बायकांच्या मनावर गौण-नागरिकत्वाचे एवढे प्रचंड संस्कार आहेत की, आजही ती ' अर्धांगी ' आहे. तिला अर्धेच व्यक्तिमत्त्व आहे, पण आर्थिक परिस्थितीत उलथापालथ झाल्याबरोबर शहरातल्या पांढरपेशा मुली चाकरमान्या झाल्या. शिक्षण आणि आपणही पुरुषाच्या जोडीने आर्थिक कमाई करू शकतो हा आत्मविश्वास ह्यातून नवी स्त्री जन्माला आली. ग्रामीण स्त्री ही मोलमजुरी करीत असे पण शिक्षणाची जोड नव्हती. उद्या ती नुसती हमाली करीत राहणार नाही. तंत्रज्ञ होईल. आज महाराष्ट्रात इंजिनियर मुली आहेत. टर्निंग, फिटिंग, रेडिओ एंजिनिअरिंग कारखान्यात तांत्रिक कामे करणे–असली कमाईची नवी क्षेत्रे आल्यानंतर ' चल ग सये वारुळाला ' म्हणून अंधश्रद्धेने नागोबाला दूध पाजायला जाणारी सयी फावल्या वेळात खो खो खेळेल, टेबल टेनिस खेळेल किंवा एखादे तंतुवाद्य वाजवील. रेडिओ ऐकेल. फार वर्षांपूर्वी मी उद्याच्या महाराष्ट्रात मला काय दिसावे ह्याचे स्वप्नरंजन करताना म्हटले होते की, उद्याच्या महाराष्ट्रात – ट्रॅक्टरवरून शेत नांगरताना बालकवींची कविता म्हणणारा शेतकरी दिसावा. माझ्या सुदैवाने ना. धों. महानोरांसारखा एक शेतकरी आज बाल-कवींची परंपरा अधिकच उजळणारा कवीच झाला आहे. मराठी कविता मला जिथून फुलायला हवी तिथून फुलू लागली असे वाटले. सारे संतकाव्य, नामदेवासारखा शिंपी, सावत्यासारखा माळी, सजनासारखा कसाई, चोखया-सारखा मंगळवेढे झाडणारा महार, गोरोबांसारखा कुंभार, अशा घाम गाळून जगणाऱ्या हातांनी लिहिले आहे. धक्के घेत–देत ऊन पाऊस खात पचवीत जगणाऱ्या लोकांची सुखदुःखे जेव्हा साहित्यातून उमटतात तेव्हा त्या साहित्याला सत्याची झळाळी लाभते.

शिवाजीमहाराजांनी राजापूरला डचांपाशी एक छापखाना पाहिला होता आणि त्यांनी तो विकत घेतला होता. पुढे तो चालवायला त्यांना कुशल कारागीर मिळेनात तेव्हा त्यांच्याकडून तो कुण्या गुजराती व्यापाऱ्याने विकत घेतला, अशी एक हकीकत मी वाचल्याचे स्मरते. मला सारखे वाटते की, सतराव्या शतकात जर ह्या महाराष्ट्रात पहिला छापखाना निघता तर महाराष्ट्राचा सारा इतिहास बदलला असता. युरोपचा इतिहास हा अशाच एक छापखान्याने आणि बाष्पशक्तीच्या शोधाने बदलला. सारा युरोप अश्मयुगातून बाष्पयुगात गेला. तिथून आज जेटच्या आणि लवकरच अणुशक्तीने चालणाऱ्या वाहनांच्या युगात जाईल. आमच्या डोक्यावर स्वनातीत विमान ध्वनिलहरींची सीमा भेदून ताशी हजारो मैल वेगाने जाताना आम्ही खाली जमिनीवर मारुतीच्या डोक्यावर तेल ओतीत बसलो तर आमच्यासारखे कर्मदरिद्री आम्हीच ठरू.

सारा मराठी समाजच अनर्थाच्या गर्तेकडे धावतो आहे असे म्हणण्याचा आततायीपणा मी तरी करणार नाही. खेड्याचे चित्र बदलते आहे. त्याला नव्या

जगाकडे पाहण्याची ओढ अधिक कशी लागेल हीच चिंता आहे. अशा वेळी नव्या जीवनाच्या मागण्याकडे दुर्लक्ष करून जर आपण तात्कालिक स्वार्थासाठी मध्ययुगीन आंधळ्या श्रद्धांनी जगणाऱ्या समाजाच्या त्या तसल्या श्रद्धांना धक्के द्यायला घाबरू लागलो तर त्यातून रक्तपात आणि अराजकाच्या दिशेने आपण जाऊ लागू. विद्येमध्ये सत्याचा शोध करण्यास आळस करू नये व विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्वांस समान संधी द्यावी हे गेल्या शतकात लोकहित-वादींनी सांगितले होते. आज तशी संधी आली आहे. कॉलेजांची संख्या वाढली आहे. परंतु ती कॉलेजे जर ज्ञानसंपादनाची स्थाने न होता परीक्षेपुरत्या पाठांतरातून होणाऱ्या पदवी-संपादनाची स्थाने होतील, तर त्यात लोकहितवादींचे स्वप्न सत्यात आल्याचा भास निर्माण होईल. ही केवळ आत्मवंचना होईल. ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म हे ईश्वरवाचक रूढ शब्द टाकून 'निर्मिक' हा 'भौतिक' शब्द वापरणारे फुले विचारांना नवे संदर्भ देण्यासाठी धडपडत होते. कारण मूळ क्रांती ही मानसिक क्रांती. नव्या मोटारीपुढे नारळ फोडून तिची गुलाल लावून पूजा करणारे मोटार नावाची एक नवी देवता निर्माण करतात. ते मनाने वैज्ञानिक झालेले नसतात. खंडाळ्याच्या घाटात एक शिंगरोबाचे देऊळ आहे. त्याला दहा पैसे टाकून प्रवास निर्विघ्न कर म्हणणारांना दहा पैशांच्या जकातीवर देव खूष होतो, हा देवाचा अपमान आहे असे वाटत नाही. यंत्र व्यवस्थित हवे, आणि यांत्रिक तरवेज हवा, दक्ष हवा. हे यंत्रज्ञान, यांत्रिकांची दक्षता ही समाजात कशी आणता येईल हाच खरा आध्यात्मिक विचार आहे. विज्ञान हे गतीची पहिली अट काय आहे ते शोधत असते. त्या शिंगरोबाला दहा पैसेच काय दहा हजार रुपये दिले तरी पेट्रोलशिवाय मोटारगाडी चालणार नाही. म्हणून प्रथम पेट्रोल हवे. मुसलमान किंवा ख्रिस्ती मोटारवाले त्या शिंगरोबाला एक नया पैसासुद्धा टाकीत नाहीत. त्यांच्या मोटारी कशा त्याच घाटातून निर्विघ्न जातात? की ॲम्बेसेडर गाडीत देखील हिंदू ॲम्बेसेडर आणि मुसलमान ॲम्बेसेडर असा देवाच्या दरबारी फरक आहे की इस्लामधर्मीयांना घाटातल्या वळणापासून धोका नाही अशी अल्लामियाने सोयच करून ठेविली आहे? याचा अर्थ मुसलमान आणि ख्रिस्ती हे बुद्धी गहाण ठेवून वागत नाहीत असा नाही. त्यांचेही शिंगरोबा आहेतच. कार्यकारणपरंपरेचा शोध घेणारे विज्ञान, आणि बुद्धीला 'चूप बस' म्हणणारी धार्मिक रूढी यांचा हा झगडा आहे. विज्ञानाला वैयक्तिक साक्षात्कार मंजूर नाही. स्वप्नात गणपती येऊन त्याने 'भक्ता तुजप्रत कल्याण असो' म्हटल्याची कथा ऐकल्याबरोबर विज्ञान विचारते, 'हा गणपती जर साऱ्या जगाचा चालक असेल तर एखाद्या जपान्याच्या स्वप्नात का जात नाही?' मग ते स्वप्नाचा मानसशास्त्र दृष्ट्या विचार सुरू करते. एखादा फ्राइड येऊन स्वप्नाची मीमांसा सुरू करतो. विज्ञान हे असे प्रश्न विचारीत राहते; आणि

त्यातून मिळणाऱ्या उत्तरांनी जातिधर्मनिरपेक्ष अशा साऱ्या मानवजातीला प्रगतीच्या नव्या वाटा दिसतात. देवाचीच जर सारी लेकरे तर सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे माणसाचा देव आणि विश्वाचा देव असे काय दोन देव आहेत? नवसाने एका मानवी आईचे लेकरू वाचवणारा देव समुद्रात निरपराध लहान माशांची कुळेच्या कुळे मोठे मासे गडप करताना चूप का बसतो? सगळीच देवाची लेकरे आहेत असे मानावे अशी काही ह्या आकाशातल्या बापाची कारकीर्द नाही. जन्मजात लंगडे, लुळे, महारोगी होऊन आपल्या काही लेकरांना खुरटत जगायला लावणारा हा देव कोण आहे ते मला माहीत नाही. परंतु कॉलऱ्याचे इंजेक्शन मात्र हिंदू, मुसलमान, ब्राह्मण, मराठा, सर्वांशी समभाव ठेवूनच वागते. देवाची कृपा सर्वत्र सारखी दिसत नाही. भौतिक विज्ञानाची सारखीच असते. निसर्गाला माणसाच्या सुखासाठी राबवले पाहिजे. पंचमहाभूतांना नोकरीला ठेवले पाहिजे. आणि त्यांच्या सेवेचा लाभ सगळ्या माणसांना लाभला पाहिजे. इंद्रियांना लाभणाऱ्या सौख्यात कसलेही पाप नाही. पाप आहे ते दुसऱ्यांना ते भोगण्याची संधी नाकारून आपणच भोगण्यात. हा नवा सामाजिक सुखभोगाचा विचार आहे. तो आता साऱ्या जगाला करावा लागला आहे.

आज पहिली पायरी म्हणून महाराष्ट्राला नव्या जगाचे हे आव्हान स्वीकारून विज्ञाननिष्ठेचा 'नवा महाराष्ट्रधर्म' स्वीकारायला हवा. शेतीची सुधारणा ग्रामदेवतेला नवस करून होत नाही, त्याला आधुनिक कृषिशास्त्रच तारते. उद्याचा शेतकरी हा आपला जिव्हाळा जगातल्या विज्ञान धर्मीयांच्यात शोधायला लागेल. शेतात घातलेले खत हे मराठ्याच्या हाताचे असेल तरच माझे शेत खाईल असे तो म्हणणार नाही. जी गोष्ट कृषीची तीच कलांची. संस्कृतीला माझ्यांनी नाहीतरी मनाची मशागतच म्हटले आहे.

एकेकाली ज्ञानप्रसाराची साधने सीमित आणि जीवनही तितकेच सीमित होते. त्यामुळे 'सभोवताल' म्हणजे आपली शतकानुशतके एकाच चाकोरीत चालत आलेली जमात आणि ते खेडे एवढेच होते. आज रेडिओवरून मास्को, न्यूयॉर्क इथले विचार आपल्या माजघरात येतात. हे सभोवताल आता खूप वाढले. पश्चात्त्य वाङ्मयाचा, कलांचा पौर्वात्यावर आणि पौर्वात्यांचा पाश्चात्त्यांवर संस्कार होऊन कलेची असंख्य स्वरूपे निर्माण होणे अपरिहार्य आहे. गीता वर्णसंकराला भीत होती, आज 'संकर' हाच मुळी रसरशितपणाचा आधार आहे. कोंडलेल्या विद्या मुक्त झाल्या. ज्ञान ही कुणाचीही जन्माने वा वर्णाने प्रांतपरत्वे वा राष्ट्रपरत्वे, एकट्याची किंवा विशिष्ट समूहाची मिरास राहिली नाही. मानवाला विज्ञानाने फार मोठा नवा हक्क दिला तो म्हणजे प्रश्न विचारण्याचा आणि उत्तरे शोधण्याचा! राजेशाहीत आणि धर्मशाहीत तो हक्कच हिरावून घेण्यात आला

होता. तो हक्क आज आपल्याला सुखासुखी मिळाला नाही. लोकशाहीच्या स्थापनेसाठी सरंजामशाहीच्या हातच्या आसुडाचे फटके खावे लागले. साम्राज्यशहांच्या सामर्थ्याखाली चिरडून घ्यावे लागले. इतिहास शिकायचा तो ती सारी झुंज कशासाठी होती हे शोधण्यासाठी आणि अजूनही सर्वार्थाने ती झुंज संपली नसेल तर ती कशी चालू ठेवावी याचा अभ्यास करण्यासाठी.

असल्या ह्या पुरुषार्थी नव्या जगाचे दर्शन मराठी भाषेच्या सोयीने बांधलेल्या तीन साडेतीन कोटी लोकांच्या मनुष्य-समाजात प्रथम व्हावे ही ओढ लागलेला मराठी माणूस हा महाराष्ट्राला नव्या जगाने देऊ केलेली नवी अस्मिता धारण करायला लावील. आणि मगच वेळोवेळी युगधर्म ओळखणारे छत्रपती, फुले, टिळक, आगरकर, लोकहितवादी किंवा ब्रिटिशांच्या पोलिटिकल एजंटांच्या बंदीत असूनही बहुजनसमाजाने क्रांतिमार्गावरून नव्या जगात प्रवेश करून विद्येचे आणि ऐश्वर्याचे मानकरी व्हावे म्हणून तळमळणारे श्री. शाहू छत्रपती यांची नावे घेण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होईल.

ह्या ग्रंथात सर्व विद्वान लेखकांनी जीवनातल्या निरनिराळ्या क्षेत्रात हे असे पराक्रम करून आम्ही का दाखवीत नाही याविषयी प्रामुख्याने असंतोषच व्यक्त केला आहे. 'असंतोषः श्रियो मूलम्' ह्या न्यायाने भविष्याची आशा वाटते आहे. भुते पडक्या वाड्यात असतात. ते वाडे पाडून तिथे आधुनिक कोऑपरेटिव्ह सोसायटीची घरे बांधली की भुते नाहीशी होतात. कारण पडक्या वाड्याला फक्त भूतच असते भविष्य नसते. नव्या सोसायट्या भविष्य उज्ज्वल करण्यासाठी उभ्या राहतात.

महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करताना, महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, कृषी, सहकारी चळवळी, शिक्षण, संगीत, नाट्य, साहित्य, ग्रंथप्रकाशन, आरोग्य ह्या विषयांचा विचार एकाच वेळी होणे आधुनिक जीवनात अपरिहार्य आहे. एकतर व्यवसाय म्हणूनही ही सर्व दालने आता सर्वांना खुली आहेत. चांभाराच्या पोराने वहाणा शिवाव्यात आणि शेतकऱ्याच्या पोराने नांगरच धरावा म्हणणारी समाजव्यवस्था आता संपली. तिची आठवण जितक्या लवकर बुजेल तितके बरे! कोकणाचे दर्शन देखील न घेतलेल्या पिढ्यान्‌पिढ्या वऱ्हाडात वकिलीसाठी स्थायिक झालेल्या ब्राह्मणाने कोकणस्थ म्हणवून घेणे हे 'उत्तर ध्रुवस्थ' म्हणवून घेण्याइतके हास्यास्पद आहे. आणि हाती तराजू धरलेल्याने सूर्यवंशीय क्षत्रिय म्हणवणेही. नव्या जीवनाच्या संदर्भात हे जातीचे उल्लेख हास्यास्पद आहेत. जरा विनोदबुद्धी वापरली तरी 'जात' नामक कल्पनेतली हास्यास्पदता लक्षात यावी.

दळणवळणाच्या सोयी नव्हत्या त्या काळात सामाजिक व्यवहाराप्रमाणे कलेच्याही क्षेत्रात कूप होते आणि साहजिकच कूपमंडूकही होते. आपापल्या

कूपांचे अभिमानही होते. त्यातून संगीतासारख्या कलेच्या बाबतीत तर रसापेक्षा पात्रांचाच बडेजाव वाढला. जानपदाची कला, नागराची कला असे भेद आले. चित्रपट संगीताने सगळीकडून सौंदर्याचे कण टिपायला सुरुवात केली. लता मंगेशकर ही मराठी म्हणून आपल्याला विशेष अभिमान वाटतो. असे म्हणताना आपण ह्या संगीताच्या नव्या आणि लोकप्रिय स्वरूपाचे स्वागत करतो. संगीताच्या दरबारातला नवा मानकरी म्हणून चित्रपट संगीताचा स्वीकार करतो. अभिजात संगीताची गोडी लावणारे चित्रपट संगीत हे साधन होते आहे. संगीताची आवड निर्माण होण्यापासून त्यात कलावंत आणि रसिक म्हणून पारंगतता येण्यासाठी गायनविद्येचा कला आणि शास्त्र या दोन्ही दृष्टींनी अभ्यास व्हायला हवा. त्यासाठी ज्या शिक्षणाच्या सोयी होतील त्यात केवळ गायक-वादक निर्माण करणे एवढाच दृष्टिकोण न राहता आणखी खोलात शिरून त्या विद्येतली नाना रहस्ये शोधणारे संशोधक निर्माण व्हावेत हाही प्रयत्न हवा. आज संगीताचा अभ्यास ही केवळ रसिक कलावंताचीच जबाबदारी न राहता गणिती आणि पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांनाही त्यात लक्ष घालणे आवश्यक झाले आहे. प्रत्येक क्षेत्रात आता संशोधन हा अपरिहार्य कार्यक्रम आहे. मग ते शेतीच्या 'ग्रीन रेव्होल्यूशनचे' असो वा नाटकांच्या 'ग्रीन–रूम रेव्होल्यूशनचे' असो. म्हणूनच सुतारकीच्या वर्कशॉपसारखी नाट्यशिक्षणाची 'वर्कशॉप्स' सुरू होताहेत. ती आवश्यक आहेत. नुसत्या नटराजाच्या स्तवनाला अर्थ उरला नाही, की धूप जाळण्याला नाही. जीवनातल्या प्रत्येक चळवळीकडे आता वस्तुनिष्ठ वैज्ञानिक भूमिकेवरून पाहिले पाहिजे. 'बाबा वाक्य' देखील परिप्रश्नेन पारखून समाधान करून घ्यायला हवे. म्हणूनच समाजात सतत आत्मपरीक्षणाचे 'संवाद' हवेत. लोकशाहीत वादप्रतिवादाला भिऊन चालणार नाही. फक्त हे वाद बुद्धिभेद करणारे नसून माणसाला अधिक दक्ष करणारे हवेत.

एक तारखेकडे पाहून जगणारा मराठी माणूस हे जसे मराठी माणसाचे दर्शन आहे तसेच कसलीतरी उदात्त वेडे घेऊन जगणारे लोक हेही मराठ देशात ठळकपणाने घडणारे दर्शन आहे. व्यक्तिगत मोठेपणातून सामाजिक मोठेपणाकडे जाण्याच्या ह्या दिवसांत व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड पडली पाहिजे. उच्चारस्वातंत्र्य ही समाजाला सुदृढ करण्यासाठी आवश्यक अट मानायला हवी. पण 'To be born is to be responsible' असे म्हटले आहे. मी कुणाचे काही देणे लागत नाही, ही ऐटही आता चालणार नाही. असंख्यांच्या श्रमांचे उपकार स्वीकारूनच जगावे लागते. म्हणूनच वाङ्मयाच्या विकासात सहकारी चळवळीचाही विकास गुंतला आहे. घड्याळाच्या असंख्य चाकांसारखी ही सगळीच चाके नीट चालली तर काळाबरोबर आपले चालणे होईल. गंजलेली चाके आणि ताण संपलेल्या स्प्रिंगा फेकून नव्या

बसवाव्या लागतील. यासाठीच एकेका गोष्टीच्या विकासाचा ध्यास घेऊन सामाजिक जाणिवा जिवंत ठेवून जगणाऱ्या माणसांची आवश्यकता आहे. मग तो जुन्या दुर्मिळ ग्रंथांचा ध्यास घेणारा असो, की सहकारी बँकांचा विकास साधणारा असो. सर्व विषयांचे ज्ञान मराठी भाषेतून यावे याचा आग्रह यासाठीच आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास जसा एका ब्राह्मणवर्गापुरता मर्यादित राहिला आणि तसा तो ठेवण्याचा अट्टाहास होता तीच गत इंग्रजीची झाली. इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची साऱ्या महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांतून सोय करणे शक्य नव्हते. त्याऐवजी सर्वांना येत असलेल्या मराठीतून हे ज्ञान मिळावे. आज निदान जगातल्या विविध ज्ञानशाखांशी प्रथम परिचय तरी व्हावा म्हणून हजारो भाषांतरित ग्रंथ निर्माण व्हावेत. प्रत्येक प्रथितयश साहित्यिकाने समाजाचे ऋण फेडण्यासाठी तरी जगातल्या एकेक चांगल्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर करावे. काही वर्षांपूर्वी याच संदर्भात श्रीयुत माधव मनोहर यांनी मराठी नाटक पुरेसे परभृत नाही असा विचार मांडला होता तो स्वागतार्ह होता. वैज्ञानिकांनी आता विज्ञान परिषद स्थापन केली आहे. तिचे फार मोठ्या उत्साहाने स्वागत व्हायला हवे. लहान मुलांचे, विज्ञानाने केलेल्या प्रगतीविषयी कुतूहल विलक्षण आहे. खरे सांगायचे तर विज्ञानाच्या बाबतीत आमची पिढी ह्या पोरांपुढे साक्षात अडाणी आहे. कुठल्याशा खेड्यात ब्राह्मणाच्या घरांना 'अडाण्याचे घर' म्हणत, अशी कथा श्री. कृ. भा. बाबरांनी सांगितली आहे. चंद्रावरच्या स्वारीचे माझे तरी शिक्षण माझ्या कुटुंबातल्या बालगोपालांनी केले आहे, आणि हे सारे ज्ञान त्यांनी मराठी पुस्तकांतून आणि लेखांतून मिळविले होते. मराठी परिभाषेला हसणारे लोक मराठी भाषेला मिळणाऱ्या ह्या नव्या शक्तीकडे पाहातच नाहीत. विकासाचे हे सारे विचार, घटकाभर नुसत्याच पूर्वदिव्याच्या घोषणा न करता आजच्या सामाजिक गरजेचा विचार करूनच व्हावेत. असा हा विज्ञाननिष्ठ मराठा तेतुका मेळवावा ही तळमळ हवी.

या ग्रंथाच्या रूपाने 'मराठा मंदिराने' महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या क्षेत्रातल्या विचारवंतांना एकत्र आणून ही जाणीव करून दिली आहे. माझी भूमिका वास्तविक प्रदर्शनात काय काय मांडले आहे ते पाहायला या, हे सांगणाऱ्या स्वयंसेवकाची आहे. स्वागताच्या दाराशी मी फार वेळ खोळंबून ठेवणे योग्य नव्हे. परंतु हे विचार-प्रदर्शन आधीच पाहण्याची संधी मला प्रा. भीमराव कुलकर्ण्यांच्या आणि मराठा मंदिराच्या कार्यकर्त्यांच्या कृपेने लाभली. या विचारदर्शनाने प्रभावित झाल्यामुळे मी वाजवीपेक्षा जास्त वेळ बोलत राहिलो असेन. ह्या अनौचित्याबद्दल मला क्षमा करावी. त्याबरोबर ह्या स्वागतपर लेखातून जर ग्रंथात शिरू पाहणाऱ्यांची उत्सुकता मी वाढविली असेन तर मला कृतकृत्यच वाटेल.

महाराष्ट्रातील मानव

डॉ. ह. धी. सांकलिया

१ : आद्य अश्मयुगीन मानव

मानवी वस्ती-विरहित महाराष्ट्र (?)

महाराष्ट्रातील आद्य मानव हा खरोखरच किती प्राचीन होता या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी प्रथम आपल्याला महाराष्ट्राची प्राचीनता पाहावी लागेल. आज ज्याला आपण महाराष्ट्र म्हणतो तो भारताचा एक घटक असून त्याला गेल्या पंधराशे वर्षांपासून महाराष्ट्र म्हणून संबोधले जाते. आता त्याच्याही पाठीमागे गेल्यास अगदी प्राचीन कालखंडात मानवाची या भागात वस्ती नव्हती असे काही विद्वान भूशास्त्रज्ञ व पुरातत्त्वशास्त्रज्ञ यांचे मत आहे. त्यासाठी त्यांनी जी सयुक्तिक कारणे दाखवली आहेत, ती म्हणजे महाराष्ट्राचे हे दक्षिणेकडील पठार अगदी प्राचीन काळी गर्द झाडींनी व्यापलेले एक निबिड अरण्य होते; आणि दुसरे कारण म्हणजे आद्य मानवाला दगडी हत्यारे बनवण्यासाठी लागणारा गारगोटीच्या प्रकारातील दगड होय. हा दगड सहजतेने उपलब्ध होणारा नव्हता. या दगडाचे अगदी सहज व सफाईदार रीतीने हत्यार बनवता येते. जगाच्या अन्य भागांत जी प्राप्त झालेली हत्यारे आहेत ती या प्रकारच्या दगडापासूनच चांगल्या प्रकारे बनवलेली आहेत. या जातीचा दगड महाराष्ट्राच्या दक्षिणेला कर्नाटकात आणि उत्तरेला गुजरात भागात मिळत असल्यामुळे आद्य मानवाच्या वसाहतीचे धागेदोरे येथे प्राप्त होतात आणि त्या दृष्टीने विचार करता महाराष्ट्रापेक्षा तेथील मानवाचा काळ हा एक लाख वर्षे मागे जातो. त्यामुळेच प्राचीन अश्मयुगीन भारताच्या नकाशावर महाराष्ट्राचा भाग रिकामा असलेला दिसून येतो.

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती पाहता त्याच्या उत्तरेकडील भाग गुजरातशी

व दक्षिणकडील भाग कर्नाटक, म्हैसूर या दक्षिण प्रदेशाशी निगडित असल्याचे दिसून येते. ज्ञात इतिहासकालापासून म्हणजे गेल्या तेवीसशे वर्षांपासून दक्षिणेकडील लोकांचे उत्तरेकडे व उत्तरेकडील लोकांचे दक्षिणेकडे सारखे जाणे-येणे आणि स्थलांतर होत असून संस्कृतीची पण त्यांच्याबरोबर देवाणघेवाण सारखी चालू होती. या वेळी महाराष्ट्राचा भूभाग हा त्यांच्या जाण्यायेण्याचा एक मार्ग बनला होता आणि या कारणाने हा एवढा मोठा पसरलेला भूभागाचा पट्टा उत्तरेला पार इंदूरपासून ते दक्षिणेला धारवाडपर्यंत आणि पूर्वेला चंद्रपूरपासून ते पश्चिमेला अरबी समुद्रापर्यंत मानवी वसतिविरहित असा कित्येक काळपर्यंत राहिला होता, अशी जी समजूत झाली होती ती हास्यास्पद होती.

दण्डकारण्य

महाराष्ट्राला पुराणकाळात दण्डकारण्याचा एक भाग म्हणून संबोधित होते. तेव्हाच्या या दण्डकारण्यात मानवी वस्तीचा विश्वास ठेवण्याजोगा पुरावा द्यावयाचा म्हणजे तेथे राम, लक्ष्मण आणि सीता हे चौदा वर्षे वनवासासाठी या दण्डकारण्यात काही काळ येऊन राहिलेले होते. यात राक्षस राहत असल्याचा उल्लेख रामायणात आलेला आहे. आर्यमुनी अगस्तिऋषी यांनी या दक्षिणेतील दण्डकारण्यात सर्वप्रथम येऊन आपला आश्रम प्रस्थापित केल्याचाही उल्लेख आहे. अशा प्रकारे त्यांच्या आगमनामुळे नर्मदा, तापी, गोदावरी, प्रवरा, कृष्णा वगैरे नद्या, तसेच पर्वत–शिखरे व पठारे इत्यादींना धार्मिक नावे व महत्त्व प्राप्त झाले. यावरून असे दिसून येते की, या भूभागातील दऱ्याखोऱ्यांत अगदी प्राचीन काळीही मानवाची वस्ती होती. परंतु या विश्वासार्ह पुराव्याला कोणताही विद्वान सत्य मानायला अथवा तो असत्य आहे हे सिद्ध करायला पुढे सरसावत नाही.

गेली तीस वर्षे त्यासंबंधी संशोधनकार्य चालू आहे आणि त्यातूनच आद्य काळात मानवाचे हिंदुस्थानात तसेच महाराष्ट्रात आगमन झाल्याचे सिद्ध झाले आहे. दक्षिण गुजरातमधून वाहणाऱ्या कर्जन नदीच्या काठावर वसलेल्या राजपिपला या गावाजवळ अगदी सर्वांत प्रथम अशा आद्य अश्मयुगीन हत्यारांचा शोध लागला आणि ही आद्य अश्मयुगीन हत्यारेही काही गारगोटीच्या प्रकारांतील दगडापासून बनलेली नव्हती. तर ती बेसाल्ट नावाच्या दगडापासून बनलेली होती. महाराष्ट्रात याच प्रकारचा दगड चोहोकडे दिसून येतो.

पहिला शोध

आम्ही गोदावरी नदीच्या काठी नाशिक जिल्ह्यात नांदूर मध्यमेश्वर येथे पद्धतशीर संशोधनाला सुरुवात केली. तसेच गोदावरीच्या पात्रात १९१६ साली प्राचीन काळच्या रानटी हत्तीची व पाणघोड्याची हाडे मिळालेली होती. तसेच पैठणच्या

समोरील तीरावर मुंगी या गावी चालसिडोनीचे (गारगोटीचे) दगडी हत्यार पण मिळाले होते. यामुळे मानवाच्या आतापर्यंतच्या अनिश्चित मार्गाचा शोध लागण्यास मदत झाली. हे हत्यार प्राचीन मानवाच्या वसाहतीचे मार्गदर्शन करणारे हत्यार ठरले.

भारतात अन्यत्र प्राप्त झालेल्या हत्यारांपेक्षा ते अगदी भिन्न स्वरूपाचे होते. या हत्यारांवरून काही महाराष्ट्रातील आद्य मानवाशी संबंध जोडला जात नव्हता. प्राचीन अश्मयुगीन हत्यारांवर नवीन प्रकाशझोत टाकणारा खराखुरा पुरावा आम्हांला अचानकपणे नाशिकजवळील गंगापूर येथे लागला. गोदावरी नदीवर मातीच्या धरणाचे प्रचंड बांधकाम सुरू होणार होते. त्याच्या पायासाठी मैलभर लांबीचा खंदक खणलेला होता. पस्तीस फूट खोलीच्या तळभागातून ज्या गोष्टी बाहेर आल्या, त्यांतूनच ही अश्मयुगीन हत्यारे ही बाहेर आली. त्या हत्यारांचे भारतातील गुजरात, म्हैसूर, मद्रास आणि आफ्रिका येथे मिळालेल्या अश्मयुगीन हत्यारांशी साम्य दिसत होते.

महाराष्ट्रातील आद्य मानवाचे अस्तित्व

भूस्तराचा आणि त्याच्या विविध अंगांचा अतिशय उत्तम प्रकारचा पुरावा पण वरील ठिकाणी गंगापूर येथे आम्हांला मिळाला. आदिअश्मयुगातील मानवाचे वास्तव्य दर्शवणारा तो पुरावा होता. अशाच प्रकारचा पुरावा देणारा दुसरा शोध नेवासे येथे लागला आणि त्यानंतर हळूहळू महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांतूनही असे पुरावे हाती येऊ लागले. कोकणपट्टीतील कुलाबा व रत्नागिरी हे भाग सोडता बाकी बहुतेक सर्व महाराष्ट्रभर आदि अश्मयुगीन मानवाच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा दर्शविणारी ठिकाणे आणि त्यावरून त्याच्या वसाहतीचा परिसर उजेडात आलेला आहे. परंतु हा आदि-अश्मयुगीन मानव कसा असावा हे मात्र अद्यापि उजेडात आले नाही. कारण आता-पर्यंत त्याचा एकही सांगाडा कोठेही प्राप्त झालेला नाही.

आदिअश्मयुगीन मानवाचा परिसर

तुलनात्मक दृष्ट्या भूस्तररचना, तसेच हत्यारांचे प्रकार, तत्कालीन जंगली जनावरे (उदा० जंगली बैल, सरळसोट लांब दात असलेले रानटी हत्ती, पाणघोडे, गवे वगैरे) या प्राप्त होणाऱ्या अवशेषांवरून आदिअश्मयुगीन मानव हा किमानपक्षी एक ते दीड लाख वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या परिसरात वावरत असला पाहिजे. भूगर्भशास्त्राच्या व्याख्येप्रमाणे असे म्हणता येईल की, हा काळ म्हणजे अंतिम चतुर्थक किंवा मध्य प्लाइस्टोसिन काळ असावा. या कालखंडात महाराष्ट्र धरून भारतात चोहोकडे पावसाचे प्रमाण हे सध्यापेक्षा अधिक होते आणि हवामानही दमट होते. तसेच नद्यांची पात्रेसुद्धा बरीचशी विशाल झालेली होती. नद्यांची ही पात्रे दगडगोट्यांनी आणि गाळांनी, विशेषतः उगमस्थानाकडे जसजसे जावे तसतशी, भरून आलेली दिसून येत होती. त्याचे स्पष्ट चित्र प्रवरा नदीच्या उगमस्थानाकडील भागातील अकोला येथे, तसेच मुळा-

मुठेच्या काठी पुण्याजवळ, कृष्णानदीच्या काठी वाईला, काण नदीच्या काठी भाडणे येथे (धुळे जिल्ह्यात), आणि वर्धा नदीवरील चंद्रपूर या विविध ठिकाणी दिसून येते.



चांदोलीजवळ सापडलेला आद्य अश्मयुगीन हत्तीचा सुळा.
सुमारे ९ फूट लांबीचा आहे.

लाव्हारसामुळे निर्माण झालेल्या भित्ती (Dykes) चे महत्त्व

भूगर्भातील लाव्हा रसामुळे भूपृष्ठावर ज्या भित्ती निर्माण झालेल्या आहेत त्यांचे महत्त्व या आदिमानवाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या काळात उत्तम आणि नियमित पाऊस आणि वनविच्छेदनाचे अत्यल्प प्रमाण—त्यामुळे या घनदाट अरण्याची जोपासना चांगली होऊन ते माजले होते आणि त्यामुळे वर उल्लेखिलेली जंगली श्वापदे यात अगदी मुक्त संचार करीत होती. याचे निश्चित पुरावे पुण्याला तसेच नांदूर मधमेश्वर येथे पाहता आले. त्यामुळे असे गृहीत धरता येते की, आदिअश्मयुगीन मानव हा एवढ्या मोठ्या परिसरात कोठे तरी निश्चितपणे वावरत असणार. त्याच्या जीवनासाठी त्याला पाणी, कंदमुळे आणि शिकार करण्यासाठी दगडी हत्यारांची नितांत जरुरी होती. पाण्याला काही कमी नव्हते. परंतु हत्यारे बनवण्यासाठी आज जसा आपणाला कच्चा माल लागतो, तसा त्याला त्याच्या हत्याराला योग्य अशा दगडांची आवश्यकता होती. तोडणे, कापणे, छिद्रे पाडणे, भोसकणे, कुटणे, वाटणे, छिलके काढणे, इत्यादींसाठी आयुधे व हत्यारे ही त्याच्या जीवनाची महत्त्वाची गरज होती.

भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने उत्तरेकडील इंदूरपासून खाली कर्नाटकपर्यंतचा हा महाराष्ट्राचा भूभागावर ट्रॅप (बेसाल्ट) ह्या दगडाने व्यापलेला दिसून येतो. हत्यारे बनविण्यासाठी हा दगड म्हणावा तेवढा योग्य नाही. त्यातील दगडाला सहजतेने अश्मयुगीन हत्याराचा आकार देणे अथवा सफाईदार रीतीने याचे छिलके काढून पाती

बनवणे अवघड गोष्ट होती. सफाईदार, मजबूत आणि उपयुक्त अशा प्रकारची हत्यारे क्वार्टझाईट किंवा चर्टमध्येच बनवता येतात. परंतु तो दगड सहजपणे सापडणे शक्य नसल्याने त्या वेळच्या मानवाने या दगडाची उणीव :कमी-अधिक प्रमाणात प्राप्त होणाऱ्या याच भागातील (ट्रॅप मधीलच) दुसऱ्या दगडाने भरून काढली. हा दुसरा पर्यायी दगड म्हणजे ट्रॅप–डाईक हा होय. पारिभाषिक शब्दात त्याला भित्ती म्हणतात. भित्तीची बनावट ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेने झालेली असते.

भूगर्भाच्या फटीत ती खोलवर रुतून बसल्याप्रमाणे असून जमिनीला जसा बांध घालतात त्याप्रमाणे ती लांबवर पसरलेली आढळून येते. तिच्या दिशा मुख्यतः दक्षिण-उत्तर किंवा पूर्व-पश्चिम अशा सरळ रेषेत असतात. जेव्हा लाव्हा रस तप्त होऊन महाराष्ट्राच्या शेकडो मैलांमधील भूभागातून बाहेर आला आणि जलद गतीने थंड झाला, त्याच काळात ह्या भित्ती पण तयार झाल्या. ही झाली भित्तींची निर्मिती. असा जो उद्‌गीर्ण दगड तीच भित्ती होय.


आदिअश्मयुगीन मानव हा निसर्गाचा खराखुरा भोक्ता दिसून येतो. त्याने निसर्गातील गोष्टींचा पुरेपूर उपयोग करून घेतलेला आहे. त्याने ह्या भित्तीमधून जे दगड घेतले, त्याबाबतीत त्याने आपली बौद्धिक हुशारी दाखविली आहे. भित्तीतला दगड हा इतर दगडांपेक्षा अधिक उपयुक्त आहे यातच याच्या बुद्धीची चुणूक दिसून येते. आणि त्या भित्तीमधील हत्यारासाठी दगड निवडतानाही त्याने आपल्या बुद्धीचा सारासार विचार करून दगड वापरले. भित्तीमध्येच निसर्गाच्या घडामोडीने जे दगड चपटे, सपाट, अणकुचीदार, लांबट असे हत्यारे बनविण्यास सुलभ व सोयीचे होते असेच दगड निवडले. केवळ जुजबी ठाकठोक करून अशा दगडगोट्यांपासून हत्यारे बनवली. तसेच मोठ्या दगडांपासून निघालेल्या चिपांची पण त्याने हत्यारे बनवली.

अशा प्रकारे नैसर्गिकरीत्या उपयुक्त असलेल्या ह्या साधनसंपत्तीचा म्हणजे भित्तीचा शोध घेण्यासाठी त्याला मैलोगणती वणवण भटकावे लागले असणार. अशी जी काही ठिकाणे आतापर्यंत उजेडात आली आहेत त्यांपैकी महत्त्वाची ठिकाणे नाशिकजवळचे गंगापूर, प्रवरा नदीकाठचे नेवासे, खानदेशातील भाडणे, ही होत. डांगच्या जंगलातही अशी काही ठिकाणे आहेत. आदिअश्मयुगीन मानवाच्या वास्तव्याचा महत्त्वपूर्ण भाग पुण्याजवळ उजेडात आलेला आहे. तो म्हणजे मुळा–मुठा नदीच्या काठी डेक्कन कॉलेजच्या परिसरात हा भाग येतो. नदीच्या पुरामुळे महत्त्वाचा भाग आता पार धुऊन गेला आहे. परंतु तेथील अस्तित्वाच्या निशाण्या दिसून येतात. तसेच त्याचा वाहून गेलेला काही भाग बंडगार्डनचे जे वॉटर पंपिंग स्टेशन आहे, त्याच्या खालच्या बाजूला दिसून येतो.

आद्य अश्मयुगीन मानवाची हत्यारे व साधने यांची संगती ही याप्रमाणे लावता येते.

(अ) आकाराने रुंद परंतु एका बाजूला धार असलेले हत्यार. ही हत्यारे मोठ्या

दगडापासून ज्या चिपा काढलेल्या असतात त्या चिपांपासून बनवलेली असतात. ही हत्यारे सध्याच्या आपल्या लोखंडी कुऱ्हाडीशी बरीचशी मिळतीजुळती असतात. हत्यारांचा धारदार बाजूचा आकार व हत्यार हातात धरण्याचा भाग विचारात घेऊन त्याला तांत्रिक 'क्लीव्हर' असे नाव दिले आहे. या हत्याराचा वापर विशेषतः जनावराच्या मांसाचे तुकडे करण्यासाठी आणि वेळप्रसंगी झाडे तोडण्यासाठी करीत असावेत.



आद्य अश्मयुगीन दगडी हत्यार (क्लीव्हर)

(ब) ही हत्यारे दोन प्रकारची आहेत. आकाराने लहान किंवा मोठी. ही साधारणतः लांबट आकाराची असून एक बाजू टोकदार तर दुसरी बाजू रुंद होत गेलेली असते. आलेख काढला असता ती लंबवर्तुळाकार किंवा लंबत्रिकोणाकृती आकारात दिसतात. मध्यभागी जाड असून दोन्ही कडांच्या बाजूंना धार येण्यासाठी छिलके काढलेले असतात. त्यांना हात-कुऱ्हाड (Hand-axe) म्हटले जाते. त्याचा उपयोग अजस्र जनावराचे शरीर फाडणे, मांसाचे तुकडे करणे, आणि जमीन खणण्यासाठी याचा वापर करीत असावेत. तसेच लाकूड तोडण्यासाठीही वापर होत असावा.

(क) ही हत्यारे गोलाकार किंवा लंबवर्तुळाकार असतात. ही भित्तीमध्येच नैसर्गिकरीत्या चपट्या किंवा सपाट दगडगोट्यापासून तयार केलेली असावीत. त्यांच्या कडा अर्धवर्तुळाकार दिसून येतात. त्यांना पुरातत्त्वीय भाषेत चॉपर असे म्हणतात. त्यांचा उपयोग, सुऱ्याप्रमाणे मांसाचे लहान लहान तुकडे करणे, आणि झाडे तोडण्यासाठी, झाडावर चढताना सुलभ व्हावे म्हणून त्याला खाचा पाडण्यासाठी, करीत असावेत.

(ड) हे एक त्रिकोणाकृती हत्यार असून त्याची एक बाजू धारदार व पातळ असून दुसरी बाजू जाड आहे आणि वापरताना सुलभता लाभावी अशी तिच्या मुठीची रचना आहे.

दगडी हातकुऱ्हाड

क्लीव्हर, चॉपर, हातकुऱ्हाडी इत्यादी हत्यारे विविध आकारांत व प्रकारांत बहुतेक सर्व महाराष्ट्रभर मिळतात. या पद्धतीची जास्तीत जास्त हत्यारे ज्या एकाच ठिकाणी मिळाली, असे ठिकाण म्हणजे नेवासे होय. प्रत्यक्ष ठिकाण नेवाशाहून दीड-दोन मैल पूर्वेला आहे. प्रवरा नदीला चिरकी नावाचा एक ओढा ज्या ठिकाणी मिळतो, त्याच्या संगमाजवळ जो बऱ्याच लहानमोठ्या घळींचा निर्जन भाग आहे, तेच हे ठिकाण

होय. आद्य मानवाच्या वस्तीची ती खात्रीशीर जागा असल्याचे दिसून आलेले आहे. संगमाजवळील नदीच्या उजव्या तीराकडे दृष्टी टाकली तर सध्याचा जो काही खडकाळ उघडा भाग दिसून येतो आणि राहिलेला भाग पुराने आलेल्या वाळूने झाकला गेलेला आहे, तेच हे प्राचीन वसाहतीचे ठिकाण होय.



अचानक तसेच अनियमित परंतु जोरदार पावसाच्या माऱ्याने राहिलेला भाग वाळूने झाकला गेला आहे आणि पावसामुळे त्याला उथळ अशा घळ्या निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीवरून हल्लीच्या अर्धशुष्क हवामानाची कल्पना येते. येथे वास्तव्य केलेल्या मानवाची शेकडो अश्मयुगीन हत्यारे त्याच्या अस्तित्वाच्या निशाण्या म्हणून शिल्लक राहिली आहेत. पुराने आलेल्या वाळूच्या थरात ती गाडली गेल्यामुळे ती आत जशीच्या तशी राहिली. टांकसाळीतून नवीन नाणी बाहेर काढावीत, तशी ती जशीच्या तशी बाहेर आली. आज हजारो वर्षे लोटली असली, तरी त्यांचे नवेपण थोडेसुद्धा कमी झालेले दिसून येत नाही. त्यांची टोके किंवा कडांच्या धारा आजही उपयोगात आणता येतील, एवढ्या उत्तम स्थितीत ती आहेत. त्यांच्यावर जो शेवाळी रंग आलेला दिसून येतो, आणि त्यांपैकी जी काही ठिसूळ झालेली आहेत, त्याचे कारण म्हणजे त्यांना कित्येक वर्षे उन्हापावसात उघड्यावर पडून राहावे लागले आहे, हे होय.

या दगडी हत्यारांच्या संग्रहाकडे एखाद्या अडाणी माणसाची जरी दृष्टी गेली, तरी त्यालासुद्धा त्यांतील सौंदर्य आणि एकसारखेपणाची प्रतीती होऊन ह्या दगडी हत्यारांचे सहज ज्ञान होईल. ही सर्व दगडी हत्यारे कोणत्याही धातूच्या हातोड्यापासून किंवा तांबे अथवा लोखंड या धातूंच्या हत्याराचा वापर न करता बनवलेली आहेत. प्रदीर्घ प्रयत्नाने मानवाने ह्या गोष्टी निर्माण केल्या आणि त्यावर त्याने आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. ही हत्यारे बनविण्यासाठी त्याने हातोड्याप्रमाणे वरवंट्यासारख्या लांबट गोलाकार दगडाचा किंवा मजबूत जाडजूड हाडाचा किंवा कठीण आणि जड अशा लाकडाचा वापर केला असावा. ही हत्यारे बनविण्यासाठी जी दगडी साधने त्याने वापरली ती स्थानिक प्राप्त होणाऱ्या हलक्या प्रतीच्या दगडाची होती. त्यासाठी तांबडा कुरुंद वगैरे प्रकारचा दगड वापरला असणार.

शारीरिक परिश्रमात व कौशल्यात महाराष्ट्रातील आदिअश्मयुगीन मानव भारतातील आपल्या कोणत्याही देशबांधवापेक्षा किंवा आफ्रिका आणि युरोप येथील मानवापेक्षा यत्किंचितही कमी नव्हता. एवढेच नव्हे तर 'महाराष्ट्राच्या भूभागावर एकाच प्रकारच्या (दगडी हत्यारे बनविण्यास अयोग्य प्रकारच्या) बेसाल्ट आणि ट्रॅप

ह्या हलक्या प्रतीच्या दगडांमधूनही त्याने तोड काढून परिस्थितीवर मात केली व आपल्या बुद्धिकौशल्याचे दर्शन घडवले.

महाराष्ट्रातील आद्य मानवाने हत्यार बनवण्यास अयोग्य असणाऱ्या ट्रॅप किंवा बेसाल्ट या दगडांमधूनही चांगल्या पद्धतीने जी उत्कृष्ट प्रकारची हत्यारांची निर्मिती केली आणि त्यावर त्याने जे प्रभुत्व मिळवले, ते वाखाणण्यासारखे आहे. खरोखरीच त्याने दगडाचा देव बनवला.

आद्य अश्मयुगीन मानवाचा ऱ्हास

एकाएकी या आद्य अश्मयुगीन मानवाला काय झाले याबाबत काहीही सांगता येत नाही. त्यांनी नद्यांची खोरी का सोडली असावीत यासंबंधी केवळ अंदाजच करावा लागतो. काही ठिकाणी संशोधनप्रसंगी असे दिसून येते की, काण नदीच्या काठी भाडणे या ठिकाणी असलेल्या नदीच्या पात्रात दगडगोट्यांच्या घट्ट झालेल्या प्राचीन थरांत या आद्य अश्मयुगीन मानवाची हत्यारे मिळतात आणि ह्या दगडगोट्यांच्या घट्ट असलेल्या थरावर दहा ते पंधरा फूट जाडीचा लाल रंगाचा प्राचीन मातीचा थर आढळून येतो.

अशा प्रकारच्या ह्या मातीचा थर पुणे, वाई आणि महाराष्ट्रातील अन्य बऱ्याच ठिकाणी, तसेच भारतातील पुष्कळ ठिकाणी दिसून येतो. परंतु त्याच्याखालील दगड-गोट्यांच्या घट्ट थरांत आद्य अश्मयुगीन हत्यारे प्राप्त होत नाहीत. सर्वसाधारणपणे वैश्विक हवामानात व भूरचनेत त्या वेळी फार मोठे बदल झाल्याचे दिसून येते व त्यामुळेच ह्या चमत्कृतिजन्य घटना घडल्या असाव्यात. त्या वेळी झालेल्या हवामानाच्या बदलामुळे भारतातील बहुतेक नद्यांची पात्रे पुराने फुगून विस्तृत होऊन वाढलेली असणार आणि नद्यांच्या काठी जी भित्ती अथवा तत्सम प्रकारची हत्यारे बनविण्या-योग्य दगडगोट्यांची उघडी ठिकाणे होती, ती गाळाने खाली गाडली गेली असणार. ज्या भित्ती आता डोंगरमाथ्यावर अथवा पाणवठ्यापासून दूर असतील, त्यांचा या मानवाला काहीच उपयोग नव्हता; आणि अशा तऱ्हेने या मानवाचे आणि त्याच्या जीवनाचे मुख्य अंगच नष्ट झाल्याने त्या आद्य अश्मयुगीन मानवाचा तेव्हापासून उत्तरोत्तर ऱ्हास होत आला असावा असे दिसून येते.

२ : मध्य अश्मयुगीन मानव


द्वितीय किंवा मध्य अश्मयुगाचा शोध

आपण आद्य मानवाचा जीवनेतिहास पाहिला. त्यानंतरच्या द्वितीय अश्मयुगात मानवाने जी दगडी हत्यारे बनविली त्यांच्यासाठी लागणारे दगड आद्य अश्मयुगीन मानवाने वापरलेल्या दगडांपेक्षा अगदी भिन्न प्रकारचे आहेत आणि हीच आद्य आणि मध्य अश्मयुगीन मानवामध्ये संपूर्ण बदल झाल्याची खूणगाठ आहे. येथूनच दुसऱ्या किंवा मध्य अश्मयुगाला सुरुवात झाल्याची जाणीव होते.

पुरातत्त्वशास्त्राच्या व्याख्येप्रमाणे त्याला मध्य अश्मयुग किंवा द्वितीय अश्मयुग संबोधले जाते. या मध्य अश्मयुगीन काळातील मानवाची केवळ हत्यारेच सापडतात. मात्र ती आद्य अश्मयुगीन मानवाच्या हत्यारांपेक्षा खूपच मोठ्या संख्येने मिळत असून चोहोकडे विखुरलेली आहेत.

मध्य अश्मयुगीन हत्यारे

आद्य अश्मयुगीन हत्यारे व अंत्य अश्मयुगीन किंवा अश्मयुगाच्या शेवटच्या खंडातील हत्यारे या दोन्ही संस्कृतींमधील हत्यारांपेक्षा मध्य अश्मयुगीन हत्यारे भिन्न आहेत. अशा प्रकारच्या दोन अश्मयुगीन हत्यारांच्या संस्कृतींमधील भिन्नत्व हेही नेवासे येथेच परत एकदा दृष्टोत्पत्तीस आले आणि त्याच ठिकाणी त्याचे अस्तित्व सिद्ध झाले. आद्य व मध्य अश्मयुगीन हत्यारांतील फरक स्पष्ट झाला. मध्य अश्मयुगाच्या या नवीन संशोधनामुळे जे मध्य अश्मयुगासंबंधीचे निश्चयात्मक ज्ञान प्राप्त झाले त्याचा फायदा



मध्य अश्मयुगीन हत्यारे

भारतात अन्य ठिकाणी प्राप्त होणारी त्याच प्रकारची हत्यारे व संस्कृती ओळखण्यास आधारभूत झाला. पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने अश्मयुगीन कालखंडांतील दुवे दर्शविणारा हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण शोध गणला जातो.

आद्य अश्मयुगीन हत्यारे वापरणाऱ्या मानवाचा वंशज असावा काय ?

हा मध्य अश्मयुगीन मानव आद्य अश्मयुगीन मानवाप्रमाणे लहानमोठ्या जलप्रवाहाजवळ तर राहात होताच, परंतु आता तो गर्द जंगलाच्या परिसरात तसेच डोंगराच्या व टेकाडाच्या उतारावर राहू लागला. आद्य मानवाच्या दृष्टीने ही प्रगतीची वाटचाल होती. आद्य मानवाने आपल्या हत्यारांसाठी ज्या नदीतील दगडगोट्यांतून दगडी हत्यारे बनवली ते भित्तीचे दगडगोटे, भौगोलिक परिस्थिती बदलल्यामुळे नद्यांना पूर येऊन वाहून गेले. तसेच राहिलेले गाळाखाली दबले गेले आणि त्यामुळे ते दिसेनासे झाले.

हत्यारे बनवण्यासाठी त्यांना आता भित्तीच्या दगडाऐवजी दुसरा मार्ग शोधणे क्रमप्राप्त होते. ज्या दगडापासून हत्यार बनवणे सहज शक्य होईल आणि हत्यार म्हणून ज्यात कठीणता अधिक असेल असा दगड त्याला हवा होता. कर्मधर्मसंयोगाने त्याला मार्ग सापडला. महाराष्ट्रभर पसरलेल्या ट्रॅपच्या दगडाच्या थरातच गारगोटीसारख्या दगडाच्या मोठमोठ्या शिरा भूपृष्ठावर आलेल्या त्याला दिसून आल्या. त्या कल्पक मानवाने हा दगड आपली हत्यारे बनवण्यास सर्वथैव योग्य आहे अशी खात्री करून घेऊन त्याची निवड केली. भूस्तरशास्त्रीय परिभाषेत ह्या दगडांना गार किंवा गारगोटी, चकमक दगड, राहूचा दगड म्हणून संबोधले जाते. अशा प्रकारची दगड मिळणारी ठिकाणे त्याने आपल्या हत्यारासाठी पसंत केली. त्यासाठी त्याने काही विवृत्त भाग पसंत केले.

नुकतेच आमच्या पाहणीत आलेल्या विवृत्त भागांपैकी एक ठिकाण म्हणजे धुळे जिल्ह्यात नंदुरबार तालुक्यातील रंका नाल्याचे ठिकाण हे होय. नैसर्गिक चपट्या सपाट दगडाचा मानवाने तेथे हत्यारासाठी वापर केलेला दिसून येतो आणि ही हत्यारे मध्य युगीन हत्यारांच्या प्रकारात मोडतात. आतापर्यंत प्राप्त झालेल्या हत्यारांपेक्षा ही हत्यारे आकाराने खूपच मोठी असल्याचे दिसून आले. हत्यारांचे प्रकार लक्षात घेता ती हत्यारे आतापर्यंत नदीच्या घट्ट थरात किंवा भूपृष्ठावर तसेच टेकाडाच्या सपाटीवर अथवा उतारावर मिळालेल्या सर्वसामान्य हत्यारांपेक्षा भिन्न नव्हती. एवढेच नव्हे तर या प्रकारची हत्यारे महाराष्ट्रभर तसेच म्हैसूर, मद्रास, आंध्र, आसाम, ओरिसा, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान कच्छ, सौराष्ट्रासह गुजरात अशा अनेक ठिकाणी आढळून येतात. मुख्यत्वेकरून खुरपणी, वेधणी आणि रंधक किंवा छिद्रक या तीन प्रकारची हत्यारे तेथे दिसून येतात.

मध्य अश्मयुगीन हत्यारांचे हे प्रकार आणि त्यांचे गुणधर्म पाहिले म्हणजे अशी कल्पना होते की, ही हत्यारे त्यांच्या जीवनाला पुरेशी नव्हती. या त्यांच्या एवढ्याशा मर्यादित हत्यारांवरून त्यांच्या जीवनासंबंधी पुरेशी कल्पना येऊ शकत नाही. या

हत्यारांचा विचार करता, त्या वेळी मानवाने धनुष्यबाणांनी शिकार केली असली पाहिजे. जनावरांची कातडी सोलणे, झाडाच्या साली खरवडणे आणि साफ करणे, तसेच काठ्यांना व लाकडांना लहानमोठी भोके पाडणे ही कामे या हत्यारांनी करता येण्यासारखी आहेत. परंतु तुकडे करणे, लाकूड तोडणे, वाटणे, कुटणे इत्यादी मोठी व अवजड कामे करण्यासाठी गंडासा, चूरकसारखी आद्य अश्मयुगीन मानवाने वापरलेल्या हत्यारांप्रमाणे मोठी हत्यारे वापरली असली पाहिजेत.

मानव मोठ्या प्रमाणात संहारक झाला

त्या वेळचे मध्य अश्मयुगीन मानवाचे जीवन म्हणजे एक भटके शिकारी जीवन म्हणावे लागेल. त्याला हत्यारे बनवण्यासाठी लागणारे साहित्य म्हणजे लहानमोठे दगड-गोटे आता आकाराने आणि वजनाने आद्य अश्मयुगीन हत्यारापेक्षा खूपच लहान व हलके होते. त्यामुळे या हत्यारांसह त्याला सहजतेने कोठेही वावरता येई व शिकारही सुलभ व अचूकपणे करता येई. त्यामुळे हा मानव गर्द अरण्यातही अगदी बिनदिक्कत जाऊ लागला. त्याच्या जीवाची जबाबदारी घेणारे आणि शिकारी जीवनात सुलभता आणणारे हे सुधारलेले टोकदार हत्यार म्हणजे धनुष्य आणि बाण हे होत. ह्या हत्याराचा शोध म्हणजे मध्य अश्मयुगीन मानवाच्या जीवनातील विकासाचा फार मोठा टप्पा होता. विसाव्या शतकात अग्निबाणाच्या शोधाचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व ह्या मध्य अश्मयुगीन हत्याराच्या धनुष्यबाणाला व तत्सम अन्य हत्यारांना आहे. त्या काळातील तेव्हाचे ते रॅकेट युगच सुरू झाले म्हणावे लागेल. एवढी मोठी या मानवाच्या जीवनातील प्रगती होती.

आद्य मानवाप्रमाणे शिकारीसाठी मोठमोठे खड्डे खणायचे, अनेकांनी एकत्र येऊन त्यांना हाकारीत त्या खड्ड्यात मानवी सापळा टेवून जनावराला पाडायचे आणि मग अगदी जवळ जाऊन शिकार करायची अशी आता त्याला जरुरी नव्हती. ती पद्धती आता मागासलेली ठरली. अशा प्रकारच्या शिकारीत मानवाची अधिक शक्ती व श्रम, तसेच अधिक वेळ जाई आणि त्या मानाने तेवढी शिकार प्राप्त होईलच अशी खात्री नव्हती. परंतु या नवीन हत्यारामुळे कोणतेही सावज आता तो हेरून अचूक टिपू शकत होता आणि त्यामुळे त्याची शिकारी प्रवृत्ती बळावत चालली. या हत्याराने मानवाच्या अंगी धडाडी आणि निर्भयता (बेडरपणा) हे गुण आले. कोणत्याही बिकट प्रसंगी हे हत्यार त्याला वाचवी आणि त्यामुळे आता तो एकटादुकटा निर्भयपणे भटकून शिकार करू लागला. गर्द जंगलातही आता तो ह्या हत्यारासह एकटादुकटा सहज जाई. आता त्याला भीती वाटेनाशी झाली होती. त्यामुळे त्याची हिंसक प्रवृत्ती वाढत गेली. मानवी कलहातही जीवांचा संहार करण्याचे त्याला काही वाटेनासे झाले. या प्रगत शस्त्राने त्याच्या जीवनात फार मोठा विकास झाला असावा आणि तो खूप धीट झाला तरी त्याच प्रमाणात तो संहारकही बनला, असे जे काही विद्वान म्हणतात ते खोटे नाही.

बौद्धिक कौशल्याचा विकास

ज्याप्रमाणे हत्यारे बनवण्यासाठी लागणाऱ्या दगडात बदल झाला होता, त्याचप्रमाणे हत्यारे बनवण्याच्या पद्धतीमध्येही पूर्णपणे बदल झालेला होता. आता जर त्याला कशाची जरुरी होती तर बाणासाठी जी टोकदार हत्यारे करावी लागत त्यासाठी योग्य म्हणजे चपटा सपाट दगड शोधण्याची. मग तो लांब असो की आखूड असो. तो सहजपणे फोडून (फाकाळून) जाड किंवा टोकदार व पातळ कपचे (छिलके) काढी आणि टोकदार व पातळ छिलक्याची बाणाची टोके व जाड कपच्या किंवा छिलक्यांपासून खुरचणी, छिद्रक किंवा रंधक बनवी. आता असे दिसून येते की, हा मानव शक्यतो हत्यारे बनवण्यासाठी जो दगड निवडी तो खालच्या बाजूला सपाट असणारे दगडगोटे निवडी. अशी जर सपाट बाजू मिळालीच नाही तर आपणाला हवी तशी सपाट बाजू तो कौशल्यपूर्वक त्या दगडाचा छिलका काढून तयार करी. अशा प्रकारे छिलके काढून बनविलेल्या हत्याराला धार येण्यासाठी बारीक बारीक दाते बनवी. अशा प्रकारे त्याने अत्यंत काळजीपूर्वक व कौशल्याने त्या हत्याराला जे स्वरूप प्राप्त करून दिले त्यावरून त्या वेळच्या मानवी जीवनाच्या अंतरंगाची पुरेपूर ओळख पटते. नावीन्यपूर्ण साधने युक्तिप्रयुक्तीने शोधणाऱ्या मानवाने मानवी जीवनाच्या उन्नतीसाठी आपल्या बौद्धिक कौशल्याचा हळूहळू विकास केलेला दिसून येतो. त्या वेळच्या त्याच्या सतत आणि दीर्घ उद्योगावरून तो आळशी होता असे म्हणता येणार नाही.

मानवी जीवनाला एवढी मोठी कलाटणी देणारा हा मानव होता तरी कोण ? आद्य अश्मयुगीन मानवाचा हा वंशज तर नसावा ना ? आपल्या या तर्कवितर्काला काहीच अर्थ नाही. कारण या प्रश्नाची उकल होण्यासाठी ह्या दोन्हीही मानवांच्या सांगाड्यांच्या सांगोपांग अभ्यासाची जरुरी आहे आणि अद्यापि महाराष्ट्रातच नव्हे परंतु भारतातही या आद्य अथवा मध्य अश्मयुगीन मानवाचा सांगाडा प्राप्त झालेला नाही. केवळ या मानवाच्या प्राप्त झालेल्या हत्यारांवरून त्यासाठी वापरलेल्या भिन्न प्रकारच्या दगडांच्या आकारात आणि हत्यारांमधील प्रकारांत, जो संपूर्ण बदल झालेला दिसून येतो त्यावरून अशी एक कल्पना सुचते की, मध्य अश्मयुगीन मानव हा बाहेरून आलेल्या नवीन मानववंशातील असावा किंवा येथील आद्य मानवाच्याच ह्या नवीन कल्पना असाव्यात. ते काहीही असले तरी जो ह्या दोन्ही अश्मयुगीन मानवांत बदल झालेला दिसून येतो. तो केवळ महाराष्ट्रातच झालेला नसून भारतात चोहोकडे आणि पश्चिम आशिया व युरोपमध्येही हा झालेला बदल आढळून येतो.

द्वितीय अश्मयुगीन मानवाचा परिसर (वातावरण)

द्वितीय अश्मयुगीन मानवाच्या काळी हवामान बहुतांशी कोरडे होते. आद्य अश्मयुगीन कालाप्रमाणे ते दमट नव्हते. पुरामुळे नद्यांची पात्रे पण खूपच बदलली गेली होती. त्यांनी आपल्या किनाऱ्याच्या मर्यादा सोडल्या होत्या. परंतु पात्रे विशेष खोल

मात्र झालेली नव्हती. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पूर्वीच्या काळात साचून राहिलेले दगडगोट्यांचे थर उघडेच होते आणि त्यांवरून नदी वाहात होती. यानंतर नदीच्या पात्रात वाढीचे व घटीचे कालचक्र सतत चाललेले दिसून येते आणि या वाढीच्या व घटीच्या चक्रामुळे काही काही ठिकाणी नदीच्या पात्राची सध्याची खोली पन्नास फूट झालेली दिसून येते. अशी ही भौगोलिक परिस्थिती केवळ महाराष्ट्रातच झालेली होती असे नसून संपूर्ण भारतभर झालेली होती.

नदीच्या पात्रातील बदल

जेव्हा नदीची पात्रे पाहिली जातात तेव्हा तिच्या पात्रात झालेले हे एवढे बदल आपल्या सहजासहजी लक्षात येत नाहीत. परंतु पुणे, नांदेड, पंढरपूर, कोपरगाव, नाशिक, दौंड या नदीकाठच्या लोकांना नदीच्या सामर्थ्याची निश्चितच कल्पना येईल. पानशेत धरणफुटीनंतरची पुणे शहराला व दौंडला चांगलीच कल्पना आहे. १९६९ साली गिरणा आणि गोदावरी या नद्यांनी आपले पुराचे उच्चांक मोडले तेव्हा त्यांच्या काठच्या नाशिक, कोपरगाव, नांदेड या शहरी हाहाःकार झाला. मध्य अश्मयुगीन मानवाला तर दरवर्षीच पुराच्या बिकट प्रसंगाला तोंड देण्याचे काम करावे लागे. त्या काळातील या प्रचंड पुरांनीच नद्यांच्या काठी ही उंचच उंच बारीक वाळूची व रेतीची टेकाडे निर्माण झाली आणि त्यांवर बारीक गाळाच्या मातीचा थर आवरणासारखा घट्ट बसला.

द्वितीय अश्मयुगीन मानवाची निश्चित कालगणना

हा द्वितीय अश्मयुगीन मानव केव्हा होऊन गेला यासंबंधी अगदी परवापरवापर्यंत कोणालाही काही सांगत येत नव्हते. भूस्तरशास्त्रज्ञांच्या अनुमानानुसार हा मानव उत्तर हिमयुगात होऊन गेलेला असावा. विज्ञानशास्त्रात जे नवीन शोध लागत आहेत त्याचा फायदा पुरातत्त्व-शास्त्राला पण झालेला आहे. किरणोत्सर्गपद्धती या विज्ञानशाखेच्या द्वारे या कालखंडातील कालगणना निश्चित करण्यात शास्त्रज्ञांनी यश संपादिले आहे. ही कालगणना वनस्पती, झाडे, हाडे, शंख, शिंपले इत्यादींच्या आधाराने केली जाते. या वस्तूंमध्ये जो किरणोत्सर्ग घटक सापडतो तो मोजला जातो आणि त्यावरून कालमान निश्चित करता येते. राहुरीजवळ मुळा नदीच्या पात्रात जेथे धरणाचे पाया खोदण्याचे काम चालू होते त्या पायात बारीक वाळूचे व रेतीचे द्वितीय अश्मयुगीन थर आढळून आले. त्यांची कालगणना केली तर ती तीस हजार वर्षे इतकी मागे जाते आणि दुसरे उदाहरण पुणे जिल्ह्यातील इनामगावाजवळील घोडनदीच्या काठचे. तेथेही पण द्वितीय अश्मयुगीन घट्ट थरातील सापडलेल्या शिंपल्याची कालगणना केली. ती एकवीस हजार वर्षे इतकी आली. तसेच कृष्णा नदीवरील धोम येथील एकोणचाळीस हजार आणि गोदावरी नदीवरील पैठण येथील त्या थरातील वस्तूंची कालगणना एकोणीस हजार

वर्षे इतकी आली. यावरून चाळीस हजार ते वीस हजार वर्षांमधील मध्य अश्मयुगीन मानवाचा निश्चित काल समजावयाला काही हरकत नाही.

या निष्कर्षावरून वीस हजार ते चाळीस हजार वर्षांमधील जो वीस हजार वर्षांचा काळ तो या मध्य अश्मयुगीन मानवाची कारकीर्द मानावी लागेल. या संपूर्ण वीस हजार वर्षांत हा मानव काही एवढ्याच प्रगतीवर थांबला नाही. त्याचे शिकारी व भटके जीवन अद्यापिही चालूच होते. त्याला अद्यापही स्थैर्य लाभलेले नव्हते. तरी पण तो आपली हत्यारे व साधने यांसंबंधी सारख्या नव्या नव्या विकासाच्या कल्पना करीत असे व त्या हत्यारांत सुधारणा होण्यासाठी त्याचे अखंड प्रयत्न चालू होतेच. आज जे आपण पाहतो किंवा गेल्या चार-पाच हजार वर्षांपासून ज्या सुऱ्या, चाकूची पाती, दाढीचे वस्तरे, भाल्याची किंवा बाणाची टोके, मासे पकडण्याचे गळ इत्यादी गोष्टी सापडतात त्यांचे आद्य जनकत्व वीस हजार वर्षांपूर्वीच्या या मध्य अश्मयुगीन मानवाकडे जाते.

बहुविध हत्यारांची निर्मिती

त्याचा आणखी एक महत्त्वाचा शोध म्हणजे त्याने संयुक्त किंवा बहुविध हत्यारे बनविली व त्याचा व्यवहारात वापर सुरू केला. लहान, लांब गारगोटीच्या पात्याने खुरप्याची पाती किंवा गळाचे दगड बनवण्याचा तो प्रयत्न करी आणि ते मध्येच फुटले तुटले तर त्याच पात्याचा आणि अन्य पातळ बारीक धारदार पात्यांना लहानशा कोयत्याच्या आकाराच्या लाकडी काठीत किंवा लांब हाडात अगर काळविटाच्या शिंगात खाचा करून बसवी व ही हत्यारे घट्ट बसावी म्हणून डकवी. प्रसंगी तो चिकण-मातीचा दांडा करून ह्यात बसवी. अशा प्रकारे गारगोटीच्या अनेक पात्यांना एकत्र आणून जे संयुक्त हत्यार त्याने बनविले त्याचा उपयोग बहुविध कामांसाठी, उदा. कापणे, खरवडणे, तोडणे, इत्यादींसाठी करण्यात आला आणि अशा प्रकारच्या सयुक्तिक हत्याराचे हे महत्त्व आज आपण रोजच्या व्यवहारात समजू शकतो. हेच संयुक्त यंत्रयोजनेचे तत्त्व आज अग्निबाणांमध्येसुद्धा उपयोगात आणले जाते. तसेच आपल्या दैनंदिन वापरातील चाकू, सुऱ्यांत पण उपयोगात येते. यात आपणाला जो फरक दिसतो तो म्हणजे हत्यारामधील साहित्याचा. तो मानव दगड वापरीत होता तर आज आपण त्याच्याऐवजी विविध प्रकारचे पोलाद किंवा अन्य धातू वापरतो.

मानवाच्या या भौतिक संस्कृतीच्या प्रगतीसंबंधीचे पहिले दर्शन नेवासे येथे १९५५–५६ साली झाले आणि त्यानंतर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी हळू हळू होत गेले. नागपूरजवळ अन्हन नदीच्या खोऱ्यात, धुळे जिल्ह्यातील भाडणे येथे, कान नदीच्या खोऱ्यात, इत्यादी स्थळी दुधाळ गारगोटीच्या दगडापासून मानव छिलके काढून हत्यार बनवी. कोणत्या कारणाने त्याच्यात ही अशी हत्यारे बनवण्याचे परिवर्तन होत गेले हे मात्र समजून येत नाही. अशा प्रकारच्या दगडापासून तो पातळ धारदार पाती व छिन्या इत्यादी हत्यारे बनवू लागला.

गारगोटीची धारदार पाती बनवणारा पहिला मानव

गारगोटीची पातळ पाती बनवणारा मानव राहात असलेला देश कसा असावा असे विचारले तर तो देश दमट हवामानाचा नसणार हे उघडच आहे. तेथील हवामान हे कोरडे असणार हे निश्चित. ही गारगोटीच्या पात्याची हत्यारे बनवण्याची ठिकाणे नदीकाठची पुराने उंच बनलेली वाळूच्या थराची ठिकाणे आता उघडी पडली असल्यामुळे ही हत्यारे मिळू शकली.

या कोरड्या किंवा अर्धशुष्क कालानंतर निश्चित स्वरूपाचा एक फार मोठा बदल हवामानात झाला आणि त्यामुळे भौगोलिक परिस्थितीतही बराच फेरफार झाला. हा बदल सर्व महाराष्ट्रभर तसेच मध्य प्रदेश, गुजरात, आंध्रचा काही भाग, म्हैसूर, मद्रास, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश या ठिकाणी झालेला दिसून येतो.



खापरावरील मानवाचे चित्र


३ : ताम्र-पाषाणकालीन मानव

काळी जमीन आणि पहिला शेतकरी

महाराष्ट्रातील आद्य अश्मयुगीन मानवापासून ते मध्य अश्मयुगीन मानवापर्यंत सुमारे दीड लाख वर्षांचे मानवी जीवनाचे दुवे जोडण्याचा आम्ही जो भगीरथ प्रयत्न केला आहे त्यातून मानवी जीवनाची उत्क्रांती आणि हळूहळू होत गेलेली प्रगती याचा आढावा मागील दोन प्रकरणांतून देण्यात आला आहे. या प्रकरणात त्यानंतरच्या मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. शेतीवाडी करून व घरेदार उभारून आता महाराष्ट्रात मानव राहू लागला. त्याला स्थैर्य लाभले आणि त्याने आपल्या जीवनात कशी क्रांतिकारक प्रगती केली ह्याचे चित्र ह्या प्रकरणात रेखाटले आहे.

महाराष्ट्राचा विस्तृत भू-भाग वरून काळ्या आणि तपकिरी भुरकट रंगाच्या जमिनीचा झालेला दिसून येतो. जमिनीचे काळेपणात रूपांतर होण्यासाठी तिच्यात कोणते गुणधर्म सामावले गेले हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. साचलेले पाणी किंवा निर्माण झालेली तळी, तसेच पाणथळ जागा, त्याचप्रमाणे, झाडेझुडपे, गवतपाला इत्यादी वनस्पतींमुळे जमिनीला काही प्रमाणात काळेपणा यावयाला कारणीभूत ठरतो. या काळ्या जमिनीच्या खालील थर हा बेसॉल्टचा खडकाचा थर आहे, तर काही नदी-

काठच्या ठिकाणी प्राचीन पिवळ्या मातीचा थर आहे. असा जर जमिनीचा खूप लांब छेद घेतला तर काळ्या मातीच्या जाडीचा थर पृष्ठभागापासून काही इंचांपासून ते तीन



ताम्रपाषाणकालीन जीवनपद्धती. राहात्या घरातच मृतांना पुरले जाई.

ते चार फूट जाडीपर्यंत असलेला स्पष्ट दिसून येतो. पिवळ्या किंवा भुरकट जमिनीपेक्षा ही काळी जमीन मगदुराने अधिक कसदार असते.

काळ्या जमिनीला योग्य प्रमाणात पाणीपुरवठा मिळाला तर त्या जमिनीत गहू, ज्वारी, बाजरी, हरबरा, कापूस, ऊस इत्यादी मानवी जीवनाला अत्यावश्यक असणारी पिके अगदी मुबलक प्रमाणात पिकतात. ज्या मानवाने ही शेतीची मुहूर्तमेढ रोवली त्याला ह्या शेतीच्या जीवनाचे सार पूर्णपणे उमगले असले पाहिजे आणि म्हणूनच त्याने शेती हा जीवनाचा मुख्य मार्ग अवलंबिला असला पाहिजे. अतीव कष्टप्रद मानवी जीवनातील भटक्या व शिकारी जीवनाची समाप्ती आणि स्थिर जीवनाची सुरुवात करणाऱ्या या आद्य शेतकऱ्याचे मानवजातीवर फार मोठे उपकार झालेले आहेत.

महाराष्ट्रातील बऱ्याच आद्य शेतकऱ्यांच्या वसाहती आता उजेडात आलेल्या आहेत. त्यांपैकी नाशिक, जोर्वे, नेवासे, चांडोली, सोनगाव, इनामगाव, दायमाबाद इत्यादी वसाहती प्राचीन काळात काळ्या मातीच्या थरावर वसलेल्या दिसून येतात. अशीच परिस्थिती खानदेशातही प्रकाशे, सावलडा, भाडणे, बहुरूपे, बहाळ या ठिकाणी दिसून येते. या वसाहतीचा काळ खिस्तपूर्व पंधराशेच्या आसपासचा आहे. विदर्भात किंवा मराठवाड्यात या ताम्रपाषाणकालीन संस्कृतीसंबंधी उत्खनन झालेले नाही. तरी पण तेथे यापेक्षा निराळे काही असेल असे म्हणता येत नाही. त्या काळी आवश्यक त्या सुखसोयी आणि मानवी जीवनाच्या दैनंदिन गरजा पुरवणारे स्वयंपूर्ण असे खेडेगाव होते. गावाच्या समोर नदीचे पात्र असावे अशी गावाची रचना असे. त्यामुळे घरातून नदीचे नयनमनोहर दृश्य पाहता येई. नदीचे पाणी बारमाही वाहणारे असून ते

आरोग्यदृष्ट्या स्वच्छ, शुद्ध असे. गावातील त्यांची निवासस्थाने म्हणजे एक लहान खोलीवजा झोपडी असे आणि अशा ह्या लहान लहान घरामध्ये ते दाटीवाटीने व गटाने एकत्र येऊन वस्ती करत.

अशा प्रकारची ही छोटी व टुमदार स्वयंपूर्ण आदर्श खेडी अगदी इतिहासकाळा-पर्यंत, एवढेच नव्हे तर अगदी परवापरवापर्यंत, म्हणजे मोठमोठ्या शहरांची निर्मिती होईपर्यंत आणि ऐषारामी जीवनाच्या सुखसोईचा संपर्क येऊन त्यांचा पगडा बसेपर्यंत टिकून होती.

या वसाहतीच्या जीवनाचा पाया घालणारे मानवाचे पूर्वज हजारो किंवा लाखो वर्षे पोटाच्या खळगीसाठी अहोरात्र वणवण भटकले. त्यांच्या जीवनाला तिळमात्र शांतता लाभली नाही. मानवी जीवनाची कोंडी दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या बुद्धि-कौशल्याचा उपयोग केला. परंतु मानवी कल्याणाचे यथार्थ स्वप्न रंगवणे त्यांना उमगले नाही. रोजचा उगवणारा दिवस त्यांना पोटासाठी भटकावयाला उद्युक्त करी. शिकारी जीवनात अनेकांना एकत्र येऊन जीवन जगणे कठीण होते. त्यामुळे मानवाचे एकमेकातील नात्याचे व प्रेमाचे संबंध, कुटुंबपद्धती, समाजजीवन, समाजकल्याण या मानवी जीवनाच्या अत्यावश्यक गोष्टींपासून ते फारच दूर होते.

पशुसंवर्धनाला प्रारंभ

शेतीच्या जीवनाची सुरुवात होताच भटक्या आणि शिकारी जीवनाला आळा बसला. मानवी जीवनाला स्थैर्य येण्यास सुरुवात झाली. शिकारी जीवनातील मानव जागृत होऊन विचार करू लागला. त्याला विचाराला अवधी मिळाला आणि प्रगतीच्या पथाकडे तो झपाट्याने वाटचाल करू लागला. शेतीच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने वन्य पशूंना माणसाळवणे आणि त्यांच्या शक्तीचा शेतीला उपयोग करून घेणे हे हळूहळू सुरू केले. त्याचप्रमाणे पशुसंवर्धनाला सुरुवात झाली.

आजपर्यंत शिकार भाजून खात असणाऱ्या मानवाला शेतीतील धान्य शिजवून खाण्याची बुद्धी सुचली. त्यासाठी तो मातीची भांडी वापरू लागला आणि आपल्या जीवनाला त्याने एक वेगळेच वळण लावले. आपल्या जीवनातील कलांचे दर्शन तो भांड्यावर रेखाटू लागला.

त्याच्या चौकस आणि शोधक दृष्टीला धातूंचाही शोध लागला. दगडी गुळ-गुळीत हत्यारांबरोबरच आता तो तांब्याची हत्यारे बनवू लागला. अशा प्रकारे एका शेतीच्या शोधापाठोपाठ त्याला पशुपालन व संगोपन आणि इतर मानवी विकासाच्या घटना पाहिल्या की पहिल्या सुधारणेच्या काळाला जेवढा प्रदीर्घ कालावधी लागला त्यापेक्षा अत्यंत कमी अवधीत मानवाला वरील सुधारणा करता आल्या आणि येथूनच मानवी जीवनाच्या इतिहासाची खरी सुरुवात झालेली स्पष्ट दिसून येते.

महाराष्ट्रात मानवाच्या आद्य वसाहती


आद्य अश्म-युगापासून ते शेतीवाडीच्या सुरुवातीच्या कालखंडापर्यंतच्या प्रदीर्घ कालासंबंधाने आम्ही महाराष्ट्रात आणि भारतात अनेक ठिकाणी उत्खनने केली. आम्ही केलेल्या कार्याच्या निष्कर्षावरून मानवाने वसाहत करून जीवन जगण्याची पद्धती आणि शेतीवाडीची सुरुवातही निश्चितपणे कोणत्या काळापासून सुरू झाली, तसेच त्याचे मूळ स्थान कोणते, यासंबंधीची निश्चित स्वरूपाची काहीही माहिती आमच्या आजपर्यंतच्या कार्यात प्राप्त झालेली नाही. आम्हांला जर काही आढळून आले असेल तर ते म्हणजे सिंध, पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, आंध्र, मद्रास, म्हैसूर, गुजरात व महाराष्ट्र या ठिकाणी शेतीची सुरुवात झालेल्या काळात मानवी जीवन जगण्याला ज्या ज्या गोष्टींची जरुरी होती त्यासंबंधीच्या सर्व कला, कल्पना आणि पद्धती, म्हणजे मातीची भांडी बनविण्याची कला, दगडी मण्यांचे दागदागिने बनविण्याची कला, सोन्याचे आणि तांब्याच्या धातूसंबंधीचे ज्ञान, तसेच गहू, तांदूळ, ज्वारी, कडधान्ये आणि कापूस इत्यादी पिकविण्याच्या कल्पना, तसेच कापड आणि कच्चे रेशीम बनवण्याच्या आद्य कल्पना इत्यादी जीननावश्यक गोष्टींचे जे बहुतांशी शोध या शेतीच्या सुरुवातीच्या काळातच हळूहळू लागू लागले, हे सर्व शोध व आद्य अश्मयुगापासून ते गारगोटीच्या धारदार पात्याच्या हत्यारापर्यंत ती हत्यारे बनवण्याच्या मूळ कल्पना आणि कला यांचे उगमस्थान येथेच असल्याबद्दलचे काहीही पुरावे दिसून आलेले नाहीत.

या सर्व गोष्टी विचारात घेता या भागात आपणाला प्राप्त होणाऱ्या मानवी वस्तीच्या खाणाखुणा व मानवी जीवनोपयोगी वस्तू या सर्व प्रांताच्या बाहेरून कोठून तरी आलेल्या दिसून येतात. त्यामुळे येथील मानवी अस्तित्वाला 'वसाहती' असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. वसाहती म्हटल्या की बाहेरून येणारा मानव हा कोठे तरी सांदीकोपऱ्याला येऊन आपली वसाहत निर्माण करतो. परंतु येथे तर मोठमोठ्या नद्यांच्या खोऱ्यांतही वसाहती आढळतात. तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा, प्रवरा इत्यादी नद्यांच्या खोऱ्यांत तर वसाहती आहेतच, परंतु वरील नद्यांच्या लहानसहान खोऱ्यांत म्हणजे कान नदी, पंजरा नदी, म्हाळंग नदी इत्यादी उपनद्यांच्या खोऱ्यांतही तत्कालीन मानवाच्या वसाहती दिसून येतात.

साधारणपणे ख्रि. स. पूर्व दोन हजार वर्षांपासून आपल्या देशातील प्रांताचे आणि उपप्रांताचे वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या हद्दीच्या खाणाखुणा दिसून येऊ लागल्या होत्या. तत्कालीन जीवनमान आणि सांस्कृतिक परिस्थिती पाहता त्याच्यात विशेष फरक झाल्याचे दिसून येत नाही. उत्खननाद्वारे प्राप्त झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण मातीच्या भांड्यांच्या आकारात त्यांना सांस्कृतिक नावे प्रदान करण्यात आली आहेत. हे वैशिष्ट्य त्या भांड्यांची जडणघडण, आकार, प्रकार, बनावट व त्याचा पोत या सर्व गोष्टींचा संशोधनात्मक

गोष्टींतून अभ्यास करून त्यांचे भिन्नत्व ठरवण्यात येते आणि अशा संपूर्णतया भिन्न सांस्कृतिक मूल्यांना नवीन सांस्कृतिक नामाभिधान देण्यात येते. ज्याप्रमाणे जोर्वे आणि नेवासा संस्कृती प्रकाश आणि सावलडा संस्कृती, म्हैसूर प्रांतातील ब्रह्मगिरी संस्कृती किंवा नव अश्मयुगीन संस्कृती, नर्मदा घाटीमधील महेश्वर नावडाटोळी संस्कृती; या त्या

प्रागैतिहासिक काळाची मातीची भांडी, गारगोटीची हत्यारे आणि तांब्याची कुऱ्हाड



संस्कृत्या. सर्वसाधारणपणे आपण जे सध्याचे सांस्कृतिक व भाषिक दृष्टिकोणातून प्रांत पाहतो त्या प्रांतांशी आणि त्या वेळच्या संस्कृतीशी तुलना करता ते किती एकमेकाच्या जवळ आहेत हे दिसून येते. तेव्हाची महेश्वरनावडा-टोळी संस्कृती म्हणजे सध्याचा माळवा प्रांत. नेवासा, जोर्वे, नाशिक म्हणजे सध्याचा पश्चिम उत्तर महाराष्ट्र, ब्रह्मगिरी म्हणजे म्हैसूर, कर्नाटक, इत्यादी. या विषयाचा आम्ही सूत्रबद्ध आणि सुसंबद्ध असा सखोल अभ्यास गेल्या दहा वर्षांपासून पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टिकोणातून करीत आहोत. आणि त्यामुळे जोर्वे-नेवासा येथे वापरत असलेली मातीची भांडी ही महाराष्ट्रात केव्हा-पासून सुरू झाली, तशीच महाराष्ट्रभर कोठपर्यंत व कशा पद्धतीने त्यांचा प्रसार झाला किंवा ती वापरात आली इ. प्रश्नांवर आज आम्ही त्यावर कालमानाप्रमाणे अधिक प्रकाश टाकू शकलो.

यासंबंधीचा निष्कर्ष काढता, खिस्तपूर्व १५०० ते ८०० ह्या कालखंडात ही संस्कृती येथे नांदत असलेली दिसून येते आणि तिचा विस्तार उत्तरेला पार नर्मदा, तापी नद्यांच्या खोऱ्यापासून दक्षिणेला कृष्णा-तुंगभद्रेच्या तटापर्यंत दिसून येतो. उत्तरेकडील नावडाटोली, महेश्वरी येथील उत्खननात प्राप्त झालेली खापरे महाराष्ट्रात गोदावरी, प्रवरा आदी नद्यांच्या खोऱ्यातील दायमाबाद, नेवासे, पैठण येथील उत्खननात जोर्वे संस्कृतीच्या खापराच्या अगोदरच्या कालखंडातील दिसून येतात. गेल्या दोन वर्षांपासून आम्ही घोडनदीच्या किनारी इनामगाव येथे जे उत्खनन केले त्या ठिकाणी उत्तरेकडील

माळवा संस्कृती व दक्षिणेकडील ब्रह्मगिरी संस्कृती यांची इतकी सरमिसळ झालेली दिसून येते की, ती कशी झाली हे समजून येत नाही. विशेषतः अखेरच्या कालखंडात म्हणजे खि. स. पूर्व ६०० ते ८०० च्या काळात दक्षिणेकडील संस्कृतीची छाप पडलेली दिसून येते, आणि पुढील काळातही त्याचा जोर वाढल्याचे दिसून येते.


मानवाचे महाराष्ट्रातील सुरुवातीचे जीवन

सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रातील मानवाच्या जीवनाच्या मूलभूत गरजांचा विचार करता त्याच्या घरादाराचा प्रथम विचार करू. या काळातील महाराष्ट्रातील खेडोपाडीची घरे गोलाकार पद्धतीची असून वासुदेवाच्या टोपीप्रमाणे ती वरच्या बाजूला गवताने शाकारून बनवलेली होती. एका लहान खोलीची झोपडीवजा ती घरे होती. खाली गोलाकार आकार असलेले फूट दीड फुटावर खांब किंवा मेढी आधारासाठी पुरत असत. या मेढीच्या बाजू विणलेल्या तट्टयाने झाकून घेत. ह्या बहुतेक तट्टया किंवा चटया स्थानिक वेलापासूनच बनवत असत आणि या चटयांवरून मातीच्या गिलाव्याने ते लिंपून घेत व त्यावरून सारवत. अशाच प्रकारे घरातील जमिनी पण .चापूनचोपून बनवीत. कुडाच्या मातीच्या भिंती असलेल्या झोपडीवजा खोलीत राहणाऱ्या ह्या महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्याच्या झोपडीत जरा डोकावून पाहिले तर काय दिसते ? प्रथम डोळ्यात भरणारी गोष्ट म्हणजे ते भले मोठे सारवणीचे रांजण. त्या रांजणाचे बारकाईने निरीक्षण केले तर त्याला खाली आधारासाठी चार मातीचे पाय बनवलेले दिसून येतात. शिवाय पक्का आधार मिळावा म्हणून चपटे चार दगड बाजूला लावलेले दिसून येतात. खाण्यापिण्याची भांडी पाहता त्यांत काही वाडगी, कटोरे व इतर काही कंगोरा असलेली भांडी आढळून येतात. कंगोरा असलेले सरळ तोटीचे किटलीप्रमाणे जे भांडे असते त्याला धरण्यास हात (हॅन्डल) नसतो. ताटे किंवा थाळ्या मात्र या भागात कुठेही आढळून आल्या नाहीत.

जोर्वे-नेवासे संस्कृती म्हणजे काय ?

जोर्वे-नेवासे संस्कृतीची ताम्रपाषाणकालीन मातीची वैशिष्ट्यपूर्ण भांडी म्हणून जी ओळखली जातात, किंबहुना महाराष्ट्रातील आद्य वसाहतीमधील मानवाची जोर्वे संस्कृती म्हणून जी ओळखली जाते त्याचे कारण म्हणजे १९५१ च्या सुमारास प्रवरा नदीच्या काठी संगमनेरजवळ जोर्वे या गावी केलेल्या उत्खननात ही अशा प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण भांडी सर्वप्रथम उजेडात आली आणि त्या संस्कृतीचे कालमान शास्त्रीय पद्धतीने ठरले गेले. तो काळ म्हणजे खिस्तपूर्व बाराशे ते पंधराशे हा होय. ह्या वैशिष्ट्यपूर्ण भांड्यांचे आगळेपण त्यानंतर महाराष्ट्रात इतरत्र झालेल्या सर्व ताम्रपाषाण-युगीन संस्कृतीच्या थरांत आढळून आले. नेवासे येथे मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आणि त्या संस्कृतीमधील भांड्यांवर अधिक प्रकाश पडल्यामुळे त्याला जोर्वे–नेवासे


संस्कृती म्हणण्याची पद्धत पडली. या भांड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे तुलनात्मक दृष्ट्या ही भांडी पातळ असून चाकावर बनवलेली आहेत. या भांड्यांची घडण ही अतिशय उत्कृष्ट पद्धतीची आहे. विटकरी किंवा आलवणी तांबूस अशा बाह्य रंगाची ती असून काळ्या रंगाच्या रेषांनी त्यावर भौमितिक आकृत्यांनी नक्षीकाम केलेले दिसून येते. ही भांडी जर आपण प्रथमच पाहिली किंवा हाताळली तरी त्यांचे वैशिष्ट्य आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या भांड्यांचे आणखी एक गुणवैशिष्ट्य म्हणजे त्यांची भट्टीमधील भाजणी उत्तम प्रकारची झाल्यामुळे त्यांचा आवाज धातूच्या भांड्याप्रमाणे खणखणीत येतो. अशा प्रकारची ही इतकी सुंदर भांडी बनविताना त्या कुंभारातील कलावंत जागा होतो आणि एखादे धावणारे कुत्रे किंवा बागडणारे हरिण असे अगदी सहजपणे त्याच्या कुंचल्यातून त्या भांड्यावर रेखाटलेले असते आणि त्या कालखंडाला



त्याने जिवंतपणा आणून बोलके केलेले असते. प्रसंगी एखाद्या वाडग्यावर स्वस्तिक-सारखे शुभचिन्ह काढलेले आढळून येते. महाराष्ट्रासह भारताच्या अन्य प्रदेशातही भांड्यांवर काढलेली प्राचीन जनावरांची चित्रे दिसून येतात. परंतु महाराष्ट्राचे वैशिष्ट्य स्वस्तिकमध्ये आहे. ते दक्षिण भारतात व महाराष्ट्रात प्रथमच दिसून येते.

प्रत्येक कुटुंबासाठी जेवणाची व स्वयंपाकाची स्वतंत्र भांडी असत. कुटुंबाची सांपत्तिक परिस्थिती आणि घरातील मंडळींची संख्या यावर भांड्यांचा आकडा अव-लंबून असे. गहू, ज्वारी, वगैरे अन्नधान्याचे पीठ करण्यासाठी आणि प्रसंगी दगडी-कुऱ्हाडी घासण्यासाठी व धार लावण्यासाठी सपाट मोठी बैठक असलेल्या दगडात नावेप्रमाणे खोलगट असा खल वापरत. या खलात खलण्यासाठी बहिर्गोलाकृती दुसऱ्या वरंवंट्याप्रमाणे वापर होणारा दगड वापरत. अशा प्रकारचा खल आणि खलण्याचा वरवंटा दोन किंवा अधिक कुटुंबांत वापरला जात असावा. त्यामुळे तो दोन घरांमध्ये ठेवलेला आढळून येतो. धान्याचे पीठ करण्याची पद्धत यातूनच पुढे उगम पावून त्याचे जात्यात आणि त्यापुढे गिरणीत अशी स्थित्यंतरे होत गेली.

मृतांना राहत्या घरातच पुरण्याची पद्धती या कालखंडात दिसून येते. मृत दोन-तीन बालकांना एका मडक्यात पुरण्यात येई. प्रौढांनाही प्रसंगी मडक्यात पुरत. परंतु त्यासाठी मात्र अधिक मडकी लागत. परंतु एरवी ते त्यांना तीन ते पाच मीटरचा



खड्डा घेऊन पुरत. दक्षिणेकडे पाय व उत्तरेकडे डोके करून पुरण्याची पद्धत महाराष्ट्रासह दक्षिण भारतात दिसून येते. मृताशेजारी त्याच्या सांपत्तिक परिस्थितीप्रमाणे त्याच्या वापराची भांडीकुंडी ठेवत. नेवासे व चांडोली येथे तर मृतांच्या गळ्यांत तांब्याच्या मण्यांची माळ आढळून आली. नेवासे येथील या मण्याची माळ एक धागा रेशीम व एक धागा सूत अशा दुहेरी विणलेल्या दोऱ्यात गुंफलेली होती. त्या वेळी तांब्याच्या मण्यांची माळ हा श्रीमंती दर्शविणारा आणि चैनीसाठी वापरलेला दागिना समजण्यात येत असावा. कारण तांबे हा धातू तेव्हा अत्यंत दुर्मिळ किंवा दुष्प्राप्य असावा. अशा प्रकारचे रेशीम आणि कापूस ह्यांचे संमिश्र सूत भारतात प्रथमच मिळत असल्याची नोंद आहे.

अन्नधान्य व आहार

अन्नधान्याच्या बाबतीत सोनगाव व इनामगाव येथील निष्कर्षांवरून ही झोपडीत राहणारी मंडळी आपल्या आहारात गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ इत्यादी अन्नधान्ये वापरीत असत हे देखील प्रथमच उजेडात आलेले आहे. वरील धान्याच्या आहाराबरोबर मिठात घालून वाळलेले डुकरांचे मांस, गोमांस, नदीवरले मासे, कासव आणि काही सरपटणारे प्राणी पण ते खात असावेत. याजबरोबर ते अल्प प्रमाणात शिकारही करीत. हे काही असले तरी आता शेतीची सुरुवात करणाऱ्या या मानवाचे लक्ष पशुसंगोपन व पशुसंवर्धन यांकडे वेधले गेले. डुकरे, बदके, कोंबड्या इत्यादी पशुपक्षी तो पाळू लागला. ताम्रपाषाणयुगीन जीवनपद्धतीसंबंधी जर सर्वप्रथम कोठे प्रकाश पडला असेल तर तो इनामगाव येथील उत्खननामुळे.


एक लहानसे शेतीप्रधान खेडे. साधारणतः एका खोलीएवढ्या आकाराच्या शंभर एक झोपड्यांचे ते कोणते बरे गाव असावे ! त्या गावात पाचशेच्या दरम्यान लोकसंख्या असून कुटुंब स्वतःच्या उदरनिर्वाहापुरते पिकवित होते. जरुरीपुरती दगडी हत्यारेच स्वतःची स्वतःच बनवीत. ग्रामकुंभार गावकऱ्याच्या आवश्यकतेनुसार त्यांच्या भांड्याच्या गरजा भागवत होता. ख्रिस्तपूर्व पाचशेच्या दरम्यान जेव्हा मानवी जीवनात लोखंडाने प्रवेश केला तेव्हा त्या वेळी दगडी हत्यारे कमी होऊन त्याऐवजी लोखंडाने व तांब्याने ती जागा घेतली. लोखंडाच्या आगमनाबरोबर घोड्याचे पण आगमन झाले. अगदी प्रथम अवस्थेत त्यांचा लढाईसाठी वापर केला. दळणवळणासाठी त्यांनी तेव्हा त्याचा एवढा वापर केला नाही. या दोन्ही गोष्टींची नोंद नागपूरजवळ जुनापाणी आणि टाकळघाट येथे झालेल्या उत्खननावरून प्रथमच उजेडात आलेली आहे. लोह-तंत्राचा वापर व त्याचे फायदे हे त्या वेळच्या राजेरजवाड्यांनी करून घेतल्याचे दिसून येते. त्या वेळचे प्रसिद्ध साम्राज्य म्हणजे सातवाहनांचे प्रतिष्ठान–सध्याचे पैठण. आणि इतर प्रसिद्ध शहरे म्हणजे नाशिक, जुन्नर, तरे, नेवासे, कोल्हापूर ही होत. व्यापारामुळे समुद्र-काठची बंदरेही प्रसिद्धीस आलेली होती. त्यांपैकी कल्याण, ठाणे, सोपारा ही महत्त्वाची होत. गेल्या शतकापासून आधुनिक तंत्रशास्त्राची सुरुवात झाली आणि खेड्याच्या स्वयंपूर्णतेला धडक देऊन आघात केलेला आहे. शहरापासून दूरवर असलेल्या स्वयं-पूर्णतेने जीवन जगणाऱ्या खेड्याचे हक्क त्या शहरांनी हिरावून घेतले आहेत आणि त्यांना परावलंबी करून सोडले आहे. परकीयांची आक्रमणे आणि आंतरिक बंडाळ्या, तसेच राजेराजवाड्यातील वंशपरंपरागत युद्धे यांतून ती वाचली हा त्यांचा फार मोठा विजयच मानावा लागेल.

सांस्कृतिक संबंध


साधारणपणे ख्रिस्तपूर्व पंधराशेपासूनच प्रादेशिक भावनेचा उद्गम होऊन आपले वैशिष्ट्य दिसू लागले होते. त्याची कारणे म्हणजे भारतात चोहोकडे सांस्कृतिक संबंध, कलाविषयक प्रश्न, वंशविषयक समस्या यांसंबंधीची सर्वसाधारण जागृतीची भावना निर्माण होऊ लागली होती; आणि या प्रादेशिक भावनेतूनच सांस्कृतिक संबंध सुरू झालेले दिसून येतात. महाराष्ट्राचे म्हैसूर, गुजरात, मध्य प्रदेश आणि आंध्र यांच्याशी ते संबंध कायमचे टिकून होते आणि त्यामुळेच शेजारच्या प्रांताला जे जे काही लागेल ते तो त्या प्रांतातून घेऊन जात असे.

त्या काळी नर्मदा तीरावर राहणारे लोक गहू, हरबरा डाळ, मूग, तांदूळ, मसूर आणि एक प्रकारची वालपापडी व बोरे खात होते, हे महेश्वर, नावडाटोळी येथे केलेल्या उत्खननावरून सिद्ध झालेले आहे. ही अन्नधान्ये उत्तरेकडून खाली दक्षिणेत पसरत आलेली असावीत. इनामगाव येथे फक्त गहू व डाळ आढळला. तो खानदेशामार्फत माळव्यातून आलेला असावा. सुतार-कामाची घासून गुळगुळीत केलेली

दगडी हत्यारे, छिन्या, दगडी पटाश्या, मोठमोठ्या दगडी कुऱ्हाडी, तसेच मृतांना घरात पुरण्याच्या पद्धती या गोष्टी दक्षिणेकडून महाराष्ट्रात आलेल्या दिसून येतात. महा-



↑ सुताराची दगडी हत्यारे



छिनी (दगडी) →

राष्ट्राचे वैशिष्ट्य म्हणूनच जर काही दाखवावयाचे असेल तर ती म्हणजे मातीची भांडी. मातृकांच्या पूजापद्धतीचा त्या वेळी महाराष्ट्रात आढळ होतो. परंतु तिचा उगमसुद्धा परदेशातूनच म्हणजे पश्चिम आशियातून इकडे आलेला दिसून येतो. प्रकाशे येथे जळलेल्या लाकडाच्या प्राप्त अवशेषांवरून तेथे त्या काळी खैर, सागवान, सिसम ह्या प्रकारची झाडी होती, हे सिद्ध होते. त्यामुळे त्या वेळच्या व हल्लीच्या सर्वसाधारण भौतिक आणि हवामान परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसून येत नाही.

या सर्व गोष्टी विचारात घेतल्या की, भारतात दिसून येणारी ही संस्कृती आणि तिच्याशी संबंधित अशी इतरत्र असलेली संस्कृती आणि त्यांचा विकास वा वाढ ही बाहेरच्या संपर्काशिवाय होऊ शकलेली नाही हे अगदी स्पष्ट होते. या गोष्टीला आणखी एक दुजोरा मिळतो. १९५९–६० मध्ये नेवासे आणि १९६३ मध्ये चांडोली येथे करण्यात आलेल्या उत्खननांतून त्या ठिकाणी प्राप्त झालेले मृतांचे सांगाडे हे शारीरिक दृष्ट्या पाहता सध्याचे जे आदिवासी किंवा भिल्ल यांच्यासारखे वरून पाहता दिसत असले तरी या जमातीच्या आणि ताम्रपाषाणयुगीन जमातीच्या भौतिक गोष्टींची तुलना करता तत्कालीन लोक हे सध्याच्या आदिवासी किंवा भिल्ल जमातींपेक्षा कितीतरी पुढारलेले होते हे दिसून येते. तसेच त्यांच्या आणि सध्याच्या लोकांत गुणधर्मांशी तुलना करता खूपच भिन्नत्व दिसते.

गेल्या सुमारे दहा वर्षांपासून महाराष्ट्रमधील ताम्रपाषाणयुगीन कालात सांस्कृतिक बदल कसकसे होत गेले आहेत यांचे आता हळूहळू स्पष्ट चित्र उमटू लागलेले आहे. अश्मयुगीन कालखंडाच्या लाख ते दीड लाखाच्या प्रदीर्घ कालखंडात

महाराष्ट्रातील मानव हा सांस्कृतिक दृष्ट्या बाहेरच्या देशापेक्षा किंवा लगतच्या प्रांतापेक्षा कुठेही कमी नव्हता हे आमच्या संशोधनाने मागील प्रकरणांतून दाखवून दिलेले आहेच. तेच कौशल्य, तीच पद्धती, तशीच निर्मिती त्यांनी दगडी हत्यारांत दाखवून दिलेली असून, दगडी अलंकार, शंखशिंपल्या, आभूषणे तो बनवी व वापरी. शस्त्रे व आयुधे आता गुळगुळीत दगड घासून करी.

कोणताही भाषिक किंवा सांस्कृतिक विभाग घ्या. त्यात विशेष असे सांस्कृतिक संबंध एकमेकांत गुंतलेले दिसून येतात. मग त्यात काही दूरचे असतील किंवा काही नजीकचे. तसेच काही स्थानिकही असू शकतील. ते नेहमीच संमिश्र असतात. अशा विविध प्रकारच्या संबंधांतून बनलेल्या संस्कृतीवरच नैसर्गिक वा भौगोलिक गोष्टींचा परिणाम होऊन त्यातूनच हळूहळू एक वेगळे वैशिष्ट्य निर्माण होते आणि त्या प्रांताला आपण तशाच प्रकारचे विशेष असे नाव देतो. नंतर कालमानाप्रमाणे त्या नावाने तो प्रांत ओळखला जातो. यातूनच सध्याचे म्हैसूर, गुजरात आणि महाराष्ट्र हे प्रांत निर्माण झाले.

४ : लोहयुग–आगमन

आद्य नागरी जीवन

शेतीवाडींनी युक्त अशा स्वयंपूर्ण खेड्याचे अस्तित्व इ. स. पूर्व १५०० च्या सुमारास दिसून येते आणि महाराष्ट्रात ते सुमारे इ. स. पूर्व ५०० पर्यंत टिकून राहिलेले दिसते. जवळजवळ हजार वर्षांचा हा महाराष्ट्रातील ताम्रपाषाण युगाचा कालखंड होय. परंतु जेव्हा लोहाचे आगमन झाले आणि ते प्रचारात आले तेव्हा परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. केवळ महाराष्ट्रातच नाही तर भारतात सर्व ठिकाणी तोच परिणाम झाल्याचे दिसून येते. लोखंडाची साधने व हत्यारे, पैशाच्या स्वरूपात नाण्यांचा वापर आणि लेखनपद्धती ह्या तिन्ही गोष्टींचे अस्तित्व लोह-युगाच्या अगोदरच्या कालखंडात दिसून येत नाही. मानवी जीवनाला अत्यंत पोषक व उपयुक्त अशा ह्या गोष्टींचा अभाव असल्याचे पुरातत्त्वशास्त्राने आपल्या गेल्या वीस वर्षांच्या संशोधनाने सिद्ध केलेले आहे. या सत्य गोष्टी उजेडात आल्यामुळे कोणालाही आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. परंतु त्याचे कारण म्हणजे आपल्या अंतःकरणात खोलवर रुजलेली अंधःश्रद्धा आणि त्या श्रद्धेवरील जबरदस्त विश्वास.

लोहाचे आगमन कोठून झाले ? त्याचे मूळस्थान एकच आहे की अनेक ? परंतु यांपैकी निश्चित काहीच आज सांगता येणार नाही. साधारणपणे इ. स. पूर्व ८०० च्या दरम्यान किंवा त्याच्या थोडे अगोदर, पूर्व आणि दक्षिण भारतात, लोहाचे स्वतंत्रपणे आगमन झाल्याचे दिसून येते; आणि साधारणपणे त्याच दरम्यान उत्तर प्रदेश नंतर पंजाब, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र येथेही त्याचे आगमन झाल्याचे दिसून येते.

लोहाचा वापर करण्याचा मानवाचा कालखंड आणि राहत्या घरातच मृतांना

पुरणाऱ्या ताम्रपाषाणकालीन मानवाचा कालखंड या दोन कालखंडांमधील कालमानाचे अंतर दर्शविणारा पुरावा म्हणजे काळ्या मातीचा पट्टा आम्हांला नेवासा येथील उत्खननात दिसून आला. या पट्ट्याचेपूर्वी ताम्रपाषाणयुगाची समाप्ती झालेली दिसून येते. ताम्रपाषाणयुगाची समाप्ती झाल्यानंतर त्या वसाहतीच्या जागेवर झाडेझुडपे वाढून जंगल तयार झाले आणि कालांतराने त्या झाडाझुडपांच्या व वनस्पतींच्या योगाने जमिनीला काळेपणा प्राप्त झालेला दिसून येते. असाच अद्‌भुत प्रकारचा देखावा आम्हांला नाशिक येथील उत्खननात १९५१ मध्ये दिसून आला होता; आणि त्यानंतर अशाच प्रकारच्या भौगोलिक परिस्थितीचे दर्शन बहाळ, प्रकाशे आणि अन्यत्र काळजीपूर्वक केलेल्या उत्खननांतून दिसून येते.

इनामगाव येथील परिस्थितीत थोडासा फरक आहे. परंतु तात्पर्य मात्र तेच आहे. इनामगावचे ताम्रापाषाणकालीन स्थळ बरेच मोठे, विस्तृत स्वरूपाचे आहे आणि तेथील भूपृष्ठावरच ताम्रापाषाणकालीन अवशेष प्राप्त होतात. किरणोत्सर्ग (कार्बन १४) या कालमापनपद्धतीच्या निष्कर्षांवरून तेथील वरच्या थरातील कालाची निश्चिती खि. स. पूर्व ७०० ठरते आणि त्यानंतर मात्र त्या वसाहतीवर कोणी वस्ती केलेली नाही. याचाच अर्थ अडीच हजार वर्षांपूर्वी ताम्रापाषाणयुगीन मानव आठशे वर्षे वस्ती करून तेथे राहिला. त्यानंतर त्यावर झाडेझुडपे उगवून जंगल माजले आणि त्यामुळे परवापर्यंत ते ठिकाण सुरक्षित राहिले.

ताम्रापाषाणकालीन ह्या वसाहतीचा नाश किंवा ऱ्हास कसा झाला हे काही सांगता येत नाही. ज्याप्रमाणे उत्तर प्रदेश, बिहार आणि म्हैसूर या प्रांतांतील मानवी जीवनात हळूहळू बदल होत गेला त्याप्रमाणे महाराष्ट्रातही झाला असावा का ? का पश्चिम बंगालप्रमाणे प्राचीन मानवी वसाहतीचा जसा जबरदस्त विध्वंस होऊन त्या मोठ्या प्रमाणावर उखडून टाकल्याचे दिसून येते तसे महाराष्ट्रात झाले असावे ? परंतु त्यांपैकी कोणताही पुरावा आतापर्यंत महाराष्ट्रातील उत्खननात आढळून आलेला नाही. नाशिक, नेवासा, चांडोळी, सोनगाव, प्रकाशे, बहाळ, कौंडण्यपूर, टाकळघाट आणि सध्याचे इनामगाव या महत्त्वाच्या ठिकाणी तर त्यासंबंधी काहीच दिसून येत नाही. पुष्कळशी प्राचीन ठिकाणे पण वस्तीविरहित उजाड झालेली दिसून येतात. त्यांवर नवीन झालेल्या वसाहती या शांततापूर्वक झाल्याचे दिसून येते. त्यांना वसाहती म्हणण्यापेक्षा शेतीवाडींनी युक्त अशी वसाहत म्हणजे खेड्यापाड्याचे रूपाने निर्माण झालेली खेडेगावाची–ती ग्रामीण संस्कृतीची उभारणी म्हणावे लागेल. सुरुवातीच्या काळात ती महाराष्ट्रात दिसून येते; आणि नंतर ती मध्यपूर्व आणि दक्षिण भारतात पसरत गेलेली दिसून येते. परंतु सिंध, पंजाब, राजस्थान आणि गुजरात येथील परिस्थिती मात्र सर्वथैव भिन्न दिसून येते. सध्या पश्चिम पाकिस्तानातील सिंधमधील मोहेंजोदारो व पश्चिम पंजाबमधील हरप्पा त्याचप्रमाणे भारतातील गुजरात राज्यातील लोथल, राजस्थानमधील कालीबंगन् येथील मोठ्या प्रमाणावरील उत्खननावरून

खि. स. पूर्व २२०० वर्षांपासून पश्चिमेकडील प्रांतात नागरी जीवन भरभराटीला आलेले दिसून येते.

लोहाचे आगमन होताच भाजलेल्या विटांची बांधलेली घरे आणि तटबंदीची शहरे निर्माण झाली. सुरुवातीच्या काळात अगदी जुन्या पद्धतीची नाणी चौरस किंवा लंब-चौरस आकाराची असत. अशा प्रकारे लहान लहान चांदीचे तुकडे पाडून त्यांवर चक्र, दर्श, ठिपके इत्यादीसारख्या खुणा दाबून उठविलेल्या दिसून येतात. त्यांना 'पंचमार्क' नाणी म्हणूनही संबोधिले जाते. ही त्या वेळची पहिली प्राचीन प्रकारातील नाणी. त्या-नंतर ग्रीकांची सुंदर नाणी भारतीयांच्या दृष्टीस पडली. एका बाजूला राजाचा मुखवटा व दुसऱ्या बाजूला त्याच्या देवदेवता आणि राज्यासंबंधीची थोडक्यात माहिती. भारतीय नाण्याचे इतके चांगले रूपान्तर होण्यासाठी काही शतके गेली. राज्यकर्त्यांपैकी काहींनी



सातवाहनकालीन नाणी

स्वदेशातील वैशिष्ट्य दर्शविणारी अशी नाणी पाडली. त्या वेळचे पहिले राज्यकर्ते सात-वाहन किंवा आंध्र हे होत. आकारातील वैशिष्ट्य सोडले तर त्यांची नाणी शुद्ध भारतीय स्वरूपाची दिसून येतात. त्यावर एका बाजूला तुळशीवृंदावनाप्रमाणे मधे एक झाड व भोवती कठडा तसेच तीन चंद्रकोरीप्रमाणे दाखविलेल्या टेकड्या व दुसऱ्या बाजूला राजा व त्यासंबंधीची थोडक्यात माहिती. त्या वेळचा उत्तर महाराष्ट्र हा काही काळ शकक्षत्रपांच्या आधिपत्याखाली होता. त्यांच्या राज्याच्या सीमा कल्याणपर्यंत दिसून येतात. त्यांनी पाडलेली तांब्याची व चांदीची नाणी ही हुबेहूब ग्रीक पद्धतीच्या नाण्यांचे अनुकरण केल्याचे दिसून येते. सातवाहन राजे व क्षत्रप राजे यांच्या त्या वेळच्या वस्त्र-परिधानपद्धती व वेशभूषा यांत खूपच फरक होता हे त्या वेळच्या त्यांच्या नाण्यांवरून दिसून येते. त्यांच्या राज्यातील जनतेच्या राहणीतील अथवा जीवनपद्धतीमधील फरक काही कोठे दिसून येत नाही.

प्रख्यात रोमन इतिहासकार प्लीनी याच्या लेखाच्या आधाराने सातवाहन राज्यातील तीस नगरांना तटबंदी असल्याचा उल्लेख मिळतो, ही काही अतिशयोक्ती नव्हे. कारण त्या वेळची पैठण, कोल्हापूर, नाशिक, नेवासा, कऱ्हाड, बहाळ, प्रकाशे, कौंडण्यपूर, तेर, इत्यादी नगरांच्या उत्खननाने हे सिद्ध झालेले आहे. अर्थातच नगरां-भोवतालची तटबंदी कशा रूपाची होती हे निश्चितपणे मर्यादित स्वरूपाच्या उत्खनना-

मुळे सांगता येत नाही. सोपारा, कल्याण, ठाणे, चौल ही त्या वेळची व्यापारासाठी असलेली प्रसिद्ध बंदरे समजली जात. त्या वेळच्या नगराचे संपूर्ण असे उत्खनन झालेले नाही. त्यामुळे त्या वेळच्या नगररचनेची पुरेपूर कल्पना येत नाही. कोल्हापूर, नाशिक व नेवासा येथील उत्खननामुळ त्या वेळी घरे कशी बांधत यासंबंधीची माहिती उपलब्ध झालेली आहे. चिखलमातीत मोठमोठे दगडगोटे घालून भरभक्कम पायावर भाजलेल्या विटांची वास्तू उभारीत. ही घरे तशी काही लहान नाहीत. कोल्हापूर येथील उत्खननात प्राप्त झालेल्या स्वयंपाकघराची लांबी १० फूट व रुंदी ६'-६" अशी होती. घरातच साठवणीचा रांजण पुरलेला असून त्याचे तोंडाचा भाग तेवढा जमिनीचे वर ठेवून समोरासमोर दोन स्वयंपाकाच्या चुली दिसून येतात. घरातील जमीन चापून चोपून बनविलेली दिसून येते. दुसऱ्या घराला तीन खोल्या आढळून आल्या. त्या प्रत्येकी ६'×६' लांबी-रुंदीच्या होत्या. त्यांना लागूनच दोन लांबलचक व्हरांडे असून ते २० फूट आणि ३० फूट लांबीचे आढळून आले. त्यांची रुंदी सुमारे १० फूट होती.

प्रत्येक घराला सांडपाणी वाहून नेण्याची आरोग्यरक्षणाची सोय होती. आडाप्रमाणे गोल भाजलेल्या मातीच्या पिपाप्रमाणे नळ्याच्या कूपनलिका, त्याचप्रमाणे पक्क्या विटांच्या बांधकामास सांडपाण्याच्या विहिरी (कूपनलिका) दिसून आल्या. त्या तीन फूट रुंदीच्या आणि खोलवर बनवलेल्या होत्या. घराच्या छताची ठेवण उतरत्या स्वरूपाची होती. छतावरील कौले पसरट चौकोनी आकाराची असून त्याच्या वरच्या पृष्ठभागास बोटांनी पन्हाळीचा आकार दिलेला असे. त्यातून पाणी झटकन निघून जाई. कौलाच्या वरच्या अंगाला दोन भोके असून ती छपराच्या लगीवर लोखंडी खिळ्यांनी ठोकून पक्की केल्याचे दिसून येते. आज जरी ही पद्धती लुप्त झालेली असली तरी दोन हजार वर्षांपूर्वी भारतात चोहोकडे हीच पद्धत प्रचारात होती.



भोजनाच्या भांड्यांचा बदललेला थाट

सध्या ज्याप्रमाणे स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचे युग सुरू झाल्याचे दिसून येते, त्याप्रमाणे त्या वेळीही तशीच सफाईदार व सुरेख स्वरूपाची भांडी प्रचारात आली. तुकतुकीत करून चकाकी आलेली भांडी काळ्या रंगाची. आतील बाजूस व बाहेरच्या बाजूला लाल रंग असलेली किंवा वरचीच बाजू लाल रंगाची असलेली. अशा प्रकारची भांडी बनविण्याची हौस भारतात चोहोकडेच या काळात दिसून येते. या काळात भोजनाच्या भांड्यांचा सगळा थाटच बदलून गेलेला दिसून येतो. जेवणासाठी ताट, वाट्या, पाणी पिण्याचे भांडे असा संच आता प्रचारात आला होता. पूर्वीच्या काळची भांड्यांची पद्धती आणि त्यावरील रंगीत नक्षीकामाची पद्धती आता पूर्णपणे लोप पावलेली होती. साठवणीच्या भांड्याच्या पद्धतीत मात्र बदल झालेला नव्हता. त्या तशाच टिकून होत्या. विशेष डोळ्यांत भरण्याजोगा आणि क्रांतिकारक स्वरूपाचा जर कोणता बदल असेल तर तो म्हणजे पूर्वीच्या काळ्या तांब्याच्या किंवा काशाच्या (ब्रॉन्झच्या) धातूची जी हत्यारे वापरात होती, त्याऐवजी आता लोखंडाचा वापर व्यवहारात सरसहा होऊ लागला. केवळ काही प्रसाधनाच्या वस्तूच आता ब्रॉन्झ किंवा तांब्याच्या बनवलेल्या दिसून येतात.

केवळ कुतूहल म्हणून स्वयंपाकघरातील नित्योपयोगी वापराच्या वस्तू पाहिल्या तर त्यांतील फोडणी देण्याची पळी किंवा उलथने, तसेच दगडी जाते ह्या गोष्टी लोह-युगाच्या सुरवातीच्या कालखंडातील असलेल्या दिसून येतात. या वस्तू महाराष्ट्रातील तसेच भारतातील अन्य उत्खननातूनही या कालखंडात प्राप्त झालेल्या आहेत. गरम भांडे धरण्याचा चिमटा मात्र महाराष्ट्र अथवा भारतातील अन्य कोणत्याही उत्खननांत प्राप्त झालेला नाही. सध्या पाकिस्तानात असलेल्या तक्षशिला येथील या कालखंडात तो प्राप्त झाला. आपण या सर्व वस्तूंना भारतीय वस्तू म्हणून संबोधतो. परंतु त्याचे मूळ जनक ग्रीक व रोमन हे होत आणि त्यांच्याकडूनच आपणाकडे परंपरेने त्या आलेल्या आहेत आणि कालमानाप्रमाणे आपण त्यांना भारतीय म्हणून संबोधतो.

लोहाचे आगमन आणि त्याचा प्रसार, त्याचबरोबर भारताचे जगातील देशांशी संबंध प्रस्थापित होत गेले, त्याबद्दल कोणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. त्या वेळी भारताचे पाश्चात्त्य देशांशी आणि आग्नेय देशांशी अत्यंत दृढ स्वरूपाचे संबंध आले होते. वरील देशांशी भारताचे व्यापारधंदे, सांस्कृतिक देवाणघेवाण व राजकीय संबंध विशेष मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येतात. हे संबंध प्रस्थापित होण्यासाठी त्या वेळचा बौद्धधर्म हा मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाला. भारतात आणि वरील देशांत त्या धर्माचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात होऊन तो चोहोकडे फैलावला होता. भारतातील या धर्माबरोबरच कलावस्तूंचा प्रसार रोमपर्यंत पोहोचलेला दिसून येतो. लॅम्पसाकोस (Lampsachos) येथे त्या काळातील प्राप्त झालेली चांदीच्या तबकावरील लक्ष्मीची मूर्ती आढळून येते, तर याउलट भारतावर ग्रीक व रोमन कलावस्तूंचा पगडा पडून त्या भारतीय जीवनाशी एकरूप झाल्याचे दिसून

येते. बौद्धधर्माचे वैशिष्ट्यपूर्ण प्रतीक म्हणून जे मानले जाते ते चैत्य आणि नंदीपद हे शुद्ध भारतीय प्रतीक म्हणून आपण मानतो. त्याबरोबर प्राप्त होणाऱ्या कलाकृतींची जर अत्यंत बारकाईने पाहणी केली तर त्यावर पडलेली पाश्चात्त्यांची एकरूपतेची छाप दिसून येते. अशाच प्रकारच्या ग्रीक व रोमन संस्कृतीची छाप पडलेल्या धार्मिक स्वरूपाच्या मूर्ती आम्हांला उत्खननांतून प्राप्त झालेल्या आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील ' तेर ' व आंध्र प्रांतातील ' कोंडापूर ' येथे त्या मोठ्या प्रमाणात मिळालेल्या आहेत. त्या काळातील अशा पद्धतीच्या मूर्तींच्या निर्मितीची ती प्रसिद्ध केंद्रस्थाने होत. चिनी मातीच्या (केव्हॅलिनच्या) लहान लहान मूर्ती ते मोठ्या प्रमाणात बनवत. त्या बालनग्न देवताच्या अगर नग्न देवदेवतांच्या अंगावर मोठ्या प्रमाणात दागदागिने घातलेल्या अशा त्या बनवत असत, आणि तेथून त्यांची बाहेरच्या देशांत मोठ्या प्रमाणात निर्यात झालेली दिसून येते.

त्या वेळी देशात बौद्धधर्माला आणि जैन धर्माला प्रांतिक तथा राष्ट्रीय आश्रय मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेला दिसून येतो. त्या विशाल स्वरूपाच्या धर्मसंघटनेबरोबरच ग्रीक व रोमन संस्कृतींची छाप पडलेल्या वरील प्रकारच्या नग्न देवदेवतांच्या मूर्तिपूजेचा प्रसार समाजात होऊ लागला होता. धर्मदेवता म्हणून पूजाअर्चा करण्याची प्रथा चालू ठेवल्याचे दिसून येते. त्याच वेळेला भारतात अगदी पहिली आणि प्राचीन वास्तूची उभारणी झाली. लोकाश्रयाने व राजाश्रयाने भारतात निर्माण झालेले ' चिरमंगल ' रूप होय. उत्स्फूर्त स्वरूपातून निर्माण झालेल्या त्या भव्य आणि उदत्त वास्तू म्हणजे तो इतिहासाचा साक्षात्कार आहे. तत्कालीन वास्तुशिल्पकलेचे ते अजोड नमुने आहेत. समाजकल्याणाची भावना आपल्या अंतःकरणात सदैव तेवत ठेवणाऱ्या आणि अध्यात्मप्राप्तीसाठी आपले जीवनाचे सर्वस्व वाहिलेल्या, त्या बौद्ध, हिंदू, जैन, साधुसंतांची आणि भिक्षुसंघांची डोंगराच्या कुशीत एकांतवासात कोरलेली ती भव्य आणि दिव्य मंदिरे आणि विहार, लेण्या आणि मठ्या आजही तत्कालीन समाजजीवनाची साक्ष देण्यास उभ्या आहेत.


नैसर्गिक साधनसामग्रीने युक्त असलेल्या ह्या गिरिकंदराच्या रांगा टप्याटप्याने निर्माण आलेल्या आहेत. उतार वाटीसाठी सोईचा आणि खोदकामास अत्यंत उपयुक्त असा हा पहाड आहे; आणि या महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतराजीने गतकालीन दोन हजार वर्षांपूर्वीचा जिताजागता इतिहास आपल्या पोटात मोठ्या जिवाभावाने जसाच्या जसा जपून ठेवला आहे. यास ' महाराष्ट्राच्या आद्य इतिहासाची सोनेरी बखर ' म्हटल्यास वावगे होणार नाही. विदर्भाकडे पाहिले तर त्या ठिकाणी पर्वतराजीच्या अभावी पवनी येथे बौद्धधर्मीयांचे भव्य स्तूपाचे दर्शन उत्खननातून प्राप्त होते.

तत्कालीन देशान्तर्गत व बाह्य व्यापारधंदे हे व्यापारी मार्गांनी जोडले गेलेले होते. सम्राट अशोक हा ह्या योजनेचा मोठा द्रष्टा मानला जातो. त्याने आपल्या कारकीर्दीत या योजना आखून त्याला राजाश्रय दिला, त्यामुळे देशातील पूर्वपश्चिम व

दक्षिणोत्तर या मार्गावरील महत्त्वाच्या बाजारपेठाची मोठी ठिकाणे जोडली गेली आणि मोठमोठी शहरे भरभराटीला आली. एवढेच नव्हे तर सागरी दळणवळणामुळे त्यात आणखीनच भर पडली. हिप्पालोस ह्या रोमन नाविकाने पावसाळी वाऱ्याचा शोध इ. स. ४० मध्ये लावला आणि त्यानंतर रोम व भारताचा थेटपर्यंतचा दर्यावर्दी व्यापार सुरू झाला. यापूर्वीची जहाजे किनाऱ्याकिनाऱ्याने रोमहून भारताला येत. त्यामुळे त्या जलप्रवासाला दीर्घ कालावधी लागे. परंतु या शोधामुळे थोड्या वेळात ही दोन राष्ट्रे जोडली गेली, आणि व्यापाराची भरभराट होण्यास मदत झाली.

मानवी जीवनात लोहाचे आगमन व ओळख होताच आणि व्यवहारात त्याचे महत्त्व समजून येताच अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडून आल्या. मोठमोठ्या शहरांची झपाट्याने वाढ होत गेली. ती होण्यासाठी मोठ्या आकारातील भाजलेल्या विटांच्या भव्य वास्तू उभारल्या गेल्या. त्यावर कौलारू छपरे आली. अशा प्रकारे निर्माण झालेल्या ह्या शहरांच्या सुव्यवस्थेसाठी नगरपालिका (निगमव्यवस्था) अस्तित्वात आल्या. व्यापारी देवाणघेवाण करण्यासाठी पेढ्या निर्माण झाल्या. व्यापारी व कामगार लोकांचे संघ (श्रेणी) निर्माण झाले. पाश्चात्त्य देशांशी दर्यावर्दी व्यापाराची भरभराट सुरू झाल्याने कल्याण, चौल, सोपारा, भडोच, इत्यादींसारखी बंदरे विकास पावून त्यांची वाढ झाली. नाण्याचा व्यवहार पैशाच्या स्वरूपात होऊन तो प्रचारात आला. यांतील बहुतेक गोष्टी ह्या त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या कृपेने निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यांच्या कार्यातील तडफदार वृत्ती आणि जबरदस्त कर्तृत्वशक्ती यांमुळे बऱ्याच गोष्टी झपाट्याने बदलत गेल्याचे दिसून येते. त्यांच्या अंगी असलेल्या ह्या गुणांबरोबरच परोपकार बुद्धी आणि सहिष्णुता ही त्यांच्या रोमारोमात भिनलेली दिसून येते. हिंदुधर्म असो की बौद्धधर्म अथवा जैनधर्म, एवढेच नव्हे तर पाश्चात्त्य देवदेवतांना भजणारे असोत त्या सर्वांना त्यांनी समानतेने वागवले. आपपर हा दृष्टिकोण न ठेवता समानता आणि सहिष्णुता ही त्यांची धर्माकडे पाहण्याची दृष्टी होती, मानवी जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीचा उच्च आणि उदात्त दृष्टिकोण आणि उदारतेचे धोरण त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेवले होते; आणि अशा प्रकारे मानवी जीवनाची उभारणी ह्या वेळच्या महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी केली होती.

सुरुवातीच्या काळातील सातवाहनाच्या इतिहासाची ती थोर व आदर्श परंपरा दुसऱ्या पुलकेशीपर्यंत चालत आल्याची इतिहासाने आपल्या ठळक अक्षरांत नोंद करून ठेवली आहे. दुसऱ्या पुलकेशीच्या महाराष्ट्रसंबंधीच्या प्राप्त होणाऱ्या पहिल्या शिलालेखात तीन महाराष्ट्रांचा उल्लेख आढळतो. ह्याचाच अर्थ ज्याला आपण 'महाराष्ट्र' म्हणून संबोधतो तो ह्या पुलकेशी राज्याच्या अगोदरच अस्तित्वात असलेला दिसून येतो. काही विद्वानांच्या मते हे तीन महाराष्ट्र म्हणजे अश्मक, मुलक व कन्हवेण्णा हे असावेत. तर काहींची अन्य मते आहेत. त्यामुळे त्यासंबंधीचा योग्य तो शोध व बोध झाल्याशिवाय आज त्यासंबंधी काहीच निश्चित सांगता येणार नाही.


महाराष्ट्रातील मानव
अश्मयुगीन शिकारी जीवना पासून शेतीच्याकालापर्यंत
खि.स.पू. १५०,००० ते १५००
टीपा
● शिकारी मानवाच्या वस्तीची स्थळे
▲ आद्य शेतकऱ्यांच्या वसाहतीची स्थळे
★ ऐतिहासिककाल दर्शवणारी उत्खनन स्थळे
■ जिल्ह्यांची ठिकाणे
खाली रेषा असलेली उत्खनित स्थळे
प्रमाण
० ३० ६० ९० १२० १५० किलोमीटर
० १६ ३२ ४८ ६४ ८० ९६ मैल
म ध्य प्र दे श
अकोला
अमरावती
यवतमाळ
भंडारा
चांदा
औरंगाबाद
परभणी
नांदेड
बीड
उस्मानाबाद
सोलापूर
अहमदनगर
पुणे
सातारा
सांगली
कोल्हापूर
रत्नागिरी
ठाणे
जळगांव
बुलढाणा
नाशिक

लोकशाही, न्यायव्यवस्था व शासनव्यवस्था

न्या.मू. वि. अ. नाईक

वरील विषय कोणत्याही परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भात तर या विषयाचे महत्त्व फारच वाढलेले आहे. शासनव्यवस्था व न्यायव्यवस्था यांचे अन्योन्य संबंध काय ? तसेच लोकशाहीत न्यायव्यवस्थेचे स्थान कोणते ? आणि अखेरीस शासनव्यवस्थेवर न्यायासनाची हुकमत असावी की असू नये असे अनेक ज्वलंत प्रश्न उभे ठाकलेले आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीवर येत्या दहा वर्षांच्या घडमोडीच्या स्वरूपाची दिशा अवलंबून आहे.

लोकशाही :

लोकशाही ही एक निव्वळ राजकीय यंत्रणा आहे अशी सामान्य समजूत आहे. त्यात बरेच तथ्यही आहे. पण लोकशाही ही काही निव्वळ राजकीय यंत्रणा नव्हे. तो एक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण आहे, ती एक श्रद्धा आहे, तो एक जीवनमूल्यांचा संग्रह आहे. व्यक्तिमात्रावरील नितांत श्रद्धा हा लोकशाहीचा आत्मा आहे. प्रत्येक माणूस हा साध्यभूत आहे. तो दुसऱ्या कोणाचेही साधन नाही. व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा हे लोकशाहीचे खरे अधिष्ठान आहे. मनुष्य हा विश्वाचा मानबिंदू आहे, या सृष्टीचा तो मेरुमणी आहे. या श्रद्धेतूनच लोकशाहीची मूल्ये अनुस्यूत झाली आहेत. व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्य ही लोकशाहीच्या मूल्यांची परिणत रूपे आहेत. विचारस्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य वगैरे सर्व स्वातंत्र्ये व्यक्तिमत्त्वाच्या स्वयंसिद्ध मूल्यातून व मानवतेच्या प्रतिष्ठेतून उदय पावतात.

लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी व लोकांनी चालविलेले राज्य, ही व्याख्या राजकीय दृष्टीने सर्वमान्य झालेली आहे. म्हणजे स्वतंत्र वातावरणात सार्वत्रिक मतदानाच्या तत्त्वावर खुल्या निवडणुकांच्या आधारावर राजकीय सत्ता निर्भर असली पाहिजे, असा

त्याचा अर्थ आहे. जनतेला राज्यकारभारामध्ये वाटा देणे (Participation of the People) हेच लोकशाहीचे सार आहे. हा वाटा देण्याचे साधन म्हणजे संसद अथवा विधिमंडळ. संसद हीच जनता व सरकार या दोहोंमधला दुवा आहे. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी संसदेवर हुकमत चालवितात. प्रत्यक्ष व्यवहारात संसदेत ज्या राजकीय पक्षाचे बहुमत असेल त्या राजकीय पक्षाच्या हातात कारभाराची सूत्रे असतात. अर्थातच राजकीय पक्षांच्या संघटना जनतेचे सहकार्य मिळवून देण्याच्या दृष्टीने व राज्यकारभारात जनतेला सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने कार्य करीत असतात. लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने अधिकारारूढ पक्षावर टीका करणारा व त्यांच्या चुका दाखवून देऊन त्यांच्यावर अंकुश चालवणारा विरोधी पक्ष असणे हे अत्यंत आवश्यक आहे. विरोधी पक्ष याचा अर्थ जरूर पडेल तेव्हा अधिकारारूढ पक्षाची जागा घेण्यास समर्थ असणारा पक्ष असा आहे. विरोधी पक्ष म्हणजे एका अर्थाने प्रतिस्पर्धी सरकार असते. निरनिराळ्या राजकीय व आर्थिक कार्यक्रमांच्या आधारावर राजकीय पक्षांची संघटना केली जाते. निवडणुकीच्या वेळी प्रतिस्पर्धी कार्यक्रम जनतेसमोर ठेवून त्यावर राजकीय पक्षांनी जनतेचा कौल मागायचा हाच सार्वत्रिक निवडणुकांचा अर्थ आहे. लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने सुजाण व जागृत मतदार असणे आवश्यक आहे. हल्लीच्या आणीबाणीच्या काळात आर्थिक, शासकीय व परराष्ट्रविषयक कठीण व गुंतागुंतीचे प्रश्न लोकांच्यासमोर पक्षाच्या कार्यक्रमाच्या स्वरूपात निवडणुकीच्या वेळेला ठेवावे लागतात. या प्रश्नांचे स्थूल स्वरूप तरी निदान मतदारांना समजणे आवश्यक असते.

जे सरकार अधिकारारूढ होईल ते संसदेला अगर लोकांना जबाबदार असले पाहिजे. संसदेला जबाबदार असणारे सरकार संसदेत बहुमत असेपर्यंतच राज्यकारभार चालवू शकते. संसदेला जबाबदार :असणाऱ्या शासनाला Parliamentary executive हे नाव मिळालेले आहे. Parliamentary executive ही संस्था ब्रिटनमध्ये प्रथम प्रचलित झाली व ती आजही चालू आहे. तिचेच अनुकरण करून आपल्या घटनेमध्ये संसदीय शासनाची तरतूद केलेली आहे. अमेरिकन घटनेप्रमाणे अमेरिकेतील शासन तेथल्या संसदेला (कॉंग्रेस) जबाबदार नसते. तेथे संसदेत शासकीय पक्षाचे बहुमत असलेच पाहिजे असे नाही. शासनाचा प्रमुख जो अध्यक्ष तो कॉंग्रेसचा निवडून आलेला सभासद नसतो. ब्रिटनमधील किंवा भारतातील प्रधानमंत्र्यांप्रमाणे संसदेत बसून त्याला काम पाहावे लागत नाही. अमेरिकन अध्यक्ष लोकांनी निवडून दिलेला अधिकारी असतो. त्यामुळे त्याचे अधिकार व प्रतिष्ठा फार मोठ्या असतात. शासनातील आपले सहकारी तो स्वतः निवडतो. हे अधिकारीसुद्धा पार्लमेंटचे सभासद नसतात. यामुळेच अमेरिकेतील शासनयंत्रणेला Non-Parliamentary executive असे नाव मिळलेले आहे. संसदीय व बिगर-संसदीय या दोन्ही शासनपद्धतींहून वेगळी शासनपद्धती क्वचित प्रत्ययास येते. याला Convention type of executive असे

नाव मिळालेले आहे. या पद्धतीच्या वैशिष्ट्यांचा ऊहापोह खालील परिच्छेदात अधिकार-विभागणीच्या संदर्भात केला आहे.

अधिकारविभागणीचे तत्त्व :

लोकशाहीची राजकीय यंत्रणा उभी केली व व्यक्तिस्वातंत्र्याच्या व मानवी मूल्यांच्या घोषणा केल्या की लोकशाही सुप्रतिष्ठित होईल, ही कल्पना चुकीची आहे. सत्तेचे व अधिकारांचे विभजन करणाऱ्या संस्था जर उभ्या केल्या नाहीत तर व्यक्तीच्या हक्कांची व स्वातंत्र्याची हमी मिळाली असे होणार नाही. या हक्कांची जपणूक करण्याकरता योग्य संस्था व कार्यक्षम यंत्रणा उभाराव्या लागतात. सगळ्या सत्तेचे व अधिकारांचे एकाच व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या हातात केंद्रीकरण केले तर लोकशाही मूल्ये व व्यक्तीचे आणि अल्पमतवाल्यांचे हक्क सुरक्षित राहणार नाहीत. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये प्रचंड राज्यक्रांती घडून आली. क्रांतीच्या नेत्यांनी १७९२ साली Convention (घटना परिषद) बोलावली व राज्यघटना तयार केली. या घटनेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याच्या, समता वगैरे तत्त्वांचा (ज्याला आपण आज फंडामेंटल राईटस म्हणतो) उद्घोष करण्यात आला. या घटनेमध्ये मानवी हक्कांची Rights of Man सनद तयार केलेली होती. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मात्र वरील घटनेच्या द्वारे लोकांना मिळालेल्या हक्कांची अधिकारावर आलेल्या शासनाने सतत पायमल्ली केली. चौकशीविना अनेक लोक तुरुंगात डांबले गेले. खांद्याला खांदा भिडवून क्रांतीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या अनेक सहकाऱ्यांना राज्यकर्त्यांनी यमसदनास पाठविले. रोबेस्पिअरने Reign of Terror सुरू केला व त्यातून नेपोलियनच्या द्वारा प्रतिक्रांतीचा अवतार झाला, याचे कारण म्हणजे घटनापरिषदेच्या हातात सर्वाधिकार केंद्रित झालेले होते. कायदा करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व शासन चालविणे ही सर्व कामे Convention च करीत होती. या अनुभवातून शहाणा झालेला फ्रेंच कायदेपंडित मॉंटेस्क्यू याने अधिकारविभागणीच्या तत्त्वाची आवश्यकता प्रतिपादिली. कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व न्यायदान करणे ही तीन कामे स्वतंत्र असून त्या त्या कामाकरता Legislature, Executive व Judiciary असे राज्यसंस्थेचे स्वतंत्र विभाग कल्पिले पाहिजेत, अशा तत्त्वाची घोषणा केली. यालाच अधिकारविभागणीचे तत्त्व (Separation of Powers) असे नाव प्राप्त झाले. राज्यसंस्थेच्या एका विभागाने दुसऱ्यावर अतिक्रमण करता कामा नये व प्रत्येक विभाग स्वतंत्र व स्वायत्त असला पाहिजे असा या तत्त्वाचा अर्थ आहे. शासकीय विभागाने न्यायदानाच्या कामात ढवळाढवळ करू नये. कायदे करणाऱ्या विभागाने सुद्धा न्यायदानाच्या कामात ढवळाढवळ करू नये, असा या तत्त्वाचा दंडक आहे. अधिकारविभागणीच्या तत्त्वाची काटेकोर अंमलबजावणी केल्याशिवाय व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या लोकशाहीला स्थैर्य प्राप्त होणे शक्य नाही. व्यक्तीच्या हक्कांच्या रक्षणाची हमी देण्याकरता स्वतंत्र आणि स्वायत्त न्यायासन

असणे आवश्यक आहे. न्यायासनावर शासनाची हुकमत बसू दिली तर खटला भरणारा व न्यायाधीश हे एकात्म होतील. विचारस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, अशा तऱ्हेच्या स्वातंत्र्यांचे रक्षण व पोषण स्वतंत्र न्यायासनाशिवाय दुसऱ्या कशानेही होणार नाही. म्हणून स्वतंत्र न्यायासनाचे अस्तित्व अधिकारविभागणीच्या तत्त्वाचा एक आवश्यक असे अंग आहे.

मूलभूत हक्क :

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकांनी स्वतःकरिता केलेल्या घटनेच्या तिसऱ्या विभागात काही हक्कांना मूलभूत हक्कांचा दर्जा दिला आहे. या हक्कांना इतिहासकालात नैसर्गिक हक्क (Natural rights) असे नाव मिळालेले होते. यूनोच्या सनदेमध्ये ह्यांना (Human Rights) हे नाव दिले आहे. इंग्लंडमध्ये (Bill of Rights) या सदराखाली हे हक्क नमूद करण्यात आलेले आहेत. अमेरिकन घटनेमध्ये पहिल्या, पाचव्या आणि चवदाव्या दुरुस्तीमध्ये या हक्कांचा समावेश झालेला आहे. या हक्कांना मूलभूत हक्क असे म्हणण्याचे कारण हे की, पार्लमेंटने केलेले कायदे या हक्कांशी विसंगत असता कामा नयेत; व ते विसंगत आहेत असे दिसून आले तर ते घटनाबाह्य होतात (आपल्या घटनेचे कलम १३ पाहा.). हे मूलभूत हक्क व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणाची हमी देणारे आहेत. त्याचप्रमाणे अल्पमतवाले व विरोधी मतवाले यांच्याही हक्कांच्या संरक्षणाची हमी देतात. भारतामध्ये अनेक वंशांचे, जातींचे, धर्मांचे लोक अनेक शतकांपासून राहात आलेले आहेत. या देशात अनेक भाषा प्रचलित आहेत. वांशिक, जातीय व अन्य अल्पसंख्याकांना या देशात गुण्यागोविंदाने सहजीवन व्यतीत करावयाचे असेल तर त्यांच्या हितसंबंधांच्या रक्षणाची हमी मिळाली पाहिजे. अशा तऱ्हेची हमी घटनेच्या तिसऱ्या विभागातील मूलभूत हक्कविषयक कलमांमध्ये ग्रथित केलेली आहे. या हक्कांची वर्गवारी अशी :

(१) समतेचे हक्क (२) स्वातंत्र्याचे हक्क (३) आर्थिक व सामाजिक शोषणापासून संरक्षण देणारे हक्क (४) धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क (५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (६) खाजगी मालमत्ता धारण करण्याचे हक्क (७) वरील कोणत्याही हक्काची पायमल्ली झाली तर हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्ट यांच्याकडे दाद मागण्याचा हक्क.

न्यायासनाचे स्थान व अधिकार :

सामान्य माणसाला आपल्या कोणत्याही मूलभूत हक्कांची पायमल्ली झाली असता हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाकडे दाद मागता येते. अशी दाद मागितली असता वरिष्ठ कोर्टाला पार्लमेंटच्या कायद्याने किंवा शासनाच्या कोणत्याही कृत्याने कोणत्याही हक्काची पायमल्ली झाली की नाही याची कसोशीने चौकशी करावी लागते. याचाच अर्थ असा की, पार्लमेंटने केलेला कायदा मूलभूत हक्कांच्या कसोटीला उतरला पाहिजे. याचमुळे

पार्लमेंटला ३६८ कलमानुसार घटनेमध्ये दुरुस्ती करून मूलभूत हक्कांचा संकोच किंवा संपूर्ण लोप करण्याचा हक्क आहे की नाही असा मोठा वाद आपल्या देशात माजून राहिलेला आहे. सहा विरुद्ध पाच अशा अल्पबहुमताने गोरखनाथाच्या खटल्यात सुप्रीम कोर्टाने निर्णय देऊन मूलभूत हक्कांची दुरुस्ती करण्याचा अधिकार ३६८ कलमाप्रमाणे पार्लमेंटला नाही असा निकाल दिलेला आहे. हा निकाल फिरवून पार्लमेंटचा घटना दुरुस्त करण्याचा हक्क अबाधित करण्याकरता श्री. नाथ पै या प्रजासमाजवादी पक्षाच्या सभासदाने पार्लमेंटमध्ये एक बिल आणलेले आहे. ते बिल पार्लमेंटच्या ऐरणीवर १९६७ पासून पडलेले आहे. त्यावर आजपर्यंत बरीच भवति न भवति होऊनसुद्धा त्या बिलावर पार्लमेंटचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे. यदाकदाचित ते बिल पास झाले तर पार्लमेंट व सुप्रीम कोर्ट यांमध्ये मोठा समरप्रसंग निर्माण होणार आहे. याचे पर्यवसान म्हणून सुप्रीम कोर्टात आपल्याला अनुकूल होतील अशा न्यायाधीशांच्या नेमणुका करा (Packing the Supreme Court) अशी मागणी पुढे आली तर नवल वाटण्याचे कारण नाही.

न्यायासनाच्या अधिकाराची कक्षा :

वरिष्ठ न्यायासनाला वर वर्णन केलेला जो अधिकार प्राप्त झालेला आहे त्याला न्यायालयीन फेरतपासणीचा अधिकार (Judicial Review) असे नाव मिळालेले आहे. न्यायालयीन फेरविचाराचे स्वरूप त्रिविध आहे : (१) पार्लमेंटने अथवा विधिमंडळाने मंजूर केलेले कायदे मूलभूत हक्कांशी सुसंगत आहेत किंवा नाहीत हे ठरविणे. (२) पार्लमेंटने मंजूर केलेल्या कायद्यामुळे राज्याच्या अधिकाराचा संकोच होतो काय किंवा विधिमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यामुळे पार्लमेंटच्या अधिकारावर अतिक्रमण अथवा संकोच होतो काय. (३) शासनाने केलेले निर्णय हे घटनाबाह्य अथवा न्याय-तत्त्वांशी विसंवादी आहेत काय हे ठरविणे. यांपैकी न्यायालयीन फेरविचाराचा जो तिसरा प्रकार आहे तो अत्यंत महत्त्वाचा असून वेगळ्या भूमिकेवर आधारलेला आहे. म्हणून त्यासंबंधी स्वतंत्र विवेचन स्वतंत्र परिच्छेदात ‘ शासनावर कायद्याची हुकमत ’ या शीर्षकाखाली केलेले आहे. त्यापूर्वी पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या न्यायालयीन फेर-विचाराच्या अधिकाराचा थोडा अधिक ऊहापोह करणे इष्ट वाटते.

न्यायालयीन फेरविचाराचे तत्त्व रद्द केले पाहिजे काय ?

गेल्या महिन्यात महाराष्ट्र राज्याचे ॲडव्होकेट जनरल एच. एम्. सीरव्हाई यांनी या वर्षाची चिमणलाल सेटलवाड व्याख्यानमाला गुंफली. त्या व्याख्यानात न्याया-लयीन फेरविचाराचा हक्क हा कालबाह्य झाला आहे, इतकेच नव्हे तर तो अनियंत्रित स्वरूपाचा (arbitrary) आहे असे प्रतिपादन केलेले आहे. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाच्या एका सरन्यायाधीशाने काढलेले उद्गार “ We are under a constitution but

the constitution is what the Judges say it is. " उद्धृत करून न्यायमूर्तींनी प्रांजल व मोकळेपणाने आपल्या अमर्याद सत्तेची कल्पना दिली याबद्दल त्यांना धन्यवाद दिले आहेत. अमेरिकेत सुद्धा न्यायालयीन फेरविचाराच्या अधिकाराबद्दलच्या वादळाचा धुराळा अनेक वेळा उडविण्यात आल्याचे दिसते. वास्तविक पाहता अशा तऱ्हेच्या अधिकाराची तरतूद अमेरिकन घटनेमध्ये स्पष्ट शब्दांत केलेली नाही. अमेरिकन सुप्रीम कोर्टाचा पहिला सरन्यायाधीश जॉन मार्शल याने Marbury versus Maddisson या खटल्याच्या निकालपत्रात सुप्रीम कोर्टाला अशा तऱ्हेचा अधिकार आहे असे प्रथमच पण स्पष्टपणे घोषित केले. त्या वेळेस अमेरिकेत अभूतपूर्व गोंधळ माजला व तत्कालीन अध्यक्षांनी सरन्यायाधीशांना 'John Marshal has given the decision, let him enforce it' या शब्दात आव्हान दिले. परंतु फेरविचाराचा हक्क हा हळूहळू रूढ होत होत सर्वमान्य होत गेला. म्हणूनच डी. टोकेव्हिल या फ्रेंच पंडिताने "सुप्रीम कोर्टाची सत्ता फार मोठी आहे पण ती अंतिमतः लोकमताची सत्ता आहे" असे म्हटलेले आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा जेव्हा सुप्रीम कोर्ट जनतेच्या सदसद्विवेकबुद्धीला वाचा फोडते त्या त्या वेळेला त्याचे अंतिम निकाल लोकादरास पात्र ठरतात. १९५४ साली ब्राउन विरुद्ध बोर्ड ऑफ एज्युकेशन या खटल्यात निग्रो मुलांना गोऱ्या मुलांच्या बरोबर एकाच शाळेत शिक्षण घेण्याचा हक्क आहे किंवा नाही, यासंबंधी सुप्रीम कोर्टाने महत्त्वपूर्ण निकाल दिला व निग्रो मुलांचा हक्क उचलून धरला. या वेळेस सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश अर्ल वॉरन हे एकेकाळाचे रिपब्लिकन पक्षाचे गव्हर्नर असलेले सद्गृहस्थ होते. पण त्या निकालाबाबत सुप्रीम कोर्टात एकमत झाले. त्या निकालाविरुद्ध अमेरिकेतील गोऱ्या लोकांनी विशेषतः प्रतिगामी दक्षिण अमेरिकेतील लोकांनी खूप आरडाओरडा केला. काही राज्यांच्या गव्हर्नरांनी तो निकाल आपण मानणार नाही असे आव्हान दिले, परंतु वरील निर्णय राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करणारा व देशाच्या न्यायबुद्धीला प्रतिबिंबित करणारा असल्यामुळे तो सर्वमान्य झाला व आज त्याची सर्व अमेरिका खंडात अंमलबजावणी जारी होऊन राहिली आहे. तीन-चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशाच्या हायकोर्टाने विधानसभेचा अवमान केल्याबद्दल एका नागरिकाला कारावासाची शिक्षा सुनावली. उत्तर प्रदेशाच्या वरिष्ठ न्यायालयाने त्या गृहस्थाची जामिनावर मुक्तता केली. त्याबरोबर उत्तर प्रदेशाच्या विधिमंडळाने अलाहाबाद हायकोर्टाच्या न्यायमूर्तींवर त्यांनी विधानसभेचा अवमान केला म्हणून वॉरंटे काढली. हा प्रसंग खरोखरच लोकशाहीच्या इतिहासात मोठा आणीबाणीचा होऊन गेला. पार्लमेंटच्या विशेष अधिकाराबद्दल (Privileges) फेरविचार करण्याचा अधिकार हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्ट यांना आहे काय ? असा अत्यंत महत्त्वाचा व दूरवर परिणाम करणारा प्रश्न उपस्थित झाला. सुप्रीम कोर्टाने नागरिकास घटनाद्वारा मिळालेले मूलभूत हक्क हे सर्वश्रेष्ठ आहेत व त्यांची पायमल्ली विधिमंडळाने केली आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार वरिष्ठ कोर्टांना आहे असे ठरविले. या

निकालाविरुद्ध बराच आरडाओरडा करण्यात आला. लोकसभेचे तत्कालीन सभापती हुकूमसिंग यांनी सर्व राज्यांच्या विधानसभेच्या सभापतींची व विधानपरिषदांच्या अध्यक्षांची मोठी परिषद बोलावली. हुकूमसिंग व इतर अनेकांनी राणा भीमदेवी थाटाची आवेशपूर्ण भाषणे केली व घटनादुरुस्तीची मागणी केली. सुदैवाने हे वारे शमले व मूलभूत हक्कावरील गंडांतर टळले. राजकारण्यांना केव्हा केव्हा शहाणपण सुचते असे म्हणावयास हरकत नाही. श्री. नाथ पै यांच्या बिलाच्या बाबतीत असे शहाणपण सुचेल किंवा कसे हे इतिहासच सांगू शकेल.

सुप्रीम कोर्टाकडे दाद मागण्याचा हक्कसुद्धा मूलभूतच :

न्यायालयीन फेरविचाराचा हक्क आपल्या घटनेच्या १३ व्या कलमामध्ये मूलभूत हक्क म्हणूनच ग्रथित केलेला आहे. सुप्रीम कोर्टाकडे कोणत्याही मूलभूत हक्काच्या पायमल्लीविरुद्ध दाद मागण्याचा हक्क हाही एक मूलभूत हक्कच आहे. मूलभूत हक्कांमध्ये ज्याप्रमाणे खाजगी मालमत्तेच्या धारणाचा हक्क ग्रथित केलेला आहे, त्याचप्रमाणे स्वातंत्र्य, समता यासारखे हक्कही समाविष्ट झालेले आहेत, हे आपण वर पाहिलेलेच आहे. खाजगी मिळकत धारण करण्याचा हक्क हा मूलभूत मानू नये हा विचार समजण्यासारखा आहे. तो काढण्यापुरती घटनेमध्ये दुरुस्ती करावी असे बिल आणण्याऐवजी सर्वच मूलभूत हक्कांचा संकोच करण्याचा अधिकार पार्लमेंटला बहाल करणारे अतिव्याप्त बिल पार्लमेंटसमोर आणणाऱ्यांचा आंतरिक हेतू शुद्ध नसावा अशा संशयाची पाल मनात चुकचुकल्याशिवाय राहात नाही, किंवा कदाचित आपण काय करतो व त्याचे परिणाम काय होतील याची पूर्ण जाणीव या मंडळींना आली नसेल. सर्वच मूलभूत हक्क काढून घेण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार पार्लमेंटला बहाल करणे म्हणजे बहुमतवाल्यांना अल्पमतवाल्यांवर जुलूम करण्याची संधी देणे व व्यक्तिस्वातंत्र्याला ग्रहण लावणे, असा होतो. त्याचप्रमाणे न्यायालयाच्या अधिकाराचा संकोच केल्याने सामान्य व्यक्तीला कोणी वाली नाही अशी स्थिती प्राप्त होईल.

शासनावर कायद्याची हुकमत :

संसद अगर विधिमंडळे यांनी केलेल्या कायद्यांची घटनात्मकता ठरविण्याचा हक्क हे अमेरिकन घटनेचे वैशिष्ट्यपूर्ण अपत्य होय. तेच अपत्य आपल्या घटनाकारांनी दत्तक घेऊन त्या दत्तक पुत्राला ३२ व्या परिच्छेदामुळे अधिक बाळसे देण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटनमध्ये संसद ही सार्वभौम असल्याने पार्लमेंटने केलेले कायदे रद्द-बातल करण्याचा अधिकार न्यायासनाला अर्थातच नाही व असणेही शक्य नाही. तथापि तेथील वरिष्ठ कोर्टाला शासनाच्या निर्णयांचा काही विशिष्ट तत्त्वांवर फेरविचार करण्याचा अधिकार आहे. भारतातील वरिष्ठ न्यायालयांनाही हा अधिकार घटनेने दिलेला आहे. व्यक्तीच्या हक्कांच्या रक्षणाकरिता व व्यक्तीला न्याय मिळवून देण्या-

करता एकंदर शासन कायद्याच्या हुकमतीखाली आणणे आवश्यक आहे. आधुनिक राज्यसंस्थेच्या (शासनसंस्थेच्या) हाती अमर्याद सत्ता आलेली आहे. थॉमस हॉब्जच्या शब्दांत आधुनिक राज्यसंस्था हा एक जगड्व्याळ प्राणी (Leviathan) आहे. १९ व्या शतकात कमीत कमी हुकमत गाजविणारी राज्यसंस्था उत्तमातली उत्तम राज्य-संस्था असे मानले जाई. शांतता आणि सुव्यवस्था पाळणे व परचक्रापासून देशाचे रक्षण करणे एवढेच राज्यसंस्थेचे कार्य असे. आधुनिक राज्यसंस्थेला लोकहिताची अनेक कार्ये करावी लागतात म्हणूनच शासकांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण होत जाते. लॉर्ड ॲक्टन याने म्हटल्याप्रमाणे सत्ता ही माणसाला भ्रष्ट करते व अनियंत्रित सत्ता अनियंत्रित भ्रष्टाचाराला जन्म देते (Power tends to corrupt and absolute power corrupts absolutely). सुप्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ (Maritain) म्हणतो, 'सत्तेमुळे सत्ता वाढते.' सत्तेची यंत्रणा एकसारखी वाढतच जाते; सार्वभौम राजकीय आणि शासकीय यंत्रणा ही स्वायत्त नोकरशाही निर्माण करते आणि अखेरीस तीच स्वयंसिद्ध असे साध्य होऊन बसते. प्रातिनिधिक संस्था दिल्या, जनतेच्या प्रतिनिधींना संसदेच्या व्यवहारात भागीदार करून घेतले व लोकप्रतिनिधींच्या हातात राजकीय सत्ता सुपूर्त केली एवढ्यानेच राज्यसंस्थेवर किंवा शासनयंत्रणेवर लोकांचे नियंत्रण प्रस्थापित झाले असे मानता येत नाही. जसजशी अधिकाधिक सत्ता शासनाच्या हाती अधिकाधिक प्रमाणात केंद्रित होईल तसतसे सामान्य नागरिकाचे शासनसंस्थेच्या जुलमापासून कसे रक्षण करायचे हा प्रश्न विचारवंतांच्या समोर आलेला आहे. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करण्यासाठी व शासनसंस्थेला निरंकुश सत्ता भोगता येऊ नये यासाठी सर्व तऱ्हेची संस्थात्मक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक ठरते. शासनावर नियंत्रण कसे ठेवायचे व तिच्या अधिकारांचा दुरुपयोग किंवा गैरवापर कसा होऊ द्यायचा नाही व सामान्य नागरिक शासनाच्या 'जगन्नाथाच्या रथाखाली' भरडून जाऊ नये याकरिता कोणत्या तरतुदी करायच्या हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न सुटले पाहिजेत.

| 2008

सरकारी कृति व न्यायालयीन फेरतपासणी :

संसद व विधिमंडळे यांनी केलेले कायदे घटनेशी सुसंगत आहेत की नाहीत हे तपासून पाहणे हा एक न्यायालयीन फेरफाराचा प्रकार. त्याचे विवेचन वर आलेलेच आहे. दुसरा प्रकार म्हणजे शासनसंस्थेने व शासन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी जे निर्णय दिलेले असतात ते निर्णय कितपत न्याय्य आहेत हे ठरविणे हा आहे. ब्रिटनमध्ये सुद्धा हायकोर्टाला असा अधिकार आहे हे वर सांगितलेच आहे. किंबहुना न्यायालयीन तपासणीमध्ये कोणत्या तत्त्वांचा वापर केला पाहिजे व त्यासंबंधीच्या पद्धती कोणत्या व उपाय-योजना कोणती हा ब्रिटिश हायकोर्टाने स्वतंत्र जगाला दिलेला एक ठेवा आहे. या उपाय-योजना चार प्रकारच्या आहेत.

(१) हेबियस कॉर्पस (Habeas corpus)

एखाद्या व्यक्तीची कायदेशीर आरोपाशिवाय व योग्य वॉरंटाशिवाय तुरुंगात रवानगी झाली असेल तर त्या व्यक्तीतर्फे हायकोर्टात रीट (Writ) अर्ज करता येतो, आणि मग हायकोर्ट त्या प्रकरणात बारकाईने लक्ष घालते व अन्यायाने त्या व्यक्तीला डांबून ठेवल्याचे आढळले तर त्याच्या सुटकेचा हुकूम देते.

(२) Mandamous

एखाद्या अधिकाऱ्याने अथवा शासनाने त्यांच्यावर कायद्याने टाकलेली जबाबदारी पार पाडली नाही तर ती पार पाडण्याला हायकोर्ट संबंधितांना भाग पाडू शकते.

(३) Quo-warranto

एखादा नागरिक एखाद्या संस्थेवर निवडून आला तर त्याला दोन संभाव्य प्रश्नांना तोंड द्यावे लागण्याचा संभव असतो : (अ) त्याच्या अधिकारग्रहणाला विरोध करणे. (ब) त्याची निवडणूक बेकायदेशीर असल्याने त्याला अधिकारावर राहता येत नाही. दोन्ही बाबतीत हायकोर्ट दाद देऊ शकते.

(४) Certiorari

एखाद्या अधिकाऱ्याने किंवा Administrative Tribunal ने दिलेला निर्णय सकृद्दर्शनीच चुकीचा असण्याचा संभव असतो. (Error apparent on the face of the record.) अशा वेळी तो निर्णय हायकोर्ट रद्द करू शकते.

सैद्धान्तिक पार्श्वभूमि :

वर वर्णन केलेल्या हायकोर्टाच्या अधिकारविस्तारामुळे शासकीय निर्णयावर हायकोर्ट हुकमत गाजवू शकते. सकृद्दर्शनी हे चमत्कारिक वाटते, म्हणून त्याच्या बुडाशी काही तत्त्व आहे का ? हा प्रश्न विचारार्ह बनतो. ते तत्त्व म्हणजे ज्याप्रमाणे नागरिक हा कायद्याच्या हुकमतीखाली आहे, त्याप्रमाणे शासनसुद्धा कायद्याच्या हुकमतीखाली असले पाहिजे. शासनसुद्धा कायद्याच्या कक्षेबाहेर असू शकत नाही. त्याचप्रमाणे कायद्याने दिलेल्या अधिकाराच्या बाहेर शासन जाऊ शकत नाही. तसेच ते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग पण करू शकत नाही. शासनाला सत्तेचा वापर लहरी किंवा जुलमी पद्धतीने किंवा आकसाने करता येत नाही. नागरिकांशी वर्तन करताना न्यायाचे सर्वमान्य दंडक (Norms) शासनाने मानले पाहिजेत. सारांश, सरकारी कृतीमध्ये बेतालपणा अथवा लहरीपणा असता उपयोगी नाही व एकंदर सरकारी यंत्रणेवर कायद्याच्या राज्याचे प्रभुत्व असले पाहिजे.

१९५७ साली ब्रिटनमध्ये सर ऑलिव्हर फ्रँक्स यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय

विभाग व शासकीय न्यायालय यांच्या कामकाजांची चौकशी करण्याकरता एक कमिटी नेमण्यात आली होती. वरील यंत्रणांच्या कार्यामध्ये कोणत्या सुधारणा कराव्यात व न्यायतत्त्वांचा बोज कसा राखावा यासंबंधीच्या शिफारशी करण्याचे काम त्या कमिटीवर सोपविण्यात आले होते. त्यांनी केलेल्या शिफारशींचे सार तीन शब्दांत सांगता येण्यासारखे आहे : उघडपणा (Openness), न्याय (Fairness) व निःपक्षपातीपणा (Impartiality). शासकीय विभाग व शासकीय न्यायासनाने उघड चौकशी व न्याय्य कार्यपद्धती यांचा अंमल केला पाहिजे. एकंदर शासनच वरील तत्त्वांच्या आधाराने चालले पाहिजे. अधिकाऱ्यावर कायद्याचे नियंत्रण असले पाहिजे. सारांश, शासनाने प्रामाणिक माणसाप्रमाणे वर्तन केले पाहिजे.

हायकोर्टाने घालून दिलेली सामान्य तत्त्वे :

(१) कोणत्याही माणसाच्या विरुद्ध निर्णय देण्यापूर्वी त्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे (Principles of Natural Justice). त्याचप्रमाणे त्याला बचावाची पूर्ण संधी मिळाली पाहिजे.

एक साधे उदाहरणच आपण घेऊ. एका टॅक्सी-ड्रायव्हरने काही अपघात केला आहे तेव्हा त्याचे लायसेन्स रद्द करावे का असा प्रश्न संबंधित अधिकाऱ्यापुढे आला आहे. लायन्सेस देणे वा न देणे ही बाब सर्वस्वी त्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीतली आहे. लायन्सेस रद्द करण्याचा प्रश्नमात्र वेगळ्या स्वरूपाचा आहे. दिलेले लायसेन्स रद्द करून घेण्यापूर्वी अपराधी ड्रायव्हरला आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. तशी संधी न देता लायसेन्स रद्द केले गेले तर हायकोर्ट तो निर्णय फिरवू शकते व त्याला लायसेन्स द्या असा आदेश देऊ शकते.

(२) परक्या देशाच्या नागरिकाला दुसऱ्या देशाच्या भूमीवर परवानगीशिवाय जाता येत नाही. तसा तो गेला तर त्याला तेथून हद्दपार करण्याची आज्ञा संबंधित अधिकारी देऊ शकतो. परंतु तो आपल्या देशाच्या भूमीवर असेपर्यंत त्याला विनाचौकशी तुरुंगात डांबून ठेवता येत नाही. नागरी स्वातंत्र्य नागरिकत्वावर निर्भर असता कामा नये.

(३) न्यायदानाचे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे चौकशी खुली व जाहीर असली पाहिजे. हेच तत्त्व शासकीय निर्णयालाही लागू केले पाहिजे, म्हणजेच चौकशी खुली असली पाहिजे व निर्णय जाहीर केला पाहिजे. त्याबाबतीत गुप्तता बाळगणे अनिष्ट आहे.

(४) शासकीय निर्णयाच्या समर्थनार्थ योग्य कारणे दिली पाहिजेत. नुसता अस्तिपक्षी अथवा नास्तिपक्षी निर्णय असता कामा नये.

वरील स्वरूपाची दुसरीही अनेक तत्त्वे ब्रिटिश व आपल्याही हायकोर्टाने घालून दिलेली आहेत. विस्तारभयास्तव त्यांचा ऊहापोह करता येत नाही.

अमेरिकेतील व्यवस्था :

वर वर्णन केलेल्या तत्त्वांना कायदेशीर स्वरूप देण्याकरता अमेरिकेमध्ये (Federal Administrative Procedure Act) या नावाचा कायदा करण्यात आलेला आहे. त्यात आणखी एक महत्त्वाचे तत्त्व ग्रथित करण्यात आलेले आहे. ते म्हणजे अधिकाऱ्याने आपला निर्णय त्याच्यासमोर जो पुरावा आला आहे त्याच्या आधारावरच दिला पाहिजे. बाहेर प्रचलित असलेल्या सांगोवांगी माहितीवर विसंबून निर्णय देऊ नये. कारण तसे केल्याने पक्षकाराला त्या बातमीच्या सत्यासत्यतेसंबंधी काहीही सांगण्याची संधी मिळत नाही.

लोकपाल व राज्यपाल (Ombudsman) :

स्वीडनमध्ये Ombudsman ही संस्था जवळ जवळ शंभराहून अधिक वर्षे कार्य करीत आहे. डेन्मार्क आणि नॉर्वे या देशांनीसुद्धा या पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी यांची चौकशी करण्याकरता पार्लमेंटने नेमलेला अधिकारी म्हणजे Ombudsman होय. तो आपले रिपोर्ट सरळ संसदेला सादर करतो. तो सर्वस्वी संसदेला जबाबदार असतो. चौकशी करण्याचे, पुरावा घेण्याचे, कोणत्याही डिपार्टमेंट-मध्ये जाऊन कागदपत्र तपासण्याचे असे विस्तृत अधिकार Ombudsman यास देण्यात आलेले आहेत. कोणी काही गुन्हा केल्याचे आढळल्यास त्याच्याविरुद्ध कोर्टात फिर्याद गुदरण्याचाही अधिकार त्याला आहे. चौकशी केल्यानंतर अधिकाऱ्यांची चूक अगर स्खलन दृष्टोत्पत्तीस आले तर तो त्यांना समज देऊ शकतो. स्कँडिनेव्हियन देशांमध्ये भ्रष्टाचार व शासकीय प्रमाद यांच्या निवारणाच्या कामी या संस्थेने फार मोठे कार्य केलेले आहे. Ombudsman ची कार्य करण्याची पद्धती इतकी सरळ व खुली आहे की, त्यामुळे सामान्य माणसाच्या मनामध्ये त्याच्या न्यायबुद्धीविषयी विश्वास निर्माण होतो. नागरिकांच्या तक्रारी घेऊन तो सरळ संबंधित अधिकाऱ्याकडे जातो व त्याच्याशी त्या निकालाच्या योग्यायोग्यतेबाबत चर्चा करतो. त्यामागची वस्तुस्थिती शोधण्याकरता सरकारी फायली तो चाळतो व दुसरीही चौकशी करून अखेर आपला निर्णय देतो. या संस्थेचे कार्य अत्यंत कार्यक्षमतेने चाललेले आहे यात शंका नाही. म्हणून इंग्लंड-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांमध्येसुद्धा तत्सम संस्था स्थापन करावी अशी मागणी जोराने पुढे येत आहे. भारतातही या मागणीने जोर धरला व शासनसुधार मंडळाने त्याचा पाठपुरावा केला. अखेरीस संसदेने लोकपाल (Ombudsman at the Federal level) व राज्यपाल (Ombudsman at the State level) नेमण्यासंबंधीचे बिल पार्लमेंटमध्ये मंजूर करून घेतले. लोकपाल व राज्यपाल यांचे अधिकार Ombudsman यांच्या मानाने बरेच मर्यादित आहेत. तरीसुद्धा या योग्य दिशेने टाकलेल्या पावलाचे जनतेने स्वागत केले पाहिजे.

चौकशी मंडळे (Commissions of Inquiry) :

१९५२ साली Commission of Inquiry Act नावाचा कायदा पार्लमेंटमध्ये पास झाला. या कायद्याच्या आधारे सार्वजनिक महत्त्वाच्या अशा कोणत्याही प्रश्नावर वस्तुस्थिती शोधून काढण्याकरिता राज्यसरकारांना व भारत सरकारला Commissions नेमता येतात. या कमिशनचे काम वस्तुस्थिती काय आहे हे ठरविणे (Fact finding) प्रामुख्याने असते. कमिशनने वस्तुस्थितीसंबंधी व्यक्त केलेल्या मतांना योग्य तो मान दिला पाहिजे असा संकेत ब्रिटनमध्ये रूढ आहे. किंबहुना कमिशनने प्रदर्शित केलेल्या मतांची पार्लमेंटने देखील चर्चा करू नये असा संकेत रूढ झालेला आहे. यासंबंधी विस्तृत विवेचन करण्यापेक्षा जॉर्ज डब्ल्यू. कीटन या निष्णात कायदेपंडिताच्या (Trial by Tribunal) या पुस्तकातील काही उतारे देणे अधिक फायद्याचे व बोधप्रद ठरेल. (Museum Press Limited Publication 1960)

Pp. 18 to 20.

It remains to consider two further points in connection with Tribunals : (1) what may be described as the effect of an inquiry by the Tribunal; and (2) the problem of a possible appeal. The two questions are closely connected. It scarcely needs to be mentioned that the Tribunal itself has no power either to grant civil redress or to inflict punishment, even if either should be appropriate. Though the Tribunal is in form of Court of Justice, with a number of the attributes of a Superior Court, it is in a substance a fact-finding agency. Formally, its report is presented to the Home Secretary, and is published by the Stationery Office as an official paper. Since both Houses of Parliament resolve to set up the Tribunal, they are also entitled to have the report of its decisions communicated to them. When the Report of the Parnell Commission was presented to Parliament, there was a long and acrimonious debate on it. Since the Act of 1921 was passed, however, there has been a clear disposition to accept it without debate, as a finding of fact by a high judicial authority, although there has sometimes been a debate upon the possible action to be taken. In this respect it may be favourably contrasted with Parliamentary Committees of Inquiry, whose Reports were not infrequently the starting point of fresh political wrangles, extending

to the findings themselves. Where the report (as those of the Tribunals of 1921 and 1957 did) finds that the allegations are baseless, nothing more remains to be done. The Reports of 1936 and 1948 found that Ministers of the Crown were guilty of improper practices. In both cases, the Ministers promptly resigned, after making explanations and apologies to the House, and there the matter has ended. There can be no doubt that, if it thought fit, the House could censure a Minister whose conduct as disclosed by the Report, merited it. The Report of 1948, however, was interesting from another point of view. It revealed corrupt practices by certain individuals, in respect of which the question of criminal proceedings might have been considered. Here, the preliminary investigations undertaken by the police for the purposes of the inquiry would then be of considerable value, but it does not seem that a prosecution could be founded upon a Tribunal's Report. Even in the case of the Parnell Commission, this was not suggested. In the case of 1936, a prosecution was suggested by Opposition Members, but the Law Officers declined to proceed.

For the reasons already discussed, there is no question of any appeal from the Tribunal's Report, at any rate in terms of law. The findings of fact, it has been pointed out, are accepted by Parliament as conclusive, though there would appear to be nothing to prevent a debate arising upon them, as in fact did occur upon the Parnell Report. This inquiry, however, raised questions of wide policy, upon which major differences of opinion might be expected, and in which the conduct of the Government itself more or less directly came under scrutiny. This has not been the case in the inquiries which have been held under the Act of 1921, even though in three of them the conduct of Ministers individually has been in some degree a matter of inquiry. After the 1936 Tribunal there was a debate on the Report, but it was substantially confined to the question whether a prosecution should be based on it. And again, the debate which followed the Bank Rate Inquiry was virtually confined to the practice of the Bank of

England. So long as Tribunals do not investigate specific charges, it is difficult to see how any provision for appeal could be made, and so long as witnesses whose conduct may be the subject of inquiry are legally represented at the outset, or at an early stage of the inquiry, there does not seem to be any risk of a miscarriage of justice.

Pp. 235–236

Finally, it should be emphasised that members of Parliament and more especially members of the Opposition (whatever its political colour) must show a full sense of responsibility when episodes which they consider should be investigated arise, for if they fail to do so, Tribunals run the risk of being drawn into party warfare, as the Parnell Inquiry was. If that should be the case, not only would the findings of Reports of Tribunals be open to Parliamentary debate, a practice which has so far been avoided, but the whole value of setting up an impartial tribunal of a judicial character would have been lost. In the debate in the House of Lords of May 14th, 1959, both Lord Shawcross and the Lord Chancellor emphasised the need for caution in setting up Tribunals of Inquiry, and the inherent difficulties facing a Government which is called upon to decide whether or not to set up a Tribunal were clearly stated in Lord Kilmuir's speech.

> " The sanction of a public inquiry (he said) is necessary on occasions for the purpose of maintaining a high standard of public administration, and the modern system was deeply aware of inadequacies of the machinery on inquiry by a select committee, on the one hand, and the limitations of the ordinary process of law on the other............
>
> " One must frankly admit that there is a conflict between the need of the State that the truth should be discovered on weighty matters which reflect on the functioning of its important agencies, and the position

of the individual who finds himself involved. The vital point, as I think every peer has said, is that the procedure should only be invoked for weighty and important matters, for it is only then that the sacrifices on the part of the individual can be fairly demanded.

दुर्दैवाने आपल्या देशात भारत सरकारने व राज्यसरकारांनी कमिशनच्या निर्णयांचा स्वीकार करण्याची प्रथा पाडली नाही. राज्यपुनर्रचनेकरता नेमलेल्या कमिशनपासून तो चंदीगडबाबत न्यायमूर्ती शहा यांच्या रिपोर्टापर्यंत बऱ्याच कमिशनचे निर्णय मध्यवर्ती सरकारने व राज्यसरकारने धुडकावून लावले आहेत. भारताचे भूतपूर्व न्यायमूर्ती श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी सरकारच्या या कृतीचा 'कायद्याच्या राज्याच्या मूलतत्त्वाला हरताळ फासणारी कृती' या शब्दांत निषेध केलेला आहे. इतकेच नाही तर कमिशनचे निर्णय आपण का मान्य केले नाहीत यासंबंधीची कारणे देण्याचे सौजन्यही भारत सरकार व राज्यसरकारांनी क्वचितच दाखविलेले आढळते. अशा स्थितीत या देशात खरी लोकशाही किंवा कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्याची आशा आहे काय अशी शंका विचारवंतांच्या मनांत आल्याशिवाय राहात नाही. पण विचारवंतांचे म्हणणे कोण लक्षात घेतो ?

कामगार कायदे

व. भ. कर्णिक

भारतातील आजच्या कामगार कायद्यांची संख्या शंभराहून अधिक आहे. त्यांचे एकीकरण करता येईल का याचा राष्ट्रीय श्रम आयोगाने (National Commission on Labour) विचार केला. आयोगाने नेमलेल्या एका समितीने एक श्रमसंहिताही (Labour Code) तयार केली. परंतु तो प्रयत्न आयोगाला पसंत पडला नाही. एकीकरणाची कल्पना सोडून देण्यात आली आणि काही महत्त्वाच्या शब्दांच्या व्याख्या सर्व कायद्यांत एक असाव्यात एवढीच आयोगाने शिफारस केली.

सन १९१९ पासून कामगार कायदे मध्यवर्ती शासन व राज्यशासने या दोघांनाही करता येतात. १९५० मध्ये उद्घोषित केलेल्या संविधानाने (Constitution) तीच योजना कायम राखली आहे. सध्याची प्रवृत्ती मात्र अशी आहे की, एकाच तऱ्हेचे कामगार कायदे सर्व देशभर जारी राहावे. त्यामुळे बहुतेक सर्व महत्त्वाच्या बाबतींत कायदे करते ते मध्यवर्ती शासन. राज्यशासने कायदे करतात ते कमी महत्त्वाच्या बाबीबद्दल आणि राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीखेरीज मध्यवर्ती शासनाने केलेल्या कायद्यात फेरबदल करू नये असे त्यांच्यावर बंधन आहे. संस्थानांच्या विलीनीकरणापर्यंत भारतीय कामगार कायदे संस्थानांना लागू नसत. विलीनीकरणानंतर ती अडचण उरली नाही आणि भारत सरकारने मंजूर केलेले कायदे सर्वसाधारणपणे सर्व देशाला लागू पडतात.

इंग्रजी अमदानीच्या सुरुवातीला देशामधे जे कामगार कायदे झाले ते कामगारांच्या हक्कावर बंधने घालणारे, दडपशाही स्वरूपाचे होते. देशामधे त्या वेळी उद्योगधंद्यांना नुकतीच सुरुवात होत होती. रेल्वेमार्ग बांधले जात होते व चहाचे वगैरे मळे उभारले जात होते. या कामासाठी कामगार मिळत नसत व मिळालेले कामगार मधेच काम सोडून जात असत. कामगारांनी काम सोडून जाऊ नये यासाठी काही कायदे करण्यात आले. या कायद्यानुसार काम सोडून जाणे अगर काम बंद करणे हा फौजदारी गुन्हा

ठरविण्यात आला. १८५९ चा कामगार करारभंग कायदा (Workmen's Breach of Contract Act), १८६० चा मालक आणि कामगार यांच्यामधील विवादा-बद्दलचा कायदा (Employer's and Workmen's (Disputes) Act) व भारतीय दंड संहितेची ४९० व ४९२ ही कलमे (Sections 490 and 492 of Indian Penal Code) या कायद्यांचा या बाबतीत उल्लेख करता येईल. या दडपशाहीच्या व प्रतिगामी स्वरूपाच्या कायद्यांविषयी पुढे खूप ओरड झाली आणि १९२६ मध्ये इंग्रज सरकारला ते सर्व रद्द करावे लागले.

चहा, कॉफी व रबर यांच्या मळ्यांसाठी असेच कामगारांवर बंधने लादणारे कायदे होते. त्या कायद्यांप्रमाणे एकदा कामगार मळयावर दाखल झाला की, त्याला मळा सोडता येत नसे, त्याने मळा सोडला तर मळेवाल्याला त्याला पकडून पुन्हा परत मळ्यावर आणता येत असे. आसाममधील मळ्यांसाठी एक कायदा होता, मद्रासमधील मळ्यांसाठी त्याच स्वरूपाचा दुसरा एक कायदा होता. मळेवाले युरोपियन होते व राजदरबारी त्यांचे खूप वजन होते. त्यामुळे कामगारांवर जवळजवळ गुलामगिरी लादणारी या कायद्यातील कलमे रद्द व्हायला बरेच दिवस लागले. पण १९३२–३३ च्या सुमारास ती कलमे अखेर सर्व रद्द झाली. आता मळ्यांवरील कामगारांसाठी वेगळा स्वतंत्र कायदा आहे. तो म्हणजे १९५१ चा मळ्यांविषयीचा कायदा (Plantation Act) आहे. तो खूपच प्रगत स्वरूपाचा आहे.

कामगार कल्याणाचे कायदे व्हायला सुरुवात झाली १८८१ मध्ये. त्या वर्षी कारखान्यांबद्दलचा कायदा (Factories Act) मंजूर झाला. हा अगदी पहिला व प्राथमिक स्वरूपाचा कायदा होता. त्याने १२ वर्षांखालील मुलांना कारखान्यामध्ये कामाला ठेवण्याची बंदी केली व मुलांचे कामाचे तास ९ व बायकांचे ११ पेक्षा जास्त असू नयेत असे बंधन घातले. पुरुषांचे कामाचे तास अनिर्बंध राहिले आणि त्या काळात ते पुष्कळ ठिकाणी १४ ते १६ तास असत. कायदा अत्यंत असमाधानकारक स्वरूपाचा होता. त्यामधे वेळोवेळी खूप सुधारणा कराव्या लागल्या. १८९१, १९११, १९२२, १९२३, १९२६, १९३१ या साली दुरुस्तीचे कायदे करून सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर १९३४ साली नवीन कायदा मंजूर झाला. काही वर्षांनंतर तो देखील अपुरा वाटू लागला. १९४८ साली कायद्याची पुनर्रचना झाली आणि तो १९४८ चा कार-खान्यांचा कायदा (Factories Act) सध्या प्रचलित आहे.

१८८१ चा पहिला कारखान्यांबद्दलचा कायदा (Factories Act) मंजूर झाला तो मुख्यत्वे करून इंग्लंडमधील कारखानदारांच्या दडपणामुळे. १८६० नंतर भारतामध्ये कापडाच्या बऱ्याच गिरण्या निघाल्या. इंग्लंडमधील कापडाच्या गिरण्यांना त्यांची चढाओढ जाणवू लागली. कलकत्ता येथील तागाच्या गिरण्यांच्या बाबतीतही तोच प्रकार घडला. त्यामुळे भारतातील कारखान्यावर कामाच्या तासांच्या बाबतीत व कामगार कल्याणाच्या इतर बाबींबद्दलही काही नियंत्रणे असावीत अशी त्यांनी ओरड

सुरू केली. अशी नियंत्रणे असल्याखेरीज भारतीय कारखानदारांच्या चढाओढीपुढे आपला निभाव लागणार नाही हे त्यांनी ओळखले होते. म्हणून नियंत्रणाबद्दल त्यांनी वेळोवेळी आग्रह धरला. त्यांच्या आग्रहामुळे कारखान्यांबद्दलच्या कायद्यात वेळोवेळी सुधारणा झाल्या आणि कामाचे तास कमी झाले व कारखान्यांमध्ये कामगार कल्याणाच्या काही सोई निर्माण झाल्या. इंग्रजी कारखानदारांचा हा स्वार्थमूलक आग्रह अशा रीतीने भारतीय कामगारांच्या फायद्याचा ठरला.

भारतीय कामगारांच्या दु:स्थितीबद्दल हळहळ वाटणारी व ती स्थिती सुधारण्यासाठी आपल्या परीने झटणारी अशी काही उदार मन:प्रवृत्तीची मंडळीही तत्कालीन इंग्लंडमध्ये होती. कामगार कल्याणाच्या कायद्याबद्दल त्यांची देखील सतत खटपट चालू असे. ती खटपटही भारतीय कामगारांना उपकारक ठरली. याखेरीज भारतीय कामगारांमधेही कामगार कल्याणाच्या कायद्याच्या आवश्यकतेबद्दल थोडीबहुत जाणीव निर्माण झाली होती. तिचीही सरकारला दखल घ्यावी लागली.

कामगारांमधील जाणिवेला संघटित स्वरूप दिले ते आद्य कामगार पुढारी श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी. श्री. लोखंडे काही वर्षे कामगार म्हणून काम करीत होते. त्यामुळे कामगारांच्या अडीअडचणींची व हालअपेष्टांची त्यांना चांगली कल्पना होती. कारखान्याबद्दलच्या कायद्याविषयी विचार करण्यासाठी १८७० च्या सुमारास सरकारने एक कमिशन नेमले होते. त्या कमिशनपुढे साक्ष देऊन कारखान्याबद्दलच्या कायद्याच्या रूपाने कामाच्या तासांवर नियंत्रण घालण्याची व इतर काही सुखसोई उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. त्यानंतर १८७४ च्या सुमारास पाचएक हजार कामगारांच्या सह्यांचा अर्ज त्यांनी सादर केला. त्या अर्जामध्ये कायद्याबद्दल काही सूचना केल्या होत्या. पुढे १८८१ चा कायदा मंजूर झाला. तो कायदा इतका असमाधानकारक होता की, तो सुधारावा अशी ओरड ताबडतोब सुरू झाली. श्री. लोखंडे यांनी त्या ओरडीला संघटित स्वरूप दिले. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या व कामगारांच्या मागण्या तयार केल्या. १८८९ मधे त्यांनी त्या मागण्यांविषयीचा अर्ज जवळ जवळ १७००० कामगारांच्या सह्यांनिशी सरकारला सादर केला. १८९१ चा सुधारित कारखान्याबद्दलचा कायदा हा बहुतांशी या प्रयत्नांचे फळ होय असे म्हणावयास हरकत नाही. या प्रयत्नामध्ये श्री. लोखंडे यांना सोराबजी बेंगॉली आदिकरून उदारमनस्क समाजकार्यकर्त्यांचे खूप साहाय्य झाले.

कामगार कल्याणाचे कायदे व्हावे असे जरी कामगारांना व समाजसुधारकांना वाटत होते तरी कारखानदारांचा व उद्योगपतींचा त्यांना विरोध होता. उद्योगावर कोणतेही निर्बंध नसावेत अशी त्यांची मनीषा होती. कामगार कल्याणाच्या कायद्यामुळे परदेशी मालाला टक्कर देणे जड जाईल अशीही धास्ती त्यांना वाटत होती. त्यामुळे कामगार कायदे होऊ नयेत असे दडपण ते नेहमी शासनावर आणीत. शासनाचे

धोरणही त्या काळात मुक्त अर्थव्यवस्थेला (laissez faire) अनुकूल होते. पहिल्या महायुद्धाच्या अंतापर्यंत म्हणजे सर्वसाधारणपणे १९१८ पर्यंत ही परिस्थिती होती. म्हणूनच त्या काळात म्हणजेच १८५० पासून उद्योगधंदे सुरू व्हायला लागले तेव्हापासून १९१८ पर्यंतच्या जवळ जवळ सत्तर वर्षांच्या काळात कामगार कल्याणाचे कायदे असे फारच थोडे मंजूर झाले.

पहिल्या महायुद्धाच्या अंतानंतर ही परिस्थिती पालटली. राजकीय जागृतीबरोबर सामाजिक जागृतीही वाढली होती आणि कामगारांच्या परिस्थितीकडे व कल्याणाकडे लक्ष पुरवले पाहिजे या गोष्टीची जाणीव समाजामधे निर्माण झाली होती. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या पाश्चात्त्य देशांतील कामगार कल्याणाच्या योजनांची व कायद्यांची माहिती सुशिक्षित वर्गामधे थोडीबहुत पसरली होती. कामगार संघटना निर्माण झाल्या होत्या व त्यांचे संघलढे सुरू झाले होते. लोकनियुक्त कायदेमंडळे अस्तित्वात येऊन त्यांच्यामध्ये कामगारांना सरकारनियुक्त का होईना, पण प्रतिनिधित्व लाभले होते. मध्यवर्ती कायदेमंडळात प्रसिद्ध कामगार-पुढारी श्री. नारायण मल्हार जोशी यांची-कामगार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली होती. तेव्हापासून जवळ जवळ पंचवीस वर्षे श्री. जोशी यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात कामगार-प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यांनी केलेले कार्य अनन्य स्वरूपाचे आहे. अनेक कामगार कायदे सुचविल्याचे व घडविल्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.

भारत सरकारचे धोरणही बदलले होते. साम्राज्यशाहीच्या बदललेल्या परिस्थितीमुळे तो बदल घडून आला होता. देशामधे वाढणाऱ्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारला स्वीकारावे लागले होते. उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यावयाचे म्हणजे कामगार कल्याणाकडे अजिबात दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. शिवाय कामगारांमधे असंतोष वाढू नये व त्याला क्रांतिवादी वळण लागू नये म्हणूनही काही योजना आखणे आवश्यक होते. या सर्व कारणांमुळे १९१९ नंतरच्या काळात वेगवेगळे कामगार कायदे मंजूर होत गेले.

या काळात कामगार कायदे वाढले त्याचे सर्वांत अधिक श्रेय दिले पाहिजे ते आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेला (International Labour Organisation). ही संस्था १९१९ साली स्थापन झाली. भारत देश हा तिच्या संस्थापक सभासदांपैकी एक आहे. कामगारांचे जीवनमान सुधारणे व कामगार कायद्यांचे आदर्श (Standards) निर्माण करणे हे त्या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. दर वर्षी भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मंजूर होणाऱ्या संकेत (Conventions) आणि शिफारसी (Recommendations) यांच्या रूपाने हे आदर्श निर्माण केले जातात. सभासद राष्ट्रांनी त्या आदर्शांनुसार कामगार कायदे करावेत ही अपेक्षा. भारतीय कामगार कायद्यावर त्या आदर्शांचा खूप परिणाम झालेला आहे. अनेक कायदे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या संकेतांना मान्यता देणे इष्ट व जरुरीचे म्हणून तयार झालेले आहेत. त्यातल्या त्यात

श्री. ना. म. जोशी यांच्यासारखे जागरूक कामगार-प्रतिनिधी कायदेमंडळात असल्यामुळे प्रत्येक संकेताचा व शिफारशीचा खल होई आणि त्यांना कायद्यांचे स्वरूप देण्याचा प्रयत्न होई. स्वातंत्र्योत्तरकालात ती प्रवृत्ती चालू राहिली, एवढेच नव्हे तर बलवत्तर झाली. आता तर कामगार कायद्यांच्या बाबतीत आपण इतर देशांच्या मागे राहू नये अशी भारत सरकारची उत्कट इच्छा आहे. त्यामुळे संकेतांना मान्यता देण्याची गती वाढली आहे.

कामगार कायद्यांच्या इतिहासातील पुढला टप्पा म्हणजे १९२९ मधील व्हिटले कमिशनची नेमणूक. कमिशनच्या शिफारशीनुसार पुढील पाच-सात वर्षांत बरेच कायदे मंजूर झाले. त्यानंतर १९३९ मधे दुसरे महायुद्ध सुरू झाले. युद्धकाळातही काही कायद्यांची निर्मिती झाली. त्या काळातील खास महत्त्वाचा कायदा म्हणजे सक्तीच्या लवादाबद्दलचा. भारत संरक्षण कायद्याखालील ८१ अ हा अधिनियम (Rule). सक्तीच्या लवादाची पद्धत युद्धकाळापुरती म्हणून सुरू करण्यात आली, पण ती युद्धानंतरही कायम राहिली. पुढचा काळ म्हणजे स्वातंत्र्यानंतरचा काळ. १९४८ पासून सुरू झालेल्या या काळात अनेक नवीन कायदे मंजूर झाले व बऱ्याचशा जुन्या कायद्यांना नवीन स्वरूप दिले गेले. कल्याणकारी राज्य व समाजवाद हे ध्येय आता मान्य झाले असून, त्या ध्येयानुसार कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी वेळोवेळी नवनवीन कायदे आजच्या या युगात निर्माण होत आहेत.

कामगार कायद्यांच्या निर्मितीच्या या त्रोटक इतिहासानंतर आता त्या कायद्यांचे थोडे समालोचन करता येईल. कामगार कायद्यांचे साधारणपणे चार गटांत वर्गीकरण करणे शक्य आहे. पहिला गट काम जिथे करावयाचे तेथील परिस्थिती कशी असावी (Condition of work) हे निर्दिष्ट करणाऱ्या कायद्यांचा. दुसरा गट वेतनाबद्दलच्या कायद्यांचा. तिसरा सामाजिक सुरक्षिततेबद्दलच्या कायद्यांचा व चौथा कामगार संघटना व औद्योगिक संबंध याबद्दलच्या कायद्यांचा. या वर्गवारीनुसार काही कायद्यांचे थोडक्यात विवेचन करू या.

पहिल्या गटातील कायद्यांमधील अधिक महत्त्वाचा कायदा म्हणजे १९४८ चा कारखाना कायदा (Factories Act). हा कायदा अगदी लहान कारखाने सोडले तर बाकी सर्व कारखान्यांना लागू आहे. अदमासे ४७ लाख कामगार या कायद्याच्या कक्षेखाली येतात. कायदा कामाचे तास व वेळा, जादा कामाचे (Overtime work) तास व मजुरीचा दर, आठवड्याची रजा व इतर सुट्ट्या व वार्षिक भरपगारी रजा, सुरक्षितता, आरोग्य व सुखसोई (Safety, health, welfare) याबद्दलच्या तरतुदी वगैरे गोष्टी निश्चित करतो. १४ वर्षांच्या मुलांना कामावर ठेवणे व स्त्रियांना रात्रीचे काम देणे कायद्याने निषिद्ध ठरविले आहे. कायद्याप्रमाणे ५०० पेक्षा अधिक कामगार असलेल्या कारखान्यात कामगार कल्याण अधिकारी नेमावा लागतो व ५० हून अधिक स्त्री-कामगार कामावर असणाऱ्या कारखान्यात पाळणाघराची (Creche) सोय

करावी लागते. कारखान्याचे काम कायद्यानुसार चालते हे पाहण्याची जबाबदारी कायद्याने कारखान्याच्या व्यवस्थापकावर (Manager) टाकलेली आहे. शिवाय सरकार निरीक्षक (Inspectors) नेमते व त्यांच्या मार्फतीने कायद्याच्या अंमलबजावणीवर नजर ठेवते.

कारखान्याखेरीज इतर अनेक उद्योग देशामधे चालतात. त्या प्रत्येक उद्योगासाठी कामाची व्यवस्था व परिस्थिती निश्चित करणारा वेगळा कायदा आहे. १९५१ च्या मळा कायद्याने (Plantation Act) चहा, कॉफी, रबर इत्यादी मळ्यांवरील कामाचे नियम निश्चित केले आहेत. खाणीतील कामाबद्दल १९५२ चा खाण कायदा (Mines Act) आहे. अशाच तऱ्हेचे कायदे गोदी, बंदरे, रेल्वे वगैरेंबद्दलही आहेत. दुकाने व कचेऱ्या यांच्यातील कामाचे तास व इतर गोष्टी निश्चित करण्यासाठी दुकाने व व्यापारी संस्था कायदे (Shops and Commercial Establishments Act) आहेत. हे कायदे बहुतांशी राज्यशासनांनी केलेले आहेत.

या सर्व कायद्यांचा प्रमुख उद्देश जो आहे तो हा की, उद्योगपतींना कामगारांना मनात येईल, तसे राबवता येऊ नये. कामाच्या तासांवर बंधन असावे व कामाच्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्यासाठी व आरामासाठी काही किमान तरतुदी असाव्या. या कायद्यांची संख्या व व्याप्ती दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. अलीकडे कामगारांसाठी घरे बांधण्याबद्दलचेही कायदे झालेले आहेत.

दुसऱ्या गटातील म्हणजे वेतनाबद्दलचे कायदे फार थोडे आहेत. वेतन हे सर्व साधारणपणे सामुदायिक वाटाघाटींनी किंवा औद्योगिक न्यायालयाच्या निवाड्यानुसार ठरते. त्याबद्दल कायदा नाही. मधे एकदा रास्त वेतनाबद्दल (Fair wags) कायदा करण्याचे सरकारच्या मनात होते; पण ही बाब फार गुंतागुंतीची आहे हे लक्षात आल्यानंतर सरकारने तो विचार सोडून दिला. वेतनाबद्दलचा एकच कायदा आहे आणि तो म्हणजे १९४८ चा किमान वेतन कायदा. हा जिथे कामगार संघटित नाहीत व त्यांचे संघटन उभारणे फार कठीण आहे अशा काही लहान धंद्यांना लागू आहे. या कायद्यानुसार सरकारने निश्चित केलेले किमान वेतन कामगारांना द्यावेच लागते. कायद्याचा प्रत्यक्ष फायदा असंघटित धंद्यातील कामगारांना मिळतो. इतर कामगारांच्या बाबतीत कायदा नसला तरी कामगाराला किमान वेतन हे मिळालेच पाहिजे हे तत्त्व सर्वमान्य झाले आहे.

या गटातील दुसरा महत्त्वाचा कायदा म्हणजे वेतन देण्याबद्दलचा कायदा (Payment of Wages Act). हा कायदा १९३६ मध्ये मंजूर झाला. कामगाराला त्याचे वेतन, वेतनाचा अवधी (wage period) संपल्याबरोबर ठराविक मुदतीत मिळाले पाहिजे, हा कायद्यातील मुख्य निर्बंध आहे. तसेच कायद्याप्रमाणे काही ठराविक बाबी सोडल्या तर इतर कारणांसाठी वेतनातून पैसे कापता येत नाहीत. या दोन्ही बाबतींत कामगाराला झटपट न्याय मिळावा म्हणून कायद्याने न्याय देणारी वेगळी

यंत्रणा निर्माण केलेली आहे. तिचा अनेक कामगार वेळोवेळी फायदा घेतात. तिसरा कायदा म्हणजे १९६५ चा बोनस देण्याबद्दलचा कायदा (Payment of Bonus Act.) या कायद्याप्रमाणे कामगाराला दर वर्षी किमान वेतनाच्या ४ टक्के इतके बोनस मिळते. फायदा अधिक झाला तर २० टक्के इतके बोनस मिळू शकते.

तिसरा गट सामाजिक सुरक्षिततेच्या कायद्यांचा. या गटातील पहिला कायदा १९२३ साली मंजूर झाला. तो म्हणजे कामगारनुकसानभरपाई कायदा (Workmen's Compensation Act.) काम करताना अपघातामुळे कामगाराला दुखापत झाली तर त्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची या कायद्याने सोय केलेली आहे. बाळंतपणाच्या वेळी बाळंतपणाचा भत्ता (Maternity benefit) स्त्री-कामगाराला कायद्याने मिळू शकतो. सुरुवातीला हे कायदे राज्यनिहाय वेगवेगळे होते. नंतर अखिल भारतीय स्वरूपाचा एक कायदा झाला. आता अपघाताबद्दलची नुकसानभरपाई व बाळंतपणाचा भत्ता या दोन्ही गोष्टी कर्मचारी राज्य विमा योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. कर्मचारी राज्य विमा कायदा (Employees State Insurance Act) १९४८ साली मंजूर झाला. या कायद्याप्रमाणे वरील दोन लाभांखेरीज आणखी तीन लाभ कामगारांना मिळण्याची सोय झाली आहे. त्यांपैकी मोठा महत्त्वाचा लाभ म्हणजे आजारीपणाच्या वेळी औषधपाण्याची व वेतनाच्या निम्मा इतका आजारीपणाचा भत्ता मिळण्याची सोय. हा कायदा बहुसंख्य कारखान्यांना लागू आहे. जवळ जवळ ३७ लाख कामगार व अदमासे ३५ लाख कामगार कुटुंबे यांना सध्या या योजनेचा फायदा मिळतो आहे.

त्यानंतर १९५२ साली कर्मचारी आरक्षित निधी कायदा (Employees' Provident Fund Act) मंजूर झाला. नोकरीवर असताना कामगाराच्या वेतनातून काही भाग कापला जावा, त्यामध्ये कारखानदाराने तेवढीच भर घालावी व ती महिन्याच्या महिन्याला एकत्रित झालेली रक्कम नोकरीच्या अखेरीस वृद्धापकाळी उपयोगी पडावी म्हणून कामगाराला मिळावी हा या कायद्याचा उद्देश आहे. सध्या हा कायदा १२० धंद्यांना व उद्योगांना लागू आहे. सुरुवातीला वेतनातून ६$\frac{१}{४}$ टक्के कापले जात असत. १९६३ मधे ती वाढ ८ टक्के करावी असे ठरले. पण ही वाढीव काट अद्याप बऱ्याच धंद्यांना लागू करण्यात आलेली नाही.

याखेरीज कोळशाच्या खाणीतील कामगारांसाठी व बोटीवरील खलाशी वगैरे कामगारांसाठी वेगळ्या स्वतंत्र कायद्यांनी मुक्रर केलेल्या योजना आहेत. या सर्व कायद्यांनी व योजनांनी सामाजिक सुरक्षिततेचे कार्य थोडेबहुत साधले आहे. परंतु काही आपत्तींच्या बाबतीत अद्याप संरक्षणाची काहीच सोय नाही. उदाहरणार्थ बेकारी. बेकार भत्त्याची सोय नाही. औद्योगिक कलह कायद्यानुसार (Industrial Disputes Act), छटणी (retrenchment) व कामावरून तात्पुरते बंद करणे (Lay-off) यांच्या वेळी थोडा भत्ता मिळतो तेवढाच. तसेच मिळवत्या कामगाराच्या अकाल

मृत्यूमुळे कुटुंबावर जे संकट कोसळते त्या संकटाला तोंड देण्यासाठी साहाय्य मिळ-ण्याची सोय नाही. म्हातारपणाच्या पेन्शनची सोय नाही. या उणिवा दूर होणे व सुरक्षिततेची एकमुखी योजना तयार होणे अगत्याचे आहे.

उरलेला शेवटचा गट कामगार संघटनेबद्दलच्या व औद्योगिक संबंधाबद्दलच्या कायद्यांचा. कामगार संघाबद्दलचा भारतीय कामगार संघ कायदा (Indian Trade Unions Act) १९२६ साली मंजूर झाला. तो कायदा आजतागायत जवळजवळ आहे तसाच कायम आहे. या कायद्याने कामगार संघांना कायदेशीर अस्तित्व (Legal Existence) दिले व संप व इतर कृत्यांसाठी फौजदारी व दिवाणी तोशीस सहन करावी लागणार नाही असे अभय दिले. परंतु यापलीकडे दुसरा कोणताही अधिकार दिला नाही. त्यामुळे या कायद्याने कामगार संघांचा विशेष फायदा झाला नाही. कामगार संघांना हवी असते ती म्हणजे मालकाकडून मान्यता. ती देण्याची या कायद्यात सोय नाही. ती सोय कायद्यात अंतर्भूत करण्याच्या उद्देशाने १९४८ साली एक दुरुस्तीचा कायदा Trade Unions Amendment Act मध्यवर्ती कायदेमंडळाने मंजूर केला. पण तो कायदा मुळी जारीच करण्यात आला नाही. संघांना मान्यता देण्याची सोय आहे ती म्हणजे मुंबई औद्योगिक संबंध कायदा (Bombay Industrial Relations Act) व इतर तत्सम राज्यशासनांच्या कायद्यामधे, पण ती सोय बरीच सदोष आहे. कामगार संघांना मान्यता मिळणे जरुरीचे आहे, हा विचार अलीकडे बऱ्याच लोकांना पटू लागला आहे. म्हणूनच वेगवेगळी राज्यशासने आता त्याबद्दल कायदे बनवू लागली आहेत. राष्ट्रीय श्रम आयोगानेही त्या स्वरूपाची शिफारस केल्या-मुळे मध्यवर्ती शासनच लवकर या बाबतीत पुढाकार घेईल असे दिसते.

कारखान्यातील कामाबद्दलचे नियम (Standing Orders) कामगाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असतात. सुरुवातीला असे नियम मुळी नसतच. ते बनू लागले तेव्हा ते बनवण्याचा पुरा अधिकार कारखान्याच्या मालकांच्या हाती असे. १९४६च्या औद्योगिक नोकरी (कामाबद्दलचे नियम) कायदा (Industrial Employment Standing Orders Act) याने ती परिस्थिती बदलली. आता प्रत्येक कारखान्याला कामाचे नियम तयार करून ते सरकारी कचेरीत नोंदावे लागतात व ते निश्चित करण्या-पूर्वी कामगारांशी सल्लामसलत करावी लागते.

औद्योगिक संबंधांच्या बाबतीत पहिली बरीच दशके, म्हणजे दुसऱ्या महा-युद्धाच्या आरंभापर्यंत सरकार उदासीन होते. औद्योगिक कलह ही कामगार आणि मालक यांच्यामधील आपापसातील भांडणे असून ती त्यांनी मांडावी, सरकारने त्यात मधे पडू नये, फार फार करावे ते एवढेच की रंगण खुले ठेवावे (Keep the ring free) अशी ह्या काळातील विचारसरणी होती. शांतताभंग होणार नाही एवढी खबरदारी घेतली की सरकारचे कार्य संपले असा समज होता. कामगारवर्गाच्या हिताला ही भूमिका फारच बाधक होती. परंतु त्या दृष्टीने सरकार विचार करायला तयार नव्हते.

पहिल्या महायुद्धाच्या उत्तरार्धात व ते संपल्यानंतरच्या पहिल्या तीन-चार वर्षांत देशात ठिकठिकाणी बरेच संप झाले. त्या वेळी औद्योगिक तंटे मिटवण्यासाठी एखादी यंत्रणा असावी असा विचार चालू होता; परंतु नंतर संपांची संख्या कमी झाली. त्यामुळे प्रत्यक्ष कारवाई झाली नाही. औद्योगिक तंट्याबद्दल पहिला कायदा देशात झाला तो १९२९ साली. उद्योग कलह कायदा (Trade Disputes Act) असे त्याचे नाव होते. कायदा झाला खरा पण त्याचा उपयोग जवळ जवळ केला गेलाच नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत म्हणजे १९४० पर्यंत ही परिस्थिती चालू होती. नंतर युद्धकाळात संप होणे इष्ट नाही असे आढळून आले म्हणून भारत संरक्षण कायद्याच्या ८१ अ या अधिनियमानुसार सक्तीच्या लवादाची यंत्रणा निर्माण करण्यात आली. संप व टाळेबंदी बेकायदेशीर ठरली. परंतु मागण्या मिळवण्यासाठी लवादाचा मार्ग उपलब्ध झाला.

युद्धकाळात सुरू झालेली ही सक्तीच्या लवादाची पद्धत १९४७ साली मंजूर झालेल्या औद्योगिक कलह कायद्याने (Industrial Disputes Act) कायम केली. फरक एवढाच केला की, प्रत्येक कलह लवादाकडे आपण होऊन जाण्याऐवजी तो लवादाकडे सोपवण्याचा अधिकार सरकारच्या हाती ठेवला. याला अपवाद एकच आणि तो म्हणजे सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवांमधे (Public Utility Services) घडून आलेले कलह. या सेवा आयोगामधे चौदा दिवसांची नोटीस दिल्याखेरीज संप अगर टाळेबंदी होऊ शकत नाही. परंतु नोटीस मिळाल्याबरोबर तडजोड (Conciliation) व अखेरीस लवाद यांची कारवाई सरकारला करावी लागते. कायद्याप्रमाणे कलह मध्यस्थापुढे अगर लवादापुढे असताना व लवादाचा निर्णय अगर तडजोड बंधनकारक असताना संप करणे अगर टाळेबंदी पुकारणे बेकायदेशीर आहे. औद्योगिक संबंधाबद्दलचा सर्व देशभर लागू असलेला असा हा एकच कायदा आहे. १९४७ साली तो मंजूर झाला तेव्हापासून त्यामधे पुष्कळ सुधारणा झाल्या, परंतु त्याचे मूळ स्वरूप होते, तसेच कायम आहे.

औद्योगिक संबंधाबद्दलचा दुसरा एक प्रादेशिक स्वरूपाचा कायदा आहे. तो म्हणजे १९४६ चा मुंबई औद्योगिक संबंध कायदा (Bombay Industrial Relations Act). हा कायदा महाराष्ट्रमध्ये कापड, साखर अशा दोन-तीन धंद्यांना लागू आहे. गुजरातेतील कापडधंद्याला हाच कायदा लागू होता. आज देखील तत्सम कायद्याच्या कक्षेखाली तो आहे. तत्सम कायदा मध्य प्रदेशात व उत्तर प्रदेशातही जारी आहे. या कायद्याचे वैशिष्ट्य हे की, प्रातिनिधिक कामगार संघाला तो मान्यता देतो व मालक आणि संघ यांनी वाटाघाटी करून कलह सोडवावे असा त्यांच्यावर निर्बंध लादतो. वाटाघाटींनी कलह तुटला नाही तर तो लवादाकडे सोपवावा लागतो. म्हणजेच या कायद्यानुसार संप अगर टाळेबंदी यांना स्थान उरत नाही.

याखेरीज संकीर्ण असा एक कायद्यांचा गट कल्पिता येईल. त्यामधे प्रामुख्या

उल्लेख करता येईल तो म्हणजे मुलांच्या नोकरीबद्दलचा कायदा, कर्ज-बाजारीपणा-बद्दलचा कायदा, कामगाराला नोकरी मिळवून देण्याच्या यंत्रणेबद्दलचा कायदा, शिकाऊ कामगाराबद्दलचा कायदा वगैरेंचा उल्लेख करता येईल.

औद्योगिक कलह कायद्यानुसार असो किंवा प्रादेशिक स्वरूपाच्या औद्योगिक संबंध कायद्यानुसार असो, निर्माण झालेला कलह मिटविण्याच्या यंत्रणेविरुद्ध देशामध्ये तीव्र असंतोष आहे. उद्योगपती व कामगार दोघांनाही ती यंत्रणा अपुरी व सदोष वाटते. उद्योगपतींना सरकारी हस्तक्षेप निषेधार्ह वाटतो तर दिरंगाईची व तांत्रिक स्वरूपाची म्हणून कामगारांचा सक्तीच्या लवाद पद्धतीवर राग आहे. सामुदायिक वाटाघाटींची पद्धत (Collective bargaining) अधिक श्रेयस्कर असे दोघांनाही वाटते. परंतु त्यांच्या यशस्वितेसाठी जे प्रातिनिधिक स्वरूपाचे संघ हवेत व जी उभयपक्षी तडजोडीची वृत्ती हवी त्यांचा अद्याप व्हावा तेवढा प्रादुर्भाव झालेला नाही. राष्ट्रीय श्रम आयोगाने या प्रश्नाचा विचार करून एक योजना सुचवली आहे. तिचा सध्या सरकार दरबारी व कामगार आणि उद्योगपती यांच्या संस्थांत विचार चालू आहे.

देशातील कामगार कायद्यांचे हे समालोचन झाले. समालोचनावरून दिसून येईल की तसे पाहिले तर कायदे पुष्कळ आहेत. कायद्यांच्याच दृष्टीने पाहिले तर भारत प्रगत देशात मोडू शकेल. परंतु कायदे करणे सोपे असते, त्यांची अंमलबजावणी करणे फार कठीण असते. अंमलबजावणीसाठी जी निरलस व कर्तव्यदक्ष यंत्रणा हवी ती अद्याप समाधानकारक स्वरूपात निर्माण झालेली नाही. तो निर्माण करण्याकडे यापुढे अधिक लक्ष पुरविणे जरुरीचे आहे. तसेच सगळ्याच गोष्टी कायद्याने निर्जीव करण्याऐवजी उद्योगपती व कामगार यांनी वाटाघाटींच्या रूपाने निश्चित कराव्या असा प्रघात काही बाबतींत तरी निदान रूढ होणे उचित ठरेल.

आम्हा मराठ्यांच्या ऐहिक उत्कर्षापकर्षाची मीमांसा

पां. वा. गाडगीळ

विषयव्याप्ति :

" सामाजिक किंवा राजकीय सुधारणांकडेच आपल्या कर्त्या पुरुषांनी लक्ष कसे दिले, जीवनविषयक इतर महत्त्वाच्या बाबींकडे (उदा० शेती, अर्थकारण, औद्योगिक विकास, विज्ञान इत्यादी) दुर्लक्ष कसे झाले याची या लेखात मीमांसा करावी. फुले, आगरकर, टिळक यांच्यापासून सावरकरांपर्यंतची पार्श्वभूमी विशद करून स्वातंत्र्योत्तर काळावर विशेष लक्ष केंद्रित करावे. गेल्या २५।३० वर्षांत या बाबतीत काही हालचाल झाली असल्यास त्याचे चित्र रेखाटून हे नेतृत्व कसे विकसित व्हावयास हवे याचे वस्तुनिष्ठ दिग्दर्शन करावे " या भूमिकेतून मी लेख लिहावा अशी सूचना या ग्रंथाच्या संपादकांनी केली.

त्यानुसार या लेखात महाराष्ट्रासंबंधाने माझे काही विचार मी मांडणार आहे. संपादकांनी आखून दिलेल्या कक्षेमुळे मला मांडावयाचे विचार अधिक स्पष्टपणे मांडण्याची सोय झाली आहे. फार थोर लोकांचा उल्लेख जागोजाग करावा लागणार असून त्यांच्याविषयी थोडेफार अनुकूल व प्रतिकूलही बोलावे लागणार आहे. पण मनमोकळेपणाने बोलल्यावाचून समाजाची वैचारिक व व्यावहारिक प्रगती होणार नाही. हे लक्षात घेऊन वाचकांनी न आवडणारे विचारही वाचावे व सहिष्णुतेने समजून घ्यावे.

महाराष्ट्रीय कोण ?

' महाराष्ट्रीय ' हा शब्द हल्ली व्यापक अर्थाने वापरावा असे ठरले आहे. ' महाराष्ट्रात राहून जो आपला चरितार्थ चालवितो तो महाराष्ट्रीय ,' अशी अधिकृत व्याख्या हल्ली करण्यात आलेली दिसते. ही व्याख्या सत्य व शास्त्रशुद्धही आहे. पण सध्या अथवा नजीकच्या भविष्यकाळात ही व्याख्या लोकांच्या मनाने रूढ केली

जाण्याचा संभव नाही. ही व्याख्या लोकांच्या भावनेशी भिडत नाही. मी या लेखात ही व्याख्या ग्राह्य धरून न बोलता रूढ अशा जुन्या समजुतीला धरून बोलणार आहे. कारण मला वस्तुस्थितीच्या संदर्भात बोलावयाचे आहे.

महाराष्ट्रातले उद्योगपती कोण ? असा प्रश्न विचारण्यात आला की, 'किर्लोस्कर, ओगले, म्हादबा मिस्त्री ' ही नावे आम्ही घेतो. पण सोलापूरचे वालचंद हे काही आमच्या लक्षात येत नाहीत. वास्तविक वालचंदशेठ व त्यांचे सारे घराणे हे खास महाराष्ट्रात वाढलेले, महाराष्ट्रीय आहे आणि उद्योगधंद्यात ते सर्वजण खरोखर आधुनिक शिवाजी आहेत. त्यांच्या घराण्यातली सर्व माणसे उत्कृष्ट मराठी बोलतात. पण महाराष्ट्रीय उद्योगपतींच्या यादीत त्यांचे नाव घेण्याचा आपणाला विसर पडतो, त्याला तसेच कारणही आहे. युरोपात मध्ययुगीन काळी हॉलंडमधील शेकडो हजारो कारागीर इंग्लंडात गेले व तेथेच ते उद्योगधंदे करीत राहिले, तेथल्या जनतेशी त्यांचे वैवाहिक संबंध घडून इंग्लंडातील समाजाशी ते एकरूप झाले. यामुळे अमुक माणूस हॉलंडचा, अमुक माणूस इंग्लंडचा असा फरक तेथे राहिला नाही. महाराष्ट्रात आलेले गुजराथी व मारवाडी कित्येक पिढ्या येथे राहिले असूनही महाराष्ट्रीयांशी त्यांचे रोटीबोटी-संबंध न आल्यामुळे त्यांची विभिन्नता कायम राहिली आणि येथे आल्यापासून मोठे उद्योग व व्यापार त्यांच्याच हाती राहिल्यामुळे महाराष्ट्रीय, गुजराथी, मारवाडी इत्यादी भेद महाराष्ट्रात कायम राहिले. मद्रासी, केरळीय, कानडी, उत्तरभारतीय इ. हे जे लोक महाराष्ट्रात आले तेही वरीलप्रमाणेच वेगवेगळे राहिले आणि त्यांनीही महाराष्ट्रातील काही विशिष्ट उद्योग व व्यापार उचलून आत्मसात केला. यामुळे हे सर्व परप्रांतीय कित्येक पिढ्या महाराष्ट्रात राहूनही 'महाराष्ट्रीय' या शब्दात या सर्व परप्रांतीयांचा समावेश करावा ही गोष्ट आपल्या मनास अजून रुचत नाही.

मुंबईची गोष्ट तर फारच वेगळी आहे. मुंबई महाराष्ट्राची ही कल्पना गेल्या शतकाच्या उत्तरार्धाच्या काही भागात मुंबईतल्या महाराष्ट्रीयांच्या मनात होती. पुढे तिचा संपूर्ण विसर पडला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होईपर्यंत मुंबई ही महाराष्ट्राची आहे याचे अवधानही कोणास नव्हते. मुंबईचे उद्योगधंदे पारशी, गुजराथी, मारवाडी यांच्या भांडवलाने व कर्तृत्वाने स्थापन होऊन महाराष्ट्रीय लोक हे केवळ मजूर व कारकून झाले. यामुळे जगन्नाथ शंकरशेठ यांच्या काळी मुंबई महाराष्ट्राची, ही जी भावना थोडीशी अस्तित्वात होती तिचा पुढे मागमूसही राहिला नाही. मुंबईत सॉलिसिटर, बॅरिस्टर्स, वकील, न्यायाधीश, प्राध्यापक, डॉक्टर इ. उच्च पदावर पंचवीस वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रीय लोक हक्क सांगू शकत असत. उत्तर भारतात पंजाबपर्यंत प्राध्यापक व न्यायाधीश या पदापर्यंत अनेक विद्वान महाराष्ट्रीय चढले होते. अलीकडे या प्रकारास ओहोटी लागली आहे. मुंबईत सॉलिसिटर, बॅरिस्टर, वकील, प्राध्यापक, डॉक्टर इ. उच्चपदावर परप्रांतीय विद्वान चढत गेले असून महाराष्ट्रीय लोक बरेच घसरले आहेत व आणखी घसरत आहेत. आता मुंबई ही महाराष्ट्राची असे आपण भौगोलिक दृष्ट्या

म्हणू शकतो. कारण मुंबई ही ठाणे व कुलाबा ह्या जिल्ह्यांनी वेढली आहे, पण खुद्द मुंबईत महाराष्ट्रीयांची लोकसंख्या ५०% च्या खाली गेली असून कारकून, मजूर व हमाल यांहून फारसा मोठा दर्जा या जागतिक दृष्ट्या धनाढ्य मानल्या जाणाऱ्या शहरात आम्हा महाराष्ट्रीयांना नाही.

म्हणून महाराष्ट्रात चरितार्थ चालवितो तो महाराष्ट्रीय ही सत्य व शास्त्रशुद्ध व्याख्या या लेखापुरती बाजूस ठेवून लोकांच्या मनात 'महाराष्ट्रीय' या शब्दाचा जो विशिष्ट अर्थ फार दिवसांपासून रूढ आहे त्या अर्थानेच मी महाराष्ट्रीयांबाबत येथे माझे विचार मांडणार आहे, असे मी सुरुवातीस म्हटले.

मागासलेपणाचे लक्षण :

महाराष्ट्रीयांना आपण महाराष्ट्रीय आहोत याबद्दल विशेष अभिमान वाटला पाहिजे असा प्रचार आपण करीत असतो. शिवाजीमहाराज आपल्यात होऊन गेले आणि ते राष्ट्रपुरुष होते असे इतरांनीही मानले पाहिजे असे आपण आग्रहाने मांडतो. महाराष्ट्राची परंपरा फार थोर असल्याचा हा पुरावा आहे असे आपण समजतो. न्या. रानडे, गोखले, लोकमान्य टिळक, डॉ. आंबेडकर, छत्रपती शाहूमहाराज, सयाजीराव गायकवाड अशी अखिल भारतीय कीर्तीची थोर माणसे महाराष्ट्रीयांत होऊन गेली. आजही काँग्रेस, संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट या पक्षांचे फार थोर पुढारी महाराष्ट्रीय असून मुंबई महाराष्ट्राची आहे असे म्हटले म्हणजे मुस्लीम लीगचे हुकूमशहा बॅ. जीना हेही 'महाराष्ट्रीय' होते असे मानले पाहिजे. या सर्व थोर व पराक्रमी पुरुषांबद्दल आपण अभिमान बाळगला तर त्यात काही गैर घडले असेही कोणी म्हणू शकणार नाही. पण ही सर्व थोरवी अगदी ओरडून ओरडून आपण जेव्हा जगाला सांगत असतो त्या वेळी आपणास हे जगाला ओरडून सांगावे लागते यातच आपण लहान व मागासलेले आहोत याची व्यक्त अथवा अव्यक्त जाणीव आपल्या मनाशी नेहमी टोचत राहिलेली आहे हे कळते, याचे कारण चटकन आपल्या लक्षात येत नाही. पण थोड्या विचाराने मनाला जाणवते आणि ही जाणीव होताच पेटलेल्या उदकाडीने बोटाला चटका बसावा तसा मनाला चटका बसतो.

नव्या जाणिवेची बोच :

ही जाणीव कोणती ? अगदी बेळगावपासून नागपूरपर्यंत आणि मुंबईपासून नांदेड-पर्यंत मोठ्या शहरातल्या अथवा तालुक्याच्या गावातल्या व्यापाराचे व धंद्याचे क्षेत्र महाराष्ट्रीयांच्या हाती कोठेही नसून कारकून, मजूर व हमाल हा दर्जा जसा आपणास मुंबईस आहे त्याप्रमाणे ग्रामीण भागात कारकून, मजूर, शेतकरी व हमाल हेच दर्जे महाराष्ट्रीयांच्या हाती असून गावोगाव धनवत्ता देणारा व्यापार व मोठा धंदा हा बिगर महाराष्ट्रीयांच्या हाती आहे ही गोष्ट आपल्या मनास अलीकडे थोडी फार पोळू लागली

आहे. जळगाव, सातारा, कोल्हापूर यांसारख्या ग्रामीण भागांच्या केंद्रातही फराळाची व जेवणाची हॉटेले महाराष्ट्रीयांपेक्षा मद्रासी लोक अगर उडपी अधिक यशस्वितेने चालवतात या गोष्टीची अजून आपणांस खंत वाटत नसली तरी ही गोष्ट मनाला जाणवू लागली आहे. आपले काय चुकत आले अथवा काय चुकते आहे हे कोणाच्या लक्षात येत नाही. त्याचा कोणी विचारही करीत नाही. महाराष्ट्रातल्या नोकऱ्या परप्रांतीय पटकावत आहेत असे म्हणून आपण चडफडतो, संतापतो, संप करतो, मोर्चे काढतो, मारामाऱ्या करतो आणि ८०% नोकऱ्या महाराष्ट्रीयांना द्या अशा मागण्या धमक्यांच्या बळावर करतो. परप्रांतीय धंदेवाले आपणापुढे थरथर कापत आहेत असा बहाणा करून आपणच आपली जाहिरात करतो. यात आपले काही चुकत आहे हे कोणाच्याच लक्षात येत नाही. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सरकारी खर्चाने चाललेल्या कितीतरी सुतारीच्या शाळा आहेत. पण एकाही शाळेतून एकही सुतार तयार होऊन सुतारीवर पैसे मिळवीत नाही, याची राज्यकर्त्यांनाही खंत वाटत नाही. मुंबईत १% सुतारीही महाराष्ट्रीय नाही. गेल्या १५ वर्षांत काही कोटी रुपयांची सुतारकामे मुंबईत झाली असतील. ती सगळी शिखांनी व पुरभय्यांनी मिळविली. महाराष्ट्रीयांचा वाटा त्यात फार थोडा आहे. गेल्या १५।२० वर्षांत सर्व प्रांतांतून मुंबईत कित्येक लाख लोक आले. त्यांनी बांधकामे, कारागिरीची कामे, यांत्रिक कामे इ. कित्येक कोटी रु. ची कामे मिळविली. ही कामे नक्त पगारी नोकऱ्यांची नव्हती. ती कर्तबगारीची आणि दूरदृष्टीची होती. यातील ८०% कामे आम्हांला मिळाली नाहीत म्हणून आम्ही कधी खंत बाळगली नाही. यासाठी लागणारी कर्तबगारी आणि दूरदृष्टी आपणा महाराष्ट्रीयांच्या ठिकाणी नाही, याची खंत आम्ही बाळगली नाहीच, पण याची जाणीवही आपल्या मनाशी नाही. मराठी वृत्तपत्र हे मराठी माणसाचे मन खुले करण्याचे मुख्य साधन. पण सारी बडी मराठी वृत्तपत्रे परप्रांतीयांच्या हाती आहेत. महाराष्ट्रात कोट्यवधी रुपये मिळविणारा सिनेमाचा धंदा बहुतेक प्रमाणात परप्रांतीयांच्या हाती असून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात पुष्कळशी थिएटरेही बिगर महाराष्ट्रीयांच्या हाती आहेत. महाराष्ट्रातील मुसलमान स्वतःला प्रथम मुसलमान मानतात. आपण महाराष्ट्रातले आहोत याची जाणीव त्यांस फारच थोडी असते आणि महाराष्ट्रातील पुष्कळशी कारागिरी या मुसलमानांच्या हाती आहे. कोकण किनाऱ्यावरील खलाशी बहुतेक मुसलमान आहेत ही गोष्ट फारशी कुणाच्या लक्षात येत नाही.

सहानुभूतिशून्यता :

महाराष्ट्रीय म्हणविणाऱ्या आपणास एकमेकांबद्दल आपुलकीही फार थोडी आहे. ग्रामीण भागात गुजराती दुकानदार व सावकार जितका मराठा शेतकऱ्यांशी एकरूप झालेला आहे तितका ब्राह्मण सावकार, वकील अथवा अधिकारी मराठा शेतकऱ्यांशी एकरूप झालेला नाही. मराठा समाज हा महाराष्ट्रात प्रचंड बहुसंख्य असून महाराष्ट्राचे नेतृत्व अगदी स्वाभाविकपणेच मराठ्यांकडे जायला हवे. पण त्या मराठ्यांकडूनच

अस्पृश्यांना एवढी हीन वागवणूक मिळते की, महाराष्ट्रातील अस्पृश्य हे मराठ्यांकडे आपले पुढारीपण जाऊ देण्यास तयार नाहीत; आणि पुढारी लोक अस्पृश्यता निवारण्याच्या प्रतिज्ञा घोकत असतात, पण मराठा बहुजनसमाजाकडून अस्पृश्यता निवारण्यास निकराचा विरोध होतो. महाराष्ट्रातील राजकीय पुढाऱ्यांचे राजकारणही जनतेच्या जीवनापासून अधांतरीच आहे. सावरकर हे अतिशय त्यागी, ध्येयनिष्ठ आणि विचारवंत होते. त्यांनी हिंदुसंघटनेची धुरा शिरावर घेतली. हिंदुसमाजाची सुधारणा झाली पाहिजे आणि जातिभेद नष्ट होऊन समता स्थापन झाली पाहिजे हे त्यांना पटले होते. त्यांनी राजकारणापासून दूर झाल्यानंतर समाजसुधारणावादाचा पुरस्कार सुरू केला, पण पुढे ते राजकारणाकडेच घसरले. हिंदु-मुसलमान दुहीवर त्यांनी भर दिल्यामुळे त्यांना राष्ट्रीय पुढारीपण मिळाले नाहीच; पण हिंदुसमाजाचे नेतृत्वही त्यांना मिळाले नाही. अस्पृश्यांनी स्पृश्य हिंदूंना पुढारी मानले नाही आणि महाराष्ट्रातील हिंदुसमाजात मोठ्यात मोठी संख्या ज्या मराठ्यांची त्यांच्यावर सावरकरांचा प्रभाव काहीच पडला नाही. सावकार व व्यापारी या नात्याने गुजराती समाजाने मराठा शेतकऱ्यांकडून व्याज व नफा अधिक मिळविला व तो समाज अधिक श्रीमान होऊन त्याने महाराष्ट्रातील अर्थसंघटनेवर प्रभुत्व मिळविले. उलट ब्राह्मणसमाज त्या मानाने गरीब असता आणि मराठा समाजापासून काहीसा दूर असता त्याचाच मराठा समाजाने द्वेष केला. ब्राह्मणांनी सर्वांनी सावरकरांना पाठिंबा दिला नाही, पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा प्रामुख्याने ब्राह्मणांचा असून त्यांच्यातील एकाने गांधीजींचा खून केल्यामुळे महाराष्ट्रातील मराठ्यांनी ब्राह्मणांची १५।२० कोटींची मालमत्ता एका आठवड्यात जाळून टाकली. गांधींचा महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी तिरस्कार केलाच, पण नेहरूंचाही तिरस्कार केला आणि महाराष्ट्र आर्थिक क्षेत्रात मागे आहे, स्वतः ब्राह्मण हे निव्वळ कारकून आहेत तरीपण ज्या नेहरूंनी भारताचा आर्थिक उत्कर्ष अभूतपूर्व अशा प्रमाणात करून महाराष्ट्राला आर्थिक उत्कर्षाच्या दिशेला लावले, त्या नेहरूंचा महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी तिरस्कारच केला.

राजकारणी कर्तृत्व : एक जमेची बाजू :

राजकारणाचे वेड आपल्या अंगी फार आहे. राजकारणात कर्तृत्वही आपण खूप दाखविले आहे. संयुक्त-महाराष्ट्र चळवळ ज्या शौर्याने, धीराने व तडफेने महाराष्ट्राने केली तीमुळे साऱ्या भारतात महाराष्ट्राचा दरारा वाढलेला आहे. हा दराराही प्राचीन काळापासूनचा आहे. शिवाजीने सुरत शहर लुटले त्या वेळी इंग्रजांना त्याचा दरारा जाणवला. चिमाजीअप्पाने वसईचा किल्ला पोर्तुगीजांपासून घेऊन पोर्तुगीजांवर दहशत बसविली; रघूजी भोसल्याने बंगालपर्यंत आपली सैन्ये नेऊन बंगालमध्ये 'मराठा-खंदक' जो काढला तो तेथे लहान मुलांना भिवविण्याचे साधन झाला आहे. महादजीने वडगावच्या लढाईत इंग्रजांचा पराभव करून मराठे हे आधुनिक शस्त्रास्त्रे व कवाईत हस्तगत करणारे आहेत, हे सिद्ध केले. पानिपतानंतरही दिल्लीत मराठ्यांनी आपले वर्चस्व

पुन्हा स्थापन केले आणि इंग्रजांनी मराठ्यांचा मोड केल्यावरच त्यांना बहुतेक हिंदुस्थान एकछत्री करता आले. मोगलांना दक्षिणेकडे येण्यास मराठ्यांनीच अडथळा करून कायमचा पायबंद घातला आणि औरंगजेबाचा मोड करून मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाला मराठ्यांनीच सुरुवात केली. औरंगजेबानंतर मराठेशाही वाढली आणि उतारास लागून लयास गेली, त्या सर्व काळात मोगल साम्राज्य निव्वळ सडत राहिले होते. इंग्रजी अमलात मराठ्यांच्या व महारांच्या पलटणी शूर असल्याचा अनुभव इंग्रजांना आला आणि कारकून फडातर्फे कार्यक्षम राज्यकारभारही इंग्रजांना महाराष्ट्रातच मिळाला. इंग्रजी अमलातील नवी वैचारिक क्रांती प्रथम बंगाल्यात सुरू झाली तरी महाराष्ट्रात तिचा प्रसार जास्त झाला. लोकहितवादी, ज्योतिबा फुले, शाहू महाराज, आगरकर, विठ्ठलराव शिंदे वगैरे नवविचारांची मंडळी पहिल्या महायुद्धापूर्वीच समाजसुधारणावादी म्हणून अखिल भारतात गाजली होती. इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून इंग्रजी अमलास प्रतिकार करणारा पंथ महाराष्ट्रातच सुरू झाला. वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, सावरकर व त्यांच्या संप्रदायातील अनेक शूर तरुण हे दहशतवादातील त्या काळातले अग्रगण्य नेते होते. शांततेच्या व कायद्याच्या मार्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ लो. टिळकांनी इतकी प्रखरपणे केली की, अखिल भारताने आश्चर्याने तोंडात बोट घातले आणि टिळकांच्या पुढे आदराने मान लवविली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्राचे दिसून आलेले तेजःपुंज दर्शन हे अपवादात्मक नसून महाराष्ट्राच्या वर दिलेल्या तेजस्वी इतिहासाशी ते सुसंगत होते. आजही संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष या अखिल भारतीय पक्षांचे अखिल भारतीय नेते हे महाराष्ट्रीयच आहेत. तेव्हा महाराष्ट्राची राजकीय क्षेत्रातील श्रेष्ठता गेल्या ३०० वर्षांत अबाधित राहिली आहे ही गोष्ट कोणीही कबूल करील.

असे असूनही आम्ही मुंबईसह साऱ्या महाराष्ट्रात कारकून, मजूर, शेतकरी व हमाल आहोत. आमच्या प्रदेशातील अर्थसंघटना परप्रांतीयांच्या प्रभुत्वाखाली असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नियोजनाच्या कालात महाराष्ट्रीयांची आर्थिक परिस्थिती किंचित सुधारली असली तरी अर्थसंघटनेतील महत्त्वाच्या व मोक्याच्या जागा परप्रांतीयांच्याच हाती आहेत. यामुळे राजकारणात जो मोठेपणा आपणांस मिळालेला दिसतो तो निव्वळ पोकळ असल्याचा अनुभव येतो. वैयक्तिक कर्तृत्वाच्या व जातीच्या बळावर काल मंत्री झालेला पुढारी आज खाली उतरला की त्याला हिंडायला स्वतःचे वाहनही राहत नाही. राजकारणात मिळणाऱ्या उच्चपदाच्या खाली आपल्याला आर्थिक बैठक काहीही नाही याची त्याला सतत जाणीव असल्याने त्याचा न्यूनगंड मनातल्या मनात त्याला सदा खात असतो. हा न्यूनगंड शमविण्यासाठी पूर्वजांचे उत्सव करणे, आपल्यातील एकमेकांचे सत्कार करविणे, करून घेणे हे कार्यक्रम महाराष्ट्रीयांचे नेहमी चालू असतात पण दिवसानुदिवस सामान्य महाराष्ट्रीयांना व काही थोड्या पुढाऱ्यांनाही आपल्या या दुःस्थितीची खंत वाटू लागली असून ते अंतर्मुख होऊ लागले आहेत.

मागासलेपणाची मीमांसा :

महाराष्ट्राच्या अंगी धाडस, कर्तबगारी, बुद्धिमत्ता वगैरे गुण आहेत हेही वर दिलेल्या माहितीवरून दिसून येते. पण तरीही आपण मागे का ? खुरटलेले का ? याचा विचार महाराष्ट्रात व्हावा तसा होत नाही. माझ्या मते याचे कारण दुहेरी आहे. सामाजिक सुधारणेचा विचार व आचार आम्ही जरूर तेवढा केला नाही आणि आर्थिक प्रगतीचा विचार मुळीच केला नाही. याचा अर्थ असा नव्हे की, आपण भारतातील सर्व प्रांतांच्या मागे आहोत. आपल्याही मागे इतर कितीतरी प्रांत आहेत. किंबहुना सामान्य जनतेबाबत बोलावयाचे तर महाराष्ट्रातल्याइतकी जागृत अशी सामान्य जनता पंजाब आणि केरळ सोडले तर इतर कोठेही नाही. पंजाबात शेतीस पाणी मुबलक असल्याने आणि हवा फार चांगली असल्याने शेती व शेतकरी समर्थ व संपन्न आहेत आणि उत्तम शेतकरी हा उत्तम सैनिक होतो या जगभर येणाऱ्या अनुभवानुसार पंजाबी शेतकरी उत्कृष्ट सैनिकही आहे. केरळात शिक्षणाचा प्रसार अफाट झाला असून केरळीय सामान्य मनुष्य अतिशय कर्तबगार आहे. पंजाबी व केरळीय सामान्य लोक साऱ्या भारतभर पसरले असून आपल्या कर्तबगारीच्या बळावर ते प्रतिष्ठेने जगत आहेत. गुजराथी शेतकरी महाराष्ट्रपेक्षा अधिक कष्टाळू आहे; पण एकंदर साऱ्या भारतातील सामान्य जनता, सामाजिक प्रगतीच्या विचाराबाबत महाराष्ट्रीय सामान्य जनतेच्या मागेच आहे. बंगाल, राजस्थान, गुजराथ, उत्तर प्रदेश इ. प्रदेशांतील वरिष्ठ वर्ग धनाढ्य झाले पण त्या त्या प्रदेशातील सामान्य जनता अत्यंत दरिद्री व खुरटलेली राहिली. महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या वरिष्ठ असा वर्ग महाराष्ट्रीय नसून वर म्हटल्याप्रमाणे परप्रांतीयच आहे. पण ज्योतिबा- फुले, न्या. रानडे, छत्रपती शाहूमहाराज, विठ्ठलराव शिंदे, डॉ. आंबेडकर वगैरे प्रभावी पुढाऱ्यांच्या शिकवणीने मध्यमवर्ग व सामान्य जनता यांच्यात विचारक्रांती इतर कोणत्याही प्रांताच्या मानाने बरीच अधिक झाली आहे. तरीही सामाजिक व आर्थिक बाबतीत आपण मागे आहोत हे सत्य आहे व ते आपणासही जाणवू लागले आहे याची कारणे समजून घेऊन यातून बाहेर कसे पडावयाचे याचा विचार आपण केला पाहिजे.

भक्तिमार्गाची मोठी कामगिरी : पण…

सामाजिक बाबतीत आपण मागे आहोत ही गोष्ट चटकन मनाला पटत नाही. महाराष्ट्रीय साधुसंतांनी समतेची शिकवण दिली, भजनी मेळावे भरविले त्यामुळे समाजात चैतन्य निर्माण झाले आणि शिवाजीमहाराजांना स्वराज्यसंघटना करण्यासाठी जागृत जनतेची बैठक मिळाली असा एक विचार काही थोर पंडितांनी मांडला आहे तो खरा आहे. भक्तिमार्गाने जनता दुबळी झाली अशी टीका करण्यात येते ती अगदी चुकीची आहे. भुताखेतांमागे लागलेली, जादूटोण्याला बळी पडलेली, अंगारेधुपारे करणाऱ्या

अनीतिमान गोसाव्यांना भिणारी जनता निर्भयपणे पंढरीच्या विठ्ठलाखेरीज अन्य देवांस धुडकावून देऊ लागली. व्यसनी, कपटी अशा गोसावड्यांना फेकून देऊन सच्चारित्र्य-संपन्न व विद्वान अशा साधुसंतांच्या भोवती जमा झाली ही भक्तिमार्गाची कामगिरी फार मोठी होय. पण यात सूक्ष्मपणे सनातनीपणाचे बीज राहून गेले. ज्ञानेश्वरादी साधु-संतांच्या काळापासून अगदी अलीकडे ख्रिस्ती मिशनऱ्यांचा महाराष्ट्रात प्रवेश होईपर्यंत अस्पृश्यतेचा धिक्कार कोणीही केला नाही, इतकेच नव्हे तर भूतदया हे ज्या हिंदुधर्माचे ठळक लक्षण म्हणून सांगितले जाते त्या हिंदुधर्मात कोणीही सतीच्या चालीचा निषेध केला नाही हे आश्चर्य आहे. इंग्रजांचे राज्य झाले नसते तर सतीची चाल अजिबात नष्ट झाली नसती आणि आगगाडीत अस्पृश्यांचे डबे अजूनही वेगळे राहिले असते. सुधारणावादाची जाणीव नसणे हा साऱ्या हिंदुधर्माचाच अंगभूत दोष आहे. मुसलमानी धर्म या मानाने हिंदुधर्माहूनही वाईट. मुसलमानांनी ज्या कोट्यवधी हिंदूंना मुसलमान केले त्यांची सामाजिक प्रगती त्यांनी अजिबातच खुंटविली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ज्या हिंदूंना व इतरांना ख्रिस्ती करून घेतले त्यांना मात्र ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुधारलेली संस्कृती व नवे शिक्षण देऊन माणुसकीच्या उच्च दर्जाला नेले.

महाराष्ट्रातले पहिले कर्ते सुधारक ज्योतिबा फुले हेच होत, याचे कारण त्यांना ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून स्फूर्ती मिळाली होती हे होय. स्वतः अस्पृश्यता निवारण्यात भाग घेणे, स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणे, वाट चुकलेल्या स्त्रियांसाठी वसतिगृह काढून त्यांचा सांभाळ करणे आणि या कार्यासाठी दारिद्र्य व सामाजिक छळ सोसणे हे कार्य फुले यांनी जे केले त्याची स्फूर्ती त्यांना साधुसंतांपासून अथवा कोणत्याही हिंदुधर्मीय पुढाऱ्यांपासून मिळालेली नव्हती. ती ख्रिस्ती मिशनऱ्यांपासून मिळालेली होती. महा-राष्ट्रात पुढे सत्यशोधक समाजाने जो सुधारणावादाचा प्रचार केला तो ज्योतिबा व शाहूमहाराज यांच्या प्रेरणेचा होता. महाराष्ट्रातील साधुसंतांच्या अथवा हिंदू पुढाऱ्यांच्या शिकवणीचा भाग त्यात मुळीच नव्हता. लोकहितवादींपासून आगरकरांपर्यंत जे मध्यम वर्गीय सुधारक झाले यांना १९ व्या शतकातील ब्रिटिश भौतिकवाद्यांकडून स्फूर्ती मिळाली होती. त्यांना हिंदुधर्माकडून कोणतेही मार्गदर्शन मिळाले नाही. टिळक हे प्रतिगामी होते, सुधारणावादास विरोध करणारे होते असे दिसले, पण खरी गोष्ट अशी आहे की ते सनातनी होते. सनातन हिंदुधर्मापलीकडे त्यांना काही दिसत नव्हते. त्यांना ब्राह्मणवर्चस्व स्थापावयाचे होते असा जो आरोप केला जातो तो खरा नाही. सुधारणावाद हिंदुधर्मात नसल्यामुळे त्यांनी सुधारणावादाची उपेक्षा केली आणि ते गतानुगतिक प्रवृत्तीत राहिले.

महाराष्ट्रात आज सामाजिक सुधारणा पुरेशी झालेली नाही हे खरे आहे. याचे कारण सामाजिक सुधारणेची प्राचीन परंपरा येथे नसून ज्योतिबांपासून आजपर्यंत जो काही विचार मांडला गेला तेवढेच विचारधन महाराष्ट्रात आहे. अर्थात इतर प्रांतांत सामान्य जनतेत समाजसुधारणेचे कार्य येथल्याइतकेही झालेले नाही. या दृष्टीने

आपण फारसे मागे नाही असेही मानता येईल. पण तीव्र जातिभेद, जातीय उच्च-नीचतेची जाणीव, जातीय परिस्थितिजन्य दारिद्र्य व मागासलेपण हे दोष समाजाच्या वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत पसरलेले आहेत. गुजराथी, मारवाडी जे समाज आर्थिकदृष्ट्या वर्चस्वशाली आहेत, ते तर धार्मिक व सामाजिक बाबतींत विचारशून्य व मागासलेलेच आहेत. हा मागासलेपणा दूर कसा करावयाचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

आर्थिक प्रगतीस व सहकारास अग्रहक्क आवश्यक :

यासंबंधाने एक विचार ऐकू येतो, तो असा की, सामाजिक मागासलेपण व आर्थिक मागासलेपण यांपैकी प्रथम सामाजिक मागासलेपण दूर करून सामाजिक समता स्थापन करावी. त्यासाठी जातिभेद नष्ट करावेत आणि मग आर्थिक उत्कर्षासाठी प्रयत्न करावा. पण माझ्या दृष्टीने हा विचार अगदी चुकीचा आणि सामाजिक व आर्थिक अशा दोनही बाबतींत आपला कोंडमारा करणारा आहे. आज सामाजिक प्रगती जी अडली आहे ती विचाराच्या अभावाने नव्हे, अथवा प्रगतीची इच्छा नाही म्हणून नव्हे. अस्पृश्य हा एका काळी परमेश्वराने आपणाला अस्पृश्यता दिली ती आपण भोगली पाहिजे असे मानणारा होता. आज अस्पृश्याला अस्पृश्यता नकोशी झाली आहे. आपण ब्राह्मणापेक्षा हीन आहोत असे मराठ्यांना वाटत होते. मराठ्यांच्या ठिकाणची ही भावना आज नष्ट झालेली आहे. मुंबईतल्या गटारातला गाळ काढण्याची नोकरी करणारा महार हा जोपर्यंत ती नोकरी करतो आहे तोपर्यंत त्याची अस्पृश्यता जात नाही. त्याला शिंप्याचा अथवा सुताराचा धंदा जर चांगल्या प्रकारे शिकवला आणि त्याजोगे काम त्याला मिळवून दिले तर त्याची अस्पृश्यता तावडतोब नव्हे पण थोड्याच काळात नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. मराठ्यांची मुले शेतीतज्ज्ञ होऊन सुधारलेली शेती करू लागली, भौतिक शास्त्रांचा अभ्यास करून निष्णात झाली म्हणजे ब्राह्मणापेक्षा आपण कमी आहोत ही त्यांची भावना संपूर्ण लयास जाईल. म्हणून एकंदर समाजात आधुनिक बौद्धिक शिक्षण व आधुनिक कारागिरी यांचा प्रसार करून आर्थिकदृष्ट्या व बौद्धिक दृष्ट्या एकंदर समाजाला अधिकाधिक उच्च दर्जाप्रत आपण नेले पाहिजे. म्हणजे सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष घडवून आणण्याची शक्यता वाढून वरच्या पातळीवर समता स्थापन होईल. त्यामुळे जातिभेद, अस्पृश्यता वगैरे दोष भराभर लोप पावू लागतील.

म्हणून आज आर्थिक प्रगतीच्या प्रयत्नास अग्रहक्क दिला पाहिजे. यातही मनोवृत्तीत बदल होणे याची गरज फार मोठी आहे. मुंबईस गोद्यांतून येणारा माल उतरणारे शेकडो हजारो मराठे फ्रियर रोडवर गर्दी करून बसलेले असतात. यांतील बहुतेक लोक जिराईत शेतकरी अथवा शेतमजूर असून त्यांच्या जमिनी माळरान व नापीक असल्यामुळे त्यांना चांगलीशी शेतीही करता येत नाही. ते निव्वळ हमाल आहेत. शारीरिक कष्टाने पोट भरणे यात सन्मान मानला पाहिजे अशी शिकवण दिली

जाते ती योग्यच आहे. पण भीक मागण्यापेक्षा हमाली करणे चांगले इतक्याच अर्थाने हे खरे आहे. पण निव्वळ हमालीपेक्षा कारागिरी करण्यात बौद्धिक व शारीरिक उन्नती अधिक असून पैसा चांगला मिळतो आणि सांस्कृतिक उत्कर्षही करून घेता येतो. पंजाबातून, उत्तर प्रदेशातून, केरळातून हजारो लोकांनी मुंबईत येऊन उच्च कारागिरी हस्तगत करावी आणि महाराष्ट्रातल्या मराठ्यांनी महाराष्ट्राच्या मुंबईत येऊन हमालीचे काम मिळते का या उत्कंठेने तापलेल्या उन्हात दिवसभर क्रियर रोडवर ताटकळत राहावे हे आम्हा महाराष्ट्रीयांच्या निर्बुद्धपणाचे लक्षण नव्हे काय? खरोखर या जनतेतून निवडून येऊन मंत्रिपदे भूषविणाऱ्यांनी आणि त्यांच्या संस्थांनी हे आपणांस परिस्थितीचे आव्हान आहे असे मानले पाहिजे. सुतारी, लोहारी, बांधकाम, मशीनदुरुस्ती अथवा मशिनचे भाग करण्याची कामे, विजेचे साहित्य तयार करणे, जुळविणे, विजेची उपकरणे बनविणे, गिरण्यांस लागणारी शेकडो साधने तयार करणे ही सर्व कामे परप्रांतीयांनी कारागिरी अंगी बाणवून हस्तगत केली आहेत. मुंबईस येणाऱ्या हजारो मराठ्यांना ही विविध कारागिरी शिकवून ही कामे मिळवून देणे हे मराठा पुढाऱ्यांना अशक्य आहे काय? निव्वळ बहुसंख्य जात म्हणून निवडणुकीत थोड्याशा पुढाऱ्यांना मोठेपण मिळेल पण कारागिरीचे कर्तृत्व असंख्य लोकांच्या अंगी आल्यावाचून सगळाच्या सगळा मराठा समाज उत्कर्षाप्रत जाणार नाही. मी येथे जातीय परिभाषेत बोलतो आहे हे मी जाणतो. मला त्याची फिकीर वाटत नाही. माधवराव बागल एका ठिकाणी म्हणतात, "मराठ्यांनी नुसत्या मराठ्यांचे कल्याण केले तरी तो समाज एवढा मोठा आहे की त्यामुळे एकूण सर्व समाजाचे आपोआप कल्याण होईल." मराठ्यांनी हमाली सोडून कारागिरी हस्तगत करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणे हे एकंदर महाराष्ट्राच्या उत्कर्षाला फार मोठे साधन ठरेल असे मला वाटते.

महाराष्ट्राच्या दारिद्र्याचे इतिहासातले मूळ कारण व्यापार व कारागिरी यांकडे आपले दुर्लक्ष झाले हे आहे. शिवाजीच्या काळापासून आपण फक्त सैनिक व कारकून झालो. शेतीला पाणी नसल्याने आपण मुलूखगिरी करून चौथाई व सरदेशमुखी मिळविणे हा चरितार्थ संपादनाचा मार्ग ठरविला. व्यापारी आपणास लुटत होता आणि चौथाई व सरदेशमुखीसाठी मुलुखगिरी करून आपण परप्रांतास लुटत होतो. खुद्द महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रातही मराठ्यांच्या सर्व अमलात कायदा व शांतता बेताचीच असून मराठी साम्राज्याच्या शेवटच्या काळात मराठी अमलातली अंदाधुंदी आणि शेजारच्या इंग्रजी अमलातली सुव्यवस्था हा फरक लोकांच्या मनाला जाणवू लागला व इंग्रजी अंमल स्थिरावण्याला त्यानेच मदत केली. मुलुखगिरीचा काळ संपल्यानंतर आपण शेतकरी, कारकून, वकील असे काहीतरी झालो. व्यापार व कारागिरी हस्तगत करण्याकडे आपण कधीच लक्ष दिले नाही. मराठा जहागिरदार व संस्थानिक हे जनतेबद्दल बेफिकीर होऊन व्यसनात लोळत राहिले. ब्राह्मण वकिलांनी व सावकारांनी शेतकऱ्यांवर जप्त्या आणून शेतकऱ्यांना नागविले. गुजराथी दुकानदारांनी व सावकारांनी शेतकऱ्याचा

माल कर्जापोटी कमीत कमी किंमतीला घेऊन जास्तीत जास्त किंमतीला विकला आणि शेतकऱ्याची व समाजाची दोन्ही बाजूंनी लूट करून आपले वैभव वाढविले. २०।२५ वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रातील लहानमोठ्या गावांचे रूप असे दिसे की, नवी मोठी घरे गुजराथी व मारवाडी व्यापाऱ्यांची असून मराठा जहागिरदारांचे वाडे मोडकळीस आलेले, ब्राह्मण वकिलांची परिस्थिती मध्यम प्रकारची आणि प्रचंड बहुसंख्य जनता पडक्या घरात दारिद्र्यात राहणारी. गेल्या २० वर्षांत सरकारच्या नियोजित विकासामुळे हे स्वरूप किंचित बदलले आहे. पण अजून खेड्यापाड्यापर्यंत पुष्कळशी बरकतीची कारागिरी परक्यांच्याच हाती आहे. गेल्या २० वर्षांत वाढलेले अनेक धंदे परक्यांच्याच हाती आहेत. जिराईत शेतकरी व शेतमजूर यातून नवे कारागीर निर्माण करावे हे निवडणुकांमागे लागलेल्या पुढाऱ्यांच्या लक्षात येत नाही !

इंग्रजांच्या सर्व १०० वर्षांच्या अमदानीत शेतीजन्य मालाचा सर्व व्यापार गुजराथी व मारवाडी सावकरांच्या हाती जाऊन जास्तीत जास्त नफा त्यांच्या हाती साचला आणि महाराष्ट्रीयांचे हाती भांडवलसंचय मुळी झालाच नाही. या व्यापाऱ्यांना आपण लुटारू म्हणतो; पण एका काळी चौथाई व सरदेशमुखी वसूल करून आपण सशस्त्र लूट करीत होतो तशी ही व्यापारी लूट नसून व्यापारी हा समाजसंघटनेचा भाग आहे. तो उत्पादन संघटनेला आवश्यक असतो, हे समाजशास्त्र आपण समजून घेतले पाहिजे. व्यापाऱ्याच्या लुटीस आपण बळी पडलो हा आपल्या निर्बुद्धतेचा परिणाम आहे. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात किर्लोस्कर-ओगले असे काही थोडे लोक सोडले तर महाराष्ट्राच्या अंगी उद्योगधंद्याचे कर्तृत्व जवळजवळ शून्य आहे. मुंबईच्या बाजारात महाराष्ट्राच्या शेतीतून येणारी फळे व भाजीपाला यावर व्यापारी कोट्यवधी रुपये मिळवितात आणि महाराष्ट्रातला शेतकरी सरळ लुटला जातो. गेल्या २० वर्षांत नियोजनाने-शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली, पण शेतकऱ्यांना एक रुपया मिळण्याकरता त्याने १० रु. व्यापाऱ्याच्या पदरात टाकले.

आजच्या परिस्थितीत व्यापार हस्तगत करून व्यक्तिशः कोणी महाराष्ट्रीय आपले वैभव वाढवील तरी त्याने एकूण महाराष्ट्राचे वैभव वाढणार नाही. महाराष्ट्रीयांच्या आर्थिक उत्कर्षाच्या मार्ग आज तरुणांना कारागिरीचे शिक्षण व कारागिरीचा व्यवसाय देणे आणि जीवनावश्यक वस्तूंचा व्यापार सहकारात आणून व्यापारात साचणाऱ्या नफ्याने वैयक्तिक व सहकारी धंदे काढणे हा आहे. सहकारी साखर कारखान्यांनी महाराष्ट्रात मोठी आशा निर्माण केली आहे. पण राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी त्या सहकाराचा उपयोग होत असून सहकारात व राजकारणात निवडणुकांचे वेड हे शरीरात भिनणाऱ्या विषासारखे पसरत चालले आहे. आपल्या प्रतिष्ठेच्या कल्पनाही अजून आर्थिक आहेत, त्यापेक्षा राजकीय अधिक आहेत. स्वतःच्या पराक्रमावर खाजगी अथवा सहकारी कारखाना यशस्वी रीतीने चालविणाऱ्या माणसापेक्षा राजकारणात गटबाजीने, कारस्थानाने व खुशामतीने उच्च पदावर चढणाऱ्यांना आपण अधिक मान देतो. ही वृत्ती बदलून अहोरात्र समाजाच्या आर्थिक उत्कर्षाचा ध्यास घेतला पाहिजे.

असा ध्यास घेतला असता कशा विधायक व भव्य कल्पना सुचत जातात याचे एक उदाहरण सांगतो. एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालकाकडे एक कामगार आला. " तीन-चार मैल लांबून कामावर यावे लागते. एका सायकलीपुरते कर्ज द्याल तर लवकर जाता येता येईल, थकवा कमी येईल आणि काम अधिक चांगले करीन. घरच्या माणसांत अधिक काळ राहीन " इ. बोलला. संचालक दोन मिनिटे त्या कामगाराकडे नुसता पाहात बसला. तेव्हा " जमत नसेल तर राहू दे साहेब " असे कामगार म्हणाला. पण संचालक म्हणतो, " जमत नाही नव्हे, तुझ्याप्रमाणे सगळ्याच कामगारांना सायकलकर्जे द्यावी काय, याचा विचार मी करतो आहे. " खरोखर त्या संचालकाने बहुतेक कामगारांना सायकलकर्जे दिली. त्यांनी सायकली घेतल्या, त्यामुळे कामगार कामावर वेळेवर येऊ लागले, कारखान्याचे उत्पादन वाढले, आणि कामगारांचा संतोष कारखान्याला मिळाला. सदर संचालकाने ही हकीकत स्वतःच मला सांगितली व तो पुढे म्हणाला, " महाराष्ट्रात सायकलींचा खप किती आहे हे पाहून सहकारी साखर कारखान्यांच्या नफ्यातूनच आपल्याला सहकारी सायकल कारखानाही काढता येईल. " या एका कल्पनेत सहकाराच्या मार्गाने महाराष्ट्राचा प्रचंड उत्कर्ष कसा करावा याचे बीज आहे. हा संचालक अतिशय बुद्धिमान, कल्पक, व्यापक दृष्टीचा, कोटी रुपयांची योजना हाताच्या बोटांच्या हिशेबाने मांडणारा आणि अशा योजना उभारण्याच्या वकुबाचा असून अत्यंत सुस्वभावी आणि गरिबांच्या दुःखाने विव्हल होणारा आहे, पण तो आज बेळगाव, कारवार, इ. राजकारणाच्या जंजाळात इतका सापडला आहे की, तो पुन्हा सहकारी अर्थकारणाकडे वळेल अशी आशा नाही.

महाराष्ट्राचा सुप्तरोग राजकीय सत्ताबाजीचा लोभ हा असून एका काळी त्याचे जे स्वरूप मुलुखगिरीचे होते तेच आता निवडणुकीचे आहे. काही लोकांनी निवडणुकीच्या राजकारणात जरूर पडावे, पण तरुणांना कारागिरीचे शिक्षण व व्यवसाय देणे, खरेदीविक्री व्यवहार जास्तीत जास्त प्रमाणात सहकारात आणणे आणि सहकारी व्यापारातून उत्पन्न होणाऱ्या नफ्याने सहकारी धंदे उभारणे हा विविध मार्ग महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी अनुसरला पाहिजे. मी अगदी नजीकची यशाची कसोटी सांगतो. मुंबईत व महाराष्ट्रातल्या शहरांत विक्रीसाठी येणारा शेतीजन्य माल शेतकरी जेव्हा सहकाराने विकतील, शेतीसाठी व संसारासाठी लागणारे साहित्य ते जेव्हा सहकाराने खरीदतील आणि शहरी मध्यमवर्ग सहकारी ग्राहक संघटना उभारून प्राथमिक उत्पादकांकडून निदान जीवनावश्यक माल सहकाराने खरेदी करतील तेव्हा महाराष्ट्राच्या उत्कर्षमंदिराची कोनशिला रचली गेली असे मी मानीन. कारण त्या सहकारातून निर्माण होणाऱ्या भांडवलसंचयाने आपले आर्थिक उत्कर्ष-मंदिर उभारले जाईल व त्याच प्रयत्नात सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष घडत जाईल.

सर्वंकष नेतृत्व व जातिभेदनिर्मूलन : एक ज्वलंत प्रश्न

प्रा. श्री. के. क्षीरसागर

सुमारे दहा-बारा वर्षीपूर्वी मी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादावर माझे विचार व्यक्त केले होते. आजही या प्रश्नासंबंधी माझी मते तीच असल्याने संदर्भाकरता मी त्यांचा पुनरुच्चार करू शकतो.

सोवळेपणाच्या पोटी जन्मलेला तुसडेपणा, हा ब्राह्मणवर्गाचा पुरातन दोष होय. विद्याव्यासंगाची अंधुक, क्षीण, पण आनुवंशिक परंपरा व भोळ्या समजुतींनीच रक्षिला गेलेला शुचिर्भूतपणा, हे त्याचे जातिगत गुण होत; तर त्या गुणांच्याच पोटी जन्मलेला निराधार अहंकार आणि तुसडेपणा हे पुरातन दोष होत. लोकहितवादी म्हणतात : "अरेरे! फुकट हे ब्राह्मण लोक गर्वाने जळतात!"

आज सोवळेपणा लुप्त झाला आहे (त्याचं श्रेय आगरकरांना नसून आगगाड्या आणि इराण्यांची हॉटेलं यांना आहे!), पण अहंकार लुप्त झालेला नाही. संस्कृत विद्येचा अन् ब्राह्मणी आचाराचा नव्हता, एवढा अहंकार आम्हांला इंग्रजी विद्येचा अन् इंग्रजीच्या आचारांचा चढला आहे. पूर्वी रूपावली, समासचक्र आणि पंचांग, एवढ्यांच्या तोंडओळखीच्या जोरावर आम्ही इतर जातींना कमी लेखीत होतो. आज शंभर व्याकरणदोष करून एक तावभर अर्ज किंवा ड्राफ्ट इंग्रजीत लिहिता आला; अन् चेकोस्लोव्हाकियाची राजधानी बुडापेस्ट् नसून प्राग आहे एवढं माहीत असलं, की आम्ही स्वतःला वर्णश्रेष्ठ समजतो. अर्थात आजचा श्रेष्ठ वर्ण म्हणजे इंग्रजी शिक्षितांचा वर्ग होय. आजचा सोवळ्यातला पोषाख म्हणजे पँट अन् बुशकोट होय. आजचं पळी-पंचपात्र म्हणजे लेदरचा किंवा प्लॅस्टिक्‌चा पोर्टमँटो होय. आजचा दर्भ म्हणजे पार्करचं फाउंटनपेन होय!

पण आजच्या या नव्या 'आंग्ल ब्राह्मणां'च्या बुडाखालचं स्टूलच काढून घेतलेलं आहे, हे त्यांचे नोकरीपेशातले प्रतिस्पर्धी—अर्थात स्वतःला 'ब्राह्मणेतर'

म्हणवणारे!—ओळखत नाहीत किंवा सोयिस्करपणे विसरतात. आजच्या या नव्या ब्राह्मणाला जन्मतःच वारशाचा आधार नाही. आजच्या या पँट-बुशकोटवाल्या इंग्रजी ब्राह्मणांत सर्वच जातींचे लोक आहेत. कारण त्या पँट-बुशकोटात प्रवेश करून घ्यायचा म्हटला, तर जन्मजात जातीची अट नाही. उलट, जातीमुळे जी विद्या अन् जे सोवळं प्राप्त होई, त्याला आज कवडीचीही किंमत नाही. "येथे रुद्र, पवमान, श्राद्धविधी, विवाहविधी इ. याज्ञिक शिकविले जाईल" अशी पाटी जर पुण्याच्या टिळक रोडवरील किंवा दादरच्या व्हिन्सेंट रोडवरील एखाद्या खोलीला लावून एखादा वैदिक ब्राह्मण तिथे दर्भासनावर बसून राहिला, तर त्याला भाड्यापुरतेही पैसे मिळणार नाहीत. पण त्याच खोलीत दोन खुर्च्या, दोन आरसे लावून तोच ब्राह्मण जर गिऱ्हाइकांच्या दाढ्या करू लागेल, तर त्याला महिना पाचशे रुपये प्राप्ती होईल. अशाही परिस्थितीत ब्राह्मणांच्या नावानं खडे फोडून फड जिंकणाऱ्या 'ब्राह्मणेतर' पुढाऱ्यांच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच!

पण ज्या वेळी साक्षर आणि सोवळ्या अशा आमच्या ब्राह्मण जातीच्या बुडाखाली जन्मजात वर्णश्रेष्ठतेचा चौरंग होता, त्या वेळी तरी ते समाजाचे पुढारी होते का? ज्याला इतिहास माहीत आहे, त्याला नकारार्थीच उत्तर द्यावे लागेल. मुलीच्या लग्नाचा मुहूर्त माघमासी धरावा की फाल्गुनमासी, मातुल घराण्यातल्या एखाद्या आप्ताचा अशौच (सुतक) तीन दिवस धरावे की दहा दिवस धरावे, चुलतीच्या बाळंतपणाच्या सोहेरात पुतण्याच्या मुंजीचा मुहूर्त धरावा की नाही, यांसारख्या 'जन्ममरणाच्या प्रश्नांवर निर्णय देणारे पुढारी' असं फार तर त्या काळच्या ब्राह्मणांना म्हणता आलं असतं. पण गावाचं, परगण्याचं वा राज्याचं पुढारीपण त्या काळी वतनदार आणि तलवार-बहाद्दर लोकांकडेच असे. राज्यं कमावली तीही यांनीच; गमावली तीही यांनीच! 'जाती' कदाचित स्वार्थी आणि 'सुपरस्टिशस्' ब्राह्मणांनी निर्माण केल्या असतील; (त्याही श्रीकृष्णानं वा मनूनं केल्या, अन् ते दोघेही ब्राह्मण नव्हते!) पण वतनं राजेलोकांनी दिली, सैन्यं राजेलोकांनी उभारली अन् हे राजे एकजात क्षत्रिय तरी होते, किंवा मुसलमान तरी होते. सारांश, इतिहासाची ओळख असणाराला हे मान्य करायला हवं, की या देशात इंग्रजांचं राज्य होण्यापूर्वीचे आमचे पुढारी पंचांगबहाद्दर वा पदवी-बहाद्दर नसून तलवारबहाद्दर होते. विद्यापरंपरा असलेली ब्राह्मणांची जात त्यांच्या अनुयायांत तरी मोडे, नाहीतर त्यांच्या नोकरवर्गात, आश्रितवर्गात तरी मोडे.

हे जुन्या काळचे तलवारबहाद्दर पुढारी, ब्राह्मणेतर असले तरी स्वतःला 'ब्राह्मणेतर' म्हणवून घेण्याची त्यांना गरज भासत नसे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या दोन बंदिस्त वर्गांत जगाची विभागणी करण्याची अचाट अल्पना इंग्रजी राजवटी-नंतरच्या सुशिक्षित मराठ्यांच्या डोक्यात आली! लोकमान्य टिळकांनी १९१९ च्या सुमारास दिलेल्या एका व्याख्यानात या 'अकरणात्मक' विभागणीचा—या 'Dichotomy' चा न्यायशास्त्रदृष्ट्या उपहास केल्याचं मला स्मरतं. जणू ब्राह्मणांखेरीज

इतर सर्व जाती एका वर्गात निमूटपणे बसण्याइतक्या सदृश आणि सलोख्याच्या आहेत! शिवाय एका पारड्यात ब्राह्मण, अन् दुसऱ्यात पंचकुळीतील मराठ्यांपासून ते महार-मांगांपर्यंत सर्व 'बलजीवी' जाती, तशाच कायस्थादी बुद्धिजीवी जाती, व सुवर्णकार, कासार, नामदेव शिंपी, वैश्य इत्यादी व्यापारनिपुण जाती बसवणं, म्हणजे ब्राह्मणांना फाजील महत्त्व देणं होय. ब्रिटिश अमलात देखील पुढारीपण आरंभापासून ब्राह्मणांकडे होतं असं दिसत नाही. महाराष्ट्राचे पहिले सर्वमान्य पुढारी एल्फिन्स्टन-सारख्या मातबर इंग्रज मुत्सद्द्याच्या मांडीला मांडी लावून बसणारे मुत्सद्दी, दैवज्ञ अथवा सुवर्णकार जातीतले विख्यात नाना शंकरशेट होते. पण पुढे जेव्हा पुढारीपण याचा अर्थ वर्तमानपत्रातून सरकारवर टीका करणं, किंवा सभेत निषेधाचे ठराव करणं एवढाच होऊ लागला, तेव्हा मात्र पुढारीपण ब्राह्मणांकडे गेल्यासारखा भास झाला. पण फिरून लगेच जनतेच्या व्यापक चळवळीचा काळ येताच गांधीजींसारखा पुढारी पुढे आला व महा-राष्ट्रीय ब्राह्मण मागे पडले. बंगाल हाही महाराष्ट्रासारखाच सुशिक्षित मध्यमवर्गाच्या नेतृत्वाचा प्रांत आहे, पण त्या प्रांतातल्याही राजकीय नेत्यांची आणि जगप्रसिद्ध पुरुषांची सूची तयार केली, तर ब्राह्मणांपेक्षा तेथील कायस्थ पुढे आहेत असं दिसून येईल. जगदीशचंद्र बोस, अरविंद घोष,—इतकंच नव्हे, तर स्वामी विवेकानंदांसारखा लोकोत्तर पुरुष हे सर्व कायस्थ होत. अशा स्थितीत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी भारतीय समाजाची अजब विभागणी करण्याचं धाडस महाराष्ट्रातल्या ब्राह्मणेतरमंडळींनी करावं, ही एक अद्‌भुत गोष्ट होय.

जुन्या ब्राह्मणवर्गात अनेक स्वभावगत दोष होते. आजच्या 'इंग्रजी' ब्राह्मणांच्या मनोरचनेतही अनेक स्वभावदोष आहेत. पण स्वतःला ब्राह्मणेतरांचे पुढारी म्हणवणारांनी ते दोष ओळखले आहेत, असं दिसत नाही. उलट, अनेक ब्राह्मण विचारवंतांनीच ते दोष प्रथम ओळखले असं दिसून येईल. ब्राह्मणांचे सर्वांत पहिले व सर्वांत कठोर टीकाकार महात्मा ज्योतिबा फुले हे होत, अशी स्वतःला 'ब्राह्मणेतरां'चे पुढारी म्हणवणाऱ्या अनेकांची कल्पना दिसते. पण ही कल्पना अज्ञानमूलक आहे. ज्योतिबा फुल्यांहूनही कठोरपणे ब्राह्मणनिंदा करणारे पुढारी स्वतः ब्राह्मण होते. कोकणस्थ ब्राह्मण होते. पुण्यात स्वतःचे वाडे असलेले घरंदाज कोकणस्थ ब्राह्मण होते! ते म्हणजे प्रख्यात 'लोकहितवादी' ऊर्फ सरदार गोपाळराव हरी देशमुख होत. त्यांचा जन्म सन १८२३ साली झाला, म्हणजे ते विष्णुशास्त्रींच्या वडिलांहून एक वर्षानं मोठे तर ज्योतिबा फुल्यांहून चार वर्षांनी मोठे होते. कधी कधी अशी जाहीर तक्रार ऐकू येते की, रानडे, आगरकर, कर्वे यांसारख्या ब्राह्मण सुधारकांचीच नामावळी सुशिक्षित महाराष्ट्र सदैव जपतो; उलट, महात्मा फुले, महर्षी शाहू छत्रपती यांची नावं मात्र विसरतो. अर्थात या विस्मृतीच्या बुडाशी जातिप्रेम आणि जातीयता याच वृत्ती लपलेल्या आहेत असा हा आरोप वा वहीम आहे. स्मरणशक्तीबद्दल वा कृतज्ञतेबद्दल सामान्य जनतेची मुळातच ख्याती नाही, हे मी सांगायला हवं असं नाही. पण स्मरण-

शक्तीच्या या दुबळेपणात ' जातीयता ' पाहण्यापूर्वी, आमच्या अन्य जातीय विद्वानांनी थोडं आत्मपरीक्षण करणं बरं. ज्यांना आज फुल्यांचं स्मरण होत आहे, त्यांना लोकहितवादींचं कधी तरी स्मरण होतं का ? या आद्य सुधारकानं, त्या आद्यनिबंधकारानं, केवळ देशहितावर नजर ठेवून स्वजातीवर कोरडे ओढले अन् बिचारा नाहक जातिद्रोही ठरला ! कारण विष्णुशास्त्रींनी ज्योतिबांच्या निंदेनं निबंधमालेचा एक अंक रंगवला असला, तर लोकहितवादींवर केलेल्या भडिमारानं बारा अंक भरून काढले आहेत ! " लोकहितवादी = देशद्रोह ", " लोकहितवादी = ब्राह्मणद्वेष " अशी समीकरणं, आमच्या सुशिक्षितांनी आपल्या मेंदूवर कोरून ठेवण्याला कारण विष्णुशास्त्रींचं भडक एककल्ली लिखाणच होय ! इकडे ब्राह्मण सुशिक्षित लोक लोकहितवादींना देशद्रोही मानणार, तर तिकडे अब्राह्मण सुशिक्षित फक्त फुल्यांचा जप करणार. अशा स्थितीत गीतातत्त्व, शाक्तपंथ यांसारख्या विषयापासून ते लंकेच्या इतिहासापर्यंत अनंत विषयांवर सर्वांच्या आधी ग्रंथ लिहिणारा, पुण्यापासून अहमदाबादपर्यंत पश्चिम भारतात सव्वाशे वर्षांपूर्वी अनेक सुधारणांचा व संस्थांचा पाया घालणारा, हा आद्य सुधारक ' धोबीका कुत्ता, न घरका न घाटका ' असा बेवारशी ठरावा, ही गोष्ट कशाची द्योतक ? कोणी म्हणतील जातीयतेची; पण आम्ही मात्र म्हणतो, जनतेच्या, सुशिक्षित जनतेच्या भोंगळ स्मरणशक्तीची द्योतक !

पण लोकहितवादी हे ब्राह्मणांचे एकुलते एक ब्राह्मण टीकाकार नव्हेत. इथे मला, जातिभेदाची उथळ मीमांसा करून, ब्राह्मणेतरांच्या शैक्षणिक मागासलेपणाचं पाप ब्राह्मणांच्या पदरात घालणाऱ्या ' उदारमतवादी ' सुधारकांचा उल्लेख करायचा नाही. कारण त्यातले बहुतेक स्वतंत्र विचारी नसून इंग्रजांचे अनुचर वा ' आंग्लशूद्र ' होते. लोकहितवादी व महात्मा फुले यांच्याखेरीज ब्राह्मणवर्गाचे आधुनिक काळातले निष्ठुर टीकाकार म्हणजे प्रि. गोळे हे होत. हे गृहस्थ सुधारकांचेही कठोर टीकाकार होते अन् ब्राह्मणांचेही कठोर टीकाकार होते, ही त्याहूनही विशेष गोष्ट होय. यांनी आपल्या ग्रंथात ब्राह्मणजातीचं केलेलं सूक्ष्म मनोविश्लेषण लक्षात घेतलं, तर आमचे ब्राह्मणेतर विद्वान, " ब्राह्मणांनी आम्हाला मागे ठेवलं " असं म्हणून दुर्बल, निर्धन आणि एकमार्गी ब्राह्मण जातीला अकारण महत्त्व देण्याची चूक करणार नाहीत. इंग्रजी अमलात इंग्रजी भाषेच्या ज्ञानाला अन् वर्तमानपत्रं, व्याख्यानं, यांना जे अचानक व अवास्तव महत्त्व प्राप्त झालं, त्यामुळे लेखांच्या वा भाषणांच्या द्वारे बडबडू शकणारा प्रत्येक जण, ' पुढारी ' झाल्याचा भास झाला ! यातले काही पुढारी बुद्धिमान व प्रामाणिक होते हे खरं, पण इतर जातींचं वा स्वजातीचं नफानुकसान करण्याची सत्ता या पुढाऱ्यांच्या हाती नव्हती. हे नफानुकसान त्या काळी इंग्रज अधिकारीच करू शकत. त्याचप्रमाणे देशी राजेरजवाडेही करू शकत. हे दोन्ही वर्ग ब्राह्मण नव्हते, हे उघड आहे.

आजचे ब्राह्मणेतरांचे पुढारी म. फुल्यांचं आदरपूर्वक स्मरण करतात, ते योग्यच आहे. पण याचा अर्थ त्यांना फुल्यांच्या मोठेपणाचं नेमकं इंगित उमगलं आहे,

असा मात्र नाही. चिपळूणकरांना फुल्यांच्या श्रेष्ठत्वाचं जेवढं अज्ञान होतं, तेवढंच अज्ञान आजच्या सर्वसामान्य ब्राह्मणेतर पुढाऱ्यांतही दिसून येतं. चिपळूणकरांनी आपल्या त्या प्रसिद्ध परीक्षणलेखात फुल्यांच्या चुकीच्या सामाजिक सिद्धान्तावर झोड उडविली आहे. फुले यांच्या विचारांचं वा चरित्राचं महत्त्व समाजशास्त्रज्ञ म्हणून खासच नाही. सामाजिक औदार्य, सामाजिक धैर्य आणि जन्मजात माणुसकी हे या महात्म्याचे प्रमुख गुण होते आणि ते एवढे ठळक होते की, एकटे लोकमान्य टिळक सोडले, तर निर्भयपणात ज्योतिबांच्या तोडीचा ठरेल असा दुसरा पुढारी दाखवणं कठीण आहे. अर्थात टिळकांचा निर्भयपणा परकीय सरकारच्या बाबतीत होता; तर ज्योतिबांचा निर्भयपणा परके सरकार आणि जुना समाज या दोहोंच्याही बाबतीत होता. या दृष्टीनं ज्योतिबांचा निर्भयपणा अधिक सर्वांगीण व अधिक कौतुकास्पद होता हे उघड आहे. कितीही नाकबूल केलं, तरी अखेर टिळक 'Conservative' किंवा सामाजिक बाबतींत 'नेमस्त' होते, हे उघड आहे. पण टिळक बौद्धिक क्षेत्रात वाघ होते. अशा या दोन वाघांच्या कार्यक्षेत्रात महदंतर असलं, तरी टिळकांच्या संकटकाळी सरकारी रोष पत्करूनही जामीन भरायला ज्योतिबाच उभे राहिले, ही गोष्ट बोलकी आहे.

अशा या महात्म्याचा जयजयकारयुक्त आठव, अलीकडे अधिक होऊ लागला आहे. पण त्याचीच न्यायनिष्ठुर मतं त्याच्याहीपेक्षा अधिक तर्कशुद्धपणे मांडणाऱ्या लोकहितवादींचा जयजयकार तर ब्राह्मणही करीत नाहीत, की ब्राह्मणेतरही करीत नाहीत. कारण इलेक्शनच्या बाजारात लोकहितवादींच्या नावाचा काडीमात्र उपयोग नाही ना!

तीच गोष्ट कोल्हापूरच्या शाहूमहाराजांच्या नावाची. काही राजकीय व सामाजिक पुढाऱ्यांच्या उद्‌गारांकडे पाहिलं, तर कै. शाहूमहाराज हे एकमेव कर्तबगार व उदारमतवादी मराठा संस्थानिक होऊन गेले असा भास होईल. शाहूमहाराज हे एक लोकविलक्षण संस्थानिक होऊन गेले हे मान्य आहे. पण आजचे ब्राह्मणेतर पुढारी जेव्हा केवळ शाहूमहाराजांचंच नाव आधुनिक महर्षी वा राजर्षी म्हणून घेतात, तेव्हा मला आश्चर्ययुक्त खेद होतो. श्रीमंत सयाजीरावांना आमचे ब्राह्मणेतर पुढारी विसरले, की सहेतुकपणे वगळतात? इथे मला तुलना करायची नाही. अशी तुलना अप्रिय व अन्याय्य होईल, म्हणूनच केवळ नव्हे, तर या दोन मनस्वी व्यक्ती अगदी भिन्न प्रकृतींच्या असल्यामुळेही मला ही तुलना अशक्य आणि अप्रयोजक वाटते. पण श्रीमंत सयाजीराव गायकवाडांचे उपकार, ब्राह्मणेतर समाज, अखिल महाराष्ट्रीय समाज आणि अखिल भारत यांवर कै. शाहूमहाराजांच्या इतपतही नाहीत, असं म्हणण्याचं धाडस कोण करू शकेल?

म्हणजे कर्तबगार ब्राह्मणेतर पुरुषांची नावं ब्राह्मण लोकच विसरतात असं नव्हे, तर आमचे ब्राह्मणेतर बंधूही सुसंगतपणे विसरतात. या पद्धतशीर विस्मृतीमागची 'सायकॉलॉजी' कोणती आहे? पण श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचं महापुरुषत्व आणि त्यांचं आजच्या मराठा पुढाऱ्यांना झालेलं शोचनीय विस्मरण यांची माझ्या

पिढीतल्या कृतज्ञ महाराष्ट्रीय अभ्यासकाला जेवढी जाणीव आहे, तेवढी आजच्या पिढीत फारच थोड्या वाचकांना असणार. म्हणून मी त्या 'कृतघ्न' विस्मृतीबद्दल वर जो खेद केला आहे, त्यावर थोडं भाष्य केलं पाहिजे. अर्वाचीन भारतात परकीय साम्राज्याच्या चौकटीत ज्या देशी राजेरजवाड्यांनी स्वजनांची जास्तीत जास्त चिंता वाहिली, व दूरदर्शीपणानं जास्तीत जास्त प्रगती साधली, त्यांत सयाजीरावमहाराज हे सर्वश्रेष्ठ होत. राज्यकारभारात व सामाजिक संबंधात त्यांनी केलेल्या सुधारणांची त्रोटक जंत्री जरी पाहिली तरी ते समकालीन राजेरजवाड्यांपेक्षाच नव्हे, तर ब्रिटिश राज्यकर्त्यांपेक्षाही किती कर्तृत्ववान व पुढारलेले होते, ते लक्षात येईल. त्यांच्या राज्य-कारभारात व कायदेकानूत केवळ 'efficiency' च दिसते असं नव्हे; त्या कार्य-क्षमतेमागे खरीखुरी आधुनिकता व तात्त्विक बैठक दिसून येते. त्यांचा इंग्रज चरित्रकार स्टॅन्‌ले राईस् म्हणतो :

"But apart from specific instances, the reforming zeal of the Maharaja was best seen in that philosophy of administration, by which he endeavoured to instil his principles of good government, and to stimulate the energy of, the subordinate with whom he had to work...Taken together, they form a manual of government which might be called the modern counterpart of the famous Arthashastra of Kautilya, Chandragupta's minister."§

ही गोष्ट झाली महाराजांच्या शेकडो 'ऑर्डर्स'मध्ये सूचित झालेल्या शासनविषयक सिद्धान्तांची; पण शिवाय त्यांनी स्वदेशात व परदेशात केलेल्या भाषणांचे ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत; त्यांच्या पत्रव्यवहाराचेही खंड प्रसिद्ध झालेले आहेत; त्यातल्या प्रत्येक ओळीत एका श्रेष्ठ भारतीय मुत्सद्याचे बहुमोल विचार आजही वाचायला सापडतील. आधुनिक स्वराज्यातील आमच्या चौदा राज्यांच्या अवाढव्य मंत्रिमंडळांतल्या एकदोन बुद्धिमान मंत्र्यांनी जरी महाराजांचे हे अमर राजनैतिक वाङ्मय वाचलं, तरी आमच्या राज्यकारभारात व राजकीय वक्तृत्वात वेगळाच सूर उमटलेला पाहावयास सापडेल.

छे! पण मी हे वेड्यासारखं काय बोलत आहे? आमच्या राज्यमंत्र्यांचं धावपळीचं अन् झगमगाटाचं जीवन तर सोडाच, पण ज्यांचं जीवन केवळ अभ्यासाला वाहिलेलं असावं असा संकेत आहे, त्या प्रोफेसर मंडळींच्या तरी वाचण्यात महाराजांचं हे बहुमोल, कृतिप्रधान शासकीय वाङ्मय आले आहे का? काही वर्षांमागे मी एका विद्वत्संस्थेच्या ग्रंथालयातून महाराजांचे स्वतःचे व महाराजांसंबंधीचे ग्रंथ आणले होते. ते वाचण्यापूर्वी मला त्यांची पानं फाडून घ्यावी लागली. म. फुले आणि शाहूमहाराज यांचं स्मरण निवडणुकांच्या निमित्तानं करण्याची 'सकाम भक्ती' तरी आज दिसून

§ Stanley Rice : Life of Sayaji Rao III, Vol. II, pp. 32, 33.

येत आहे, पण सयाजीरावांचं स्मरण कृतज्ञतेमुळंही झालेलं दिसत नाही, की राजकीय स्वार्थामुळंही होण्याचा संभव नाही. फुले, शाहूमहाराज आणि सयाजीराव, तिघेही थोर पुढारी होते. तिघांची योग्यता सारखी होती की काय, हा प्रश्न आजच्या देशहिताच्या दृष्टीनं निरुपयोगी म्हणून मी उपस्थित करीत नाही. पण फक्त फुले आणि शाहूमहाराज यांचंच आमच्या आजच्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी स्मरण करावं, अन् सयाजीरावां-सारख्या श्रेष्ठ मराठा सुधारकाला अन् देशभक्ताला विसरावं, यातलं इंगित कोणतं ? ज्या खेडवळ जातीयतेचा उपयोग निवडणुकांच्या होलिकोत्सवात होतो, त्याला लोकहितवादी अन् सयाजीराव यांच्या नावांचा काही उपयोग नाही हे तर या पंक्तिभेदाचं कारण नव्हे !

पण इतरांच्या भूमिकांचं विश्लेषण या लहानशा लेखात अधिक न वाढवता या बाबतीतली माझी भूमिका थोडक्यात पण स्पष्टपणे सांगितली पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकारणात अधूनमधून ब्राह्मणांना नेतृत्व करावं लागलं असलं, तरी (विशिष्ट समाजाचा नामोल्लेख करूनच सांगायचं झालं तर) मराठा समाजाकडेच महाराष्ट्राचं राजकीय नेतृत्व असणं अधिक स्वाभाविक व अधिक हिताचं आहे. या माझ्या मताला समाजशास्त्र, अर्थशास्त्र व मार्क्सवाद यांचा काही आधार मिळतो की नाही याची मी चौकशी केलेली नाही. पण इतिहासाचा आणि मानसशास्त्राचा आधार तरी दाखविता येईल, असं मला वाटतं. मग त्याला कोणी माझं 'मत' म्हणो, 'सिद्धान्त' म्हणो, की 'Idiosyncrasy' (तऱ्हेवाईकपणा) म्हणो !

पण 'ब्राह्मणेतर' पुढारी म्हणजे 'ब्राह्मणेतरांचे पुढारी' ही ब्रिटिश राज-वटीतल्या भेदनीतीची गुलामी कल्पना आज आपण भरून काढली पाहिजे. आज ब्राह्मणेतर हा शब्द टाकून 'बहुजनसमाज' हा शब्द वापरण्याची खबरदारी घेतात, हे मला माहीत आहे. पण पोटात वृत्ती इंग्रजी अमलातलीच असते. ब्राह्मण पुढाऱ्यांच्या हातून ब्राह्मणेतरांचं खरं हित होणार नाही, एवढाच अन्तस्थ दुर्ग्रह (Prejudice) असता तरी मला तितकंसं नवल वाटलं नसतं. पण मला पुष्कळदा आणखी एक मनोरचना दडलेली दिसते. "ब्राह्मणेतर पुढाऱ्यानं फक्त ब्राह्मणेतरांचं नेतृत्व केलं म्हणजे झालं; त्यानं ब्राह्मणांचं नेतृत्व करण्याची आकांक्षा धरण्याचं कारण नाही ", "ब्राह्मण पुढारलेले, ब्राह्मणेतर मागासलेले !" दुहीचं बीज या मनोरचनेतच आहे ! अन् ही दुही अन् ही 'दरी' (हे गल्फ !) इंग्रजी शिक्षणाच्या अन् इंग्रजी कुटिल नीतीच्या काळातच वाढीला लागली. इंग्रजी शब्द घोकून ब्राह्मण लोक कारकुनीच्या अन् 'शुकपांडित्या'च्या वाटेला लागले. पण म्हणजे ते 'पुढारले' ही इतर जातींची कल्पना, इंग्रजी राजवटीतल्या गुलामी वृत्तीचीच द्योतक आहे. संस्कृत घोकंपट्टीनं ब्राह्मण विद्यावान झाले नसून 'टोणपे' व नीतिभ्रष्ट झाले, हे लोकहितवादींनी व ज्योतिबांनी दाखवून दिलं; तर इंग्रजी घोकंपट्टीनं ब्राह्मण लोक एकमार्गी मेंढरं बनले, हे प्रि. गोळे यांनी दाखवून दिलं. 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हे प्रि. गोळ्यांचं प्रक्षोभक पुस्तक ब्राह्मणांच्याही आधी मराठ्यांनी वाचायला हवं. (आज वाचीत नाहीत दोघेही !) कर्म-

वीर भाऊराव पाटलांच्या संस्थेचं साताराचं पहिलं कॉलेज निघण्याच्या सुमारास मला त्यांच्या संस्थेपुढे चार शब्द बोलण्याचा योग आला होता. मी त्यांना म्हणालो, "इंग्रजी शिक्षणानं ब्राह्मण जसे झाले आहेत, असेच तुम्ही 'नवब्राह्मण' ही होणार असाल, तर तुमचं अन् देशाचं दुर्दैव म्हटलं पाहिजे!"

आज मला ब्राह्मणांचीही सुधारणा करण्याचा कार्यक्रम हाती घेणारे ब्राह्मणेतर पुढारी हवे आहेत. जेव्हा सयाजीरावांसारखा एखादा बुद्धिमान आणि तालेवार राजा समाजाचं नेतृत्व करतो, तेव्हा जातीय हेवेदावे अन् न्यूनगंड यांच्यापासून तो मुक्त असतो. "ब्राह्मणांनी आम्हांला मागं ठेवलं" हे रडगाणं गाण्याऐवजी "अरेरे हे ब्राह्मणही किती मागासलेले" असं म्हणून त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. जेव्हा विवेकानंदांसारखा एखादा ब्राह्मणेतर वैराग्यसम्राट समाजाचं नेतृत्व करतो, तेव्हा तो 'मासेस्'करिता (बहुजनसमाजाकरता) ढळाढळा अश्रू गाळतो. पण ब्राह्मणांच्या माथी भारताच्या अखिल अवनतीचं खापर फोडून ब्राह्मणेतरांचं वेगळं नेतृत्व करण्याचं त्याला कारण भासत नाही. तो आपोआपच नुसत्या ब्राह्मणांचा नव्हे, तर वेदान्ती, विरक्त ब्राह्मणांचा देखील नेता बनतो. आज महाराष्ट्राला असे "ब्राह्मणेतर" पुढारी हवे आहेत की, जे केवळ ब्राह्मणेतरांचे पुढारी नव्हेत. सयाजीरावांच्या राजवटी-तही वेदोक्त प्रकरण झालं. सयाजीरावांनाही ब्राह्मणांचे दोष माहीत होते. स्वामी विवेकानंदांनाही ब्राह्मणांच्या दोषांवर, ब्राह्मणांच्या संकुचित सोवळ्यावर, त्यांच्या तोंडावर भडीमार करण्याचे प्रसंग आले. पण ब्राह्मणांना वगळून,—ब्राह्मणांवर दोषाचं खापर फोडून, आपला संप्रदाय स्थापण्याची त्यांना गरज भासली नाही. उलट, श्रेष्ठां-तील श्रेष्ठ ब्राह्मणांनाही त्यांचं पादोदक घेण्यात कमीपणा वाटत नाही.

एके ठिकाणी स्वामीजींनी "भारताच्या इतिहासात ब्राह्मणांनी थोर कामगिरी केलेली आहे व निःस्वार्थी ज्ञानोपासनेचं व्रत ते चालवतील, तर भविष्यकालातही ते थोर कामगिरी बजावतील," अशा अर्थाचे गौरवपर उद्गार काढले आहेत.

१९६३ हे या थोर राज्यकर्त्याच्या जन्माचं शतसांवत्सरिक वर्ष होतं. आमच्या-तल्या पुरोगामी मंडळींना एखाद्या संस्थानिकाचा शतसांवत्सरिक उत्सव करणं म्हणजे मागासलेपणाचंच वाटणार! संप, सत्याग्रह, तुरुंगवास या, त्यांच्या दृष्टीनं, राजकीय मोठेपणाच्या कसोट्या होत. उलट, या उमद्या मराठा राजाच्या चरित्राचा इलेक्शन-मधील सवंग जातिद्वेषाला काडीचाही उपयोग नसल्यानं, आमच्या 'बहुजनसमाजी' नेत्यांनीही त्याच्या शताब्दीकडे दुर्लक्ष केलं!

'ब्राह्मणेतर पुढारी' आणि 'ब्राह्मणेतरांचे पुढारी' यांत मला फरक करावासा वाटतो तो यामुळेच. आज देशाला ब्राह्मणेतर नेते हवे आहेत,—पण 'ब्राह्मणेतरां'चे नेते नको आहेत.

ब्राह्मणांसह सर्व जातींचं नेतृत्व करण्याची ज्यांची आकांक्षा व धमक आहे असे ब्राह्मणेतर पुढारी आज निघतील, तर त्यांना गेल्या पिढीतील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांहूनही

अधिक भक्कम अनुयायित्व मिळेल.

पुण्यश्लोक शिवाजीमहाराजांनी मराठ्यांइतकाच ब्राह्मण-कायस्थांचा उपयोग देशाकरता केला, हे आपण विसरलो काय ?

या सर्वंकष नेतृत्वाबरोबरच जातिभेद-निर्मूलनाच्या प्रश्नाचाही आज नीट विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

इंग्रजी शिक्षणाने झालेल्या उद्बोधनाच्या प्रारंभकाळात जातिभेदनिर्मूलन हा एक प्रमुख प्रश्न आणि कार्यक्रम मानला जाई. हिंदूंतील भिन्न जातीयांची एक पंगत होणं, ही यातली पहिली पायरी; भिन्न जातींमध्ये विवाह होणं ही यातली शेवटची पायरी. या प्रश्नावर जे लोक त्वेषानं बोलत त्यांनी किंवा त्यांच्या मुलाबाळांनी भिन्नजातीयांशी विवाह केलेले मात्र दिसणार नाहीत. याबद्दल कधी कधी त्यांचं उणं काढलं जातं, पण तेही बरोबर नाही. विवाह ही गोष्ट केवळ पैज मारून वा केवळ सामाजिक धाडस म्हणून करण्याची गोष्ट नव्हे. विवाहातले उद्देश, विवाहातल्या जबाबदाऱ्या, विवाहातल्या निष्ठा, भिन्न आहेत. व्यक्तीला आणि कुटुंबाला सुखी करणं, स्वतःच्या भावनांशी, आवडीनिवडींशी प्रामाणिक राहणं, एवढंच विवाहातलं कर्तव्य होय. समाजसुधारणेला हातभार लावणं हे विवाहातलं उद्दिष्ट होऊ शकत नाही. याउलट पंक्तिभेदाची गोष्ट अगदी वेगळी आहे. पंक्तिभेदाचा निर्बंध मोडणं अगदी सोपं आहे. तो आज सार्वजनिक जीवनात व सामुदायिक समारंभांत मोडलाही आहे. पण तोही सुधारकांच्या बुद्धिवादानं किंवा वीरश्रीनं मोडलेला नसून इतर अशा घडामोडींमुळे मोडला आहे की, ज्यांचा सुधारक आणि सुधारणावाद यांशी काडीचाही संबंध नाही. कारखान्यांच्या व आगगाड्यांच्या युगात शहरांना व प्रवासाला जे रूप आलं, ते सुधारकांनी खासच आणलेलं नव्हतं. या नव्या शहरांत आणि नव्या प्रवाससाधनांत खाण्यापिण्याचे जुने निर्बंध टिकणं शक्य नव्हतं. आगगाडीच्या डब्यात सनातनी ब्राह्मणाच्या शेजारी स्पृश्य हिंदू बसला आहे, की अस्पृश्य बसला आहे याची चौकशी अशक्य होती. येथे स्पृश्यास्पृश्य कल्पनेला पहिली तिलांजली मिळाली.

ही सुधारणा जशी सुधारकांनी घडवून आणली नाही, तशीच सनातन्यांनी आडविलीही नाही. या रूढिभंजनाचं श्रेय जितकं सुधारकांना आहे, तितकंच सनातन्यांना आहे. उलट वर्षातून एकदा सहभोजन करण्याच्या प्रयोगानं स्पृश्यास्पृश्य हिंदूंनी, सोवळ्या ब्राह्मणांनी व ओवळ्या अब्राह्मणांनी, वर्षातून एक दिवस स्पर्शनिर्बंध मोडण्याचा क्रम चालविला असता, तर स्पृश्यास्पृश्य कल्पना नष्ट होण्याला किती शतकं लागली असती, ते सांगणं कठीण आहे ! बुद्धीला पटत नाही, म्हणून एखादी रूढी वर्षातून एक दिवस जोरकस व्याख्यान देऊन मोडणं, हा रूढी मोडण्याचा हास्यास्पद मार्ग आहे. रूढीचा जन्म जसा व्याख्यानातून झालेला नसतो, तसाच तिचा अंतही व्याख्यानानं होण्याचा संभव नसतो ! म्हणूनच लोकहितवादींच्या व्यवहारनिष्ठ सुधारणावादाचं महत्त्व आगरकरांच्या पुस्तकी सुधारणावादापेक्षा अधिक आहे. लोकहितवादींचं

रूढिभंजनाच्या बाबतीतलं सूत्र आजही उपयोगी पडण्यासारखं आहे. "पराक्रमाच्या आड येतील त्या रूढी मोडा!" समुद्रगमनासंबंधीचा निर्बंध जरूर झुगारून द्या. प्रायश्चित्तानं समाजाचं समाधान होत असेल, तर प्रायश्चित्तावर हट्टून बसू नका; कारण, 'समुद्र न ओलांडणं' हे पराक्रमाच्या आड येत असलं, तरी 'पंचगव्य' घेऊन ब्राह्मणाला एक दिवस भोजन आणि दक्षिणा देणं हे काही पराक्रमाच्या आड येत नाही. समान शिक्षण, समान नोकऱ्यांचं धोरण एकदा मान्य झाल्यावर सार्वजनिक जागी तरी अस्पृश्यांना अस्पृश्य मानणं अशक्यच आहे. ते कार्य वर्षातून एक दिवस दवंडी पिटवून एका अस्पृश्याला पंगतीला घेण्यानं होणार नाही. सारांश, तर्कवाद आणि वैयक्तिक धिटाई या गोष्टी शेकडो वर्षे चालत आलेल्या रूढी मोडण्याला निरुपयोगी आहेत. रूढी ही संपूर्ण समाजाला व्यापणारी गोष्ट होय. म्हणूनच 'A convention is the most democratic thing' असं सुप्रसिद्ध इंग्रज तत्त्वचिंतक चेस्टरटन् हा म्हणत असे. ती मोडायची असेल, तर संपूर्ण समाजाला व्यापणारं एखादं महत्कार्य आरंभलं पाहिजे. त्या कार्याच्या आवेशात मनुष्य पोकळ अर्थशून्य सोवळेपणा सहज विसरतो, हे इतिहासातल्या अनेक उदाहरणांवरून सिद्ध आहे. जीर्ण अन्याय किंवा दुष्ट रूढी यांच्याशी सरळ मुकाबला करणं, म्हणजे (डॉन क्विक्झोटप्रमाणे) वाऱ्याशी भांडणं होय. उलट अन्य काही पुरुषार्थ समाजापुढे ठेवून, सोवळेपणा, व्रतवैकल्यं, पोकळ जातिश्रेष्ठता यांत गुरफटलेलं समाजाचं मन बाहेर काढणं, हा रूढीशी मुकाबला करण्याचा 'वक्र' किंवा 'Indirect' मार्ग होय.

आपल्या देशात इंग्रजी अमलानंतर पहिल्या प्रकारचे, म्हणजे 'डॉन क्विक्झोटी' सुधारकच अधिक गाजले! वर्तमानपत्री गाजावाजा वा पोकळ पट्ट्याचे हात, न करता समाजाला कर्तृत्ववान करीत करीत रूढींना निर्बल करणारे पुढारी बंडखोर म्हणून गाजले नाहीत. विवेकानंदांनी ब्राह्मणांच्या ऐतिहासिक कार्यांचे पवाडेही गायिले आहेत, अन् त्रिपुंड्र लावणाऱ्या महासोवळ्या दाक्षिणात्य ब्राह्मणांच्या गर्वाचं त्यांच्या तोंडावर ताडनही केलं आहे. विवेकानंद स्वतः ब्राह्मण नव्हते, बंगाली कायस्थ म्हणजे मूळचे क्षत्रिय होते. दाक्षिणात्य सनातनी ब्राह्मणांच्या मते त्यांना संन्यासग्रहणाचा अधिकारच नव्हता. या संबंधात त्यांची व स्वामींची क्वचित तोंडातोंडी झालेली होती. एखाद्या ब्राह्मण वा वैश्य कन्येशी विवाह करूनही विवेकानंद रूढिभंजक वीर ठरू शकले असते! व त्या रूढिभंजनाची सुधारकांच्या वृत्तपत्रात जाहिरातही झाली असती. "पण ब्राह्मण नसून संन्यास घेणं" हे रूढिभंजन त्यांना अधिक निकडीचं वाटलं. त्यांच्या अशिक्षित धर्मभोळ्या ब्राह्मण गुरूनं, स्वतः सुधारक नसूनही रूढी मोडून त्यांना संन्यास दिला. हा रूढिभंजक 'ब्राह्मणेतर' संन्यासी आज सर्व हिंदू समाजाचं दैवत बनला आहे. त्यानं स्थापलेलं रामकृष्ण मिशन जुन्या धर्माला, रूढींना शिव्या न देता अनेक पुरोगामी कार्ये करीत आहे.

माझ्या मते हिंदू समाजातील आठरापगड जाती एका देशकार्याला लावणं

एक कार्यक्रम होऊ शकेल; सर्व जातींना आधुनिक, उदार, पण स्वजनद्रोही नसलेलं शिक्षण देणं, हाही कार्यक्रम होऊ शकेल; रूढी मोडून स्वखुषीनं परजातीत विवाह करणाऱ्या, परजातीत मुली देणाऱ्या वा परजातीतल्या मुली करणाऱ्या लोकांचा सामाजिक छळ होऊ न देणं हाही कार्यक्रम होऊ शकेल; पण 'जातिभेद' नामक अनादी आणि अमूर्त वस्तूचा निःपात करण्याच्या प्रतिज्ञा करणं हा मात्र वेगळा आणि विवक्षित (Specific) कार्यक्रम होऊ शकणार नाही.

गेली शंभर वर्षं जातिभेद-निर्मूलनासंबंधी केलेल्या भाषणांना आणि ठरावांना यत्किंचित यश न येण्याचं कारण जातिभेद-निर्मूलन हे सरळ सामन्याचं, Direct Action चं क्षेत्र नसून अप्रत्यक्ष कृतीचं क्षेत्र आहे, हेच होय.

जातिभेद मोडणं हा " कार्यक्रम होऊ शकत नाही ", याचा अर्थ जातिभेदासंबंधी आज प्रत्यक्ष असं कोणतंच कर्तव्य नाही असा नव्हे. इंग्रजी शिक्षणानंतर जातिभेदावर तोंडी हल्ले झाले असले व केवळ औद्योगिक संस्कृतीमुळे स्पृश्यास्पृश्य कल्पना शिथिल झाल्या असल्या, तरी एक प्रकारे जातिभेद अधिक कट्टच झाला. जन्मजात उच्च-नीचतेवरचा विश्वास कमी झाला, पण जातीजातीतील मत्सर इंग्रजांच्या व मिशनऱ्यांच्या आगलावेपणामुळे वाढला. इंग्रजी शिक्षणानं धर्मावरचा विश्वास जसा कमी झाला, तसाच पुस्तकी पोपटपंचीवरचा, कारकुनीवरचा व मास्तरकीवरचा विश्वास वाढला! त्या भिकार नोकऱ्या स्वजातीकरिता मिळवणं म्हणजे सामाजिक प्रगती असं सर्व जातींना वाटू लागलं! धंद्यांना व धंदेशिक्षणाला उत्तेजन देण्याऐवजी पुस्तकी शिक्षणावरच भर देऊन इंग्रज सरकारनं या मत्सराला खतपाणीच पुरवलं. स्वराज्य आल्यावर निवडणुकांच्या निमित्तानं व गांधीवधाच्या निमित्तानं, जातिद्वेषाला रान मोकळं झालं. **आजचा खरा 'प्रॉब्लेम्' जातिभेदाचा नसून जातिद्वेषाचा आहे.** ब्राह्मणांचा द्वेष ब्राह्मणेतर करतात; ब्राह्मणेतरांचा द्वेष पूर्वास्पृश्य हल्लीचे बौद्ध करतात! या आपसातील द्वेषाचा वा 'जातीयते'चा फायदा परराष्ट्र आणि परधर्म घेतात. असं असून 'जातीयता' म्हटली की, आमच्यातील काही पुढाऱ्यांना फक्त मुसलमानद्वेषाचाच धोका डोळ्यांपुढे येतो! जातिभेद नष्ट करता करता हिंदुहिंदूंतली जातीयता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाढीला लागली आहे, याची सरकारला व विशिष्ट पक्षीय पुढाऱ्यांना खबरच नाही. कारण जातीयतेवरच त्यांचं 'इलेक्शन' अवलंबून आहे!

आजचा राष्ट्रीय प्रश्न जातिभेदाचा नसून जातीयतेचा आहे. ती कमी करण्याची जबाबदारी आणि किल्ली ब्राह्मण-ब्राह्मणेतर दोघांच्याही हाती आहे. आन्तरजातीय विवाह, मेडिकल व इंजिनियरिंग कॉलेजात गुणांपेक्षा जातीवर प्रवेश ठेवणं, या मार्गांनी जातीयताही नष्ट होणार नाही, की जातिभेदही नष्ट होणार नाही. तसेच एखाद्या स्त्रीनं वा पुरुषानं परजातीतल्या व्यक्तीशी विवाह केल्यानं दोन जातींतलं अंतर कमी होईल असंही नाही. आज आन्तर-जातीय विवाह फार होत नसले, तरी जे होत आहेत त्यांना समाजसंबंधाच्या दृष्टीनं फारशी मोठी किंमत द्यावी लागत नाही. असे विवाह आज

सुधारणा-ध्येयानं होत नसून वैयक्तिक प्रेमसंबंधामुळं होत आहेत व ते स्वाभाविकही आहे. या विवाहामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होत आहे, पण जातिभेद कमी होत आहे असं मात्र नाही. व्यक्तिस्वातंत्र्य वा प्रेमस्वातंत्र्य हे आपलं ध्येय नसून विवाहमार्गे जातिभेद नष्ट करणं हे आपलं ध्येय असेल, तर सर्रास व्याख्यानबाजी अन् तुरळक प्रेमविवाह हे त्याचे मार्ग नसून नव्या स्मृतीच्या वा हिंदुकोडाच्या द्वारे सगोत्र विवाहाप्रमाणे सजातीय विवाह बेकायदा ठरवणं, हा त्याचा मार्ग आहे ! पण हा मार्ग कट्टया सुधारकाला वा सत्यशोधकालाही झेपणारा वा रुचणारा नाही. कारण कट्टया सत्यशोधकालाही आज जातकुळीचा अभिमान आहेच. ब्राह्मणांची जातिनिष्ठा अनेक पिढ्यांत मुरलेल्या सोवळेपणाच्या कल्पनेत आहे, तर मराठ्यांची जातिनिष्ठा उच्च कुळीच्या अभिमानात आहे. ते दोघेही फुले-आगरकर, मिल्-स्पेन्सर वा मार्क्स् यांचे ग्रंथ वाचून 'रॅडिकल्' विचार बोलतील; पण कृतीच्या वेळी मागेच सरतील. जी एखादी 'रॅडिकल' कृती होईल, ती पुढाऱ्यांच्या बुद्धिवादामुळे होणार नाही, तर त्यांच्या मुलामुलींच्या भावनावादामुळेच होईल !

अशा स्थितीत खरा प्रश्न जाती मोडण्याचा नसून जातीयता मोडण्याचा आहे. जातीजातींतील उच्चनीच भावामुळे वा तुटक राहणीमुळे हिंदू समाजात 'अलीकडे' फूट लवकर पाडता येते, आणि ऐक्य व्हायला वेळ लागतो, यात मुख्य राष्ट्रीय धोका आहे. 'अलीकडे' हा शब्द मी सहेतुकपणे घातला आहे. आज इलेक्शनपासून ते मंत्रिमंडळाच्या वाटणीपर्यंत, शिक्षणसंस्थांपासून ते साहित्यसंस्थांपर्यंत सर्वत्र जातीय मत्सराचं – अथवा स्पष्ट म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाचं जे भांडवल मुंबईपासून दिल्लीपर्यन्तचे पुढारी करू शकतात, ते इतिहासकालात कुणी केल्याचं दिसत नाही. पूर्वीही फितुरी, भाऊबंदकी, लाचखाऊ वृत्ती होती. पण जातिद्वेषाला फुंकर घालून फितुरी माजविता येईल अशी उमेद आमच्या शत्रूंनाही नव्हती. फौलादखानाच्या यमदूतांच्या वेढ्यातून शिवाजीमहाराज निसटून गेल्यावर, "प्राणाशी गाठ आहे" हे माहीत असूनही हिरोजी फर्जंदचे पाय रगडीत बसलेला मुसलमान छोकरा मदारी मेहेतर, राखेचा तोबरा दिल्यावरही राजगुपित तोंडाबाहेर न काढणारा खंडो बल्लाळ, छत्रपतीला चंदी चंदावरकडे निसटू दिल्यावर महाबळी औरंगझेबाच्या पंजातून स्वराज्य राखणारा हुकूमतपन्हा रामचंद्रपंत, स्वजातिबांधव अबदाली यानं दाखविलेल्या आमिषाला बळी न पडणारा मराठी तोफखान्याचा प्रमुख इब्राहीमखान, शिवाजीमहाराजांची गुप्त मसलत विश्वासूपणे पार पाडणारे असंख्य ब्राह्मण अधिकारी, हे सर्व वीर आंतरजातीय सोयरिकीमुळे खासच इतके जिवलग बनलेले नव्हते ! आपला हेतू "राष्ट्रकार्याकरिता ऐक्य" हा आहे, की खिस्ती मुसलमानांसारखा एकजिनसी समाज हा आहे हे प्रथम आपण मनाशी ठरवलं पाहिजे. आज ज्या वृत्तीनं, भाषेनं अन् पद्धतीनं सामाजिक समानता साधण्याचा यत्न होत आहे, त्या पद्धतीनं जातीजातींतला भेद नष्ट होण्याऐवजी जातीजातींतला मत्सर मात्र वाढीला लागत आहे.

मी या सामाजिक प्रश्नाकडे मानसशास्त्रीय दृष्ट्या पाहतो. रोटीबंदी, बेटीबंदी नष्ट होण्याच्याही आधी जातीजातींतला उच्चनीच भाव नष्ट व्हायला हवा. आधी जन्मजात उच्चतेची कल्पना खोटी होय. त्यातून भारतीय जातींच्या पोटात दडलेली उच्चनीच भावना मुळातच खोट्या पायावर आधारलेली आहे. जो जास्त सोवळ्या घरात जन्मलेला तो जास्त श्रेष्ठ होय हा आमच्या खोट्या श्रेष्ठत्वकल्पनेचा पाया होय. कोण केवढ्या वाड्यात राहतो, कोण अधिक उंची कपडे घालतो यापेक्षाही कोण किती वेळा स्नान करतो, केवढं मोठं गंध लावतो यावर आमच्या देशातली जातीय श्रेष्ठता ठरत असते. सोवळेपणाचं अन् तुटकपणाचं हे स्तोम नुसत्या ब्राह्मणांत न राहता, या ना त्या रूपानं आमच्या हजारो जातींत शिरलं! प्रत्येक जण आपली जात दुसऱ्याच्या जातीपेक्षा, आपली पोटजात दुसऱ्याच्या पोटजातीपेक्षा श्रेष्ठ आहे असं मानू लागला!

परवा मला क्षत्रिय धनगर समाजातला एक तरतरीत मनुष्य भेटला. माझ्या सामाजिक कुतूहलामुळे व नुकताच इंदोरला जाऊन आलो असल्यामुळे, मी त्याच्याजवळ धनगरसमाजासंबंधी बोलणे काढले. बोलण्याच्या ओघात तो क्षत्रिय धनगर गृहस्थ म्हणाला : आमच्यात एकंदर १८ पोटजाती आहेत. त्यात आमची जात सर्वांत उच्च आहे. ती इतकी उच्च आहे की, आमच्यातले जुने लोक प्रथम प्रथम इंदोरच्या राजघराण्याशी सोयरीक करायलाही तयार नसत!

हा झाला आपल्या जातीय वेडाचा भाग! पण त्याबरोबरच शिवाजीमहाराजांच्या पुण्याईनं एक-दोन शतकं आमच्यात जे राष्ट्रीय तेज चमकून गेलं,:त्यामुळे आम्ही रूढी, जात, कुळ यांच्या वेडाच्या पलीकडे पोहोचलो होतो, हेही विसरता येत नाही! ज्या राजघराण्याशी त्या सामान्य धनगर मनुष्याचे वाडवडील सोयरिकीला तयार नसत, त्याचाच शूर मूळ पुरुष, ब्राह्मण बाजीरावाला सख्ख्या भावाप्रमाणे वाटे. त्याची पुण्यश्लोक स्नुषा अहिल्याबाई तर आज अखिल भारतात देवतातुल्य मानली जात आहे. अशा आमच्या विचित्र देशात ‘ खिस्तीछाप समानता ” हे ध्येय घट्ट धरून चालण्यासारख नाही.

आणि तरी जातींचं हे खूळ अतिरेकाला गेलं आहे यात शंका नाही. लोकहितवादी लिहितात : “ चार वर्ण म्हणतात आणि चार हजार जाती मानतात. धर्म धर्म म्हणून ओरडतात आणि धर्म म्हणजे काय म्हणून विचारलं, तर ‘ रूढी! ’ म्हणून सांगतात! ” या खुळेपणातून आपला समाज बाहेर पडलाच पाहिजे. पण या खुळेपणावर एकांड्या वीरश्रीनं नुसतं तोंड सोडल्यानं जातिभेद कमी न होता अधिकच वाढत आहे, हा गेल्या शंभर वर्षांचा अनुभव आहे. सर्व जातींनी मिळून सर्व दोषांचं खापर ब्राह्मणांवर फोडण्यानंही भागण्यासारखं नाही! ब्राह्मणांनी ज्ञान आपल्या वाट्याला घेऊन इतर जातींना अज्ञानाच्या धनी केल्या, हे खरं नाही! आपल्या स्वतःच्या वाट्यालाही ब्राह्मणांनी भरपूर अज्ञान घेतलेलं होतं, म्हणून तर त्यांना “ टोंबे ” म्हणणं लोकहितवादींना प्राप्त झालं! जातीजातींनी एकमेकांवर दोषारोप करण्याचा, एकमेकांचं

श्रेष्ठकनिष्ठत्व सिद्ध करण्याचा इंग्रज अमदानीतला गुलामी खेळ आता बंद झाला पाहिजे. कारण त्यामुळे दुही आणि द्वेष वाढतो. नुसत्या दलित जातींचाच नव्हे, तर ब्राह्मणांसह सर्व जातींचा उद्धार, हे आजच्या पुढाऱ्यांचं सामाजिक ध्येय असलं पाहिजे, आणि त्याकरिता नोकऱ्यांमधल्या व इलेक्शनमधल्या जागांवर नजर न ठेवता राष्ट्रवर्धन हे ध्येय ठेवलं पाहिजे.

केवळ तलवारबहाद्दरीच्या युगातच नव्हे, तर आजच्या यंत्रयुगातही महाराष्ट्रातलं राजकीय पुढारीपण मराठा या जातीकडे जाणं स्वाभाविक आहे, योग्य आहे अन् ते तसं गेलंही आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ते महाराष्ट्राएवढ्याच विस्ताराच्या प्रदेशात मराठ्यांकडे होतंही. कोल्हापूर, बडोदे, इंदोर, ग्वाल्हेर मिळून काही कमी प्रदेश होत नाही. यापैकी कुठेही ब्राह्मण राजा नव्हता अन् ब्राह्मणावर बहिष्कारही नव्हता. राज्यकर्ता मराठा आणि कारभारी ब्राह्मण अशा तऱ्हेची विभागणी असे. शासकवर्ग क्षत्रिय जातीतील असावा; कारभारी विद्याव्यवसायी जातीतील असावा ही प्राचीन परंपराच आहे. सर्व जातींची, सर्व अधिकारांची हाव धरण्यानं स्पर्धा वाढून नैपुण्यमात्र कमी होईल. या दृष्टीनं पाहता तज्ज्ञांनीच भरण्याच्या अधिकारपदात जातवार जागा राखण्यात तात्पुरता संतोष आणि दूरगामी राष्ट्रीय हानीच आहे. शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्रातल्या विविध जातींकडून ज्या योजकतेनं एकनिष्ठ राष्ट्रसेवा घेतली ती योजकता आजच्या मराठा शासकांनी दाखविली पाहिजे. त्या धर्मभोळेपणाच्या काळीही जातिभेद राष्ट्रकार्याच्या आड आला नाही, मग आजच्या आधुनिक आचारविचारांच्या काळी तो आड येण्याचं कारणच नाही. पण जातिभेद मोडणं हेच स्वतंत्र कार्य मानलं, तर मात्र जातिभेद तसाच राहून जातिमत्सर वाढीला लागेल. उलट शिवकालाप्रमाणे खऱ्या राष्ट्रकार्याला एकजुटीनं मान दिली, तर जातिभेद सैल, सौम्य आणि पुसट होईल. शिवाय आधुनिक शिक्षणानं अन् शहरी राहणीनं तो आजच्या स्वरूपात तरी लुप्त होईल.

पण या बदलत्या सामाजिक संबंधात ब्राह्मणांवर काही खास जबाबदारी येऊन पडते. केवळ इराण्याच्या हॉटेलात मुसलमान आणि अस्पृश्य यांच्या हातचं खाण्यात किंवा 'नॉन्-व्हेजिटेरियन्' पदार्थ खाण्यात रूढिभंजनाची इतिकर्तव्यता मानण्यानं "गाढवही गेलं अन् ब्रह्मचर्यही गेलं!" या तुकाराममहाराजांच्या उक्तीतलंच फक्त पुण्य पदरी पडतं, हे सुशिक्षितांनी ओळखलं पाहिजे. केवळ उच्छृंखलपणाखातर जातिनिर्बंध मोडण्यानं ब्राह्मणांचा अहंभाव व तुसडेपणाही कमी होत नाही, अन् इतर जातींचं प्रेम संपादण्याचं सामाजिक कर्तव्य---अतिविलंबित (overdue) सामाजिक पुण्यही जोडलं जात नाही. केवळ म्हाताऱ्या बायकांना खिजवणारा रूढिभंजनाचा पराक्रम तेवढा हातून घडतो! आज हळूहळू सार्वजनिक ठिकाणी पंक्तिभेद नष्ट झाला आहे, पण त्यातही एक प्रकारचं 'डबल स्टॅन्डर्ड'–दुटप्पी आचार रूढ होत आहे. सैपाकघरात एक आचार, तर कॉन्फरन्सच्या मंडपात दुसरा आचार! कुणालाही अपंक्त मानणं हा आधुनिक काळात स्वतः तिरस्कृत होण्याचा मार्ग ठरेल. जे जुन्या समजुतींनी जुन्या काळी

अपंक्त होते, त्यांना निर्मळपणे, प्रेमळपणे आदरानं पंक्तीला बोलावणं हे आजच्या ब्राह्मणांनी आपलं पवित्र कर्तव्य मानलं पाहिजे. कोणी मनातल्या मनात कोणत्याही जातीला उच्च वा नीच मानो, महाराष्ट्रातल्या सर्व जाती मनातून स्वाभिमानी आहेत, हेच काय ते अंतिम सत्य आहे, सोवळ्याच्या वा अन्य कोणत्याही कल्पनेनं कोणाचाही स्वाभिमान दुखावणं हे असंस्कृतपणाचं, अज्ञानाचं अन् राष्ट्रविरोधी कृत्य आहे.

पण हा पंक्तिव्यवहार "आपण मोठं शतकृत्य करीत आहोत" अशा कल्पनेनं करणंही तितकंच चुकीचं होईल. तो नवा प्रेमयुक्त समाजधर्म म्हणून झाला पाहिजे. आमच्या माहितीच्या एक पदवीधर ब्राह्मण बाई श्रावणी शुक्रवारी मराठा जातीची सवाष्ण जेवायला बोलावून तिची ओटी भरतात. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये इंग्रजी विद्येला बट्टा लागेल म्हणून सर्व जातींनी एका पंक्तीला बसण्यात जो जातिभेद मोडला जातो, तो वरवरचा होय. जेव्हा आमच्या स्त्रिया धार्मिक विधीत शुचिर्भूतता पाळूनही जात विसरतील, तेव्हा उच्चनीच भावात्मक व पंक्तिभेदात्मक जातिभेद मोडेल. यातही 'One step enough for me!' हे सूत्र लक्षात ठेवलं पाहिजे. ब्राह्मण, मराठा, वैश्य यांसारख्या पृथकपणे उच्च पण परस्परांना परक्या व हीन समजणाऱ्या जातींनी फक्त कुणाला 'अपंक्त' समजण्याची वेडी समजूत नष्ट केली म्हणजे पुरे. ती नष्ट करताना जे शाकाहारी आहेत त्यांनी लगेच मांसाहारी होण्याचं कारण नाही, कोणी शाकाहारी आहे एवढ्यानं मांसाहारी माणसाचा वा समाजाचा अपमान होत नाही, पण कुणी कुणाला अपंक्त मानलं तर मात्र खास अपमान होतो.

तीच गोष्ट वेदोक्तासंबंधीच्या अडेलपणाची. ब्राह्मणांनी कोणाही संस्कारवान जातीतील घरी जाऊन वेदोक्त विधी केले असते, तर वेदांचा सदुपयोग झाला असता. ब्राह्मणांचा चरितार्थ चालला असता आणि उपाशी मेला असता काय तो ब्राह्मणद्वेष! सोवळ्यात बांधून ठेवलेल्या त्या वेदोक्त विधींचं पुढे काय भलं झालं? तर वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांनाच स्वतःची मुलं रजिस्टर्ड लग्न करीत आहेत हे पाहावं लागलं! या दृष्टीनं पाहता, ख्रिस्ताळलेले सुधारक, भलत्या टोकाला जाऊन नव्या प्रार्थना वा नवे विधी काढू पाहणारे सत्यशोधक, अन् वेदविधी धाबळीत बांधून ठेवणारे सनातनी हे तिघेही एकाच पंक्तीत बसतात–एकाच तऱ्हेचे ठरतात.

रूढिभंजन नव्हे, तर सर्व जातींबद्दल आदर आणि जुन्या संस्कारांबद्दल अभिमान हा नव्या समाजधर्माचा पाया झाला पाहिजे. सुधारक हे रूढी आणि संस्कार मोडण्यातच काय ते शूर होते. सत्यशोधक हे जुन्या संस्काराबरोबर एका महत्त्वाच्या जातीचाही धिक्कार शिकवीत होते. उलट ब्राह्मण जातीचाही उद्धार करण्याची जबाबदारी नव्या समाजोद्धारकांनी उचलली पाहिजे. सर्वश्रेष्ठ रचनात्मक सुधारक श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे तर पुरोहितवर्गालाही एखादी राजमान्य परीक्षा ठेवावी या मताचे होते. त्या काळातल्या त्यांच्या इंग्लंडच्या पहिल्या प्रवासात त्यांनी आपले पुरोहितही बरोबर नेले होते. कारण श्राद्धादी आवश्यक कर्मे परदेशातही खंडित होता उपयोगी नाहीत.

अशा राजामुळे पुरोहितपेशाच्या ब्राह्मणांचीही सुधारणा झाली असती व परदेशात हिंदुधर्माचीही अधिक जवळून माहिती झाली असती. आज मॉरिशससारख्या परदेशातल्या हिंदू समाजाकडून भारतीय पुरोहितांना मागणी आहे. रवींद्रनाथांबरोबर जावा-सुमात्रात गेलेल्या ब्राह्मणांनी जेव्हा शुद्ध स्वरूपात वैदिक मंत्र म्हटले, तेव्हा हिंदू परंपरा पाळणाऱ्या तिथल्या लोकांना धन्य वाटलं.

जिवंत हिंदुधर्म याप्रकारे वर्तेल ! आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, पुरोगामित्वातही पूर्व संस्कार संभाळतात. शिवाजीमहाराजांचा विजिगीषु हिंदुधर्म असाच होता ! राष्ट्रवाद आणि सुधारणावाद यांचा जो विरोध आगरकरी सुधारणेत व सत्यशोधकी सुधारणेत दिसतो, तो अनिवार्य नाही. इतर जातींच्या प्रगतीला ब्राह्मणद्वेष अनिवार्य नाही. उलट सत्ताधारी, बहुसंख्य इतिहास-प्रसिद्ध मराठा समाजानं ब्राह्मणवर्गाचा तारतम्यानं उपयोग करून घेण्यातच राष्ट्रीय हित आहे. मराठा ही जात शूर आणि समावेशक आहे, तर ब्राह्मण ही जात विद्याव्यासंगी, विद्याप्रसारक आणि विविध शास्त्रांतील तज्ज्ञांची जात आहे. रशियासारख्या, जुनं सर्व मोडून पाहणाऱ्या समाजातही अखेर हेच दोन वर्ग शिल्लक राहिले.

या दोन वर्गांचं बळ टिकवणारी, द्वेष निरसून टाकणारी, सुधारणाच काय ती राष्ट्रोपयोगी होय. खोटा अहंभाव, खोटा सोवळेपणा व खोटा द्वेष हे तिन्ही उद्याच्य समाजसुधारकांनी टाळले पाहिजेत. कारण आज जाती कशा टिकतील हा प्रश्न नसून हिंदुत्व कसं टिकेल हा प्रश्न आहे !

मराठी समाजाची समृद्धि : स्वरूप व उपाय

श्री. रा. टिकेकर

स्वराज्योत्तर काळात–विशेषतः महाराष्ट्र वेगळा झाल्यानंतर बहुतेक विचारवंतांना ज्या एका प्रश्नाचा विचार उत्कट रीतीने करावा लागला, तो प्रश्न म्हणजे अखिल भारतीय स्वरूपाच्या व्यवसायांत, नोकऱ्यांत, प्रकल्पांत महाराष्ट्रातील जनतेचा समावेश योग्य प्रमाणात कसा होईल ? महाराष्ट्राच्या वाटणीस अशी कामे, अशा नोकऱ्या कशा येतील ?

बरीच वर्षे असे वाटले की, ह्या प्रश्नाकडे सरकारने लक्ष घालू नये. पण लोक-कल्याणकारी शासन म्हटल्यानंतर हा प्रश्न आमचा नव्हे असे म्हणता येतच नाही. लोककल्याण आणि शासनाचे हित यांची उत्तम सांगड असल्याने महाराष्ट्र सरकारने या प्रश्नात लक्ष घातले. डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक छोटी समिती नेमली आणि ' महाराष्ट्राची पीछेहाट " होत असल्यास तिची कारणे शोधण्याचा, त्यावर उपाय सुचविण्याचा आदेश त्या समितीस दिला. अखिल भारतीय सरकारी नोकऱ्यां-पुरती ह्या समितीची कक्षा मर्यादित असली तरी तिच्या निर्णयाकडे लक्ष लागून राहिले आहे खरे. परंतु ह्या समितीमुळे दोन बाबी स्पष्ट झाल्या : (१) महाराष्ट्रीय जनतेला भारतीय कारभारात मिळायला हवा तो वाटा मिळत नाही अशी वस्तुस्थिती आहे आणि (२) त्याबद्दल शासनाने काही तरी केले पाहिजे हे सरकारला पटले.

परंतु महाराष्ट्रीयांची पीछेहाट म्हणजे नेमकी कोणत्या वर्गाची ? ती तमाम महाराष्ट्राची मानण्यात काही चुकत तर नाही ना ? महाराष्ट्रात काही संघटना, महाराष्ट्रीयांना योग्य ते स्थान मिळवून देण्यासाठी झटत आहेत. त्यांचे लक्ष कुणावर खिळलेले आहे ?

खऱ्या अर्थाने बहुजनसमाज म्हणतात तो महाराष्ट्रातच राहणारा आहे; शेती व्यवसायातच तो व्यग्र राहणारा आहे. त्याच्या पीछेहाटीची, त्याच्याकडे होणाऱ्या दुर्लक्षाबद्दलची ही चिंता नव्हे. कारण महाराष्ट्रातली जमीन उत्तरेकडील गंगा-यमुना

दुआबाच्या मानाने कमी सुपीक खरी; पण कष्टाळूपणात मराठी शेतकऱ्याची बरोबरी करणारे फार थोडे शेतकरी आहेत. तेव्हा त्याची पीछेहाट होत असली तर शासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे थोडीबहुत होते. नारळी, पोफळी, काजू अशा पिकांसाठी मध्यवर्ती सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत व इतर सवलती इतर राज्यांच्या वाट्यास येतात. त्या मानाने त्या महाराष्ट्राला मिळत नाहीत – ही एक तक्रार होईल, पण ही पीछेहाट नव्हे.

पीछेहाट भासते–तीव्रतेने नजरेत भरते ती अखिल भारतीय संबंधात. राजकारण, अर्थकारण, उद्योगधंदे, नोकरीपेशा, व्यापारधंदा या शाखांत महाराष्ट्रीयांचे प्रमाण असावे तेवढे नाही ही मुख्य तक्रार अलीकडे प्रामुख्याने–जाहीरपणे–व्यक्त होत आहे. तिची व्याप्ती सुशिक्षित वर्गापुरती–बव्हंशी पांढरपेशा वर्गापुरती–मर्यादित असल्याने महाराष्ट्राची पीछेहाटदेखील त्या वर्गापुरतीच मर्यादित आहे. परंतु एकाच्या कर्तबगारी-मुळे राष्ट्राला, राज्याला, मोठेपण लाभत असल्याने अशा मर्यादित स्वरूपाच्या पीछे-हाटीचा परिणाम सबंध राष्ट्राच्या अस्मितेवर होतो—असंतोष तर प्रभावीपणे व्यक्त होतो.

महाराष्ट्रीय पांढरपेशाला मिळावयास हवे तितके स्थान (प्रतिनिधित्व) सरकारी वा बिनसरकारी नोकऱ्यांतही मिळत नाही, ही तक्रार वारंवार व्यक्त होते ही गोष्ट खरी. राष्ट्रीय दृष्टीने किंवा आंतर-राष्ट्रीय दृष्टीनेही पाहता, अशी तक्रार व्यक्त करणे हे इष्ट का अनिष्ट, हा वाद निराळा. पण भारतीय घटक राज्यांतल्या एका घटकाला असा अन्याय आपल्यावर होत आहे, असे वाटणे ही बाब चिंताजनक होय. कारण घटक राज्यांचा आपसातील सलोखा, हा तर राष्ट्रीय ऐक्याचा भक्कम पाया आहे. एका राज्यावर अन्याय होतो–पंक्तिप्रपंच होतो–असे म्हणण्यात दुसऱ्या (एक वा अनेक) राज्यांना विशेष लाभ मिळतो ही तक्रार अव्यक्त असते. पण ही तक्रार वारंवार व्यक्त होत आहे तेव्हा ती खरी मानून तिची कारणे शोधण्यास हरकत नसावी. एका दृष्टीने हे आत्मनिरीक्षण आहे.

निरनिराळ्या सरकारी प्रकल्पांत अगर खासगी उद्योगधंद्यांत महाराष्ट्रातल्या कर्तबगारांना मिळावा तितक्या प्रमाणात वाव मिळत नसल्यास त्याची कारणे शोधली पाहिजेत. कुठलीही योजना पार पाडायची म्हणजे तिजसाठी कार्यकर्ते पाहिजेत आणि मिळेल तिथून लायक माणसे निवडावी-असा साधारण शिरस्ता असतो. योजकांचा दृष्टिकोण किंवा त्यांच्या आवडीनिवडी, पूर्वग्रह यांचा विचार तूर्तास न करता, प्रथम महाराष्ट्रीयांच्या गुणावगुणांचा, त्यांच्या लायकीचा विचार करावयाचा आहे; हे आत्म-निरीक्षण म्हटले ते या अर्थाने.

सध्या महाराष्ट्रात देखील कारखाने कमी नाहीत, किंबहुना ते सारखे वाढते आहेत. या ठिकाणी महाराष्ट्रीयांना कितपत वाव मिळतो ? कोणत्या क्षेत्रात त्यांना अधिक मान आहे ? त्यांना मज्जाव कुठे कुठे आहे ? त्यांच्या ऐवजी इतर कुठली माणसे निवडतात ? दूर प्रांतांतून आलेली माणसे महाराष्ट्रात रुळतात कशी ? इत्यादी अनेक प्रश्नांचा विचार ह्या आत्मनिरीक्षणात येतो.

सध्याच्या बदलत्या—झपाट्याने बदलत्या—जमान्यात मिळूनमिसळून वागण्याला प्राधान्य आहे. हा गुण महाराष्ट्रीयांनी अद्याप आत्मसात केला नाही. त्यांना मिळते ती शिकवण थोडीशी दोषास्पद आहे. तो चिक्कू मारवाडी, तो कोंगाडी, हा भय्या, तो अप्पा, हा बाबू असे इतरांचे दोष तेवढे काढून त्यांना तुच्छतेने लेखावे—त्यांच्याबद्दल असे निंदेने बोलावे हा महाराष्ट्रीय स्वभावविशेष होऊन बसला आहे. मराठी नाटके-कथा-कादंबऱ्यांत अशा लोकांचे चित्रण सहज आढळते—आणि पूर्वग्रह बळावण्यास ते पुरे ठरते. म्हणून असेल कदाचित, इतरांशी मिळून मिसळून वागण्यात महाराष्ट्रीय मंडळी मागे पडतात. कुठलाही प्रकल्प घ्या, मोठे कारखाने पाहा, त्यात सध्या सहकाराचा धडा धडाक्याने अमलात येतो. पाची बोटांनी मिळून कार्य साधते, एकेका बोटाने काही साधत नाही, हा प्रत्यक्ष अनुभव अद्याप पुरा अंगी बाणला नाही. म्हणून महाराष्ट्रीयांना इतर प्रांतीयांशी मोकळेपणाने मिसळता येत नाही की काय ?

इंग्रजी बोलण्याचा सराव कमी. शिवाय बोलावे काय याबद्दलही पंचाईत म्हणून महाराष्ट्रीय मागे पडतो. तुमच्या बोलण्या-चालण्यावरूनच तुमची ओळख इतरांना व्हायची ना ? मग इतरांशी बोलला नाहीत, त्यांच्याशी कुठल्याही गोष्टीची साधकबाधक चर्चा केली नाहीत, तर तुमचा अभ्यास, तुमचा अनुभव, तुमचे वाचन, तुमचे धोरण यांची माहिती इतरांना व्हावी कशी ? समाजाची उन्नती होत आहे, तो समृद्ध होत चालला आहे, असेच दृश्य सर्वांना पाहावयास आवडते; पण नुसत्या उत्कट इच्छेने काही कार्य साधते असे नाही. मराठी भाषा समृद्ध व्हावी, मराठी साहित्याची वाढ व्हावी, अशी जाहीर इच्छा साहित्यसभा-संमेलनांतून व्यक्त होत असते; पण साहित्याची समृद्धी समाजाच्या समृद्धीवर अवलंबून आहे. कारण भाषा, साहित्य हे अधांतरी वाढणारे झाड नव्हे. लोक भाषा बोलतात. लोकच पुस्तके लिहितात, वाचतात, विकत घेतात. म्हणून लोकांची समृद्धी साधल्याखेरीज साहित्याची समृद्धी अपेक्षणे हे व्यवहारी नव्हे.

समृद्धी समृद्धी म्हणून म्हणतात ती ओळखण्याची सोपी खूण अशी : संपत्तीत भर टाकणारे व्यवसाय करणारी मंडळी किती आहेत याचा अंदाज घ्यावा. त्यातल्या त्यात परदेशात विक्री होणारा माल पुरविणारा समाज समृद्ध होतो; परदेशात नोकरीपेशा करणारी मंडळीदेखील समाजाची समृद्धी वाढवितात. म्हणून गुजराती बोलणारांची संख्या मराठी बोलणारांपेक्षा कमी असूनही गुजराती साहित्य अधिक समृद्ध आहे. तामिळ साहित्याच्या समृद्धीचे कारणही असेच आहे. गुजराती आणि तामिळभाषी मंडळी परदेशांत गेली आहेत. परदेशांशी त्यांचा व्यापार आहे. म्हणून हे दोन्ही समाज इतरांच्या मानाने समृद्ध आहेत. इंग्रजांची इंग्रजी साहित्याची समृद्धी त्यांच्या परदेशी व्यापावर आणि व्यापारावर अवलंबून नाही काय ?

महाराष्ट्रीय समाजाची समृद्धी होत नाही याचे गमक मुंबईतल्या काही व्यवसायांवरून कळून येते. माधवबागेच्या आसपास कापड दुकानदार महाराष्ट्रीय होते. तेथे

पुस्तकविक्रेते प्रकाशकही प्रख्यात होते. आज ते कुठे आहेत किंवा त्यांची अवस्था कशी आहे ? स्पर्धेच्या ओघात ते वाहून गेले. त्यांना टिकाव धरता आला नाही असे ह्या उदाहरणावरून दिसून येते. काही पेढ्या, काही दुकाने, काही व्यवसाय, एकेकाळी महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांच्या हाती भरभराटीत होते. त्यांची वाताहत झालेली पाहिली म्हणजे महाराष्ट्रीय समाज आपले स्थान टिकवून राहिला नाही हे सत्य स्पष्ट दिसते.

नाटक मंडळ्यांचा व्यवसाय महाराष्ट्रात तेजीत दिसला तरी समाजातील पैसाच त्यामुळे खेळत राहतो–परप्रांतातील किंवा परदेशातील द्रव्याची त्यात भर पडत नाही, हे लक्षात घेणे जरूर आहे. असे काही व्यवसाय आहेत की, त्यांचा परिणाम समाजाच्या समृद्धीवर होत नाही. म्हणून समाजातील घटकांचे व्यवसाय समृद्धीस पोषक ठरले तरच समाज समृद्ध होतो. मराठी नियतकालिके हीही पुन: नाटकांसारखी एकाच समाजावर अधिष्ठित असल्याने त्यांच्यामुळे समृद्धीत फारशी भर पडत नाही. मोठमोठ्या विदेशी कंपन्यांच्या जाहिराती मिळतील त्या मानाने बाहेरचा पैसा त्या त्या पत्रांना मिळेल. बाकी सर्व देवघेव त्या समाजापुरतीच मर्यादित राहील. दलाली, धंदे संपत्ती खेळती ठेवतात—तीत भर घालीत नाहीत. काही धंदे ऐदीपणा वाढविणारे असतात. 'स्वस्थ बसून खाता' येण्यासारखे हे व्यवसाय समाजाला हानिकारक ठरतात. सर्वस्वी नोकरांकरवी व्यवसाय चालविणे हा काही समाज समृद्ध करण्याचा मार्ग नव्हे. समाजातील प्रत्येक घटक धनोत्पादक कार्यात सारखा गुंतलेला हवा म्हणजे समाजात बेकारी नाही, आळशी वृत्तीचे आणि ऐदीपणाचे धंदे तेजीत नाहीत, ही अवस्था इष्ट. वायदे बाजार, लॉटरीची तिकिटविक्री, घोडदौड इत्यादी धंदे धनोत्पादक नव्हेत. हे समाज पोखरणारे—समाजावर पोसणारे—व्यवसाय होत. वायदेबाजार बंद :करणारे सरकार स्वत: लॉटरीचा धंदा चालवीत आहे हे आश्चर्य !

धंदा करताना देखील उदार दृष्टीने तो करता येतो. मुंबईत एक उदाहरण नेहमी ऐकू येते—तसे आपल्या महाराष्ट्रीय समाजात शक्य होईल काय ? असा प्रश्न पडतो. एका बोहऱ्याच्या दुकानातील दोन नोकर नोकरी सोडून दुसरीकडे जाण्याच्या विचारात आहेत असे कळल्यावर मालकाने त्यांना विचारले, " काय करणार आहात नोकरी सोडून ? दुकान काढणार असाल तर × × × ठिकाणी जा आणि किती माल पाहिजे ते सांगून ठेवा–" म्हणजे आपल्याच दुकानाची जणू ती नवी शाखा अशा समजुतीने त्याने नोकरांना वागविले. दोघांचाही लाभ झाला. इतक्या व्यवहारी दृष्टीने व्यापारधंदा करणारे किती श्रेष्ठी आहेत ? खऱ्या व्यापारी वृत्तीने वागणारे श्रेष्ठी नोकरांना आपल्या धंद्यात भागिदारी देतात. महाराष्ट्रात अशी भागिदारी फार थोड्यांच्या वाट्यास येते, म्हणून धंद्यात आमची फारशी चलती होत नाही. एका दुकानातून फुटून दुसरे दुकान जवळपास काढल्याने धंदा विभागतो. एकालाही पुरा मिळत नाही, ही गोष्ट लक्षात घेऊन अशी ' स्पर्धा ' करू नये, हा व्यवहार महाष्ट्रीय व्यावसायिकांना सहसा पटत नाही. उलट, येन केन प्रकारेण आपल्या विरोधकाचा उच्छेद करण्याची ही विशेष

वृत्ती आम्हांत का शिरली खुदा जाने! किंबहुना आपल्या बांधवांना 'विरोधक' मानण्यात चूक होत आहे असे वाटते. एकमेका साहाय्य करून अवघ्यांनी सुपंथ धरावयाचा सोडून एकमेकांचे उणे काढण्यात वेळ दवडून वैर पत्करण्यात, ते वाढविण्यात, ते कायम ठेवण्यात आम्हांस पुरुषार्थ वाटतो असे अनेक उदाहरणांवरून अनुमान निघते. तेव्हा नसेल तेथे विरोध पाहण्याची वृत्ती बदलणे आवश्यक आहे. वास्तविक विरोध असला तरी त्याच्या जागी सहकार आणण्याची खटपट झाली पाहिजे—ही नव्या जमान्याची निकड आहे.

अंगीकृत कार्याशी तन्मय होण्याऐवजी भाडोत्री वृत्ती अंगी बाणवून घेण्याचा अट्टाहास, "हे काम माझे आहे. त्यात दोष राहू नये, राहिला तर त्यामुळे मला कमीपणा येईल" ही एक वृत्ती. दुसरी अशी की "शक्य तेवढे मी केले. मी म्हणजे यंत्र नाही. माझ्यापेक्षा चांगले काम करणारा कोण आहे?"

कुठलाही मालक पहिल्या वृत्तीच्या माणसाला अधिक पगार देऊन ठेवील. दुसऱ्या प्रकारचा कार्यकर्ता कितीही मोठा पदवीधर असला तरी त्याला निवडून, काढून टाकील.

ह्या व असल्या कारणांमुळे महाराष्ट्रीय मंडळी इतरांशी मिसळण्यात मागे राहतात. "आमचे काही तरी वेगळे आहे—इतरांजवळ ते नाही, म्हणून आम्ही निराळे राहू" अशी छुपी वा प्रकट बढाई ठिकठिकाणचे 'महाराष्ट्रीय' समाजाचे कार्यकर्ते मारीत असतात. आपल्या समाजाचे कार्यक्षेत्र अगदी संकुचित ठेवण्याचे हे समर्थन होय. परंतु कुठल्याही सद्‌गुणाची कसोटी ही की, तो सद्‌गुण इतरांत पसरविण्याची खटपट किती होते? क्रिकेटपटू, आपल्याभोवतीच्या समाजात तो खेळ लोकप्रिय करण्याची खटपट करतो, 'ब्रिज' खेळणारा त्या खेळाच्या स्पर्धांना उत्तेजन देतो—सदाचारी साधू सदाचाराचा संदेश फैलावतो. याप्रमाणे महाराष्ट्रीयांच्या अंगचा कोणता विशेष गुण फैलावण्याचा प्रयत्न होतो? अशा प्रकारे आत्मनिरीक्षण केल्यानंतर खरी वस्तुस्थिती लक्षात येईल. इतरांशी मिळून मिसळून वागता येत नाही म्हणून तर आपण असा वेगळेपणाचा आव आणीत नाही ना?

चालू जमान्याची गरज काय आहे—ती ओळखून जरूर ते नवे गुण आत्मसात करण्याची पात्रता प्रत्येक जमातीत असते. नवी यंत्रे आली, नवी साधने मिळू लागली की ती वापरून आपला धंदा चालविणारे कामगार तयार होतात. त्या त्या बदलत्या परिस्थितीशी जुळते घेण्यास त्यांना अडचण वाटत नाही. मग सामाजिक परिस्थितीत बदल होतो, तेव्हा आपल्या राहणीत थोडाफार फेरफार का करता येऊ नये? अशी तडजोड करणे हे अवघड का वाटावे?

आजकाल शहरी राहणी ही अधिकाधिक संमिश्र स्वरूपाची होत आहे. भारतभरचे लोक 'एका कढईत' पडल्यागत एकत्र राहात आहेत. समाजातले पूर्वीचे थर पार लोपले आहेत (कदाचित नवे थर तयार होत असतील) आणि नव्य जमान्या-

तली समान्तता आमच्या पांढरपेशांना विशेषतः नडते. ती अद्याप त्यांना पचविता येत नाही. नोकरचाकरांशी त्यांचे वागणे सुधरत नाही. आपला दर्जा ओळखून नोकरांनी वागावे, असा त्यांचा कायमचा सूर लागलेला असतो. म्हणजे आपण कुणीतरी वरच्या प्रतीचे आहोत, नोकरांनी आमची बरोबरी करू नये असे जणू ते बजावत असतात.

ह्याच वर्चस्वाची दुसरी बाजू म्हणजे महाराष्ट्रीयेतर सर्व समाज कमी लेखण्याकडे प्रवृत्ती. हे छुपे वर्चस्व व्यक्त होते कसे ? तर सर्वांना ' दूर ' ठेवण्यात किंवा इतरांपासून स्वतः ' दूर ' राहण्यात ! कुणाच्या घरी जायला नको – कारण त्याला आपल्याकडे बोलवावे लागेल – अशी ' व्यवहारी ' (खरोखरीने अव्यवहारी) भाषा कशाची द्योतक समजावी ?

मोठेपणाची खोटी कल्पना किंवा खोट्या मोठेपणाची कल्पना उराशी बाळगण्याची आमची एक खोडी आहे. मुंबईतल्या एका प्राध्यापकाला एक खास कामगिरी मिळाली. जपानी विद्यापीठातल्या विद्वान प्राध्यापकास, तीन-चार दिवसांत मिळून मुंबईतल्या विद्यावर्धक संस्थांचा परिचय करून देण्याची. तैनातीला ' गाडी ' होती आणि इतर खर्च करण्याची मुभाही होती. म्हणजे पाहुणचाराचे हे काम. पण असल्या ' म्हारकी '-साठी आपणास सरकारने नेमावे याबद्दल त्यांना अत्यंत विषाद वाटला. आपला हा अपमान झाला अशी त्यांची मनोमन खात्री होती ! त्यांची समजूत पाडावी कोणी ? कशी ?

हे असे का झाले ? ' जपानी ' हे ' आमच्या ' पेक्षा कमी दर्जाचे असे काल्पनिक भूत तर आमच्या प्रोफेसरांच्या मानगुटीवर बसले नव्हते ना ?

किंवा ' पाहुणचार ' ही सेवा आपल्या दर्जास कमीपणा आणणारी आहे अशी त्यांची समजूत होती की काय ?

काहीही असो; आमच्या प्रोफेसरास ह्या कामगिरीचा कमीपणा वाटला, हे त्या जपानी पंडितास समजले, तेव्हा त्याने अत्यंत मृदू भाषेत, अगदी नम्रतेने, त्यांची क्षमा मागितली ! ! तरी त्या प्रोफेसराचा घुस्सा कमी झाला नाही तो नाहीच ! !

व्यापारधंद्यात महाराष्ट्रीय मंडळी फारशी पडत नाहीत, पण तेथे देखील ठराविक मर्यादेपलीकडे त्यांची पोच जात नाही. स्वभाव अल्पसंतुष्ट असावा किंवा त्यांची कर्तबगारीची मर्यादा फार मोठी नसावी. कारण काहीही असो परिणाम एकच होतो. व्यापार-धंद्यात व्हावी तितकी प्रगती महाराष्ट्रीयांना साधत नाही. अपवादात्मक उदाहरणे नित्याची निदर्शक ठरत नाहीत.

तिसरेही एक कारण संभवते. प्रत्येक व्यापारी धंदेवाईक, किंवा कारखानदार ' पैशा 'साठी, फायदा कमावण्यासाठी कुठला तरी व्यवसाय पत्करतो खरा; पण त्या त्या व्यवसायाबद्दल निष्ठा नसेल तर मात्र फार प्रगतीची आशा नको. पंतोजी, डॉक्टर, वैद्य हे सुद्धा पैशासाठीच तो तो व्यवसाय पत्करतात. तेवढ्याने त्यांना मिळणारा मान कमी होत नाही. ही त्यांची व्यवसाय-निष्ठा असते. तशीच प्रत्येक धंदेवाइकाची हवी.

आमचा अट्टाहास, या वेळी उफाळून बाहेर येतो–आणि आमचे जवान म्हणतात— समाजाची गरज भागवीत असता मला माफक नफा मिळतो—ही धंदेवाइकाची देखील भूमिका असते—निदान असायला हवी. महाराष्ट्रातल्या व्यापाऱ्यांची किंवा कारखानदारांचीही विचाराची दिशा थोडी वेगळी दिसते. पैसे मिळविले, गाडी आणली, घर बांधले, जमीन घेतली, मुलामुलींची लग्ने थाटात केली की संपले आपले काम! अशा वृत्तीने ते वागतात. म्हणजे धंद्यातला पैसा धंद्यासाठी न वापरता इतर इस्टेट करण्याकडे त्याचा विनियोग होतो. त्यामुळे धंद्याची वाढ न होता त्याची कुचंबणा होऊ लागते. मालकाची तात्पुरती चलती झालेली दिसली तरी धंदा मात्र उतरंडीला लागलेला असतो. हा प्रकार केवळ पैशाचा हव्यास धरल्याने होतो. म्हणून धंदा करावयाचा तो पैशासाठी असे न मानता नमुनेदार व्यवसाय, दोन-तीन पिढ्या चालेल, परंपरा चालेल असा धंदा, करण्याची उमेद बाळगावी. त्याप्रमाणे व्यवसायाची पथ्ये पाळावी.

आम्ही तत्त्वनिष्ठेबद्दल विख्यात आहोत, पण तीत अव्यवहारी आम्ही कसे बनतो हे आमचे आम्हांसच कळत नाही. अरब राष्ट्रांकडे सुवर्णगंगा फार झपाट्याने वाहात आहे; ही गुप्त असलेली पृथ्वीच्या पोटातली गंगा होय. तिचे स्वरूपही बदलले आहे. ती द्रवरूप असली तरी तिचे कृष्ण स्वरूप आहे; तिला एक गंध आहे. ती ज्वालाग्राही आहे. पण तरीही ती सुवर्णगंगा आहे.

ह्या गंगेमुळे अरब राष्ट्रांत सुधारणा झपाट्याने होत आहे. ह्या आधुनिकीकरणात त्यांना युरोपियन आणि अमेरिकन राष्ट्रांची विविध प्रकारे मदत होत आहे. पण साहेबांचे आणि अरबांचे गोत्र फारसे जमण्यासारखे नाही. म्हणून भारतीय यांत्रिक आणि तंत्रज्ञ मिळतील तितके घेण्याकडे अरबी सरकारचा कल आहे. धार्मिक प्रभावामुळे काही अरब सरकारांचे हे धोरण कदाचित लहरी ठरेल, पण कोणते सरकार शुद्ध तर्कवादी असते? बेकन, हॅम, इत्यादी सूकरजन्य खाद्यविशेषांना अरबांनी जाहीर बंदी घातली म्हणून त्यांना हसावे हवे तर, पण त्यांच्या सेवेत राहायचे तर हा निर्बंध पाळावाच लागेल.

मद्यपान आणि धूम्रपान या बाबतीतले अरबी निर्बंध 'स्वातंत्र्यावर घाला' समजून अरब प्रदेशातली किफायतशीर नोकरी झिडकारणारांची तत्त्वनिष्ठा प्रशंसनीय ठरण्यापेक्षा त्यांच्या अव्यवहाराची कीव येईल. अरब राष्ट्रांना भारतीय नोकरांना बोलावल्याबद्दल पश्चात्ताप व्हावा, इतक्या प्रकारची 'उच्च' सुधारणा आमच्या काही जवान तंत्रज्ञांनी आत्मसात केली आहे!! अमेरिकन पुरवले—पण हे भारतीय नकोत—असे वाटण्याइतपत आमचा लौकिक पसरला आहे!!

रस्त्यात हिंडण्याची बंदी अमेरिकन युगुले बिनतक्रार पाळतात. जाहीररीत्या धूम्रपानाचा निर्बंधही त्यांना मानता येतो. बेकन-हॅमशिवायही त्यांचे चालते. इतकी तडजोड साहेब पत्करतो. कारण तो पक्का व्यवहारी आहे. पोळीचे तूप–तुपाने माखलेली पोळी–त्याला हवी असल्याने तो अवांतर बाबींकडे लक्ष देत नाही. पण आम्ही बनलो आहोत — "अस्सलसे ज्यादा!!" आमची तत्त्वनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्याचा

" अशा अपमानास्पद अटी आम्ही नाही पत्करणार ! "

कित्येक वेळा तर असे असते की, ती तत्त्वनिष्ठ व्यक्ती शुद्ध शाकाहारी, सात्त्विक वृत्तीची, धूम्रपान न करणारी असते. त्या अटींचा प्रत्यक्ष जाच होण्याचा संभव नसताही तत्त्वनिष्ठेसाठी मानाच्या, लाभाच्या, जागा नाकारणारांचे कौतुक कसे करावे ?

ब्रिटिशांची किंवा अमेरिकनांची व्यवहारी तडजोड वृत्ती विशेष उठून दिसते. स्वराज्योत्तर कालात तिचा अनुभव विविध क्षेत्रांत इतका तीव्रपणे जाणवला ! मुंबईच्या एका ' अस्सल ' ब्रिटिश आय. सी. एस्. ने स्वराज्योत्तर नोकरीत राहण्याचे नाकारले. ' इंडियन ' मंत्र्यांची आज्ञा आपणास पाळता येणार नाही, असा त्याचा स्वाभिमानी दावा म्हणून सेवा-निवृत्ती पत्करून हे बडे साहेब स्वदेशी गेले. व्यापारी कंपनीत मोठ्या हुद्द्याचे काम त्यांनी मिळविले. पण योगायोग म्हणतात तो असा ! त्यांना परत हिंदुस्थानात नेमणूक मिळाली आणि तेवढ्यात हिंदुस्थानी ब्रिटिश कंपनीचा नूरही पार पालटला ! अनेक भारतीयांना वरिष्ठ जागा मिळाल्या होत्या. त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने वागण्याशिवाय गत्यंतर नव्हते ! ! पण साहेबाने तडजोड पत्करली. अवघ्या दोन-तीन वर्षांत त्याने आपली वृत्ती पालटली. भारतीयांचा तो पक्का पाठीराखा बनला. जगविख्यात इतिहासकार टॉयन्बी मुंबईस आल्या वेळी ' मुंबईबद्दलचा वाद ' त्यांनी पाहुण्यांना समजावून दिला. महाराष्ट्राची तरफदारी करणारा हा साहेब स्वतंत्र हिंदी सरकारात नोकरी करण्यास तयार नव्हता !

नेमकी हीच व्यवहारी वृत्ती आम्हांस आत्मसात करता येत नाही. अद्यापपर्यंत आली नाही.

आमचे इंग्रजी संभाषण पद्धतीचे अज्ञान आम्ही छान झाकून ठेवतो. आम्हाला साहेबांशी व्यवहार करायचा नाही असे आम्ही डौलाने सांगतो. पण जेव्हा रशियन पाहुणे येतात – हिंदी, उर्दू, पंजाबी, मराठी . . . अशा कुठल्याही भाषेत आमच्याशी बोलू लागतात – तेव्हा आम्ही त्यांची भलावण वेगळ्या प्रकारे करतो. आम्हांला त्यांच्या ह्या भाषाप्रभुत्वाबद्दल आदर, कौतुक वाटत नाही. आम्ही त्यांना ' बेरकी ' म्हणतो. मिळून काय, कुठलाही उपयोगी गुण मिळविण्याची आमची तयारी नसते – तो गुण असा आम्ही मानतच नाही ! ! मग तो अंगी बाणविण्याचा प्रयत्न दूरच !

आमच्या समाजातील हा दृष्टिदोष घालविण्यासाठी काही पथ्ये कडक रीतीने पाळावी लागतील. चांगल्या संवयी लावून घेण्यासाठी पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. वाईट संवयी प्रयत्न न करताही लागतात – पण एकदा जडलेल्या संवयी बदलण्यास विशेष कष्ट पडतात. समाजहितासाठी, राष्ट्रलाभासाठी आपण काही चांगल्या हितकर संवयी जडवून घेतल्या तर आपली भलाई होईल.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकारांनी महाराष्ट्रीय समाजाबद्दल आपले निरीक्षण (स. १९२६) लिहून ठेवले आहे. ते बदलण्याइतकी प्रगती गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत आपण केली आहे काय, याचा विचार ज्याचा त्याने करून पाहावा.

ह्या अवधीतला निम्मा भाग स्वराज्यातला आहे एवढे लक्षात घेतल्यावर प्रगतीचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल. महाराष्ट्राची अस्मिता प्रखरपणे केव्हा प्रकट होऊ लागली, हे देखील कळेल.

महाराष्ट्राची अस्मिता प्रकट झाली आणि अन्याय दूर होऊन महाराष्ट्र राज्य-स्थापना झाली तरी प्रभावी रीतीने महाराष्ट्राची प्रगती साधली नाही. जगातल्या कित्येक राष्ट्रांनी किती तरी खटपट केली—आपल्या समाजाचा कायापालट साधला, तेव्हा आपणांसही ते साधेल.

आपल्या व्यवसाया-व्यतिरिक्त आपणांस दुसरा काही तरी छंद असावा. त्यात मन रमविता येते हे तर खरेच, पण इतरांशी संबंध जोडता येतात. इतरांना सांगण्या-सारखे, इतरांचे मनरंजन करता येण्यासारखे, आपणाजवळ काही तरी असावे. अगदी काही नाही तरी साधी कविता, संस्कृत किंवा मराठी श्लोक म्हणून दाखविता यावा—त्याचा अर्थ इतर भाषीयांना समजावून सांगता यावा. गोष्टी सांगणे, नकला करणे, गाणे म्हणणे, बासरी, तबला वाजविणे, अशी काही तरी आवड आपण वाढवावी. इतरांचे मनरंजन करण्याची ही हिकमत आधी बाळगावी. कारण समाजात मिसळणे, विविध ठिकाणच्या लोकांसमवेत राहणे, हे आता अधिकाधिक अवश्य होणार आहे.

इतरांशी मिसळताना कौशल्य आहे ते इतरांना बोलके करण्यात. आपणच आपली टकळी सारखी सुरू ठेवू नये. पण इतरांना प्रश्न विचारून आपली जिज्ञासा व्यक्त करून बोलणारांची कळी खुलविण्यास शिकले पाहिजे. मुलाबाळांशी बोलताना त्यांच्या आवडीचे विषय निवडावे; त्यांना झिडकारू नये. त्यांना कुठल्याही प्रकारे अवघडल्यासारखे वाटू देऊ नये.

पुष्कळदा होते काय की फॅशनेबल युगुले मुलांचा (विशेषतः ती लहान असली की) कंटाळा करतात. त्यांनी विशेष कुठे ‘ घाण ’ केली तर—अशी फाजील भीती त्यांना वाटते. परंतु घरोघरी मातीच्याच चुली असतात; आमचीही मुले अशी ‘ घाण ’ करतात—म्हणून त्यांना वगळणे बरे नाही असे सांगून मोकळेपणा वाढविला पाहिजे. मुलामुलांचे खेळ करावे, स्पर्धा लावाव्या, पोषाख-स्पर्धांचे कौतुक करावे, अशा प्रकारे सामूहिक जीवन वाढीस लावावे—त्यात अधिक सौख्य आहे—हे खरे जीवन आहे.

‘ आपला तो बाब्या ’ ही वृत्ती अद्याप अनेक कुटुंबांच्या अंगी खिळली आहे. परंतु विशाल मातृत्वाच्या दृष्टीने सर्व मुले सारखी मानायला शिकणे सध्या अत्यावश्यक झाले आहे. मुलांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जवळपासची शाळेतली मुले एकत्र जमवावी; त्यांना नवे खेळ शिकवावे. नवे काही तरी खेळायला, शिकायला, पाहायला मिळेल असे करावे. स्वतःचे तेवढे मनरंजन साधण्यापेक्षा कौटुंबिक, सामाजिक प्रमाणावर ते साधणे हे श्रेयस्कर, असे ओळखून त्याप्रमाणे प्रगती साधावी. आपल्या कर्तबगारीचे क्षेत्रही वाढवीत राहावे. कारण फार अवाढव्य अशी कार्ये आपणांसच पाहावयाची आहेत. त्यांची जबाबदारी आपणांपैकी कुणाला तरी घ्यावी लागणार आहे, हे

ओळखून त्या वाढत्या जबाबदारींचा बोजा सांभाळण्यास त्याने शिकावे. अशी परिस्थिती आपणच आणावयाची आहे. चुका करणाराची कुचेष्टा न करता—चुकांतूनच पुढे यशाची निश्चिती असते, हे उमजून कर्त्याला वाव द्यावा लागतो. चुका करणाराला कर्तबगारी साध्य होईल, पण नुसती बडबड करणाराच्या हातून काही होणार नाही—चुकासुद्धा होणार नाहीत,––हे नीट विचारात घ्यावे. म्हणून केवळ बडबडे आणि कर्तबगार धडपडे असे स्पष्ट विभाग कार्यकर्त्यांचे पडतात. बडबड्यांना कार्यकर्ता तरी का म्हणावे हा प्रश्न पडेल. काहीही असो, कर्तबगारीला उत्तेजन हा सुजनपणाचा गुण साध्य करणे आवश्यक आहे; बडबडून तेजोभंग टाळणे देखील तितकेच आवश्यक आहे. एकंदर समाजहित नेहमी ध्यानात ठेवावे, याचा ध्यास हवा तर घ्यावा, पण केवळ स्वार्थी राहू नये. सर्वांच्या हितात आपले हित समाविष्ट आहे, ही खात्री ठेवावी. असो.

व्यावसायिक कर्तबगारी साधत नाही म्हणून केवळ वैचारिक प्रगतीचा आढावा घेतला तरी गेल्या अर्धशतकात आपण म्हणण्यासारखे काही साध्य केले आहे असे वाटत नाही. आमचे लोकमत म्हणजे वाऱ्याची मोट होय, गवताचे दोरखंड नव्हे. आणि या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे कार्य पुढाऱ्यांनी करावयाचे. पण त्यांनाही ते साधलेले दिसत नाही. म्हणजे महाराष्ट्रात कर्तबगार पुढारीदेखील नाहीत असे समजावयाचे काय ? आणि सामान्य जनता—म्हणजे पुढाऱ्यांचे अनुयायी—कोणत्या प्रकारची आहे हे तर आधीच स्पष्ट झाले आहे.

आमच्यात कोणते दुर्गुण आहेत आणि ते कसे कसे नडतात याची चर्चा सारखी चालू असते. परंतु व्यापक भूमिकेवरून किंवा दोषनिर्मूलनाच्या दृष्टीने विधायक विचार होत नाही असे वाटते म्हणून काही पथ्ये सुचवावीशी वाटतात.

१. कुणाचे दोष पाहण्याऐवजी गुण हुडकावे; दोषांचा उल्लेख न करता गुणांची नोंद करायला शिकावे. गुण आढळले नाहीत तर निदान दोषांचा जाहीर निर्देश करू नये.

२. दुसऱ्याचा उत्कर्ष झाला तर त्याबद्दल मनापासून आनंद झाला पाहिजे. तो आनंद व्यक्त झाला पाहिजे. त्या उत्कर्षाबद्दल त्याचे अभिनंदन करण्याइतपत आनंदाची व्याप्ती हवी.

३. ज्यांच्या बरोबर राहायचे, ज्यांच्या बरोबर काम करायचे, त्यांच्या दुर्गुणांचा उल्लेख कटाक्षाने टाळावा.

४. गैरहजर असलेल्याची टवाळी, निंदा, कुचेष्टा करण्याचा मोह अनावर होतो; तो अजीबात टाळला पाहिजे. दोषरहित मानव असेल त्याने इतरांच्या दोषांची छाननी करावी. अपूर्ण मानवाला इतरांच्या दोषांचा उल्लेख करण्याचाही हक्क नाही, असे मानावे.

५. कुठलेही सत्कार्य असो, त्याला खीळ घालू नये. शक्यतो मदत करावी. निदानपक्षी स्वस्थ राहावे. पण "कुणाला धडा शिकविण्याची" किंवा "खाली,

पाडण्याची " उठाठेव पत्करू नये.

६. चालू लोकशाहीचा जमाना ओळखून, समतेची जाणीव सर्वत्र होत आहे, हे पटवून घेऊन इतरांशी नसत्या ताठ्यानें वागण्याचे सोडून द्यावे. आपल्या घटनेनुसार आपण सर्वजण एकाच देशाचे नागरिक आहोत, हे पटल्यावर कुणाहीपुढे विशेष ताठ्याने मिरविण्याचा फोलपणा समजेल.

७. 'पत्ते' खेळण्यात आपल्या दोन पिढ्या गुंतल्या होत्या, हे लक्षात घेऊन पुढील दोन पिढ्यांना पत्त्यांपासून मोकळीक मिळेलसे करावे. म्हणजे हा वाचलेला वेळ कुटुंबियांसमवेत वनभोजनात, हिंडण्याफिरण्यात, इतरांशी मिसळण्यात, घालविता येईल.

८. "तौलनिक अभ्यास" ही मिळून मिसळून वागण्यासाठी मोठी सबब समजावी. "आम्ही वर्षारंभ असा साजरा करतो. तुमचा कसा असतो ?" ह्या चौकस वृत्तीने मैत्री लवकर जडते. परस्परांची ओळख चांगली होते; दुजाभाव दूर होतो.

९. ज्या नव्या ठिकाणी आपण राहतो, तिथली माहिती मिळवावी. लोकांचा इतिहास धुंडाळावा; देवळे, घाट, मशिदी यांचा तपास करावा. नावाचा अर्थ हुडकावा. एकंदरीने चौकस वृत्तीने शोध चालवावा.

१०. विश्वबंधुत्व सध्याची फॅशन समजून चालायला हरकत नसावी. ओळख करून घेण्यास लाजू नये. जिज्ञासा दडपू नये. माहिती नसेल तर दडपून काही तरी सांगू नये.

११. परकीयांशी बोलताना आपल्या सरकारची, आपल्या पुढाऱ्यांची बाजू घ्यावी. "माझे सरकार, आमचा देश, आमचे पुढारी" अशी भाषा बोलण्यास लाजू नये. "माय गव्हर्नमेंट राइट ऑर रॉंग" हा जप केला तरी बिघडणार नाही. आपल्या आईवडिलांचा अभिमान आपणांस वाटतो तसाच आपल्या सरकारबद्दल, पंतप्रधानां-बद्दल, राष्ट्रपतींबद्दल, वाटला पाहिजे.

ही एकादश पथ्ये पाळली म्हणजे आपली प्रगती झाल्याचे आपल्या सहज लक्षात येईल. ध्येय उंचावले पाहिजे. दृष्टी व्यापक झाली पाहिजे आणि आकांक्षा वाढल्या पाहिजेत – पण त्या सर्वांचा पाया म्हणजे ही एकादश व्रते आहेत. त्यांचा विचार व्हावा एवढीच विनंती.

संयुक्त महाराष्ट्रच नव्हे तर—

अनंत काणेकर

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात चालू होती. त्या वेळी मी म्हटले होते की, ‘ संयुक्त महाराष्ट्र, महागुजराथ, संयुक्त कर्नाटक ’ वगैरे भाषिक राष्ट्रे व्हावीत, केवळ भाषिक प्रांत होऊन भागणार नाही, असेच माझे स्पष्ट मत आहे; आणि त्याचबरोबर यापुढे आता स्वतंत्र भारत, सार्वभौम इंग्लंड, स्वतंत्र अमेरिका अशी स्वतंत्र राष्ट्रे जगात राहण्यात अर्थ नाही,– त्यामुळे जगाला फार मोठा धोका आहे, जगाचे एक मध्यवर्ती राज्य व्हावयाला हवे, असेही माझे मत आहे. ही दोन विधाने परस्पर विरुद्ध वाटतात, पण शांतपणे विचार केल्यास या दोन गोष्टींतच जगाचे हित आहे हे कुणाच्याही ध्यानात येईल.

महायुद्धे का होतात ?

जगात जी दोन भयानक महायुद्धे गेल्या पंचवीस-तीस वर्षांत झाली आणि तिसऱ्या सर्वविध्वंसक युद्धाच्या ज्या छाया आज जगावर बावरत आहेत त्यांच्यावरून विचारवंतांची खात्री पटून गेली आहे, की इतर बारीकसारीक कारणे काही असोत, पुन्हापुन्हा उद्‌भवणाऱ्या या महायुद्धाचे प्रमुख कारण गेल्या शेदीडशे वर्षांत विज्ञानाच्या विकासामुळे सर्व जग एक झाले आहे, पण राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे आता जुनाट झालेले तत्त्व जगाचा एकच व्यवहार होऊ देत नाही, हे आहे. जगाच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकाला आता चोवीस तासांत पोहोचता येते, पण एखाद्या राष्ट्राच्या मनात आले तर आपल्या भूप्रदेशावरल्या आकाशातून दुसऱ्या देशाच्या विमानाला ते जाऊ देत नाही. अमेरिकेकडे ठेवायला जागा नाही म्हणून किंवा योग्य किंमत देणारे गिऱ्हाईक मिळत नाही म्हणून जाळून टाकण्याइतका गहू आहे, पण दुष्काळ पडून कोट्यवधी माणसे तडफडून मरणाची वेळ आलेल्या भारताला अमेरिकन राष्ट्राची खुषी असेल

तरच ते राष्ट्र गहू देणार. भारताला पेट्रोल द्यावयाचे नाही असे अमेरिकेने ठरविले तर आमच्या मोटारी, विमाने, सैन्याचे रणगाडे थंड पडणार.

राष्ट्रीयत्वाची अडगळ

विज्ञानपूर्व काळातल्याप्रमाणे जगातले लोक आता एकमेकांपासून दूर पडलेले नाहीत. पूर्वी काशीतला माणूस पुण्यातल्या माणसाला आयुष्यात एकदा केव्हा तरी भेटण्याची महत्त्वाकांक्षा धरी; आता मुंबई–पुण्यातला माणूस न्यूयार्कमधल्या माणसाला आठवड्यात दोनदा भेटू शकेल. आपण एक पेला चहा घेत असताना आपला सर्व जगाशी संबंध येतो. कपबशा असतात झेकोस्लोव्हाकियातल्या, चहा असतो चीनमधला, साखर असते जावा किंवा क्यूबातली, आणि फक्त पाणी काय ते आपल्या गावातले असते. अशी अनेक उदाहरणे देता येतील. जगातले लोक आता इतके परस्परावलंबी झाले आहेत की, त्या सर्वांनी मिळून आपली काही व्यवस्था केली नाही, तर त्यांना स्वतःची प्रगती करणेच काय, पण जिवंत राहणेही शक्य होणार नाही. म्हणजेच आता अडगळीसारख्या झालेल्या राष्ट्रीयत्वाचा त्याग करून त्यांनी एक मध्यवर्ती जागतिक राज्य प्रस्थापित करायला पाहिजे. अशी काही व्यवस्था आज नसल्यामुळे अत्यावश्यक असलेली एखादी गोष्ट एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राकडून राजीखुषीने मिळाली नाही की जगात युद्धप्रसंग उद्‌भवतो.

या विषयावर अत्यंत विचारपूर्ण असा ग्रंथ लिहिणाऱ्या एमेरी रीव्ह्जने दाखवून दिले आहे की, अमक्या देशात समाजवाद आहे आणि तमक्या देशात भांडवलशाही आहे म्हणून समाजवादी देश युद्ध करणार नाही आणि भांडवलशाही देश युद्ध करील या बोलण्यात काही अर्थ नाही. राष्ट्रीयत्वाच्या चौकटीत समाजवाद असला काय, भांडवलशाही असली काय आणि फाशीवाद असला काय, दोन राष्ट्रीयत्वांची टक्कर ही होणारच आणि तिच्यातून महायुद्ध उद्‌भवणारच. जगातल्या जनतेचे सर्व संबंध आंतरराष्ट्रीय किंवा अतिराष्ट्रीय झाले आहेत. त्यांच्यात अडथळे निर्माण करणाऱ्या राष्ट्रीयत्वाच्या या जुनाट भिंती पाडून जमीनदोस्त केल्याशिवाय युद्धे थांबणार नाहीत; जगाला शांतपणे जगता येणार नाही, असे रीव्ह्जचे म्हणणे आहे. ते कुणालाही पटण्यासारखे आहे.

सत्तेचे विकेंद्रीकरण

राष्ट्रीयत्वाच्या या भिंती पाडून टाकल्या की लहानमोठी स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रे नष्ट होऊन जग हेच एक राष्ट्र होईल आणि त्या राष्ट्रांचा कारभार मध्यवर्ती जागतिक राज्य चालवील. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे राष्ट्र या शब्दाला काही अर्थच उरणार नाही, आणि एक असलेल्या जगाचे एकच राज्य होईल. या जागतिक राज्याची व्यवस्था कशी असेल, त्याचे घटक काय असतील, अतिरिक्त केंद्रीकरण म्हणजे लोक-

शाहीचा अस्त, तेव्हा एकच जागतिक राज्य म्हणजे केंद्रीकरणाची पराकोटी नाही का होणार, इत्यादी प्रश्नांचा आता विचार केला पाहिजे.

केंद्रीकृत सत्ता असली की घटकांना आपले वैशिष्ट्य राखता येणार नाही, सगळ्या जगाचा एकच ठोकळा करण्याकडे प्रवृत्ती होईल हे अगदी खरे आहे. राजकीय दृष्ट्या जगाचे एक राज्य झाले तरी जगाची खरी प्रगती व्हायची असेल,—विद्या, कला, संस्कृती, साहित्य यांचा विकास व्हायचा असेल तर प्रत्येक घटकाला आपले वैशिष्ट्य टिकविण्याचे आणि वाढविण्याचे जास्तीत जास्त स्वातंत्र्य पाहिजे. प्रगती म्हणजे प्रत्येक सूक्ष्म वैशिष्ट्याचा विकास,—म्हणजेच विविधतेचा विकास. सर्वांचा एकच साचा किंवा ठोकळा करणे म्हणजे परागती. आदर्श जगात जर्मनांचे काही विलोभनीय वैशिष्ट्य असेल, जपान्यांचे काही असेल, मराठ्यांचे काही असेल, बंगाल्यांचे काही असेल, गुजरात्यांचे काही असेल तर त्या सर्वांना संपूर्ण वाव मिळाला पाहिजे. तेव्हा एका टोकाला राष्ट्रीयत्वाची ही कल्पना झुगारून देऊन जगाचे एक राज्य करायचे, तर दुसऱ्या टोकाला प्रत्येक घटकाला जास्तीत जास्त स्वातंत्र्य द्यायचे असा हा समतोल सांभाळला गेला पाहिजे.

राष्ट्रांची संख्या वाढेल, पण —

म्हणूनच जगाचे एक राज्य म्हणजे न्यूयार्क, लंडन किंवा कैरो, दिल्ली, जागतिक राज्याची जी कोणती सोयीस्कर राजधानी ठरेल तिथे एकच सरकार बसणार आहे, आणि मुंबईत गटारे तुंबली किंवा शिकागोत दरोडे पडले तर ती गटारे साफ करण्याची किंवा त्या दरोडेखोरांना पकडण्याची सर्व जबाबदारी ते सरकार घेणार आहे, ही कल्पना चुकीची आहे. आज ज्याप्रमाणे ;शहरांचा कारभार नगरपालिका पाहतात, प्रांताचा प्रांतिक सरकारे पाहतात, देशाचा राष्ट्रीय सरकारे पाहतात, त्याप्रमाणेच जे जागतिक प्रश्न आहेत तेवढ्यांचाच जागतिक सरकार विचार करील. फरक फक्त दोनच बाबतींत पडेल. आजच्या यूनोप्रमाणे चर्चा करायची, निर्णय घ्यायचे पण ते अमलात आणण्याची सार्वभौम सत्तामात्र हाती नाही, असे ते जागतिक राज्य असणार नाही. राष्ट्रीय सार्वभौमत्व नष्ट झाल्यामुळे सार्वभौम सत्ता या जागतिक सरकारच्याच हाती असेल. माझ्या मते दुसरा महत्त्वाचा फरक पडायला हवा तो असा की, जागतिक सरकार झाले तरी सोयीच्या दृष्टीने शहरासाठी नगरपालिका, प्रांतासाठी प्रांतिक राज्ये आणि देशासाठी सार्वभौम सत्ता नसलेली पण कामचलावू अशी राष्ट्रीय सरकारे राहतील हे खरे, पण ज्या राष्ट्रात अनेक भाषिक लोक आहेत त्या राष्ट्रांतल्या त्या त्या भाषिक गटाचे स्वतंत्र राष्ट्र जाहीर करून त्याला या जागतिक राज्याचा घटक बनवून टाकावे. रशिया किंवा हिंदुस्थान यांसारख्या दोनतीन राष्ट्रांपुरताच हा प्रश्न आहे, तेव्हा त्यात काही फार कठीण आहे असे नाही. आज बावन्न राष्ट्रे यूनोची सभासद आहेत. त्यांत फार तर पंधरासोळा हिंदुस्थानातल्या राष्ट्रांची आणि दहाबारा रशियातल्या राष्ट्रांची भर पडेल. जागतिक संघराज्याच्या घटक सभासदांची संख्या फार फार तर शंभरापर्यंत जाईल.

परराष्ट्रखाते आणि गृहखाते एकच

पण हेच करणे स्वाभाविक आणि सर्व घटकांच्या विकासांच्या दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते. इंग्लंड, जर्मनी, जपान वगैरे या जागतिक संघराज्याचे सभासद असतील. त्याप्रमाणेच महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, तामीळनाड, बंगाल वगैरे आणि जॉर्जिया, उझबेकिस्तान, ताजिकिस्तान वगैरेही असतील. आजसुद्धा रशियातील युक्रेन आणि बायलोरशिया यांना यूनोचे स्वतंत्र सभासदत्व आहेच. महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, वगैरे स्वतंत्र राष्ट्रे व्हावी, असे मी म्हणतो यात भयंकर काही नाही हे आता कुणाच्याही ध्यानात येईल. कारण राष्ट्र या शब्दाचा मूळ अर्थच बदललेला असेल. राष्ट्र म्हणजे प्रांत नव्हे, जागतिक संघराज्याचा स्वायत्त घटक इतकेच.

हे संघराज्य जागतिक प्रश्नांचाच विचार करील असे वर म्हटले त्याचा थोडा विस्तार केला पाहिजे. आपल्या भारताच्या संघराज्यात काश्मीरसारखे संस्थान ज्याप्रमाणे फक्त तीन बाबींपुरते सामील करून घेण्यात आले आहे, बाकी सर्व बाबींत त्याला स्वातंत्र्य किंवा स्वायत्तता आहे, तसाच थोडासा प्रकार जागतिक संघराज्य आणि त्याचे घटक यांच्या संबंधात असेल. संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्रसंबंध एवढ्या-पुरतीच (१९५१) भारतीय संघराज्याची काश्मीरवर सत्ता आहे. जागतिक संघराज्यात परराष्ट्रसंबंधाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण जगच एक राष्ट्र होते—परराष्ट्र कुठले उरतच नाही. परराष्ट्रखाते व गृहखाते ही एकच होणार. अंतर्गत बंडाळी किंवा उठाव यांच्या बंदोबस्तासाठी एक आंतरराष्ट्रीय सैन्य किंवा आंतरराष्ट्रीय सशस्त्र पोलीस ठेवावे लागतील. मुख्यत्वेकरून जागतिक देवाणघेवाण आणि जगाचे आर्थिक किंवा सामाजिक प्रश्न यांच्याकडेच जागतिक सरकारला लक्ष द्यावे लागेल.

राज्य जगाचे पण घटक प्रदेश भाषिक

या विवेचनावरून हे ध्यानात येईल की, शक्य तितके विकेंद्रीकृत असे स्वतंत्र किंवा स्वायत्त घटक असावेत आणि भाषा हा प्रत्येक घटकाचा पाया असावा. या दोन गोष्टींवर माझा विशेष रोख आहे. लोकशाहीचा आणि विविधतेचा विकास या दृष्टीने शक्य तितके विकेंद्रीकरण आणि प्रत्येक घटकाला स्वायत्तता पाहिजे, हे आपण पाहिलेच. यावर कोणी विचारील की, जास्तीत जास्त लोकशाही किंवा विविधता यांच्यासाठी भाषिक गटापेक्षाही लहान गट का करू नयेत? प्रत्येक माणूस वेगळा असतो. तेव्हा जास्तीत जास्त विकेंद्रीकरण म्हणजे प्रत्येक माणूस स्वायत्त स्वतंत्र होऊ शकेल, हे खरे आहे. पण या बोलण्याला काही अर्थ नाही. माणूस हा समाज करून राहणारा प्राणी आहे. माणूस म्हणून जगण्याकरिता आणि स्वतःचा विकास करून घेण्याकरता त्याला इतरांशी हरतऱ्हेचे सामाजिक, राजकीय, आर्थिक संबंध निर्माण करावे लागतात; आणि तो समाज निर्माण करतो. त्या समाजाचे बरेचसे व्यवहार भाषेनेच चालतात, किंबहुना भाषा नसेल तर माणसाला समाज करून राहता येईल की नाही याचीच शंका आहे.

याच गरजेतून प्रत्येक भाषा निर्माण झाली आहे. जगात जे भाषिक गट आहेत, त्यांच्यापैकी प्रत्येकाचे बरेचसे वैशिष्ट्य त्यांच्या भाषेतून व्यक्त झालेले आहे. त्यांचा बहुतेक सर्व व्यवहार भाषेनेच चालतो. म्हणून जागतिक राज्याचा लहानात लहान घटक हा भाषिक गटच असावा, असे मी म्हणतो.

अशा स्वायत्त घटकांचे जागतिक संघराज्य करायचे एकदा ठरल्यावर मग मध्येच आणखी भारत किंवा रशियासारख्या अनेक-भाषिक अशा फक्त एकदोन राष्ट्रांच्या पोटातल्या, यूरोपमधल्या नार्वे-स्वीडनसारख्या किंवा मध्यपूर्वेतल्या कोणत्याही एक एका राष्ट्रापेक्षा मोठ्या असलेल्या महाराष्ट्र, बंगाल, गुजरात किंवा ताजिक, अझरबैजान, उझबेक या भाषिक गटांना विनाकारण दुय्यम स्थान देऊन अन्याय करण्याचे किंवा बंगाली, इंग्लिश, फ्रेंच, एस्पॅरन्टो जी काय जागतिक व्यवहाराची भाषा ठरेल तिच्याबरोबर आणखी हिंदी किंवा रशियन राष्ट्रभाषा शिकण्याची जबरदस्ती करून भाषाभगिनींत निष्कारण हेवेदावे निर्माण करण्याचे कारण काय? जागतिक संघराज्य आणि संपूर्ण स्वायत्त भाषिक घटक त्यांच्यामुळेच जगात शांतता नांदणार आहे आणि जगाची सांस्कृतिक प्रगती किंवा जगातल्या माणुसकीचा विकास होणार आहे.

विविधतेतली एकता

संतसाहित्यिकांनी शतकानुशतके समृद्ध करीत आणलेल्या भारतातल्या मराठी, गुजराती, कानडी, बंगाली, तेलगु वगैरे गाषा ऐक्याच्या नावाने नष्ट करून एकच राष्ट्रभाषा करू पाहणारे किंवा निरनिराळ्या भाषांऐवजी जागतिक ऐक्यासाठी जगाची एकच भाषा करू पाहणारे हे नुसते वेडेपीरच नव्हेत तर भारताच्या आणि जगाच्या खऱ्या विकासाचे एक नंबरचे शत्रू आहेत. त्यांना ऐक्य नको असून जगाचा एक साचा किंवा एक ठोकळा बनवायचा आहे. एकता ही विविधतेतूनच निर्माण होत असते. मराठी, बंगाली, कानडी वगैरे विविध भाषा आणि त्यांची विविध वाङ्मये; धोतर, मुंडु, पगडी, फेटा, सुर्वार, सल्वार, पातळ, साडी, पैठणी, शेरवानी वगैरे विविध प्रकारची वेषभूषा; पुरणपोळी, इडली, रसगुल्ला, दोशा, घेवर वगैरे विविध पक्वान्ने – या विविधतेतच भारताचे, तसेच जगाचे सौंदर्य आणि वैभव आहे. हे खोट्या एकतेचे पुजारी विविधरंगी फुले नष्ट करून धोत्र्याच्या पांढऱ्या फुलांच्या बागा बनवतील आणि विविध वाद्ये फोडून किंवा तोडून टाकून संगीत म्हणजे फक्त ढोल बडवणे शिल्लक ठेवतील! अनेक रंगांच्या संगतीने एक इंद्रधनुष्य होते किंवा अनेक सुरांच्या मेळाने नादब्रह्म होते याची यांना कल्पना नाही. एकता आणि एकरूपता यातला भेद यांना कळत नाही. म्हणूनच राज्य जगाचे झाले, तरी प्रदेश भाषेचाच राहिला पाहिजे.

विज्ञानयुगातील मराठी अस्मिता

यदुनाथ थत्ते

स्वातंत्र्याच्या उदयाची चाहूल लागली त्याला आता पाव शतक पूर्ण होईल या पाव शतकात वाढत्या अपेक्षांशी तुल्य असा फरक देशात पडला नसला तरी फरक बराच पडला आहे. पोलाद, रसायने, वीज यांचे उत्पादन व वापर यांचे माप हे प्रगतीचे निदर्शक मानले जाते. त्या दृष्टीने देशाने व महाराष्ट्राने बरीच प्रगती केली आहे. सुखसाधनांच्या रूपाने विज्ञान घरोघर पोचले आहे आणि नाथांघरच्या श्रीखंड्या-प्रमाणे ते आता खेड्याच्या शेतकऱ्यांच्या शेतातही पाणी भरू लागले आहे. माणसाच्या हातातील औजारां-उपकरणांप्रमाणे त्याच्या अस्मितेचे, संस्कृतीचे व जीवनव्यवहारांचे स्वरूप बदलते असे म्हणतात. गेल्या पाव शतकाच्या मराठी अस्मितेचा विचार करता आपल्याला काय आढळते ते शोधणे या दृष्टीने मोठे उद्‌बोधक होईल.

मराठी समाजाच्या ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही भागांत सुखसाधनांच्य रूपाने विज्ञानाचा प्रवेश झाला आहे. सहज जरी आपण घरात आणि परिसरात नजर टाकली तरी ही गोष्ट सहज ध्यानी येईल. पन्नास वर्षांपूर्वी ज्या वस्तूंची गणना ‘ चैन ’ या सदरात केली जात होती, त्या वस्तू आता ‘ गरज ’ बनल्या आहेत. विजेचे पंखे, रेफ्रिजरेटर्स, ट्रॅन्झिस्टर्स या गोष्टी पटकन नजरेस येतात. गॅस, वॉशिंग मशिन, प्रेशर कुकर, स्कुटर्स यांची चर्चा चाललेली सतत आढळते. ग्रामीण भागातही आता पंप, पोल्ट्री फीड, हायब्रिड, अमोनियम सल्फेट, पॉवर सप्लाय, ट्रॅक्टर, गॅस प्लँट यांचा उल्लेख साध्या बैठकीतही चाललेला दिसतो. समाजाचा पोत आणि अस्मिता बदलत आहे असे तुलनात्मक दृष्टीने पाहता सहज वाटू लागते. अधिक खोलात जाऊन पाहता मात्र परिस्थिती निराशाजनक असल्याचे आढळून येते. वस्तुरूपाने जीवनात विज्ञानाने प्रवेश केला असला तरी विज्ञानाबरोबर येणारे संस्कार मात्र कटाक्षाने आपण दूरच ठेवले आहेत की काय, अशी शंका येऊ लागते. मराठी अस्मितेच्या स्वरूपात या पाव

शतकात जो फरक पडावयाला हवा होता तसा तो पडलेला जाणवत नाही. विज्ञानाची झूल आम्ही पांघरली आहे, पण आमचे जीवन मात्र जलकमलवत अलिप्तच राहिले आहे!

परवा एक कळकळीचे हरिजन कार्यकर्ते भेटले. ते म्हणाले, "ग्रामीण भागात अस्पृश्यतेचा पाठीराखा वर्ग खरोखर जर कोणता असेल तर तो सधन शेतकऱ्यांचा आहे. हा सधन शेतकरी हायब्रिड पेरतो, नवनवी खते उपयोगात आणतो, टेरिलिनचे कपडे घालतो, फटफट्या त्याच्या दाराशी झुलत असतात, सर्व जगाची खबर पोचविणारे ट्रान्झिस्टर घरागणिक नव्हे तर माणसागणिक येतील की काय अशी शंका येते. विजेचे पंखे पोचले आहेत. रेफ्रिजरेटर्स येऊ लागले आहेत. परंतु ह्या वस्तूंचा वापर करणारे पण संस्कारांच्या दृष्टीने अद्याप जुनेपुराणेच राहिले आहेत. अस्पृश्यांना सामाजिक समतेची वागणूक देण्याला त्यांचाच विरोध असतो. वैज्ञानिक साधनांबरोबर व वस्तूंबरोबर जे संस्कार यायला हवेत, ते काही त्यांनी स्वीकारलेले नाहीत. त्यामुळे परंपरेची चाकोरी त्यांची सुटत नाही. त्यांच्या श्रीमंतीचा प्रभाव लोकांवर पडतो, पण त्यांच्यातील सुजाण व सुबुद्ध व्यक्तींचा मात्र पडताना दिसत नाही."

शहरातील माणसांबद्दल विशेषतः नवा टेक्नोक्रॅट्सचा-तंत्रज्ञांचा जो सधन वर्ग अस्तित्वात आला आहे त्याबद्दल बोलताना असेच एकदा एक गृहस्थ म्हणाले, "हा वर्ग देवभोळा बनत आहे." बुवा-बाबांचे बंड हाच वर्ग पाजळीत आहे, नवससायास, जुने रीतिरिवाज, रूढी-अंधश्रद्धा यांचा या वर्गात फार बोलबाला आहे. साईबाबांना भजणारे पुष्कळ आहेत. सत्यसाईबाबांच्या चमत्कारावर त्यांचा विश्वास असतो. विज्ञानातील कुठल्यातरी अपुऱ्या माहितीच्या आधारे या चमत्कारांचे समर्थन करण्याचा उद्योग ही मंडळी करीत असतात. आइन्स्टाइनने इ = एमसी² हे जे समीकरण मांडलेले आहे त्याचा आधार घेऊन सत्य साईबाबा हे ऊर्जेचे वस्तूंत आपल्या आध्यात्मिक सामर्थ्याने परिवर्तन करतात व अवकाशातून वस्तू निर्माण करतात असा युक्तिवाद ते मांडतात! जर्मन शास्त्रज्ञ हाबर याने हवेतील नैट्रोजन व पाण्यातील हैड्रोजन घेऊन अमोनिया तयार करण्याची एक आश्चर्यजनक पद्धती शोधली व अनेक खतकारखान्यांत तिचा आज जगभर वापर केला जात आहे. त्या पद्धतीचे काहीतरी सत्यसाईबाबा करतात असा भ्रम ही मंडळी निर्माण करतात. सत्यसाईबाबा फक्त मलबार हिलवरच्या लोकांनाच अंगठ्या आणि रत्नजडीत अलंकार का काढून देतात आणि गलिच्छ वस्त्यांत जनावरांसारखे जिणे जगणाऱ्या लोकांकडे त्यांचे लक्ष कसे जात नाही, हा प्रश्न त्यांना कधी सतावीत नाही. अशा महापुरुषांची मालिका देशात असूनही देशाचा अन्नधान्याचा आणि संरक्षणाचा प्रश्न कसा सुटत नाही ही गोष्ट त्यांना बेचैन करीत नाही!

ह्या मंडळींच्या मनोगंडाचा छडा लावता असे दिसून येते की, आसपास दैन्य-दारिद्र्य-विवंचना-रोगराई व अज्ञान माजलेले असताना आपण प्रमाणाबाहेर उपभोग घेत आहोत ह्यामुळे अपराधित्वाची जाणीव त्यांच्या मनात निर्माण होते आणि व्यापक

समाजजीवनापासून आपण अलग पडलो आहोत आणि हे लोक बिथरले तर कोणत्याही क्षणी आपले सर्व वैभव हिरावून घेतील या कल्पनेने ही मंडळी बिभिस्त झालेली असतात. ही बिभिस्तता घालवण्याचे जे विज्ञानानुकूल वर्तन ते स्वीकारण्याची मात्र ह्या वर्गाची तयारी नसते. ते देवदेवस्की व बुवांच्या मागे लागतात.

ग्रामीण भागात पुढारीपण ज्यांच्या हाती आहे तो सधन शेतकरी वर्ग आणि शहर भागात ज्यांच्या हुषारीची छाप आहे असा तंत्रकुशलांचा वर्ग ह्या दोन्ही वर्गांच्या अस्मितेचा आविष्कार युगविरोधी अशा स्वरूपातच होताना दिसतो. ह्या दोन्ही, पुढारीपण करू पाहणाऱ्या समाजघटकांची नजर भूतकाळातच खिळून राहिल्यामुळे भविष्यकाळ घडवण्याला ते स्वतःला अपात्र बनवीत आहेत. स्वतःच्या समृद्धीसाठी व वैभवासाठी ते कोठल्याही वस्तूंची उसनवारी करण्याला तयारच नव्हे तर तत्परही आहेत. पण त्यांच्या जीवनावर त्यांचा संस्कार होऊ देण्याला त्यांची तयारी नाही. ह्या दोन्ही वर्गांच्या अस्मिता भूतकाळावरच विसंबून असल्याने तिचा आविष्कार बहुधा जातीय स्वरूपातच होतो. एकांना मतसंख्येची मग्रूरी चढते, दुसऱ्यांना तंत्रकुशलतेचा अहंकार येऊन घेरतो. मतशक्तीवाल्यांना गुणवत्तेची चाड रहात नाही आणि तंत्रकुशलांना सर्वसामान्य जनतेची पर्वा वाटत नाही. त्यामुळे विज्ञानाच्या आगमनाने ज्या अपरिहार्यता निर्माण केल्या आहेत त्याचे अवधान फारसे कुठे आढळत नाही. ग्रामीण जनतेचा लोकशाही समाजवादाचा उद्घोष ही तंत्रकुशलांना सत्तावंचित ठेवण्याची युक्ती ठरते आणि तंत्रकुशलांचे भारतीय संस्कृतीचे प्रेम म्हणजे संख्येला धाब्यावर बसवण्याचा एक बनाव बनतो.

विज्ञानयुगाने प्रयोगशीलतेला महत्त्व आणून दिले आहे. प्रयोगशीलतेचे दोन अटळ घटक असतात. पहिली गोष्ट म्हणजे आपल्यालाच काय ते अंतिम सत्य सापडले आहे, ह्या अहंतेचा प्रभाव आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रयोगाचा लाभ सार्वत्रिक करण्याची ऊर्मी. इतिहासकाळात ह्या गोष्टीचा प्रभावच राहिल्याने आपल्याकडील विद्यांना गुप्ततेचे बंधन पडले आणि त्या फक्त अभिमान दाखवण्यापुरत्याच उपयोगी ठरल्या. दुसऱ्या बाजूला अहंतेने आपल्याला असे फुगवले की, जगात निर्माण होणाऱ्या नवनव्या गोष्टींचे अवधानच आपले सुटले. याची परिणती गेल्या पंचवीस वर्षांत उधारी—उसनवारी करण्यात झाली आहे. एक तर जुन्या ग्रंथांची उसनवारी करावी किंवा परदेशांची उसनवारी करावी. प्रयोगशीलतेमुळे अस्मितेचा जो सर्जनशील आविष्कार होतो तो येथे कधीच झाला नाही. साहित्यापासून तो यंत्रोद्योगांपर्यंत कोठेही मराठी अस्मितेचा स्वतंत्र आविष्कार झाल्याचे दिसून येत नाही. विचारांच्या क्षेत्रात महाराष्ट्राची मर्दुमकी गाजते असे आपल्याला वाटत असते, पण येथे जुन्या तत्त्वचिंतनाचे भाष्यकार व मीमांसक झाले तरी जगाच्या विचारसमृद्धीत ज्यांच्या कर्तृत्वाची नोंद घ्यावी लागली असे कोणतेही कर्तृत्व आपल्याकडे प्रकट झाल्याचे आढळत नाही.

विज्ञानयुगाने समृद्धीचे दरवाजे सताड उघडे केले आहेत. परंतु ही समृद्धी वाढून

उपभोगण्याची तयारी नसेल तर ती विकृती निर्माण करते, अंगी लागत नाही. विज्ञानयुग म्हणजे वाटून उपभोगण्याचे युग. अमेरिका व रशियासारख्या पुढारलेल्या देशांना त्याची जाण आलेली आहे. 'युनेस्को'सारख्या संघटनांच्या मार्गाने वाटून उपभोगण्याचे कार्यक्रम ते अमलात आणीत आहेत. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या भागांतील मागासलेल्या जनतेला आपल्या बरोबरीने आपण आणले नाही तर विज्ञानाने दाराशी आणलेली समृद्धी आपल्याला उपभोगता येणार नाही, याची वाढती जाणीव त्यांच्यात दिसू लागली आहे. आपल्याकडे दुष्काळ पडला की, त्यांचा जीव कळवळतो आणि आपल्याकडील कोंबड्या कमी अंडी देऊ लागल्या की, त्यांच्याकडील तंत्रज्ञ हवालदिल होतो; पण ' जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात ' असा जप सहाशे वर्षे करीत असूनही त्या देशातील दीनदलितांची कणव कधी आपल्याला वाटली नाही. अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण ही साधी सर्वसामान्यांची वांछा, पण ती तृप्त करण्यासाठी येथे काहीही घडले नाही. गेल्या पाव शतकातही हा मंत्र तितक्याच उत्साहाने व अभिमानाने जपला जात आहे; पण त्या दृष्टीने मराठी अस्मितेने काही आपले वैशिष्ट्य प्रकट केल्याचे दिसत नाही. वाटून उपभोगण्याच्या वृत्तीची पुरेशी जोपासना आपण करीत नसल्याने नाना प्रकारच्या फाटाफुटींनी समाज ग्रस्त झालेला दिसतो, आणि जे मिळण्याजोगे आहे तेही पदरी पडत नाही. परंतु हा विचार अद्याप आपल्या अंगवळणी पडलेला नाही. उलट आपली जात, धर्म, तज्ज्ञता, पैसा, साधने या सर्वांच्या साह्याने इतरांना नागवण्याला कोणाला येथे दिक्कत वाटत नाही. खेड्यातला सधन नागवतो, त्याचप्रमाणे शहरातला बुद्धिमंतही इतरांना नागवतो आणि त्यामुळे द्वेष-मत्सराचे वातावरण येथे कायमच राहिलेले दिसते. शिक्षणामुळे समाजात परिवर्तन होते ह्या अनुभवाला आपण अपवाद ठरू पाहात आहोत. विद्यालये व विद्यापीठे यांची गणनाच जातवारीने येथे केली जाऊ लागली आहे. पुणे विद्यापीठ ब्राह्मणांचे, कोल्हापूर मराठ्यांचे, औरंगाबाद नवबौद्धांचे, जळगावला कधी काळी विद्यापीठ झाले तर ते लेवापाटीदारांचे अशी भाषा खाजगी बोलण्यात ऐकू येते! विज्ञानाने रक्ताच्या चारच जाती आहेत असे सांगितले असले तरी आमची जातिप्रथा अद्यापही रक्तसंबंधाच्या वेटोळ्यातून बाहेर पडलेली नाही.

विज्ञानाने समनुयोगाची अनंत साधने निर्माण केली आहेत. अवकाशयात्रिकाच्या नाडीचे ठोके पृथ्वीच्या पाठीवरच्या डॉक्टरांना ऐकता येतात आणि त्याचे प्रकृतिमान जाणून त्याला योग्य त्या सूचना देता येतात. तिथून छायाचित्रे मिळतात. त्याला पृथ्वीवरील लोकांशी बातचीत करता येते. जग असे पुढे चालले आहे. परंतु या समनुयोगाच्या युगातही आमच्या समाजघटकात किती समनुयोग आहे? नवबौद्ध, मुसलमान, खिश्चन, पारशी, ज्यू आणि भिन्न भाषिक समाजांत समनुयोगाचा फार मोठा अभाव आहे. साधा वरवरचा संबंधही जिथे नाही तिथे सखोल संबंध कुठे येणार? समनुयोगाची साधने आहेत, पण समनुयोगाची तळमळ नाही अशी स्थिती आहे. सत्यनारायणप्रसंगी

आणि लग्नप्रसंगी लाउडस्पीकर्स्, टेपरेकॉर्डस्, ग्रामोफोन रेकॉर्डस् यांचा सर्रास वापर केला जातो, पण तो समनुयोग साधण्यासाठी नसून समनुयोग टाळण्यासाठी जणू असतो. हीच गोष्ट इतर साधनांची. समनुयोगाचे भाषा हे आणखी एक साधन. पण हे साधनही आम्ही विटाळवून टाकले आहे. शब्द समजले तरी अर्थ जाणवत नाही अशी स्थिती आहे! एका गावात अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरता येते किंवा नाही याची चौकशी करायला एक शहरी अधिकारी गेले. अस्पृश्यांकडे पृच्छा करताच त्यांनी सांगितले, 'पाणी वाढत्यात!' त्या अधिकाऱ्याला वाटले त्यांची काही तक्रार नाही. शेवटी त्यांना 'पाणी वाढणे,' आणि 'पाणी विहिरीतून काढू देणे' यातील फरक समजवावा लागला! विज्ञानयुग हे समनुयोगाचे युग आहे, पण मराठी अस्मितेला त्याची जाण नसल्याने विज्ञान वस्तुरूपाने अवतरूनही मराठी समाज एकसंध होऊ शकलेला नाही.

विज्ञानयुग म्हणजे संघटित प्रयत्नांचे युग. परंतु आपल्याकडे एकांडे शिलेदारच बहुत आणि त्यांच्या कर्तबगारीचा उदोउदोही बहुत. चंद्रावर अमेरिकेने माणसे पाठवली. त्यासाठी लाखो लोक एकतानतेने आणि एकवटून कार्य करीत होते. परार्धांश पळाचा किंवा परार्धांश अंश कोणाचा जरी त्यात फरक पडला तरी सारा प्रकल्पच निकामी झाला असता...! परंतु आपल्याकडे शे-दोनशे माणसे अशी एकतानतेने केवळ ज्ञानासाठी खटपट करताना क्वचितच दिसतात. मराठी अस्मिता एकत्र काम करण्याला जणू अडथळा आणते! विश्वकोशनिर्मितीचे कार्य असो, एखादी नावारूपाला आलेली संस्था चालविण्याचे काम असो की साहित्याच्या इतिहासलेखनाचे काम असो, ते एकतानतेने शेवटास गेल्याचे दिसत नाही. जिथे एकोपा असल्यासारखे दिसते तिथे तेज नसते, जिथे तेज दिसते तिथे एकांडे शिलेदारीही दिसते. एकट्याने काम करता येते, पण एकवटून काम करता येत नाही हे मराठी अस्मितेचे जणू व्यवच्छेदक लक्षणच बनले आहे आणि विज्ञानयुगाशी ते विसंगत आहे.

विज्ञानयुग म्हणजे नियोजित प्रयत्नांचे युग. विज्ञानाने अशा काही पद्धती उपलब्ध करून दिल्या आहेत की, पन्नास–शंभर वर्षांनंतरची चाहूल घेता येते आणि ती घेऊन पावले टाकता येतात. वेगवेगळ्या बदलत्या घटकांचा (व्हेरिएबल्स) अंदाज घेऊनही हे करता येते. पण नियोजित प्रयत्नांचा शिरकाव मराठी जीवनात अद्याप झाल्याचे दिसत नाही. भारताचे केले जाणारे वर्णन महाराष्ट्रालाही चपखल लागू होते. 'भारत म्हणजे नियोजनरहित घटकांचे योजना करू पाहणारे राष्ट्र होय!' असे म्हणतात; ते महाराष्ट्रालाही लागू आहे. आपली खेडी आणि शहरे यांच्याकडे वरवर नजर टाकली तरी ही गोष्ट दिसून येईल. पायापुरते पाहून इथले सर्व व्यवहार होतात. वाहतूक, पाणीपुरवठा, घाणीचा निचरा या तिन्ही बाबतींत शहरा-खेड्यांची स्थिती बरीचशी सारखीच आहे!

'इंडिया इज ॲमॉर्फस क्राउड' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे

वर्णन केले होते. 'गर्दी' हेच वर्णन महाराष्ट्रलाही लागू पडते. गर्दीला व्यक्तित्व नसते, गती असली तरी दिशा नसते, सामान्य असे प्रयोजन नसते, गर्दीच्या घटकांचे सेंद्रिय असे संबंध परस्परांशी नसतात. अशा गर्दीचे नियंत्रण करता आले तरी नियोजन करता येत नाही. मराठी अस्मितेची या दृष्टीने छाननी करणे उपयुक्त ठरेल. सोवळ्याच्या मनोवृत्तीतून अद्याप मराठी समाज बाहेर पडलेला नाही. कद आणि पीतांबर नाहीसे झाले असले तरी ती वृत्ती अद्याप कायमच आहे! स्वतःपुरती स्वच्छता, स्वतःपुरते ज्ञान, स्वतःपुरती सोय एवढ्याने आता भागत नाही. इतरांच्या संदर्भातच या गोष्टींना अर्थ असू शकतो, पण मराठी अस्मितेला त्याची पुरेशी जाण नाही.

विज्ञानयुगाने संचयाची व्यर्थता आणि शोषणाची अशक्यता दाखवून दिली आहे. संचय आता समृद्धीचा निदर्शक राहिला नसून, मत्सराला कारणीभूत ठरत आहे. संचयाचा विनियोग सार्वत्रिक हितासाठी करण्याची लाट जगभर उठत आहे. परंतु मराठी अस्मितेला त्याचे भान नाही. विषमता वैराला जन्म देते, वैभवाला नव्हे, ही गोष्ट अद्याप आपल्याला शिकायची आहे. शोषणही दिवसेंदिवस विज्ञानयुगामुळे अशक्य बनू लागले आहे. शोषण कोणत्याही तऱ्हेचे असो ते दिसले की लोकांत तो एक चर्चेचा विषय होतो आणि ते थांबवण्याचे उपाय शोधले जातात. शोषणाने निर्माण होणारी समृद्धी विकृती निर्माण करते. बुद्धिमत्तेचा विकास असो की संपत्तीचा–साधनांचा तो थांबवण्याची चिंता सगळेच वाहू लागतात. ब्रेनड्रेनचा विचार मागासलेली राष्ट्रेच करतात असे नव्हे तर ज्यांच्याकडे ही बुद्धिमता वाहात जाते तेही करतात आणि ही निर्यात थांबली पाहिजे यासाठी उपायही सुचवितात. मराठी मुलखात या दृष्टीने फारसा विचार होताना दिसत नाही. उलट मुंबईला–प्रतिमुंबई जोडून वैभवाला वैराणाची कीड लावण्याचा उद्योग चालू आहे! महालांना गलिच्छ वस्त्यांनी घेरलेले आहे आणि हा फास वाढतच आहे. मुंबईत एका नव्या माणसाची वसणूक होताना ऐंशी हजार रुपयांचा खर्च सार्वजनिक पैशातून करावा लागतो. मुंबईतील एक चौरस फूट जागा महाराष्ट्रातील पन्नास चौरस फुटांना खाऊन फस्त करते. मुंबईतला एक मैल रस्ता ग्रामीण भागातील पन्नास मैल रस्त्यांची वाट लावतो! ग्रामीण भागातला पैसा आणि बुद्धिमत्ता मुंबईकडे वाहतो आणि त्यामुळे खेडी ओसाड होतात आणि मुंबईचे खेदान होते! पण मराठी अस्मितेला त्याचे अवधान दिसत नाही. मुंबईच्या वाढीवर पाण्यासारखा पैसा उधळून ग्रामीण भाग सर्वथैव नागवला जात आहे. महाराष्ट्राची चौथा हिस्सा जनता एका शहरात गर्दी करून राहते याचे वैषम्य कोणाला वाटत नाही. अगतिक झाल्यासारखी माणसे वागतात.

विज्ञानाने पुरुषार्थासाठी अवघे विश्व मोकळे केले आहे. पण मराठी अस्मिता अटकेवर तुरंगांना पाणी पाजण्याच्या गोष्टी अभिमानाने सांगत आपल्या सीमांबाहेर दृष्टिक्षेप करायला फारशी तयार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातच शिवसेना जन्माला येते–वाढते-फोफावते. पंजाबी माणूस आपली वाहने दामटीत आसामच्या जंगलात जातो

आणि कन्याकुमारीच्या सागरमीलनाचेही दर्शन करतो. त्याचे भाषेवाचून आडत नाही किंवा अन्य भाषिकांचे भयही त्याला वाटत नाही. मारवाड्याचे दुकान नेफातही आढळते आणि केरळमध्येही दिसते. तो कधी राजस्थानात इतरांनी आक्रमण केल्याची तक्रार करीत नाही. सिंधी माणूस तिकडे फ्रान्सपर्यंत आणि इकडे टोकिओपर्यंत व्यापारउदीम करतो, आपल्याला एक-भाषिक प्रदेश हवा असे कधी म्हणत नाही. पण सर्व अखिल भारतीय पक्षांत मराठी माणसे वरिष्ठ नेतृत्वात समाविष्ट असताना मराठी अस्मिता मात्र न्यूनगंडाने पछाडलेली दिसते! आपल्याबद्दल इतरांच्या मनात आकस आहे, असा तिला भ्रम होतो. गोळवलकरगुरुजींपासून डांगे-रणदिव्यांपर्यंत आणि विनोबांपासून जयंत नारळीकरांपर्यंतची मंडळी मराठी अस्मितेची न्यूनगंडातून सुटका करू शकत नाहीत. हे केवढे आश्चर्य आहे! विज्ञानाने जी नवी क्षेत्रे उपलब्ध करून दिली, त्यांची जाणीव असती तर मराठी अस्मिता वेगळ्याच रूपात चमकली असती. अंड्यातल्या पिलाने सुरक्षिततेच्या लोभाने बाहेर येण्याचे नाकारून मरण ओढवून घ्यावे तशी आज मराठी अस्मितेची स्थिती झाली आहे.

विज्ञानाने सर्व महापुरुष जगाच्या मालकीचे बनवले आहेत आणि सर्वसामान्य माणसे जगाच्या चिंतेचा विषय बनवली आहेत. त्यामुळे कार्ल मार्क्स असो की महात्मा गांधी असो, मार्टिन ल्यूथर किंग असो की हेडेकी युकावा असो जगाला त्यांचा वारसा मिळतो. आणि भारतातला बिहारचा भुकेकंगाल असो की आफ्रिकेतला कांगो लिपिविहीन असो त्याची चिंता अवघे जग वाहू लागते. मराठी प्रदेशात मात्र म. फुल्यांची जयंती माळी, डॉ. आंबेडकरांची जयंती नवबुद्ध, लो. टिळकांची पुण्यतिथी ब्राह्मण उत्साहाने साजरी करताना दिसतात! मराठी समाजाची दैवतेदेखील अद्याप जातींना उल्लंघून सर्व समाजाची समान दैवते बनलेली नाहीत, आणि सामान्य माणूस सर्वांच्या चिंतेचा विषय अजून बनल्याचे दिसत नाही. अद्याप जातिगणिक गृहनिर्माण संस्था स्थापन होत आहेत, जातिविशिष्ट वसतिगृहे चालत आहेत, आणि पाठ्यवेतने दिली जात आहेत. मराठी अस्मितेला विज्ञानयुगाचा स्पर्श झाला असता तर गेल्या पंचवीस वर्षांत ही स्थिती अशीच कायम राहिली नसती.

विज्ञानयुग म्हणजे आस्तिक्याचे युग. आस्तिक म्हटला म्हणजे देवदेव करणारा, टिळेमाळा लेवून वावरणारा, नवससायास करणारा, गाईची शेपटी तोंडावरून फिरवणारा, देव दिसला की जोडे काढून हात जोडणारा अशी आपली रूढ कल्पना. पण असला मनुष्य आस्तिक नसून नास्तिक असतो! कुणीतरी कधीतरी, कुठेतरी अंतिम सत्य सांगून टाकले आहे. आपण फक्त आता त्यावर अंमल करायचा अशी यांची समजूत असते. परमेश्वर आता खुद्दक बसला असून नवनिर्मितीची, नवा आविष्कार करण्याची त्याची शक्ती संपुष्टात आली आहे असेच अप्रत्यक्षपणे ही मंडळी सुचवीत असतात! आस्तिक्याच्या नावाने वावरणारी ही नास्तिकता भयंकरच आहे. ही नास्तिकता अविश्वासाला जन्म देते आणि परस्परांबद्दल अविश्वास बाळगणारा

समाज कधीही एकसंध होऊ शकत नाही. भूतकाळावरून भविष्यकाळाचे आडाखे बांधणारा समाज अगतिक व वैफल्यग्रस्त बनतो. मराठी समाजाचे तसेच काही झाले आहे की काय अशी शंका येते.

वस्तुरूपाने वा सुखसाधनांच्या रूपाने विज्ञान अवतरून भागत नाही. त्यांचे सहचरी भाव आणि संस्कार उमदेपणाने स्वीकारले पाहिजेत. ते स्वीकारल्यावाचून मराठी अस्मिता लखलखीतपणे तळपू लागणार नाही. ती तशी तळपू लागली की ती अस्मिता मराठी राहणार नाही, ती मानवी अस्मिता बनेल.

विज्ञानाभिमुख महाराष्ट्र

मधुकर ना. गोगटे

भूमिका

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची विविध क्षेत्रांत प्रगती झाली आहे. भारतात १९५० साली विज्ञान, तंत्रज्ञान व वैद्यक यांचे २ लाख पदवीधर होते. १९७० साली ही संख्या १२ लाख झाली. अशा प्रकारची संख्यावारी देशातील उत्पादन, संशोधन यांच्या बाबतीतही देता येईल, पण आकडेवारीवर या लेखात भर द्यायचा नाही. आकडेवारी-वरून प्रगतीचा अंदाज येईलच, पण जनतेच्या अंतरंगाचा बोध होईल असे नव्हे. ' त्याने सर्व झाडे मोजली, पण ते रान आहे हे त्याच्या लक्षात आले नाही. ' अशा अर्थाची इंग्रजीत एक मार्मिक म्हण आहे ! महाराष्ट्रात ललितसाहित्य व संगीतनाट्य या कलांबद्दल प्रेम आहे. ही आस्था मोजण्यासाठी हाऊसफुल्ल नाटकांची संख्या, पुस्तक-विक्रीची संख्या अशा प्रकारची आकडेवारी जमविता येईल. पण तसे न करताही जनतेचे अंतरंग प्रत्ययास येते. विविध थरांतल्या लोकांशी चर्चा करून, सभासंमेलनातील परिसंवादांचे परिशीलन करून, वृत्तपत्रांतील विचारप्रदर्शन लक्षात घेऊन जनमानसाचे एक चित्र बनवता येते.

महाराष्ट्र हा भारताचाच एक भाग असल्यामुळे भारताची जशी प्रगती झाली, तशी महाराष्ट्राची झाली हे स्पष्ट आहे. साहित्यासारख्या काही क्षेत्रांत केवळ महाराष्ट्राचा विचार करता येतो. मराठी वाङ्मयात कोणते प्रयोग होत आहेत, कोणते साहित्य श्रेष्ठ आहे हे स्वतंत्रपणे अभ्यासिता येते. पण विज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवरूनच विचार करावा लागतो. भारतात पहिले अणु-वीजकेंद्र महाराष्ट्रात तारापूर येथे सुरू झाले, हा काही महाराष्ट्राचा पराक्रम नसून राष्ट्रीय पातळीवर निर्णय घेताना, साधन-संपत्तीचा विचार केल्यावर महाराष्ट्रातील तारापूर हे ठिकाण पहिले पाऊल टाकण्यास

नियोजकांना योग्य वाटले. राजस्थान व तामीळनाडू या राज्यांतही आता अशा केंद्रांची उभारणी होत आहे, म्हणजे विज्ञानाच्या अमुक क्षेत्रांत महाराष्ट्र आघाडीवर आहे असे म्हणता येणार नाही. सबंध राष्ट्राचाच तेथे विचार करावा लागेल. तथापि, जनमानसाचा विचार करताना महाराष्ट्र एवढे मर्यादित क्षेत्र स्वीकारणे सोयीचे आहे. आकडेवारी जमवून निष्कर्ष काढण्याऐवजी 'मला उमजलेला महाराष्ट्र' या भूमिकेवरून या लेखात काही विचार मांडले आहेत. महाराष्ट्रातील विज्ञानविषयक कार्याचा येथे फारसा विचार नसून, वैज्ञानिक प्रवृत्तींचे येथे दर्शन घेतले आहे.

महाराष्ट्राच्या रुचि

दुसऱ्या महायुद्धात जर्मनी व जपान हे देश बेचिराख झाले. पण भूमी उद्ध्वस्त झाली तरी तेथील नागरिकांची मनोभूमी शाबूत राहिली. त्यांचे उद्योगप्रेम व विज्ञान-प्रेम हे गुण नष्ट झाले नाहीत, व त्या गुणांवर ती राष्ट्रे पुन्हा वैभवाच्या शिखरावर चढली. आपण कल्पना करू की, महाराष्ट्रावर बॉंबवर्षाव होऊन प्रदेश बेचिराख झाला तर येथील नागरिकांचे पुनरुत्थान कोणत्या स्वरूपात होईल ? कोणत्या रुची पुन्हा प्रकट होतील ? महाराष्ट्रीयांचे देशप्रेम व भाषाप्रेम टिकून राहतील असा एक अंदाज करता येतो. राजकीय आपत्ती आल्या असताना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ कशी यशस्वी झाली, हा इतिहास ताजा आहे.

महाराष्ट्रात अनेक कारखाने आहेत, संशोधनसंस्था आहेत, विज्ञानाची महा-विद्यालये आहेत. पण मराठी भाषिकांना विज्ञानाविषयी जिव्हाळा आहे काय ? आपला समाज अनेक वैज्ञानिक साधने वापरतो, पण समाजामध्ये विज्ञाननिष्ठा आहे काय ? या प्रश्नांना होकारार्थी उत्तर देता येणार नाही, पण त्या दिशेने वाटचाल होत आहे असे जरूर म्हणता येईल. महाराष्ट्रीय समाजात विज्ञानप्रेम रुजायला सुरुवात झाली आहे.

समाजामध्ये कोणत्याही रुची, प्रवृत्ती निर्माण व्हायला धडाडीचे प्रवर्तक लागतात, व काही काळही जावा लागतो. महाराष्ट्राचे संतवाङ्मयावर फार प्रेम आहे. पण सातशे वर्षांपूर्वी संतसाहित्य अस्तित्वात नव्हते, आपली भाषादेखील लेखनात नव्हती. परमार्थाचे विचार समाजाच्या भाषेत आणणारे प्रवर्तक पुढे निर्माण झाले. त्यांच्या काळात त्यांचा छळच झाला, पण अखेर काही काळानंतर त्यांचे अभंग, श्लोक समाजपुरुषाच्या रक्ताचाच भाग बनून गेले आहेत. महाराष्ट्रात नाट्यकलेविषयी मोठी आस्था दिसून येते. पण दीडशे वर्षांपूर्वी मराठी भाषेत नाटक नव्हते. नाटकाच्या व्यवसायात जाणे म्हणजे एकेकाळी अप्रतिष्ठा मानली जाई. पण जिद्दीचे कलावंत लाभल्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात आता नाट्यकलेला मोठा मान मिळाला आहे.

महाराष्ट्रीय समाजात आज विज्ञानप्रेम, विज्ञाननिष्ठा दिसली नाहीत तरी कालांतराने त्यांचा वटवृक्ष झालेला दिसणार आहे. बीज रोवले गेले आहे. विज्ञानाबद्दल समाजाला

आपुलकी वाटण्यास काही काळ लागणे स्वाभाविक आहे. मुलाला आईबद्दल प्रेम निसर्गतः वाटते, पण पोषणकर्त्या बापाबद्दल जिव्हाळा वाटण्यास काही काळ लागतो. आपणांस आज भाषाप्रेम जितके आहे, तितके विज्ञानप्रेम नाही ही एक स्वाभाविक अशीच गोष्ट आहे.

विज्ञानामागची प्रेरणा

विज्ञानामुळे आपले जीवन सुखसोयींनी भरून गेले आहे. विज्ञानावाचून आपण आता जगूच शकणार नाही. अन्नपदार्थ, वस्त्रप्रावरणे, इमारती, औषधोपचार, वाहने, करमणुकीची साधने इत्यादी सर्व क्षेत्रांत विज्ञानाने क्रांती घडवून आणली आहे. अधिक सुखसोयी निर्माण करणे ही विज्ञानामागची मुख्य प्रेरणा आहे. या प्रेरणेमागे काही उपप्रेरणा असतात. एखादा कारखानदार नवीन प्रकारचे वैज्ञानिक साधन बाजारात आणतो, तेव्हा संपत्तिलाभ ही त्याची मुख्य प्रेरणा असते. एखादा संशोधक अज्ञात अशा पदार्थांचे किंवा क्रियेचे विश्लेषण करतो, तेव्हा ज्ञानलाभ ही त्याची मुख्य प्रेरणा असते. एखादा डॉक्टर रोग्यावर कष्टपूर्वक विशेष प्रयोग करतो तेव्हा त्यास मानवतेची प्रेरणा असते. एखादा देश अवकाशात काही करामत करतो, तेव्हा सर्वप्रथम विक्रम करण्याची त्यामागे प्रेरणा असते. या विविध उपप्रेरणांची काटेकोर विभागणी करता येणार नाही. एकाच वेळी निरनिराळ्या उपप्रेरणांनी प्रभावित होऊन काही कार्य होत असते. या उपप्रेरणा एकमेकांस पोषक झाल्या की समाजात सुखसोयी निर्माण होतात, व अशा सुखसोयी निर्माण करणे ही विज्ञानाची प्रेरणा आहे असे एकत्रितपणे म्हणता येते.

या उपप्रेरणांचे संतुलन झाले नाही, त्या जर परस्परपूरक ठरल्या नाहीत, तर आपत्ती येतात. केवळ ज्ञानाची उपप्रेरणा असली, पण मानवतेची उपप्रेरणा नसली तर विनाश होऊ शकतो. अणुस्फोटाच्या शेकडो चाचण्या केल्या तर अणुविषयक ज्ञानात भर पडेल हे खरे असले तरी त्यामुळे मानवजातीला धोका निर्माण झालेला असतो. केवळ संपत्तीची उपप्रेरणा असली व मानवतेची उपप्रेरणा नसली, तर समाजाच्या चांगल्या रुची बिघडवणाऱ्या वस्तू बाजारात येतील, किंवा एखादा कारखानदार कामगारांचे शोषण करून त्यांना यंत्राचे गुलाम बनवील. केवळ मानवतेची उपप्रेरणा असली, व संपत्तीची उपप्रेरणा नसली तर कर्मचारीफुगवटा होऊन कार्यक्षमता कमी होईल.

या उपप्रेरणा योग्य प्रमाणात राहाव्यात म्हणून समाजाला शिक्षण मिळावे लागते, काही कायदे करावे लागतात. तथापि, इतके करूनही उपप्रेरणांचे संतुलन होत नाही. मग कधी बेकारी उद्भवते, कधी युद्ध निर्माण होते आणि सारा दोष विज्ञानाच्या माथी मारला जातो. विज्ञानामुळे खरोखरीच सुख मिळते काय? अमेरिकेसारख्या संपन्न देशात हिप्पी निर्माण झाले यावरून विज्ञान मनःशांती देऊ शकत नाही, हे सिद्ध होऊ शकत नाही काय? खरे सुख कोठे आहे? असे प्रश्न मग विचारले जातात. सुख हे बाह्य नसून आंतरिक असायला पाहिजे व विज्ञानापेक्षा अध्यात्माची उपासना अधिक

व्हायला पाहिजे, असे विचार मांडण्यात येतात. महाराष्ट्रात एक संतपरंपरा होऊन गेली असल्यामुळे व आजही अनेक अभ्यासक अध्यात्मावर चिंतन करीत असल्यामुळे अध्यात्माला महाराष्ट्रात एक विशेष महत्त्व आले आहे. म्हणून विज्ञान व अध्यात्म यांच्यात संघर्ष आहे काय, हे पाहिले पाहिजे.

विज्ञान व अध्यात्म

सृष्टीचे आपणास जे ज्ञान होते ते सत्य आहे काय ? आपली ज्ञानेंद्रिये, आपले मन आपली काही फसवणूक तर करत नसतील ? सृष्टीचे नियम कोण करतो ? अशा अनेक मूलभूत शंका प्रत्येक विचारी मनुष्याला पडतात. भारतात प्राचीन काळापासून या प्रश्नांचा शोध घेण्याचे प्रयत्न झाले आहेत. या प्रश्नांचे उत्तर बाह्य अनुभवावरून किंवा बुद्धीच्या साहाय्याने मिळत नाही, मिळणार नाही, त्यासाठी आंतरिक शक्ती प्रेरित केली पाहिजे असे अध्यात्मशास्त्राचे म्हणणे आहे. ही आंतरिक शक्ती विकसित करण्यासाठी मार्ग वेगवेगळे सांगितले आहेत. ध्यान, भक्ती, अनासक्त क्रिया वगैरे ते मार्ग आहेत.

मनुष्यात अशी आंतरिक शक्ती वास करते हे वैज्ञानिकांनाही मान्य असते. स्फूर्ती, प्रतिभा यांचे स्पष्टीकरण वैज्ञानिक बुद्धिवादाने होत नाही. वैज्ञानिकांना सृष्टीची काही रहस्ये समजली असली, तरी सृष्टीचे स्वरूप अथांग आहे याची नम्र जाणीव वैज्ञानिकांस असते. आंतरिक शक्तीचा विकास करून सृष्टीचे स्वरूप काही प्रमाणात जाणून घेणे शक्य आहे, याबाबतही अनेक आधार आहेत.

सृष्टीचे ज्ञान करून घेणे हाच अध्यात्म व विज्ञान यांचा हेतू आहे. पण या दोघांचे मार्ग वेगवेगळे आहेत. अध्यात्म व्यक्तिनिष्ठ आहे, याउलट विज्ञान वस्तुनिष्ठ आहे. अध्यात्माचा अनुभव आत्मबोधाने घ्यावा लागतो, याउलट विज्ञानाचे अनुभव कुणालाही प्रयोगसाध्य आहेत. अध्यात्माचे शस्त्र म्हणजे प्रेरणा व श्रद्धा. विज्ञानाचे शस्त्र म्हणजे प्रयोग व बुद्धी.

अध्यात्म हा विषय श्रेष्ठ आहे, पण अध्यात्माचा मार्ग बुद्धीपेक्षा प्रेरणेवर भर देणारा असल्यामुळे अध्यात्माचा खरा साधक कोण आहे याचे बाह्यतः आकलन होत नाही. त्यामुळे अनेक उत्तम साधकांचा समाजाकडून उपहास झाला आहे व अनेक दांभिकांचा साधुपुरुष म्हणून समाजात गौरव झाला आहे. या दांभिक लोकांच्या आहारी अनेकजण जातात. अध्यात्म मोहबंधनापासून दूर राहते, कारण सत्यज्ञान होण्याआड मोहबंधने येतात. असे असूनही, कित्येक भोंदू साधुत्वाचा आव आणतात, व मोहपाशात देखील पुरेपूर आसक्त असतात. तरीही ‘ अनासक्तपणे मोहात कसे पडावे ’ याचेच हे प्रात्यक्षिक असावे, अशी भोळी समजूत करून त्या भोंदूंच्या मागे समाज जमतोच ! अध्यात्मशास्त्र श्रेष्ठ असले तरी त्याची ही शोकांतिका आहे. समाजात बुवाबाजी निर्माण होते, त्याचे मूळ कारण अध्यात्म नाही. किंबहुना, अज्ञानातून बाहेर येण्यासाठीच अध्यात्माची धडपड असते. पण अध्यात्माच्या लांबलचक बाता मारून स्वार्थ साधणे

मात्र भोंदू लोकांस फावते.

बुवाबाजीबरोबर अंधश्रद्धा, दैववाद, धर्मभोळेपणा हे सर्व आलेच. बुद्धीला प्रमाण न मानता गुरूच्या शब्दाला प्रमाण मानले पाहिजे असा दंडक केला जातो. भक्तीच्या मार्गात सांगितलेल्या काही उपचारांचे मूळ प्रयोजन विसरले जाऊन उरतात त्या मात्र उपद्रवी रूढी! ग्रंथवचनांचा बरावाईट अर्थ काढला जाऊन समाजजीवन विकृत होते.

महाराष्ट्रात बहुधा प्रत्येकाच्या मुखावर ज्ञानदेव, तुकाराम, रामदास या श्रेष्ठ संतांची वचने आहेत. मराठी भाषेला संतसाहित्याचे मोठे तेजस्वी लेणे मिळाले आहे. पण इहलोकापेक्षा परलोकाचा जास्त विचार करणाऱ्या अध्यात्मामुळे, व त्याला जोडून येणाऱ्या दैववाद, निष्क्रियता, अंधश्रद्धा यामुळे आपल्याकडे भौतिक प्रगतीची प्रेरणा निर्माण होत नव्हती. अशी प्रेरणा नसल्यामुळे विज्ञानाचा उदय आपल्याकडे होत नव्हता, तो आता होऊ लागला आहे. महाराष्ट्राच्या मानाने मागासलेल्या हिंदी भाषिक राज्यांत अद्यापि पौराणिक, अंधश्रद्धायुक्त कथांना वाहिलेली मासिके व पुस्तके अफाट लोकप्रिय आहेत. त्या मानाने महाराष्ट्रात अधिक जागृती आहे.

अध्यात्मामुळे मनःशांतीचे, नीतीचे, शीलवर्धनाचे, सहृदयतेचे काही संस्कार मनावर होतात. अध्यात्माचा वारसा आपण टिकवून ठेवला पाहिजे; पण अंधश्रद्धा, बुवाबाजी यांच्या आहारी मात्र जाता कामा नये. म्हणजे, अध्यात्म व विज्ञान यांचा मधुर संगम आपण घडवून आणला पाहिजे. पारमार्थिक व भौतिक या दोन्ही क्षेत्रांत आपली प्रगती व्हायला हवी. असे म्हणतात, की प्राचीन भारतात अध्यात्म व विज्ञान या दोन्हींना बहर आले होते. आध्यात्मिक संस्कारामुळे विज्ञानाचा दुरुपयोग होणार नाही व वैज्ञानिक संस्कारामुळे अध्यात्माचा दुरुपयोग होणार नाही. गीतेचा पहिला भाष्यकार संजय गीतेच्या शेवटी जो भाष्यरूपी श्लोक सांगतो तो आशयपूर्ण आहे. जीवनात कोण विजय मिळवील ? यत्र योगेश्वरो कृष्णो, यत्र पार्थो धनुर्धरः—असा पक्षच विजयी होईल. म्हणजे योग व उद्योग यांचा संगम होईल तेथेच विजयश्री येईल. अध्यात्म व विज्ञान यांचा संयोग करा. जणू असाच संदेश संजयाने हजारो वर्षांपूर्वी देऊन ठेवला आहे !

विज्ञानाचे संस्कार

विज्ञानामुळे भौतिक प्रगती होतेच, त्याशिवाय मनावर काही संस्कारदेखील होतात.

विज्ञानाची एक पद्धती असते. कोणतीही समस्या घेतल्यावर तिच्यासंबंधी समग्र माहिती जमवायची. कोणतेही पूर्वग्रह न ठेवता या माहितीचे पृथक्करण करायचे, काही प्रयोग करायचे, प्रयोगात अपयश आले तरी खचून न जाता अपयशातून बोध घ्यायचा, कार्यकारणभावाची उपपत्ती लावायची, या उपपत्तीच्या आधारे अन्य काही घटनांचे स्पष्टीकरण होते का हे बघायचे, अशी विज्ञानाची पद्धत असते. ही पद्धत आपल्या मनावर बिंबली, तर वैज्ञानिकच नव्हे तर अन्य समस्या, रूढी इत्यादींचा देखील शास्त्रीय विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

विज्ञानामुळे विराट विश्वाचे दर्शन मानवाला झाले आहे. नुसत्या डोळ्यांना फार तर पाच हजार तारे दिसू शकतात, पण वैज्ञानिक उपकरणांनी लाखो ताऱ्यांचे विश्व माणसास दाखविले आहे. त्याचप्रमाणे, अतिसूक्ष्म कणांचेही विश्व आता माणसापुढे प्रकाशित झाले आहे. सृष्टीचा हा अफाट पसारा पाहिल्यावर व अथांग सृष्टीतही काही नियम आहेत हे पाहिल्यावर आपल्या मनात विनम्रता निर्माण होते.

विज्ञान हे व्यक्तिनिरपेक्ष आहे. विज्ञानामध्ये विभूतिपूजा नाही. शत्रूनेदेखील वैज्ञानिक करामत करून दाखविली, तर त्याबद्दल त्याची पाठ थोपटली जाते. धर्मनेत्यांचे, राजकारणी मंडळींचे वाढदिवस, जयंती, पुतळे वगैरे मानसन्मान होतात, तसे वैज्ञानिकांचे होत नाहीत. एखाद्या वैज्ञानिकाची मीमांसा चूक आहे असे सिद्ध करणारे आधार मिळाल्यास ते मांडण्यास विज्ञानवर्तुळात विरोध होत नाही.

विज्ञानाने सृष्टीतली अनेक रहस्ये प्रकाशात आणली आहेत. इतकेच नव्हे, तर काही अंशी सृष्टीवर विजयही मिळविला आहे. पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण भेदून मानव चंद्रावरही जाऊन आला आहे. सृष्टीचा अज्ञात भाग बघण्याची एक ईर्षा मानवी मनात त्यामुळे निर्माण झाली आहे. ही ईर्षा मुळातच असली तर नव्या करामतींमुळे ती आणखी वाढत जाणार आहे.

विज्ञानामुळे अनेक वेडगळ कल्पना, मानवनिर्मित भेदभाव फोल ठरले आहेत. कोणत्याही मनुष्याच्या शरीरात नव्वद टक्के पाणी असते असे सिद्ध करून जन्मजात उच्चनीचतेच्या कल्पनांवर विज्ञानाने घाला घातला आहे. सृष्टीतील अनेक रहस्ये उघडकीस आल्याने सत्याकडे मानवाची काही पावले पडली आहेत. सत्य शोधनाचे त्यामुळे एक वातावरण तयार होऊ लागले आहे.

विज्ञानामुळे जीवनात एक गतिमानपणा निर्माण झाला आहे. वैज्ञानिक साधनांमुळे संवयी बदलल्या आहेत. जग जवळ आले आहे, जीवन एक प्रकारे ढवळून गेले आहे. स्थितिप्रेम चालणार नाही, असा विज्ञानाने एक संदेश दिला आहे.

विज्ञानाचे हे संस्कार प्रत्येक वैज्ञानिकाच्या किंवा समाजाच्या अंगवळणी पडले असतात असे मात्र नाही. संस्कार हे सुप्त मनावर होत असतात, व ते हळूहळू होतात. त्यांची फळे काही वर्षांनंतर अथवा पुढील पिढीत दिसून येतात. अध्यात्माचे, साहित्याचे, कलाक्रीडांचे देखील संस्कार होत असतात, पट्टीचा खेळाडू स्वभावाने खिलाडू असतोच असे नाही. पण एकंदरीत, क्रीडाक्षेत्रामुळे जीवनावर खिलाडूपणाचा संस्कार होतो असे आपण म्हणतो, त्याचप्रमाणे वैज्ञानिक संस्कारांच्या बाबतीत आहे. समाजावर हे वैज्ञानिक संस्कार पडायला हवेत, त्याशिवाय नीतीचे, रसिकतेचे, कलाक्रीडांचे, मानवतेचे संस्कारही व्हायला हवेतच.

वैज्ञानिक दृष्टिकोण

वैज्ञानिक साधनांचा प्रसार आता खेड्यांतून देखील होऊ लागला आहे. शहरांतून

रेफ्रिजरेटर, टेलिफोन अशी साधने दिसतात तितकी खेड्यांत नसली तरी रेडिओ, विजेचे दिवे, पाण्याचे पंप अशी साधने अनेक खेड्यांत वापरली जातात. खते, बी-बियाणे पॉलिथिलीनच्या पिशवीतून आता शेतकऱ्याला मिळू लागली आहेत. विज्ञानामुळे गृहजीवनात परिवर्तन झाले आहे. चूल फुंकण्यात गृहिणींचा कितीतरी वेळ पन्नास वर्षांपूर्वी जात असे. आता सिलिंडर गॅसमुळे गृहिणींची सोय वाढली आहे.

वैज्ञानिक साधनांचा उपयोग प्रत्यही वाढत असला तरी ही साधने कशी काम करतात, त्यांत काही सुधारणा करता येईल काय, ती बंद पडल्यास दुरुस्त कशी करायची याची जिज्ञासा समाजात फारशी दिसत नाही. एकप्रकारे विज्ञानावर अंधश्रद्धा ठेवूनच या साधनांचा वापर केला जातो. जिज्ञासा ही विज्ञानास पोषक. अंधश्रद्धा ही विज्ञानास मारक. मग विज्ञानाचा उपयोग अंधश्रद्धेने का होतो ? हा एक प्रश्न.

विज्ञानाचे अनेक संस्कार होतात, याचा वर निर्देश झाला आहे. विज्ञान हे बुद्धिवादी असल्यामुळे जीवनातील सर्व प्रश्नांचा विचार चिकित्सक, वैज्ञानिक दृष्टिकोणातून करण्याची प्रवृत्ती निर्माण व्हायला हवी. संस्कार घडण्यासाठी काळ लागतो हे मान्य करूनही, आपल्या समाजात अंधश्रद्धेचे व रूढींचे इतके प्राबल्य का हा दुसरा प्रश्न आपणास पडतो.

विज्ञानाची प्रगती व्हायला प्रयोगशाळा लागतात, द्रव्य लागते हे सर्वमान्य आहे. पण त्यांचा वापर करणारे संशोधक कसे आहेत त्यावरच विज्ञानाची प्रगती अवलंबून असते. १९६५ च्या भारत–पाक संघर्षात पाकिस्तानकडे उत्कृष्ट पॅटन रणगाडे होते. गणकयंत्राने चालणाऱ्या उत्कृष्ट तोफा या रणगाड्यांत होत्या. तथापि पाकिस्तानी सैनिकांना हे रणगाडे कसे चालवायचे याचे नीट ज्ञान नसल्यामुळे, व युद्धनीती नीट न समजल्याने, ते रणगाडे निरुपयोगी ठरले. तसाच प्रकार प्रयोगशाळांच्या बाबतीत होऊ शकतो. प्रयोगशाळा अद्ययावत यंत्रे व साधने यांनी परिपूर्ण असली तरी तिचा वापर करणारा जिज्ञासेने व बुद्धिवादाने पेटलेला नसेल तर ती यंत्रे, ती साधने निरुपयोगी ठरतील. वैज्ञानिक पदवी ही जिज्ञासेची व वैज्ञानिक दृष्टिकोणाची द्योतक असतेच असे नाही. वस्तुतः पदवी ही प्रवृत्तिनिर्देशक असायला हवी, पण आपले शिक्षण परीक्षार्थी असल्यामुळे ज्ञान व संस्कार यांपासून पदवीधर वंचित होतो. आपल्याकडे अनेक उत्कृष्ट संशोधक आहेत, हे येथे नाकारायचे नाही. पण हजारो संशोधकांच्या लाटा उसळल्या तरच विज्ञानाची प्रगती वेगाने होते. अशा लाटा निर्माण व्हायच्या असतील तर सबंध समाज ढवळला गेला पाहिजे.

समाजाच्या मूलभूत श्रद्धांच्या रसायनात विज्ञानाचे चूर्ण घालून समाजाला हे औषध पाजले तरच जिज्ञासा, बुद्धिवाद समाजाच्या नसानसांतून मुरू लागतील. विज्ञानप्रसाराला देखील श्रद्धा लागतेच. हा कदाचित विरोधाभास वाटेल, पण तो मानवी स्वभाव आहे हे जाणले पाहिजे. औषधामागील विज्ञानाप्रमाणे डॉक्टरवरील श्रद्धा देखील औषधाच्या प्रभावास कारणीभूत झालेली असते.

चिकित्सक बुद्धिवादास अखेर श्रद्धेच्या, भावनेच्या मर्यादा पडतात. तेथे मग

कोणतेच अपील चालत नाही! निरनिराळ्या व्यक्तींत, निरनिराळ्या समाजांत निरनिराळी श्रद्धास्थाने असतात. प्राण्याचे मांस खाऊच नका असे कुणी म्हणतील. कोंबडी खा पण गाय मारू नका, असे कुणी म्हणतील. गोमांस-सेवनास अनुकूल असलेला मनुष्य 'आई म्हणजे बापाची बायको' अशी मातेची चिकित्सक व्याख्या करण्यास तयार होईल असे नाही. एखादा चिकित्सक मूर्तिपूजेत दोष काढतो, पण ध्वजावर त्याची श्रद्धा असते, त्याला तो कापडी तुकडा असे म्हणार नाही.

विज्ञानामुळे अनेक श्रद्धांना तडे पडले असले तरी काही मूलभूत श्रद्धा व निष्ठा उरतातच. या श्रद्धांचाही बुद्धिवादाने विचार करा, असेच विज्ञान नेहमी सांगेल, पण तेथे विज्ञानाचे बहुधा काही चालणार नाही. अशा परिस्थितीत या श्रद्धांचा उत्तम उपयोग करून घेतला पाहिजे.

माणसाला अशी असलेली एक जबरदस्त श्रद्धा म्हणजे स्वतःच्या भाषेवरचे प्रेम. अन्य भाषांचा तो अभ्यास करतो, त्यातील विचारधनाने तो प्रभावित होतो, पण स्वतःची भाषा त्याला प्राणप्रिय असते. आपल्या भाषेत तो आपले व्यक्तिमत्त्व व्यक्त करू शकतो.

महाराष्ट्रात भागवतधर्माचा प्रसार संतमंडळींनी केला. त्यांना यश येण्याचे एक कारण म्हणजे लोकभाषांतून त्यांनी आपले विचार मांडले. महाराष्ट्राचे नाट्यकलेवर, नाट्यसंगीतावर प्रेम आहे. इंग्लिश भाषेतील उत्कृष्ट नाटकांमुळे महाराष्ट्रातील लोक नाट्यप्रेमी झालेले नाहीत. मराठी माध्यमातून नाटके निर्माण झाल्यामुळे त्यांनी लोक-मताची पकड घेतली आहे.

इंग्रजी किंवा अन्य इतर भाषांचे महत्त्व कमी आहे असे नव्हे. त्या भाषांच्या संपर्कामुळे विचारवंतांचा व्यक्तिशः फायदा झाला आहे. पण सबंध समाजाची प्रगती जेव्हा आपणास साधायची असते, तेव्हा समाजाची भाषा वापरणे इष्ट ठरते. मराठी भाषेच्या दिव्य रसायनात, विज्ञानाचे, वैज्ञानिक दृष्टिकोणाचे चूर्ण कालविले तर मराठी भाषा संपन्न होईल, विज्ञानाबद्दल आस्था समाजात वाढीस लागेल व अंधश्रद्धांचे प्राबल्य कमी होईल यात शंका नाही. विज्ञान हा विषय वाटतो तितका रुक्ष किंवा अनाकलनीय नसून तो एक रसपूर्ण, संस्कारक्षम व लाभदायक विषय आहे याची प्रचीती येण्यासाठी विज्ञान मराठी भाषेतून देताघेता आले पाहिजे.

बीजारोपण

स्वभाषेची ही ताकद आपल्याकडील अनेक विचारवंतांनी जाणली. गेल्या पन्नास वर्षांत मराठीतून विज्ञानाचा व बुद्धिवादाचा प्रसार करणारी काही पुस्तके व नियत-कालिके निघाली. ही सर्व लोकप्रिय झाली किंवा आर्थिक दृष्ट्या यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. पण लोकमानसात विज्ञाननिष्ठा रुजविण्याचे त्यांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

शिक्षणाचे, राज्यकारभाराचे माध्यम प्रादेशिक भाषा हेच असावे असे आता शासनाचेही धोरण आहे. त्या दृष्टीने शासन पावले टाकीत आहे. पण शासनाची चाल

नेहमी मंद असते. जनतेने स्वयंप्रेरणेने एखादे सत्कार्य हाती घेतले व शासनाने त्यास आशीर्वाद दिले तर कार्य त्वरेने फोफावते.

असे एक कार्य १९६६ मध्ये महाराष्ट्रात सुरू झाले आहे. मराठीतून संघटितपणे विज्ञानप्रसार करण्यासाठी मराठी विज्ञान परिषद या संस्थेची स्थापना त्या वर्षात झाली. मराठीतून वैज्ञानिक विषयांवर व्याख्याने, चर्चा, प्रदर्शने, सहली, संमेलने, मुखपत्र, निबंधस्पर्धा अशा प्रकारचे कार्य करून परिषदेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मोलाची भर घातली आहे. वैज्ञानिकांस समाजाभिमुख करण्याचे व समाजास विज्ञानाभिमुख करण्याचे हे कार्य महत्त्वाचे आहे.

पण केवळ एक परिषद निर्माण झाल्याने समाजाचे परिवर्तन होणार नाही. एखादी संस्था, एखादे मासिक, एखादे पुस्तक काही प्रचंड उलथापालथ करील असे मानणेच चुकीचे होईल. समाजाला एकसारखे व विविध पातळ्यांवर धक्के बसले की समाजाची हालचाल सुरू होते. विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी अनेक मार्ग वापरले पाहिजेत. साहित्यिकांनी विज्ञानावर आधारलेले रंजक साहित्य निर्माण करायला हवे. वृत्तपत्रे, आकाशवाणी या माध्यमांकडून देखील विज्ञानप्रसार व्हायला हवा व तो काही प्रमाणात होऊ लागला आहे. काही वृत्तपत्रे अधूनमधून वैज्ञानिक माहितीची सदरे प्रसिद्ध करतात, हे शुभसूचक आहे.

समाजात नव्या प्रवृत्ती, नव्या अभिरुची निर्माण करताना दोन महत्त्वाच्या घटकांवर लक्ष ठेवायला हवे. एक म्हणजे उमलते विद्यार्थी व दुसरे म्हणजे घरातील गृहिणी. त्यांच्यात विज्ञानाविषयी आस्था, जिज्ञासा निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व्हायला हवेत. चित्रपटासारखे माध्यम आबालवृद्धांना प्रभावीपणे शिक्षण देऊ शकते. आपल्याकडे विज्ञानप्रसारासाठी या माध्यमाचा फारसा उपयोग अद्यापि झालेला नाही.

विज्ञानप्रसाराचे कार्य चांगले आहे; आवश्यक आहे, हे माहीत असूनही ते एका विचित्र कोंडीत अडकले होते. वैज्ञानिक परिभाषा नाही म्हणून वैज्ञानिक साहित्य नाही, व वैज्ञानिक साहित्य नाही म्हणून परिभाषा प्रमाण नाही! विज्ञानलेखक नाहीत म्हणून विज्ञानसाहित्य नाही, विज्ञानसाहित्य नाही म्हणून विज्ञानवाचक नाहीत, विज्ञान वाचक नाहीत म्हणून विज्ञानलेखक नाहीत! विज्ञानप्रसार नाही म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोण नाही, व वैज्ञानिक दृष्टिकोण नाही म्हणून विज्ञानप्रसार नाही! पण ही कोंडी आता फुटू लागली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे ही कोंडी फुटलीच पाहिजे असा निश्चय करणारे, त्यासाठी घाम गाळणारे निष्ठेचे विज्ञानप्रसारक व त्यांना लहानमोठ्या प्रमाणात दाद देणारे समाजातील अन्य घटक या सर्वांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र आता विज्ञानाभिमुख झाला आहे. प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. यापुढे स्वस्थ बसून चालणार नाही. प्रत्येकाने विज्ञानप्रसारास साहाय्य करून महाराष्ट्रास विज्ञानाभिमुखच नव्हे तर विज्ञानसंपन्न बनण्यास हातभार लावावा, ही विनंती.

पावशतकातील धर्मजीवन

गजानन विश्वनाथ केतकर

सामाजिक जीवनाचा प्रवाह हा अखंड आहे. तो मागील पृष्ठावरून पुढे चालू असा महान ग्रंथराज आहे. व्यक्तींच्या आणि समाजाच्या जीवनात धार्मिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा विविध रज्जूंना पिळून त्याचे एक दोरखंड किंवा महासूत्र बनलेले असते. सोयीसाठी पंचवीस वर्षांचा कालखंड हा ठोकळमानाने धरून त्यातील मागील अंकावरून पुढे काय चालू राहिले व राहणार आहे याचे सामान्य निदान करता येईल.

त्याचप्रमाणे समाज हा एकरूप नाही. हिंदू, मुस्लिम, पारशी, खिस्ती, यहुदी या सर्वांचे वास्तव्य महाराष्ट्रात थोड्याबहुत प्रमाणात आहे. हिंदूंमध्येही भिन्न धार्मिक पंथ आणि जातिजमाती आहेत, तसेच श्रीमंत-गरीब, सुशिक्षित, अर्धशिक्षित-अशिक्षित असेही थर आहेत. तसेच महाराष्ट्रात जैनधर्मीय आहेत. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने सामुदायिकपणे बौद्धधर्मदीक्षा घेतलेले बौद्ध आहेत. महाराष्ट्रात उत्तरेकडून आलेले शीख पुष्कळ प्रमाणात आहेत. जैनांची अप्रतिम शिल्पाची आणि सुंदर मूर्तींची मंदिरे जशी आहेत तशी शिखांची गुरुद्वारेही महाराष्ट्रात आहेत. मारवाडी व गुजराती लोकही महाराष्ट्रात स्थायिक झाले असून त्यांचीही देवालये व पुरोहितवर्ग महाराष्ट्रात आहेत. तद्वतच कनिष्ठ मानल्या गेलेल्या जमातींची म्हसोबा, खंडोबा इ. विशिष्ट दैवते व त्यांची देवस्थाने आहेत. हरिजनांचीही देवस्थाने असून त्यांच्या यात्रा व ठराविक तिथींना उत्सव असतात. देवालयांचे वंशपरंपरेने नेमलेले पुजारीही असतात.

महाराष्ट्रात पंढरपूर, आळंदी, नासिक, पैठण, त्र्यंबकेश्वर, वाई, इत्यादी क्षेत्रे आहेत आणि त्यांच्या परंपरागत यात्रा, उत्सव हेही चालू आहेत. गेल्या २५ वर्षांत कै. पंडित श्री. दा. सातवळेकर यांनी आपल्या स्वाध्याय मंडळाच्या प्रकाशनातून मराठीत सार्थ वेद छापून पुनः प्राचीन वेदविद्येकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधले. उत्तरेकडे

पूर्वी महर्षी दयानंद सरस्वती यांनी जे काम केले तेच पंडित सातवळेकर यांनी महाराष्ट्रात केले. पण त्यांच्या कार्यांचा प्रभाव केवळ अगदी वरच्या थरातील विद्वान व सुशिक्षित मंडळीवर पडला. प्राचीन वैदिक वाङ्मय उपेक्षणीय नाही. त्यांतही धर्माच्या तत्त्वज्ञानाची आणि नीतीची उच्च मूल्ये विखुरलेली आहेत हे विद्वानांना कळून आले व त्यांच्या लेखनातून व भाषणातून वैदिक वाङ्मयाचे आधार पुढे येऊ लागले.

देवालयात जाऊन देवदर्शन नियमाने घेणे, यात्रा करणे यांमध्ये बहुजनसमाजाची श्रद्धा टिकून आहे. पण सुशिक्षित वर्गातील मध्यमवयीन व तरुण यांच्यात ती आस्था राहिली नाही. शहरांतून व मोठ्या गावांतून देवदर्शनासाठी सुशिक्षित वर्गातल्या वयस्क स्त्रिया जातात, पण तरुणींची संख्या कमी झाली आहे. तरुण व मध्यमवयीन पुरुष तर देवळातून जाताना दिसत नाहीत. वयस्क वृद्ध पुरुष तेवढे देवळातून दिसतात. नासिक, वाई, पैठण इ. क्षेत्रांतही तीच अवस्था आहे.

पूर्वीच्या काळची मोठी एकत्रित राहणारी कुटुंबे सुशिक्षित वर्गात गेल्या पंचवीस वर्षांत सतत घटत चालली आहेत. व्यापारी व शेतकरी वर्गात ती उरली आहेत. म्हणून व्यापारी व शेतकरी वर्गात कुलधर्म, कुलदेवतांच्या मूर्ती व देव्हारे आणि पूजा-उत्सव उरले आहेत, तसे भंग पावणाऱ्या सुशिक्षित कुटुंबांतून उरले नाही.

कारण चार-पाच मुलगे असले तर एक कलकत्त्याला, एक बंगलोरला, एक जर्मनीत किंवा अमेरिकेत असे पांगले जाणार. कोणी एक जो स्थायिक असेल त्याच्याकडे देव-दैवते राहणार आणि तो शक्य तोवर कुलधर्म पाळणार.

वैयक्तिक धर्माचरण कमी झाले. आर्थिकदृष्ट्या श्राद्ध-पक्ष हे शिक्षित वर्गाला जड म्हणून व अश्रद्धा म्हणून संपले. शेतकरी वर्गात पितृस्मृति-भोजन उरले आहे. व्यापाऱ्यांतही कमी प्रमाणात आहे. ब्राह्मणांपैकी जे पुरोहित आहेत त्यांच्यातच संध्या, पूजा, वैश्वदेव हे उरले आहेत. इतर ब्राह्मण नोकरीधंद्यानिमित्त पांगले गेले असल्यामुळे नाममात्र जानवे उरले आहे आणि आधुनिक तरुणांत त्याचाही लोप होत आहे. जानवे उरले आहे तेही किल्ली अडकविण्याचे साधन म्हणून पुष्कळांशी उरले आहे. श्रावणात नवीन यज्ञोपवीते किंवा जानवी घालण्याच्या श्रावण्याही आता घटत आहेत.

चातुर्वर्ण्यातील उच्चनीचतेच्या कल्पना आता सर्वांनाच नकोशा झालेल्या आहेत. जाती आणि वर्ण यांची व्यवस्था आता केवळ विवाहापुरती उरली आहे. त्यातही पोटजातींचे एकीकरण करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. उदाहरणार्थ, निळारी, नामदेव शिंपी व भावसार क्षत्रिय हे मूळचे एक म्हणून त्यांच्यातील प्रमुखांनी त्यांच्यात सात विवाह घडवून आणले व त्याची जोडप्यांच्या चित्रासह पुस्तिका प्रसिद्ध केली. श्री. गोविंद धर्माजी वर्तक यांनी प्रथम त्यांच्या समाजातील वयस्क सनातन्यांचा विरोध असताही त्यांना तोंड देऊन सोमवंशीय क्षत्रिय परिषदेत त्या समाजातल्या सर्व पोटजातींचे एकीकरण करण्याचा ठराव मंजूर करून घेतला.

संमिश्र म्हणजे आंतरजातीय किंवा आंतरवर्णीय विवाहदेखील गेल्या पंचवीस

वर्षांत टीकास्पद न राहता अभिनंदनीय झाले आहेत. उदाहरणार्थ, पुण्याच्या रिसबूड नावाच्या एका धाडसी ब्राह्मण तरुणाने आसामात सरकारी नोकरीची बदली पत्करली. नाग लोकांच्या बंडाळीमुळे आसाममध्ये सरकारी नोकर जाण्यास कचरत म्हणून सरकारने येथे बदली पत्करणाऱ्यास जादा भत्ता जाहीर केला. रिसबूड याने तेथे नोकरी तर पत्करलीच, पण एका नाग जातीच्या युवतीशी विवाह लावून तिला घेऊन तो पुण्यास आला. त्याच्या इष्टमित्रांनी त्या जोडप्याचा प्रकट सत्कार केला. त्या समारंभात त्याची वृद्ध मातापितरे उपस्थित होती. मातेने उभे राहून सांगितले की, जशी एखादी ब्राह्मण सून नम्रतेने व आज्ञाधारकपणे वागली असती तशीच ही नाग मुलगी माझे घरी महिनाभर नांदत आहे. रिसबूड महिन्याची रजा घेऊन आला होता तो परत तिच्यासह गेला. चाळीस वर्षांपूर्वी पुण्याला ही गोष्ट झाली नसती. आता त्यांना संतती झाली तरी त्यांच्या विवाहाची पंचाईत पडणार नाही.

उदाहरणार्थ श्रीमती शकुंतला परांजपे हिने रशियात एका रशियनाशी लग्न केले. पण थोड्याच काळात विच्छेद झाला. एक मुलगी झाली होती, तिला घेऊन शकुंतलाबाई भारतामध्ये आल्या. ती सई परांजपे शुद्ध मराठीत बोलणारी आता विवाह होऊन सौ. जोगळेकर झाली आहे. पुण्यात देशपांडे नावाच्या एका तरुण गृहस्थाने आवाबेन हवेवाला या पारशी स्त्रीशी विवाह केला. ती सौ. आवा देशपांडे आता कुंकू, मंगळसूत्र, कानांत कुडी व महाराष्ट्रीय लुगडे नेसलेली वावरते ती मूळची पारशी आहे हे सांगितल्याविना उमगत नाही आणि सांगितले तरी आश्चर्य वाटते.

आर्यसमाज, मसूरकर महाराज, हिंदू मिशनरी गजाननराव वैद्य यांनी परधर्मांत गेलेल्या हिंदूंनाच नव्हे तर मूळच्याच अहिंदूंना देखील हिंदुधर्मात घेता येते अशी चळवळ केली ती गेल्या वीस-पंचवीस वर्षांत चांगलीच फोफावली आहे. लहानमोठ्या नगरांतून सरकारी कार्यालयात लघुलेखन व टंकलेखन करण्याच्या नोकऱ्या शेकडो हिंदू आणि पूर्वी हिंदूंतून ख्रिस्ती झालेल्या तरुणी करीत आहेत. तेथीलच हिंदू लेखनिक तरुणांशी संपर्क येऊन त्यांचे विवाह जुळतात. मुंबईच्या मसुराश्रमाने अलीकडे अशा शेकडो हिंदूकृत ख्रिस्ती तरुणी व हिंदू तरुण यांचे विवाह लावले आहेत. तत्पूर्वी वसई हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. दातार यांनी अशा अनेक शुद्धीकृत ख्रिस्ती तरुणींचे हिंदू तरुणांशी विवाह लावले आहेत. कार्यालयातील परिचयांनी हिंदूंमधील आंतरजातीय विवाहही होत आहेत. अशा विवाहितांच्या संततीचे पुढे विवाह होण्यास अडचण पडेल ही भीती आता उरली नाही.

भिन्नजातीय तरुण स्त्रीपुरुष एकत्र येण्याचे दुसरे स्थान म्हणजे सैनिकांची ठाणी. कै. क्रांतिकारक श्री. पां. स. खानखोजे यांनी अमेरिकेत एक बेल्जम पत्नी केली. दोन मुली झाल्या. एकीचे तिकडेच लग्न झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दुसरी मुलगी व पत्नी यांच्यासह ते भारतामध्ये आले. पुण्याच्या सैनिकी छावणीतील एक सैनिक अधिकारी विजय सावने याने या दुसऱ्या मुलीशी विवाह केला. म्हणजे बाप महाराष्ट्रीय ब्राह्मण

आई बेल्जन व नवरा पंजाबी. माझेकडे एक वयस्क पंजाबी सैनिक अधिकारी सपत्नीक आले होते. आम्ही त्यांच्याशी इंग्रजीत बोलत होतो. इतक्यात मध्येच त्यांच्या पत्नी शुद्ध मराठीत बोलल्या "मी तुमचा 'केसरी' वाचीत होते". मी चकित झालेला पाहून त्या शुद्ध मराठी पद्धतीने म्हणाल्या, "हे पंजाबी आहेत, पण मी मराठी आहे."

आजच्या आर्थिक परिस्थितीमुळे व वयस्क माणसांना बाजूला ठेवून तरुण-तरुणींचे जातीय वा आंतरजातीय विवाह होत असल्यामुळे पुण्याहवाचन, वाङ्निश्चय, मधुपर्क इ. विधींना अवकाश नाही. गृहप्रवेशसमारंभ व विधीही होत नाही. फक्त विवाहहोम व सप्तपदी एवढ्या विधीवर विवाह लागतात आणि "पतित्वं सप्तमे पदे" या स्मृति-वचनामुळे त्याला शास्त्रीय बाध नाही. पत्रिकाही कोणी फारशा पाहात नाही. प्रेमाचे दहाबारा ग्रह जुळल्यावर नवग्रहांची व त्यांच्या जन्मपत्रिकेतील स्थानाची कोण चिंता करणार? पूर्वीच्या पद्धतीने वयस्क आप्तांनी जुळविलेली लग्नेही पुष्कळ होतात, पण त्यातही आता वाङ्निश्चय, मधुपर्क, गृहप्रवेश, मांडवपरतणे, गर्भाधान या विधींना फाटा मिळाला आहे. पूर्वी वराचे कुटुंब वधुगृही येई व तेथे लग्न होई. आता दोन्ही पक्षांची दोन-तीन खोल्यांची बिऱ्हाडे! यामुळे शहरांतून मंगल कार्यालये झाली आहेत. तेथे दोन्ही पक्षांची कुटुंबे येतात व एक दिवसात लग्न उरकून जातात. भोजनसमारंभाऐवजी आता स्वागत समारंभात अल्पोपाहार टेबलावर देऊन इष्टमित्रांची बोळवण होते. प्रौढ वधूवरे एकत्र बसलेली असतात. त्यांना पाहून त्यांचे नमस्कार घेऊन इष्टमित्र विसर्जित होतात.

उपनयनसंस्कारही आता ब्राह्मणांना पूर्वीसारखा थाटामाटाने करणे जड झाले आहे. आता मोठ्या नगरांमधून सामुदायिक मुंजी होतात. सत्यनारायणपूजाही घरी करणे आता अवघड झाले आहे. त्या पूजेचे आकर्षण आहे. पण आता एका परिसरातील वा कार्यालयातील मंडळी वर्गणी जमवून सार्वजनिक सत्यनारायण करतात. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव अद्याप लोकप्रिय आणि धडाक्याने चालू आहे. धर्माच्या घरगुती वैयक्तिक आचरणापेक्षा हे सामुदायिक धर्म-समारंभ सोयीचे व सर्वांच्या आनंदाचे झाले आहेत.

पूर्वी, चालू शतकाच्या पहिल्या २५ वर्षांमध्ये बाह्य वस्त्राप्रावरणांमध्येही बदल केला तर धर्मनीती बुडाली अशी सनातनी गटाकडून ओरड होई. १९०५-६ मधील पुण्याच्या 'सन्मित्र समाज' या लोकप्रिय मेळ्याचे पुढील पद आठवते—

चालरीत सारी गेली। नित्य नवी सोंगे आली।
स्वाभिमानबुद्धी सरली। नीति ही बुडाली॥ ध्रु० ॥
टोपि खो दे पागोट्याला। जोडा बूटाला हो भ्याला।

गेल्या पन्नास वर्षांत दळणवळणाच्या सोयी सारख्या वाढत आहेत. दूरदूरच्या ठिकाणी सोयरिकी होऊ लागल्या आहेत. इंदूरच्या मुलीला बेळगावचा वा कोल्हापुरचा चांगला वर मिळाला तरी विवाह होतात आणि पुढे त्याच वराला नागपुरच्या बँकेत चांगली नोकरी मिळाली की ते दांपत्य तिकडे राहावयास जाते.

आगगाड्यांतही पहिला, दुसरा व तिसरा वर्ग असल्यामुळे समाजातील अनेक धर्मांच्या व अनेक थरांच्या लोकांचे संघटन तितकेसे होत नसावे. पण स्टेट ट्रान्सपोर्ट (एस. टी.) च्या गाड्यांनी कोनाकोपऱ्यात प्रवासाचे मार्ग चालू केल्यामुळे अधिक संघटन होते. एकाच गाडीत मागच्या बाकावर ख्रिस्ती पाद्री बायबल किंवा प्रार्थना-पुस्तक घेऊन त्यात मग्न होऊन बसलेला आहे तर पुढच्या दोन बाकांवर खोजा मुसलमानांचे सुधारलेले कुटुंबच्या कुटुंब बसलेले आहे, त्यातील अगदी लहानग्या मुलाला स्त्रिया आळीपाळीने घेऊन हसवीत कौतुक करीत आहेत. मानवी धर्मबुद्धी सारखीच आहे आणि ईश्वराने बालपणात काळजी घेतली जावी या हेतूने स्त्रियांमध्ये अपरंपार वात्सल्य निर्माण करून ठेवले आहे. या दृष्टीने पाहिले तर मानवता एक आहे. धर्मभेद, भाषाभेद कृत्रिमरीत्या लादले गेले आहेत याची प्रचीती येत जाते. सांगली-कोल्हापूरकडील दांपत्य नोकरीधंद्याच्या निमित्ताने नागपूरला गेल्यावर तेथे 'शेजार-धर्म' हा आपोआप येतो. एकमेकांना अल्पस्वल्प साह्य करण्याची बुद्धी स्वाभाविकपणे येते. सांगली-कोल्हापूरच्या चालीरीती व नागपूरच्या चालीरीती व किंचित भाषाप्रयोगांचे भेद ध्यानात येतात. लहानमोठ्या नोकऱ्यांत असलेल्या व बदल्या होणाऱ्या सुशिक्षित लोकांना सर्व धर्मवंशातील मूलभूत मानवतेचा साक्षात्कार अधिक होतो. अशिक्षित किंवा अर्धशिक्षित शेतकरी वा व्यापारी यांची कुटुंबे एस. टी. प्रवासात एकत्र येतात. एकमेकांचे क्षेमकुशल विचारतात. एका कुटुंबातील वयस्क स्त्री दुसऱ्या कुटुंबातील नव्या जोडप्याचे लहान मूल हाती घेते; आणि हे नवे जोडपेही त्या आजी आहेत, जा त्यांच्याकडे म्हणून मुलाला सांगत असते. पूर्वी सामुदायिक यात्रादी प्रसंगात एकाच धर्माच्या व धर्मसमजुतीच्या माणसांचे दळणवळण होई. आता सर्वधर्मीयांचे होते.

याच कालखंडामध्ये इस्रेल हे स्वतंत्र राष्ट्र यहुदी (ज्यू) लोकांना लाभले. महाराष्ट्रातच सर्व भारतीय प्रांतांपेक्षा अधिक प्रमाणात या यहुदी लोकांची वस्ती होती. ते मराठी भाषा उत्तम बोलत. इस्रेल झाल्यामुळे पुष्कळ तिकडे गेले. जाताना सहृदयतेची वागणूक दिल्याबद्दल शेजारीपाजारी असलेल्या हिंदूंचे आभार मानून प्रेमाने 'निरोप' घेऊन तिकडे गेले.

पूर्वी शिक्षित वर्गातही स्त्रियांचे शिक्षण बेताचेच होई. चालू शतकाच्या पहिल्या वीस वर्षांत स्त्रीशिक्षणावर टीका होत असे—

पोळी न फुगे परि वदे इंग्रजी बोली ।

किंवा—

भाकरीचे तुकडे सात । वरण करपलेले ॥

ही मेळ्याची पदे आठवतात. स्त्रियांचे मुख्य काम म्हणजे घरातला स्वयंपाक. शिक्षित स्त्रियांना स्वयंपाक नीट करता येत नाही किंवा येणार नाही अशी समजूत. पण आता आर्थिक दृष्ट्या स्त्रीही स्वावलंबी असावी म्हणून तिला टंकलेखन शिकवणे, शक्य तर शिक्षकिणीच्या परीक्षांना बसवणे किंवा डॉक्टरीग करणे हे आवश्यक झाले

आहे. आता स्त्रियांच्या हायस्कूलमधून मोठ्या नगरांत इतकी खेच आहे की, दरसाल शेदीडशेना जागा नाही म्हणून नकार द्यावा लागतो. साक्षरता वाढती आहे, सर्व वर्गांतल्या व जातींतल्या स्त्रिया आता शिकत आहेत आणि स्त्री सुधारली की घरही सुधारले. आता स्टोव्ह, गॅस यांनी पाकक्रिया सुलभ झाली आहे, 'गृह्याग्नी' संपला. साग्नी म्हणजे गृहस्थ व निरग्नी म्हणजे संन्याशी हे का, हे आता समजून सांगावे लागते. पूर्वी गृह्याग्नी हा राखेत विस्तवरूपाने राखला जात असे व त्यावरच अंत्यविधीपर्यंत सर्व विधी व्हावयाचे. अंत्ययात्रेला मडक्यात अग्नी घेऊन जाण्याची चाल उरली आहे. तो आता काड्याच्या पेटीने पेटवला जातो. पूर्वी पुरोहित विवाहादी होमासाठी घरातून विस्तव आणा म्हणून सांगत. आता विस्तवच उरला नाही.

आता पुरोहित भिक्षुकांनाही काड्याच्या पेटीने होमाग्नी पेटवावा लागतो. दिवा लावला की बालकाला दिव्यापुढे नेऊन 'दिव्या दिव्या दीपत्कार' इ. गाणे धार्मिक बुद्धीने म्हणत. आता लहान नगरातूनही विजेचे दिवे आले. समया, तेलवाती, नीरांजने ही अडगळीत पडली. अर्थात 'दिव्याला देखून नमस्कार' गेला.

पतिपत्नी दोन्ही नोकरीत असल्याने मुलांना सांभाळणारी बालकविद्यालये झाली. तेथे मुलांना पोचवून दिले की, घरधनीण नवऱ्याचे व स्वतःचे जेवण ग्यासच्या चुल्यावर करण्यास मोकळी झाली. शाळा इतक्या लहानपणी सुरू होत असल्यामुळे पाचव्या सहाव्या वर्षी शाळेत घालणे, त्या वेळची पाटीपूजा इ. गोष्टीही कमी झाल्या. पूर्वीच्या प्रथम सुधारकांच्या काळात पुनर्विवाहाचा प्रचार व सनातन्यांचा त्याला विरोध झाला. ह्या काळात अल्पवयात लग्ने होऊन बालविधवा पुष्कळ होत. आता प्रौढ विवाह होत असल्याने बालविधवांचा प्रश्नच निकडीचा उरला नाही. पुनर्विवाहाला बंदी ब्राह्मणांतच विशेष होती. इतर जातींत 'म्होतुर' रूपाने पुनर्विवाह रूढच होता.

आगरकर-कर्वे हे मुख्यतः ब्राह्मणांतील सुधारक. पण गेल्या काही वर्षांत महात्मा जोतिबा फुले यांच्या चरित्राचे संशोधन व उद्धरण झाले. त्यांनीही बुद्धिवादाने धार्मिक थोतांडावर केलेले हल्ले बहुजनसमाजातील शिक्षित व जाणत्यांपुढे आले. महात्मा गांधींच्या खालोखाल लगतच महात्मा फुले यांना स्थान मिळाले. यामुळे शिक्षित व साक्षर बहुजनसमाजात सुधारणांचा प्रसार होण्यास मोठेच साह्य झाले आहे. शास्त्रविधी मागे पडले तरी धर्मश्रद्धा उरली. धर्मग्रंथांची छाननी ऐतिहासिक दृष्ट्या होऊ लागली. अलीकडील शतकांतून उत्पन्न झालेल्या अनिष्ट चाली पूर्वी नव्हत्या. शूद्रालाही ब्राह्मणत्व प्राप्त करून घेता येत असे. इ. स. दुसऱ्या व तिसऱ्या शतकानंतर चातुर्वर्ण्य आणि ब्राह्मण्य यांचा बडेजाव मनुस्मृतीच्या आधारे फार करण्यात आला, तो परवापरवापर्यंत होता. "जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ" इत्यादी वचने आता केवळ थट्टा करण्यासाठी उरली आहेत.

या ब्राह्मणश्रेष्ठतेची प्रतिक्रिया ब्राह्मणेतर चळवळीने झाली. तिचे अनिष्ट आणि अतिरेकी परिणाम होऊन गेले. आता वर्णविषमता राहिली नाही. यांत्रिक कारखान्यांतून

यंत्रांवर आजकाल ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हे जोडीने काम करू लागले आहेत. कारकुनी पेशातही ब्राह्मणाची 'मोनोपोली' उरली नाही. यांत्रिक कारखान्यात, छापखान्यात, वाहतूक व्यवसायात आता ब्राह्मण व इतर खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. ब्राह्मणेतर चळवळीचा अनिष्ट भाग संपला असून दोहोबाजूंनी समताप्रस्थापनेचा इष्ट भाग उरला आहे. ब्राह्मणांनाही आता ब्राह्मण्यरक्षणापेक्षा व्यापक हिंदुत्वाच्या रक्षणाची, त्यांच्यातील ऐक्यप्रस्थापनेची, समानतेच्या आचरणाची ओढ अधिक लागली आहे.

आता 'सोवळे' उरले नाही. पुष्कळशा कुटुंबांत टेबलावर जेवण आले आहे. मग चित्राहुती, प्राणाहुती संपल्या. पाटावरील जेवण वाढण्यास वाकावे लागते तसे टेबलावरील जेवणात करावे लागत नाही. पाटावरील जेवणातही चित्राहुती व प्राणाहुती संपल्या. विवाहादी प्रसंगाने आरंभी पुरुषांची व नंतर बायकांची जेवणे होत. आता दोन्ही पंक्ती समोरासमोर बसतात. पूर्वी आगरकरांनी "अंडी खाण्यास काय हरकत आहे?" म्हणून 'सुधारक' पत्रात अग्रलेख लिहिला होता, पण आता ब्राह्मणात क्वचित मांसाहारी व त्याहून सार्वत्रिक अंडी खाण्याचा प्रसार झाला आहे. सनातनी भालाकार भोपटकर यांनी त्यांच्या अखेरच्या काळात व्याख्यानामध्ये एक प्रसंग सांगितला. तो असा : सकाळी ब्राह्मण मोहोल्यात 'अंडी' घेता का बाई म्हणून अंडी विचारण्यास एक बाई आली. भालाकार बाहेर येऊन म्हणाले, "या ब्राह्मण वस्तीत अंडी कोण घेणार?" त्या बाईने सांगितले की, "दादा माझ्याबरोबर चला म्हणजे येथे ब्राह्मणांच्या घराघरातून कशी अंडी खपतात हे तुम्हांला दाखविते."

चातुर्मास व त्यात कांदेलसूण न खाणे व चातुर्मास्य सुरुवातीस 'कांदे नवमी'च्या दिवशी यथेच्छ कांद्यांच्या भज्यांवर ताव मारणे हे आता संपले. एकादशी व विशिष्ट वार यांचे 'उपास' आता उरले आहेत. ते उपास म्हणजे वेगळ्या प्रकारचे खाणे, तेच पुष्कळदा नित्याच्या खाण्यापेक्षा अधिक चविष्ट असते. श्राद्धपक्षही आता परिस्थितीमुळे संपुष्टात येत आहेत. महाराष्ट्रात स्त्रियांमध्ये उत्सवस्वरूपी धर्मपालन, हळदी-कुंकू समारंभ, मंगळागौरी इ. राहिल्या आहेत. पण जुनी उपासादी कठीण व्रते आता काही वृद्ध स्त्रिया करतात. त्या संपल्या म्हणजे ती व्रते बहुधा संपतील. आता जननाशौच व मरणाशौच पाळणेही कमी होत चालले आहे. ऋतुकालाचे अशौचही (चार दिवसांचे) आता सुशिक्षित तरुणी व मध्यमवयीन शिक्षित स्त्रिया पाळीत नाहीत.

त्यामुळे 'धर्म बुडाला' अशी ओरड हवी तर सनातन्यांनी खुशाल करावी. पण बाह्य विधींचा खटाटोप जरी गेला तरी तात्त्विक दृष्ट्या हिंदू तत्त्वज्ञान आणि संतवाङ्मय, रामायण व महाभारत आणि गीता यांचा अभ्यास वाढला आहे. पांगारकर, विष्णुबुवा जोग इत्यादींनी चालू शतकाची पहिली २५ वर्षे या कालात सुशिक्षितांपुढे ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंतच्या संतांचे वाङ्मय, बहुजनसमाजाच्या धर्माचरणात त्यायोगे प्रकटलेला प्रभाव, त्यातील रहस्ये इ. उलगडून मांडली. तेच कार्य नुकतेच परलोकवासी झालेले मामा दांडेकर यांनी सतत चालविले. पूर्वी पांगारकरांचा 'मुमुक्षु'

जे कार्य करीत होता तेच कै. य. गो. जोशी यांच्या ‘प्रसाद’ मासिकाने जोराने पुढे नेले. प्रसाद मासिकामध्ये तर मामा दांडेकरांचे संतवाङ्मयरहस्य सांगणारे बोधक लेख येतच; पण दांडेकरांचे ग्रंथही ‘प्रसाद’ प्रकाशनाने प्रकाशिले. तेच काम य. गो. जोशी यांचे पुत्र पुढे चालवीत आहेत. ‘प्रसाद’ हे मुख्यतः धर्मचर्चेला वाहिलेले मासिक आजच्या युगातही उत्तम चाललेले आहे.

गुरुदेव रानडे, उपनिषत्तीर्थ जोग यांनी औपनिषदिक वेदान्त लोकांपुढे मांडला, तुलनात्मक तत्त्वज्ञानाचे विचारही या काळात मांडले गेले. “ज्ञानदेव व प्लेटो” अशासारखे लेख हे उदाहरणादाखल सांगता येतील. ‘प्रसाद’ मासिकापूर्वी अमळनेरच्या श्रीमंत प्रतापशेट यांच्या आश्रयाने चाललेल्या “तत्त्वज्ञान-मंदिर” मासिकाने वेदान्त तत्त्वज्ञानाच्या प्रसाराचे कार्य उत्तम रीतीने केले. उपनिषदातील तत्त्वज्ञान आणि संतवाङ्मय जाणत्यांपुढे ठेवण्याचे काम गेल्या २५ वर्षांत उत्तम रीतीने झाले आहे.

लो. टिळक, महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांनी श्रीमद्‌भगवद्गीतेचे रहस्य, भावार्थ आणि मूल्य लोकांपुढे आणले. गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात किती तरी गीताविषयक पुस्तके छापली गेली. यात विनोबांपर्यंतची केवळ भाविक दृष्टी जाऊन अलीकडे चिकित्सक आणि ऐतिहासिक दृष्टीची गीतापरीक्षणे पुढे आली. गीतेतील श्लोकसंख्या ही निरनिराळ्या ठिकाणी वेगळी सांगितली आहे. व्यासांच्या गीतेमध्ये सौतीने भर घातली आहे. इतकेच नव्हे तर बौद्ध व खिस्ती धर्मांच्या आगमनानंतरही गीतेवर काही संस्करणे झाली आहेत. या गोष्टी लेखांतून आणि ग्रंथांतून मांडल्या गेल्या. काही अगदी सनातनी यावर व्यग्र आणि नाखूष होतात. पण या चिकित्सेला पाखंडी अधार्मिक म्हणून फारशी निंदा सहन करावी लागत नाही. पुणे विद्यार्थीगृहाचे श्री. खैर यांनी गीतेचे एकामागून एक तीन लेखक झाले असले पाहिजेत असे भाषेवरून व मांडणीवरून अनुमान करून मांडलेला ग्रंथ अलीकडेच पुढे आला. त्यावर हे गीतेचे विडंबन म्हणून टीकाही झाली. पण अशा प्रकारच्या चिकित्सेला आता सर्वसामान्य सुशिक्षित त्याज्य ठरवीत नाही. मग ती अनुमाने कोणास पटोत वा न पटोत. पुण्याच्या गीताधर्ममंडळाने पुण्यात व महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना गीतापठण व गीतार्थ सांगणे यावर पारितोषिके लावून गीताप्रसार केला. गीतेच्या प्रसारामध्ये दोन हेतू प्रकट नसले तरी अंतर्यामी आहेत.

एक हेतू असा की, हिंदुधर्मस्पर्धक खिस्ती व इस्लामी धर्म हे एक पुस्तकावलंबी म्हणून सुटसुटीत व आटोपशीर वाटतात. हिंदुधर्मांचा वेदांपासून पुराणापर्यंत धर्मग्रंथांचा पसारा याचे आलोडन करण्यास सात जन्मही पुरणार नाहीत. तेव्हा संग्राहक एकमेव पुस्तकाची खिस्ती व इस्लामी यांच्या प्रतियोगित्वासाठी आवश्यकता होती. तो कालिक आवश्यकता गीता चपखल रीत्या पुरविते. आमचे वाङ्मय विपुल पण एकच पुस्तक हवे असेल तर ही घ्या असे गीता पुढे करून म्हणता येते.

दुसरी गोष्ट म्हणजे गीता ही प्रामुख्याने कर्मयोगपर आहे. ‘लोकसंग्रह’ म्हणजे

समाजसुस्थिती यासाठी प्रत्येकाने आपले स्वभावनियत असे कर्म किंवा स्वकर्म 'अतंद्रितपणे' निरलसतेने आणि कर्तव्यबुद्धीने फलाची अपेक्षा न करता आजन्म करीत राहणे ही गोष्ट आजच्या काळात अत्यावश्यक आहे. धर्माचरण म्हणजे समाजापासून दूर जाऊन एकाकी आयुष्य कंठणे यातच केवळ नसून सामाजिक कर्तव्याचरणात आहे हे सांगण्याची आवश्यकता चालू परिस्थितीत सर्वतोपरी आहेच आणि ती गीताप्रचाराने साधते. इतर सर्व हिंदू धर्मग्रंथांपेक्षा गीतेनेच लोकसंग्रह व स्वकर्माचरण यांवर अधिक भर दिलेला आहे.

रामायणापेक्षाही महाभारताचा अभ्यास आणि त्यांतील कर्ण, धर्मराज, भीष्म, द्रौपदी यांच्या भूमिकांची आणि चारित्र्याची चर्चा ही गेल्या २५ वर्षांच्या काळात अधिक पुढे आली. महाभारतातील व्यक्तिरेखांची छाननी करणारी व्याख्याने व प्रवचने अधिक लोकाकर्षक झाली. वारकरी आणि नारदीय पद्धतीच्या कीर्तनकारांनी कालानुसार आपल्या उपदेशात समाजधारणेस उपयुक्त गोष्टी आणल्या असून नव्या कोट्या, नवे विनोद यांनी ही दोन्ही प्रकारची कीर्तने समाजाला आकर्षित करीत राहिलेली आहेत.

अलीकडील काळात 'कोश' पुढे आले. कै. डॉ. केतकर यांच्या ज्ञानकोशामध्ये ऐतिहासिक, चिकित्सक आणि कालनिर्णय शक्य तो ठरवीत बौद्धपूर्व आणि बौद्धोत्तर धार्मिक सांप्रदायांची व ग्रंथांची चिकित्सा सविस्तरपणे आलेली आहे. त्यानंतर श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी संकलित केलेले प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन चरित्रकोश यांमध्येही ऋषिमुनी, संत आणि आधुनिक काळात धर्मजागृती करणारे थोर पुरुष यांची चरित्रे मांडली गेली आहेत. वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाने प्रसिद्ध केलेला सांस्कृतिक कोशही सांस्कृतिक गोष्टींची शोधपूर्वक माहिती देणारा आहे. अगदी परवा प्रसिद्ध झालेला श्री. अमरेंद्र गाडगीळ संपादित 'गणेशकोश' हे ताजे उदाहरण आहे.

सर्वधर्म समानत्व हे महात्मा गांधींच्या एकादश तत्त्वांपैकी एक तत्त्व. हे समानत्व मोघम न राहता परस्परांच्या धर्मांचा अभ्यास करून मांडले गेले पाहिजे, आणि धार्मिक व सांस्कृतिक विचारांची देवघेवही झाली पाहिजे. महाराष्ट्रातील ख्रिस्ती धर्मीयांमध्ये ख्रिस्तभक्तीबरोबर भारतीय सांस्कृतिक परंपराही राखता येते अशी जागृती रे. नारायणराव टिळक यांनी केली तीच वाढती आहे. बाह्य आचारांच्या बाबतीत हिंदूंपासून ख्रिस्त्यांनी तुटक काय म्हणून राहावे? असा प्रश्न उत्पन्न होऊन आता ख्रिस्ती स्त्रिया कुंकू लावीत आहेत. ख्रिस्तभक्तीला भारतीय भक्तीमधील उत्कटता आणि आत्मविस्मृती यांची जोड दिली पाहिजे, असे मत मांडले जात आहे. ख्रिस्ताला "अवतार" ही भारतीय समर्पक संज्ञा लावली जात आहे. प्राचीन ज्यू लोकांची पुस्तके हा प्राचीन ख्रिस्ती लोकांचा जुना करार होता, त्याचा भारतामध्ये काही अर्थ नाही, भारतीय परंपरेतील धर्मज्ञानभांडार यातून आम्ही आमचा जुना करार उभा केला पाहिजे असे विचार ख्रिस्ती लेखकच आपल्या लेखांतून व ग्रंथांतून मांडीत आहेत.

चिकित्सक ऐतिहासिक बुद्धी ही जशी हिंदूंनी हिंदू धर्मग्रंथांवर चालविली तशी ती खिस्ती धर्मावरही चालविली जात आहे. खिस्तजन्म हा डिसेंबरच्या नाताळातला असणे शक्य नाही, रोमन सूर्यपूजेच्या उत्तरासमारंभाच्या संक्रांति-उत्सवाला खिस्तजन्म चिकटवून देण्यात आला असे खिस्ती लेखकच लिहीत आहेत. खिस्ती शक हा खिस्तोत्तर चारपाच शतकांनी केव्हातरी सुरू करण्यात आला. त्या वेळी केलेल्या अनुमानात चार वर्षांची चूक राहिली. आता खिस्तजन्म खिस्तपूर्व (बी. सी.) ४ या वर्षी झाला असे ऐतिहासिक दृष्ट्या इंग्रजी विश्वकोशातूनही नमूद केले जात आहे.

अस्पृश्यतानिवारणाचा प्रचार महात्मा गांधींनी खूप निष्ठेने आणि तळमळीने केला. पण अस्पृश्यता निवारण त्यांना अभिप्रेत असलेल्या त्वरेने झाले नाही. डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वान् हरिजनाने या परिस्थितीला वैतागून शेवटी आपल्या हजारो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. तीही फार विचारपूर्वक दिली. कारण बौद्ध धर्म हा भारतोत्पन्न आहे. हिंदूंनीही बौद्धाला अवतार मानण्यापर्यंत त्याचा प्रभाव हिंदुत्वावरही पडला आहे. खिस्ती व विशेषतः मुसलमान यांच्याइतका तो असहिष्णू नाही. "इतरांच्या धर्माची निंदा करणे म्हणजे आपल्याच धर्माची निंदा करणे होय." असा भगवान बुद्धाचा उपदेश आहे. बौद्ध आणि वैदिक धर्मात अनेक तत्त्वांची व कल्पनांची देवाणघेवाण झाली आहे.

जी गोष्ट हरिजनांची तीच वन्य जमातींची. यांमध्येही जाऊन त्यांची सुधारणा व उन्नती करण्याचे कार्य सरकारी व खाजगी पातळीवरही व्हावयास पाहिजे. तसे झाले नाही. फादर वेरियर एल्विन या खिस्ती मिशनऱ्याने ही कामगिरी उत्कृष्टपणे केली. ते पुण्याच्या खिस्तप्रेमसेवासंघाचे संस्थापक. त्यांनी नागपूरलगतच्या प्रदेशातील गोंड लोकांमध्ये कार्य करण्यास प्रारंभ केला. गोंड हे शिरगणतीत हिंदूंमध्येच गणले गेले पाहिजेत अशी त्यांनी शिरगणतीच्या अधिकाऱ्यांची खात्री करून त्यांचेकडून तसे प्रमाणपत्र घेतले. त्यांनी एका गोंड स्त्रीशी विवाह केला व मनाने ते हिंदू झाले. आपले और्ध्वदेहिक अग्निसंस्काराने करावे व अस्थींचे विसर्जन तीर्थात करावे असे त्यांनी मृत्युपत्रात लिहून ठेवले. पुढे त्यांनी नाग लोकांव्यतिरिक्त इतर सर्व आदिवासी वन्य जमातीत राहून त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला. या सर्व जमाती हिंदूंतच गणल्या गेल्या पाहिजेत असे प्रकटपणे सांगितले. कारण सांगितले की ते "हिंदुधर्माच्या कुटुंबाचे घटक आहेत." (दे बिलॉंग टु धि हिंदु फॅमिली).

हे कारण समर्पक व विचारणीय आहे. हिंदुधर्माचे एक एकत्र कुटुंब आहे. त्यात वयस्क आहेत, मध्यवयीन आहेत, तरुण आहेत व बाल आहेत. सर्वांच्या पात्रतेनुसार वैदिक तत्त्वज्ञान, औपनिषदिक तत्त्वज्ञान, स्मृती आणि अनेक दैवतांच्या पुराणकथा या निर्मिल्या आहेत. या अवडंबराचे कित्येक हिंदूंना वाईट वाटते. पण त्यायोगेच हिंदू एकत्र कुटुंब नांदते आहे. वेरियर एल्विन यांनी असेही घोषित केले की या वन्य जमातींत मिशनऱ्यांना प्रवेश देणे म्हणजे धार्मिक लूटमार (रिलिजस बॅंडिट्री) होईल.

कारण या लोकांची परंपरागत दैवते व श्रद्धा उखडून काढल्या जातील व नव्याने लादलेला खिस्ती धर्म त्यांना उमगणार नाही. त्रिशंकूसारखी त्यांची अधांत्री व शोचनीय अवस्था होईल. वेरियर एल्विन म्हणजे आळशी हिंदूंवर आलेली गंगाच होय! एल्विन यांना त्यांच्या अखेरच्या काळात भारतीय राज्याने आदिवासी वन्य जमातींच्या प्रश्नात सल्लागार म्हणून नेमले होते.

महाराष्ट्रातील जाणत्या व सुशिक्षित इस्लामीयांमध्येही आता धार्मिक सामंजस्य उत्पन्न होत आहे. मी 'तरुण-भारत' पत्रामध्ये 'हिंदूंचे कुराण वाचन' या मथळ्याने पाच लेख लिहिले. इस्लाममध्ये आदम हा ईश्वराचा पहिला प्रेषित. तेथपासून हजरत महंमद पैगंबरापर्यंत एक लाख चाळीस हजार किंवा दुसऱ्या कल्पनेने दोन लाख चोवीस हजार प्रेषित किंवा संदेष्टे देवाने पृथ्वीवर पाठविले. कुराणात पैगंबरांनी म्हटले आहे की "जगात असा एकही समाज किंवा प्रदेश नाही की जेथे अल्लाने आपले संदेष्टे धाडले नाहीत. काहींची नावे येथे (कुराणात) सांगितली आहेत. काहींची सांगितली नाहीत" असे का? तर अरबी प्रदेशात तेथे पूर्वी झालेले हजरत इब्राहीम (अब्रॅहॅम), हजरत मूसा (मोझेस), हजरत अयूब (जोब), हजरत ईसा (जीझस) हे लोकांना माहीत होते. इतर चीन, जपान, भारत, आफ्रिका, अमेरिका इ. देशांतील देवाच्या प्रेषितांची नावे अरबी प्रदेशात अपरिचित होती, म्हणून ती सांगितली नाहीत. पैगंबर भारतात आले असते तर—

आहुस्त्वां ऋषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा
असितो, देवलो, व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ।

यातल्या नावासारखीच नावे घेतली असती. वरील श्लोकासह त्या लेखमालेत मी ही गोष्ट छापली, या लेखमालेची कात्रणे पाचसहा मुसलमानांनी मजकडून मागून नेली. ती हातोहात फिरत वाचली जात आहेत असे मला तपास करता आढळून आले. त्याला आता सात वर्षे झाली. अद्याप एकाही मुसलमानाने त्या लेखावर आक्षेप घेतलेला नाही. 'महजब' म्हणजे धर्म याच्या बाबतीत सक्ती नसावी असे पैगंबरांनी म्हटले आहे. तसेच मुसलमानांना सांगितले आहे की "हे मुसलमानांनो, तुमच्या घरादारांवर आक्रमण होऊन तुम्हांला निर्वासित होण्याची वेळ आली तर, हातात तलवार घेऊन प्रतिकार करण्याचा अधिकार अल्लाने तुम्हांला दिला आहे. पण त्यातही अतिरेक करू नका. कारण अतिरेक अल्लाला आवडत नाही." यावरून पैगंबरांनी फक्त आत्म-संरक्षणासाठी शस्त्राचार सांगितला आहे. आक्रमक हिंसेसाठी नव्हे हे स्पष्ट होते. ही गोष्टही मी त्या लेखमालेत मांडली होती.

आतापर्यंत आजवरच्या धर्मजीवनाचा ऊहापोह केला. आता पुढे काय करावयास पाहिजे याचेही थोडे दिग्दर्शन अप्रस्तुत होणार नाही. हिंदूंनी विशेषतः त्यांतील सुशिक्षितांनी ढापणे लावलेले घोडे, न्यूनगंडी व आत्मसंकोची बनू नये. एक घडलेली हकीकत सांगतो. आठनऊ वर्षांपूर्वी एका खिस्ती मिशनऱ्याचे खिस्तीधर्मावर

पुण्यास गोखले सभागृहात व्याख्यान झाले. व्याख्यानाच्या हस्तपत्रिकेत छापले होते की "कोणाला प्रश्न विचारावयाचे असतील तर शेवटी विचारावेत." मी त्या वेळी पर्वतीपलीकडे रानात झोपडे बांधून राहात होतो. यामुळे संध्याकाळी उजेड असताच परतणे अवश्य होते. म्हणून मी हिंदुसभेचे एक स्वयंसेवक श्री. होनराव यांना तीन प्रश्न लिहून दिले. तसेच पुण्यास सुशिक्षितांच्या भरवस्तीत "प्रश्न विचारावयाचे असतील तर विचारा" असे आव्हानपूर्वक प्रकट भाषण जाहीर केले असता आणखी कोण प्रश्न विचारावयास येतो याबद्दलही मला जिज्ञासा होती.

श्री. होनराव यांना प्रश्न लिहून दिले ते असे—

(१) देवाने सात दिवसांत जग निर्माण केले व चौथ्या दिवशी चंद्रसूर्य निर्माण केले. मग सूर्यावाचून पहिले तीन दिवस कसे मोजले ?

(२) काही अस्तित्वात नव्हते तेव्हा देव म्हणाला प्रकाश होवो आणि प्रकाश झाला. कोणीच पुढे नसता प्रकाश होवो असे देव म्हणाला कोणाला ?

(३) आदम व ईव्ह हे पहिले जोडपे. त्यांना केन व ॲबेल हे मुलगे. मग त्यांना बायका कोठून मिळाल्या ?

पहिल्या दोन प्रश्नांना उत्तर आले की, "हे सृष्टीच्या उत्पत्तीचे वर्णन रूपकात्मक आहे. सत्यार्थाने ते घ्यावयाचे नाही." तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर "त्या वेळी बहीण-भावांची लग्ने करण्यास देवाची परवानगी होती." पण आदम व ईव्ह यांना मुली झाल्याची नोंद नाही. केनने ॲबेलला ठार केले. तेव्हा आईबापांनी त्याला हाकलले. तो दुसऱ्या प्रदेशात गेला व तेथे त्याला बायका मिळाल्या असे वर्णन आहे.

सुशिक्षितांच्या भरवस्तीतील या व्याख्यानाच्या शेवटी प्रश्न विचारण्यास होनरावखेरीज फक्त एकच कोणी भालेराव नावाचा मनुष्य आला होता. दुसरे कोणी आले नाहीत.

ही हकीकत मी फादर लेदर्ले यांच्याकडे जाऊन त्यांना सांगितली व म्हणालो की, "तुम्ही मिशनऱ्यांनी आमच्या धर्मशास्त्रांविरुद्ध जे तर्कशास्त्रीय हल्ले केले त्याच्या दशांश तर्कशास्त्र चालविले तर तुमच्या शास्त्राच्या चिंधड्या उडविता येतील." ते गप्प राहिले.

मी लेदर्ले यांना पुढील खिस्तविषयक आर्या कवीचे नाव न सांगता म्हणून दाखविल्या—

निर्मल हिमशीतल यद्वचनी भवतप्त जीव लोभावा।
धाडी देव कधी तरि सत्यचि तो देवदूत शोभावा॥
त्या शान्त दान्त भगवद् यशपावन येशुच्या पदां नमुनी।
देखा पुनरुत्थाना सत्यचि घे करुनि आत्मदान मुनी॥

लेदर्ले म्हणाले, "फार चांगले खिस्तवर्णन आहे". मग मी त्यांना म्हणालो, "ज्यांना तुम्ही कडवे हिंदू समजता त्या वीर सावरकरांच्या 'सप्तर्षी' काव्यातल्या या आर्या

आहेत. कोणीही ख्रिस्ती एखाद्या हिंदू दैवताची वा संताची अशी स्तुती करील काय ?" ते गप्प राहिले. तेव्हा मी त्यांना म्हणालो, "मग मी असे का म्हणू नये की, कडव्यातल्या कडव्या हिंदूतही उदारातल्या उदार ख्रिस्त्यापेक्षा अधिक उदारता असते." यावरही ते काही बोलले नाहीत.

कै. य. गो. जोशी यांनी फादर स्टीफन्स यांचे ज्ञानेश्वरीच्या काळात लिहिलेले 'ख्रिस्तपुराण' मिशनऱ्यांनी छापावयास दिले तेव्हा छापले. त्याची पहिली प्रत घेण्यासाठी तीन गोरे मिशनरी, उतारवयाचे आले होते, तेव्हा मीही कर्मधर्मसंयोगाने 'प्रसाद'मध्ये लेख देण्यास गेलो होतो. आम्ही बसण्याच्या खोलीत एकत्र आलो व श्री. जोशी हे पहिली बांधीव प्रत आणण्यासाठी पलीकडील त्यांच्या मुद्रणालयात गेले. तेव्हा मी या मिशनऱ्यांपुढे पुढील गोष्टी मांडल्या. जोशी यांना प्रत आणावयास वेळ लागल्यामुळे मला सविस्तर बोलता आले. मी त्यांच्यापुढे मांडलेल्या गोष्टी अशा—

(१) वालचंदनगर कारखान्याची सर्व वसाहत प. वा. गुलाबचंद शेठ यांनी फार योजकतेने निर्माण केली. त्यात सर्व कामकरी व अधिकारी यांच्यासाठी एक देवालय त्यांनी बांधले. कोणाचाही सल्ला न घेता या देवळात मध्यभागी भिंतीला लागून केलेल्या एकाच ओट्यावर शिव, विष्णू, महावीर व बुद्ध यांच्या सारख्याच आकाराच्या व उंचीच्या चार मूर्ती ओळीने मांडलेल्या आहेत. आजपर्यंत विष्णुपदी फूल वाहणाऱ्या कोणा विष्णुभक्ताने बुद्धाला वा महावीराला दगड मारला नाही. आपल्या देवाला भजताना इतर देवांचा तिरस्कार करावयाचा हे शास्त्र भारतात नाही; ते सेमेटिक म्हणजे ख्रिस्ती-ज्यू-इस्लामी धर्मात आहे. गुलाबचंदजी स्वतः जैन. ते माझे मित्र आहेत. तुम्ही तितक्याच उंचीची मेरीमाता व तिचे हाती बालख्रिस्त अशी मूर्ती द्या. मी ती पाचवी मूर्ती तेथे बसवण्यास गुलाबचंदांना प्रवृत्त करीन. ते नाही म्हणणार नाहीत. आणि मी तुम्हांला या भारतामधील चालू व भावी पिढ्यांची हमी देतो की, कोणीही त्या मूर्तीचा अपमान करणार नाही.

पण तीन्ही वयस्क गोरे मिशनरी डोळे टवकारून गप्प, मूकस्तंभ.

(२) मी दुसरी गोष्ट मांडली, "वेरुळला बौद्धांची, जैनांची व हिंदूंची डोंगरात खोदलेली लेणी आहेत. सर्व धर्मांचे लोक ती सारख्याच आदरभावाने पाहतात. तुम्ही मिशनरी श्रीमंत आहात. तुम्ही तेथील जवळचा डोंगर घ्या व त्यात समग्र ख्रिस्त-चरित्रातील ठळक उद्‌बोधक प्रसंग खोदा. या ख्रिस्ती लेण्यांचा कोणीही अवमान करणार नाही. असे झाले तरच ख्रिस्त भारतामध्ये स्थायी झाला असे होईल. तोवर तो परका राहील."

पण यावरही तीन्ही गोरे मिशनरी डोळे वटारून गप्प. एक शब्दही नाही. ते कुंठित झाले असेच मी समजतो. हिंदूंनी इतर धर्मीयांशी त्यांच्या धर्माची माहिती घेऊन परिसंवाद (डायलॉग) करावेत. आजूबाजूला न पाहण्याची वृत्ती सोडून द्यावी. हाच यातला निष्कर्ष.

एक मुंबईचा धनाढ्य व्यापारी जपानात जाऊन आला. गेल्या दहा वर्षांतलीच ही गोष्ट. सातव्या शतकात बौद्ध धर्माबरोबर जपानात हिंदू दैवतेही गेली. त्यांची देवळे तेथे आहेत. तेथे अशी चाल आहे की, देवळाबाहेर त्या देवतेच्या लहानमोठ्या मूर्ती तयार करून विकणारे बसलेले असतात. त्या देवळाचे दर्शन घेतल्याचे प्रतीक म्हणून ऐपतीप्रमाणे लहान वा मोठी मूर्ती विकत घेऊन लोक जातात. भारतीय व्यापाऱ्याने अशा चांगल्या मोठ्या मूर्ती घेतल्या व मुंबईस आल्यावर त्यांचे प्रदर्शन "घरी आलेले देव" (गॉड्स कम होम) या नावाने मांडले. त्याची चित्रे व माहिती 'इलस्ट्रेटेड वीकली' मध्ये आल्याचे मला कित्येक महिन्यांनी समजले. शोध करूनही तो अंक सापडला नाही. पण हे प्रदर्शन पुण्याला, साताऱ्याला, धुळ्याला, कोल्हापूरला आणा असे त्या व्यापाऱ्याला सांगण्याची बुद्धी कोणाला झाली नाही. याचे मला वाईट वाटले.

आपल्या पूर्वजांची जशी पुण्याई आहे तशीच 'पापाई' आहे. विशेषतः ब्राह्मण पूर्वजांनी उच्चता, श्रेष्ठपणा मिरवला, इतरांना असंस्कृत ठेवले. भेदभाव जोपासला. ही ब्राह्मण पूर्वजांची पापाई होय. ती निस्तरावयाला, एक प्रकारे पितृऋण फेडण्याला, ब्राह्मणांनीच पुढे येऊन समता प्रस्थापित केली पाहिजे. त्यांच्यावर ही मुख्य कर्तव्यता येते.

मात्र त्याचा न्यूनगंड त्यांनी बाळगू नये. जातिगट विभिन्न होण्यास ऐतिहासिक कालातील भिन्न वंशांचे गटागटाने स्थानोस्थानी जाणे (मायग्रेशन) हे कारण झाले. ते गट सांभाळणे ही संरक्षणाची आवश्यकता होती म्हणून ते बांधून पक्के झाले. हिंदूंनी लक्षात घ्यावे की, सर महंमद इक्बल हे मुस्लीम लीगच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात म्हणाले होते की "We Muslims have out-Hindued the Hindu in the matter of caste. We have inherited all their castes and added the denominational distinctions" (आम्ही मुसलमानांनी जातिभेदाच्या बाबतीत हिंदूंवर मात केली आहे. परंपरेने त्यांच्या सर्व जाती आमच्यात आल्याच आहेत आणि त्यांतही शिया, सुनी, सुफी इ. भेदांची आम्ही भर घातली आहे.)

ख्रिस्त्यांतही सुप्त जातिभेद आहेत. दक्षिणेकडील "हरिजन ख्रिस्ती परिषदा" १९४६ पर्यंत भरत होत्या. कोठेही जातिभेद वाईट. कोणी कोणाला न हसता त्याच्या निर्मूलनाचा प्रयत्न आपापल्या समाजात करावा.

तत्त्वज्ञानविचारात महाराष्ट्राने घातलेली भर

डॉ. लीला द. गोळे

प्रास्ताविक

'गेल्या पंचवीस वर्षांत तत्त्वज्ञानविचारात महाराष्ट्राने घातलेली भर' हा मथळा वाचल्याबरोबर साहजिकच विषयाच्या मांडणीला स्थलकालाच्या निश्चित अशा सीमारेषा आहेत हे उघड होते. प्रस्तुत निबंधामध्ये सबंध भारताचा विचार करावयाचा नसून केवळ महाराष्ट्रापुरता व तोही गेल्या पंचवीस वर्षांतील महाराष्ट्राचा, म्हणजे जवळजवळ स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राचा विचार करावयाचा आहे. महाराष्ट्राचा भूगोल या कालावधीत इतका बदलत गेलेला आहे, की त्यामुळे महाराष्ट्राचा व्याप नेमका कोणता मानावा याबद्दल संभ्रम पडावा.

स्वातंत्र्योत्तर कालात प्रथम इंग्रजी अमदानातील प्रांतरचना जाऊन भाषावार प्रांतरचना झाली व नंतर स्वतंत्र राखून ठेवलेली मुंबईही महाराष्ट्रात सामील केली जाऊन, १९६० सालापासून संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. तसेच १९६३ साली गोवा काबीज करून त्याचा समावेशही महाराष्ट्रात करण्यात आला. म्हणजे आज मागे वळून पाहताना ज्या महाराष्ट्राचा विचार करावयाचा, त्याचा व्याप फार मोठा म्हणजे मुंबई व गोवा, वऱ्हाड, नागपूर, धुळे, जळगाव इ. नी युक्त असा बृहन्महाराष्ट्र होय हे ध्यानात ठेवावयास हवे.

तसेच 'तत्त्वज्ञान' या शब्दाचा अर्थही येथे स्पष्ट करणे प्रस्तुत ठरेल. 'तत्त्वज्ञान म्हणजे विचारांच्या मूलभूत स्वरूपाची चिकित्सा करणे' असा संकुचित अर्थ येथे अभिप्रेत नाही. तसा अर्थ घेतला तर तत्त्वज्ञान म्हणजे केवळ विधानचिकित्सा किंवा भाषिक विश्लेषण ठरण्याची शक्यता आहे. भारतीय व महाराष्ट्रीय परंपरेला अनुसरून तत्त्वज्ञान या पदाचा मूळ व्यापक अर्थच येथे गृहीत धरला आहे. त्या दृष्टीने

' तत्त्वज्ञान ' या पदात सत्ताशास्त्र, ज्ञानमीमांसाशास्त्र, नीतिशास्त्र, कलास्वरूपशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, धर्म व अध्यात्मशास्त्र यांचा समावेश होतो. अर्थात येथे महाराष्ट्रापुरताच विचार जसा करावयाचा आहे तसाच तत्त्वज्ञानाच्या या विविध शाखोपशाखांमध्ये प्राचीन कालापासून आजपावेतो कोणकोणते विचारप्रवाह प्रचलित झाले व निर्माण होत आहेत या सर्वांचा विचार अभिप्रेत नसून, केवळ गेल्या पंचवीस-तीस वर्षांसंबंधीच विवेचन करावयाचे आहे.

अर्थात या स्थलकालमर्यादेमुळे प्राचीन कालातील वेदउपनिषदांचा अभ्यास, तत्त्वदर्शनांची खंडनमंडनात्मक चर्चा, स्मृतिपुराणग्रंथांचे अध्ययन–अध्यापन व मध्ययुगीन कालातील नाथसंप्रदाय, महानुभावपंथ व त्यात होऊन गेलेले गोरक्षनाथ, चक्रधरस्वामी इत्यादी थोर विचारवंतांनी केलेले तत्त्व व धर्मप्रसाराचे कार्य व ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या थोर संतांनी केलेला भक्तियोगाचा प्रसार, व तत्त्वमीमांसा यांचा विचार करण्याचे प्रयोजन नाही. तसेच त्यानंतरच्या कालावधीत मोरोपंत, दासोपंत, वामनपंडित, रामजोशी इत्यादी अनेक पंत व पंडित कवींनी आपआपल्या साहित्यामधून केलेली तात्त्विक चिकित्सा यांचाही आपल्याला येथे विचार अभिप्रेत नाही. किंबहुना आधुनिक कालातील न्यायमूर्ती रानडे, कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, परांजपे, कोल्हटकर, वा. म. जोशी इत्यादी विचारवंतांच्या तत्त्वविचारांचा देखील ऊहापोह आपणांस या निबंधात करण्याचे कारण नाही. आपल्याला विचार करावयाचा आहे तो स्थूलमानाने स्वातंत्र्योत्तर कालाचा म्हणजे सुमारे १९४७ पासून १९७० पर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्रात झालेले तत्त्वज्ञानविषयक ग्रंथलेखन व विचारविमर्श यांचा !

मात्र आधुनिक कालातील विचारांची दिशा समजून घेण्यासाठी वरील विचारधनाचा पुसटसा का होईना परिचय व माहिती असणे-अत्यावश्यक आहे व ती पार्श्वभूमी गृहीत धरूनच हे अत्याधुनिक कालाचे विवेचन केलेले आहे. सुदैवाने महाराष्ट्रातील तत्त्वविचाराचा विकास अगदी प्राचीन कालापासून आजपर्यंत कसकसा होत गेला याचे सारभूत विवेचन करण्याचा प्रयत्नही आतापर्यंत अनेकदा झालेला आहे.

नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे १९४० मध्ये प्रसिद्ध झालेल्या ' प्रदक्षिणा ' नावाच्या ग्रंथात, तत्पूर्वीच्या १०० वर्षांत महाराष्ट्रामध्ये वाङ्मय, इतिहास व तत्त्वज्ञान आणि इतर मानवी व भौतिक शास्त्रे यात झालेला विकास समाविष्ट करण्यात आला आहे. फर्ग्युसन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानविभागाचे भूतपूर्व विभाग प्रमुख प्रा. न. ग. दामले ह्यांनी त्यात लिहिलेला ' तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय ' हा निबंध जिज्ञासूंनी अवश्य वाचवा. त्यानंतरच्या कालात १९६० च्या मध्यात श्री. गं. बा. सरदार यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेल्या ' महाराष्ट्रजीवन, भाग १ व २ ' या मोठ्या ग्रंथात धार्मिक संस्था व संप्रदाय या विभागासाठी श्री. ज. स. करंदीकर व श्री. दा. न. शिखरे यांनी लिहिलेले लेख; व तत्त्वमीमांसा या विभागासाठी श्री. दि. के.

वेडेकर, श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेले लेख यांमध्ये महाराष्ट्रातील धर्म व तत्त्वविचाराचा इतिहास अधिक तपशीलवार मिळू शकेल.

आता येथे गेल्या पाव शतकाचा विचार करू जाता, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात विशेष भर घालणाऱ्यांमध्ये अग्रस्थान द्यावे लागेल ते काही तत्त्वज्ञानास वाहिलेल्या संस्थांना व मंडळांना. या संदर्भात भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च, प्रतापशेट तत्त्वज्ञानमंदिर इत्यादी ख्यातनाम संस्थांबरोबरच अलीकडच्या काळात अधिक काम करून राहिलेल्या अनेक संस्था, मंडळे व प्रकाशने यांचा ओझरता का होईना परिचय करून घ्यावयास हवा.

तत्त्वज्ञान-पूरक संस्था-मंडळे-प्रकाशने :

प्रथमतः स्वातंत्र्योत्तर कालात स्थापन झालेल्या भारतीय विद्याभवन या संस्थेचा उल्लेख करता येईल.

भारतीय विद्याभवन या संस्थेने तत्त्वज्ञान व धर्म यांचा ऊहापोह करणारे अनेक ग्रंथ अलीकडच्या काळात प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकी इंडियन इन्हेरिटन्स १ ते ३ भाग, एपिक्स अँड पुराणाज् ऑफ इंडिया, शंकराज टीचिंग्ज इन् हिज ओन् वर्डस्, भक्तियोग, भगवान बुद्ध इत्यादी पुस्तकांचा वानगीदाखल उल्लेख करता येईल.

याशिवाय वाई येथील प्राज्ञपाठशाला ग्रंथमालेतर्फे प्रसिद्ध झालेली धर्मकोश भाग १ ते ४, मीमांसादर्शन, बौद्धागमार्थसंग्रह, नवमानवतावाद इ. पुस्तके या संदर्भात उल्लेखनीय आहेत. शिक्षणप्रसारक मंडळीच्या विद्यमाने १९४७ सालापासून सुरू झालेली कौशिक व्याख्यानमाला व पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने नुकतीच सुरू झालेली गुरु. रानडे व्याख्यानमाला यांनाही येथे फार महत्त्व द्यावयास हवे. या व्याख्यानांपैकी काही व्याख्याने आता ग्रंथरूपाने उपलब्ध झालेली आहेत. त्यांपैकी रा. ना. दांडेकर यांचे 'वैदिक देवतांचे अभिनव दर्शन,' ह. रा. वेलणकरांचे 'ऋग्वेदातील भक्तिमार्ग,' शं. दा. पेंडसे यांचे 'ज्ञानेश्वरीचा अभ्यास', खुपेरकरशास्त्री यांचे 'श्रीशैवागम आणि ज्ञानेश्वर', शं. वा. दांडेकर यांचे 'ज्ञानेश्वर व प्लेटो', व्हॉ. सूर्यकांत यांचे 'व्हॉईस ऑफ द वेद' इ. पुस्तकांचा विशेष गौरवाने उल्लेख करता येईल.

तसेच राज्य सरकारने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने स्वतः व अनुदान देऊन अलीकडे प्रसिद्ध केलेली अनेक प्रकाशने तत्त्वज्ञान, सामाजिक मानसशास्त्र, सामाजिक तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र इ. विषयांतील प्रश्नांशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, इस्लामी संस्कृती, चार्वाक, इतिहास व तत्त्वज्ञान, लोकमत इ. तसेच समाजप्रबोधन प्रकाशनातर्फे अनेक सामाजिक प्रश्नोपप्रश्नांची चर्चा करणारे ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत व सामाजिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात भर पडत आहे.

काही मासिके व साप्ताहिके ही तर तत्त्वज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान यांतील विचारविमर्श यांना वाहिलेली आहेत. त्यांच्या अनेक अंकांमधून भिन्न भिन्न तात्त्विक

प्रश्नांसंबंधीचे लेख प्रसिद्ध होत असतात. महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, नवभारत, समाज-प्रबोधनपत्रिका, साधना, माउली, प्रसाद, माणूस, युगवाणी, जीवन-विकास इ. अनेक मराठी मासिकांतून वा साप्ताहिकांतून व Indian Philosophical Journal, Proceedings of All India Philosophical Congress इ. इंग्रजी मासिकांतून विविध विषयांची तत्त्वचर्चा केली जाते. नवभारतातील भारतीय तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, गांधींचे तत्त्वज्ञान इ. विषयांवरील लेख अथवा प्रसादमधून प्रसिद्ध होणारी अभंग संकीर्तने व प्रवचने, साधनेत प्रसिद्ध होणाऱ्या तात्त्विक चर्चा अथवा समाजप्रबोधन-पत्रिकेमधील मार्क्सवाद (विशेष अंक), मानवतावाद, रॉयचे तत्त्वज्ञान इ. विषयांवरील निबंध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाला उद्बोधक वाटल्यावाचून राहणार नाहीत. तसेच गेल्या काही वर्षांत काही महाराष्ट्रीय विद्वानांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त गौरवग्रंथ रचण्यात आले, त्यांतील कित्येक संशोधनपर लेखांवरून संतवाङ्मय, महाराष्ट्रसंस्कृती व तत्त्वज्ञान यांविषयी किती नवनवीन दृष्टीने अभ्यास केला जात आहे याची कल्पना येईल.

गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर कालावधीत थोरामोठ्यांच्या अनेक पुण्यतिथी अथवा शताब्दी-समारंभ साजरे करण्यात आले. त्यानिमित्ताने प्रसिद्ध झालेले वाङ्मय म्हणजे तत्त्वज्ञान क्षेत्राला लाभलेले मोठेच लेणे म्हटले पाहिजे. बौद्ध जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेली पुस्तके, विवेकानंद पुण्यतिथीनिमित्ताने प्रसिद्ध झालेले विवेकानंदांचे स्वतःचे समग्र ग्रंथ व त्यांच्या चरित्र व तत्त्वज्ञानावरील इतरांचे अनेक ग्रंथ, म. गांधी जन्मशताब्दीनिमित्त नवजीवन ग्रंथप्रकाशन संस्थेमार्फत प्रसिद्ध झालेले गांधींचे समग्र वाङ्मय व त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले असंख्य ग्रंथ यामुळे मराठीतील तात्त्विक विचारात बहुमोल भर पडली आहे.

मराठी वाचकाला कायमचे उपकृत करून ठेवू शकेल असा एक महान प्रयत्नही या संदर्भात चालू झाला आहे व तो म्हणजे वाई येथे स्थापिले गेलेले विश्वकोश-मंडळ. या विश्वकोशाचे काम जेव्हा पूर्ण होईल तेव्हा मराठी वाचकाला ज्ञानाचा एक अमोल ठेवा लाभणार आहे. तत्त्वज्ञान, धर्म, नीती इ. विषयीही त्यात स्वतंत्र विभाग असल्याने तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त होईल. याशिवाय प्रा. दे. द. वाडेकर यांच्या संपादकत्वाखाली मराठी एन्सायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफी अॅण्ड फिलॉसॉफर्स, हा तत्त्वज्ञ व तत्त्वज्ञानकोश गेली ७/८ वर्षे तयार होत आहे. या कोशाच्या प्रसिद्धीमुळेही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात बहुमोल भर पडणार आहे. याशिवाय श्री. चित्रावशास्त्री यांचे ऋग्वेदाचे भाषांतर व भारतीय चरित्रकोश हे ग्रंथ व इतर वेदांचेही मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्याचा त्यांनी सोडलेला संकल्प यामुळे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात फारच महत्त्वाच्या ग्रंथसंपत्तीची भर पडली असे म्हणावे लागते. श्री. महादेवशास्त्री जोशी यांच्या संपादकत्वाखाली तयार व प्रसिद्ध होत असलेले संस्कृतिकोशाचे विविध खंड यांचाही या बाबतीत उल्लेख करणे आवश्यक आहे. कारण त्यात तत्त्वज्ञान व धर्मशास्त्रेतील विषयोपविषयांसंबंधी अत्याधुनिक माहितीवर आधारलेल्या लेखांचा समावेश होणे अपरिहार्य आहे.

विद्यापीठांतर्गत तत्त्वज्ञानशाखा व तत्त्वज्ञान परिषदा :

महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, मराठवाडा, नागपूर, शिवाजी, ना. दा. ठाकरसी ही विद्यापीठे व त्यांमधील तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र या विषयांचे विभाग व तेथे अध्ययन, अध्यापन करणारे प्राध्यापक व संशोधक यांच्यामार्फतही काही थोडेफार काम चालू आहे. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक्रमाला धरून अनेक मराठी पाठ्यपुस्तके आजवर लिहिली गेली व जात आहेत. उदा. प्लेटोचे रिपब्लिक, भारतीय दर्शने, मानसशास्त्र, बालमानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र इ० अनेक विषयांवरील पाठ्यपुस्तके व इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. शिवाय पीएच्. डी. च्या अभ्यासासाठी विविध तात्त्विक विषयांची निवड करून, त्यावर लिहिलेले अनेकविध प्रबंधही उपलब्ध होत आहेत.

या संदर्भात महाराष्ट्रात तत्त्वज्ञान व धर्म यांचा ऊहापोह करणाऱ्या ज्या अनेक लहानमोठ्या परिषदा भरत असतात त्यांचा उल्लेख करावयास हवा. इंडियन फिलॉसॉफिकल ॲसोसिएशनतर्फे दरवर्षी मुंबई, पुणे किंवा नागपूर येथे एक किंवा दोन सेमिनार भरविण्यात येतात. आजवर या संस्थेमार्फत झालेले विटजेन्स्टाइन, कान्ट, लाय ब्लिट्झ, मार्क्स इ० अनेक थोर विचारवंतांवरील सेमिनार्स व त्यामधील निबंध उल्लेखनीय आहेत. पुणे येथील पूना फिलॉसॉफी युनियनतर्फे प्रसिद्ध झालेले तत्त्वज्ञानविषयक निबंधांचे सारसंग्रह व प्रा. प्र. रा. दामले यांचे निबंधसंग्रह यांचाही येथे अगत्याने उल्लेख करावयास पाहिजे.

तत्त्वज्ञानपर ललित साहित्य :

या कालखंडात आणखी अप्रत्यक्ष तऱ्हेनेही एका वेगळ्याच क्षेत्राकडून तात्त्विक विचारमंथनामध्ये भर पडत चाललेली दिसून येते व ते क्षेत्र म्हणजे नवसाहित्य. गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात झालेले अनेक कवी आणि लेखक (काही दिवंगत व काही हयात असणारे) यांनी आपआपल्या साहित्यातून तात्त्विक विचारमंथनही केलेले आढळून येते. हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी यांचे साहित्य जुन्या काळातील म्हणून जरी बाजूला ठेवले तरी वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे, विश्राम बेडेकर, मालतीबाई बेडेकर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, श्री. ना. पेंडसे, इ० अनेक लेखकांच्या कादंबऱ्यांत सामाजिक तत्त्वचिंतनाचा आविष्कार प्रकर्षाने होत असलेला दिसून येईल. अनेक लहानमोठ्या तात्त्विक समस्यांचा ऊहापोह त्यांच्या साहित्यात होत असल्याने त्याला तात्त्विक चर्चेत मानाचे स्थान मिळू शकते. येथे गेल्या काही वर्षांत झालेल्या महाभारत – रामायणावरील नवीन साहित्याचा व श्रीशिवछत्रपतींच्या जीवन-शिकवणुकीच्या संशोधनामधून निर्माण झालेल्या वाङ्मयाचाही उल्लेख करावासा वाटतो. श्रीमती दुर्गा भागवत यांचे 'युगपर्व,' श्रीमती इरावती

कर्वे यांचे 'युगान्त', बाळशास्त्री हरदास यांची —महाभारत–रामायण–श्रीकृष्ण–बुद्ध–शंकराचार्य व शिवछत्रपती या विषयांवर झालेली व पुढे ग्रंथरूप प्राप्त झालेली व्याख्याने, याच संदर्भात मराठी नवकवींचाही आवर्जून उल्लेख करावयास पाहिजे. मर्ढेकर, मुक्तिबोध, करंदीकर, पु. शि. रेगे इत्यादिकांच्या काव्यातून जीवनविषयक एक नवीन दृष्टिकोण प्रकट होतो, तर दिलीप चित्रे, नारायण सुर्वे, आनंद यादव इत्यादी कवींच्या कवितांतून शहरी व ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या प्रचलित समाजजीवनांचे चित्रण व त्यातील समस्या व अंतर्विरोध इ. चा आविष्कार आढळतो.

काव्याप्रमाणेच नाट्यामध्येही अनेक मानसशास्त्रीय, तात्त्विक व सामाजिक समस्यांचा प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः परिस्फोट केला गेलेला आढळतो. पु. ल. देशपांड्यांच्या 'तुझे आहे तुजपाशी'मधील जीवन आनंदाने उपभोगून अलिप्त राहणारा 'काकाजी' व बटाट्याच्या चाळीतील सर्वसाधारण मध्यमवर्गीय माणसाचा प्रतिनिधिभूत असा 'कारकून' ही पात्रे काही वेगळेच जीवनभाष्य शिकवतात हे नाकारता येणार नाही. तसेच दंभ व भोंदूपणावर टीकाप्रहार करणारे अत्रे यांचे 'बुवा तेथे बाया' व 'तो मी नव्हेच' ही नाटके व वर्तमान मध्यमवर्गीय समाजातील अनेक छिद्रांवर प्रकाश टाकणारी विजय तेंडुलकर यांची 'श्रीमंत,' 'मी जिंकली मी हरलो', 'शांतता! कोर्ट चालू आहे' किंवा 'तोरडमल' यांचे 'काळे बेट लाल बत्ती' हे सत्ताप्रिय प्रवृत्तीचे उपरोधात्मक वर्णन करणारे नाटक इ. नाटके तत्त्वचिंतनाची साक्ष देणारी आहेत.

वास्तविक, हे ग्रंथसाहित्य प्रत्यक्षतः तत्त्वज्ञानावरील नव्हे. परंतु या साहित्याचे परिशीलन करणाराला त्यातील विवेचनपद्धती तत्त्वनिष्ठ व कित्येक मानसशास्त्रीय व तात्त्विक समस्यांचा ऊहापोह करणारी, तर्कप्रधान व सर्वंकष अशी आढळून येईल.

काही प्रमुख धर्मसंप्रदाय व त्यांचे कार्य :

महाराष्ट्रातील तत्त्वमीमांसेचा विचार येथील धर्मसंप्रदायाच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होत नाही. महाराष्ट्राची भूमी ज्ञानदेवांच्या पुनीत पदस्पर्शाने पावन झाली आहे आणि निवृत्तिनाथ, सोपानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादी संतमंडळींच्या पदरवाने वंद्य झाली आहे या गोष्टीचा कोणाही महाराष्ट्रीयास अभिमानच वाटेल. या संतश्रेष्ठ मंडळींनी ज्या अध्यात्मविद्येचा व गूढविद्येचा मागोवा घेतला त्यातील काही मार्गांचे अनुकरण करणारे व साक्षात्काराचा स्पर्श अनुभवणारे थोर संत आजही उपलब्ध आहेत, ही आनंदाची गोष्ट. या संदर्भात विजापूर जिल्ह्यातील 'निंबाळ' या गावी आश्रम स्थापून भक्तिज्ञानाचा प्रसार करणारे सद्‌भक्त व तत्त्वज्ञ रा. द. रानडे यांचा नामनिर्देश करता येईल. खरोखरी गुरु. रा. द. रानडे म्हणजे महाराष्ट्राची उज्ज्वल संतपरंपरा टिकवून धरणारे आधुनिक कालातील साधुपुरुषच होत. तसेच पुण्याच्या वासुदेवाश्रमात वास्तव्य करणारे गु. वामनरावजी गुळवणीमहाराज यांचाही येथे उल्लेख करावासा वाटतो. यांचा योग व अध्यात्मविद्येतील व्यासंग व अधिकार फार

मोठा असून त्यांच्या असंख्य शिष्यवरांना त्यांच्या कृपेने जीवनातील परमसुखाचा मार्ग सापडला आहे.

या संदर्भात महाराष्ट्रात दृढमूल होऊन बसलेल्या वारकरी, दत्त, नाथ, रामदासी, महानुभाव या मोठ्या पंथांबरोबर शिरडी येथील साईबाबांचा मठ, साकोरी येथील उपासनीमहाराजांचा मठ, अक्कलकोट स्वामींचे मठ, पंढरपूर व आळंदी येथील अनेक लहानमोठ्या साधूंचे मठ व फड आणि त्यात कार्य करणारे भक्तगण यांचीही दखल घ्यावयास हवी. सामान्य जनमनावर त्यांचा फार मोठा प्रभाव पडत आहे यात संशय नाही. विशेषेकरून महाराष्ट्रात प्राचीन कालापासून चालत आलेले जे धर्मपंथ व संप्रदाय आहेत त्यांचा वारसा हिरीरीने व एकनिष्ठेने चालविणारे काही लोक व संस्था अनेक कार्यक्रम कार्यवाहीत आणीत आहेत. वारकरी संप्रदायात तर अनेक लहानमोठे फड, मठ व दिंड्या निर्माण झाल्या असून हरिभक्तीचा प्रसार व धार्मिक विचारांचा संस्कार जनमनावर करण्याचा प्रयत्न चालू आहे. उदाहरणार्थ, गाडगेमहाराज, तुकडोजी-महाराज, कैकाडीमहाराज, धुंडामहाराज, दासगणूमहाराज, मनमाडकर महाराज, श्री. नेऊरगावकर, श्री. देवधर इत्यादी लोकांचे व त्यांच्या शिष्यगणांनी चालवलेले धर्मप्रसाराचे कार्य तसेच रामदासी पंथाचे प्रमुख प्रवक्ते म्हणजे सज्जनगड येथील श्रीधरस्वामी व त्यांचे शिष्यगण यांचाही येथे आदरपूर्वक उल्लेख करता येईल. थोर समर्थभक्त श्री. देव यांनी धुळ्याहून प्रसिद्ध केलेले समर्थवाङ्मय आजही प्रमाणभूत मानण्यात येते व अनेक रामदासभक्तांच्या नित्य पठणात त्याचा वापर करण्यात येतो. याशिवाय महाराष्ट्राबाहेरील थोर भारतीय तत्त्वज्ञ व संत यांच्या कार्याची मराठी माणसाला ओळख करून देण्याचा उद्योग काही संस्था व व्यक्ती यांनी चालविला आहे. योगी अरविंद यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी अरविंद सर्कल्समध्ये एकत्र जमणारी मुंबई, पुणे, धुळे, नागपूर येथील मंडळी, व ‘संजीवन’ हे अरविंदांच्या तत्त्वज्ञानाला वाहिलेले पाक्षिक व मासिक हे त्याचे एक उदाहरण. सेनापती बापट यांनी केलेल्या Life Divine या ग्रंथाच्या मराठी अनुवादाचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावयास हवा. जगप्रसिद्ध तत्त्वचिंतक जे. कृष्णमूर्ती यांच्या तत्त्वज्ञानाची छापही महाराष्ट्रीयांवर फार जोरदारपणे पडलेली दिसून येते. अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, पु. य. देशपांडे, आ. रा. देशपांडे इ. अनेक मान्यवर पंडितांच्या मनावर जे. कृष्णमूर्तींच्या आत्मबुद्धिनिष्ठवादी तत्त्वचिंतनाचा परिणाम झालेला दिसतो. प्रा. ए. डी. धोपेश्वरकर यांनी अनेक इंग्रजी ग्रंथांतून जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचा महाराष्ट्रीयांना परिचय करून दिला आहे. तसेच पु. य. देशपांडे यांनी ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान व जे. कृष्णमूर्तींचे तत्त्वज्ञान यांची तुलना करण्याचा प्रयत्न आपल्या अमृतानुभवावरील ग्रंथात केलेला आढळतो.

महाराष्ट्रीयेतर चिंतकांनी महाराष्ट्रात केलेला तत्त्वज्ञानपर विचारांच्या प्रसाराचे उदाहरण म्हणून चिन्मयानंद व पूर्णानंद यांचा नामनिर्देश करता येईल. गीतायज्ञाद्वारे

भगवद्गीतेची शिकवण जनमनाला करून देण्याचा यत्न स्वामी चिन्मयानंद करीत असतात. पवई येथे त्यांनी चिन्मय मिशन उघडले असून त्याद्वारा अखिल महाराष्ट्रात ठिकठिकाणी त्यांची प्रवचने व चर्चासत्रे होत असतात. तसेच स्वामी पूर्णानंद यांनी योगसूत्रे, गीता, योगवासिष्ठ इ. ग्रंथांप्रमाणेच रमणमहर्षींच्या ' आत्मज्ञान ' वादाची शिकवण लोकांपर्यंत नेऊन पोहोचवण्याचा उद्योग आरंभिला आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील अनेक गावी त्यांनी प्रवचने करून तत्त्वज्ञानाचा प्रसार सुरू ठेवला आहे. महाराष्ट्रातील गुजराती, मारवाडी व सिंधी समाजावर विशेष पकड ठेवणारे आणखी एक महान प्रवचनकार म्हणजे जैन साधू आचार्य रजनीश. त्यांच्या प्रवचनातही ते आधुनिक विज्ञानजगातील समस्या व तत्त्वदर्शन यांचा सुरेख मेळ घालून दाखवितात. बहुजन-समाजावर विशेष प्रभाव टाकणारे आणखी एक तत्त्वप्रचारक म्हणजे कोल्हापूरचे श्री. दत्ता बाळ. विज्ञान व तत्त्वज्ञान, तंत्र व मंत्र, ऐहिक व पारलौकिक कल्याण यांच्यातील अभिन्नतेचे दर्शन करवून ते महाराष्ट्रीयांना तत्त्वज्ञानाच्या वास्तविक उपयुक्ततेची जाणीव करून देतात. याशिवाय वैज्ञानिक दृष्टिकोणातून जीवनाचे महान अद्वैतवादी तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न लोणावळा येथील स्वामी विज्ञानानंद गेली दहाबारा वर्षे करीत आहेत. अतीन्द्रिय शक्तींना आवाहन करून त्याद्वारा जीवितसाफल्य साधता येऊ शकेल अशा श्रद्धेने विविध प्रकारच्या मंत्रतंत्रयोगादी विद्यांचे अध्ययन व प्रचार करण्याचे कार्य नुकतेच दिवंगत झालेल्या धुं. गो. विनोद यांनी आमरण सुरू ठेवले होते.

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक धनसंपदेत आपापल्या दृष्टिकोणानुसार व सामर्थ्या-नुसार भर टाकणाऱ्या आणखी काही महाराष्ट्रेतर व्यक्तींचा ओझरता उल्लेख करावयाचा म्हटले तर त्यामध्ये मेहेरबाबा, साधु वास्वानी, आनंदमयी माँ व महाराष्ट्रात ठिकठिकाणी असलेल्या रामकृष्ण-आश्रमांमधून कार्य करणारे स्वामी इत्यादी व्यक्तींचा समावेश करावा लागेल. वर उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व साधुपुरुषांच्या हयातीत अथवा पश्चात एक मोठा शिष्यसंप्रदाय व अध्यात्मकेंद्रे निर्माण झालेली दिसून येतात; व त्यांच्यामार्फत त्या त्या साधूंचे कार्य पुढे चालविले जाते.

काही प्रमुख तत्त्वचिंतक व त्यांचे कार्य :

वर उल्लेखिलेले महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानपर वाङ्मय व समाजकार्य याविषयीची सर्वसाधारण पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ज्यांनी विशेष उल्लेख-नीय व बहुमोल कामगिरी बजावली आहे अशा काही प्रमुख तत्त्वचिंतकांचा व त्यांच्या लेखनाचा आता ओझरता परिचय करून घेऊ. या दृष्टीने गेल्या २५–३० वर्षांतील तत्त्वचिंतनाकडे पाहिले तर त्यामध्ये प्रमुखतः दोन अलग विचारधारा स्पष्टपणे दिसून येतात : (अ) अध्यात्म, धर्म व नीतिप्रधान विचारप्रवाह आणि (आ) सामाजिक व राजकीय तत्त्वविचारप्रवाह.

(अ) अध्यात्म, धर्म व नीतिप्रधान विचारप्रवाह

ह्या पहिल्या प्रकारच्या विचारप्रवाहामध्ये ज्यांनी आपल्या लक्षणीय व विपुल ग्रंथलेखनाने भर टाकली अशांपैकी पुढील काही विचारवंतांचा निःसंशय विचार करावा लागेल. गुरुदेव रा. द. रानडे, के. ल. दफ्तरी, आहिताग्नी राजवाडे, पंडित सातवळेकर, धर्मानंद कोसांबी, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, सानेगुरुजी, शं. दा. पेंडसे, शं. वा. दांडेकर, बाळशास्त्री हरदास, वि. भि. कोलते, लक्ष्मणशास्त्री जोशी, उपनिषत्तीर्थ द. वा. जोग, न. र. फाटक, रा. चिं. ढेरे इत्यादींचा समावेश या गटात करता येईल. आता क्रमाने या सर्व तत्त्वचिंतकांच्या कार्याचा परामर्श घेऊ.

डॉ. रा. द. रानडे : भारतीय व युरोपीय तत्त्वज्ञानाचे प्रगाढ अध्ययन करून त्यातून समन्वयात्मक पण परमार्थवादी अशी निश्चित तत्त्वप्रणाली प्रतिपादन करण्याचे श्रेय डॉ. रा. द. रानडे यांना द्यावे लागेल. त्यांनी लिहिलेले ‘उपनिषदाचे समीक्षात्मक समालोचन’, ‘महाराष्ट्रामधील साक्षात्कारवाद’, ‘परमार्थसोपान’, ‘कानडी साहित्यातील साक्षात्कारवाद’, ‘भगवद्गीता ऊर्फ ईश्वर साक्षात्कारवाद’ हे ग्रंथ अजरामर कीर्ती मिळवून राहिले आहेत. अद्वैततत्त्वज्ञान व अनुभूतीसाठी करावे लागणारे साधन यांची सुरेख सांगड घालून जीवनविषयक परमार्थपर तत्त्वज्ञानाचा त्यांनी हिरीरीने प्रसार केला.

श्री. के. ल. दफ्तरी : यांनी आपल्या तत्त्वज्ञानपर लेखनात अधिक वस्तुनिष्ठ व बुद्धिवादी दृष्टिकोण स्वीकारलेला दिसून येतो. त्यांच्या ‘उपनिषदांचा अभ्यास’ या ग्रंथात व व्याससूत्रे, मीमांसासूत्रे यासंबंधीच्या लेखनात त्यांचा मूळ संस्कृत ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास व तर्कनिष्ठ मांडणी स्पष्ट दिसून येतात.

आहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे : ही महाराष्ट्राला लाभलेली आणखी एक मोलाची ठेव. त्यांच्या तत्त्वचिंतनामध्ये अद्वैतवादावर परखड टीकास्त्र उपसलेले जसे आढळून येते, तसेच मीमांसा, सांख्य व न्यायवैशेषिक या दर्शनांविषयीची आस्था व चिकित्सक अभ्यास यांचेही दर्शन घडते. षड्दर्शनसमन्वय व पुरुषार्थमीमांसा या ग्रंथांत त्यांनी व्यक्त केलेले विचार मूलगामी स्वरूपाचे व अद्वैतवादातील संभाव्य धोके समजण्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे असेच आहेत.

पंडित सातवळेकर : हे याच पठडीत शोभतील असे वेदव्यासंगी पंडित होते. त्यांनी प्रसिद्ध केलेले ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, रामायण, महाभारतावरील त्यांचे लेखन व धर्म म्हणजे काय हा त्यांचा दीर्घनिबंध इत्यादी अनेक पुस्तकांचा येथे नुसता धावता उल्लेख करणेच शक्य आहे.

श्री. धर्मानंद कोसांबी : यांनी आपले जीवन बौद्धधर्म व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास व प्रसार यास वाहिले होते. बुद्धाच्या विचाराचा सर्वांगीण अभ्यास करण्याच्या इच्छेने त्यांनी बुद्धवाङ्मयाचे तर आलोडन केलेच; परंतु सिलोन, ब्रह्मदेश इत्यादी ठिकाणच्या विहारात वास्तव्य करून बुद्धधर्माची प्रात्यक्षिक बाजूही नीट समजावून

घेतली. 'भगवान बुद्ध' या त्यांच्या ग्रंथाला साहित्य अकादमीकडून पुरस्कार मिळाला असून, तत्पूर्वीचे त्यांचे समाधी मार्ग, बौद्ध संघाचा परिचय, हिंदी संस्कृती व अहिंसा हे ग्रंथ विद्वन्मान्य झालेले आहेत. प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानामध्ये अद्वैत तत्त्वज्ञानाचे महत्त्व फार वाढलेले दिसते त्याला एका बाजूने शह देण्याचे कार्य बौद्धतत्त्वज्ञानाच्या आपल्या प्रगाढ व्यासंगामुळे कोसांबी यांना करता आले, असे म्हणता येईल.

आचार्य विनोबा भावे : महात्मा गांधींचे निष्ठावंत अनुयायी व स्वातंत्र्य-चळवळीस जीवन वाहून घेतलेले थोर सामाजिक कार्यकर्ते म्हणून आचार्य विनोबा भावे हे सर्व महाराष्ट्रलाच काय पण भारताला व जगालाही परिचित आहेत. महात्मा गांधींनी आखलेल्या सर्व कार्यक्रमांत जातीने भाग घेऊन या महाराष्ट्राच्या सुपुत्राने आपली काया-वाचा-मन ही अखिल भारताच्या कल्याणासाठी झिजवली व सामाजिक उन्नती साधण्याचा प्रयत्न करीत असतानाच आपल्या आवडत्या विषयांचे सखोल अध्ययन व विद्याव्यासंग सतत चालू ठेवला. त्यांनी लिहिलेल्या अनेक लहानमोठ्या ग्रंथांतून त्यांची स्वतंत्र व स्वच्छ विचार करण्याची पद्धती, विशिष्ट मराठी शैली व सखोल अभ्यास यांचा आविष्कार झालेला दिसून येतो. 'गीताई' हे त्यांनी केलेले गीतेचे समश्लोकी उत्कृष्ट असे मराठी भाषांतर अत्यंत सरस उतरले आहे. स्थितप्रज्ञदर्शन व गीताप्रवचने या दोन पुस्तकांमध्ये त्यांनी स्थितप्रज्ञदशेचे व अनासक्तियोगाचे अत्यंत तर्कसंगत व मार्मिक पद्धतीने विवरण केले आहे. ईशावास्यवृत्ती, उपनिषदांचा अभ्यास, विचारपोथी, गुरुबोध, ज्ञानदेव-एकनाथांची भजने इत्यादी अनेक पुस्तकांमधून त्यांनी आद्यशंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे व संतांच्या भक्तिप्रेमयुक्त तत्त्वज्ञानाचे सोप्या भाषेत मंडन केले आहे. आचार्य विनोबा भावे यांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे 'भूदान-यज्ञा'चा त्यांनी केलेला आरंभ. 'भूदानयज्ञ' या पुस्तकात त्यांनी आपली सर्वकल्याणाची कल्पना व सर्वोदयाचे तत्त्वज्ञान स्पष्ट शब्दांत व्यक्त केले आहे. श्रीमंत व समृद्ध लोकांनी गरीब व जमीनविरहित शेतकऱ्यांना भूमी दान करावी व त्यांनी कृतज्ञतापूर्वक तिचा स्वीकार करून स्वकष्टाने तिची लागवड व जपणूक करावी. सर्वांचा उदय वा उत्कर्ष साधण्यासाठी सर्वांना प्रथम उपजीविकेपुरती जमीन मिळालीच पाहिजे. अशा तऱ्हेचे बंधुभाव व समता या तत्त्वावर आधारलेले आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी विनोबांनी भारतभर पदयात्रा सुरू केली व अनेक सर्वोदय कार्यकर्त्यांना प्रेरणा देऊन भूमिदान प्रत्यक्षतः घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आचार्य विनोबांच्या या अद्वैतवादी तात्त्विक भूमिकेचा खंबीर पाया असलेल्या परंतु एका विशिष्ट अर्थाने साम्यवादी म्हणता येईल अशा सर्वोदय तत्त्वज्ञानाचा भारतीय मनावर अधिक जलद परिणाम होत आहे व त्यायोगे एक प्रकारे परदेशीय साम्यवादाचे आकर्षण कमी होण्यास मदतच होत आहे.

दादा धर्माधिकारी : आचार्य विनोबांचे सच्छिष्य व सर्वोदय चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते म्हणून श्री. दादा धर्माधिकारी लोकांना परिचित आहेत. त्यांचे सर्वोदय-

वादावरील ग्रंथ व अन्य स्फुट लेख सर्वोदयाचे तत्त्वज्ञान समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत. 'सर्वोदयवाद' हा त्यांचा अलीकडे प्रसिद्ध झालेला ग्रंथ म्हणजे तर या तत्त्वज्ञानावरील जणू पाठ्यपुस्तक आहे असे म्हणता येईल. याच संदर्भात महात्मा गांधी व विनोबा भावे या दोन महापुरुषांकडून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात ठिकठिकाणी साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, प्रौढशिक्षण, खादी ग्रामोद्योग, वैद्यकीय मदत, निसर्गोपचार, समाजसेवापथके इत्यादी अनेकविध योजना राबवून घेऊन समाजसेवेचे कंकण बांधलेल्या असंख्य गांधीभक्तांचा व श्री. बाबासाहेब आमटे गुरुजी यांच्यासारख्या प्रसिद्धिपराङ्मुख व दीनदलित, रोगपीडित आणि मागासलेल्या लोकांच्या सेवेला आजन्म वाहून घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा आदरपूर्वक उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. अनामिकपणे जनताजनार्दनाची सेवा करीत राहणाऱ्या या थोर व्यक्तींचे आपण आजन्म ऋणी आहोत.

सानेगुरुजी : याच ठिकाणी सानेगुरुजींची आठवण येते. यांचे मूळ नाव **पांडुरंग सदाशिव साने.** सानेगुरुजी हे महाराष्ट्रीयांनी त्यांना दिलेले लाडके नाव. शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून त्यांनी अनेक समाजसेवेची कामे अंगावर घेतली. साक्षरताप्रसार व अस्पृश्यतानिवारण ही त्यातील प्रमुख कामे. स्वातंत्र्यचळवळीत तुरुंगवास पत्करल्यानंतर तुरुंगातील वेळ त्यांनी फुकट जाऊ दिला नाही. जगातील विविध भाषांतील सर्वोत्कृष्ट साहित्यातील निवडक व उद्बोधक कथा–कादंबऱ्यांची त्यांनी मराठी अनुवाद व रूपांतरे केली व त्याद्वारा लोकशिक्षणाचा आरंभ केला. भारतीय संस्कृती, गीतेवरील प्रवचने, गोड गोष्टींचे दहा भाग, श्यामची आई व अन्य रूपांतरित कादंबऱ्या इ. वाङ्मयाच्या द्वारा त्यांनी अनेक आदर्श व सामाजिक मूल्ये जनमानसापुढे उभी केली. किंबहुना स्वातंत्र्यलढ्यात सानेगुरुजींच्या निर्मळ व त्यागी जीवनचरित्र्यामुळे महाराष्ट्रातील तरुणपिढी अत्यंत प्रभावित झाली होती असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. 'साधना' साप्ताहिक' व 'सानेगुरुजी कथामाला' ह्या दोन संस्था त्यांच्या कार्याचे स्मारकस्वरूप असून आजही कार्यरत आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

श्री. शं. दा. पेंडसे : महाराष्ट्रीय संस्कृती व संतपरंपरा यांचा चिकित्सक अभ्यास करणारे अद्वैतवादी लेखक असा प्रा. पेंडसे यांचा लौकिक आहे. श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान या ग्रंथात त्यांनी ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान अद्वैत तत्त्वज्ञानच असून चिद्विलसावाद हा त्यापासून अभिन्न कसा आहे हे साधार सिद्ध केले आहे. शिवाय 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', 'ज्ञानदेव व नामदेव' हे त्यांचे ग्रंथही अभ्यसनीय आहेत.

श्री. शं. वा. दांडेकर : वारकरी संप्रदायाच्या कार्याला पूर्णपणे वाहून घेतलेले हरिभक्तिपरायण प्रा. शंकर वामन ऊर्फ सोनोपंत दांडेकर यांचे नाव माहीत नाही असा महाराष्ट्रीय विरळा. महाविद्यालयात अध्यापनकार्य चालू असतानाच दांडेकरांनी आपले कीर्तन-प्रवचनद्वारा समाजप्रबोधन करण्याचे कार्य चालू ठेवले. सेवानिवृत्तीच्या काळात तर भक्तिप्रसाराचे कार्य त्यांनी आमरण चालू ठेवले. 'ईश्वर-

वाद ', ' ज्ञानेश्वरीची संपादित आवृत्ती ', वारकरी संप्रदायाचा इतिहास, ज्ञानदेव आणि प्लेटो व अभंग संकीर्तनाचे अनेक भाग ही त्यांची पुस्तके तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाला उपयुक्त ठरावीत अशीच आहेत. एक उच्चशिक्षित प्राध्यापक लोकलज्जा सोडून वारकरी म्हणून वावरतो व स्वतःच्या नैष्ठिक ब्रह्मचर्ययुक्त व तेजस्वी अशा व्यक्तिमत्त्वाच्या द्वारा मराठी जनमानसावर साधुत्वाचा विलक्षण ठसा उमटवितो हा मोठा चमत्कारच म्हणावा लागेल. सोनोपंत दांडेकरांनी आपल्या जीवनचरित्राने हाच चमत्कार प्रत्यक्षात घडवून आणला होता हे खचित !

श्री. बाळशास्त्री हरदास : रामायण, महाभारत, आद्य शंकराचार्य, शिवचरित्र इत्यादी अनेक विषयांवर आपल्या ओघपूर्ण वक्तृत्वशैलीमध्ये व्याख्यानमाला गुंफून महाराष्ट्रीयांची अस्मिता व स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य श्री. हरदास यांनी केले. कालांतराने त्यांच्या व्याख्यानांना ग्रंथस्वरूपही प्राप्त होऊ शकले व त्याद्वारा मराठीतील तत्त्वज्ञानपर साहित्यात बहुमोल भर पडली. महाकाव्ये व आदर्श पुरुष यांच्या विवेचनाच्या निमित्ताने त्यांनी समाजापुढे मांडलेला तत्त्वज्ञानाचा सतेज व सर्वंकष गाभा हा कोणाही महाराष्ट्रीयाला अभिमान वाटावयास लावणाराच ठरेल यात शंका नाही.

डॉ. वि. भि. कोलते : हे नागपूरचे दुसरे एक संशोधक व पंडित. कवी, नाटककार, संगीतप्रेमी म्हणून श्री. कोलते जेवढे लोकांना ज्ञात आहेत, त्यापेक्षा अधिक महानुभाव संप्रदायाचे वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचे गाढे अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती आहे. श्रीचक्रधर चरित्र, चक्रधर व ज्ञानदेव, महानुभावांचा आचारधर्म, महानुभाव तत्त्वज्ञान व महानुभाव संशोधन आणि मराठी संतोंका सामाजिक कार्य इत्यादी त्यांचे ग्रंथ अत्यंत अभ्यासपूर्ण व सूक्ष्म संशोधनदृष्टीची ग्वाही देणारे असे आहेत. त्याशिवाय त्यांनी युगवाणी, साहित्य-पत्रिका, सत्यकथा इत्यादी अनेक मासिकांतून व्यासंगपूर्ण लेख लिहिले आहेत.

नागपूर विदर्भ भागातील तत्त्वचिंतकांमध्ये श्री. अप्रबुद्ध ऊर्फ श्री. पाळेकर यांचीही गणना करता येईल. उपनिषदे व भारतीय तत्त्वज्ञान याविषयीचा त्यांचा दृष्टिकोण बुद्धिनिष्ठ व चिकित्सक असल्यामुळे पारंपरिक मतापेक्षा काहीतरी निराळे असे विचार त्यांच्या लेखनात आढळून येतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संस्कृत पठडीत शिक्षण घेऊन तर्कतीर्थ व न्यायमार्तण्ड या उपाधीचे बिरुद संपादन करून त्याचबरोबर पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा व विशेषकरून रॅडिकल ह्युमॅनिझमचा अभ्यास व प्रचार करणारे एक बुद्धिनिष्ठ पंडित अशी जोशीबुवांची ख्याती आहे. वैदिक संस्कृतीचा विकास, हिंदुधर्माची समीक्षा व ज्योतिनिबंध इत्यादी त्यांनी लिहिलेले ग्रंथ गाजलेले आहेत. धर्मकोशाचे संपादनाचे प्रचंड काम पूर्ण केल्यानंतर भारत सरकारने आयोजित केलेल्या वाई येथील विश्व-कोशाच्या प्रमुख संपादकाचे जबाबदारीचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आले आहे

व आपल्या चतुरस्र बुद्धीच्या व कार्यकुशल अशा विद्वान मित्रांच्या सहकार्याने शास्त्रीबुवांचे हे प्रचंड कार्य मोठ्या गतीने सुरू आहे.

उपनिषत्तीर्थ द. वा. जोग : जुन्या परंपरेचा जाज्वल्य अभिमान असणारे बापटशास्त्रींच्या आचार्य कुलामध्ये शास्त्रीय पद्धतीने शिक्षण घेतलेले कडवे आचार्यभक्त म्हणून लोक जोगशास्त्रींना ओळखतात. अद्वैत सिद्धान्तदर्शन, शांकर अद्वैतमतानुवाद, सार्थ पंचदशी, भारतीय दर्शनसंग्रह हे त्यांचे ग्रंथ षड्दर्शनाच्या अभ्यासकाला उपयुक्त झाल्यावाचून राहणार नाहीत.

सामाजिक व राजकीय समस्याविषयक विचारप्रवाह :

दुसऱ्या प्रकारच्या विचारप्रवाहामध्ये म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक तत्त्वचिंतनामध्ये मोलाची भर घालणारे विचारवंत म्हणून आचार्य शं. द. जावडेकर, गं. बा. सरदार, ना. गो. चापेकर, डॉ. घुर्ये, इरावतीबाई कर्वे, दुर्गा भागवत, प्रा. पारीख, रावसाहेब पटवर्धन, डॉ. मंगुडकर, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. अ. भि. शहा, डॉ. देशपांडे, दि. के. बेडेकर, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा उल्लेख करावा लागेल.

सामाजिक व राजकीय विषयांवरील या विचारवंतांची लेखनसंपदा वैशिष्ट्यपूर्ण व विपुल आहे. त्याचबरोबर गेल्या पाव शतकात धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे ग्रंथलेखनही अनेकांनी केले आहे. स्थलाभावी त्या सर्वांचा परमर्श घेणे शक्य नसल्याने त्यांचा येथे उल्लेखच केलेला बरा.

भविष्यकालातील वाटचाल :

येथवर महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानविषयक विचाराचा धावता आढावा घेतल्यावर साहजिकच एक प्रश्न मनासमोर उभा राहतो की, ह्या बाबतीत महाराष्ट्राचा भविष्यकाल कसा राहील—कशी वाटचाल होईल ? अर्थात महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानविषयक चिंतनात अधिक स्वतंत्रपणा, बुद्धिनिष्ठता, सूक्ष्म व चिकित्सक अभ्यासाची दृष्टी व नवनवीन उपपत्ती मांडण्यासाठी लागणारी तेजस्वी प्रतिभा यांचा आविष्कार व्हावयास पाहिजे ही गोष्ट कोणीही मान्य करील. गेल्या २५।३० वर्षांतील तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयाचे परिशीलन केल्यानंतर असे आढळून येते की, अजूनही आमच्या विचारांवर साधुसंतांची शिकवण, अद्वैत तत्त्वज्ञान, पारंपरिक व पौराणिक धर्माचार व कर्तव्याकर्तव्यविषयक मते यांचा जबरदस्त पगडा बसलेला आहे. तसेच पाश्चात्त्य तत्त्वविचारांची उसनवारी करण्याची प्रवृत्तीही फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. विसाव्या शतकाच्या आरंभी ज्याप्रमाणे मिल, स्पेन्सर, बर्गसाँ इ. अनेक विचारवंतांची महाराष्ट्रीय विचारवंतांच्या मनावर छाप होती तशीच वर्तमानकालात बर्ट्रन्ड रसेल, मूर, विटजेन्स्टाइन, इत्यादी तत्त्वज्ञांचा व वास्तववाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद, प्रत्यक्षवाद इत्यादी तत्त्वप्रणालींचा येलथी विचारवंतांच्या मनावर असर पडलेला दिसतो.

महाराष्ट्राचा तत्त्वज्ञानविषयक विचार अधिक स्वतंत्र, प्रगल्भ व अव्वल दर्जाचा व्हावयाचा असेल तर परकीयांचे उथळ अनुकरण किंवा जुन्या परंपरेचे अंधपूजन करून भागणार नाही. जीवनातील समस्या आम्ही डोळसपणे व धैर्याने समजावून घेतल्या पाहिजेत व त्यांना आमची आम्ही नवी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. नुसते पाश्चात्त्यांचे उसने घेऊन भाषांतरित किंवा रूपांतरित स्वरूपात मांडलेले विचार या भूमीत रुजणार नाहीत. तसेच प्रचलित परिस्थिती व बदलत्या समस्या यांची दखल न घेता, जुन्या वैदिक परंपरांचे गौरव व संतशिकवणुकीचे डांगोरे पिटीत बसूनही उपयोग होणार नाही. कालौघाचे बदलते स्वरूप ओळखून, संक्रमणाचे आव्हान स्वीकारून जुन्यातील सत्यांश गमावू न देता नवनवीन विचारस्फुलिंगाचे वस्तुनिष्ठ दृष्टीने स्वागत व त्यावर सखोल चिंतन होण्याची आज नितांत आवश्यकता आहे. तत्त्वज्ञानाची व्याप्ती ज्ञानकोश, भाषांतरे, रूपांतरे व जुन्या वाङ्मयासंबंधीची संशोधनपर चिकित्सा करण्यामुळे वाढत जाते व तशी ती वाढवणे हे एक महत्त्वाचे कार्य आहे यात शंका नाही. तथापि तत्त्वज्ञानविचारात मौलिक भर पडण्याच्या दृष्टीने मूलग्राही व स्वतंत्र अशा आमच्या भूमीत रुजेल व वाढेल अशा तत्त्वांकुरांचे बीजारोपण होणे अधिक मोलाचे वाटते. अर्थात अशा स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत संत ज्ञानेश्वरांच्या कालापासून लोकमान्य टिळकांच्या काळापर्यंत अधूनमधून होत आलेला आहे व पुढेही तो तसा होत राहील यात तिळमात्र शंका नाही.

तसे पाहिले तर तत्त्वज्ञानात काय किंवा कोणत्याही इतर विषयांत काय अगदी सर्वथा नवीन असे काही नसतेच. परंतु जुन्या विचारमंथनातील युक्त भाग निवडून नवीन विचारांशी त्याचा समन्वय घालणे व नवीन सुसंगत रचना करणे हे कामही काही कमी महत्त्वाचे व सोपे नाही. अशा तऱ्हेचे स्वतंत्र, सुसंगत व सर्वंकष विचाराचे कौशल्य महाराष्ट्रीयांत निर्माण होत गेले व जोपासले गेले तर तेथील तत्त्वचिंतनाला आगळेच तेज प्राप्त झाल्याखेरीज राहणार नाही हे खचित !

मराठी अस्मितेची राजकीय अंगोपांगे

डॉ. पां. श्री. घारे

१९४५ ते १९७० हा कालखंड भारताच्या इतिहासात मोठ्या धामधुमीचा गेला. याचे कारण उघडच आहे. दीडशे वर्षांच्या गुलामगिरीनंतर भारत स्वतंत्र झाला, हिंदी संस्थानांचे सामिलीकरण होऊन देश एकसंध बनला, घटनासमितीमार्फत राज्य-घटना निर्माण करण्यात येऊन भारत हा स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक गणराज्य बनला. एका बाजूला या गोष्टी घडत असतानाच फाळणी, म. गांधींचा खून, निर्वासितांची समस्या, चिनी व पाकिस्तानी आक्रमण अशा घटनाही घडल्या. भारताचा एक महत्त्वाचा राजकीय घटक या नात्याने या साऱ्या हर्षामर्षाच्या प्रसंगांत महाराष्ट्रही सामील होता. महाराष्ट्राच्या दृष्टीने या कालखंडात तीन अत्यंत महत्त्वाच्या घटना घडल्या. पोलीस कारवाई होऊन निजामी राजवट संपुष्टात आली व मराठवाड्यातील मराठी भाषिक जनता स्वतंत्र झाली व यथाकाल ती महाराष्ट्रात सामील झाली. दुसरी घटना म्हणजे गोवा मुक्ति-संग्रामाची. गोव्याचा प्रश्न शांततेने बारा-तेरा वर्षांत न सुटल्याने अखेरीस सामर्थ्याच्या जोरावर गोव्यातील मराठी जनता मुक्त झाली. गोव्यात महाराष्ट्रवादींना बहुमत मिळाले असले तरी अद्याप त्या विभागाचे महाराष्ट्रात विलीनीकरण झालेले नाही. तिसरी घटना म्हणजे संयुक्त महाराष्ट्र स्थापनेची. भारतात सर्वत्र भाषिक प्रांत निर्माण झाले तरी मुंबईच्या प्रश्नामुळे आरंभी महाराष्ट्र व गुजराथ यांचे विशाल द्वैभाषिक निर्माण करण्यात आले व तो प्रयोग अयशस्वी ठरल्यामुळे महाराष्ट्र व गुजराथ या राज्यांची निर्मिती, सुमारे चार वर्षांनंतर करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र जरी निर्माण झाला तरी बेळगावचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. याच कालात महाराष्ट्रात विविध राजकीय पक्ष निर्माण झाले. शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, प्रजासमाज-वादी, समाजवादी, लाल निशाण, डावे कमुनिस्ट, उजवे कम्युनिस्ट, जनसंघ, स्वतंत्र हे यांपैकी महत्त्वाचे पक्ष आहेत. यातील काही पक्ष हे अखिल भारतीय आहेत तर

काहींचे कार्य प्रायः महाराष्ट्रापुरतेच मर्यादित आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्र परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिती हे दोन पक्ष निर्माण झाले. त्यांपैकी संयुक्त महाराष्ट्र समितीने इ. स. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत घटक-राज्य विधानसभेत, लोकसभेत अनेक जागा जिंकून सत्ताधारी कॉंग्रेसपक्षाला हादरा दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही या पक्षाने यथोचित श्रेय संपादन केले. अखिल भारतीय राजकीय पक्षांच्या नेत्यांकडे, त्यांचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या विचार-वंतांकडे, दृष्टिक्षेप टाकल्यास तेथेही अनेक महाराष्ट्रीय लोक अग्रभागी असलेले आप-णांस आढळून येतील. महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वर्षांत राजकीय विचारांचा प्रवाह कसा वाहत गेला, कोणते संघर्ष निर्माण झाले, कोणते नवे विचार निर्माण झाले या साऱ्या गोष्टींचा आढावा या छोट्या लेखात घेण्याचे योजिले आहे.

स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी महाराष्ट्रात कॉंग्रेस, मुस्लीम लीग, हिंदुसभा, कम्युनिस्ट, लाल निशाण इत्यादी राजकीय पक्ष अस्तित्वात होते. समाजवादी विचारसरणीची मंडळी कॉंग्रेसमध्येच होती. दुसऱ्या महायुद्धाच्या कालात विपरीत भूमिका घेतल्यामुळे कम्युनिस्ट पक्ष बदनाम झालेला होता. हिंदुसभेचा प्रभाव नाममात्रच होता. अखिल भारतीय मुस्लीम लीगने पाकिस्तानचा ठराव केल्यापासून मुसलमानांत तो पक्ष प्रभावी होता. मुंबई कायदेमंडळातील सर्वच्या सर्व जागा (३०) मुस्लीम लीगने जिंकल्या होत्या. मुस्लिमेतरांत कॉंग्रेस हा पक्ष अर्थातच प्रबळ होता. १९४५ च्या दुसऱ्या सहामाहीत कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांची मुक्तता झाली. इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन मजूर पक्ष अधि-कारावर आला; महायुद्ध संपले व भारताच्या स्वातंत्र्याची पहाट झाली आहे, याची जाणीव जनतेला झाली. मुसलमानांचा हिंदुद्वेष व पाकिस्तानची अराष्ट्रीय मागणी याला महाराष्ट्राचा अर्थातच विरोध होता. कॅबिनेट मिशन योजना, अन्य पर्याय यांचा खल महाराष्ट्रात होत होता. शेवटी माऊंटबॅटन योजना भारतीय नेत्यांनी स्वीकारली व भारताची फाळणी झाली. त्या कालात महाराष्ट्रात थोडे हिंदु-मुस्लीम दंगे झाले. तथापि महाराष्ट्रात एकंदरीत शांतताच होती. सिंधमधून निर्वासित हिंदू आले व त्यांपैकी काहींचे पुनर्वसन महाराष्ट्रात करण्यात आले. स्वातंत्र्यानंतरच्या कालात दोन महत्त्वाच्या राजकीय घटना घडल्या त्या म्हणजे म. गांधींचा खून व कॉंग्रेसचा घटना-बदल त्याचे राजकीयदृष्ट्या कोणते परिणाम झाले याचा थोडक्यात आढावा घेऊ.

भारताच्या फाळणीला म. गांधी हे जबाबदार आहेत, असे गृहीत धरून अतिरेकी हिंदुत्ववाद्यांपैकी एकाने त्यांचा खून केला. खुनी इसम हा कट्टर हिंदुत्ववादी व ब्राह्मण जमातीचा होता. त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाला खतपाणी मिळाले. महाराष्ट्रातील बहुसंख्य ब्राह्मणेतरवर्ग हा महात्मा गांधींच्या व पर्यायाने कॉंग्रेसच्या पाठीमागे होता. हरिजन आंबेडकरांचे अनुयायी होते. ब्राह्मणवर्गापैकी असंख्य लोक म. गांधींचे अनुयायी होते तर त्यांतील कित्येकजण राजकीय क्षेत्रात आघाडीवर होते. विनोबा भावे, देव, देवगिरीकर, गाडगीळ, धर्माधिकारी, पटवर्धन, गोरे, जोशी आदी

मंडळीही सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणच होती. तथापि ब्राह्मणांपैकी बहुसंख्य लोक हे म. गांधींच्या तत्त्वज्ञानावर व कॉंग्रेसच्या राजकीय धोरणावर नाराजच होते, असे म्हणता येईल. पण म. गांधींचा खून व्हावा अशी त्यांची इच्छा होती, हे म्हणणे अन्यायाचे होईल. अतिरेकी मंडळी सर्वच राजकीय पक्षांत असतात. सारांश, गांधी-वधानंतर महाराष्ट्रात ब्राह्मणविरोधी लाट निर्माण झाली, अनेक ब्राह्मणांच्या घरादारांची राखरांगोळी झाली. जातिद्वेष उफाळून आला. दक्षिण महाराष्ट्रात याचे पडसाद अधिक तीव्र उमटले. तत्कालीन मुख्य मंत्री बाळासाहेब खेर, गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी खंबीर भूमिका घेतल्यामुळे ह्या प्रक्षोभाला लवकरच आवर बसला. या घटनेमुळे हिंदुसभा अधिकच दुर्बल झाली. आज तर तिचे अस्तित्व नाममात्रच आहे. क्षणमात्र उफाळून आलेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आता हळूहळू नाहीसा होण्याच्या मार्गावर आहे, हे महाराष्ट्राच्या राजकीय पुरोगामित्वाचे द्योतकच म्हणावे लागेल.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कॉंग्रेसची घटना बदलणे, हे अपरिहार्य होऊन बसले. कारण आता स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय ठेवणे हे निरर्थकच ठरले असते. स्वातंत्र्यप्राप्ती हे ध्येय जोपर्यंत होते तोपर्यंत कॉंग्रेस ही विविध राजकीय मते धारण करणाऱ्यांची एक संयुक्त आघाडी होती. समाजवादी, भांडवलदार, उदार मनोवृत्तीचे, मध्यममार्गी, सनातनी अशी विविध मते धारण करणारे लोक स्वातंत्र्यप्राप्तीच्या एकाच ध्येयाने कॉंग्रेसमध्ये सामील झालेले होते. परस्परविरोधी वा विविध राजकीय मते धारण करणाऱ्यांना सांभाळून घेण्याची म. गांधींची हातोटीही विलक्षण होती. म. गांधींच्या नंतर ते कोणालाही जमणारे नव्हते. समाजवादी विचारसरणीच्या मंडळींना कॉंग्रेस सोडण्यावाचून गत्यंतरच नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या कालात तुरुंगातच स्थापन झालेला ' कॉंग्रेस-सोशॅलिस्ट ' पक्ष आता फक्त ' सोशॅलिस्ट ' राहिला. श्री. जोशी, गोरे, पटवर्धन आणि मंडळी कॉंग्रेसबाहेर पडली. भांडवलवाल्यांच्या आहारी कॉंग्रेस जाईल व त्यामुळे शेतकरी-कामगारवर्गाचे खरे कल्याण तिच्या हातून होणार नाही या कल्पने-मुळे शेतकरी-कामगार पक्षाची स्थापना झाली. साम्यवाद्यांच्यामधला कडवा गट ' लाल निशाण ' या नावाने कार्य करीत होता. मुंबई, पुणे व अन्यत्र औद्योगिक शहरांमधील कामगारवर्गावर कॉंग्रेस व साम्यवादी पक्षाची पकड होती. १९५० साली नवीन राज्य-घटनेचा अंगीकार करण्यात आला व सार्वत्रिक निवडणुका दृष्टिक्षेपात आल्यामुळे प्रत्येक राजकीय पक्ष आपापल्या कुवतीनुसार निवडणुकीची तयारी करू लागला. जेधे-मोरे यांच्यासारख्या एकेकाळच्या कॉंग्रेसमधल्या प्रभावी पुढाऱ्यांचे नेतृत्व शेतकरी-कामगार पक्षाला लाभले होते तर जोशी, गोरे, मेहता यांसारख्या १९४२ च्या स्वातंत्र्य-संग्रामातील क्रांतिकारकांचे नेतृत्व समाजवादी विचारसरणीच्या लोकांना प्राप्त झाले होते. त्यामुळे पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांकडे महाराष्ट्रीय जनतेचे लक्ष लागले होते. या निवडणुका १९५२ च्या मार्चमध्ये झाल्या.

महाराष्ट्रात या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला चांगलेच घवघवीत यश मिळाले.

समाजवादी पक्षाचे तीनही प्रमुख पुढारी— श्री. जोशी, अशोक मेहता व गोरे— निवडणुकीत पराभूत झाले. श्री. केशवराव जेधे हे शे. का. पक्षाचे पुढारीही निवडणुकीत पराभूत झाले. या निवडणुकीचा परिणाम या पक्षांवर चांगलाच झाला. समाजवादी पक्षाला तर अजूनही बळकटी आलेली नाही. काही विशिष्ट विभाग सोडला तर शेतकरी कामगार पक्षालाही आपला पाय रोवता आला नाही. कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी श्री. डांगे हेही या निवडणुकीत पराभूत झाले. विरोधी पक्षाच्या पराभवाला दोन प्रमुख कारणे होती. पहिले कारण निवडणुकीची पद्धती होय. एक प्रतिनिधी मतदारसंघामुळे निम्म्यापेक्षा कमी मते मिळूनही कॅाँग्रेसचा उमेदवार विजयी होई व बहुसंख्य मतदारांची मते विविध विरोधी पक्षांत वाटली जात. तेव्हा कॅाँग्रेसचा पराभव करावयाचा असल्यास विरोधी पक्षांत समझोता होणे आवश्यक आहे. याची जाणीव त्यांना झाली व संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात त्याचा अंगीकार करण्यात आला व त्याचे फळही त्यांना मिळाले. दुसरे कारण असे की, कॅाँग्रेसनेही काही प्रमाणात प्रागतिक धोरण अवलंबिले. ‘ कसेल त्याची जमीन ’ या तत्त्वावर आधारलेला कुळकायदा, अनुभवी प्रशासक (मंत्री) व मध्यममार्गी धोरण यामुळे सामान्यपणे जनतेचा पाठिंबा कॅाँग्रेसला होता. पं. नेहरू यांचे अलौकिक नेतृत्व व त्यांचे समाजवादी, पुरोगामी विचार यामुळेही समाजवादी पुरोगामी पक्षांचे आकर्षण लोकांना राहिले नाही. पं. नेहरूंच्या निधनानंतर आजही सामान्यपणे डाव्या पक्षांनी महाराष्ट्रात अजून बाळसे धरलेले नाही. अर्थात याचे प्रमुख कारण म्हणजे समाजवादी पक्षातील पुढाऱ्यांच्यामधील फाटाफूट हे होय.

शेतकरी कामगार पक्षाने ‘ दाभाडी-प्रबंध ’ निर्माण केला तरी त्या पक्षाबद्दल शेतकरी व कामगारांनाही फारसे आकर्षण निर्माण होऊ शकले नाही. एक तर या तत्त्वज्ञानाला पोषक असे वातावरण महाराष्ट्रात निर्माण झाले नाही. त्यामुळे कॅाँग्रेसपक्षावर टीका करण्याव्यतिरिक्त अधिक विधायक कार्यक्रम त्यांच्याजवळ राहिला नाही. सत्ताधारी कॅाँग्रेस पक्षाच्या हाती राज्ययंत्रणा असल्यामुळे त्याद्वारे आपल्या पक्षाचे सामर्थ्य व पाठिंबा कायम ठेवणे त्यांना सहजसाध्य होते, हेही लक्षात ठेवले पाहिजे. साखर कारखाने, जिल्हा परिषदा, पंचायत-समित्या, बँका, आमदारकी,-खासदारकी, कमिशनवर नेमणूक, शिक्षणक्षेत्रातील वरिष्ठ जागा अशा नानाविध प्रलोभनांचा वापर सत्ताधारी पक्षाला करता येतो. कॅाँग्रेस पक्षाला जसे नेते मिळाले तसे अन्य पक्षांना मिळाले नाहीत. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्वामुळे शेतकरी-कामगार पक्षात फाटाफूट होऊन त्याचे सामर्थ्य कमी झाले व कॅाँग्रेसचे सामर्थ्य कायम राहिले. त्यांच्यापूर्वी हिरे, गाडगीळ, देव, जेधे यांच्याकडे नेतेपद होते. १९५७ पासून महाराष्ट्र कॅाँग्रेस व महाराष्ट्राच्या राजकारणावर श्री. यशवंतराव चव्हाण यांची पकड आहे हे उघड आहे.

महाराष्ट्राची राजकीय अस्मिता खऱ्याखुऱ्या अर्थाने जी जागृत झाली ती संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात ! हिंदुस्थानच्या एकंदर राजकीय जीवनात महाराष्ट्राने नेहमीच

आघाडीवर राहण्याचे कार्य केले आहे. रानडे, गोखले, टिळक ह्यांनी जी परंपरा घालून दिली ती महाराष्ट्राने पुढे चालविली. सावरकर, डांगे, एस्. एम्., विनोबा, पटवर्धन, अत्रे, देव, गाडगीळ आदी किती तरी पुढारी मंडळी महाराष्ट्रात निर्माण झाली. लो. टिळकांच्या निधनानंतर हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचे नेतृत्व म. गांधींच्याकडे गेले व त्यांच्यानंतर ते पं. नेहरूंच्याकडे गेले. म. गांधींच्या उदयामुळे हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्रीयेतर माणसांकडे गेले, तरी महाराष्ट्र मागे पडला असे झाले नाही. म. गांधींच्याच शब्दांत सांगावयाचे झाले तर 'महाराष्ट्र म्हणजे कार्य-कर्त्यांचे पोळे आहे.' बहुजनसमाज म. गांधींच्या चळवळीत सामील झाला व काँग्रेस-मध्ये दाखल झाला. काही टिळकपंथीय मंडळींना म. गांधींचे नेतृत्व व तत्त्वज्ञान मान्य नव्हते व त्यांच्यात पुढे फार कटुता निर्माण झाली व म. गांधींचा खून हा त्याचाच परिपाक होय. म. गांधींच्या खुनामुळे अन्य प्रांतीय लोकांच्या मनातही महाराष्ट्रीय लोकांविषयी थोडीफार कटू भावना निर्माण झाली, हे मान्य केलेच पाहिजे. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा अर्थ विपरीत लावण्यात आला.* संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा एका अर्थाने फारच चमत्कारिक होता. कारण या लढ्यात शत्रू असे कोणीच नव्हते; सारे स्वकीयच, भारतीयच होते. महाराष्ट्रातील वा महाराष्ट्राबाहेरील, मध्यवर्ती कायदे-मंडळातील कार्यकारी मंडळातील ज्या ज्या व्यक्तींनी संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला विरोध केला त्यांना शत्रू म्हणणे युक्त होणार नाही. सारांश, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात स्वकीयांविरुद्धच लढावयाचे होते; संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची इष्टता, महाराष्ट्रावर झालेला अन्याय त्यांना समजावून देऊन स्वकीयांमार्फतच (लोकसभेमार्फतच) हे ध्येय साध्य करावयाचे होते. पं. जवाहरलाल नेहरूंच्याच हस्ते संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करून घेण्यात महाराष्ट्राने कणखरपणा व राजकीय चातुर्य दाखविले यात शंका नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची विभागणी पुढील विभागात करता येईल : (१) स्वातंत्र्य-पूर्व कालातील चळवळी व विचार, (२) संयुक्त महाराष्ट्र परिषद व संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळी, (३) विशाल द्वैभाषिक, (४) संयुक्त महाराष्ट्राची स्थापना. या-बाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यावयास हवा आणि तो म्हणजे मराठी भाषिकांच्यापैकीच 'विदर्भ' राज्याची मागणी करणारे लोक व त्यांच्या चळवळी. मुंबई ही साऱ्या भारताचीच आर्थिक राजधानी. त्यामुळे मुंबईचा प्रश्न फारच गाजला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला मुंबई व डांगमुळे गुजराथी मंडळींचा विरोध होता. तात्पर्य, अंतर्गत व बाह्य निरोधाला तोंड देऊन संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते.

---

* १० डिसेंबर १९४८ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'दार' कमिशनच्या अहवालात याचे प्रत्यंतर आढळते. "महाराष्ट्रीय लोक जुन्या, आक्रमक सरंजामी वृत्तीचे आहेत. पुणेरी वृत्ती ही तर भयंकर स्वरूपाची आहे. मुंबईवर महाराष्ट्राचा मुळीच हक्क नाही..."

ब्रिटिशांनी हिंदुस्थान जसजसा जिंकला तसतसे त्यांनी त्याचे, त्यांच्या सोईनुसार प्रांत बनविले. ईस्ट इंडिया कंपनीचा, एकेकाळचा सरहद्द प्रांत तर सुमारे ४००–५०० मैल पश्चिमेकडे सरकला. त्यामुळे ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रांतरचनेत भाषिक, प्रशासकीय वा अन्य कोणतेच तत्त्व नव्हते. तत्कालीन मुंबई प्रांतात सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक (म्हैसूर) यांचा प्रदेश होता. काही प्रांत यदृच्छया भाषिक निर्माण झाले ती गोष्ट वेगळी. दक्षिण भारतातील प्रांत हे प्रायः बहुभाषिक होते. हिंदुस्थानची राजकीय जागृती जसजशी होऊ लागली तसतशी प्रांतांची ही कृत्रिम रचना पुढाऱ्यांच्या लक्षात येऊ लागली. न्यायमूर्ती रानडे, लो. टिळक यांच्या लेखनातून याची प्रचीती अपणांस येते. त्या वेळी मुंबई हे एकच विद्यापीठ या प्रांतात होते. महाराष्ट्र विद्यापीठाची मागणी १९२० नंतर करण्यात आली. १९२० साली काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेचा ठराव केला व आपल्या संघटनात्मक कर्यात त्याचा अंगीकारही केला. मराठी भाषिक प्रदेश हा मध्यप्रांत, निजामाचे राज्य, मुंबई प्रांत, पोर्तुगीजांच्या सत्तेखालील गोवा अशा विविध विभागांत विखुरलेला होता. विविध राजकीय पक्षांमधले तात्त्विक विरोध व अन्य संघर्ष मराठी भाषिकांमधले विरोध व अविश्वास प्रारंभापासूनच होते. परंतु संयुक्त महाराष्ट्राची भावना ही पुरेशी प्रबळ होती. १ ऑक्टोबर १९३८ रोजी वऱ्हाड-मध्यप्रांताच्या (सी. पी. ॲन्ड बेरार) प्रांतिक कायदेमंडळाने मध्यप्रांताचे द्वैभाषिक मोडून सर्व सलग मराठी भागाचे विदर्भ नावाचे एकभाषी राज्य निर्माण करण्यात यावे असा ठराव मंजूर केला. कायदेमंडळातील प्रतिनिधींमार्फत ठराव करण्याचा हा पहिला प्रयत्न होय. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात, मराठी साहित्य संमेलनानेही आपला वाटा उचलला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला मराठी साहित्यिकांनी जोरदार पाठिंबा दिला. १५ ऑक्टोबर १९३८ रोजी मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनात, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली, विदर्भासह सर्व मराठी भाषिक प्रदेशाच्या एकछत्री सलग मराठी राज्याची मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला. या उद्दिष्टाच्या साध्यतेसाठी इ. स. १९४० साली "संयुक्त महाराष्ट्र सभे"ची स्थापनाही करण्यात आली. परंतु दुसरे महायुद्ध व 'छोडो भारत' हा लढा यामुळे चळवळ झाली नाही. १९४६ सालच्या बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मजूर करण्यात आला. १९४६ सालच्या जुलै महिन्यात संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव हे होते. म. म. पोतदार, धनंजयराव गाडगीळ, पाटसकर, स्वामी रामानंद तीर्थ, केशवराव जेधे, माडखोलकर, नवरे इत्यादी मंडळी त्यात होती. काँग्रेसने आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाषिक राज्यनिर्मितीला पाठिंबा दिलेला होता. त्यामुळे काँग्रेसचे पुढारी –देव इत्यादी–या चळवळीत सामील झाले. परंतु संयुक्त महाराष्ट्राची मागणी व्यापक स्वरूपाची असल्यामुळे तिला एकपक्षीय राजकीय चळवळीचे स्वरूप येऊ नये, यासाठी जी खबरदारी घेण्यात आली ती राजकीयदृष्ट्या मुत्सद्देगिरीचीच म्हटली पाहिजे.

कम्युनिस्टांना या चळवळीतून प्रारंभी वगळण्यात आले, असा एक तक्रारी सूर ऐकू येतो. छोडो भारत चळवळीच्या वेळी म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी रशियावर जर्मनीने हल्ला केल्यानंतर कम्युनिस्टांनी ज्या राजकीय कोलांट्या उड्या घेतल्या त्यामुळे तो पक्ष आधीच बदनाम झाला होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीत त्याला सहभागी करणे हे अदूरदृष्टीचे ठरले असते. अखिल भारतीय पुढाऱ्यांच्या चुकीमुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सामील होण्याची व आपले महत्त्व वाढविण्याची संधी पुढे कम्युनिस्टांना मिळाली, हा भाग अगदीच वेगळा आहे.

विदर्भ, मुंबई व मराठवाडा हे तीन प्रश्न महत्त्वाचे होते. विदर्भ हे प्राचीन राज्य होते; महाराष्ट्रापेक्षाही त्याच्यापाठीमागे अधिक कालाचा इतिहास होता. सीमा प्रश्नावर नेमलेल्या कमिशनने स्वतंत्र विदर्भाची मागणीही मान्य केलेली होती. त्यामुळे मराठी भाषिकांची दोन राज्ये होण्याची शक्यता होती. हे टाळण्यासाठी विदर्भातील पुढाऱ्यांचे, जनतेचे, समाधान करणे जरूर होते. म्हणून इ. स. १९४६ साली अकोला येथे एक करार करण्यात आला. विदर्भाचा एक ‘ उपप्रांत ’ बनविण्याची त्यात कल्पना होती. या करारावर पश्चिम महाराष्ट्रातील व विदर्भातील पुढाऱ्यांच्या सह्या होत्या. तथापि, स्वतंत्र विदर्भाची चळवळ थोडीफार चालूच राहिली व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ज्या वेळी स्थापन झाला त्या वेळी विदर्भातील जनतेने हरताळ पाळला. भारतीय राज्य-घटनेत उपप्रांताची तरतूद नसल्यामुळे ‘ अकोला करार ’ प्रत्यक्षात आणणे शक्य झाले नाही. तथापि, अधिकारांच्या जागांच्या वाटणीसंबंधी ज्या गोष्टी स्थूलमानाने ठरविण्यात आल्या त्याची बहुतांशी अंमलबजावणी होत आहे. विदर्भातील जनतेचा जो पश्चिम महाराष्ट्रासंबंधी अविश्वास होता तो हळूहळू कमी झाल्याची लक्षणे दिसत आहेत, ही एक स्तुत्य गोष्ट होय.

मराठवाडा हा मराठी भाषिक प्रदेश दीर्घ काळ हैदराबादच्या निजामाच्या अमलाखाली होता. निजामी अमदानीत हा प्रदेश अत्यंत मागासलेला राहिला होता. बहुसंख्य प्रजा हिंदू परंतु राज्यसत्ता मुसलमानांच्या होती ! त्यातच रझाकारी चळवळ व स्वतंत्र होण्याचे निजामाचे स्वप्न ! निजामाच्या जुलमाविरुद्ध स्टेट काँग्रेसने चळवळ केली, ती अपेक्षेपेक्षाही जोरदार ठरली. अखेर पोलीस कारवाई होऊन हा सारा प्रदेश स्वतंत्र झाला. मराठवाड्यातील पुढाऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यासाठी कोणत्याही अटी लादल्या नाहीत, हे लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या मागास-लेल्या प्रदेशाची सुधारणा लवकर व्हावी हीच त्यांची तीव्र तळमळ होती. मराठवाड्याच्या या धोरणाचे श्रेय बव्हंशी स्वामी रामानंदतीर्थ यांच्याकडे जाते. राज्यपुनर्रचना होई-पर्यंतच्या काळात हा विभाग हैद्राबादच्या राज्यात होता. तो आरंभी विशाल द्वैभाषिकात व १९६० साली महाराष्ट्रात सामील झाला. मराठवाड्याची सुधारणा करण्यासाठी अनेकविध विकासयोजनांची अंमलबजावणी होत आहे.

मुंबईचा प्रश्न फारच गाजला, त्यामुळे रक्तपात झाला व कटुताही निर्माण झाली.

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी, गुजराती व अन्य भाषिक भांडवलदारांनी औद्योगिकदृष्ट्या प्रगती केली. महाराष्ट्रीय हे बहुसंख्येने (मुंबईत) कामगार आहेत व नोकऱ्यांतून आहेत. मुंबईवर साऱ्या भारताचा हक्क आहे. तेव्हा मुंबईचा समावेश कोणत्याही एका राज्यात न करता (म्हणजे महाराष्ट्रात न करता) ते स्वतंत्र राज्य ठेवावे किंवा मध्यवर्ती सरकारच्या अमलाखाठी ठेवावे, असे विचार प्रकट होऊ लागले. मुंबईसारखे सुंदर शहर रांगड्या मराठ्यांच्या हाती जाता कामा नये, कारण तसे झाल्यास त्या सुंदर शहराची ते धूळदाण उडवतील अशी भीतीही कित्येकांनी व्यक्त केली. वस्तुतः कलकत्ता, मद्रास आदी शहरांची स्थितीही तशीच असताना मुंबईबाबतच वेगळा न्याय भारतीय स्तरावरचे पुढारी लावू लागले, याचा संताप महाराष्ट्रीय जनतेला आला. महाराष्ट्रात कॉंग्रेस बहुसंख्य होती. परंतु मुंबईतील मूठभर कॉंग्रेस कार्यकर्ते वगळता, बहुसंख्य कॉंग्रेसपक्षीयांना मुंबईबाबतचे पुढाऱ्यांचे, पं. नेहरूंचे धोरण चुकीचे वाटत होते. पं. नेहरूंच्या चुकीमुळेच आंदोलनाची सूत्रे कॉंग्रेसेतर पक्षांकडे गेली व महाराष्ट्रातील कॉंग्रेसपक्ष व पुढारी त्या काळी फार बदनाम झाले. 'दार' कमिशनचा रिपोर्ट रद्द झाल्यानंतर नेहरू, पटेल व पट्टाभी सीतारामय्या यांचे कमिशन नेमण्यात आले. या कमिशनने तीन महिने वाटाघाटी करून ५ एप्रिल १९४९ रोजी आपला अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात "मुंबईचा समावेश महाराष्ट्रात होणार नाही. विदर्भाचा स्वतंत्र प्रांत होणार नाही. महाराष्ट्र प्रांत यथावकाश निर्माण होईल" असे निष्कर्ष काढले. आंध्र व कर्नाटक मात्र त्वरित निर्माण होऊ शकतील, असे म्हटले. यामुळे महाराष्ट्रात परत संतापाची लाट उसळली. मुंबई महानगरपालिकेने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव बहुमताने मंजूर केला. मुंबईच्या प्रश्नाबाबत आता साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष केंद्रित झाले. कारण उर्वरित भाग एकत्रित येण्याची शक्यता दृष्टिक्षेपात आली होती. परंतु भाषावार प्रांतरचनेचे गाडे पुढे जात नव्हते.

आन्ध्रमधील गांधीवादी कार्यकर्ते पोट्टी श्रीरामलु यांनी आन्ध्र प्रांताच्या निर्मितीसाठी १९ ऑक्टोबर १९५२ रोजी उपोषणास आरंभ केला. या उपोषणात त्यांचे १५ डिसेंबर १९५२ रोजी देहावसान झाले. साऱ्या देशात खळबळ माजली. आंध्रात दंगे झाले. 'आहुतीशिवाय भाषिक राज्याची निर्मिती स्वराज्यातही होऊ शकत नाही' असे लोकांना वाटू लागले. कारण पोट्टी श्रीरामलूंच्या निधनानंतर लगेच आन्ध्र राज्याच्या निर्मितीची घोषणा पं. नेहरूंनी केली. महाराष्ट्र कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना अद्यापही मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची आशा होती. परंतु लढ्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र निर्माण होणार नाही, अशी शंका येऊ लागली व तीच पुढे साधार ठरली. मध्यवर्ती नेतृत्वाला या प्रश्नाच्या तीव्रतेचे आकलन झाले नाही. त्यामुळे निष्कारण प्राणहत्या घडली. महाराष्ट्र कॉंग्रेसने आपल्या कुवतीनुसार सर्व ते प्रयत्न केले, पण त्यात त्यांना अपयश आले. फाझलअली कमिशनने 'स्वतंत्र विदर्भ' राज्याच्या निर्मितीस पाठिंबा दिला. मुंबई केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याची तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्रात झाली.

उपप्रांताची तरतूद राज्यघटनेत नसल्यामुळे 'अकोला-करार' निर्माल्यवत झाला. महाराष्ट्रातील राजकीय मुत्सद्देगिरी परत जागृत झाली. २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर येथे करार करण्यात आला. "त्यात मंबई, मध्यप्रदेश व हैदराबाद राज्यातील सर्व सलग मराठीभाषी लोकांचे राज्य बनविण्यात यावे, मुंबई ही त्याची राजधानी राहील" असे महत्त्वाचे कलम होते. करारावर विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांच्या सह्या होत्या. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी या करारावर सही केली आहे.

१० ऑक्टोबर १९५५ रोजी राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यामुळे महाराष्ट्रात असंतोषाची लाट उसळली. मुंबई प्रदेश कॅांग्रेसचे पुढारी व महाराष्ट्र कॅांग्रेसचे पुढारी जनतेच्या मनातून पार उतरले. पं. नेहरूंनासुद्धा पोलीस संरक्षणात, बंद मोटारीतून मुंबईतून जावे लागले इतका लोकक्षोभ वाढला. दीर्घकाळ वाटाघाटी चालून अखेर विशाल द्वैभाषिक १ नोव्हेंबर १९५६ रोजी अवतरले. द्वैभाषिकाला महाराष्ट्राचा तर विरोध होताच. आता गुजराथमध्ये विरोध झाला. अहमदाबादेत दंगा होऊन गोळीबार झाला. त्यांत चौदा माणसे मृत्युमुखी पडली. महाराष्ट्रातील गोळीबारात १२६ माणसे मरण पावली व १५८० लोक जखमी झाले. यानंतर १९५७ साली ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यात प. महाराष्ट्रात कॅांग्रेसचा संपूर्ण पराभव झाला. कॅांग्रेसपक्षाचे रथी-महारथी श्री. काकासाहेब गाडगीळ, पाटसकर, अळतेकर, कानवडे, कुंटे, मोरोपंत जोशी आदी नेते या निवडणुकीत पराभूत झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीने प. महाराष्ट्रात १३३ पैकी १०१ जागा जिंकल्या. मुंबईतील १२ जागा समितीने जिंकल्या. गुजराथ, मराठवाडा आणि विदर्भ यात कॅांग्रेसला बहुमत मिळाले. त्याचा परिणाम एकूण विशाल द्वैभाषिकात कॅांग्रेसला बहुमत मिळाले. या नव्या विशाल द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण झाले.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास महाराष्ट्रातील कॅांग्रेस पक्षाला अपयश आल्यामुळे आणि कॅांग्रेस पक्षातील कित्येक पुढाऱ्यांनी जादा नेहरूनिष्ठा दाखविण्यास सुरुवात केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नेतृत्व समाजवादी, साम्यवादी, शेतकरी कामगारपक्षीय नेत्यांच्याकडे गेले. श्री. केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा मेळावा भरला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून कार्यकर्ते आले होते. याच दिवशी म्हणजे ६ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. या मेळाव्यात ५ ठराव मंजूर करण्यात आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे ध्येय; असहकार, शांततेच्या, अहिंसेच्या व लोकशाहीच्या मार्गाने ध्येयसिद्धी-साठी लढा देण्याची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्रात समितीचे बळ चांगलेच वाढले. दिल्ली येथे पार्लमेंटपुढे सत्याग्रह (डिसेंबर १९५८), लोकसभेवर मोर्चा, सीमा लढा, प्रतापगड येथे मोर्चा, मुंबईत असंख्य मोर्चे इत्यादी मार्गाने संयुक्त महाराष्ट्र समितीने, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धसास लावला. संयुक्त महाराष्ट्र समितीत प्रामुख्याने

नेतृत्वाची धुरा श्री. एस्. एम्. जोशी व डांगे यांच्या हाती होती. पण समितीचें बल अल्पकालात जसे वाढले तसे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण होताच घटले, हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याच्या कारणांची चर्चा करण्याचे स्थल हे नव्हे.

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीतील विविध घटक पक्षांनी जागांची आपापसात वाटणी केली व निवडणुकी लढविल्या. त्यात पश्चिम महाराष्ट्रात त्यांना भरघोस यश मिळाले. त्यामुळे कॉंग्रेसला व वरिष्ठ कॉंग्रेस नेत्यांना हादरा बसला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत क्वचित अतिरेकी प्रकार झाले, पण कॉंग्रेस श्रेष्ठींच्या महाराष्ट्रावरील अन्यायाच्या मानाने हे प्रकार फारच गौण मानावे लागतील. कॉंग्रेसश्रेष्ठींना सुबुद्धी सुचून अखेर १९६० च्या अंदाजपत्रकी अधिवेशनात द्वैभाषिक-भंगाचा ठराव मुंबईच्या कायदेमंडळात मांडण्यात आला व तो मंजूर झाला. महाराष्ट्राचा डांग, उंबरगाव तालुक्यातील ५० खेडी व प. खानदेशाची १५६ खेडी गुजराथेत घालण्यात आली. गुजराथच्या राजधानीसाठी व अन्य खर्चासाठी महाराष्ट्राने रक्कम द्यावी, अशा अर्थाचा ठराव लोकसभेत मंजूर झाला. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला व दीर्घकाळ चाललेल्या या लढ्याची फार मोठ्या प्रमाणात समाप्ती झाली. फार मोठ्या प्रमाणात असे म्हणण्याचे कारण की, बेळगाव, कारवार, गोवा, बस्तर आदी सीमाभागाचा लढा अजून चालूच आहे. नजीकच्या काळात हे प्रश्नही सुटतील अशी अपेक्षा करू या.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होताच संयुक्त महाराष्ट्र समितीतील घटक पक्षात बेशिस्त व बेदिली वाढली व त्याचा परिणाम महाराष्ट्रात परत कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व वाढण्यात झाला. महाराष्ट्राच्या दृष्टीने, महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर दुसरी शुभ गोष्ट घडली, ती म्हणजे गोवा-मुक्तीची! १९३८ पासून गोवा स्वतंत्र करून त्याला महाराष्ट्रात समाविष्ट करण्याच्या प्रयत्नांना आरंभ झाला. गोवा हा मराठी भाषिक प्रदेश आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील फ्रेंच वसाहतींप्रमाणे पोर्तुगीज वसाहतीचाही प्रश्न सामोपचाराने सुटेल अशी पं. नेहरूंची कल्पना होती. परंतु ती यशस्वी होण्याची लक्षणे दिसेनात. भारताचा इतर भाग स्वतंत्र होऊन १६–१७ वर्षे लोटली तरी गोवामुक्तीचे काही चिन्ह दिसेना, त्यामुळे जनतेत प्रक्षोभ वाढू लागला. १९४६ पासूनच गोव्याच्या लढ्याला आरंभ झालेला होता. डॉ. गायतोंडे, मस्कारेन्हस, रानडे आदी पुढाऱ्यांना पोर्तुगीज सरकारने कडक शिक्षा दिल्या. दादरा, नगर-हवेली जनतेच्या लढ्यामुळे मुक्त झाली. १९५५ मध्ये जनतेच्या सत्याग्रहाच्या लढ्याला त्याचबरोबर गोवासरकारच्या दडपशाहीला तीव्रतेने सुरुवात झाली. पोर्तुगीज सरकारच्या गोळीबार लाठीमारात सुमारे ३० माणसे मरण पावली व कित्येक जखमी झाली. सत्याग्रहाचा लढा तहकूब करण्यात आला. पोर्तुगालने लढण्याची जय्यत तयारी केल्याच्या बातम्या येऊ लागल्या. शेवटी १७ डिसेम्बर १९६१ रोजी भारतीय सैन्याने गोव्यात प्रवेश केला व पोर्तुगीजांच्या सैन्याचा जो काही विरोध होता तो मोडून काढून १९ डिसेंबरला

सर्व प्रदेश ताब्यात घेतला. आरंभी तेथे लष्करी गव्हर्नरांची सत्ता होती. पुढे निवडणुका झाल्या. त्यात महाराष्ट्रवादी पक्षाचा विजय होऊन त्या पक्षाचे मंत्रिमंडळ स्थापन झाले. महाराष्ट्रात सामील व्हावयाचे का केंद्रशासित प्रदेश म्हणून राहावयाचे या प्रश्नावर घेतलेल्या सार्वमतात मात्र बहुमत महाराष्ट्राच्या विरुद्ध गेले व सध्या गोवा केन्द्रशासित प्रदेश म्हणून कारभार करीत आहे. परत ज्या सार्वत्रिक निडणुका झाल्या त्यात महाराष्ट्रवादी पक्षास गोव्यात बहुमत मिळाले व तो पक्ष आज सत्तारूढ आहे. गोवा महाराष्ट्रात सामील करून घेण्याच्या प्रश्नावर महाराष्ट्राचे राजकीय चातुर्य पुन्हा पणास लागणार आहे. महाराष्ट्राची परंपरा पाहता याबाबत महाराष्ट्र विजयी होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळे, गेल्या पंचवीस वर्षांतील सुमारे पंधरा–सोळा वर्षे महाराष्ट्राचे राजकारण ‘ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ’ या प्रश्नाभोवती केंद्रित झाले होते. तो स्थापन झाल्यानंतर मात्र समाजवाद, आर्थिक विकास व शैक्षणिक विकास इत्यादी प्रश्नांकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले, तथापि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होण्याच्या आधीच्या दोन महत्त्वाच्या घटनांकडे लक्ष दिले पाहिजे, त्या म्हणजे (१) आचारसंहिता, व (२) भारतीय जनसंघाचा उदय. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने महाराष्ट्रीय जनतेच्या भावना तीव्र झालेल्या होत्या. अशाही परिस्थितीत महाराष्ट्रीय जनतेने विवेक सोडला नाही, की लोकशाही मूल्यांना धुडकावून दिले नाही. विविध पक्षांनी निवडणुकीच्या काळी व अन्यही प्रसंगी कोणत्या आचारांचे पालन करावे, यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक भाटघर येथे डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली भरली. या बैठकीत सर्वमान्य अशी आचारसंहिता निर्माण करण्यात आली. या आचारसंहितेचे पालन होते किंवा नाही हे पाहण्यासाठी काही समित्यांची नेमणूक करण्यात आली. निवडणुकांच्या धामधुमीच्या काळात आचारसंहितेच्या भंगाच्या क्वचित तक्रारी आल्या, परंतु निवडणुकांचे एकंदरीत क्षेत्र व राजकीय पक्षांची संख्या पाहता घडलेले आचार-संहितेच्या भंगाचे प्रकार अगदीच मामुली म्हणावे लागतील. लोकशाहीत शांततामय सत्तांत्तर झाले पाहिजे, या दृष्टीने सहिष्णुवृत्तीची जोपासना करायला हवी. महाराष्ट्राने याबाबत अन्य राज्यांना आदर्श घालून दिला, असे म्हणणे योग्य होईल. लोकशाही समाजवादाला महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पोषक आहे व शांततामय मार्गांनी लोकशाही-समाजवाद स्थापण्याचे व तद्द्वारा समाजकल्याण साधण्याचे ध्येय महाराष्ट्र साध्य करील, अशी आशा करण्यास जागा आहे.

स्वतंत्र पक्ष निर्माण झाला असला तरी महाराष्ट्रात त्या पक्षाला आपला पाय रोवता आलेला नाही. मुंबईत स्वतंत्र पक्षाचे अस्तित्व मात्र जाणवते.

कै. श्यामाप्रसाद मुकर्जींच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय जनसंघाची स्थापना झाल्याबरोबर महाराष्ट्रातही ‘ भारतीय जनसंघ ’ आपले पक्षाचे कार्य करू लागला. प्रखर राष्ट्रवाद, प्रांतिक, भाषिक संकुचित वृत्तीचा अभाव, निरलस व त्यागी कार्यकर्ते

यामुळे भारतीय जनसंघाने लगेच महाराष्ट्रात मूळ धरले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी, महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनप्रसंगी समाजवादी व साम्यवादी पक्षांनी घेतलेली भूमिका जनसंघास पटली नाही, या विविध कारणांमुळे या पक्षाने महाराष्ट्रात मूळ जरी धरले असले तरी या पक्षाला अजून बाळसे आलेले नाही. सुशिक्षित वर्गावर जनसंघाचा प्रभाव हळूहळू पडत आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या निवडणुकांत जनसंघाला जसे यश मिळाले तसे, त्या प्रमाणात सार्वत्रिक निवडणुकीत मिळाले नाही. महाराष्ट्रातील अन्य पक्षांची स्थितीही थोडीफार तशीच आहे. प्रजासमाजवादी, समाजवादी, कम्युनिस्ट–डावे नि उजवे, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्ष व त्यांच्यात निर्माण झालेले गट या सर्वांचा विचार करता सध्या तरी काँग्रेसचेच प्राबल्य आहे. काँग्रेस पक्षातही आता फाटाफूट झाली असली तरी श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष सत्तेवर राहील, अशी चिन्हे दिसत आहेत. काँग्रेसपक्षाने हळूहळू अंगीकारिलेल्या पुरोगामी धोरणामुळे विरोधी पक्षांना फारशी संधी मिळत नाही. इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रातील राज्ययंत्रणा कार्यक्षम व प्रशासनक्षम आहे. सबंध भारतात ‘ उत्तम प्रशासन ’ या व्याख्येत जी काही अल्प राज्ये (महाराष्ट्र, मद्रास, गुजरात) येतात, त्यांत महाराष्ट्राचा अग्रक्रम आहे, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने स्पृहणीय गोष्ट आहे.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात एक नवीन संघटना उदयास आली आहे, ती संघटना म्हणजे ‘ शिव-सेना ’ होय. आचार्य अत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे “ शिवसेनेची ” कल्पना त्यांचीच, परंतु प्रबोधनकार ठाकरे यांचे चिरंजीव श्री. बाळ ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई व उपनगरात या सेनेने चांगले बाळसे धरले. मुंबई महानगरपालिकेतील सुमारे चाळीस जागा या पक्षाने जिंकल्या. एकंदर महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या मानाने व आकारमानाने विचार करता शिवसेनेचे स्वरूप अगदीच मर्यादित व संकुचित आहे. शिवसेनेला जी अफाट प्रसिद्धी मिळाली व शिवसेनेची जी काहीशी दहशतही निर्माण झाली याचे कारण तिचे मुंबईतील प्राबल्य होय. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असल्यामुळे मुंबईत महाराष्ट्रीय माणसांना उद्योगधंद्यांमध्ये, नोकरीमध्ये प्राधान्य हवे. परंतु मुंबईत प्रमुख उद्योगधंदे महाराष्ट्रीयतेवर माणसांच्या हाती असल्यामुळे मुंबईत खूपच महाराष्ट्रीयेतरांचा भरणा आहे. शिवसेनेने आपला प्रचार प्रामुख्याने दाक्षिणात्यांच्या विरोधी चालविला. प्रचाराची पातळीही खालच्या दर्जाची ! तसे पाहिल्यास सर्वच प्रांत, भाषिक लोक स्वार्थी आहेत. सर्व प्रांतांतून प्रादेशिक, निमलष्करी स्वरूपाच्या, असहिष्णू प्रवृत्तीच्या, दंडेलीच्या जोरावर आपले ईप्सित साध्य करून घेऊ इच्छिणाऱ्या संघटना निर्माण झालेल्या आहेत. भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने ही फार मोठी काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. मराठी माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी ही संघटना निर्माण झाली. या संघटनेमागे कोणतेच राजकीय तत्त्वज्ञान नाही. प्रजासमाजवादी पक्षासारख्या राजकीय पक्षाने मुंबईत शिवसेनेशी सहकार्य करावे, हे त्या पक्षाच्या

अधःपाताचे लक्षण आहे. स्वार्थासाठी या सेनेला काही मंत्री, भांडवलदार, राजकीय पक्ष पाठिंबा देतात. दूरदृष्टीने विचार करता ही गोष्ट धोकादायक आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. विशेषतः शिवसेनाही कट्टर साम्यवादीविरोधक आहे. तिचा फायदा काही पक्ष निवडणुकीत व अन्य वेळी घेतात. सुदैवाने मुंबईखेरीज महाराष्ट्रात अन्यत्र शिवसेनेला यशही लाभले नाही; शिवसेनेने मूळही धरलेले नाही. भारतीय एकात्मतेला :तर बाध येता कामा नये व स्थानिक जनतेच्या मनात तर अन्यप्रांतीयांच्याविषयी कटुता निर्माण होऊ नये असा समतोल राखणारे नेतृत्व भारतीय स्तरावर व राज्यीय स्तराबर निर्माण झाले, म्हणजे प्रादेशिक पक्ष व सेना आपोआप मागे पडतील. मोठमोठ्या औद्योगिक शहरांचे स्वरूप अखिल भारतीय स्वरूपाचे राहणार व ते तसे राहणेच इष्ट आहे. याची जाणीव भारतीय जनतेच्या मनात निर्माण होणे अगत्याचे आहे.

महाराष्ट्रला राजकारण काही नवे नाही. अगदी प्राचीन व मध्ययुगीन कालखंड सोडून दिला तरी रामदास-शिवाजी यांच्या कालखंडापासून मराठ्यांची राजकीय अस्मिता चांगली जाणवणारी आहे. राजकारणाला रामदासांनी मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान दिले तर शिवाजीमहाराजांनी ते प्रत्यक्षात हाताळले. शाहू-पेशवे-शिंदे यांनी तर भारतीय राजकारणावर आपली छाप बसविली. इंग्रजांच्या अमलानंतर महाराष्ट्राची राजकीय अस्मिता विविध चळवळींच्या रूपाने प्रकट होऊ लागली. लोकहितवादी, फुले, भांडारकर, चिपळूणकर, आगरकर, टिळक, केळकर, सावरकर, विनोबा–देव–गाडगीळ–जेधे–मोरे–गोरे–पटवर्धन–जोशी–डांगे अशी किती तरी पुढाऱ्यांची नावे गेल्या शंभर सवाशे वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला तर नजरेसमोर येतात. विविध राजकीय विचारप्रणालींची तात्त्विक चर्चा, ऊहापोह, नेतृत्व या साऱ्या गोष्टी महाराष्ट्रात घडल्या व घडत आहेत. भारताचे नेतृत्व करण्याची कुवत महाराष्ट्राच्या राजकीय अस्मितेत आहे. लो. टिळक, सावरकर यांनी ते केलेले होते. श्री. डांगे, गोरे, जोशी आज ते त्यांच्या राजकीय पक्षामार्फत करीत आहेत. भूदान, सर्वोदय अशा क्रांतिकारी विचारसरणीचे प्रणेते विनोबा भावे हे तर महाराष्ट्राचे व भारताचे अभिमानास्पद भूषण आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या भावी राजकीय जीवनाचा विचार केला म्हणजे मनात आशेचा अंकुर फुटतो. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल,' या कवी विनायकांच्या उक्तीप्रमाणे, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचा पूर्व इतिहास हा उज्ज्वल आणि अभिमानास्पद आहे म्हणून त्याच्या भावी राजकीय जीवनाबद्दल जर काही चांगल्या अपेक्षा बाळगल्या तर ते चुकीचे होणार नाही. महाराष्ट्राच्या बोधचिन्हाचा (मुद्रा भद्राय राजते) खरा अर्थ लक्षात घेऊन महाराष्ट्राचे व भारताचे कल्याण महाराष्ट्राच्या भावी पिढ्या साधतील अशी अपेक्षा करणे सयुक्तिकच ठरेल.

नवे राजकीय नेतृत्व

नरुभाऊ लिमये

भारताच्या राजकीय परंपरेपेक्षा महाराष्ट्राचे नेतृत्व काही निराळे आहे. या लेखात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाची वाढ आणि वाटचाल याचा उल्लेख येणे स्वाभाविक आहे. असेही दिसेल आणि कबूल करावे लागेल की, महाराष्ट्राने राजकीय नेतृत्वासाठी अनेक पक्षांना नेते पुरविले. लोकमान्यांपासून तो यशवंतरावांपर्यंत नुसते एकाच पक्षाला नव्हे तर कम्युनिस्टांपासून तो रा. स्व. संघ आणि जनसंघापर्यंत.

नवे राजकीय नेतृत्व म्हटले म्हणजे आजच्या घटकेला भारताचे अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांची व्यक्तिरेखा डोळ्यांसमोर उभी राहते. गेली पंचवीस वर्षे ते महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहेत. मराठी नेतृत्वाला दिल्लीत स्वतःचे, मानाचे आणि शक्तीचे असे स्थान निर्माण करून देण्याला यशवंतराव चव्हाण कारणीभूत झालेले आहेत. यापूर्वी श्री. शंकरराव देव आणि कै. काकासाहेब गाडगीळ दिल्लीपर्यंत पोचले होते. तेथील स्थान त्यांनी मंडितही केले होते, पण त्यांच्यापेक्षा अधिक समर्थपणे आणि स्वतंत्रपणे केंद्रिय मंत्रिपदावर कराडचे यशवंतराव चव्हाण बसले आहेत. इतिहासातील दाखला द्यावयाचा तर, पहिल्या माधवराव पेशव्यांच्या काळात महादजी शिंदे यांनी आपल्या मुत्सद्दीगिरीने, शक्तीने दिल्ली राजकारणात जे स्थान पटकाविले होते ते आज यशवंतराव चव्हाण सांभाळीत आहेत.

हे काम अर्थातच सोपे नाही. गेली दहा वर्षे महाराष्ट्रात एकमेव नेते म्हणून 'साहेबांचे' नाव घेतले जात असले तरी त्यांना आव्हान देणाऱ्या शक्तीही महाराष्ट्रातच आहेत. तूर्त त्यांचा प्रभाव पडत नाही हे खरे; पण अशा वादळी वादग्रस्त नेतृत्वाचा उल्लेख ते स्वतःच मोठ्या खिलाडूपणे करतात. ते म्हणतात "राजकारणात काही सोपे नसते. वादळी गोलंदाजासमोर आपली विकेट सांभाळावी लागते." आज तरी ही विकेट स्थिर झालेली आहे आणि समोरच्या गोलंदाजीला टोलवाटोलवीने उत्तर देत नसली तरी

स्थिर धिमेपणाने चेंडू थोपवीत आहे. आपली आणि आपल्या पक्षाची फळी कर्णधाराला साजेशा जबाबदारीने ते राखून लढत आहे. हे नेतृत्व एका व्यक्तीचे दिसते; पण ते तसे नाही असे मला वाटते. १९६० साली पुण्याच्या एका सभेत खुद्द यशवंतरावांनी सांगितले कीं, " मी एकनेता नाही. एकनेता ही विचारसरणी मला मान्य नाही. विभूतिपूजा मी केली नाही, करून घेऊ इच्छित नाही. महाराष्ट्राला या पद्धतीने वागणे जमत नाही. आम्ही सामुदायिक विचारविनिमय आणि सामुदायिक नेतृत्वावर विश्वास ठेवतो. तेच खरे लोकशाहीचे स्वरूप आहे. " (२१-४-६०). यशवंतरावजींचे हे उद्गार मी खरे मानतो. आज त्यांचे असंख्य अनुयायी आणि विरोधक त्यांना सर्वाधिकारी समजतात, पण माझ्या मताने त्यांचे नेतृत्व सामुदायिक आहे. फरक एवढाच की, निर्णय त्यांच्या तोंडून बाहेर पडावा, त्यापूर्वीची पडद्याआडची चर्चा मैदानावर येऊ नये आणि एखादा निर्णय फारच कठीण असला तर सर्व गोष्टींचा खल झाल्यानंतर "हो-किंवा-नाही" म्हणण्याचा अधिकार त्यांच्यावर सोपविण्यात येतो. तसे करावेच लागते. नाहीतर निर्णय होणारच नाही. आज महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाडा असे विभाग सामील झाले आहेत. वीस वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्राच्या समस्या आणि या नव्याने एकत्र आलेल्या प्रदेशाच्या समस्या समजून घेऊन सांभाळून सामुदायिक नेतृत्व निर्माण झालेले आहे. कै. आबासाहेब खेडकर, दादासाहेब कन्नमवार व श्री. वसंतराव नाईक यांचे सहकार्य आज यशवंतरावांनी प्रयत्नपूर्वक मिळविले आणि जोपासले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी आपल्या चरित्रात नमूद केले आहे की, सर्व तज्ज्ञ आणि सहकारी यांच्याबरोबर तासन्‌तास चर्चा झाल्यानंतर अध्यक्ष आपल्या खोलीत, दार लावून बसतो आणि निर्णय घेतो. तो एकट्याच्या सहीने बाहेर पडणारा निर्णय अनेकांच्या विचारांचा परिपाक असतो !

आपल्या महाराष्ट्रात तर एकनेता कधी झाला नाही आणि मराठी जनतेने मानला नाही. इतिहासात छत्रपती शिवाजीमहाराज आणि स्वातंत्र्यलढ्याच्या पहिल्या प्रहरात लोकमान्य टिळक हेच दोन कदाचित अपवाद करता येतील. बाकी कोणाही मोठ्या पुरुषाला तेवढेच मोठे टीकाकार समोर उभे ठाकलेले दिसले. याचे कारण मराठी जनता सर्व दृष्टीने जागृत आहे. त्यांची श्रद्धा डोळस आहे. भारताच्या इतर प्रांतांत देवदर्शनासारखे लोक आपल्या नेत्याच्या दर्शनाला जातात. अजूनही ती अवस्था फारशी बदलली असे दिसत नाही. पण महाराष्ट्रात यशवंतरावांनी सांगितले तेच खरे. विभूतिपूजा त्यांनी केली नाही आणि महाराष्ट्राला विभूतिपूजा कधी मानवली नाही. छप्पन्न साली द्वैभाषिक राज्य मान्य करणाऱ्या यशवंतरावांनाच तो अनुभव आला. पण त्यातूनही यशवंतराव पार पडू शकले; कारण महाराष्ट्राची श्रद्धा डोळस झालेली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळी त्याला कारणीभूत आहेत. ज्ञानेश्वर, तुकारामासारखे महाराष्ट्राचे संतही कोटल्यातरी अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारेच होते. मग प्रस्तुत लेखाच्या संदर्भातल्या कालखंडात महात्मा फुले यांची शिकवण, राजर्षी शाहूमहाराजांचे कार्य, सत्यसमाज स्थापना, राजकारणात बंगालसारखे क्रांतीचे तेज,

सारे काही जनतेला डोळस बनविणारे होते. कै. जावडेकरांनी ‘आधुनिक भारता’त लिहिले आहे :

“महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीचे आद्य पुरस्कर्ते ज्योतिराव फुले होते. समाजाचे चळवळीला सामाजिक वर्गविग्रहाचे स्वरूप प्राप्त होण्यास त्यांच्या सत्यशोधक समाजाची विचारसरणी कारण झाली. ब्राह्मण जातीच्या वर्चस्वाविरुद्ध अशा प्रकारची आक्रमणशील चळवळ होणे ही गोष्ट तर हिंदुसमाजातील ब्राह्मणेतर जातींत स्वाभिमान उत्पन्न करण्याच्या दृष्टीने अपरिहार्य होती असे दिसते.” ‘जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट । तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ’ हे तत्त्व उराशी बाळगून वागणारे ब्राह्मण याच चळवळीच्या आचेने बरेच जागे झाले. खेड्यापाड्यातून वरील सूत्राची प्रतिक्रिया ‘जरी ब्राह्मण असला श्रेष्ठ । तरी तो मानावा अतिभ्रष्ट!!’ अशा स्वरूपात काही काळ दुमदुमू लागली!!

चळवळीचे रूप एखाद्या अवस्थेत विकृत झालेले दिसले तरी ती जागृती खालच्या टोकापर्यंत पोचविणारी ठरली. म. फुले वा त्यांचे अनुयायी नेते कै. शंकरराव मोरे, केशवराव जेधेप्रभृती मान्यवर पुढे ब्राह्मणद्वेष्टे या आरोपाचे धनी झाले; कारण त्यांचा विरोध “प्रतिगामी ब्राह्मण्याला होता, ब्राह्मण जातीला नव्हता”, हे आपल्या सामान्य अनुयायांना पटवून देण्यात त्या नेत्यांना पुरेसे यश आले नाही. १९४८ सालची सरसकट ब्राह्मणसमाजाची ससेहोलपट हा त्यांचा त्या मर्यादित अर्थाने पराभव आहे.

तरी पण या बहुजनसमाज चळवळीच्या नेत्यांनी आपापल्या मगदुराप्रमाणे ही चळवळ जातीय वळणावर जाऊ न देता आर्थिक व सामाजिक समतेच्या ध्येयाकडे वळविण्याचा सतत प्रयत्न केला. कै. भाई विष्णुपंत चितळे या सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेत्यांनी सातारा जिल्हा हे आपले कार्यक्षेत्र ठरविले होते. फुले पुण्याचे आणि सत्यसमाजाला राजाश्रय कोल्हापुरात. दोन्ही टोकांचा मध्य सातारा जिल्हा, त्यात हा कराड तालुका, कराड गाव तेच यशवंतराव चव्हाण आणि यशवंतराव मोहिते यांचे कार्यक्षेत्र!! सत्यशोधक चळवळीतून तीन प्रवाह निघाले अशी मीमांसा भाई चितळे करीत असत : (१) कै. केशवराव विचारे यांचेबरोबर सहकारक्षेत्रातला प्रवाह, (२) कै. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मागोमाग शिक्षणक्षेत्रातला प्रवाह, (३) नाना पाटील ज्याचे प्रतीक मानले तरी चालेल असा राजकारणात जोराने वाहू लागलेला प्रवाह. ज्यामध्ये १९३७ साली भाई आत्माराम पाटील हे त्या वेळच्या खातेदार मतदारसंघात ३७ हजार मतांनी निवडून आले, तो राजकीय प्रवाह.

या तीन प्रवाहांत सारख्याच सहजतेने खेळणाऱ्या मंडळींचे नेतृत्व १९३७ सालापासून आकार घेऊ लागले. म्हणूनच या लेखाचा कालखंड मी पंचवीस ऐवजी पस्तीस वर्षांचा योजला आहे. स्वातंत्र्याची चळवळ १९३२ साली मंदावली. सत्याग्रह आणि असहकार मागे पडला; तेव्हा साऱ्या भारतात कॉंग्रेसपक्षाने पहिली असेंब्ली निवडणूक लढवली ती सातारा जिल्ह्यात. त्यापूर्वीच्या नोकरीवादी ब्राह्मणेतर चळ-

वळीचा बालेकिल्ला असलेल्या सातारा जिल्ह्यात कूपरशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परकीय सरकारप्रणीत शक्तीबरोबर यशस्वी झुंज दिली भाऊसाहेब सोमण या वृद्ध लोकप्रिय नेत्याने. ते यशस्वी झाले. त्यांना सहकार्य श्री. चव्हाण, आत्माराम पाटील, सिंहासनेप्रभृती बहुजनसमाजातल्या नव्या पिढीने दिले होते. त्याच्या मागोमाग १९३४ सालची गाजलेली दिल्ली असेंब्लीची निवडणूक. जेधे-गाडगीळ या राजकीय राम-लक्ष्मणांची. महाराष्ट्राचा सात जिल्ह्यांचा तो मतदारसंघ. विरोधकांत धनिक वालचंदशेट, सरदार पाटणकर आणि टिळकपंथीय गुंजाळ. पण आजच्या नेतृत्वाची ती तारुण्यावस्था होती. सोलापूर, नगर, खानदेश सर्वत्र जेधे-गाडगीळ जवळजवळ सारखी मते घेऊन निवडून आले. श्री. जेधे यांना १६९०० व गाडगिळांना १६१५०. विरोधक पाच हजार मतांनी मागे राहिले. काकांनी लिहिले, "महाराष्ट्रातील काँग्रेसला आनंद झाला. जुन्या नेतृत्वाची पकड संपली. नव्याचा उदय झाला. तरुण आम्हाकडे."

काँग्रेस निवडणूक मार्गावर

१९३४ ची सोमण निवडणूक, जेधे-गाडगीळ निवड आणि पुढे १९३७ सालची उल्लेखनीय आत्माराम पाटील यांची निवडणूक. या काँग्रेस-यशाची शक्ती, जाग्या आणि डोळस झालेल्या बहुजनसमाजातील नव्या पिढीची होती. त्यांच्या मनातून जातीयतेचा अंधविश्वास जाऊ पाहात होता. मात्र या शक्तीला पदाधिकारी नेतृत्वामध्ये स्थान मिळण्याचा काळ आला नव्हता असे आढळते. त्या वेळच्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी मंडळ पाहा. अध्यक्ष शंकरराव देव. श्री. तात्या देशपांडे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बुवासाहेब गोसावी, गो. ह. देशपांडे हे चार चिटणीस. उपाध्यक्षात देवगिरीकर, जेधे, रावसाहेब पटवर्धन आणि बाळूभाई मेहता. या नावांसंबंधी भाष्य करण्याची गरज नाही. १९३७ साली राज्यात पहिले लोकनियुक्त मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यापूर्वी व त्या कालात पुढे जे संघर्ष झाले त्याची बीजे कोठे रोवली गेली होती हे दिसून येईल. एवढ्याचपुरता हा उल्लेख आहे. अशा अवस्थेत नव्या शक्ती व जुने नेतृत्व यांचा सांधा जुळविण्याचे प्रयत्न प्रामुख्याने काकासाहेब गाडगीळ यांनी केले. कै. केशवराव जेधे यांनी आपला स्वाभाविक राग आवरून काकांना साथ दिली. नव्या पिढीला समजून घेणारे आणि जुन्या पिढीसमोर त्यांची वकिली करणारे असे होते काकासाहेब, दोघांनाही मान्य. तरी पण या वकिलीत त्यांना यश फारसे आलेले दिसत नाही. दोन प्रवाह फुटत निघाले होते. इतर कारणाने आणखी काही फाटे फुटून समाजवादी गट निर्माण होऊ घातले होते त्यांना चालना मिळाली.

डाव्या बाजूकडे कल कलला

राजकारणाबाहेरची सामाजिक परिस्थिती व नेतृत्वाची चौकट बदलत होती. लोकल बोर्डासारख्या संस्था केवळ सरकारी कच्छपी लोकांच्या हाती असत. त्याऐवजी

पुणे लोकल बोर्डाचे अध्यक्षपदी १९३५ साली श्री. शंकरराव मोरे येऊन बसले. हा आणि असाच बदल साऱ्या महाराष्ट्रात होत होता. साताऱ्यास पुढे बाळासाहेब देसाई, नाशिककडे हिरे, पुण्याला औटेप्रभृती सुशिक्षित लोकल बोर्डात विजयी झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयतशिक्षणसंस्था खेड्यापाड्यांत शिक्षणाचा प्रकाश पोचवीत होती. नाशिक भागात भाऊसाहेब हिरे, विदर्भात पंजाबराव देशमुख यांचे विद्याप्रसाराचे काम सुरू होते. मोठ्या चळवळीनंतर कॉंग्रेस कमिटीच्या खालच्या थरावर बदल होत होता. पुन्हा सातारा जिल्ह्याचे उदाहरण देतो. तेथे भाई विष्णुपंत चितळे १९३९-४० सालात त्रिपुरा व रामगढ कॉंग्रेसला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सभासद म्हणून निवडून गेले. त्या जिल्ह्यातून प्रांतिक कमिटीवरच्या वीस जागांपैकी अठरा जागी जहाल डावे निवडून गेले. पण १९३२ ते १९३७ प्रांतिकचे अध्यक्षपद व इतर पदे मात्र जुन्या नेतृत्वाच्या हाती होती. श्री. शंकरराव देव १९३२ ते १९३७ प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. १९३७ सालचे त्या वेळच्या मुंबई राज्याचे मंत्रिमंडळ श्री. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. ‘ पथिक ’ या आत्मचरित्रात काकासाहेब गाडगीळ यांनी या बनावाचे धागेदोरे सविस्तर उकलून दाखविलेले आहेत. त्यांनी प्रथमच अभिप्राय दिला की, “ मंत्रिमंडळाचा बनाव सुखाने झाला नाही.” प्रांताचा पक्ष अध्यक्ष आणि मुख्यमंत्री हे समविचाराचे असणे अगत्याचे होते. पण पक्षाची जनतेपासून फारकत होणे हेही सरकारला हितकर नव्हते. शेवटी श्री. गाडगिळांच्या सूचनेवरून श्री. देवांनी जेधे यांनी प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष होण्यास मान्यता दिली. ब्राह्मणेतर मंडळींना कॉंग्रेसमध्ये अधिक विश्वास वाटू लागला, मुख्य मंत्र्याशी संबंध सुरळित राहावेत म्हणून पक्ष व मंत्रिमंडळ यांची वारंवार चर्चा व्हावी अशी योजना मुक्रर करण्यात आली. पण ही योजना करावी लागली याचाच अर्थ सर्व काही ठीक नव्हते. कसेबसे चालले होते. परंतु पुन्हा नव्या स्वातंत्र्यलढ्याच्या नौबदी ऐकू येत होत्या. युरोपात युद्धाची छाया दिसत होती. नवी कार्यकर्ती मंडळी अजून अधिकाराच्या जागा आणि नेतृत्व यांचा विचार करीत नव्हती. यामुळे तणाव दिसला तरी वाढला नाही. कॉंग्रेस पक्षात अखिल भारतीय पातळीवरच नेतृत्वाचा संघर्ष सुरू होता, त्यापुढे प्रांतिक भेदाची टिमकी गप्प झाली आणि शेवटी युरोपातल्या युद्धाबरोबरच चाळीस सालच्या अखेरीस कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. बेचाळीसच्या ‘ करेंगे या मरेंगे ’ या लढ्याची तयारी वैयक्तिक सत्याग्रहाने सुरू झाली.

युद्धात प्रथम सोविएट रशिया सामील झाला नव्हता, यामुळे भाई पंथीय मंडळी साम्राज्यशाहीला विरोध करण्याच्या भाषा बोलत. भाई मंडळींपैकी चितळ्यांसारखे लोक “ साताऱ्याच्या भूमीवर सत्यशोधक चळवळीची लाट येऊन गेली होती, समाज घुसळून निघाला होता. बहुजन समाजात एक नवी शक्तिशाली जागृती निर्माण झाली होती. ही सर्व ताकद स्वातंत्र्यलढ्यात आणि नंतर साम्यवादाच्या लढ्यात खडी उभी करायची”, अशा दृष्टीने कामाला लागले होते. सत्यशोधक मंडळींची जातीयता भाईंना

नडली नाही. उलट जातीयवादातून साम्यवादाकडे असा वळसा घेण्यास ते तयार होते. काकासाहेब गाडगीळ, जेधेप्रभृती नेते या शक्तीला सरळ राष्ट्रीय लढ्याला जुंपून घोडदौड करू इच्छित होते, तर १९३९ सालपर्यंत सुप्रतिष्ठित नेतृत्व "महात्माजी उपास केव्हा करतील?" याकडे नजर लावून बसले होते. ही मंडळी मुंबईच्या एआयसीसीनंतर सरळ तुरुंगात जाऊन बसली. कार्यकर्ते मात्र काही भांबावले तर बरेच नऊ ऑगस्टचा नवा पुकार घेऊन भूमिगत झाले. नव्या नेतृत्वाचे निशाण रोवले गेले. जुन्यांनी पुढे स्वतःच्या अस्तित्वासाठी चिवट लढाई दिली; पण जमाना बदलला तो बदलला. चाळीस ते पंचेचाळीस या पाच वर्षांत संसदीय आणि संघटनात्मक कार्याला खंड पडला. जो लढ्यात उतरला तो नेता. सातारा, कोल्हापूर, नगरपासून तो खानदेश-विदर्भापर्यंत वणवा पेटला. नेतृत्वाचे अग्निदिव्य झाले. पक्के होते ते टिकले, कच्चे वितळून गेले. भाई मंडळींना पुढे हे युद्ध लोकयुद्ध वाटू लागले. कारण हिटलर रशियावर चालून गेला. ते लढ्यातून गळाले.

स्वातंत्र्याचा उषःकाल

पंचेचाळीस साल उजाडले. युद्ध संपले. स्वातंत्र्याचा लढाही रेंगाळला होता. सर्वांना कळून चुकले होते की, आता ब्रिटिश सत्ता जाणार आहे. कार्यकर्ते बाहेर येत होते. औरंगजेबाच्या मोहिमेला महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून लपून हल्ले करून उत्तर देणारे संताजी-धनाजी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर जसे कडेकपारीतून एकदम प्रगट झाले तसे देशातले असंख्य कार्यकर्ते आता स्वातंत्र्य आले अशा विश्वासाने हिंडू लागले. बेचाळीस सालच्या लढ्यात किती सहस्र तरुणांनी भाग घेतला याची कल्पनाच आली नव्हती. प्रत्येक सैनिकाला सेनानी बनविण्याची ती महात्माजींची किमया होती. सत्ता समोर दिसू लागल्यानंतर सत्ताधीश कोण याची चिंता अनेकांच्या मनात डोकावू लागली तर नवल नव्हते. या सत्तेची भागीदारी करण्याची इच्छा बाळगणारे गट तयार झाले. उलट ही सत्ता अद्याप पुरेशी हाती येणार नाही किंवा आली तर ती जनतेच्या हितासाठी वापरली कशी जाईल याची चिंता करणारे नेते पुढे काय असा प्रश्न विचारू लागले.

एका काँग्रेसच्या झेंड्याखाली प्राणपणाने लढलेले लोक मध्यंतरीच्या कुरुक्षेत्रानंतर दुखावल्यासारखे दिसत होते. नऊ ऑगस्टचे सरदार अच्युतराव पटवर्धन आणि त्यांचे काँग्रेस सोशॅलिस्ट नावाने ओळखले जाणारे तरुण अनुयायी एस्. एम्., गोरे, खाडिलकर, शिवाजी पाटील, उत्तमराव पाटील, शिरुभाऊ लिमये आणि अनेक पुन्हा देव-देवगिरीकर-देशपांडे यांच्या काँग्रेसनेतृत्वाला पूर्वीप्रमाणे मानतील अशी शक्यता नव्हती.

कम्युनिस्ट आणि राइस्ट स्वातंत्र्यसंग्रामापासून दूर राहिले होते. त्यांना जनताच मानीत नव्हती. त्यांचा विचार समजून घेण्यालाही कुणाला सवड नव्हती. लढ्यापासून दूर असलेले टिळकपंथी वा सावरकरपंथी खिजगणतीत उरले नव्हते.

यशाचे वाटेकरी कोण

शेका पक्ष हा पक्ष म्हणून स्थापन व्हावयाचा होता. ती शक्ती खूप मोठ्या संख्येनिशी काँग्रेसच्या लढ्यात उतरलेली होती. लढ्यापूर्वी सुरू झालेली सत्तास्पर्धा पुन्हा डोके वर काढणार होती. कारण सेहेचाळीस सालच्या निवडणुकीत काँग्रेसपक्ष विजयी होणार यात काडीमात्र शंका नव्हती. स्वातंत्र्य मिळवणारा तो पक्ष होता. लोक उत्सुक होते काँग्रेस उमेदवाराला मत देऊन आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी! डावे गट म्हणून नवजीवन संघटना आणि कम्युनिस्ट आपली प्रतिमा उजळून वाढविण्यासाठी उत्सुक होते, प्रयत्नशील होते, पण नेतृत्वाचा खरा लढा आणि झगडा होता तो काँग्रेस झेंड्याखाली जमलेले, लढलेले नवे शिलेदार आणि जुने नेतृत्व यांमध्ये. त्याचे बाह्य स्वरूप जातीय होते. लोकशाहीत ते स्वाभाविक होते. जातिबद्ध समाजव्यवस्थेत कोणी कसे वागणे गरजेचे असते याचा मौलिक विचार काकासाहेब गाडगिळांच्या कार्याचा गौरव करण्याच्या निमित्ताने श्री. नानासाहेब गोरे यांनी मांडला आहे. स्वातंत्र्याच्या उषःकालात त्या विचारांची गरज होती. ते विचार पुढे उद्धृत केले आहेत —

"— अशा वेळी खरी क्रांती राजकीय व सामाजिक पुढेच आहे. आणि प्रत्यक्षात ब्रिटिश सत्ता जाईल तेव्हा प्रत्यक्षात तुमच्या वर्गाच्या (ब्राह्मणांच्या) हातात काही पडणार नसले आणि समाजातले तुमचे जन्मजात श्रेष्ठत्व जरी नष्ट होणार असले तरी सर्व समाजाच्या बंधविमोचनात व हितात आपले हित आहे असे ब्राह्मणवर्गाने मानले पाहिजे. स्वातंत्र्य आल्यानंतर पुन्हा पेशवाई स्थापन होणार नाही तर बहुजनसमाजाच्या हातीच शासनाची सूत्रे जाणार हे ब्राह्मणेतरांना पटविल्याशिवाय राजकारणाचा गाडा चिखलातून वर येणे शक्य नाही. जातिसंस्था ज्या समाजात इतक्या दृढ आहेत व विशेष म्हणजे सजीव आहेत, त्यांच्या बांधणीतच मान्य केले गेले आहे की, ब्राह्मणवर्ग हा अत्यल्प, त्यांनी आपल्या (नेतृत्वाच्या) बळावर लोकसत्ताक क्रांती वा मन्वंतर घडवून आणण्याची महत्त्वाकांक्षा धरणे म्हणजे बेडकीने बैलासारखे फुगण्याचा फोल यत्न आहे. हे सत्य मान्य केले तर पांढरपेशा समाजाच्या मनात तीन प्रक्रिया संभवतात. एक राजकारणनिवृत्ती; दुसरी समाजक्रांतीच्या आंदोलनाला विरोध करण्याची. या दोन्ही पक्षांत तिसरी एक हितकर प्रतिक्रिया असू शकते. ती म्हणजे स्वतःच्या आचरणाने, अविश्रांत श्रमाने इतरांना पटवून द्यावयाची, 'आत्मविलोपनाची व वर्गविलोपनाची प्रक्रिया.' ब्राह्मणांना जसे एक पथ्य सांगावयाचे तसेच बहुजनसमाजाला सांगावयाचे की, "ब्राह्मणांच्या द्वेषाचा परिणाम जर ज्ञानद्वेषात झाला तर चार उच्च पदे मिळालेली दिसतील, पण श्रमजीवीवर्गाचे देशविमोचनाचे इतिहासदत्त कार्य मागे पडेल."

हा उल्लेख स्वातंत्र्याच्या संधिकालाच्या थोडाफार पूर्वीच्या कालाला उद्देशून नानासाहेबांनी केला होता, पण चाळिशीतल्या त्या कालातल्या नेतृत्वाने लक्षात घेण्याचे ते पथ्य होते. जातिबद्ध समाजामध्ये सत्य हे सत्य असले तरी आपल्या जातगंगेच्या

माणसाकडून आले तर त्याची सत्यता समाजाला चटकन पटते. म्हणूनच मराठी नेतृत्वात बदल झाल्यानंतर नानासाहेबांना एका मार्क्सवादी गांधीवादी नेत्यांनी सल्ला दिला होता. " बहुजनसमाजाचे हित साधू इच्छिणाऱ्या मंडळींनी आपला पक्ष मोडून यशवंतरावांचे हात बळकट करावे. आता काँग्रेस समाजवाद आणील असा विश्वास वाटतो. " नानासाहेबांनी शंका विचारली की, " खेर-मोरारजी असताना जी काँग्रेस होती तीच आज आहे ! " त्यावर ते माननीय नेते म्हणाले, " आजची काँग्रेस आम्हांला आपलीशी वाटते. पूर्वी ती काँग्रेस आपलीशी वाटत नव्हती. विश्वास वाटत नव्हता. " या उत्तरात्तले सत्य कितीही विदारक असले तरी इतिहासाच्या खऱ्या अभ्यासकाला ते नाकारून चालणार नाही असे मत श्री. गोरे यांनी व्यक्त केले !

काँग्रेसच्या प्रस्थापित नेतृत्वाने श्री. गोरे यांनी मांडलेले पथ्य लक्षात ठेवले नाही. १९४७ साली अधिकारावर आलेल्या खेर-मोरारजी यांच्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण, ल. मा. पाटीलप्रभृती बहुजनसमाजाची मंडळी होती तरीही सदतीस सालची तपासणी संपली नाही, उलट काँग्रेसमधून बहुजनसमाजाचा एक मोठा कार्यकर्ता गट बाहेर पडणार असे दिसू लागले होते. पंचेचाळीस सालात केंद्रीय असेंब्लीची निवडणूक निघाली. वास्तविक श्री. गाडगीळ व केशवराव जेधे हीच जोडी काँग्रेसतर्फे रणांगणात उतरणे सोईचे व स्वाभाविक होते. पण जेधे यांनी नकार दिला. काकांच्या जोडीला श्री. भाऊसाहेब हिरे उमेदवार बनले. काकांनी आपल्या ' लाल किल्ल्याच्या छायेत ' या पुस्तकात या छोट्या गोष्टीचा मोठा अर्थ सांगितला आहे. या निवडीचा अर्थ " काँग्रेसच्या राजकारणात नव्या पिढीचे नेतृत्व सुरू झाले " (लाल किल्ला पान ६) खेर-मोरारजी मंत्रिमंडळ आणि देव-देवगिरीकर नेतृत्व, ही बदलती घडी ओळखत होते किंवा मान्य करीत होते असे मात्र दिसत नाही.

संघर्ष अटळ झाले

परिणामी संघर्ष वाढले. १९४७ च्या ऑगस्टमध्ये काँग्रेसांतर्गत अशी बहुजन-समाजवादी गटाची स्थापना झाली. गांधीवधानंतर दोन्ही जमातींमधील संघर्ष आणखीच वाढले. अठ्ठेचाळीस सालात पुण्यास भाऊसाहेब शिरोळे यांच्या घरी शेकापक्षाचा नारळ फोडण्यात आला. श्री. अण्णासाहेब बाबर यांनी लिहिलेल्या चव्हाण-चरित्रात असे म्हटले आहे की, शेकापक्ष स्थापनेच्या आरंभीच्या एका सभेचे अध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण बसले होते. पुढे या पक्षाला विविध तऱ्हांचे वळण लागले. पण काँग्रेसमधली मोठी शक्ती बाहेर गेली. त्या पक्ष-स्थापनेच्या दिवशी उपस्थितांची यादी उद्बोधक आहे. जेधे, मोरे, औटे, मोहिते, आनंदराव चव्हाण, तुळशीदास जाधव, गणपतराव शेंडे, भाऊसाहेब शिरोळे, महागावकर, दत्ता देशमुख, भापकर, सड्डा म्हणजे पुणे, सातारा, कोल्हापूर, नगर जिल्ह्यांतील तरुण कार्यकर्ता वर्ग शेकापक्षाच्या झेंड्याखाली उभा राहिला

या शक्तीला ' जातीय ' म्हणून हिणवून ते बाहेर जाताना, जाऊ द्यात असे धोरण

प्रस्थापित नेतृत्वाने ठेवले. प्रस्थापित देव-देवगिरीकर नेतृत्वाने शेकापक्षाच्या या उठावाला तोंड देण्यासाठी निष्ठावान कॉंग्रेस कार्यकर्त्यांची एक बैठक मुंबईस तांबेभुवनमध्ये घेतली. ३० मार्च १९४८ रोजी ७१ कार्यकर्त्यांच्या त्या सभेत जनतेला व कार्यकर्त्यांना उद्देशून एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. श्री. मामासाहेब देवगिरीकर यांनी या कामी पुढाकार घेतला होता. याबाबत त्यांनी श्री. शंकरराव देव यांची अनुमती घेतली होती. पण "श्री. जेधे वा काकासाहेब गाडगीळ यांचा सल्ला घेतला नाही; कारण ते हरकत घेणार नाहीत असे वाटले" असे देवगिरीकरांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे. ७२ कार्यकर्त्यांत एक म्हणून प्रस्तुत लेखकाची त्या पत्रकावर सही आहे. तांबेभुवनमधील या बैठकीचा परिणाम पुढे कॉंग्रेसपक्षामधून बरीच मंडळी बाहेर जाण्यात झाला. जेधे-गाडगिळांचा सल्ला मामांनी घेतला असता तर बहुधा सबुरीचा सल्ला मिळाला असता.

आजचे नेतृत्व मध्यममार्गी

आज महाराष्ट्रात सुप्रतिष्ठित असलेल्या श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेचाळीस सालच्या नेतृत्वस्पर्धेत कॉंग्रेस संस्थेतच आपले स्थान ठेवले. बहुजनसमाजाला कॉंग्रेसमध्ये आणणाऱ्या काकासाहेब गाडगिळांचे ऋण ते मान्य करतात. यशवंतराव कसे आहेत याचे वर्णन त्यांच्या एका चिकित्सक पत्रकारमित्राने केले आहे. "यशवंतरावांजवळ बहुजनसमाजामधून आलेल्या व्यक्तीला जी उपजत हुषारी असते ती तर त्यांच्या जवळ आहेच पण मार्क्सवाद्यांपासून गांधीवाद्यांपर्यंत अनेक राजकीय पक्षांच्या मतप्रणाली, पक्षपुढाऱ्यांचे व्यक्तिमत्त्व, पक्षापक्षातील सूक्ष्म मतभेद यांचे जवळून निरीक्षण करण्याची संधी त्यांना मिळाली आहे व त्यामुळे त्यांचे जीवन संस्कारित झाले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला ग्रासरूट्सचा आधार आहे. तसेच उच्च पातळीवरचे संस्कारही आहेत. त्यांच्या मनात कॉंग्रेसनिष्ठा आहे, पण अभिनिवेश नाही. विरोधकांना ते तोडून बोलत नाहीत, पण विशिष्ट मर्यादेअलीकडे जवळ येऊ देत नाहीत. आपण कोठून निघालो, कुठे जावयाचे याचा पक्का हिशेब मनाशी तयार आहे. मन खूप खोल आहे. निकटवर्तियांना त्याची खोली लवकर कळत नाही, त्यामुळे आदराबरोबर कधी संशय दाटतो. ज्या स्थानावर ते बसतात त्या स्थानावर जसजशी पकड बसत जाईल तसतसा प्रभाव आपोआप पडू लागतो. तो वळवाचा पाऊस नाही तर धिम्या गतीने पडणारा पण धरित्री सस्यश्यामला करणारा हा आषाढाचा पाऊस आहे."

किती सार्थ वर्णन आहे! अर्थात हे सर्वमान्य विश्लेषण नाही. अनेकांना यशवंतरावांचे म्हणजे सध्याचे महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेतृत्व केवळ निवडणूक जिंकणारे, मागेपुढे पाहात जाणारे, सौदेबाजीचे, तात्पुरते अडथळे दूर करीत पुढे जाणारे नेतृत्व आहे असे वाटते. त्याऐवजी समर्पित जीवनाचे दृढ तत्त्व आणि विचार मांडणारे नेतृत्व समाजाला अधिक उपयुक्त ठरते असे काहींना वाटते.

हा आक्षेपही सकृद्दर्शनी खरा वाटतो, कारण मुत्सद्दी व राजकारणी नेत्यांना वैचारिक तात्त्विक ठाम बैठक नसेल किंवा प्रसंगी सर्व सोडून तत्त्वाला कवटाळण्याची त्याची तयारी नसेल तर कसे चालेल असेही वाटेल. महाराष्ट्राच्या व म्हणून त्या प्रमाणात देशाच्या राजकारणाच्या समस्या काय आहेत त्या लक्षात घेतल्या म्हणजे वरील कोडे लवकर सुटण्यास मदत होईल. वर आपण पाहिले की, महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक जीवनाला जातीय अस्तर आहे. श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या धोक्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

" —महाराष्ट्राच्या सामाजिक अंतर्विग्रहाचा प्रश्न महाराष्ट्रातील राजकारणातील कसोटीचा प्रश्न आहे. या प्रश्नाचा अर्थ मार्क्सवादाच्या आधारे समजण्यासारखा नाही, कारण आर्थिक पिळवणूक करणारा वर्ग व पिळला जाणारा वर्ग असे त्याचे स्वरूप नाही. हिंदू समाजातील मागासलेल्या व जीर्ण झालेल्या जातिभेदाची विकृती म्हणजे हा विग्रह आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे या विग्रहात दोन विरोधी पक्ष आतापर्यंत होते, अजूनही आहेत. त्यामध्ये अनेक अंतर्विग्रहाची भर स्वातंत्र्योत्तरकालात पडलेली आहे. लोकशाहीप्रधान सामाजिक जीवनाशी विरोधी व विसंगत असा हा सामाजिक विग्रह आहे. लोकशाहीतील नागरिकांची कसोटी किंवा मूल्यमापन नागरिकांच्या जाती-वरून व धर्मावरून होत असेल तर लोकशाही राज्यपद्धतीला तो मोठा धोका आहे."

या धोक्याची जाणीव ठेवून पण त्याच बरोबर श्री. गोरे यांनी मांडलेले सत्य लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या नव्या नेतृत्वाला वाटचाल करावयाची होती. जुन्या-नव्याचा सांधा साधून पुढे जावयाचे होते. सामाजिक व धार्मिक क्षेत्रातली बंडखोरी व वरिष्ठ जातीच्या अन्यायाविरुद्ध बंड करून समतेची मागणी करणाऱ्या शक्तींची दखल घ्यावयाची होती. स्वातंत्र्य ज्या जनतेने श्रम, घाम व रक्ताने मिळविले त्यांच्या पदरात ते पडले पाहिजे अशी दक्षता घ्यावयाची होती, आणि हे साधत असताना महाराष्ट्रातील राजकारणातली स्वतंत्र शिलेदारी वृत्ती चुचकारून घेऊन मध्यम मार्गाने पुढे जावयाचे होते. अशा कठिण भयानकाचा मुकाबला मृदू साधनांनी करता येतो. 'मृदुना दारुणं हन्ति' या राजनीतीच्या सुप्रसिद्ध सूत्राचा प्रयोग करून यशवंतरावांनी विरोधी पक्षांना संमोहित केले.

महाराष्ट्रात अशा तऱ्हेचे सामाजिक व समाजवादी (समतेचे) राजकीय वारे वाहात असताना आजच्या महाराष्ट्रात सामील झालेल्या विदर्भ विभागात मात्र काँग्रेसच्या मध्यमवर्गीय, व्यापारी, वकील अशांचे नेतृत्व कायम होते. संयुक्त महाराष्ट्रात सामील होईपर्यंत खेडकर-वियाणी तुल्यबल होते. औद्योगीकरण न झाल्याने अर्थव्यवस्था शेतीप्रधान आणि रयतवारीपेक्षा मालगुजारी सुप्रतिष्ठित होती. हिंदीच्या कचाट्यातून सुटावे व मराठी भाषिकात यावे एवढीच त्यांची उत्कंठा. तीच गोष्ट मराठवाड्याची. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातल्या नेतृत्वाच्या फेरबदलासारखी तेथील स्थित्यंतरे दिसत नाहीत. दुसरी एक शक्ती महाराष्ट्रातील जागृत महार समाजाची. कै. डॉ. आंबेड-

करांच्या नेतृत्वाखाली हा समाज आपल्या हक्कांसाठी झगडत होता. प्रस्थापित सत्ता व समाजव्यवस्था या दोन्हीविरुद्ध झगडा देताना हा समाज स्वाभाविक कॉंग्रेससमोर सामन्याला उभा राहिला. अनेक वर्षे महार व नवबौद्ध हे कॉंग्रेसच्या विरोधी शक्तींना पाठबळ देत आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी समितीला सर्व पाठबळ दिले, पण सदैव विरोध कशासाठी आणि कुणाशी असा एक नवा विचार या मंडळींमध्ये निर्माण झाला. महाराष्ट्र-निर्मितीनंतर त्याला वेग आला. १९६० साली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रराज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर आंबेडकरवादी नेतृत्व कॉंग्रेसशी अधिक सहकार्य करू लागले. कायमच्या अल्पमतात राहून झगडत झिजण्यापेक्षा उदार बहुमतवाल्या कॉंग्रेसशी म्हणजेच यशवंतराव–नाईक प्रभृतींशी नवबौद्ध रिपब्लिकनांचे सूत अधिक जुळले. आज या दोन नेतृत्वाचा सहकार्य करारच झालेला आहे.

याशिवाय एक मोठी गोष्ट नव्या नेतृत्वाने साधली ती म्हणजे पक्ष व नेतृत्व संकुचित प्रांतीय होऊ दिले नाही. कॉंग्रेसमधील वरिष्ठ वर्गाच्या नेतृत्वावर नाराज होऊन शेकापक्ष स्थापन करणाऱ्या शंकरराव मोरे यांना शेवटी असे अनुभवास आले की, शेकापक्षाला प्रांतीय पातळीच्या मर्यादा आहेत. त्या दूर झाल्याशिवाय भागणार नाही. दाभाडी प्रबंधाच्या या जनकाला शेवटी मार्क्सवादामधील उणिवा प्रकर्षाने दिसू लागल्या. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीपूर्वीच शंकररावजी कॉंग्रेसमध्ये परत आले. "कॉंग्रेसच्या हाती सत्ता आल्यानंतर समाजवाद्यांनी व शेकापक्षीयांनी कॉंग्रेस सोडण्यात चूक केली. त्यांनी तेथेच राहून कॉंग्रेसमध्ये रेंगाळलेल्या प्रतिगामी शक्तीशी लढा दिला असता तर देशात विशेषतः महाराष्ट्रात कॉंग्रेसची पावले पुरोगामी मार्गावर अधिक द्रुतगतीने पडली असती यात शंका नाही" असे शंकरराव म्हणत असत.

शेकापक्षापूर्वी दहा वर्षे समाजवादी कॉंग्रेसमधून बाहेर गेले. महाराष्ट्रात त्या पक्षाची स्थापना श्री. गाडगिळांच्या घरी झाली, पण ते त्या पक्षात गेले नाहीत. काकांनी पथिकमध्ये या संदर्भात आपला अभिप्राय दिला आहे. ते म्हणतात,

" समाजवाद्यांत मी सामील झालो नाही. माझ्या मते कॉंग्रेस ही एक शक्ती आहे. एक प्रबल यंत्रणा आहे. तिच्यात राहून तिच्यामध्ये बदल घडवून आणले पाहिजेत. कालांतराने कॉंग्रेस राज्यावर येईल तेव्हा तिच्यात जर प्रागतिक, आर्थिकदृष्ट्या प्रागतिक व क्रांतिकारक विचाराचे लोक राहणार नाहीत तर श्रीमान व मध्यमवर्गीय लोकांच्या हातात राज्यसत्ता जाईल. गरिबांना न्याय देण्याचे कॉंग्रेसचे ध्येय साध्य होणार नाही." (पथिक २९७)

अठ्ठेचाळीस साली यशवंतराव व त्यांचे सहकारी शेकापक्षात गेले नाहीत, उलट तांबेभुवनमधील सभेस हजर राहिले आणि त्या सभेतील पत्रकाचा प्रचार करण्यासाठी चव्हाण-घोरपडे-कुंटे यांनी महाराष्ट्रात दौरा काढला. वृत्तीने समाजवादी असून समाजवादी पक्षात ते सामील झाले नाहीत तर कॉंग्रेसलाच समाजवादी नेतृत्व देण्याचा प्रयत्न करीत अनुकूल काल येईपर्यंत कॉंग्रेसमध्ये थांबले. उलट जी मंडळी तत्त्वांचा

उद्‌घोष करीत बाहेर गेली ती पक्षबांधणी करू शकली नाहीत. एकामागून एक नवी फळी त्यांच्यामधून फुटून अलग झाली.

याउलट सर्वांमधले चांगले आणि जनतेला हवे ते काँग्रेसमार्फत साध्य करून देण्याचे धोरण चव्हाण-नेतृत्वाने ठेवले. योग्य शक्ती योग्य प्रकारे वापरण्याचें कौशल्य त्यांनी दाखविले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी मंगल कलश त्यांचे हातांनी आला हे दृश्य जगाला दिसले तरी फ्लोरा फाऊंटनवरच्या हुतात्मा स्मारकाला स्वतः हार घालून ज्याचे श्रेय त्याला देण्याची वृत्ती यशवंतरावांनी दाखविली. आज ते व त्यांचे सहकारी नवा महाराष्ट्रच नव्हे तर देशात नवे समाजवादी जीवन साकार करण्याचा यत्न करीत आहेत. इंदिरा गांधी समाजवाद आणू पाहतात तर त्यांच्यामागे ते समर्थपणे उभे आहेत. पण एक पाऊल पुढे टाकून सांगतात की, समाजवादाच्या मार्गावरून इंदिराजी मागे वळू लागल्या, तरी आपण पुढे जाणार, हे एक महाराष्ट्रीय नेताच म्हणू शकतो, कारण लेखाच्या सुरुवातीपासून टप्प्याटप्प्याने दाखविल्याप्रमाणे महात्मा फुले यांचेपासून तो चार वर्षांपूर्वी काकासाहेब गेले, त्यांच्या निर्वाणापर्यंत मराठी नेत्यांनी या समाजवादी विचारांची पेरणी केली. समाजवादी, समतावादी, राईस्ट, कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट सर्वांनी काही सांगितले, काही पेरले, त्यांची कलमे या नेतृत्वाने महाराष्ट्र काँग्रेसवर केली आहेत.

उद्या हे नेतृत्व अधिक शक्तीनिशी देशाला आपल्या अनुभवाचा फायदा देईल. महाराष्ट्र ही जणू प्रयोगशाळाच ठरली की जेथे भारताच्या भावी विकासासाठी हवे असलेले नेतृत्वाचे रसायन तयार व्हावे. आज या मराठी नेतृत्वाला फार कठिण काळातून जावे लागत आहे. महाराष्ट्रापुरता समाजवाद, समता व लोकशाही आता दृढ होऊ लागली असे म्हणता येईल, पण उत्तरेत जनसंघ, पूर्व दक्षिणेत कम्युनिस्ट अशा प्रतिगामी व अतिडाव्या शक्ती वाढत आहेत. इंडिकेट सिंडिकेट हा झगडा या लेखाचा विषय नाही, परंतु इंडिकेटमध्ये राहून इंदिराजींना अधिक लाल होऊ न देणे आणि सिंडिकेटशी शक्य तेवढा मधुर संबंध ठेवून त्यांच्या प्रतिगामित्वाने लाल छाया लवकर येईल असा त्यांनाही इशारा देणे असे अवघड काम यशवंतरावजींना करावे लागत आहे. महाराष्ट्रात दृढ पायावर उभी असलेली इंडिकेट काँग्रेस म्हणजेच गेल्या ३५ वर्षांत आकार घेतलेले बहुजनसमाजाचे नवे नेतृत्व ही भारताची आशा ठरणार असा मला विश्वास वाटतो. हा आत्मविश्वास आहे, प्रौढीवा कुणा इतर प्रांताच्या नेतृवाचा अधिक्षेप करण्याची भावना त्यामध्ये नाही.

जिल्हा परिषद : शोध आणि बोध

पन्नालाल सुराणा

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची निर्मिती १९६२ साली झाली. राज्यकारभार लोकमतानुसार चालावा हे लोकशाही राज्यपद्धतीचे प्राणभूत सूत्र आहे. लोकांचा त्यांच्या प्रश्नांशी व अंमलबजावणीशी जेवढा जवळचा संबंध आणता येईल तितके चांगले. राजकीय सत्तेचे अधिकात अधिक विकेंद्रीकरण केले जावे ही भूमिका जिल्हा परिषदांच्या निर्मितीमागे होती. नागरी सुखसोयी पुरविणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रधान कर्तव्य मानले जाते. भारतात व महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकापासून या ना त्या स्वरूपातील जिल्हा किंवा तालुका पातळीवरील संस्थांकडे शिक्षण, आरोग्य, दळणवळण यांसारख्या सोयींचा पुरवठा करण्याचे काम देण्यात आले होते.

ही कामे जिल्हा परिषदांकडे सुपूर्द झालीच; पण आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. १९५१ सालापासून भारताने आर्थिक विकासासाठी नियोजनाच्या मार्गाचा अवलंब केला. शेती-विकासासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी समाज-विकास-योजना व राष्ट्रीय विस्तार सेवा या योजनांचा अंगिकार करण्यात आला. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने शेतीच्या सर्वांगीण विकासावर भर देणे आवश्यक होते. शेतीत स्थानिक परिस्थितीनुसार विविधता व गुंतागुंत फार. त्यामुळे फार मोठ्या प्रदेशासाठी शेती-विकासाच्या योजना आखणे उपयुक्त नाही हे योजनाकारांच्या लक्षात येऊ लागले. राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवर या योजना आखण्याऐवजी शक्य तितक्या कनिष्ठ पातळीवर ते काम व्हावे हा दृष्टिकोण सर्वमान्य होऊ लागला. संसदेने नेमलेल्या बलवंतराय मेहता समितीने या प्रश्नाचा अभ्यास करून दोन निष्कर्ष काढले होते : (१) शेती-विकास योजनांचा फायदा मुख्यतः बड्या शेतकऱ्यांनी घेतला आहे. सर्वसाधारण शेतकरी विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित राहिला आहे. त्यामुळे शेती-विकासाची गतीही पाहिजे तितकी वाढू शकली नाही. (२) शेतीविकासाच्या योजना

वरिष्ठ पातळीवर, फार मोठ्या प्रदेशासाठी ठरविल्या जात असल्याने त्या काहीशा अवास्तविक, अशास्त्रीय व अव्यवहार्य बनत आहेत. अंमलबजावणीत दीर्घसूत्रीपणाचा दोष वाढला आहे.

म्हणून त्या समितीने शिफारस केली, की शेती व एकंदर ग्रामीण विकासाच्या नियोजनाचे व अंमलबजावणीचे काम स्थानिक पातळीवरील लोकनियुक्त संस्थांकडे द्यावे. त्यासाठी त्यांना पुरेसे अधिकारही द्यावेत.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा हा मुख्य गाभा महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या नाईक समितीनेही स्वीकारला. परिणामतः जिल्हा परिषद कायद्यान्वये या संस्थांकडे नागरी सुखसोयींबरोबरच शेती, ग्रामीण उद्योग, सहकार, पाटबंधारे यांसारखी कामे सोपविण्यात आली. भारतात लोकशाही बद्धमूल होण्याच्या आड येथील सामाजिक विषमता येते आहे, ती कमी करणे स्थानिक नेतृत्वाला व संस्थांना अधिक सुलभ होईल. प्रत्यक्षात त्यांनाच ते काम करावे लागणार आहे, म्हणून समाजकल्याण खातेही जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले. शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते या सोयीसुद्धा केवळ कल्याणकारी स्वरूपात न पुरविता विकासाची प्रक्रिया गतिशील बनविण्यास साह्यभूत होतील अशा रीतीने त्यांचा विस्तार केला जावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर गेल्या आठ वर्षांतील जिल्हा परिषदांची वाटचाल कशी काय दिसते ? ग्रामीण भागातील सर्वसाधारण शेतकरी-शेतमजूर-कारागीर याला जिल्हा परिषदेपासून विशेष काही फायदा झाल्यासारखे वाटत नाही. विकासाच्या प्रक्रियेतील आपला मित्र व मार्गदर्शक ही भूमिका जिल्हा परिषद बजावू शकेल असे त्याला वाटत नाही. जिल्हा परिषदेचा नोकरवर्ग अनेक कारणांस्तव नाराज आहे. वरिष्ठ पातळीवरील सत्ताधारी व अधिकारी यांचाही अपेक्षाभंग झाला असल्याचे यांच्या बोलण्यावरून व विशेषतः मौनावरून दिसून येते. एवढेच नव्हे तर ज्यांनी या संस्थांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी अहमहमिकेने उचलली त्यांचीही मने असामाधानी आहेत. शेती व ग्रामीण विकासाच्या कामाला जिल्हा परिषदेमुळे विशेष उभारी आली आहे. या संस्थेची उपयुक्तता व वैशिष्ट्य विकसित होत आहे असे दिसत नाही. वस्तुस्थितीचे हे वर्णन म्हणजे निराशावादाचा झटका होय असे कोणी म्हणेल, पण ते बरोबर नाही. वस्तुस्थिती आहे तशी समजून घेणे उपाययोजनेच्या दृष्टीने शहाणपणाचे ठरत असते. आत्मवंचनेमुळे आत्मनाश ओढवतो.

जिल्हा परिषदांचे कामकाज समाधानकारक रीतीने चालत नाही याची कारणे काय ? कोण याला जबाबदार आहे ? कामकाज समाधानकारकपणे चालणे याचा मर्यादित अर्थ येथे अभिप्रेत नाही. अकार्यक्षमता, भ्रष्टाचार हे दोष कुठल्याही यंत्रणेत कमी-अधिक प्रमाणात असतातच. त्यांचे प्रमाण शक्य तितके कमी झाले पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी संबंधित नेत्यांवर व एकंदर समाजावर असते. पण भ्रष्टाचार व अकार्यक्षमता एवढ्याच फूटपट्ट्यांनी जिल्हा परिषदांचे यशापयश मोजणे योग्य नाही. विकास प्रक्रियेतील जी महत्त्वाची कामगिरी त्यांनी बजवावी अशी अपेक्षा होती

त्याबाबत त्यांचा आचार (परफॉर्मन्स) कसा झाला, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

हा आचार संबंधित व्यक्तींची मनोवृत्ती व वर्तन यावर काही अंशी अवलंबून आहे, तसेच कायद्याची चौकट व तत्सम इतर गोष्टी यांवरही अवलंबून आहे. जिल्हा परिषदा विकासप्रक्रिया गतिमान करण्यात यशस्वी झाल्या नाहीत याला लोकनियुक्त पदाधिकारी काही प्रमाणात निःसंशय जबाबदार आहेत. जिल्हा परिषदेतील पदाधिकारांच्या जागा या पूर्णतया निवडणुकांवर आधारलेल्या आहेत. गेली सात-आठ वर्षे ज्या पदाधिकाऱ्यांनी ती ती पदे भूषविली त्यांच्यावर ती पदे लादली होती, कोणी त्यांना जबरदस्तीने त्या स्थानांवर बसविले होते असे मुळीच नाही. त्यांनी स्वतः त्या पदांसाठी धडपड केली व ती मिळविली. पण ही पदे कशासाठी आहेत याचा त्यांच्यापैकी बहुतेकांनी कधी गंभीरपणे विचारच केला नाही. शेती व ग्रामीण विकासाचे प्रश्न काय आहेत, योजनांची आखणी व अंमलबजावणी यांचे तंत्र कोणते, प्रशासनाची पथ्ये व मर्यादा काय आहेत व त्या सांभाळूनही मूळ धोरण कसे पुढे रेटायचे या गोष्टींचा अभ्यास केलेले पदाधिकारी अपवादात्मकच होत. बहुतेकांनी ही पदे म्हणजे प्रतिष्ठेच्या व सत्तेच्या जागा होत एवढेच ओळखले. प्रतिष्ठा व सत्ता मिळावी अशी महत्त्वाकांक्षा असणे गैर नाही, पण त्याचबरोबर त्या पदांची जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्य अंगी असले पाहिजे. हे सामर्थ्य कमविण्याचा प्रयत्न न करता बहुतेकजण प्रतिष्ठा व सत्तेच्याच मागे लागले होते. ही स्थाने मिळविली की अमर्याद वैयक्तिक स्वार्थ साधता येईल अशी काहीजणांची समजूत होती. अशांची संख्या जास्त आहे. पण काहीजण असेही आहेत की, ज्यांना सत्ता ही स्वार्थासाठी नव्हे तर केवळ प्रतिष्ठेसाठी पाहिजे. त्या स्थानावर आपण न बसता दुसऱ्या कोणी तरी बसणे हा आपला अपमान आहे अशीच त्यांची भावना आहे. तर काहीजणांना त्या स्थानी अमुक माणसाने बसू नये, मग दुसरा कोणीही तेथे बसले तरी चालेल असे वाटते. प्रतिष्ठेच्या अशा वेगवेगळ्या कल्पनांसाठी जिल्हा परिषदेतील पदे वापरली गेली.

याला केवळ संबंधित व्यक्तीच जबाबदार आहेत असे नाही. पक्षसंघटनाही तितकीच जबाबदार आहे. आपल्यासारख्या उच्चनीचतेच्या कल्पनेवर उभारलेल्या उतरंडवजा समाजव्यवस्थेत स्थानमाहात्म्य विलक्षण असते. प्रतिष्ठेच्या चुकीच्या कल्पनांच्या आहारी माणसे जात असतात. पण ज्यांना समाजात लोकशाहीवादी परिवर्तन घडवायचे आहे अशा व्यक्ती व संघटनांनी या कल्पनांना मुरड घालायचे शिक्षण आपल्या कार्यकर्त्यांना द्यायला हवे. सत्तास्थान प्रतिष्ठेसाठी नसून कर्तव्य-पालनासाठी आहे, तेव्हा विशिष्ट लायकी व कुवत असलेल्या व्यक्तींनाच ही स्थाने मिळू शकतील असा कटाक्ष पक्षसंघटनांनी धरायला पाहिजे होता. तसा प्रयत्न जवळ जवळ कुठल्याही पक्षाने केला नाही. पण काँग्रेसखेरीज इतरांना या क्षेत्रात प्रवेशच फार थोडा मिळाला. १९६२ साली पंचवीसच्या पंचवीस जिल्हा परिषदांत काँग्रेस पक्षाचे निर्विवाद बहुमत होते. जिल्हा परिषदेतील पद हे नुसते मानाचे नव्हे तर मुख्यतः कामाचे स्थान आहे हे आपल्या कार्यकर्त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न त्या

पक्षाने केला नाही. पक्षाच्या हाती सत्ता टिकविणे हेच एकमेव सूत्र ठरवून जिल्हा परिषदांतील पदांबाबत सर्व प्रकारच्या तडजोडी या पक्षाने केल्या. पदाधिकारी स्थानापन्न झाल्यानंतर तरी त्यांना शिक्षण देण्याचा, मार्गदर्शन करण्याचा व शिस्त लावण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे होता. १९६३–६४ साली तसा थोडाफार झाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या चिटणिसांनी जिल्हा परिषद अध्यक्षांची बैठक बोलावण्याचा दोनदा प्रयत्न केला; पण अनेक सबबी सांगून जिल्हा परिषद अध्यक्षांनी व इतर पदाधिकाऱ्यांनी तो हाणून पाडला. मंत्र्यांनी बोलाविले तरच बैठकीला जायचे, निवडणुका जवळ नसेतोवर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकांना जायचे नाही असा त्यांचा परिपाठ होता. याची गंभीरपणे दखल घेऊन उपाययोजना व्हायला पाहिजे होती. पण त्याऐवजी अशा बैठका बोलाविण्याचा नादच पक्ष-पदाधिकाऱ्यांनी सोडून दिला. १९६७ साली एक-दोन जिल्हा परिषदांत काँग्रेसचे बहुमत गेले. पण तरीही आपल्या कार्यकर्त्यांना शिक्षण देण्याचे व शिस्त लावण्याचे काँग्रेसने मनावर घेतले नाही. उलट जिल्हा परिषदांना गटबाजीच्या राजकारणाचे आखाडे बनू दिले. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून नवे, ध्येयवादी पण व्यवहारदक्ष नेतृत्व विकसित होणे त्यामुळे अशक्य होऊन बसले. जिल्हा परिषद कायद्यान्वये मिळालेले अधिकार वापरून विकास-प्रक्रिया गतिशील बनविण्याचा जोमदार प्रयत्न जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांनी केला असता तर काही चांगल्या गोष्टी साध्य करता आल्या असत्या. तसेच त्या कायद्याच्या मर्यादा व इतर क्षेत्रांतील धोरणांशी विकेंद्रीकरणाचा येत असलेला संघर्ष साधार स्पष्ट झाला असता व त्यात विकेंद्रीकरणाशी सुसंगत असे बदल घडविण्यासाठी राज्य सरकारवर दडपण आणता आले असते. पण पदाधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे असे न होता जिल्हा परिषदा या आज चेष्टेचा विषय बनल्या आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

जिल्हा परिषदांच्या अपयशाला या व्यक्तिनिष्ठ कारणांइतकीच वस्तुनिष्ठ कारणेही जबाबदार आहेत. किंबहुना आपली स्थानिक संस्थांच्या उत्क्रांतीची प्रक्रियाच चमत्कारिक आहे. खालून विकसित होणे याऐवजी वरून वाढविणे असे तिचे स्वरूप आहे. इंग्लंडमध्ये कौंटी किंवा म्युनिसिपालिटी यासारख्या संस्था लोकांनी पुढाकार घेऊन निर्माण केल्या. त्यांना कायदेशीर हक्क प्राप्त व्हावेत यासाठी सरकारकडे अर्ज केले व सरकारने त्यांना कायदेशीर सनदा दिल्या. स्थानिक गरजा भागविण्यासाठी वेगवेगळी कामे सुरू करण्यात पुढाकार त्या संस्थांनी घेतला, त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते अधिकार व थोडेफार आर्थिक साह्य त्यांनी सरकारकडे वेळोवेळी मागितले. सरकारने ते दिले. पण त्या योजनांची अंमलबजावणी नीट होईल की नाही याची चिंता सरकारला करावी लागली नाही. लोकांनी सुरुवातीपासून स्वतःच पुढाकार घेतला असल्याने कामे बहुतांशी व्यवस्थित पार पडत असत. हा एकोणिसाव्या शतकातील अनुभव आहे. विसाव्या शतकात मग स्थानिक संस्थांच्या कायद्याचे व प्रशासनाचे सुसूत्रीकरण करण्यात आले.

भारतात प्राचीन व ऐतिहासिक काळात ग्रामपंचायती चांगल्या प्रकारे काम

करीत होत्या. पुढे पुढे त्या मोडकळीस आल्या. इंग्रजी अंमल कायम झाल्यानंतर काही बाबी स्थानिक संस्थांकडे सोपविण्यास सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला महापालिका व नगरपालिकांची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागासाठीही स्थानिक निधी समित्या स्थापन करण्यात आल्या (१८६९). साम्राज्यशाही राजवटीच्या नोकरशहांना हे धोरण फारसे पसंत नसावे. पण व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांनी याबाबत ठाम भूमिका घेतली. १८८२ साली केलेल्या ठरावात त्यांनी म्हटले आहे, " प्रमुखतः राज्यकारभारात काही सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूने हा उपाय सुचविलेला किंवा पुरस्कारलेला नाही. मुख्यतः राजकीय शिक्षणाचे व लोकशिक्षणाचे एक साधन म्हणून त्याची आवश्यकता आहे. स्थानिक जनतेचे ज्ञान व स्थानिक हितसंबंध यांचा स्थानिक कारभारावर जसजसा अधिक प्रभाव पडत जाईल तसतशी कार्यक्षमतेत सुधारणा होईल ...शक्यतो लोकांनी कारभार स्वतः पाहावा यासाठी त्यांना तयार करणे हाच सरकारला एकमेव योग्य मार्ग उपलब्ध आहे. तसेच साम्राज्यविषयक कारणांमुळे ज्या बाबी सरकारच्या प्रतिनिधींच्या हातात राहिल्या पाहिजेत अशा बाबींखेरीज करून बाकीची सर्व कामे लोकांनी स्वतः करावी याकरिता शक्ती विकसित करावी लागेल किंवा वेळप्रसंगी ती निर्माण करावी लागेल..."

लॉर्ड रिपनने आपले धोरण निर्धाराने रेटले. त्या वेळच्या मुंबई इलाख्यापुरते बोलावयाचे तर १८८४ साली लोकल बोर्ड्स ॲक्ट करण्यात आला. १९०७ साली विकेंद्रीकरणाच्या प्रश्नावर रॉयल कमिशन नेमण्यात आले. त्यांच्या व १९१५ साली नेमलेल्या लॉरेन्स कमिटीच्या शिफारशी स्वीकारण्यात येऊन १९१८ साली महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या. कलेक्टरना लोकल बोर्डातून वगळण्यात आले व बिगरसरकारी व्यक्तीची अध्यक्ष म्हणून नेमणूक होऊ लागली. १९१८ च्या मॉटफोर्ड अहवालातील शिफारशीनुसार १९२३ च्या लोकल बोर्ड कायद्याने निवडून आलेल्या सभासदांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आले. १९३८ साली नियुक्त सभासदांची तरतूद पूर्णतया काढण्यात आली. १९४७ साली प्रौढमतदानाचे तत्त्व स्वीकारले गेले. विदर्भात १८८३ साली स्थानिक स्वराज्य संस्था कायदा झाला. जिल्हा बोर्डे १९२० साली अधिक मजबूत पायावर उभारण्यात आली. हैदराबाद संस्थान तसे व्हाइसरॉयच्या नियंत्रणाखाली नसले तरी तेथेही समांतर कायदे झाले. १८८९ साली झालेल्या दस्तूर-अल-अमल अन्वये जिल्हा व तालुका बोर्डांची स्थापना करण्यात आली.[1] पश्चिम महाराष्ट्रात १९३८ साली जिल्हा इमारत समित्या स्थापन करण्यात आल्या.

१. १९६० साली अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्यात अंतर्भूत असलेले पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश पूर्वी अनुक्रमे मुंबई इलाखा (प्रांत), हैदराबाद संस्थान व मध्यप्रांत आणि वऱ्हाड यात होते. त्यामुळे या तीन प्रदेशांत प्रचलित असलेल्या कायद्यांची माहिती होण्यासाठी त्या तीन प्रांत संस्थानांचा वेगवेगळा निर्देश करावा लागतो.

जिल्हा पातळीवर आणखी काही संस्था निर्माण करण्यात आल्या. मुंबई इलाख्यात १९२३ सालापासून जिल्हा स्कूल बोर्डे अस्तित्वात आली. १९४७ साली मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा झाला. त्यान्वये जिल्हा स्कूल बोर्डाच्या अधिकारात वाढ झाली. १९४१ साली हैदराबादेत जिल्हा बोर्डविषयक कायदा झाला. त्यानुसार निवडणुका मात्र पुढे झाल्या. १९३९ साली जिल्हा विकास मंडळे नेमण्याचे अधिकार कायद्यान्वये प्रांतिक सरकारांना मिळाले होते, पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने त्याची अंमलबजावणी झाली नाही. ती पुढे १९५२ साली झाली. १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतर विदर्भ व मराठवाड्यातही अशी मंडळे स्थापन करण्यात आली.

सत्तरऐंशी वर्षांच्या काळात इतका मोठा पसारा उभारला जाणे वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना उत्तेजन देण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला यात शंका नाही. पण उत्तेजन " वरून " द्यायचे हे वैशिष्ट्य कायम राहिले. स्थानिक गरजांनुसार व स्थानिक घडपडीतून या संस्थांचा विकास होण्याऐवजी वरिष्ठ सत्ताधाऱ्यांना विविध व्यवधाने सांभाळून जेवढे सोयीचे वाटले तेवढे अधिकार त्यांनी दिले. काही बाबतीत अधिकार देण्याचे कायदे झाले तरी त्यांची अंमलबजावणी झाली नाही. किती पैसा द्यायचा हे तर सर्वस्वी वरिष्ठ सत्ताधारी आपल्या सोयीने ठरवीत आले. रिपनच्या ठरावातील "...साम्राज्यविषयक कारणांमुळे ज्या बाबी सरकारच्या प्रतिनिधींच्या हातात राहिल्या पाहिजेत..." हा वाक्यार्थ अतिशय सूचक आहे. साम्राज्याचे हितसंबंध ही सर्वोच्च महत्त्वाची बाब होती. ती सांभाळून व त्या दृष्टीने सोयगैरसोय पाहूनच स्थानिक संस्थांना दाणापाणी पुरवायचे ही सत्ताधाऱ्यांची भूमिका स्वच्छ होती. अशा स्थितीत दमदार, आत्मविश्वासपूर्ण स्थानिक संस्थांची जोपासना होणे कठिणच होते.

१९४७ साली " साम्राज्यविषयक कारणां" चा लोप झाला. पण नंतरच्या गतिविधीवरून असे दिसून येते की, स्वतंत्र भारतातील सत्ताधाऱ्यांनी स्थानिक संस्थांविषयीचे परंपरागत धोरण तसेच चालू ठेवले. देशाची राज्यघटना लोकशाही स्वरूपाची बनविली गेली; पंचायत राज्याचा विकास करणे हे शासनसंस्थेचे " मार्गदर्शक तत्त्व " म्हणून नमूद केले गेले; त्यानुसार अनेक कायदेकानू झाले व अनेकविध संस्थांचे जाळे विणण्यात आले हे सगळे खरे. पण स्थानिक संस्थांच्या चैतन्यमय विकासाच्या गरजांनुसार तरतुदी करण्याऐवजी वरिष्ठ पातळीवरील धोरणे व कार्यक्रम यांची सोयगैरसोय महत्त्वाची मानायची व या आराखड्यात जेवढी फट मिळेल तेवढ्याच स्थानिक संस्था वाढू द्यायच्या असाच दृष्टिकोण गेल्या वीस-बावीस वर्षांत प्रभावशाली राहिलेला दिसतो. यात कोणावर अप्रामाणिकपणाचा आरोप करण्याचा हेतू नाही. पण वरिष्ठ पातळीवर स्वीकारलेली अन्य धोरणे आणि शासनाविषयीच्या परंपरागत कल्पना यांच्याशी विकेंद्रीकरण-कल्पनेचा काही बाबतीत संघर्ष येणे अटळ होते. त्या वेळी एक तर या संघर्षाला बगल देण्याचा प्रयत्न झाला व ते जमले नाही त्या वेळी स्थानिक संस्थांना कागदोपत्री अधिकार देऊन खरी सत्ता वरिष्ठ पातळीवर ठेवण्यात आली.

महाराष्ट्रात जिल्हा परिषदांच्या निर्मितीचा निर्णय सरकारने लोकशाही विकेंद्रीकरण समिती[1] च्या शिफारशीनुसार घेतला. त्या अहवालातील विवेचनात वर उल्लेखिलेली वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसून येतात. विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचा पुरस्कार करताना या समितीने म्हटले आहे, "राजकीय शिक्षणाचा सतत जोरदार प्रयत्न आणि जलद गतीने आर्थिक विकास या दोन मार्गांनीच या अडचणी (दारिद्र्य, निरक्षरता, मागासलेपण) दूर होणे शक्य आहे. मग ते करीत असताना कार्यक्षमतेचा थोडा ऱ्हास झाला किंवा काही चुका झाल्या तरी हरकत नाही. पण या स्थानिक संस्थांकडे खरे अधिकार सुपूर्त करणे अत्यंत निकडीचे आहे. या अधिकारांच्या वापरामुळेच त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण होईल; स्वयंशासनाच्या कलेचे त्यांना शिक्षण मिळेल; व त्यांच्यात आर्थिक विकासाची तळमळ निर्माण होईल." (पृ. ५१) स्थानिक संस्थांकडे "खरे अधिकार" सुपूर्त करण्याची भूमिका या समितीने घेतली खरी; पण प्रत्यक्ष शिफारशी करताना मात्र खरे अधिकार देण्याचे राहून गेले. जिल्हा परिषदांना सत्तेत भागीदारी द्यायची; शासनात त्यांना स्थानिक पातळीवरील बाबींबाबत महत्त्वपूर्ण वाटा द्यायचा तर राज्यपातळीवर जसे राज्य सरकार तसे जिल्हा पातळीवर जिल्हा सरकार स्थापन करायला हवे होते. आपल्या संघराज्यात्मक घटनेत काही विषय (उदा. संरक्षण, परराष्ट्र संबंध) हे पूर्णतया केंद्र सरकारच्या कक्षेतले आहेत. राज्य सरकारांना त्यात दखल घेण्याचा घटनात्मक अधिकार नाही. पण तरीही इतर बाबतींत जे अधिकार राज्य सरकारांना आहेत त्यामुळे ती शासनसत्तेतील महत्त्वाची सत्ताकेंद्रे आहेत हे जाणवते. घटनेत विषयांची विभागणी करताना राज्ययादी महत्त्वपूर्ण बनविण्यात आली असून त्या यादीतील विषयांबाबत राज्य सरकार सार्वभौम आहे. अर्थात अशी यादी घटनेत आहे एवढ्यावरूनच राज्य-सरकारचे स्वतंत्र महत्त्व सिद्ध होते असे नाही. किंबहुना राज्य-सरकारच्या सत्तेचा खरा पुरावा हा आहे की, राज्य पातळीवर केंद्र सरकारची समांतर यंत्रणा नाही. केंद्र सरकारला आपल्या विविध खात्यांच्या कामांसाठी राज्य किंवा त्याहूनही कनिष्ठ पातळीवर अधि-कारी नेमता येतात, पण राज्य पातळीवर राज्य सरकारपासून स्वतंत्र असा केंद्र सरकारचा कोणी प्रतिनिधी नाही. राज्यपाल हा राष्ट्रपतीने नेमलेला असतो हे खरे; पण घटनेनुसार विधिमंडळ चालू असेतोवर राज्यपाल हा राज्यातील लोकप्रतिनिधींच्या सल्ल्याने वागत असतो. तो राज्य सरकारचा एक अंगभूत घटकच आहे. राष्ट्रपतीचा प्रतिनिधी हे राज्य-पालाचे स्वरूप व्यवहारात खूप मर्यादित असते. तितकेदेखील ते असू नये असे काही लोकशाहीनिष्ठांना वाटते. पण घटनात्मक मर्यादा व राज्य सरकारचाच एक भाग बनून राहणे यामुळे राज्यपातळीवर त्याची सत्ता राज्य सरकारपेक्षा वरिष्ठ किंवा समांतरसुद्धा

१. तत्कालीन महसूलमंत्री श्री. व्ही. पी. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली होती. म्हणून ती नाईक समिती या नावाने ओळखली जाते. या विवेचनातही यापुढे तसाच उल्लेख केला आहे.

नाही. त्या पातळीवरील राज्य सरकारची सत्ता शासन-संस्थेचीच असल्याचा प्रत्यय जनतेला येत राहतो.

जिल्हा परिषदांच्या बाबतीत असा प्रत्यय येत नाही. एक तर "जिल्हा परिषद" हे नावच तात्पुरतेपणा––अस्थिरता किंवा गौणत्व सुचविणारे आहे. 'जिल्हा शासन' अशासारखे नाव देता येणे शक्य होते, पण महत्त्वाचे म्हणजे जिल्हा पातळीवर शासनाची मुख्य जबाबदारी जिल्हा परिषदेची नसून राज्य सरकारचा प्रतिनिधी असलेल्या कलेक्टरची आहे व त्यामुळे जिल्हा परिषदेला उपन्यासारखे स्वरूप प्राप्त झाले आहे. घटनेतील तीन याद्यांच्या धर्तीवर 'जिल्हा यादी'ची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद कायद्यात करण्यात आली असली तरी जिल्हा पातळीवरील शासनाचे मुख्य केंद्र असे स्वरूप जिल्हा परिषदेला आलेले नाही. कलेक्टर हाच शासनाचा कणा ठेवल्याने त्याचे स्थान हेच सत्तेचे खरे स्थान वाटते. याचा अर्थ असा नाही की, कलेक्टरला जिल्हा परिषदेचा अंगभूत भाग बनवायलाच पाहिजे होते. महसुली यंत्रणेचा प्रमुख या नात्याने व इतर काही कामासाठी कलेक्टर हा जिल्हा परिषदेपासून अलग ठेवायला काहीच हरकत नव्हती. पण सध्याच्या रचनेत त्याचे नुसते तेवढेच स्थान नाही. (राज्य पातळीवरील इन्कमटॅक्स कमिशनरसारखे); तो राज्य सरकारचा प्रतिनिधी आहे.

ही व्यवस्था अजाणता झाली असे नाही. नाईक समितीने बराच विचार करून ही व्यवस्था सुचविली आहे. "प्रशासकीय संघटना" या प्रकरणात (प्र. ८ वे) नाईक समितीने जिल्हा परिषदेचा मुख्य प्रशासक कोण असावा याची चर्चा केली आहे. कलेक्टरला मुख्य प्रशासक करावा ही सूचना नाकारण्यासाठी प्रदीर्घ युक्तिवाद करण्यात आला आहे.[1] त्यातील मुख्य सूत्र हेच आहे की, जिल्हा पातळीवरील अंतिम सत्ता राज्य सरकारच्या हातात राहिली पाहिजे व ती वापरण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून त्याला जिल्हा परिषद यंत्रणेच्या बाहेर ठेवले पाहिजे.

---

१. या संदर्भात पुढील उतारे पाहावेत :

(अ) "जिल्ह्याच्या कारभारात त्याचे ऐतिहासिक स्थान, जिल्ह्याच्या जनतेकडून त्याला मिळणारा मान व दर्जा आणि जिल्हाप्रमुख म्हणून त्याचे स्थान. . .". (पृ. १०६)

(ब) "सरकारच्या दृष्टीने पाहू गेल्यास कलेक्टर हाच जिल्ह्यात घडणाऱ्या किंवा घडणे आवश्यक असलेल्या बहुतेक सर्व बाबींस जबाबदार असतो." (पृ. १०६)

(क) "कलेक्टरला बाहेर ठेवून त्याला कायद्याने काही नियंत्रणाचे व देखरेखीचे अधिकार देण्याचे आजपर्यंत सरकारी धोरण आहे आणि ह्या धोरणात बदल करण्याने काही विशेष फायदा होईल असे आमच्या दृष्टोत्पत्तीस आले नाही." (पृ. १०९)

(ड) १९६० साली सेंट्रल कौन्सिल ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटच्या बंगलोर येथे झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे एकमुखी शिफारस करण्यात आली.—"त्रिविध स्वरूपाच्या या पद्धतीपासून (ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद

राज्य सरकारचा प्रतिनिधी हे कलेक्टराचे स्थान केवळ प्रशासनिक विचारातून ठरलेले नाही. नाईक समितीने विकेंद्रीकरणाविषयी घेतलेल्या अर्धवट भूमिकेचे ते एक उदाहरण आहे. समितीने स्पष्टच म्हटले आहे, " विकेंद्रीकरण म्हणजे राज्य सरकार व स्थानिक स्वराज्यसंस्था यांमध्ये सर्व कामांची विभागणी करून प्रत्येकाने आपापली जबाबदारी दुसऱ्याशी संबंध न ठेवता स्वतंत्रपणे पार पाडावयाची असा त्याचा अर्थ नव्हे. तर राज्य सरकारची काही कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवावयाची आणि कायदा, सुव्यवस्था व विकास (याबाबत राज्य सरकारची) सर्वसामान्य घटनात्मक जबाबदारी असते त्याला बाध येऊ न देता याबाबतची राज्य सरकारांची जी कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात येतील ती त्यांनी पार पाडावयाची असा विकेंद्रीकरणाचा खरा अर्थ आहे. अर्थातच त्यांना तोडून दिलेल्या कामांमध्ये राज्य सरकारच्या सर्व-सामान्य धोरणाला अनुसरून निरनिराळ्या कामांविषमी कोणता अग्रक्रम ठरवावयाचा किंवा ती कोणत्या विभागात (प्रदेशात) करावयाची हे ठरविण्यासंबंधीचे सर्व अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना असले पाहिजेत. उलटपक्षी, स्थानिक स्वराज्य संस्थांना तोडून दिलेली कारभारविषयक व नियामक स्वरूपाची कामे त्यांच्याकडून योग्य रीतीने केली जातात की नाही हे पाहण्याकरीता व त्यांनी हाती घेतलेले विकासकार्य हे राज्य सरकारच्या अथवा भारताच्या विकासयोजनांशी सुसंगत राहील अशी दक्षता घेण्यासाठी राज्य सरकारला त्यांच्यावर काही प्रमाणात देखरेख करावी लागेल व काही प्रमाणात त्यांच्यावर नियंत्रणही ठेवावे लागेल. " (पृ. ५५)

कायदा व सुव्यवस्थाविषयक जबाबदारी आणि आर्थिक विकासासाठी नियोजन-पद्धतीचा स्वीकार केल्याने काही प्रमाणात अटळ झालेले केंद्रीकरण यामुळे राज्य सरकारचे अधिकार अबाधित ठेवण्याकडे नाईक समितीचा कल दिसून येतो. " काही

....

ही त्रिविध पद्धत) कलेक्टरला अलिप्त ठेवले पाहिजे आणि प्रत्यक्ष क्षेत्रात त्याने सर-कारचे प्रतिनिधी म्हणून काम करावे व या क्षेत्रातील घडणाऱ्या घटनांच्या संबंधी सरकारला सर्वसाधारण माहिती देण्याचे कर्तव्य करावे व जेथे सरकार आदेश देईल तेथे आवश्यक ती दुरुस्तीची कारवाई करावी," ही शिफारस नाईक समितीला स्वीकारार्ह वाटली आहे.

(ई) " कलेक्टरला, जिल्ह्यातील सरकारी यंत्रणेचा प्रमुख म्हणून आपले सर्व लक्ष राज्य क्षेत्रातील कार्यक्रमावर केंद्रित करता येईल व ती गोष्ट राज्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरेल. आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी, स्थानिक संस्थां-संबंधी आजही त्यांच्याकडे जे अधिकार आहेत ते तसेच चालू राहतील. कलेक्टर हा राज्य सरकारचा जिल्ह्याच्या पातळीवरील प्रतिनिधी असल्याने त्याला सरकारचे जणू ' डोळे व कान ' अशा तऱ्हेने वागावे लागेल व सर्वांना त्याला तशी मान्यता द्यावी लागेल. " (पृ. १११)

कामे स्थानिक संस्थांकडे सोपवायची ” हे सूत्र चालू राहिल्याने स्थानिक उपक्रमशीलता विकसित होण्याला या व्यवस्थेत फारसा वाव राहिला नाही.

बलवंतराय मेहता समिती व नाईक समिती या दोन्हींचाही भर ग्रामीण भागातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक सहकार्य वाढत्या प्रमाणात मिळावे यावर आहे व त्यासाठी त्यांनी तालुका किंवा जिल्हा पातळीवरील संस्थांना विशेष अधिकार देण्याची सूचना केली आहे. नियोजनात केंद्रीकरण बऱ्याच अंशी अटळ आहे याची जाणीव त्यांनाही होती. नाईक समितीने म्हटले आहे, “ काही मूलभूत राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजनाचे केंद्रीकरण केले पाहिजे हे निःसंशय सत्य आहे. तथापि राष्ट्रीय योजनेच्या सर्वसाधारण उद्दिष्टांच्या परिसरात राहून स्थानिक उपक्रमशीलता व स्थानिक जनतेचे प्रयत्न यांच्या द्वारेच हे स्थानिक कार्यक्रमांच्या नियोजनांचे उद्दिष्ट अत्यंत यशस्वीपणे गाठता येईल असा आम्हाला विश्वास वाटतो. परिणामी अशा प्रकारचे स्थानिक मार्गदर्शन व सहकार्य मिळाले तरच राष्ट्रीय योजनेची अधिक वास्तववादी अशी अंमलबजावणी होईल व नियोजनाच्या कार्यात डोळयांत भरण्यासारखी वाढ घडून येईल. “ (पृ. ४८) समितीने पुढे असेही म्हटले आहे की, आतापर्यंतच्या नियोजनाने राष्ट्रीय मोठ्या योजनांना प्राधान्य दिले. परिणामतः स्थानिक गरजांकडे दुर्लक्ष झाले. ही फार मोठी उणीव राहून गेली. ती भरून काढण्यासाठीही स्थानिक संस्थांना विकास-प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

विकेंद्रीकरणामागील हा सद्हेतूसुद्धा व्यवहारात असाध्यच राहिला. त्याची दोन कारणे दिसतात. एक तर नियोजनाचे केंद्रीकरणात्मक स्वरूप अबाधितच ठेवण्यात आले. दुसरे, जी कामे जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली त्यासाठी तेवढा-तेवढा पैसा दर वर्षी सरकार जिल्हा परिषदेला देऊ लागले; त्या व तशा योजनांसाठी आवश्यक असलेला पैसा उभारण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला मिळाला नाही. त्यामुळे सरकारने योजना चालवायला दिली की चालवायची, आणि बंद केली तर हातावर हात ठेवून बसायचे अशी जिल्हा परिषदेची अवस्था झाली आहे. हे मुद्दे स्पष्ट होण्यासाठी जिल्हा परिषदेकडे सोपविलेल्या काही खात्यांची व कामांची तपशिलाने चर्चा करायला हवी. ती नीट समजण्यासाठी उदाहरणादाखल म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेच्या तीन सालांच्या खर्चांचा तुलनात्मक तक्ता पुढे दिला आहे. पंचवीसपैकी एकाच जिल्हा परिषदेच्या उदाहरणावरून सर्वसाधारण निष्कर्ष काढणे कितपत उचित ठरेल अशी शंका उपस्थित होऊ शकेल. पण योजना व त्यासाठी पैसा किती, कसा द्यायचा याची पद्धत सर्व जिल्हा परिषदांसाठी सारखी आहे. ‘ वने ’ यासारख्या बाबींबाबतच काय तो फरक पडू शकेल.

सोलापूर जिल्ह्याचे उदाहरण घेण्यात ती जिल्हा परिषद विशेष अकार्यक्षम आहे असेही मुळीच सुचवायचे नाही. तिचा आचार (परफॉर्मन्स) इतरांपेक्षा फारसा वेगळा नाही. सोलापूर हा राज्यातील मोठ्या जिल्ह्यांपैकी एक आहे. त्यासंबंधी १८२–८३ पृष्ठावर दिलेल्या तक्त्याविषयी काही खुलासे केले पाहिजेत.

सोलापूर जिल्हा परिषदेचा तीन सालांचा तौलनिक खर्च

बाब	१९६२-६३	६८-६९		१९७०-७१ (मूळ अंदाजपत्रक)		
	प्रत्यक्ष खर्च	दुरुस्त अंदाज	प्रत्यक्ष खर्च	जिल्हा परिषद	सरकार	एकूण
१. प्रशासन	६२,०५६	१,७६,०००	१,६४,४४०	२,७५,०००	—	२,७५,०००
२. सामान्य प्रशासन ...	५,७६,९३८	२१,०६,०००	२३,०३,४१६	२,७५,०००	२२,४९,०००	२५,२४,९००
३. व्याज	—	—	—	१,०००	—	१,०००
४. शिक्षण	९३,००,०९७	२,२१,७२,४००	२,२९,३६,३१५	६,००,०००	१,७१,३९,०००	१,७७,३९,०००
५. वैद्यकीय	२,२०,६१३	४,८६,०००	४,१०,५६३	४,२५,०००	१,२०,०००	५,४५,५००
६. सार्वजनिक आरोग्य ...	३,०२,३६८	१४,५०,०००	९,७७,८९५	१,९९,०००	२१,६७,०००	२३,६६,०००
७. आयुर्वेद	—	९,०००	५,८१२	—	३,९००	३,९००
८. शेतकी	१,५३,३३६	११,३३,३००	११,९७,१६९	५,०५,०००	८,४६,०००	१३,५१,०००
९. पशुसंवर्धन	१,५३,१६४	५,५४,८००	५,२३,२७८	१,५५,०००	४,४८,१००	६,०३,१००

१०. वने	—	—	—	—	—	—
११. समाजकल्याण ...	१,७१,३१३	८,६१,६६५	८,९८,४३४	१०,०००	८,५४,०००	८,७४,०००
१२. सहकार	७,०००	१२,०००	४९,६१२	—	४,४००	४,४००
१३. उद्योग	१,१४,४१३	१,९५,८००	१,६०,०४६	—	१,१७,०००	१,१७,०००
१४. सामूहिक विकास ...	१९,९१,४४४	८,५०,५००	८,७०,४६३	१,००,०००	६०,०००	१,६०,०००
१५. संकीर्ण विभाग ...	—	—	—	—	—	—
१६. सार्वजनिक कामे, इमारती, दळणवळण ...	१५,२१,६०७	४०,७२,५००	३९,३१,६६३	१४,८०,०००	३३,६०,०००	४८,४०,०००
१७. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी कामे ...	१७,३९४	६,०८,०००	६,०२,४००	५,०००	५,१७,०००	५,२२,०००
१८. पाटबंधारे	—	१४,५०,०००	९,७७,८९५	—	८,८०,०००	८,८०,०००
१९. निवृत्ति वेतन इत्यादी ...	२१,४७२	७५,०००	३,५०,१०२	४०,०००	—	४०,०००
२०. संकीर्ण	३,९८,१५७	२४,०५,२६१	१५,२७,९४१	२,२५,०००	७,५३,०००	९,७८,०००
एकूण	१,४६,११,३७२	३,८६,१८,२२६	३,७८,८७,४५०	४३,०५,०००	२,९६,०७,८००	३,५४,७७,८००

जिल्हा परिषदा १९६२ च्या ऑगस्टमध्ये अस्तित्वात आल्या. त्यामुळे त्या वर्षी झालेल्या खर्चाचे आकडे विशेष कमी दिसतात. १९६८–६९ चे दुरुस्त अंदाज व प्रत्यक्ष खर्चाचे आकडे प्रशासनिक अहवालातून घेतले आहेत, तर १९७०-७१ चे आकडे हे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला १९७० च्या मार्चमध्ये सादर केलेल्या अंदाजपत्रकावरून घेतले आहेत. खर्चाच्या आकड्यात कर्ज परतफेड, अनामत परत, यासारख्या ज्या प्रत्यक्ष व्यवहारावरील खर्चाच्या रकमा नाहीत त्या तक्त्यातून वगळल्या आहेत.

वरील तक्त्यावरून काही गोष्टी ठळकपणे नजरेत भरतात. पहिली अशी की, शिक्षण व सामान्य प्रशासन या बाबींवरील खर्च अंदाजपत्रकाच्या जवळजवळ साठ टक्क्यापर्यंत आहे. शिक्षणावरील खर्च हा चालू सेवेवरील खर्च आहे; विकासाचा भाग त्यात फारसा नाही. सहकार व उद्योग ही खाती तशी महत्त्वाची आहेत. पण त्यांच्यावरील खर्च फारच कमी आहे. सामूहिक विकासावरील रकमा उतरत्या भांजणीने झपाट्याने कमी झाल्या आहेत. इमारती व दळणवळण यावर भरीव व वाढत्या प्रमाणात खर्च होतो आहे.

'सहकार' वरील खर्च इतका कमी असण्याचे कारण असे की, जिल्ह्यातील सहकारी यंत्रणा स्वतंत्रपणे काम करते आहे. हा योगायोग किंवा अपघात नव्हे. नाईक समितीला याची जाणीव होती व जाणीवपूर्वक सहकारी यंत्रणा जिल्हा परिषदेपेक्षा स्वतंत्र ठेवण्यात आली आणि जिल्हा परिषदेतही सहकाराचे खाते उघडण्यात आले. भारतीय शेतीच्या विकासासाठी सुलभ व्यवस्थित व किफायतशीर कर्जपुरवठ्याची सोय करणे मूलगामी महत्त्वाचे आहे ही गोष्ट योजनाकारांच्या १९५२ च्या सुमारासच लक्षात आली होती. त्याप्रमाणे रूरल क्रेडिट सर्व्हे घेण्यात आला व त्या कमिटीच्या शिफारशीनुसार शेतीला कर्जपुरवठा करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेने उचलली आणि सहकारी यंत्रणेमार्फत ही सेवा बजावण्याचे ठरले. १९६२ पर्यंत या यंत्रणेचा बराच विकास झालेला होता. ती तशी अबाधित ठेवणेच योग्य होय, असे नाईक समितीला वाटले, त्याचबरोबर स्थानिक संस्थांशी त्या यंत्रणेचा संबंध कोठे तरी जोडला पाहिजे असेही वाटले. समितीच्या अहवालात म्हटले आहे,... "सहकारी संस्था ह्या मूलतः आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था आहेत व त्या व्यापारी तत्त्वावर चालवावयाच्या आहेत. स्वयंस्फूर्त व खाजगी प्रयत्नांमुळे ह्या राज्यातील सहकारी सोसायट्यांनी फार मोठी प्रगती केली आहे. म्हणून या मूलभूत दृष्टिकोणापासून विशेष दूर जाणे चुकीचे ठरेल. त्याचबरोबर लोकांच्या प्रातिनिधिक असणाऱ्या स्थानिक संस्था ह्या सहकारी संस्था वाढीला लावण्यात, त्यांचा विस्तार करण्यात, त्यांच्यावर देखरेख ठेवण्यात व मर्यादित स्वरूपात त्याबाबतचे शिक्षण देण्यात महत्त्वाचा भाग घेऊ शकतील असे आम्हास वाटते." (पृ.६९)

नाईक समितीने व्यक्त केलेली शेवटची अपेक्षा व्यवहारात फलद्रूप झालेली नाही, पण प्रश्न असा पडतो की, तशी अपेक्षा तरी का ठेवण्यात आली ? सहकारी यंत्रणेचा

विकास व नियंत्रण याबाबत रिझर्व्ह बँक व राज्य सरकारचे सहकार खाते यांच्यावर भरपूर जबाबदाऱ्या सोपविलेल्या होत्या. त्यांच्याशी समांतर अशी वेगळी यंत्रणा उभारण्याचे कारण नव्हते. जी यंत्रणा पैसा पुरविते तिचेच नियंत्रण चालत असते. सहकारी यंत्रणेवर रिझर्व्ह बँक आणि सहकारी खाते यांचेच नियंत्रण चालणार हे स्पष्ट होते. कार्यकर्त्यांच्या हद्दीपर्यंत बोलायचे तर स्थानिक पातळीवर जी उपक्रमशील व राजकीय दृष्ट्या क्रियाशील मंडळी असतात ती जिल्हा परिषदांच्या निर्मितीच्या आधीपासून सहकारी यंत्रणेत प्रविष्ट झालेली होती. जिल्हा परिषदेकडे सहकार हा विषय सोपविला नसता तरी त्या कार्यकर्त्यांचा सहभाग सहकारी चळवळीत होतच राहिला असता. जिल्हा परिषदेमार्फत त्या कार्यकर्त्यांना सहकारी यंत्रणेवर विशेष प्रभाव येण्याची शक्यता मुळीच नव्हती. व्यवहारात काही सोसायट्यांना व्यवस्थापनासाठी वार्षिक रु. २००।–पर्यंत अनुदान देणे यापलीकडे जिल्हा परिषदेला काहीही करता आले नाही. "सहकारासारखे महत्त्वाचे विकाससंबंधी क्षेत्र जिल्हा परिषदेपासून अलग का ठेवण्यात आले." या टीकेपासून बचावण्यासाठीच केवळ ह्या खात्याचा जिल्हा परिषद यादीत अंतर्भाव करण्यात आलेला दिसतो. सहकारी चळवळीच्या विकासाची दिशा वगैरेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार वरिष्ठ पातळीवरील इतर संस्थांकडे आहेत. नियोजनाच्या यशस्वितेसाठी या प्रकारचे केंद्रीकरण असणे इष्ट आहे की नाही हा स्वतंत्र प्रश्न आहे. जिल्हा परिषदेच्या रूपाने झालेल्या विकेंद्रीकरणाशी त्याचा ताळमेळ बसत नाही, एवढे खरे. जिल्हा यादीत घालून ठेवलेल्या 'सहकारा'सारखा महत्त्वाच्या विषयावर जिल्हा परिषदेला निष्क्रिय राहावे लागत आहे. त्यापेक्षा तो विषयच नसता तरी बरे झाले असते. निदान ही निराशा तरी टळली असती.

उद्योगधंद्यांबाबतही तसेच. देशाच्या औद्योगीकरणाचे स्वरूप कसे असावे, मोठ्या यंत्रांच्या साहाय्याने चालणाऱ्या उद्योगांचे मोजक्या केंद्रात जास्त जास्त केंद्रीकरण करावयाचे की अल्पप्रमाण यंत्रांच्या साहाय्याने ग्रामीण भागात विखुरलेल्या स्वरूपात उद्योगांचे जाळे विकसित करावयाचे याचा निर्णय राष्ट्रीय पातळीवरच घेतला गेला. योजनाकारांनी पहिला पर्याय स्वीकारला आहे, पण काही ऐतिहासिक-राजकीय कारणांस्तव ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचे धोरणही चालू आहे. त्यानुसार वर्षात एखादा लाख रुपये जिल्हा परिषदेकडे खर्चावयाला येतात. दहावीस कारागिरांना प्रशिक्षण देणे व त्याहून निम्म्या लोकांना थोडी थोडी कर्जे वाटणे एवढेच काम जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आले आहे.

सामूहिक विकास किंवा समाज विकास योजना यांची कहाणी तर फारच दारुण आहे. वास्तविक या योजना चांगल्या रीतीने कार्यान्वित व्हाव्यात म्हणून पंचायती राज्याचा प्रपंच करण्यात आला. पण त्या योजनांच्या खंडवार अवस्था ठरलेल्या होत्या आणि ७-८ वर्षांच्या कालावधीत त्या संपणार होत्या. १९७०-७१ च्या अंदाजपत्रकात किती किरकोळ रक्कम या बाबीवर दाखविली आहे हे वरील तक्त्यात

पृष्ठ १८२-८३ दिसतेच आहे. ही योजना ठरविली गेली राष्ट्रीय पातळीवरून, अंमलात आली राज्य सरकारमार्फत, तिच्या उत्तर्धात ती जिल्हा परिषदेकडे चालविण्यास देण्यात आली, आता ती संपणार, मग पुढे काय ? जिल्हा परिषदेचा यात कसलाही दोष नसताना एक बाब संपल्याचे तिला मुकाट्याने मान्य करावे लागणार.

राज्य सरकारच्या वतीने यावर कदाचित असे म्हणता येईल की, जिल्हा परिषदांनी स्वतःचा पैसा उभा करून या योजना चालू ठेवाव्यात, सरकारची त्याला मुळीच आडकाठी असणार नाही. जिल्हा परिषदांना काही कर बसविण्याचे अधिकार दिले आहेत हे खरे. जिल्हा परिषद कायदा कलम १४४, १४५, १५६ व १५७ या अन्वये जमीन महसुलावर उपकर बसविणे, वाढविणे, जमीन महसुलाचा दर वाढविण्याची शिफारस राज्य सरकारला करणे, पाणीपट्टीवर उपकर, व्यवसाय कर, यासारखे करवाढीचे मार्ग उपलब्ध आहेत. जमीन महसूल व त्यावरील उपकर हा कराचा प्रकार किफायतशीरपणा व सामाजिक न्याय या दोन्ही दृष्टींनी योग्य नाही असे अनेकांचे मत आहे. पण तो मुद्दा बाजूला ठेवला तरी ही गोष्ट खरी की, जमीन महसुलावरील उपकर हा पैसे उभारणीचा फार महत्त्वपूर्ण मार्ग नाही. बहुतेक जिल्हा परिषदांनी याचा अवलंब केला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेने महसुलाच्या एक रुपयामागे उपकरही एक रुपया बसविला आहे. त्यातून दर वर्षी सुमारे सोळा लाखांचे उत्पन्न मिळते. पाणीपट्टीवरील उपकरातून सुमारे चार लाख रुपये मिळतात. हे दोन जास्तीत जास्त उत्पन्न देणारे मार्ग होत. बाकीच्या सर्व मार्गांनी मिळून वर्षाकाठी चार-पाच लाखांपेक्षा अधिक उत्पन्न मिळण्याची शक्यता नाही. जिल्हा परिषदेला काही व्यापारी स्वरूपाची उत्पन्ने आहेत. त्यातून दर वर्षी अंदाजे पंधरा लाखापर्यन्तचे उत्पन्न मिळते. सुमारे तीन साडेतीन कोटीच्या अंदाजपत्रकात जिल्हा परिषदेचे सगळे मिळून साधारणपणे चाळीस लाखांचे उत्पन्न आहे, बाकी सर्व राज्य सरकारकडून मिळते. राज्य सरकारकडून येणाऱ्या रकमा कारणपरत्वे येतात, त्यात फेरबदल करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला नाही. राज्य सरकारच्या योजना कुठल्याही प्रदेशात लागू करता याव्यात या हेतूने बनविलेल्या असतात, पण त्यामुळेच विशिष्ट प्रदेशात त्या लागू करताना स्थानिक परिस्थितीमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. काही ठिकाणच्या गरजा भागविण्यासाठी वेगळ्याच प्रकारच्या योजना आखण्याची गरज असते, पण तशा आखायला फारसा वाव जिल्हा परिषदेला राहिलेला नाही.

स्वतःच्या उत्पन्नाचा विनियोग जिल्हा परिषदांनी शिक्षण, काही शेती विकास योजना व काही अंशी दळणवळणावर केलेला दिसतो. शाळांच्या इमारती बांधण्यासाठी राज्य सरकारकडून पैसा मिळत नाही, त्यामुळे ते काम जिल्हा परिषदेला स्वतःच्या पैशातून करावे लागते. रस्त्यांची गरज सगळीकडेच फार आहे. विकासप्रक्रिया गतिशील करण्याचे ते एक सधन आहे, पण दूरान्वयाने सोलापूर जिल्हा परिषदेने आपल्या निधीपैकी जवळ जवळ निम्मी रक्कम रस्त्यांसाठी वापरावयाचे ठरविलेले दिसते. उस्मानाबाद

जिल्हा परिषदेनेही तसेच केले आहे. पाटबंधाऱ्यांच्या योजनांवर मात्र आपला पैसा खर्चावयाचे जिल्हा परिषदेच्या मनात आलेले दिसत नाही. शेती-विकासाच्या योजनांत पीक-स्पर्धा, अवजारे भाड्याने देणे, सुधारलेल्या बियाण्यासाठी अनुदान यांसारख्या कार्यक्रमावर भर दिसतो. एकंदरीने प्रत्यक्ष उत्पादक किंवा उत्पादनक्षमता वाढविण्याच्या कार्यक्रमांवरील जिल्हा परिषदेच्या खर्चाचे प्रमाण फार कमी आहे असे दिसते. याला मात्र कायद्यातील उणिवा व राज्य सरकारची धोरणे यापेक्षा जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाचा दृष्टिकोणच अधिक जबाबदार आहे.

जिल्हा परिषदेचे प्रशासनिक अहवाल पाहिले म्हणजे एकंदर विकासप्रक्रियेत त्यांना किती गौण स्थान आहे हे प्रकर्षाने जाणवते. जिल्ह्यात नव्याने किती जमीन लागवडी-खाली आली, ओलिताचे क्षेत्र किती टक्क्याने वाढले, उत्पादनक्षमता किती प्रमाणात वाढली, नवा रोजगार किती जणांना उपलब्ध झाला, जिल्ह्याचे सरासरी दरडोई उत्पन्न वाढले की कसे, उत्पादनशक्ती (कपॅसिटी व पोटेंशिअल) किती वाढली—यासारख्या मुद्द्यांबाबत त्या अहवालातून कसलाच प्रकाश मिळत नाही. जिल्ह्याची विकासयोजना जिल्हा परिषदेने बनवायची नाही हे शासनकर्त्यांनी इतके पक्के ठरवून टाकले आहे की, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी ठरविलेल्या उपाययोजनेची घोषणा करताना १९६९ च्या डिसेंबरात मुख्य मंत्री म्हणाले की, "आम्ही नियोजनाचा घटक जिल्हा हाच योग्य मानला आहे. जिल्ह्यांची माहिती आम्ही मागवीत आहोत. ती आल्यावर प्रत्येक जिल्ह्याची पंधरा वर्षीय विकास योजना बनविली जाईल." विकासाचे वाहन म्हणून निर्मिलेल्या जिल्हा परिषदेला विकास प्रक्रियेपासून दूर, अडगळीत फेकून दिले आहे याचा आणखी पुरावा कुठला हवा ?

सामाजिक अभिसरण व समतेच्या दिशेने जिल्हा परिषदा दमदार पावले टाकू शकतील अशीही अपेक्षा होती. व्यवहारात तीही फोल ठरलेली दिसते. समाजकल्याण खात्यावर जिल्हा परिषद स्वतःच्या रकमेतून वर्षाकाठी दहा हजार रुपयेदेखील खर्चावयाला तयार नाही. मागास जातींसाठी पिण्याच्या पाण्याच्या वेगळ्या विहिरी बांधण्याची योजना सरकारने बंद केली. आता सार्वजनिक आडांवरही त्यांना पाणी मिळत नाही व वेगळ्या विहिरी मिळणेही बंद झाले अशी अवस्था आहे. एकंदर यंत्रणेतही दलितांना फारच गौण स्थान मिळाले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे संबंध महाराष्ट्रात मिळून सुमारे आठशे पदाधिकारी आहेत. पण त्यांपैकी ८-१० जागासुद्धा दलित जातीच्या कार्यकर्त्यांच्या वाट्याला आलेल्या नाहीत. १९६७ साली कॅांग्रेस–रिपब्लिकन यांची राजकीय युती होऊनसुद्धा या परिस्थितीत फरक पडला नाही. कार्यकर्ते आपखुषीने सत्तेतील हिस्सा दलित जातीयांना द्यायला तयार नाहीत, हे पाहून शेवटी राज्यकर्त्यांना वेगळीच तोड काढावी लागली. १९७० च्या एप्रिलमध्ये जिल्हा परिषद कायद्याला केलेल्या दुरुस्तीनुसार आता प्रत्येक जिल्हा परिषदेत समाज कल्याणासाठी स्वतंत्र विषय समिती असेल व तिचा सभापती दलित जातीयच असला पाहिजे असे

कायद्याने बंधन घातले आहे. कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी यथावकाश होईलच; पण त्यामुळे सामाजिक अभिसरण वाढेल अशी अपेक्षा ठेवायला जागा नाही.

× × ×

जिल्हा परिषदांच्या निर्मितीमागील भूमिका, कायदा व गेल्या सात-आठ वर्षांतील व्यवहार यांची येथपर्यंत छाननी केली. सुमारे ऐंशी वर्षांच्या कालावधीत ऐतिहासिक, राजकीय व प्रशासनिक कारणांमुळे निर्माण झालेल्या जिल्हा पातळीवरील अनेकविध स्थानिक संस्थांचे एकत्रीकरण करणे व त्यांच्या कामकाजात एकसूत्रता आणणे एवढे यश १९६१ सालच्या कायद्याला मिळाले आहे. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण प्रभावशाली स्वरूपात होत आहे असे दिसावे म्हणून जिल्हा परिषदेच्या निवडणुकांविषयीची तरतूद लोकसभा–विधानसभेसारखी करण्यात आली आहे. पण कनिष्ठ पातळीवर खरी सत्ता दिल्यास अनर्थ होईल अशा भीतीतून कामांची व अधिकारांची विभागणी झाली आहे. नियोजनाचा जो पवित्रा स्वीकारला आहे त्यामुळेही विकास-कार्यक्रमांच्या आखणी व अंमलबजावणीचे अर्थपूर्ण विकेंद्रीकरण अशक्य झाल्यासारखे दिसते. लोकशाही राज्य-पद्धती यशस्वी होणे ज्यावर अवलंबून असते त्या निःस्वार्थ व चैतन्यशाली नेतृत्वाचा विकास होऊ शकलेला नाही. प्रचंड सांगाडा उभारण्यात आला; पण त्यात प्राण ओतण्याचे राहून गेले, असे हे चित्र आहे. पर्याय दोनच आहेत : सर्व प्रकारची जोखीम पत्करून प्राण ओतायचा, किंवा निरर्थक बनलेला सांगाडा मोडून टाकायचा. समाजातील कर्त्या मंडळींनी व विचारवंतांनी विचार करून निर्णय घेतला पाहिजे.

महाराष्ट्राचे सहकारी कर्तृत्व

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ

महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांतील सर्वांगीण प्रगतीमुळे आज त्याला भारताच्या संघराज्यात अग्रेसरत्वाचा मान मिळाला आहे. राजकारण, अर्थकारण, शिक्षण, औद्योगीकरण व शेती यासारखे कोणतेही क्षेत्र घ्या. त्यामध्ये महाराष्ट्रातील व्यक्ती व संस्थांनी भरीव कामगिरी बजावल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. म्हणूनच कवीने

" बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा । "

अशा शब्दांत केलेले महाराष्ट्राचे गुणगान ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयाची छाती अभिमानाने पुढे येते.

इतर सर्व क्षेत्रांप्रमाणेच सहकारी क्षेत्रामध्येही महाराष्ट्राने मिळविलेले यश असाधारण आहे यात संशय नाही. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने देशातील सहकारी चळवळीला मार्गदर्शन केले आहे. सहकारी पतपुरवठा व कृषि-उद्योग यांच्याद्वारे जनतेच्या अडचणींचे निवारण करून शिवाय देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यात मोठा हातभार लावला आहे.

तसे पाहिले तर देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीला महत्त्वाचे स्थान सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिळू लागले. स्वराज्यप्राप्तीनंतर देशाने लोकशाहीप्रधान राज्यघटना स्वीकारली. समाजवादाचे ध्येय स्वीकारल्यानंतर देशाचा आर्थिक विकास जलद घडवून आणण्याच्या दृष्टीने सामान्य माणसाचे सर्वतोपरी साहाय्य मिळविण्यासाठी सहकारासारखे अमोघ साधन नव्हते. कारण खुले सभासदत्व, लोकशाही नियंत्रण, भांडवलावर मर्यादित व्याज, राजकीय व धार्मिक प्रश्नात अलिप्तता इत्यादी सहकाराची मूलतत्त्वे लोकशाही व समाजवाद या दोहोंशी सुसंगत आहेत. मतदानाचा अधिकार हा भाग भांडवलाच्या प्रमाणात न ठेवता सभासदाला दरडोई एक मत व संचालक

मंडळाची एक वर्षापुरती नियुक्ती इत्यादी सहकारातील प्रथा या खंडप्राय देशातील लोकशाहीच्या महान प्रयोगाला पूरक व पोषक अशा आहेत. या अनुकूल परिस्थितीमुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नात सहकाराला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. या प्रयत्नात सहकारी चळवळीने मिळविलेल्या यशापयशाचा ताळेबंद मांडणे उद्बोधक होईल.

ताळेबंदाला एक जिंदगीची व दुसरी देण्याची अशा बाजू असतात. या दोन्ही बाजूंची वजावट होऊन जो मुनाफा उरतो त्यावरून आपण काय कमावले अगर गमावले हे समजू शकते. प्रथम एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. सहकारी चळवळीचा ताळेबंद हा पारंपरिक पद्धतीने रुपये-पैशात मांडता येणार नाही. सहकारी चळवळ ही सामान्य माणसांनी त्यांच्या सामुदायिक हितासाठी सामुदायिक प्रयत्नाने निर्माण केलेली लोकशाही संघटना आहे. त्यामुळे सहकारी चळवळीचा हिशोब मांडताना त्यातला माणूस विसरता येणार नाही. सामान्य माणसांनी त्यांचे समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा हा आढावा आहे. हा आढावा घेताना माणसाचे अपूर्णत्व, त्यांच्या मूलभूत प्रवृत्ती व प्रेरणा या विसरता येणार नाहीत. ज्या प्रमाणात सहकारी कार्यकर्ते या उपजत प्रवृत्तींवर विजय मिळविण्यात यशस्वी झाले तितकी जमेची बाजू जास्त. याउलट स्वार्थासारख्या प्रेरणांच्या आहारी जाऊन, सामूहिक हिताऐवजी स्वहिताला प्राधान्य गेले दिले तर ते चळवळीचे अपयश मानावे लागेल. या सामान्य माणसांना संघटित करून त्यांच्या प्रत्येकाचा अत्यल्प सुप्त शक्तीतून केवढी मोठी सामुदायिक शक्ती निर्माण करता येते याचा आविष्कार करण्यात सहकारी नेतृत्व यशस्वी झाले आहे हे आज कोणालाही नाकबूल करता येणार नाही. ही सुप्त शक्ती अणूसारखी अत्यंत सूक्ष्म व तितकीच प्रभावी आहे. अणु-विस्फोटातून साखळी पद्धतीने शेवटी जगाला हादरा देणारी प्रचंड शक्ती निर्माण होते. हीच साखळी प्रक्रिया सहकारी क्षेत्रातही होत असते. ही एक फार मोठी जमेची बाजू आहे. सामुदायिक हितासाठी स्वहिताला आपणहून मुरड घालण्याची प्रवृत्ती निर्माण करणे हा सहकारी व्यवस्थेमध्ये मिळणारा डिव्हिडंड आहे. तात्पर्य, रुपये-पैसे, नफा-तोटा, डिव्हिडंड इ. रूढ फुटपट्ट्यांनी सहकारी चळवळीच्या ताळेबंदाचे विश्लेषण करता येणार नाही. त्यासाठी सहकारी चळवळीतील माणसे, त्यांचे नेतृत्व, निरनिराळ्या परिस्थितीत त्यांनी स्वीकारलेली धोरणे व बंधने आणि या सर्वांतून सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी केलेले प्रयत्न आणि त्यात मिळविलेले यश इत्यादी गोष्टींचा आढावा घ्यावा लागेल.

पूर्वेतिहास

भारतामध्ये सहकारी चळवळीचे बीजारोपण मुख्यतः सरकारी प्रेरणेनेच झाले. १९०४ साली सहकारी चळवळ-विषयक काही कायदे झाले ते निकोलसन यांच्या अहवालावरूनच झाले. सहकारी चळवळीची सरकारच्या मर्जीनुरूप वाढण्याची क्रिया एक-दोन अपवाद वगळल्यास साधारणपणे या देशातील सर्व प्रांतांत स्वराज्य मिळेपर्यंत

चालू होती असे दिसते. स्थूलमानाने सहकारी चळवळीचे विकासाच्या दृष्टीने तीन महत्त्वाचे टप्पे पडतात. त्यातील पहिला टप्पा विसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू होतो आणि १९३० साली साधारणपणे तो संपतो. या कालखंडात सहकारी चळवळीची जी काही प्रगती झाली ती प्रामुख्याने 'शेती' या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. देशातील ७५ टक्के लोक शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीकडे प्रथम लक्ष जाणे साहजिकच होते. ग्रामीण भागात मुख्यतः शेतीविषयक व्यवहाराला माफक दरात कर्जे उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांकडेच लक्ष केन्द्रीभूत झाले. सहकारी पतपेढ्या काढणे आणि त्याच्यासाठी सरकारी व अन्य मार्गाने उपलब्ध करून घेतलेल्या भांडवलातून शेतीविषयक कर्जे उपलब्ध करून देणे हेच कार्य सर्वसाधारणपणे देशभर होत होते. हे कार्य मुख्यतः ग्रामीण स्तरावर चालत असे.

दुसऱ्या कालखंडाचा प्रारंभ १९३० नंतरच्या जागतिक मंदीच्या काळापासून झाला आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांच्या सुरुवातीपर्यंत तो टिकला असे मानणे वावगे होणार नाही. युद्धजन्य परिस्थितीतून आलेल्या मंदीच्या लाटेला तोंड देण्यासाठी ज्या राज्यपातळीवर उपाययोजना करण्यात आल्या, त्यांत एकवाक्यता नव्हती. कारण त्या वेळी अस्तित्वात असणाऱ्या प्रांताच्या ध्येयधोरणात सुसूत्रता अगर एकवाक्यता नव्हती. अशा प्रसंगी शेती मालाचे भाव एका विशिष्ट पातळीवर रोखणे, तसेच कर्जाबाबत सूट देणे वगैरे जे उपाय सर्वसाधारणपणे योजण्यात येतात ते योजण्याचा काही संघटित प्रयत्न झाल्याचे दिसत नाही.

तिसरा कालखंड १९४५ पासून सुरू होतो असे म्हणता येईल. तोपर्यंत 'सहकार' हे अविकसित देशातील आर्थिक विकास व प्रगतीचे महत्त्वाचे साधन आहे, आणि त्याकरता काही महत्त्वाची आर्थिक ध्येयधोरणे सरकारला आखावी लागतात याची फारशी जाणीवच असल्याचे दिसत नाही. या जाणिवेचा पहिला निनाद १९४५ साली उमटला. सहकाराबाबत महत्त्वाचा विचार करण्यासाठी सरकारने दोन समित्या नेमल्या. त्यांतील एक महत्त्वाची समिती म्हणून 'गाडगीळ समिती'चा उल्लेख करता येईल. या समितीने शेती कर्जाचे ग्रामीण कर्ज-निवारणाबाबत धोरण हे अकरणात्मक नसावे व त्याबाबत काही विधायक कार्य केले जावे अशी भूमिका प्रथमच या देशात मांडली. याबाबत डॉ. धनंजयराव गाडगीळ म्हणतात, "सावकाराचे महत्त्व कमी करण्याचा एकमेव उपाय म्हणजे सर्व पतवान शेतकऱ्यांना पर्यायी कर्ज पुरवणे हा होय. सावकाराचे ग्रामीण लोकांवरील प्रभुत्व त्यांच्याकडे ग्रामीण पतपुरवठ्याचा एकाधिकार आहे यावर अवलंबून आहे. हा एकाधिकार जर नष्ट करावयाचा असेल तर पर्यायी यंत्रणेकडे लोकांना वळता येईल असा विश्वास त्यांच्यात निर्माण करायला पाहिजे."

अलीकडील घडामोडी

१९४७ साली वसाहतवादी राज्य गेले व स्वराज्य आले. प्रांताप्रांतातून लोका-

भिमुख अशी मंत्रिमंडळे स्थापन झाली. त्यानंतरच्या काळात सहकारी चळवळीबाबत सर्वत्र विचार होऊ लागला आणि देशाच्या आर्थिक नियोजनातील 'सहकार' हे महत्त्वाचे अंग मानले जाऊ लागले व त्या दृष्टीने काही महत्त्वाची पावलेही पडू लागली. पंचवार्षिक योजनेतील विकास कार्यक्रम यशस्वी करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून सहकारी यंत्रणेकडे पाहिले जाऊ लागले. सहकारी भागीदाराचे तत्त्व मान्य करण्यात आले. सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करण्यासाठी रिझर्व बँकेत १९५१ साली स्वतंत्र 'शेती कर्ज विभाग' सुरू करण्यात आला.

पुढे १९५२ मध्ये रिझर्व बँकेने नेमलेल्या ग्राम पतपुरवठा समितीने सहकारी चळवळीच्या सर्वांगीण विकासासाठी म्हणून सरकारी साहाय्य व भागीदारी यांचा जोरदार पुरस्कार केला. शेतीकर्जाबाबत महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या पीक-कर्ज-पद्धतीचा सर्व देशभर प्रसार व्हावा अशी निःसंदिग्ध शिफारस केली. कर्जाची खरेदी-विक्री व्यवहार, माल साठवणुकीची व्यवस्था आणि प्रक्रिया-व्यवसाय यांच्याशी सांगड घालण्याची आवश्यकता प्रतिपादिली.

सरकारने या समितीच्या सर्व शिफारशी स्वीकारल्या. विशेषतः द्वितीय पंचवार्षिक योजनेपासून प्रक्रिया व इतर औद्योगिक सहकारी संस्थांच्या स्थापनेला खास प्रोत्साहन दिले. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर मालाच्या किंमतीतील अवास्तव वाढ पाहून ग्राहक सहकारी संस्थांच्या निर्मितीला खास चालना दिली. त्यामुळे गेल्या काही वर्षांत सहकारी चळवळीची अतिशय वेगाने व विविधांगी प्रगती झाली. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांबाबतची पुढील पानावरील आकडेवारी उद्‌बोधक होईल.

ह्या आकडेवारीवरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने गेल्या ९-१० वर्षांत पतपुरवठा, खरेदी-विक्री व्यवस्था व प्रक्रिया-संस्था या क्षेत्रात केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीची कल्पना येते. पीक कर्ज योजनेनुसार पतपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या बऱ्याच अंशी गरजा भागविल्या जात असल्या तरी जिराईत भागातील छोट्या शेत-कऱ्यांना अजूनही त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरिता बाहेरून कर्ज उभारावे लागते. कारण त्यांना शेतीतून होणारे उत्पन्न हेच अपुरे पडत असते. या दृष्टीने नाशिक व कुलाबा जिल्ह्यांत त्यांच्या शेतीविषयक व कौटुंबिक गरजा विचारात घेऊन त्यांना कोंबड्या पाळणे, दुग्धव्यवसाय अशा पूरक धंद्यांची जोड देऊन त्यांचे उत्पन्न वाढ-विण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. या प्रयोगांना काही प्रमाणात यशही आले आहे व शासनाची योग्य ती मदत मिळाल्यास त्यांचे प्रश्न सुटू शकतील.

महाराष्ट्रातील एकाधिकार धान्य खरेदी मोहीम १९६४ सालापासून सुरू झाली. या मोहिमेच्या यशामध्ये सहकारी चळवळीच्या एकजिनसीपणाचे (Integrated) प्रतीक दिसून आले. कारण सहकारी बँका, सहकारी खरेदी-विक्री संस्था भातगिरण्या या तिन्ही घटकांनी आपल्या कार्यात यत्किंचितही कसूर न करता शिस्तबद्ध वर्तणूक

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती

(रुपये लाखात)

नाव	सभासद (हजार)	स्वभांडवल रुपये	ठेवी रुपये	खेळते भांडवल रुपये	व्यवहार कर्जवाटप रुपये
१. राज्य सहकारी बँक					
१९६१		४२५	२१५३	५१८६	३७४२
१९६९		१४३७	७४५७	१२९१४	१०५७४
२. जिल्हा सहकारी बँका					
१९६१	५७	८२०	२६४७	५९३२	४३४७
१९६९	५७	२८२७	१०४०५	१८७७१	१३७४१
३. प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था					
१९६१	१८२७	१५११	—	५२९८	४२९६
१९६९	३०५४	५०२८	—	१६७३८	१२७५८
४. राज्य मार्केटिंग सोसायटी					एकूण उलाढाल रुपये
१९६१	७	१४	—	४८	१२३३
१९६९	७	१५३	—	१६०९	४८९६
५. जिल्हा व प्राथमिक मार्केटिंग संस्था					एकूण उलाढाल रुपये
१९६१	१३९४	२६८	—	५४०	३६६६
१९६९	२४५०	११०९	—	२२४३	१५२३९
६. सहकारी साखर कारखाने					साखर उत्पादन रुपये
१९६१	३७०	११६०	—	३२६९	२७९२
१९६९	९४१	३४१९	—	१०३९७	८०४६*
७. सहकारी सूत गिरण्या					चात्यांची संख्या
१९६१	—	७	—	१२	४२०००
१९६९	—	९७६	—	१९७९	३०१५०००
८. सहकारी तेल गिरण्या					तेल गाळप (हजार टन)
१९६६	४९५	६०	—	१००	८
१९६९	६६१	१०७	—	२५९	१८
९. सहकारी भात गिरण्या					भात भरडाई (हजार टन)
१९६६	२७५	४९	—	७८	३२
१९६९	३७३	४७	—	१२३	१५२

* १९६८ च्या उत्पादनाची किंमत

करून या मोहिमेच्या यशामध्ये मोठा हातभार लावला आहे. यामुळे अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यात महाराष्ट्र राज्याने आघाडी मारली.

महाराष्ट्रात कृषिउद्योगाची मुहूर्तमेढ १९४९-५० साली अहमदनगर जिल्ह्यात स्थापन झालेल्या प्रवरा साखर कारखान्याने केली. शेतकऱ्याला त्याच्या मालाची रास्त किंमत मिळण्याकरिता खरेदी-विक्री संस्था स्थापन झाल्यावर त्यापुढची पायरी म्हणजे शेतमालावर प्रक्रिया घडवून आणणे व या शेतमालाची किंमत देताना कर्जाची वसुली करून त्याची विक्रीशी सांगड घालणे (Linking of Credit with Marketing) हे होय. सहकारी साखर कारखान्यामुळे हे शक्य झाले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने धाडसाने केलेल्या पतपुरवठ्यामुळे सहकारी साखर कारखाने भक्कम पायावर उभे झाले. महाराष्ट्रात आज २६ कारखाने उत्पादन काढीत असून, नजिकच्या भविष्यकाळात १७ नवीन कारखाने निघत आहेत. या कारखान्यांनी केवळ शेतकऱ्यांचा फायदा होतो असे नसून जवळपासच्या परिसरातील लोकांना नोकरी-व्यवसाय मिळतो. रस्ते, शाळा, कॉलेजे, दवाखाने निघून आजूबाजूच्या भागाचा सामाजिक व आर्थिक विकास घडून येण्यास मदत होते. तेथे पूरक जोडधंदे निघू शकतात. साखर कारखान्यांनी राज्यातील कृषि-उद्योगाचा पाया घातल्यानंतर सहकारी तेल गिरण्या, भात गिरण्या, जिनिंग प्रेसिंग संस्था व अलीकडे सूत गिरण्या निघून विकेंद्रित ग्रामीण औद्योगीकरणाचा हेतू साध्य होऊ लागण्याची लक्षणे दिसू लागली आहेत.

औद्योगिक सहकारी संस्था स्थापन झाल्यावर त्यांना तांत्रिक ज्ञान देण्यासाठी शिखर बँकेने स्थापन केलेल्या सहकारी उद्योग मंडळाने गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत बहुमोल कार्य केले आहे. लातूर येथील वनस्पती तुपाचा कारखाना, कोल्हापूर येथील इंजिने तयार करण्याचा कारखाना, कुलाब्यातील नियोजित खत कारखाना असे प्रकल्प महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात निर्माण होत आहेत.

अशा प्रक्रिया संस्थांचा भांडवली खर्च हा मोठ्या प्रमाणात असतो. दीर्घ मुदतीचे कर्ज देणाऱ्या संस्थांकडून गरजेच्या वेळी पतपुरवठा होतोच असे नाही. कृषि-उद्योगाचा फायदा मिळाल्याने ग्रामीण जनतेच्या हातात पैसा उपलब्ध झाला आहे. त्याचा सुयोग्य वापर व्हावा व सहकारी क्षेत्राने स्वावलंबनाच्या दिशेने पावले टाकावीत या हेतूने ऋणपत्राद्वारे (Debentures) दीर्घ मुदतीकरिता पैसा उपलब्ध व्हावा ही कल्पनाही साकार होऊ घातली आहे.

सहकारी चळवळीकडून अपेक्षा

सहकारी चळवळीने राज्यातील सामान्य जनतेच्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. कृषि-उद्योगांची वाढ केली आहे. परंतु हे करीत असताना प्रामुख्याने उत्पादकांचाच विचार केला जातो व उत्पादित वस्तूंचा जो अंतिम ग्राहक ‘ उपभोक्ता ’ याचा विचार केला जात नाही. पाश्चात्त्य देशांतील ग्राहक चळवळीने

डेअरी, बेकरी, फळावर प्रक्रिया करणे, रेडिमेड कपडे, मसाले करणे इत्यादी उद्योग आपल्या हाती घेतले आहेत. राज्यातील सहकारी चळवळीने जनतेला या वस्तूंचा रास्त पुरवठा होण्याच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत.

ग्रामीण भागातील बलुत्यांची पारंपरिक कामे करणाऱ्या व्यावसायिकांना बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात उदरनिर्वाह करणे कठीण होऊन बसले आहे. त्याच-प्रमाणे शेतमजूर, वर्गीकृत मागासलेल्या जमाती व अनुसूचित वन्य जमाती, नागर भागातील फेरीवाले, कारखान्यात काम करणारे मजूर वगैरे समाजातील बराच वर्ग अजूनही उपेक्षित राहिला आहे. अशा या 'असमर्थ घटका'कडे सहकारी चळवळीने ज्याप्रमाणे शेतकऱ्याकडे आपुलकीने पाहिले त्याप्रमाणे लक्ष देऊन त्यांच्या गरजा भागविण्यासाठी काही विशेष प्रयत्न करणे जरुरीचे आहे.

शहरी विभागातील नागरी बँका अशा असमर्थ घटकाबाबतची महत्त्वाची जबाब-दारी पार पाडू शकतील. परंतु त्यापूर्वी या नागरी बँकांच्या कार्यातील अडचणी दूर झाल्या पाहिजेत. रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या डमरी कमिटीने अलीकडे पाहणी करून विकेंद्रीकरणासाठी आवश्यक असलेल्या लघु-उद्योगांना पतपुरवठा करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवली आहे. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या पोटनियमात व कार्यपद्धतीत सुधारणा करून छोट्या व्यावसायिकांना व लघुउद्योग स्थापन करणाऱ्यांना पतपुरवठा केला पाहिजे.

समारोप

सहकारी चळवळीच्या महाराष्ट्रातील अलीकडील काळातील प्रगतीचा धावता आढावा घेण्याचा येथे प्रयत्न करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या इतर क्षेत्रातील प्रगतीप्रमाणे सहकारी क्षेत्राने देखील स्पृहणीय कामगिरी बजावली आहे हे निःसंशय आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे या चळवळीला लाभलेली निःस्वार्थी व तळमळीच्या कार्यकर्त्यांची अखंड परंपरा ही होय. तिची सुरुवात शिखर बँकेचे पहिले अध्यक्ष सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्यापासून होते. लल्लुभाई सामळदास व गोपाळ कृष्ण गोखले हे शिखर बँकेच्या संचालक मंडळात होते. श्री. जी. के. देवधर यांनी ग्रामीण सहकारी पतपेढ्या स्थापन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील अधिकारी व थोर व्यक्तींनी सहकारी चळवळीत सक्रिय भाग घेतल्याचे दिसून येते. साहित्य-सम्राट न. चिं. केळकर पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. अर्थशास्त्राचे नामवंत प्रोफेसर वा. गो. काळे व रावबहादूर बी. व्ही. जाधव यांनी देखील या चळवळीत भाग घेतला. नंतरच्या काळात श्री. वैकुंठभाई मेहता यांनी या चळवळीची धुरा वाहिली. नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ, कै. प्रा. द. गो. कर्वे, श्री. वामनराव वर्दे यांच्या चतुरस्र नेतृत्वाखाली या चळवळीने विविध क्षेत्रात पदार्पण करून नवी क्षितिजे धुंडाळली.

स्वातंत्र्योत्तर कालामध्ये व विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शासनाने या चळवळीचे महत्त्व जाणून व जनतेला विश्वासात घेऊन उदारमतवादी धोरणाचा अवलंब केला. तसेच राज्यातील सहकारी कार्यकर्त्यांचे व सहकारी खात्याच्या निकटच्या साहचर्याने त्यांच्या धोरणात सुसंगती येऊन ते अधिकाधिक विधायक स्वरूपाचे होत गेले.

प्रक्रिया संस्था, खरेदी-विक्री व्यवस्था, एकाधिकार धान्य खरेदी इत्यादी सहकारी क्षेत्राने स्वीकारलेल्या कामगिऱ्यांमुळे या सहकारी संस्थांमधील सहकार्य अधिक प्रमाणात वाढले हेही नमूद करावयास पाहिजे. कारण या योजनेमुळे त्यांना परस्पर अवलंबित्वाची अधिक जाणीव झाली व ही जाणीव सहकारी क्षेत्राचा एकसंधपणा वाढविण्यास हितकारक ठरली.

कै. भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली भूतारण बँकांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली. सांगली जिल्ह्यात श्री. वसंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी साखर-कारखाना, तेल गिरण्या वगैरे औद्योगिक प्रकल्प निघाले. मराठवाडा विभागात पद्मश्री शामराव कदम, श्री. केशवरावजी सोनवणे, कै. विनायकराव पाटील, कै. रामचंद्रजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकारी चळवळ खंबीर पाय रोवत आहे, तर विदर्भात कै. भाऊसाहेब बसु, श्री. भाऊसाहेब पागे, श्री. भोकरे गुरुजी, डॉ. ना. अ. देशमुख, श्री. एस. जी. जानी आदी कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाने ती जोमाने पुढे पाऊल टाकत आहे.

जिल्हा बँका, साखर कारखाने, सूत गिरण्या, तेल गिरण्या, भात गिरण्या यांच्यातून नवीन तरुण व उत्साही स्थानिक सहकारी नेतृत्व निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील आजवरचा इतिहास विचारात घेता या नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली उत्तरोत्तर या चळवळीला उज्ज्वल भविष्यकाळ येईल असे समजण्यास प्रत्यवाय नाही.

औद्योगिक महाराष्ट्राची वाटचाल

भा. र. साबडे

गेल्या पंचवीस वर्षांचा महाराष्ट्राचा आद्योगिक विकास जर पाहिला तर त्याची तीन कालखंडांत विभागणी करता येते. पहिला कालखंड दुसऱ्या महायुद्धापासून ते १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत. दुसरा कालखंड स्वातंत्र्यानंतर १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येईपर्यंत नि तिसरा कालखंड महाराष्ट्र राज्यस्थापनेनंतरचा.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी महाराष्ट्रात बरेचसे कारखाने चालू होते. मुंबई, सोलापूर, खानदेश, नागपूर, औरंगाबाद, सांगली, मिरज येथे कापडाच्या गिरण्या होत्या. मुंबई नि सोलापूर येथे या धंद्याचे केंद्रीकरण झाले होते. याशिवाय यंत्रमागही बऱ्याच मोठ्या संख्येने इचलकरंजी, भिवंडी, सांगली, मालेगाव, मुंबई या शहरांत होते. याखेरीज होजिअरी आणि गिरण्यांना लागणाऱ्या साइझिंग आणि इतर मालाच्या निर्मितीचेही बरेच कारखाने अस्तित्वात होते. तसेच गिरण्यांना लागणारे कातडी पट्टे, रोलर स्किन्स, वॉशर्स, पिकिंग बँडस, पिकर्स वगैरे साहित्य तयार करणारे कारखानेही महाराष्ट्रात चालू करण्यात आले होते. कापडधंद्याच्या खालोखाल महत्त्वाचा महाराष्ट्रातील उद्योग म्हणजे साखर उद्योग. दुसऱ्या महायुद्धापूर्वी हा साखरेचा धंदा महाराष्ट्रात चांगलाच वाढीला लागला होता. बेलापूर, टिळकनगर, फलटण, वालचंदनगर, रावळगाव, बेलवंडी, बोरगाव येथे साखर कारखाने चालू झाले होते नि आपटे, डहाणूकर, आगाशे, शिरगावकर, शेठ वालचंद यांसारख्या कर्तबगार महाराष्ट्रीय उद्योगपतींनी यात पदार्पण केले होते. याखेरीज गुळाचे अनेक कारखाने होते आणि सामुदायिक भांडवलाची कंपनी काढून मोठ्या प्रमाणावर गूळ करण्याचा प्रयत्नही चितळे बंधूंनी चालविला होता. शेतीकरता लागणारे नांगर व इतर यंत्रे, उपकरणी यांचे किर्लोस्कर आणि कूपर यांचे कारखाने चालू होते. याखेरीज कोल्हापूर, सांगली, कराड, पाचोरा इत्यादी ठिकाणी शेतीशी संबंधित अशी यंत्रे तयार करणारे अनेक लहानमोठ्या कारखानदारांनी आपले

कारखाने चालू केले होते. दक्षिण महाराष्ट्रात पैसा फंड ग्लास वर्क्स आणि ओगले बंधू यांचे काच-कारखाने, गोंदिया येथे ओनामा ग्लास वर्क्स आणि मुंबई शहरातील अनेक काच-कारखाने महाराष्ट्रात नावारूपास आले होते. धातूच्या पत्र्यापासून दाबाने हरतऱ्हेच्या वस्तू तयार करण्याचे कारखानेही मुंबई नि पश्चिम महाराष्ट्र येथे होते. याखेरीज नाशिक, सांगली नि पुणे या ठिकाणी नि इतरही काही ठिकाणी धातूंच्या भांड्यांचे कारखाने भरभराटीत चालू होते. याशिवाय अनेक औषधी कारखाने, शास्त्रीय व शस्त्रक्रियेची उपकरणी तयार करण्याचे कारखाने, रंग, बेलतेल, छपाईची शाई या वस्तू तयार करणारे कारखाने, कागदाचे कारखाने, रबरी वस्तू, बिस्किटे नि इतर खाद्यपदार्थ तयार करणारे कारखाने, सिगरेट, विड्या, तपकीर हा उद्योगधंदा, विजेची नि स्प्रिंगची घड्याळे, मशीन टूल्स, विजेची उपकरणी, सायकली, रासायनिक कारखाने, साबण, काड्याच्या पेट्या तयार करण्याचे कारखाने असे अनेक कारखाने महाराष्ट्रात होते. यांपैकी बरेचसे कारखाने मुंबईतच होते. कोल्हापूर, इचलकरंजी, औंध, सांगली, फलटण या दक्षिणी संस्थानांच्या राज्यकर्त्यांनी त्या वेळी नवे कारखाने उभे करण्यासाठी अनेक सवलती दिल्यामुळे व त्यांचे धोरण कारखानदारांना प्रोत्साहनाचे असल्यामुळे या संस्थानांतून अनेक लहानमोठे कारखाने निघाले नि ते आज नावारूपास आलेले दिसत आहेत.

दुसऱ्या महायुद्धामुळे या कारखान्यांना चांगलेच भरभराटीचे दिवस आले. सरकारकडून अनेक आवश्यक वस्तूंना भरमसाट मागणी आली, परकीय देशातून होणारी आयात थांबल्याने देशी मालाला मागणी वाढली आणि लोकांच्या हातात एकदम भरपूर पैसा खेळू लागल्यामुळे त्यांच्याकडूनही मागणी वाढली. किंमतीही भरमसाट वाढल्याने कारखानदारांना अमाप फायदा होऊ लागला. पण याचा फायदा सगळयाच कारखान्यांना मिळू शकला नाही. भारताची उत्पादनशक्ती मर्यादित होती आणि अनेक वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत यंत्रसामग्रीसाठी किंवा कच्च्या मालासाठी परकीयांवर अवलंबून राहावे लागे. त्यामुळे साहजिकच उत्पादनवाढीवर मर्यादा पडल्या. पण कापडधंद्यासारख्या काही उद्योगांना युद्धाचा चांगला फायदा मिळाला. जवळजवळ १०० कोटी वार इतके कापड दरसाल सरकारला पुरविण्यात आले आणि युद्धकालात कापडाची निर्यात चौपटीने वाढून ती ८२ कोटी वार इतकी झाली. कापडाचे उत्पादन सुमारे तीस टक्क्यांनी वाढले. याखेरीज लोखंड नि पोलाद उद्योग आणि इंजिनिअरिंगच्या वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांची युद्धकालात चांगलीच वाढ झाली. मशीन टूल्स, पंप, डिझेल इंजिने, शेतीची अवजारे, विजेची उपकरणे नि त्याला लागणाऱ्या वस्तू यांच्या उत्पादनात बरीच वाढ झाली किंवा यातील अनेकांचे उत्पादन देशात प्रथमच करावयास सुरुवात झाली.

युद्धकालानंतर ज्या उद्योगधंद्यांची वाढ युद्धकालात झाली होती त्यांचे काय करावयाचे हा प्रश्न उभा राहिला. मागणी पूर्वीच्याच गतीने वाढणे शक्य नव्हते.

परदेशातून आता आयातही होणे अपरिहार्य होते. तेव्हा सरकारने या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आणि देशी उद्योगधंद्यांना संरक्षण देण्यासाठी एक इंटेरिम टॅरिफ बोर्ड नेमले. या बोर्डाने सुमारे ९० उद्योगधंद्यांची चौकशी करून कोणत्या उद्योगांना संरक्षण द्यावे नि किती द्यावे याच्या शिफारशी केल्या. नंतर १९४९–५० साली स्वातंत्र्यानंतर फिस्कल कमिशन नेमून त्याच्याकडे हा प्रश्न सोपविण्यात आला. त्यांनी देशहिताचा, नि देशात औद्योगिक वाढ व्हावी हा विचार लक्षात घेऊन उद्योगांची चौकशी करण्याचे काम हाती घेतले.

महायुद्धानंतर अनेक वस्तूंची मागणी कमी होत गेली आणि युद्धकालात वाढविलेले उत्पादन अनेक कारखान्यांतून कमी करावे लागले. शिवाय युद्धानंतर लगेच भारताच्या स्वातंत्र्याची नांदी सुरू झाली आणि १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. १९४८ साली भारत सरकारने आपले पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले असले तरी पुढील काही वर्षांत उद्योगधंद्यांची देशात वाढ होण्यासाठी खास प्रयत्न करण्यात आले नाहीत. त्या वेळी स्वातंत्र्यानंतर परकीय भांडवल गुंतवणूक देशात होणार आहे किंवा नाही ह्याच प्रश्नाला बरेच महत्त्व देण्यात आले आणि परकीय भांडवलाला देशात आकर्षित करण्यासाठी बरीच आश्वासनेही देण्यात आली.

१९५१ साली पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात झाली. परंतु या योजनेतही शेती उत्पादनावर जास्त भर देण्यात आला असल्याने उद्योगधंद्यांच्या वाढीचा प्रश्न जरा मागेच पडला. साहजिकच या सर्व घडामोडींचा महाराष्ट्रावरही परिणाम होणे शक्य होते आणि तसा तो झालाही. या कालात उद्योगधंद्यांत विशेष म्हणण्यासारखी प्रगती झाली नाही. या कालातील नव्या उद्योगांच्या बाबतीतील संपूर्ण आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु दक्षिण महाराष्ट्राच्या बाबतीत (पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर) डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने काही आकडेवारी त्या वेळी एकत्रित केली होती, ती उपयोगी ठरावी. या माहितीप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रात १९२० ते १९३० या कालात नवे ६ कारखाने निघाले, १९३० ते १९४० या कालात नवे ३८ कारखाने निघाले नि १९४० ते १९४७ या कालात नवे २० कारखाने निघाले. परंतु १९४७ नंतरच्या पाच वर्षांत मात्र एकही नाव घेण्याजोगा नवीन कारखाना निघाला नाही. उलट सुमारे १४ कारखाने मात्र बंद पडले. पण ही परिस्थिती तात्पुरती होती. देशातील उद्योगधंद्यांची वाढ होऊ देणे हे नियोजनाचे एक सूत्र आणि त्यानुसार सरकारी धोरणांची पावले लवकरच पडू लागली. या दृष्टीने पहिली महत्त्वाची घटना म्हणजे कोयना जलविद्युत प्रकल्प आणि इतर विद्युत निर्मिती योजना या कालात कार्यान्वित झाल्या. त्यामुळे विद्युत शक्तीचे दुर्भिक्ष महाराष्ट्रातून नाहीसे झाले. तुर्भे येथे तेलशुद्धीकरणाचे दोन कारखाने प्रस्थापित होऊन त्या कारखान्यांतील शुद्ध खनिज तेले व तदनुषंगिक रासायनिक द्रव्यांचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात सुरू झाले. आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे राज्याच्या औद्योगीकरणाचा मास्टर प्लॅन तयार करण्यात

आला. १९५६ सालीच मुंबई राज्यात कोणते लहान व मोठे उद्योग सुरू करता येतील याचा एक तपशील राज्याच्या उद्योगखात्याने तयार केला होता. १९५७ साली विशाल मुंबई राज्य अस्तित्वात आल्यानंतर यासंबंधी विभागवार पाहणी झाली आणि राज्याच्या कोणत्या विभागात कोणती साधनसंपत्ती आहे याचा शोध घेऊन तेथे कोणते नवे उद्योगधंदे सुरू करता येतील याचा संपूर्ण तपशील ठरविण्यात आला. राज्यातील व्यापारी, कारखानदार नि सामान्य जनता यांच्याही आकांक्षा आता जागृत झाल्या होत्या. हेळवाक येथे परिषद घेऊन कोयना योजना हाती घेण्याची प्रथम मागणी त्यासाठी करण्यात आली. नंतर प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद भरून तीत प्रथमच महाराष्ट्राच्या आर्थिक नि औद्योगिक विकासाच्या प्रश्नांचा विचार करण्यात आला आणि सरकारकडे यासंबंधी काही सूचनाही करण्यात आल्या. १९५६ साली दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली आणि या योजनेत उद्योगधंद्यांची वाढ करण्यावर जास्त भर दिल्याने साहजिकच राज्यातील औद्योगिक वाढीस नव्याने चालना मिळाली.

१९५१ साली इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन ॲक्ट अस्तित्वात आला. या कायद्यान्वये नवे कारखाने काढण्यासाठी किंवा सध्याच्या कारखान्यांना आपली वाढ करण्याकरिता किंवा नवीन वस्तूंचे उत्पादन करण्याकरिता परवाने घ्यावे लागतात. १९५४ ते १९६० पर्यंत या कायद्याखाली महाराष्ट्राला जे औद्योगिक परवाने मिळाले आहेत, त्यांमध्ये दरसाल महाराष्ट्राला मिळणाऱ्या औद्योगिक परवान्यांच्या संख्येत वाढ होत आहे असे दिसेल. महाराष्ट्राच्या सर्व विभागाला (मुंबईखेरीज) एकूण ३७५ परवाने या कालात मिळाले आहेत तर ८०१ परवाने एकट्या मुंबई शहरातच मिळाले आहेत. या आकड्यांत लहान कारखान्यांचा समावेश नाही. वरील परवाने हे इंजिनिअरिंग वस्तू, औषधे, रसायने, ग्राहकांकरिता लागणाऱ्या वस्तू या सर्व तऱ्हेच्या कारखान्यांकरिता दिलेले आहेत.

१९६० पर्यंत औद्योगिक क्षेत्रात झालेल्या या प्रगतीचा फायदा नंतर महाराष्ट्राला मिळाला आणि त्यानंतरच्या कालावधीत औद्योगिक क्षेत्रात बरीच प्रगती होऊ शकली. इंजिनिअरिंग मालाच्या उत्पादनाबरोबरच रंग, औषधनिर्मिती, प्लॅस्टिक वस्तूंचे उत्पादन, रबरी साहित्य, शास्त्रीय उपकरणी, यांच्या निर्मितीच्या कारखान्यांची खूपच वाढ झाली. इंजिनिअरिंग मालाच्या उत्पादनातही मोटारी आणि यंत्रे यांचे सुटे भाग, विद्युत उपकरणे, रेडिओ, ट्रँझिस्टर्स नि त्यांचे भाग या बाबतीत बरीच प्रगती झाली. १९६० साली भारी उद्योगक्षेत्रात फक्त ८५० कारखाने होते तर १९६८ साली त्यांची संख्या १९६३ इतकी होती. त्याचप्रमाणे कृषिउद्योग क्षेत्रातही राज्याने बरीच प्रगती केली आहे. १९६० साली खाजगी क्षेत्रात ४ व सहकारी क्षेत्रात १४ असे एकूण २८ साखर कारखाने होते तर १९६९ साली हीच संख्या खाजगी क्षेत्रात ११ व सहकारी क्षेत्रात २७ आहे. याशिवाय डिस्टिलरीज खत कारखाने, जंतुनाशके नि कीटाणुनाशके,

फळे टिकविण्याचे कारखाने यांतही भर पडली आहे. लघुउद्योगांच्या बाबतीतही महाराष्ट्राने स्पृहणीय प्रगती केली आहे. १९६० साली ४८०७ लहान कारखाने होते तर ते मार्च १९६९ पर्यंत लहान कारखान्यांची नोंदणी झालेली संख्या २५,३६६ इतकी आहे. या प्रगतीला देशातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील अनुकूल परिस्थिती कारणीभूत आहे. पण त्याहीपेक्षा महाराष्ट्र सरकारने उद्योगधंद्यांबाबत अवलंबिलेले प्रगतिशील धोरण आणि त्यासाठी कार्यान्वित केलेल्या योजना यांचाही अवश्य उल्लेख करावा लागेल. विशेषतः लघुउद्योगांना अर्थसाहाय्यासाठी बँकांतर्फे करण्यात आलेल्या योजना, राज्य वित्त मंडळाची स्थापना, औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाची स्थापना, राज्याच्या अंतर्गत भागाच्या औद्योगिक विकासासाठी सिकॉमची योजना, यासाठी राज्य सरकारने देऊ केलेल्या सवलती, लघुउद्योगांसाठी कच्चा माल, यंत्रसामग्री, निर्यात, विक्री ह्या अडचणींचे निवारण करण्याकरिता महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने चालविलेले कार्य या सर्व गोष्टींमुळे राज्यातील औद्योगिक वाढीस मोठीच चालना मिळाली आहे. राज्यातील सुस्थिर राज्यकारभार यंत्रणेचाही हातभार या औद्योगिक वाढीस लागला आहे हेही मान्य करावे लागेल.

१९५६ ते १९६६ सालात निरनिराळ्या राज्यांना दिलेल्या औद्योगिक परवान्यांसंबंधीची माहिती आता उपलब्ध आहे.

तीवरून महाराष्ट्र राज्याने १९५६ ते १९६६ या दहा वर्षांच्या कालात ३६४५ अर्ज औद्योगिक परवान्याकरिता केले होते आणि त्यांपैकी २७४१ परवाने प्रत्यक्ष मिळाले असे दिसते. इतर राज्यांच्या तुलनेने हे आकडे सर्वांत जास्त आहेत. परवान्याकरिता एकूण केलेल्या अर्जांपैकी सुमारे २५·४१ टक्के अर्ज महाराष्ट्राचेच होते, आणि सर्व राज्यांना या दहा वर्षांत मिळालेल्या एकूण परवान्यांपैकी २७·३७ टक्के परवाने महाराष्ट्राला मिळाले. महाराष्ट्राच्या खालोखाल बंगालला परवाने मिळाले आहेत आणि त्यांची टक्केवारी १६·३४ आणि १६·४७ अशी अनुक्रमे आहे. यावरून इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात औद्योगिक वाढ चांगली झाली आहे असे अनुमान करावयास काही हरकत नसावी.

असे जरी असले तरी महाराष्ट्रातील सर्व उद्योगधंद्यांची या दहा वर्षांत भरभराट झाली किंवा महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांना याचा फायदा मिळाला असे झालेले नाही. पुढील पानावरील तक्त्यात त्यासंबंधीची आकडेवारी एकत्रित केली आहे.

ह्या तक्त्यात महाराष्ट्रातील कारखान्यांची आणि कामगारांची वाढ वा घट निरनिराळ्या उद्योगांतून कशी झाली हे दाखविले आहे. त्यावरून कापूस सरकी काढणे व गठ्ठे बांधणे यात १५० ने कारखान्यांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रोजंदारी ७३५५ ने कमी झाली आहे. कापड-गिरण्यांच्या संख्येत जरी वाढ झाली असली तरी या उद्योगात असलेल्या कामगारांच्या संख्येत २४,४९७ ने घट झाली आहे. प्रोसेसिंगचे लहान कारखाने आणि काही सूत गिरण्या यांत वाढ झाली असावी परंतु सोलापूर,

१९५६ ते १९६५ पर्यंत महाराष्ट्रातील कारखान्यांची व कामगारांच्या संख्येत झालेली वाढ वा घट (+ वा –)

क्रमांक	नाव	कारखान्यांची संख्या + वाढ, – घट	कामगारांची संख्या + वाढ, – घट
१	कापूस सरकी काढणे व गठ्ठे बांधणे	– १५०	– ७,३५५
२	सूत काढणे, विणणे व कापड प्रक्रिया	+ १०७	– २४,४९७
३	सूत काढणे, विणणे व प्रक्रिया (कापडाव्यतिरिक्त)	+ १२२	+ ३,९२५
४	दोर, दोरे, सुतळी व इतर कापड उद्योग	+ ८४	+ १४,०४४
५	साखर	+ १८	+ ८,५३२
६	गूळ	– २४४	– ५,७२३
७	खाद्य तेले (वनस्पति तुपाखेरीज)	+ ४४	– १७०
८	इतर खाद्य पदार्थ (मद्यार्काखेरीज)	+ १३०	+ ७,७९५
९	तंबाखू	+ १२	– ५,७१०
१०	जड रसायने (खते धरून)	+ ६४	+ ६,९८८
११	इतर रासायनिक पदार्थ	+ १३४	+ १८,६८६
१२	विटा व फरश्या	+ ९१	+ ६,६१६
१३	कोळसा व पेट्रोलियम पदार्थ, काच, चिनी माती, सिमेंट व खनिज पदार्थ	+ ८४	+ १०,०५५
१४	जडधातू उद्योग	+ १६८	+ १४,१७३
१५	धातूचे पदार्थ (यंत्रे व वाहतुकीची साधने सोडून)	+ ३३८	+ २५,४२६
१६	यंत्रसामग्री (विद्युत यंत्रसामग्री सोडून)	+ ३५९	+ ४०,०८३
१७	विद्युत यंत्रसामग्री, उपकरणे इ.	+ २०५	+ २६,९९४
१८	मोटार वाहने दुरुस्ती	+ ७६	+ ६,१६५
१९	वाहतुकीची साधने (मोटार दुरुस्ती सोडून)	+ २४	+ १४,३७९
२०	इतर उद्योग	+ ८५८	+ ५६,८२५
	एकूण	२,५००	२,१७,२३१

औरंगाबाद किंवा खानदेश येथील मोठमोठ्या गिरण्या बंद पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजंदारी कमी झाली. त्यानंतर साखर कारखाने वाढल्यामुळे गुळाचे कारखाने नि त्यातील कामगार कमी झालेले दिसतात. विडी उद्योगातही या दहा वर्षांत ५७१० ने रोजगार कमी

झालेला दिसतो. याउलट धातूचे पदार्थ, रासायनिक पदार्थ, यंत्रसामग्री, विद्युत यंत्रसामग्री, वाहतुकीची साधने तयार करणाऱ्या कारखान्यांतून रोजंदारी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाढली आहे आणि या कारखान्यांची महाराष्ट्रातील एकूण संख्याही वाढली आहे.

१९५६ ते १९६५ या कालात महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांत झालेली औद्योगिक वाढ वा घट (+ वा –)

अनुक्रमांक	जिल्हा	कारखान्यांची संख्या	कामगारांची संख्या
१	बृहन्मुंबई	+ १,४१२	+ ४२,७८०
२	ठाणे	+ ४२७	+ ३८,७९२
३	कुलाबा	+ ३८	+ २,७०५
४	रत्नागिरी	+ २२	+ ८४९
५	नाशिक	+ ६४	+ ५,९३२
६	धुळे	+ ९१	+ १,०६०
७	जळगाव	+ ६७	– २,०२९
८	अहमदनगर	– १८०	+ ३,८५४
९	पुणे	+ २३३	+ ३१,९१०
१०	सातारा	– २९	+ २,२४३
११	सांगली	+ ३५	+ ३,८७०
१२	सोलापूर	+ १५	– ७,३९५
१३	कोल्हापूर	+ १८२	+ ७,३०५
१४	औरंगाबाद	+ ४९	+ १,२५५
१५	परभणी	+ ४	– ३५९
१६	बीड	+ १४	+ १०६
१७	नांदेड	+ १०	– २८९
१८	उस्मानाबाद	+ १३	– २३२
१९	बुलढाणा	– १८	– २,१४४
२०	अकोला	– ५	– २,३६६
२१	अमरावती	+ ६	+ ३०
२२	यवतमाळ	– ५	+ ५५०
२३	वर्धा	– १३	– १,८२०
२४	नागपूर	+ ११०	– २,६२२
२५	भंडारा	– ५२	– ८,४६१
२६	चांदा (चंद्रपूर)	+ १०	+ १,७०७
	एकूण	२,५००	२,१७,२३१

जिल्ह्यांतील औद्योगिक वाढीकडे पाहताना अहमदनगर, सोलापूर, बुलढाणा, अकोला, भंडारा या जिल्ह्यांत रोजंदारी बऱ्याच प्रमाणात कमी झालेली दिसते. खुद्द नागपूर शहरातही जरी कारखान्यांची संख्या वाढलेली दिसत असली तरी रोजंदारी कमी झालेली दिसते. ही घट प्रामुख्याने या भागातील कापडगिरण्या बंद पडल्यामुळे किंवा त्या संपूर्ण तीन पाळ्यांवर चालत नसल्यामुळे झाली असावी असा अंदाज करावयाला हरकत नाही. बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक या भागांना औद्योगिक वाढीचा चांगलाच लाभ मिळालेला दिसतो. या भागातून कारखान्यांची संख्याही वाढली आहे आणि कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येतही बऱ्याच मोठ्या प्रमाणात भर पडली आहे.

पृष्ठ २०३ वर दिलेली माहिती ही फॅक्टरीज ॲक्टखाली नोंद झालेल्या कारखान्यांची माहिती आहे. याखेरीज १० कामगारांच्यापेक्षाही कमी कामगार असलेल्या आणि फॅक्टरीज ॲक्टखाली नोंद झालेल्या कारखान्यांची संख्या बरीच आहे. पण त्यांची एकत्रित माहिती कोठेच उपलब्ध नाही. उपलब्ध माहितीप्रमाणे एकूण कारखान्यांपैकी सुमारे १३ टक्के कारखाने कापड-उद्योगात आहेत आणि एकूण कामगारांपैकी ३५ टक्के कामगार याच उद्योगात आहेत. यात कापडगिरण्या, प्रोसेसिंगचे कारखाने, सूत-गिरण्या, यंत्रमाग आणि हातमाग या सर्वांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील हा सर्वांत मोठा उद्योग आहे. याखालोखाल खाद्यपदार्थ (यांत साखर कारखान्यांचाही समावेश आहे) तयार करणारे कारखाने जास्त संख्येने सुमारे १३ टक्के आहेत. पण कामगारांची संख्यामात्र फक्त ६ टक्केच आहे. याचा अर्थ या धंद्यात कन्फेक्शनरी, फळे टिकविण्याचे कारखाने असे अनेक लहान कारखाने आहेत असे दिसते. यानंतर लोखंड व पोलाद, विजेची यंत्रे नि उपकरणे, धातूच्या इतर वस्तू या इंजिनिअरिंग धंद्याचा क्रमांक लागतो. रसायने नि रासायनिक पदार्थ आणि रबर नि रबराच्या वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांची संख्या आणि त्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या बरीच मोठी आहे.

बृहन्मुंबई, ठाणे, पुणे येथे उद्योगांचे केंद्रीकरण झाले आहे. सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, जळगाव येथेही बरेच कारखाने आहेत. पण हे जिल्हे सोडले तर महाराष्ट्रातील इतर ठिकाणी कारखान्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात नाही.

पृष्ठ २०५ वरील तक्त्यात हेच आकडे विभागवार संकलित केले आहेत. त्यावरून महाराष्ट्रात उद्योगांचे एका विशिष्ट भागात कसे केंद्रीकरण झाले आहे हे दिसून येते.

बृहन्मुंबईत महाराष्ट्रातील एकूण कारखान्यांपैकी ५० टक्के कारखाने आहेत आणि सुमारे ६० टक्के कामगार आहेत. त्या खालोखाल उद्योगांचे जाळे पश्चिम महाराष्ट्रात पसरले आहे. बृहन्मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्र दोन्हींचा मिळून विचार केला म्हणजे महाराष्ट्रातील एकूण कारखान्यांपैकी सुमारे ८७ टक्के कारखाने या भागात आहेत आणि महाराष्ट्रातील एकूण औद्योगिक कामगारांपैकी सुमारे ९२ टक्के कामगारांना

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागातील कारखाने नि कामगार (१९६८)

विभाग	कारखान्यांची संख्या	शे. टक्केवारी	कामगारांची संख्या	शे. टक्केवारी
बृहन्मुंबई	४,५७१	५०.१०	५,३९,००५	६०.८०
पश्चिम महाराष्ट्र	३,३७६	३७.०२	२,६६,२०२	३१.०१
मराठवाडा	२३९	२.६२	१५,६०३	१.०७
विदर्भ	९३०	१०.२६	६६,३६४	७.१२
एकूण	९,११६	१००.००	८,८७,१७४	१००.००

या विभागात रोजंदारी मिळालेली आहे असे दिसून येते. विदर्भात फक्त १० टक्के कारखाने आहेत आणि सुमारे ७ टक्के कामगार तेथे काम करीत आहेत. मराठवाड्याचा भाग हा तुलनात्मकदृष्ट्या या सर्व भागाहून औद्योगिकदृष्ट्या अतिशय मागासलेला आहे. महाराष्ट्रातील एकूण कारखान्यांपैकी फक्त २ टक्के कारखाने तेथे आहेत आणि एकूण कामगारांपैकी फक्त १ टक्क्याइतकेच कामगार तेथे आहेत.

कामगारांच्या संख्येप्रमाणे महाराष्ट्रातील कारखान्यांची वर्गवारी करावयाची म्हटले म्हणजे खालील चित्र दिसते.

कामगारांच्या संख्येप्रमाणे महाराष्ट्रातील कारखान्यांची वर्गवारी

कामगारांच्या संख्येप्रमाणे वर्गवारी	कारखाने	शे. टक्केवारी	एकूण कामगार	शे. टक्केवारी
१० कामगारांपेक्षा कमी	१२३६	१३.५४	८,३६०	०.९५
१० ते १९ कामगार	२८१५	३०.८६	३७,७३९	४.२५
२० ते ४९ कामगार	२४७०	२७.१०	७६,४६४	८.६२
५० ते ९९ कामगार	१२२३	१३.४१	८५,२२१	९.६१
१०० ते ४९९ कामगार	११००	१२.०६	२,१९,६१३	२४.७५
५०० ते ९९९ कामगार	१३३	१.५०	९४,१७२	१०.६१
१००० ते ४९९९ कामगार	१२६	१.४०	२,८०,६३४	३१.६३
५००० पेक्षा जास्त	१३	०.१३	८४,९२१	९.५८
एकूण	९११६	१००.००	८,८७,१७४	१००.००

५० कामगारांपर्यंत कामावर असलेल्या महाराष्ट्रातील एकूण कारखान्यांची संख्या सर्वांत जास्त आहे (सुमारे ७२ टक्के). पण त्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या मात्र एकूण कामगारांच्या १३ टक्के आहे. १००० ते ४९९९ कामगार असलेल्या

एकूण कारखान्यांची संख्या फक्त १२६ (१ टक्का) आहे, पण त्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्यामात्र बरीच–सुमारे ३१ टक्के–इतकी आहे.

एकंदर कामगारांची संख्या, गुंतविलेले भांडवल आणि एकूण औद्योगिक उत्पादन लक्षात घेता महाराष्ट्राचा देशातील वाटा बराच मोठा आहे हे लक्षात येते. महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांत रुपये १३५१ कोटींचे भांडवल गुंतले असून दरसाल सुमारे रुपये २०४२ कोटी किंमतीचे उत्पादन त्यातून होते. हे आकडे लक्षात घेता भारतातील एकूण औद्योगिक भांडवलापैकी सुमारे १५ टक्के भांडवल महाराष्ट्रात गुंतले आहे आणि देशातील एकूण उत्पादनाच्या २३ टक्के उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होते. कामगारांची संख्या विचारात घेतली तर देशातील एकूण औद्योगिक कामगारांपैकी सुमारे १९ टक्के कामगार महाराष्ट्रातच आहेत असे दिसते. भारतातील एकंदर संयुक्त भांडवली कंपन्यांपैकी सुमारे ३० टक्के कंपन्याही महाराष्ट्रातच आहेत. औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचे देशातील नेतृत्व यावरून सिद्ध व्हावयास हरकत नाही.

महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगधंदे

गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगधंद्यांची वाढ कशी झाली, त्यात अडचणी कोणत्या आल्या हे पाहणे आता आवश्यक ठरेल.

कापड–उद्योग : यांपैकी कापड उद्योग हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा आणि सर्वांत जुना उद्योगधंदा. देशातील कापूस लागवडीखालील एकूण ८० लाख हेक्टर जमिनीपैकी २६ लाख जमीन किंवा सुमारे १/३ जमीन महाराष्ट्रातच आहे. देशातील एकंदर कापूस उत्पादनापैकी सुमारे २५ टक्के उत्पादन महाराष्ट्रातच होते. देशातील ३४६ सूत गिरण्यांपैकी १८ गिरण्या आणि २८७ कापड-गिरण्यांपैकी ७७ कापड-गिरण्या–म्हणजे देशाच्या सुमारे १५ टक्के गिरण्या महाराष्ट्रात आहेत. कापड-गिरण्यांत देशात एकंदर नोकरीवर असलेल्या ८ लाख कामगारांपैकी अडीच लाख कामगार एकट्या महाराष्ट्रातच आहेत. यंत्रमाग आणि हातमाग यांची महाराष्ट्रातील संख्या अनुक्रमे ९४,५७९ आणि १,६४,००० असून हेही प्रमाण बरेच मोठे आहे.

महाराष्ट्रातील एकूण औद्योगिक कामगारांपैकी २५ टक्के कामगार कापड-गिरण्यांत आहेत. महाराष्ट्रातील एकूण उत्पन्नापैकी सुमारे १० टक्के उत्पन्न कापूस-उत्पादन आणि कापड-गिरण्या यांमधून निर्माण होते. यावरून या धंद्याचे महाराष्ट्रातील महत्त्व लक्षात यावे.

ह्या धंद्याचे मुख्यत्वेकरून मुंबई आणि इतर काही शहरांतून केंद्रीकरण झाले आहे. महाराष्ट्रातील ९५ कापडगिरण्यांपैकी सुमारे ५९ गिरण्या मुंबईत आहेत. बाकीच्या गिरण्या कोल्हापूर ते नागपूर या सर्व भागात पसरलेल्या आहेत. मुंबईखालोखाल पूर्वी सोलापूर येथे या गिरण्या बऱ्याच होत्या. परंतु त्यांपैकी बऱ्याच बंद पडल्यामुळे सोला-पूरचे आता या बाबतीतील महत्त्व कमी झाले आहे. यंत्रमाग आणि हातमाग यांचे

इचलकरंजी, मालेगाव, भिवंडी, सोलापूर, नागपूर, औरंगाबाद अशा काही शहरांतून केंद्रीकरण आले आहे. याला काही ऐतिहासिक कारणेही आहेत. सूतगिरण्या सहकार-क्षेत्रातच काढण्याचे सरकारचे धोरण असून अशा गिरण्या इचलकरंजी, सोलापूर अशा ठिकाणी आता निघाल्या आहेत.

परंतु महाराष्ट्रातील सर्वांत मोठा, सर्वांत जुना, जास्तीत जास्त रोजगारी मिळवून देणारा कापडधंदामात्र गेल्या पंचवीस वर्षांत फारशी प्रगती करू शकला नाही. उलट तो दिवसेंदिवस मोडकळीसच येत आहे ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रातील या धंद्याची पाहणी करण्यासाठी नेमलेल्या कोगेकर समितीने १९६८ साली आपल्या अहवालात या धंद्याच्या परिस्थितीचे केलेले वर्णन चिंताजनक आहे. या धंद्याच्या ऱ्हासाची अनेक कारणे समितीने दाखविली आहेत. मजुरांचे वाढते वेतन, कच्चा माल व सुटे भाग यांच्या वाढत्या किंमती, सरकारचे भारी कर आणि व्यवस्थापकांचा गैरकारभार ही या ऱ्हासाची प्रमुख कारणे आहेत. यामुळे या धंद्यातील प्रचंड-संख्य कामगारांवर रोज-गारीची अनिश्चिती आली असून कापूस-शेतक-याला कापसाची चांगली किंमत मिळणे कठीण झाले आहे. जुनी यंत्रसामग्री गिरणी मालकांनी वेळीच बदलली नाही. यामुळे धंदा नुकसानीत येत गेला आणि आता यंत्रसामग्रीची किंमत अफाट वाढली आहे. धंदा जास्त किफायतशीर नसल्यामुळे धंद्याला नवे भांडवल मिळत नाही. यामुळे धंद्याचे नुकसान आणखी वाढत जाते. या धंद्यातील बेकारी टाळण्यासाठी राज्य सरकारने बंद पडणाऱ्या या गिरण्या ताब्यात घेऊन चालविल्या आहेत, पण याबाबतीतही सरकारचा अनुभव काही फारसा चांगला नाही, किंवा ही योजना फलदायी झाली आहे असे म्हणता येत नाही.

गेल्या पंचवीस वर्षांत विजेची उपलब्धता वाढल्यामुळे महाराष्ट्रातील यंत्रमागांची संख्यामात्र बरीच वाढली आहे. सालोसाल अनधिकृत यंत्रमागांची यात भर पडत आहे आणि वेळोवेळी टेक्स्टाइल कमिशनरकडून या अनधिकृत यंत्रमागांना टेक्समार्क देऊन अधिकृत करण्यात येते. राज्याच्या औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या धोरणास यंत्र-मागांची बरीच मदत होणार असून यापुढे सहकारी सूत गिरण्या आणि जोडीला यंत्र-मागांची वाढ अशा तऱ्हेने कापड-उद्योगाची वाढ होण्याची शक्यता दिसते.

कापड-गिरण्यांचा जरी गेल्या पंचवीस वर्षांत ऱ्हास झाला असला तरी नायलॉन टेरीलीन, रेयॉन यांसारख्या कृत्रिम धाग्यांची निर्मिती करणारे नवीन कारखाने महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वर्षांत निघाले आहेत आणि त्यांची दिवसेंदिवस वाढही चालू आहे.

साखर-उद्योग : कापड-उद्योगाच्या खालोखाल महाराष्ट्रातील दुसरा महत्त्वाचा उद्योग म्हणजे साखर-उद्योग. गेल्या पंचवीस वर्षांत या उद्योगाची खूपच प्रगती झाली. पूर्वी महाराष्ट्रात खाजगी क्षेत्रात फक्त ४ कारखाने होते तर आता खाजगी क्षेत्रात ११ कारखाने आणि २७ सहकारी साखर कारखाने आहेत. याखेरीज आणखी १९ नवे साखर-कारखाने सहकारी क्षेत्रात स्थापण्यात येणार आहेत. त्यांपैकी आठ पश्चिम महाराष्ट्रात,

नऊ मराठवाड्यात आणि दोन विदर्भात स्थापण्यात येणार आहेत. साखर-कारखाने पूर्वी पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांतच–उदा. अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, पुणे – विशेषेकरून होते. आता महाराष्ट्राच्या इतर भागातील ग्रामीण विभागांची वाढ होण्याच्या हेतूने तेथेही साखर कारखाने काढण्यात येत आहेत.

गेल्या २५ वर्षांत सहकारी क्षेत्रात झालेली या कारखान्यांची वाढ हे साखर-उद्योगाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणून दाखविता येईल. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात प्रवरानगर येथे पहिल्या सहकारी साखर-कारखान्याची सुरुवात झाली आणि त्यानंतर महाराष्ट्रात ठिकठिकाणी हे कारखाने सुरू करण्यात आले. यामुळे ग्रामीण भागात नवे नेतृत्व उभे राहिले, साखर-कारखान्याच्या परिसरात आर्थिक सुबत्ता आली आणि ग्रामीण जनतेत नवा विश्वास निर्माण झाला.

साखर-कारखान्यांतून उपलब्ध असणाऱ्या मळीवर मद्यार्कांचा उद्योगधंदा अवलंबून आहे. महाराष्ट्रात सध्या आठ आसवनी असून त्यांतून ५ कोटी ६० लक्ष लिटर मद्यार्कांचे उत्पादन होते. महाराष्ट्रात आणखी पाच आसवनी स्थापण्याचा विचार असून त्यांची उत्पादनक्षमता २ कोटी ४७ लक्ष लिटर इतकी असेल.

महाराष्ट्रातील ऊस पिकविणाऱ्या अनेक भागांतून सहकारी साखर-कारखाने निघाल्यामुळे पूर्वी तेथे गूळ तयार करणारे जे कारखाने होते त्यांची संख्यामात्र कमी झाली. यांपैकी बरेच कारखाने बंद पडले आहेत.

अभियांत्रिकी उद्योगधंदे : बंगालच्या खालोखाल महाराष्ट्रामध्ये इंजिनिअरिंगच्या हरतऱ्हेच्या वस्तू निर्माण करणारे कारखाने मोठ्या संख्येने आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी हा उद्योगधंदा प्रामुख्याने मुंबई आणि मग किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, पुणे अशा काही तुरळक ठिकाणी होता. लहानसहान यंत्रांच्या दुरुस्त्या, साध्या यंत्रांची किंवा औजारांची निर्मिती, पितळी भांडी, शेतीची औजारे, फर्निचर अशा वस्तूंचे कारखाने, फौंड्री असे कारखाने होते. पण आता मुंबई, कोल्हापूर, पुणे ही तर या तऱ्हेच्या उद्योगधंद्यांची केंद्रेच आहेत. पण शिवाय महाराष्ट्रातील इतर अनेक ठिकाणी ह्या उद्योगांची वाढ होत आहे. शिवाय आता या कारखान्यातून निव्वळ साध्यासुध्या वस्तूंचे उत्पादन होते असे नाही तर कापड-उद्योग, साखर-कारखाने, विजेच्या वस्तू तयार करणारे कारखाने, रासायनिक कारखाने या व इतर नवनव्या उद्योगांना लागणारी सर्व प्रकारची आधुनिक यंत्रसामग्री या कारखान्यांतून आता तयार होते. सर्व प्रकारच्या खास मशीन टूल्सचे उत्पादन येथे केले जाते. डिझेल इंजिनाच्या उत्पादनाचे तर महाराष्ट्रात केंद्रीकरण झाले आहे. देशातील या उद्योगातील तीन सर्वांत मोठे कारखाने तर महाराष्ट्रातच आहेत. शिवाय कोल्हापूर येथे या उद्योगातील लहान कारखान्यांचे केंद्रीकरण झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रात विजेच्या मोटारी, पॉवर ट्रॅन्सफॉर्मर, विद्युद्वाहक केबल, स्विचगिअर इत्यादी अनेक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात होत आहे. इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातही गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्राने नेत्रदीपक

प्रगती केली आहे. रेडिओ, ट्रिमर, कंडेन्सर, पेपर कॅपॅसिटर, कार्बन फिल्म, रेझिस्टर, फेराइट रॉड, ट्रॅन्झिस्टर, डायोडस इत्यादी अनेक वस्तूंचे उत्पादन महाराष्ट्रात होऊ लागले आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचेही अनेक कारखाने राज्यात निघाले आहेत. हा धंदा नव्यानेच वाढीला लागला असून महाराष्ट्रातच या तऱ्हेचे अनेक कारखाने आहेत.

मुंबई व पुणे येथील तीन मोठ्या कारखान्यांतून मोटारी, वाहतुकीची इतर वाहने आणि स्कूटर्स यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू झाले आहे. पंचवीस वर्षांपूर्वी हा उद्योग अस्तित्वात नव्हता. मोटार कारखान्याच्या आश्रयाखाली त्यांना लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन करणारे आनुषंगिक कारखानेही हळूहळू वाढत आहेत.

रासायनिक कारखाने : पंचवीस वर्षांपूर्वी रंग, मूलभूत रसायने, औषधांना लागणारी रसायने ही सर्व आयात केली जात असत. आता ह्या वस्तू तयार करणारे अनेक कारखाने महाराष्ट्रात निघाले आहेत. कापड-कारखान्यांना लागणारे रंग, त्यासाठी इंटरमीजिट्स, शाई, इतर रंग यांना लागणारे मूलभूत रंग हे तयार करणारे भारतातील महत्त्वाचे कारखाने महाराष्ट्रात आहेत, भोरजवळील अरलॅब्स हा रंगधंद्यातील आद्य कारखाना. त्याच्यानंतर आता अनेक कारखाने महाराष्ट्रात निघाले आहेत. मुंबईजवळ तेलाच्या रिफायनरीज निघाल्यामुळे तेथे आता पेट्रो केमिकल उद्योगधंदे नव्याने सुरू होत आहेत. सुमारे ८० कोटी रुपयांहून अधिक भांडवल या धंद्यात गुंतविण्यात आले आहे. या उद्योगामुळे महत्त्वाची रसायने आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या वस्तू याबाबतीत देश स्वयंपूर्ण होण्याची शक्यता आहे आणि या क्षेत्राचा विकास झाल्यामुळे ह्या क्षेत्रातील उत्पादित मालावर प्रक्रिया करणारे अनेक लहान व मध्यम स्वरूपाचे धंदे निघाले आहेत नि निघत आहेत. याखेरीज पनवेलजवळ रासायनी येथे निरनिराळी सेंद्रिय रसायने उत्पादन करण्याचा प्रकल्प भारत सरकारतर्फे हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे या भागात आणखी उद्योगधंदे निघण्यास चालना मिळेल. नत्रयुक्त खताचे उत्पादन करण्यासाठी ट्रॉम्बे येथे सार्वजनिक क्षेत्रातील फर्टि-लायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या कारखान्याची स्थापना ही घटनाही रासायनिक उद्योगधंद्याच्या विकासातील एक महत्त्वाची घटना आहे. हे सर्व रासायनिक कारखाने मुंबई, ठाणे, कल्याण, पनवेल, पुणे या भागात पसरले आहेत. क्वचितच काही कारखाने इतर भागातही आहेत. आता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळातर्फे रत्ना-गिरी जिल्ह्यात रोहा येथे नवे रासायनिक कारखाने काढण्यासाठी नवीन औद्योगिक क्षेत्राची वाढ करण्यात येत आहे. रासायनिक उद्योगही बऱ्याच मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात केंद्रित झाला असून त्याची झालेली वाढ ही गेल्या पंधरा-वीस वर्षांतीलच आहे.

महाराष्ट्रातील औषधांचा पहिला कारखाना पनवेल येथे श्री. पुराणिक यांनी १८७२ साली सुरू केला. त्यापूर्वी तज्ज्ञ स्वतःची औषधे स्वतःच करून घेत व जी थोडी औषधे दुसऱ्याकडून घेतली जात तीही फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलेली नसत. पनवेलच्या धूतपापेश्वर कारखान्यानंतर मुंबई येथील झंडू फार्मास्युटिकल वर्क्स, चेंबूर येथील

सांडू ब्रदर्सचा कारखाना, आयुर्वेद रसशाळा पुणे, आयुर्वेदाश्रम फार्मसी अहमदनगर, आयुर्वेदीय अर्कशाळा लि. सातारा असे अनेक कारखाने महाराष्ट्रात निघाले. हे सर्व कारखाने १९३० च्या पूर्वीच निघाले आणि अजूनही ते कार्यक्षम आहेत. महायुद्धापूर्वी आणि नंतर महत्त्वाच्या परकीय औषधांचा तुटवडा पडू लागला आणि नंतर या औषधांची आयात आस्ते आस्ते बंद करण्याचे सरकारने धोरण स्वीकारले. त्यामुळे परकीय औषधी कंपन्यांनी आपले कारखाने येथे काढावयास सुरुवात केली. यांपैकी बहुतेक कंपन्या परकीयांच्या मालकीच्या असून तांत्रिक सल्ला, रॉयल्टी, डिव्हिडंड या रूपाने बरेच परकीय चलन परदेशात दरसाल पाठवावे लागते. १९४८ नंतर या उद्योगाची भरमसाठ वाढ झाली आणि आता देशातील एकंदर १७६६ कारखान्यांपैकी ५६५ कारखाने किंवा ३० टक्के इतके कारखाने महाराष्ट्रातच आहेत. सुमारे ५० कोटी रुपयांहून जास्त या कारखान्यांचे उत्पादन आहे. हिंदुस्थान अँटिबॉयॉटिक्स हा सरकारी मालकीचा कारखाना महाराष्ट्रात पिंपरी येथे असून या कारखान्यात पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसिन, हेमायसिन आणि इतर अँटिबॉयॉटिक्स औषधे तयार होतात. हा कारखाना १९५२ साली सुरू झाला असून सरकारी क्षेत्रातील कार्यक्षम कारखान्यात याची गणना होते.

काच-कारखाने : लोकमान्य टिळकांच्या प्रोत्साहनाने तळेगाव येथे पैसा फंड ग्लास वर्क्स हा पहिला काच-कारखाना महाराष्ट्रात निघाला. त्यानंतर ओगले ग्लास वर्क्स, बॉंबे ग्लास वर्क्स, बोरोसिल असे अनेक कारखाने महाराष्ट्रात निघाले. या कारखान्यांतून बांगड्या, मणी व कृत्रिम मोती, बाटल्या, तावदान काच, काचेची हरतऱ्हेची भांडी, दिवे इत्यादी काचमालाचे उत्पादन होते. गेल्या काही वर्षांत रासायनिक उपकरणीही या कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहेत. ही उपकरणी लहान प्रमाणावर करता येण्यासारखी असल्यामुळे अशी शास्त्रीय उपकरणी तयार करण्याचे अनेक लहान कारखाने, मुंबई, ठाणे, पुणे विभागात निघाले आहेत. त्याचप्रमाणे चिनी मातीच्या भांड्यांचेही अनेक कारखाने महाराष्ट्रात मुंबई, नागपूर येथे निघाले आहेत.

कागद-कारखाने : या शतकाच्या प्रारंभी पुण्यात सुरू झालेला डेक्कन पेपर मिल्स हा महाराष्ट्रातील आद्य कागद-कारखाना. पण आता मुंबई, खोपोली, पुणे, ओगलेवाडी आणि बल्लारपूर असे सहा कागद-कारखाने आहेत. याखेरीज हातकागद, फिल्टर पेपर तयार करणारे लहान कारखाने अनेक आहेत. पुठ्ठ्यांचेही व त्यापासून कारुगेटेड कागद आणि पॅकिंगकरिता पेट्या तयार करणारेही अनेक कारखाने मुंबई, पुणे, कोल्हापूर या भागात आहेत. महाराष्ट्रीय कागद-कारखानदारांनी एकत्र येऊन त्यांना पल्पचा कायम पुरवठा होण्यासाठी सेंट्रल पल्प मिल्स नावाची कंपनी सुरतेजवळ सोनगड येथे काढली आहे. या कारखान्यात सुमारे ७ कोटी रुपयांचे भांडवल गुंतले असून महाराष्ट्रीय कारखानदारांनी गुजराथेत सुरू केलेला हा मोठा औद्योगिक प्रकल्प असल्याने

त्याचे खास वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील सध्याच्या कागद कारखान्यांची उत्पादन-क्षमता सुमारे ४० हजार टन आहे. कागद कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीचे उत्पादनही यांपैकी एका कारखान्याने सुरू केले आहे.

या महत्त्वाच्या उद्योगधंद्याखेरीज गेल्या पंचवीस वर्षांत बिस्किटांचे व पाव केक्स इत्यादी खाद्यपदार्थांचे कारखाने, विड्यांचे, तपकिरीचे कारखाने, सिगारेटचे कारखाने, धान्ये सडण्याच्या गिरण्या, साबणाचे लहानमोठे कारखाने, स्टेशनरी मालाच्या वस्तूंचे कारखाने, स्टेनलेस स्टील किंवा पितळी भांड्यांचे, कटलरी मालाचे कारखाने, काड्याच्या पेट्यांचे कारखाने, छापखाने, रबरी वस्तू तयार करणारे कारखाने असे अनेक नवीन लहानमोठे कारखाने निघाले.

लघु-उद्योग : गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात अनेक लहान कारखाने निघाले असून आता त्यांची संख्या सुमारे २८,००० आहे. त्यांत विजेची साधने, चामड्याच्या वस्तू, रासायनिक द्रव्ये, रंगसामग्री, तयार कपडे, डिझेल इंजिने, विजेचे पंप, केबल्स इत्यादी वस्तू तयार होतात. यांपैकी अनेक लहान कारखाने मोठ्या कारखान्यांना पूरक म्हणून काम करतात आणि अनेक कारखान्यांचे स्वतःचे उत्पादनही आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर लघुउद्योगांची राज्यात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि पुणे, मुंबई, कोल्हापूर यासारख्या शहरी हरतऱ्हेच्या वस्तू निर्माण करणाऱ्या लहान कारखान्यांचे जाळेच तयार झाले.

केंद्र सरकारचे कारखाने : गेल्या पाव शतकात केंद्र सरकारचे अनेक कारखाने महाराष्ट्रात निघाले. पूर्वी पुण्याजवळील दारूगोळ्यांचे संरक्षणखात्याचे कारखाने आणि नाशिक येथील सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस हेच काय ते दोन कारखाने होते. आता मुंबई-जवळ तुर्भे येथे रासायनिक खत उत्पादनाचा देशातील सर्वांत मोठा कारखाना केंद्र सरकारने काढला असून त्यात सुमारे रुपये ५० कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. पुण्याजवळील पिंपरी येथील हिंदुस्थान ॲंटिबॉयॉटिक्सचा कारखानाही महत्त्वाचा आहे. सुमारे १२ वर्षांपूर्वी या कारखान्याची स्थापना झाली आणि आता तेथे सुमारे ८ कोटी रुपयांचे वार्षिक उत्पादन होते. नॅशनल केमिकल लॅबोरेटरीजची प्रयोगशाळाही पुण्याजवळ आहे. तीत रासायनिक संशोधनाचे महत्त्वपूर्ण काम करण्यात येते. नाशिकजवळील ओझर येथील मिग विमानांचा कारखाना आणि वरणगाव व खडकवासला येथील संरक्षण प्रकल्प ह्यामुळेही महाराष्ट्राचे औद्योगिक चित्र बदलण्यास मदत झाली आहे.

औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडी

महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांत नि विशेषतः गेल्या दहापंधरा वर्षांत महाराष्ट्रात ज्या घडामोडी झाल्या तेवढ्या अजूनपर्यंत कधीच झालेल्या नव्हत्या.

प्रथम नजरेत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे सरकारने राज्याच्या औद्योगीकरणात

घेतलेला पुढाकार. दुसऱ्या महायुद्धानंतर त्या वेळच्या मुंबई सरकारने औद्योगिक पुनर्घटनेची योजना प्रसिद्ध केली होती. त्यात मच्छीमारी, लहान कुटिरोद्योग यांच्या काही किरकोळ योजना आणि तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे एवढीच आपली जिम्मेदारी असे मानलेले दिसते. मुद्दाम राज्यात उद्योगधंदे वाढावेत म्हणून काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. अर्थात त्या वेळचे सरकारच परकीय असल्याने अशी अपेक्षा करणेही योग्य ठरणार नाही. स्वातंत्र्यानंतर मुंबई सरकारचे उद्योगांच्या वाढीकडे लक्ष गेले. १९४५ साली यासाठी एक समिती नेमण्यात आली आणि १९४६ साली या समितीने अहवाल दिला. या अहवालानुसार उद्योगांना आर्थिक मदत देणे, सवलती देणे, तांत्रिक शिक्षणाची सोय करणे, पायलट प्लँट जेथे शक्य असेल तेथे सुरू करणे आणि कारखान्यांकरिता वसाहती निर्माण करणे हे सरकारने आपले धोरण म्हणून स्वीकारले आणि त्यानुसार कार्यवाही चालू केली. पुढे १९५७ साली मुंबई राज्याची पुनर्रचना होऊन विशाल द्वैभाषिकाची रचना झाल्यावर सबंध राज्याची औद्योगिकदृष्ट्या पाहणी करून एक मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. या मास्टर प्लॅनमध्ये राज्याच्या कोणत्या भागात कोणते उद्योगधंदे काढता येतील हे तेथील स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीची पाहणी करून ठरविण्यात आले होते. या प्लॅनमुळे प्रथमच महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांची औद्योगिकदृष्ट्या पाहणी झाली व औद्योगीकरणाचा बराचसा तपशीलही ठरला. याच कालात मुंबई राज्य वित्त मंडळाची स्थापना झाली आणि राज्यातील लहान व मध्यम उद्योगधंद्यांना मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे मिळण्याची एक सोय झाली. शिवाय या कालात कोयना प्रकल्पाची कार्यवाही झाल्यामुळे विजेचे महाराष्ट्रातील दुर्भिक्ष बरेचसे नाहीसे झाले.

पण महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाला खरी चालना मिळाली महाराष्ट्र राज्य झाल्यानंतर. उद्योगधंद्यांना आकर्षित करण्यासाठी निरनिराळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी करमाफी, जमीन, पाणी यांची उपलब्धता आणि प्रलोभने दाखविली, औद्योगिक वसाहती ठिकठिकाणी स्थापण्यास राज्य सरकारने उत्तेजन दिले आणि औद्योगिक वाढीला पोषक असे एकंदर वातावरण तयार केले. एवढेच करून राज्य सरकार थांबले नाही तर त्यांनी औद्योगिक वाढीला साहाय्यभूत होण्यासाठी अनेक नव्या संस्था निर्माण केल्या. राज्यात ठिकठिकाणी औद्योगिक वसाहती आणि औद्योगिक क्षेत्रे निर्माण करण्यासाठी १९६२ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली. औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे आणि कारखान्यांना जमीन, रस्ते, पाणी, वीज आणि इतर सुखसोई उपलब्ध करून देणे हे या मंडळाचे प्रमुख कार्य आहे. ठाणे, पुण्याजवळ भोसरी, रत्नागिरी, रोहा, नांदेड इत्यादी अनेक ठिकाणी या मंडळातर्फे औद्योगिक क्षेत्रांचा विकास करण्यात आला आहे.

१९६२ साली राज्य सरकारकडून महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळातर्फे लघुउद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा,

उत्पादन केलेल्या मालाची विक्री, निर्यात, भाडे, खरेदी योजनेच्या तत्त्वावर यंत्रांचा पुरवठा वगैरे बाबतीत सक्रिय मदत दिली जाते. अगदी थोड्या अवधीत हे महामंडळ देशातील एक आघाडीचे राज्य बनले.

अविकसित भागात उद्योगधंदे आकृष्ट करण्याकरिता राज्य सरकारने १९६६ साली सिकॉमची स्थापना केली. अविकसित भागातील उद्योगधंदे आकर्षित करणे, या उद्योगांना दुसऱ्या अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या कर्जासाठी हमी देणे, उद्योगधंद्यांच्या भाग भांडवलात प्रत्यक्ष सहभागी होणे या स्वरूपात सिकॉमकडून आर्थिक सहाय्य दिले जाते. याचा उपयोग होऊन आता नागपूर आणि नाशिक या ठिकाणी अनेक नवे कारखाने होऊ घातले आहेत.

या तीन संस्थांच्या बरोबरीनेच लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीच्या कराराने अर्थपुरवठा करण्याच्या कामी राज्य वित्तीय महामंडळ फार उपयुक्त ठरले आहे.

या संस्थांचे साहाय्य राज्यातील उद्योगांना बरेच झाले आहे. त्यांच्या कारभारात काही दोष आहेत. दैनंदिन व्यवहारात कारखानदारांना काही अडचणी येतात हे जरी खरे असले तरी या सर्व संस्थांनी केलेले भरीव कार्य कोणालाही नाकारता येणार नाही. त्याच बरोबरीने राज्य सरकारच्या उद्योग खात्यालाही श्रेय द्यावयास हवे. उद्योगांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना कच्चा माल, विजेची उपलब्धता, भांडवल, मालाची विक्री या बाबतीत त्यांना मदत करण्यात उद्योग खात्याचे बरेच साहाय्य झाले आहे. शिवाय आता महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांत जाऊन उद्योगमंत्र्यांनी औद्योगिक परिषदा घेऊन, स्थानिक आणि संबंधित अधिकाऱ्यांना आणि कारखानदारांना बोलावून विचारविनिमय करण्याची प्रथा पाडल्याने त्याचाही बराच उपयोग झाला आहे. शिवाय आता विभागीय औद्योगिक सल्लागार मंडळे नेमण्यात आली असल्याने तेथेही आपल्या अडचणी किंवा प्रश्न घेण्याची सोय झाली आहे.

राज्याच्या औद्योगीकरणाच्या दृष्टीने राज्य सरकारने ही जी पावले टाकली आहेत त्याची नोंद अवश्य घ्यावयास हवी आणि त्यामुळे राज्यातील उद्योगांची संख्या वाढण्यास निश्चित मदत झाली आहे, हेही कबूल करावयास हवे. गेल्या पंचवीस वर्षांतील ही सर्वांत मोठी घटना आहे असे म्हणावे लागेल.

औद्योगिक वसाहती

औद्योगिक वसाहतीमुळेही औद्योगिक वाढीला बरीच चालना मिळाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी जरी औद्योगिक वसाहतींची कल्पना निघाली तरी १९६० नंतरच अनेक वसाहतींची कार्यवाही झाली. या वसाहती पुढील तीन प्रकारच्या आहेत :

(१) राज्य सरकारने संघटित केलेल्या वसाहती.

(२) स्थानिक संस्थांनी संघटित केलेल्या वसाहती.

(३) सहकारी संस्थांनी संघटित केलेल्या वसाहती.

चौथ्या योजनेच्या प्रारंभापर्यंत ६९ औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे लक्ष्य ठरले. त्यांपैकी ५२ या कंपनी क्षेत्रात असून पर्वती, कांदिवली आणि पैठण या वसाहती सरकारने स्थापावयाच्या आहेत. डिसेंबर १६८ पर्यन्त १४२१ शेड्स या वसाहतीतून बांधलेल्या होत्या. १३२५ शेड्स कारखानदारांना दिल्या असून त्यांपैकी १०६३ शेड्स-मधून उत्पादन चालू असून तेथे १५,४०२ कामगारांना काम मिळाले. ही आकडेवारी जरी मोठी वाटत असली तरी यापैकी शेड्स मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर या भागात आहेत तेथेच फक्त उत्पादन चालू आहे. एक काळ असा होता आणि अजूनही पुष्कळांना असे वाटते, की आपल्या गावी औद्योगिक वसाहत असणे म्हणजे गाव पुढारलेले असल्याचे एक लक्षण. म्हणून राजकीय आकांक्षेच्या पोटी बऱ्याच राजकीय नेत्यांनी आपल्याही भागात औद्योगिक वसाहती स्थापण्याचा आग्रह धरला. याचा परिणाम एकच झाला–वसाहतीत शेड्स बांधून तयार आहेत पण कारखाने नाहीत अशी अवस्था झाली. औद्योगिक वसाहतीपेक्षा या राजकीय वसाहतीच ठरल्या !

वीज, रस्ते, तांत्रिक शिक्षण

महाराष्ट्रात गेल्या दहा-पंधरा वर्षांत उद्योगधंदे वाढण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे पुणे, कोल्हापूर यांसारख्या काही ठिकाणी उद्योगधंद्यांना आवश्यक अशा सर्व सुखसोयी पूर्वीच उपलब्ध होत्या. वीज, रस्ते, तांत्रिक शिक्षण, भरपूर पाणी, जागा या सोयी पुरेशा प्रमाणात असणे हेही औद्योगिक वाढीच्या दृष्टीने आवश्यक आहे. या दृष्टीने महाराष्ट्र राज्याची पावलेही योग्य दिशेने पडली आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी विजेचा पुरवठा खाजगी कंपन्यांकडून केला जात होता. त्यामुळे फक्त काही शहरी भागातच वीज होती आणि धंद्याच्या दृष्टीने परवडण्यासारखे नसल्याने ग्रामीण भागात वीज नेण्याचा कोणी प्रयत्नच केला नव्हता. पण १९४८ साली महाराष्ट्र राज्य वीज मंडळाची निर्मिती झाली आणि वीज उत्पादनाचे व वाटपाचे काम सरकारने हाती घेतले. मुळशी येथील वीज निर्मितीची टाटांची योजना, कोल्हापुराजवळ राधानगरी येथील वीज निर्मितीची योजना, विदर्भात खापरखेडा व बल्लारशहा येथील लहान योजना आणि ठिकठिकाणी शहराशहरातून वीजनिर्मितीची असलेली व्यवस्था असे चित्र पंचवीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात होते. परंतु आता हे चित्र पूर्ण पालटले आहे. कोयनेसारखी वीजनिर्मितीची प्रचंड योजना, अणुशक्तीवरील वीजनिर्मितीची तारापूर येथील योजना, खापरखेडा, पारस, बल्लारशहा येथील औष्णिक वीजनिर्मितीत केलेली वाढ, एल्डारी (मराठवाडा) येथील नवीन योजना असे अनेक प्रकल्प या कालात घेण्यात आले. १९६० साली ७०,००० किलोवॅट वीज राज्यात निर्माण होत होती, तर १९६९ मध्ये ८, ६६, ४०० किलोवॅट वीज-निर्मिती करण्यात आली.

वीज-वाटपातही अनेक सुधारणा करण्यात आल्या. अनेक शहरांतील वाटप वीज बोर्डाने आपल्याकडे घेतले. इतर शहरातील वीज कंपन्यांना वाटपासाठी वीज पुरविण्यास सुरुवात केली आणि सुमारे ११,००० खेड्यांतून वीज दिली व १,५०,००० इलेक्ट्रिक पंपांना वीज पुरवठा केला. विजेचा भरपूर पुरवठा असल्याने महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाला चांगलीच चालना मिळाली.

या दहा-पंधरा वर्षांत रस्त्यांची अनेक नवी कामे हाती घेण्यात आली. त्यामुळे दळणवळण वाढण्यास मदत झाली. परंतु अजूनही या बाबतीत बरीच प्रगती व्हावयाची आहे. भारतातील रस्त्यांची एकंदर सरासरी १०० चौरस मैलाला २७ किलो मीटर आहे, तर महाराष्ट्रात हे प्रमाण फक्त १८ किलोमीटर आहे. शिवाय महाराष्ट्रातील सर्व रस्ते मुंबईला जोडणारेच आहेत. एकमेकात दळणवळणाला सोईस्कर रस्ते नाहीत. निरनिराळ्या भागांना जोडणारी रेल्वे नाही. मुंबई, पुणे, नागपूर नि औरंगाबाद ही गावे सोडली तर कोठेही विमान-वाहतूक नाही. त्यामुळे मुंबईच्या आसपासच्या दळणवळणाच्या सोईच्या दृष्टीने असणाऱ्या पुणे शहराची औद्योगिक वाढ प्रथम झाली, आता नाशिक वाढू पाहात आहे. औद्योगिक विकेन्द्रीकरणाच्या दृष्टीने मोठे रस्ते व नीट दळणवळण नसल्याने मोठीच अडचण निर्माण झाली आहे.

तांत्रिक शिक्षणाच्या सोईच्या दृष्टीने महाराष्ट्र-राज्य पूर्वीपासून आघाडीवर आहे. सर्व तऱ्हेच्या शैक्षणिक सोई येथे उपलब्ध आहेत आणि गेल्या दहा-पंधरा वर्षांत यांत भरही पडत आहे. औद्योगिक कामगारांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याच्या योजनाही राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर हाती घेतल्या आहेत. त्यामुळे तंत्रज्ञांचा तुटवडा महाराष्ट्र राज्यात पडला नाही. वाढत्या औद्योगीकरणामुळे कसबी कामगारांच्या, तंत्रज्ञांच्या नि व्यवस्थापकांच्या गरजा वाढल्या त्या सर्व पुरविल्या गेल्या.

कामगारविषयक कायदे

राज्याच्या औद्योगिक वाढीबरोबरच औद्योगिक कामगारांच्या कल्याणविषयक अनेक कायदे करून त्यांना संरक्षण देण्यात आले. पंचवीस वर्षांपूर्वी फॅक्टरीज ॲक्ट आणि वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट हे दोन कामगारविषयक कायदेच अस्तित्वात होते. पण स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हिताचे अनेक कायदे करण्यात फॅक्टरीज ॲक्ट नव्याने करण्यात आला. दुकाने व संस्था यांतील कामगारांसाठी वेगळा कायदा करण्यात आला. औद्योगिक कलह कायदा (१९४७), मुंबई औद्योगिक संबंध कायदा (१९४६), किमान वेतन कायदा (१९४८), मोटार ट्रॅन्स्पोर्ट वर्कर्स ॲक्ट (१९६१), विडी कामगार कायदा (१९६६) असे अनेक कायदे करण्यात आले. राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक शहरातील कामगारांच्या राहणीमानाची पाहणी करून त्यांच्यासाठी राहणी-मानाच्या निर्देशांकाची व्यवस्था केली. आता या निर्देशांकांप्रमाणे कामगारांना महागाई भत्ता देण्याची व्यवस्था अनेक कारखान्यांतून झाली आहे. याशिवाय कामगार कल्याण-

विषयक अनेक योजना या कालात कार्यान्वित झाल्या. कामगार विमा योजना सर्व प्रमुख औद्योगिक शहरांना लागू करण्यात आली, कामगारांसाठी क्रीडास्पर्धा व नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांना आता कामगारांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

नवीन कारखानदारांचा वर्ग

साधारणपणे महाराष्ट्रीय माणूस म्हणजे नोकरीपेशाच्या मागे लागणारा, व्यापार नि उद्योग यांच्याकडे लक्ष न देणारा असा समज होता नि बऱ्याच अंशी तो खराही होता. पण आता गेल्या दहा वर्षांत अनेक महाराष्ट्रीय तरुण उद्योगात पडलेले दिसतात. विशेषतः मुंबई, पुणे किंवा कोल्हापूर या राज्याच्या प्रगत भागात अनेक महाराष्ट्रीय उद्योगधंद्यात यशस्वी झालेले दिसतील. मुंबई किंवा काही प्रमाणात पुणे येथे परप्रांतीय उद्योगपतींचे प्रमाण अजूनही बरेच आहे. परंतु कोल्हापूरसारख्या ठिकाणी हे आढळणार नाही. प्रत्यक्ष कारखान्यात कामगार म्हणून काम करीत असताना तेथील तांत्रिक अनुभव घेऊन मग लहानशा प्रमाणात कारखाने काढलेले आणि नंतर यशस्वी झालेली अनेक कारखानदार मंडळी तेथे दिसतील.

तांत्रिक अनुभव गाठीशी असल्याने या लोकांचे जरी प्रत्यक्ष शाळाकॉलेजातून तांत्रिक शिक्षण झाले नसले तरी त्यांनी आपापल्या क्षेत्रात अनेक तांत्रिक करामती करून दाखविल्या आहेत आणि ही गोष्ट निःसंशय कौतुकास्पद आहे यात शंका नाही. पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी तर देशांतील किंवा परदेशातील उच्च शिक्षण घेऊन आलेले अनेक तरुण इलेक्ट्रॉनिक्स, शास्त्रीय नि यांत्रिक उपकरणे, शैक्षणिक नि संशोधनासाठी लागणाऱ्या वस्तू, वैद्यकीय उपकरणी, रसायने इत्यादी अनेक नवनवीन क्षेत्रात जिद्दीने पदार्पण करीत आहेत. उच्च प्रकारचे तांत्रिक ज्ञान नि कौशल्य लागणाऱ्या वस्तूंचे ते उत्पादन हाती घेत आहेत आणि त्यातील अनेक लोकांनी यात चांगले नाव मिळविले आहे. ही गोष्ट आशादायक आहे यात शंका नाही. पण ही सर्व मंडळी नव्या उत्पादन व्यवसायात गढून गेलेली आहेत. व्यापार-व्यवसायात मात्र अजून मराठी मंडळी अभावानेच तळपताहेत हे मात्र नाकारता येत नाही.

महाराष्ट्रात संशोधनात्मक बुद्धी फार मोठ्या प्रमाणात आहे. नवनवीन डिझाइन्स किंवा प्रक्रिया शोधून काढून दरसाल पेटंट्स मिळविणाऱ्यांत महाराष्ट्रीय मंडळी बऱ्याच मोठ्या प्रमाणात दिसतात. सालोसाल पेटंट्सची यादी पाहिली तर त्यात सुमारे तीस ते चाळीस टक्के नावे महाराष्ट्रीयांची दिसतील. इन्व्हेन्शन प्रमोशन बोर्डाच्या बक्षिसांच्या मानकऱ्यांतही मराठी नावे बरीच आढळतील. पण ही सारीच पेटंट्स व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी होतात असे नाही. पण तांत्रिक बुद्धिमत्तेत महाराष्ट्र पुढे आहे हे दाखविण्यासाठी याचा येथे उल्लेख केला इतकेच.

औद्योगिक वाढीचे काही प्रश्न

गेल्या पंचवीस वर्षांतील औद्योगिक वाढीमुळे काही प्रश्न राज्यापुढे उभे राहिले आहेत. त्याचाही उल्लेख येथे थोडक्यात केल्यास अप्रस्तुत ठरू नये. आपण यापूर्वी पाहिलेच आहे की, उद्योगांचे बहुतेक केंद्रीकरण मुंबई-पुणे विभागात झाले आहे. राज्यातील एकूण कारखान्यांपैकी ५० टक्के कारखाने आणि ६० टक्के कामगार एकट्या बृहन्मुंबईत आहेत. मुंबई व पश्चिम महाराष्ट्र घेतल्यास ८७ टक्के कारखाने व ९२ टक्के कामगार या भागात आहेत असे दिसून येते. मुंबई, ठाणे, कल्याण, पनवेल, खोपोली आणि पुणे, पिंपरी, चिंचवड या भागात बहुतांशी हे सर्व कारखाने आहेत. यामुळे दोन प्रश्न उभे राहिले आहेत. एक या भागातील वाढत्या नागरीकरणाचा आणि दुसरा विकेंद्रीकरणाचा.

मुंबईतील वाढत्या कारखानदारीमुळे वाहतूक, जागांची टंचाई, पाण्याची टंचाई, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, सामान्य माणसाचे सामाजिक प्रश्न असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांचा आतापर्यंत अनेक वेळा विचार करण्यात आला. अनेक समित्यांनी शिफारशी केल्या. परंतु प्रत्यक्ष त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. मुंबईखालोखाल पुण्याच्या आसपासही औद्योगिक वाढ झपाट्याने होऊ लागली. त्यामुळे पुण्यापुढे आणि पुण्यासारख्या इतर वाढत्या शहरांपुढे मुंबईचेच प्रश्न पुनः येऊ नयेत म्हणून काही कार्यवाही करणे आवश्यक वाटू लागले. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आणि या समितीने १९६५ साली आपला अहवाल सादर केला. या समितीच्या शिफारसीनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना कायदा १९६६ साली करण्यात आला. मुंबई, पुणे, नागपूर या शहरांसाठी प्रादेशिक नियोजन मंडळे नेमण्यात आली आणि या मंडळांनी सर्व संबंधितांच्या सल्ल्याने आपापल्या भागाच्या प्रादेशिक नियोजनासंबंधी योजना तयार करून शिफारसी केल्या आहेत. या शिफारसीनुसार आता कार्यवाही व्हावयाची आहे. शहराचे चांगले नियोजन करावयाचे झाल्यास फक्त त्या शहरापुरताच विचार करून चालत नाही तर त्या शहराच्या आसपासचा व शहरावर अवलंबून असलेल्या सबंध प्रदेशाचा विचार करून एकंदर नियोजन केले पाहिजे. ही या पाठीमागील कल्पना. आतापर्यंत मुंबई व पुणे या भागातील प्रादेशिक नियोजन मंडळांनी आपल्या योजना तयार केल्या असून त्यांच्या शिफारसी अमलात आणल्यास वाढत्या नागरीकरणामुळे होणारे बरेच प्रश्न टाळण्यास मदत होईल असे वाटते.

विकेंद्रीकरणाचे प्रश्न

मुंबई, पुणे या भागात सर्व उद्योगांचे केंद्रीकरण झाल्यामुळे महाराष्ट्राच्या इतर भागांत हे उद्योगधंदे कसे आकर्षित होतील, त्यांना या वाढत्या औद्योगीकरणाचा

कसा फायदा मिळेल हाही राज्य सरकारपुढील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. १९६४ साली राज्य सरकारने मागास विभागात कारखाने सुरू केल्यास अनेक सवलती देण्याचे जाहीर केले. त्यात जकात करात सूट, विक्री करात सूट, विजेवरील करात सूट, प्राजेक्ट रिपोर्टच्या खर्चाच्या काही भागाइतके अनुदान, घर बांधणीसाठी अग्रक्रम इत्यादी अनेक सवलती जाहीर करण्यात आल्या होत्या. पण त्याला पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून अविकसित भागात उद्योगधंद्यांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारने सिकॉमची स्थापना केली. सिकॉमच्या भांडवल भागीदारी योजनेनुसार एखाद्या तंत्रज्ञाचे स्वतःचे २० टक्के भांडवल असले की नवा उद्योग सुरू करता येतो. व्यापारी बँकांना हमी देऊन आणि स्वतः भांडवल पुरवून बाकीच्या भांडवलाची गरज भागविली जाते. या योजनेनुसार सुमारे १०७ उद्योगांची ६ कोटी रुपयांची गुंतवणूक अविकसित भागात होणार आहे. या योजनेखेरीज मुंबई, पुणे येथील मोठ्या उद्योगधंद्यांनी अविकसित भागात जावे म्हणून राज्य सरकारने उद्योगधंद्यांनी सरकारला भरलेला विक्री कर दीर्घ मुदतीच्या, बिनव्याजी व विनातारण कर्जाच्या स्वरूपात त्यांना परत मिळण्याची सवलत जाहीर केली आहे. हे कर्ज अर्थात अविकसित भागात नवीन उद्योगधंदे चालू करण्यासाठीच फक्त उपयोगात आणावयाचे आहे. याशिवाय जकात दर, पाणीपट्टी, वीजकर याबाबतच्या इतर सवलतीही या योजनेत आहेत. या योजनेबद्दल बरेच औत्सुक्य असून अविकसित भागाचा औद्योगिक विकास होण्याच्या कामी या योजनेमुळे मोलाची प्रगती होण्याची शक्यता आहे. याखेरीज अविकसित भागात कोठे काय सोई आहेत, तेथे उद्योगधंदे सुरू करणे कसे शक्य किंवा फायदेशीर आहे याचा पद्धतशीरपणे प्रचार ' सिकॉम ' तर्फे केला जातो. नाशिक, नागपूर किंवा औरंगाबाद या शहरी नवे उद्योग सुरू करण्यासाठी सिकॉम बरेच प्रयत्न करीत आहे. राज्य सरकारने विकेंद्रीकरणासाठी याप्रमाणे बरेच प्रयत्न चालविले आहेत.

ग्रामीण भागाचे औद्योगीकरण

विकेंद्रीकरणाबरोबर आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे तो म्हणजे ग्रामीण भागात नवे उद्योग कसे सुरू करता येतील ते पाहणे. फार मोठे औद्योगिक प्रकल्प हातीं घेण्याची कल्पना यामागे नाही तर शेतीला पूरक आणि ग्रामीण भागात रोजगार मिळेल असे नवे छोटे उद्योगधंदे काढण्याचा विचार करणे यासंबंधात आवश्यक आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे राज्यात ठिकठिकाणी अशा अनेक योजना चालू आहेत. त्याखेरीज नियोजन मंडळातर्फे वर्धा, संगमनेर, लातूर आणि वेंगुर्ला येथे ग्रामीण उद्योग प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. सांगली, यवतमाळ आणि नांदेड येथे औद्योगिक सोसायट्या काढून त्यांच्याकडे ग्रामीण उद्योगांचे काम देण्यात आले आहे. पण या सर्व प्रकल्पांचे यश मर्यादित आहे. खऱ्या अर्थाने कोणत्याही ग्रामीण भागात औद्योगीकरण झाले आहे किंवा तेथील रोजगारीचा प्रश्न सुटला आहे असे म्हणता येणार नाही. खरे म्हणजे

ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांचे उत्पन्न इतके तुटपुंजे असते की, स्थानिक मागणी-नुसार काही उद्योग सुरू करता येत नाहीत. ग्रामीण भागाबाहेरील मागणीही विचारात घेतली तर ग्रामीण भागातील छोट्या माणसापुढे विक्री कशी करावयाची हाही प्रश्न येतो. सहकारी पद्धतीने संघटित होऊन शेतीमालावरील प्रक्रिया करण्याच्या मध्यम योजना कार्यान्वित करणे हे एक शक्य आहे. परंतु खरे पाहिले असता शेतीचे उत्पन्न निश्चित आणि खात्रीचे झाल्याखेरीज औद्योगिक प्रगतीला फारसा वाव नाही. वेळ पडली तर मोडून खावयाचे याच हेतूने सध्या पैसा गुंतविला जातो. शेतीच्या उत्पन्नाबाबत निश्चिती झाल्याखेरीज नवे भांडवल उभे करणे आणि चालू भांडवलांचा योग्य उपयोग करणे शक्य होणार नाही. महाराष्ट्रात जिराईत शेतीचे बरेच मोठे प्रमाण असल्यामुळे हा एक यक्ष प्रश्न आहे. शिवाय प्रत्येक ग्रामीण भागात उद्योग सुरू करणे शक्य नाही. असे प्रयत्न यशस्वीही होणार नाहीत. तेव्हा काही भाग यासाठी निवडून तेथेच नीट प्रयत्न करणे हाच एक उपलब्ध मार्ग आहे.

महाराष्ट्राची शेती बदलते आहे !

आनंद बापूराव पाटील

'महाराष्ट्र अमुचा महान' असे आपण अभिमानाने म्हणतो. अनेक बाबतींत हा अभिमान सार्थ ठरतो. महाराष्ट्राच्या पाठीशी अनेक परंपरा आहेत. अशा या महाराष्ट्रात शेतीचेही विविध पैलू दृष्टीस पडतात. चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि कंधारपासून कुलाब्यापर्यंत असा हा महाराष्ट्राचा विशाल भूप्रदेश आहे. भाषा, इतिहास, सामाजिक परंपरा, नात्यागोत्याचे संबंध या धाग्यांनी महाराष्ट्र एकत्र जोडलेला आहे. तर भौगोलिक रचना, भौतिक परिस्थिती, स्थानिक रीतिरिवाज यांनी महाराष्ट्राच्या एकतेला विविधतेची जोड दिली आहे.

शेतीचीच गोष्ट घ्या ना. कोकणातील शेती म्हणजे प्रमुख्याने भातशेती. एका बाजूला डोंगराची आडवी भिंत व दुसऱ्या बाजूला अथांग दर्या यांच्यामध्ये एखाद्या वळचणीसारखी कोकणची भूमी आहे. पन्नास-पंचावन्न मैलांपेक्षा ती कोठेही अधिक रुंद नाही. पावसाळ्यात पाऊस म्हणजे दगडफोड, तर उन्हाळ्यात दगड फोडले तरी पाणी मिळत नाही. हवा ओली व दमट. जमिनीला सर्वत्र चढउतार. तीत कस कमी. डोंगरउतरणीवर जेथे थोडीशी सपाटी सापडेल अशा ठिकाणी अवघडून बसल्यासारखी भाताची खाचरे. कोकणच्या शेतीचे चित्र असे आहे. मुख्य पिके भात आणि तेही वर्षातून एकदाच. नाही म्हणायला नागली, वरी, सावा, राळा, कोद्रा यासारखी हलकी धान्यपिके त्याच्या जोडीला काढण्यात येतात.

वैशाखात तेथे जमिनीचा राब करतात, म्हणजे जमीन भाजतात. या भाजावळीपासून भाताच्या पिकाची मशागत सुरू होते. शेणकूट आणि झाडाझुडपांचे कवळ घालून जमीन भाजून काढतात. पेरभात व लावणीचे भात असे भाताच्या पिकाचे दोन प्रकार आहेत. शेतातच बी पेरून काढलेले पीक म्हणजे पेरभात, तर प्रथम वाफ्यात रोप करून नंतर ही रोपे खाचरात लावून काढलेले पीक हे लावणीचे पीक असते.

लावणीचे पीक जास्त असते. पावसाच्या पहिल्या सरी येऊन गेल्या की भाजून काढलेल्या वाफ्यात भात पेरायचे. त्याचबरोबर शेत नांगरून, ढेकळे फोडून माती मऊसूत करून घ्यायची. या वेळेपर्यंत वाफ्यात रोप तरारून आलेले असते. मग धो धो पावसात डोक्यावर इरली घेऊन बाप्ये आणि बाया वाफ्यातील रोपांच्या पेंढ्या उकलून चौढ्यात दोन दोन चार चार रोपे लावीत जातात. वाऱ्यापावसाचा मार खात भाताचे पीक मजेत वाढत राहते. मोठे होते. मग दसऱ्याच्या सुमारास भाताची लोंबरे पिकून पिवळी पडली की त्याची काढणी व झोडणी करतात. आता मिळाले ते भात. हे भात नंतर कांडून किंवा घिरटात घिरडून निखळ तांदूळ मिळतो. नागली, वरी या पिकांना इतका त्रास पडत नाही. वरकस म्हणजे हलक्या मगदुराच्या जमिनीत ही पिके काढतात.

उत्तर आणि दक्षिण कोकणातील शेतीत थोडा फरक आहेच ! उत्तर कोकण म्हणजे ठाणे व कुलाबा हे जिल्हे. उल्हास, सावित्री व वासिष्ठी या नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाने या भागातील जमीन अधिक सुपीक व सपाट झाली आहे. या जिल्ह्यांत पोफळीच्या (नारळीच्या) बागा अनेक दिसतात. या भागातील भाताचे पीक अधिक चांगले असते. त्याचे उत्पादनही भरपूर येते. दक्षिण कोकणातील म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील जमीन जांभ्याच्या दगडापासून बनलेली आहे. ही जमीन गेरूसारखी तांबडी दिसते. हा भाग अधिक डोंगराळ आहे. त्यामुळे तेथील शेती अधिक कष्टाची आहे. पण याच भागात कोकणचा जगप्रसिद्ध हापूस अंबा पिकतो, ज्याला परदेशातही मोठे मोल आहे तो बहुगुणी काजू तेथल्या रानावनात होतो, तर ' भटो, भटो कोकणातून काय आणले ' या गोष्टीने महाराष्ट्रातील मुलाबाळांना ज्याची पहिली ओळख होते तो फणसही याच भागात भरपूर पिकतो.

सह्याद्रीच्या पूर्वेस दख्खनचे विस्तीर्ण पठार पसरले आहे. उत्तरेस पुडामागून पुडे खोलून बनलेला सातपुडा आणि पश्चिमेस उभ्या दांड्यासारखा सरळसोट गेलेला सह्याद्री या दोन पर्वतांनी हे त्रिकोणी पठार उचलले आहे. कृष्णा, गोदावरी, भीमा, तापी, पूर्णा, वैनगंगा, वर्धा या मोठ्या नद्या व त्यांना मिळणाऱ्या अनेक लहान नद्या यांच्या पाण्याने या पठाराची भूमी नित्य भिजते. त्यातच महाराष्ट्राची शेती पिकते.

एवढ्या ह्या विस्तीर्ण प्रदेशात नाना प्रकारची शेती व पिकाचे नाना प्रकार आढळल्यास त्यात नवल काय ? प्रत्येक पिकाच्या लागवडीचे वेळापत्रक वेगळे असते. पण सामान्यतः मशागतीची कामे थोड्याफार फरकाने सगळीकडे सारखीच असतात. विदर्भात वर्धेच्या काठाकाठाने काळ्याशार वावरातून फिरा किंवा मराठवाड्यात गोदेच्या तीरावरील दाणेदार जोंधळ्याच्या शेतातून हिंडा, किंवा दक्षिण महाराष्ट्रात कृष्णा-काठचा काहीसा ओबडधोबड मुलूख पायांखाली घाला, शेतकामाचा तोच रगडा व तेच चक्र तुम्हांला आढळेल. फाल्गुन-चैत्रापर्यंत पहिले पीक काढून झाल्यावर वैशाखात वावराला लाहीलाही करणाऱ्या उन्हाची ताप देण्यात येते.

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ १,१८,४५९ चौरस मैल आहे. एकराच्या हिशेबात

सांगायचे म्हणजे राज्याचे एकूण क्षेत्रफळ ७ कोटी ६० लाख एकर एवढे आहे. यापैकी पीक लागवडीखालील एकूण क्षेत्र ४ कोटी ५१ लाख ५० हजार एकर म्हणजे एकूण क्षेत्राच्या ५९·४ टक्के झाले आहे.

धान्याच्या दृष्टीने पाहिले तर ज्वारी हे महाराष्ट्राचे प्रमुख धान्य पीक आहे. सबंध भारतात ज्वारीच्या पिकाखालील एकूण ४१४ लाख एकर जमीन असून त्यापैकी १५५·३ लाख एकर म्हणजे ३७ टक्के क्षेत्र एकट्या महाराष्ट्रात आहे. खरीप ज्वारी आणि रब्बी ज्वारी अशी ही दोन पिके आहेत. खरीप ज्वारीखाली ६७ लाख एकर, तर रब्बी ज्वारीखाली ८८·५ लाख एकर क्षेत्र आहे. खरीप ज्वारी ही मुख्यतः वऱ्हाड व मराठवाडा या भागात होते. यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला, नागपूर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड व पश्चिम महाराष्ट्रातील सांगली हे खरीप ज्वारी पिकविणारे मुख्य जिल्हे आहेत. सोलापूर, पुणे व अहमदनगर या तीन जिल्ह्यात महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक रब्बी ज्वारीचे क्षेत्र आहे. त्याशिवाय बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद, परभणी, नांदेड, सातारा, सांगली, धुळे व नागपूर या जिल्ह्यांत रब्बी ज्वारी होते.

ज्वारीच्या खालोखाल बाजरीचा क्रमांक लागतो. राज्यात बाजरीच्या पिकाखाली एकूण ४६ लाख ७० हजार एकर जमीन आहे. हे क्षेत्र भारतातील बाजरीच्या पिकाखालील क्षेत्राच्या १६ टक्के आहे. नाशिक, धुळे, जळगाव, पुणे व अहमदनगर या जिल्ह्यांत अधिक बाजरी होते. विदर्भात बाजरीचे फार थोडे क्षेत्र आहे.

धान्य-पिकात भाताचा तिसरा क्रमांक लागतो. भाताखाली महाराष्ट्रात २३ लाख ९० हजार एकर जमीन आहे. भारतातील भाताच्या एकूण क्षेत्राच्या ३·६ टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. भंडारा, चांदा, ठाणे, रत्नागिरी, कुलाबा, पुणे, कोल्हापूर व सातारा हे भात पिकविणारे प्रमुख जिल्हे आहेत. विदर्भातील ९३ टक्के भाताचे क्षेत्र भंडारा व चांदा जिल्ह्यात आहे.

महाराष्ट्रात गव्हाखाली २१ लक्ष ६० हजार एकर क्षेत्र आहे. कोरडवाहू आणि बागायत असा दोन्ही प्रकारचा गहू घेतला जातो.

इतर धान्यपिकांत तूर व हरभरा या पिकांचा उल्लेख करणे जरूर आहे. महाराष्ट्रात तुरीखाली १३ लाख एकर आणि हरभऱ्याचे स्वतंत्र पीक घेण्याची पद्धत आहे. पण तूर, चवळी, मटकी, मसूर, उडीद यांसारखी कडधान्याची पिके ही इतर पिकांबरोबर मिश्रपिके म्हणून घेतात. राज्यात कडधान्याच्या पिकाखाली ५७ लाख ९० हजार एकर क्षेत्र आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्रात अन्नधान्ये व कडधान्ये या पिकाखाली एकूण ३ कोटी २७ लाख १० हजार एकर क्षेत्र आहे.

रोखीची किंवा पैशाची पिके ज्याला म्हणतात त्यात कापूस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे पीक आहे. महाराष्ट्रात कापसाखाली ६५ लाख ९० हजार एकर क्षेत्र आहे. रोखीचे दुसरे महत्त्वाचे पीक म्हणजे भुईमूग आहे. महाराष्ट्रात भुईमुगाखाली व इतर तेलबिया यांखाली ३३ लाख २० हजार एकर जमीन आहे.

महाराष्ट्राने ज्या पिकाचा अभिमान बाळगावा असे पीक म्हणजे ऊस होय. महाराष्ट्रात उसाखाली ४ लाख ३० हजार एकर क्षेत्र आहे. हे भारतातील उसाच्या क्षेत्राच्या सुमारे ५ टक्के आहे. तथापि उत्पादनाच्या दृष्टीने पाहिल्यास महाराष्ट्रातील गूळ साखरेचे उत्पादन भारतातील एकूण उत्पादनाच्या सुमारे २० टक्के आहे. तसेच दख्खन कालव्याच्या भागात पिकणाऱ्या उसाचे एकरी उत्पादन आणि उसातील साखरेचे प्रमाण हे भारतात सर्वांत अधिक आहे. तसे पाहिले तर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात थोड्याफार प्रमाणात ऊस पिकतो. तथापि अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, नाशिक, सोलापूर, सातारा व सांगली या जिल्ह्यांत उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. आता मराठवाड्यात व विदर्भातही उसाची लागवड वाढते आहे.

फळांच्या बाबतीत महाराष्ट्र मोठा भाग्यवान आहे. नानाप्रकारची रसाळ फळे ह्या भूमीत पिकतात. आंबा हा तर फळांचा राजा. आंब्याच्या अनेक जाती महाराष्ट्रात होतात. तथापि 'या सम हा' असे ज्याचे वर्णन करता येईल तो जगप्रसिद्ध हापूस आंबा कोकणच्या भूमीत अमाप पिकतो. त्याच्या जोडीला रसदार पायरी ही जात याच भागात होते. विदर्भात नागपूर आणि वर्धा या भागात पिकणारी संत्री सर्व आशिया खंडात उत्कृष्ट म्हणून समजली जातात. नाशिक, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यांत होणारी रसाळ द्राक्षे भारतातील अनेक बाजारपेठांत जातात. पुणे जिल्ह्यातील सासवड भागातील अंजिरांची गोडी अवीटच असते. ठाणे जिल्ह्यात पालघरच्या आस-पास होणारे चिक्कू साखरेलाही मागे टाकतील असे गोड असतात. केळी हे तर महाराष्ट्रातील सर्वांचे फळ आहे. वसईच्या केळ्यांचा स्वाद वर्णन करण्यापेक्षा तो चाखूनच पाहावा. भारतात सर्वोत्कृष्ट गणली गेलेली खानदेशी केळी आता वाजतगाजत परदेश-पर्यटनाला निघाली आहेत. कोकणच्या भूमीला तर फळांचे वरदानच आहे. तेथे आंब्याखेरीज नारळ, सुपारी, अननस, काजू, फणस इत्यादी नाना प्रकारची रसाळ फळे होतात. सीताफळे, रामफळे, पेरू, बोरे, चिंचा इत्यादी फळांचा काय हिशेब करायचा? ती तर सर्वत्र होतात. फळझाडे व भाजीपाला याखाली ३ लाख ८० हजार एकर क्षेत्र आहे.

महाराष्ट्रातील शेतीचे चित्र असे आहे. गेल्या २०–२५ वर्षांत हे चित्र सारखे बदलते आहे. नवनवे रंग त्यात भरले जात आहेत. त्यामुळे ते अधिकाधिक समृद्ध आणि संपन्न बनत आहे. हे कशा रीतीने घडले आणि घडत आहे याची माहिती आपणास करून घेतली पाहिजे.

महाराष्ट्रातील शेतीचा विचार करीत असताना आपण त्यातील समस्यांचाही विचार केला पाहिजे. कारण या समस्यांची सोडवणूक करूनच प्रगतीची वाटचाल करता येते.

महाराष्ट्राच्या शेतीची महत्त्वाची समस्या म्हणजे पाण्याची आहे. आपल्या राज्यातील पिकाखाली ४ कोटी ५१·५ लाख एकर जमीन आहे. त्यापैकी फक्त ६ टक्के

जमिनीला पाणीपुरवठ्याची सोय आहे. उरलेली ९४ टक्के जमीन जिरायती असून ती सर्वस्वी पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. ही सबंध जमीन तीन स्थूल अशा प्रदेशांत त्रिभागता येईल. (१) सरासरी पाऊसमान ६० ते २५० इंचापर्यंत असलेले कोकण आणि राज्याच्या पश्चिम व उत्तर बाजूकडील डोंगराळ व नापीक जमिनीचा टापू. (२) दुष्काळी टापू. या भागात १० इंचांहून कमी पाऊस पडतो. अशी जमीन सुमारे ३० टक्के आहे. म्हणजे एवढा मोठा भाग नेहमी दुष्काळाच्या दाढेखाली असतो. (३) जेथे सुमारे ३० ते ३५ इंच पाऊस पडतो आणि जेथील जमीन तुलनेने पाहता सुपीक म्हणता येईल तो उरलेला बाकीचा टापू. ह्यावरून असे दिसून येईल की, आपल्या शेतीची परिस्थिती मुळातच समाधानकारक नाही. शिवाय या परिस्थितीच्या बाबतीत पडणारी तफावतही फार मोठी आहे. यामुळे शेतकरी पूर्णपणे पावसाच्या व इतर नैसर्गिक शक्तींच्या अधीन राहतो. अर्थातच त्यामुळे त्याचे उत्पादनही त्याच्या नियंत्रणाबाहेरील गोष्टींवर अवलंबून राहते.

महाराष्ट्रात छोट्यामोठ्या अनेक नद्या आहेत. परंतु महाराष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे, मोठ्या नद्यांपैकी मुळा तापी सोडली तर बाकी सर्व नद्यांचा उगमाकडील भाग महाराष्ट्रात आला आहे. त्यांचा विस्तार वाढलेला आहे. तो त्यांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडल्यानंतर. शिवाय महाराष्ट्राची भूमी म्हणजे एक विस्तीर्ण पठार असून हे पठार पूर्व बाजूकडे खूपच कलंडलेले आहे. त्यामुळे पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या या नद्यांचे पाणी भराभर ओसरत जाऊन त्या रिकाम्या होण्यास वेळ लागत नाही. या नद्यांतून एकूण १३ कोटी ५० लाख एकर घनफूट पाणी वाहते. तथापि नियोजनाचा काळ सुरू होण्यापूर्वी या नद्यांवर धरणे बांधून अवघे ३.५ टक्के पाणी अडविले गेले होते.

अशा या परिस्थितीमुळेच महाराष्ट्राने ओलिताच्या विकासाचा योजनाबद्ध कार्यक्रम आखला आहे. परंतु महाराष्ट्र राज्य सिंचन मंडळाने (महाराष्ट्र स्टेट इरिगेशन बोर्ड) दाखवून दिल्याप्रमाणे राज्यातील पाणीपुरवठ्याची सुप्त शक्ती मर्यादित आहे. ही सर्व सुप्त शक्ती उपयोगात आणली तरी जास्तीत जास्त ३० टक्के (१५३ लाख एकर) जमीन ओलिताखाली आणली जाईल. ह्या सर्व कार्यक्रमासाठी सुमारे १५०० कोटी रुपये खर्च करावे लागतील आणि या कार्यक्रमाची पूर्तता करावयास २० ते २५ वर्षे लागतील.

पाणीपुरवठ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या बागायत जमिनीपैकी निम्म्यापेक्षा कमी क्षेत्राला कालव्याचे पाणी उपलब्ध आहे. उरलेल्या क्षेत्राला विहिरी व तळी ह्यांतूनच पाण्याचा पुरवठा होतो. हा पाण्याचा पुरवठा बहुशः हंगामी स्वरूपाचा असतो. त्यामुळे दीर्घ मुदतीची व भरपूर उत्पन्न देणारी अशी पिके काढण्यावर साहजिकच मर्यादा पडते.

दुसरी समस्या म्हणजे महाराष्ट्रातील अल्प जमीन-धारकांचे प्रमाण फार मोठे आहे. राज्यातील सुमारे ४३ लाख खातेदारांपैकी ४७ टक्के खातेदार अल्प जमीनधारक आहेत.

त्यांच्याकडे पाच एकरांपेक्षा कमी जमीन आहे. अशा या लहान शेतकऱ्यांची परिस्थिती गरिबीची असते. शेतीत सुधारणा करण्याची त्यांची इच्छा असली तरी त्यावर अनेक कारणांनी मर्यादा पडते. त्यामुळे ते गरीब राहतात आणि त्यांची शेतीही गरीब राहते.

महाराष्ट्रातील सर्वसाधारणपणे जमिनीचा विचार केला असता ती फार सुपीक आहे, असे म्हणता येणार नाही. कारण अनेक कारणांमुळे जमिनीची सतत धूप होत असते. अनेक ठिकाणी जमिनीची बांधबंदिस्ती करणे जरूर आहे. त्यामुळेच लागवडी-खालील ४·६० कोटी एकर जमिनीपैकी सुमारे ३·५० कोटी एकर जमिनीत बांध-बंदिस्तीची कामे होणे जरूर आहे.

अशा ह्या समस्या शेती-व्यवसायापुढे असतानाही महाराष्ट्र शासनाने शेती-व्यवसायात सुधारणा करण्याच्या दृष्टीने चांगली वाटचाल केली आहे. महाराष्ट्रातील अन्नधान्याचे उत्पादन पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वी म्हणजे १९५०–५१ साली ४५ ते ५० लाख टनांच्या दरम्यान असावयाचे, ते पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी सुमारे ५४ लाख टनांवर गेले तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी सुमारे ६५ लाख टनांपर्यंत गेले. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या काळात ही वाढ थोडी मंदावली. कारण ह्या काळात एक मोठा दुष्काळ व दोन परकीय आक्रमणे आली. त्यामुळे आपल्या एकूण अर्थव्यवस्थेवरच विपरीत ताण पडला. ह्याचाच परिणाम ह्या उत्पादनवाढीच्या वेगाला मंदपणा येण्यात झाला.

महाराष्ट्र हे अन्नधान्याच्या दृष्टीने तुटीचे राज्य आहे. देशातील एकूण अन्न-धान्याच्या तुटीपैकी $\frac{1}{3}$ तूट महाराष्ट्राची असते. ही तूट सुमारे २० लाख टनांची आहे. ही परिस्थिती १९६५–६६ सालापर्यंत होती. परंतु त्यानंतर शेतीत अनेक सुधारणा होऊ लागल्या. संकरित व अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्यांचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेण्यात आला. या नव्या जातींच्या बियाण्याखाली बरेच क्षेत्र आले. त्यामुळे पुष्कळ उत्पादनवाढ झाली. सध्या अन्नधान्यांच्या आयातीचे प्रमाण पुष्कळ कमी झाले आहे. आपण आता बरीच तूट भरून काढली आहे. बऱ्याच ठिकाणची शिधावाटप पद्धती बंद झाली आहे, त्याचेही कारण हेच आहे.

महाराष्ट्रातील जमिनीवर घेण्यात येणारी पिके व त्यांचे क्षेत्र लक्षात घेतल्यास असे दिसून येते की, सुमारे ७० टक्के पिकाखालील क्षेत्र हे केवळ अन्नधान्याच्या पिका-साठी राखीव असते. महाराष्ट्रातील मुख्य व्यापारी पिके म्हणजे कापूस, भुईमूग व ऊस ही आहेत. ह्या पिकांखाली केवळ २० टक्के पिकाखालील जमीन असते. अशा तऱ्हेच्या पीक-पद्धतीमुळे महाराष्ट्रातील एकूण शेतीचे उत्पन्न व त्यात करावयाची वाढ ह्यावर साहजिकच मर्यादा पडते. परंतु येथील जमीन, तिचा मगदूर, बागायती साधने, हवामान व पाऊस या कारणांमुळे पीक-पद्धतीत फारसा बदल करता येत नाही. ह्यावर उपाय म्हणून पिकाच्या सुधारलेल्या जाती अशा रीतीने काढल्या पाहिजेत की, येथील परिस्थितीत त्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ दिसून आली पाहिजे. या दृष्टीने सर्व पीक-संशोधन केंद्रांवर

कार्य चालू आहे. त्याचा परिणाम म्हणून अनेक सुधारलेल्या जाती, संकरित व उन्नत बियाण्याच्या जाती, आता उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

शेती उत्पादनवाढीचे अनेक कार्यक्रम महाराष्ट्रात घेण्यात आले आहेत. त्यांपैकी महत्त्वाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत : (१) भू-संरक्षण (२) पाणीपुरवठा (३) संकरित व उन्नत बियाण्याचा कार्यक्रम (४) सघन शेती योजना (५) रासायनिक व सेंद्रिय खते (६) पीक-संरक्षण (७) फळबाग विकास (८) व्यापारी पिकांच्या विकास योजना (९) एकात्मिक क्षेत्र विकास योजना (लहान शेतकऱ्यासाठी योजना). (१०) सामूहिक प्रशिक्षण योजना (११) शेती संशोधन (१२) शेती शिक्षण.

अशा अनेक लहानमोठ्या योजना सुरू आहेत. पण या योजनांच्या तपशिलात फारसे न शिरता आपल्या शेतकऱ्यांचा त्यामुळे फायदा झाला आहे काय, जुनी शेती बदलली आहे काय, शेतकरी बदलला आहे काय, याचाच अधिक तपशिलाने विचार करणे सयुक्तिक आहे.

‘ शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी ’ हे तुकाराममहाराजांचे सांगणे आमच्या शेतकऱ्यांना चागले माहीत आहे. म्हणूनच शेतातील चांगली कणसे काढून, ती मळून, राखेत घालून किंवा व्यवस्थित ठेवून पेरणी करण्याची पद्धत आपले शेतकरी वापरतात. पण दरवर्षी त्याच शेतातले आणि तेच बियाणे वापरतात. आता जग फार पुढे गेले असल्याने शेती शास्त्रातही पुष्कळ क्रांती झाली आहे. आपल्या पिकाच्या जातीपेक्षा दुप्पट तिप्पट उत्पन्न देणारे नवीन पिकांचे वाण निघाले आहेत. परंतु हे नवीन वाण, नवी बियाणे वापरण्यास आपला शेतकरी तयार नव्हता. कारण शेती एक शास्त्र आहे हे त्याला पटत नव्हते. आपल्या वडलांनी जे पेरले आणि जसे पेरले, तसेच आपण करायचे हा त्याचा हट्ट होता. म्हणून १५-२० वर्षांपूर्वी एखाद्या शेतकऱ्यास ‘ तुम्ही हे नवे बियाणे वापरून पाहा. कमी उत्पन्न आले तर आम्ही नुकसान भरून देऊ ’ असे सांगूनही पटत नसे, पण आज ती स्थिती राहिलेली नाही. जरा खेड्यात फिरा, शेतकऱ्यांशी थोडा वेळ बोला. सामान्य शेतकऱ्याच्या तोंडीही तुम्हाला ‘ हायब्रिड ’ शब्द अनेकदा ऐकायला मिळेल. तायचुंगपेक्षा आयआर-८ भात चांगले असे तो तुम्हांला सांगेल. खपलीपेक्षा एनआय ७४७-१९ गहू फार चांगला येतो असे तो बोलेल. उसाची ४१९ जात जुनी झाली. आता आम्ही ७४० ऊस लावतो, असे तो अभिमानाने म्हणेल. हा बदल निश्चित जाणवण्यासारखा आहे. शेतकरी किती आणि कसा बदलला आहे हे त्याच्या बियाण्याच्या माहितीवरून समजेल. ‘ तुम्ही हे थोडे तरी पेरून बघा ’ अशी मनधरणी ज्या शेतकऱ्याला काही वर्षांपूर्वी करावी लागत असे, तोच शेतकरी ‘ आम्हांला हे नवे बियाणे थोडे तरी द्याच ’ असे म्हणू लागला आहे. हे त्याच्या प्रगतीचे लक्षण नाही असे कोण म्हणेल ?

केवळ सुधारलेले बियाणे वापरले तरी उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते, हे आता अनेक शेतकऱ्यांना उमजले आहे. त्याचा चांगला फायदा होत आहे.

'हायब्रिड' हा आता शेतकऱ्यांचा परवलीचा शब्द झाला आहे. संकरित आणि अधिक उत्पादन देणाऱ्या निरनिराळ्या पिकांच्या जातींमुळे धान्य उत्पादनात बरीच भर पडते आहे. आपणास अन्नधान्यात स्वयंपूर्ण करण्याची कार्यक्षमता या एकाच कार्यक्रमात आहे. १९६६–६७ साली या कार्यक्रमास महाराष्ट्रात सुरुवात झाली. त्या वर्षी फक्त २.५१ लाख एकरांत हे संकरित व उन्नत बियाणे वापरले. १९६९–७० साली म्हणजे तीन-चार वर्षांतच या कार्यक्रमाखाली भात, गहू, ज्वारी, बाजरी आणि मका या पिकांच्या बियाण्याखाली २५ लाख एकर क्षेत्र आले.

पिकाची तहान वेळेवर भागविली तर पीक चांगले फोफावते हे आमच्या शेतकऱ्यांस चांगले माहीत आहे. 'पण काय करायचे, पाऊस पडलाच नाही तर आम्ही कोठून पीक काढणार ?' असे आमचा शेतकरी म्हणत असे. तो फक्त आभाळाकडे बघत असे. पण आपल्या शेताच्या शेजारून वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा उपयोग करावा हे त्याला फारसे माहीत नव्हते. नदीचे पाणी पवित्र म्हणून तिला नमस्कार करायचा आणि एखादा पैसा तिला अर्पण करायचा, एवढेच आमच्या शेतकऱ्यांना काही वर्षांपूर्वी माहीत होते. अगदी उदाहरणच द्यावयाचे म्हटले तर कृष्णेच्या काठचे घ्या. कृष्णा नदी भरून वाहायची. पण तिचे पवित्र पाणी आपल्या शेतात आणून शेती पवित्र करण्याचे आणि शेतीत खरे 'पाणी' निर्माण करण्याची शेतकऱ्याची फारशी इच्छा नव्हती.

पण आज 'आम्हांला पाणी द्या, आम्ही तुम्हाला धान्य देतो' असे मागणे शेतकरी करू लागले आहेत. जर खेड्यात एखादी नदी असेल तर तिच्या काठाने थोडी चक्कर मारा. त्या नदीवर अनेक इंजिनांचा आवाज तुम्हांस ऐकू येईल. अनेक विजेचे पंप पाणी पोटात घेऊन शेतात ओकताना दिसतील. त्या पाण्याने तहान भागल्याने पिकांना टवटवी आली असेल. पिकाप्रमाणेच शेतकऱ्यांची पाण्याची तहान किती वाढली आहे हे ज्यांना पाहावयाचे असेल त्यांनी कोल्हापूर-सांगली जिल्ह्यांच्या सरहद्दीवरून वाहणाऱ्या वारणा नदीच्या काठाने उन्हाळ्यात फिरावे. त्या ठिकाणी शेतकरी नदीच्या पात्रातील वाळू उन्हाळ्यात काढतो. जे पाणी मिळेल ते लगेच पंप सुरू करून नेतो. पाणी शोधण्यासाठी तो स्वतःच्या घामाचे पाणी नदीला देतो, असे दृश्य अनेक ठिकाणी पाहावयास मिळते. पाण्यासाठी शेतकऱ्याची फार धडपड चालली आहे.

'या ठिकाणी बंधारा बांधू या' असे म्हणण्याचा काळ आता गेला आहे. आता शेतकरीच अनेक लहान लहान बंधारे बांधतो आहे. 'आमचा हा बंधारा झालाच पाहिजे' अशी शेतकऱ्यांची मागणी येते आहे. अमुक ठिकाणी पाझर तलाव पाहिजे, आमचे हे धरण केव्हा होणार, आमचे धरण लवकर पूर्ण करा, अशा शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या येत आहेत. शेतकऱ्याच्या प्रगतीची ही निशाणी नाही असे कोण म्हणेल ?

वर सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात पाणीपुरवठ्याच्या सोयी अपुऱ्या आहेत. अनेक

प्रयत्नांनी आता बागायतीचे क्षेत्र ८ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. पण त्यात विहिरींचा मोठा भाग आहे. आता अनेक गावांत कितीतरी नव्या विहिरी निघत आहेत. कारण त्यामुळे पिकास लवकर पाणी मिळू शकते. सध्या महाराष्ट्रात सव्वा सहा लाख विहिरी आहेत. दरवर्षी सुमारे ३०,००० नवीन विहिरी काढणे आणि १०,००० जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम शासनामार्फत चालू असतो.

'शेतात शेणखताची एखादी गाडी केव्हातरी द्यायची,' अशी शेतकऱ्याची पद्धत होती. लहान शेतकरी तर आपले खत दुसऱ्या मोठ्या शेतकऱ्याला विकत असे. या शेणखताशिवाय इतर खते क्वचितच वापरीत असत. उसासाठी फक्त अमोनियम सल्फेट काही शेतकरी वापरीत असत. त्यामुळे इतर खते असतात आणि ती उसा-शिवाय इतर पिकांना वापरावी लागतात, हे फार थोड्या शेतकऱ्यांना १५-२० वर्षां-पूर्वी माहीत होते. एवढेच नाही तर इतर खते वापरल्याने जमिनीचा कस कमी होतो आणि पिके जळतात अशाही चुकीच्या कल्पना अनेक शेतकऱ्यांच्या होत्या.

पण आज पाहा. खेड्यातील शेतकऱ्यांच्या सेवा सहकारी संस्था दरवर्षी हजारो रुपयांची खते विकत आणून शेतकऱ्यांना देत आहेत. त्यामुळेच 'मी आता पिकाला युरिया दिला आहे, थोडे सुपर फॉस्फेटही दिलं पाहिजे' असे शेतकरी सांगू लागले आहेत. खते दिल्यास उत्पादन वाढते, याची खात्री शेतकऱ्याला पटली आहे, म्हणूनच तो इतर धान्य पिकांनाही खते देतो आहे.

शेतकऱ्यांत रासायनिक खते वापरण्याची प्रवृत्ती वाढली आहे, हे खतांच्या खपाच्या आकड्यांवरूनही समजता येण्यासारखे आहे. १९५०–५१ साली नत्र, स्फुरद व पालाश यांचा खप अनुक्रमे १४,००० टन, ३००० टन आणि ३००० टन असा होता. पण आता हेच प्रमाण अनुक्रमे २ लाख टन, १ लाख टन आणि ३०,००० टन इतके झाले आहे. पूर्वी खेड्यात शेणखत विकत मिळण्याची अडचण नसे. पण आता मात्र शेणखत फारसे विकत मिळत नाही. हा बदल निश्चितच चांगला झाला आहे.

हातातोंडाशी आलेले पीक रोग अगर किडीने फस्त केल्यानंतर कपाळावर हात मारून दैवाला दोष देण्याशिवाय आपला शेतकरी पूर्वी काही करीत होता, असे वाटत नाही. फार तर 'पकडा आणि मारा' किंवा 'उपटा आणि जाळा' हेच दोन उपाय त्याच्याजवळ होते. पण आज हा दैववाद कमी झाला आहे. कोणत्या पिकावर कोणते औषध केव्हा फवारावे, याचे गणित तो शिकला आहे. संकरित किंवा अधिक उत्पादन देणाऱ्या पिकावर औषधे फवारली नाहीत तर पीक चांगले येत नाही, याची माहिती त्याला झाली आहे. म्हणूनच आता अनेक शेतकऱ्यांच्याकडे पीकसंरक्षणाची आयुधे दिसतात. पाठीवर पंप बांधून, शेतात औषध फवारून तो पीक-संरक्षण-आघाडी सांभाळतो. आता विमानातून औषधफवारणी केली जात आहे. दरसाल सुमारे ६० लाख एकरांवर पीकसंरक्षण मोहिमा घेण्यात येतात.

शेती हे एक शास्त्र आहे, याची जाणीव आता अनेक शेतकऱ्यांना झाल्याने, शेतीतील नवी नवी माहिती मिळविण्यासाठी शेतकऱ्याची धडपड चाललेली आहे. त्याबद्दल ते अनेक शेतकी अधिकाऱ्यांना माहिती विचारतात. पत्रे पाठवितात. नवी पुस्तके वाचतात. शेतकऱ्यांची ही ज्ञानलालसा किती प्रचंड वाढली आहे हे शेतकी खात्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'शेतकरी' मासिकाच्या वर्गणीदारांवरून समजून येईल. शेती विषयासंबंधी माहिती देणाऱ्या या मासिकाचे ५५,००० वर्गणीदार आहेत. ते सर्व शेतकरी आहेत. यावरून आपला शेतकरी शहाणा होत आहे, तो शेतीचे ज्ञान वाचू लागला आहे, असा निष्कर्ष काढल्यास चुकीचे ठरेल काय?

अनेक शेतकरी आपल्या मुलांना आता शेतकी महाविद्यालयात पाठवीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात आठ कृषि महाविद्यालये स्थापन झाली असली आणि त्यात दरवर्षी १२०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असला तरी जागा अपुऱ्या आहेत, असे म्हटले जाते.

नवीन बियाणे वापरून, वेळेवर खते देऊन, आंतरमशागत करून, औषधे फवारून, पाणी देऊन भरपूर उत्पादन काढण्यात पुढाकार घेणारे आता अनेक शेतकरी आहेत. शेतकऱ्यांना शेतीचे आधुनिक ज्ञान मिळावे म्हणून तीन आणि दहा दिवसांची शेतकरी प्रशिक्षण शिबिरे भरवली जातात. यालाही चांगला प्रतिसाद आहे. दरवर्षी अशा शिबिरांत ३२००० शेतकऱ्यांना शिक्षण मिळते. त्यामुळे नांगरामागचा शेतकरी अधिक शहाणा होत आहे.

शेतीतही व्यापारी दृष्टी ठेवली तर अधिक फायदा होतो, हे आमच्या शेतकऱ्यांना आता समजू लागले आहे. म्हणूनच ते आता ऊस, कापूस, भुईमूग आणि फळबागा यांच्या लावगडीकडे वळत आहेत. उसाबद्दल तर सांगण्याची जरुरी नाही. ऊस-उत्पादनात आपला शेतकरी अखिल महाराष्ट्रात आघाडीवर आहे. अखिल भारतीय पातळीवरील ऊस-स्पर्धेची अनेक बक्षिसे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळतात. सामान्य शेतकरीसुद्धा एकरी ३५ ते ४० टन ऊस काढतो. एकरी १०० टनांचेवर ऊस काढणारे तर हजारो शेतकरी आहेत. सहकारी साखर कारखाने झाल्याने उसाला निश्चित दर मिळतो. त्यामुळे उसाची अधिक काळजी घेतात. भरपूर उत्पादन काढतात. महाराष्ट्रात सध्या २६ सहकारी साखर कारखाने चालू आहेत, तर एकवीस सहकारी साखर कारखाने सुरू होण्याच्या निरनिराळ्या अवस्थेत आहेत. यावरून आपला शेतकरी कारखानदारही होऊ लागला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

कापूस आणि भुईमूग या पिकांकडेही शेतकरी अधिक लक्ष देत आहेत. फळबागांपासून भरपूर उत्पन्न मिळते याची खात्री पटल्याने आता नवीन फळबागा सुरू होत आहेत. विशेषतः कोकणात या दृष्टीने चांगले काम चालले आहे. तेथे सहकारी फलोद्यान संस्था निर्माण होत आहेत. फळबागा लागवडीसाठी उदार हाताने कर्ज शासन देत आहे. या सर्वांमुळे आता शेतकरी पैशाच्या पिकांनी अधिक पैसा मिळवू लागला आहे असे म्हणणे गैर ठरणार नाही.

शासनाने आखलेल्या अनेक विकास योजनांचा फायदा फार मोठे मोठे शेतकरी घेतात, असे अनेकदा म्हटले जाते. काही बाबतीत ते खरेही असेल. महाराष्ट्रात तर ४७ टक्के शेतकऱ्यांच्याकडे पाच एकरांपेक्षा कमी जमीन आहे. त्याशिवाय १९६१ च्या शिरगणतीनुसार शेतमजुरांची संख्या ३४ टक्के आहे. म्हणून हा सर्व वर्ग विकासात सामील झाला नाही, शेती उत्पादनात सहभागी झाला नाही तर आपले उत्पादन लवकर वाढणे अवघड आहे. अशा या लहान शेतकऱ्यांसाठी एक मोठी योजना आखली आहे. एकात्म क्षेत्र विकास योजना, असे त्यास म्हणतात. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांनी ही योजना तयार केल्याने त्यास 'पागे योजना' असेही म्हणतात. या योजनेनुसार अशा या लोकांना आवश्यक तो पैसा, साधनसामग्री व तांत्रिक ज्ञान उपलब्ध करून देऊन निवडक विभागातील शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पादन वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यांना जोडधंदे मिळण्यासाठीही प्रयत्न केला जात आहे. आता त्यातच रोजगार हमी योजना सुरू केल्याने खेड्यातील बेकारांना काम मिळू लागले आहे. अशा लहान शेतकऱ्याला त्याच्या शेतीतून व इतर पूरक व्यवसायांतून दरवर्षी सुमारे १८०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सध्या ही योजना महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील काही भागात चालू आहे. इतर ठिकाणी ही योजना लवकरच सुरू करण्यात येईल. या कार्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे अगदी लहान शेतकऱ्यांस आणि शेतमजुरास चांगला फायदा होत आहे.

लाकडी नांगराऐवजी लोखंडी नांगर वापरा म्हणून सांगितले तरी काही वर्षांपूर्वी शेतकरी ऐकत नव्हता. पण आता तो काळ बदलला आहे. शेतकऱ्यांच्या शेतात यंत्रे चालू लागली आहेत. ट्रॅक्टरने नांगरट करून घेणारे अनेक शेतकरी आहेत. अनेक शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर खरेदी केले आहेत. त्या ट्रॅक्टरवर बसून आपल्या शेताची नांगरट करताना त्यांना एक आगळे आणि वेगळे समाधान लाभते आहे. नांगरटीनंतर ढेकळे फोडणे, सऱ्या पाडणे इत्यादी अनेक कामांसाठी तो ट्रॅक्टर किंवा इतर सुधारलेली अवजारे वापरतो आहे. पेरणीसाठी यांत्रिक पाभरीचा तो उपयोग करतो आहे. खते घालण्यासाठीही तो आता नवी अवजारे वापरतो. औषध-फवारणीसाठी अनेक साधने त्याच्याजवळ आहेत. पीक-कापणीसाठी अद्याप विशेष यांत्रिक साधने वापरली जात नाहीत. परंतु मळणीसाठी, उफणणीसाठी मात्र अनेक यंत्रे शेतकऱ्यांच्या शेतावर दिसत आहेत. ज्यांना यंत्रे विकत घेणे परवडत नाही, ते कामापुरती भाड्याने घेतात. काहीं वर्षांपूर्वी ऊस गाळण्यासाठी लाकडी चरक वापरला जात असे, पण आज तो शोधूनही सापडणार नाही. हा बदल हळूहळू होत आहे; पण होतो आहे हे निश्चित ! लाकडी नांगरापासून शेतकरी ट्रॅक्टरपर्यंत पोहोचला आहे, ही काही साधी गोष्ट नाही.

शेतीच्या कामासाठी शेतकऱ्यास पैशाची जरुरी असते. अगदी शेतात नांगर घालण्यापासून धान्य घरात आणीपर्यंत अनेक कारणांसाठी त्याला पैसे हवे असतात.

पैशासाठी पूर्वी शेतकरी सावकाराच्या दारात जाई आणि मग शेतकऱ्याची शेती सावकाराच्या घरात जात असे. पण आता ही परिस्थिती राहिलेली नाही. शेतकऱ्याला शेतकामासाठी लागणारा पैसा अनेक सहकारी संस्था, बँका देत आहेत. शासन पुरवीत आहे. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकाही आता शेतकामास पैसा पुरवीत आहेत. शासनातर्फे देण्यात येणाऱ्या कर्जात काही सूटही मिळते आहे. या सर्व कारणांमुळे आता पैसा नाही म्हणून माझे काम अडून राहिले आहे, असे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यावर येत नाही. म्हणूनच आता ' अडचण नाही पैशाची ' असे शेतकरी म्हणत आहेत.

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी गेल्या २५ वर्षांत निश्चित बदलला आहे. हा बदल चांगला होत आहे. आता हिरव्या क्रांतीची भाषा ऐकू येते आहे. अर्थात या बदलातही अजून अनेक रंग भरायचे आहेत. अनेक बारकावे सुधारायचे आहेत.

आता शेतीला प्रतिष्ठा लाभते आहे. पण अजून हवी तशी प्रतिष्ठा आलेली नाही. शेतकरी हा इतरांचा पोशिंदा असला तरी अजूनही त्याला हव्या त्या मानाची जागा दिली जात नाही. कृषी व इतर महाविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या शेतकरी तरुणांनी आता अधिक संख्येने खेड्यात गेले पाहिजे. आपली शेती सुधारली पाहिजे. आता खेडेगावात विजेने विकासाचा सांगावा नेला आहे. पण या सुशिक्षित तरुणांनी नव्या वातावरणाचा, नव्या शेतीचा सांगावा नेणे जरूर आहे. सुशिक्षित तरुणांनी शेती केल्याशिवाय शेती विकासाचा वेग अधिक वेगाने वाढणे अवघड आहे.

शेतकऱ्याच्या शेतमालाला अजूनही हवा तसा भाव मिळत नाही. अजूनही काही प्रमाणात त्याला अडत्याचा, दलालाचा त्रास होतो. पण सर्व शेतमालांचे दर कोठे निश्चित आहेत ? शेतकऱ्याला किफायतशीर ठरतील, असे सर्व शेतमालाचे दर निश्चित झाले पाहिजेत. त्याची शेती त्याला फायदेशीर ठरली पाहिजे. या कामासाठी शासनाने एक समिती नेमली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

आपली शेती लहान असल्याने अमेरिकेतील मोठ्या यांत्रिक अवजारांचा अपणास फारसा उपयोग होणार नाही. म्हणून लहान शेतीस उपयोगी आणि आपल्या लहान शेतकऱ्याला परवडतील अशी यांत्रिक अवजारे तयार केली पाहिजेत.

केवळ अर्थशास्त्राच्या गणितात बसत नाही म्हणून धरणे, तलाव होत नाहीत, ही सबब कमी झाली पाहिजे. उपलब्ध असलेल्या पाण्याचा अधिकाधिक उपयोग करण्याच्या दृष्टीने पाणी देण्याच्या नव्या पद्धती, नवी साधने यांचा वापर शेतकऱ्यांना शिकविला पाहिजे. शेती संशोधन शेतकऱ्याच्या शेतावर लवकर पोहोचले पाहिजे. त्याला मिळणारा पैसा, मदत वेळेवर मिळाली पाहिजे, असेही घडावे असे अनेकांना वाटते.

शेती आणि शेतकरी यांच्या बाबतीत अद्याप अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. त्या करणे जरूर आहे. पण जे काही झाले आहे तेही काहीच नाही, असे म्हणता येणार नाही. २५ वर्षांपूर्वीची शेती व शेतकरी आठवा आणि त्याच खेडेगावात जा. आता तेथे जाण्यासाठी एस्. टी. असेल किंवा एखादा शेतकरीही तुम्हांला त्याच्या

मोटारीतून, मोटारसायकलवरून अगर ट्रॅक्टरवरून घेऊन जाईल. सर्व गाव विजेने लखलखला असेल. रेडिओची गाणी अनेक ठिकाणी ऐकावयास मिळतील. शेतकऱ्याचे घर टुमदार असेल. तेथे खुर्च्या असतील. सोफासेट असेल. सुंदर ट्रेमधून छान कपबशीतून तुम्हाला चहा मिळेल. शेतात फिरला तर अनेक विहिरी, इंजिने, पंप दृष्टीस पडतील. ट्रॅक्टर नांगरत असतील. लोक कामात गुंग असतील. मोटारीतून किंवा मोटारसायकलवरून शेतावर जाणारेही काही भेटतील. ही खते टाका. ती औषधे फवारा, अशी भाषा अनेक ठिकाणी ऐकू येईल. शेतकऱ्यांना नव्या सुधारणेची चाहूल लागलेली आहे, याची जाणीव तुम्हांला होईल. हरितक्रांतीस निदान सुरुवात तरी निश्चित झाली आहे, याचे चित्र तुम्हांला दिसेल. हे चित्र अधिक चांगले होईल. आमची शेती आणि शेतकरी अधिक सुधारणार आहे. आता कोठे त्याने सुरुवात केली आहे. त्याचे नवे स्वप्न साकार होणार आहे. म्हणूनच भविष्यकाळात महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांचे सुरेख चित्र लपले असावे, अशी अपेक्षा अनेकांची आहे.

वैद्यकशास्त्रातील प्रगति व संशोधन

डॉ. वि. ना. भावे व डॉ. ह. वि. सरदेसाई

१. प्रास्ताविक

वैद्यकशास्त्रातील महाराष्ट्रातील प्रगतीचा व संशोधनाचा विचार करताना प्रथम एकूण जगातच या बाबतीत कोणती प्रगती व संशोधन झाले आहे व त्यानुसार आपल्या भारतात ही प्रगती कितपत झाली आहे हा विचार प्रथम मनात आणून मगच महाराष्ट्रात ही प्रगती कितपत झाली आहे याचा विचार करावा लागेल. महाराष्ट्रातील प्रगती असे म्हणताना कित्येक ठिकाणी भारतीय प्रगतीचा एक भाग असाच तो असू शकेल, हेही ध्यानात घेतले पाहिजे. उदा० कुटुंबनियोजन, रोगनिर्मूलन योजना इ० योजना अखिल भारतीय पातळीवरच चालू आहेत.

गेल्या ५० वर्षांत व विशेषतः अलीकडील २५ वर्षांत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये कमालीचे बदल झालेले आहेत. आपली राहणी व सुखसोईची साधने, ज्ञानार्जनाची व ज्ञानप्रसाराची साधने या सर्वांमध्ये आश्चर्यकारक बदल झालेला आहे. वैद्यक शास्त्रामध्येही असाच कमालीचा फरक झालेला आहे. ४० वर्षांपूर्वी माझ्या वैद्यकीय व्यवसायाच्या सुरुवातीस मी ज्या प्रकारचे उपचार करीत असे अथवा विविध वैद्यकीय शाखांत माझ्या बरोबरीचे डॉक्टर ज्या प्रकारच्या उपाययोजना करीत त्यांमध्ये व आताच्या प्रचलित योजनांमध्ये महदंतर पडले आहे.

वरील बदलाचे महत्त्वाचे कारण म्हणजे सर्वच भौतिक शास्त्रांमध्ये झालेली आश्चर्यकारक प्रगती हे होय. यामुळे जगातील सर्व देश एकमेकांच्या अत्यंत जवळ आले आहेत. वास्तवशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (बायॉलॉजी) अशा मूलभूत शास्त्रांच्या झपाट्याने झालेल्या वाढीबरोबरच वैद्यकशास्त्राच्या विविध भागांची वाढ त्वरेने होत गेली. शरीररचनेचा (ॲनॉटॉमी), शरीरव्यापारांचा (फिजिऑलॉजी) व

शरीरविकृतिविज्ञानाचा (पॅथॉलॉजी) सूक्ष्म अभ्यास नव्यानव्या साधनांनी करणे शक्य झाल्यामुळे रोगनिदानास मोठीच मदत होऊ लागली.

२. प्रतिबंधक वैद्यक (प्रिव्हेन्टिव्ह मेडिसिन)

ज्या कारणांमुळे रोग होतो ती मुळातच नाहीशी करणे हे या वैद्यकाचे कार्य; झालेला रोग बरा करण्यापेक्षा अगोदरच त्याचा प्रतिबंध करणे चांगले हे आता अनेकांना पटू लागले आहे. रोग कोणत्या कारणामुळे होतो, तो कसा पसरतो व त्याचा प्रतिबंध कसा करावा हे समजल्यामुळे कित्येक रोग टाळता येतात. डासांमुळे हिवताप येतो व डास होऊ दिले नाहीत तर हिवतापाचा प्रसार थांबेल, ही गोष्ट ध्यानात आली. डी. डी. टी.-सारखी कीटकनाशक औषधे वापरल्याने हिवतापाचे जवळ जवळ उच्चाटन आता होत आले आहे. अगदी बालवयात देवी, घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला व पोलिओ यांच्या प्रतिबंधक लसींचा उपयोग करून व क्षयरोगप्रतिबंधक बी. सी. जी. लस वापरून हे रोग टाळण्यात बरेच यश मिळाले आहे. मातेच्या गर्भारपणी घेतल्या गेलेल्या योग्य काळजीमुळे व वर निर्देश केलेल्या प्रतिबंधक लसींमुळे बालमृत्यूंचे प्रमाण आता बरेच कमी झाले आहे. प्रौढ वयात देखील या लसींचा उपयोग करून वरील रोग टाळता येतात हे सर्वांना समजले आहे. पटकीसारख्या प्राणघातक रोगावरील प्रतिबंधक लस चांगलीच परिणामकारक ठरली आहे. पूर्वी दरवर्षी येणारी प्लेगची साथ आता नामशेष झाली आहे. हिवताप व देवी या रोगांच्या ज्या निर्मूलन योजना सरकारने अलीकडच्या काळात हाती घेतल्या त्या पुष्कळच यशस्वी झाल्या आहेत. हिवतापाचे रोगी अलीकडे दवाखान्यात फारसे आलेले आढळत नाहीत व पूर्वी सर्रास वापरले जाणारे क्विनिन हे औषध दवाखान्यात आता दुर्मिळच ठरले आहे. सरकारी पोस्टातून क्विनिनची विक्री केली जात असे तीही आता बंद झाली आहे. वरील प्रकारच्या सांसर्गिक रोगाने भारतात पूर्वी किती लोक पछाडले जात व हल्ली त्यांचे प्रमाण काय आहे या दृष्टीने या दोन्ही कालांतील आकडे तुलनात्मक दृष्टीने पाहणे उद्बोधक ठरेल.

हिवताप

वर्ष	आजारी	दरहजारी मृत्यूचे प्रमाण
१९४५	१००,०००,०००	८·७९
१९६२	५९,५७९	०·२९

देवी

१९६३	८२,४२३	३२·९
१९६८	२२,३८०	२३·३

सांसर्गिक रोग धरून एकूण सर्व प्रकारच्या तापाने आजारी झालेल्यांमध्ये दर हजारी मृत्यूचे प्रमाण---

१९५३	१०८
१९६३	२३
१९६७	४

बालमृत्यूंचे एकूण दर हजारी प्रमाण- -

१९५७	२१५
१९६८	८९

महाराष्ट्र सरकारच्या आरोग्यखात्याने याबाबत उपलब्ध करून दिलेले १९५६ व १९६८ या वर्षांचे रोग व मृत्यूंचे प्रमाण दर्शविणारे काही आकडे पान २३६ वरील कोष्टकात दिले आहेत ते प्रगती दर्शविण्याच्या दृष्टीने खचितच उद्बोधक वाटतील.

पान २३६ वरील कोष्टकावरून काही महत्त्वाच्या गोष्टी नजरेस येतील. आपल्या राज्यात अलीकडे रोगप्रतिबंधार्थ ज्या विशिष्ट योजना जारी केल्या गेल्या त्यामुळे देवी, हिवताप, डांग्या खोकला व कॉलरा यांसारख्या रोगांत व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंत खूपच घट झाली आहे व त्यांतील देवी व हिवतापांचा प्रतिबंध हा अखिल भारतीय रोगप्रतिबंधक योजनेचाच एक भाग आहे. प्रतिवर्षी पंढरपूर-यात्रेसारख्या यात्रांच्या वेळी कॉलरा-प्रतिबंधक लस टोचण्याची मोहीम चालू ठेवण्यामुळे कॉलऱ्याचे रोगी व त्यामुळे होणारे मृत्यू यांचे प्रमाणही बरेच कमी झाले आहे. बालमृत्यूंचे प्रमाणही कमी झाले आहे. विषमज्वर व हगवण ह्यांमध्ये विशेष घट झाली नाही व त्यामुळे ठिकठिकाणी शुद्ध पाणीपुरवठा होण्याची विशेष आवश्यकता आहे ही गोष्ट नजरेस येते. क्षयरोगाचे प्रमाणही अजून बरेच आहे, म्हणून बी. सी. जी. लस टोचण्याची मोहीम चालू ठेवून व इतर प्रतिबंधक उपाय योजून तो काबूत ठेवण्याचा प्रयत्न करणे जरूर आहे. महारोग (लेप्रसी) व कर्करोग (कॅन्सर) ह्या रोगांत व त्यायोगे होणाऱ्या मृत्यूंत मात्र वाढच झाली आहे व त्यामुळे ह्यांच्या प्रतिबंधाकडे लक्ष देणे अत्यंत जरूर झाले आहे. या वर्षीच्या जागतिक आरोग्य-दिनाचे कार्य कॅन्सरविरोधी मोहीम चालू करणे हेच होते हे वाचकांना ठाऊक असेलच. अपघातामुळे होणाऱ्या मृत्युसंख्येतही वाढ होत आहे ही गोष्टही लक्ष देण्यासारखी झाली आहे.

३. विविध रोगांवरील परीक्षणात व दैनंदिन उपचारात बदल

विकृति-विज्ञानशास्त्र, जंतुशास्त्र (बॅक्टिरिऑलॉजी) इत्यादी शास्त्रांत प्रगती झाल्यामुळे व विविध प्रकारचे परीक्षण-प्रकार व यंत्रे उपलब्ध झाल्यामुळे अधिक अचूक रोगनिदान करणे आता शक्य झाले आहे. ही परीक्षणे व त्यांसाठी वापरली जाणारी काही साधने वा यंत्रे पुढीलप्रमाणे आहेत—

१९५६ व १९६८ या दोन वर्षी महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या रोगांनी घडून आलेले एकूण मृत्यू व दर हजारी लोकसंख्येत त्यांचे अनुक्रमे प्रमाण.

मृत्यूचे कारण		नोंदलेले एकूण मृत्यू १९५६ ‡	दर हजारी प्रमाण १९५६	नोंदलेले एकूण मृत्यू १९६८	दर हजारी प्रमाण १९६८
१ कॉलरा (पटकी)	—	५,४३८	०.१२	५६०	०.०१
२ देवी	—	४,३७३	०.०९	१,४३१	०.०३
३ विषमज्वर (टायफॉइड)	०	३,९९७	०.०८	३,५१९	०.०९
४ गोवर	—	५,८६७	०.१३	२,८८२	०.०७
५ मेंदू मज्जारज्जूदाह		२७५	०.००	११६	०.००
६ हिवताप	—	७६,३५४	१.६५	१,५१६	०.०४
७ इन्फ्ल्युएंझा		२२६	०.००	१२८	०.००
८ इतर ताप	—	१,७९,१२४	३.८८	९५,६१५	२.३१
९ फुफ्फुसदाह (न्युमोनिया)	—	१९,८५८	०.४३	१२,६२५	०.३०
१० क्षयरोग	+	२१,०२६	०.४६	१९,२८५	०.४७
११ डांग्या खोकला	—	२,३९६	०.०५	५८९	०.०१
१२ श्वसनसंस्थेचे इतर विकार		५१,६६९	१.१२	३७,३८१	०.९०
१३ रक्ती आव		३,५१२	०.०८	९११	०.०२
१४ अतिसार (हगवण)	०	२९,३११	०.६४	२३,५१८	०.५७
१५ कांजिण्या		७५९	०.०२	२१५	०.००
१६ घटसर्प		९३८	०.०२	८५०	०.०२
१७ बेरीबेरी		५	०.०७	५	०.००
१८ पोलिओ		३६	०.००	१६०	०.००
१९ गालगुंड		५५	०.००	१९	०.००
२० महारोग	+	१,२७४	०.०३	१,५०८	०.०४
२१ कॅन्सर (कर्करोग)	+	२,८९४	०.०६	५,१६१	०.१२
२२ धनुर्वात		आकडे उपलब्ध नाहीत		४,६२२	०.१०
२३ कावीळ		आकडे उपलब्ध नाहीत		१,२४६	०.०३
२४ दुखापती, अपघात	+	१२,६२१	०.२७	१३,९९९	०.३४
२५ बालमृत्यु	—	६,६३४	४.३	४,०३९	२.८
२६ इतर कारणांनी मृत्यु		२,७३,०७८	५.९२	२,५०,१७१	६.०५
एकूण मृत्यू		७,०१,८००	१५.२१	४,८१,५२४	११.६४

‡ १९५६ चे मराठवाड्यातील शहरी विभागातील रोगांचे आकडे उपलब्ध नाहीत.

— सांसर्गिक रोगांमुळे मृत्यूचे प्रमाण १९५६ पेक्षा १९६८ बरेच कमी झाले.

+ रोगांमुळे झालेल्या मृत्यूच्या प्रमाणात १९५६ १९६८ वाढ झाली.

० रोगांमुळे मृत्यूंच्या प्रमाणात १९५६–१९६८ साली फारसा फरक झाला नाही.

रासायनिक परीक्षणे : मल, मूत्र, रक्त इत्यादींची अनेक प्रकारची परीक्षणे रोगनिदानासाठी करता येतात व उपचारासाठी त्यांचा फार उपयोग होतो. रक्तातील शर्करा, युरिया, कोलेस्टेरॉल, रक्तगोठनकाल, रक्तगोठनात भाग घेणाऱ्या निरनिराळ्या घटकांचे प्रमाण, एन्झाइम्स व रक्तातील इतर प्रेरक द्रव्यांचे प्रमाण इत्यादी रक्तातील वेगवेगळ्या घटकांची तपासणी आता करता येते. रोगनिदान निश्चित करण्यास त्यांची मदत होते आणि ज्या घटकांची कमतरता वा आधिक्य आढळून येईल त्यानुसार यशस्वी उपचार करता येतात. मधुमेह, युरीमिआ, रक्तदाबवृद्धी, रक्तस्रावामुळे वा इतर कारणांमुळे उद्‌भवणारा रक्तक्षय (अनीमिया) इत्यादी विकारांत शरीरात घडून आलेल्या बदलांचे निदान करता आल्यामुळे यशस्वी उपचार करता येतात. त्यामुळे शरीर घटकांची उणीव भरून काढता येते. सांसर्गिक रोगांवरही नियंत्रण ठेवता येते.

सूक्ष्मदर्शकातून परीक्षण : रक्ताची तपासणी सूक्ष्मदर्शकातून करता येते. कॅन्सरचा संशय वाटल्यास अर्बुदाच्या (ट्यूमर) लहानशा कापाचा सूक्ष्म छेद घेऊन किंवा एखाद्या रोगिष्ट शरीरावयवात जाडसर सुई घुसवून त्याचा थोडासा भाग पिचकारीत ओढून घेऊन (नीडल बायोप्सी) तो सूक्ष्मदर्शकातून तपासता येतो व त्यायोगे रोगाचे निश्चित निदान करता येऊन लवकर उपचार करणे शक्य होते. जंतुशास्त्रविषयक परीक्षणेही करता येतात. काचपट्टीवर रंगलेपन (स्टेनिंग) करून विशिष्ट जंतूंचे सूक्ष्मदर्शकातून परीक्षण, विशिष्ट पदार्थावर जंतू वाढवून (कल्चर) त्याचे परीक्षण, औषधामुळे जंतूंवर होणाऱ्या परिणामाचे मापन (ॲन्टिबायोस्टॅटिक सेन्सिटिव्हिटी) इत्यादी करता येतात. इलेक्ट्रॉन मायक्रॉस्कोप नावाचे जे सूक्ष्मदर्शक यंत्र निघाले आहे त्यातून जंतू २ लक्ष पट मोठे दिसू शकतात व त्यामुळे इन्फ्ल्युएंझा, देवी यांसारख्या रोगांचे जे विषाणू (व्हायरस) नेहमीच्या सूक्ष्मदर्शकातून दिसू शकत नव्हते ते आता दिसू शकतात. रोगप्रतिबंधाच्या दृष्टीने उपयुक्त अशी इन्फ्ल्युएंझा लस त्यामुळेच तयार करता येणे शक्य झाले. नुकतीच अशी माहिती जाहीर झाली आहे की, ३० लक्ष पट मोठे दिसू शकणारे सूक्ष्मदर्शक यंत्र रशियाने आता तयार केले आहे.

क्ष-किरणांच्या मदतीने निरीक्षण : क्ष-किरण फोटो घेऊन अस्थिभंग, सांध्यातील विकृती, काही हृदयविकार (उदा. हायपरट्रॉफी), अन्युरिझम (रक्तवाहिनी फुगवटा) सारखे रक्तवाहिनीविकार, फुफ्फुस तील क्षयरोग, बिस्मथ मीलच्या साहाय्याने पचनमार्गातील विकृती इत्यादींचे निदान होते. क्ष-किरणांनी शरीरातील इंद्रियांचे प्रत्यक्ष निरीक्षण (स्क्रीनिंग) करता येते; उदाहरणार्थ, फुफ्फुसावरणात पाणी साठले आहे किंवा कसे व ते किती साठले आहे हे प्रत्यक्ष पाहता येते. मानेतील रक्तवाहिनीत विशिष्ट रंगीत द्रव्य टोचून व त्वरित क्ष-किरण फोटो घेऊन (सेरिब्रल ॲंजिओग्राफी) मेंदूतील विकृती ओळखण्यास मदत होते. तसेच मेंदूतून वाहणाऱ्या विद्युत्प्रवाहाचा आलेख (एन्केफलोग्राम) घेऊन काही विशिष्ट मेंदूविकृतींचे (उदा. एपिलेप्सी म्हणजे फेफरे याचे) निदान होण्यास त्याचा उपयोग होतो. क्ष-किरण फोटो केवळ एकाच

पातळीत न घेता ते निरनिराळ्या पातळींमध्ये (टोमॉग्रफी किंवा सेक्शनल एक्सरेज) घेता येतात व त्यामुळे अर्बुदाचे शरीरातील निश्चित ठिकाण ठरवायला मदत होते. क्ष-किरणाचा उपयोग केवळ निदान करण्यापुरताच न होता कॅन्सरसारख्या विकारावर उपचार करण्यासाठीही करता येतो.

इतर परीक्षणे : हृदयाचे कार्य जाणण्यासाठी इलेक्ट्रोकार्डिओग्राफ घेता येतो. दंडातील रक्तवाहिनीत एक बारीकशी शलाका घालून व सरकवीत सरकवीत ती हृदयाच्या आतील कप्प्यापर्यंत पोहोचवून हृदयविकार जाणण्यासाठी उपयोग होतो. आता गुदाशय, श्वासनलिका व श्वासवाहिन्या, अन्ननलिका, छातीतील व उदरातील पोकळी इत्यादी भागांचे आंतरपरीक्षण (इन्डोस्कोपी) त्या त्या विशिष्ट यंत्रांच्या साहाय्याने प्रत्यक्ष करता येते.

वरील परीक्षणाशिवाय इतरही अनेक परीक्षणे आता उपलब्ध आहेत. अलीकडे रक्तदान हे अनेक रोग्यांना उपकारक ठरले आहे. परंतु ते करता येण्यासाठी रोग्याच्या व दात्याच्या रक्ताचा विशिष्ट वर्ग निश्चित करावा लागतो व विशिष्ट तपासणी करून रक्ताचा वर्ग ठरविण्याचे कार्य करावे लागते. एका अवयवावर दुसऱ्याच्या अवयवाचे कलम करण्यापूर्वी पेशीजालांचे असेच वर्गीकरण (टिश्यू मॅचिंग) करावे लागते.

रेडिओ–ॲक्टिव्ह आयसोटोप्सच्या मदतीने एखादी गाठ (गुल्म अर्बुद) साधी आहे की घातकी (मॅलिग्नंट) आहे व निरनिराळ्या इंद्रियांच्या कार्यात न्यूनता व आधिक्य झाले आहे ते कळण्यास मदत होते. तसेच यामुळे थायरॉइड ग्रंथींतील किंवा मेंदूतील अर्बुदांचे निदान होण्यास मदत होते. किरणोत्सर्गी पदार्थांचा उपयोग केवळ निदान करण्यापुरताच न होता कॅन्सरसारख्या रोगावर उपचार करण्यासाठीही करता येतो. कॅन्सरवरील उपचारासाठी आता मुंबई, नागपूर व मिरज येथील हॉस्पिटलमध्ये कोबाल्ट युनिट नावाचे २।३ लाख रुपये किंमतीचे यंत्र उपलब्ध झाले आहे. या यंत्रामुळे शरीरातील विस्तृत भागावर किरणोत्सर्जन न होता एका विशिष्ट लक्ष्यावर, उदा. कॅन्सरच्या प्रत्यक्ष गाठीवर किरणोत्सर्जन होऊ शकते; त्यामुळे शरीराच्या इतर कोणत्याही भागावर किरणांमुळे दुष्परिणाम न होता रोगग्रंथीवरच तेवढा केंद्रित पद्धतीने तो होऊ शकतो. हृदय, मेंदू, मज्जारज्जू इत्यादी नाजूक अवयवांच्या गुल्मावर याचा उपयोग यशस्वी रीतीने करणे सोयीचे होते.

४. संशोधनाची आणि नव्या औषधांची व उपकरणांची निर्मिति

वरील काळात नव्या नव्या व अद्भुत गुणकारी अनेक औषधांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायोसिन, क्लोरोमायसिटीन, टेरामायसिन इत्यादी प्रतिजैविक (ॲंटिबायॉटिक) औषधे, इन्स्युलिन, कॉर्टिकोस्टेरॉइड, विविध जीवनसत्त्वे, संश्लिष्ट (सिंथेटिक) औषधे अशा कितीतरी उपयुक्त औषधांचा नामनिर्देश करता येईल. वरील प्रकारच्या औषधांशिवाय अलीकडे कित्येक आयुर्वेदीय

औषधांवरही संशोधन होऊन काही उपयुक्त औषधांचा उपयोग डॉक्टर करू लागले आहेत. वाढलेल्या रक्तदाबावर ' सर्पिना ' या औषधाचा निर्देश या संदर्भात करता येण्यासारखा आहे.

पूर्वी फुफ्फुसदाहाला नवज्वर (न्युमोनिया) म्हणत. कारण त्याचा ताप ८।९ दिवस राही. एकूण मृत्युसंख्येपैकी १०।१२ टक्के लोक तरी या रोगाने मरत. परंतु पेनिसिलिनचा वापर सुरू झाल्यापासून या रोगाविषयीची विशेष भीती नष्ट झाली आहे व ताप, धाप इत्यादी लक्षणे १।२ दिवसांतही कमी होतात. पूर्वी न्युमोनिया म्हटला की पहिला उपचार म्हणजे फुफ्फुसदाह व वेदना कमी करण्यासाठी त्याच्या छातीला ॲटिफ्लॉजिस्टिनचा लेप लावणे हाच असे व मला आठवते की अशा रोग्याला त्या वेळी मुंबईच्या जी. टी. हॉस्पिटलमध्ये हाऊस फिजिशिअन या नात्याने स्ट्रिक्निन डिजिटॅलिनची इन्जेक्शने ऑनररी फिजिशिअनच्या सल्ल्यानुसार दिवसातून चार वेळा मला द्यावी लागत. विषमज्वर (टायफाईड) हाही तीन आठवड्यांचा ताप समजला जाई व तो वारंवार उलटण्याचा संभव असे; परंतु क्लोरोमायसिटिन हे औषध निघाल्यापासून तो आता फार लवकर बरा होतो व त्यामुळे आतड्यातून रक्तस्राव, आंत्रछेद इ. पूर्वी आढळून येणारे आनुषंगिक उपद्रव फारसे उत्पन्न होत नाहीत. जंतांवर पूर्वी सँटोनिन हे औषध दिले जाई, पण या औषधांचे दुष्परिणाम व नंतर घ्यावे लागणारे एरंडेल यामुळे जंतांपेक्षा त्याच्या उपचाराची भीती जास्त वाटत असे. हल्ली प्रचारात असलेल्या ' ॲन्टिपार ' या औषधामुळे किंवा त्याहूनही नव्या ' थायाबेंडझॉल ' सारख्या औषधामुळे जंतनिर्मूलन सोपे झाले आहे. अतिसार किंवा कॉलऱ्यासारख्या रोगात शिरेतून निरनिराळी क्षारद्रव्ये देण्यामुळे मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे.

कित्येक दुःसाध्य किंवा असाध्य समजले जाणारे रोग आता तसे राहिले नाहीत. मज्जावरणदाह (मेनिंजायटिस) या रोगाचे रोगी फारसे वाचत नसत. परंतु पेनिसिलिनमुळे या रोगाची धास्ती आता बरीच कमी झाली आहे. बी. सी. जी. चे इन्जेक्शन योग्य वेळीच घेतल्यास क्षयरोगाचा प्रतिबंध होतो. क्षयाचे विशिष्ट जंतू पाहण्यासाठी सूक्ष्मदर्शकाखाली कफाची तपासणी करून किंवा छातीचा क्ष-किरण फोटो घेऊन निश्चित निदान त्वरित करता येते व स्ट्रेप्टोमायोसिन, आयसोनिअझाइड आणि ' पास ' या औषधांचा वापर डॉक्टरी सल्ल्यानुसार पुष्कळ दिवस केला व योग्य पौष्टिक आहार व विश्रांती घेतली तर पूर्वी असाध्य वाटणारा हा रोग आता संपूर्णपणे बरा होऊ शकतो. वरील उपचार घरच्या घरीच करता येतात. त्यासाठी आरोग्यभवनात जाऊन राहण्याची जरुरी पडत नाही. कुष्ठरोग (लेप्रसी) हाही रोग एक असाध्य व भयानक समजला जाई. या रोगाची सांसर्गिकता कमी करून तो बरा करणारी प्रभावी औषधे (डी. डी. एस्., डॅप्सोन) आता उपलब्ध झाल्याने दीर्घ उपचारानंतर हा रोग बरा होऊ शकतो. निरनिराळ्या इंद्रियांच्या कर्करोगामुळे (कॅन्सर) बरेच लोक मृत्युमुखी पडतात. पण या रोगाचा संशय येताच त्या भागाचा थोडासा सूक्ष्मछेद सूक्ष्मदर्शकाखाली

तपासून लवकर निदान केले तर शस्त्रक्रियेने तो भाग काढून टाकता येतो व रोग बरा होतो. तसेच त्याच्या विशिष्ट अवस्थेत एन्डॉक्सॉना मिथोट्रिक्सेट किंवा ॲक्टिनोमायसीन यांसारख्या औषधांचा उपयोग करून रोग काबूत ठेवता येतो. मधुमेह (डायाबेटिस्) हाही एक भीती वाटणारा रोग समजला जाई. १९२१ साली बेंटिंग व बेस्ट या शास्त्रज्ञांनी असा शोध लावला की, स्वादुपिंडातील आयलेटस् ऑफ लँगरहॅन्समध्ये नेहमी उत्पन्न होणारा इन्स्युलिन नावाचा अंतःस्राव उत्पन्न न झाल्यामुळे मधुमेह होतो. कारण शरीरातील निरनिराळ्या भागांत उष्णता उत्पन्न होण्यासाठी पेशींमध्ये साखरेचे जे ज्वलन होत असते त्यासाठी इन्स्युलिनची जरुरी लागते व त्याची कमतरता झाल्यास साखरेचे ज्वलन न झाल्यामुळे तिचे रक्तातील प्रमाण वाढून ती लघवीतून जाऊ लागते. आता साखर व पिष्टमय पदार्थांच्या आहारावर योग्य नियंत्रण ठेवल्यास ठराविक उष्मांकाचा (कॅलरीज) आहार घेतल्यास व जरुरीप्रमाणे ठराविक गोळ्या किंवा इन्स्युलिनचे इन्जेक्शन घेतल्यास मधुमेह काबूत राहतो व अशा माणसाला दीर्घ कालपर्यंत त्याचे नेहमीचे व्यवहार चालू ठेवता येतात. अशा रोग्यावर दुसऱ्या काही कारणांसाठी शस्त्रक्रिया करण्याची पाळी आली तरी ती निर्धास्तपणे करता येते.

पूर्वी व अलीकडेपर्यंत देखील डॉक्टरांना लागणाऱ्या औषधांबाबतचे संशोधन व उत्पादन पाश्चात्त्य देशांतच (अमेरिकासकट) मुख्यतः होत असे. भारतात सुरुवातीस बेंगॉल केमिकल कंपनी, बेंगाल इम्युनिटी कंपनी, बडोद्यातील अलेंबिक केमिकल कंपनी इत्यादींनी या क्षेत्रात सुमारे ५० वर्षांपूर्वी पदार्पण केले. मुंबई येथील हाफकिन इन्स्टिट्यूट ही देखील रोगप्रतिबंधक व रोगहारक व्हॅक्सीन व सीरा यांचे संशोधन व उत्पादन मोठ्या प्रमाणात करीत आली आहे. येथे पिसाळलेल्या कुत्र्याच्या चावण्यावर प्रतिबंधक उपाय म्हणून वापरले जाणारे ॲंटिरेबिक व्हॅक्सीन मोठ्या प्रमाणावर तयार केले जाते.

स्वराज्यप्राप्तीनंतर आपल्या सरकारने परदेशी औषधांच्या आयातीवर फार मोठे नियंत्रण घातल्याने अनेक परदेशी कंपन्यांनी येथील कंपन्यांशी सहकार्य करून औषधांचे संशोधन व निर्मिती करण्याच्या उद्देशाने भारतातच या कार्याला सुरुवात केली व येथील औषधनिर्मिती धंद्याला मोठी चालना मिळाली. बडोद्यातील साराभाई-मर्क कंपनी, इतर राज्यातील कंपन्या व पुणे-मुंबई मार्गावरील अशाच देशी-परदेशी अनेक जोड कंपन्या अस्तित्वात आल्या. आपल्या भारत सरकारनेही पुण्यानजिक पिंपरी येथे हिंदुस्थान ॲंटिबायॉटिक फॅक्टरी चालू केली. तेथे फार मोठ्या प्रमाणावर पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायोसिन इत्यादी प्रतिजैविक (ॲंटिबायॉटिक) औषधांची निर्मिती होऊ लागली. एवढेच नव्हे तर संशोधनाने टेट्रोसायक्लिन, हॅमिसिन इत्यादी नव्या औषधांचे उत्पादन होऊ लागले. सोडा बायकार्ब, पोटॅशिअम सायट्रेट, सोडिअम सॉलिसिलेट इत्यादी दवाखान्यात वापरली जाणारी बेसिक केमिकल्स ऊर्फ क्षारलवणे आणि विविध टिंक्चर्स आता इकडे तयार होऊ लागली आहेत. जीवनसत्त्व ए व सी, निरनिराळे प्रवर्तक अंतःस्राव (होर्मोन्स) यांचे उत्पादनही आता आपल्याकडे होते. मुंबई परिसरातील

संडोज लॅबोरेटरी हृदयविकारावर उपयोगी पडणाऱ्या डिजिटेलिस या औषधाचे उत्पादन करते. पुण्यानजिक चिंचवड येथील एल्प्रो कारखाना क्ष-किरण यंत्रांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करू लागला आहे.

आपल्या राज्यात सरकारी व बिनसरकारी संस्थांतर्फे विविध वैद्यकीय विषयांवर हल्ली संशोधन चालू आहे. राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांचाही त्यात भाग आहे. कोणत्या विषयावर कोठे संशोधन चालू आहे, त्यातील काहींचा निर्देश यापूर्वी आला आहे. त्याची सविस्तर यादी या लेखात देणे कठीण आहे; पण उदाहरणादाखल काहींचा निर्देश खाली करीत आहे.

व्हायरस रीसर्च सेंटर, पुणे : संधिपादप्राण्यांतर्फे पसरणाऱ्या व्हायरसवर येथे संशोधन केले जाते. आजवर व्हायरसचे संवर्धनासाठी माकडांचा उपयोग करीत; परंतु येथे अलीकडे व्हायरसच्या संवर्धनासाठी सेल-लाइन नावाचे नैसर्गिक माध्यम शोधून काढण्यात आले असून त्यायोगे व्हायरस-संशोधनास मोठी चालना मिळणे शक्य झाले आहे. येथे डेंगी, चिन्गु, गुनिया इत्यादी व्हायरसजन्य रोगांवर संशोधन चालू आहे.

सीबा रीसर्च सेंटर, ठाणे : येथे संशोधन होऊन निरनिराळी होर्मोन व सिंथेटिक ड्रग्जचे उत्पादन होऊ लागले आहे.

ड्रग रीसर्च असोसिएशन, पुणे : येथे विविध औषधी वनस्पतींवर संशोधन चालू आहे. राय जातीच्या वनस्पतीवर वाढणाऱ्या बुरशीपासून एका मनःशांतिदायक औषधाचे (ट्रन्क्विलायजर) संशोधन चालू आहे. सिप्लाच्या संशोधन शाळेत डॉ. सोहराब हाकीम खाद्य तेलाच्या भेसळीवर संशोधन करीत आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे कित्येक वैद्यकीय बाबतीत संशोधन चालू असून खालील-प्रमाणे वैद्यकीय सोयी उपलब्ध झालेल्या आहेत.

पुणे येथील पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी व नागपूर, औरंगाबाद येथील विभागीय हेल्थ लॅबोरेटरीज : अशुद्ध पाणी व भेसळीचे खाद्यपदार्थ अनेक रोगांस कारणीभूत होतात. वरील लॅबोरेटरींत पिण्याच्या पाण्याची शुद्धता ठरविली जाते व दुकानांतून विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांत भेसळ आहे किंवा काय ते तपासले जाते. अन्नभेसळीचे प्रमाण भारतात वाढत आहे. दरवर्षी महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या दुकानांतून वीस हजारपर्यंत अन्नपदार्थांचे नमुने घेऊन तपासले जातात व अशा तपासणीत एकूण ३० टक्केपासून ५५ टक्के पदार्थांमध्ये भेसळ असल्याचे आढळून आले आहे. दूध, लोणी, तूप, तेल, दही, आइस्क्रीम, सरबते, तिखट, हिंग अशा या नेहमीच्या वापरातील पदार्थांचा समावेश तपासलेल्या पदार्थांत आहे.

अन्नातील भेसळ व औषधी द्रव्यांतील शुद्धाशुद्धता तपासण्यासाठी एक नवीन खाते सरकारने सुरू केले असून एका कमिशनरची त्यावर नेमणूक झाली आहे. मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये, नीलेत दिली जाणारी इन्जेक्शने, सेलाइन, सीरा व व्हॅक्सिन आणि विविध औषधे यांची शुद्धाशुद्धता तपासण्यासाठी एक स्वतंत्र क्वालिटी

कंट्रोल डिपार्टमेंट चालू केले आहे.

सेंट्रल पब्लिक हेल्थ इंजिनीअरिंग रीसर्च इन्स्टिट्यूट, नागपूर : ही इन्स्टिट्यूट आरोग्य योजनांबाबत संशोधन करते. भारतातील सुमारे ८० टक्के जनता खेडेगावात राहते व तेथे पाण्याचा पुरवठा केवळ विहिरीवर अवलंबून असल्याने तेथील पाणी अशुद्ध होऊन हगवण, आव, कॉलरा, विषमज्वर असे विकार तेथील लोकांना होत असतात. विहिरीतील पाणी शुद्ध करण्यास ब्लीचिंग पावडरचा उपयोग रोजच्या रोज करण्याची जरुरी असते व त्यामुळे या कामात हेळसांड होते. वरील इन्स्टिट्यूटने संशोधन करून असा शोध लावला आहे की, ज्यातून सुमारे १००० लिटर पाणी दररोज काढले जाते, असे १० ते १२ हजार लिटर पाणी असलेल्या विहिरीसाठी एक ७/८ लिटर मापाचे मडके घेतले व तळाला २।३ छिद्रे पाडून खाली $\frac{१}{४}$ भागांत मोठे दगड, मधल्या निम्म्या उंचीच्या भागात ब्लीचिंग पावडर व वाळू यांचे मिश्रण आणि राहिलेल्या वरच्या भागात पुन्हा लहानमोठे दगड आत घालून ते मडके शिंक्यातून पाण्यात लोंबत ठेवले तर ब्लीचिंग पावडरमधील क्लोरीन सतत पाण्यात विरघळत राहून पाणी निदान ३-४ आठवडेपर्यंत तरी निर्जंतुक राहते. ही अत्यंत सोपी पण प्रयोगाने यशस्वी ठरलेली पद्धत खेडेगावातील विहिरींचे पाणी शुद्ध राखण्यासाठी वापरली तर पाण्यावाटे उद्भवणारे अनेक रोग टळू शकतील. नागपूरच्या रीसर्च इन्स्टिट्यूटने संशोधनाने ही सोपीरीत सुचविली आहे.

मुंबईतील टाटा कॅन्सर रीसर्च इन्स्टिट्यूट : या इन्स्टिट्यूटमध्ये कॅन्सर-रोगाबाबतचे संशोधन सतत चालू असून या रोगावरील उपचारासाठी ही संस्था प्रसिद्ध आहे. डीप एक्सरे-नी कॅन्सरवर उपचार करता येण्यासाठी येथे कोबाल्ट युनिट नावाचे यंत्रही आहे. मुंबईशिवाय अशा यंत्रांची सोय नागपूर व मिरज येथेही उपलब्ध आहे.

क्षयरोग केंद्र म्हणून औरंगाबाद विभागातील बीड जिल्ह्यात आंबे जोगाई येथे आणि पुण्यानजिक औंधलाही महत्त्वाचे केंद्र आहे. येथे शस्त्रक्रियेसह फुफ्फुसक्षयावरील सर्व उपचार व कॅन्सरवर उपचार होत असून हृदयावरील शस्त्रक्रिया शक्य होण्याच्या दृष्टीनेही तयारी चालू आहे.

पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये इन्टेन्सिव्ह केअर युनिट म्हणजे अतिशय काळजी घेणे आवश्यक असलेल्या रुग्णांसाठी एक खास विभाग सुरू केला आहे. यामध्ये अतिशय भाजलेल्यांवर, बुडलेल्यांवर, तीव्र हृदयविकारावर किंवा शस्त्रक्रिये-नंतर विशेष काळजी घेणे आवश्यक असलेल्यांवर तावडतोबीने उपचार केले जातात. येथे विशेष तज्ज्ञ परिचारिकांची नेमणूक केलेली असते व जरुरीप्रमाणे तज्ज्ञ डॉक्टरांना तावडतोब बोलावले जाते.

मुंबई, पुणे, मिरज इत्यादी ठिकाणी हृदयफुफ्फुस यंत्र (हार्ट लंग मशीन) उपलब्ध झाले असून हृदयावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

परदेशात वैद्यकीय विषयांबाबत संशोधन आणि औषधांबाबतचे संशोधन व

निर्मिती यांमध्ये जेवढी प्रचंड प्रगती चालू आहे त्या मानाने आपल्या देशातील कार्य बरेच तुटपुंजे मानावे लागेल. परंतु योग्य दिशेने व समाधानकारक रीतीने प्रगती चालू आहे असे म्हणण्यास जागा आहे. इकडे विशेषत: आयुर्वेदीय औषधांचे संशोधन होऊन कितीतरी नव्यानव्या औषधांच्या निर्मितीस वाव आहे व योग्य संशोधन होऊन उपयुक्त ठरणारी औषधे ॲलोपेथिक डॉक्टर्सही वापरू लागले आहेत, हे सर्पिना, लिव्ह ५२ या औषधांच्या उदाहरणावरून म्हणता येईल. तरीपण स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने औषधांचे संशोधन व निर्मिती या दोन्ही क्षेत्रांत आपणांस अजून मोठाच प्रयत्न करण्याची जरुरी आहे.

वैद्यकीय व्यवसायात लागणाऱ्या विविध उपकरणांचे व औषधांचे संशोधन व निर्मिती करता येण्यासाठी पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी मूलभूत शास्त्रांच्या संशोधनाबरोबरच औषधिविज्ञान (फार्मसी) या शास्त्रात विशेष शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञांची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत मुंबई, नागपूर व कऱ्हाड येथे फार्मसीच्या पदवीचा (बी. फार्मचा) अभ्यासक्रम चालू आहे व पुणे विद्यापीठातही प्रस्तुत लेखकाच्या प्रयत्नाने पदवीचा अभ्यासक्रम आखला जाऊन मान्यही करण्यात आला आहे. मात्र तो शिकविला जाणारी संस्था अजून अस्तित्वात यावयाची आहे. परदेशी औषधांची आयात सरकारी नियमानुसार बंद झाल्यापासून सीबा, सँडोज, बायर, मर्क इत्यादी अनेक परदेशी कंपन्यांनी येथील कंपन्यांशी सहकार्य करून औषधांचे संशोधन व निर्मिती सुरू केली आहे, त्यामध्ये वरील प्रकारची पदवी वा पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांना निश्चित हातभार लावता येईल.

५. मानसोपचार व पुनर्वसन

शरीरात बिघाड झाल्यास एखादे बिघडलेले यंत्र दुरुस्त करावे अशा ठोकताळ्याच्या पद्धतीने शरीरातील बिघाड दुरुस्त करण्याचा कोणी विचार करीत नाही. शरीर व मन यांचा निकटचा अन्योन्यसंबंध आहे ही गोष्ट सदैव मनात बाळगावी लागते. म्हणूनच रोग्याचा विश्वास संपादन करणे ही त्याच्यावरील उपचार यशस्वी होण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब आहे असे आता मानले जाऊ लागले आहे. पुष्कळशा रोगांचे मूळ कारण मानसिक ताण असल्याचे आढळून आले आहे. याची उदाहरणे म्हणून रक्तदाबातील वाढ, जठरव्रण, सव्रण आंत्रदाह (अल्सरेटिव्ह कोलायटिस) ही देता येतील. अशा रोगांना सायकोसोमॅटिक रोग असे म्हणतात. उलट पक्षी, वारंवार उद्‌भवणाऱ्या आजारीपणामुळे माणूस चिरचिरा बनतो व मानसिक विकृतीही (ऑर्गेनिक सायकोसिस) सुरू होतात.

गरिबीचा प्रश्न, राहण्याच्या जागेचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, बेकारीचा प्रश्न, निरनिराळ्या वर्गांतील कलह या सर्व कारणांमुळे माणसाला धकाधकीचे व मानसिक ताणाचे जीवन जगावे लागते व त्याचा परिणाम मानसिक विकृती वाढण्यामध्ये होतो. महाराष्ट्रात येरवडा (पुणे), ठाणे, नागपूर, रत्नागिरी आणि मिरज येथील डॉ. सिकदार

यांचे खाजगी हॉस्पिटल अशा पाच ठिकाणी मेंटल हॉस्पिटले असून तेथील खाटांची संख्या सुमारे ५६५० आहे. तरीही ती अपुरी आहे. यावरून या प्रश्नाचे महत्त्व ध्यानात येईल.

उष्णता, मालिश, व्यायाम, विद्युत्प्रवाह इत्यादी भौतिक चिकित्सेचा (फिजिओथेरपी) उपयोग करून व जरुरीनुसार कृत्रिम साधनांची मदत देऊन रोग्याची शक्ती व अवयवांतील हालचाली पूर्वस्थितीला आणणे आणि काहीतरी व्यावसायिक शिक्षणाची सोय करून त्याला उपयुक्त जीवन जगण्यास समर्थ करणे – याचाच अर्थ, रोग्याला शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्य मिळवून देणे, या गोष्टी पुनर्वसनात समाविष्ट आहेत. अपंग रोगी स्वतःला अथवा समाजाला भारभूत ठरू नये अशी यामागची भूमिका आहे. या दृष्टीने सरकारी पुनर्वसनकेंद्रे स्थापन झालेली आहेत. अशा अपंगांची भौतिक चिकित्सा (फिजिओथेरपी) केली जाते. कृत्रिम अवयव बसविले जातात व अशा लोकांच्या पळण्याच्या, तिचाकी सायकल चालविण्याच्या किंवा इतर खेळांच्या शर्यतीही घेतल्या जातात. अंध व बहिरे यांच्या शिक्षणाचा व पुनर्वसनाचाही प्रयत्न केला जातो.

६. आधुनिक शस्त्रक्रियेतील सुरक्षितता

आता शस्त्रक्रिया (सर्जरी) हे एक बिनधोक किंवा निर्विघ्न कौशल्य ठरत आहे. ‘ ऑपरेशन करणे जरूर आहे ’ असे म्हटल्याबरोबर पूर्वीप्रमाणे धास्तावण्यासारखे त्यात आज काही उरले नाही. शस्त्रक्रियेमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण एवढे घटले आहे की, मोटारसायकलीवरून जाण्यात किंवा गजबजलेल्या रस्त्यावरून चालण्यातसुद्धा शस्त्रक्रियेपेक्षा जास्त धोका संभवतो, असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये. आधुनिक शस्त्रक्रियेच्या सुरक्षिततेला कारणेही अनेक आहेत.

रोगाचे अचूक निदान करण्याला व शस्त्रक्रियेने उद्भवणाऱ्या रोग्याच्या जोखमेचा अंदाज करण्याला आता अनेक साधने उपलब्ध आहेत. प्रत्यक्ष क्ष-किरणांखाली अवयवाची पाहणी (स्क्रीनिंग) करता येते, क्ष-किरण फोटो घेता येतो किंवा विशिष्ट द्रव्ये घेऊन पचनमार्ग, मूत्रपिंड, मूत्रनलिका, यकृत, रक्तवाहिन्या अथवा मेंदूदेखील निरीक्षता येतो व त्यामुळे अचूक निदानास मदत तर होतेच, पण शस्त्रक्रिया करणाऱ्याला विकृत अवयवाचा कमीत कमी भाग कापावा लागून शस्त्रक्रियेचा धोका आणखी कमी करता येतो. रोग्याचा रक्तदाब, हृदयाच्या स्पंदनाचा आलेख (इलेक्ट्रोकार्डियोग्राफ) इत्यादी घेता आल्यामुळे कोणत्या प्रकारची भूल देऊन शस्त्रक्रिया करणे योग्य आहे याचा अंदाज अगोदर घेता येतो. क्लोरोफॉर्मसारख्या विषारी द्रव्याऐवजी गुंगी आणण्यासाठी नायट्रस ऑक्साइड, इथर यांसारखी कित्येक द्रव्ये आता उपलब्ध आहेत. गुंगीचे औषध व प्राणवायू योग्य प्रमाणात मिसळून दिला जाण्यासाठी विशिष्ट यंत्राचा (ॲनेस्थेशिआ मशीन) उपयोग करता आल्यामुळे भूल देण्याच्या क्रियेतील धोका आता

कमी झाला आहे. भूल देण्याच्या क्रियेतही अनेकांनी कौशल्य प्राप्त करून घेतले आहे. तसेच, स्थानिक बधिरता उत्पन्न करूनही कित्येक शस्त्रक्रिया उरकता येतात. अत्यंत अशक्त व कमी रक्त असलेल्या रोग्याला प्रोटीनयुक्त खाद्यपदार्थ व जीवनसत्त्वे देऊन आणि रक्तदानासारखे समर्थ साधन उपलब्ध करून अल्पावकाशात त्याला शस्त्रक्रिया झेपण्याइतक्या स्थितीत आणता येते. शरीररचना, शरीरव्यापार व रोगसंप्राप्ती, शरीर-विकृतिविज्ञान यांच्या सूक्ष्म अभ्यासामुळे मूत्रपिंड अथवा फुफ्फुस यांसारख्या महत्त्वाच्या इंद्रियांचा थोडासाच परंतु विकृत भाग आता काढून टाकता येतो. पूर्वी हे करणे जमत नसे. शस्त्रक्रिया करणारांनीही पूर्वीच्या मानाने अधिक शस्त्रकौशल्य प्राप्त करून घेतले आहे. प्रत्यक्ष शस्त्रक्रिया अत्यंत संसर्गदोषविरहित पद्धतीने केली जाते. शस्त्रक्रियालयातील साधने म्हणजे छायाविरहित दिवे, जरुरीप्रमाणे वाटेल तसे हालविता येणारे रोग्याचे टेबल, शस्त्रक्रियेनुसार लागणारी अनेक आधुनिक शस्त्रे, टाके घालण्यासाठी नायलॉन-सारखे धागे, शस्त्रक्रियेच्या वेळी कमीत कमी रक्तस्राव व्हावा या दृष्टीने तुटलेल्या रक्त-वाहिनीतील रक्त जागच्या जागी गोठवण्यासाठी असणारे विद्युत्-उपकरण, अशी अनेक-विध सामग्री आता उपलब्ध असते. पेनिसिलिनसारख्या औषधामुळे शस्त्रक्रियेनंतर जखमा दूषित होण्याची भीती आता फारशी राहिली नाही. शस्त्रक्रियेनंतरची विशिष्ट काळजी ही या विषयाची जणू एक स्वतंत्र शाखाच निघाली असून त्यामुळे रोगी त्वरित बरा होतो.

रक्तदान करता येणे अलीकडे शक्य झाल्यामुळे अक्षरशः हजारो लोकांचे प्राण वाचले आहेत. रक्तदान करण्यापूर्वी, रोग्याचे रक्त ए, बी, एबी किंवा ओ या चार वर्गांपैकी कोणत्या वर्गाचे आहे हे तपासून ठरवावे लागते व त्याला अनुरूप असेच रक्त द्यावे लागते. शस्त्रक्रियेपूर्वी किंवा शस्त्रक्रियेनंतर जरुरीप्रमाणे वाटेल तेवढे रक्त देता येते व त्यामुळे मज्जाघाताचा (सर्जिकल शॉक) धोका उरत नाही. पूर्वी अपघातानंतर अतिशय रक्तस्राव होऊन असंख्य माणसे मृत्युमुखी पडत; परंतु आता रक्तदान लगेच करता येणे शक्य झाल्यामुळे केवळ रक्तस्रावामुळे होणारे मृत्यू बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहेत. अगदी जरुरीच्या वेळी रक्ताऐवजी रक्तद्रव (प्लाझ्मा) किंवा त्याचे पर्याय देऊनही काम भागविता येते.

वाटेल तेव्हा वाटेल त्या वर्गाचे रक्त रोग्याला उपलब्ध व्हावे म्हणून अलीकडे मुंबई, पुणे, सोलापूर, मिरज इत्यादी अनेक शहरांतील हॉस्पिटलतर्फे रक्तपेढ्या (ब्लडबँक) स्थापन झाल्या आहेत. मुंबईच्या हाफकिन इन्स्टिटयूटतर्फे मुंबई-पुण्यातील शेकडो विद्यार्थ्यांकडून रक्त गोळा करून पेढीत साठविले जाते. पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकलतर्फे गोळा केल्या जाणाऱ्या रक्ताचे प्लाझ्मामध्ये किंवा त्याच्या पावडर-मध्ये रूपांतर करून ते सैन्याच्या उपयोगासाठी दूरवर पाठविले जाते.

मूत्र तयार करण्याचे कार्य शरीरातील मूत्रपिंड करीत असतात; परंतु ते बिघडले असता डायलायझर या यंत्राचा उपयोग करून तेच कार्य करता येणे आता शक्य

झाले आहे व कित्येक महिनेपर्यंत ते चालू ठेवून माणसाचे आयुष्य वाढू शकते. मॉर्फिन, डायझिनॉन किंवा बार्बिटयूरेटस् अशा विषारी द्रव्यामुळे विषबाधा होऊन ती मूत्रपिंडावाटे उत्सर्जित होत असताना मूत्रपिंडांना अपाय होतो व त्यांचे कार्यच एकाएकी बंद होण्याचा संभव असतो; अशा वेळीही वरील यंत्राचा उपयोग करून मूत्रपिंडाचे रक्षण करता येते.

मानवी शरीराची वैगुण्ये दूर करण्याच्या हेतूने रूपदायक शस्त्रक्रिया (प्लास्टिक सर्जरी) या एका नव्या दालनाकडे माणसाचे लक्ष दिवसेंदिवस अधिक वेधले जात आहे.

अलीकडे आणखी एका नव्याच शाखेकडे लोकांचे लक्ष वेधले गेले आहे. मानवी विकृत इंद्रिय काढून त्याऐवजी दुसऱ्या निरोगी इंद्रियाचे कलम करण्याचा प्रयत्न सध्या केला जात आहे. भाजून नाहीशा झालेल्या त्वचेच्या जागी त्याच रोग्याच्या दुसऱ्या भागावरील त्वचा काढून ती लावणे किंवा अपघातात नडगीच्या हाडाचे अनेक तुकडे होऊन त्यातील एखादा मृत झाला तर त्या अवयवाची लांबी दुसऱ्या अवयवापेक्षा कमी होऊ नये व राहिलेल्या हाडांची टोके मिळून यावी म्हणून दुसऱ्या नडगीच्या हाडाचा तुकडा काढून तेथे बसविणे यांसारखे कलम अनेकदा केले जात असे. हे स्वतःच्या शरीरावर स्वतःच्या भागाचेच कलम होय. परंतु शरीरातील एखाद्या महत्त्वाच्या इंद्रियावर दुसऱ्याचे इंद्रिय बसवून कलम करता येणे शक्य आहे काय याचा विचार शास्त्रज्ञ करू लागले. प्रथम कुत्र्यामांजरांच्या मूत्रपिंडावर कलम करण्याचे प्रयोग करण्यात आले. अगदी अलीकडे म्हणजे १९५४ मध्ये उंदराच्या त्वचेचे कलम करण्याचे प्रयोग करण्यात आले. त्या सर्वांमध्ये असे नजरेस आले की, एखाद्याच्या शरीरावर दुसऱ्याच्या इंद्रियाचे कलम केले असता ते बाह्य पदार्थ म्हणून शरीराशी असात्म्य ठरते व त्यामुळे शरीरात उत्पन्न झालेली विशिष्ट प्रतिद्रव्ये त्याला विरोध करतात आणि शरीरातील लिम्फोसाइट जातीच्या पेशी काही काळात त्याचा नाश करून टाकतात.

याला ' टिशू रिजेक्शन ' म्हणजे पेशीजालाची वा इंद्रियाची हकालपट्टी म्हणतात. एकाचे रक्त दुसऱ्यास देण्याची पद्धत यशस्वी करताना या अडचणींनाच तोंड द्यावे लागेल व कोणाचे रक्त कोणत्या वर्गाचे आहे व कोणत्या वर्गाच्या रक्तात ते मिसळता येईल हे ठरविता आल्याने आता रक्तदानाचा उपयोग हवा तेथे करता येऊ लागला आहे. १९६५ सालापासून ज्याच्या शरीरावर कलम करावयाचे व ज्याच्या शरीराच्या भागाचे करावयाचे ते दोन्ही पेशीजाल एकमेकांशी जुळणारे म्हणजे सात्म्य आहेत की नाहीत ते प्रथम पाहिले जाऊ लागले व त्यामुळे आणि इम्युरॉन, ॲक्टिनोमायसिन, कॉर्टिसोन यांसारखी औषधी द्रव्ये रोग्यास देण्यामुळे असात्म्यता होण्याचे टळून मूत्रपिंडावर कलम केलेले कितीतरी रोगी जगू लागले. केवळ कोलोरॅडो विद्यापीठात अशा प्रकारे कलम केलेले रोगी १ वर्षाहून अधिक काळपर्यंत जगण्याचे प्रमाण पूर्वी शेकडा ३३ होते ते अलीकडे ८० टक्क्यांपर्यंत सुधारले. मूत्रपिंडाशिवाय यकृत, स्वादुपिंड, प्लीहा यांच्या बाबतीत आणि फुफ्फुसाच्या रोगाच्या रुग्णात फुफ्फुसाचा एकच भाग

बदलून कलम करण्याचे काही प्रयोग यशस्वी झाले आहेत. अगदी अलीकडील वैद्यकशास्त्रातील नवा चमत्कार म्हणजे रोग्याचे हृदय काढून त्या जागी अपघाताने नुकत्याच मेलेल्या निरोगी माणसाच्या शरीरातील हृदय काढून त्याचे कलम करणे हा होय.

अशा प्रकारचे रोगी जगण्यामधील मुख्य अडचण पेशीजालांची असात्म्यता ही आहे व ती कशी सोडविता येते या प्रश्नाच्या सोडवणुकीवर निरनिराळ्या इंद्रियांच्या कलमाच्या शस्त्रक्रियेची यशस्विता अवलंबून आहे. रोगट इंद्रिय काढून त्याऐवजी निरोगी इंद्रियाचे कलम यशस्वीपणे करणे शक्य होईल असे मानावयास जागा आहे. शास्त्रज्ञांचे प्रयत्न त्या दिशेने अहर्निश चालू आहेत. गतवर्षी मुंबईच्या के. इ. एम्. हॉस्पिटलमध्ये डॉ. सेन यांनी हृदयकलमाची एक शस्त्रक्रिया केली, पण काही तासांनंतर तो रोगी मरण पावला. अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया भारतात अजून फारशा झाल्या नसल्या तरी योग्य शस्त्रकौशल्य व अशा शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणारी आधुनिक साधनसामग्री उपलब्ध झाल्यावर आपल्या इकडील शस्त्रवैद्य ही कलाही आत्मसात करतील असा विश्वास वाटतो.

७. अंतराळभ्रमण व मानव

मानव चंद्रावर धाडण्याचे जे प्रयोग अमेरिकेमध्ये सुरू आहेत त्यावरूनही आधुनिक वैद्यकाची किती आश्चर्यकारक प्रगती होत आहे याची कल्पना येते. अंतराळभ्रमण करताना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या बाहेर झेप घेण्यासाठी दर ताशी ४० हजार किलोमीटर वेगाने उड्डाण करावे लागते. ८ लक्ष कि. मीटरच्या प्रवासात पृथ्वीशी सतत संपर्क चालू ठेवून निश्चित दिशेने निश्चित स्थळी पोचावे लागते व त्यासाठी केवढ्या तांत्रिक कौशल्याची व शास्त्राच्या निरनिराळ्या शाखांतील तज्ज्ञांच्या सहकार्याची आवश्यकता असली पाहिजे त्याची कल्पना करणेही अवघड आहे. पण त्यातून विशेष आश्चर्याची गोष्ट ही की, अंतराळयान केवळ चंद्रावर जाऊन यावयाचे आहे असे नसून एवढ्या प्रदीर्घ अंतराचा व एक आठवड्याचा प्रवास संपूर्णपणे बंद असलेल्या कोठडीवजा यानातून मानवाला करावयाचा आहे. या काळात केवळ मानव जिवंत राहण्यासाठी नव्हे, तर मानवी शरीरक्षमता टिकविण्यासाठी त्याला पुरेसा ऑक्सिजन, योग्य अन्न व पाणी यांचा पुरवठा असला पाहिजे; मूत्र, विष्ठा इत्यादी शरीरातील उत्सर्जक द्रव्यांचा निकाल लागला पाहिजे. शरीराचे तपमान, भोवतालचे तपमान व शरीरावरील दाब योग्य राहिला पाहिजे; वजनरहित अवस्थेत त्याला राहता आले पाहिजे. अंतराळातील अदृश्य अशा इन्फ्रारेड, अल्ट्रा-व्हायोलेट व (कॉस्मिक) विश्वकिरण यांच्या घातुक माऱ्यापासून त्याचे रक्षण व्हावयास पाहिजे व एवढ्या अवघड परिस्थितीत व एकान्तवासाच्या अवस्थेत त्याच्या मानसिक शक्ती शाबूत राहिल्या पाहिजेत. या सर्व गोष्टी यशस्वीपणे करता येणे शक्य होऊन तिन्ही अमेरिकन अंतराळवीर चंद्रावर जाऊन सुखरूप परत आले, एवढेच नव्हे तर त्यांची प्रकृतीही ठणठणीत राहिली

हे सर्वांस आता ठाऊकच आहे. सर्व शारीरिक प्रक्रिया सुरक्षित ठेवण्यासाठी वद्यैक-शास्त्रातील केवढ्या संशोधनाची व कौशल्याची जरूर होती याचा विचार मनात आणला तरी मन थक्क होते.

८. प्रगतीची अपूर्णता

जगातील अनेक देशांतील शास्त्रज्ञांच्या प्रदीर्घ संशोधनाने मूलभूत शास्त्रे व त्यांच्या प्रगतीवर अवलंबून असणारी वैद्यकशास्त्रासारखी इतर शास्त्रे यांमध्ये झालेली सारी प्रगती लक्षात घेऊनही आपले ज्ञान अनेक बाबतींत किती अपूर्ण आहे हे समजून घेतले पाहिजे. मेंदूच्या एकूणएक भागाचे कार्य कोणते, झोप कशामुळे येते व आपोआप जाग कशामुळे येते? स्मरणशक्ती व भावना या शक्ती कोठे व कशा उद्‌भवतात? प्लीहेच्या अंत:स्रावाचे कार्य कोणते? फेफरे किंवा अंगावर कोड कशामुळे उद्‌भवते व त्यावर यशस्वी उपचार कोणता? कॅन्सर व ल्युकेमिया यावर उपचार कोणता? ॲलर्जी, दमा किंवा जन्मजात हृद्‌रोग उद्‌भवण्याचे निश्चित कारण कोणते व त्यावर हमखास उपाय कोणते? या व अशा अनेक प्रकारच्या वैद्यकशास्त्राच्या संबंधित प्रश्नांवर आपल्याला समर्पकपणे उत्तरे देता येत नाहीत. म्हणून वैद्यकशास्त्रातील प्रगती योग्य दिशेने, अभिमानास्पद व आश्चर्यकारक आहे हे खरे असले तरी अजून आपण शिखर गाठलेले नाही. किंबहुना या बाबतीत शेवटचे शिखर आहे की नाही हेच समजलेले नाही! अधिक अधिक मानवी आरोग्य साध्य करता यावे या दृष्टीने सतत संशोधन व प्रयत्न करणे मात्र जरूर आहे.

९. वैद्यकीय शिक्षणात वाढ

सुमारे ५० वर्षांपूर्वी त्या वेळच्या मुंबई इलाख्यात म्हणजे मुंबईसह महाराष्ट्र, गुजरात, सिंध व कर्नाटक यांनी बनलेल्या मुंबई इलाख्यात ग्रँट मेडिकल कॉलेजएवढी एकच संस्था एम्. बी. बी. एस्. व त्यानंतरच्या एम्. एस्. व एम्. डी. या पदव्युत्तर पदव्यांपर्यंतचे शिक्षण देणारी संस्था होती व त्यात वर्षातून दोन वेळा एकूण सुमारे २५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळे. त्यानंतर मुंबईतच मुंबई कॉर्पोरेशनचे गोर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज व टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज ही सुरू झाली. स्वराज्यानंतरच्या कालात वैद्यकीय कॉलेजांच्या संख्येत खूपच वाढ होत गेली व एकूण भारतात ही संख्या आता शंभराचे घरात पोहोचली असून सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना त्यात प्रवेश मिळतो. आपल्या महाराष्ट्र राज्यात गेल्या २५ वर्षांच्या अवधीत बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे (२०० विद्यार्थी), मिरज मेडिकल कॉलेज (८० विद्यार्थी), डॉ. वैशंपायन मेडिकल कॉलेज, सोलापूर (६० विद्यार्थी), नागपूर मेडिकल कॉलेज औरंगाबाद मेडिकल कॉलेज आर्मड् फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे (१२० विद्यार्थी) व मुंबई कॉर्पोरेशनचे सायनचे मेडिकल कॉलेज अशा संस्था सुरू झाल्या व मुंबईतील कॉलेजासह त्यामध्ये आत

एकूण सुमारे १४०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्याच्या ३-४ पट असते.

वैद्यकीय पदवीपर्यंतच्या शिक्षणात वाढ झाली आहे; त्याप्रमाणेच पदव्युत्तर शिक्षणातही वाढ झाली आहे. शस्त्रक्रिया (सर्जरी), वैद्यकविद्या (मेडिसिन), स्त्रीरोग-विज्ञान (गायनाकॉलजी), विकृतिविज्ञान (पॅथॉलजी), नेत्ररोग, नाक-कान-घसा रोग-विज्ञान, प्रतिबंधक वैद्यक, संमोहनशास्त्र, क्ष-किरण, अशा विविध शाखांमध्ये वर निर्देशिलेल्या काही वैद्यकीय महाविद्यालयांत पदव्युत्तर पदव्या प्रस्थापित झाल्या असून त्यांच्या परीक्षांना दरवर्षी चारपाचशे विद्यार्थी बसू लागले असून सुमारे ८० ते १०० इतके उत्तीर्ण होतात. याशिवाय परदेशांतून पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संपादून येणाऱ्या तज्ज्ञांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामध्ये केवळ एका विशिष्ट शाखोपशाखेत प्रावीण्य मिळविणारेही अनेक आहेत. उदाहरणार्थ, मूत्रविषयक इंद्रिय रोगतज्ज्ञ (युरोलॉजिस्ट), हृद्रोगतज्ज्ञ (कार्डियॉलॉजिस्ट), कर्करोगतज्ज्ञ (कॅन्सरस्पेशॅलिस्ट), छातीरोगतज्ज्ञ (चेस्टडिसीजेस स्पेशालिस्ट), क्षयरोगतज्ज्ञ (टी. बी. स्पेशॅलिस्ट), शरीरव्यंगोपचारतज्ज्ञ (ऑर्थोपीडिक सर्जन) इत्यादी. डॉक्टर व शाखातज्ज्ञ यांच्या मानाने परिचारिका व दुय्यम वैद्यकीय साहाय्यक यांची संख्या अजून अपुरीच आहे.

या संबंधात आणखीही एक विचार प्रदर्शित करणे जरूर आहे. ३५।४० वर्षां-पूर्वीपर्यंत मुंबई शहराखेरीज इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी फारसे स्पेशॅलिस्ट उपलब्ध नव्हते. त्या वेळी सर्वसाधारण डॉक्टरला एखाद्या तज्ज्ञाचे साहाय्य घ्यावेसे वाटले तर तो आपल्यापेक्षा अनुभवाने, ज्ञानाने व वयाने उच्च श्रेणीवर असलेल्या दुसऱ्या सर्वसाधा-रण डॉक्टरकडेच धाव घेई. पुण्यामध्येदेखील मेडिकल स्कूलचे रूपांतर मेडिकल कॉलेजमध्ये झाले व नवे पुणे विद्यापीठ १९४८ साली स्थापन झाले तोपर्यंत जवळ जवळ अशीच स्थिती होती. परंतु नंतर ही परिस्थिती बदलली. रोगनिदानासाठी नवी नवी अनेक प्रकारची यंत्रे, परीक्षणपद्धती व नव्या प्रभावी औषधांची निर्मिती यामुळेच केवळ वैद्यक-शास्त्राचा विकास होत गेला असे असून निरनिराळ्या विविध शाखांत वर निर्देश केल्या-प्रमाणे अत्युच्च शिक्षण घेतलेले तज्ज्ञ यानंतर उपलब्ध होऊ लागले व त्यामुळे आता अवघड प्रकारच्या रोगांचे योग्य निदान व यशस्वी उपचार करणे शक्य झाले आहे.

त्यामुळे आपल्या भारतात माणसाचे आयुष्यमान कसे वाढत आहे ते खालील आकड्यांवरून दिसून येईल.

सन	आयुर्मान (वर्षे)
१९४१ ते ५०	३२·५
१९५१ ते ५६	३७·५
१९५६ ते ६१	४१·९
१९६१ ते ६६	४६·५
१९६८	५२

दर वर्षी दर हजारी लोकसंख्येमध्ये होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण

सन	मृत्यूंचे प्रमाण
१९११ ते २०	४८·६
१९३१ ते ४०	३१·२
१९५१ ते ५५	२५·९
१९५६ ते ६६	२१·५
१९६८	१६·८

वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेतलेले डॉक्टर व वैद्यकीय विविध शाखांतील तज्ज्ञ (स्पेशॅलिस्ट) यांच्या संख्येत गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात अनेक पटींनी वाढ झाली असली तरी अलीकडे उद्योगधंद्यांच्या झालेल्या वाढीमुळे शहरातील लोकसंख्याही वाढत आहे व त्यामुळे पूर्वीपेक्षा अधिक डॉक्टरांची जरुरी मोठ्या शहरांत निर्माण झालेली आहे व मोठ्या शहरात जरुरीपेक्षा अधिक डॉक्टर उपलब्ध झाले आहेत, परंतु लहान लहान गावांतील व खेड्यापाड्यांतील जनतेची वैद्यकीय मदत मिळण्याची गरज मात्र मुळीच भागलेली नाही. परंतु शहरात होणारी डॉक्टरांची गर्दी व खेडेगावात असणारी डॉक्टरांची गरज ही विचारात घेऊन आपल्या व्यवसायाचे क्षेत्र दूरपर्यंतच्या खेडेगावापर्यंत पोहोचविण्याची तयारी डॉक्टरांनी दाखविणे जरूर आहे. अलीकडे कित्येक डॉक्टर व स्पेशॅलिस्ट मधूनमधून दूरवरच्या गावांना भेटी देऊन तेथील जनतेला वैद्यकीय साहाय्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत व खेड्यातील जीवन जसजसे सुधारेल तसतशी तेथे धंद्यानिमित्त स्थायिक होण्याच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळेल.

महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय उच्च शिक्षणाबाबतची अलीकडील परिस्थिती दाखविणारे आकडे (महाराष्ट्र राज्य शिक्षण-संचालकांमार्फत प्रसिद्ध झालेले जुलै १९६८ ची परिस्थिति दर्शक).

	एकूण संस्था	एकूण प्रवेश
	१३	७,८९९
पाश्चात्त्य वैद्यकीय (अॅलोपॅथिक) शिक्षण-संस्था		
आयुर्वेदीय शिक्षण-संस्था	७	१,५७५
दंतरोगीय शिक्षण-संस्था	३	८१४
परिचारिका शिक्षण-संस्था	२	१२६
पशुवैद्यकीय शिक्षण-संस्था	३	५४४

व्यावसायिक व विशिष्ट तज्ज्ञतेचे शिक्षण देणाऱ्या संस्था

	एकूण संस्था	एकूण प्रवेश
पाश्चात्त्यवैद्यकीय (ॲलोपॅथिक)	१	२७
आयुर्वेदीय	१२	१,३०३
होमिओपॅथीच्या	९	९३३
परिचारिका व सुईणीचे शिक्षण देणाऱ्या	३८	३,८७४
सॅनिटरी इन्स्पेक्टर	१	१३
फॅमिली प्लॅनिंग	२	१७७
कुष्ठरोग	२	१२३
फार्मसी	२	१९८
पशुवैद्यकीय	७	३४२

१०. वैद्यकीय सोईत वाढ

गेल्या २५ वर्षांत खाजगी वद्यैकीय व्यवसाय करणारे डॉक्टर व स्पेशॅलिस्ट महाराष्ट्रात खूपच मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. खाजगी डॉक्टर आपले ज्ञान अद्ययावत राखण्याचा प्रयत्न करतो आणि स्पेशॅलिस्ट आपल्या ज्ञानात व अनुभवात भर घालण्याचा व आपली कन्सल्टिंग रूम वा हॉस्पिटल आधुनिक साधनांनी सुसज्ज ठेवण्याचा प्रयत्न करतो. म्हणून ज्यांना परवडते ते खाजगी व्यावसायिकांकडे जाण्याचा प्रयत्न करतात. आपल्या ज्ञानात वाढ व्हावी व आपल्या कौशल्याचा फायदा सर्व-साधारण जनतेला मिळावा म्हणून अनेकजण आपला खाजगी व्यवसाय चालू ठेवूनही सरकारी हॉस्पिटलांमध्ये विनावेतन काम करतात. मुंबईतील जे. जे. हॉस्पिटल, के. इ. एम्. हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, टाटा कॅन्सर हॉस्पिटल, पुण्यातील ससून हॉस्पिटल, मिरजेचे हांस्पिटल आणि जिल्ह्याजिल्ह्याच्या ठिकाणी असणारी हॉस्पिटले पूर्वीच्या मानाने आता पुष्कळच सुसज्ज ठेवलेली आहेत. बहुतेक ठिकाणी क्ष-किरणयंत्रे, इतर विविध साहित्य, रक्तपेढी यांचीही व्यवस्था उपलब्ध आहे. तेथील खाटांची संख्याही खूप वाढली आहे. परंतु महाराष्ट्रातील जनतेची एकूण गरज लक्षात घेता तीही फार अपुरी पडत आहेत. शिवाय सेवरी (मुंबई), औंध (पुणे), मिरज, तळेगाव, पाचगणी, नागपूर व औरंगाबाद इत्यादी ठिकाणी क्षयरोग रुग्णालये आणि येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी, नागपूर व मिरज (खाजगी सिकदार रुग्णालय) अशी मानसिक (मेंटल) रुग्णालये आपल्या राज्यात आहेत. नर्सिंगचे शिक्षण देण्याची व्यवस्थाही बरीच वाढली असली तरी खाजगी व सरकारी क्षेत्रातील गरजेच्या दृष्टीने तीही अजून अपुरीच आहे.

उपलब्ध वैद्यकीय सोयी : १९६७

१ +	एकूण रुग्णालयांची संख्या		३७०
२ +	एकूण दवाखान्यांची संख्या		९८२
३ +	एकूण खाटांची संख्या		२६,१०३
४	नोंदणी झालेल्या पाश्चात्त्य वैद्यकीय ॲलोपॅथिक डॉक्टरांची संख्या		१५,९८२
५	सरकारी दवाखाने व रुग्णालये यांत काम करणारे डॉक्टर	पूर्ण वेळ	९५६
		मानसेवी	५१६
		प्राध्यापक वर्ग	५१९
६	सरकारी दवाखाने व रुग्णालये यांत काम करणाऱ्या परिचारिका		२,६३७
	नोंदणी झालेल्या परिचारिका व सुईणी		११,१२२
	,, ,, साहाय्यक परिचारिका व सुईणी		२,९३२
	पुरुष परिचारक		७३५
७	मेडिकल कॉलेजे		११
८	त्यात प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या		१४००
	दंतरोग-महाविद्यालये		३
	प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या		२१०
	मानसोपचार (मेंटल) रुग्णालये		४
	त्यांतील खाटांची संख्या		५,६४६
	क्षयरोग रुग्णालये	सरकारी	७
		खाजगी	१४
	,, खाटांची संख्या		५,५१६
	क्षयरोग केंद्रे (क्लिनिक)		२१
	प्राथमिक आरोग्य केंद्रे		३८२
	त्यांतील खाटांची संख्या		२२९२

महाराष्ट्र राज्यात दर हजारी लोकसंख्येत जनन, मरण याविषयीचे प्रमाण व दर हजारी जन्मणाऱ्या मुलांत बालमृत्यूंचे प्रमाण.

जन्म ३४·७ मृत्यू १३·८ बालमृत्यू ८६

या सर्व सोईंमुळे अद्याप खेड्यांतील जनतेची गरज मात्र भागलेली नाही. त्या दृष्टीनेच अलीकडे सरकारने सामाजिक आरोग्य व प्राथमिक आरोग्यकेंद्रे यांची पुढे वर्णन केल्याप्रमाणे व्यवस्था केली आहे.

+ यात क्षयरोगाच्या व मानसोपचाराच्या रुग्णालयांचा समावेश नाही.

११. सामाजिक आरोग्य व प्राथमिक आरोग्यकेंद्रे

ब्रिटिश अमदानीत म्हणजे स्वराज्यापूर्वीपर्यंतच्या कालात जवळजवळ अशी परिस्थिती होती की, बहुतेक खाजगी डॉक्टर व तज्ज्ञ लहान-मोठ्या शहरातच आपला व्यवसाय करीत. सरकारी हॉस्पिटल्स जिल्ह्याच्या ठिकाणी व सरकारी दवाखाने तालुक्याच्या ठिकाणीच फक्त असत. त्यामुळे खेडेगावातील जनतेला मोठ्या गावात आल्याशिवाय वैद्यकीय साहाय्य मिळणे अशक्यच असे.

आपल्या देशातील ८० टक्के जनता ग्रामीण विभागात असते व त्यांच्यासाठी रोगप्रतिबंधक व रोगपरिहारक आरोग्यसेवा निर्माण केली पाहिजे असा विचार १९४६ च्या भोर कमिटीच्या अहवालात प्रदर्शित झाला. त्यानंतर १ एप्रिल १९५८ पासून भारतातील इतर प्रांतांप्रमाणे महाराष्ट्रात देखील प्राथमिक आरोग्यकेंद्रांची स्थापना करण्यास प्रारंभ झाला. महाराष्ट्राचा ग्रामीण विभाग एकूण सुमारे ३८२ गटांत विभागला गेला आहे. प्रत्येक गटात अंदाजे ६६००० लोकवस्ती व सुमारे १०० खेड्यांचा समावेश केलेला आहे. त्यात एक प्राथमिक केंद्र व तीन उपकेंद्रे असतात व त्यातून ग्रामीण जनतेस सर्व प्रकारची वैद्यकीय मदत पुरविण्यात येते. ही मदत घरोघरी पोहोचविण्याची व्यवस्था केलेली असते. ह्या केंद्राच्या कार्यकक्षेत आता कुटुंबनियोजन, तसेच देवी व हिवताप निवारण व निर्मूलन योजनांची कार्यवाही यांचाही समावेश केला गेलेला आहे.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत कुटुंब-नियोजनाला अग्रक्रम देण्यात आला आहे व ते योग्यच आहे. कारण आपली लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढत आहे की, त्याला आळा घालण्याकरिता युद्धपातळीवर जर प्रयत्न झाले नाहीत तर ह्या पंचवार्षिक योजनांतून उपलब्ध होणाऱ्या फायद्यावर पाणी पडेल व त्यांचा काहीही फायदा सामान्य माणसापर्यंत पोहोचणार नाही. कुटुंबनियोजनाचा मुख्य उद्देश आपल्या भारतातील दर हजारी ४० जन्मांचे सध्याचे प्रमाण शक्य तितक्या लवकर व निदान १९७५ च्या आत ५० टक्क्यांनी कमी करणे हा आहे. ह्याबाबतीत खेड्यांतील पुढारी व प्रतिष्ठित मंडळींचे साहाय्य घेऊन त्यांच्याकडून योग्य अशा जोडप्यांना कुटुंबनियोजनास उद्युक्त करणे (दर हजारी अशी सुमारे १६० जोडपी असतात) व त्यांचे सक्रिय सहकार्य मिळविणे, संततिप्रतिबंधक साधने सहज मिळू शकतील अशा सोयी करणे व त्याकरिता स्वयंस्फूर्त कार्य करणारी माणसे नेमणे, इत्यादी संततिनियमनविषयक कार्यांची वाटचाल सध्या मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

सांसर्गिक रोगांचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने आधुनिक वैद्यकीय उपायांचा अनेक प्रकारे सर्वत्र अवलंब केला जात आहे. सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य या बाबतीतही नाना प्रकारच्या उपाययोजना अगदी खेडोपाडी पोचविण्यात आल्या आहेत.

१२. राज्य कामगार विमा योजना (इ. एस्. आय्. इन्शुरन्स स्कीम)

या योजनेतर्फे कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना मोफत वैद्यकीय सल्ला

व औषधोपचार मिळण्याची सोय सरकारतर्फे केली जाते. राज्य कामगार विमा योजना, महाराष्ट्र राज्यात प्रथम मुंबई येथे सन १९५४ साली सुरू झाली. त्यानंतर त्याच वर्षी ती नागपूरलाही लागू करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र विभागात प्रथम नोव्हेंबर १९६३ मध्ये ही योजना सोलापूर शहराला लागू करण्यात आली व पुण्याला १५ ऑगस्ट १९६५ या स्वातंत्र्यदिनी सुरू झाली. कोल्हापूरला मार्च १९६६ मध्ये व सांगलीला एप्रिल १९६७ मध्ये लागू करण्यात आली.

भारत सरकारच्या १९४८ च्या कायद्याप्रमाणे तिची अम्मलबजावणी होते. विजेसारख्या शक्तीवर चालणाऱ्या आणि २० हून अधिक कामगार असलेल्या सर्व कारखान्यांना ही योजना लागू होते. या योजनेचे सारे फायदे हे राज्य कामगार विमा योजनेतर्फे महाराष्ट्र सरकारकडून दिले जातात.

महाराष्ट्रातील या योजनेसंबंधीची अलीकडील आकडेवारी त्या खात्याच्या डायरेक्टरमार्फत मिळालेली खालीलप्रमाणे आहे.

(१) योजनेखाली आलेले एकूण कारखाने	४,१२४
(२) योजनेखाली एकूण कामगार कुटुंबे	८,०७,६००
(३) योजनेखालील रुग्णालये	२
(४) योजनेखालील एकूण खाटांची संख्या	१,६५४
(५) योजनेखालील एकूण दवाखाने	३०
(६) रोगपरीक्षण व रोगनिदानासाठी केंद्रे	१७
(७) योजनेखाली नेमलेले एकूण विमा वैद्यकीय व्यावसायिक (डॉक्टर)	१९७७
(८) रुग्णवाहिनी (ॲम्ब्युलन्स) केंद्रे	१५
(९) फिरता दवाखाना	१
(१०) पश्चिम महाराष्ट्रातील योजनेवर १९६९–१९७० या काळात वैद्यकीय फायद्यासाठी, हॉस्पिटले, सेवा, दवाखाने, रोग—निदान केंद्रे, औषधे वगैरेवर झालेला एकूण खर्च	४६,५६,९७७

वरील खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :—

(१) विमा वैद्यकीय व्यावसायिकांना कॅपिटेशन फी म्हणून दिलेली रक्कम	१७,२१,२०९
(२) राखीव खाटांसाठी खर्च	२,०७,७९०
(३) बाळंतपणाचे फायदे	२,४८,९११
(४) औषधे	१८,१८,१६६
(५) नोकरांचे पगार व भत्ते	५,२३,४१४
(६) इतर खर्च	१,३७,४८७

या योजनेसाठी (१ एप्रिल १९७० पासून) खालील दराने कामगार राज्य विमा मंडळाकडून वर्गणी गोळा केली जाते :

(१) कारखान्यांचे मालक

एकूण विमा योजनेखाली असलेल्या कामगारांच्या पगाराच्या ३ १/३ टक्के द. म.

(२) योजनेखाली आलेले कामगार

विमा कामगाराकडून खालीलप्रमाणे वर्गणी घेतली जाते.

रोजंदारीचा पगार	साप्ताहिक हप्ता
(१) रु. १ ते १·४९ पर्यंत	काही नाही
(२) रु. १·५० ते २·०० पर्यंत	२५ पैसे
(३) रु. २·०० ते ३·०० पर्यंत	४० पैसे
(४) रु. ३·०० ते ४·०० पर्यंत	५० पैसे
(५) रु. ४·०० ते ६·०० पर्यंत	७० पैसे
(६) रु. ६·०० ते ८·०० पर्यंत	९५ पैसे
(७) रु. ८·०० ते १५.०० पर्यंत	१·२५ पैसे
(८) रु. १५·०० पेक्षा जास्त	१·७५ पैसे

दर महा ५०० रुपयांपेक्षा जास्त पगार असणारांना ही योजना लागू होत नाही.

१३. विद्यार्थ्यांचे आरोग्य

आजचे विद्यार्थी हेच भावी पिढीचे आधारस्तंभ होत. देशाचे भाग्य ठरविणारे पुढारी व सुजाण कार्यक्षम नागरिक यांतूनच निर्माण व्हावयाचे आहेत. स्वराज्या-पूर्वीच्या काळापेक्षा आजच्या विद्यार्थ्यांपुढे विविध प्रकारची आव्हाने, अनेक कार्यक्षेत्रे व संधी पुढे आलेल्या आहेत व त्यांना तोंड देण्याला विद्यार्थ्यांनी समर्थ व्हावयास पाहिजे. अगदी बाल्यावस्थेपासून प्रौढावस्थेपर्यंत त्यांच्याकडे सतत लक्ष देण्याची जरुरी आहे. विद्यार्थ्यांची संख्या आता बेसुमार झाली आहे. ती वाढण्याचे एक प्रमुख कारण ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. १२०० च्या आत आहे त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची फी देण्याचा सरकारने निर्णय घेतला हे होय. ही संख्या आता एकूण लोकसंख्येच्या १/३ ते १/४ इतकी आहे. १९२१ साली त्या वेळच्या मुंबई इलाख्यात ७००० विद्यार्थी मॅट्रिक परीक्षेला बसले होते. साधारणपणे तेवढ्याच विभागात तत्सम अशा एस्. एस्. सी. परीक्षेसाठी आता ५ ते ६ लाख विद्यार्थी बसू लागले आहेत. डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र स्टेट, पुणे यांचेमार्फत मिळालेले निरनिराळ्या पातळीवर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचे १९६८ सालचे आकडे खालील-प्रमाणे आहेत.

पूर्व प्राथमिक (प्री.-प्रायमरी)	४१,७४०
प्राथमिक (प्रायमरी)	६३,२९,४८६
दुय्यम शाळेत (सेकंडरी)	१८,८०,९१६
उच्च शिक्षण (कॉलेजमधील)	२,६७,०७८
इतर (शालेय व पदवीपूर्व)	१,०२,१०१
एकूण	८६,२१,३२१

अलीकडे सर्वसाधारण दृश्य दिसते ते असे की, मुलगा वडिलांपेक्षा अधिक उंच व मुलगी आईपेक्षा उंच दिसते. पण पूर्वीच्या पिढीपेक्षा हल्लीच्या विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले की बिघडले हे निश्चित सांगण्यास दोन्ही वेळच्या तपासणीचे आकडे उपलब्ध नाहीत. प्रत्यक्ष आरोग्य तपासणी करूनच सध्याच्या परिस्थितीचे निष्कर्ष काढले पाहिजेत.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे आरोग्य कशा प्रकारचे आहे व ते सुधारण्यासाठी काय केले पाहिजे त्याची थोडीशी कल्पना पुणे शहरात याबाबत काय प्रयत्न होत आहेत ते समजावून घेतल्यास होऊ शकेल.

पुणे शहरात विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी प्राथमिक, दुय्यम व महाविद्यालयीन अशा तिन्ही पातळींत करण्यात आली आहे त्यावरून काय निष्कर्ष निघतात ते पाहू.

१. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी : सरकारी कायद्यानुसार प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी आता करावी लागते. पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या ११ हजार विद्यार्थ्यांच्या १९६६-६७ च्या तपासणीचे आकडे उपलब्ध आहेत. त्यामध्ये सुमारे ३८ टक्के विद्यर्थ्यांना दंतदोष, २४ टक्के कान-नाक-घसा दोष, १३ टक्के नेत्रदोष व २५ टक्के शस्त्रक्रियार्ह दोष आढळले. वरील योजना पुणे महानगरपालिकेचे आरोग्य प्रमुख यांचे देखरेखीखाली चालते. एक डॉक्टर व दोन परिचारिका यांच्या साहाय्याने नगरपालिकेच्या निरनिराळ्या दवाखान्यांत ही तपासणी होते व तेथील डॉक्टरकडून किरकोळ दोषांवर तेथेच उपचार केले जातात. विशिष्ट नोंदणी-पत्रकावर दोषांची व उपचारांची नोंद होते. विशेष दोष असलेल्यांची फेरतपासणी स्कूलहेल्थ युनिटच्या डॉक्टरकडून होते. आरोग्यपरिचारिका पालकांना शाळेत बोलावून वा घरी भेट देऊन पालकांना दोषांची जाणीव करून देतात व मार्गदर्शन करतात. कान-नाक-घसा यांतील दोष, नेत्रदोष व इतर मोठे दोष यांवर उपचार सरकारी रुग्णालयात व दंतदोषावर उपचार नगरपालिकेच्या केंद्रात होतात.

२. दुय्यम शाळांतील आरोग्य-तपासणी : सरकारी अनुदानासाठी दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्यतपासणी दरवर्षी करावी लागते. पुणे शहरात बहुतेक शाळांत स्टूडन्टस् हेल्थ असोसिएशनमार्फत ही तपासणी केली जाते व तिने तयार केलेले तक्तेच नोंदणीसाठी वापरले जातात. ही संस्था प्रत्येक विद्यार्थ्यामागे २५ पैसे

नाममात्र शुल्क घेऊन तपासणी करते. शाळेद्वारा पालकांना पत्र पाठवून रोगप्रतिबंधक लसीची व पूर्वीच्या आजारांची माहिती मागविली जाते. ८।१० मानसेवी डॉक्टर रोज २ तास काम करून सुमारे १५० विद्यार्थ्यांची तपासणी करतात. तपासणीची नोंद स्वतंत्र पत्रकावर करून शाळेद्वारा पालकांना दोष कळविण्यात येतात. संस्थेतर्फे १ रु. शुल्क घेऊन किंवा खाजगी रीत्या दोषांवर उपचार करून घेता येतात. काही डॉक्टरांनी चालविलेली ही खाजगी संस्था आहे. तिला आर्थिक पाठबळ नाही. दोषांचा पाठपुरावा करण्यास विशेष यंत्रणा नाही. त्यामुळे पाठपुरावा फारसा होत नाही. १९६६–६७ साली २७,१२६ विद्यार्थी तपासण्यात आले त्यांमध्ये ८,६९७ दोष आढळून आले. आढळून आलेल्या दोषांत दंतदोष, नाक-कान-घसादोष. नेत्रदोष व शस्त्रक्रियार्ह दोष हेच विशेष प्रमाणात आढळून आले.

३. महाविद्यालयीत विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी : १९६२ सालपर्यंत कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्यतपासणीची सुसूत्र योजना नव्हती. पुणे विद्यापीठाने १९६२ मध्ये विद्यार्थी आरोग्यसेवायोजना (स्टूडन्ट्स् हेल्थ सर्व्हिस स्कीम) चालू केली. प्रथम पुण्यातील कॉलेजवसतिगृहातील विद्यार्थ्यांची मग १९६७ सालपासून विद्यापीठातील पदव्युत्तर व पुण्याबाहेरील ११ कॉलेजमधील वसतिगृहांतील विद्यार्थ्यांची व काही लहान कॉलेजमधील सर्व विद्यार्थ्यांची तपासणी आता होत आहे. एकूण २८ कॉलेजे आता या योजनेत समाविष्ट आहेत. योजना कार्यवाहीत आणण्याचे काम विद्यापीठाची वैद्यकीय सल्लागार समिती व या कामासाठी विद्यापीठाने नेमलेले मानसेवी वैद्यकीय चिटणीस यांच्यामार्फत होते. विद्यापीठाचे विद्यार्थी हितवर्धक मंडळ व विद्यापीठ कार्यकारिणी यांची मान्यता या योजनेला व त्यावरील खर्चाला प्रथम घेतली जाते. प्रत्यक्ष तपासणीचे काम १० डॉक्टरांचे मंडळ व ४ स्त्रीडॉक्टरांचे मंडळ (विद्यार्थिनींसाठी) ठराविक वेळी करते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ४ वर्षे चालू राहील असा नोंदणी फॉर्म असतो व आढळलेल्या दोषांसंबंधी सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना पत्र पाठविले जाते. निरनिराळ्या वैद्यकीय शाखातज्ज्ञांचेही (स्पेशॉलिस्टस) मंडळ असून दोष आढळलेला प्रत्येक विद्यार्थी त्या त्या शाखातज्ज्ञाकडे पाठविला जातो. पुणे शहरात सुमारे ४००० तपासलेल्या विद्यार्थ्यांपैकी १३०० म्हणजे सुमारे $\frac{1}{3}$ विद्यार्थी दरवर्षी तज्ज्ञांच्या सल्ल्यासाठी पाठवावे लागतात. या योजनेमुळे तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासाठी लागणारे १०।२० रुपये अशा प्रत्येक विद्यार्थ्यांचे वाचतात, एवढेच नव्हे तर ज्या दोषांची कल्पना स्वतः विद्यार्थ्याला व पालकाला नव्हती असे कित्येक दोष दरवर्षी आढळतात. उदाहरणार्थ, केवळ एकच डोळ्याची दृष्टी मंद असल्याने विद्यार्थ्याला त्याची कल्पना नव्हती असे किमान ७५ विद्यार्थी दरवर्षी आढळून येतात. त्वचारोगतज्ज्ञाकडे पाठविलेल्यांत ११ विद्यार्थी आजवर लेप्रसीचे ठरले व ५।७ विद्यार्थी गनोऱ्हिया सिफिलिस या विकाराने पछाडलेले आढळले. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या होस्टेलमधील सर्व विद्यार्थ्यांची तपासणी मास-मिनिएचर-एक्सरे यंत्राने केली असता सुमारे २ % विद्यार्थ्यां-

मध्ये प्राथमिक अवस्थेत क्षयरोगाची बाधा असल्याचे निदान झाले. दोष आढळलेला विद्यार्थी व त्याचा पालक त्याच्या दोषाकडे लक्ष देऊन उपाय करून घेतो किंवा नाही या गोष्टीचा पाठपुरावा वैद्यकीय चिटणीस पत्र पाठवून व त्या त्या महाविद्यालयात समक्ष जाऊन करतात. विशिष्ट शाखातज्ज्ञाकडून तपासणी व सल्ला आणि आढळलेल्या प्रत्येक दोषाचा चिटणिसाकडून पाठपुरावा ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. वर्ल्ड युनिव्हर्सिटी हेल्थ सर्व्हिस व केंद्रीय सरकारचे नॅशनल हेल्थ कमिशन यांनी या योजनेची विशेष प्रशंसा केली असून त्याचे अनुकरण इतर विद्यापीठांनी करावे अशी शिफारस केली आहे. १९६६–६७ साली पुणे शहरात तपासलेल्या ३७०५ विद्यार्थ्यांमध्ये आढळलेले दोष खालीलप्रमाणे आहेत.

दोष	दोषांची संख्या	तज्ज्ञांचा सल्ला घेतलेल्यांची संख्या	उपचार करून घेतलेल्यांची संख्या
१ दंतदोष	१६४	१०१	३८
२ कान-नाक-घसा दोष	७५	४१	१०
३ नेत्रदोष	७१०	४६७	२४५
४ त्वचादोष	४१	२९	२९
५ श्वसनेंद्रियविकार	५	०	०
६ हृदयविकार	५	१	१
७ रक्तक्षय (अनीमिया)	४	४	४
८ शस्त्रक्रियार्ह दोष	६४	४१	—
९ इतर दोष	१९८	९६	८१
एकूण	१,२६६	७८०	४१६ (सुमारे ५५%)

प्राथमिक, दुय्यम व महाविद्यालयीन अशा तिन्ही प्रकारच्या तपासणीत संपूर्ण एकसूत्रता नसली तरी त्यांवरून काही अनुमाने स्पष्टपणे निघू शकतात. विद्यार्थ्यांमध्ये नेत्ररोग, दंतरोग व कान-नाक-घसा दोष यांचे प्रमाण बरेच आहे. त्वचारोग व शस्त्रक्रियार्ह तक्रारीही कमी नाहीत. योग्य पोषणाच्या अभावी उद्भवणारा अशक्तपणा व रक्तक्षय (ॲनीमिआ) कित्येकांमध्ये आढळतो.

विद्यार्थ्यांत आढळणाऱ्या दोषांचे निराकरण वेळेवर व त्वरित झाले तर त्यांना त्यांच्या अभ्यासाच्या प्रगतीत तर मदत होईलच पण पुढे उद्भवणारे व विकोपास जाणारे कित्येक दोष वा विकार टळू शकतील, ही गोष्ट आता आपल्या महाराष्ट्र शासनाला पटली असल्याने शाळांत होणाऱ्या वैद्यकीय तपासणीला शासन अनुदान देऊ लागले आहे व विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणती सक्रीय मदत करता येईल याचा विचार सुरू झाला आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळानेही (यू. जी. सी.) वैद्यकीय तज्ज्ञांची एक समिती नेमून विद्यार्थी आरोग्य तपासणी व रोगप्रतिबंधक आणि रोगहारक उपचार केले जाण्यासाठी निरनिराळ्या महाविद्यालयांसाठी लहानमोठी वैद्यकीय केंद्रे स्थापिली जाण्याची विस्तृत योजना केंद्रीय सरकारपुढे मांडली आहे व पुणे विद्यापीठाची विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेची माहिती त्या अनुदान मंडळाला असल्याने विद्यापीठ केंद्राच्या धर्तीवर परंतु त्या मानाने लहानसे आरोग्यकेंद्र पुण्यातील एखाद्या महाविद्यालयात प्रयोग म्हणून लवकरच चालू व्हावे असा प्रयत्न प्रस्तुत लेखकाकडून चालू आहे. त्याबाबतचा निर्णय २।३ महिन्यांतच लागेल अशी अपेक्षा आहे व तो अस्तिपक्षी लागल्यास कालांतराने विद्यापीठ कक्षेतील सर्वच महाविद्यालयांना त्याचा लाभ मिळण्याचा संभव आहे.

१४. वैद्यकशास्त्राच्या प्रगतीचे उद्दिष्ट व आरोग्य रक्षणाच्या तरतुदी

' सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः ' असे उपनिषद्वचन आहे. परंतु प्रत्येकाने केवळ निरामय म्हणजे निरोगी असावे एवढेच ध्येय असून चालणार नाही. केवळ रोगरहित असण्याऐवजी प्रत्येकाला निःशेष आरोग्य प्राप्त झाले पाहिजे. वैद्यक शास्त्राच्या प्रगतीचे उद्दिष्ट एखाद्याला झालेला रोग बरा करणे एवढेच न मानता त्याचे आयुष्य संपूर्ण शारीरिक, मानसिक व सामाजिक सुस्थितीत आनंदाने, उपयुक्ततेने व कार्यक्षमतेने जगता येणे हे असले पाहिजे. विद्यार्थ्यांची वैयक्तिक तपासणी करून आढळलेल्या दोषांचे तर त्वरित निराकरण केलेच पाहिजे. परंतु त्याला आरोग्य-रक्षणाच्या सर्व तरतुदी उपलब्ध होऊन मुळातच रोग उद्भवणार नाही असे पाहिले पाहिजे. आरोग्यरक्षणाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे :

१. शुद्ध व मोकळी हवा. त्याची राहण्याची जागा हवेशीर पाहिजेच पण तो ज्या शाळेच्या वातावरणात दिवसाचे ५।७ तास घालविणार ती हवेशीर असली पाहिजे. २. पिण्यासाठी शुद्ध पाणी. ३. पुरेसा व समतोल आहार. ४. व्यायाम व योग्य विश्रांती. ५. आवडीचा कामधंदा किंवा दैनंदिन काम. ६. मानसिक करमणूक. ७. शारीरिक स्वच्छता व परिसराची स्वच्छता. ८. आरोग्यकारक संवयी. ९. सांसर्गिक रोगाविरुद्ध प्रतिबंधक उपाय. १०. ठराविक वेळी आरोग्यतपासणी व आढळलेल्य दोषावर त्वरित उपाय. ११. विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये आरोग्यरक्षणाविषयी जाणीव, ज्ञान व आस्था.

या शेवटच्या मुद्द्यासंबंधी थोडे अधिक सांगण्याची जरुरी आहे. आरोग्यरक्षणाचे मार्ग नीट समजावून घेतले व त्याप्रमाणे आचरण करण्याची आवश्यकता पटली तरच कोणत्याही तरतुदीचा फायदा होईल. याबाबतीत एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. शहरात शिक्षण घेऊन आपल्या खेडेगावात वास्तव्य करण्यास गेलेल्या एका माणसाला असे वाटले की, आपल्या खेड्यात सुधारणा करण्यासाठी व पाण्यावाटे आणि माश्यांवाटे

पसरणारे रोग उद्‌भवू नयेत म्हणून आपण तेथे सर्वांसाठी फ्लशिंगच्या संडासाची सोय करावी. त्याप्रमाणे त्याने ती केली. परंतु ते संडास कसे वापरावे व का वापरावे ही गोष्ट गावकऱ्यांना त्याने प्रथम पटवून दिली नाही. संडासाच्या बंद खोलीत जाण्याऐवजी शेतावरील मोकळ्या हवेतच मलविसर्जनासाठी जाणे त्यांना प्रशस्त वाटले व त्यांनी तसे केले व ज्यांनी संडासात जाण्याचे ठरविले त्यांना ते कसे वापरावे याचे ज्ञान न मिळाल्याने संडास तुंबले व याचा परिणाम माश्यांचा सुळसुळाट होण्यात होऊन त्या गावात कॉलरा व हगवण या रोगांचा प्रादुर्भाव झाला. यावरून तात्पर्य असे की, आरोग्यासाठी जी सुधारणा वा तरतूद आपण करू इच्छितो ती ज्यांच्यासाठी असेल त्यांना त्या तरतुदीची आवश्यकता मनोमन पटली पाहिजे (It must be a felt want). नाहीतर तरतूद करूनही सर्व खटाटोप व्यर्थ होय. म्हणूनच वैद्यकशास्त्राच्या प्रगतीचे खरे उद्दिष्ट झालेला रोग पूर्णपणे बरा करता येणे एवढेच न मानता प्रत्येकाला आरोग्यरक्षणाचे मार्ग ठाऊक असले पाहिजेत, त्याविषयी संपूर्ण ज्ञान झाले पाहिजे व ते आचरण्याची आस्था प्रत्येकाने बाळगली पाहिजे. या मार्गाने आरोग्य व सुख प्राप्त होईल व स्वतःच्या आणि राष्ट्राच्या उन्नतीस हातभार लागेल.

वृत्तपत्रसृष्टीचा कानोसा

ल. ना. गोखले

गेल्या पंचवीस-तीस वर्षांतील (१९४० च्या पुढच्या) मराठी वृत्तपत्रसृष्टीकडे दृष्टी टाकल्यास अगदी प्रथम लक्षात येणारी गोष्ट ही की, ' मतपत्र ' असे जे प्रारंभीच्या कालिकांचे स्वरूप होते ते पुरतेपणी बदलले आहे. त्याच अनुषंगाने घडलेला दुसरा मोठा बदल म्हणजे या व्यवसायास आता धंद्याचे रंगरूप प्राप्त झाले आहे. मतपत्रे प्रामुख्याने वृत्तपत्रे झाली आणि मोठा धंदा आणि उद्योग असे त्यास स्वरूप प्राप्त झाले ते कालमानानुसार योग्यच घडले असल्याने, वृत्तपत्रसृष्टीचा विचार करणाऱ्यांनी ही गृहीत कृत्ये कायम लक्षात ठेवली पाहिजेत.

वृत्तपत्रांचा प्रसार कसा वाढता आहे हे प्रेस रजिस्ट्रारांच्या वार्षिक अहवालांमध्ये स्पष्ट होते. १९५६ सालापासूनचे हे अहवाल कोणासही उपलब्ध होण्यासारखे आहेत. त्यातील वृत्तपत्रांच्या खपासंबंधीचे, म्हणजे वाढीचे आकडे पाहून कोणासही आश्चर्य वाटेल. परंतु वाढणारी लोकसंख्या, साक्षरतेचा प्रसार आणि लोकशिक्षणाची गरज यांच्या निकषावर तपासता आपल्या देशातील एकूण वृत्तपत्रप्रसार अद्यापही फारच अपुरा आहे असे निष्पन्न होते. पूर्व जर्मनीत दर शंभर माणसांमागे ३०·७, पश्चिम जर्मनीत ४५·६, स्वीडनमध्ये ४६·२, अमेरिकेत ३२·६, ग्रेट ब्रिटनमध्ये ५०·६, जपानमध्ये ४१·६ अशा प्रकारे एकूण वृत्तपत्रांच्या प्रती खपतात. तेव्हा भारतात तो आकडा ४·३ असतो असे ' युनेस्को 'च्या १९६४ च्या पाहणीमध्ये दिसते. सर्व प्रकारची कालिके एकत्रितपणे धरल्यास मराठीमध्ये ६०० हून अधिक पत्रे आज आहेत. (या आकड्यात केवळ दिवाळी अंकांच्या रूपाने प्रकाशित होणाऱ्या नवनवीन वार्षिकांचा तेवढा समावेश नाही.) वाचनाची गरज कितीतरी वाढली आहे आणि कानाकोपऱ्यातील समाजाच्या सर्वांगीण विकासाचे एक साधन म्हणूनही कालिक स्वरूपात अवतीर्ण होणाऱ्या छापील शब्दांची निर्मिती येथून पुढे पुष्कळच अधिक होणार आहे.

ग्रंथरूपाने विस्तार पावलेल्या साहित्याचे मूळ झरे कित्येक वर्षांपूर्वीच्या डोंगरातून उगम पावलेले आहेत आणि म्हणूनच आजच्या मराठी साहित्याचे जनक एका अर्थाने पत्रकारच होत हे सत्य आचार्य प्र. के. अत्रे यांनी १९५० साली बेळगावच्या मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून विशद केले. त्याच भाषणात आचार्य अत्रे यांनी म्हटले होते, " स्वातंत्र्य प्राप्त होऊनही जनतेच्या गरजा आणि गाऱ्हाणी वाढत जातील आणि त्यांचे निराकारण सरकारला तातडीने दूर करता न आल्याने जनता आणि सरकार यांच्या हितसंबंधात अंतर उत्पन्न होईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. देशाच्या राजकारणात हा जो विरोधाभास निर्माण झाला आहे त्यामुळे वृत्तपत्रांची स्थिती अतिशय चमत्कारिक होऊन गेली. जनता आपली आणि सरकारही पण आपलेच. कोणाचा रोष पत्करावा ? अर्जुनाप्रमाणे अशा द्विधा मनःस्थितीत महाराष्ट्रातलेच काय पण साऱ्या देशातले पत्रकार आज अगतिक होऊन बसले आहेत. तथापि, स्वातंत्र्यप्राप्तीमुळे आपली जोखीम आणि जबाबदारी अनेक पटींनी वाढलेली आहे आणि आपण एका वैचारिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे आहोत याची निश्चित जाणीव सर्व पत्रकारांना आज झालेली आहे. "

ही जाणीव दुसऱ्या महायुद्धाचे संकट उत्पन्न झाले तेव्हाच व्यक्त झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषिक राज्यनिर्मितीचा विषय निघाल्यापासून १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य निर्माण होईपर्यंत तीच जाणीव सतत जागती होती. प्रसंगविशेषी मराठी वृत्तपत्रे आपापली संकुचित क्षेत्रे टाकून देऊन व्यापक पातळीवर येऊ शकतात हे चिनी आक्रमण आणि पाकिस्तानबरोबरची लढाई या घटनांमुळे सिद्ध झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने हेच प्रायः सिद्ध केले की, लोकशाहीमधील शासनावर वृत्तपत्रांचा अंकुश पद्धतशीरपणे राहिला तर सत्ताधाऱ्यांना आपला हेका सोडावा लागतो. मराठीतील ज्या वृत्तपत्रांनी या कामी पोटतिडकेने कार्य केले त्यांतील आचार्य अत्रे यांच्या ' मराठा 'पत्राचा सिंहाचा वाटा सर्वांस सामान्यतः मान्य व्हावा. ' मराठा ' पत्राच्या पत्रकारितेचे अन्य उन्मेष कोणास कदाचित पसंत नसतील, परंतु त्याने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस फार मोठ्या प्रमाणात हातभार लावला हे मान्य केलेच पाहिजे.

नागपूरचा ' तरुण भारत ' पुण्याहूनही प्रसिद्ध होणे, ' केसरी 'चे त्रिसाप्ताहिक स्वरूप संपून त्याचे दैनिक बनणे, एस्. एम्. जोशींसारख्यांनी मुंबईत मराठी दैनिकाचा (लोकमित्र) अयशस्वी प्रयोग करून पाहणे, व्यंगचित्रांच्या भांडवलावर मराठीमध्ये साप्ताहिक निघणे, बड्या भांडवलदारी पत्रसाखळ्यांमध्ये मराठी वृत्तपत्रांची भर पडणे या गेल्या पंचवीस वर्षांतील वृत्तपत्रसंबंधित ठळक घटना होत. मराठी वृत्तपत्रांचा बारा पॉइंट टाईप असल्यामुळे मोठ्या इंग्रजी पत्रांपेक्षा कितीतरी कमी मजकूर (शब्दसंख्या) त्यामध्ये असतो हे मान्य केल्यावरही इंग्रजी पत्रांच्या दर्जाच्या तुलनेने काही मराठी पत्रे आता खासच मागे नाहीत. मराठी माणसाने हुरळून जावे अशी मात्र ही परिस्थिती नाही. बारकाईने विचार व्हावा अशा काही थोड्याच घटनांचा आणि विषयांचा येथे परामर्श घेतला आहे.

१९५२ साली केंद्र सरकारने न्यायमूर्ती राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली प्रेस कमिशनची नेमणूक केली. त्या वेळपर्यंत मराठी पत्रकारांच्या संघटनेचे व्यापक आणि प्रातिनिधिक स्वरूप शर्थीने टिकविले गेले होते. या कमिशनपुढे मराठी पत्रकारांच्या वतीने देण्यात आलेली साक्ष आणि त्यांनी कमिशनला सादर केलेले निवेदन याबद्दल कै. राजाध्यक्ष यांनी समाधान व्यक्त केले, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देशातील वृत्तपत्र-सृष्टीवर आलेली विविध दडपणे आणि उदित झालेल्या नव्या अपप्रवृत्ती यांची झळ मराठी वृत्तपत्रांना आणि त्यामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना पोहोचलेली होती. ही समस्या कमिशनपुढे निर्भिडपणे मांडण्यात आली आणि देशाच्या वृत्तपत्रसृष्टीच्या मुख्य प्रवाहाशी मराठी पत्रकारांचे गाऱ्हाणे संलग्न कसे आहे हेही स्पष्ट करण्यात आले. या अगोदर दोन वर्षे म्हणजे १९५० साली ' इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जरनॅलिस्टस् ' या नावाने सर्व:श्रमिक पत्रकारांची मोठी देशव्यापी संघटना स्थापन झाली होती. तिच्यामध्ये भाग घेण्यास मराठी पत्रकारांनी प्रारंभ केला. त्या संस्थेमार्फत मांडावयाचे आपले म्हणणे महाराष्ट्रातील पत्रकारांनी कमिशनपर्यंत चोखपणे पोहोचविले आणि शिवाय प्रमुख भाषिक पत्रकार म्हणून मराठी मुलूख मागास नाही हेही सिद्ध केले. मराठी पत्रकारांची संघटना, १९५०-५२ नंतरच्या काळात औदासिन्याच्या गर्तेत सापडल्याने आणि निर्नायकी प्राप्त झाल्याने सर्वथैव विस्कळीत झाली ही वस्तुस्थिती असली तरी व्यावसायिक संघटनेच्या बाबतीतील मराठी हुंकार अर्थयुक्त होता हे कोणीही मान्य करील.

मराठी वृत्तपत्रव्यवसाय, दोन-तीन वृत्तपत्रांपुरता तरी ' मोठ्या धंद्या 'च्या पातळीवर दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात पोहोचला. खपाबाबत लाखाची गोष्ट आता ख-पुष्पाप्रमाणे दुर्लभ राहिली नाही, इतकेच नव्हे तर रविवारी साप्ताहिक स्वरूपामध्ये बहुविध विषयांना वाहिलेला अंक वाचकांच्या हाती द्यावा, त्या बाबतीतील इंग्रजी वृत्तपत्रांइतका दर्जा संपादन करावा आणि वाचकांच्या पुढ्यात जीवनाच्या नाना अंगांचे दर्शन घडविणारा, चित्रे, छायाचित्रे यांनी युक्त असलेला असा मजकूर नेटकेपणाने टाकावा असा रविवार अंकाचा, मराठी वृत्तपत्रसृष्टीस अगदी नवीन असणारा नमुना निष्पन्न झाला. साहजिकच त्याचा दणका आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकांना बसला. ' चित्रा ' व ' मौज ' ही साप्ताहिके नामशेष झालेली होतीच, ' विविधवृत्ता 'ची ही तीच गत झाली. तटणिसांसारख्या कसबी, हर-हुन्नरी आणि कल्पक संपादकालाही कालप्रवाहाशी झुंज देणे अशक्य झाले. त्यांच्या निर्याणानंतर आणि ' विविधवृत्त ' बंद पडल्यानंतर त्याच नमुन्याबरहुकूम निघणाऱ्या ' आलमगीर ' साप्ताहिकाचीही अलिकडच्या काळात इतिश्री झालीच. स्वतंत्र साप्ताहिक मराठीत चालणे अशक्य ठरविणारी घटना म्हणजे आचार्य अत्रे यांच्या ' नवयुग ' साप्ताहिकाचा अवेळी झालेला शेवट होय. आचार्य अत्रे यांनी ' मराठा ' दैनिक ज्या जिद्दीने आणि समर्थपणे चालविले त्याच गुणांचा पुरेपूर लाभ घडलेल्या

'नवयुग' साप्ताहिकाला मात्र आपला प्रवास आटपता घ्यावा लागला. त्यापूर्वी कितीतरी अगोदर प्रा. फडके यांचे 'झंकार' साप्ताहिक अल्पजीवी ठरून लुप्त झाले होते. १९५० सालच्या आगेमागे साप्ताहिकांच्या दृष्टीने हा अत्यंत अनिष्ट असणारा काळ महाराष्ट्रात प्राप्त झाला.

पूर्वी दैनिकांना आठवड्यातून एक दिवस सुट्टी असे. हा सुट्टीचा दिवस बहुधा रविवार असे आणि त्या दिवशी साप्ताहिके प्रसिद्ध होत. दैनिकांपेक्षा वेगळ्या चवीचे आणि निराळ्या चणीचे पत्र म्हणून रविवारी लोकांना साप्ताहिक वाचावेसे वाटे. पण हा मनू पालटला. दैनिकांनी सुट्टी बंद करून मनोरंजक मजकुरावर भर देणारे स्वतंत्र अंक रविवारीही काढावयास प्रारंभ केला. तेव्हा या अंकांतून साप्ताहिकाची गरज भाग-विणाऱ्या या मजकुराबरोबरच रोजच्यासारख्या ताज्या बातम्याही वाचावयास मिळू लागल्या, म्हणजे मग स्वतंत्र साप्ताहिकांचे जणू काम उरलेच नाही आणि एक प्रकारे साप्ताहिकांचा कालखंडच संपला. 'विविधवृत्तासारखे चविष्ट साप्ताहिकही यामुळेच बंद पडले' असे श्री. पा. वा. गाडगीळ म्हणतात. १९६१ च्या अखेरीस सांगलीस झालेल्या मराठी पत्रकारांच्या संमेलनात 'मराठवाडा' कार श्री. अनंत भालेराव यांनी साप्ताहिके नाहीशी होण्याबद्दल काळजी व्यक्त केली आणि व्यवसायाच्या "आरोग्यरक्षणा-साठी काही 'श्रम विभागणी' व्हावी, दैनिकांनी साप्ताहिक आवृत्त्या न काढता स्वतंत्र साप्ताहिक मतपत्रे वाढू द्यावीत" असेही सुचवून पाहिले. अर्थातच, त्याचा काहीही उपयोग होण्यासारखा नव्हता. उद्या टेलिव्हिजन आल्यावर त्याने बातम्या दृश्य व श्राव्य स्वरूपात न देता इतर कार्यक्रम तेवढे करावेत आणि बातम्यांबाबतची जबाबदारी दैनिकांवर सोपवावी अशी श्रमविभागणी कोणी सुचवील काय? श्री. भालेराव यांनाच त्यांच्या सूचनेतील दोष लक्षात आला असावा हे त्यांनी अलीकडेच आपल्या 'मराठ-वाडा' या द्विसाप्ताहिकाचे दैनिक वृत्तपत्रांत रूपांतर केले यावरून दिसून येते.

'केसरी'ने आपल्या द्विसाप्ताहिक स्वरूपास त्रिसाप्ताहिकाचे नवे रूप प्राप्त करून दिले तेच मुळी त्यातील विविध विषय-विभागाच्या पुरवणीने. १९५१ सालचा पहिला रविवार उगवला तो या विविध विषय-विभागाच्या नावीन्याने संपन्न झालेला होता. 'केसरी'चा हा नवा अवतार सर्वांनाच चकित करणारा ठरला. कारण यामधून आता 'गिरीकुहरी निद्रित असणाऱ्या हरी'ने आपले उग्र, गंभीर रूप टाकून एक निराळेच दर्शन घडविले होते. आता तो कंगव्याने केस विंचरणारा, मधून मधून आरशात पाहणारा, निराळाच देखणा सिंह झाला होता. निरनिराळे ललित विषय, त्यांची रोचक आणि आकर्षक मांडणी, चित्त वेधून घेणारी चित्रे आणि फोटो हे सारे 'केसरी'च्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या शुद्ध राजकारणी प्रकृतीस सर्वस्वी विसंगत होते. परंतु वाचकांच्या आवडीच्या रूपाने प्रकट होणारी काळाची गरज त्यामध्ये स्पष्ट झाली होती. दैनिक वृत्तपत्रांनीही विचार करावा असे हे स्थित्यंतर पुष्कळ काही सुचवीत होते. जनमानसावरील 'केसरी'ची पकड पक्की व विस्तृत करण्यास विविध विषय-

विभागजसा कारणीभूत होता त्याचप्रमाणे मराठी साप्ताहिकांची मागणी कमी कमी करावयास लावणाराही तो ठरला. व्यवस्थापनाचे नवे आधुनिक तंत्र आणि लोकांच्या बहुविध आवडींची कदर करणे याबाबतीत दुबळ्या ठरलेल्या साप्ताहिकांवर ' विविध विषयविभागा 'ने रामटोलाच हाणला.

साप्ताहिकांची समाप्ती एकपरीने विचारांस चालना देणारी ठरली आणि वृत्तपत्रांच्या मनोरंजक सदरांच्या बाहेर जाऊन स्वतंत्रपणे काही अवसान आणावे आणि ते नव्या परिस्थितीतील अंगभूत गुणांच्या बळावर टिकवून धरावे अशा स्वरूपाचा नवा विचार पुढे उत्पन्न झाला आणि ' मार्मिक ', ' माणूस' व ' सोबत ' अशांसारखी, भिन्न-प्रकृती साप्ताहिके अवतरली. या तीनही साप्ताहिकांमध्ये तसे काहीच साम्य नाही पण त्यांनी आपापले विभिन्न व्यक्तिमत्त्व कसोशीने जपले आहे यात शंकाच नाही. लेखणी-बहाद्दरतेच्या जोडीस काही एक प्रकारची आगळी कृतिशीलता यातील निदान दोन तरी साप्ताहिकांनी व्यक्त केली आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टीतील हा नवा निराळाच पैलू होय. ' साधना ' साप्ताहिक त्याच्या ध्येयवादामुळे आणि निर्मितिमूल्यांच्या समाजामुळेही मराठी साप्ताहिकातील आपले स्वतंत्र स्थान टिकवून राहिले आहे.

' सकाळ ' संस्थेतर्फे निघणाऱ्या ' स्वराज्य ' साप्ताहिकाच्या यशाची कथा कोणालाही विचार करावयास लावील अशीच आहे. अगदी छोटा प्रारंभ, सर्वसामान्य वाचकांच्या नाडीवर कायम ठेवलेला हात आणि तसे विशेष, विलक्षण, नावीन्ययुक्त काहीही नसताना या साप्ताहिकाने एक लाखाच्या आसपास मारलेली खपाची उडी थक्क करणारी आहे. सामान्य वाचकांमधून नाना प्रकारचा मजकूर उत्पन्न करून त्यांनाच एक प्रकारे संपादनात सहभागी करून घेण्याचे कसब हे ' स्वराज्य ' साप्ताहिकाचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

पुण्यातील ' ज्ञानप्रकाश ' दैनिकाचा अंत १९५० च्या अखेरीस झाला त्या वेळी त्या पत्राने शंभरी ओलांडली होती. ' ज्ञानप्रकाश ' हे मराठीतले एकेकाळी जनमानसाची मोठ्या प्रमाणावर पकड घेतलेले पत्र होय. द्विसाप्ताहिक असणाऱ्या ' केसरी 'स ' ज्ञानप्रकाश 'ने फार पूर्वी आपल्या दैनिक स्वरूपाच्या जोरावर काही काळ स्तिमित केले होते. " त्यांचे पत्र दैनिक, माझे साप्ताहिक, मी एका लेखाने जर त्यांचा महिन्या-भराचा प्रचार हाणून पाडायचा तर थोडे कडक लिहिणे येतेच, " असे लोकमान्य टिळकांनी एका निमित्ताने म्हटले होते. परिस्थितीनुसार पुढे ' ज्ञानप्रकाश ' बदलला आणि विचारपत्र म्हणून असणारा मोठेपणा सोडून बातम्या गोळा करून त्या ढंगदार-पणे देण्यावर ' ज्ञानप्रकाश 'ला भर द्यावा लागला. ' ज्ञानप्रकाश 'चा असा मोहरा वळविण्यास ' सकाळ ' कारणीभूत झाला. ' ज्ञानप्रकाश 'चे कल्पक संपादक श्री. काकासाहेब लिमये यांनी ' ज्ञानप्रकाश' लोकप्रिय करण्यासाठी नाना प्रकारच्या भारदस्त क्लृप्त्या केल्या. त्यांनी वैचारिकता ढळू न देता, किंवा महत्त्वाच्या विषयांबाबत हात राखून लिहिण्याचे तंत्र न अवलंबिता ' ज्ञानप्रकाश 'ची बैठक आपल्या निःपक्षपाती

धोरणाने व्यापक बनविली. आचार्य अत्रे काकासाहेब लिमये यांना ज्येष्ठ स्नेही मानीत असत. 'ज्ञानप्रकाश'चे अस्तित्व संपल्यानंतर पुढे सहा वर्षांनी 'मराठा' सुरू केल्यावर 'ज्ञानप्रकाश'ची आठवण करून देणारे "हंशा" "टाळया" यांनी भरगच्च असणारे वृत्तान्त 'मराठा'मध्ये येऊ लागले ते मुख्यतः अत्रे यांच्या समोर असणाऱ्या 'ज्ञानप्रकाश'च्या नमुन्याबरहुकूमच होते. 'ज्ञानप्रकाश' बंद पडला तो काही त्याचा दर्जा घसरला म्हणून नव्हे. चालकांचे माघारीचे धोरण आणि व्यवस्थापनामध्ये निर्माण झालेली गोंधळाची अवस्था हीच 'ज्ञानप्रकाश' बंद होण्याची प्रमुख कारणे होत.

मराठी मालकी व तिच्या मर्यादा आणि मराठी बाण्याच्या संपादकाची सर्वांगीण जिद्द या गोष्टींचा नमुनेदार पडताळा मुंबईच्या 'प्रभात' दैनिकाच्या कहाणीत मिळतो. या पत्राचे संपादक श्री. श्रीपाद शंकर नवरे यांनी स्वतःच्या सहीने 'प्रभात'च्या शेवटच्या अंकात ती विशद केली आहे. या पत्राच्या एकवीस वर्षांच्या आयुष्यापैकी जवळ जवळ सतरा वर्षे श्री. नवरे त्याच्याशी संबंधित होते. प्रारंभी या पत्राची किंमत अवघी एक पैसा (जुना) होती. सप्टेंबर १९३९ पासून ती दुप्पट म्हणजे दोन पैसे झाली आणि पुढे युद्धकाळात सरकारी आज्ञेनुसार एक मार्च १९४३ पासून एक आणा झाली. अत्यंत काटकसरीने उत्पादन केलेले मराठी बाण्याचे नीटनेटके वृत्तपत्र असा 'प्रभात'ने लौकिक प्रस्थापित केला होता. परळ व लालबागचा वाचकवर्ग मोठा म्हणून 'प्रभात' हे एकपरीने कामगारांचे पत्र मानले जाई. मुंबईच्या वृत्तपत्राने पुण्यात आपली स्वतंत्र आवृत्ती काढण्याचा प्रयोग 'प्रभात'नेच केला. (हजारो रुपयांची खोट आल्यामुळे पुढे 'प्रभात'चे मालक भागवत यांना पुण्याचा 'प्रभात' विकून टाकावा लागला.)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वच उद्योगधंद्यांची स्थिती सुधारेल असे मानले गेले होते. परंतु मोठ्या भांडवलावर चाललेल्या धंद्याशी त्याच जागी छोट्या भांडवलावर चालणारा धंदा स्पर्धा करू शकत नाही या सिद्धान्ताचे प्रात्यक्षिकच 'प्रभात' पत्राच्या अनुभवास आले आणि श्री. नवरे यांनी आपल्या शेवटच्या अग्रलेखात लिहिले, "हल्ली वृत्तपत्रांच्या क्षेत्रात एकाच मालकाची एका किंवा अनेक ठिकाणी चाललेली अनेक भाषांतील पत्रे होऊ लागलेली आहेत. या अजस्र साखळीपुढे एकाकी पत्राला टक्कर देणे दिवसेंदिवस कठीण होत चाललेले आहे हे या धंद्यातील उघड गुपित होय." श्री. नवरे निर्देशितात ती गळेकापू स्पर्धाच 'प्रभात'ला मुख्यतः भोवली. त्यांनी आपल्या लेखात, 'अत्यंत दुःखाने आणि संतापाने' निर्देश केलेली गोष्ट मोठीच विलक्षण आहे. 'प्रभात'चे छापले जाणारे सर्वच अंक पैदा करून नष्ट करून टाकावयाचे आणि 'प्रभात' पत्र निघालेच नाही किंवा बंद पडले आहे असा पुकार ग्राहकांमध्ये करावयाचा अशासारखा प्रयोगही भांडवलदारी पत्राच्या हस्तकांनी केला. खुद्द श्री. नवरे यांच्याकडेच अंक टाकणाऱ्या पोऱ्याने 'आज 'प्रभात' निघाला नाही' असे सुनावले होते.' 'प्रभात'चा अशा प्रकारे झालेला शेवट पाहून या क्षेत्रातील विचारी माणसांची

अंतःकरणे थरथरली आणि भांडवलदारी आक्रमणाचा धक्का मराठी वाचकवर्गालाही जाणवला. सर्व पत्रकारांनी मिळून एकत्रित येऊन या अवस्थेचा विचार करावा असाही विचार त्या काळी व्यक्त झाला. परंतु भांडवलदारी पत्रांच्या चालकांशी इतरांनी बोलणे करण्यातून काहीच निष्पन्न होणार नाही हाच निष्कर्ष प्रबळ ठरला आणि 'भांडवली स्पर्धा करणाऱ्या लोकांची तोंडेही पाहावयाला नकोत' असे 'नवाकाळ'च्या श्री. आप्पासाहेब खाडीलकरांनी वैतागून उद्‌गार काढले.

'प्रभात'च्या समाप्तीनंतर मुंबईत उरलेल्या 'नवाकाळ' या एकमेव मराठी मालकीच्या पत्रास आपला जम स्वतंत्रपणे बसविणे आणि धंदा म्हणून यशस्वी ठरणे काही केल्या जमू शकले नव्हते. मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये परिस्थितीनुसार असंख्य बदल होत होते, पण 'नवाकाळ'ची अवस्था सुधारण्यास कशाचाच काहीही उपयोग होऊ शकला नाही. वास्तविक श्री. आप्पासाहेब खाडीलकर 'नवाकाळ'मध्ये जसे अग्रलेख लिहीत होते, (आणि आजही लिहीत आहेत) त्यांची अलंकारिक धाटणी, सोपेपणा आणि खुबीदारपणा ही वैशिष्ट्ये अगदी स्वतंत्र व स्वयंपूर्ण अशीच होती. पण 'नवाकाळ'ची परिस्थिती सुधारण्यास तो श्री. आप्पासाहेब यांचे चिरंजीव श्री. नीलकंठराव यांच्या स्वाधीन व्हावा लागला. 'नवाकाळ'चे चिमुकले भावंड 'संध्याकाळ' याचाच काय तो तरुण नीलकंठरावांना पत्रकारितेचा अनुभव. पण 'संध्याकाळ'च्याच उत्साहाने त्यांनी 'नवाकाळ' हाती घेतला आणि अगदी अलीकडेच त्याची समग्र घडी नव्याने बसविली.

'नवाकाळ' दैनिकाने मे १९६८ मध्ये नवे वेगवान मुद्रणयंत्र विकत घेतल्यापासून जो चमत्कार करून दाखविला आहे त्याला तोड नाही. 'प्रभात' पत्राचे संपादक श्री. श्री. शं. नवरे यांनी २५ नोव्हेंबर १९५० च्या आपल्या शेवटच्या अंकात जो अनुभव विशद केला त्याचा 'नवाकाळ' पत्रास काहीच उपयोग झालेला नव्हता. आता 'नवाकाळ' हे एकमेव मराठी मालकीचे पत्र मुंबईत उरले या वस्तुस्थितीचाही त्यास काही फायदा मिळू शकला नाही. प्रतिदिनी त्यास माघारीचाच अनुभव येऊ लागला. पत्राचा खप कमी कमी म्हणजे किती होऊन राहावा? ४५०० प्रतींइतकी ही गाडी घसरली होती. १९७० सालात आज तो आकडा ५५ हजारांच्या घरात आहे. १९५४ साली ज्याच्या नाकापुढे सूत धरले होते त्या पत्राने अगदी अलीकडे म्हणजे मे १९६८ पासून एकदम नवाच अवतार धारण केला आहे आणि वृत्तपत्राच्या खपांच्या वाढीत सहसा कधी अनुभवास न आलेला चमत्कार करून दाखविला आहे. वाचकांच्या नाडीवर सतत हात ठेवावयाचा, त्यांना हव्या असलेल्या सर्वांत प्रमुख विषयाची बातमी भरपूर व सर्वांगीण प्रकारे द्यावयाची आणि कोणत्या ना कोणत्या वैशिष्ट्यानिशी हे रोजच्या रोज करीत राहावयाचे म्हणजे अत्यंत अवघड असा विक्रमच होय. तो 'नवाकाळ'ने मोठ्या उमेदीने चालविला आहे. सहा पानी अंक रोज द्यावयाचा आणि ७५ हजारांवर खप न्यावयाचा अशी त्या पत्राने उमेद

बाळगली आहे. मराठी अस्मितेचा हा 'नवाकाळ' म्हणजे नव्या अद्‌भुत पर्वाचा प्रारंभकाळ ठरला पाहिजे.

भाषिक पत्रांसंबंधी दिल्लीच्या प्रेस इन्स्टिटयूटतर्फे छोटासा प्रबंध (१९६७) लिहिणाऱ्या श्री. टी. जे. एस्. जॉर्ज यांनी पुण्याच्या 'सकाळ' पत्रासंबंधी जे विवेचन केले आहे ते लक्षात घेण्यासारखे आहे. श्री. जॉर्ज म्हणतात, "सर्व श्रमिक पत्रकारांनी 'सकाळ'च्या कारभारावर टीका केली. कारण असे की 'सकाळ'च्या संपादकमंडळात पूर्ण वेळ पत्रकार म्हणण्याजोगे पाच-सहा जणच आहेत आणि फुटकळ मजकूर देणारे रोजंदारी पद्धतीचे काम करणारे कॉलेज-विद्यार्थी आहेत. तसे असले तरीही हे मान्यच केले पाहिजे की, अत्यंत शास्त्रशुद्धपणे चालविले जाणारे आपल्या देशातले 'सकाळ' हे एक प्रमुख पत्र आहे. ग्रामीण भागातील वाचकवर्ग आणि नागरी लोकजीवन व बहुविध समाजहितसंबंध यांची बूज राखण्यासाठी शक्य असणारे सर्व प्रयत्न 'सकाळ' करीत आहे. जिल्हा व तालुका पातळीवर काम करणाऱ्या बातमीदारांना त्यांचे काय हुकले, त्यांनी काय साधले, पुढील काही दिवसांत त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत, याबाबत 'सकाळ'मधून अनेक पत्रे पाठविली जातात त्यामुळे बातमीदारांना सतत पराणी लावली जाते, त्यांची भ्रमंती अविरत चालू असते. ग्रामीण भागातील बातमीदारांचा वर्षातून एकदा मेळावा भरवून त्यांना समक्ष शिक्षण देण्याचाही प्रयोग 'सकाळ' तर्फे केला जातो. पत्रे, भेटीगाठी आणि टेलिफोन यांच्या आश्रयाने आपल्या बातमीदारांशी सतत जागता संबंध ठेवूनच 'सकाळ' महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील बातम्या मिळवितो. त्यामुळे जिल्हा तालुका पातळीवरच्या जास्तीत जास्त बातम्या देण्यात 'सकाळ'ची बरोबरी करू शकणारे मराठीत एकही वृत्तपत्र नाही. छोट्या ठिकाणचे नियमित बाजारभाव देणारे हे एकच पत्र आहे. ठिकठिकाणच्या बातमीदारांना पूरक होणारे काम 'सकाळ' कचेरीतून बाहेर खास प्रतिनिधी पाठवूनही केले जाते. त्यामुळे समाजाच्या नाना अंगांचे दर्शन 'सकाळ'मध्ये विशेषपणे होते. 'सकाळ'च्या संपादकीयासंबंधी लोक फारसे बोलणार नाहीत; पण ज्यांना बातम्या पाहिजे असतात ते प्रथम 'सकाळ' हाती धरतात. पुण्यातल्या एका जुन्या पत्रकाराने मला सांगितले की, 'सकाळ'ने आपली अशी सोपी मराठी वृत्तपत्रीय भाषा निर्माण केली आहे. शुद्ध मराठीचा आग्रह धरणाऱ्यांना 'सकाळ' धाटणीची मराठी भाषा आवडणार नाही; पण ते हे मान्य करतात की ग्रामीण वाचकवर्ग या भाषेकडे आकृष्ट होतो."

श्री. जॉर्ज यांनी 'सकाळ'च्या वतीने चालणाऱ्या भाजीपाला समितीचाही परामर्श आपल्या पुस्तिकेमध्ये घेतला आहे. नाट्यवाचन समिती, भाजीपाला समिती किंवा नागरी संघटना या साऱ्यांचा अंतिम रोख 'सकाळ'कडे वाचकांचे लक्ष वेधून घेण्याकडे कसा असतो हेही त्यांनी वर्णन केले आहे. 'सकाळ'ची बातम्यांची मांडणी आकर्षक नसते आणि मजकूर खच्चून भरण्याचे धोरण एकंदरीत दिसते असे दोषही त्यांनी दाखविले आहेत. 'सकाळ'च्या यशाच्या इतिहासाचे अनेक उद्‌बोधक टप्पे

आहेत. एक माणूस आपल्या अंगच्या गुणावर केवढे विश्व निर्माण करू शकतो त्याचा धंदा या दृष्टीने ' सकाळ 'चा विचार करणाऱ्यास प्रथम पडताळा येईल.

पत्रकारांच्या शिक्षणाचा आणि प्रशिक्षणाचा विषय अधूनमधून डोके वर काढतो. मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्षीय भाषणांमध्ये आणि स्वतंत्र ठरावान्वये या विषयास सतत चालना मिळाल्याचे दिसून येते. मुंबईस प्रा. न. र. फाटक आणि पुण्यास श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांनी वृत्तपत्र-व्यवसायाच्या शिक्षणाचे वर्ग चालविले (असहकारितेच्या चळवळीच्या काळात कै. न. चिं. केळकर यांनी पुण्याला काढलेला वृत्त-पत्रव्यवसाय शिक्षणाचा वर्ग सतत एक वर्षभर चालला होता) परंतु या विषयास खरी चालना दिली ती पत्रकारांच्या कोणत्याही संघटनेने नव्हे तर मराठी मुलखातील विद्यापीठांनी. नागपूरला हिस्लॉप कॉलेजच्या वतीने आणि नागपूर विद्यापीठाच्या आशीर्वादाने, पत्रव्यवसायाचा अभ्यासक्रम चालविण्यात आला. त्याचे संचालन करणाऱ्या अमेरिकन प्राध्यापकांच्या असमर्थतेमुळे म्हणा किंवा हिस्लॉप कॉलेजच्या दृष्टिकोणात झालेल्या बदलामुळे म्हणा हा शिक्षणक्रम काही वर्षेच चालू राहिला. पुढे पुणे विद्यापीठाने या बाबतीतील कोंडी फोडली आणि १९६४ साली स्वतंत्र विभाग काढून या विषयातील सर्वांगीण शिक्षणास प्रारंभ करून दिला. नागपूर विद्यापीठाने १९६९ मध्ये पुन्हा हा शिक्षणक्रम सुरू केला आहे. शिवाजी विद्यापीठाचा पत्रव्यवसायाचा प्रमाणपत्र परीक्षेचा अभ्यासक्रम आता स्थिरपद झाला आहे. याच पद्धतीने मुंबई विद्यापीठाने आपला वाटा उचलावयास हवा होता. परंतु दुर्दैवाने या विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाची व त्याच्या अभ्यासक्रमाची भ्रूणहत्या झाली. मुंबईस साऱ्या सुविधा उपलब्ध असताना आणि पत्रकारितेच्या प्रत्यक्ष शिक्षणाचे सर्व टोलेजंग आखाडे स्वागतशील असताना हे घडावयास नको होते.

हे लक्षात ठेवले पाहिजे की, या सर्व अभ्यासक्रमांचे लक्ष्य केवळ मराठी वृत्तपत्र-व्यवसाय नाही आणि केवळ वर्तमानपत्रेही नाही. समुदायाशी नाते जोडणाऱ्या आणि संवाद करणाऱ्या दृश्य श्राव्य आणि वाचनसंबंधित अशा सगळ्याच माध्यमांचा अभ्यास या शिक्षणक्रमामध्ये होतो. या शिक्षणक्रमांचा उपयोग समाजास अधिकाधिक व्हावयाचा तर त्याबाबतचा आग्रह वृत्तपत्रीय व अन्य व्यावसायिक नोकरी करणारासाठी म्हणून धरला जावयास हवा. ब्रिटनमधल्यासारखी पत्रव्यवसायात पडणाऱ्यांच्या शिक्षणाची व्यवसायातर्फे व्यवस्था आपल्याकडे झालेली नसल्यामुळे विद्यापीठांचा एतद्-विषयक डिप्लोमा अथवा डिग्री असल्याशिवाय या व्यवसायामध्ये सरकारच्या माहिती खात्यामध्ये आणि नभोवाणीच्या वार्ताविभागामध्ये कोणासही प्रवेश द्यावयाचा नाही, असे काही ठरवून टाकण्याची वेळ आलेली आहे. या बाबतीतील शुभारंभ महाराष्ट्र राज्यास आता खासच करता येईल. वृत्तपत्रांनाही शैक्षणिक पात्रता असलेल्यांची नेमणूक करण्याच्या योजना स्वतंत्रपणे आखता येतील. मोठ्या पत्रांच्या तर्फे चालणाऱ्या अशाच खाजगी शिक्षणव्यवस्थेचाही लाभ छोट्या पत्रांना (आवश्यक त्या तरतुदीस

मान्यता देऊन) करून घेता येईल. मराठी पत्रकार परिषदेच्या आजवरच्या कितीतरी अधिवेशनांमध्ये पत्रकारिता शिक्षणाची व्यवस्था होण्याबाबत आग्रही ठराव करण्यात आलेले आहेत. तशी व्यवस्था मोठ्या प्रमाणात आणि विद्यापीठ पातळीवर होऊ लागल्यावर पत्रकारांच्या संघटनांनीही आनुषंगिक जागृती दाखविली पाहिजे.

या लेखामध्ये मुख्यतः पुण्या-मुंबईच्या अगदी थोड्या वृत्तपत्रांच्या अनुषंगाने धावता परामर्श घेतला आहे. तोही मराठी मनाची अस्मिता स्पष्ट करण्यापुरताच. आता पुण्या-मुंबईच्या बाहेर कोल्हापूर, नगर, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात पत्रकारिता धडपड व्यक्त झाली आहे. नव्हे, ‘ मराठवाडा ’, ‘ गावकरी ’, ‘ संचार ’ आणि ‘ तरुण भारत ’ या दैनिकांचे वर्धिष्णू संसार लक्षात घेतले तर केवळ त्यांच्यासाठीही, म्हणजे त्यांस न्याय देण्यासाठी किमान एवढेच लिखाण करावे लागेल.

हा सारा विकास पुढील काळात योजनाबद्ध होईल तर मराठी पत्रसृष्टीचा चेहरा मोहराच बदलून जाईल आणि लोकशिक्षणाच्या कार्यात वृत्तपत्रांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसू शकेल. परंतु ते होण्यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवर असणाऱ्या सर्व वृत्तपत्रांचा दर्जा पुष्कळच सुधारला पाहिजे. त्यांनी पुण्या-मुंबईच्या मोठ्या दैनिकांचे नमुने आपल्यापुढे न ठेवता स्वतःचे कार्यक्षेत्र स्वतंत्रपणे आखून घेऊन जागत्या आणि संवेदनाक्षम संपादनाची कास धरली पाहिजे. मग इतर भाषिक पत्रांच्या तुलनेने मराठी पत्रे आपोआपच वरिष्ठ स्थानी पोहोचलेली दिसतील.

महाराष्ट्रातील बँका

डॉ. वसंत पटवर्धन

भारतातील बँकिंग क्षेत्राचा साकल्याने विचार केला तर महाराष्ट्रातील बँकिंगचा व्यवसाय बराच प्रगत आहे असे म्हणावे लागेल. अर्थात हे विधान बरेच फसवे आहे; आणि त्यातील सत्य हे या व्यवसायाची महाराष्ट्रापुरती संपूर्ण पाहणी केल्याखेरीज लक्षात येणारही नाही. केवळ आकड्यावरच प्रगती मोजायची असेल तर महाराष्ट्राला बँकिंग क्षेत्रातल्या वाढीचा अभिमान बाळगता येईल. कारण १९६८ चे जे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यानुसार देशातील व्यापारी बँकांच्या एकूण शाखांपैकी १०४३ शाखा महाराष्ट्रात होत्या. १९६९ साली त्यात आणखी सव्वाशे शाखांची भर पडली आहे. महाराष्ट्राच्या एकूण पावणेपाच कोटी लोकसंख्येसाठी ४९ बँका कार्यरत असून दर ४६००० माणसांमागे बँकेची एक शाखा पडते. इतर राज्यांची परिस्थिती त्या मानाने तितकी चांगली नाही. मध्य प्रदेशमध्ये केवळ ३२४, उत्तर प्रदेशमध्ये ६९३, पंजाबमध्ये ३००, बंगालमध्ये ४६३ तर म्हैसूरमध्ये ६८७ एवढ्याच शाखा या वर्षी या बँकांच्या होत्या. सहकारी बँकांबाबतही महाराष्ट्रात ११०७ शाखा होत्या, तर म्हैसूर, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब या राज्यांत त्या अनुक्रमे ४९१, ५६०, २२१, १२२ एवढ्याच होत्या. गावांच्या दृष्टीने बघितले तरीसुद्धा महाराष्ट्रात २८२ ठिकाणी व्यापारी बँकांच्या शाखा आहेत व ७१८ ठिकाणी सहकारी बँकांच्या शाखा आहेत (जून १९६८ अखेर). लोकसंख्यानिहाय त्यांची वाटणी परिशिष्ट ' अ 'मध्ये दिली आहे.

महाराष्ट्रातील बँकांचा विस्तार हा नुक्तानुक्ता शहरातूनच मर्यादित होता. मात्र सहकारी बँका, जिल्हा बँका, जिल्हा बँकांची वाढ व्हायला लागल्यानंतर तालुक्याच्या ठिकाणी गेल्या आहेत. महाराष्ट्रातील व्यापारी बँकांकडे असलेल्या ठेवींचा आकडा १९६८ अखेर ११०४ कोटी रुपये (किंवा देशाच्या एकूण ठेवीच्या २५ टक्के) एवढा होता, तर महाराष्ट्रातील कर्जे ९८१ कोटी रुपये एवढी होती. सर्व भारतातील

एकूण व्यापारी बँकांची कर्जे ३१४६ कोटी रु. होती. त्याच्याशी या रकमेचे प्रमाण ३१ टक्के एवढे पडते. महाराष्ट्रातील व्यापारी बँकांची कर्जे व ठेवी यात गेल्या दहा वर्षांत कशी वाढ झाली आहे हे परिशिष्ट ' ब ' वरून लक्षात येईल.

असे असूनही महाराष्ट्रातील बँकिंगचीही वाढ काही शहरांपुरतीच मर्यादित होती व अजूनही आहे. महाराष्ट्रात मुंबईचा समावेश होत असल्याने बँकिंगचा जास्त विकास झालेला दिसतो. पण मुंबई वगळल्यास इतरत्र हा विकास सर्वत्र सारखा दिसत नाही. मुंबईनंतर १९६० सालानंतर पुणे, नागपूर, कोल्हापूर अशी काही शहरे थोडीफार वाढली आहेत; पण त्यांच्या वाढीतही जाणवणारी तफावत आढळते. एक कोटी रुपये ही फार मोठी रक्कम हल्लीच्या काळात मानता येत नाही. पण १९६८ अखेर महाराष्ट्रात अशी शहरे फक्त ३७ होती. म्हैसूर राज्य किंवा गुजरात व पंजाब ही राज्ये महाराष्ट्राहून लहान असूनही तिथे अशा शहरांची संख्या अनुक्रमे २९, ३७ व २१ इतकी आहे. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांत ह्या बँकांचा विस्तार किती तुटपुंजा आहे आणि शिरगणतीत मोठी गावे म्हणून नोंद केलेल्या अनेक गावी सुद्धा तीन अगर तीनपेक्षा जास्त व्यापारी बँकांच्या शाखा किती ठिकाणी आहेत याची कल्पना परिशिष्ट ' क ' बघितल्यावर सहज येईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील मोठ्या तीन शहरांच्या ठेवीत किती तफावत आहे याची कल्पना परिशिष्ट 'ड' वरुन येईल. बाकीच्या शहरांची वाढ तर त्याहूनही किती तरी तफावतीत व कमी प्रमाणात आहे.

महाराष्ट्रातील बँकिंगचा इतिहास या बाबींवर सहज प्रकाश टाकू शकतो. तसे पाहिले तर मुंबई महाराष्ट्रात असल्याने या राज्यात व्यापारी बँकांचा नवीन पद्धतीचा व्यवसाय ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या वखारी येथे सुरू केल्या तेव्हापासूनच सुरू झाला असे म्हणता येईल. तत्पूर्वी महाराष्ट्रातीलच मंगळवेढ्याला दामाजीच्या हुंडीची झालेली गोष्ट सर्वश्रुत आहे आणि त्यानंतरही शिवकालीन व पेशवेकालीन इतिहासात कर्जे घेऊन राज्यविस्तार करावा लागला हीही गोष्ट जाहीर आहे. पण हुंड्यांच्या स्वरूपात झालेल्या त्या व्यवहारांना बँकिंग म्हणता येणार नाही. आधुनिक पद्धतीच्या बँकिंगचा व्यवहार-सुद्धा इंग्रजांनी वखारी काढल्यानंतर राज्यविस्तारासाठी घेतलेल्या कर्जात अनुस्यूत होता असे म्हणता येणार नाही. पण तशा व्यवहारातून नंतर नोटा काढायची पद्धत निघाली आणि हळूहळू बँकिंगचा व्यवसाय प्रस्थापित होत गेला. बँक ऑफ् बॉम्बे या बँकेची दुसरी प्रेसिडेन्सी बँक म्हणून १८४० साली स्थापना झाली तो महाराष्ट्रातील आधुनिक बँकिंगचा जन्मदिवस धरता येईल. अर्थात त्या वेळेपासून ते १९६० सालापर्यंत महाराष्ट्र राज्य स्वतंत्र नव्हते व त्याचा बराचसा भाग मुंबई राज्य म्हणून गणल्या जाणाऱ्या इलाख्यात होता. त्यात सिंधपासून कर्नाटकपर्यंत प्रांत होते आणि विदर्भ व मराठवाडा हे भाग नव्हते. महाराष्ट्रातल्या बँकिंगच्या इतिहासाची नोंद करताना मात्र आजच्या महाराष्ट्र राज्यात जो भाग आहे तोच लक्षात घेतला आहे आणि आज बेळगाव जरी म्हैसूर राज्यात असले तरी त्याचीही गणना इतिहासासाठी महाराष्ट्रात केलेली आहे.

सन १८४० साली निघालेल्या या बँक ऑफ बॉम्बेचे अधिकृत भांडवल ५० लाख रुपयांचे होते आणि तिला नोटा छापायचा अधिकार दिला गेला होता. तिने वीस वर्षे कारभार केला. पण १८६२ ते १८६५ या तीन वर्षांत अमेरिकन यादवी युद्धानंतर तिने सट्ट्याचे व्यवहार केल्याने तिला नुकसान आले आणि ती शेवटी १८६८ मध्ये गुंडाळण्यात आली. तिच्या ठेवीदारांना सर्व पैसे मिळाले, पण भागीदार मात्र बुडाले. त्यानंतर त्याच नावाने त्याच वर्षी एक नवी बँक स्थापन करण्यात आली आणि ती १९२०सालापर्यंत चालू होती. मुंबई, कलकत्ता व मद्रास इथल्या तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांचे एकत्रीकरण करून इंपीरिअल बँक ऑफ इंडिया स्थापण्याचे त्या वेळी ठरले आणि ती त्यात विलीन झाली. हीच इंपीरिअल बँक पुढे १९५५ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियात रूपांतरित करण्यात आली.

बँक ऑफ बॉम्बे ही निघाली होती तरी नावाप्रमाणे तिचा व्यवहार केवळ मुंबई शहरापुरताच मर्यादित होता. महाराष्ट्रातील व्यापारी बँक म्हणून घेण्याचा मान खऱ्या अर्थाने १८८९ साली स्थापन झालेल्या पूना बँकेचा आहे. तिच्या पाठोपाठ १८९० मध्ये डेक्कन बँकही पुणे येथेच स्थापन झाली, आणि १८९८ साली बॉम्बे बँकिंग कंपनीची स्थापना मुंबईला करण्यात आली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा स्वदेशी चळवळीने जोर धरला तेव्हा आपल्या स्वदेशी बँकाही असाव्यात अशी विचारधारा प्रबळ झाली आणि मुंबई हे त्या वेळीही राजकीय व सामाजिक सुधारणेचा केंद्रबिंदू असल्याने बँक ऑफ इंडिया (७ सप्टेंबर १९०६), सेंट्रल बँक ऑफ इंडिया (२१ डिसेंबर १९११) या मोठ्या बँकांची तिथे स्थापना झाली. त्या अजूनही चालू आहेत व आता राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांत अग्रभागी आहेत. या बँकांबरोबरच सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक (२०-८-१९०७), इंडियन स्पेसी बँक, बॉम्बे मर्चंटस बँक, स्टँडर्ड बँक ऑफ बॉम्बे व शिलोत्री बँक यांचीही स्थापना वेगवेगळ्या लोकांनी केली. पहिली बँक ही पुढे १९६१ साली युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन झाली. पण उरलेल्या सर्व बँका लौकरच बुडाल्या. विशेषतः स्पेसी बँक व शिलोत्री बँक बुडाल्यानंतर त्यांचा व्यवहार जरी थोड्याच गावी होता तरी त्यामुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली होती.

याच सुमारास दक्षिणी संस्थानांतूनही आपल्याकडे अशा प्रकारचे उपक्रम असावेत असे वाटू लागले आणि सांगली, फलटण व कुरुंदवाड येथे राजाश्रयाखाली ५ ऑक्टोबर १९१६, १ जुलै १९१८ व १८ ऑगस्ट १९२० रोजी अनुक्रमे सांगली बँक, फलटण बँक व गणेश बँक ऑफ कुरुंदवाड यांची स्थापना झाली. पैकी पहिली व तिसरी बँक आजही चालू आहे. मधली बँक सांगली बँकेत १९६१ साली विलीन करण्यात आली. याच पहिल्या महायुद्धाच्या काळात १९१७ साली टाटा इंडस्ट्रिअल बँक ही उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी म्हणून सुरू करण्यात आली. तिचे काही वर्षांनी सेंट्रल बँकेत विलीनीकरण करण्यात आले. महायुद्धानंतरच्या पुढील बारा वर्षांत आणखी सात बँका उघडण्यात आल्या त्या येणेप्रमाणे : युनियन बँक ऑफ इंडिया

(११नोव्हेंबर १९१९), बँक ऑफ कोल्हापूर (२२ जानेवारी १९२६), बँक ऑफ बार्शी (९ जून १९२६), न्यू ओरिएन्टल बँक कोल्हापूर (६ डिसेंबर १९२६), मिरज स्टेट बँक (३० एप्रिल १९२९), बेळगाव बँक (११ जानेवारी १९३०), बँक ऑफ बेरार (तारीख उपलब्ध नाही.) पैकी युनियन बँक अजूनही चालू असून तिचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. मिरज स्टेट व बेळगाव बँक या खाजगी क्षेत्रात अजूनही काम करीत आहेत. महाराष्ट्रातील या बँकांचा इतिहास पाहता काही बँका केवळ मुंबईत त्यांच्या मुख्य कचेऱ्या आहेत म्हणूनच इथल्या गणल्या जातील तर बाकीच्या अगदी लहान प्रमाणावर स्थानिक गरजा भागविण्यासाठीच काढल्या गेल्या होत्या असे म्हणावे लागेल. भारताच्या नकाशावर महाराष्ट्राचे राज्य अवतीर्ण होईपर्यंत इथल्या भागाचा सर्वार्थाने विकास करणारी मोठी बँक इथे नव्हती. ज्या आंतरभारतीय बँका होत्या त्या केवळ मोठाल्या शहरातूनच आपल्या शाखा काढीत होत्या तर ज्या छोट्या बँका होत्या त्या तोटा पेलण्याची ताकद नसल्याने जास्त वाढू शकत नव्हत्या. त्यातच महाराष्ट्रात बँका निघण्याची लाट जशी दोनतीनदा आली तशी बुडण्याची लाटही पाठोपाठ येऊन गेल्याने बँकिंगचा व्यवसाय खऱ्या अर्थाने प्रगतच होत नव्हता. १९६५ सालानंतर जेव्हा रिझर्व बँकेने शाखा विस्ताराबाबत विशिष्ट धोरण आखायला सुरुवात केली, तेव्हा आणि १९६० ते १९६५ या काळात लहान लहान बँकांचे एकत्रीकरण झाल्याने मगच भारतभर बँकिंग व्यवसाय खऱ्या अर्थाने प्रगत होऊ लागला व आता राष्ट्रीयीकरणानंतर शाखाविस्ताराची गतीही वाढल्याने पर्यायाने महाराष्ट्रातही त्या वाढीचा बराच फायदा झाला. कारण वेगवेगळे भाग अविकसित असूनही मुंबईच्या अस्तित्वामुळे व स्थिर सरकार असल्याने बँकांनीही वाढीच्या वेळी महाराष्ट्रात जास्त लक्ष दिले.

महाराष्ट्रातील बँकांच्या विकासाचा दुसरा कालखंड १९३० ते १९४५ हा धरला पाहिजे. या पंधरा वर्षांत पहिली ८ वर्षे मंदीची होती तर पुढील ७ वर्षे युद्धाची होती. तरीसुद्धा बुधगाव या दक्षिणी छोट्याशा संस्थानात ४ ऑक्टोबर १९३३ रोजी बुधगाव बँक स्थापन झाली आणि पुढे आणखी ३८ बँका काढण्यात आल्या. त्यातील सात मुंबईत निघाल्या, सात पुण्यात निघाल्या तर कोल्हापूर संस्थानात पाच, बेळगावमध्ये दोन, नागपूरमध्ये दोन, पाच वेगवेगळ्या दक्षिणी संस्थानांत आणि उर्वरित दहा वेगवेगळ्या ठिकाणी निघाल्या. त्यांची यादी परिशिष्ट 'इ' मध्ये दिली आहे. १९४५ नंतर मात्र गेल्या पंचवीस वर्षांत एकही बँक निघाली नाही. नाही म्हणायला सिंध नॅशनल बँक ही पूर्वी परदेशी म्हणून गणली गेलेली बँक एका स्वतंत्र कायद्यान्वये १९५२ मध्ये कल्याण येथे भारतीय बँक म्हणून नोंदली गेली व पुढे ती दुसऱ्या मोठ्या बँकेत विलीन करण्यात आली.

या सर्व बँकांपैकी फक्त १२ बँका शेड्यूल्ड बँका या पात्रतेपर्यंत पोचल्या आणि त्यातल्या केवळ पाचच आता अस्तित्वात आहेत. याचे कारण १९४६ पासून बँका

बुडण्याची लाटही महाराष्ट्रात परत आली होती. १९६० साली बुडणाऱ्या ज्या दोन बँकांबद्दल भारतात खळबळ उडाली होती त्यातील एक बँक—लक्ष्मी बँक महाराष्ट्रातील नागपूर येथील होती. महाराष्ट्रातील बंद झालेल्या बँकांची १९१४ ते १९६४ या पन्नास वर्षांतील संख्या ९४ एवढी आहे. त्यांपैकी ५४ बँका १९३५ सालापूर्वी म्हणजे रिझर्व बँक स्थापन होण्यापूर्वी बुडाल्या होत्या. रिझर्व बँक स्थापन झाल्यावर तिने पुढील तीस वर्षांत बऱ्याच बँकांना दुसऱ्या मोठाल्या बँकांतून विलीन होण्यास सांगितले व मदतही केली. त्यामुळे ठेवीदारांचे फार नुकसान झाले नाही. पण १९३५ पूर्वी बुडालेल्या बँकांतून त्या वेळेच्या मानाने ठेवीदारांना बरीच झळ बसली. अर्थात आजच्या मानाने ती रक्कम नगण्य म्हणावी लागेल, हेही खरे आहे.

आजमितीस महाराष्ट्रात राष्ट्रीयीकरण झालेल्या सर्व चौदा बँका, स्टेट बँक ऑफ इंडिया व स्टेट बँक ऑफ हैदराबाद (काही स्टेट बँकेच्या संलग्न बँकांच्या केवळ मुंबईतच शाखा आहेत), युनायटेड वेस्टर्न बँक, सांगली बँक, रत्नाकर बँक, मिरज स्टेट बँक, गणेश बँक ऑफ कुरुंदवाड व बँक ऑफ कऱ्हाड एवढ्या बँकांच्या शाखा आहेत. त्यात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (मार्च १९६९ अखेरचे उपलब्ध असलेल्या अलिकडच्या आकड्यानुसार) १७८ शाखा आहेत व बँक ऑफ महाराष्ट्रच्या १२५ शाखा आहेत तर स्टेट बँक ऑफ हैदराबाद, बँक ऑफ इंडिया व सेंट्रल बँक यांच्या अनुक्रमे ४४, ६० व ५४ शाखा आहेत. गणेश बँक ऑफ कुरुंदवाडची फक्त एकच शाखा आहे व रत्नाकर बँकेचीही एकच शाखा आहे. युनायटेड वेस्टर्न बँक व सांगली बँक या दुसऱ्या दोन मोठ्या व खाजगी क्षेत्रातल्या बँकांच्या १९६९ अखेर अनुक्रमे ४३ व ५८ शाखा होत्या. बँक ऑफ कऱ्हाडच्या शाखा १० इतक्या होत्या.

भारतातील बँकिंगचा विकास होण्याच्या दृष्टीने स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका आणि राष्ट्रीयीकरण झालेल्या चौदा बँका यांच्यात सुमारे ३३० जिल्हे वाटून दिले गेले आहेत. या बँका त्या त्या जिल्ह्यात लीड बका किंवा अग्रणी बँका म्हणून धरल्या जातील व त्या जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक पाहणी करून आर्थिक विकासासाठी तिथे काय योजना कार्यान्वित होऊ शकतील हे बघून त्या दृष्टीने तिथे शाखा उघडणे, बँकेचे खातेदार होऊन ठेवी संचयासाठी लोकांना प्रवृत्त करणे आणि कर्जपुरवठा करून सावकारी पाशातून गरीब शेतकऱ्यांची सुटका करणे हे त्यांचे काम राहील. महाराष्ट्रानेही विशेषतः जिल्हावार विकास हेच आपले पुढील पंधरा वर्षांतील योजनेसाठी सूत्र ठेवल्याने अशा जिल्हावार विकासाला इथे जास्त लौकर वाव मिळेल व परिशिष्ट 'क' मध्ये दिसत असलेला मोठा फरक हळूहळू नाहीसा होईल. एका बाजूला विकसित मुंबई व दुसऱ्या बाजूला मागे पडलेले बीड, परभणी जिल्हे हे चित्र नाहीसे होण्यासाठी मागासलेल्या जिल्ह्यांवर जास्त लक्ष केंद्रित होणे जरूर आहे. त्याच वेळी मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर इथेही ठेवी गोळा होण्यासाठी जास्त शाखा सतत काढल्या जायला हव्यात. महाराष्ट्रातील सध्याच्या योजनेनुसार स्टेट बँक गटाला चार जिल्हे,

बँक ऑफ महाराष्ट्रला चार जिल्हे, बँक ऑफ इंडियाला नऊ जिल्हे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाला सात जिल्हे देण्यात आले असून एक जिल्हा सेंट्रल बँक व महाराष्ट्र बँक या दोघांना दिला गेला आहे व मुंबई जिल्हा या योजनेतून वगळण्यात आला आहे. ही योजना तीनचार वर्षे राबवल्यावर महाराष्ट्रातील तीन हजार वस्तीच्या बहुतेक सर्व गावांतून व्यापारी बँकेची शाखा अस्तित्वात आलेली दिसेल.

महाराष्ट्रात व्यापारी बँकांचा व्यापक प्रमाणावर विस्तार झाला नाही, याचे कारण मोठ्या बँकांची शहरातच जाण्याची प्रवृत्ती व बुडालेल्या अनेक बँका हे होते. त्याचप्रमाणे सहकारी बँकांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला हेही आहे. सहकारी क्षेत्रात बँकिंग व्यवसायात महाराष्ट्रात गेल्या पासष्ट वर्षांत अभिनंदनीय प्रगती झालेली आहे. योगायोग असा आहे की, खऱ्या अर्थाने पहिली व्यापारी बँक जशी पुण्यात स्थापन झाली तशी महाराष्ट्रातील पहिली सहकारी बँकही पुणे येथेच स्थापन झाली. १९०४ मध्ये केंद्र सरकारने इंडियन को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट मंजूर केल्यानंतर जानेवारी १९०६ मध्ये 'नंबर एक, मिलिटरी अकाउंटस म्युच्युअल हेल्प को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,' अस्तित्वात आली. त्याच महिन्यात कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना करण्यात आली. या दोन्ही संस्थांचे नंतर बँक म्हणून नामाभिधान होऊन आजमितीसही त्या नागरी बँका म्हणून छोट्या प्रमाणावर चालू आहेत. बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह व बेळगाव पायोनियर को-ऑपरेटिव्ह बँक याही पाठोपाठ अस्तित्वात आल्या. जिल्ह्याची सहकारी बँक म्हणून १९०९ साली अस्तित्वात येण्याचा मान अकोला को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेला मिळालेला असला तरी त्या वेळच्या मुंबई राज्याची कळसाची बँक म्हणून बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक १९११ साली निघाली. त्याच वर्षी भंडारा व नागपूर या जिल्ह्यांच्या सहकारी बँका निघाल्या. बॉम्बे प्रॉव्हिन्शियल बँकेचे १९५६ मध्ये बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्हमध्ये नामांतर झाले व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर तिची दुभागणी करण्यात येऊन विदर्भ को-ऑपरेटिव्ह त्यातच संमीलित करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्राच्या उरलेल्या जिल्ह्यांसाठीही जिल्हा सहकारी बँका निघाल्या. अमरावती, बुलढाणा, चांदा व यवतमाळ या जिल्ह्याच्या बँका १९६२ मध्ये निघाल्या. आता मुंबई सोडून उरलेल्या सर्व जिल्ह्यांत जिल्हा सहकारी बँका आहेत. शिवाय आजला २१२ नागरी सहकारी बँकाही राज्यात काम करीत आहेत. त्यांच्यातर्फे बिनशेतकी सहकारी व्यवसाय कर्जे दिली जातात. १९६० साली फक्त १२३ नागरी सहकारी बँका होत्या. सत्तावीस भूतारण बँकाही शेतीविकासासाठी कार्यरत आहेतच. १९६० मध्ये अशा तऱ्हेच्या फक्त १४ बँका होत्या.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर आता त्याही बँका ग्रामीण भागात जाणार आहेत व शेतीला कर्जपुरवठा करणार आहेत. त्यामुळे विशेषतः महाराष्ट्रात सहकारी बँकांचे सर्वत्र जाळे पसरले असल्याने या दोन स्तरांत अनिष्ट स्पर्धा निर्माण होईल का किंवा गैरफायदा घेतला जाईल का अशी शंका येण्यासारखी आहे. पण महाराष्ट्रात

पाणीपुरवठ्याचे बाबतीत खूपच काम करण्यासारखे असल्याने आणि अन्यथाही कर्ज-पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने ती निराधार ठरेल. पण ह्या दोन्ही प्रकारच्या बँकांनी हातात हात घालून काम करताना जिल्ह्यांचा सर्वत्र समतोल विकास होईल असे बघितले पाहिजे व अग्रणी बँकांनी त्या त्या बाबतीत जिल्हा बँकांशी सहकार्य करून आपल्या योजना आखल्या पाहिजेत. व्यापारी बँकांचे ते नामाभिधानसुद्धा गेली कित्येक वर्षे त्या व्यापाराखेरीज उद्योगधंदे व अन्य बाबतीतही कर्जे देत असल्याने बदलण्यास हवे आहे.

महाराष्ट्रात मुंबईत आज शंभर वर्षे विदेशी बँकासुद्धा व्यवहार करीत आहेत. पण त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असल्याने त्यांचा महाराष्ट्रातील बँकिंग क्षेत्रात खऱ्या अर्थाने तितकासा समावेश होत नाही. त्यामुळे त्यांचा फारसा ऊहापोह केलेला नाही. अशा सतरा बँका मुंबईत काम करीत आहेत.

परिशिष्ट ' अ '

लोकसंख्यानिहाय महाराष्ट्रातील बँक शाखांची वाटणी

	व्यापारी बँका		सहकारी बँका		एकूण बँका	एकूण तुलनेसाठी बँकांच्या
गावची लोकसंख्या	गावे	शाखांची संख्या	गावे	शाखांची संख्या	शाखांची एकूण संख्या	एकूण शाखा १९६० साली
१० लाखांचे वर	१	४०६	१	१०४	५१०	२५७
५ ते १० लाख	२	९५	२	४२	१३७	५८
२ ते ५ लाख	१	१५	१	१०	२५	३९
१ ते २ लाख	८	७५	७	५१	१२६	८
७५००० ते १ लाख	४	२६	४	१६	४२	९१
५०००० ते ७५०००	१०	५७	१०	३५	९२	
२५००० ते ५००००	२७	७५	२७	६३	१३८	१११
१०००० ते २५०००	१०७	१६३	११८	१८७	३५०	१७६
५००० ते १००००	९१	९९	२०१	२४३	३४२	११३
५००० चे खाली	१९	२०	२८२	२९१	३११	१५१
वर्गीकरण न झालेली	१२	१२	६५	६५	७७	
एकूण	२८२	१०४३	७१८	११०७	२१५०	१०४०

परिशिष्ट ' ब '

महाराष्ट्रातील बँकिंगची गेल्या दशकातील प्रगति	१९६०	१९६१	१९६२	१९६३	१९६४	१९६५	१९६६	१९६७	१९६८	अंदाजे १९६९
व्यापारी बँकांच्या शाखा	५८६	५८५	६३८	६९१	७४२	८१८	८७४	९१९	१०४३	१२००
सहकारी बँकांच्या शाखा	४५४	५९५	६१३	६७३	आकडे	उपलब्ध	नव्हते	—	११०७	११५०
एकूण बँकांच्या शाखा	१०४०	११८०	१२५१	१३६४	आकडे	उपलब्ध	नव्हते	—	२१५०	२३५०
महाराष्ट्रातील व्यापारी बँकांच्या ठेवी (कोटी रु.)	उ	४७७·८९	५१४·७६	५६७·४९	६८२·५२	७९६·६४	९२५·०२	९७०·६३	११०३·५३	१२५०·००
व्यापारी बँकांची कर्जे (कोटी रु.)	प	३८४·०१	४३६·४८	५०९·४२	५९४·७७	६५५·६८	७५९·८२	८८५·९२	९८१·११	११००·००
महाराष्ट्रातील व्यापारी बँकांचे भारतातील एकूण ठेवीशी प्रमाण %	ल	२४·४	२३·९	२४·८	२५·२	२५·९	२५·६	२४·७	२४·८	२५·००
महाराष्ट्रातील व्यापारी बँकांच्या कर्जाचे भारतातील व्यापारी बँक-कर्जाशी प्रमाण (%)	ब्ध	२९·९	३०·६	३२·१	३१·९	३०·८	३०·९	३२·४	३१·२	३२·०
महाराष्ट्रातील व्यापारी बँकांच्या ठेवी (दरडोई)	ना	१२१	१३१	१४३	१६२	१८०	२०४	२०९	२३२	२५०
महाराष्ट्रातील व्यापारी बँकांची कर्जे (दरडोई)	ही	९७	११०	१२९	१४१	१४९	१६८	१९१	२०६	२००
कर्जाचे ठेवीशी प्रमाण (%)	त	८१	८५	९०	८८	८२	८३	८४	८९	८०
व्यापारी बँकांच्या दर शाखेची सरासरी लोकसंख्या	—	६८०००	६३०००	५८०००	५७०००	५४०००	५३०००	५१०००	४६०००	४१०००

परिशिष्ट 'क'

जिल्हा	१९६१च्या खानेसुमारी-नुसार एकूण गावांची संख्या	दोनापेक्षा जास्त शाखा असलेली गावे व तिथल्या एकूण शाखा	३ मधील गावी १९६३ साली असलेल्या शाखा	१९६८ साली असलेल्या शाखा	१९६८ साली कोटी रुपयांत	
					ठेवी	कर्जे
मुंबई	१	१|४०६	२८२	४०६	८८०.२१	८७०.९६
बृहन्मुंबई विभाग	१	१|४०६	२८२	४०६	८८०.२१	८७०.९६
कुलाबा	१२	—	११	१८	३.५२	०.२७
ठाणे	२०	६|३७	२८	५७	२२.०६	६.७६
रत्नागिरी	१३	४|१४	२२	२९	५.२२	०.७६
एकूण कोकण विभाग	४५	१०|५१	६१	१०४	३०.८०	७.७९
अकोला	९	२|९	११	१५	४.२८	६.२९
अमरावती	१३	१|५	९	१५	४.३७	३.९१
भंडारा	५	१|५	७	१०	२.४०	०.६७
बुलढाणा	९	१|४	११	१२	२.११	१.६६
चंद्रपूर	५	१|४	७	१०	२.६२	३.२२
नागपूर	१२	१|३४	२८	३९	२२.१३	१२.४६
वर्धा	६	२|७	४	१०	२.४६	२.०३
यवतमाळ	८	१|५	११	१४	३.१५	०.६९
एकूण विदर्भ विभाग	६७	१०|७३	८८	१२५	४३.५२	३१.०१

बीड	७	—	६	९	नगण्य	नगण्य
परभणी	१२	—	७	१३	नगण्य	नगण्य
नांदेड	१२	१।५	८	११	२.३८	२.२२
औरंगाबाद	१०	२।११	१०	१८	५.७४	१.५७
उस्मानाबाद	१२	१।३	५	१३	२.३७	०.७२
एकूण मराठवाडा विभाग	५३	४।१९	३६	६४	१०.४९	४.५१
अहमदनगर	५	२।१०	१२	२१	७.८६	२.११
धुळे	७	२।९	१०	१७	३.४९	१.३५
जळगाव	१४	२।१०	१३	२७	६.१५	२.८०
नाशिक	१५	३।२१	२३	३६	११.९७	२.९६
कोल्हापूर	११	२।२६	२९	३८	१२.५३	७.५७
सांगली	६	२।१९	२६	३३	९.०४	५.९०
सोलापूर	१०	४।२७	३४	४१	११.५७	५.३६
सातारा	१०	३।१४	२१	३२	६.९४	१.९२
पुणे	२२	२।७३	५६	९९	६५.७२	३६.०४
एकूण पश्चिम महाराष्ट्र विभाग	१००	२२।२०९	२२४	३४४	१३५.२७	६६.०१
एकूण महाराष्ट्र	२६६	४७।७५८	६९१	१०४३	११००.२९	९८०.२८

परिशिष्ट ' ड '

	१९६०	१९६१	१९६२	१९६३	१९६४	१९६५	१९६६	१९६७	१९६८	अंदाजे १९६९
राज्यातील एकूण ठेवी (कोटी रु.)	उ. नाही	४७८	५१५	५६७	६८३	७९७	९२५	९७१	११०४	१२५०
बृहन्मुंबईच्या ठेवी (कोटी रु.)	३३९	३५३	४४४	५०५	५७२	६६०	७६१	७८५	८८०	१०००
राज्यातील व्यापारी बँक शाखा	५८६	५८५	६३८	६९१	७४२	८१८	८७४	९१९	१०४३	१२००
बृहन्मुंबईतील व्यापारी बँक शाखा	१९१	२०४	२२२	२९२	३१५	३४०	३५६	३७०	४०६	४५०
मुंबईच्या ठेवींचे एकूण ठेवीशी प्रमाण (टक्के)	उ. नाही	७४	८६	८९	८४	८२	८२	८१	८०	८०
मुंबईच्या शाखांचे एकूण शाखाशी प्रमाण (टक्के)	३२	३५	३५	४२	४२	४२	४१	४०	३९	३८
क्रमांक दोनच्या पुण्यातील ठेवी (कोटी रु.)	उ. नाही	१९	२४	२७	३१	३८	५४	५०	५८	६५
क्रमांक तीनच्या नागपूरमधील ठेवी (कोटी रु.)	६	६	८	११	१२	१४	१८	१८	२१	२५

परिशिष्ट 'इ'

बॉम्बे मर्कंटाईल बँक मुंबई	२३-५-१९४४	१९५१ नादारीत निघाली
डिस्काउंट बँक ऑफ इंडिया "	५-११-१९४२	१९४९ "
गडोदिया बँक "	११-८-४३	१९६३ बँक ऑफ इंडियात विलीन
न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया "	३१-७-१९३७	१९६१ बँक ऑफ बरोडात विलीन
नॅशनल सेव्हिंग्ज बँक "	२८-५-१९४१	१९५३ नादारीत निघाली
एक्स्चेंज बँक ऑफ इंडिया "	३०-४-१९४२	१९४९ नादारीत निघाली
सेफ बँक "	२४-२-१९४५	१९६१ परवाना काढून घेतला गेला
भारत इंडस्ट्रिअल बँक पुणे	१४-४-१९३८	१९६१ महाराष्ट्र बँकेत विलीन
बँक ऑफ पूना, "	१९-७-१९४५	१९६१ सांगली बँकेत विलीन
डेक्कन इंडस्ट्रिअल बँक,	२२-२-१९३९	१९५५ परवाना काढून घेतला गेला
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक,"	१९-११-१९३६	१९६२ बँक ऑफ कराडमध्ये विलीन
साउंड बँकिंग कॉर्पोरेशन, "	१९३५ सालापूर्वी	माहिती उपलब्ध नाही. नादारीत निघाली
पूना इन्व्हेस्टर्स बँक, "	१५-९-१९४५	१९६१ सांगली बँकेत विलीन
सराफ बँक ऑफ कोल्हापूर, कोल्हापूर	२७-९-१९४५	१९५५ सांगली बँकेत अंशतः विलीन
श्री शिवाजी नॅशनल बँक, "	५-१-१९४२	१९५० नादारीत निघाली
युनियन बँक ऑफ कोल्हापूर	२८-१०-१९४२	१९५५ नादारीत निघाली
कमर्शिअल बँक, "	२२-४-१९३६	१९५३ नादारीत निघाली
बँक ऑफ नागपूर, नागपूर	१३-११-१९३७	१९६१ महाराष्ट्र बँकेत विलीन
लक्ष्मी बँक, अकोला	२६-२-१९३८	१९६० नादारीत निघाली
सुप्रीम बँक ऑफ इंडिया बेळगाव	२७-५-१९३९	१९५५ "
बँक ऑफ सिटिझन्स	१३-१-१९३७	१९६१ कार्पोरेशन बँकेत विलीन
स्वस्तिक बँक, भोर	माहिती उपलब्ध नाही	
सांगली इंडस्ट्रिअल बँक	४-४-१९४६	१९५३ सांगली अर्बन को-ऑप. बँकेत विलीन
जंजिरा बँक, मुरुड जंजिरा	५-३-१९४३	१९५५ परवाना नाकारण्यात आला.
गुडविल बँक, कुपवाड मिरज	१८-११-१९४०	१९५१ नादारीत निघाली.

भोर स्टेट बँक भोर	१-८-१९४४	१९६२ स्टेट बँक ऑफ इंडियात विलीन
फार्च्यून कमर्शिअल बँक, भुसावळ	२१-४-१९४५	१९५० ”
बुधगाव बँक, बुधगाव	४-१०-१९३३	१९५६ नादारीत निघाली
बँक ऑफ औरंगाबाद, औरंगाबाद	१७-८-१९४३	१९५४ माहिती नाही
बँक ऑफ औंध, औंध	२५-८-१९३८	१९६३ स्टेट बँकेत विलीन
बांठिया बँक, पनवेल	२७-२-१९४३	१९५४ महाराष्ट्र बँकेत विलीन
बँक ऑफ कोकण, मालवण	९-३-१९४५	१९६१ ”
मॉडिल बँक ऑफ बार्शी, बार्शी	१०-१-१९३५	१९४७ नादारीत निघाली
बँक ऑफ बेरार, अमरावती	माहिती नाही	१९४१ ”
सिंध नॅशनल बँक, कल्याण	२२-५-१९५२	१९६५ युनियन बँक ऑफ इंडियात विलीन

संगीताचे मानस-सरोवर

अरविंद मंगरूळकर

'मानस'सरोवर हे सर्वांना ज्ञात आहे, पण ते अल्पपरिचित आहे. त्याची पुष्कळ वर्णने वाचावयास मिळतात; छायाचित्रे पाहावयास मिळतात; आणि ती वर्णने वाचताना व छायाचित्रे पाहताना अपरिचित भूभागाच्या 'वैदेशिक' (exotic) अनुभवाने आपल्या आतुरतेला कितीतरी धार येते. वाटते की, जावे आणि त्याचे ते अपूर्व सौंदर्य घटाघटा प्राशन करावे; पण उत्पन्न झालेले हे मनोरथ अनेकदा तसेच विलीन होतात, आणि 'मानस'-सरोवराच्या बालबालिका असलेल्या, त्याच्यापासून जन्म पावलेल्या आणि दिशादिशांनी वाहणाऱ्या विविध नद्यांच्या सौंदर्याने आपण समाधान पावतो; त्यांच्या पावित्र्याने आपण पुनीत होतो.

भारतीय संगीताचे उगमस्थान असेच 'मानस'-सरोवरासारखे ज्ञात, पण अल्प-परिचित आहे. या उगमस्थानाची माहिती खंडित स्वरूपानेच आपल्याला आहे. माहितीत पडलेले हे खांडवे सांधण्याचे प्रयत्न अद्यापि चालू आहेत. पण संगीताच्या क्षणजीवी स्वरूपामुळे या प्रयत्नांनी जिज्ञासूंचे कुतूहल मात्र उत्तरोत्तर वाढत जाते. कारण अशा प्रयत्नांनी शब्दमय ज्ञान काहीसे झाले, तरी संगीताचा आत्मा जो स्वर तो पूर्वीसारखाच सूक्ष्म, अणू आणि अगम्य राहतो. त्या अतिप्राचीन काळाचे संगीत असेल तरी कसे? त्याची रचना कशी असेल? त्याचा आविष्कार कसा करीत असतील?—असे किती तरी प्रश्न बहुतांशी अनुत्तरितच राहतात; आणि मग त्या उगमापासून आजमितीला वाहणाऱ्या भिन्नभिन्न घराण्यांच्या सरितांनी आपण हर्षभरित होतो व उत्खननाचा हा प्रयत्न सोडून देतो.

संगीताची गंगोत्री सामवेदात आहे, असे म्हणतात. हे सामसंगीत कसे असेल, हा संशोधनाचा विषय आहे, परंतु ही संगीतगंगा सामवेदापासून निघाली, ती रामायणाच्या किंवा भरत-मुनीच्या काळी हरद्वारास येऊन पोहोचली. हरद्वारला गंगा ज्याप्रमाणे प्रथम

लोकोपकारार्थ मैदानात शिरते, त्याप्रमाणे संगीत हे रामायणकाली किंवा भरतकाली पुरोहितवर्गाच्या धार्मिक फत्तरांमधून निघून लौकिक व प्रगल्भ रूपाने प्रकट झाले, असे म्हणण्यास हरकत नाही. रामायणातील कुश व लव या बालगायकांचा निर्देश जसा करुणरम्य, तसाच उद्‌बोधकही आहे. भरतकाली तर या संगीताची शास्त्रीय व सूक्ष्म चिकित्साही सुरू झाली. त्यानंतर ही सरिता वाहता-वाहता अमीर खुश्रू, पंधराव्या शतकातील ग्वाल्हेरचा राजा ' मान ' व तदनंतर तानसेन, सदारंग, अदारंग, इत्यादी रचनाकारांच्या रूपाने प्रयागास येऊन पोहोचली. हा काळ म्हणजे संगीताचे ' प्रयाग'-क्षेत्र आहे. या काळी मुसलमानी संस्कृतीचे बीजारोपण होऊन त्या संस्कृतीचा वृक्ष भराभर फोफावू लागला होता. मुसलमानांनी येथल्या अनेक गोष्टी आपल्या मानिल्या, त्याप्रमाणे संगीतही आपले मानिले. भारतीय संगीतामध्ये खास इराणातून वा अरबस्तानातून आलेला अंश किती आहे, हाही एक संशोधनाचाच विषय आहे. परंतु तो अंश बहुतेक थोडा असावा. मात्र मुसलमानांनी येथले संगीत आत्मसात केले, आणि त्यात स्वतःची भरही घातली, हे खरे आहे. ती भर महत्त्वाची आणि मोलाची होती. इतकी की, तिचे अवशेष अनेक रूपांनी आजही घराण्याच्या परंपरेत जिवाभावाने जपून ठेविलेले आहेत.

संगीत आणि वाङ्मय यांची तुलना करिताना एक महत्त्वाचा भेद नेहमी करावा लागतो. तो म्हणजे संगीतात जशी ' घराणी ' असतात, तशी ती वाङ्मयात नसतात, हा होय. निदान आधुनिक वाङ्मयाच्या बाबतीत तरी ती खचित नसतात. ' संप्रदाय ' हा संगीतात असतो, तसा तो वाङ्मयात असू शकत नाही. संगीत हे विद्येच्या रूपाने लेखरूप व शब्दनिष्ठ असले, तरी कलेच्या रूपाने मात्र ' मुखनिष्ठ ' म्हणजे मौखिकच राहिले आहे. त्यामुळे त्यात जिवंतपणा रसरसत असतो हे खरे, पण त्याचबरोबर मौखिक कला ही केवळ क्षणजीवी असल्यामुळे तिचे स्वरूप अतूटपणे टिकविणे ही अत्यंत अवघड गोष्ट होऊन बसते. गेल्या सहा-सात हजार वर्षांची वेदपठनाची परंपरा अविच्छिन्नपणे आणि अचूकपणाने चालत आली आहे, हे भारतातील परंपरेच्या टिकाऊपणाचे एक अत्यद्‌भुत निदर्शन आहे. परंतु ही वेदांची परंपरा शब्दनिष्ठ होती; आणि ती विद्येच्या रूपाने चालत आली, कलेच्या रूपाने नव्हे. शिवाय, वेदांची आणि धर्माची व पावित्र्याची सांगड घातल्यामुळे आणि त्यांचे अपौरुषेयत्व सर्वमान्य झाल्यामुळे त्यांच्या परंपरेचे रक्षण हा एक कर्तव्याचा कठोर भाग होऊन बसला. संगीताचे तसे नव्हते. संगीत ही अशा प्रकारची विद्या नव्हती. तिचे शास्त्र बनले, ते भाषेप्रमाणेच उत्तरकाली बनले. संगीताचा उपयोग जरी धर्मकृत्यात होत होता, तरी धर्मकृत्यांचे ते अनिवार्य अंग नव्हते. शिवाय, जरी त्याला उपवेदाची संज्ञा दिलेली होती, तरी वेदांचे पावित्र्य त्याला लाभले नाही. या कारणामुळे आणि संगीताच्या क्षणजीवी स्वरूपामुळे त्याची परंपरा अविच्छिन्न राहिली नाही. पडलेल्या देवालयाच्या शिळा एकीवर एक बसवून ते पुन्हा उभे करावे, त्याप्रमाणे संगीताच्या बाबतीत विचारवंतांचा यत्न चालू असतो. अशा

प्रयत्नाच्या फळाने होणारे समाधान अर्थातच स्थूल स्वरूपाचे असते.

मानवाची भाषा टिकली, तरी तिचे स्वरूप सतत बदलते असते. संगीताचेही असेच आहे. समुद्र हा स्थिर असा भासत असला, तरी त्याच्या अंतरंगात आणि बहिरंगात ज्याप्रमाणे सतत खळबळ व हालचाल चालू असते, आणि त्या दृष्टीने पाहता तो जितका स्थिर तितकाच अस्थिरही असतो, त्याचप्रमाणे संगीत हे जसे स्थिर तसेच चंचलही आहे. शास्त्ररूपाने ते स्थिर, तर कलारूपाने ते चंचल. कलेची प्रकृती बेलगाम होण्याकडे, तर शास्त्राचा लगाम तिला ठाणबंद करण्याकडे. या उभय गोष्टींमधून कलेचे विद्यामय रूप आणि विद्येचे कलामय अंग सरतेशेवटी सिद्ध होते. परिणामी, कला व विद्या यांचा हा संगम अतिशय सुभग होतो.

संगीतकला ही एका दृष्टीने अत्यंत अल्पायुषी आहे. किंबहुना, जीवन्मृतच. स्वरांचा प्रकटनाचा क्षण हाच त्यांचा निधनाचा काळ. भाषा हीही मुळात अशीच आहे. परंतु लिपीमध्ये ती गोठवून टाकल्यामुळे तिला काहीसा शाश्वतपणा लाभलेला आहे. हाही शाश्वतपणा सापेक्षच आहे. प्रत्येक मूल आईची भाषा बोलते व ती पुढे परंपरित करते, असे जरी असले तरी वस्तुतः कोणाही मनुष्याला दुसऱ्याची भाषा तंतोतंत बोलता येत नाही. तोंडाची रचना, गळ्यांतील स्वरयंत्र, अनुकरणाचे उणे-अधिक सामर्थ्य अशा अनेक कारणांमुळे एकाचा उच्चार दुसऱ्याला तंतोतंत येत नाही. ही झाली साध्या उच्चारांबाबतची गोष्ट. स्वर हा तर कितीतरी सूक्ष्म आविष्कार आहे. आणि तो तसा असल्यामुळे अनुकरण करणे अथवा परंपरा टिकविणे हे त्याच्या बाबतीत अधिकच बिकट. त्याची लिपी सिद्ध केली असली, तरी तिच्या द्वारा होणारा त्याचा आविष्कार स्थूलच असतो. लिपीत स्वराचे व्यक्तित्व येत नाही. अशा स्थितीत संगीताची परंपरा विद्येसह, अंगोपांगांसह, कसासमवेत मूळ आविष्काराबरोबर जशीच्या-तशी राहणे किती असंभाव्य आहे, याची कल्पना येऊ शकेल. वेदकालापासूनचा भाषेचा प्रवास पाहिला, तर तिच्या स्थित्यंतरांनी मन चकित होऊन जाते. मग संगीता-सारख्या तरल कलेबाबत काय सांगावे?

परंतु आपल्या जवळच्या उत्तमोत्तम गोष्टी दुसऱ्याकडे संक्रांत करण्याचा मानवाचा हव्यास इतका जबरदस्त आहे की, संगीतासारख्या अत्यंत अशाश्वत कले-बाबतही त्याने हा प्रयत्न केला; व हा त्याचा प्रयत्न अगदीच काही विफल झाला नाही. अशाच ठिकठिकाणच्या प्रयत्नांमधून संगीताच्या घराण्यांचा जन्म झाला. व्यक्तीने व्यक्तीला, पिढीने पिढीला व शतकाने शतकाला दिलेला हा वारसा आहे. या वारशाचे प्रगल्भ रूप घराण्यांच्या गायनकलेमध्ये व्यक्त होते. संपत्तीच्या वारशाप्रमाणेच हाही वारसा उण्याअधिक उत्कर्षाने चाललेला असतो, परंतु काही मूलभूत गुणसंपदा अशा घराण्याच्या वारशामध्ये एकवटलेली दिसते. संगीताचा वारसा चालविताना नव्या कमाईचे महत्त्व असले, तरी मुळातल्या विशुद्धतेचा महिमा काही विलक्षण मानिला जातो. आणि तो आजच्या उठवळीच्या काळातही मानिला जातो; विशुद्धतेच्या या हव्यासामुळे

गेली चार-पाचशे वर्षे तरी भारतीय संगीत अखंड सारणीमधून वाहत आले आहे.

उत्तरापथ आणि दक्षिणापथ या भारताच्या दोन विभागांप्रमाणेच संगीताचेही उत्तरादी आणि दक्षिणादी असे दोन पंथ आहेत. हे दोन्ही मार्ग पुराण आहेत. अकराव्या शतकापर्यंत दोन्ही मार्ग एकरूप होते, असे सांगतात. कदाचित दक्षिणादी पंथ अधिक जुना असेल, परंतु महाराष्ट्रियांच्या रुचीला उत्तरादी पंथ उतरला, तसा दक्षिणादी उतरला नाही, हे खरे. प्रत्येक प्रदेशाचे स्वतःचे म्हणून संगीत असते, तसे ते महाराष्ट्राचेही होते आणि आहे. परंतु या संगीताचे स्वरूप आजच्या उस्तादी संगीतासारखे सुभग आणि अभिजात नव्हते खास. ते संगीत विशेषेकरून शब्दनिष्ठ होते. गीतांच्या अनुरोधाने प्रकट होई, तेवढेच त्याचे छोटेखानी स्वरूप. आजचे संगीत शब्दनिष्ठ नाही. स्वरनिष्ठ आहे. गीतांच्याच अनुरोधाने ते टिकले आहे, असे नाही. ते स्वरतंत्र व स्वतंत्र आहे. याच भूमिकेने त्याचे शास्त्रही बनले आहे. ते संगीत अशा स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा आविष्कार केवळ कंठाच्याच द्वारा नव्हे, तर वाद्याच्याही द्वारा शुद्ध स्वररूपाने होतो. शब्दनिष्ठ संगीताची स्थिती अशा प्रकारची असणे असंभाव्य आहे. कारण शब्द हे त्याचे महत्त्वाचे व अनुपेक्षणीय अंग असल्यामुळे त्यावाचून होणारा स्वराविष्कार तोकडा, लंगडा आणि निरंग ठरतो.

महाराष्ट्रियांच्या दृष्टीने या उस्तादी संगीताचा इतिहास फारसा जुना नाही. आधुनिक मराठी काव्यापेक्षा त्याचे वय थोडेसे अधिक असेल इतकेच. मात्र हा इतिहास अतिशय जिवंत आणि रसरशीत आहे. बी रोवल्यापासून जोमाने अंकुरणाऱ्या, चहूबाजूंनी फोफावणाऱ्या व झपाट्याने डेरेदार बनणाऱ्या स्निग्धच्छाय वृक्षासारखे या संगीताचे स्वरूप आहे. हा वृक्ष लावणारे पहिले लक्षणीय मालाकार कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर होत. मुलुखगिरीसाठी उत्तरेकडे कूच करणाऱ्या मराठ्यांच्याच परंपरेमधले ते होते. त्यांनी आणलेले हे रोपटे अतिशय जोमाने फुटले. केवळ पाचपन्नासच वर्षांत आपल्या डोळ्यांदेखत त्याला इतके भव्य भरदार स्वरूप येईल याची स्वतः बुवांनाही कल्पना नसेल. संगीताच्या दृष्टीने हा काळ महाराष्ट्राच्या नवजीवनाचा होता. त्यांच्यानंतर इतरही पुष्कळ ईर्ष्यालू कलावंत उत्तरेकडे जाऊन गायन शिकून आले, आणि संगीताची सरिता त्यांनी पराकाष्ठेची समृद्ध केली. योगायोग असा की, त्याच कालावधीत उत्तरेकडील नामांकित घराणेदार गवयी महाराष्ट्रातली संगीताची बूज पाहून येथेच स्थायिक झाले. काही प्रेमाने, काही व्यवसायासाठी. पण त्यामुळे मूळच्या समृद्धीचा अनायासे परिपोष होत गेला, हे मात्र खरे. वास्तविक पाहता, दिल्लीच्या राजकीय तख्ताप्रमाणे उत्तरेस सांगीतिकही तख्त होते; आणि दक्षिणापथ हा त्या तख्ताचा केवळ मांडलिक होता. परंतु एक असा आश्चर्य-जनक काळ सुमारे १९१०-पासून १९३०-पर्यंतचा येऊन गेला की, त्या कालावधीत सम्राटालाच मांडलिकाच्या वैभवाचा हेवा वाटावा. या काळामध्ये काही असे श्रेष्ठ कलावंत होऊन गेले की, ज्यांच्या कलेच्या सकसपणाबद्दल, सौंदर्याबद्दल, मोहकपणा-बद्दल दुमत म्हणून नाही. अनेक घराणीही येथेच स्थायिक झाली; नांदली. त्यांनी

आपले प्रपंच येथे थाटले आणि वैभव कमाविले. श्रोत्यांची तारीफ संपादिली आणि येथल्या सांस्कृतिक समृद्धीत आपली भर टाकिली.

कै. बाळकृष्णबुवांच्या घराण्यात कै. पं. विष्णू दिगंबरांचाही समावेश होतोच. बुवांनी कलेची बाजू उचलली; पंडितजींनी प्रचाराची कड घेतली; आणि अक्षरशः भरतखंड पायांखाली घातला. या कलेला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. अर्थात एकेकच बाजू घेतली म्हणजे कार्यात काहीसा एकांगीपणा, क्वचित एकारलेपणाही येणे अटळ असते. कलेच्या अशा स्थित्यंतरामध्ये एक विचार मनामध्ये येतो : तो असा की, उच्च व अभिजात अशा कलेचा 'प्रचार' कितीसा शक्य असतो ? आणि अशा 'कलेचा प्रचार' याचा अर्थ तरी काय समजावयाचा ? कालिदास, शेक्सपियर यांसारख्या कलावंतांच्या कलेचा 'प्रचार' होऊ शकेल काय ? प्रचार व्हावयाचा असेल, तर त्यांच्या कलाकृती घरोघर, अहोरात्र पोथ्यांप्रमाणे वाचल्या गेल्या पाहिजेत. तसे खरोखर होते काय ? वस्तुस्थिती अशी आहे की, 'प्रचार' याचा हा अर्थ अशा बाबतीत योग्य नाही. कोणत्याही उच्च, अभिजात गोष्टीचा वा कलेचा असा 'प्रचार' होऊ शकत नसतो; व त्यात त्या कलेचे गुण-वैगुण्यही नसते. कलाकृती हे कलावंताच्या व्यक्तित्वाच्या द्वारे झालेले जीवनदर्शन असते. हे जीवनदर्शन हा 'धर्म' नसतो की, ज्याचा प्रचार करणे आवश्यक वाटावे. अर्थात अशा कलाकृतीचे मूल्य व महिमा पटवून देणे अगत्याचे असते. परंतु तसे करणे हीही काही सुगम गोष्ट नसते. कारण तीत अनेक कलाविषयक मूल्यांचा परामर्श, ऊहापोह व चर्चा समाविष्ट असते. अर्थातच हे प्रकरण गुंतागुंतीचे होऊन बसते आणि कलेचे वा कलाकृतीचे सामान्य स्वरूप आणि तिचे बहिरंगवर्णन यांवरच प्रचारकाला शेवटी समाधान मानून घेणे प्राप्त होते. समाज ज्याप्रमाणे वेगवेगळ्या थरांचा घडलेला असतो, त्याप्रमाणे कलेचेही निरनिराळे थर असतात. सर्वांनीच उस्तादी संगीत गावे, ऐकावे अशी अपेक्षा बाळगणे वेडेपणाचेच नव्हे, तर चुकीचेही आहे. समाजघटकांच्या गरजेप्रमाणे त्यांची कलाविषयक क्षुधाही भिन्नरूप असते. समाजामध्ये असे भिन्नभिन्न झिरपे असणे स्वाभाविक आहे. त्यांची नीट समजूत करून घेतली, आणि त्यांचे मूल्य तारतम्याने मनात बिंबले, म्हणजे कोणत्याच अभिजात कलेला धोका असा नसतो. कलेला एखाद्या काळी प्रचारक आवश्यक असला, तरी त्याच्या मर्यादा आणि त्याच्या कार्याचा अर्थ नीट समजावून घेणे अगत्याचे आहे.

बाळकृष्णबुवा, भास्करबुवा, किरानेवाले, आगरेवाले, अतरौलीवाले इत्यादिकांची जी घराणी येथे स्थिर झाली, त्या प्रत्येकात काही-ना-काही वेगळे वैशिष्ट्य, सौंदर्यदृष्टी आणि अभिमानाचे स्थान होते. त्यावाचून ती येथे रूढावतीच ना. यांतली काही घराणी मुळात धृपदियांची असली, तरी आजमितीस त्यांचे मूल्यमापन स्थूल मानाने ख्यालियांच्या घराण्याच्या भूमिकेने होते. आगरेवाले (उदा. फैयाझखाँ) व अतरौलीवाले (उदा. अल्लादियाखाँ) यांच्या घराण्याच्या गायकीमध्ये धृपदियांचा बुद्धिविलास

पुष्कळ प्रमाणाने दिसतो. आलापीमध्ये तर धृपदियांच्या खुणा विशेषच स्पष्ट दिसतात. फैयाझखाँची नोम्-थोम्-युक्त आलापी व तिच्या नंतर येणारी पक्की होरी ही धृपदियांच्या घराण्याचीच खास अंगे होत. त्यांची आवाज लावण्याची सरळसोट पद्धती आणि आलापीत लय टाकण्याची रीत हेही धृपदाचेच विशेष होत. त्यांच्या महत्त्वाच्या सर्व मैफलीत हे विशेष आरंभीच प्रकट करण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. या घराण्यात आवाजाची रुंदी बहुतेक सर्व गायकांत दिसून आल्यावाचून राहणार नाही. काही गायकांचे स्वर ' नक्की ' म्हणजे अनुनासिक आहेत हे खरे, पण तो व्यक्तिगत भाग असावा. धृपदियाचा ताल पक्का असतो; एवढेच नव्हे, तर त्याच्या गाण्याचा सर्व बर्ताव लयीच्याच अंगाने होत असतो. दुगण, चौगण, सवाई, दिढी, इत्यादी लयीचे प्रकार त्याच्या हाडीमासी खिळलेले असतात. त्यामुळे बोलतानेचा विशेष आविष्कार ओघानेच येतो. आगरेवाले यांची गायकी जास्तीकरून खटकेबाज आहे व तिचे दर्शन एखाद्या भव्य वास्तुकृतीसारखे आहे. त्यांच्या आवाजाचा गडगडाट, तानेचा गुरगुराट, लयीचे उघडउघड धक्के, जोरकस तिय्ये यामुळे नरमपणापेक्षा वीरश्रीचाच संचार त्यांच्या गायकीत दिसतो. मध्ययुगीन उमद्या शिलेदाराप्रमाणे या घराण्याचे गाणे एकंदरीने लढाऊ आहे. एवढेच काय, त्यातल्या तिय्यम दर्जाचा कलावंत घेतला, तरी त्याच्याही गानाविष्कारांत ही आक्रमक वृत्ती प्रकट होतेच. त्यांच्या ठुंबरीचाही असाच प्रकार. तीत प्रेमाविष्कार असला तरी ते प्रेम शिलेदारी, लष्करी रितीने प्रकट व्हावयाचे. 'प्रियाराधना'पेक्षा 'प्रियाहरणा'वर भर अधिक. भक्तिपर गीत असले, तरी त्यात दटावणीचा अंश थोडासा व्यक्त व्हावयाचा. त्यामुळे या घराण्याच्या ठुंबऱ्या ख्यालांइतक्या सूक्ष्मवाची नसतात.

एखाद्याच श्रेष्ठ कलावंत-गायकामुळे कधीकधी घराण्याचे भाग्य उजळते. फैयाझखाँची प्रतिष्ठा ही अशा प्रकारची आहे. अर्थात गेल्या पाचपंचवीस वर्षांच्या अनुरोधाने हे विधान करावे लागेल. त्यांच्या पूर्वीही नत्थनखाँसारखे बहुढंगी गायक या घराण्यात होऊन गेले. परंतु आजच्या पिढीपुढे फैयाझखाँचे नाव विशेष प्रामुख्याने आहे. विद्येच्या व आशयाच्या दृष्टीने विचार केल्यास विलायत हुसेनखाँचे गायन फैयाझखाँपेक्षा अधिक भरलेले असेल. परंतु फैयाझखाँचा रसीलेपणा व रंगदारपणा न्याराच. किंबहुना, ' फैयाझखाँ झाले नसते तर ? ' हा प्रश्न काहीसा बेचैन करणारा आहे. अव्वल व दुय्यम गायक यांत फार अंतर असणे हे घराण्याच्या दृष्टीने हितावह नसते. या दृष्टीने अब्दुल करीमखाँ व अल्लादियाखाँ यांची घराणी विशेष भाग्यवान होत. मात्र अध्यापनाच्या दृष्टीने आगरेवाले यांनी पुष्कळ कार्य आजवर केलेले आहे. आद्य शंकराचार्यांना मिळाले, तसे एकापाठोपाठ एक महनीय व कर्तबगार शिष्य मिळणे हे फारच क्वचित आढळते. पण त्यानेच ते घराणे पक्के रुजते, रूढावते व फोफावतेही.

बाळकृष्णबुवांचे घराणे महाराष्ट्रात पुष्कळ जुने. अर्थात त्यांची शिष्यशाखा मोठी व सातत्याची. परंतु एक तात्त्विक प्रश्न येतो तो असा की, शिष्यशाखेमध्ये मूळ गाण्याचे

स्वरूप इतके का पालटावे? थोरल्या बुवांनी इतके भिन्नभिन्न गायकीचे प्रकार शिष्यांना शिकविले की काय? की शिष्यांनी ही स्वतंत्र कमाई केली? ही कमाई स्वतंत्र व व्यक्तिगत आहे असे म्हटले, तर मूळ घराण्याचा प्रतिपाल तीत किती प्रमाणाने केला जातो, हा महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. गाण्यात वैयक्तिक कमाईला व समृद्धीला महत्त्व आहे हे खरेच; परंतु ती कमाई मूळ घराण्यात बेमालूमपणे सामावून गेली पाहिजे. तसे झाले नाही, तर निदान स्वतःच्या कमाईवर आणि प्रतिभेवर स्वतंत्र घराणे उत्पन्न करण्याची धमक असली पाहिजे. या बाबतीत निदान एवढे तरी मान्य करावे लागेल की, मैफलीतील महत्त्वाच्या गानांशात 'घराणे' हे एखाद्या अधिदेवतेप्रमाणे प्रकट झाले पाहिजे. उदाहरणार्थ, ठुंबरी हा काही अल्लादियाखाँच्या घराण्याचा विशेष नव्हे, पण केसरबाई ठुंबरी गात असल्या, तरी तो भाग गौण ठेवण्याची खबरदारी घेऊन मैफलीच्या पूर्वार्धात त्या आपल्या घराण्याच्या कुलदैवताचाच साक्षात्कार श्रोत्यांना घडवून देतात.

सांगीतिक समृद्धीच्या निमित्ताने अलीकडे घराण्यांचा संकर पुष्कळ आढळून येतो, त्याचाही विचार अगत्याचा आहे. लवचिक गळ्याच्या ईर्ष्यालू गायकाला अनेक घराण्यांचे विशेष वठविण्याचा मोह होणे हे साहजिक आहे. परंतु या मोहात फार मोठा धोक्याचा कीटक दडलेला असतो, आणि तो नकळत घराण्याचे विशेष खाऊन टाकतो. छातीतील जाड आवाज, मोठमोठी गमके, भव्य ख्याल हे ज्या घराण्याचे विशेष असतात, त्यातील गायकांनी मैफलीचा शौक पुरविण्यासाठी गळा नरम बनविला, आवाज 'गळी' केला आणि ठुंबरीचा हलका नाचरेपणा गैरसावधपणे गळ्यात कायम केला, तर त्यांच्या ख्यालालाही घुणा लागल्यावाचून राहत नाही. शिवाय, घराण्याच्या विशुद्ध रूपात हा सर्व नवोपक्रम सामावून गेला नाही, तर पुन्हा विसंगती निर्माण होते, ती वेगळीच. अशा वेळी आत्मपरीक्षणाची पराकाष्ठेची आवश्यकता असते. हा विचार जमेस धरता मिराशीबुवांसारखे गायक उच्च दर्जाचे म्हणावे लागतील. कारण घराण्याचा एक विशिष्ट नकाशा त्यांच्या गाण्यात शुद्ध रूपाने आढळून येतो. पूर्वीचे धृपदिये जाणतेपणाने ख्यालिये झाले येथवर ठीक होते, परंतु ख्यालियांनीही मैफल राजी करण्यासाठी अधिकाधिक हलका ढंग पत्करण्यास सुरुवात केली, तर ख्यालगायकीचा "शतमुखांनी विनिपात" होण्याचा धोका आहे. नटवेपणात जसे सौंदर्य असते, तसे साधेपणात, अनघडपणातही अगळे सौंदर्य असते, हे कलावंतांनी ओळखावयास हवे.

ख्यालातल्या अस्सल अभिजात सौंदर्याचा विचार करता अतरौलीवाले (अल्लादियाखाँ) यांचे घराणे अतिशय उठावदार आहे. आवाजाचा स्वाभाविकपणा, आविष्काराचा सहजपणा, एकंदर गायनाचा निर्मळपणा, लयीचा पेचदारपणा यांमुळे व अशा अन्य विशेषांमुळे त्यांचे गायन फार मोहक ठरले आहे. आणि आज जवळजवळ प्रत्येक गायकाला असे वाटते की, त्यांच्या वळणाची एखादी चीज, एखादा अलंकार, एखादी तान, जागा, समेचा प्रकार आपल्या गळ्यात बसवून ठेवावा. यात या घराण्याचा

प्रभाव दिसतो, यात शंकाच नाही. 'मानस-सरोवरा'तून निघालेल्या नद्या अनेकदा आपली पात्रे पालटतात, तशी घराणीही एखाद्या प्रतिभावान कलावंताच्या रूपाने आपली वळणे बदलतात. खाँसाहेबांनी अनेक धृपदांचा आविष्कार ख्यालांच्या पूर्तीने केला. धृपदियांचे गांभीर्य संभाळून त्यांनी सर्वस्वी अभिनव गायकी निर्माण केली, आणि तरीही ख्यालियांचे मोहक वळण पतकरिले. त्यामुळे धृपदियांची पूर्वोक्त घनगंभीर अंगे व ख्यालियांची आकर्षणे यांचा फारच सुंदर मिलाफ त्यांच्या ठिकाणी झाला. त्यांचे गायन शिल्पकृतीसारखे (sculptural) आहे. शिल्पकृतीतला नतोन्नतपणा, गोलपणा, भरीवपणा व प्रवाहीपणा यांची अभिव्यक्ती नेमकी त्यांच्या गायकीतही दिसून येते. विद्येची उपासना या घराण्यात विशेषच साक्षेपाने विद्यमान आहे. अनवट व बिकट राग, अनोख्या चिजा, लयीचे पाचपेच यांमुळे विद्योपासनेला साहजिकच महत्त्वही आले. अपरिचित राग मैफलीत गाण्याची रूढी या घराण्याने फार जोमाने आणिली. तथापि विशेष गोष्ट अशी की, कोणताही अपरिचित राग अगदी साधासाधा वाटावा अशा प्रकारे त्याची ते निभावणी करतात. पेशवाईतले आण्णासाहेब खाजगीवाले कोणताही नाठाळ, बुजार व कडक घोडा त्यावर मांड टाकताच वठणीवर आणीत, असे म्हणतात; त्याचप्रमाणे या घराण्यात रागाविष्काराविषयी स्थिती आहे. नवथर स्वाराला असा घोडा ज्याप्रमाणे फेकून देण्याचा संभव जास्त, त्याप्रमाणे या घराण्यातील या वैशिष्ट्याचे अनुकरण अनेक वेळा भयावह होते. या घराण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील अध्यापनाची वृत्ती. पर्वतापासून उण्याअधिक लांबीचे पाणलोट निघावे, त्याप्रमाणे कितीतरी शिष्य यात उत्पन्न झाले व कमीजास्त प्रभावाने ते गाजलेही. या शिष्यांच्या गायकी फारकरून विवादी आढळणार नाहीत. अर्थात त्यात तरतमभाव दिसतो; परंतु घराण्यांचे सूत्र त्यांच्या गायकीत खेळताना प्रकट होते; हे मात्र खरे.

आवाज पुरापुरा लावण्याच्या व तो निर्मळपणे फिरविण्याच्या पद्धतीमुळे आपाततः या घराण्याचे गायन सुगम वाटते; परंतु त्याची तालीम घेण्यास सुरुवात केली म्हणजेच त्यातल्या अविश्रांत तपस्येचा भाग लक्षात येतो. दीर्घश्वासयुक्त तान, धीमी लय, तानेची विशिष्ट कूट आकृतिबंधांची (patterns) मांडणी, तीतील विविधता या विशेषांमुळे कधीकधी या गाण्याचे दृश्य जैनांच्या दिलवाडा देवालयातील कुसरकामाप्रमाणे दिसते. त्यातील निर्मळपणा तर केवळ अनुपम असतो. स्वरांचा एकेक बुंद, लयीचा एकेक खाना आणि रागाची गोंडस आवकजावक अत्यंत रेखीव असते. यालाच गायनातील 'प्रसादगुण' म्हणता येईल.

तयारीचे गाण्यात जसे अलीकडे स्तोम माजले आहे, तसेच धीम्या लयीचेही माजले आहे. रुंद आवाजावाचून धीमी लय वस्तुतः व्यर्थ होय. तसेच आवाजात भरदारपणा व नादवत्ता असल्यावाचूनही अशी लय गायकाच्या उपयोगी पडत नाही. सर्वांत लक्षणीय गोष्ट ही की, अशा लयीचा हिशेब संभाळणे ही अत्यंत बिकट गोष्ट. तालावर्ताच्या एकेका मात्रेचे खाने हिशेबाने चोख भरणे आणि ते वैचित्र्याने सजविणे

ही अतिविकट गोष्ट या घराण्यात स्फूर्तीने केली जाते. याच धीम्या लयीत एखाद्या चार मात्रांच्या समूहात चटकन बढतही होऊन जाते आणि विलक्षण वैचित्र्यकारी प्रत्यय श्रोत्याला येतो. हे सर्व कौशल्य ज्या वजनदारपणाने निभावले जाते तो वजनदारपणा पाहिला म्हणजे मन खरोखर स्तिमित होते.

अनेक उत्तम गायक उत्पन्न करण्यात किरानेवाले (अब्दुल करीमखाँ) फार भाग्यवान अणि सफल ठरले आहेत; आणि महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे ह्यांची गायकी फार आवडलेलीही आहे, असे दिसते. किरानेवाले हे एखादे वेळी विद्वत्तेची मैफलीत परवा करणार नाहीत; पण रंग मात्र दवडणार नाहीत; आणि हे उजू आहे. शांतपणा आणि सात्त्विकपणा हे गुण त्यांच्या गायनात उत्कटतेने फार प्रत्ययास येतात. कोणाला त्यांची गायकी आवडणार नाही; कोणाला त्यांच्या गाण्यातील चेंगटपणा आवडणार नाही; कोणाला त्यातला तोचतोपणा व एकसुरीपणा रुचणार नाही; कोणाला त्यांची तान सुरेख वाटणार नाही; पण त्यातला मधुरपणा मात्र सर्वांनाच आवडेल. या घराण्यात स्वरांचा विचार फार काळजीने केलेला दिसतो, – विशेषतः खाँसाहेबांनी त्यातले माधुर्य श्रोत्यांच्या सर्वाधिक अनुभवास आणून दिले. त्याला त्यांनी फार पैलू पाडले नसतील, पण त्याचा परिणाम त्यांनी खूप वाढविला. स्वराकडे त्यांनी फार लक्ष्य दिले; त्याची किंमत त्यांनी फार वाढविली. त्यामुळे गायकीच्या इतर अंगांचा परिपोष त्या मानाने कमी झाला; व त्यातून त्यांच्या गायकीच्या मर्यादाही आपोआप स्पष्ट होतात.

ठुंबरीचे वैशिष्ट्य मात्र त्यांच्या घराण्यात चांगल्या दर्ज्याचे आहे. स्वरमाधुर्याचा त्यांनी ठुंबरीकडे उत्कृष्ट उपयोग करून घेतला. लयीचे अंग ठुंबरीत गौण असल्याने माधुर्यांचा आणखी परिपोष होऊन ठुंबरी अधिकच आकर्षक झाली. तथापि पूरब अंगाच्या ठुंबरीत शब्द ठसठशीतपणाने ‘टाकण्याचे’ म्हणून जे कसब दिसते, त्या ठुंबरीत नाही. ही ठुंबरी काहीशी नरम ख्यालाच्या वळणाने जाते. कधीकधी ती ‘ललित ख्याल’ बनते. अलीकडे गायकांच्या येण्याजाण्यामुळे व वेगवेगळ्या ठुंबऱ्यांच्या श्रवणामुळे ठुंबरीला पुष्कळच बहुरंगी पेहराव चढला आहे. पूरब, पंजाबी अशा अनेक पद्धती श्रोत्यांच्या अंगवळणी पडल्या आहेत. अशा स्थितीत तुलनेने या घराण्याच्या ठुंबरीच्या मर्यादा दिसत असल्या, तरी ज्या काळात तिचा उदय झाला व गाढ प्रभाव पडला, त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

भास्करबुवांच्या घराण्याने महाराष्ट्राला एके काळी वेड लावलेले होते. बुवांच्या गाण्याच्या मोहकपणाबद्दल कोठेही दुमत नाही. फैज महंमदखाँ, नत्थनखाँ, अल्लादियाखाँ अशा दोन-तीन घराण्यांचा त्यांच्या गायकीत संगम झालेला होता. विविध मसाला घातलेल्या पक्वान्नाप्रमाणे ती अतिरुचिकर झाली होती. बुवा म्हणजे मूर्तिमंत रंगदेवताच होते. त्यांच्या ढंगाचा, नटवेपणाचा पुष्कळच वारसा मास्तर कृष्णरावांकडे आलेला आहे. एखाद्या हजरजबाबी, चतुर माणसाप्रमाणे असलेले त्यांचे गाणे ‘जमले’, म्हणजे भारी आकर्षक वठते. बुवांच्या मूर्तीप्रमाणेच त्यांचे गायन नित्य प्रफुल्ल दिसे. ख्याल, ठुंबरी,

पद इत्यादी सर्व अंगांनी डवरलेले त्यांचे गाणे 'सबरंगी' होते, यात शंका नाही. दुर्दैव असे की, अशा गाण्याचे सातत्य दीर्घकाल टिकण्याचे चिन्ह दिसत नाही. मास्तर वगळले, तर बुवांना त्या तोलाचे अनेक शिष्य मिळण्याचे भाग्य मिळाले नाही. निदान आज तरी त्यांची साक्ष नाही. त्यामुळे हे घराणे कालगतीमध्ये कुंठित होईल की काय, अशी भीती वाटते.

वरील घराण्याच्या व्यतिरिक्त महाराष्ट्रात आणखीही काही घराणी नांदली, आणि कमी-अधिक प्रसिद्धीही पावली. महादेवबुवा गोखले यांचे घराणे अशाचपैकी होते. परंतु आज त्याची नावनिशाणीही मैफलीत आढळत नाही. त्याची फक्त ऐतिहासिक नोंद काय ती होऊ शकेल. १९४४–४५-पासून पतियाळाचे बडे गुलाम अलीखाँ यांच्या मखमाली, सुरेल, संपन्न आणि अतिमधुर आवाजाचीही जनमनावर फार खोलवर छाप पडलेली आहे. त्यांच्या पंजाबी पद्धतीच्या ठुंबरीने तर ठुंबरी-गायनाची कोंडीच फोडली, असे म्हटले पाहिजे. कारण तोपर्यंत अब्दुल करीमखाँची ठुंबरी ही मैफलीत प्रायः मान्यता पावलेली होती. बडे गुलाम अलीखाँच्या लकबी आज अधूनमधून इतरांच्याही गळ्यात दिसतात. पण खाँसाहेबांचा रंग काही न्यारा होता, यात शंका नाही.

घराण्याची गायकी म्हणजे विशिष्ट सौंदर्यदृष्टीचा संगीतमय परिपाक व आविष्कार आहे, असे सांगतात. हा आविष्कार आणि ही सौंदर्यदृष्टी वैयक्तिक असणार, हे उघड आहे. पण तिचे काही स्थूल विशेष हे सामूहिक स्वरूपाचे असतील. हे विशेष त्या-त्या घराण्याच्या गायकीत कोणाही गायकाच्या बाबतीत कमी-अधिक खोलीने प्रतिबिंबित झालेले असतात. संगीतातले हे जातिभेद होत! संगीतातले हे जातिभेद इष्ट म्हटले पाहिजेत. अशा सौंदर्यप्रणालींची जपणूक प्रत्येक घराण्यामध्ये चिजेच्या वळणाच्या बाबतीत, लयीच्या खान्याच्या बाबतीत, स्वर लावण्याच्या बाबतीत, मोठ्या निष्ठेने केली जाते आणि या निष्ठेने सार्वजनीन मान्यता प्राप्त होते. घराणे हा गायकाच्या गानाविष्काराचा पाया मानिला जातो. तो त्याचा एका परीने कळसही आहे. विभिन्न घराण्यांचे अस्तित्व आणि पोषण हे विभिन्न सौंदर्यप्रणालींचेही एका दृष्टीने चिन्ह आहे, म्हणून ते स्वागतार्ह आहे. गणवेष हा सैन्यात, किंवा एकत्व हे वेदान्तात उचित, व तर्कसिद्ध असेल, परंतु कलेत द्वैताचा महिमा मोठा आहे. ब्रह्मपुत्र, सिंधु इत्यादी मानस-सरोवरातून उगम पावलेले नद अगदी वेगवेगळ्या दिशांनी वाहतात, त्यांच्या भोवतालची दृश्ये बहुविध, पशु-पक्षी-सृष्टी भिन्न, त्यांचे लोकोपकारित्वाचे प्रकार वेगळे, त्यांची लांबी-रुंदी कमी-अधिक, आणि त्यांचा थाटही अलग. संगीतातल्या घराण्यांचीही कुळकथा अशीच आहे. घराण्याची कल्पना ही सामूहिक वैशिष्ट्याची वाचक मानिली जाते.

दुसऱ्या दृष्टीने पाहता कलाकृतीचे वैशिष्ट्य हे तिच्या स्वयंपूर्ण, अनोख्या आणि स्वतंत्र अशा घडणीतच असते, हे जर मान्य केले, तर गायन ही घराण्याच्या पार असलेली एक गोष्ट म्हटली पाहिजे. बालगंधर्व, कुमार गंधर्व ह्या व्यक्तींच्या गायनावर कोणत्याही एका घराण्याचा असा शिक्का मारता येणार नाही. त्यांचे गायन हे मधु-

मक्षिकेने पराग गोळा करून रूपांतरित केलेल्या चविष्ठ, सुगंधी मधाप्रमाणे अगदीच स्वतंत्र आहे. ही एक प्रकारची बंडखोरीच आहे. पण कलेच्या क्षेत्राला अत्यंत पोषक. त्यांचे जीवन हे जमिनीमधून अकल्पितपणे उसळलेल्या एखाद्या जोमदार झऱ्यासारखे असते. अशा व्यक्ती गायनातल्या अथवा संगीतातल्या आपल्या मूलभूत मानिलेल्या, पण वस्तुतः सांकेतिक असलेल्या कल्पनाच बदलून टाकितात. बडे गुलाम अलीखाँनी ज्याप्रमाणे ठुंबरीची कोंडी फोडली, असे म्हटले, त्याप्रमाणे कुमार गंधर्वांनी भजनाची— म्हणजे भजने गाण्याच्या पद्धतीची कोंडी फोडिली; नवीन वाटा काढिल्या. आजपर्यंत मैफलीत बालगंधर्वांची भजनगायनाची रीत मान्यता पावलेली होती. ती अर्थातच चांगली रीत होती. परंतु कलेमध्ये 'चांगले' ह्या कल्पनेपेक्षा 'वेगळे' ह्या कल्पनेचा हव्यास असतो. त्या दृष्टीने कुमार गंधर्वांनी भजनाचा नुसता तोंडवळाच नव्हे, तर आत्माही बदलून टाकिला, आणि तो अत्यंत समर्थपणे. मीरेच्या भजनातली समर्पणाची वृत्ती, सूरदासाच्या भजनातली आर्द्र काव्यात्मता, कबिराच्या भजनातला वेदान्ती निर्गुणी साक्षात्कार या सर्वांचे एकमेकांपासून भिन्नत्व राखण्यात ते जी गुंजनाची आणि रचनांची विशिष्टता कटाक्षाने आणितात, ती केवळ अद्वितीय आहे. ही भजने अशा रितीने आणि अशा आगळेपणाने — म्हणजे श्रेष्ठपणाने — आजवर कोणीच म्हटली नव्हती. आणि ती तशा रितीने अजून तरी दुसरे कोणीही म्हणत नाही. हा एक सर्वस्वी नवाच प्रकार आहे, की ज्याचे आजवर कोणालाही स्वप्नही पडले नव्हते; आणि कोणालाही न पडलेले हे बहुरंगी स्वप्न कुमार गंधर्वांनी आज आपल्यापुढे मूर्त करून ठेविले आहे.

लोकगीतांच्या गायनाचे जे एक अभिनव क्षेत्र कुमार गंधर्वांनी उपलब्ध करून दिले आहे, तेही असेच अपूर्व आहे. संपूर्ण मैफलच्या मैफल लोकगीतांनी भरून आणि भारून टाकणे ही एक सर्वथा अकल्पित गोष्ट आहे; एरव्ही असंभाव्य वाटणारी घटना आहे. पण तीही कुमार गंधर्वांनी आपल्या रचनेच्या आणि गायनाच्या उभारीने नुसती शक्यच नव्हे, तर रूढही केली. संगीतात नवनवीन मार्ग शोधण्याची आणि चोखाळण्याची त्यांची जिद्द, तिला लागणारी कुशलता आणि सर्व सामग्री संघटित करण्यास लागणारी उमेद, शक्ती या सर्वांचे एक अद्‌भुत रसायन कुमार गंधर्वांच्या ठिकाणी एकत्रित झालेले आहे.

एका काळी मराठी संगीत-नाटकांत गाण्याच्या बाबतीत बालगंधर्वांनीही असेच विलक्षण कर्तृत्व गाजवलेले होते. तो जमाना ज्यांनी पाहिलेला आहे, ते तो कधीही विसरू शकणार नाहीत. सुमारे तीस वर्षेपर्यंत बालगंधर्वांच्या नाट्यगायनाची श्रोत्यांवर — अज्ञांवर आणि तज्ज्ञांवरही — विलक्षण मोहिनी पडलेली होती. स्वभावतः त्यांचे गायन हे अभिजात स्वरूपाचे होते. परंतु तेवढे वर्णन करण्याने त्यांच्या गायनाचे स्वरूप ध्यानात येणार नाही. कारण त्या अभिजाततेला त्यांनी नाट्यानुरूप असे इतके वेगळे व ललित रूप दिलेले होते की, ते अभिजात व सांकेतिक आहे असे तर वाटू नये, पण तसे जाणवत मात्र रहावे. रागगायनाचे सांकेतिक नियम ते खुशाल मोडीत असत

आणि तरी ते जाणकारांकडून हे नियम मोडले म्हणूने वाहवाही मिळवीत असत. अशी त्यातली मोहकता व जादू होती. तसेच, त्यांच्या गायनाचा आराखडा ढोबळ मानाने अभिजात स्वरूपाचा होता. तरीही त्यातले सर्व विशेष त्यांनी कधीही नाट्यगायनात दाखविले नाहीत. मूळच्या अभिजात स्वरूपाच्या गायनाला त्यांनी एक अनोखे आणि अत्यन्त आकर्षक रूप देऊन ते आपल्यापुढे ठेविले. त्यात उस्तादी स्वरूपाचे आलाप नव्हते, की तशा प्रकारचे अलंकार नव्हते; किंवा त्या पद्धतीच्या बोलताना नव्हत्या. पण तरीही संगीतातल्या उस्तादांनाही त्याची भुरळ पडत असे. या सर्वांमुळे त्यांनी अज्ञांना अभिजात गायनाला सतत उन्मुख केले. सुरेलपणा आणि लयकारी यांनी ते तज्ज्ञांना डोलवीत असत, तर निर्मळपणा आणि लालित्य यांनी ते अज्ञांना झुलवीत असत. नाटकीय संगीताचा बालगंधर्वांचा जमाना म्हणजे मराठी संगीत रंगभूमीला पडलेले एक कमालीचे मधुर स्वप्न होते, असेच म्हटले पाहिजे.

संगीताची परंपरा खंडित होत-होत, पालटत-पालटत आजवर आलेली आहे. पण ती वेगवेगळ्या दिशांनी संपन्नही झालेली आहे. प्रतिभावंतांचा मक्ता कोणत्याही एका काळाला दिलेला नसतो. त्याचप्रमाणे अभिजात — म्हणजे उस्तादी संगीत हाच काय तो गायनाचा एकमेव सर्वमान्य प्रकार आहे, असेही मानण्याचे कारण नाही. समाजाच्या विविध घटकांना विविध संगीताची आवश्यकता असते. तदनुसार फिल्मी संगीत, लोकसंगीत, तमाशा-संगीत असे अनेकविध संगीत अभिजात संगीतासमवेत समाजात नांदत असते. हे अपरिहार्य आहे. अशा प्रकारच्या संगीतातही वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व आढळते. लता मंगेशकर हे असेच एक लक्षणीय उदाहरण आहे. गेले पाव शतक आपल्या असंख्य गीतांनी लता मंगेशकरांनी करोडो लोकांना जी एक भुरळ घातली आहे, ते त्यांचे कर्तृत्व असामान्यच म्हटले पाहिजे.

आज ज्या प्रकारचे अभिजात संगीत येथे रूढावले आहे, त्याची परंपरा महाराष्ट्रात फार प्राचीन नाही. महाराष्ट्राने ते संगीत उत्तरेकडून दत्तक घेतलेले आहे. वाटल्यास हा उत्तरदिग्विजय म्हणा! पण या दत्तक पुत्रावर मराठी माणसांनी औरस पुत्रासारखे अपार प्रेम केले, त्याला जीव लावला, आणि ते आपलेसे केले. ह्या संगीताचे काही चुटपुटते उल्लेख रामदासांच्या रचनात आढळतात, हे खरे, पण ते संगीत क्रियाशील राहिलेले नव्हते. त्यामुळे ह्या अभिजात संगीताचा साक्षात क्रियारूप आणि ठसठशीत असा इतिहास ‘ महाराष्ट्राच्या दृष्टीने ’ एक-दीड शतकाहून अधिक नाही.

तंतुवादनाची परंपरा महाराष्ट्रात गायनाच्या परंपरेइतकी जोरदार कधीच नव्हती. काही बीनकार, काही सतारिये जरी होऊन गेले असले, तरी त्यांनी एखादी परंपरा भक्कमपणे रुजविण्याइतके बळ कधी धरिले नाही. बीनवादन तर आज लुप्तच झाले आहे. विलायतखाँ, अली अकबर, रवि शंकर इत्यादी महान वादनकार आज आपण ऐकतो. पण त्यांचे पूर्वज हे मराठी संस्कृतीचे होते, असे म्हणणे किंवा त्यांचा दीर्घ रहिवास मराठी प्रदेशातला म्हणणे हे कठीण आहे. अशा वाद्यांपेक्षा मृदंग, तबला

इत्यादी वाद्यांच्या वादनाची परंपरा ही खास मराठी म्हणता येईल. पानसे, चांदवडकर, अळकुटकर, गोविंदराव बऱ्हाणपुरकर, दत्तोपंत मंगळवेढेकर, शंकर भैया ही खास मराठी माणसे होती. तबलानवाज तिरखवा खाँसाहेबांचा बहुतेक सर्व उमेदीचा काळ गंधर्व-नाटक-मंडळीत — म्हणजे महाराष्ट्रात गेला. त्यांना प्रतिष्ठाही महाराष्ट्रातच मिळाली, आणि तिचा विस्तार पुढे भारतभर झाला. असेच आणखी अनेक तबलिये.

वाङ्मयीन टीका ही ज्याप्रमाणे वाङ्मयाच्या काठाकाठाने वाढते, त्याप्रमाणे संगीतसरितेच्या काठाकाठाने संगीतसमीक्षा अंकुरते, वाढते, फोफावते. संगीताच्या वर सांगितलेल्या सचेतन परंपरेसमवेतच संगीतविषयक ग्रंथरचनाही महाराष्ट्रात पुष्कळ झालेली आहे. महाराष्ट्रातल्या शार्ङ्गदेवप्रणीत 'संगीतरत्नाकरा'सारख्या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथाची गोष्ट आपण सोडून देऊ. परंतु १८५० सालचा भाऊशास्त्री अष्टपुत्रे यांचा 'गायनप्रकाश' हा ग्रंथ, १८६४ सालचे 'गीतलिपि' हे स्वरलिपियुक्त पुस्तक, १८०० सालचे 'राधागोविंदसार' हे हस्तलिखित, 'रागविबोधा'चे मराठी भाषांतर इत्यादी एकोणिसाव्या शतकातल्या पुस्तकांचा नामनिर्देश येथे केला पाहिजे. येथून पुढे संगीताविषयीचे शास्त्रीय लेखन अधिक जोराने आणि सकसपणाने सुरू झाले; आणि कितीतरी छोटीमोठी पुस्तके रचिली गेली. पण या विसाव्या शतकातला सर्वांत मोठा नाव घेण्याजोगा ग्रंथ म्हणजे पं. वि. ना. भातखंडे (ऊर्फ विष्णुशर्मा, ऊर्फ चतुर पंडित) यांच्या 'हिंदुस्थानी संगीतपद्धति' या ग्रंथाचे चार भाग. यांमध्ये त्यांची तीव्र बुद्धिमत्ता, तर्कवादपाटव, उद्योगप्रियता आणि संगीताची सुव्यवस्थित व आधुनिक रितीने मांडणी करण्याची हौस ही सर्व उत्तम प्रकारे प्रतिबिंबित झालेली आहेत. 'लक्ष्यसंगीत' हाही त्यांचाच ग्रंथ. याव्यतिरिक्त ठिकठिकाणांहून बहुविध चिजा त्यांनी प्रयत्नपूर्वक गोळा करून, त्या स्वर-लिपिबद्ध करून, संगृहीत करून ठेविल्या. रावसाहेब देवल-क्लेमंट्स् यांनी श्रुतींचा प्रश्न घेऊन त्याचे उत्तम विवरण आपल्या ग्रंथात केले. याच प्रश्नाचा आणखी पाठपुरावा गं. भि. आचरेकर, कृष्णराव मुळे, फिरोज फ्रामजी यांनीही पुढे आपापल्या ग्रंथांत केला. तथापि त्याचे मूळ देवलांच्या प्रयत्नांत आढळते. कै. ग. ह. रानडे यांनी 'Hindustani Music' आणि 'संगीताचे आत्मवृत्त' या आपल्या पुस्तकांत श्रुतिसिद्धान्ताव्यतिरिक्त इतरही संगीतसंबद्ध विषयांची लक्षणीय चर्चा केलेली आहे. तशीच गायनातल्या चिजांचीही या क्षेत्रात अनेक पुस्तके तयार झाली आहेत. एवढेच नव्हे, तर गायनाचा समग्र विस्तारच्या-विस्तार नोटेशनने लिहून काढण्याचाही उपक्रम पं. विष्णू दिगंबर पलुस्करांनी सुरू केला. 'रागप्रवेश' या नावाचे त्यांनी अठरा भाग प्रसिद्ध केलेले आहेत. भातखंड्यांनी तर सुमारे २००० चिजा ज्यात संगृहीत आहेत, असे 'क्रमिक पुस्तकमालिके'चे सहा भाग प्रसिद्ध केले. हे काम प्रचंड आणि निरलस उद्योगाचे होते. अशाच रितीचे काम मिराशीबुवा, प्रो. देवधर, पं. पटवर्धनबुवा यांनीही केले आहे. ना. द. तांबेशास्त्री यांचीही 'बालकसंगीत' व 'गीतविलास' ही पुस्तके लक्षात घेण्यासारखी आहेत.

अलीकडच्या काही वर्षांत रसास्वादपर व समीक्षात्मक असे बरेच वाङ्मय मराठीत निर्माण झालेले आहे. त्यात चरित्र-वाङ्मयही समाविष्ट आहे. केशवबुवा इंगळे यांनी दोन छोटी पण फार चांगली पुस्तके लिहिलेली आहेत : बाळकृष्णबुवांचे चरित्र, आणि गोखले घराण्याची गायकी. नगरच्या रानडे वकिलांनी लिहिलेले अब्दुल करीमखाँचे चरित्र, गोविंदराव टेंब्यांनी लिहिलेले अल्लादियाखाँचे चरित्र, वसंत शांताराम देसाई यांचे बालगंधर्वांचे चरित्र व अगदी अलीकडे नी. म. केळकरांनी उद्योगपूर्वक लिहिलेले भास्करबुवांचे चरित्र यांचाही या संदर्भात आवर्जून उल्लेख केला पाहिजे. यांव्यतिरिक्त गेली अनेक वर्षे चाललेल्या ' संगीतकलाविहार ' मासिकात अनेक कलावंतांची छोटी चरित्रे त्यांच्या कलेच्या विवेचनासह येऊन गेली आहेत.

गेल्या काही वर्षांत रसास्वादपर वाङ्मयाला जणू बहर आलेला दिसतो. त्याचा प्रारंभ गोविंदराव टेंबे यांनी केला आणि पुढे तो ' माझा संगीतव्यासंग ' या पुस्तकात फार रोचकपणाने फुलविला. समीक्षेच्या दृष्टीने केशवराव भोळे यांनी पद्धतशीरपणे लिहिलेल्या वाङ्मयाचा अवश्य उल्लेख करावयास हवा. त्यांची ' संगीतांचे मानकरी ', ' अस्ताई ', ' अंतरा ', ' केशवकाकांची पत्रे ', ' माझे संगीत ' इत्यादी पुस्तके जशी वाचनीय, तशीच मार्मिकही आहेत. वामनराव देशपांड्यांचे ' घरंदाज गायकी ' व ना. र. मारुलकरांचे घराण्यांच्या गायकीची चिकित्सा करणारे ' संगीतातील घराणी ' हे पुस्तक, बाबुराव जोशी यांची ' संगीताचे रसग्रहण ' आणि ' संगीताने गाजलेली रंगभूमि ' ही पुस्तके आणि हरि विनायक दात्ये यांचे ' गायनी कळा ' हे पुस्तक ही अशा वाङ्मयातली लक्षात घेण्यासारखी पुस्तके आहेत. यांव्यतिरिक्त अरविन्द मंगरूळकर, ना. सी. फडके, अशोक रानडे, पु. ल. देशपांडे, गोपाळकृष्ण भोबे इत्यादी लेखकांनीही संगीतसमीक्षात्मक विपुल वाङ्मय निर्माण कलेले आहे. महाराष्ट्रातली संगीताची समजदारी आणि त्याबद्दलचे कुतूहल वाढविण्याचे हे वाङ्मयीन प्रयत्न खरोखरच महत्त्वाचे आहेत. मग यांतल्या विधानांविषयी आणि दृष्टिकोणांविषयी किती का मतभेद असेनात.

या संदर्भात दोन गोष्टींचा आवर्जून निर्देश केला पाहिजे. पहिली ही की, आपल्या कलेची बूज राखली जाते म्हणून आणि व्यावसायिक उत्कर्षाचे आश्वासक स्थान म्हणून सर्वांत जास्त कलावन्त आज महाराष्ट्रात स्थायिक झालेले आहेत. त्यांनी गायन-वादन जसे विपुल ऐकविले, तशीच आपली शिष्य-शाखाही निर्माण केली आहे; विद्यालये चालविली आहेत. येत्या कित्येक वर्षांत महाराष्ट्रातली संगीताची अभिरुची वाढत राहणार आणि ती शानदार होणार, याचा यामुळेच विश्वास वाटतो.

ही ज्याप्रमाणे एक अभिनन्दनीय गोष्ट आहे, त्याचप्रमाणे दुसरीही एक गोष्ट लक्षणीय आहे. संगीतविषयक जागृतीमुळे आणि कुतूहलामुळे संगीतविषयक वाङ्मयाचीही मराठीत पुष्कळ निर्मिती आजवर झाली आहे. कदाचित यातले सर्वच वाङ्मय सारख्या तोलामोलाचे नसेल. (तसे ते नसणार, यात आश्चर्य नाही.) कदाचित संगीतविषयक सर्व प्रश्नांना त्यामध्ये स्पर्श होत नसेल. (तेही शक्य आहे.) परंतु अन्य भारतीय

भाषांत क्वचितच निर्माण होत असेल, इतके एतद्विषयक वाङ्मय मराठीत उत्पन्न होत आहे, आणि त्याच्या द्वारा संगीताच्या जाणिवेचे क्षेत्र वाढत आहे, व झिरपे सर्वदूर पाझरत आहेत. 'संगीतकलाविहारा'सारखे मासिक गेली कित्येक वर्षे नियमितपणे चाललेले आहे. मराठी वाङ्मयातले हे एक अतिसंपन्न नसले तरी चांगले दालन आहे, हे मान्य केले पाहिजे. यातून पुढे अनेक मार्गांनी हा वृक्ष डेरेदार होण्याची शक्यता दिसत आहे. मुंबईचे बी. बी. देशपांडे, पुण्याचे हेमचंद्र मोडक यांनी संगीताविषयीचे काही प्रयोगशालीय संशोधनही पार पाडले आहे. त्याचे निष्कर्ष जनमनात चांगल्या प्रकारे रुजल्यावर एक नवी वैज्ञानिक दिशा आणि गती या विषयाला येईल. त्याला नवीन dimension लाभेल. संगीताविषयीचा मानसशास्त्रीय पाठपुरावा अजून फारसा कोणी केलेला नाही. तो सिद्ध झाला म्हणजे आणखी नवी क्षितिजे दिसू लागतील, आणि एखादी सुसान लँगर येथे निर्माण होण्याची शक्यता वाढेल. केवळ संगीताला वाहिलेला असा विश्वकोशही निर्माण होईल आणि असेच आणखी कितीतरी निर्माण होईल. त्या आशादायक भविष्यकालाकडे अशा प्रकारच्या अपूर्ण, संक्षिप्त स्वरूपाच्या लेखामध्येही आपोआपच दृष्टी वळते, आणि मन जसे उत्फुल्ल, तसेच विनम्रही होते.

महाराष्ट्रातील चित्रकला

[१९४५ ते १९७०]

ज. द. गोंधळेकर

आपल्या विचारासाठी जरी हा निश्चित कालखंड (इ. स. १९४५ ते १९७०) घेतला असला तरी कोणत्याही कालप्रवाहाचा विचार] करताना त्याच्या मागील आणि पुढील काळाचा विचार केल्याशिवाय विचाराधीन कालखंडाबद्दल योग्य कल्पना येणार नाही. विशेषतः कलांचा विचार करताना तर ही गोष्ट जास्तच आवश्यक आहे. कारण विशिष्ट कालातील विशिष्ट कलाप्रकार तसा काही आपोआप बनत नसतो, तर मागील परंपरेचा त्याला वारसा आणि अधिष्ठान असते आणि पुढील तयार होणाऱ्या नव-प्रकाराची बीजचिन्हेही त्यात जाणत्याला दिसू शकतात. कालाप्रमाणे कलाही प्रवाहितच असतात, आणि ज्या कलाप्रवाहाचा ओघ खुंटतो त्या कलाप्रकाराची गतिमानता आणि ओज ही दोन्हीही नष्ट होतात. आपण विचारासाठी ठरविलेल्या कालखंडातील चित्र-कारांची कालानुक्रमे यादी आणि माहिती सांगून, महाराष्ट्रातील त्या काळातील कलेची संपूर्ण अनुभूती मिळणे कठीण; आणि म्हणून या कालखंडातील चित्रकारांचा किंवा चित्रकलेचा विचार करण्यापूर्वी मागील कालाचे सिंहावलोकन करणे जरूर आहे. पण ते मागेसुद्धा कुठवर जायचे हेही ठरवावयास हवे. नदीच्या मधल्याच एखाद्या भागाचा विचार करताना त्याअगोदर जर एखादा दुसरा प्रवाह तिच्यात मिळाला असेल तर त्या ठिकाणापासून पुढील प्रवाहातील पाण्यात दुसरा प्रवाह मिसळलेला आहे हे निश्चित म्हणता येईल, आणि अगदी उगमापासून मागोवा घेण्याऐवजी या जवळच्या संगमापासून विचार करणे युक्त ठरेल. महाराष्ट्रातील कलेत असा झालेला शेवटचा संगम म्हणजे ब्रिटिश अमदानीची सुरुवात. पूर्वीच्या परंपरागत कलाशैली-ऐवजी तत्कालीन ब्रिटिशांनी आणलेल्या युरोपीय शैलीचा प्रभाव येथील कलेवर पडला आणि येथील चित्रकलेचे स्वरूपच बदलले. महाराष्ट्रापुरते म्हणावयाचे तर प्रत्यक्ष इंग्रजी अंमल येण्यापूर्वी सवाई माधवराव पेशव्यांच्या काळापासूनच इंग्रजी कलेचा प्रभाव

सुरू झाला. मॅब्रोन, डॅनिएल, रेसिडेंट मॅलेटसाहेबाचा सासरा वेल्स् या; चित्रकारांच्या कलेचा परिणाम तत्कालीन दरबारी चित्रकारांवर झाला असावा. वेल्सकडून सवाई माधवरावांनीही धडे घेतले होते व त्याच्या नेतृत्वाखाली एक चित्रशाळाही सुरू केली गेली होती. गंगाराम तांबट हा या शाळेत तयार झालेला चित्रकार. त्याने वेरूळ, अजिंठा येथील देखावे तयार केले होते. पेशवाईचा अस्त आणि त्यानंतरचा अव्वल इंग्रजीचा काल आपल्या बदलत्या दृष्टिकोणाचा आहे. कलांबद्दलच नव्हे तर इतर सर्वच बाबतींत आपले पूर्वीचे दृष्टिकोण बदलले. आपला पराभव झाला तेव्हा आपल्या सर्वच गोष्टी टाकाऊ असल्या पाहिजेत आणि इंग्रजांच्या सर्वच गोष्टी अत्युत्कृष्ट असल्या पाहिजेत या विचारांचा त्या काळातील बुद्धिमंतांनी पाठपुरावा केला. आपल्यातील उणिवा काढून टाकल्या पाहिजेत आणि आपण इंग्रजांच्या बरोबरीने व्हावयास पाहिजे म्हणून जे जे इंग्रजी ते ते आत्मसात करणे यातच इतिकर्तव्यता असल्याचे तत्कालीन विद्वानांनी हिरीरीने सांगितले. दुर्दैवाने यामुळे ओल्याबरोबर सुकेही जळते या न्यायाने जुन्या, चांगल्या परंपरासुद्धा टाकाऊ ठरल्या. संस्कृत भाषेच्या अभ्यासाऐवजी नव्या इंग्रजी भाषेचा अभ्यास बळावला आणि संस्कृतची परंपरा नष्टप्राय झाली. त्या काळात स्थापलेल्या अनेक विद्वत्सभांचा तोंडावळा इंग्लंडमधील तत्सदृश विद्वत्सभांसारखाच होता.

भारतातील चित्रशाळांची स्थापना ही घटना महाराष्ट्रातीलच नव्हे तर सर्व भारतीय कलेच्या प्रांतात महत्त्वाची आहे. भारतीय परंपरागत चित्रकार आणि हौशी व इतर आंग्लचित्रकार यांचा सहयोग झाला, पण त्यातून भारतीय परंपरा नष्ट होण्याची आपत्ती ओढवली. येथील चित्रकारांचा प्रयत्न साहेबबहाद्दुरांची मर्जी राखण्याकडे असणे स्वाभाविक होते. त्यांनी (साहेबांनी) अशा चित्रकारांना आपण सुरू केलेल्या शिळाछाप मुद्रणासाठी हाताशी धरले. इंग्लंडमधील लोकांना येथील आयुष्यक्रमाबद्दल कुतूहल होतेच. ते पुरे करण्यासाठी, येथील निरनिराळे देखावे धार्मिक व सामाजिक प्रसंग यांचे आरेखन व चित्रण करून त्यांच्या मोठ्या आकारात शिळाछापाने किंवा मुद्रितारेखन पद्धतीने प्रती काढीत व त्यांचा खपही त्या काळी जास्त असे. या कामात येथील परंपरागत चित्रकारांची मदत असेच.

निरनिराळ्या चित्रशाळांची स्थापना १८५७ च्या सुमारास झाली. मुंबईचे " सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट " १८५७ मध्ये स्थापन झाले व त्याच्या आसपासच मद्रास, कलकत्ता, लाहोर येथेही अशा चित्रशाळा स्थापन झाल्या.

मुंबईत चित्रशाळा स्थापन व्हावी यासाठी १८५३ पासूनच प्रयत्न सुरू होते. सर जमशेटजी जिजीभाई पहिले बॅरोनेट, यांनी त्यासाठी कंपनी सरकारच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सला याबाबत एक पत्र लिहिले व अशी शाळा स्थापिल्यास त्यासाठी एक लाख रुपये देण्याची तयारी दाखविली. येथील विद्यार्थ्यांना आरेखन आणि रंगकामाचे अद्यायावत शिक्षण देण्यासाठीं इंग्लंडहून कलाशिक्षक आणावेत अशीही त्यात विनंती होती. यातून एक गोष्ट स्पष्ट दिसून येते ती ही की, सर जमशेटजींच्या मते, येथील प्रचलित

आरेखन किंवा रंगकाम, पाश्चात्त्य चित्रकलेच्या तुलनेत कमी होते, आणि आदर्श होता तो इंग्रजी कलेचा. ही विचारसरणी एका दृष्टीने त्या काळातील इतर विचारपद्धतींशी सुसंगतच होती. पेशवाईच्या नंतरच्या काळातील भिवा सुतार वगैरेसारखे परंपरागत धार्मिक प्रसंगावर चित्रे कढणारे चित्रकार मागे पडत चालले. इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या यथातथ्य चित्रकलेचे नमुने पाहणाऱ्यांना व त्याने भारावून जाणाऱ्यांना या परंपरागत चित्रकाराच्या कलेत कलागुण दिसले नाहीत.

चित्रकारांना आश्रय देणारा भारतीय वर्ग म्हणजे इंग्रजांनी निर्माण केलेला संस्थानिक, सरदार व इंग्रजांशी व्यापार करून श्रीमंत झालेले व्यापारी यांचाच होता. याशिवाय इंग्रज अधिकारीही येथील त्यांच्या वास्तव्याच्या आठवणी म्हणून येथील चित्रकारांची चित्रे घेऊन जात.

महाराष्ट्रातील चित्रकारांना आणखी उत्तेजन मिळाले ते नवीन सुरू झालेल्या चित्रप्रदर्शन-प्रथेमुळे. ही प्रथाही अर्थात इंग्रजांनीच त्यांच्या मायदेशीच्या पद्धतीनुसार येथेही सुरू केली. "बॉम्बे आर्ट सोसायटी"ची वार्षिक प्रदर्शने अगदी अलीकडे अलीकडेपर्यंत प्रामुख्याने हौशी इंग्रज स्त्री-पुरुष कलावंतांसाठीच असत. अशी प्रदर्शने कौतुकाच्या स्वरूपाची असल्यामुळे इंग्लंडमधील "रॉयल ॲकडेमी" सारख्या धंदेवाईक कलावंतांच्या पारितोषकासाठी नसलेल्या पण मान्यतेसाठी असलेल्या चित्रप्रदर्शनाशी त्यांचे यत्किंचितही साम्य नव्हते. उलट अशा प्रदर्शनात बक्षिसांची खैरात असे. पण अशी बक्षिसे जास्त प्रमाणात लष्करी अधिकारी (आणि अर्थात हे बव्हंशी इंग्रजच असत) व इतर इंग्रजांसाठीच राखीव असत. काही उरलीसुरली बक्षिसे "नेटिव्ह" चित्रकारांसाठी शिल्लक असत. प्रदर्शनासाठी बक्षिसे असल्यामुळे, अर्थात त्यासाठी निवडही अभिप्रेतच होती; आणि अशी निवड करायला लायक व्यक्ती म्हणजे अर्थातच येथील चित्रशाळेचा इंग्रज प्रमुख. चित्रे विकत घेणारे येथील संस्थानिक, श्रीमंत व सरकार दरबारी मान्यता मिळविण्यासाठी झटणारे लोक, त्यांनाही सल्ला देणारा म्हणून हाच चित्रशाळेचा प्रमुख. त्यामुळे येथील चित्रकारवर्ग त्यांच्या काळच्या चित्रशाळा-प्रमुखाच्या आवडीनुसार चित्रे काढण्यात तत्पर होता. काही अपवाद सोडल्यास हे शाळाप्रमुख इंग्रज, खुद्द इंग्लंडमध्ये फार नामवंत म्हणून गणलेले नसत. शिवाय हिंदुस्थानातील दीर्घ वास्तव्यामुळे इंग्लंड वा युरोपमधील कलेच्या प्रगतीशी त्यांचा संबंध राहत नसे. येथील कलाप्रकारापेक्षा इंग्लंडमधील कलाप्रकारांची श्रेष्ठता, तेथील शिक्षणपद्धतीची महती, यथातथ्यावर न्यास अशा अनेक कल्पना या जेत्या कला-शिक्षकांच्या मनात दृढमूल होत्या. अर्थात या मनोवृत्तीला आपणही भरपूर साथ दिली. काही थोड्या इंग्रजांनी येथील प्राचीन कलाप्रकाराबद्दल कुतूहल दाखविले, त्यांचा अभ्यासही केला. पण असेही अपवादात्मकच. या पार्श्वभूमीवर अशा शाळेतून तयार झालेल्या चित्रकारांच्या पिढ्यांचा आढावा घेणे सुकर होईल. महाराष्ट्रीय चित्रकारांची प्राथमिक पिढी, संपूर्णतया पाश्चात्त्य वळणाची यथातथ्य चित्रे करणारी होती. आबा-

लाल रहिमान, पेस्तनजी बोमनजी, ही काही आद्य पिढीतील चित्रकारांची नावे. पेस्तनजी बोमनजींची मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिअममधील चित्रे पाहिल्यावर ही गोष्ट लक्षात येईल. संपूर्ण रविवर्मायुग या परंपरावर्तित कलेचे उदाहरण आहे.

याच ठिकाणी एका अडचणीच्या मुद्द्याचा विचार करणे योग्य ठरेल. महाराष्ट्रीय चित्रकार कुणाला म्हणावयाचे हा एक यक्षप्रश्न आहे. ही जी चित्रकलेबाबत अडचण तीच संगीतासारख्या इतर कलाप्रांतांतही आहे. केवळ महाराष्ट्रात वास्तव्य म्हणून त्यांना महाराष्ट्रीय म्हणावयाचे का केवळ महाराष्ट्रात जन्म घेतलेल्या महाराष्ट्रीय चित्रकारांचा विचार करावयाचा. पहिल्यामुळे महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र असलेल्या चित्रकारांचा (वर रविवर्म्यांचा उल्लेख केला त्याप्रमाणे) विचार करता येईल व विचाराचे क्षेत्रही व्यापक होईल. पण त्यात खास महाराष्ट्रीयांवर अन्याय होणेही शक्य आहे. दुसऱ्या तऱ्हेने काही नामवंतांचा विचार वगळावा लागेल. याशिवाय तिसराही एक विचार आहे. खास महाराष्ट्रीय अशी काही चित्रशैली होती का ? किंवा आहे का ? याबाबतीत अगदी पेशवेकालापासून खास महाराष्ट्रीय अशी शैली दिसून येत नाही. जी गोष्ट इंग्रज कालात झाली तीच त्या वेळीही होत होती. पेशवे जरी स्वतंत्र होते तरीही मोगल आणि उत्तरेकडील कलाकारांचेच त्यांच्या काळी प्रस्थ होते; आणि येथे तिकडल्या चित्रकारांची शैलीच प्रचलित होती. स्वातंत्र्य नष्ट झाल्यावर उत्तरेऐवजी इंग्लंडहून आलेली चित्रशैली महाराष्ट्राने मोठ्या उत्सुकतेने आणि आनंदाने पत्करली. इंग्रज गेल्यावर आज सर्व जगातील कलेचा प्रभाव आपल्या चित्रकलेवर आहे; आणि आपल्या कलेत अमूक एक गोष्ट खास इथली आणि महाराष्ट्रीय असे म्हणता येत नाही.

यासंबंधी एक गमतीदार आठवण सांगणे गैर होणार नाही. भारतीय चित्रकलेच्या पुनरुत्थानाच्या प्रयत्नाचा तो काळ होता; आणि भारतीय चित्रकला म्हणजे काय याबद्दल आमच्यात आणि आमच्या शिक्षकवर्गात चर्चा व्हावयाची. एका नामवंत शिक्षकाच्या मते ही गोष्ट अगदी साधी होती. भारतीय चित्रकार जी निर्मिती करील ती भारतीय कला असे त्यांचे मत. भारतीय कलेला काही विशिष्ट तत्त्वप्रणाली, किंवा आविष्कारवैशिष्ट्य असावे याची त्यांना जरुरीही वाटत नव्हती, आणि हे म्हणताना त्यात विनोद किंवा उपहास नव्हता तर अगदी गांभीर्याने ते हा मुद्दा प्रतिपादीत. त्यांच्या दृष्टीने भारतीय कलेचे पुनरुज्जीवन वगैरे प्रयत्न टाकाऊ होते; आणि त्या वेळच्या शाळाप्रमुख इंग्रजांचे आम्हा भारतीयांना युरोपीय उच्च कलेपासून वंचित करण्याचे हे धोरण होते अशीही त्यांची ठाम खात्री होती. ही गोष्ट भारतीय म्हणजे काय यासंबंधीच्या जाणत्यांच्या कल्पनेची. मग महाराष्ट्रीय म्हणजे काय याबद्दलचा विचार तरी कोण करणार ! आजही तीच परिस्थिती आहे असे म्हणावयास हवे, आणि वरील न्यायाने जो महाराष्ट्रीय (म्हणजे महाराष्ट्रात जन्म घेतलेला, मराठी बोलणारा किंवा येथील चित्रशाळेत शिकून तयार झालेला) असेल त्याने केलेली चित्राकृती म्हणजे महाराष्ट्रीय चित्रकला अशी सोयी समजूत करून घेण्यास हरकत नाही.

ग्रिफिथ्स या शाळाप्रमुखाने अजिंठ्याच्या कलेबाबत मोठी संशोधनात्मक कामगिरी केली. त्याच्या पुस्तकात छापलेल्या चित्राकृतींची मूळचित्रे त्या वेळी छायाचित्रणावर आधारलेल्या मुद्रणपद्धतीचा प्रचार नसल्यामुळे हाताने काढलेली आहेत. ती तयार करण्यासाठी त्याने शाळेतील हुषार विद्यार्थ्यांची निवड केली होती. पण ती चित्रे करणाऱ्यांना हे एक साहेबाचे खूळ यापलीकडे मातब्बरी नव्हती. त्यांच्या दृष्टीने युरोपीय कला श्रेष्ठ होती आणि तिचा अभ्यास हेच त्यांचे ध्येय होते. या चित्रशाळेचा इतिहास आणि महाराष्ट्रीय चित्रकलेचा इतिहास यात एकरूपता आहे. बदल जे झाले ते बदलत्या युरोपीय, नव्हे, आंग्ल शाळाप्रमुखांच्या दृष्टिकोणामुळे.

ग्रिफिथ्स, कॅ. सॉलोमन या दोन शालाप्रमुखांना भारतीय कलेबद्दल आदर होता. विशेषतः कॅ. सॉलोमन यांनी भारतीय चित्रकलेच्या पुनरुत्थानाचे अतिशय प्रयत्न केले. पण तरीही बक्षिसे मिळतात म्हणून त्यांनी पुरस्कृत केलेल्या यथातथ्य पण समपातळीवर काढलेल्या चित्रणपद्धतीचा अवलंब अनेकांनी केला. कॅ. सॉलोमन १९३७ साली निवृत्त झाले आणि त्यानंतर आलेल्या चार्लस् जेरार्ड या प्रमुखाने प्रथमच युरोपात चाललेल्या कला-जगातील घडामोडींची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. त्यांची कारकीर्द १९४७ पर्यंत होती. ग्रिफिथ्सपासून ते शेवटच्या जेरार्ड या इंग्रज शाळाप्रमुखांच्या काळातही हयात असलेल्या चित्रकारांपैकी रा. ब. धुरंधरांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. त्यांच्या व नंतरच्या काळातील (म्हणजे आपल्या लेखाच्यासाठी ठरविलेल्या कालखंडातील) चित्रकारांची नावे सांगण्यापूर्वी या काळात महाराष्ट्रीय चित्रकलेत आणि चित्रकारांच्या परिस्थितीत झालेल्या बदलाबद्दल विचार करणे योग्य होईल.

परकीय व विशेषतः इंग्रजी कलाशिक्षणाचा व विचारांचा येथील चित्रकारावरील व कलेवरील पगडा ही एक सातत्याची सामान्य परिस्थिती होती हे मागेच सांगितले आहे. तीच परिस्थिती पुढेही चालू आहे असे म्हणावयास हवे. पण असे परकीय संस्कार केवळ शालाप्रमुखाकडून येण्याऐवजी परदेशातील वा येथील इतर परकीयांच्या प्रत्यक्ष संपर्काने ते आले. अर्थात एका दृष्टीने हा मोठाच बदल आहे. मध्यस्थाच्या शिळ्या कलाविचारांऐवजी प्रत्यक्ष युरोपात जाऊनच तेथील विचारांची ओळख करून घेतली गेली. अर्थात असे नवेविचार आत्मसात करताना सर्वच व्यक्तींकडून तारतम्य राखले गेले असे म्हणता येणार नाही.

मागील काळात उच्च कलाशिक्षण घेण्यासाठी इंग्लंड युरोपमध्ये अनेक लोक गेले असले तरी त्यांतून फारच थोडे असे निघाले की, ज्यानी परत आल्यावर स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार दाखविला. बहुतेकांनी तेथील पदविका किंवा पदव्या मिळविल्या.

पण स्वातंत्र्यानंतर येथील अनेक हुषार विद्यार्थ्यांना निरनिराळ्या युरोपीय आणि अमेरिकन देशांत जाण्याची संधी मिळाली. निरनिराळ्या देशांच्या वकिलाती स्थापन झाल्या होत्या आणि त्या त्या देशातर्फे सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली होती त्याचा

या काळातील चित्रकारांना फायदा मिळाला व आजही मिळत आहे. काहींना जास्त काळ राहून शिकण्याची संधी मिळाली तर काहींना काही ठराविक काळ भेट देण्याची संधी मिळाली. पूर्वीच्या मानाने परदेशी जाणे हे अतिशय सुलभ झाले आणि त्याचा फायदाही अनेकांना विशेषतः तरुण चित्रकारांना मिळाला.

चित्रशालेत जेरार्डने नवविचारांची ओळख अगोदरच करून दिली होती. यामुळे व प्रवासाने मिळालेल्या अनुभवामुळे येथील चित्रकाराची कला प्रयोगशील झाली. अर्थात सर्व प्रयोगामागे परकीय प्रयोगांचे अधिष्ठान होते. परकीय स्फूर्तीचे सूत्र वर्षानुवर्षांपासून आजवर चालूच आहे.

जेरार्ड यांच्या कारकीर्दीत, व्यापारी आणि उपयोजित कलाशिक्षणाला सुसूत्र वळण लागले. या प्रकारच्या दैनंदिन व्यवहारासाठी व देशातील औद्योगिक क्रांतीमुळे, त्यांच्या प्रसिद्धीसाठी कलेचा अतिशय उपयोग असल्याने त्याचा अभ्यास केलेल्या अनेक चित्रकारांना स्वतःचा व्यवसाय करणे किंवा चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळविणे शक्य झाले.

परकीय वकिलाती आणि भारतात येणाऱ्या परकीयांच्यामुळे चित्रकारांना त्यांच्या चित्रासाठी भरपूर मोबदला देणारी गिऱ्हाइकेही मिळाली. चित्रकार हा स्वतंत्र व्यवसाय करू लागला. यापूर्वी चित्रकाराला वार्षिक प्रदर्शनात चित्रे विकून मिळणाऱ्या व बक्षिसाच्या तुटपुंज्या उत्पन्नावर व कलाशिक्षक म्हणून किंवा छायाचित्रकार म्हणून काही जोड व्यवसाय करून आपला निर्वाह करावा लागे. पूर्वीच्या काळात हळदणकरासारख्या काही थोड्याच चित्रकारांनी चित्रकलेचा स्वतंत्र व्यवसाय केला, ती परिस्थिती अजिबात बदलली. आपापल्या चित्रांचे व्यक्तिगत प्रदर्शन करण्याची प्रथाही रूढ झाली, आणि अशा प्रदर्शनामुळे प्रत्येक कलाकाराची खास रसिकग्राहकांशी ओळखही झाली.

परदेशाशी संबंध वाढल्यामुळे, भारतेतर देशांत प्रदर्शन भरविणे शक्य झाले. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात नाव मिळविण्याची संधी याच पिढीतील चित्रकारांना मिळाली. अशी संधी पूर्वीच्या चित्रकारांना क्वचित मिळे.

ललित कला अकादमीच्या स्थापनेमुळे भारतातील सर्वच कलाकारांना उत्तेजन मिळाले.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलासंग्रहालयाकडून होणाऱ्या चित्रखरेदीमुळेही चित्रकारांना उत्तेजन मिळू लागले.

टेलिफोन, घर, मोटर वगैरे असणारे आणि स्वतंत्र व केवळ चित्रकार म्हणून व्यवसाय करणारे चित्रकार याच काळात आढळतात.

निरनिराळ्या येणाऱ्या कलाविचारांमुळे, कलाविषयक विचारांचे प्रमुखत्व चित्रशाळेकडे राहिले नाही हेही या काळाचे वैशिष्ट्य मानता येईल.

चित्रकलाविषयक समीक्षालेखन आणि चित्रकारावरील निघालेल्या खास पुस्तिका, याही गोष्टी याच काळातील नावीन्य मानावयास हव्यात.

यानंतर शेवटी या काळातील काही चित्रकारांचा पिढीगणिक उल्लेख करणे रास्त होईल.

जेरार्ड यांच्या कारकीर्दीतील अनेक विद्यार्थी, आज कलाप्रांतात नामवंत झालेले आहेत. हेब्बार, गायतोंडे, लक्ष्मण पै, रझा सुझा, कुलकर्णी, पळशीकर, साबावाला, सामंत, रेड्डी वगैरेंनी भारतातच नव्हे तर इतरत्रही नाव मिळविले आहे. पण त्यांच्या कलाकृतीत भारतीय वा महाराष्ट्रीय भाग अंशत्वे आणि विषयत्वानेच आहे. चित्रणपद्धतीचा आविष्कार युरोपीय म्हणा वा आंतरराष्ट्रीय म्हणा, असाच आहे. कॅ. सॉलोमन यांच्या कारकीर्दीतील नगरकर, चिमुलकर हे दिवंगत व भोसुले, अहिवाशी, धोपेश्वरकर, देऊसकर (रॉयल अॅकेदमीत चित्र लावणारे), आचरेकर, चावडा, माधव सातवळेकर वगैरे आजमितीसही प्रसिद्ध आहेत. पण त्यांच्या आणि आताच्या पिढीतील चित्रकारांच्या दृष्टिकोणातील भिन्नत्व वाढतच आहे. त्यातल्या त्यात चावडा वगैरे थोडेसे सद्यःकालीन आंतरराष्ट्रीय पद्धतीचे मानावयास हरकत नाही. जुन्या-नव्याचे निरंतरचे वाद आजही चालू आहेत आणि ते तसेच पुढेही चालणार. जेरार्डसाहेबांच्या नंतरच्या काळातील चित्रकारांत साडवेलकर, बी. प्रभा, प्रफुल्ल जोशी, कदम, बरवे, तन्ना वगैरेंचा उल्लेख करणे रास्त होईल. त्यांच्याही चित्रकलेवर युरोपीय आधुनिकतेचा खासच पगडा आहे.

मुंबईच्या कला विद्यालयाशिवाय बडोद्याचे कलाविद्यालयही या काळातील चित्रकारांचे स्फूर्तिस्थान आहे. अमेरिकन नमुन्यावर सुरू झालेल्या या विद्यालयातून अर्थात अद्ययावत कलेचाच पाठपुरावा झाला यात नवल नाही. या विद्यालयाला बेंद्रे या प्रयोगशील चित्रकाराचे नेतृत्व लाभले. या कलाविद्यालयातील अनेक चित्रकारांपैकी श्रीमती डोंगरे यांचा प्रस्तुत संदर्भात उल्लेख करणे जरूर आहे.

मुंबईच्या शाळेशी प्रत्यक्ष संबंध नसलेलेही चित्रकार आहेत. त्यांपैकी एम्. एफ्. हुसेन व बेंद्रे यांनी आंतरराष्ट्रीय स्थान मिळविले आहे. अलमेलकर व आरा यांची नावेही याच संदर्भात सांगता येतील.

मुंबईच्या चित्रशाळेशिवाय महाराष्ट्रात इतर ठिकाणीही चित्रशाळा निघाल्या आहेत. पण सरकारी परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करण्यावर त्यांचा भर जास्त आहे.

खाजगी चित्रप्रदर्शनगृहांमुळे नव्या नव्या चित्रकारांना आपली चित्रे लोकांपुढे मांडणे शक्य झाले आहे. पूर्वीच्या मानाने आजचा महाराष्ट्रीय चित्रकार जास्त मानाने जगत आहे.

पण इतके सर्व असले तरीही आजच्या चित्रकलेवर मागच्याप्रमाणेच या ना त्या परकीय कलापद्धतीची छाप आहेच. पण आजच्या या संधियुगानंतर खास महाराष्ट्रीय वळणाची कला अस्तित्वात येईल अशी आशा मात्र खासच उत्पन्न झाली आहे.

महाराष्ट्रातील कला, कलावंत आणि कलाशिक्षण

संभाजी कदम

मराठी अस्मितेचा दृश्यकलांशी जरूर संबंध आहे, पण तो फार वेगळ्या प्रकारचा. अठराशे सत्तावन्नच्या क्रांतिसालीच महाराष्ट्रात कलाशिक्षणाची पद्धतशीर सुरुवात सर जे. जे. स्कूलमध्ये झाली. या संस्थेमधून शिकून बाहेर पडलेले चित्रकार, शिल्पकार प्रत्येक पिढीमध्ये आपापल्या क्षेत्रात आघाडीवर आहेत. अलीकडील पंधरा-वीस वर्षांत तर मराठी कलावंत जागतिक कीर्ती मिळवू लागले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या दृश्य-कलांमधील डिप्लोमा परीक्षांना आजही भारतभर व बाहेर प्रतिष्ठा आहे. महाराष्ट्रातील चित्रकलेच्या साध्या प्राथमिक ग्रेड परीक्षा भारतभर लोकप्रिय आहेत. या ग्रेड परीक्षांची बिरुदे पदवीसारखी लावल्याची उदाहरणे उत्तर भारतात बरीच सापडतात. बॉंबे आर्ट सोसायटीसारखी कलावंतांची संस्था पाऊणशेहून अधिक वर्षे मुंबईत कार्य करीत आहे. स्वातंत्र्योत्तरकलात एक कलाकेंद्र म्हणून दिल्लीला बरेच महत्त्व आले आहे. पण गेली पाऊणशेहून अधिक वर्षे भारतातील मुख्य कलाकेंद्र मुंबई हे होते; आणि याशिवाय छोटी कलाकेंद्रे महाराष्ट्रातील इतर अनेक शहरांतून आहेत. आजही ते सर्वांत मुख्य कलाकेंद्र आहे. एकट्या मुंबईत आज सात-आठ प्रदर्शनालये आहेत आणि त्यात दर आठवड्याला एक प्रदर्शन भरत असते. कलावंतांना लागणाऱ्या रंग वगैरे साहित्याचा कारखानाही भारतातील महाराष्ट्रात प्रथम निघाला आणि ऊर्जितावस्थेस आला आहे. एकाग्रतेने निवळ कलेला वाहून घेणाऱ्या कलावंतापासून अगदी पुस्तकांची सजावट करणाऱ्या उपयुक्त कलावंतांपर्यंत, उच्च कलाशिक्षण देणाऱ्या प्राध्यापकां-पासून अगदी प्राथमिक शिक्षण देणाऱ्या कलाशिक्षकांपर्यंत सर्व पातळ्यांवर महाराष्ट्रातील कलावंत मनापासून काम करीत आहे असे म्हणता येईल.

मराठी माणसाला रास्त अभिमान वाटण्यासारखीच ही स्थिती आहे. पण कला-रसिकता आणि कलाश्रय यामध्ये समाजाने काही सक्रिय वाटा उचलावयाचा असतो हे

एकदा मान्य केले तर मात्र मराठी समाजाची पात्रता उणी पडते, हे स्पष्ट आहे. महाराष्ट्रातील कलावंतांना आश्रय व उत्तेजन मुख्यतः मिळाले ते महाराष्ट्रीयेतरांकडून आणि विशेषतः पाश्चत्त्य रसिकांकडून. स्वातंत्र्यपूर्वकाळात काही चित्रकारांना मराठी संस्थानिकांकडून आश्रय मिळाला. पण काही चित्रे-शिल्पे विकत घेणे अगर कोणाला शिष्यवृत्ती देणे एवढीच त्याची मर्यादा होती. एखाद्या दर्जेदार कलावंताला आपल्या पदरी कायम ठेवून त्याच्याकडून शिष्यपरंपरा निर्माण व्हावी अशा उद्देशाने कोणत्याही संस्थानिकाने किंवा मराठी माणसांच्या एखाद्या संस्थेने प्रयत्न केलेला नाही. नाही म्हणायला औंध हे एकुलते एक चिमुकले संस्थान याला अपवाद आहे. तिथे काही चित्रकारांना पदरी बाळगून त्यांच्याकडून विद्यादानाचा प्रयत्न झाला. सातवळेकर पितापुत्र या दोन्ही कलावंतांना औंधकडून उत्तेजन मिळाले. स्वतः चित्रकार असलेल्या औंधच्या कै. बाळासाहेब पंतप्रतिनिधींना याचे श्रेय जाते. त्यांच्या स्मरणार्थ, दृश्यकलांवरील व्याख्यानांसाठी मराठी साहित्य परिषदेला एक देणगीही चालू आहे. पण उभ्या महाराष्ट्राच्या मानाने हा प्रयत्न इतका अल्प होता की, त्याच्या उल्लेखाने महाराष्ट्राच्या कलाश्रयाची प्रतिष्ठा यत्किंचितही वाढत नाही. आबालाल रहिमान हा त्याच्या काळातील अवलिया चित्रकार कोल्हापूर संस्थानचा पगारी नोकर होता. पण तो केवळ एक ‘ ड्रॉइंग टीचर ’ म्हणून. मेणवलीच्या नाना फडणिसाच्या वाड्यातील भित्तिचित्रे, हा एक अपवाद वगळल्यास पेशवाईतील चित्रकलेच्या राजाश्रयाचेही ठळक उदाहरण ऐकिवात नाही. महाराष्ट्रात पूर्वीच्या काळी लोककला ऊर्जितावस्थेत असाव्यात. त्यांतील जिनगरांच्या गंजिफा, बाहुल्या वगैरे गोष्टी आज फक्त आठवणीत जमा आहेत. दिवाळीतील रांगोळ्या हा लोककलांचा एकुलता एक अवशेष अजूनही आहे. इंग्रजी संस्कृती आल्यावर मराठी माणसाने त्यातील बाह्य गोष्टींचा इतक्या तातडीने स्वीकार केला की, आपल्या संस्कृतीशी एकजीव झालेली लोककला या शतकाच्या सुरुवातीसच नामशेष होत गेली. अगदी नेहमीच्या वापरातील साड्या-कपड्यांच्या डिझाईनचा विचार केला तरी रंग-आकार-अलंकरणाच्या बाबतीतले पाश्चात्त्य दंडक सुशिक्षित मराठी वर्गाने ताबडतोब उचलले. स्वातंत्र्य-चळवळीबरोबर देशाभिमान उफाळून आला; पण इंग्रजी आदर्श आधीच डोक्यात बसले होते. त्यात पुन्हा समाजसुधारकांनी साधेपणाच्या राहणीचा पुरस्कार केला. त्यातून साधी राहणी कितपत अंगी बाणली कोणास ठाऊक, पण जीवनाकडे कलात्मक दृष्टीने पाहण्याची वृत्तीमात्र मरत गेली. सर्वसाधारण मराठी रसिकाने काव्यसंमेलने गाजविली, मैफली रंगविल्या, कुस्त्यांचे फड दृष्टी फाटेपर्यंत पाहिले, मासिके उदंड जगविली आणि मारली. मराठी संस्थानिकांनी गवई, विद्वान, पेहेलवान आणि त्यांच्या परंपरा पोसल्या; पण दृश्यकलांच्या बाबतीतली मराठी माणसाची उत्सुकता मात्र नगण्य आहे. मुंबईमधील प्रदर्शनालयांपैकी ‘ ओयासिस ’ हे प्रदर्शनालय सोडल्यास बाकीची सर्व महाराष्ट्रीयेतरांनी चालविली आहेत; आणि ती महाराष्ट्रीयेतरांच्या आश्रयावर चालली आहेत. दृश्यकलांच्या भरघोस कार्यक्रमांनी गजबजलेल्या मुंबई-

सारख्या शहरातही आठवड्यातून एखादे तरी प्रदर्शन आपण पाहिलेच पाहिजे अशी उत्कंठा कितीशा महाराष्ट्रीय लोकांना आहे ?

चित्रकलेला किंवा त्यातील कलापरंपरांना संस्थानिकांचा आश्रय मिळाला नाही, याला तशी काही कारणेही आहेत. अव्वल ब्रिटिश काळात, ब्रिटिशांची सत्ता स्थिरावते आहे एवढ्यातच चित्रकलेच्या पद्धतशीर शिक्षणाची सुरुवात मुंबईत सरकारी पुढाकाराने झाली. सर जमशेटजी जिजीभाई आणि नाना शंकरशेठ यांच्या आग्रहामुळे आणि सक्रिय हातभारामुळे सरकारने हे काम अंगावर घेतले. भारतीय (नेटिव्ह) कारागीर कलावंतांमधील गुणांची जोपासना व्हावी व त्यांना पाश्चात्त्यांचे मार्गदर्शन व्हावे हा यातील उद्देश. त्यामुळे, संस्थेचा प्रमुख म्हणून कोणीतरी पाश्चात्त्य तज्ज्ञच नेमला जावा ही स्वतः जमशेटजींनी घातलेली अट आज विचित्र वाटली तरी ब्रिटिशांचे सर्वच आदर्श स्वीकारण्याच्या त्या काळात ती योग्य होती. अशा रीतीने कलाशिक्षणाच्या सुरुवातीलाच ब्रिटिशांच्या कला-जाणिवेचे वर्चस्व प्रस्थापित झाले. या संस्थेने उभ्या भारतात प्रथमच मोठ्या प्रमाणावर कार्य आरंभिलेले असल्यामुळे संस्थानिकांनी किंवा इतरांनी आश्रय देण्याने त्याहून अधिक काही घडले नसते. या संस्थेतून शिकून निघालेल्या कलावंतांनी संस्थानिकांच्या आश्रयाने आपापली शिष्यपरंपरा निर्माण करण्याचे ठरविले असते तरीही जे. जे. स्कूलमध्ये उपलब्ध असलेली शैक्षणिक परिस्थिती व सोयी त्यांना तेथे निर्माण करता आल्या नसत्या. शिवाय कलाजाणिवेचे आदर्श त्या काळी जे. जे. स्कूलचेच होते; आणि त्यापलीकडची दृष्टीची झेप पाश्चात्त्यांचे वर्चस्व मान्य करणाऱ्या कोणाही कलावंताला घेता आली नसती. कोणतीही कला-जाणीव नव्याने भारतात यायची तर ती प्रथम सर जे. जे. स्कूलमध्ये आणि नंतर इतरत्र पसरायची. एक तर स्कूलच्या प्रमुखांच्या मुखाने किंवा तेथील शिक्षक-विद्यार्थी याच्या चळवळीने. या संस्थेची विद्यार्थि-परंपरा आज भारतभर व इतरत्रही पसरली आहे. बडोद्याची वेगळी परंपरा प्रस्थापित करणारे चित्रकार बेंद्रे हे प्रत्यक्ष जे. जे. चे विद्यार्थी नसले तरी जे. जे. च्याच देवळालीकरांचे ते विद्यार्थी. मुंबई सरकारचा डिप्लोमा हा जे. जे. स्कूलचा डिप्लोमा मानला जात होता. त्या काळी तो डिप्लोमा घेतलेले बेंद्रे हे मुंबई परंपरेचे एक चित्रकार मानले जात. जे. जे. स्कूलच्या ऐवजी पुढे बॉम्बे स्कूल असा शब्दप्रयोग या परंपरेसाठी वापरला जाऊ लागला. नव्या सर्व विचारधारांची मुळे मुंबईतून नंतर इतरत्र पसरत. कधी प्रथम जे. जे. मध्ये तर कधी जे. जे. मधून बाहेर पडलेल्या मुंबई परंपरेच्या चित्रकारांमध्ये. यात जे. जे. स्कूलचा अग्रक्रम की मुंबईतील इतर कलावंतांचा, याचा निर्णय करणे कठीण जावे इतके हे अभिसरण एकमेकांवर परिणाम करणारे ठरत आले आहे.

तपशीलवार पाहिले तर असे दिसेल की, आधीची पाश्चात्त्य शैली प्रथम जे. जे-मधून प्रतिष्ठा पावली व इतत्र पसरली. पुढे स्वातंत्र्यचळवळीबरोबरच वाढीला लागलेली भारतीय शैलीचे पुनरुज्जीवन करण्याची चळवळ बंगाल व मुंबईमध्ये एकदमच फोफावली.

जे. जे. स्कूलमधील त्या काळचा डायरेक्टर कॅ. सॉलोमन हा इंग्रज गृहस्थ भारतीय शैलीच्या पुनरुज्जीवन चळवळीचा उद्‌गाता व आधारस्तंभ होता हा एक विलक्षण योगायोग म्हणावा लागेल. आधीच्या वास्तववाद्यांचे या शैलीशी जुळले नाही आणि भारतीय शैलीच्या पुरस्कर्त्यांचे पुढील आधुनिकतेशी जुळले नाही. जेरार्ड डायरेक्टर असताना जे. जे. स्कूलमध्ये आधुनिकतेची पावले उमटू लागली, पण ती अडखळतच. अमृता शेर गील या पहिल्या आधुनिक भारतीय चित्रकर्त्रीला बाँबे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक मिळाले त्या वेळी सॉलोमन डायरेक्टर होते. ही चित्रकर्त्री मात्र जे. जे. स्कूल ऐवजी परदेशात शिकलेली. पाश्चात्त्य चित्रकार गोगँ यांची रंगदृष्टी आत्मसात करून तिने स्वतःची अशी आधुनिक भारतीय शैली घडविली होती. अमृता शेर गीलमधील गुणवत्ता जे. जे. स्कूल आणि मुंबईचे कलावंत यांनी तात्काळ आपलीशी केली. यातून खरी आधुनिकतेची सुरुवात झाली. यात आधुनिक विचारधारांची तितकीशी स्पष्ट जाणीव सुरुवातीला नव्हती, आणि जुन्या भारतीय पुनरुत्थानवाद्यांची शक्तीसुद्धा सहजी मागे न हटण्याइतकी जबरदस्त होती. आपापल्या परीने पदरी अमाप श्रेय बाळगलेली आहिवासी, भोसले, नगरकर यांसारखी मातबर मंडळी त्या वेळी या संस्थेत होती, आणि त्यांच्याशी संघर्ष करणारे नवे हे त्यांचे विद्यार्थी म्हणून उभे होते. आधीच्या पुनरुत्थानवादी पिढीला सॉलोमन यांची स्पष्ट दृष्टी आणि सश्रद्ध समर्पित वृत्ती मार्गदर्शक म्हणून उभी होती. त्यांची सर नव्यांना प्रोत्साहन देणाऱ्या जेरार्ड यांना नव्हती. त्यामुळे तर मुंबईतील आधुनिकतेच्या वाटचालीला वेगळे महत्त्व येते. नव्या मंडळींपैकी पळशीकर, सडवेलकर यांसारख्यांनी आपल्या जुन्या परंपरेच्या शिक्षकांचे त्यांच्या आदर्शानुसार प्रथम समाधान केले आणि त्याच वेळी आधुनिकतेच्या विचारधारा पुढे रेटीत नेल्या. म्हणजे असे : त्यांनी तथाकथित वास्तववादी किंवा भारतीय चित्रपद्धतीमध्ये बिनतोड प्रावीण्य तर मिळविलेच, पण त्याच वेळी आधुनिकतेची बंडखोरी चालू ठेवली. त्यामुळे जुन्या मताच्या त्यांच्या शिक्षकांना तक्रार करण्यास जागा नव्हती. ज्या नव्यांनी जुन्याचा मुळातच अव्हेर केला त्यांचे जुन्यांशी कधी पटणे शक्य नव्हते. पण जे नवे जुन्याला पुरून उरले त्यांच्याशी कितीही मतभेद झाला तरी संस्थेने त्यांना आपल्यामध्ये सामावून घेतले; आणि या संस्थेतील शिक्षणपद्धतीत नवीन दृष्टी आणण्याच्या जिद्दीने हे नवे या संस्थेमध्ये ठाम उभे राहिले. मुंबईमध्ये व सर जे. जे. स्कूलमध्ये जुन्या-नव्यांचा असा संघर्ष झाला. जुन्यातील चांगले तेवढे फक्त टिकले. नव्यातील चांगले तेवढे कसून पारखून घेतले गेले, आणि संघर्षातही अखंड वाटचाल चालू राहिली. कलेच्या आणि संस्कृतीच्या इतिहासात असे संघर्ष नेहमी चालू राहावयाचे असतात. संस्कृतीच्या जिवंतपणाचे ते लक्षण असते आणि संघर्ष चालू असूनही नवे व जुने ज्या संस्थांमध्ये एकत्र जगतात त्यांचा वाटा संस्कृतीच्या इतिहासात महत्त्वाचा ठरतो. महाराष्ट्रातील कलाशिक्षणाचा विचार जे. जे. वगळून होऊ शकत नाही तो यामुळेच.

या सर्व वाटचालीत मराठी समाज व मराठी संस्था यांचा उल्लेखही करता येऊ नये इतकी मराठी माणसाची कलारसिकता आणि उत्सुकता नगण्य आहे. या काळात जी जी उलथापालथ झाली, मंथन घडले त्यापासून मराठी समाज दूरच राहिला. कोणतीही साहित्यिक चळवळ झाली की मराठी समाजातील काही एक जागृत वर्ग तरी त्याच्या बाजूने किंवा विरुद्ध अहमहमिकेने उठतो. संगीताच्या घराण्याघराण्यांतील वादांच्या उष्टावळी चव्हाट्यावर व घराघरांतून एकदमच चालत आल्या आहेत. पण दृश्यकलांमध्ये सतत पन्नास वर्षे जी स्थित्यंतरे होत गेली त्यांची मर्यादा कलावंत, कला-शिक्षक, विद्यार्थी आणि महाराष्ट्रीयेतर आश्रयदाते एवढीच होती. भारतीय शैलीमध्ये रमलेले भोसलेमास्तर हे स्वतः थोर व्यक्तिचित्रणकार होते. त्यांची रंगविलेपनपद्धती आणि एकूण कलादृष्टी काळाला इतकी भेदून जाणारी होती की, आधुनिकांनाही चित्रकार म्हणून त्यांची श्रेष्ठता मान्य करावी लागते. पण प्रत्यक्ष भोसलेमास्तरांच्या काळात त्यांची योग्यता मराठी समाजाला कितीशी कळली ? दिसते त्याबरहुकूम फोटोसारखी आखीव चित्रे यांत्रिकपणे रंगविणाऱ्या सुमार दर्जाच्या चित्रकारांना महाराष्ट्रात जेवढा राजाश्रय मिळाला आणि त्यांचा बोलबाला झाला त्याच्या दशांशानेही तो भोसलेमास्तरांच्या वाट्याला आला नाही. बरेच तेल आणि टर्पेंटाईन ओतून कॅन्व्हासवर रंगांचे धुवण लावण्याची प्रथा सर्वमान्य होती त्या काळात भोसलेमास्तरांच्या भारावलेल्या कुंचल्याने लावलेला जिवंत टवटवीत रंग त्या काळी कोणाला कळलाच नाही. आज तो कळला तरी तथाकथित वास्तववादी शैली मोडीत निघाल्याचा गैरसमज करून घेणाऱ्या तथा-कथित आधुनिकांना त्याबद्दल मोकळेपणाने बोलावेसे वाटत नाही. भोसलेमास्तरांच्या जाड रंग लावण्याच्या पद्धतीवर त्या वेळच्या मराठी वर्तमानपत्रांतून "जाड रंग लावल्याने काही तिलोत्तमा निर्माण होत नाही." अशी टीका येत असे, असे म्हणतात. त्याउलट निवळ स्मरणचित्रांच्या पातळीवरची, ज्यात रंगाचा उपयोग निव्वळ रेखना-साठी केलेला आहे पण विषयांची मात्र विविधता आहे अशी धुरंधरांची सुमार दर्जाची चित्रे महाराष्ट्रीय समाजाने त्या काळी डोक्यावर घेतली. त्रिंदादांसारख्या त्याच पिढीच्या श्रेष्ठ चित्रकाराला जे. जे. स्कूलमध्ये स्थान आणि संस्थानिकांचा आश्रय कशा प्रकारचा मिळाला तेही पाहण्यासारखे आहे. चित्रकला विभागाचा अग्रेसर ठरण्याचा मान वास्तविक त्यांना मिळायचा. त्याऐवजी कारागिरी विभागाचे प्रमुखपद त्यांच्या माथी बसले; आणि संस्थानिकांकडून त्यांना आश्रय मिळाला तो पाश्चात्त्य चित्रकारांकडून आधीच करून घेतलेल्या व्यक्तिचित्रावर शेवटचा हात फिरवून घेण्यासाठी त्रिंदाद हवे होते म्हणून ! पाश्चात्त्य चित्रकारांना इतर सर्व जमे. पण भारतीय संस्थानिकांचा (काला आदमी) वर्ण रंगविण्यासाठी त्यांच्या रंगपात्रात रंगच नसे. इतकी वेळ येत असे. त्रिंदादावाचून अडून बसे. पण प्रत्यक्ष कामे मात्र त्रिंदादांना मिळाली नाहीत. आगास्कर हे असेच त्या काळातले श्रेष्ठ पण सर्वस्वी उपेक्षित चित्रकार. श्रेष्ठ असूनही महाराष्ट्रात सर्वतोमुखी होणारे करमरकर हे एकच भाग्यवंत शिल्प कलावंत.

आजही महाराष्ट्रातील कलावंत व कलाशिक्षण भारतात पुढारलेले आहे. कलाशिक्षणातील नवे-जुने साधक-बाधक याचा विचार कलावंत करीत आहेत. शासनाच्या पाठिंब्याने नव्या शिक्षणक्रमांची आखणी होत आहे. कलाजाणीव व कलाशिक्षणातील गुणा-उणिवांची चर्चा फक्त कलावंतांपुरतीच मर्यादित राहावी आणि समाजाने मात्र 'काहीच झाले नाही' अशा उदासीन वृत्तीने तिकडे पाठ फिरवून बसावे ही परिस्थिती समाजाला भूषणावह नाही. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी, किंवा अधिक अचूक बोलायचे तर 'पोटासाठी' कलेचा उपयोग काय म्हणून? उदासीन राहणारा समाज आपल्या सांस्कृतिक ज्येष्ठतेचा अभिमान कसा बाळगू शकतो? पोटाचा उद्योग म्हणून पाहिले तरीही मराठी समाजाची मजल कारकुनी किंवा शिक्षकी-प्राध्यापकी पेशापलीकडे, क्वचितच जाते; आणि आर्थिक पाठबळ नसल्यामुळे कलाश्रय देणे त्याच्या आवाक्याबाहेर राहते. असे हे दुष्ट चक्र आहे. आर्थिक आश्रयाची अपेक्षा बाजूला ठेविली तरी निदान द्रव्यनिरपेक्ष रसिकता आम्ही कितीशी अंगी बाणविली आहे. एक रुपयापासून दहापंधरा रुपयांची गाण्याची तिकिटे घेऊन मराठी रसिक मैफलीला जाऊ शकतो. संस्थानिकांचा आश्रय मागे पडण्यापूर्वीच त्याने संगीतातील कलावंतांच्या आश्रयाची जबाबदारी स्वखुशीने अंगावर घेतली. पण तेच एखादे चित्रकलेचे प्रदर्शन विनामूल्य असून मराठी रसिक किती उत्सुकतेने पाहतो? एखादे चित्र विकत घ्यायचे तर त्यासाठी शेकड्यांनी रुपये मोजावे लागतात आणि ते सर्वसामान्य मराठी माणसाच्या आवाक्याबाहेरचे आहे हे खरे. पण मराठी माणसाच्या सार्वजनिक संस्था, साहित्यसंस्था, थोडे असले तरी मराठी उद्योगपती व उद्योगकेंद्रे आणि मराठी धनिकांचे व सुखवस्तू सामाजिकांचे बंगले यांत कलेला वाटा किती मिळतो याची मोजदाद करायची झाली तर महाराष्ट्राच्या आर्थिक दैन्यापेक्षाही त्याचे सांस्कृतिक दैन्य उघडे पडण्याची धास्ती अधिक. पूर्वीच्या काळी गाण्या-वादनाच्या मैफली संस्थानिक व धनिकांच्या घरीच होत. तिकिटावर मैफल हा प्रकार माहीत नव्हता, पण जागृत संगीत रसिकांनी तिकिटावर मैफलींची प्रथा पाडली आणि संस्थानिक धनिकांच्या आश्रयाची गरज संगीतकारांना उरली नाही. जे संगीताच्या क्षेत्रात झाले तेच चित्रकलेच्या क्षेत्रात होऊ शकले असते, पण त्यासाठी जागृत असा रसिकवर्गच महाराष्ट्रात निर्माण झाला नाही.

याचा कलावंतांकडेही बराच दोष जातो. आधीच्या पिढीतील कलावंत संस्थानिकांच्या आश्रयावरच जगले. इतर समाजाकडे पाहण्याची त्यांना गरज नव्हती, आणि स्वतःचे सर्वसाधारण शिक्षण कमी असल्यामुळे समाजातील सुसंस्कृत वर्गाशी बरोबरीच्या नात्याने वागण्याइतका आत्मविश्वासही त्यांना नव्हता. "चित्रकाराने फक्त हाताने काम करायचे असते. बोलायचे नसते." ही त्याची मनोवृत्ती या न्यूनगंडातून निर्माण झाली होती. संगीतातील घराण्यांच्या अभिमानामुळे समाजात सर्वदूर पोहोचून रसिकांचे गट आपापल्या मागे उभे करण्याची गरज होती तशी ती जुन्या पिढीच्या चित्रकार-शिल्प-

कारांना नव्हती. आधुनिकतेच्या लाटा आल्या तेव्हा तर सामाजिक संपर्काची शक्यता अधिकच दुरावली. जुना कलावंत अशिक्षित होता तर नवा कलावंत शैक्षणिक दृष्ट्या कमी नव्हता, उलट बहुश्रुत होता. तो सर्वच जुन्याविरुद्ध झगडा देण्यासाठी उभा होता. मग रसिकतेत आधीच मागे असलेल्या समाजाशी संपर्क ठेवण्याची निकड त्याला का वाटावी ? ' मला वाटते-आवडते ते मी करतो ' एवढे एकदा बोलल्यानंतर, समाजाला आपल्या पातळीवर आणण्यासाठी अधिक काही करावयाचे शिल्लक राहिले आहे याची त्याला आठवणच नव्हती, अजूनही फारशी नाही. क्वचित त्याची जाणीव झाली तरी त्याची क्षिती त्यांनी बाळगली नाही. पाश्चात्त्य देशांत आधुनिकतेची एकेक लाट आली त्या वेळी तेथला समाज उसळून उठला. सर्वच जाणिवांचे स्तर ढवळून निघाले तसे येथे काहीच घडले नाही. कलावंत आणि समाज आपापला तथाकथित सांस्कृतिक अभिमान पोटाशी कवटाळून एकमेकांपासून दूरच राहिले.

स्वातंत्र्यानंतर आता शासनातर्फे अखिल भारतीय पातळीवर कलाश्रयासाठी प्रयत्न होऊ लागले आहेत. तेव्हा आतामात्र कलावंतांना काही प्रश्न नव्याने जाणवू लागले आहेत. लोकशाही शासनामधील कलाश्रयाबाबत संपूर्ण चोखंदळ व जागृत रसिकवृत्तीची अपेक्षा हे कलावंत कसे काय करू शकतात ? अशी अपेक्षा करायची व अपात्री दान होऊ नये याबद्दल हमी मागायची तर त्याच लोकशाहीतील लोकांमध्ये रसिकता बाणावी म्हणून आपण काय केले याची कलावंतांनी थोडी आठवण करावी. कलेबद्दल उदासीन असलेल्या समाजाने निवडून दिलेले शासक कलारसिक नसले तर ते अगदी स्वाभाविक आहे. पूर्वीच्या काळी समाजाने कलावंताला ' निरुपयोगी ' म्हणून उपेक्षिले ! (त्यामुळे बत्तीस साली सर जे. जे. स्कूल बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. स्कूलचे विद्यार्थी व चालक त्या वेळी खडबडून जागे झाले. त्यांनी समाजाला हाक दिली व निर्णय फिरवून घेतले. त्यानंतर मात्र त्यांना पुन्हा जाग आली नाही.) नंतरच्या आधुनिक कलावंताने समाजाला फक्त अज्ञान, अरसिक म्हणून हिणविले, त्याहून काही केले नाही. असे असताना त्याच समाजामधून निवडून आलेल्या शासकांची कलारसिकता चोखंदळ असावी अशी अपेक्षा करणे आडमुठपणाचे आहे. संगीताच्या क्षेत्रात रसिकवर्ग निर्माण होतो आणि तो संगीतविषयक प्रश्नांमध्ये सहभागी होतो. मग तेच दृश्यकलांच्या क्षेत्रात का होऊ नये ? संगीत लोकप्रिय होण्या-आधीचा काळ तर अधिकच प्रतिकूल परिस्थितीचा होता. संगीतकलावंतांच्या नैतिक पातळीसह सर्व काही शंकास्पद होते. पण पं. पलुस्कर, पं. भातखंडे, इचल-करंजीकर, बखले यांसारख्या धुरीणांनी आपल्या कर्तबगारीने व निष्ठेने समाजाच्या दृष्टिकोणात आमूलाग्र बदल घडवून आणला. त्याचीच फलश्रुती आज संगीतक्षेत्रात दिसत आहे. दृश्यकलांमधील कोणत्याही पिढीने अशा प्रकारचे कार्य हाती घेतले नाही. बॉंबे आर्ट सोसायटी या पाऊणशे वर्षे कार्य केलेल्या मान्यवर संस्थेनेही सोसायटीच्या वार्षिक प्रदर्शनाचा सोहळा गव्हर्नरांच्या अध्यक्षतेखाली थाटामाटाने घडवून आणण्या-

पलीकडे समाजाची रसिकता उंचावण्यासाठी काहीही केले नाही. पहिली पन्नासएक वर्षे सोसायटीच्या कार्यासाठी कायमची व सुयोग्य जागा नव्हती, ही एक सबब सांगता येईल. पण जहांगीर आर्ट गॅलरी एक्कावन्न साली पूर्ण झाली, कलाविषयक सर्व चळवळींचे ते केंद्र व्हावे ही अपेक्षा होती. निदान मुंबईच्या परिसरातील कलेची उत्सुकता असलेल्या समाजाला या केंद्राभोवती जमा करण्याच्या कार्यासाठी गेली वीस वर्षे पुरेशी होती. पण नव्या-जुन्यांच्या अंतर्गत भांडणात सोसायटी व गॅलरी या दोहींचीही दुरवस्था स्वतः कलावंतांनी केली. आज पुन्हा तेथे नवी मंडळी स्थानापन्न झाली आहे. पण आपली स्थाने जपण्यापलीकडे कलाजगतासाठी पोषक असे काही करण्याची आठवण आजही त्यांना क्वचितच होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात, आधुनिकतेचे वारे वाहू लागण्यापूर्वी कलाविषयक सर्व चळवळींची सूत्रे जे. जे. च्या डायरेक्टरांच्या हाती एकवटलेली असत. कॅ. सॉलोमन हे कलाजगाचे त्या वेळचे अनभिषिक्त राजे होते. त्यांचा समाजातील विद्वान, पुढारी व इतर प्रतिष्ठित मंडळींशी चांगला स्नेह असे. भारतीय शैलीचे पुनरुज्जीवन करण्याच्या त्यांच्या चळवळीमागे, येथील कलावंत व कला भारतीय जीवनाशी एकजीव व्हावी हा उद्देश होता. टॉमस कमिटीच्या शिफारशीनुसार सर जे. जे. स्कूल बंद व्हायची वेळ आली होती. पण सॉलोमन यांचा समाजसंपर्क असा दृढ असल्यामुळेच समाजातील विचारवंतांनी त्या धोरणाला विरोध करून स्कूल जगविले. सॉलोमननंतरचे जे. जे. स्कूल आधुनिकतेच्या लाटांखाली वाकून गेले. आधुनिक विचारांचा एवढा संघर्ष जुन्यांशी व आपसातही झाला पण आपापली भूमिका तर्कशुद्धपणे समाजातील कलोत्सुक वर्गासमोर मांडण्याचे प्रयत्न जुन्यांनी व नव्यांनीही फारसे केले नाहीत. जे झाले ते व्यक्तिगत उणे–दुणे काढण्यापुरते. एकीकडे बॉंबे आर्ट सोसायटीमधले कलावंत रसिकांबद्दल बेफिकीर राहिले आणि दुसरीकडे, विद्यार्थ्यांबरोबरच रसिक वर्गाला जागे करण्याची कामगिरी ज्या प्राध्यापकांची ते केवळ "आपले नम्र सरकारी नोकर" बनून स्थाने जपत राहिले. ब्रिटिश राजवटीत वाढलेल्या या प्राध्यापक मंडळींना कलेबद्दल स्वच्छ वाणीने बोलणे किंवा लिहिणे हा गुन्हा वाटत असे. कलाविषयक कोणत्याही योजनांसाठी शासकीय मदत लागणार हे स्वाभाविक. पण या शासकांना या योजनांचे महत्त्व व निकड पटावयाची तर मुळात जो समाज या शासकांना निवडून देतो त्या समाजाला कलेची मातब्बरी वाटावयास हवी. आपण मान्य केलेल्या योजनांतून भरलेली प्रदर्शने ही शासक मंडळी पाहतात आणि बिचकून जातात. त्यांना कळेल असे त्यात काही नसते आणि त्यांना कळावे अशी कोणाचीच उत्सुकता नसते. कलावंत आणि रसिक यांची फारकत असलेल्या समाजात हे स्वाभाविकच आहे.

या विवेचनाचा सारांश असा : कलाविचार आणि कलाशिक्षण यात आजवर जाणीवपूर्वक किंवा अजाणता, बदल झाले आहेत, हे खरे. पण यात रसिक व कलावंत यांचे जे परस्परावलंबी सहकार्य व्हावयास हवे होते ते झाले नाही. एकूण कलाविचारांचा माझ्या जीवनाशी संबंध काय, याची कल्पना सामाजाला नाही, आणि

कलेसाठी पोषक परिस्थिती निर्माण करावयाची तर समाजाचे आपण काय देणे व घेणे लागतो याची कल्पना कलावंताला नाही. कलाशिक्षणाची नवी आखणी सध्या होत आहे. अशा वेळी आजवर काय घडले. त्यात डावे उजवे किती; आणि जे काही नव्याने आणावयाचे त्याचा भारतातील आजच्या परिस्थितीशी कसा मेळ साधावयाचा याचा विचार व्हावयास हवा आणि त्यासाठी प्रथम उत्सुक समाज आणि कलावंत यामध्ये काही एक जवळीक व विश्वास निर्माण व्हावयास हवा. उदाहरणार्थ, छोट्या मुदतीचे व्यवहारात उपयोगी पडणारे अभ्यासक्रम समजा आखावयाचे आहेत, तर त्यासाठी प्रथम, ज्या समाजातून या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी यावयाचे व ज्या समाजामध्ये पुन्हा कार्य करण्यासाठी जावयाचे त्याच्या परिस्थितीची, मानसिक व बौद्धिक कुवतींची कल्पना योजकांना हवी. उलटपक्षी, या अभ्यासक्रमातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडल्यानंतर त्यांचा उपयोग आपणाला कोणत्या प्रकारे व्हावयाचा आहे याची कल्पना समाजाला आणि विविध पातळ्यांवर कार्य करणाऱ्या संस्थांना हवी. आज दोन्ही पक्षी परिस्थिती काहीशी संभ्रमाची दिसते. समाज आपल्याकडे काहीच मागत नाही, आपल्याशिवाय त्याचे काही विशेष अडत नाही, आपणच फक्त धडपडतो आहो, अशी रुखरुख योजक कलावंतांना वाटते, त्याउलट जे काही नव्याने होऊ घातले आहे त्याचा आपणाला उपयोग काय याबद्दल पालकवर्ग व समाज संभ्रमात आहे.

कला व कलाशिक्षण यांमध्ये बदल कशाप्रकारे होत गेले ते पाहणे येथे उद्‌बोधक ठरेल. तसे पाहता भारतीय शैलीच्या पुनरुज्जीवनास सुरुवात झाली त्याच्याही पूर्वीचा अभ्यासक्रमच अजून चालू आहे. आधुनिक काळाबरोबर त्यात बदल झाला नाही, व्हावयास हवा आहे हेही खरे आहे. त्या काळी आखलेला अभ्यासक्रम एका अर्थी ढोबळ होता आणि दुसऱ्या दृष्टीने तो लवचिक होता. त्यात व्यक्तिचित्रण, स्थिरचित्र, रचनाचित्र किंवा अलंकृती वगैरे विषयांची वर्गवारी होती, हे विषय शिकवायचे एवढे खरे. पण ते नेमके कशा प्रकारे शिकवायचे याबद्दल मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केलेली नव्हती. शिक्षक कलावंतांच्या मगदुराप्रमाणे शिकविले जायचे. व्यक्तिचित्र म्हटले तरी रेखन व्यवस्थित असावे ही प्राथमिक अट एकदा पुरी केली की ते जाड रंगांनी कुंचल्याच्या फटकाऱ्यातून सिद्ध व्हावे की अगदी यांत्रिक नितळपणा त्यांत असावा, या शैलीविषयक किंवा आदर्शविषयक मर्यादा त्यात अंतर्भूत नव्हत्या. कलेचा इतिहास आणि सौंदर्यशास्त्र हे विषय परीक्षेचे म्हणून अभ्यासक्रमात समाविष्ट नव्हते. पण त्यांचा व्यासंग शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी केल्यास त्याचा प्रत्यक्ष फायदा त्यांच्या कलाजाणिवेच्या दृष्टीने होण्यासारखा होता. जुन्या काळात 'कलावंताने बोलायचे नसते. फक्त हाताने काम करायचे असते' ही कल्पना रूढ असतानासुद्धा धोपेश्वरकरांसारखे शिक्षक स्वतःच्या विद्यार्थिदशेपासूनच 'चित्र आपणाला आवडते म्हणजे नेमके काय होते' यासारख्या प्रश्नांचा ऊहापोह आपल्यापरीने करीत. चांगले चित्र म्हणजे काय असा प्रश्न आला की जुन्या पाश्चात्त्य व पौर्वात्य कलाकृतींचे दाखले त्या वेळीही द्यावे लागत. मनापासून शिकवायचे

व शिकायत्रे म्हटले तर या गोष्टी आवश्यक होत्या. या चर्चा अगदी प्राथमिक पातळीवर किंवा अपुऱ्या होत असतील, पण त्या मुळातच नव्हत्या, असे म्हणणे मात्र अन्यायाचे होईल. उत्सुक विद्यार्थी आणि मनस्वी व मेहनती शिक्षक लाभत गेले त्या प्रमाणात प्रत्यक्ष अभ्यासक्रमात सक्तीचे म्हणून समाविष्ट नसलेल्या अशा अनेक विषयांचा अभ्यास वाढत गेला. एकोणीसशे पंचवीस, तीस, पस्तीस अशा पाच पाच वर्षांच्या अंतरातील डिप्लोमाची रचनाचित्रे नुसती पाहात गेल्यास, सुरुवातीला संपूर्ण वास्तववादी, त्यानंतर त्यात अजिंठा शैलीचे मिश्रण, कुठे बंगालशैलीचे पडसाद, त्यानंतर रजपूत-कांग्रा वळणाच्या शैली, त्यानंतर भारतीय शैलीचे आधुनिकीकरण, असे होत होत आताची संपूर्ण केवलचित्र शैली डिप्लोमा परीक्षेत दिसून येईल. पंचवीस-तीस सालांतील व्यक्तिचित्रे आणि आज हाताळलेली व्यक्तिचित्रे यांतही शैलीविषयक व गुणवत्ताविषयक आमूलाग्र बदल झालेला दिसून येईल. परीक्षा त्याच असल्या तरी कार्यप्रवृत्त शिक्षक, संवेदनाक्षम विद्यार्थी यांच्यामुळे हा बदल झाला व बदलत्या परीक्षकांनाही त्याला मान्यता द्यावी लागली. जे. जे. स्कूलसारख्या संस्थेत आता स्लाईड्स्-पुस्तकांच्या आधारे कलेच्या इतिहासाचा अभ्यास करवून घेतला जातो. सौंदर्यशास्त्रातील मूलभूत प्रश्न ओघाओघात पण विद्यार्थ्यांना पेलेल अशा प्रकाराने चर्चिले जातात. विद्यार्थ्यांची याविषयीची उत्सुकताही आता वाढू लागली असल्याने त्यांचा खल केल्याशिवाय खऱ्या शिक्षकाला समाधान लाभणे शक्य नसते. तसे पाहिले तर आरेखन (Graphic) हा विषय अभ्यासक्रमात नाही. (या विषयाचा बोलबालाही आता होऊ लागला आहे.) पण गोंधळेकर डीन होते तेव्हा म्हणजे पंधरा एक वर्षांपूर्वीच एक पूरक विषय म्हणून आरेखन माध्यमाचा अभ्यास त्यांनी समाविष्ट केला.

पूर्वीच्या काळी शिक्षक शिकवीत असे, म्हणजे आपले पूर्वग्रहीत विचार व शैली विद्यार्थ्यांना देऊन मोकळा होत असे. आजची स्थिती वेगळी आहे. आजचा प्राध्यापक अनेक पटींनी बहुश्रुत असल्याने तो कलाविषयक समस्यांचा विद्यार्थ्यांच्या समवेत विचार करतो. म्हणजे विद्यार्थ्याला शिकविण्याच्या निमित्ताने चर्चेच्या ओघात स्वतःही त्या समस्यांचा शोध घेत व त्या उलगडीत जात असतो. समस्या स्पष्ट होत जातील त्या प्रमाणात विचारांचा ठामपणा आणि त्या जितक्या धूसर राहतील तितक्या प्रमाणात अनाग्रही वृत्ती आता शिक्षकामध्ये बाणत आहे. जिथे ती नसेल तिथे ती यायला हवी. या बदलत्या वृत्तीचे मूळही त्या लवचिक अभ्यासक्रमात सापडते. ढोबळ व लवचिक अभ्यासक्रमाच्या बाबतीत दोन्ही शक्यता असतात. ज्यांना शिकविण्या-शिकण्यात स्वारस्य नसते त्यांना सूट मिळते आणि जे मनापासून शिकण्या-शिकविण्यात रस घेतात त्यांना बरेच काही करता येते. उलट अभ्यासक्रमाची काटेकोर आणि तपशीलवार आखणी केल्याने काही किमान गरजा निश्चित पुऱ्या करता येतात; पण त्याच वेळी त्यात आदर्शविषयक मर्यादा पडतात आणि त्याबाहेर जाणे कठीण होते. असे अभ्यासक्रम वेळोवेळी दुरुस्त करीत राहण्याशिवाय गत्यंतर नसते. आजच्या

अभ्यासक्रमात वरील विषय परीक्षेसाठी अंतर्भूत नसल्यामुळे ते कोणी केव्हा शिकवावेत, त्यात कोणत्या विचारधारेला प्रमाण मानावे किंवा त्याज्य मानावे या प्रकारचे आग्रह निर्माण होत नाहीत. त्यामुळे बडोद्यामध्ये 'वस्तुनिरपेक्ष' (nonobjective) चित्रपद्धती हीच कला, असे जे कलेचे एकुलते एक समीकरण करण्यात आले तसे मुंबई परंपरेत कधी झाले नाही. एकाच वर्गात किंवा एकाच परीक्षेत भारतीय आधुनिक, अत्याधुनिक अशा विविध शैली विद्यार्थ्यांच्या प्रकृतिधर्माप्रमाणे व कुवतीप्रमाणे हाताळलेल्या दिसतात. कोणत्याही एकाच कलाप्रणालीचा धोपट मार्ग अनुसरला की शिकविणे किंवा शिकणे कठीण नसते. सर्व अभिव्यक्तिप्रकारांना वाव द्यावयाचा म्हटला म्हणजे मूल्यविषयक प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होतात आणि त्यातून मार्ग काढणे हे शिक्षकांना आव्हान ठरते. आजच्या शिक्षणपद्धतीत कलेतिहासाचे संदर्भ व सौंदर्य-शास्त्रीय प्रश्न शक्यतो त्या त्या विशिष्ट विद्यार्थ्याला आवश्यक ठरतील त्या त्या प्रमाणे चर्चिले जातात. वेगवेगळ्या विद्यार्थ्यांसाठी तेच ते प्रश्न पुन्हा वेगवेगळ्या पद्धतीने हाताळणे भाग पडते. एकच विषय एकाच पद्धतीने पन्नास-पाऊणशे विद्यार्थ्यांसमोर एकदा मांडून झाला की काम आटोपले, असे या शिक्षणपद्धतीत आणि एकूण कलाशिक्षणात होऊच शकत नाही. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे असे प्रत्यक्ष नाते गुरुकुल पद्धतीतल्याप्रमाणे थोडेबहुत शिल्लक राहिल्याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

महाविद्यालयातील वाङ्मयाचा विद्यार्थी हा इतर थोरामोठ्यांच्या कलाकृतींचा आस्वाद घेत अभ्यास करीत असतो. तिथे त्या त्या कलाकृतीच्या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न सार्वत्रिक असतात आणि बहुतांशी विद्यार्थी निरपेक्ष असतात. चित्रकलेचा (किंवा) संगीताचा विद्यार्थी हा स्वतः कलाकृतीमध्ये गुंतलेला असतो. अशा वेळी निर्माण होणारे प्रश्न हे प्रथम त्या त्या विद्यार्थ्याचे स्वतःचे प्रश्न असतात आणि नंतर ते सार्वत्रिक असतात. म्हणून त्या त्या विद्यार्थ्याच्या संदर्भातच ते शिकविणे अधिक हिताचे ठरते. कलेच्या इतिहासातील सरधोपट कालक्रमापेक्षाही त्या त्या विद्यार्थ्याच्या प्रकृतीशी जुळणारे इतिहासातील कलावंत व कलाकृती याबद्दलची चर्चा त्याला अधिक भिडते. संवाद, विरोध, तोल इत्यादी लयतत्त्वांची तपशीलवार चिकित्सा करण्यापेक्षाही त्याच्या कलाकृतीतील ढळलेला किंवा साधलेला संवाद किंवा तोल आणि एखाद्या पूर्वसूरी कलावंताशी त्याचे दूरान्वयाने किंवा आपाततः जुळणारे नाते याबद्दलची चिकित्सा अधिक उपकारक ठरते. सौंदर्यशास्त्रीय इतर प्रश्नांबद्दलही हेच म्हणता येईल. शैली, प्रतिमा, प्रतीक, व्यक्तित्व, व्यक्तिमत्त्व, वैधिकता असल्या प्रश्नांची चर्चा, विद्यार्थ्यांच्या कलाकृतीतून या प्रश्नांना तोंड फुटेल त्या वेळी त्या संदर्भात केल्याने ती अधिक कारणी लागते. एकूण पाहता कलाशिक्षणात आखून दिलेला अभ्यासक्रम, आखून दिलेल्या विचारधारा आणि आखून दिलेल्या शिक्षणपद्धती यापेक्षा त्या त्या विशिष्ट व्यक्तिसापेक्ष परिस्थितीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांची हाताळणी त्या त्या पद्धतीने झाल्यास ते शिक्षण अधिक निकोप ठरते.

कलावंत घडविता येत नसतो हे खरे. पण म्हणून कलाशिक्षणच अप्रस्तुत ठरविण्याचा

मोह काही विचारवंत व कलावंतांना होतो त्याला तार्किक आधार मिळतोच असे नाही. कलाकृती ' चांगली ' म्हटली, की त्या वेळेपुरती कलाचर्चा कलावंताला उपयुक्त वाटते. तिच्यावर टीका झाली की तो अस्वस्थ होतो; आणि एकूण कलाचर्चाच फोल आहे म्हणू लागतो. हा दुटप्पीपणा त्याला व्यवहारात पेलता येतो असेही नाही. मला वाटते, आवडते ते मी करतो, असे कलावंताने एक वेळ म्हटले तर ते समजू शकते. पण ' मला आवडते म्हणून ते चांगले, तीच कला ' असे तो म्हणू लागतो तेव्हा त्याची कलादृष्टी अधू आहे असे समजावे. बरे, असा कलावंत आपली कलाकृती दुसऱ्याला आवडावी म्हणून धडपड व तडजोडही करताना दिसतो, तेव्हा तर त्याचे कलाविषयक आग्रह अप्रस्तुत ठरतात. तेव्हा, निखळ चिकित्सक वृत्तीने कलाचर्चा होणे हे आवश्यक व अपरिहार्यच आहे. इतकी निखळ चर्चा समाजात नेहमी होतेच असे नाही आणि ' मला आवडते ती कला ' ही काही निखळ चर्चा नव्हे. पण जी चर्चा होते त्यातील व्यक्तिगत दुराग्रह टाळून तर्कसिद्ध निकोपपणा टिकविता आला तर कलावंत आणि रसिक, दोहोंनाही त्यातून आकलनास मदत होते. अशी चर्चा कलाजगात स्वतंत्रपणे होत असेल. शैक्षणिक पातळीवर ती होणेही शक्य आहे. कलाशिक्षणाचे उद्दिष्ट तेवढे असते. शिक्षकाच्या शैलीचे व हट्टाग्रहांचे आक्रमण विद्यार्थ्यांवर होत नसेल तर कलाशिक्षणात आक्षेपार्ह वाटण्याचे कधीही काहीही कारण नाही. पण असा मोकळेपणा जेथे नसेल, आपल्या शैलीची आणि आदर्शांची बळजबरी जेथे विद्यार्थ्यांवर होत असेल तेथे मात्र शिक्षण वांझोटे ठरते. ते शिक्षणच नव्हे.

या चर्चेच्या पार्श्वभूमीवर कलाशिक्षणात होऊ घातलेल्या बदलांचे निरीक्षण करणे अधिक सोपे व आवश्यक आहे. नव्या अभ्यासक्रमात एका वर्षाचा पायाभूत अभ्यासक्रम सर्व कलाशाखांसाठी समान आहे. या प्रथम वर्षानंतर चित्र, शिल्प, शिक्षक, प्रशिक्षिण, कारागिरी व उपयुक्त कला अशा इतर कलाशाखांची निवड विद्यार्थी आपल्या आवडीनुसार आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाने करील. वास्तुकलेच्या अभ्यासक्रमाशी याची सांगड घातली गेलेली नाही. कलासंचालनालयाच्या अधिकारकक्षेत वास्तुकला ही शाखा राहिलेली नाही हे त्यांचे बहुधा एक कारण असावे. पण हा जर सर्व कला-शाखांसाठी अभिप्रेत असा ' पायाभूत ' अभ्यासक्रम असेल तर आज ना उद्या वास्तु-कलेशीही त्याचा मेळ साधणे आवश्यक आहे; आणि त्यासाठी शासकीय पातळीवरील अधिकारकक्षांचा प्रश्न योग्य त्या प्रकारे सोडवावा लागेल. सर्व कलाशाखांना प्राथमिक स्वरूपात उपकारक ठरतील असे कार्यक्रम 'पायाभूत ' अभ्यासक्रमात आखलेले आहेत. अक्षरचित्रणापासून (Caligraphy) तो तहत मॉडेल बसवून चित्रण आणि हस्त-कौशल्यापासून दृश्य माध्यमांच्या साहाय्याने कलेतिहासाची ओळख इथपर्यंत व्यापक कार्यक्रम या अभ्यासक्रमात आहेत. हेतू हा की समाजाच्या सर्व थरांमध्ये व जीवनाच्या सर्व अंगांमध्ये माणसाची कलाजाणीव सतत जागृत राहावी. नुसत्या दृश्यकलाच नव्हेत तर काव्य, नाट्य, संगीत या सर्व कलांसाठी मूलभूत रसिकदृष्टी जागृत व्हावी. यातून

बाहेर पडलेला विद्यार्थी पुढे उच्च कलाशिक्षण घेऊ शकला नाही तरी जीवनाच्या रोजच्या रगाड्यातही त्याची कलासक्ती व रसिकदृष्टी त्याला अंतर देणार नाही. अशी अपेक्षा यापुढील अभ्यासक्रमात पूर्वीच्या सारखे नुसते ढोबळ विषय न ठेवता आरेखन प्रकार, भित्तिचित्र (सध्या हा डिप्लोमानंतरच्या विशेष अभ्यासाचा विषय आहे.), कले-इतिहास, सौंदर्यशास्त्र असे विषय समाविष्ट केले आहेत. हा उच्च शिक्षणाचा डिप्लोमाचा अभ्यासक्रम चार वर्षांचा. अभ्यासक्रम शिकविणे ज्या संस्थांना शक्य नसेल, त्यांना साधा प्रमाणपत्र (सर्टिफिकेट कोर्स) अभ्यासक्रम राखून ठेवण्यात आला आहे. त्यात ज्ञानात्मक भागापेक्षा कृतिप्रधान भाग जास्त आहे. ' पायाभूत ' अभ्यासक्रमासह हे दोन्ही अभ्यासक्रम पाच वर्षांचे होतात. प्रमाणपत्र अभ्यासक्रम डिप्लोमाच्या इतका प्रतिष्ठेचा मानला जात नाही, आणि मुदतमात्र तेवढीच आहे. अशा वेळी या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकडे विद्यार्थी कसा वळणार हा प्रश्नच आहे. त्यामुळे हा अभ्यासक्रम करण्यामागील मूळ हेतू पराभूत होतो. शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पायाभूत अभ्यासक्रमानंतर एका वर्षाचा आहे. त्यामुळे तो आता एकूण दोन वर्षांचा होतो. पूर्वी एका वर्षात जे संस्कार शिक्षक होऊ घातलेल्या उमेदवारावर घडविणे कठीण होत होते, त्याऐवजी आता त्याची कलादृष्टी अधिक चौरस करता येईल. कृतिप्रधान व बौद्धिक विषयांची गर्दी जी एका वर्षात होत होती ती टळेल. त्यानंतर शिक्षक प्रशिक्षणाचा विशेष अभ्यासक्रम आणखी एका वर्षाचा आहे. कारागिरीमध्ये वेगवेगळ्या विषयांचे तीन गट पाडले असून प्रत्येक गटाचा अभ्यासक्रम पायाभूत शिक्षणानंतर दोन वर्षांचा आहे. कारागिरीच्या विद्यार्थ्याला पूर्वी रेखनावरील प्रभुत्व आणि सौंदर्यदृष्टी वाढण्यासाठी काहीच सोय नव्हती, ती त्रुटी आता पायाभूत शिक्षणामुळे भरून निघेल असे म्हणता येईल. याशिवाय टेक्स्टाईल डिझाइन, सिरॅमिक्स यासारख्या उपयुक्त विषयांचे खास अभ्यासक्रम दोन दोन वर्षांचे आखण्यात येत असून ते शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्वरित काही उपजीविकेचे साधन लाभावे हा उद्देश आहे. आजवर सर्वच विद्यार्थी दीर्घ मुदतीचे उच्च शिक्षण घेत, किंवा त्यांना ते घ्यावे लागे आणि त्या मानाने भविष्यात काही लाभ पदरी पडण्याची शक्यता मात्र कमी असे. असे बरेच विद्यार्थी आता लहान मुदतीच्या अभ्यासक्रमात विभागले जातील किंवा जावेत. म्हणजे खऱ्या पोटतिडिकीने उच्च कलाशिक्षण घेणारे तेवढे मोजके विद्यार्थी शिल्लक राहतील आणि ते मोजके असल्याने त्यांना अधिक सोयी उपलब्ध करून देणे सोपे होईल.

महाराष्ट्र शासनाने वार्षिक राज्य कला प्रदर्शनाची सुरुवात छप्पन्न साली केली. मध्ये काही वेळा त्यात खंड पडला. या वर्षी कलासंचालनालयाने विद्यार्थी विभाग व कलावंत विभाग अशी दोन वेगळी प्रदर्शने भरविली. या प्रथेमुळे दोन्ही विभागांना अधिक वाव मिळणे व प्रदर्शन आटोपशीर होणे शक्य आहे. या प्रदर्शनाची परंपरा अधिक निकोप ठरत गेली तर मान्यवर कलावंत त्याकडे अधिक आकर्षिले जातील. बॉम्बे आर्ट सोसायटीची पूर्वीची प्रतिष्ठा आता बरीच उतरली असल्यामुळे ती उणीव राज्य प्रदर्श-

नाने भरून काढावयास हवी. तशी सुचिन्हेही या वर्षीच्या प्रदर्शनातून दिसू लागली आहेत. या वर्षी कलासंचालनालयाने आणखी एक चांगली प्रथा सुरू केली. राज्य-प्रदर्शनातील निवडक कलाकृतींचे प्रदर्शन महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरांतून फिरविले. याहून स्पृहणीय गोष्ट, जी बॉंबे आर्ट सोसायटीने कधी केली नाही ती अशी की, कला-संचालनालयाने कलारसग्रहणासाठी वार्षिक व्याख्यानसत्र सुरू केले. अशी व्याख्यान-सत्रे फिरत्या प्रदर्शनाबरोबर महाराष्ट्रातील प्रमुख शहरांतही अधूनमधून ठेवल्यास समाजाची कलोत्सुकता आणि रसिकता वाढीला लागेल. खरे म्हणजे अशा प्रकारच्या कार्यांसाठी प्रत्येक वेळी शासनाच्या प्रयत्नावर कलावंतांनी अवलंबून राहणे योग्य नव्हे. पुणे, कोल्हापूर किंवा इतर कलाकेंद्रांतून कलावंतांना या दृष्टीने काही संघटित प्रयत्न करता येतील. ज्या शहरातून अशी केंद्रे मुळातच नाहीत तेथे संचालनालयाच्या व्याख्यानसत्रांची आवश्यकता अधिक आहे.

महाराष्ट्रातील कलाजग जिवंत व रसरशीत आहे, याची या एकूण आढाव्या-वरून साक्ष पटेल. पण यातही काही अधिक विचाराला वाव आहे. उदाहरणार्थ, आजचा ‘ पायाभूत ’ अभ्यासक्रम हा जर खरा ‘ पायाभूत ’ ठरावयाचा असेल तर तो शक्य तितक्या लवकर माध्यमिक शिक्षणात अंतर्भूत करावा लागेल. त्यासाठी महाराष्ट्राच्या सर्व भागात कोणत्या सोयी पुढील काळात उपलब्ध होऊ शकतील, कराव्या लागतील याची पाहणी जर आतापासून करण्यात आली तर येत्या पाच-दहा वर्षांत तरी हा अभ्यास-क्रम माध्यमिक पातळीवर नेता येईल. (पाश्चात्त्य देशांत तो तसाच करून घेतला जातो.) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक व मानसिक मगदूर काय असतो याची कल्पना आली तर अभ्यासक्रमाची सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिकविण्याच्या पद्धतीत व विषयांच्या हाताळणीत योग्य ते फरक करता येतील. शहरे आणि लहान गावे अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक पातळ्यांवरील विद्यार्थ्यांना कमीअधिक कलाविषयक पार्श्वभूमी लाभलेली असते, विशिष्ट मर्यादित दृष्टी व ग्रहणक्षमता असते. ‘ पायाभूत ’ शिक्षण समाजाच्या सर्व थरांमध्ये न्यावयाचे तर या सर्व पाहणीची गरज आहे. त्यातल्या त्यात आज एक करता येणे शक्य आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर वगैरे ज्या कलाकेंद्रांत हा ‘ पायाभूत ’ अभ्यासक्रम या वर्षी सुरू झाला आहे तेथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी आणि त्यांच्याकडून सुरुवातीपासून वर्षअखेरपर्यंत मिळत गेलेला प्रतिसाद, प्रगती व शिकविण्यात आलेल्या अडचणी यांचे शक्य तितके तपशील गोळा करून वर्षअखेर त्यांची वर्गवारी केली तर बरीच उद्‌बोधक माहिती मिळून त्याप्रमाणे पुढील पावले टाकता येतील. चित्र, शिल्प, उपयुक्त कला इत्यादी कला-शाखांसाठी आजवर वेगवेगळे विद्यार्थीगट सुरुवातीपासून विभागले जात. आता प्रथम वर्षासाठी ते सर्वत्र एकत्र येत आहेत. व्यापक पाहणीसाठी ही परिस्थिती अत्यंत पोषक आहे.

शिक्षक-प्रशिक्षणात बालांच्या चित्रांचा मानसशास्त्रीय अभ्यास हा विषय प्राचार्य

धोंड त्या विभागाचे प्रमुख होते त्या वेळी त्यांनी मोठ्या उमेदीने सुरू केला व यशस्वी-रीतीने हाताळला. त्यावर भर देऊन त्या अभ्यासाचा विकास करता आला तर असा प्रशिक्षित शिक्षक बालांच्या चित्रातून त्यांचे मनोविशेष विश्लेषण करून मांडू शकेल. नुसत्या कलाशिक्षणातच नव्हे तर एकूण शिक्षणात विद्यार्थ्यांच्या मनोविशेषांचे आकलन फार महत्त्वाचे असून बालचित्रकलेतून ते जितके चांगल्या रीतीने साध्य होईल तितके अन्य मार्गांनी होणार नाही. ही जबाबदारी पार पाडण्याइतकी कलाशिक्षकाची तयारी व्हावी अशा रीतीने या विषयाचा अभ्यास शिक्षक-प्रशिक्षणाच्या दुसऱ्या वर्षात करून घेता येणे शक्य आहे. पायाभूत अभ्यासक्रम सर्वत्र न्यावयाचा असल्यामुळे मुंबई-बाहेरील कलाकेंद्रांमध्ये तो रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. याशिवाय अल्पमुदतीचे उपयुक्त अभ्यासक्रमसुद्धा प्रमुख शहरांतील सर्व कलाकेंद्रांतून (प्रसंगी अशी केंद्रे वाढवून) शिकविले गेल्यास त्यांचा समाजाला अधिक फायदा होईल. पुढील उच्च शिक्षणाबद्दल मात्र आता अधिक जागरुक राहणे आवश्यक आहे. उच्च कलाशिक्षण हे कलेला वाहून घेणाऱ्या खास विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे यापुढील काळात त्यांची संख्या मर्यादित होईल. त्यासाठी सोयी अधिक उपलब्ध करून देणेही शक्य होईल. रंग, कॅन्व्हास इत्यादी साधनांचा खर्च विद्यार्थ्यांचा असला तरी सुसज्ज ग्रंथालये, प्रदर्शनगृहे, प्रेक्षागृहे या सोयी त्या त्या संस्थांना कराव्या लागतील. यातील ग्रंथा-लयाच्या सोयी खर्च सोसूनही इतरत्र करता येतील, पण प्रदर्शनगृहे आणि त्यामुळे निमाण होणारे पोषक वातावरण मुंबईबाहेर नजिकच्या काळात तरी शक्य नाही. मुंबईत आज सात-आठ प्रदर्शनालये आहेत. काही सार्वजनिक व खाजगी संग्रहालये आहेत. परदेशी व भारतीय चित्रकारांची वर्दळ आहे. तशी स्थिती इतर शहरांची नाही. कलाशिक्षणासाठी अशी पोषक परिस्थिती इतरत्र नसताना इतर शहरांनी उच्च शिक्षणाचा उपक्रम नुसती हौस म्हणून हाती घेण्यात समाजाचा विशेष फायदा नाही. त्याऐवजी मुंबईबाहेरच्या या कलाकेंद्रांनी अल्पमुदतीच्या समाजोपयोगी अभ्यास-क्रमावर भर देऊन ते यशस्वी करणे यात सर्वांचेच हित आहे. शिक्षण सर्वत्र पसरवायचे असेल तर विशिष्ट दर्जाचा आग्रह धरू नये असे आज महाविद्यालयीन प्राध्यापक व विचारवंतही म्हणू लागले आहेत. शिक्षणसंस्था ज्या प्रादेशिक भागात असेल त्याच्याशी ती एकरूप व्हावी, त्या जीवनाशी एकरूप होण्यासारखे शिक्षण दिले जावे, असे म्हटले तर ते पटण्यासारखे आहे. अशा वेळी तशा विशिष्ट अभ्यासक्रमांची आखणी करून त्यामध्ये मात्र दर्जा टिकविण्याचा प्रयत्न करावा लागेल. पण त्याऐवजी नागर-पद्धतीचा अभ्यासक्रम अर्धवट सोयी-सवलतींच्या परिस्थितीत आणि अपुऱ्या तयारीनिशी सरसकट सगळीकडे पसरवीत जाणे आणि त्यापायी दर्जाचा आग्रह नाकारणे, यात त्या त्या प्रादेशिक विभागाचे अहितच आहे. आज सर्वत्र लहानमोठया शहरी निघणाऱ्या महाविद्यालयीन व इतर उच्च शिक्षणसंस्थांचा विचार करताना त्यात निखळ ज्ञानाची आस्था किती आणि जवळच्या दुसऱ्या प्रादेशिक विभागाशी स्पर्धा किती

याचा नीट तपास केल्यास अधिक बरे. कलाशिक्षणाचा विचार करायचा तर प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षणाचा हव्यास धरून (खरे म्हणजे) मुंबईच्या पातळीवर येण्याचा आभास निर्माण करण्याऐवजी इतर केंद्रांनी आपापल्या प्रादेशिक जीवनाशी एकरूप व उपयुक्त ठरतील असे अभ्यासक्रम यशस्वी रीतीने हाताळल्यास समाजाच्या ते कारणी लागतील, हे समजून घेण्याची वेळ आली आहे.

उच्चशिक्षणातील कलेतिहास व सौंदर्यशास्त्र यांचा अभ्यास हा विद्यार्थ्यांच्या निकडीच्या प्रश्नांशी मेळ साधून शिकविणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन शिक्षणात ॲरिस्टॉटल, कांट, भरत किंवा मर्ढेकर यांची कलाविषयक विचारप्रणाली काय हे एकदा अचूक सांगून झाले की काम संपते. स्वतःचा स्वतंत्र विचार प्राध्यापकाने मांडला तरी परीक्षेत त्याचा उपयोग होण्याची शक्यता कमी. परीक्षक आपल्यासमोर त्या त्या सौंदर्यवाद्यावरील तज्ज्ञांचे भाष्य ठेवून बसणार. येथे तसेच होणार असेल तर विद्यार्थी परीक्षेत मार्क मिळवील, पण तो जे चित्र किंवा शिल्प घडवितो त्याच्याशी त्याचे नाते काय याचे उत्तर जर त्याला मिळत गेले नाही आणि तशी दृष्टी प्राध्यापकाने ठेवली नाही तर मुळात सौंदर्यशास्त्राबद्दलचा अविश्वास पोटी बाळगून तो निवळ परीक्षेसाठी शिकेल. (नाही तरी सौंदर्यशास्त्र मुळातच अप्रस्तुत मानण्याकडे आज काही विचारवंतांचा कल आहेच.) भारतीय रसशास्त्राचा उच्चशिक्षणात अंतर्भाव आहे. त्याबाबत एक वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. भरताच्या नाट्यशास्त्राची मांडणी नाट्याच्या अनुरोधाने झालेली होती. त्याची काव्योपयुक्त पुनर्घटना करण्यासाठी कित्येक शतके गेली. अभिनवगुप्त-जगन्नाथ पंडितापर्यंत वाटचाल व्हावी लागली. त्यामुळे आजच्या स्वरूपातील रसशास्त्र हे मुख्यतः काव्यशास्त्रच आहे. चित्र–शिल्प या कलांना ते उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने त्याची मांडणी आतापर्यंत झालेली नाही. मध्ययुगीन भारतीय चित्रकारांनी सरळ सरळ काव्यसंकेत चित्रातून मांडले, त्यामुळे 'नवरसां'चा विचार करणारे ढोबळ काव्यशास्त्र चित्रकलेलाही लागू पडत असल्यासारखे भासले तरी आजच्या आधुनिक विचारप्रवाहांना ते लागू पडणे कठीण, नव्हे आज ते अप्रस्तुतच ठरण्याचा संभव अधिक. अशा परिस्थितीत नुसता आपद्‌धर्म म्हणून ते शिकविले तर, मर्ढेकरासारख्यांनी रसशास्त्राबद्दल आधीच प्रकट केलेल्या अविश्वासात पुन्हा भर फक्त पडेल. कृतिप्रधान विषय आणि विचारप्रधान विषय यांची सांगड घालण्याची आवश्यकता आहे तशीच ती वेगवेगळ्या कलाप्रकारांचीही घातली जाणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, रचनाचित्र, व्यक्तिचित्र, भित्तिचित्र, वास्तववादी पद्धतीचे रचनाचित्र, असे वर्गीकरण नव्या अभ्यासक्रमात आहे, त्यांचा एकमेकांशी संबंध काय हा प्रश्न आहे. हा निवळ अभिव्यक्ती पद्धतीबद्दलचाच प्रश्न आहे की ते मुळातच वेगळे प्रकार आहेत? नुसते व्यक्तिचित्र म्हटले तरी ते तथाकथित वास्तववादी, दृक्‌प्रत्ययवादी, घनवादी किंवा त्याहून वेगळ्या अभिव्यक्ती पद्धतींनी किंवा त्यांच्या संयोगांनी होऊ शकते. विषय ठरविताना सर्जनशील (Creative) चित्र असा शब्दप्रयोग (बहुधा आधुनिक पद्धतीच्या) रचनाचित्रा-

साठी केलेला आहे. व्यक्तिचित्रासारखा विषय सर्जनशील होऊ शकत नाही असा अर्थ यातून ध्वनित होतो. शिवाय "figurative genre painting" असा वेगळा विषय ठेवण्यात आला आहे. पूर्वीची विषयविभागणी स्थिरचित्र, व्यक्तिचित्र, रचनाचित्र अशी सुटसुटीत होती. त्यात शैली कोणती असावी याबद्दल आग्रह नव्हता. आताची विषयविभागणी शैलीनुसार झालेली दिसते आहे. यात वेगवेगळ्या शैलींचे कलाविषयक निकष वेगळे असतात असे गृहीत धरल्याचे ध्वनित होते. हेही तात्पुरते खरे मानले, पण मग प्रत्येक नव्या-जुन्या भारतीय-अभारतीय शैलीचा एकेक विषय करावा लागेल. त्याशिवाय त्याला वाव मिळतो असे होणार नाही. 'ललित कला ॲकॅडमी'च्या प्रदर्शनातही वास्तववादी, भारतीय, आधुनिक असे ढोबळ शैलीनुसार गट पाडून बक्षिसे देण्याची प्रथा मध्यंतरी चालू करण्यात आली होती. कलानिकष हे सर्व अभिव्यक्ती-प्रकारांना समान असले पाहिजेत याची जाणीव झाल्यावर या गटवारीचा फोलपणा ललितकलेलाही कळला, आणि ही वर्गवारी सोडून देण्यात आली. अशा परिस्थितीत शैलीनुसार विषयवर्गीकरण करण्यात कलाजाणिवेची काय दुरवस्था होते आहे याचा वेळीच विचार करणे आवश्यक आहे. जी दृष्टी अभ्यासक्रमाच्या आखणीत दिसते तीच उद्या प्राध्यापक अधिकृत मानू लागले तर कलाजाणीव समृद्ध होण्याऐवजी ती अधिक गोंधळाची होईल.

म्हणूनच प्रत्यक्ष शिक्षणात गुंतलेल्या प्राध्यापकाचे कार्य महत्त्वाचे ठरते. अभ्यासक्रम कोणताही असो त्याचे सोने करणे किंवा माती करणे त्याच्या हाती असते. अशा बदलत्या अभ्यासक्रमात तर प्राध्यापक अतिशय जागरूक असावयास हवा. त्याची दृष्टी उदार पण स्पष्ट हवी. व्यासंग अविश्रांतपणे चालावयास हवा. असा प्राध्यापक आणि त्याच्या व्यासंगासाठी लागणारी साधनसामग्री उपलब्ध करून देण्याची त्या त्या संस्थांची क्षमता यावर शिक्षणाचे यशापयश अवलंबून असते. प्राध्यापकांची मनस्विता आणि विद्यार्थ्यांची उत्सुकता व उत्साह यावरच शिक्षण नावाचा मनोव्यापार यशस्वी ठरतो. यामधील अडचणी, मग त्या वैयक्तिक असोत किंवा कशा असोत, त्या शक्य तितक्या कमी करीत नेणे नेहमी आवश्यक असते. नव्या अभ्यासक्रमाचा हा उपक्रम हाती घेऊन महाराष्ट्र शासनाने, म्हणजे मूलतः मराठी समाजाने, फार मोठी जबाबदारी अंगावर घेतली आहे, यात शंका नाही. महाराष्ट्राची अस्मिता अबाधित राहावयाची तर विद्यार्थी, शिक्षक आणि समाज, सर्वांनी जागरूक प्रयत्न करून त्याच्या यशस्वितेला हातभार लावला पाहिजे.

व्यावसायिक चित्रकला

देवीदास बागूल

व्यावसायिक चित्रकला म्हणजे व्यवसायाकरिता वापरलेली चित्रकला, व्यवसाय सुकर व्हावा, पार पाडावा यासाठी उपयोगी पडणारी चित्रकला, किंवा व्यवसाय करणारी चित्रकला. व्यवसाय हा नेहमीच दोन किंवा दोनपेक्षा अधिक माणसांत होतो. एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी किंवा प्राण्याशी संबंध येणे हा माणसाच्या रोजच्या जगण्याचा एक न टाळता येणारा व्यवसाय आहे. एका अर्थाने माणसाला जगायचे असेल तर त्याला दुसऱ्याशी व्यावसायिक संबंध ठेवणे अटळ आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे माणसाच्या जीवनात समाजाला पर्याय नाही. मग तो माणूस नागरिक असो किंवा चोर असो किंवा हिप्पी असो. एका चोराला दुसऱ्या चोराशी कोणत्यातरी प्रकारचे व्यावसायिक संबंध ठेवावे लागतात, आणि प्रचलित समाजाला ठोकरणाऱ्या हिप्पीलाही दुसरा हिप्पी गाठून त्याच्याशी (किंवा तिच्याशी) व्यावसायिक संबंध चालू ठेवावे लागतात.

ह्या सर्व प्रकारच्या व्यवसायांचा पाया निवेदन हा असतो. एकजण दुसऱ्याला अनेक प्रकारच्या व्यावसायिक उद्दिष्टांसाठी निवेदन करीत असतो. भूक लागली आहे ही गोष्ट निवेदन करण्यासाठी कोणी तोंडातून ठराविक (म्हणजे दोन किंवा अधिक माणसांनी आपसात आधी ठरवून विशिष्ट स्वराघाताला विशिष्ट अर्थ असा व्यवसाय मान्य करून) शब्द काढतो, कोणी न बोलता पोटावर हात मारून अभिनयाच्या मदतीने निवेदन करतो, लहान मूल तर नुसते रडून म्हणजे संगीताच्या साह्याने निवेदन करते, तर कोणी प्रौढ माणूस अन्नाने भरलेल्या ताटाचे चित्र काढून निवेदन करतो.

निवेदन करणे हाच हेतू असला तर ह्या अर्थाने सर्वच कला व्यावसायिक कला असतात. कारण निवेदन करणे हाही एक उद्योगच होऊन बसतो. हा उद्योग म्हणजेच व्यवसाय पार पाडण्यासाठी कलावंत मन धडपड करते. कुणाला रम्य संध्याकाळचे

रंग पाहून एक नवे चित्र मनात तयार होते आणि ते मानसिक चित्र दुसऱ्याला दाखविण्यासाठी तो माणूस रंग, कुंचला, कागद, कापड, दगड यांचा वापर करून चित्र काढतो. म्हणजे ही व्यावसायिक चित्रकला झाली.

पण आजच्या प्रचलित भाषेत ह्या चित्रकलेला विशुद्ध चित्रकला असे म्हणतात आणि व्यापारउदीमातील गोष्टी निवेदन करण्यासाठी काढलेल्या चित्रांना व्यावसायिक चित्रकला असे संबोधतात.

अशी विभागणी करताना कोणता कायदा पाहतात ? कायदा असा की विशुद्ध चित्रकार स्वतःच्या मनाला वाटेल त्या वस्तूचे वाटेल तशा रीतीने चित्र काढतात, तर व्यावसायिक चित्रकार आपला पक्षकार सांगेल त्या वस्तूचे चित्र काढतात. म्हणजे व्यावसायिक चित्रकार दुसऱ्याच्या हुकमावर निवेदन करतो.

दुसऱ्याचे निवेदन असे जे वर म्हटले आहे त्याबद्दल थोडा अधिक खुलासा करणे आवश्यक आहे. हा जो दुसरा कोणी असतो तो फक्त निवेदन 'कशाबद्दल' करावयाचे आहे एवढेच सांगतो. प्रत्यक्ष त्या 'कशाबद्दल' 'काय' आणि 'कसे' निवेदन करायचे ह्या गोष्टी तो व्यावसायिक चित्रकारावरच सोपवतो, आणि येथेच 'व्यावसायिक चित्रकले'तील कला सुरू होते.

व्यावसायिक निवेदनासाठी माणसाने निरनिराळ्या माध्यमांचा वापर केला आहे. संगीत, नृत्य, अभिनय, लेखन, चित्रण आणि सगळ्यांचा मिळून म्हणजे सिनेमा. ह्या सर्व प्रकारांत चित्रकलेचा वापर फार मोठ्या प्रमाणात आणि प्रभावीपणे करण्यात आला आहे. चित्र हे जवळजवळ मूळ वस्तूच्या प्रतिबिंबासारखे असल्याने दुसऱ्यास काय निवेदन करावयाचे आहे याची समज लवकर होते. 'मला अंडे हवे' असे मराठी भाषेतले वाक्य अफगाणिस्तानातल्या माणसास समजत नाही, पण जर त्याला कोंबडी आणि तिच्याजवळ लंबवर्तुळाकार यांचे चित्र काढून दाखवले तर चित्रकाराला काय हवे हे पटकन उमगते. सादृश्याच्या पातळीवर माणूस सारखा जगत असतो. म्हणून तर साहित्यातही 'उपमा' हा प्रकार या ना त्या रूपात आजही अपरिहार्यपणे वापरला जातो. उपमा म्हणजे एक प्रकारे visual communication आहे. माणूस कुठेही परप्रांतात गेला आणि तेथे नवीन रस्ता, नवीन चौक, घरेदारे पाहिली म्हणजे त्याच्या तोंडून पहिला उद्‌गार बाहेर पडतो तो हा की, 'आमच्या गावात असा चौक नाही,' किंवा 'अगदी आमच्याकडच्या सारखाच हा दिसतो.' अगदी लहान मुलाचीच गोष्ट घ्या ना ! तो अक्षरे काढायला लागण्यापूर्वी चित्रेच रेखाटीत असतो. चिनी लिपी म्हणजे एक प्रकारची चित्रेच आहेत ही गोष्टही या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी आहे. गोष्टींच्या पुस्तकांत चित्रे घालण्याचे प्रयोजन काय सुचवते ? लहान मुलांसाठी असलेल्या गोष्टींच्या पुस्तकांचे (एक वेळ) सोडा, पण हेमिंग्वेसारख्या 'थोर' लेखकाच्या 'द ओल्ड मॅन अँड द सी' मध्येही चित्रे घालण्यात येतात ! म्हणजे 'वाचून' जे समजले ते 'पाहून' ही समजावे ही माणसाची गरज असते. ही गरजच व्यावसायिक चित्रकलेची जन्मदात्री झालेली आहे.

अशी जरी स्थिती असली तरी खुद्द चित्रकलेच्या प्रांतात 'व्यावसायिक चित्र-कलेला' मानाचे स्थान काही सहजासहजी मिळाले नाही. कलेच्या प्रांतातील बरोबरीचे स्थान मिळावे म्हणून अनेक व्यावसायिक चित्रकारांनी आपले सर्वस्व पणाला लावून व्यावसायिक चित्रकलेबद्दलचे गैरसमज दूर केले. सुरुवातीच्या काळात अशी एक समजूत होती की, जो विशुद्ध कलावंत चित्रकार म्हणून यशस्वी होत नाही तोच व्याव-सायिक चित्रकलेकडे वळतो. पण नंतर नंतर सर्वांना मान्य करावे लागले की, जो चित्रकार विशुद्ध (fine) चित्रकलेत पारंगत झालेला असतो तोच व्यावसायिक चित्रकार होण्यात यश मिळवतो. इतकेच नव्हे तर ज्या चित्रामुळे आपल्या पक्षकाराच्या मालाचा उठाव प्रभावीपणे होत असतो त्या चित्रात विशुद्ध चित्रकलेचेही मौलिक गुण समृद्धपणे असतात.

व्यावसायिक चित्रकलेतील मूलतत्त्वे विशुद्ध चित्रकलेतील मूलतत्त्वांपेक्षा कोणत्याही तऱ्हेने वेगळी नसतात. आकार, प्रतीकात्मकता, रंग आणि रेषा यांचे परस्परपोषक आणि नवनवोन्मेषशाली नाते, लय इत्यादी घटकांच्या साह्यानेच व्यावसायिक चित्रकला आपले निवेदन प्रभावीपणे करीत असते.

व्यावसायिक चित्रकलेला असे गृहीत धरावे लागते की, एखाद्या वस्तूचे निवेदन दृश्य पातळीवर करताना अनंत तऱ्हा चाचपडून पाहता येतात, पाहाव्या लागतात, आणि त्यांपैकी पुष्कळशा तऱ्हा समर्पकही असतात. मात्र ह्या अनेक तऱ्हा शोधताना एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते ती ही की, दिलेल्या कामाच्या स्वरूपावरून, तपशिलातून आणि वैशिष्ट्यावरून चित्राचे स्वरूप ठरवायचे असते. ह्या बाबतीत ठोक आणि रूढ तऱ्हा वापरून प्रभाव पडत नाही. चित्रातील प्रतीकात्मकता ह्या गुणाच्या बाबतीत तर वरील पथ्य पाळण्याची फार गरज असते. प्रेम ह्या कल्पनेचेच उदाहरण घेऊ. प्रेम म्हटले की सर्वसाधारण चित्रकार हृदयाचा बदामी आकार आणि त्यात घुसलेले दोन बाण दाखवतो. परंतु चित्र जर नवीन व्हायचे असेल तर दिलेल्या कामाचा तपशील फार उपयोगी पडतो. सत्यजित रे यांनी 'चारुलता' या सिनेमात प्रारंभीच्या चित्रात ही गोष्ट फार प्रभावीपणे साधली आहे. त्या प्रारंभीच्या चित्रात कोपरापासूनचे दोन हात दिसतात. हातांतील बांगड्यांवरून ते हात बाईचे आहेत हे लक्षात येते. ते दोन हात भरतकाम करतात. त्या भरतकामात नावाची अक्षरे गुंफलेली असतात. त्यावरून भरतकाम करणाऱ्या स्त्रीचे त्या नावाच्या व्यक्तीवरील प्रेम सूचित होते. हे एकच चित्र दोनतीन मिनिटे दाखवून झाल्यावर पुढील दृश्यात ती स्त्री संपूर्ण दाखवून मग त्या स्त्रीचे आणि त्या भरतकामातील नावाच्या पुरुषाचे संबंध दाखवायला सुरुवात होते. म्हणजे 'प्रेम' करणाऱ्या व्यक्तीचे 'प्रेम' दाखविण्यासाठी प्रसंगबाह्य किंवा रूढ वस्तूंचा वापर न करता प्रसंगगत तपशिलाचा आणि वस्तुगत स्वभावाचा वापर करण्यात किती परिणामकारकता आणि कार्यसुकरता येते हे दिसते! दुसरे असे की ज्या व्यवसायाला अनुलक्षून चित्र काढायचे असते ते व्यवसाय तर नेहमीच

बदलत असतात. ह्या अनेकानेक कामांच्या बाबतीत एकाच चित्रकाराला एकच एक सौंदर्यमूल्य आणि रचनेचा दृष्टिकोण ठेवून कार्यभाग साधता येतो. आणि रचना रचना म्हणजे तरी काय ? रचना म्हणजे केवळ अंतःप्रेरणा नव्हे, की केवळ तर्कनिष्ठता नव्हे, किंवा केवळ तांत्रिक कसबही नव्हे. उलट रचना म्हणजे ह्या तिन्हींचे संयोगीकरण.

व्यावसायिक चित्रकलेचा आधुनिक दृष्टिकोण म्हणजे काय याबद्दल स्पष्टीकरण करताना पॉल रँड याने पुढील स्वच्छ आणि विचारपरिपूर्ण सूत्रे सांगितली आहेत. (ए. आय. जी. ए. जर्नल फॉर स्प्रिंग १९५१)

१. मनास वाटेल तशी ठेवाठेव करणे म्हणजे रचना (Designing) नव्हे.
२. आविष्कार-स्वातंत्र्य म्हणजे बेबंदशाही नव्हे.
३. नवनव्या वस्तूंचा वापर करीत सुटणे म्हणजे प्रयोगातील नावीन्य नव्हे.
४. सफाईदारपणा आणला म्हणजे कार्यसुकर आकार (Functional form) साधला असे नव्हे.
५. अनुक्रम, शिस्त आणि प्रमाणबद्धता ही काही केवळ ग्रीकांचीच मक्तेदारी नाही.
६. साधेपणा म्हणजे नागडेपणा नव्हे.
७. अवकाश (space) म्हणजे केवळ रिकामी जागा सोडणे नव्हे किंवा वस्तू वाटेल तशा आणि वाटेल तिथे मांडून रिकामी जागा निर्माण करणे नव्हे.
८. संवेदनक्षमता म्हणजे क्षुल्लक गोष्टींना महत्त्व देणे नव्हे किंवा अतिरेक करणेही नव्हे.
९. लोअर केसची अक्षरे वापरली किंवा सॅन्स सेरिफ अक्षरे वापरली म्हणजे आधुनिक अक्षराकृती (typography) साधली असे नव्हे.
१०. सिनेमा फिल्मचे संपादन (montage) म्हणजे एकत्र केलेला गोंधळ नव्हे.
११. पोत (texture) ही काही केवळ शारीरिक अनुभवाची गोष्ट नव्हे.

रँडसाहेबांची ही मार्गदर्शक तत्त्वे आचरणात आणणे कठीण असले किंवा त्याप्रमाणे काम करणारे व्यावसायिक चित्रकार तुरळक प्रमाणात असले तरी त्या तत्त्वांच्या खरेपणाबद्दल शंका घेणारे मात्र कोणीही नाही.

रँडसाहेबांच्या पूर्वी (म्हणजे १९३७ पूर्वी) जी रूढ आणि पारंपरिक व्यावसायिक चित्रकला होती तिची ठळक लक्षणे पुढीलप्रमाणे होती.

—ती गतिशील असण्याऐवजी जड स्वरूपाची होती.

—तिचा भर सूचकतेऐवजी वर्णनावर अधिक होता; किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे एखाद्या वस्तूच्या संकल्पनेऐवजी (concept) त्या वस्तूचे हुबेहुब चित्र काढण्यावर अधिक भर होता. (उदाहरणार्थ, आयातनिर्यात ह्याचे चित्रीकरण करायला सांगितले तर पारंपरिक व्यावसायिक चित्रकार बंदराचे तपशीलवार चित्र काढील, याउलट एका आधुनिक चित्रकाराने खुर्ची आणि पाण्याचे भांडे यांचे चित्र

काढले आहे. खुर्चीत येऊन बसणे म्हणजे आयात आणि भांड्यातून पाणी ओतणे म्हणजे निर्यात अशी सूचकता तो वापरतो.)

—पारंपरिक चित्रकलेत चित्र, मजकूर, मथळा, बोधचिन्ह हे घटक वेगवेगळेपणाने हाताळले जात असत.

—एखाद्या चित्रातून जो काही संदेश वाचकांना निवेदन करावयाचा असे तो संदेश तत्क्षणी एखाद्या आघाताप्रमाणे होण्याऐवजी जुन्या चित्रकलेला तो फार सावकाशपणे आणि सगळ्या घटकांच्या प्रतिक्रियांच्या गोळाबेरजेने सांगण्यात येई.

आधुनिक व्यावसायिक चित्रकला एखादी जाहिरात प्रभावी आणि स्वयंसिद्ध होण्यासाठी काय करते? त्यासाठी ती इतरांनी चोखाळलेली वाट सोडून एखादी आकर्षक युक्ती वापरते, म्हणजेच ती एखाद्या प्रतीकाचा शोध घेऊन त्याचा वापर करते. पण अनुरूप प्रतीक सुचणे ही केवळ पहिली पायरी झाली. त्या प्रतीकास साजेल अशी अक्षरांची वळणे निर्माण करणे ही नंतरची अतिशय अवघड अशी कामगिरी असते. पोलादाची जहिरात असेल तर अक्षरे कशी कांबीसारखी कणखर, कोचदार आणि कराल हवीत (पाहा–मुकुंद पोलादाची जाहिरात.). विमानाची जाहिरात असेल तर अक्षरे गतिशील हवीत (पाहा – ' एअर इंडिया 'ची अक्षरे). अशी अक्षरे शोधल्यावर त्या अक्षरांची रचना करणे ही एक नवी कलात्मक गरज असते. चित्र आणि अक्षरे ह्यांचे नाट्यमय नाते निर्माण करणे म्हणजेच एक नवे दृश्य रूप उभे करणे. ह्या नव्या रूपात अक्षरांना जसे स्वतंत्र अस्तित्व असून चालत नाही तसे ती अक्षरे केवळ मजकुराची अर्थवाहक साधनेही असून चालत नाही; याउलट ती अक्षरे एका नव्या रूपाची कार्यकारी सेंद्रिय प्रत्यंगे असतात.

ह्या नव्या रूपात अनेक प्रकारांनी कलात्मकता साधलेली असते. विरोध, विनोद, पुनरावृत्ती, असमतोल, लय, पोत आणि एरवी असंबद्ध वाटणाऱ्या गोष्टींची अर्थघन संघटना.

साधी विरोधतत्त्वाची गोष्ट घ्या. हा विरोध कधी खडबडीतपणा आणि गुळगुळीतपणा ह्यातील असतो, तर कधी साधेपणा आणि संमिश्रता ह्यांच्या एकत्र मांडणीतील असतो; वर आणि खाली, रिकामी आणि भरलेली जागा, छायाचित्र आणि रेखाचित्र, गच्चपणा आणि सैलपणा, जाडी आणि सडपातळपणा, हालचाल आणि स्तब्धता, तांबडेपिवळे रंग आणि काळापांढरा रंग—ह्या विरोधी गोष्टींच्या एकत्रित मांडणीतून व्यावसायिक चित्रकलेला कलात्मकतेची पातळी गाठता येते.

व्यावसायिक चित्रकलेला दोन्ही गोष्टींकडे लक्ष ठेवावे लागते : (१) कार्य आणि (२) सौंदर्य. केवळ सौंदर्याकडे झुकून चालत नाही, तसेच केवळ कार्यसुकरता (Function) साधण्यासाठी सौंदर्य डावलून भागत नाही. याउलट दोघांचा असा मेळ घालावा लागतो की, परिणामी दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या न जाणवता त्या साधेपणा आणि सूचकता यांनी उठून दिसतील. आणि असे उठावदार चित्र कलेच्या पातळीवर नकळतपणे गेलेले असते.

व्यावसायिक चित्रकला ही व्यवसायाच्या अनेक क्षेत्रांत शिरत आहे. जाहिराती सिनेमा-विशेषतः सिनेमांची श्रेयनामावली (titles) (उदाहरणार्थ From 007 with Love आणि Grand Prix ह्या सिनेमातील श्रेयनामावली पाहा.), वस्तूंची आवरणे, पुस्तकांची वेष्टने, सचित्र पुस्तके, पत्रव्यवहार, :प्रदर्शने, भेटकार्डे, वस्त्रप्रावरणे, बोधचिन्हे इत्यादी.

व्यावसायिक चित्रकला अनेकानेक व्यवसाय आणि समाजजीवन यांच्यात कार्यसुकर आणि सौंदर्यशील सांगड घालण्याचा जो प्रयत्न करीत असते त्या प्रयत्नामुळे मानवी जीवन अधिकाधिक सुखी, समंजस आणि उद्योगप्रिय होण्यास मदत होत आहे.

खरे सांगायचे म्हणजे व्यावसायिक चित्रकलेचे स्फूर्तिस्थान अमूर्त किंवा कल्पित (Abstract!) चित्रकला हीच आहे. अमूर्त चित्रकलेत प्रत्यक्षातील कोणत्याही मूर्तींचे, वस्तूचे वा दृश्याचे प्रतिबिंबात्मक चित्रण नसते, पण त्या चित्रकलेत विविध आकारांचा, रंगांचा, रेषांचा समतोल-असमतोल साधून जी एक स्वयंसिद्ध नवरचना केलेली असते ती एका नव्या सूत्राला जन्म देते. ते नवे सूत्र म्हणजे प्रत्येक चित्राचे नियम त्या चित्राच्या गरजेतून जन्मतात. अमूर्त चित्रकलेतील हे अभिनव सूत्र सामाजिक संदर्भातील प्रत्यक्ष :विनियोगाच्या वस्तूंच्या निवेदनासाठी वापरून व्यावसायिक चित्रकला त्या सामाजिक विनियोगाच्या वस्तूंना एक नवा देहाकार देते. व्यावसायिक चित्रकलेची ही एक प्रकारे तारेवरची कसरतच असते. ही कसरत करीत करीत व्यावसायिक चित्रकला समाजाला अमूर्त चित्रकलेकडे डोळे आणि मन वळवायला लावते— व्यावसायिक चित्रकलेचा वावर व्यवसायात असला तरी तिचा आत्मा सतत अमूर्त चित्रकलेतच असतो.

महाराष्ट्रात व्यावसायिक चित्रकलेने गेल्या पंचवीस वर्षांत जाणीवपूर्वक वाटचाल केली आहे.ही वाटचाल करताना कधी परंपरा सांभाळणे, कधी दुसऱ्याकडून प्रेरणा घेणे, कधी सरळ अनुकरण करणे, तर कधी स्वतंत्रपणे नवे प्रयोग करणे अशा अनेकविध तऱ्हा पडताळून पाहण्यात आल्या.

वस्त्रप्रावरणे

याबाबतीत कापडगिरण्यांतून चित्रकारांची नेमणूक करण्यात येई. आणि पातळांचे काठ, चोळ्यांचे खण, चिटाचे कापड यांसाठी पारंपरिक आणि नवीन रचनाप्रकार केले जात. पुढे हँडलूम हाऊस या मुंबईतील संस्थेने अधिक नवीन प्रयोग केले. भारतीय कुयरी हा प्रकार तर अनेकविध तऱ्हांनी वस्त्रप्रावरणात गुंफण्यात आला. बाटिक हा कलाप्रकार म्हणजे व्यावसायिक चित्रकलेने सामाजिक जीवनाला दिलेली नवी देणगी होय. चादरीवरील नक्षीमध्ये संगमरवरी नक्षीचे अनुकरण करून चादरींच्या रूपात क्रांतिकारक प्रयोग झाले.

नेपथ्यरचना

नाटकातील नेपथ्यरचना हा चित्रकारांचा एक खास विभाग असतो. किर्लोस्कर देवल-गडकरी ह्यांच्या नाटकाच्या काळात हुबेहुब देखावे असलेले पडदे तयार करण्यातच चित्रकार आपली शक्ती वेचीत असत. पु. श्री. काळे ह्यांच्यासारखे कलावंत ती परंपरा अजूनही समर्थपणे चालवीत आहेत. 'पडद्याला टाळी' मिळवण्याची प्रथा त्यांनीच पाडली असे म्हटले जाते. अशी ही प्रथा सुरू असतानाच व्यावसायिक चित्रकलेने नेपथ्यरचनेत काही प्रयोग केले. दामू केंकरे ह्यांनी केलेल्या 'हॅम्लेट'च्या प्रयोगात नेपथ्यरचना ही व्यावसायिक चित्रकलेची फार मोठी कामगिरी होती. हुबेहुबचा मोह सोडून प्रतीकात्मकतेचा प्रयोग करणे हे फार मोठे धाडस होते. ही नवी प्रतीकात्मक रचना आता इतकी अंगवळणी पडली आहे की, बालरंगभूमीवरही ती आता सहजतेने वावरत असते.

पुस्तकांची वेष्टने

याबाबतीत दलाल-मुळगावकर ह्या जोडीने फार नाव कमावले. पैकी मुळगावकर आज मागे पडले असले तरी दिवाळी अंकांच्या वेळी ते दिसतात. मुळगावकरांनी राजा रविवर्म्याची प्रथा पुढे चालविली. दलालांनी मात्र पुष्कळच नवे प्रयोग करून व्यावसायिक चित्रकलेची सुरुवात केली. एखादी कल्पना दृश्यपातळीवर आणणे (visualisation of a concept) हा व्यावसायिक चित्रकलेतील महत्त्वाचा भाग त्यांनी पुस्तकांची वेष्टने करताना आचरणात आणण्याचे प्रयत्न केले. ह्या बाबतीत अधिक भरीव कामगिरी द. ग. गोडसे ह्यांनी केली. 'ध्रुपद' ह्या कवितासंग्रहावरचे चित्र त्यासाठी मुद्दाम पाहावे.

गेल्या दहा वर्षांत तर प्रभाकर गोरे, बाळ ठाकूर, वसंत सरवटे, पद्मा सहस्रबुद्धे, यशवंत चौधरी यांनी केलेली पुस्तकांची वेष्टने अव्वल दर्जाची आहेत हे सांगताना फार अभिमान वाटतो.

पुस्तकांच्या संदर्भात व्यावसायिक चित्रकलेचे दुसरे कार्य म्हणजे अक्षराकृती (Typography). याबाबतीत केशव भिकाजी ढवळे ह्यांनी केलेले प्रयोग आजही ताजे वाटतात. त्यांच्यानंतर हा धागा पार तुटला. पुस्तक छपाईत अक्षराकृती म्हणून चित्रकलेची आठवण करून देण्यासारखा काही भाग असतो ह्याचा विसरच पडला. आपल्या पोथ्यांमधून तर अक्षरवळण आणि अक्षराकृती ह्यांचे समृद्ध वैभवच होते, त्याचेही नाते तुटले. आता ते नाते पुन्हा प्रकट होऊ लागले आहे. त्या बाबतीत मौज प्रकाशने आणि देशमुख प्रकाशने ह्यांनी पुष्कळच नवे प्रयोग केले आहेत.*

---

* श्री. देवीदास बागूल यांनी या बाबतीत अलीकडे केलेले प्रयोग अत्यंत लक्षणीय आहेत. —संपादक.

वस्तूंची वेष्टने

वस्तूंची वेष्टनेसुद्धा आकर्षक असावीत, त्या वस्तू आपल्या जीवनात यायच्याच असतील तर त्या येत असताना आपला चेहरा आणि मन प्रसन्न व्हावे, म्हणजे मग घेतलेली वस्तू अंगी लागण्यात मदत होते, ही गोष्ट गेल्या दहा वर्षांत वस्तूंच्या कारखानदारांनी ओळखली आहे. म्हणून विविध कंपन्यांनी व्यावसायिक चित्रकलेचे अद्ययावत शिक्षण घेतलेल्या चित्रकारांना नवनिर्मितीस अवसर दिला आहे. फेसपावडर, टुथपेस्ट, निरनिराळी टॉनिक्स ह्यांची वेष्टने पाहा म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनात व्यावसायिक चित्रकलेने केवढे नवनवोन्मेषशाली सौंदर्य उभे केले आहे, हे जाणवते. उल्का, शिल्पी, सीबा, ह्या आणि इतर अनेक जाहिरात-संस्थांनी ह्याबाबतीत लक्षणीय काम केले आहे.

वस्तूंचा प्रचार करणारे इतर साहित्य

व्हिजिटिंग कार्ड्स, लेटरहेड्स, कॅलेंडर्स, परिपत्रके ह्या बाबतीत मात्र अजूनही मुंबई हे शहरच अग्रभागी आहे. त्याची कारणे काही का असेनात, पण मुंबई शहरातील या बाबतीतील कार्य फार अव्वल दर्जाचे आहे. आपापल्या कामाच्या स्वरूपाचे सूचन करणारे कॅलेंडर काढणे हे काम तर अजून फार तुरळक प्रमाणात होते. निसर्गदृश्य अथवा स्त्री ह्यांची चित्रे-छायाचित्रे असंबद्ध रीतीने छापणारे फार. उदाहरणार्थ, सीबा ही औषधांच्या क्षेत्रातील संशोधन-उत्पादन करणारी संस्था आहे. त्या कंपनीचे कॅलेंडर कसे असावे ? तर संशोधनाचे स्मरण करून देणारे असावे. आणि म्हणून जुन्या संशोधित मूर्तींची चित्रे त्या कंपनीच्या कॅलेंडरवर देण्यात येतात. गेल्या दहा वर्षांत तर ह्या सर्व प्रकारच्या स्टेशनरीमध्ये अक्षराकृतीचा उपयोग करण्याकडे अधिकाधिक कल दिसून येत आहे. पण या बाबतीतही पुणे व मुंबई सोडल्यास बाकीचा महाराष्ट्र फार मागासलेला आहे.

वर्तमानपत्रातील जाहिराती

याही बाबतीत मुंबईच फक्त कार्यशील आहे. इतर ठिकाणच्या जाहिराती म्हणजे निव्वळ अनुमानधपक्याने केलेले काम असते. मुंबईच्या जाहिरात-संस्थांमध्ये मात्र चैतन्य आहे. नवनवे प्रयोग करण्याची जिद्द आहे, समाजाला सर्जनशील बनविणारी दृष्टी आहे.

वास्तुशिल्प

माधव आचवल

१. कोणत्याही कलेबद्दलच्या कल्पना व विचार हे त्या त्या काळातील जीवन व कलाविषयक जाणिवांशी निगडित असतात व त्याच्या बरोबरच अपरिहार्यपणे बदलत असतात. वास्तुशिल्पाबद्दलच्या कल्पनाही, काळाच्या ओघात अशाच बदलत गेल्या आहेत. आज " विशिष्ट उद्दिष्टांनी भारलेले आच्छादित अवकाश " म्हणजे वास्तुशिल्प असे मानले जाते. वरील व्याख्येतील ' उद्दिष्ट ' हा शब्दमात्र व्यापक अर्थाने घेतला पाहिजे. मानवाची व मानवी समूहाची , वास्तुशिल्पाशी निगडित अशी अनेक उद्दिष्टे असतात. ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण लाभावे, विशिष्ट कार्य सुकरतेने पार पाडता येईल, अशी त्यांची रचना असावी इत्यादी उद्दिष्टे शरीराशी निगडित असतात; तशीच विशिष्ट इच्छांची व आशा-आकांक्षांची त्यातून पूर्ती व्हावी, जीवनातील विशिष्ट क्षेत्रातील मानवी प्रयत्नांना प्रतीकरूप लाभावे, अशी काही मानसिक व आत्मिक उद्दिष्टेही असतात. वास्तुशिल्पाच्या निर्मितीत ती सगळीच लक्षात घ्यावी लागतात. म्हणूनच वास्तुशिल्पकृतीला जसे संवेदनागम्य असे ' प्रत्यक्षरूप ' असते, तसेच भावगम्य ' प्रतीकरूप ' ही असते. मनात कल्पिलेले हे रूप प्रत्यक्षात आणताना, वास्तुशिल्पज्ञाला, निरनिराळ्या साधनवस्तूंचा उपयोग करावा लागतो. त्या साधनांची गुणवत्ता, ती वापरण्याच्या योग्य रीती, भूमीचे गुणधर्म, ऊन, वारा, पाऊस यांचे परिणाम, हे सर्व जसे लक्षात घ्यावे लागते, तसेच विशिष्ट मानवी समूहाचा सांस्कृतिक वारसा ध्यानी घेऊन, सुस्थिर, सौष्ठवयुक्त अशी वास्तुशिल्प कृती निर्माण करावी लागते. म्हणून वास्तुशिल्प हे शास्त्रही आहे, आणि कलाही.

वास्तुशिल्पातील प्रमुख कल्पना ' नव-रूप-निर्मिती ' ही आहे. अवकाश व आच्छादन या दोहोंचाही संवादी उपयोग करून, त्यांना विशिष्ट उद्दिष्टांनी भारून वास्तुशिल्पज्ञ वास्तुकृती निर्मितो. याकरता वास्तुशिल्पज्ञाला स्पर्श, रूप, दृक्,

गंध, नाद, या संवेदनांबद्दल प्रकाश, छाया, रेषा, आकार, घनता, रंग, पोत, अवकाश या निर्मितिघटकाबद्दल, तसेच साधन-वस्तूच्या प्रत्यक्ष प्रतीकात्म व सौष्ठवपूर्ण अशा गुणधर्मांबद्दल तरल जाणीव असावी लागते. अशा तरल जाणिवेतून निर्मिलेल्या अनेक कृतींच्या परस्परानुरूप सुजाण रचनेतून, माणसाच्या सर्वांगीण विकासाला व स्वास्थ्याला साहाय्यभूत होईल, असा परिसर निर्मिला जावा, हे वास्तुशिल्पाचे उद्दिष्ट असते. वास्तुशिल्प अवकाश निर्मित नाही, तर ते अवकाशाची बंदीश निर्माण करते.

डोंगरात खोदलेल्या गुहा आणि झाडाच्या फांद्या आणि पाने यांनी घडविलेल्या झोपड्यांपासून वास्तुशिल्पाची सुरुवात झाली. मानवाच्या प्रगतीत काळाबरोबर बदलत गेलेल्या, व्यक्तिगत व सामूहिक जीवनाच्या कल्पना व गरजा, तसेच विज्ञानाच्या वाटचालीत उपलब्ध होत गेलेली नवीन साधने व ती वापरण्याची रीती यातून वास्तुशिल्पाचे रूप घडत व बदलत गेले. ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहिले तर, औद्योगिक क्रांतीपर्यंत, वास्तुशिल्पाचे दोन समांतर प्रवाह वाहत असताना दिसतात. एक, धर्म व संरक्षण याच्या गरजांतून निर्माण झालेली वास्तुशिल्पे. त्यांचे प्रणेते, धर्मगुरू वा धर्मसंस्था, तसेच राजे, अमीर-उमराव किंवा सत्तेची केंद्रस्थाने, हे असत. त्या त्या काळातील उत्तमोत्तम वास्तुशिल्पज्ञ व कारागीर यांच्या करवी, ती वास्तुशिल्पे बांधली जात असत. भव्यता, भक्कमपणा व सौंदर्य ही या वास्तुशिल्पांची प्रमुख लक्षणे असत. त्या चिरंतन किंवा निदान काही शतके तरी टिकाव्या अशी त्यांची घडण असावी, असा प्रयत्न केला जात असे. या सर्वांना ‘ स्मारक–वास्तुशिल्पे ’ असे म्हणता येईल. वास्तुशिल्पाचा इतिहास, म्हणजे त्या त्या काळी निरनिराळ्या संस्कृतींनी बांधलेल्या धार्मिक वास्तू, किंवा राजवाडे, प्रासाद, किल्ले, यांचा इतिहास असेच आजही मानले जाते. या काळात सामान्य माणसाच्या सांस्कृतिक गरजा पुऱ्या करण्यासाठी अनेक वास्तू व वास्तुकल्प बांधले गेले. नाही असे नाही. परंतु त्यांच्यामागची प्रेरकशक्ती ही सामान्य माणसाच्या गरजा पुऱ्या करणे यापेक्षा, दात्याचे दातृत्व चिरंतन करणे, त्याचे स्मारक उभारणे, हीच असे. पिरॅमिडस्, पार्थेनॉन, रोमचे फोरम्स, मध्ययुगीन युरोपातील चर्चेस्, भारतातील देवालये, ताजमहाल, ही या ‘ स्मारक–वास्तुशिल्पा ’च्या प्रवाहातील ठळक उदाहरणे. पण या प्रवाहाहूनही पुरातन व नंतर या प्रवाहाशी समांतर असा दुसराही एक प्रवाह मानवाच्या इतिहासात आढळतो. तो म्हणजे त्या त्या काळात देश-कालपरिस्थित्यनुरूप, माणसाने आपल्या वैयक्तिक व सामूहिक गरजा भागविण्यासाठी निर्माण केलेली घरे, निवासस्थाने, ग्रामे, शहरे, नगरे, हा होय. ही सर्व निर्माण करणारे काही वास्तुशिल्पज्ञ नव्हते. सामान्य माणसेच होती. धडपड करीत, चुकांतून शिकत, ती आपल्या गरजा स्वतःच पुऱ्या करीत होती. इंका, मोहेंजोदाडो–हडप्पा या संस्कृतींनी निर्मिलेली नगरे; घनदाट अरण्यातील आदिवासींच्या झोपड्यांचे समूह; समुद्रकिनाऱ्यालगतच्या कोळी मासेमाऱ्यांच्या वस्त्या; जपानमधील लाकडातून बांधलेली, बागेच्या पाण्याच्या साहचर्याने जगणारी छोटी घरे ही त्या त्या निसर्गरूपाशी संवाद साधत,

त्यांचाच भाग होऊन जात. ही सर्व वास्तुशिल्पे आजूबाजूच्या परिस्थितीत आपले स्वत्व टिकविण्याच्या माणसाच्या धडपडीची साक्ष देतात, तसेच वास्तुशिल्पनिर्मिती हा सतत मानवाच्या नवरूपनिर्मितीच्या समग्र आविष्काराचाच एक भाग होता हेही दर्शवितात. ह्यांना "लोक-वास्तु-शिल्प" असे म्हणता येईल. वास्तुशिल्पाचा हा प्रवाह अधिक स्वयंस्फूर्त जीवनेच्छेने भारलेला, सकस, निसर्गाला जवळचा, अधिक वैचित्र्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण असा असलेला आढळतो. पण वास्तुशिल्पाच्या या प्रवाहाचा अजून चांगला अभ्यास झालेला नाही. इतिहासही उपलब्ध नाही.

औद्योगिक क्रांतीनंतर या दोन प्रवाहांचा संगम झालेला दिसतो. औद्योगिक क्रांतीनंतर जीवनविषयक कल्पनांतच आमूलाग्र बदल झाला. राजसत्तेच्या जागी लोकसत्ता आली. सामान्य माणसाच्या गरजा, आशा-आकांक्षा यांना केंद्रस्थान मिळाले. विज्ञानाच्या प्रगतीने, जीवन अनेक दिशांनीं समृद्ध झाले. वास्तुशिल्पाच्या क्षेत्रातही महत्त्वाचे बदल झाले. दगड, विटा, लाकूड, संगमरवर या जुन्या साधनवस्तूंच्या जोडीला, लोखंड, कॉंक्रीट, अल्युमिनियम्, प्लॅस्टिक्स, पॉलिथिलीन इत्यादी नवीन साधने उपलब्ध झाली. गृहबांधणीच्या साधनात, यंत्र हे एक प्रमुख साधन गणले जाऊ लागले. प्रत्यक्ष जागेवर घडणारे बांधकाम, या जुन्या रीतीबरोबरच, कारखान्यात आधीच तयार केलेल्या अनेक घटकांचे, प्रत्यक्ष जागेवर 'संकलन' ही रीत प्रचलित झाली. वास्तुशिल्पाच्या सुस्थिरतेच्या, व सौष्ठवाच्या कल्पना, ज्या नेहमीच साधने व ती वापरण्याच्या रीती, यांच्याशी निगडित असतात, त्यांच्यात, या दोहोत झालेल्या बदलाबरोबर बदल झाला. अलंकृततेचा, डामडौलाचा, किंवा जुन्या भक्कमपणाच्या कल्पनेचा अभाव, आत्यंतिक साधेपणा; स्वच्छ नेटक्या, स्पष्ट बाह्यरेषा असलेले थोडेच घनाकार, आणि त्यांची समतोल रचना; नवीन साधनांबरोबर आलेला हलकेपणा, तसेच उद्दिष्टांच्या अधिक सखोल व तरल जाणिवेतून साधले जाणारे अपरिहार्य असे प्रत्यक्ष व प्रतीकरूप ही औद्योगिक क्रांतीनंतरच्या वास्तुशिल्पाची वैशिष्ट्ये आहेत असे म्हणता येईल.

परंपरा आणि नवता यांतील सनातन संघर्षाचा प्रत्यय इतर सर्व कलांपेक्षा वास्तुशिल्पात अधिक ठळकपणे येतो, कारण वास्तुशिल्पाच्या 'उपयोग' आणि संस्कृतीचा एक प्रबळ आविष्कार या दोन्ही नात्यांतून ती कला मानवाच्या फार जवळ येते. संस्कृतीचे पाउलठसे वास्तुशिल्पांनीच चिरंतन केलेले आहेत. त्यांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, कोणत्याही काळात किंवा देशात, परंपरेला चिकटून राहून तिचे अंधानुकरण करण्यात कृतकृत्यता मानणाऱ्यांनी संस्कृती समृद्ध केलेली नाही, तर जे सृजनशील कलावंत संस्कृतीचा गाभा सहजगत्या ओळखत होते, नवीन साधनांचा व वास्तुविषयक कल्पनांचा प्रयोगशील उपयोग करीत होते, व आपल्या आजूबाजूच्या सर्व परिस्थितीशी संबंध राखतानाही स्वतःशी प्रामाणिक राहून आविष्कार करीत होते, अशांच्याच कृतीतून संस्कृती समृद्ध झालेली आहे.

आधुनिक काळातील वास्तुशिल्पाच्या स्वरूपावर व वास्तुशिल्पविषयक कल्पनांवर अशा अनेक सृजनशील कलावंतांच्या कृतींचा व कल्पनांचा ठसा उमटला आहे. फ्रँक लॉइड राइटने आधुनिक वास्तुशिल्पाला, साधनांच्या स्वतंत्र गुणवत्तांची जाणीव, निसर्ग व वास्तुशिल्प या दोहोंतील नात्याची सखोल समज व काव्यात्म वृत्ती दिली; ल कॉर्ब्यूझिएने औद्योगिक क्रांतीने आणलेले यंत्रयुग पूर्णपणे स्वीकारले, आणि अशा युगात, कलात्मकता राखून वास्तुशिल्पनिर्मिती कशी होऊ शकते हे, फ्रान्समधील 'रोशाँ' येथील चर्चमधून, मार्सेय येथे बांधलेल्या फ्लॅटस् मधून, व नगररचना कशी होऊ शकते हे चंदिगडमधून, दाखविले. त्याच्या विचाराचा, कलाकृतीचा ठसा, जपानपासून ब्राझीलियापर्यंत, जगातल्या वास्तुकृतींवर, व वास्तुशिल्प व नगररचनाविषयक कल्पनांवर झालेला आढळतो. वॉल्टर ग्रोपियसने, वास्तुशिल्पाला एका दिशेने इतर कलांशी व दुसऱ्या दिशेने यंत्रयुगाशी जोडले. त्यांच्या, मूलभूत अशा विचारांचा तसेच त्याने चालविलेल्या, जर्मनीतील 'बाऊहाअस्' या शिक्षणसंस्थेत एकत्र झालेल्या, अनेक कलावंत व यंत्रज्ञ यांनी केलेल्या निरनिराळ्या प्रयोगांचा सखोल परिणाम, वास्तुकलेवरच नव्हे, तर चित्र, शिल्प, रेखाटन या कलांवर तसेच यंत्रोत्पादित वस्तूंबद्दलच्या सौंदर्यकल्पनांवरही झालेला दिसतो. मसि व्हॅन द रोहचे ब्रीद-वाक्य "जितके उणे, तितके अधिक" हे होते. त्याच्या संयमित वास्तुकृती ग्रीक वास्तु-शिल्पाची आठवण करून देतात. नेर्व्ही हा इंजिनिअर आहे, परंतु नवीन साधनांच्या व घडणतत्त्वाच्या उपयोगातून वास्तुशिल्पनिर्मितीच्या कक्षा किती विस्तारू शकतात हे त्याने दाखविले. लुइ कहान, फुलर, यामासाकी, ऑस्कर नीमर, यांच्या वास्तु-कृतींचा, व वास्तुविषयक व नगररचनाविषयक कल्पनांचा मोठाच परिणाम आधुनिक वास्तुशिल्पावर झालेला आढळतो. या कलावंतांपैकी अनेकांनी आपल्या कलाकृतींवर तसेच कल्पनांवर पुष्कळसे लिहिलेही आहे. चंदिगड, ब्राझिलिया या प्रसिद्ध राजधान्या, युनायटेड नेशन्सची वास्तू, तसेच वरील प्रतिभासंपन्न वास्तुशिल्पज्ञांच्या कलाकृती ही आधुनिक वास्तुशिल्पाची पाउले आहेत. अंतराळ यात्रेच्या या युगात इतर ग्रहांवरही ही पावले उमटतील अशी चिन्हे आज दिसू लागली आहेत.

२. भारताची वास्तुशिल्पाची परंपरा हीही अतिशय संपन्न, विविधतापूर्ण व गुणवत्तेने मोठी अशी आहे. हा देश, हा खरोखरच एक भूखंड असावा इतका मोठा आहे, आणि या एकाच देशात, जगात आढळणारी सर्व तऱ्हेची निसर्गरूपे, हवामान, आणि साधनांचे वैपुल्य आढळते. जगातील अती पुरातन अशा संस्कृतीची ही भूमी आहे; अनेक संस्कृतींचा संगम या देशात झालेला आहे, आणि म्हणून जगातील इतर फारच थोड्या देशांना दाखवता येईल एवढे वास्तुशिल्पाचे वैभव भारतात आढळते. वर उल्लेखिलेल्या दोन्ही प्रवाहांनी भारतीय वास्तुशिल्प समृद्ध झाले आहे. दक्षिण भारता-तील मद्रास, मदुरा, कांजीवरम्, रामेश्वर येथील उत्तुंग गोपुरे असलेली मंदिरे; मध्य भारतातील, डोंगरकपारींतून खोदलेली अजंठा-वेरुळ येथील वास्तुशिल्पे, उत्तर

भारतातील सांची, भूवनेश्वर, कोणार्क येथील बौद्ध व हिंदू काळातील स्तूप व देवळे, मोगल-मुसलमान अमदानीतील भव्य प्रासाद, स्मारके व राजशाही किल्ले; त्याचबरोबर त्रावणकोर, कोचीन, मंगलोर, कोकणपट्टी व बंगालच्या समुद्रकिनाऱ्यावरील नारळ-पोफळींनी वेढलेली गावे; पोर्तुगीज संस्कृतीचा परिणाम दाखवणारा गोवा; पठारावरील शेती व व्यापार-उदीमात गुंतलेल्या समाजाने निर्मिलेली तालुका-जिल्ह्याची ठिकाणे व तिथल्या बाजारपेठा; म्हैसूर, हैदराबाद, बडोदे, उदयपूर, जयपूर या जुन्या संस्थानांच्या राजधान्या आणि राजधान्यांची राजधानी वाटणारी नवी दिल्ली, बर्फाच्छादित हिमालयाच्या कुशीत वसलेली उत्तर हिमाचल, काश्मीरमधील गावे हा भारतीय वास्तु-शिल्पाचा वारसा आहे.

भारताच्या एका भागाच्या–महाराष्ट्राच्या-वास्तुशिल्पाच्या परंपरेचा विचार करण्यापूर्वी, महाराष्ट्राचा सांस्कृतिक पिंड कोणता, व तो तसा घडण्याची कारणे काय, याकडे पाहिले पाहिजे. भारताच्या नकाशाकडे बघितले की महाराष्ट्र हा भारताच्या मध्यस्थानी वसला आहे असे आढळते. भारताचे भौगोलिक अंतराच्या दृष्टीने केंद्र कल्पिले, तर ते नागपूर हे होते. उत्तर भारतातून दक्षिणेकडील भागात जावयाचे, तर महाराष्ट्रातूनच जावे लागे. आणि त्यामुळे इतिहासातील महाराष्ट्राचे नाव 'दक्षिणापथ' हे सार्थ वाटते. (महाराष्ट्रावर राज्य करणारे प्राचीन राजे 'दक्षिणापथस्वामी' हे बिरुद मोठ्या अभिमानाने लावीत) या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे महाराष्ट्र हा उत्तर व दक्षिण भारतातील संस्कृतींच्या संगमाचे, तसेच संघर्षाचे आपोआपच क्षेत्र झाले. त्यामुळे महाराष्ट्रीय संस्कृतीचा पिंड, निरनिराळ्या संस्कृतींच्या संस्कारांना आत्मसात करणारा, निरनिराळ्या संघर्षांना तोंड देताना चिवटपणे आपले अस्तित्व सांभाळणारा झाला. या संस्कृतीच्या संमिश्रतेचा प्रत्यय महाराष्ट्रात आढळणाऱ्या आर्य, नाग, द्राविड, शक, यवन, पारसिक अशा विविध मानववंशांच्या सहअस्तित्वातूनही आढळतो. अशा संस्कृतीला बाहेरून येणारे संस्कार पचविण्याची, आत्मसात करण्याची व बदलतानाही स्वत्व राखण्याची लवचिकता व ताकद असावी लागते. तसा लवचिक-पणा व ताकद हा महाराष्ट्रीय अस्मितेचा स्थाईभाव आहे. सतत निरनिराळ्या संघर्षांना तोंड द्यावे लागल्यामुळे, जीवनातील प्रत्येक आविष्कारात 'स्वसंरक्षण' ही महाराष्ट्रीय पिंडाची मूळ प्रकृती बनलेली आहे.

महाराष्ट्राचा भूभागही, भारतातील इतर प्रदेशांहून निराळा, वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर कोठेही उभे राहिले तरी, परिसरात, आसमंतात किंवा क्षितिजावर, एखादा डोंगर, पहाड, किमान टेकडी तरी दिसतेच. हा भूभाग म्हणजे सह्याद्री, विंध्य, सातपुडा यांच्या एकसंध दगडी कड्यांनी व त्यातील खोल दऱ्यांनी आकारित केलेली एक आगळी 'वास्तुवंदीश'च आहे! गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र देश हा 'दगडांचा देश' आहे. अशा परिसरात वाढलेला इथला माणूसही म्हणूनच सुदृढ, चिवट पिंडाचा, संकोची, ठेंगणा-ठुसका, मध्यम बांध्याचा असा आहे.

आकाशाला भिडणाऱ्या प्रचंड पहाडांचे व खोल दऱ्यांचे नैसर्गिक वास्तुशिल्प सदैव समोर उभे असल्यामुळे, महाराष्ट्रीय माणसाच्या वास्तुविषयक जाणिवाही निराळ्या झाल्या आहेत. परिस्थितीने मनात रुजवलेली "स्वसंरक्षणाची कल्पना," या भूप्रदेशातच प्रत्यक्ष रूपाने साकार झालेली सतत पाहताना, वास्तुरूपावर, नगररचनेवरही तिचा परिणाम होणे अपरिहार्य होते. गड, दुर्ग, नगराचे कोट, घरांची विशिष्ट रचना हे तिचेच आविष्कार. भूभागाच्या उंचसखलपणामुळे 'विस्तृतपणा'ची जाणीवही येथे संकोचली. वास्तुशिल्पेही आटोपशीर, सुदृढ, साधी, "स्थूल व कृशहिन" अशी झाली. ज्या प्रदेशाची आकाशरेषा चिरेबंद, आकाशाला भिडणाऱ्या कड्यांनी आरेखिली तिथे 'उंच' वास्तू निर्माण करणे अप्रस्तुत ठरले. कुतुबमिनाराचे कौतुक राहिले नाही. दौलताबादच्या डोंगराच्या पार्श्वभूमीवर अमहाराष्ट्रीय बहामनी राजांनी बांधलेली, देवगिरीची 'चार' मिनार ही वास्तुकृती बघितल्यावर हे सहजगत्याच जाणवते. या सर्वांतून महाराष्ट्रीय वास्तु-शिल्पाचा घाट निश्चित झाला.

असा हा महाराष्ट्रप्रदेश, हा दगडांचा देश आहे. महाराष्ट्रभूमीचा कणाच दगडाचा आहे; जिथे दगड संपतो, तिथे महाराष्ट्रही संपतो. 'डेक्कन ट्रॅप' या नावाने ओळखला जाणारा हा दगड एकसंध, अतिशय कणखर, व कोरण्यास कठीण असा आहे. हा दगड हे महाराष्ट्रीय वास्तुशिल्पीचे आदि-आविष्कार माध्यम होते. नेवासे येथील उत्खननात अनेक शिल्पे सापडली आहेत व त्यांचा काळ इ. स. पूर्व १०००० ते इ. स. पूर्व ५०,००० वर्षांच्या दरम्यानचा असावा असे मानले जाते. आदिमानव काळातील हा दाखला सोडला तरी, इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून इ. स. बाराव्या शतकापर्यंत, महाराष्ट्र सतत या दगडात "कोरत" होता, याला इतिहासाचाच पुरावा आहे. १५०० वर्षांची ही कोरण्याची परंपरा, हे महाराष्ट्राच्या वास्तुशिल्पाचे एक मोठे वैशिष्ट्य आहे, आणि महाराष्ट्रातील वास्तुशिल्पींच्या या कर्तृत्वाला इतरत्र कोठेही तोड नाही. भारतात दगडातून कोरलेली सुमारे १२०० लेणी आहेत, व त्यांतील ११००, ही महाराष्ट्रात आहेत. अनेक शतके या माध्यमात काम करताना महाराष्ट्रीय वास्तु-शिल्पज्ञांनी, या माध्यमाला सर्वस्वी आपले केले होते, त्याच्या स्वत्वाचा आदर करतानाही त्याच्यावर कबजा मिळवला होता याची साक्ष जोगेश्वरी, कान्हेरी, कार्ला, घारापुरी, अजंठा, वेरूळ व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आढळणारी असंख्य कोरीव वास्तुशिल्पे देतात. या वास्तुशिल्पकृती हीनयान, महायान बौद्धपंथी, तशाच जैन व वैदिक पंथी आहेत; पण त्या कोणत्याही धर्मपंथाच्या असल्या तरी महाराष्ट्राचा मूळ व खरा ऐहिक धर्म 'कोरणे' हा होता हेच सिद्ध करतात.

महाराष्ट्राच्या या, कोरीव वास्तुशिल्पाच्या १५०० वर्षांच्या परंपरेची अनेक लक्षात घेण्याजोगी वैशिष्ट्ये आहेत. कोरीव लेणी, ही त्या त्या धर्मपंथातील भिक्षूंची पावसाळी निवासस्थाने होती. त्यांचे आश्रयदाते, जसे राजे, प्रधान, सामंत, मांडलिक हे होते, तसेच बुरूड, कोळी, तेली या व्यवसायश्रेणींचे समूह व्यापारी व श्रद्धावान

सामान्य माणसे हीही असत, इतकेच नव्हे तर परदेशातून येथे येऊन स्थायिक झालेले व एतद्देशीय धर्मांचा स्वीकार केलेले यवन, क्षत्रप, पल्हव आदी समाजही या कार्यात सक्रिय मदत करीत असत, असे उल्लेख सापडतात. या अर्थाने, ही 'स्मारक-वास्तु-शिल्पे' खरोखर 'लोक-वस्तु-शिल्पे'च होती. या सर्व कृतींत वास्तुकला व शिल्पकला यांचा पूर्णतया समन्वय झालेला आढळतो. दगडांतून कोरीव काम करण्याचे तंत्र हे 'बांधीव' किंवा 'घडीव' वास्तुशिल्पांच्या तंत्राहून अगदी वेगळे असते, व त्याचा सखोल अभ्यास त्या काळातील वास्तुशिल्पींनी केलेला होता. अगदी प्रारंभीच्या काळात खोदली गेलेली लेणी ही त्या त्या डोंगराच्या पायथ्याशी सापडतात. ती अतिशय साधी, लहान, ओबडधोबड अशी होती. त्यांच्यातील खोदलेले खांब, हे साधे, चौकोनी व वरच्या प्रचंड दगडाचा भार सहन करण्याकरता, तिरके असलेले आढळतात. नंतरच्या काळातील लेणी, क्रमशः डोंगराच्या वरच्या भागात व अखेरीस टोकाजवळ कोरलेली असत. या लेण्यांत खांबांच्या रांगा असलेले विस्तृत सभामंडप, विहार असत. आतल्या अवकाशाला प्रमाणबद्धता यावी यासाठी, उंचीही अधिक असे व त्या मंडपाचे छत सपाट किंवा 'शैलगुहाकार' असून कोरलेले असे. खांब, तुळया याही अधिक सौष्ठवपूर्ण असत, आणि सभामंडपाच्या भिंती 'चित्रांनी' सुशोभित केलेल्या असत. आतल्या भागात प्रकाश यावा यासाठी, काही लेण्यांत प्रवेशद्वाराच्या खांबावर ठेवलेल्या दगडी तुळईवर, एक, पिंपळाच्या पानाच्या आकाराचे भव्य गवाक्ष असे. त्याचा आकार कमानीचा होता, पण ती 'रचलेली' कमान नव्हती. एकसंध शिळेतून कोरलेली कमान होती. या सर्व काळात, वास्तुशिल्पींनी खोदकामाच्या व कोरण्याच्या तंत्रावर अधिकाधिक प्रभुत्व मिळविले. वेरूळचे कैलास लेणे, हे डोंगराच्या टोकावरील एक प्रचंड शिळा, आजूबाजूच्या दगडांतून प्रथम मोकळी व निराळी करून, व नंतर ती कोरत तिला वास्तुशिल्पाचा संपूर्ण आकार देण्यातून निर्माण झालेले आहे. घारापुरी-वेरूळच्या या कोरीव शिल्पात या परंपरेचा अंतिम आविष्कार, परमकोटीला गेलेला दिसतो. त्यानंतरच्या काळात मात्र या परंपरेत घसरण सुरू झाली. तिचे पर्यवसान, दगडात कोरलेल्या तुळयांवर, लाकडी तुळयांचे पोत हुबेहुब दर्शविण्यात होऊ लागले व इ. स. बाराव्या शतकात ही परंपरा खंडित झाली.

या सर्व काळात, नगरातील निवासस्थाने विटा, मातीचे बांधकाम व लाकूड यांतून बांधलेली असत. या घरांतून मातीच्या बांधकामातील जाड भिंती आढळत असल्या, तरी घराचे आधार-घटक हे नेहमी लाकडाचे खांब, तुळया, वगैरेच असत. सहाव्या शतकाच्या सुमारास चिरेबंद दगडांतून घडविलेल्या 'बांधिव' शिला-वास्तूंची परंपरा सुरू झाली. याच सुमारास यज्ञसंस्थेचा लोप होऊन सगुण उपासनेचा प्रारंभ झाला, व बौद्ध, जैन व वैदिक या तिन्ही धर्मपंथांनी मूर्तिपूजेचा अंगिकार केला. या काळात वास्तुशिल्पा बरोबरच 'मूर्तिशिल्पे' प्रचलित होऊ लागली, आणि या दोहोचाही पहिला आविष्कार देवालयाच्या घडणीत झाला. "स्वर्गप्राप्तीची इच्छा धरणाऱ्यांनी देवालये बांधावी"

(विष्णुधर्मोत्तर पुराण) ही कल्पना दृढ झाली व गावागावांतून देवालयांची स्थापना होऊ लागली. देवालय हे खेड्यातील, गावातील व शहरातील एकमेव श्रद्धास्थान बनले. दूरवरून, एखाद्या मानवी वसतीचे अस्तित्व, क्षितिजरेषेवर दिसणाऱ्या शिखराने ओळखले जाऊ लागले, व ग्राम आणि नगर-रचनेचा, देवालय हा केंद्रबिंदू बनला. चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य व यादव वंशातील राजांनी, तसेच मौर्य, कदंब, शिलाहार आदी सामंत-महासामंतांनी बांधलेली असंख्य देवालये महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. त्यातील पंढरपूरचे विठोबाचे देवालय, उमरावती येथील आदित्य मंदिर, वहाळ येथील भवानी मंदिर, एलिचपूरचे विष्णुमंदिर, नेवासे येथील ज्ञानेश्वर-कालीन मोहिनीराजाचे देऊळ, शिलाहारांनी बांधलेली कोल्हापूरची जैन व हिंदू मंदिरे. तळ व उत्तर कोकणातील, तसेच वऱ्हाडातील प्रसिद्ध देवालये, यांचा उल्लेख केला पाहिजे. या बांधीव शिलावास्तुशिल्पाचा परमोच्च आविष्कार हा, शिलाहार राजा छित्तराज याचा भाऊ मुम्मणी याने बांधलेल्या अंबरनाथ येथील प्रसिद्ध देवालयात, तसेच सिन्नर येथील श्रीगोंदेश्वराच्या देवालयात आढळतो. यातील बरीचशी देवळे 'हेमाडपंथी' शैलीतील होती. शिलावास्तूच्या निरनिराळ्या परंपरा व शैली यांचा उल्लेख वराहमिहिराची बृहत्संहिता, विष्णुधर्मोत्तर पुराण, मायामतम् पञ्चरात्र, समरांगणसूत्रधार काश्यप आदी ग्रंथांत आढळतो.

या लोकवास्तुशिल्पाच्या काही प्रमुख वैशिष्ट्यांचा येथे उल्लेख केला पाहिजे. महाराष्ट्रात त्या सर्व काळात ग्रामे व छोटी नगरे यांची आर्थिक स्वायत्तता परिपूर्ण होती. शेत जमिनी, गावातील भूमी व तीवरील वास्तू यांवर मालकाचा संपूर्ण हक्क असे, व राजसत्ता तो मानत असे. परकीय सत्ता आल्या, त्यांनी राज्ये स्थापिली, परंतु ग्रामे व छोटी नगरे यांच्या कडून फक्त खंड वसूल केले, त्यांच्या अस्तित्वाला किंवा स्वायत्त-तेला धक्का लावला नाही. त्यामुळे ग्रामे किंवा छोटी नगरे त्यांच्या दृष्टीने स्वसंरक्षणाचा प्रश्न तितका महत्त्वाचा नव्हता. या ग्रामांची व त्यांतील घरांची रचना मोकळी व बहिर्मुख अशी असे, परंतु मोठ्या शहरांच्या भोवती मात्र कोट असत, त्यातील घरे व वाडे, यांची रचना अंतर्मुख असे, कारण परकीय राजसत्तेच्या, राज्यसंस्थापनेतील एक महत्त्वाची पायरी, ही शहरे काबीज करणे, ही असे. घरांच्या किंवा वाड्यांच्या रचनेत तळघरे व भुयारे यांना महत्त्वाचे स्थान होते. उन्हाळ्याच्या ऋतूत ही तळघरे शीतळाई देत, हा त्यांचा उपयोग होताच, पण त्यापेक्षा महत्त्वाचा उपयोग हा धान्य, जडजवाहर व मोक्याच्या प्रसंगी जीवितालाही संरक्षण मिळावे, हा होता. यातील काही भुयारे, गावातल्या वाड्यातून थेट गावाच्या वेशीपलीकडे बाहेर काढलेली होती, असे आजही आढळते. शिवाजीराजांनी बहामनी संस्कृतीचा परिणाम पचवून महाराष्ट्रात ३०० गड बांधले व दुरुस्त केले असा इतिहासात दाखला आहे. देवालये, गड, दुर्ग यांबरोबरच, राजप्रासाद, वाडे, मठ, परकोट, बाहुल्या (खोल, मजले असलेल्या विहिरी), धर्मशाळा, तलाव, घाट, पुष्करिणी, छत्र्या, समाध्याही बांधली जात असत. त्यांचे

उल्लेख, सोमेश्वराचा अभिलाजितार्थ चिंतामणी (मानसोल्लास), वराह मिहिराची बृहत्संहिता, यादवकालीन शास्त्रीय वाङ्मय, महानुभव कवी नारायण व्यास बहाळिये याचा ‘ ऋद्धिपुरवर्णन ’ हा ग्रंथ, व महानुभावांच्या समग्र वाङ्मयात आढळतात.

मुसलमानी राजसत्तेशी महाराष्ट्राचा संघर्ष अनेक शतके चालू होता, तरीही मुसलमानी आमदानी महाराष्ट्रप्रांतात सातत्याने व दीर्घ काळपर्यंत रुजू शकली नाही. त्यामुळे मुसलमानी वास्तुशिल्पकृती, विजापूरचा गोलघुमट, काही मशिदी व किल्ले, अशी थोडीच उदाहरणे सोडली, तर महाराष्ट्रात दाखवता येत नाहीत. त्याची प्रतही ज्या इतर प्रांतांत मुसलमानी राजसत्ता अनेक शतके स्थायिक झाली होती तेथल्या वास्तुशिल्पाच्या मानाने हीण अशीच होती. मुसलमानी संस्कृतीचा परिणाम महाराष्ट्रीय जीवनावर व वास्तुशिल्पावर सर्वदूर पसरलेला दिसतो. मऱ्हाठी भाषेने फारसी शब्द व लकबी इतक्या आत्मसात केल्या, की आज त्या मूळ भाषेपासून निराळ्या काढून दाखविणेही अशक्य झाले आहे. वाड्यातील भागांची नावे दिवाणखाना, मुदपाकखाना, गुसलखाना, जवाहरखाना, अशी झाली, व त्या काळातील मंदिरांवरही मशिदीच्या वास्तुशिल्पाची छाप पडली.

नंतरच्या ब्रिटिश राजवटीत पुनः सर्व बदलले. प्रत्येक स्थिर झालेली राजसत्ता, जिंकलेल्या प्रांतावरील आपले स्वामित्व, नवीन, आपल्या शैलीत निर्मिलेल्या वास्तु-शिल्पांचे रूपाने प्रस्थापित करीत असते. युरोपातील तो काळ ‘ रिनेसान्स ’चा होता, आणि ग्रीक व रोमन वास्तुकला, घासून पुसून, नवीन तऱ्हेने पुनः प्रचलित होत होती. इंग्लंडमध्ये, मोठ्या प्रमाणावर या शैलीतील वास्तुशिल्पाच्या प्रतिकृती निर्माण होत होत्या, आणि या प्रतिकृतींच्या प्रतिकृती ब्रिटिशांनी भारतात, व विशेषकरून महाराष्ट्रात बांधण्यास सुरुवात केली. व्हिक्टोरिया टर्मिनस, जनरल पोस्ट ऑफिस व टाऊन हॉल या मुंबईतील प्रसिद्ध इमारती; जिल्ह्यांच्या ठिकाणी कलेक्टराकरता किंवा पी. डब्ल्यू. डी. च्या अधिकाऱ्यांकरता बांधलेल्या इमारती व बंगलेवजा निवासस्थाने, आणि त्या काळात, राजसत्तेला जवळ असलेल्या पारशी जमातीतील श्रेष्ठींनी बांधलेले ऐसपैस बंगले, ही या वसाहतवादी – ‘ कलोनियल ’–वास्तुशिल्पांची उदाहरणे. तसेच अनेक काल पोर्तुगीझ राजसत्तेखाली असलेल्या गोव्यातील शहरांवर, बाजारपेठांवर व घरांवर पोर्तुगीझ वास्तुशिल्पाची किती दाट छाया आहे, ते आजही आढळते. परंतु या सर्व काळातही, नवीन संस्कार आत्मसात करून, पचवून आपल्या मूळ पिंडाचा भाग करण्याची महाराष्ट्रीय प्रवृत्तीच सतत वरचढ ठरली असल्याचेच आढळते.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून, अनेक वर्षे, भारतातील वास्तुशिल्पाचे पुढारीपण मुंबईकडे होते. क्लॉड बॅटले या इंग्लिश वास्तुशिल्पज्ञाने आपली सर्व सृजनशील वर्षे भारतात घालविली. भारतीय वास्तुशैलीचा सखोल अभ्यास करून वास्तुकृती निर्मिल्या. वास्तुशास्त्राचे ज्ञान देणारी पहिली शिक्षण संस्था–सर जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर ही मुंबईतच सुरू झाली. त्या संस्थेतून शिक्षण घेऊन नंतर स्वतंत्र

काम करू लागलेल्या वास्तुशिल्पज्ञांच्या पिढ्या मुंबईत स्थायिक झाल्या, व विसाव्या शतकातील पूर्वार्धापर्यंत, सर्व भारतातील वास्तुकृतीच्या योजना मुंबईतूनच निर्माण होत होत्या. वास्तुशिल्पज्ञाची आजची तरुण पिढी अधिक सृजनशील, अधिक सखोल विचार करणारी आहे. ती आता भारतभर, तसेच महाराष्ट्रातही मुंबईखेरीज पुणे, सांगली, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबादपर्यंत पोहोचली आहे. त्यांनी निर्मिलेले, नगरपालिका, पंचायत समित्या व उद्योगसमूहांचे प्रकल्प, जुन्या शहरांचे नवीन विस्तार, मुंबईसारख्या शहराची बदलती आकाशरेषा, तसेच भारतात इतरत्र त्यांनी निर्मिलेली वास्तुशिल्पे, त्यांच्या सृजनशीलतेची साक्ष घडवितात. आजही भारतातील प्रमुख वास्तुशिल्पज्ञांमध्ये मराठीमंडळींचे कार्य फार चांगल्या दर्जाचे समजले जाते.

३. विसाव्या शतकात, सर्वच:तऱ्हेने, जग फार जवळ आले, लहान झाले. देशोदेशींच्या समाजांच्या आचारविचारांत, राहण्याच्या पद्धतींत समानता येऊ लागली. स्थानिक वैशिष्ट्ये या समानतेत पुसली गेली. याचा परिणाम वास्तुशिल्पाच्या क्षेत्रातही दिसतो. आधुनिक काळातील वास्तुशिल्प, त्या त्या प्रदेशांतील हवामान, साधनसामग्री यांच्याशी नाते ठेवून असले, तरी ते आता विशिष्ट प्रदेशाचे किंवा देशाचेही, असे सांगता येणे कठीण झाले आहे. असे होणे अपरिहार्य आहे. परंतु माणसामाणसांत जितकी समानता असते तितकीच स्वतंत्रता, व्यक्तिवैशिष्ट्येही असतात. माणसाला त्याच्या सर्वच व्यवहारात, या दोहोंतील सुवर्णमध्य साधावा लागतो. वास्तुकलाही त्याला अपवाद नाही.

औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात, वास्तुशिल्पाच्या रूपात, तसेच वास्तुविषयक कल्पनांत इतकी प्रगती झाली, की जी आधीची एकोणीस शतके एकत्रित करूनही दिसली नव्हती. पण त्यापेक्षा महत्त्वाचा भाग असा की, विसाव्या शतकाच्या वास्तुविषयक समस्या, आधीच्या सर्व शतकांपेक्षा वेगळ्या, अशा आहेत. विज्ञानाच्या व यंत्रशास्त्राच्या प्रगतीने ग्रामजीवन व नगरजीवन, आमूलाग्र बदलले. नैसर्गिरीत्या व गरजेनुसार स्थापिली गेलेली व वाढलेली जुनी नगरे, वस्तीत प्रचंड वाढ झाल्यामुळे व तिचे केंद्रीकरण झाल्यामुळे नवीन परिस्थितीला तोंड देण्यास असमर्थ ठरली. नवीन बांधल्या जाणाऱ्या घरांच्या संख्येपेक्षा ही वसतीवाढ कितीतरी पटीने अधिक असल्यामुळे गावोगावी गलिच्छ वस्त्या, झोपडपट्ट्या अतोनात फैलावू लागल्या. शहराचा पाणीपुरवठा ड्रेनेज, वीजपुरवठा इत्यादींवर विलक्षण ताण पडून या सर्व यंत्रणा मोडकळीस आल्या. जे रस्ते, निव्वळ पादचाऱ्यांसाठी होते, त्यांतून यांत्रिक वाहनांची अतिजलद वाहतूक सुरू झाल्याने, अनेक प्रश्न निर्माण झाले. मध्यवर्ती शहरापासून ३०–४० मैल दूर वसलेल्या उपनगरांतून रोजगारासाठी हजारो माणसे शहरात ये-जा करू लागली. या सर्वांमुळे आज नागरी जीवन असह्य होऊन गेले आहे. जगणे याचा अर्थ, स्वतःला जिवंत ठेवणे एवढाच उरला आहे.

ज्या इतिहासाचा आपण आतापर्यंत आढावा घेतला, त्याचाच दाखला असा

आहे की, वास्तुशिल्पाचे विशिष्ट कार्यक्षेत्र, देश-काल-परिस्थितीच्या कारणातून निश्चित होते, आणि वास्तुशिल्पज्ञाची कर्तबगारी, या परिस्थितीने निर्माण केलेल्या समस्यांना ते किती सृजनशीलतेने हाताळतात यांवरून ठरत असते. जगातील वास्तुशिल्पज्ञांपुढील आजचा खरा प्रश्न, मानवी जीवनाला सर्वार्थाने साहाय्यभूत होईल असा संपूर्ण परिसर निर्माण करणे, हा आहे; स्वतंत्र, सुंदर, पण एकमेव व विलग विलग अशी वास्तुशिल्पे निर्माण करणे, हा नव्हे. वास्तुशिल्पाचे क्षेत्र, त्यामुळे आज खूपच विस्तारले आहे. एका बाजूने त्याची कक्षा, ग्रामरचना, नगररचना, प्रदेशरचना व संपूर्ण परिसर-रचना यांना भिडते, तर दुसरीकडे, गृहांतररचना, फर्निचर तसेच घरात वापरण्यात येणाऱ्या सर्वच वस्तूंची सुयोग्य, सुंदर निर्मिती येथपर्यंत पोचते. आपोआपच वास्तु-निर्मिती म्हणजे एका वास्तुशिल्पज्ञाने निर्मिलेली एक कलाकृती हे तिचे स्वरूप बदलून अनेक शास्त्रे व कला यांतील तज्ज्ञांनी सामूहिकपणे केलेली निर्मिती, असे तिचे स्वरूप आज झाले आहे.

आज आपल्या देशातील खरी व प्राथमिक स्वरूपाची समस्या, अफाट वाढणाऱ्या शहरांना पुनः माणसांच्या वस्तीला योग्य असे करणे; झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या यांचे उच्चाटण करणे, राहण्याच्या घरांची आवश्यक असलेली प्रचंड संख्या, नवीन वस्त्यांची सुरचित बांधणी करून शक्य तितक्या लवकर पुरी करणे, ही आहे. नव-विकसित देशाच्या, भांडवल, तंत्रविद्या आणि तंत्रज्ञ यांच्या साऱ्या कमतरता लक्षात ठेवून हे कार्य करणे अतिशय अवघड आहे. आपल्या कार्याबद्दलचा दृष्टिकोण संपूर्णपणे बदलल्याशिवाय हे कार्य करता येणे अशक्य आहे, आणि हेच आज वास्तु-शिल्पज्ञांच्या तरुण पिढीला आव्हान आहे. वास्तुशिल्पज्ञांनी हे आव्हान स्वीकारावे. याकरता 'काल' थांबणार नाही, वाट पाहणार नाही, आणि दुर्दैवाने तसे झाले तर, याच समस्या अधिक बिकट होतील, अधिक भयंकर स्वरूप धारण करतील. याकरता बदलत्या काळाची चिन्हे, जितक्या लवकर वास्तुशिल्पज्ञ ओळखतील, तितके ते आपल्या देशाला भाग्याचे ठरणार आहे. अनेक वर्षे, महाराष्ट्राने भारतीय वास्तुशिल्पाचे पुढारीपण केले आहे. आजच्या काळाचे हे आव्हान स्वीकारून, नजीकच्या भविष्यकालातही, भारताच्या वास्तुशिल्पात, महाराष्ट्राने आपली परंपरा राखली पाहिजे.

चित्रपटसृष्टि

बापू वाटवे

भारतीय चित्रपटसृष्टीचा जन्म होऊन १९७१ साली साठावे वर्ष लागेल.

ज्या वेळी भारत स्वतंत्र नव्हता, ज्या काळी आजच्यासारखी विद्या आणि कला यांची प्रगती आणि भरभराट झाली नव्हती अशा वेळी एका महाराष्ट्रीय कलाकाराने इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशात आपल्या कलेची करामत दाखवून तिथल्या चोखंदळ आणि मार्मिक टीकाकारांकडूनही वाहवा मिळविली, इतकेच नव्हे तर तिथल्या सेसिल हेपवर्थ स्टुडिओसारख्या एका मातबर संस्थेने, त्या कलाकाराला त्याच्या गुणांवर प्रसन्न होऊन २५० पौंड पगाराची नोकरी व नफ्यात चार आणे भागी असा अपूर्व सन्मान देऊ केला, पण तो दुर्मिळ सन्मान त्या कलाकाराने नाकारला. ताठरपणाने अशा प्रकारचा नकार देणारा तो महाराष्ट्रीय माणूस एक मानी आणि महत्त्वाकांक्षी कलाकार होता. त्याचे कार्यक्षेत्र चित्रपटनिर्मिती हे होते आणि भारतातील त्या कलेचा तो आद्य-प्रवर्तक आणि जनक होता. आज भारतीय चित्रपटकलेचा जो कुतुबमिनार दिमाखाने उभा आहे त्याचा पाया रचून, त्याची जडणघडण करण्यासाठी उभा जन्म वेचणाऱ्या या महाशिल्पकाराचे नाव धुंडिराज गोविंद तथा दादासाहेब फाळके!...

१९१२ साल हे भारतीय चित्रपटसृष्टीच्या जन्माचे वर्ष असले तरी १५ एप्रिल १९११ हा भारतीयांच्या जीवनामधील महत्त्वाचा क्रांतिकारक क्षण होता. याच दिवशी येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील मूकपटासारखा श्रीकृष्णावर एखादा मूकपट तयार करण्याचा निश्चय दादासाहेबांनी घेतला व त्याच्या निर्मितीच्या तयारीला लागले. भांडवलाची जुळवाजुळव करून काही अत्यावश्यक यंत्रसामग्री आणण्यासाठी व चित्रपट स्टुडिओतील प्रत्यक्ष कामकाज पाहण्यासाठी १ फेब्रुवारी १९१२ रोजी त्यांनी भारताचा किनारा सोडला.

'बायोस्कोप' या साप्ताहिकाचे संपादक मि. केबर्न यांच्या हार्दिक सहकार्यामुळे या गोष्टी दादासाहेबांना शक्य होऊन १ एप्रिल १९१२ रोजी दादासाहेब परत भारतात

आले. मे महिन्यात यंत्रसामग्री येऊन ‘ रोपट्याची वाढ ’ हा एक मिनिटाचा लघुपट प्रथम चित्रित करण्यात आला. म्हणजे भारतीय चित्रपट-व्यवसायाचा प्रारंभ एका वाटाण्याच्या बीजारोपणापासून झाला.

चित्रपटकलेसाठी आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्या दादासाहेब फाळक्यांनी आपल्या चित्रपटासाठी कथा निवडली तीही सत्त्वशील राजा हरिश्चंद्राची. हे पहिलेवहिले भारतीय चित्र पुरे होईतो हरिश्चंद्रापेक्षाही अधिक खडतर अशा सत्त्वपरीक्षेतून दादासाहेबांना जावे लागले. राणी तारामतीचा धीरोदात्त आदर्श यथातथ्य निर्माण करण्यासाठी स्वतःच्या अर्धांगीला लंकेची पार्वती बनवावी लागली.

राजा हरिश्चंद्राबरोबरच ‘ पिठाचे पंजे ’ नावाचा एक विनोदी लघुपटही (सदतीसशे फुटांचा) त्यांनी तयार केला होता. मुंबईच्या टाइम्स पत्राचा संपादक युरोपियन असून त्याने भारताच्या या पहिल्या चित्रपटाची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती.

त्या वेळी आतासारखी अद्ययावत यंत्रसामग्री नव्हती, तंत्रज्ञ नव्हते, रसायनशाळा नव्हत्या, कुठलीही यांत्रिक वा तांत्रिक मदत नव्हती. दिवसा उन्हात खपून चित्रण करीत फिरावे, रात्री बरोबरच्या नटमंडळींना तंत्रज्ञ बनवून त्यांच्या मदतीने फिल्म जोडणे व तोडणे करावे लागे. आजच्यासारखी कच्ची फिल्मसुद्धा हवी तिथे मिळत नसे.

निर्माता, दिग्दर्शक, कथालेखक, छायालेखक, रसायनतज्ज्ञ, संकलक, रंगभूषाकार, प्रमुख नट आणि मजूरसुद्धा स्वतः दादासाहेब फाळकेच.

त्या काळी चित्रपटात काम करण्यासाठी नटी मिळणे अशक्यप्राय होते. आपल्या मिश्यांना सोडचिठ्ठी द्यायला तयार होणारे नट विरळाच. दादासाहेब स्वतः राजा हरिश्चंद्र व त्यांचा मुलगा रोहिदास ही पात्रे तर घरचीच होती. मिश्यांचा वियोग सहन करायला त्यांनी साळुंके नावाच्या एका नटाला तयार केला व चित्रपटासाठी अशा तऱ्हेने त्यांनी तारामती मिळविली.

अनंत कष्टांतून दादासाहेबांनी आपला चित्रपट पुरा केला. पण हा चित्रपट दाखवायचा कसा आणि कुठे ? कारण त्या वेळी मुंबईची बहुतेक चित्रपटगृहे भांडवलवाल्यांच्या वर्चस्वाखाली होती. दादासाहेबांचे हे चित्र दाखविण्याची हिंमत कोणत्याही चित्रपटगृहाच्या मालकाने दाखविली नाही. कारण त्या वेळी अमेरिकन चित्रांच्या सिरिअल्स धडाक्याने चालू असत. शेवटी नानासाहेब चित्रे या गृहस्थाने धीर करून सॅन्डहर्स्ट रोडवरच्या कॉरोनेशन चित्रपटगृहात दादासाहेबांचे चित्र दाखविण्याची तयारी दर्शविली व १७ मे १९१३ रोजी शनिवारी भारताचा पहिला मूकपट ‘ राजा हरिश्चंद्र ’ प्रदर्शित झाला. या पहिल्या असामान्य भारतीय कलाकृतीला मराठी प्रेक्षकांनी साथ दिली नाही. उदार आश्रय दिला, अलोट कौतुक केले ते गुजराथी, पारशी यांसारख्या अन्य भाषिकांनी.

चित्रपटाचे पहिले परीक्षण प्रसिद्ध झाले ते ६ मे १९१३ च्या केसरीत. श्री. अनंत नारायण कौलगेकर यांनी. २१ एप्रिल रोजी या गृहस्थानी ‘ राजा हरिश्चंद्रा ’ची खाजगी

ट्रायल पाहिली होती. या परीक्षणावरून राजा हरिश्चंद्र चित्रपटाची लांबी ३ हजार फूट होती हे कळते.

त्या वेळी आजच्यासारख्या चित्रपट-वितरण संस्थाही नव्हत्या. मोठमोठ्या शहरी जाऊन दादासाहेबांना स्वतःचा चित्रपट स्वतः प्रदर्शित करावा लागे. सुरत या शहरी घडलेला एक प्रकार सांगण्यासारखा आहे. स्वतःचा प्रोजेक्टर व पडदा घेऊन दादासाहेब फाळके तिथे गेले. चित्रपट लावला. दर तीन आणे. पण उत्पन्न फक्त तीन रुपये झाले. दादासाहेब हताश झाले नाहीत. त्यांनी आपले डोके लढवून एक खुबीदार जाहिरात केली. ' दोन मैल लांब, पाऊण इंच रुंद, सत्तावन्न हजार फोटो असलेला चित्रपट फक्त दोन आण्यांत पाहा. ' त्याचा इष्ट तो परिणाम होऊन नंतरचे सर्व खेळ हाऊस फुल्ल झाले.

अशीही एक माहिती मिळते की, सतराव्या शतकापासून पाश्चात्त्यांना परिचित असलेल्या ' मॅजिक लॅन्टर्न 'चा कल्पकतेने उपयोग करून इ. स. १८८९–९० च्या सुमारास श्रीकृष्णचरित्रातील काही प्रसंगांचा चलच्चित्रपट श्री. मदनराव माधवराव पितळे नावाचे हरहुन्नरी गृहस्थ मुंबईमधे खाजगीरीत्या दाखवीत असत. काचेवर चित्र रेखाटण्याची व अशा चित्रांचा चलच्चित्रपट मॅजिक लॅन्टर्नच्या साहाय्याने ती दाखविण्याची अशा दोन्ही अभिनव कला चिकाटीने कल्याणच्या पटवर्धन कुटुंबाने हस्तगत केल्या होत्या. कलांद्वारे भारतीय कथा पडद्यावर दाखविणाऱ्या व्यवसायाला त्यांनीच ' शांबरिक खरोलिका ' असे यथार्थ भारतीय नाव दिले. विसाव्या शतकातील मूकपटाची ती अगदी प्राथमिक अवस्था होती असे म्हणावयास हरकत नाही.

सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने सेल्युलॉइडच्या फिल्म पट्ट्यावर अनेक दृश्ये उमटविण्याचे व ती दृश्ये प्रोजेक्टरच्या साहाय्याने पडद्यावर दाखविण्याचे आधुनिक तंत्रही मुंबईतील सावेदादा ऊर्फ भाटवडेकर या भारतीयाने १८९८ साली हस्तगत केले. मलबारहिल हँगिंग गार्डनमधे चलच्चित्रपटाच्या उद्देशानेच घेतलेली कुस्तीची फिल्म हाच पहिला भारतीय फिल्म चलच्चित्रपट म्हणावा लागेल. या सावेदादांनीच इंग्लंडहून आलेल्या रँग्लर परांजपे यांच्या सत्कारसमारंभाचा चलच्चित्रपट घेऊन पहिला भारतीय वार्तापट तयार करण्याचा मान मिळविलेला आहे.

परदेशी तंत्रज्ञांचे साहाय्य घेऊन सिनेकॅमेऱ्यावर पहिले भारतीय कथानक ' पुंडलिक ' साकार करणारे पहिले निर्माते श्री. नारायण गोविंद तथा नानाभाई चित्रे हेच होत. गिरगावातील श्रीपाद संगीत मंडळी या हौशी नाट्यसंस्थेतील दत्तात्रय दामोदर दाबके, बुक-बाईंडर जोशी, पुरुषोत्तम राजाराम टिपणीस, रामराव बाळकृष्ण कीर्तीकर, इत्यादी मंडळींनी हा पहिला मूकपट यशस्वी करण्यात भाग घेतला होता. या मूकपटाचे दिग्दर्शन श्री. गोपाळ रामचंद्र तथा दादासाहेब तोरणे यांनी केले होते. हा चलच्चित्रपट मुंबईच्या कॉरोनेशन चित्रपटगृहात शनिवारी १८ मे १९१२ रोजी प्रदर्शित झाला व तो दोन आठवडे दाखविण्यात आला. बरोबर एक वर्षाने १७ मे १९१३ रोजी

दादासाहेब फाळके यांचा चित्रपट याच चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. 'पुंडलिक' परदेशी तंत्रज्ञांच्या साहाय्याने तयार झाला होता, तर 'राजा हरिश्चंद्र' दादासाहेबांनीच पूर्णपणे बनविला होता हा फरक लक्षात घेणे जरूर आहे.

यानंतर चार वर्षांनी कोल्हापुरात महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना झाली. बाबूराव पेंटर व त्यांचे मामेभाऊ थोर आणि कल्पक कलावंत आनंदराव पेंटर या दोघांनी कॅमेरा आदी चित्रपटनिर्मितीस लागणारी उपकरणे कोल्हापुरातच तयार करून त्याची यशस्विता अजमावण्याचे प्रयोग सुरू केले. या प्रयोगाच्या यशाची निश्चिती झाली. आनंदराव आर्थिक जुळणीस लागले तोच काळाने त्यांना अचानक ओढून नेले व महाराष्ट्र एका महान कलावंताला अकाली मुकला.

महाभारतातील अत्यंत नाट्यपूर्ण व प्रखर संघर्षमय कीचकवधाच्या कथानकावरील 'सैरंध्री' हा भव्य चित्रपट हाती घेण्याचे संस्थेचे संचालक, निर्माते, दिग्दर्शक श्री. बाबूराव पेंटर यांनी निश्चित केले. या चित्रपटाच्या आर्थिक जनकत्वाचा मान श्रीमंत तानीसाहेब कागलकर यांच्याकडे जातो. त्या काळात त्यांनी दाखविलेले धाडस कौतुकास्पद होते.

दादासाहेब फाळक्यांना स्त्री-भूमिकेसाठी पुरुष पात्राचीच योजना करणे त्या वेळच्या परिस्थितीनुसार भाग पडले. परंतु बाबूराव पेंटरांनी स्त्री-भूमिका स्त्रियांनीच केल्या पाहिजेत असा ठाम निर्णय घेतला, व चित्रपटसृष्टीतील वास्तव प्रगतीचा पहिला टप्पा गाठला. त्या काळी ऐन वैभवात असणाऱ्या रंगभूमीवरही जे दिसू शकले नाही ते बाबूराव पेंटर यांनी प्रत्यक्षात आणून एका सामाजिक सुधारणेचा पाया त्या वेळी घातला असे म्हणायला हरकत नाही.

सामाजिक बंधने आणि कौटुंबिक तीव्र विरोध असताही सुशिलादेवी तथा अनसूयाबाई व गुलाबबाई यांनी सुदेष्णा व सैरंध्रीच्या भूमिका करण्याचे धैर्य दाखविले हे निर्विवाद. पहिल्या स्त्रीकलाकार म्हणून चित्रपटसृष्टीच्या इतिहासात त्यांचे नाव अवश्य नमूद करावे लागेल.

आजच्या चित्रपटसृष्टीतील बहुतेक कलाकार सुशिक्षित तर काही पदवीधर देखील आहेत. त्यांना अभिनयाचा समज आहे. पण त्या वेळी बाबूराव पेंटरांनी सामान्यतः शिक्षित नसलेल्या कलाकारांकडून प्रमुख भूमिका करवून घेतल्या व त्या यशस्वी झाल्या याचे श्रेय बाबूराव पेंटर यांच्या दिग्दर्शनकौशल्याला आहे. तेच पुढे 'प्रभात'ने केले.

बाबूराव पेंटरांचा 'सैरंध्री' चित्रपट पाहून लोकमान्य टिळकांनी 'सिनेमाकेसरी' ही गौरवाची पदवी देऊन बाबूरावांना भूषविले होते.

चित्रपट निर्माण करणाऱ्या कोणत्याही संस्थेची व्यावहारिक बाजू म्हणजे चित्रपटनिर्मितीबरोबर स्वतःची चित्रपटवितरण व्यवस्था असणे ही होय. त्या दृष्टीने महाराष्ट्र फिल्म कंपनीने आपला चित्रपटवितरण विभाग प्रथमपासून चालू ठेवला होता. तोही कोल्हापुरातच. डाक्क्यापासून पेशावरपर्यंत आपले चित्रपट महाराष्ट्र फिल्म कंपनी

आपल्या प्रतिनिधींच्या द्वारे वितरण करीत असे. मुंबईतील महत्त्वाची व्यवहाराची बाजू दादासाहेब तोरणे व बाबूराव पै हे पाहात असत.

जवळ जवळ बारा वर्षे महाराष्ट्र फिल्म कंपनीचा कारभार व्यवस्थित चालला, पण परदेशातून चित्रपटदिग्दर्शनकलेचे शिक्षण घेऊन आलेल्या मोती बी. गिडवानी या परप्रांतीयाला भल्या मोठ्या पगारावर आणून 'रजनीबाला' या चित्रपटाची जबाबदारी बाबूरावांनी सोपविली. यामुळे दामले, फत्तेलाल, व्ही. शांताराम, केशवराव धायबर यांसारखे बाबूरावांचे शिष्योत्तम आणि निष्णात तंत्रज्ञ, कलावंत नाराज झाले व त्यांनी कोल्हापूरच्या मंगळवार पेठेत १ जून १९२९ रोजी प्रभात फिल्म कंपनीची स्थापना सीताराम बापू कुलकर्णी यांच्या आर्थिक साहाय्याने केली.

महाराष्ट्र फिल्म कंपनीप्रमाणे प्रभात फिल्म कंपनीनेही एकाहून एक सरस असे सहा मूकपट निर्माण केले. मुंबईच्या इंपीरिअल फिल्म कंपनीने 'आलमआरा' आणि कलकत्त्याच्या मादन सिनेटोनने 'लैलामजनू' हे बोलपट सादर करून भारतात बोलपटाचे युग सुरू केले. ते साल होते १९३१. याच वर्षी प्रभात फिल्म कंपनीने 'अयोध्येचा राजा' हा पहिला मराठी बोलपट सुरू करण्याचा मान मिळवला. हे चित्र प्रकाशित झाले १९३२ च्या आरंभी. 'अयोध्येचा राजा'मधे दुर्गा खोटेसारख्या सुविद्य, सुसंस्कृत, प्रतिष्ठित घराण्यातल्या अभिनेत्रीचे चित्रपटव्यवसायात प्रथमच आगमन होत होते. तेव्हा कुतूहलाबरोबर खळबळही माजली होती.

कोल्हापुरात प्रभात फिल्म कंपनीने ६ बोलपट तयार केले. त्यांपैकी 'सैरंध्री' हा रंगीत होता. हाच भारताचा पहिला रंगीत बोलपट होय !

कोल्हापूर सिनेटोनने 'विलासी ईश्वर' हे सामाजिक मराठी चित्र सादर केले. दिग्दर्शक होते मा. विनायक. मात्र सांगलीच्या बलवंत पिक्चर्ससाठी 'ठकीचं लग्न–सत्याचे प्रयोग' सादर करून पहिल्या सामाजिक विनोदी बोलपटाचा मान मिळविला विश्राम बेडेकरांनी.

आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. १९३४ साली प्रभातने 'जंबूकाका', न्यू थिएटर्सने 'चटक चांदणी' व कोल्हापूर सिनेटोनने 'बकंभट' हे व्यंगपट एकाच वर्षी सादर केले. मात्र यानंतर व्यंगपटांची वाढ खुंटलीच.

१९३३ च्या अखेरीस प्रभात फिल्म कंपनीने कोल्हापुराहून पुण्याला स्थलांतर केले. २१ एकर जागेत स्वयंपूर्ण सुसज्ज असा अद्ययावत प्रचंड साऊंडप्रूफ स्टुडिओ उभारण्यात आला होता. असा भव्य स्टुडिओ साऱ्या भारतातच काय पण साऱ्या आशिया खंडातही नव्हता. पुण्यात निर्माण झालेल्या अमृतमंथन या पहिल्या भव्य चित्रपटाने नाटक आणि सिनेमा या दोन माध्यमांतील फरक प्रकर्षाने स्पष्ट केला असे म्हणायला हरकत नाही.

एवढे मात्र खरे की प्रभात फिल्म कंपनीने इतिहास घडविला. प्रभातसारखी जागतिक कीर्ती कुठल्याही चित्रपट संस्थेच्या वाट्याला आली नाही हे मोठ्या अभिमानाने

म्हणावेसे वाटते. प्रभात फिल्म कंपनीचा 'संत तुकाराम' व्हेनिस जागतिक चित्रपट प्रदर्शनात जगातील तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक म्हणून निवडला गेला.

संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर हे केवळ भारतातच नव्हे तर अमेरिका, मध्यपूर्व, इंडोचायना, चीन या ठिकाणीही पसंत पडले.

न्यूयॉर्कमध्ये कार्नेजी हॉलमध्ये दाखविलेले पहिले भारतीय बोलपट म्हणजे संत ज्ञानेश्वर, कुंकू, माणूस ही तीन प्रभात चित्रे. अमेरिकेतील तंत्रज्ञ, निर्माते, दिग्दर्शक, नटनट्या यांना तिथे स्थायिक झालेल्या राम बगाई या भारतीयाने ही चित्रे दाखविली. 'कुंकू' चे तंत्र सर्वांना फार आवडले, पण कुंकवाचे महत्त्व कळले नाही. ज्ञानेश्वरवर सर्वजण खूष झाले तर 'माणूस' चार्ली चॅप्लीनला फार पसंत पडला. अमेरिकेतील ख्यातनाम दिग्दर्शक फ्रँक कॅप्रा यांनी अमेरिकन सिनेमॅटोग्राफरमध्ये एक लेख लिहिला होता. संगीताबद्दल त्याने गौरवाने लिहिले होते. तसेच पुण्यासारख्या लहानशा गावी पुरेशी साधने नसताना प्रभात फिल्म कंपनीने इतका तंत्रशुद्ध बोलपट काढावा याचे खरोखरच आश्चर्य वाटते असे अत्यंत कौतुकाने म्हटले होते.

प्रभात फिल्म कंपनीनं चित्रपटसृष्टीत प्रभात युग निर्माण केले होते.

प्रभातच्या काळात तिकडे कलकत्त्याला न्यू थिएटर्स तर मुंबईला बॉम्बे टॉकीज आणि रणजित स्टुडिओ हे प्रमुख चित्रनिर्माते होते. प्रभातची तुतारी आणि न्यू थिएटर्सचा हत्ती यांची तर जुगलबंदी चाले. हत्तीने अमके चित्र दिले, आता तुतारी काय देते पाहू या, इतके होई.

पुण्याच्या सरस्वती सिनेटोनने प्रभात काळातच पौराणिक, ऐतिहासिक यशस्वी चित्रपट सादर केले.

कोल्हापूरला कोल्हापूर सिनेटोन, शालिनी स्टुडिओ, हंस पिक्चर्स, जयप्रभा स्टुडिओ यांनी त्या वेळी चित्रनिर्मितीत मोलाची भर घातली.

आचार्य अत्रे यांनी स्थापन केलेल्या नवयुग चित्रपट लिमिटेडनेही उत्तमोत्तम चित्रपट पुण्यात निर्माण केले.

वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे यांसारखे अग्रगण्य साहित्यिक हाताशी धरून चित्रनिर्मितीचा अभिनव आणि अत्यंत यशस्वी प्रयोग हंस पिक्चर्सने केला. मा. विनायक यांनी आपला एक विशिष्ट ठसा जनमानसावर उमटविला होता हे नमूद करण्यासारखे आहे.

मूकपटांचा जमाना सोडला तरी गेली सुमारे चाळीस वर्षे चित्रपटसृष्टी बहरतच गेली. जगातील चित्रपटव्यवसायात भारताचा दुसरा क्रमांक लागतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९३१ पासून १९६८ अखेर चित्रपटनिर्मितीची आकडेवारी पाहता अडतीस वर्षांत एकूण ८, ७८० चित्रपट निर्माण झाले. ते एकूण २७ भारतीय भाषांत निघाले. पैकी ३,९८६ हिंदी, १,३९४ तामीळ, १,११६ बंगाली, ८९२ तेलगू, ४५७ मराठी, २८८ कानडी, २७२ मल्याळम्, १२९ गुजराती आणि ८९ पंजाबी. इतर आठरा

भाषांत अवघे १५४ चित्रपट निघाले. यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, सुमारे ४५ टक्के चित्रपट नुसत्या हिंदी भाषेत निघाले तर ५ टक्के मराठी. पहिला क्रमांक हिंदीचा तर पाचवा मराठीचा. एक गोष्ट मात्र निश्चित की, अर्ध्याहून अधिक चित्रपटनिर्मिती एकट्या महाराष्ट्रात झाली व होत आहे चित्रपट-व्यवसाय महाराष्ट्रात केवढ्या मोठ्या प्रमाणात आहे व या व्यवसायावर किती कुटुंबे उपजीविका करीत आहेत हे वेगळे सांगायला नको.

ओघात एक गोष्ट आठवली म्हणून सांगत आहे. हंस पिक्चर्सची चित्रपट-निर्मिती चालू असता एक महत्त्वाची घटना घडून आली. या वेळपर्यंत चित्रपटांच्या टायटल्स इंग्रजीमधून देण्याची प्रथा होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ही प्रथा बंद करून मराठी टायटल्स देण्याचे सुचविले व त्याप्रमाणे त्यांनी मूळ इंग्रजी शब्दांना सुयोग्य असे प्रतिशब्द सुचविले. 'बोलपट' हा शब्द त्यांचाच. सावरकरांच्या सूचनेप्रमाणे मराठी टायटल्स लिहिल्या गेल्या व पुढे हीच प्रथा कायम झाली. हिंदी चित्रपटांनीही पुढे त्याचे अनुकरण केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चित्रपट उत्पादनात वाढ होत गेली. १९४६ त एकूण २०० चित्रपट तयार झाले, त्याखाली हा आकडा कधी आला नाही. १९५९ साली हा आकडा ३०० च्या वर गेला, तो त्याच्या आसपास कायम राहिला. १९६८ साली हा आकडा ३५० पर्यंत गेला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चित्रपटव्यवसाय जसा वाढला, फोफावला तशी त्यात बरीवाईट स्थित्यंतरेही झाली.

युद्धकाळात मराठी चित्रनिर्मिती मात्र थंडावत चालली होती. १९४२ साली २० मराठी बोलपट तयार झाले होते. १९४३ साली ही संख्या ६ वर, १९४४ साली ४ वर तर १९४५ साली एकही मराठी चित्र प्रदर्शित झाले नाही हे विशेष होय. १९४६ त पुन्हा दोन मराठी चित्रे प्रदर्शित झाली. १९४७ साली 'जयमल्हार'च्या यशानंतर मराठी चित्रपटांनी वेग घेतला व या चित्रापासूनच ग्रामीण आणि लावणी चित्रांचा जमाना सुरू झाला. १९४७ साली ६ मराठी चित्रे प्रदर्शित झाली. १९४८ साली ७, तिथून पुढे दरवर्षी १२ ते २० मराठी चित्रे निर्माण झाली. आताही एवढी मराठी चित्रे तयार होतातच. १९६२ साली हा आकडा २२ होता.

१९४५ साली जेव्हा एकही मराठी चित्र लागले नाही. त्या वर्षी अवघी ९९ चित्रे प्रसिद्ध झाली. त्यात हिंदी ७३ होती. हीच संख्या पुढे १९४६ साली दुप्पट म्हणजे २०० झाली, हे पूर्वी सांगितलेलेच आहे. त्यात हिंदी चित्रपटांची संख्या दुपटीहून अधिक म्हणजे १५५ होती. मराठी फक्त दोन. हिंदी चित्रनिर्मितीचा उच्चांक १९४७ साली होता. त्या वर्षी १८६ हिंदी चित्रपट निर्माण झाले. आता हे प्रमाण शंभरच्या आसपास आहे. इतर भारतीय भाषांतील चित्रपटनिर्मितीचे प्रमाण १९४८ साली प्रथमच शंभराच्यावर गेले ते वाढत जाऊन १९६० मधे (हिंदी वगळून) इतर भारतीय भाषांत २०० चित्रपट निर्माण झाले. १९६८ साली या चित्रांचा आकडा २७५ वर गेला.

१९३२ ते १९६२ या कालखंडात एकूण ३७४ मराठी बोलपट निर्माण झाले. त्यांत सामाजिक २५९, पौराणिक ४९, ऐतिहासिक ३३, संतपट २६, काल्पनिक मध्ययुगीन ६ बोलपट या तीस वर्षांत झाले.

१९३५ च्या अखेरपर्यंत उसना आवाज (Playback) पद्धत नव्हती, त्यामुळे बऱ्या चेहऱ्याबरोबर बरा आवाजही लागत असे. मात्र अमुक एक भूमिकेला तमुक एक कलाकारच योग्य आहे असे वाटले तर त्याला गाण्यातून साहजिकच वगळले जाई. पूर्वीच्या काळात गाणारे दुर्गा खोटे, अशोक कुमार, मा. विनायक यांसारख्या कलावंतांना नंतर उसना आवाज देण्यात येऊ लागला. प्रभात फिल्म कंपनीने मात्र ' शेजारी ' चित्रापर्यंत Playback चा फार क्वचित वापर केला. शांता आपटे, राम मराठे, शाहू मोडक, मा. परशराम, वासंती, शांता हुबळीकर, मंजू किंवा अन्य प्रमुख कलावंतांनी स्वतःची गाणी स्वतःच म्हटली होती.

पंजाबी ढंगाचे संगीत प्रथम लोकप्रिय झाले पांचोली आर्टसच्या ' खजांची ' या चित्रापासून. गुलाम हैदरच्या त्या संगीताने अफाट लोकप्रियता मिळविली. ते साल होते १९४१. त्या वेळपासून श्रोत्यांच्या गीतांच्या अभिरुचीला वेगळे वळण लागले. या नजिकच्या काळात Playback गायक पुढे येऊ लागले. लता मंगेशकर, महमद रफी ही नावे सर्वश्रुत होऊ लागली. त्यांच्या मधुर आणि सुरेल आवाजाने श्रोत्यांना वेड लावले. पंचवीस वर्षे होऊन गेली. त्यांचे अनन्यसाधारण स्थान अद्याप नाबाद आहे.

आता किशोरकुमारसारखा एखादा अपवाद सोडला तर सर्व कलावंतांना उसना आवाजच दिला जातो.

एक काळ असा होता की, चित्रपट प्रसिद्धीपूर्वी त्यातील चाली बाहेर फुटू नयेत म्हणून दक्षता घेतली जाई. प्रभातमधे तर हे फार कटाक्षाने पाळले जाई. आता जमाना बदलला. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सहासहा महिने गाणी अगोदर आकाशवाणीवर प्रसृत केली जातात. त्यातली आधीच काही लोकप्रिय होतात. त्याचा त्या चित्रपटाला निश्चित फायदा मिळतो. अगोदरच लोकप्रिय झालेल्या गीतावर चित्रपट चालल्याचीही आता उदाहरणे सापडतात. पार्श्वगायक आता दरमहा हजारो रुपयांची कमाई करीत आहेत.

उत्तान चित्र यशस्वी करण्याचा पाया घातला पी. एल्. संतोषीच्या शहनाई, सरगम, खिडकी या चित्रांनी १९४६-४७ मधे. याच प्यारेलाल संतोषींनी प्रभातच्या संत ज्ञानेश्वर, संत सखू सारख्या उदात्त, सोज्ज्वळ चित्रांचे हिंदीकरण केले. उत्तम केलं. प्रभातच्या झेंड्याखाली ' हम एक हैं ' यासारखे आदर्शचित्र सादर केले तेच संतोषी असल्या चित्रांचे अध्वर्यू असावेत हे विशेष होय.

चित्रपटव्यवसायाची युद्धकाळात एकीकडे भरभराट होत असता चित्रपटसृष्टीतील आब, आदब, शिस्त कमी होत चालली होती. दिग्दर्शकाचा दरारा कमी होऊ लागला होता. कलाकारांचे भलतेसलते लाड वाढू लागले होते. पूर्वीच्या काळात शिस्त,

नियम किती कडक होते याचे प्रभात फिल्म कंपनीत घडलेले दोन प्रसंग मुद्दाम सांगण्यासारखे आहेत.

चंद्रमोहन या तरुण नटाने अमृतमंथनमधील राजगुरूच्या पहिल्याच भूमिकेने एकदम अफाट कीर्ती मिळविली. पुढच्या प्रभात चित्रात चंद्रसेनेत त्याला अहिरावणाची भूमिका होती. त्याच्या कामाचे पुष्कळ चित्रीकरण झाले होते. शूटिंगमधून थोडी सवड मिळताच तो विश्रांतीसाठी एका थंड हवेच्या ठिकाणी जाऊन राहिला. तिथून गर्विष्ठपणे निरोप पाठविला, ' मला पगारवाढ दिल्यावाचून मी कामाला येणार नाही '. चंद्रमोहनची ही पद्धत निःसंशय अदूरदृष्टीची व अडवणुकीची होती. प्रभातच्या पद्धतीप्रमाणे त्याला पगारवाढ मिळाली असती; पण असा निरोप येताच प्रभातच्या चालकांनी कणखरपणे आपला निर्णय घेतला. मराठीत अहिरावणाची भूमिका करीत असलेल्या भाऊ केळकरांना हिंदी आवृत्तीसाठीही तयार करण्यात आले. चंद्रमोहनचे झालेले सर्व काम रद्द करून भाऊ केळकरांकडून काम घेण्यास सुरुवातही केली. आपल्यावाचून अडेल अशा भ्रमात असलेल्या चंद्रमोहनचा भ्रमनिरास झाला. तो धावतच पुण्याला आला. क्षमायाचना केली. पण त्याचे रद्द केलेले काम तरीही त्याला देण्यात आले नाही. त्यासाठी त्याला पुढच्या चित्रापर्यंत—' धर्मात्मा 'पर्यंत थांबावे लागले.

असाच एक प्रसंग विश्राम बेडेकरांच्या लाखाराणीच्या वेळी घडला. शांतारामबापू प्रभात सोडून गेलेले, विष्णुपंत दामले अंथरुणाला खिळलेले. प्रभातमधील घडी विस्कटत चालली होती. पण दामले अंथरुणावर होते तरीही त्यांचा दबदबा होता. लाखाराणीची नायिका मोनिका देसाई एकदा अशीच अडून बसली. दामलेमामांना हे कळताच त्यांनी एस. फत्तेलाल यांच्याबरोबर तिला निरोप पाठविला, ' बाई, तुम्ही मोठ्या असाल पण प्रभात फिल्मकंपनी तुमच्याहूनही मोठी आहे, हे लक्षात ठेवा. तुम्हांला काम करायचे नसेल तर तुम्ही खुशाल जाऊ शकता.' असा निर्वाणीचा निरोप ऐकून मोनिका देसाई मुकाट कामाला आली. याला म्हणायचे निर्मात्याचा दरारा !

५ जुलै १९४५ ला दामलेमामांचे अकाली निधन झाले आणि प्रभात खिळखिळ व्हायला प्रारंभ झाला. कणखर खंबीर नेता कुणी उरला नाही. मुंबईचे गढूळ वातावरण प्रभातमधेही आले. युद्धकाळात अनेक लहानमोठ्या निर्मात्यांनी भरपेट कमाई केली. तेव्हा नेमकी प्रभात उतरतीला लागली होती. १९४४ साली रामशास्त्री हेच प्रभातचे अखेरचे प्रकाशित झालेले मानचित्र. पुढे १९५३ च्या ऑक्टोबरपर्यंत प्रभात टिकली होती, तरी दामल्यांच्या निधनानंतर १९४५ नंतर प्रभातची शान, मान, प्रतिष्ठा संपुष्टात येत चालली होती. पूर्वपुण्याईवर सात-आठ वर्षे पुढे प्रभात टिकली एवढेच. प्रभात वाचवू शकेल असा एकही समर्थ माणूस पुढे झाला नाही. ज्या वेळी प्रभात असायला पाहिजे होती त्या वेळी ती दुर्बळ होत चालली होती. प्रभातची विकल अवस्था हा चित्रपटसृष्टीला-विशेषतः मराठी चित्रसृष्टीला—धरणीकंपच होता. दर्जेदार, भारदस्त, वैभवशाली चित्रे सादर करणारी संस्थाच उरली नाही.

प्रभातची अशी अवस्था असता १९४७ साली मा. विनायक यांना मृत्यू यावा हा चित्रपटसृष्टीला आणखी एक धक्का होता.

पूर्वीच्या काळी इतर मराठी चित्रपटसंस्थांपेक्षा सर्व भारतात प्रभातचे नाव होते याची दोन प्रमुख कारणे होती. एक तर भव्य सेट्स, उत्कृष्ट तंत्र आणि उत्तम कथानक यांनी ते प्रेक्षकांना भारावून टाकीत. त्याचबरोबर सिंहगड, संत तुकाराम चे अपवाद सोडल्यास इतर सर्व चित्रे मराठीबरोबरच हिंदीतही निर्माण करण्यात आली. मात्र हिंदी आवृत्ती महाराष्ट्रात फारशी दाखविली जात नसे. मुंबईसारख्या बहुभाषिक शहरी दोन खेळ मराठीचे तर दोन खेळ हिंदीचे करण्यात येत. युद्धकाळात हिंदी चित्रपटही मराठी शहरी चालू लागले आणि मराठी चित्रपटांची पीछेहाट सुरू झाली. निर्मितीच्या मानाने मराठी चित्रपटाचे खर्च वाढले पण उत्पन्न कमी झाले. चित्रपट काटकसरीने तयार करणे भाग पडू लागले. कथानक निवडताना या चित्रासाठी फार खर्च होणार नाही ना हे पाहून कथा निवडण्याची पाळी आली. त्यामुळे मराठी चित्रांना निर्मितिमूल्ये उरलीच नाहीत; त्या मानाने हिंदी चित्रपटांची बाजारपेठ वृद्धिंगत होत होती.. निर्मितीवर हिंदी निर्माते अधिकाधिक खर्च करू शकत होते. त्यामुळे हिंदीशी तुलना करताना मराठी चित्रे दरिद्री वाटू लागली. आजही ती स्थिती कायम आहे. हिंदी आणि मराठी कलावंतांच्या कमाईत कित्येक पटींनी फरक पडला. मराठी कलावंतांची कमाई जेमतेम तीन-चार आकडी तर हिंदी अग्रगण्य कलावंतांची सात आकड्यांपर्यंत पोचलेली. तीच व्यवस्था कमी-अधिक फरकाने तंत्रज्ञांच्या बाबतीतही दिसून येते.

हिंदी चित्रपटसृष्टीत निर्माते दिग्दर्शकाचा दबाव कवडीमोल झाला आहे. कलावंत भल्याभल्यांना जेरीस आणीत आहेत. नामवंत कलाकारांना घेतल्याशिवाय धंदा होत नाही व नामवंत कलाकारांना घेऊन चित्र ठरल्या मुदतीत आणि पैशात पुरे करायचे हे एक दिव्यच आहे. पण ते केल्याशिवाय हे नाही आणि हे केल्याशिवाय ते नाही, असे हे दुष्टचक्र आता निर्माण झाले आहे. कलावंत अवाच्या सवा पैसे घेऊनही त्यांच्या वागण्याला कोणी पायबंद घालू शकत नाही. एका कलाकाराने किती चित्रांत कामे करायची याला काही धरबंधच राहिला नाही. त्यामुळे कुठल्याही निर्मात्याला विशेषतः या प्रमुख कलाकारांना पुरेसा वेळ देणे शक्यच होत नाही. बरे एका कलावंताच्या तारखा मिळाल्या तर त्याच दुसऱ्याच्या मिळणे मुष्किल. एकाच प्रसंगात तीन-चार मोठे कलावंत असले तर मग बघायलाच नको. त्यांचा मेळ घालणे महाकर्म कठीण. त्यांची मर्जी संभाळता संभाळता निर्मात्याला नाकी नव येतात. निर्मिती कित्येक दिवस रेंगाळत राहते.

पूर्वीच्या काळी कलावंत हे त्या संस्थेच्या कायम नोकरीत असत. त्यांना बाहेर काम करायला परवानगी नव्हती. प्रत्येक चित्रपट-निर्मात्याचा स्वतःचा स्टुडिओ असे. त्यामुळे निर्माते दिग्दर्शक यांना मनाप्रमाणे काम करायला मिळत असे. घाई नसे. आज नाही झाले तर उद्या. प्रभातमध्ये तर चित्रपट सुरू होण्याच्या अगोदर दोन दोन

महिने नाटकासारख्या तालमी चालत असत. त्यामुळे प्रसंगाचा, दृश्याचा परिणाम किती साधतो याची कल्पना येई. एवढेच नव्हे तर प्रसंगाला पोषक असे कितीतरी बारकावे सुचत. दिग्दर्शकाला ' टेकिंग 'चा बरोबर अंदाज येई, सेट कसा असावा हेही ध्यानात येत असे. त्यामुळे चित्र निर्दोष होण्यास केवढी तरी मदत होई. सर्वच कलावंत हाताशी, जवळ स्वतःचा स्टुडिओ असल्यामुळे एखादा सीन पुन्हा घ्यावासारखा वाटला तर दिग्दर्शकाला ते सहज शक्य होते. आता कितीशा निर्मात्यांजवळ स्वतःचा स्टुडिओ आहे ? शांतारामबापू, राज कपूर, भालजी पेंढारकर सारखा एखादाच निर्माता. युद्ध-काळात सारेच बदलत चालले. साधारण कुठल्याही हिंदी चित्राला बरा पैसा मिळू लागला. कलावंतांच्या नावावर चित्रपट खपू लागले. दिग्दर्शकाचे नाव गौण होऊ लागले. पूर्वी प्रभात चित्र म्हटल्यावर प्रेक्षक कलाकार कोण आहेत, संगीत कुणाचे आहे वगैरे पाहात नसत. असेल ते उत्तमच असणार याची त्यांना खात्री असे व तसे असतही असे. पुढे परिस्थिती बदलून कलाकार कोण आहेत हे प्रेक्षक पाहू लागले. विशिष्ट नावे असली तर गर्दी करू लागले. कलावंतांनी हे ओळखले आणि ते मनमानेल तशी मागणी करू लागले. चित्रपटव्यवसायात लॉटरीसारखा एकदम अलोट पैसा मिळतो म्हणून तर काही पाकिस्तानातून भरगच्च पैसा घेऊन आलेले धनाढ्य व्यापारी काळ्याचा पांढरा पैसा करायला चित्रपटसृष्टीत दाखल झाले. कलावंतांच्या नावावर चित्र चालते म्हटल्यावर ते त्याला हवा तेवढा पैसा द्यायला तयार झाले. मूकपटाच्या जमान्यात एकच एक उदाहरण असे सापडते की ज्याच्या नावावर चित्रपट धुम-धडाक्याने चालत तो भाग्यवान कलाकार म्हणजे मा. विठ्ठल ! भारताच्या पहिल्या बोलपटाचा नायक होण्याचा मानही त्याचाच. मा. विठ्ठल यांच्या इतकी अफाट लोक-प्रियता क्वचित कुठल्या नायकाच्या वाट्याला आली असेल.

युद्धकाळात प्रथम ' प्रो–रेटा ' पद्धत अमलात आली म्हणजे इतक्या ' शूटिंग डेज् ' चे इतके पैसे. तेवढ्यात चित्र पुरे झाले नाही तर एक दिवसाला अमकी रकम. बरे, हे आकडे काही लहानसहान नसत. हिंदीतल्या दुय्यम दर्जाच्या कलावंतांनाही चांगला आर्थिक लाभ होऊ लागला. पुढे ही पद्धत मागे पडून कॉन्ट्रॅक्टपेक्षा दसपट पैसे काळ्याबाजाराने कलावंत घेऊ लागले, ही गोष्ट आता जगजाहीर आहे. दिलीपकुमार जेव्हा स्वतः निर्माता झाला तेव्हा त्याच्या लक्षात आले की, सगळा खर्चवेच वजा जाता निर्मात्याला रुपयातले दोन पैसे सुटतात. यावरून निर्मात्याच्या प्राप्तीची वाचकांना कल्पना येईल.

पंचवीस वर्षांपूर्वीचा काळ हा महाराष्ट्रीय चित्रपटकलेचा परम उत्कर्षाचा काळ होता असे म्हणावे लागेल. तो काळ कलात्मक परंपरेचा होता. त्यात ध्येयनिष्ठा होती. संघवृत्ती होती. प्रयोगशीलता हे तिचे साधन होते. या परंपरेने महाराष्ट्रीय चित्रपटकलेला भारतात आघाडीचे स्थान मिळवून दिले होते. एकमेकांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कला-कृती सर्वांगामध्ये गुणवती होई. कलेच्या यशाबरोबरच आर्थिक यशही वाट चालत येई.

एकाहून एक सरस चित्रपट तयार करण्याची चुरस असे. प्रेक्षकही अशा निर्मितीची महिनोन् महिने वाट पाहात. तांत्रिक अंगे आस्ते आस्ते विकास पावत होती. प्रभात फिल्म कंपनी केवळ भारतालाच काय पण पूर्वेकडील सर्व देशांना भूषणभूत झाली होती. प्रभातचा स्टुडिओ व इतर खाती पाहायला ब्रह्मदेश, सिलोन, मलाया या देशांतून लोक येत. प्रभात म्हणजे परदेशीयांना मोठे आकर्षण होते.

ऐन युद्धकाळात चित्रपटसृष्टीचे सारेच चित्र बदलून गेले. साधनसामग्री महाग होऊ लागली. कच्ची फिल्म दुर्मिळ होऊ लागली. निर्मितीचा खर्च वाढू लागला. याच वेळी देशातील बेकारी कमी झाली होती. सामान्य माणसाच्या हातीही पैसा खेळत होता. याबरोबरच नित्य जीवनाला लागणाऱ्या वस्तू मिळणे कठीण झाले होते. दैनंदिन जीवन कष्टप्रद व बिकट झाले होते. रोजची विवंचना घटकाभर तरी विसरता यावी यासाठी त्यांना मनोरंजनाची आवश्यकता वाटू लागली. ती त्यांची गरज चित्रपटांनी पुरी केली. महागाई, पगारवाढ, बोनस इत्यादींमुळे पैशाचा तुटवडा नव्हता. कुठल्याही चित्राला आणि कुठल्याही चित्रपटगृहाला गर्दी करणारा एक मोठा प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. त्यांना करमणुकीशिवाय दुसरी अपेक्षा नव्हती. डोळ्यांना व कानांना सुख देणारी तांत्रिक सफाई, कर्णमधुर संगीत, नेत्राकर्षक नृत्य, मोहक चेहरे, ढोबळ प्रसंग एवढ्या गोष्टी त्याला पुरेशा वाटू लागल्या. सवंग मसाल्याचे चित्रपट तर आठवडेच्या आठवडे चालू लागले.

म्हणून वर म्हटले आहे की, अशा वेळी प्रभातसारखी एखादी ध्येयनिष्ठ संस्था हवी होती. कलात्मक, भव्य, उदात्त चित्रांबरोबर प्रभातने धंदाही केला. एक गोष्ट निश्चित की, प्रभातसारखी आदर्श चित्रपटसंस्था पूर्वी कधीही झाली नव्हती. पुढेही होणार नाही. ऐक्य हे प्रभातचे ऐश्वर्य होते. तिथे संघर्ष नव्हता. समन्वय होता. पण त्यालाही पुढे दृष्ट लागली. एका मोठ्या सुखी कुटुंबाची शोकांतिका झाली. सुविख्यात निर्माते-दिग्दर्शक स्व. बिमल रॉय म्हणत, 'प्रभातकडे आम्ही पाहतो ते एक उत्कृष्ट चित्रपट निर्माण करणारी संस्था म्हणून नव्हे तर चित्रपटकलेचं ते एक मंगल मंदिर म्हणून.'

सवंग हिंदी चित्रपट चालले तरी केवळ धांगडधिंगाच आहे असे म्हणता येणार नाही. व्ही. शांताराम, बिमल रॉय, गुरुदत्त, हृषीकेश मुकर्जी, बी. आर. चोप्रा, नितिन बोस, सत्येन बोस, असीत सेन, मेहबूब यासारख्यांनी दर्जेदार चित्रेही दिली आहेत. आता तंत्र खूपच पुढे गेले आहे. चित्र प्रेक्षणीय आणि श्रवणीय करण्यात निर्माते यशस्वी होत आहेत. डोळ्यांना सुख देणारा रंगीत चित्राचा जमाना आता आला आहे. पहिले टेक्निकलर रंगीत चित्र सादर करण्याचा मान मेहबूब यांच्या 'आन' या चित्राला वीस वर्षांपूर्वी मिळाला आहे.

मराठी चित्रपटसृष्टीची अवस्था शोचनीय झाली असली तरी भालजी पेंढारकर, राजा परांजपे, राजा ठाकूर, दत्ता धर्माधिकारी, शांताराम आठवले, राम गबाले, माधव शिंदे, मधुकर पाठक यांसारख्या निर्मात्या दिग्दर्शकांनी अनेक अडचणी सोसून

उत्तमोत्तम चित्रे दिली आहेत. 'प्रभात'काळात शिवराम वाशीकर, ' हंस 'च्या काळात वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे यांनी आपला ठसा रसिक मनावर उमटविला होता. तो वारसा गद्य आणि पद्य दोन्हींमध्ये ग. दि. माडगूळकरांनी दीर्घकाळ चालविला आहे.

युद्धकाळात चित्रनिर्मितीसाठी स्टुडिओ भाड्याने देण्याची प्रथा सुरू झाली त्यामुळे चार तंत्रज्ञ एकत्र येऊन एखादा भांडवलदार गाठून चित्रपटनिर्माते होऊ लागले. एक, दोन, चार चित्रे निर्माण करून अशा संस्था अंतर्धान पावू लागल्या. पुन्हा नवीन संस्था नवीन जुळणी. तंत्रज्ञांचे विशेषतः दुय्यम दर्जाच्या तंत्रज्ञांचे आणि कलावंतांचे पैसे बुडविण्याचीही लाट आली. अर्थात या छोट्या निर्मात्यांना पैसे देणे काही वेळा अशक्यही होते. तंत्रज्ञांच्या निरनिराळ्या संघटना झाल्यावर त्यांचे पैसे बुडण्याचे प्रकार थांबले. मराठी चित्रपटसृष्टीत त्याची अद्यापही ओरड आहेच.

चित्रपटव्यवसायाला विशेषतः उत्तम निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्यसरकारचे लक्ष या व्यवसायाकडे वळले. उत्कृष्ट चित्राला, कलावंतांना, तंत्रज्ञांना पारितोषिके देण्याची प्रथा पंधरा वर्षांपूर्वी केंद्रसरकारने सुरू केली. निरनिराळ्या भाषांतील उत्कृष्ट चित्रांनाही उत्तेजन देण्यात आले. मराठीतील ' श्यामची आई ' हे चित्र सर्वप्रथम या मानाचे मानकरी ठरले. आठ वर्षांपूर्वी उत्तम कथा-निर्मिती असणाऱ्या चित्राला सरकारकडून कर्ज देण्यासाठी फिल्म कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना केली. यंदा सर्वोत्तम ठरलेल्या चित्रांपैकी ५ चित्रांना सरकारतर्फे कर्ज देण्यात आले होते. याच सुमाराला भारत सरकारप्रमाणेच महाराष्ट्र राज्यसरकारने उत्कृष्ट चित्रपट, निर्माते, कलावंत, तंत्रज्ञ यांना रोख रक्कम द्यायला प्रारंभ केला.

यापुढचे पाऊल म्हणजे दर्जेदार, संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या, सामाजिक समस्यांचा ऊहापोह करणाऱ्या चित्रांना महाराष्ट्र सरकारने पाच वर्षांपूर्वी करमणूक करमाफीचा प्रारंभ केला. अशा तऱ्हेने सरकारने या व्यवसायाकडे लक्ष घातले हे खरे. एक गोष्ट मात्र नक्की की, मोठमोठ्या कलावंतांना मिळणाऱ्या अवाच्यासवा मोबदल्यातील काही भाग इतरांना मिळाला:तर ते सुखाने जगू शकतील, एवढेच नव्हे तर यामुळे कितीतरी लोक अजूनही या व्यवसायावर पोट भरू शकतील.

अशी अवस्था असूनही चित्रपटव्यवसायावर आज हजारो लोक उदारनिर्वाह करीत आहेत हे निर्विवाद !

महाराष्ट्रातील नृत्यदर्शन

प्रा. सुरेंद्र वडगावकर

नृत्य हे मानवाच्या जीवनाचे अपरिहार्य अंग आहे. जेथे जेथे जगाच्या पाठीवर मानवाने पाऊल टाकले आहे तेथे तेथे ते तालबद्धच आहे. नृत्य मानवाच्या भावनांचे आविष्करण नि आत्म्याचे प्रकटीकरण आहे. भाषा, संगीत इत्यादी स्वतःच्या आविष्करणाच्या माध्यमाच्या पूर्वी विकसित झालेले एक रम्य भावनाविष्करण आहे. अगदी आफ्रिकेतील रानटी जमात असो किंवा अंदमानातील आदिवासीय असो त्यांचे नृत्य हे आहेच.

नृत्यासाठी मान्यता मिळविलेल्या काही विवक्षित देशांत भारत अग्रगण्य आहे. रशियातील 'बॅले' नृत्य प्रकाराप्रमाणेच 'भारतीय शास्त्रोक्त नृत्य' हे एक भारताचे गौरवस्थान आहे. भरतनाट्यम्, कथाकली कथ्थक, मणिपुरी हे शास्त्रीय नृत्यप्रकार व अलीकडेच प्रसिद्धीस आलेले कुचिपुडी, ओडिसी इत्यादी प्रकार जगन्मान्य ठरलेले आहेत.

परंतु विस्मयाची गोष्ट अशी की, राजकारण, तत्त्वज्ञान इत्यादी बुद्धिविलासाची अंगे, फार काय शिल्प इत्यादी कलांत अग्रेसर असलेला आपला महाराष्ट्र नृत्याच्या क्षेत्रात मात्र स्वतःचे असे गौरवाचे स्थान निर्मू शकला नाही. मराठी रंगभूमी, मराठी नाट्यकला भारतात 'मानाचं पान' पटकावून बसलेली आहे. परंतु नाट्यकलेची जननी असलेली ही मोहक नृत्यकला मात्र महाराष्ट्रात उपेक्षिताच राहिली.

मलबार, मणिपूरसारख्या छोट्याशा प्रदेशांनीही भारतीय नृत्यकलेला आपला नजराणा अर्पिलेला असताना महाराष्ट्रासारखा बुद्धिमान प्रदेश त्यात मागे का राहावा ? बरे, महाराष्ट्रात रसिकता नाही म्हणावे तर तसेही नाही. महाराष्ट्राची रंगभूमी महाराष्ट्राच्या रसिकतेची विजयपताका घेऊन उभीच आहे. महाराष्ट्रात अजिबात नृत्य नाही असे म्हणावे तर हजारो छोट्या छोट्या नृत्यप्रकारांची पखरण महाराष्ट्रभर विखुरलेली आहे.

महाराष्ट्रातील नृत्याच्या ह्या उपेक्षेचे अन्तरंग आपण शोधू लागलो तर प्रकर्षाने

मनात ठसते ते म्हणजे महाराष्ट्रातील अस्थिर राजकीय वातावरण. दक्षिण प्रदेशाला लाभलेली चिरशान्तता महाराष्ट्राला कधीच लाभली नाही. उलट बाराव्या शतकापासून सारे मुसलमानादी परकीयांचे हल्ले महाराष्ट्राला थोपवावे लागले व त्यामुळे दक्षिणेला स्थैर्य लाभले. संगीत, नृत्य, शिल्प इत्यादी ललितकलांचा दक्षिणेत मनोहर विकास झाला. फार काय तत्त्वज्ञान इत्यादी शाखांचाही झाला. ह्याउलट स्थिती महाराष्ट्राची ! त्याला कधीच शान्तता नाही. मध्यकालीन म्हणजे १२-१३ व्या शतकापासून महाराष्ट्र युद्ध-भूमीच बनला. देवगिरीच्या अस्तापासून दोन-तीन शतकें मुसलमानी राजवट सुरू होती. परंतु स्वाभिमानी मराठी माणसाने तिला कधीच पुरती रुजू दिली नाही की फोफावू दिली नाही.

आणि पुढे सुदैवाने महाराष्ट्राला लाभले शिवाजीदत्त स्वराज्य ! पण तो सारा काळच इतका धामधुमीत गेला की शिवाजीलाच काय पण पहिल्या बाजीरावापर्यंत कुणालाही स्वास्थ्यच लाभले नाही. शेवटी नानासाहेब पेशवे यांजपासून जरासे स्थैर्य लाभले व त्यामुळे महाराष्ट्रातील पूर्वीपासून चालत आलेला 'तमाशा' हा नृत्यप्रकार फोफावू लागला. नंतर लवकरच पेशव्यांची राजवटच संपल्यामुळे तमाशाचा अधिक विस्तार होऊ शकला नाही.

उत्तर भारतात मोगली संस्कृतीचा बराच परिणाम झालेले उत्तर हिंदुस्थानी संगीत व कथ्थक नृत्य ह्यांचा विकास झाला. त्यामुळे आपल्या मनात अशीही एक शंका येते की, महाराष्ट्रातही दोन-तीन शतकें मुसलमानी राजवट असूनही कलांचा प्रसार कसा झाला नाही ? त्याला पुढील कारणे असू शकतील. एक तर उत्तरेप्रमाणे इकडील सत्ता दीर्घकालीन नव्हती. शिवाय त्यांनाही स्वास्थ्य अगर स्थैर्य लाभले नाही. आपापसात अगर मराठ्यांशी युद्ध करण्यातच त्यांचा बराच काल गेला. शिवाय मुख्य विरोध हा होता की, महाराष्ट्रातील मुसलमान राजे हे रानटी, संस्कृतिहीन व अभिजात परम्परा नसलेले होते. ह्याउलट उत्तरेकडील मोगल सम्राट उच्च अभिरुची असलेले, सुसंस्कृत, खानदानी परंपरा असलेले अभिजात रसिक होते. त्यांना शिल्प, संगीत, नृत्य इत्यादी साऱ्या कलांची अभिरुची होती. त्यामुळे उत्तरेकडे ह्या कलांचा विकास झाला. मात्र ह्या कलांवर मोगली परिणाम झाला. त्यामुळेच कथ्थक नृत्याचा विकास हा दरबारी स्वरूपाचा आहे.

महाराष्ट्रातही शिवाजीपासून कलांना राजाश्रय मिळू शकला असता, परंतु येथील राजेही कलाविन्मुख होते. त्यांना अभिजात रुचीही नव्हती. रसिक आस्वाद व व्यसनाधीनता ह्यांतील भेदच त्यांना कळला नाही. नाहीतर तमाशात आलेला भडक शृंगार-बीभत्स रसाकडे झुकणारा—येऊ शकला नसता. रसिकतेने आस्वाद घेण्याऐवजी व्यसनाधीन होणे हाच त्यांचा स्थायी भाव बनला.

महाराष्ट्रातील नृत्याच्या दुरवस्थेचे दुसरे ठसठशीत कारण म्हणजे 'मराठी मन'. मराठी मन जात्याच रोखठोक नि व्यवहारी. स्वप्नाळू डोळ्यांनी कलाजगतात

विहार करणे त्याला क्वचितच जमते. अभिजात कलासक्तीचे नि त्याचे फारसे सख्य नसते. स्वच्छंदपणे कलाविश्वात धुंदावणारे त्याचे मन नव्हे. मराठी माणसाची राहणी, आचारविचार कसे व्यवहारी असतात. ह्या साऱ्या मनोरचनेमुळे मराठी माणूस कलासक्तीत विलीन होऊ शकत नाही.

ह्या सगळ्याला कारणीभूत झाला महाराष्ट्राचा निसर्ग. येथील निसर्गसुद्धा कसा मराठी मनासारखा कणखर नि दगडांचा! मराठी माणूस भरपूर श्रमल्याशिवाय जीवनकलहात टिकूच शकत नाही. अविश्रांत श्रमाने गरजेपुरते मिळविणे हाच मराठी माणसाचा जीवनक्रम बनतो. उलट उत्तरेकडे गंगायमुनेच्या पयसदानाने तेथील समाज सुखासीन जीवन जगू शकतो. गंगामैय्याच्या सुपीक खोऱ्यात कलाविकास झाला नि मराठी माणूस सह्याद्रीच्या कड्यासारखा कणखर बनला.

ह्या नैसर्गिक पार्श्वभूमीवर मराठी मनाला पुनश्च साहचर्य मिळाले ते सन्तांच्या आध्यात्मिक वैराग्याचे. महानुभावांपासून तो अगदी मोरोपन्तापर्यन्त ८–९ शतके महाराष्ट्रात निवृत्तीचे पीक अगदी उदण्ड झाले. महानुभावांचा ऐकान्तिक वैराग्यपंथ, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम ह्या साऱ्यांचा निवृत्तिपर भक्तिमार्ग, मराठी मनाची घडण वैराग्यशील बनविण्याचा प्रयत्न करीत होता. मराठी मन जात्याच विलासप्रिय नाही. त्याला चैतन्यप्रभूंची मधुराभक्ती मानवली नाही, की व्रजवासीयांच्या राधाकृष्ण लीला रुचल्या नाहीत. ह्यामुळे धार्मिक पार्श्वभूमीवर निर्मिली जाणारी रंगेलताही महाराष्ट्रात रुजली नाही.

अर्थात महाराष्ट्रात फक्त नृत्याचीच उपेक्षा झाली असा भाग नव्हे. संगीताचीही हीच स्थिती होती. दक्षिणेने कर्नाटकी संगीताचे उपायन दिले तर उत्तरेने हिंदुस्थानी संगीताचा नजराणा दिला. महाराष्ट्राने दिलेली देणगी म्हणजे फक्त लावणी. तिची गणना शास्त्रीय संगीतात होणे असंभवनीय.

ही महाराष्ट्रातील नृत्याची उपेक्षा तर पाहिली. परन्तु ज्या थोड्याफार प्रमाणात नि स्वरूपात महाराष्ट्रात नृत्य दिसते ते आता पाहू या.

मानवाच्या सांस्कृतिक प्रगतीवर आधारित अशा नृत्याच्या तीन अवस्था कल्पू शकतो. एक म्हणजे अगदी आदिवासीय, रानटी, मागासलेल्या जमातीचे 'आदिवासीय नृत्य.' ह्या नृत्याला ना यम ना नियम! केवळ तालबद्ध—नव्हे ठेकाबद्धच म्हणा—हालचाल हाच त्याचा गाभा. ही नृत्ये अगदी ओबडधोबड, पुनरुक्ती असलेली नि कंटाळवाणी असतात. महाराष्ट्रातील विविध आदिवासीय जमातींत ह्या अवस्थेतील नृत्यरचना दिसतात. महाराष्ट्रातील आदिवासीय म्हणजे भिल्ल, कातकरी, वारली, ठाकूर इत्यादी होत. विवाह, जन्म, मृत्यू, सण हे या जमातीचे नृत्यप्रसंग. मानवाची अद्भुतरम्यतेची आवड ही ह्या नृत्यांची मूलभूत प्रेरणा. कर्कश नि ओबडधोबड वाद्ये, भडक पोषाख व रानटी मनोविकार ही आदिवासीय नृत्याची प्रमुख अंगे म्हणता येतील. वारली, ठाकूर ह्यांची लोकनृत्ये रानटी अवस्थेतील वाटतात. कातकरी त्याच्या नृत्यात चित्र-

विचित्र देवता दाखवितात. त्याचे मुख्य नृत्य झेण्डा हे आहे. मात्र ह्या आदिवासीय नृत्यातदेखील विशेषतः ठाकरांच्या नृत्यात पुराणे वगैरेंची वर्णने बरीच येतात.

ह्यानंतरची नृत्याची दुसरी प्रगत अवस्था म्हणजे लोकनृत्ये! आदिवासीय नृत्यांपेक्षा ही खूपच प्रगत वाटतात. ही प्रामुख्याने समूहनृत्ये असतात. ह्यांना नियम असतात. रेखीवपणा असतो. लोकनृत्यात दोन उपविभाग पडतात. एक स्त्रियांची नृत्ये व दुसरी पुरुषांची नृत्ये. महाराष्ट्रात स्त्रियांची नृत्ये बहुधा सणाचे प्रसंगी केली जातात. ही नृत्ये नाजूक, लालित्यपूर्ण जरी वाटली नाहीत तरी सहजसुंदर वाटतात. मंगळागौर, गौरीपूजा, दसरा, हरितालिका, नागपंचमी इत्यादी सणांच्या प्रसंगी ती केली जातात. फुगडी हा नृत्यप्रकार मोठा आकर्षक आहे. त्याचे दण्डफुगडी, बसफुगडी इत्यादी विविध प्रकार आहेत. ते सर्वच गतिमान व आकर्षक वाटतात. ग्रामीण स्त्रिया व नागर स्त्रिया यांच्या नृत्यप्रकारात बराच फरक पडतो. ग्रामीण स्त्रिया गौरीनृत्ये करतात. त्यालाच फेर असेही म्हणतात.

नागर स्त्रियांच्या नृत्यात ‘ नाच गो घुमा ’ हे रुसलेल्या मैत्रिणीला समजाविण्याचे नृत्य आहे. ‘कोंबडा’, ‘ किस बाई किस ’, ‘ पिंगा ’, ‘ आगोटापागोटा ’ इत्यादी नानाविध प्रकार आहेत. झिम्मा हा नृत्यप्रकार तर भारतभर सर्व प्रांतांत थोड्याफार फरकाने आढळतो. ही सारी नृत्ये शास्त्रीय दृष्ट्या प्रगत व आकर्षक नसली तरी मराठी स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब प्रगटविणारी खचितच आहेत.

पुरुषांच्या लोकनृत्यात तीन विभाग आढळतात. एक धार्मिक प्रसंगी केलेली नृत्ये, दुसरी वीरवृत्तिपोषक अशी नृत्ये व तिसरी केवळ समाजाच्या मनोरंजनाकरता केलेली नृत्ये.

धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या नृत्यांत दिण्डी, गोपाळकाला नृत्य, दशावतार इत्यादी नृत्यांचा समावेश होतो. मृदंग, टाळ व वीणा यांच्या साथीवर विठ्ठलभक्तीने धुंदफुंद होऊन केलेले दिण्डी नृत्य सर्वपरिचितच आहे. कोकण भागात गोकुळअष्टमीच्या दुसऱ्या दिवशी बाळू लोकांनी केलेले दहिहण्डी अगर गोविन्दा नृत्य, दशावतार नृत्य म्हणजे शास्त्रोक्त नृत्य व लोकनृत्य ह्यांच्या सीमारेषेवरील नृत्यप्रकार. गोमान्तक व कोकण विभागात हे फारच लोकप्रिय आहे. ह्यात विष्णूचे दहाही अवतार चित्रित करतात. ह्या नृत्यप्रकाराचे कथाकली नृत्यप्रकाराशी बरेच साम्य आढळते.

वीरवृत्तिपोषक नृत्यांत लेझीम नृत्य, ढोलाचे नृत्य, वीराचे नृत्य, तरापि नृत्य इत्यादी प्रकार आहेत. लेझीम हे तर एक आदर्श लोकनृत्य आहे. त्याचे घाटी व देशी हे दोन प्रकार परिचितच आहेत. वाद्याच्या ठेक्यात व घोषात बेहोष होणे हा जो लोकनृत्याचा आत्मा तोच लेझीममध्ये आढळतो. लेझीम हे एक आदर्श लोकनृत्य आहे. तरापि नृत्य कोकणातील असून ते तरापि ह्या वाद्याच्या साथीवर केले जाते. उड्यांचा नाच, पाय पलटाचा नाच, गुंजावयाचा नाच हे त्याचे प्रकार आहेत. वीरनृत्य हे देवाळ्यासमोर मृत वीरांचे वंशज करतात.

मनोरंजनाच्या विभागात शिमगा किंवा नकटा नृत्य, तमाशा इत्यादींचा समावेश होतो. नकटा नृत्य कोकणातील कोळी, कोळीण व नकटा ही पात्रे करतात. कोळी-कोळीण नृत्य करतात तर नकटा नाट्याच्या साहाय्याने अभिनय करतो.

तमाशा नृत्य हे महाराष्ट्राचे खरेखुरे नृत्य! ‘ शास्त्रीय नृत्य ’ ह्या संज्ञेजवळ थोडे-फार जाऊ शकणारे. त्याची निर्मिती झाली सैन्याच्या मनोरंजनाच्या गरजेतून. त्यामुळे त्यात मोगलांचा परिणाम होणे अपरिहार्यच होते. तमाशांत जो आदा करतात तो मोगलांचाच परिणाम.

तमाशांत गोंधळी करीत असलेल्या ललितापासून वेदान्तपर गूढार्थ अंतर्भूत झाला तर कथेकरी संप्रदायातून उडत्या नि चटकदार चाली आलेल्या आहेत. बहु-रूप्यापासून भावविकसन व नाट्यमयता आलेली आहे. रामा गोंधळी, सगन भाऊ, होनाजी बाळा, राम जोशी, प्रभाकर इत्यादी कवींकडून तमाशास जीवंत काव्य मिळाले आहे. सहजसुलभ व आकर्षक नाट्य, अवघड नि तरीही लालित्यपूर्ण व सुबक जोष-पूर्ण पदन्यास ही तमाशाची प्रमुख अंगे आहेत. तमाशाचा झालेला विकास पाहता असे वाटते की, अधिक सुव्यवस्थित मार्गदर्शन लाभले असते तर तमाशा हा जो आज लोकनृत्य ह्या सदरात येतो तो ‘ शास्त्रीय नृत्य ’ ह्या पदवीस सहजतेने पोहोचला असता. कारण शास्त्रीय नृत्याची बरीचशी अंगे म्हणजे कथानक रचना व त्याचे विकसन, तालातील कसरती–पटी दाखविणे, तुकडे तोडे घेणे बीजरूपाने का होईना पण तमाशात आहेत.

आता शास्त्रीय नृत्याविषयी विचार करता असे म्हणावे लागते की, दुर्दैवाने ‘ शास्त्रीय नृत्य ’ ही संज्ञा लाभेल असे एकही नृत्य महाराष्ट्रात नाही. शास्त्रीय नृत्य हे वरच्या पातळीवरील किंबहुना समाजातील उच्चभ्रूंना रुचेल, पटेल असे असावे लागते. ते अत्यंत नियमबद्ध, विवक्षित लोकांनी केलेले व विवक्षित लोकांसाठीच असते. महा-राष्ट्रातील नृत्याचा विकास शास्त्रीय ह्या नामाभिधानास योग्य इतका झालेला नाही.

गेल्या ३०-३५ वर्षांत मात्र महाराष्ट्रातील नृत्यकलेचे चित्र उजळत आहे. ते पालटावयाचे प्रथम श्रेय द्यावयास हवे ते श्री. उदयशंकर ह्यांना! त्यांचे नृत्यप्रयोग होण्यापूर्वी महाराष्ट्रात नृत्य म्हणजे ‘ तमाशा ’ नृत्य हेच समीकरण होते. उच्चभ्रू व सुसंस्कृत माणूस त्यापासून चार पावले दूर राहू पाहात होता. अशा ह्या पार्श्वभूमीवर श्री. उदयशंकर ह्यांनी महाराष्ट्रात पाऊल टाकले. ‘ शास्त्रीय नृत्य ’ हा नृत्यप्रकार महाराष्ट्रातील लोकांना पहिल्याप्रथम दिसला. नृत्य ही शास्त्रबद्ध कला आहे, तिला काही आखीव बांधीव नियम आहेत ही गोष्ट त्या वेळी महाराष्ट्राला परिचित झाली. श्री. उदयशंकर ह्यांच्या जवळ आपली कला आकर्षकपणे पेश करण्याचे कौशल्य (Show-manship) फार चांगले होते. त्यामुळे त्यांचे प्रयोग रसिकप्रिय होऊ लागले. आणि थोड्याच दिवसांत नृत्य येणे ही एक अभिमानाची बाब ठरू लागली.

श्री. उदयशंकर ह्यांचे समकालीन नर्तक म्हणजे श्री. गोपीनाथ, श्री. रुक्मिणी

अरुण्डेल, श्री. रागिणीदेवी, कै. मेनका, राम गोपाल ह्यांनीही आपापल्या परीने महाराष्ट्रात नृत्यप्रयोग करून महाराष्ट्रातील नागर समाजाचा व सुशिक्षितांचा नृत्याविषयीचा दृष्टिकोण बदलण्यास भरीव मदत केली. मराठी रसिकांना शास्त्रीय नृत्याविषयी औत्सुक्य व आकर्षण निर्माण केले.

विशेषतः कै. लेडी मेनका ह्यांचे कार्य महाराष्ट्राच्या दृष्टीने तर जास्तच गौरवास्पद आहे. कारण त्यांनी इतर कलावंतांप्रमाणे महाराष्ट्राचे नुसते दौरे न करता महाराष्ट्र हेच आपले कार्यक्षेत्र बनविले. त्यांनी खण्डाळा येथे नृत्यशाळा स्थापन करून महाराष्ट्र हीच आपली कर्मभूमी बनविली. विविध प्रांतांतील ख्यातनाम नर्तकवर्ग जमवून त्यांनी नृत्य शिक्षणाची पद्धतशीर आखणी केली. त्यामुळे त्यांची एक शिष्यपरंपराच तयार झाली. भारतविख्यात श्रीमती दमयन्ती जोशी, श्रीमती शेवन्ती ह्यांसारख्या नर्तिका महाराष्ट्राला लाभल्या. नृत्याचे पुनरुज्जीवन हेच ह्या कालखंडातील नर्तकांचे खरे कार्य म्हणावे लागेल.

ह्यानंतर महाराष्ट्रात जी नर्तकांची पिढी उदयास आली ती उदयशंकर, गोपीनाथ इत्यादींच्या कलादर्शनाने भारावलेली. ह्या साऱ्यांना नृत्य शिकण्याची आच होती, तळमळ होती, पण पायांत सामाजिक प्रतिष्ठेची बेडी होती. योग्य गुरू शोधण्याची तळमळ होती. आकांक्षा होती. ही सारी पिढी सुशिक्षित होती. सुसंस्कृत होती. सुप्रतिष्ठित होती. ह्यांत समावेश होतो प्रस्तुत लेखक, श्री. पार्वतीकुमार, श्री. मोहन कल्याणपूरकर, श्रीमती रोहिणी भाटे, श्री. रोहिणी वागळे इत्यादींचा. आजपर्यंत कुणी न गेलेल्या अज्ञात नि काटेरी वाटेचा तो शोध होता. त्या मार्गात उपहास, कष्ट होते. प्रतिष्ठेचा अडसर होता. संगीतात जे श्रीमती हिराबाई बडोदेकरांविषयी म्हटले जाते की त्यानी 'माजघरात संगीत नेले', संगीतास प्रतिष्ठा दिली तेच ह्या नर्तक पिढीस लागू पडते. त्यांनी महाराष्ट्रात नृत्यास प्रतिष्ठा दिली. तिचे बीजारोपण केले. महाराष्ट्राच्या उच्च मध्यमवर्गीय, सुशिक्षित, सुसंस्कारित व प्रतिष्ठित समाजात त्यांनी नृत्याचा प्रसार नि आवड निर्माण केली. विशेषतः प्रस्तुत लेखकाने तर कांदिवली व शारीरिक शिक्षण विद्यालय, पुणे, इत्यादी शारीरिक शिक्षण संस्थांत व महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांत नृत्य हे अभ्यासक्रमात अंतर्भूत केले. नृत्याचे ललित स्वरूप व कलात्मक आत्मा नष्ट न करता नृत्याचा सांघिक प्रसार महाराष्ट्रभर पद्धतशीररीत्या केला. श्री. पार्वतीकुमार ह्यांनी 'भरतनाट्यम्' ह्या शास्त्रीय परंपरेत तंजावरच्या मराठी राजांनी घातलेली भर ह्या विषयावर बरेच संशोधन केले आहे.

वरील सर्व नर्तकांनी पुणे व मुंबई ह्या मोठ्या शहरी कार्य केले तर अनेक कलावंतांनी निरनिराळ्या छोट्या मोठ्या गावी शास्त्रीय नृत्याचा प्रसार केला. श्री. गट्टी बंधू ह्यांनी सोलापूरला, श्रीनिवास कुलकर्णी ह्यानी धारवाड येथे, श्री. मिरजकर ह्यानी कोल्हापूर येथे नृत्यप्रसाराचे कार्य केले.

ह्यानंतर स्वातंत्र्योत्तरकाळातील अनेक फायदे मिळून उदयास आलेली पिढी. ह्या पिढीचा मार्ग बराच सुकर झाला होता. सामाजिक प्रतिष्ठेची बंधने बरीच शिथिल

झाली होती. सुयोग्य गुरू संपादन करणे इतके अशक्य राहिले नव्हते. सरकारकडून आर्थिक साहाय्यही लाभू शकत होते. ह्या उदयोन्मुख पिढीत समावेश होतो कु. सुचेता भिडे, मेनका ठक्कर, रोहिणी ओक, शशिकला जगदाळे, सिलू इराणी, मंदा मालवीय, पक्वासा वगैरेंचा. मराठी नृत्यरसिक त्यांच्यापासून अपेक्षा बाळगून औत्सुक्याने त्यांच्या प्रगतीकडे पाहात आहे.

ह्याशिवाय अन्य बऱ्याच नर्तकांचा महाराष्ट्राच्या नृत्येतिहासात उल्लेख करावयास हवा. हे सर्व नर्तक होते व आहेत अन्यप्रांतीय व विविध परम्परेतील. पण त्यांनी आपले कार्यक्षेत्र निवडले होते ते मात्र महाराष्ट्रात ! त्या सर्वांच्या कार्याचा आपण थोडक्यात परामर्श घेऊ या. श्री. कन्हैयालाल मुनशी ह्यांनी प्रथम नवकुमार सिन्हा, ह्या मणिपुरी नर्तकाला मुंबईत आणून त्या नृत्यपद्धतीचा परिचय करून दिला. त्यानंतर नवकुमाराचा मुलगा नरेंद्रकुमार व श्री. बिपिन सिन्हा ह्यांनी मुंबईत मणिपुरी नृत्याचा बराच प्रचार केला. झवेरी भगिनी तर मुंबईच्याच असल्याने गेली १०-१५ वर्षे त्यांनी मणिपुरी नृत्य सर्वपरिचित व लोकप्रिय करण्यास बराच हातभार लावला आहे.

नरेंद्रकुमार ह्यांचे समकालीन सुखेन्दु दत्त ह्यांच्या स्फूर्तीने मुंबईत रुपायतन ही संस्था सुरू झाली व गेली पंचवीस वर्षे तिच्यात मणिपुरी, भरतनाट्यम्, कथाकली इत्यादी नृत्यशाखेचे शिक्षण दिले जाते.

नंतर कथाकली परंपरेचा विचार केला तर श्री. अच्युतन् नायर, गुरू करुणाकरन् पणीकर, गुरू कृष्णन् कुट्टी व श्री. राघवन् ह्यांना नृत्यप्रसाराचे श्रेय द्यावयास हवे. ह्या नर्तकांनी मुंबईत वास्तव्य करून मराठी जनतेला कथाकलीचे सुयोग्य दर्शन घडविले. तद्वतच मराठी शिष्य तयार केले.

श्री. रमणि ह्यांनी गुरू गोविंदराज पिल्ले ह्यांना पाचारण करून पहिल्याप्रथम भरतनाट्यम् परंपरेचे दर्शन घडविले. तदनंतर श्री. चंद्रशेखर पिल्ले, कल्याणसुंदरम्, जयलक्ष्मी अल्वा वगैरे गुरुंनी भरतनाट्यम् नृत्यशाखेचा मुंबईत प्रसार केला व एक लोकप्रिय नृत्यपरंपराच तयार केली.

कथ्थक नृत्यपद्धतीत श्री. कल्याणपूरकर ह्यांनी प्रथमच महाराष्ट्रात श्री. सुंदरप्रसाद ह्यांना आणून कथ्थकचे बीजारोपण केले. नंतर कै. मेनकाने बिहारीलाल, सीताराम प्रसाद इत्यादी कथ्थक गुरुंना एकत्रित करून कथ्थकचे पद्धतशीर शिक्षण सुरू केले. त्याचप्रमाणे कथ्थकमधील जयपूर घराण्याचा प्रसार पवैय्या भगिनींनीही केला. राजाराम मांजरेकर हेही महाराष्ट्रीयन कथ्थक नर्तक होते. ह्याशिवाय श्री. गौरीशंकर सितारा व सर्वपरिचित असलेले श्री. गोपीकृष्ण ह्या सर्वांनी कथ्थकच्या प्रसारास साहाय्य केले.

महाराष्ट्राच्या नृत्येतिहासाचा मागोवा घेताना आपल्याला असे आढळते की, नृत्यात एक नवीन प्रयोग घडविण्याचा मान महाराष्ट्रलाच मिळतो. Ballet हा नृत्यप्रकार भारतीय नृत्याला फारसा परिचित नाही. पण गेली पंचवीस वर्षे हा 'नृत्यनाट्य'

प्रकार भारतात दृढमूल करण्याचे श्रेय महाराष्ट्रालाच मिळते. विशेषतः मुंबईत अनेक ख्यातनाम नर्तकांनी Ballet (नृत्यनाट्य) दिग्दर्शित केले.

पहिल्या प्रथम कै. मेनका ह्यांनी पुढील नृत्यनाट्ये निर्मिली. कृष्णलीला, देवविजय, मेनकालास्यम्, मालविकाग्निमित्रम् इत्यादी. नंतर श्री. कृष्णन् कुट्टी ह्यांनी हिमा केसर-कोडी, सितारा ह्यांच्या मदतीने अनेक नृत्यनाट्ये चित्रित केली ती पुढीलप्रमाणे : चित्रा, False pride, Terrible boon इत्यादी. विशेषतः Birth of Nation हे नृत्यनाट्य त्यातील विषयाच्या नावीन्यामुळे नृत्याच्या माध्यमात फार मोठा प्रयोगच होता.

Little Ballet Troupe ह्या संस्थेतर्फे कै. शांतिवर्धन ह्यांनी अनेक नृत्यनाट्ये बसविली. रामायण in puppet, मेघदूत, क्षुधितो पाषाण, पच्चतन्त्र इत्यादि नृत्यनाटये ह्या संस्थेतर्फे रंगमंचावर आली. पंडित नेहरूंच्या Discovery of India ह्या ग्रंथावर आधारित नृत्यनाट्यही कै. शांतिवर्धन ह्यानी दिग्दर्शित केले.

प्रसिद्ध भरतनाट्यम् नर्तक श्री. पार्वतीकुमार ह्यानीही 'देख तेरी बम्बई', Discovery of India ही नृत्यनाटये मुंबईच्या रसिकांसमोर पेश केली.

प्रसिद्ध नर्तक श्री. सच्चिनशंकर ह्यांनीही शिवपार्वती, रामायण, शिवाजी इत्यादी नृत्यनाटये सादर केलेली आहेत. श्री. योगेंद्र देसाई ह्यांनी रामशबरी, नरसी भगत इत्यादी नृत्यनाट्ये निर्माण केलेली आहेत.

प्रस्तुत लेखकानेही ज्याला संपूर्णपणे महाराष्ट्राचेच म्हणता येईल असे नृत्यनाट्य सादर केले. ते म्हणजे तुकाराम. त्यातील कथावस्तू सर्वस्वी महाराष्ट्राचीच होती. मराठी मनाला रिझवणारे संगीत–भूपाळी, अभंग, लावणी, साकीसारखे त्यात उपयोगात आणले गेले होते. मराठी नृत्यप्रकार म्हणजेच तमाशा, दिण्डी, लेझीम, वगैरेंचा त्यात समावेश होता. सर्वार्थाने हे एक मराठी नृत्यनाट्य होते.

मराठी रसिक मोठे चोखंदळ, मार्मिक व रसज्ञ समजले जातात. कोठल्याही नवीन प्रयोगाकडे ते कुतूहलाने व रसिकतेने पाहतात. त्यामुळे महाराष्ट्रात लोकप्रियता मिळविणे म्हणजे नर्तकांना मानदण्डच वाटतो. महाराष्ट्रातील लोकप्रियता ती भारतात लोकप्रियता लाभण्यासारखेच वाटते.

अशी आहे महाराष्ट्रातील नृत्याची गाथा ।

मराठी लोकनाट्य !

व्यंकटेश माडगूळकर

आपल्या सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी प्रत्येक समाज स्वतःच्या अशा काही संस्था निर्माण करतो, त्यांना विशिष्ट रूप देतो. मराठी समाजाने मराठी कीर्तन, मराठी भजन, मराठी प्रवचन ह्या संस्था जशा निर्माण केल्या तसे मराठी नाट्यही निर्माण केले. तमाशा हे खास मराठी नाट्य आहे. त्याचे हे मराठीपण त्याच्या अंगोपांगात भरून राहिलेले आहे. पटांगणात उभा राहिलेला तमाशा दूर उभे राहून ऐकला, तो ढोलकीचा खणखणाट, ती वगाची म्हणणी, ती झील, ते 'रंगू तू, राधा ग' आणि ती रांगडी भाषा कानी पडली की, तात्काळ आपण म्हणतो की हा मराठी तमाशा आहे. हा इतरत्र कुठे, उत्तर प्रदेशात, गुजरातेत, आंध्र प्रदेशात वा केरळमध्ये आढळणार नाही. हे झाड इथेच वाढलेले आणि विस्तारलेले आहे, फळाफुलाला आले आहे.

तमाशाने हे आजचे रूप घेतले आहे त्याअगोदर पुष्कळच घडामोडी झालेल्या आहेत. खेळाचे बरेच प्रकार पूर्वीपासून होत होते.

दशावतार, गोंधळ, भारुड, ललित ह्या सर्वांचेच तमाशा घेणे लागतो. ह्या सर्वांचा त्याच्या जडणघडणीला हातभार लागलेला दिसतो. दशावतारातला सूत्रधार किंवा गोंधळातला नाईक तसाच तमाशातला सरदार. गोंधळातले तुणतुणे तमाशात आहेच. मृदंगाची जागा ढोलक्याने घेतली. संबळाऐवजी कडे आले. दहिकाला किंवा गौळणकाला हा जो प्रकार दशावतारात होई त्याचेच थोडे वेगळे रूप म्हणजे तमाशातील गौळण. दशावतारातला, गोंधळातला गण तमाशात आहेच. सोंगाड्याची जातकुळी सांगायची तर ती दशावतारातील शंखासुराचीच.

पेशवाईच्या अगोदरसुद्धा खेळ किंवा गंमत ह्या नावाखाली तमाशेवजा प्रकार होत होता. मुळातल्या 'गमती'ने तमाशा हे नाव घेतले. ते मुसलमान अमदानीत. उत्तर पेशवाईत तमाशा भरभराटीला आला. होळीच्या निमित्ताने तमाशे होत. त्यांना

लोकाश्रय आणि राजाश्रयही होता. स्वतः शाहीरच तमाशाचे फड काढीत.

पेशवाईतील तमाशाचे स्वरूप आजच्या तमाशापेक्षा वेगळे होते हे स्पष्ट आहे. गण-गौळण, सोंगाड्या, नाच्या पोऱ्या हे सगळे होते. शिवाय कलगी-तुऱ्याचा वादही होता. सवाल जबाब होते. पण आजचा वग नव्हता. तो पुढे पठ्ठे बापूराव (१८६८ ते १९४२) ह्या शाहीर परंपरेतील शेवटच्या शाहिराच्या वेळी आला असावा. एका गणात त्यांनीच म्हटले आहे की, ' लवकर येई सिद्ध गणेशा, आतमधी नाटक वरुन तमाशा. ' पठ्ठे बापूरावांचा ' मिठ्ठाराणी ' हा वग गाजलेला होता. नाच्या पोऱ्याऐवजी तमाशाच्या बोर्डावर राजरोसपणे बायका आल्या त्याही याच काळात. ' नाव तुझे पवळी, आम्ही केली सोवळी, लोकांच्या मनामध्ये सारे खुपते ' असे पठ्ठे बापूराव नामचंद पवळी नाचीसंबंधी म्हणतात. पटांगण सोडून तमाशा थिएटरात आला तोही याच काळात. कदाचित नाटकाचा तमाशावर झालेला परिणाम असावा.

पठ्ठे बापूरावांच्या काळातील तमाशाचे स्वरूप गण, गौळण, फार्स (हाही पुन्हा नाटकाचाच परिणाम. कारण पूर्वी नाटकाला फार्सांचा जोड देत.), वग, सवाल जबाब असे होते. शृंगाराच्या जोडीला अध्यात्म देऊन तोल राखण्याचा प्रकार म्हणजे सवाल जबाब. सर्व जग हा मायेचा पसारा आहे. म्हणजेच त्या शक्तीच्या कला आहेत. ह्या कलांचे गीत गाणारा तो कलगी आणि शिवाचा पक्ष तो तुरा. वस्तुतः कलगी आणि तुरा ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. तुर्की आणि अरबी भाषांतून आलेल्या ह्या शब्दांचा अर्थ पागोट्याला लावण्यासाठी मोत्याचे वा फुलाचे गुंफून केलेले शिरोभूषण. ह्या कलगी-तुरावाल्या शाहिरांची फार चुरस असे. त्यांचे जाहीर सामने होत. उत्तर पेशवाईत होनाजी-गवळ्यांचा फड आणि सगनभाऊचा ' रावळाचा फड ' ह्यांतील चुरस विकोपाला जाऊनच ' होन्या गवळ्याचा केला चुना ' असे उद्‌गार बाहेर पडले. आणि ह्या वादांना कंटाळलेल्या परशुराम शाहिराने–' सगुण निर्गुण शोधून पाहाता कमी जास्त नाही भेद, कलगी तुऱ्याशी निंदून गाईल तो मांगाची अवलाद ' असे संतापाने म्हटले. सवाल जबाबाची ही परंपरा पठ्ठे बापूरावांनी पुढे चालू ठेवलेली दिसते.

आपल्या बरोबरीच्या तमासगिरांची नावे गुंफलेली एक लावणी पठ्ठे बापूरावांनी केली. ती वाचली म्हणजे अठरापगड जातीतील किती पुरुष तमासगीर म्हणून प्रसिद्ध पावले होते याची कल्पना येऊन आश्चर्य वाटते. संभा कवलापूरकर, भाऊ बापू मांग, शिवा खेडकर, बाबू कुरणकर, संभू गोपाळ, दगडू साळी ह्या कधी ना कधी ऐकलेल्या नांवांबरोबर इतरही कित्येक नावे ह्या यादीत आहेत.

कैऱ्या गैबी, नाऱ्या धोबी, बाब्या म्हैदाचा
जोत्या बाघेरी, मोत्या डोंबारी, तात्या शिंद्याचा,
करीमभाई, बुऱ्हाण हलवाई, कसाई वांद्याचा
रुस्तुम काझी, पेस्तुम दरजी माहीम दादरचा,
शंकर वाणी, अकबर मुलाणी, दिनकर ब्राह्मणाचा,

गब्दुल झालाय डुलत चाललाय अबदुल मुमनाचा
हासन कलाल, हुसेन दलाल, किसन होलाराचा
पिर्वती चिवस्या, मारुती कवड्या हलालखोराचा

पुरुष तमासगिरांच्या ह्या नावांबरोबरच स्त्री-तमासगिरांचीही एक यादी आहे—

रंगु माळ्याची, गंगु साळ्याची
न्हाई भागी तांबोळी, तानी सोनारिण
राणी महारिण, चांभारिण गोकुळी
सैना धनगरिण, बैना सनगरिण
बैना लव्हारिण, काळी, आकी सुतारिण
बकी उतारिण, ठकी वतारीण खुळी

म्हणजे अठरापगड जातीजमातींतील स्त्री-पुरुष ह्या व्यवसायात होते. ही सर्वच मंडळी पठ्ठे बापूरावांसारखी कोणी नावाजलेली नव्हती. होळी, जत्रेच्या निमित्ताने गावोगाव तमाशे होत. मोठमोठ्या बिदाग्या देऊन नावाजलेले लोक एकदोन खेळांसाठी बोलावणे गावकऱ्यांना शक्यच नसे. मग गावातलाच किंवा आसपासच्या पंचक्रोशीतला एखादा फड सुपारी देऊन आणला जाई आणि तो खेळ करी. 'ब्राह्मणा घरी लिहणे आणि महाराघरी गाणे' अशी एक म्हण मराठीत आहे. गावोगावच्या महारवाड्यातून गाण्याची नादी माणसे असत. त्यांतलीच चारआठ टाळकी एकत्र जमत आणि तमाशाचा फड उभा करण्याच्या वेडाने भारावून उद्योगाला लागत. गावातली इतर नादी पोरेही त्यांना जाऊन मिळत.

दशावतारातील सूत्रधाराप्रमाणे कोणी हुन्नरी, सरदार निघे. तो ऐकून ध्यानी राहिलेली, माहितीत असलेली अशी सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी किंवा वेताळपंचविशी-तली एखादी कथा निवडी. पात्रे जमवून कामाची वाटाघाट करी. कुणी वग रची. लावण्या करी. तालमी चालत आणि चुकतमाकत फड उभा राही. त्याचा पहिला प्रयोग होळीचा मोका साधून गावातच होई. साहजिकच गाववाले कौतुक करीत आणि त्यांना शाब्दिक प्रोत्साहन देत असत. मग हा फड शेजारपाजारची गावे घेई आणि असे होता होता, गावे-ओढ्याच्या वाळूत कुस्त्या खेळणाऱ्या भाराभर पोरांपैकी एखादेच निवडून पहिलवान होते तसा एखाद्या 'रामा नामाचा' किंवा 'शिवा संभाचा' किंवा 'भाऊ बापू'चा प्रसिद्धीला येई.

अशा स्थानिक फडांचे खेळ बहुधा चावडी-देवळापुढच्या पटांगणात होत. अगदी खेटून असे चारी बाजूंनी प्रेक्षक बसलेले असत. दिवटीचा किंवा एखाददुसऱ्या बत्तीचा प्रकाश असे. समोरचे दृश्य पाहण्यात प्रेक्षक एवढे गुंगून जात की, मधेच समोरच्या वाजंत्र्याचे काम करणाऱ्यांतला एक गडी बाजूला केव्हा गेला आणि बाखाच्या दाढीमिश्या लावून, कपाळाला भस्माचे पट्टे ओढून अलख निरंजन करीत पुन्हा समोर केव्हा आला, वगातले पात्र म्हणून काम करू लागला हे कळत नसे. खरे तर थोडे

बाजूला कमी उजेडात बसूनच त्याने हे मेक-अप झटपट उरकलेले असे.

कोणी राजा भोज, कोणी राणी, कोणी चतुर प्रधान आणि एक खाकी पोशाखातला हवालदार अशी पात्रे हटकून असत. कथानक पौराणिक असो, नाहीतर मध्ययुगीन असो, त्यात हवालदार हे पात्र सोंगाड्या म्हणून वावरत असे. त्याला कुठेही आणि काहीही बोलण्याचे स्वातंत्र्य असे. नलदमयंती कथानकात 'मी नळ' म्हणून नळराजा प्रेक्षकांपुढे उभा राहिला की त्याच्या पुढे डफाचे घंगाळे धरून हा, पाणी केव्हा पडते म्हणून उभा राही. हंसपक्षी निरोप घेऊन दमयंतीकडे आला की हा प्रेक्षकांना म्हणे, 'चिकन फ्राय करायला हा बरा लठ्ठमठ्ठ दिसतो.'

समोर उभ्या असलेल्या तमासगिराची ओळख करून देणे हा सोंगाड्याचा एक खास कार्यक्रम. मग त्यात त्याच्या नेहमीच्या कोट्या आल्याच.

दुसरे महायुद्ध झाले. शतकानुशतकें तसेच राहिलेले ग्रामीण जीवन ढवळून निघाले. लोक-कलांची बरीच पडझड ह्या काळात झाली. रेशनिंग आले. महागाई आली. सुगीसराईच्या निमित्ताने गावाला दरवर्षी भेट देणारे डोंबारी, कोल्हाटी, काशी कापडे, वासुदेव, बाळसंतूस, बहुरूपी, हरदास, तमाशेवाले तुरळक दिसू लागले. दारी आलेल्या अशा लोकांना शेर-मापटे धान्य घालणे गृहिणीला अवघड वाटू लागले. केवळ एवढी फिरस्ती करून आता आपले पोटपाणी भागणार नाही याची जाणीव फिरस्त्यांना झाली आणि त्यांनी इतर उद्योगधंदे जोडले. लोकांचे मनरंजन करून त्यांना धर्म-अधर्माच्या, नीति-अनीतीच्या, व्यवहाराच्या कथा-गाणी ऐकवणारे लोक हळूहळू दिसेनासे झाले. नाटक सिनेमा तर अद्याप खेड्यात पोचला नव्हता. त्यामुळे ग्रामीण जीवनात काही काल पोकळी निर्माण झाली.

असा काही हलाखीचा काळ गेला आणि स्वातंत्र्य आले. लोककलांना पुन्हा एकवार राजाश्रय मिळाला. महाराष्ट्र राज्यात तमाशाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. तमासगीर परिषदा भरू लागल्या. त्या निमित्ताने थोर मोठे साहित्यिक ह्याविषयी बोलू, लिहू लागले. तमाशाचे उत्सव साजरे होऊ लागले. हा व्यवसाय करणारे चाळीस हजार लोक ह्या महाराष्ट्र देशात आहेत ही जाणीव प्रथमच झाली आणि शासनातर्फे प्रतिवर्षी तमासगिरांचा मेळावा भरून चाळीस हजारांची बिदागी वाटली जाऊ लागली. थकलेल्या तमाशा कलावंतांना अनुदाने, प्रशस्तिपत्रे मिळू लागली.

अलीकडे धंदेवाईक तमासगिरांचे बरे चालले असावे असे वाटते. मोठमोठ्या लॉन्या बाळगून हे लोक आता दौरे काढतात. सावळा धर्मा खुडे, दत्तोबा तांबे, तुकाराम खेडकर, दादू मारुती इंदोलीकर ही नावे सिनेमातील नटांइतकीच ग्रामीण जनतेच्या:परिचयाची झाली आहेत.

बहुतेक तमासगीर जत्राखेत्रा करीत हिंडत असतात. यांचा प्रेक्षक हा शेतकरी पेशाचा आहे. ह्या लोकांना रुचतील, पचतील अशीच कथानके वगांतून त्यांनी घेतली तर नवल नाही.

पौराणिक नाटकाचा परिणाम म्हणून की काय, हरिश्चंद्र-तारामती, नळदमयंती असली कथानके वगांत असत, तर झाशीची राणी, मर्द मराठा असे ऐतिहासिक वगही असत.

फार्स, वग ह्यांच्या जोडीने रंगबाजी लावण्याही बतावणीसहित म्हटल्या जात. त्यात आपुकमापुकातला झगडा असे. तात्या आणि बापू ह्या 'स्टॉक कॅरेक्टर्स' असत.

तमाशा धंद्यात असलेले लोक असा तमाशा जेव्हा करीत होते तेव्हा राजकीय पक्षही ह्या माध्यमाचा वापर करून तुफान प्रचार करीत होते. पूर्वी सत्यशोधक समाजाने ह्याच माध्यमाचा उपयोग केल्याचे आपण पाहतो. साम्यवादी पक्षाने आणि सेवादलानेही तमाशे करून जनजागृती केली. ह्या तमाशांची रचना करणारे आणि ते सादर करणारे पांढरपेशे असल्यामुळे काही वेगळाच रंग ह्या तमाशांनी घेतलेला आपण पाहतो. सरदारांऐवजी शाहीर नावाचे प्रमुख पात्र ह्याच तमाशातून प्रथम बोर्डावर आले. सर्व संचात जी काही आठ-बारा मंडळी असत त्या सर्वांनाच गळा आहे असे क्वचित असे. त्यामुळे शाहीर आणि रिंगाख्यानी मधून मधून बोर्डावर यावे, म्हणणी म्हणावी, वग म्हणावे आणि विंगात जावे असा रसभंग करणारा प्रकार सुरू झाला.

साहजिकच जत्राखेत्रांच्या वेळी, योगायोगाने एक राजकीय प्रचार–तमाशा आणि एक धंदेवाईक तमाशा अशा दोघांच्याही कनाती आमनेसामने लागल्यावर, सगळी गर्दी तिकिटे काढून धंदेवाइकांकडे आणि प्रचारकी तमाशासमोर फक्त आठ-पंधरा देशप्रेमी मंडळी असे दृश्य दिसे. शहरात मात्र ह्याही तमाशांना गर्दी होई.

हल्ली धुमधडाक्याने सुरू असलेला प्रकार म्हणजे लोकनाट्ये ह्या नावाखाली होणारे तमाशे. विच्छा माझी पुरी करा, लंवगी मिरची कोल्हापूरची, कथा अकलेच्या कांद्याची, माकडाला चढली भांग ही खेळांची आणि दादा कोंडके, निळू फुले, राम नगरकर, साबळे ही कलाकारांची नावे ह्या संदर्भात चटकन आठवतात. ही लोकनाट्ये चांगलीच लोकप्रिय झाली आहेत. मुंबई–पुण्यासारख्या शहरांतून त्यांचे शेकड्यांनी प्रयोग झाले आणि होत आहेत.

ह्या लोकनाट्यांचे जुन्या तमाशाशी नाते कोणते ?

तर गणगौळण, वग अशीच ह्यांचीही मांडणी असते. लावणी असते. कडे, तुणतुणे, ढोलकी, झिलकरी असतात. पटांगणात होण्याऐवजी हा प्रयोग मागे निळा पडदा असलेल्या थिएटरात होतो. ह्यातही सोंगाड्या असतो आणि अगदी प्रचलित प्रश्नावर विनोद कोट्या करून तो श्रोत्यांना हसत ठेवतो. नाही म्हटलं तरी थोडा चावट भाग ह्यात असतो. मुळातले स्क्रिप्ट आणि प्रत्यक्ष प्रयोग ह्यांत थोडेफार स्वातंत्र्य घेतलेले असते. भाऊ बापू मांग ह्यांच्या फडातील काशिनाथ सोंगाड्या जसा ग्रामीण भागात लोकप्रिय होता, दादू मारुती इंदोलीकर, किसन उसगावकर हे जसे लोकप्रिय आहेत तसेच ह्या नव्या लोकनाट्यातील सोंगाडे थिएटराच्या प्रेक्षकांत लोकप्रिय

आहेत. कौशल्याबाई कोपरगावकरांच्या ताकतीच्या नसल्या तरी लीलाबाई गांधी, उषा चव्हाण ह्या लोकप्रिय नर्तिका ह्या लोकनाट्यात आहेत. मराठी चित्रपटात त्यांनी केलेली नावेही ह्या बोर्डावर त्यांना उपयोगी पडत आहेत. परिचित अशा तमाशातील नृत्याबरोबरच पंजाबी भांगडा, ट्विस्टसारखी नृत्ये त्यांनी नव्याने आणली आहेत. उलट राजकीय पक्षाच्या कलापथकाप्रमाणे ह्यात शाहीरही दिसतो. हे असे बदल होत जाणे स्वाभाविकच आहे. मुळात तमाशाचे म्हणून जे सामर्थ्य आहे ते कायम राहिले म्हणजे तक्रारीला जागा राहू नये.

आता तमाशाचे सामर्थ्य कशात आहे? एक तर ते त्याच्या लवचिक अशा घाटात आहे. फार बंदिस्तपणा त्याला मानवत नाही. आखीवरेखीवपणा, घोटीवपणा ह्या त्याच्या प्रकृतीत नाही. सहजता आणि साधेपणा हीच वैशिष्ट्ये आहेत. कारुण्याचे अस्तर असलेला विनोद हा त्याचा आणखी एक गुण. रोखठोक रांगडी भाषा ऐकायला मिळते ती इथेच. बोली मराठीची सगळी वैशिष्ट्ये असलेली अशीच तमाशाची भाषा आहे. नृत्य आणि लावणी ही तर खास वैशिष्ट्ये आहेतच. त्यांची ओढ, टाळमृदंग आणि तुकोबांच्या अभंगाखालोखाल लोकांना आहे. वरवर पाहता असे वाटते की, फार गडद गंभीर, असा एखादा जीवनानुभव तमाशाला पेलणार नाही, पण खोलवर विचार केला तर हे पटेल की, हसतखेळत व्यावहारिक तत्त्वे प्रेक्षकांच्या गळी उतरविण्याचे काम तो करील, एवढेच नव्हे तर, आज जगभर गाजत असलेल्या ‘फिडलर ऑन द रूफ’ ह्या अमेरिकन म्युझिकलसारखे जीवनातील एखादे गंभीर सत्यसुद्धा त्याला सांगता येईल.

तमाशाची सारी वैशिष्ट्ये, सगळी सामर्थ्ये हेरून त्याला उच्चतर अशा कलापातळीवर नेऊन ठेवण्यासाठी एखादा ब्रेस्ट ह्या मराठी मुलखात केव्हा बरे निर्माण होईल?

आपण आपली वाट पाहावी झाले!

लोकनाट्य ! नव्हे तमाशा ! !

विश्वनाथराव वाबळे

तमाशा या मराठमोळ्या कलेला आजपर्यंत बहुजनसमाजाने वाढविले आणि वर्तविले. त्याच कलेला तमाशा हे नाव आहे. परंतु ‘ तमाशा ’ ऐवजी ‘ लोकनाट्य ’ या पांढरपेशा नावाने तो अलीकडे ओळखिला जाऊ लागला आहे. तमाशासंबंधी सुशिक्षित मंडळींतही १९७० सालात नाकाला पदर लावण्याची वृत्ती दिसत असल्यामुळे तमाशाचे वावडे असणाऱ्यांनी ‘ लोकनाट्य ’ हा नवीन शब्दप्रयोग सुरू केला आहे. इतकेच नव्हे तर, तमाशाच्या धरतीवर लोकनाट्य सादर करण्याचाही प्रयोग पांढरपेशा मंडळींनी चालू केला आहे. परंतु तमाशा आणि लोकनाट्यामध्ये उघड उघड फार मोठा फरक आहे. हा फरक चर्चेचा विषय असल्यामुळे विषयांतर न करता आता आपण सरळ तमाशालाच जाऊ या. पण हा तमाशा पाहण्यासाठी मुंबई-पुण्याचे थिएटरात न शिरता खेडेगावच्या जत्रेत बांधलेल्या कनातीत शिरले पाहिजे. कारण तेथेच खरा तमाशा आपणास दिसू शकतो. अशा एका जत्रेत वर्षानुवर्षे परंपरेने चालणारा तमाशा पाहणे अवश्य आहे.

अंधार पडला आहे. खेड्यातल्या एका माळावर तमाशाची कनात उभी आहे. मुंडाशी घातलेले शेतकरी जत्रेला आले आहेत, आणि जेवूनखाऊन तमाशा पाहण्यासाठी मोकळ्या माळावर ते बसले आहेत. समोरच दोन बाजूंला बत्त्या लावलेले छोटे स्टेज दिसत आहे. त्या ठिकाणी ढोलकी तुणतुण्याचा आवाज सुरू होत आहे. थोड्याच वेळात पायांत घुंगरे बांधलेल्या नाचणाऱ्या पोरी मुजरा करून लोकांसमोर येतात आणि गणगौळण होऊन तमाशा सुरू होतो. पदराची दोन टोके हाताने तोंडासमोर घेऊन नाचणाऱ्या पोरींचा नाच सुरू होतो. त्या वेळी त्यांची पाठ प्रेक्षकांकडे असते. ढोलकी तुणतुण्याच्या तालात नाचकामाला सुरुवात होते. पायातली घुंगरे त्यांना साथ देतात आणि नाच-कामानंतर गौळणींचा तांडा मथुरेला निघतो. त्यांना कृष्ण भगवान आडवतो आणि

सोंगाड्या असणारा पेंद्या कोट्या-प्रतिकोट्यांनी प्रेक्षकांना हसवायला लावतो. थोडी गंमत झाल्यानंतर लावण्या सुरू होतात; आणि यानंतर सोंगाड्या आणि नाचणारणी यांचे सवाल आणि जबाब होतात. हे कोणी लिहिलेले नसतात आणि पाठ केलेले नसतात. ते उत्स्फूर्त असतात. त्यांनाच फार्स किंवा गंमत असे म्हणतात. गंमत करणारे शिकलेले नसतात आणि ऐकणारे अशिक्षित असतात, त्यामुळे एकमेकांची भाषा एकमेकांना समजते. गमतीतली गंमत अडाणी माणसांना ठसते आणि म्हणूनच या गंमतीने सारी मंडळी पोट धरून हसतात. हसून हसून त्यांच्या मुरकुंड्या वळतात. पण लोकांना हसवण्यासाठी तमासगीर घाणेरडे बोलत नसतात. हिडीस हावभाव तमाशात दिसत नाहीत. तरी पण लोक टाळ्या देतात आणि मनमुराद हसतात. अशा सवाल-जबाबाबरोबर लावण्या म्हटल्या जातात आणि याच तमाशाच्या बारीला ‘ संगीत बारी ’ म्हणतात. अशा संगीत बाऱ्यांनंतर शेवटी ढोलकीची बारी येते. या ढोलकीच्या बारीला वग सादर करावा लागतो. या वगाचे संवाद एका गोष्टीच्या भोवती घुटमळत असतात. वगातली मंडळी कोणी राजा होतो, कोणी राणी होते, कोणी प्रधान होतो, कोणी शिपाई होतो आणि आपल्या मोडक्यातोडक्या भाषेत त्यांचे संवाद चालतात. थाट सारा नाटकाप्रमाणे असतो. पण नाटकांच्या लेखकाप्रमाणे कोणी लेखक हा वग लिहीत नाही. आयत्या वेळी सुचेल ते वगात बोलले जाते. वाणीने उत्स्फूर्त वदले जाते म्हणून त्याला वग असे म्हणतात. वगाची सुरुवात गाण्यानेच होते आणि गाण्यामधूनच वगाची गोष्ट सादर केली जाते. गाणी आणि संवाद यांच्या सुरेख मिश्रणाने गोष्ट सादर केली जाते. असा हा वग म्हणजे खेड्यापाड्यातल्या भोळ्याभाबड्या जनतेला आवडणारा तमाशा. हा तमाशा मध्यरात्रीनंतर सुरू होतो आणि तांबडे फुटल्यानंतर जेव्हा पूर्व दिशा फटफटते तेव्हा हा वग संपत असतो. असा असतो हा खेड्यातला तमाशा. हा तमाशा पाहण्यासाठी आसपासच्या खेड्यांतील हजारो लोक जत्रेच्या ठिकाणी जमत असतात. तमाशाला जत्रेसाठी गावकऱ्यांची सुपारी असते. या सुपारीची बिदागी ठरलेली असते. जशी महागाई वाढत गेली, तशी बिदागी वाढत गेली. बिदागीवरच तमाशा चालत नसतो. त्याला दौलतजादाची जोड असते. हा दौलतजादा तमाशा पाहणारे खुशालचंद करीत असतात. आपले आवडते गाणे पुन्हा म्हणावे म्हणून जे बक्षीस दिले जाते त्यालाच दौलतजादा म्हणतात. पूर्वीच्या काळात तर चवलीच्या रूपाने हा दौलतजादा होत असे आणि म्हणूनच चवली घेऊन ‘ चवलीचे म्हणणे काय ! ’ असे नाचणारीण जाहीर करीत असते आणि चवली देणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे लावणी म्हणत असते. पण आता ही चवली दिसेनाशी झाली. चवलीची जागा पावलीने घेतली आणि महागाईबरोबर पावलीची जागा रुपयाने घेतली. इतकेच नव्हे तर रुपयाच्या नोटेऐवजी शंभराच्या नोटासुद्धा दौलतजादासाठी नाचणारणीच्या हातात पडू लागल्या. मुंबई राज्याचे महसूलमंत्री असताना मुरारजी देसाई या गांधीभक्ताने तमाशा सुधारण्याचा पहिला प्रयोग केला आणि त्यासाठी समिती नेमली; आणि समितीचे ऑफिस होते पेशव्यांच्या पुण्या-

मध्ये. पुण्यातल्या शुक्रवार पेठेऐवजी शनिवार पेठेमध्ये. महाराष्ट्राच्या बहुजनसमाजाच्या तमाशाचा हा ‘तमाशा’ करण्याचा मोठा फार्स खेर–मुरारजींनी केला. दोघांचाही तुणतुण्याच्या तारेइतकाही तमाशाशी संबंध नव्हता. त्याबरोबर साऱ्या महाराष्ट्रात शेकडो वर्षांच्या तमाशा कलेवर पहिल्याप्रथम महान संकट कोसळले. तमाशाच्या शुद्धीकरणास निघालेल्या पांढरपेशांनी तमाशातला शुद्ध तमाशा अशुद्ध केला. शनिवार पेठेत बसून एका पांढरपेशाने एक अहवाल तयार करून सरकारला सादर केला आणि खेर–मुरारजींच्या शेटजी-भटजींच्या सरकारने बहुजनसमाजाच्या तमाशावर पहिला प्रचंड टोला हाणला. त्यामुळे तमाशाला साऱ्या महाराष्ट्रात एकदम उतरती कळा लागली. दौलतजादावर बंधने आली. या उत्स्फूर्त कलेचे नाटकाप्रमाणे परीक्षण होऊ लागले. अश्लीलतेच्या नावाखाली लावण्यांची गळचेपी झाली. वेळेच्या बंधनामुळे खेड्यातले तमाशे वेळी अवेळी बंद पडू लागले. तमाशा पाहण्यासाठी आलेल्या अडाणी खेडुतांचा विरस होऊ लागला आणि त्यातून खरा तमाशा लुप्त झाला.

पण नियतीचा खेळ काही आगळा होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली आणि द्वैभाषिक जन्मास आले. महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या संस्कृतीला आणि कलांना प्रोत्साहन देण्याची नीती नव्या सरकारने अमलात आणली. त्यामुळे पहिलवानी पेशाबरोबर तमाशाच्या कलेला उत्तेजन मिळाले, आणि मरणाच्या दारात पडलेला तमाशा पुन्हा उठला. मराठी तमाशा परिषद जन्मास आली, आणि तमाशा परिषदेची अधिवेशने सुरू झाली. लोकमान्य अशा तमाशाला राजमान्यता मिळाली, आणि भाऊ बापू मांग नारायणगावकर राष्ट्रपती पदकाचे पहिले मानकरी झाले. त्याबरोबर तमासगीर संघटित होऊ लागले. सरकारने त्यांचा तमाशा महोत्सव सुरू केला. तमाशा महोत्सव सादर करून सरकार तमासगिरांचे म्हणणे ऐकून घेऊ लागले. तमाशाच्या अडचणी सरकारपुढे आल्या आणि तमासगिरांच्या तक्रारी दूर करण्यासाठी समाज कल्याण खाते लक्ष घालू लागले. त्याबरोबर तमाशाकडे सारा महाराष्ट्र आपुलकीने पाहू लागला. तमाशा म्हणताच जे नाके मुरडीत असत तेही तमाशा पाहू लागले. त्याबरोबर पांढरपेशाचे लक्ष तमाशाकडे लागले, आणि त्यांनीही तमाशाची नक्कल करायला सुरुवात केली. पण ती अस्सल तमाशापासून वेगळी ठरली गेली. ‘लोकनाट्य’ नावाने ती महाराष्ट्रापुढे आली पण या तमाशाची सर लोकनाट्याला कशी येणार? अखेर लोकनाट्य राहिले आणि तमाशा मात्र तमाशाच राहिला. अखेर तमाशाची आवड लोकांमध्ये वाढू लागली, आणि हे हेरूनच तमाशाला सिनेमात खेचावयाला सुरुवात केली. तमाशाच्या धरतीवर सिनेमा निर्माण झाले, आणि ते लोकप्रिय ठरले. तमाशा जसा सिनेमात शिरला त्याप्रमाणे सिनेमाही तमाशात घेतला. सिनेमातली गाणी तमाशात आली आणि तमाशातला तमाशा नष्ट होऊ लागला. लावण्यांची जागा गाण्यांनी घेतली आणि तमाशा कलेचे विडंबन होऊ लागले. नऊवारी पातळांऐवजी पाच वारी पातळे आली, आणि तमाशातला मराठमोळेपणा नाहीसा होऊ लागला. शेवटी तमाशा-

तली गाणी बंद करा बंद करा म्हणण्याची वेळ आली, आणि तमाशात लावण्याच पाहिजेत असा आग्रह धरणारा ठराव तमाशा परिषदेला करावा लागला. इतकेच नव्हे तर तमाशासाठी खास थिएटर्स उभारण्याची मागणी करण्यात आली. कारण तमाशात नाटकीपणा येऊ लागला, आणि नाटकाच्या थिएटरात तमाशे होऊ लागले. त्यामुळे तमाशातले तमाशेपण कमी होऊ लागले. आणि म्हणूनच नाटक सिनेमाचे तमाशावर आक्रमण नको अशी आरोळी ठोकण्याची वेळ तमासगिरांवर आली.

मुरारजीनंतर पांढरपेशा लेखकांनी तमाशावर हा दुसरा हल्ला चढवला. सुदैवाने तो अपयशी ठरला. कारण हा हल्ला शहरातल्या पांढरपेशांचा असल्यामुळे खेड्यापाड्यातल्या तमाशावर तो परिणाम करू शकला नाही. म्हणूनच तमाशात येऊ पाहणारा इनामदार वर्ग खेड्यातल्या तमाशावर आक्रमण करू शकला नाही. तरीपण लोकनाट्याच्या नावाखाली या मंडळींनी तमाशात घातलेला धुडगूस कमी झालेला नाही. आकाशवाणीवरही अद्यापही खरा तमाशा ऐकू येत नाही. तर तमाशाच्या नावाखाली लोकनाट्याचे नट आणि बोलट बसवले जात आहेत. जुन्या तमाशातल्या लावण्या अद्यापही रेकॉर्ड केल्या जात नाहीत. तमासगिरांच्या शिक्षणाची सोय झालेली नाही आणि त्यांच्या राहण्याचीही व्यवस्था झालेली नाही. तमाशातला तमाशा अजूनही अस्सल मराठमोळ्या थाटाचा चाललेला दिसत नाही. तमाशातल्या जुन्या लावण्या इतिहासजमा होत असून त्यांची जागा भावगीत व गावगीताने घेतली आहे. नवीन लावण्या निर्माण होत नाहीत. कारण महाराष्ट्रात होनाजीबाळा व पठ्ठे बापूरावांची किमया करणारे नवे नवे शाहीर उदयाला येत नाहीत. भाऊ बापूचा फड गाजवणारा शाहीर निर्माण होत नाही. ही परिस्थिती सुधारल्याशिवाय तमाशाच्या कलेला भविष्यकाळ दिसत नाही. म्हणूनच भूतकाळावर जगण्याची पाळी आज तमाशावर आली आहे. वर्तमानकाळात तमाशाला गती नाही. कारण तमाशाची रीती हळूहळू नष्ट पावत आहे. जुन्या लावण्या आणि जुने वग हेच तमाशाचे भांडवल झाले आहे. त्याला नवीन साजशृंगार चढवल्याशिवाय तमाशाचे भविष्य उज्ज्वल आहे असे निदान आज तरी म्हणता येणार नाही.

भाषाभ्यासाच्या नव्या प्रवृत्ति

ना. गो. कालेलकर

भाषा हे माणसाचे परंपरागत स्वाभाविक व्यवहारसाधन आहे. पण ते इतके अंगवळणी पडलेले आहे की, ते आपल्याजवळ आहे, त्याच्यामुळे आपले सबंध जीवन चालू शकते, ते नसेल तर समाजाची अवस्था कळप करून राहणाऱ्या प्राण्यांसारखी होईल, इत्यादी गोष्टी माणसाच्या लक्षात येत नाहीत. सूक्ष्म अभिव्यक्तिक्षमता असलेले, अनेक क्षेत्रांतील व्यवहार चालवणारे, ज्ञान जतन करून ठेवणारे, ते पुढील पिढीला पोचवणारे, हे साधन आहे, पण ते बालपणापासून निरीक्षण व अनुकरण करीत राहिल्यामुळे सहजगत्या आत्मसात होते. स्वभाषेवर प्रभुत्व मिळवायला ती शिकावी लागत नाही. मुलाला शाळेत जावे लागत नाही. आपण लिपीचा भाषेसाठी कसा उपयोग करायचा ते शिकतो, बोलभाषेपासून भिन्न अशी सर्वमान्य प्रमाण भाषा शिकतो, ती लिहावी कशी याचे नियम शिकतो. पण बोलभाषा 'बोलावी' कशी, अनेकवचन कसे करावे, सामान्यरूप कसे करावे, भूतकाळ कुठे वापरावा, इत्यादी गोष्टींचा विचारही डोक्यात न आणता आपण बोलत असतो. एवढेच काय, पण नाम म्हणजे काय, क्रियापद म्हणजे काय यासारखी डोकेफोड करण्याचे काम व्यवहारात पडत नाही.

भाषाशिक्षकांची किंवा व्याकरणकर्त्यांची लुडबूड व्यवहारात नसल्याने तो सुरळीत चालला आहे. भाषा आहे म्हणून भाषेचे शिक्षक आहेत. व्याकरणाचा अभ्यास करणारे तज्ज्ञ आहेत. पण मुळात भाषेचा अभ्यास किंवा शिक्षण स्वभाषेसाठी नव्हते असे दिसून येईल. परभाषा, राज्यकर्त्या लोकांची भाषा, मृत भाषा, प्रतिष्ठापूर्ण भाषा यांचा अभ्यास होतो. प्रवासी, व्यापारी, धर्मगुरू, सरकारी नोकरी किंवा दरबारातील स्थान यामागे लागलेले लोक, साहित्यप्रेमी, यांनी प्रारंभी हा अभ्यास केला. त्याला पद्धतशीर स्वरूप प्राप्त झाले तेव्हा व्याकरणे आणि भाषांतरे होऊ लागली.

क्वचित भाषा म्हणजे काय, शब्द म्हणजे मुखनिर्मित ध्वनी खरा पण त्यात अर्थ

कुठून येतो. भाषा आली कुठून, भाषेचा तर्कशास्त्राशी काही संबंध आहे का, अनुभवाचे भाषेतील विश्लेषण आणि जगातल्या वस्तू व घटना यांचा काही संबंध आहे का, असे प्रश्न काही चिंतकांना सुचले, चर्चिले गेले, पण त्यांपासून फारसे काही निष्पन्न झाले नाही. कारण कोणत्याही समाजोपयोगी संघटित पद्धतीचे विश्वघटनातले स्थान चिंतनाने किंवा तर्काने समजून येणे शक्य नसते. तिचे वास्तवरूप काय आहे याची अंधुकशीही कल्पना आली तरच तिच्या शास्त्रीय अभ्यासाची शक्यता निर्माण होते. कोणत्या दिशेने हा अभ्यास केला पाहिजे हेही कळते आणि या अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट आणि निश्चित बनत जाते.

अठरावे शतक संपता संपता भाषेसंबंधीच्या नव्या कल्पना अस्तित्वात आल्या. मुख्य म्हणजे भाषांचे कालिक भेद, भाषाकुटुंबाचा सिद्धांत आणि भाषेचे स्थानिक भेद यांच्यावर लक्ष केंद्रित झाल्यामुळे भाषा म्हणजे काय, तिच्यात स्थिर काय आणि परिवर्तनीय काय याची जाणीव होऊ लागली आणि खऱ्या अर्थाने भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाचा जन्म झाला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्याच्या प्रारंभी होऊन गेलेल्या अनेक अभ्यासकांनी भाषेचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट केले. या अभ्यास-कांत फेर्दिनां द सोस्यूर यांचे नाव सर्वांत आधी घेतले पाहिजे.

भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने भारत हे अत्यंत समृद्ध आणि विविधतापूर्ण क्षेत्र असूनही त्या दृष्टीने तिकडे कोणाचे लक्ष गेले नव्हते. व्याकरण, उच्चारप्रक्रिया आणि काही सामान्य सिद्धांत यांचे तीव्र कुतूहल प्रारंभी होते, ते नंतर टिकले नाही. प्राकृत व्याकरणकारांनी ' प्रकृतिः संस्कृतम् ' असे म्हणून संस्कृतच्या आधाराने प्राकृतचे वर्णन केले तरी या दोहोतला परिवर्तनाच्या नियमांनी सिद्ध होणारा ऐतिहासिक संबंध त्यांना समजू शकला नाही. शिवाय कोणती प्राकृत केव्हापासून केव्हापर्यंत कोणत्या प्रदेशात बोलली जात होती याचा पुरावा मिळणे इतके कठीण होते की, संस्कृतपासून प्राकृतादी मध्ययुगीन भाषांचा आधार घेऊन अर्वाचीन आर्यभाषांचा इतिहास लिहिणे अजूनही शक्य झालेले नाही. संस्कृत हे उगमस्थान आहे. त्याची पुढील अवस्था प्राकृत किंवा तत्सदृश भाषांत सापडते आणि ही अवस्था अर्वाचीन आर्यभाषा आणि संस्कृत यांच्यातला दुवा आहे याबद्दल शंका न राहावी इतका पुरावा उपलब्ध साहित्य, शिलालेख, ताम्रपट इत्यादींमधून सापडतो. पण त्यातून हाती येते ती रूपरेषा किंवा फक्त सांगाडा.

या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून अनेक लेखकांनी भाषेचे अत्यंत सूक्ष्म असेही बारकावे समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे, प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ती दिली आहे आणि ती संस्कृतपर्यंत नेऊन दाखविली आहे. प्रत्यक्ष पुराव्याचा निकष लावला तर यातले बहुतेक सर्व निष्कर्ष अग्राह्य ठरतील; एवढेच नव्हे तर अशा प्रकारचे लेखन वाचून भाषाशास्त्राचे विकृत रूप जिज्ञासू वाचकांच्या मनात रुजण्याची भीती आहे. म्हणून शास्त्रीय लेखन, अभ्यास आणि संशोधन करताना किती काटेकोर राहिले पाहिजे

हे जाणून घेतले तरच चांगले लेखक, चांगले अभ्यासक म्हणजे लेखकाच्या मर्यादा, दोष, अशास्त्रीय विधाने समजू शकणारे निष्ठुर वाचक आणि संशोधक निर्माण होऊ शकतील.

वरील म्हणणे लक्षात घेऊन मराठीच्या अभ्यासाचा मागोवा आपण घेऊ लागलो तर काय आढळते ते इथे पाहायचे आहे.

आधी मराठीच्या उत्पत्तीचा प्रश्न घेऊ. मराठीचा जन्म कधी झाला, ती अस्तित्वात कधी आली याबद्दलची चर्चा निश्चितपणे फार मोलाची आहे. पण त्यासाठी भाषेचे सामाजिक स्वरूप, तिचे व्यवहारसाधन म्हणून स्वरूप, ध्वनिपरिवर्तन, रूपपरिवर्तन, संपर्कजन्य परिवर्तन, स्वयंभू परिवर्तन आणि सर्वांत महत्त्वाचे असे बाह्यतः अखंडित परंतु वस्तुतः खंडित असे प्रवाही स्वरूप लक्षात घेऊन निर्णयात्मक असा अंतर्गत पुरावा आणि तुलनात्मक पुरावा यांचा विचार व्हायला हवा.

मराठी ही एक इंडो-युरोपियन, आर्य संस्कृतोद्भव भाषा आहे हे विधान भाषाशास्त्रीय आहे. सामान्य माणूस एवढेच समजेल की संस्कृत बोलणाऱ्या माणसाचे भाषिक वारसदार काही शतकांनंतर मराठी बोलू लागले. पण हा बदल कसा घडून आला याबद्दलच्या त्याच्या कल्पना पात्र काटेकोर असणे शक्य असणार नाही. भाषेचा इतिहास म्हणजे काय आणि तो निश्चित करायला कोणत्या प्रकारचा पुरावा लागतो, कोणती पद्धत वापरून भाषाविषयक अभ्याससामग्रीतून आपणास तिचा इतिहास, घडण, उत्क्रांती किंवा विकास क्रमशः दाखविणारे चित्र रेखाटता येईल याचे योग्य ज्ञान असलेला अभ्यासक हा इतिहास लिहू शकेल. इतिहास लिहिताना किती मागे जायचे याची मर्यादा घालून घ्यावी लागेल. थोडक्यात म्हणजे मराठी भाषेचा इतिहास लिहायचा असेल तर मराठी भाषा म्हणजे काय हे सांगावे लागेल.

संस्कृतकडून खाली उतरता उतरता ज्या कालमर्यादेपासून मराठीला परिचित आणि वैशिष्ट्यपूर्ण बनवणारी रूपे आढळू लागतील तो मराठीचा प्रारंभकाळ म्हणता येईल. या रूपांचे प्रमाण हळूहळू वाढत जाईल, म्हणजेच भाषेच्या प्रवाहातून पुढे सरकता सरकता आपण आपल्या काळाच्या जवळजवळ येत जाऊ.

खाली न उतरता आपण वरवर जाऊ लागलो तर मराठीपासून अधिकाधिक दूर जाऊ. हे खरे असले तरी लक्षात ठेवायची मुख्य गोष्ट ही की, प्रवाह किंवा परंपरा बदललेली नाही. वर जाता जाता मराठी माणसाला अधिकाधिक अपरिचित होत जाणारी भाषाच मराठीचे पूर्वज बोलत असत हे विसरून चालणार नाही.

मराठीत संस्कृतातून न आलेले शेकडो शब्द, वाक्प्रचार इ. सापडतात. त्यामुळे या विषयावरचे वाद अनेकदा रंगलेले आहेत.

वास्तविक असे वाद होण्याचे कारण नाही. आद्यभाषेव्यतिरिक्त इतर अंश जिच्यात आढळतात अशी काही मराठी ही एकमेव भाषा नाही. किंबहुना सर्वच भाषांत हा प्रकार कमी-अधिक प्रमाणात असतोच.

मराठी जर संस्कृतपासून आली तर तिच्यात इंग्रजी शब्द कसे असा प्रश्न आज कोणी विचारत नाही. कारण त्याचे उत्तर आपल्याला ठाऊक आहे. या शब्दांचा मराठीत प्रवेश केव्हा आणि का झाला हेही आपल्याला ठाऊक आहे. त्यामुळे आपण अजून त्यांना इंग्रजी शब्द म्हणतो एवढेच. असे शब्द यापूर्वी फारसीतून मराठीत आले हेही आपण जाणतो. पण ज्यांचा उल्लेख नाही अशा ऐतिहासिक घटनांमुळे परकीयांशी संबंध येऊन अनेक संस्कृतेतर शब्द मराठीत आले असतील आणि अशा-प्रकारे अन्य शब्द भाषेत येण्याची जी शक्यता मराठीच्या बाबतीत आहे तशीच ती संस्कृतच्या बाबतीतही कबूल केली पाहिजे. फक्त इतिहासपूर्व काळातील परकीय शब्दांची उसनवारी असे शब्द काही कारणामुळे स्वभाषीय नाहीत असे अनुमान करता येत असेल तरच दाखवता येईल. या ना त्या कारणाने संस्कृतचा भारतातील इतर संस्कृतींशी आणि भाषांशी दीर्घकालीन संबंध आला ही एकच घटना संस्कृतवर आर्येतर भाषांचा प्रभाव पडला असलाच पाहिजे असे विधान करण्यास पुरेशी आहे.

हे परकीय शब्द संस्कृतद्वारा मराठीत येणे शक्य आहे आणि मराठीच्या इतिहासा-पुरते तरी ते संस्कृतच मानले पाहिजेत. एवढेच नव्हे तर एखादा संस्कृत शब्दही आपण बंगाली, हिंदी यासारख्या परभाषांतून विशिष्ट अर्थाने आयात केला तर आपल्या इतिहासात तो बंगालीतून किंवा हिंदीतून आला, म्हणजे तो बंगाली किंवा हिंदीच आहे असे म्हटले पाहिजे. उसनवारीचा उगम किंवा त्यामागील तत्त्व माहीत नसेल तरच चूक होण्याची शक्यता आहे.

म्हणजे केवळ भाषेचे नमुने घेऊन आणि क्रमवार मांडून भाषेचा इतिहास समजणार नाही, तर ज्या जीवनप्रवाहाचे भाषा हे एक महत्त्वाचे अंग आहे त्या प्रवाहाचा म्हणजे भाषेहून वेगळ्या परंतु भाषेशी संबंधित अशा इतर सर्व प्रवृत्तींचा परिचय आपण करून घेतला तरच तो समजेल. यात राजकीय स्थित्यंतरे, सामाजिक घडामोडी, शास्त्रीय प्रगती इत्यादींचा फार मोठा भाग आहे. थोडक्यात म्हणजे भाषेचा अभ्यास समाजजीवनाचे एक अंग, व्यवहाराचे साधन, संस्कृतीचे वाहन म्हणून केला पाहिजे.

भाषिक प्रश्नांकडे अशा रीतीने पाहणे हे भाषेच्या मूलभूत स्वरूपाला धरूनच आहे. भाषा हे समाजजीवनाचे एक अंग असल्यामुळे तिचा अभ्यास करणारे शास्त्र हे त्रिकालाबाधित निसर्गनियमांनी बांधलेले वास्तवशास्त्र नसून मानवी प्रवृत्तींच्या क्षेत्रांची दखल घेऊन त्यातला क्रम व संगती लावणारे एक सामाजिक शास्त्र आहे. समाज-जीवनाची माहिती अजिबात नसेल, अपुरी किंवा असमाधानकारक असेल तर भाषेचा अभ्यास करणे किंवा भाषाविषयक सिद्धांत मांडणे जवळजवळ अशक्य होईल.

याबरोबरच दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे समाजाचे स्वरूप. कोणताही समाज पूर्णपणे एकजिनसी नसतो आणि समाज जितका मोठा, भौगोलिक दृष्टीने पसरलेला, अनेक प्रवृत्तींच्या मागे लागलेला, जुन्या परंपरा आणि

संस्थांना धरून राहिलेला, तितकी त्यात अंतर्गत विविधता अधिक. शिवाय समाजातले सर्वच लोक नेहमी एकत्र येऊन व्यवहार करीत नाहीत. धंदा, मते, राजकीय पक्ष, धर्म, निवासस्थान इत्यादी अनेक कारणांनी काही लोकांचा एकमेकांशी जितका घनिष्ठ संबंध येतो तितका इतरांशी येत नाही. या एकत्र जीवनाचा ठसा इतर अनेक गोष्टीं-प्रमाणे तिथल्या लोकांच्या भाषेवर उमटतो आणि अमुक जातीची, प्रदेशाची, वर्गाची भाषा असे प्रयोग आपण करू शकतो.

या अनेक भेदांत कमी-अधिक प्रमाणात तीव्र असे फरक आढळतील आणि एखादे भौगोलिक स्थान भाषिक केंद्रापासून दूर आणि परभाषेच्या सरहद्दीला जितके जवळचे तितके तिचे स्वरूप अधिक वेगळे होत जाते हे उघड आहे.

या वेगळेपणाच्या प्रवृत्तीला काबूत ठेवणारी राजकीय आणि सांस्कृतिक कारणे असू शकतील. एकभाषिक प्रदेश विस्तीर्ण असूनही एकाच सत्तेखाली असला तर जीवन व्यवहार एकत्र होईल. केंद्रसत्तेच्या प्रभावाने भेद तीव्र होण्याची शक्यता मंदावेल. पण या प्रदेशाचे वेगवेगळे तुकडे वेगवेगळ्या सत्तेखाली असले तर भेद-प्रवृत्तीला आळा घालणारे एक महत्त्वाचे साधन व कारण नाहीसे होईल. मराठी प्रदेश जेव्हा मुंबई, मध्यप्रांत व मराठवाडा असा तिहेरी विभागला गेला होता तेव्हा मराठी भाषेची झालेली अवस्था आज बऱ्याच प्रमाणात सुधारण्याच्या मार्गावर आहे असे म्हणता येईल.

या तिहेरी विभाजनालाही मराठीची एक विशिष्ट सांस्कृतिक परिस्थिती तोंड देऊ शकली; ती म्हणजे मराठी भाषिकांची एकत्वाची आणि अस्मितेची भावना. या भावने-मागे सर्वमान्य अशा साहित्य-निर्मितीचा बराच मोठा वाटा होता, मुख्यतः संतवाङ्म-याचा. नंतरही जी जी उत्तम ग्रंथरचना झाली तिच्याकडे या तिन्ही भागांतल्या रसिकांचे व पंडितांचे लक्ष सदैव लागलेले असे. म्हणूनच इतर कोणत्याही कारणापेक्षा कमी-अधिक मानाने प्रमाणभूत अशा भाषिक माध्यमातून होणारी साहित्य किंवा ग्रंथनिर्मिती, ऐतिहासिकदृष्ट्या अभिमानाची आणि धार्मिकदृष्ट्या पवित्र अशी स्थाने, यात्रा, संमेलने, यांच्यामुळे ही एकत्वाची भावना इतर वादग्रस्त प्रश्नांना तोंड देऊनही टिकून राहिली आहे.

पण या भौगोलिक व सामाजिक भेदातून जी भाषा डोकावते तिच्याबद्दलची एक स्पष्ट आणि वास्तववादी भूमिका निर्माण करण्याचे काम भाषाशास्त्रच करू शकेल. ज्या समाजात जातिभेद आणि त्यावर आधारलेल्या उच्चनीच श्रेणी आहेत, त्यात उच्च जातींच्या आचारविचारांना, सांस्कृतिक वैशिष्ट्यांना, जीवनक्रमाला आणि या सर्वांचे अपरिहार्य अभिव्यक्तिसाधन म्हणून भाषेला विशेष प्रतिष्ठा मिळावी, तिचा शुद्ध, श्रेष्ठ, प्रमाण इत्यादी विशेषणांनी गौरव व्हावा, या प्रतिष्ठित वर्गातीलही सर्वश्रेष्ठ लोक ज्या भागात राहतात त्या भागाला प्राधान्य मिळावे ही गोष्ट स्वाभाविक आहे. आणि असे करताना इतर भागातल्या, इतर वर्गांच्या भाषा अशुद्ध, कनिष्ठ, मागासलेल्या मानण्यात

याव्यात यातही आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. पण या विचारांना आणि घटनांना ज्यात मान्यता मिळावी ते इतिहासाचे प्रकरण आता संपले आहे. भाषेच्या प्रश्नाकडे वास्तववादी दृष्टीने पाहणारे पर्व सुरू झाले आहे.

भाषाशास्त्राची ही वास्तववादी भूमिका भाषेचे यथार्थ वर्णन करणाऱ्या, वास्तव घटनांचे प्रामाणिक चित्र देणाऱ्या तटस्थ अभ्यासकाची आहे. ज्या समाजात भाषेला जी अभिव्यक्ती करायची असते तिला अनुरूप असे तिचे स्वरूप असते. सामान्य व्यवहारातली आपली भाषा अपुरी पडते, असमाधानकारक आहे अशी कोणाचीही तक्रार नसते. तांत्रिक, शास्त्रीय, विवेचनात्मक क्षेत्रात इतर समाजांनी केलेली प्रगती सामावून घेण्याचा एखादी अप्रगत भाषा जेव्हा प्रयत्न करते तेव्हाच अडचण निर्माण होते, कारण अशा भाषेजवळ जे परंपरागत अर्थघटकांचे भांडवल असते ते या कामाला फारच अपुरे पडते. त्यामुळे जे जवळ नाही ते निर्माण करणे किंवा उसने घेणे याचाचून भाषेजवळ तिसरा मार्ग नसतो. अशा प्रसंगी दोन भाषांची तुलना करून त्यांची श्रेष्ठकनिष्ठता ठरवणे हे तात्त्विक दृष्टीने शक्य असते. कारण ही तुलना कार्यसापेक्ष आणि समाजनिरपेक्ष असते.

याउलट समाजातल्या वर्गाच्या ज्या बोलीवर कनिष्ठ किंवा अशुद्ध असा शिक्का मारला जातो तो त्या बोली बोलणाऱ्या लोकांचा सामाजिक दर्जा लक्षात घेऊन मारला जातो. इथे शास्त्रनिष्ठा नाही, परंपरानिष्ठा आहे. ‘ पानी ’ किंवा ‘ लई ’ यांची अशुद्धता हे समाजाला कमी लेखणाऱ्या आपल्या मनोभावनेत आहे. ‘ पाणी ’ किंवा ‘ फार ’ यांच्याइतकेच हे शब्दही अर्थवाहक आहेत, हे कबूल केलेच पाहिजे. तर मग अशुद्धता राहिली कुठे ? संख्येच्या दृष्टीने पाहिले तर हे शब्द वापरणारे लोक ‘ शुद्ध ’ बोलणाऱ्यांच्या कितीतरी पटीने आहेत. अशा लोकांकडे, त्यांच्या दैनंदिन अभिव्यक्ति साधनाकडे दुर्लक्ष करून आपल्याला मराठीचे खरे स्वरूप कळणार नाही. कारण मराठी म्हणजे सर्व प्रकारची मराठी. त्यातल्या कित्येक बोली तर सहजासहजी कळण्यासारख्याही नाहीत, पण त्यांचा अभ्यास झाल्याशिवाय मराठीचे यथार्थ स्वरूप, तिची विविधता, तिचे वर्गभेद व स्थानभेद आपल्याला कळणार नाहीत.

मराठीचा इतिहास हा या सर्व भेदांच्या निर्मितीचा, त्यातल्या विविधतेच्या कारणांचा इतिहास आहे. हा इतिहास नीट, निःपक्षपाती बुद्धीने लिहिला जायचा असेल तर या इतिहासाच्या सामग्रीचा म्हणजे मराठीच्या अनेकविध बोलींचा परिश्रमपूर्वक अभ्यास झाला पाहिजे. हिंदुसमाजाचा अभ्यास हा ज्याप्रमाणे त्यातल्या सर्व घटकांचे सूक्ष्म निरीक्षण करून आणि माहिती मिळवून केलेला अभ्यास आहे, त्याचप्रमाणे मराठीचा अभ्यास हा तिच्या सर्व भाषिकांच्या सर्वभाषिक संवयींचा अभ्यास आहे.

ही दृष्टी समाजाभिमुख आहे, शास्त्रीय आहे आणि न्यायाला धरून आहे. ती स्वीकारून पुढे पाऊल टाकले तरच मराठीची खरी सेवा आपण करू शकू.

मराठी व्याकरणाची पंचवीस वर्षे

कृ. श्री. अर्जुनवाडकर

मराठी व्याकरणाने पहिली पावले टाकायला सुरुवात केली ती इंग्रजी व्याकरणाचे बोट धरून. संस्कृत व्याकरणाने त्याच्या तोंडात दुधाची बाटली दिली. एका हातात हे बोट आणि दुसऱ्या हातात ही बाटली घट्ट धरून मराठी व्याकरणाचे बाळ एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून जगाचे हवापाणी चाखू लागले. आता हे बाळ १६५ वर्षांचे झाले आहे. पण त्याला अजून चालताना बोटाचा आधार लागतो; भुकेची वेळ झाली की बाटली लागते. लहानाला काय, मोठ्याला काय, बाटली सुटणे एकंदरीने जडच जाते. पण बाळ मोठे झाल्यावरही मोठ्यांचे बोट धरून चालत राहिलेले दिसले की वाटायला लागते,—याला पोलिओबिलिओ तर झाला नसेल ?

तसे हे बाळ आपल्या पायांवर उभे राहावे म्हणून झाले काही प्रयत्न. त्याची बाटली सोडवायचाही खटाटोप काही कमी नाही झाला. पण दोन पावले टाकावी, पुन्हा बोटाला चिकटावे; एक वेळ कपाने अर्धवट दूध प्यावे, पुन्हा बाटलीचा हट्ट धरावा; —असे झाले. आता या बाळाचे कसे व्हायचे, म्हणून मोठी माणसे काळजी करू लागली. मग कोणाच्या तरी लक्षात आले,—या बाळाच्या वाढीचा वेगच निसर्गतः कमी. मांजराचे पिल्लू जन्मल्यावर काही दिवसांत चालायला लागते; पण दहापंधरा वर्षांत त्याचा एकूणच ग्रंथ आटपतो. माणसाचे पिल्लू तेवढ्या काळात पूर्ण वाढलेलेही असत नाही; त्याच्या आयुष्याचा पल्लाही मोठा. यावरून शास्त्राच्या पिल्लाच्या विकास-क्रमाचे गणित मांडता येईल. मग मराठी व्याकरणाचे १६५ वर्षांचे बाळ कळायला अडचण पडणार नाही.

हे एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासूनच्या मराठी व्याकरणाच्या परंपरेचे सार आहे. या परंपरेत दादोबा, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, मोरो केशव दामले, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, गोविंद कृष्ण मोडक,—इत्यादी

वैयाकरणांचे काम वेगवेगळ्या कारणांसाठी महत्त्वाचे निश्चितच आहे. पण या सर्वांना त्यांच्या त्यांच्या मर्यादा आहेत. यांतला कोणी मरेचा भक्त; कोणी हॉवर्डचा; कोणी बेनचा; तर कोणी पाणिनीचा. आपापल्या देवतेची मूर्ती पुढे ठेवून या वैयाकरणांनी मराठी व्याकरणाची नमुन्याबरहुकूम मूर्ती बनवायची कोशीस केली. अशा प्रयत्नाला जितपत यश येणे शक्य आहे, तितपत त्यांनी मिळवलेही. या मूर्ती प्रदर्शनात मांडल्या-वर बारकाईने पाहणाऱ्यांना त्यांत ठिकठिकाणी न्यून जाणवू लागले. येशूला घेऊन बसलेल्या मेरीची मूर्ती समोर ठेवून ज्यांनी कृष्णाला घेऊन बसलेल्या यशोदेची मूर्ती घडवली, त्यांची कला निरखताना प्रेक्षक आपापसांत कुजबुजू लागले—'अहो, या यशोदेच्या अंगात झगा कसा? आणि तिचे मंगळसूत्र कोठे गेले? तिच्या कपाळावर कुंकू आहे; पण कृष्णाचे कपाळ अगदीच कोरे कसे?' वेरूळ-अजंठ्यांच्या नमुन्यावर तयार केलेले विसाव्या शतकातल्या भारतीय स्त्रीचे शिल्प या प्रदर्शनात ठेवले होते; ते प्रेक्षकांची नजर खिळवून ठेवत होते, तरी त्यात आपल्या घरातली किंवा शेजारपाजारची स्त्री त्यांना कोठे ओळखू येईना. पण असल्या खोडी काढणारे चिकित्सक प्रेक्षक फारच कमी भरले. बहुतेक प्रेक्षकांनी प्रदर्शनाची वाहवा केली. प्रदर्शनाचे उत्पन्नही बरेच झाले. चिकित्सकांचे मात्र मत पडले—'यात काही यश जरूर आहे; पण अप-यश त्याहून बरेच अधिक आहे.'

मराठी वैयाकरणांचे पहिले अपयश हे की, त्यांनी शास्त्राचा मंत्र सतत जपला, पण त्यांना शास्त्राचे रूप मुळात नीट आकळलेच नाही; आणि ज्यांना ते आकळले, त्यांना तपशिलात शिरल्यावर त्या रूपाचा विसर पडला. शास्त्रात प्रमाणांच्या आधाराने प्रमेय मांडायचे असते, त्याच्या विविध अंगांची नीट संगती लावून दाखवायची असते, त्यात मूळ तत्त्वांच्या बाबतीत धरसोड करून चालत नाही, कोणत्याही कारणासाठी तडजोड करणे शास्त्राला भावत नाही,—याची जाण कितीशा मराठी वैयाकरणांना आहे? 'शास्त्रीय' ही रुबाबदार पगडी घातलेल्या अशाही भारी व्याकरणग्रंथांतून शास्त्राच्या या मूलभूत अटी सोयीनुसार वाऱ्यावर सोडून दिलेल्या आढळतात. मराठी व्याकरणात येणाऱ्या गोष्टींची एरवी कस्टमच्या करड्या नजरेने देखरेख करणारे असेही चांगले तीक्ष्णबुद्धी वैयाकरण केव्हा केव्हा सवयीच्या पगड्याखाली बेकायदा गोष्टीच्या प्रवेशाकडे कानाडोळा करतात. ही भल्या भल्या असामींची स्थिती; तेथे केवळ अनुकरणाची माफक आकांक्षा बाळगणाऱ्यांकडे काय जाब मागणार?

मराठी वैयाकरणांचे दुसरे अपयश हे की, त्यांना व्याकरण या शास्त्राची निश्चित व्याप्ती उमगली नाही; व्याकरणाच्या क्षेत्राचा तंतोतंत नकाशा त्यांना काढता आला नाही. वहिवाटीने व्याकरणाच्या पुस्तकातून येतात ते विषय व्याकरणाचे, या काम-चलाऊ समजुतीत त्यांनी संतोष मानला. ज्यांचे डोळे समुद्रापलीकडे लागले होते, त्यांनी इंग्रजी व्याकरणाच्या पुस्तकात येतात म्हणून वहिवाटीबाहेरचेही काही विषय उणेअधिक व्याकरणात घेतले. पण अमूक विषय व्याकरणाचा होय की नव्हे, होय तर का, नव्हे

तरी का, हे सारे शेवटी ठरते कशावरून,—असे प्रश्नच त्यांना पडले नाहीत. याचे कारण त्यांनी व्याकरणाच्या प्रमाणांचाच खोलवर विचार केला नाही; त्यांच्या सापेक्ष बलाबलाचाही केला नाही. तो ते करते, तर त्यांना व्याकरण म्हणजे काय हे तर उमगतेच; पण मराठी व्याकरणातल्या विविध विषयांवरील वर्षानुवर्षे चालूनही अनिर्णीत राहिलेल्या वादांच्या उकलीचे निर्णायक साधनही त्यांना गवसते. युद्ध करायला निघावे, पण शस्त्रास्त्रांचीच माहिती असू नये, असा (पाकिस्तानसारखा) प्रकार मराठी वैयाकरणांचा झाला.

या दोन अपयशांचा भार वारसा म्हणून खांद्यावर वाहत मराठी वैयाकरण वाटचाल करीत आले आहेत. त्यांच्या कार्यात कोठे काही बरे भेटले, तर ते तुरळक अपवाद सोडता अनुकरणाच्या आदर्शातून उतरलेले आढळते,—म्हणजे, ज्याचे ते अनुकरण करतात, त्या त्यांना आदर्शभूत असलेल्या मूळ ग्रंथात किंवा व्यवस्थेतच काही चांगल्या गोष्टी असतात, त्या अनुकरणामुळे त्यांच्याही कृतीत उतरतात. या गोष्टीचे श्रेय अर्थातच त्या मूळ ग्रंथाकडे किंवा व्यवस्थेकडे जाते. गेल्या पंचवीसतीस वर्षांतला मराठी व्याकरणाचा इतिहास या वरील सर्वसाधारण रूपरेखेला फारसा अपवादभूत नाही.

मराठीच्या व्याकरणाच्या विचाराची स्थितिगती पाहण्याच्या दृष्टीने गेल्या पंचवीसतीस वर्षांतले व्याकरणग्रंथ शोधू गेल्यास ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच भरतील. त्यांत महादेव पांडुरंग सबनिसांचे 'आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण' (१९५१) आणि अरविंद मंगरूळकरांचा 'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार' (१९६४) यांचा प्रथम निर्देश करावा लागेल. दामल्यांच्या व्याकरणाची जी तिसरी आवृत्ती निघाली आहे (१९६५, दामोदर सावळाराम मंडळी), तिला जोडलेल्या 'व्याकरणविषयक निबंधांची पुरवणी' या परिशिष्टातले तुरळक लेख दखल घेण्याजोगे आहेत. 'MARATHI' (१९६५) हे नारायण गोविंद कालेलकरांचे इंग्रजीत लिहिलेले छोटे पुस्तक हा आधुनिक भाषाशास्त्राच्या परिभाषेच्या चौकटीत मराठी भाषा बसविण्याचा मर्यादित स्वरूपाचा यत्न आहे. या निमित्ताने अन्य भाषांच्या माध्यमाने लिहिलेल्या मराठीच्या व्याकरणांचा निर्देश करिता येईल. त्यांत कत्येनिना यांनी लिहिलेले 'ओचिर्क ग्रामातिकी यिझिका मराठी' (१९६३) हे पुस्तक रशियन भाषेत आहे. 'यिझिक मराठी' (१९६३) हा त्याचा मूळ लेखिकेनेच केलेला प्रायः संक्षेप आहे. आपणांला इंग्रजीच्या परंपरागत व्याकरणाच्या द्वारा लॅटिन भाषेच्या व्याकरणाची जी चौकट परिचित झाली आहे, तीत मराठी भाषा बसवण्याचे काम रशियन भाषेत कत्येनिनांनी केले आहे. हिंदीतही दोनतीन पुस्तके झालेली आढळतात. 'लँग्वेज कोर्स' या स्वरूपाची पुस्तके व्याकरणाच्या कक्षेत मर्यादित अर्थानेच बसवावी लागतील. त्यांत एच. एम. लॅंबर्ट या लेखिकेचे 'MARATHI LANGUAGE COURSE' (१९४३) आणि नरेश कवडी, फ्रँकलीन साऊथवर्थ यांचे 'SPOKEN MARATHI'

(१९६४) यांचा अवश्य उल्लेख करावयास हवा. वर हिंदी पुस्तकांचा उल्लेख केला आहे, त्यांतलीही दोन पुस्तके 'लँग्वेज कोर्स'मध्येच मोडणारी आहेत. वर निर्देशिली आहेत, त्यांव्यतिरिक्त शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी म्हणून जुन्या व्याकरण-कारांना वाट पुसत लिहिलेली लहानमोठी मराठीची व्याकरणे लक्षित काळात पुष्कळ आढळतील. त्यांची नावनिशी देण्याने प्रस्तुत समालोचनाला काही लाभ होणार नाही. पण प्रत्यक्ष व्याकरण नव्हे, तरी व्याकरणाच्या अभ्यासकाला जिव्हाळ्याच्या असलेल्या विषयांसंबंधीचा आधुनिक भाषाशास्त्राचा दृष्टिकोण आणि विचारप्रक्रिया मराठीत उत्तम रीतीने मांडणारा कालेलकरांचा 'भाषा आणि संस्कृती' (१९६२) हा लेखसंग्रह मात्र येथे अवश्य उल्लेखिला पाहिजे.

भाषा आणि व्याकरण यांच्या संबंधाविषयीचा वैयाकरणाचा दृष्टिकोण हा त्याच्या समग्र व्याकरणविचाराचा पाया ठरतो. 'शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे, हे व्याकरण शिकल्याने समजते,' [लघुव्याकरण] या दादोबाप्रवर्तित आज्ञापत्राला आव्हान देणारा वैयाकरण त्यांच्या हयातीतच जन्माला आला. वैयाकरणाने भाषा शुद्ध करू न जाता भाषेतला सिद्ध प्रयोग प्रमाण मानून आणि त्याप्रमाणे आपल्या नियमात सुधारणा करून 'व्याकरण शुद्ध करावे,' असे बजावून गुंजीकरांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी भाषाव्याकरणसंबंधाविषयीचा शास्त्रशुद्ध दृष्टिकोण मराठी व्याकरणाला दिला. 'भाषेचे स्वरूप दाखविण्याला व्याकरण हा एक आरसा आहे आणि त्या आरशामध्ये जर त्या भाषेचे वास्तविक स्वरूप दिसत नाही, तर तो आरसा निरुपयोगी होय.' [विविधज्ञानविस्तार, जुलै १८७०, गुंजी १६८] इतक्या स्वच्छ शब्दात गुंजीकरांनी मराठी वैयाकरणाला त्याच्या कामाची समज दिली आहे,—शंकराचार्यांचे शब्द योजावयाचे झाले, तर हे शास्त्र ज्ञानाप्रमाणे 'वस्तुतंत्र' आहे, क्रियेप्रमाणे 'पुरुषतंत्र' नाही, 'कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम्' शक्य नाही, असे बजावले आहे. आधुनिक भाषाशास्त्राशी परिचय असलेले अलीकडच्या काळातले बरेच मराठी वैयाकरण हाच दृष्टिकोण स्वीकारणारे आहेत. मंगरूळकर तर लिहितात : 'प्रत्येक भाषा ही आपापल्या परीने आपली नियमव्यवस्था घेऊनच विद्यमान असते...ही व्यवस्था जेव्हा एखादा सूक्ष्मदर्शी वैयाकरण पाहतो, ...आणि शास्त्रनिविष्ट करितो, तेव्हा त्या भाषेला व्याकरण मिळाले, असे आपण लौकिक दृष्ट्या म्हणू लागतो. पण व्याकरणाचे फक्त विधान मागाहून होते. त्याचे अस्तित्व त्या साक्षात विधानापूर्वीही अव्यक्त रूपाने असते.' [मंग ७–८] याच भूमिकेतून ते 'आधी भाषा, नंतर व्याकरण' या पुष्कळदा केल्या जाणाऱ्या 'वृथा' विधानाला नापसंत करतात.

एकीकडे या टोकापर्यंत मराठी व्याकरण पोचले असले, तरी दुसरीकडे दादोबांचा दृष्टिकोण मानणारे वैयाकरण आजच्याही काळात आहेत. या दृष्टिकोणाचे स्वरूप सबनिसांनी याविषयी जी सविस्तर चर्चा आपल्या व्याकरणाच्या प्रास्ताविकात केली आहे, तिच्यावरून चांगले कळून येते. त्यांच्या मते व्याकरण हे धर्मशास्त्राप्रमाणे

‘ प्रभुसंमित शास्त्र ’ आहे, Normative Science आहे. ‘ बोली ’ (बोलण्यातली) भाषा ही त्यांच्या मते खोटी भाषा आहे. वाङ्मयात योजली जाणारी भाषा ही खरी भाषा असून ती व्याकरणामुळे निर्माण आणि नियमित होते, असे ते समजतात. याला अनुसरून त्यांनी ‘ प्रयोगशरणाः वैयाकरणाः ’ या परंपरागत वचनाचा रूढ अर्थ टाकून आपल्याला अनुकूल असा अर्थ लावून दाखवलेला आहे. त्यात ‘ प्रयोग ’ म्हणजे व्याकरणनियमांना अनुसरणारी रचना असा अभिप्राय आहे. ‘ बोलण्याचा प्रचार ’ (usage) अशा अर्थाने ‘ प्रयोग ’ हा शब्द घेतला, तरी ‘ प्रौढभाषेत लिहिताना दादोबांसारख्या भाषाशास्त्रज्ञ शिष्टांना संमत असलेले प्रयोगच स्वीकारणे योग्य होईल.’ [सब ४७] मंगरूळकरांच्या व्याख्यानग्रंथाच्या प्रस्तावनेत पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्ध्यांनी याच भूमिकेचे मंडन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, ‘ थोर मान्य अशा ग्रंथांतली भाषा ’ (थोर, मान्य ग्रंथ कसे ओळखावे ? कथाकादंबऱ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल की नाही ?) हाच व्याकरणाचा विषय होय. ‘ बोलल्या जाणाऱ्या भाषेचे व्याकरण ही कल्पना शक्यतेच्या कोटीत येईल, असे वाटत नाही. म्हणून आजपर्यंत लिखित-मुद्रित भाषेचेच व्याकरण लिहिले गेले, तेच योग्य होते...व्याकरण रचण्याच्या दृष्टीने ग्रंथांतील भाषा, लिखित-मुद्रित भाषा हीच प्रमाणभाषा...’ [मंग ०२७] (‘बोलली जाणारी भाषा ’ योजून कोणी शास्त्रीय विषयावर ‘ थोर ’ ग्रंथ लिहिला तर ? मला वाटते, असे आता कोणी तरी करावेच.) ‘ प्रयोगशरणाः वैयाकरणाः ’ यातला ‘ प्रयोग ’ मात्र सहस्रबुद्ध्यांच्या मते ‘ लोकव्यवहार ’, ‘ वाग्व्यवहार ’ हाच होय. ‘ प्रत्येक कालखंडातल्या या...वाग्व्यवहाराचा अभ्यास अत्यंत अवश्य आहे. पण हा अभ्यास करून त्य कालखंडातल्या भाषेचे व्याकरण जेव्हा आपण रचितो, त्या वेळी वाग्व्यवहारातील जो पालट लिखित भाषेत रूढ होतील, त्यांचाच फक्त विचार करिता येईल, इतरांचा नाही.’ [उक्त ०२७] (लिखित-मुद्रित ‘ भाषे’च्या व्याकरणातले वर्ण ‘ कंठ्य, तालव्य ’ वगैरे असतात ते कसे काय ? त्यांच्या रेखाकृतींत तर कोठे या धर्मांची प्रतीती येत नाही.) टेनिसनची ‘ लेडी ऑफ शॅलॉट ’ ही आपल्या मनोऱ्यावरच्या खोलीत बसून समोरच्या आरशात जसे दिसेल तसे जग जाळ्यात विणते. मराठी वैयाकरण याहून वेगळे काही करीत नाही. दोघांच्याही शिरांवर कसल्या तरी अगम्य शापाचे ओझे आहे. व्याकरणाचे हे असे लिखित-मुद्रित भाषेशी लग्न लागले आहे, अशी समजूत पक्की झाली, की मग काही वैयाकरणांना असेही वाटू लागते की, ‘ लेखनशुद्धतेचे चौदा कलमी नियम रूढ झाल्यानंतर त्याला अनुसरून व्याकरणाच्या नियमांची काही ठिकाणी फिरवाफिरव करावी लागणार आहे.’ [दाम / ३ : ०११] मग शुद्धलेखनाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या पंडितसमितीला हेही सांगणे आपल्या अधिकारकक्षेतले वाटू लागते की, ‘ करणेसाठी, फडकेंना, पाहणेला यांसारखी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत; ’ तर ‘ करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला ’ यांसारखी करावी. [मराठी साहित्य महामंडळाचे लेखनविषयक नियम, क्र. १२] पायांवर पाणी घालायचे काम ज्याला

सांगितले असेल, त्याने भिकबाळीच्या किमतीची उठाठेव करायची नसते, असा सामान्य जनांचा समज आहे. विद्वज्जन असे समजत तरी नसावेत, किंवा त्यांच्या मते भिकबाळीच्या किमतीची उठाठेव हा पायांवर पाणी घालण्याच्या कामाचाच एक भाग ठरत असावा.

मराठी व्याकरणातल्या मतांतरांत याप्रमाणे दोन टोकांमध्ये प्रायः भरपूर अंतर आढळते. ते न पाहवल्यामुळे म्हणा, किंवा व्यवहारात तडजोडीचे धोरण वर जाण्यास हात देते या अनुभवाचा परिणाम म्हणून म्हणा, काही वैयाकरण या दोन टोकांमधला मार्ग—जशी बुद्धाची 'मज्झिमा पटिपदा'—काढण्याचा प्रयत्न करतात. दामले लिहितात : 'व्याकरण हे भाषेच्या पाठीमागून जाते व भाषा पुढे चालते; व्याकरण जर भाषेस सोडून जाऊ लागले, तर ते व्याकरणच नव्हे.' [दाम / ४ : ७·१४] एवढे लिहिल्यावर पुन्हा पलटी खाऊन ते लिहितात : 'तथापि पुढारी जरी पूर्णपणे स्वतंत्र असला तरी अनुयायांचे सूचनांचा त्याने सर्वथा तिरस्कार करणे जसे त्यास अहितकर...त्याचप्रमाणे व्याकरणाचेही मार्गदर्शकत्व कधी कधी अंशतः कबूल केल्यापासून भाषेचे कल्याणच होते.' [उक्त ७·१८] वैयाकरणाने वाग्व्यवहाराचा नित्य अभ्यास करावा, पण व्याकरण लिहिताना थोर, मान्य ग्रंथांतली लिखित-मुद्रित भाषाच लक्षात घ्यावी, या वर आलेल्या सहस्रबुद्ध्यांच्या मतात ही तडजोडनिष्ठाच गर्भित आहे. तिचा जन्म कोणत्या विचारात होतो, याचाही सहस्रबुद्ध्यांच्या प्रतिपादनात शोध करता येण्यासारखा आहे : 'भाषेस बहुधा कोणताच नियम सर्वांशी लागू पडत नाही.' याला दाखला—'हिंदू कोणास म्हणावे, जर्मन म्हणजे नेमका कोण, धर्म म्हणजे काय, ...हे शेकडो वर्षांच्या चर्चेनंतरही अजून ठरलेले नाही.' [मंग ०२१] म्हणूनच बहुतेक व्याकरणकारांनी '"असे मानावे"...अशी भाषा वापरली आहे. इतर जड शास्त्रांत..."असे आहे" असा निर्णय देतात.' [उक्त ०२०] जितकी म्हणून 'मानवसंबंधी शास्त्रे' आहेत (यांत व्याकरणशास्त्रही आले), त्या सर्वांचे स्वरूप असेच संकुल असते, संदिग्धप्रकृती असते. त्यांना 'जड शास्त्रां'चे काटेकोर स्वरूप देऊ म्हणता देता येणार नाही.

'व्याकरणाला विषयभूत भाषा कोणती—बोलण्यातली की लिखित-मुद्रित?' या प्रश्नावरून मराठी व्याकरणाच्या अभ्यासकांत जसे दोन तट किंवा गट पडलेले दिसतात, तसे ते 'लँग्वेज कोर्स' या स्वरूपाच्या पुस्तकांतूनही दिसतात. आधुनिक भाषाशास्त्राच्या तालमीत तयार झालेल्या लेखकांचा अपवाद करता (लँबर्ट, कब्रडी-साऊथवर्थ) अशा स्वरूपाच्या पुस्तकांतूनही लिखित-मुद्रित भाषेचाच प्रभाव आढळून येतो. लँबर्टनी बोलण्यातली भाषा प्रामुख्याने शिकवून मग लिखित-मुद्रित मराठी भाषेच्या सरावासाठी स्वतंत्र धडे घातले आहेत. लँबर्ट लिहितात, 'The rules of Marathi orthography have to be studied, for the most part, independently of the spoken language.' [लँब ११०] एकंदरीने मराठी बोलणे आणि लिहिणे शिका-

यचे म्हणजे दोन भाषा शिकायच्या, असे झाले! मराठी लेखन हे मराठी भाषणाहून हट्टाने दूर ठेवणाऱ्या मराठी भाषक-लेखकांचाच हा दोष आहे. हा दोष म्हणावयाचा नसेल तर मराठी भाषणाचे वेगळे आणि लेखनाचे वेगळे अशी दोन स्वतंत्र व्याकरणे रचून ती दोन्ही मराठीच्या अभ्यासात समाविष्ट करणे हा मार्ग आहे. यामुळे होणारा लाभ हा की, मराठीचा अभ्यासक वस्तुस्थितीपासून वंचित राहणार नाही. गद्यपद्यांची अशी वेगवेगळी व्याकरणे रचण्याची सूचना मंगरूळकरांनी केलेली आहेच. [मंग २३]

व्याकरणाचा आरंभही होण्याआधीचा मुद्दा भाषा आणि व्याकरण यांचा संबंध. पण त्यातून पाहता पाहता किती प्रश्न उत्पन्न झाले! व्याकरण हे भाषा कशी आहे ते सांगणार की कशी असावी ते? भाषेमागून व्याकरण की व्याकरणामागून भाषा? की दोन्ही बरोबरच, सहजातच? ती ही भाषा वाग्व्यवहारातली की लिखित-मुद्रित अशी वाङ्मयातली? या दोन्हींपैकी खरी कोणती, खोटी कोणती? दोन्ही खऱ्या असल्यास त्यांपैकी मुख्य कोण, गौण कोण? भाषा आणि व्याकरण यांचे जेव्हा पटेनासे होते, तेव्हा भाषेवरून व्याकरण शुद्ध करायचे की व्याकरणावरून भाषा शुद्ध करायची? या दोहोंचे पटेनासे झाल्यास कौल कोणाच्या बाजूने द्यायचा? या दोन्ही टोकांच्या मधला मार्ग काढून तडजोड करावी की नाही? ज्या अर्थाने जड शास्त्रांना, त्या अर्थाने व्याकरणासारख्या मानवसंबंधी शास्त्रांना ' शास्त्र ' म्हणावे की नाही? व्याकरणाचा ' शुद्धलेखना 'शी संबंध आहे की नाही? इतके हे प्रश्न वैयाकरणांच्या चर्चेतून उपस्थित झाले, हेही काही थोटे श्रेय नव्हे. एखादी बाजू घेऊन आवेशाने भांडण करण्याच्या कामी मराठी माणूस सहजासहजी कोणाला हार जाणार नाही, याचा प्रत्यय व्याकरणाविषयीच्या या प्रास्ताविक मुद्द्यांवरच्या चर्चेवरूनसुद्धा येऊ शकेल. या उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह करून सप्रमाण निर्णय करणे हे काम फार मोठे आहे. ते एखाद्या छोट्या समालोचनात्मक लेखाच्या कक्षांमध्ये होणे बिकट आहे, आणि प्रमाणे न मांडता संक्षेपाने आपले नुसते निर्णय सांगून आटोपते घेणे हे अस्वीकृत मतांच्या पुरस्कर्त्यांवर अन्याय करण्यासारखे आहे. त्यामुळे हे आणि यासारखे प्रश्न समजावून सांगण्यातच प्रस्तुत लेखाची सफलता मानणे भाग आहे.

येथपर्यंत जे प्रश्न उपस्थित झाले, ते व्याकरणाच्या उंबरठ्यावरचे आहेत. उंबरठ्याच्या आत पाऊल टाकल्यावर प्रश्न भेटतो, तो व्याकरण म्हणजे काय हा. मराठी वैयाकरणांनी सर्वांत कमी बुद्धी शिणवली, ती या प्रश्नावर. ज्यांनी समोर इंग्रजी किंवा संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा नमुना पुढे ठेवूनच मराठीचे व्याकरण लिहिले, त्यांच्यापुढे हा प्रश्न उपस्थितही होत नव्हता. त्यांनी उपचार म्हणून व्याकरणाची मोघम लक्षणे (तीही अनुकरणात्मक) सांगून लगेच तपशिलाला हात घातला. ' व्याकरण म्हणून एक शास्त्र आहे, जेणेकरून भाषेचे तत्त्वज्ञान होते, म्हणजे आतील नियम कळतात, तेणेकरून शुद्ध कोणते आणि अशुद्ध कोणते, हे यथायोग्य समजते, ' [दादो / ७ : १] या एवढ्या लक्षणावरून अवघे भाषाशास्त्रही व्याकरणाच्या पोटात सामावता

येण्यासारखे आहे. आणि खरोखरच काही ग्रंथांवरून, लेखांवरून त्यांच्या लेखकांचा समज असा दिसतो की, भाषेसंबंधीची काहीही माहिती किंवा विचार असला, की घाला तो व्याकरणात. अशा रीतीने मराठी व्याकरणात ऐतिहासिक व्युत्पत्ती आली, अन्य भाषांशी तुलना आली, वाक्यपृथक्करण आले, भाषेच्या उत्पत्तीविषयीची विविध मते, ध्वनीची उत्पत्ती आणि वर्गीकरण यांविषयीचे सिद्धान्त, लिपिविचार, शुद्धलेखन, वगैरे वगैरे. यांतले अमूक अमूक विषय व्याकरणात यावेत, येऊ नयेत, असे काही मतप्रदर्शनही—क्वचित सप्रमाणसुद्धा [सब २८]— झालेले आढळते. पण या समग्र प्रश्नाच्या मुळालाच हात घालून व्याकरणात काय येते, काय नाही, येते ते का, नाही तेही का, व्याकरणाची प्रमाणे कोणती, त्यांचे सापेक्ष बलाबल काय, याचा शास्त्रशुद्ध विचार व्हावयास हवा तो कोणी केलेला नाही.

जुन्या वैयाकरणांपैकी एका गुंजीकरांनी मात्र या विषयाचा विशेष लक्ष घालून विचार केलेला आढळतो. ‘ज्या शास्त्रामध्ये भाषेचे मूलभूत अवयव आणि त्यांचा अर्थविस्तार करणारे प्रत्यय यांच्या योगाने शब्द सिद्ध होण्याचा प्रकार, आणि वाक्यातील अवयवांचा परस्परसंबंध यांचे प्रतिपादन केलेले असते, ते व्याकरण.’ [गुंजी १३७] या लक्षणात व्याकरणाच्या ज्या दोन कार्यकक्षा दाखवल्या आहेत, त्यांना त्यांनी अन्यत्र ‘शब्दांची व्युत्पत्ती आणि योजना’ अशी नावे दिली आहेत. [उक्त १९१] व्याकरणाच्या कार्यकक्षेची सांगोपांग चर्चा होऊन जे फलित निघेल, ते गुंजीकरांनी केलेल्या लक्षणाच्या जवळपास असेल, असे वाटते. सबनिसांनी बराच ऊहापोह करून आणि प्रामुख्याने येस्पर्सनला गुरुस्थानी स्थापून ‘प्राकृतेय’ आणि ‘वाक्येय’ या दोन भागांनी व्याकरणाची कार्यकक्षा दाखवली आहे. [सब ३०] ती आपाततः गुंजीकरांच्या विभागणीशी सदृश वाटली, तरी त्यांचे ठोस समीकरण करण्याचा मोह आवरला पाहिजे. रूढ व्यवस्था आणि परिभाषा यांत सबनिसांनी फार मोठ्या प्रमाणावर उलथापालथ केली असून त्यांना नक्की काय म्हणावयाचे आहे हेसुद्धा कळण्यासाठी बराच खटाटोप करावा लागतो. पण हा खटाटोप जरूर करण्यासारखा आहे; कारण मराठी व्याकरणातल्या बऱ्याच परंपरागत गोष्टींना सबनिसांनी आव्हान दिलेले असून त्यांचे लिखाण सर्वांशी स्वीकार्य नसले तरी विचारप्रवर्तक आहे,—(विश्वनाथ काशीनाथ) राजवाड्यांच्या लिखाणासारखे. राजवाडे आणि सबनीस या दोघांचेही लिखाण जितके विचारप्रवर्तक तितकेच दुर्बोध. या दोघांनी योजलेल्या अपरिचित परिभाषेतून वाट काढून त्यांचा अभिप्राय समजून घेता घेता मराठी वाचकाची (एकवचन साभिप्राय आहे.) दमछाक होते. या दोघांचे मराठी व्याकरणाचे लिखाण मागे पडण्यास बहुधा ते दोघेच जबाबदार आहेत.

‘वर्णविचार, शब्दविचार, वाक्यविचार’ असे व्याकरणाचे तीन विभाग करण्याची प्रथा आहे. या प्रथेत आपाततः आक्षेपार्ह असे काही नाही, तरी या प्रत्येक विभागाची व्याप्ती किती, या गोष्टीचा विचार अवश्य झाला पाहिजे. मराठीचे वर्ण,

त्यांची उत्पत्ती, स्थानप्रयत्न, वर्गीकरण, संयोगविशेष, मराठीची लिपी,—इत्यादी बऱ्याच गोष्टींचा कमीअधिक तपशिलाने परामर्श करण्याची मराठी वैयाकरणांची वहिवाट आहे. तिच्या कायदेशीरपणाला प्रथम हरकत घेतली राजवाड्यांनी. 'दामल्यांच्या... स्वरांच्या व व्यंजनांच्या व्याख्या इंग्रज वैयाकरणांच्या गचाळ लक्षणांवरून घेतलेल्या आहेत...परंतु उच्चारधर्मांच्या आधारावर ही व्यंजनांची व्याख्या करून व्याकरण-शास्त्रात काय कार्य होते ? वस्तूंची लक्षणे जी करावयाची ती त्या त्या शास्त्राला उपकारक अशी असावी लागतात.' [राज / सु ८२] ख् = क् + ह्; घ् = ग् + ह् — इत्यादी समीकरणे दामल्यांनी मांडली आहेत. [दाम / ४ : २७·१४] या गोष्टीला हरकत घेऊन राजवाडे म्हणतात की, ख्, घ्,...ही 'अशा तऱ्हेने वस्तुतः जोडाक्षरे आहेत, असे दामल्यांचे मत आहे. मग ती... मूळ वर्णांतून काढून टाकण्यास काय हरकत आहे ? ' [राज / सु ८४] आधुनिक भाषाशास्त्राचे धडे घेतलेले मराठी वैयाकरण वर्णविचार करताना असा बराच तपशील देतात. [मंग ६६] दुसऱ्या टोकाला 'उच्चतर व्याकरण'कार 'क्ष्, ज्ञ्' यांनाही मूळ वर्णांत गणतात. [सब ६५] या दोन्ही प्रकारांच्या मुळाशी व्याकरणातल्या 'वर्ण' या कल्पनेविषयीचा उणाअधिक गैरसमज असला पाहिजे. ती कल्पना एकदा भट्टीत घालून काढली, म्हणजे वर्णो-संबंधीच्या अन्य बऱ्याच वादग्रस्त गोष्टींचा निर्णय होईल. अ-चा दीर्घ आ, ऋ-ऌ यांचे स्वरत्व, इ-उ-ऋ या स्वरांच्या ऱ्हस्वदीर्घ रूपांची पृथक गणना, ऐ-औ यांचे स्वतंत्र स्वरत्व, ॲ-ऑ या स्वरांचा वर्णमालेत समावेश, वर्गीय व्यंजनांपैकी द्वितीय-चतुर्थ (जसे—ख्, घ्) व्यंजनांची स्वतंत्रता, दंततालव्य वर्गाला (चमचा, झबले इत्यादी शब्दांतले च्, झ्,...) मान्यता, अनुनासिक व्यंजनांची गणना, अनुस्वाराचे अस्तित्व, इत्यादी. यांपैकी काही प्रश्नांची जाणीव मराठी वैयाकरणांना पुष्कळ काळ असून त्यांची उकल करण्याचा थोडाबहुत प्रयत्नही त्यांनी केलेला आढळतो. काही प्रश्न प्रामुख्याने अलीकडेच भाषाशास्त्रज्ञांनी उपस्थित केले आहेत. [मंग ५६...] त्यांपैकी काही प्रश्न आधुनिक विद्यांचा गंधही नसलेल्या कोकणातल्या एका वेदमूर्तीने—पांडुरंग जनार्दन पाध्ये—साठ वर्षांपूर्वी कोणाचेही पाठबळ नसता शिळाछापाने जिद्दीने छापलेल्या आपल्या पुस्तकात उपस्थित केलेले पाहून वाचक थक्क होतो. 'हा ग्रंथ अक्षरशः खरा आहे,' [पाध्ये, खिळाछापाची प्रस्तावना,— पृष्ठांक नाहीत.] असे लोकमान्य टिळकांचे सर्टिफिकेट मिळवलेल्या या अज्ञातप्राय लेखकाच्या पुस्तकात जो चौकसपणा, जी प्रमाणनिष्ठा, जी तर्कबुद्धी प्रत्ययाला येते, ती त्याच्या मागच्या, पुढच्या कित्येक ख्यातनाम वैयाकरणांच्या जाडजूड ग्रंथांतून आढळून येत नाही. पाध्यांच्याच दाखल्यात बोलायचे, तर या परंपरेत 'चिन्हांटी'च फार; 'आंबे' फारच थोडे ! हे पुस्तक व्याकरणात अनभिज्ञ असलेल्या अशाही वाचकाला केवळ शैलीनेदेखील रंजवल्याखेरीज राहणार नाही.

'संधी' हा मराठी व्याकरणाचा आणखी एक समस्याविषय. दादोबांना वाटते

की, 'संधिप्रकरण हा संस्कृत व्याकरणाचा विषय होय; शुद्ध मराठी शब्दांचा संधी होत नाही.' [दादो / ७ : १४] 'श्वश्ववर्थ, भूभृड्ढका, रामष्टीकते' [दाम / ४ : ६०·५, ६२·२४, ६५·६] असली उदाहरणे वाचल्यावर इतरांचाही हाच ग्रह असल्याची खात्री पटते. काही तर तसे जाहीरही करतात. [उक्त ५६·६] संस्कृत व्याकरणाची भीड मोडवत नाही, म्हणून हा विषय मराठी व्याकरणात घ्यायचा; या माहितीच्या अभावी मोरोपंत, वामनपंडित वगैरे असामींचे बोलणे कळणार नाही, म्हणून ती द्यायची;—अशी प्रायः मराठी वैयाकरणांची भावना आहे. (पण मुले विचारतात, 'आम्हांला मोरोपंतांचे वगैरे काव्य शिकवायच्या ऐवजी संस्कृत काव्यच का नाही शिकवत?' संस्कृताभिमान्यांनी ही दुर्मीळ संधी दवडू नये.) 'गायुभी, दूधून, मीज्जर, पाड्ढ(ड्ढ)कल' [वेंक १७·२१, २२·२०, २४] असले मराठी संधी ज्याला दिसले, असा वेंकटराव हा एकच मराठी वैयाकरण मला आढळला. त्याच्या उदाहरणांनी वाचकाला जणू अलीबाबाची गुहा उघडण्याचा मंत्रच मिळतो. आणि मग त्याला मराठीत जिकडे तिकडे संधीच संधी दिसू लागतात. पण 'लिखित-मुद्रित भाषा हीच प्रमाणभाषा' [मंग ०२७] असाच चंग बांधून आखाड्यात उतरल्यावर त्यांना कोण पुसणार? मराठी वैयाकरणांना चिंता याच गोष्टीची की, पदातील अंत्य अ 'अनुच्चारित' मानण्यास एकदा का संमती दिली, की 'मराठीतील अकारान्त म्हणविले जाणारे बहुतेक सर्व शब्द व्यंजनान्त होतील.' [दाम / ४ : ३८·३] (आणि स्वर-पक्षाचे सरकार अल्पमतात येईल. मग वटहुकूम, राष्ट्रपतींची राजवट वगैरे वगैरे.) हे टाळायला उपाय एकच,—'लेडी ऑफ शॅलॉट' होणे, जगाचे दर्शन आरशात घेणे. जगाकडे साक्षात पहायची गरजच मुळी काय?

'लिखित-मुद्रित भाषा हीच प्रमाण भाषा' ठरल्यामुळे मराठी व्याकरणावर आणखी एक आपत्ती ओढवली. ती ही की, स्वराघाताच्या विचाराला बहुतेक वैयाकरणांनी एक तर अजिबात फाटा दिला, नाही तर जुजबी आतिथ्य करून त्याची बोळवण केली. खेरांनी, दामल्यांनी त्यावर पुष्कळ लिहिले [दाम/४: ४३·५]; पण त्यांच्या मूळ भूमिकेतच कच्चा माल राहिल्यामुळे तिच्यावर उभारलेली इमारत भरवशाची राहिली नाही. पाणिनीने संस्कृत स्वराघातावर तब्बल २६५ सूत्रे लिहिलेली असताना [अष्टाध्यायी ६।१।१५८–६।२।१९९] दामले चक्क सांगतात, 'संस्कृत भाषेत स्वराघात नाही.' [दाम / ४ : ४३·१३] स्वराघात या विषयाचा ज्याला चांगला समज आहे, असा या विषयाची तर्कशुद्ध, अनुभवनिष्ठ मांडणी करणारा एकच मराठी वैयाकरण मला आढळला. तो म्हणजे गोविंद कृष्ण मोडक. [महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, जुलै-डिसेंबर १९४८] मराठी व्याकरणावर थोडे पण फार चांगले ज्यांनी लिहिले आहे, असे मराठी वैयाकरण (कृष्ण-शास्त्री चिपळूणकर, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, गोविंद कृष्ण मोडक) पाहिले, तर त्यांना संस्कृत शास्त्रग्रंथांची, विशेषतः व्याकरणग्रंथांची, चांगली तालीम मिळालेली आहे, असे आढळून येते. हा योगायोग म्हणावा, की या घटनांत काही कार्यकारणभाव

आहे? गुंजीकर लिहितात, 'धन्य आहे त्या संस्कृत वैयाकरणांची, की ज्यांचे शब्द म्हणजे जशी मुक्ताफळे. नेमकी योजना आणि नेमका अर्थ.' [गुंजी २१२] सुज्ञांनी काय ते समजून घ्यावे. मतांची सक्ती होऊ शकत नाही.

दादोबांनी इंग्रज गुरूंच्या नमुन्याप्रमाणे शब्दांचे आठ वर्ग केले खरे; पण या संख्येच्या बाबतीत इतरांचा मतभेदही नमूद केला आहे. [दादो/७ : २३] हा सुरुवातीचा इंग्रज गुरूंचा प्रभाव काही अपवाद सोडता एका शतकाहून अधिक काळ मराठी वैयाकरणांच्या मानगुटीवर बसलेला आहे; आणि नवे विचारप्रवाह सुरू झालेले असले, तरी आज अधिकांश वैयाकरण त्याच्याच पगड्याखाली बरेवाईट लिहीत आहेत, असे आढळते. इंग्रज गुरूंच्या शहाणपणाविषयी मराठी वैयाकरणांना इतका विलक्षण भरवसा आणि आदर वाटतो की, 'पाहिजे तेवढी हातचलाखी केली तरी या सात (केवलप्रयोगी अव्ययांसह आठ) जातींपैकी कोणत्याही जातीत पडणारा शब्द त्याच अर्थाने दुसऱ्या कोणत्याही जातीत घालता येणार नाही; तसेच, ज्याला या सात जातींपैकी एका जातीत घालता येणार नाही, असाही शब्द भाषेत सापडायचा नाही.' [आग/१ : ०११] असे ते छातीठोकपणे सांगतात. दामल्यांचीही माहिती अशी आहे की, 'कोणत्याही भाषेमधील एकंदर शब्दांच्या...आठ जाती आहेत हा सिद्धान्त भाषाशास्त्रज्ञांमध्ये आता अगदी सर्वसंमत झाला आहे.' [दाम/४ : ७६·३] या सर्वसंमत सिद्धान्ताला विरोध करण्याच्या प्रवृत्तीही दादोबांच्या इतक्या जुन्या आहेत, हे त्यांनीच नमूद केलेल्या मतभेदावरून उघड आहे; त्या तेव्हापासून अखंड चालू आहेत. [चिप/१ : ४३, गुंजी २१६–२१९, सब ५७, ११३, मंग १५७-१५८] इंग्रज गुरूंनाही पुढे या आठ शब्दवर्गांचा दामल्यांना वाटतो तितका भरवसा वाटेनासा झाला. तर्कशास्त्र आणि लॅटीन व्याकरण यांच्यामध्ये वैयाकरणांनी केलेला घोटाळा आणि त्याचे परिणाम हीच व्याकरणाच्या क्षेत्रात निर्माण आलेल्या असंख्य चुकांची अक्षय गंगोत्री आहे, असे त्यांना वाटू लागले. [येस्प ४७] 'The endeavour to find the distinctions of Latin grammar in that of English has only resulted in grotesque errors, and a total misapprehension of the usage of the English language.' [उक्त ४७] हे येस्पर्सनने उद्धृत केलेले सेसीचे (Sayce) उद्गार सुमारे शंभर वर्षांचे जुने आहेत. (Encyclopaedia Britannica, 9th edition, 1875] एडवर्ड सपीर तर स्पष्टच लिहितो : 'No logical scheme of the parts of speech...is of the slightest interest to the linguist. Each language has its own scheme.' [सपी ११९] मला एक पुष्कळ वर्षांपूर्वी वाचलेली गोष्ट आठवते. एक आस्तिक माणूस आणि एक नास्तिक माणूस यांची एकदा 'देव आहे की नाही?' या विषयावर खडाजंगी झाली. कोणीही माघार घेतली नाही. अखेर दोघे आपापल्या घरी परतले. आल्याबरोबर आस्तिकाने देव्हाऱ्यातला देव उचलून विहिरीत फेकून दिला; आणि

नास्तिक एका दगडाला शेंदूर फासून त्याची अखंड आराधना करण्यात, आणि आजवर ती न केल्याबद्दल पश्चात्ताप करण्यात मग्न झाला. आस्तिकाचा नास्तिक आणि नास्तिकाचा आस्तिक झाला. इंग्रज वैयाकरण पाणिनीचा (हा सध्या पाकिस्तानचाही आद्य आणि थोर व्याकरणकार झाला आहे !) भक्त झाला; मराठी वैयाकरण मरे-हॉवर्ड वगैरे मंडळींचा भक्त झाला. चला, फिटंफाट झाली ! देणे, घेणे काही राहिले नाही.

या प्रश्नाचा गाभा हा आहे की, मराठी शब्दांचे वर्गीकरण वैयाकरणाने कोणत्या तत्त्वाच्या आधाराने करणे योग्य आहे ? या कामी त्याने शब्दांचे रूप पहावे की कार्य पहावे ? व्युत्पत्ती की अर्थ ? (वधूपरीक्षेतही नेमके हेच प्रश्न उपस्थित होतात.) दोन्ही तिन्ही पहायचा प्रसंग आला, तर त्यांत डावे-उजवे किंवा पहिले-दुसरे कसे ठरवायचे ? व्याकरणात अर्थविचार किती यावा ? हा व्याकरणाचा मूलभूत प्रमाणविचार आहे. तो निश्चित न करता व्याकरणातले वर्गविभाग ‘ रूपावरून की अर्थावरून ’ असले वाद वर्षानुवर्षे घातले, तरी त्यातून निर्णय काहीही निघणार नाही,—निघालेला नाही. मराठी व्याकरणातला नुसता विभक्तींचा वाद पाहिला, तरी या विधानाची सत्यता पटेल. म्हणजे, एवढा प्रवास केल्यानंतर वैयाकरणाला पुन्हा सुरुवातीच्याच प्रश्नापाशी येऊन पोचावे लागते. या परिस्थितीला संस्कृतात ‘ घट्टकुटीप्रभाता’चा दाखला (न्याय) देतात; मराठीत ‘ वेताळ पूर्वस्थळी आला, ’ म्हणतात. वरील मूलभूत प्रश्नांची निव्वळ जाणीवसुद्धा—निर्णय नव्हे—तुरळक अपवाद सोडता [मोड २०७, २१५, २४०, २४८, मंग १५६] मराठी वैयाकरणांना आहे, असे त्यांच्या लिखाणावरून असंदिग्धपणे जाणवत नाही.

‘ या भाषेत विभक्तीविषयी फार गोंधळ आहे, ’ [दादो / ७ : ६३] ही तक्रार दादोबांइतकी जुनी आहे. (‘ पण आमची समजूत अशी आहे की, हा गोंधळ या भाषेत आहे असे नाही; तर या भाषेचे जे सध्याचे व्याकरणग्रंथ आहेत, त्यांत आहे. ’ [गुंजी २९१]) हा गोंधळ दूर करण्याच्या कामी त्यांनी ‘ बाळ गंगाधर शास्त्री ’ या विद्वान मित्राचा सल्ला मानला, आणि ‘ संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणे प्रत्ययावरूनच विभक्ती मानाव्या, ’ [दादो / ७ : ६३] हे तत्त्व पतकरले. ते पतकरूनही द्वितीया आणि चतुर्थी अशा समान प्रत्ययांच्या दोन भिन्न विभक्ती मानून असे रूलिंग दिले की, ‘ एका कर्माच्या अर्थाशिवाय जेथे द्वितीयेचे रूप आढळेल ती चतुर्थी मानावी. ’ [उक्त ६४] असे करण्याचे समर्थन हे की, ‘ जर संस्कृत आणि प्राकृत व्याकरणांचा मूलशाखासंबंध नसता, ...तर चतुर्थीस केव्हाच काढून टाकून संबोधनासुद्धा सातच विभक्ती मानल्या असत्या; परंतु तसे करणे प्रशस्त दिसत नाही. ’ [उक्त ६५] दादोबांना जे अप्रशस्त वाटले, ते चिपळूणकरांनी साधकबाधक चर्चा करून प्रशस्त ठरवले; आणि द्वितीया आणि षष्ठी या दोन्ही विभक्तींना निरोप दिला. संबोधनाचेही स्वतंत्र-विभक्तित्व त्यांनी गौण पक्ष म्हणूनच मांडले आहे. [चिप / ७ : ६२] गुंजीकरांनी काही अडचणींचा

परिहार करून आणि चतुर्थीसाठी वेगळा प्रत्यय शोधून काढून विभक्तिसंख्या पुन्हा पहिल्याइतकी केली. [गुंजी २९४] दामल्यांनी फक्त द्वितीया गाळली. [दाम / ४ : २८९·२३] चतुर्थीसाठी स्वतःची अशी वेगळी तरतूद करून मोडकांनीही परंपरागत विभक्तिसंख्या कायम ठेवली. [मोड २०४] सबनिसांनी प्रथमा आणि षष्ठी या गाळल्या. [सब ३६] मंगरूळकरांनी चार (चतुर्थी ते सप्तमी) गाळल्या; चार ठेवल्या. [मंग १४४] ('सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः ।') मराठीत दोनच विभक्ती मानाव्या,—एक uninflected, आणि दुसरी inflected; सर्व विभक्तिप्रत्यय शब्दयोगी अव्ययांत घालावे, अशी एक सूचना बर्जिसने केली आहे. ही सूचना स्वीकारण्यास चिपळूणकरांचे 'मन घेत नाही.' [चिप / १ : ६६] पण राजवाड्यांनी बर्जिसचे व्याकरण वाचून की काय न कळे, नेमके हेच मत पर्यायी व्यवस्था म्हणून मांडले आहे. 'स, ला, ते, न, ने, हून व त हे प्रत्यय व कर्मप्रवचनीये निराळी काढली म्हणजे मराठीत शब्दाच्या दोनच विभक्ती राहतात. एक प्रथमा व दुसरी द्वितीया......ह्या दुसऱ्या विभक्तीला मराठी वैयाकरण सामान्यरूप म्हणतात. पहिल्या विभक्तीची कारके कर्ता व कर्म. दुसऱ्या विभक्तीची कारके हवी तितकी. मराठी ही इंग्रजीप्रमाणे व्यस्त भाषा आहे, संस्कृताप्रमाणे समस्त भाषा नाही.' [राज / सु ७६] मराठी वैयाकरणांनी विभक्तींवर जितका वाद घातला आहे, तितका अन्य कोणत्याही विषयावर घातलेला नाही.

पण विभक्तींविषयीच्या मतांत दोन टोकांमध्ये जसे बक्खळ अंतर आहे, तसे अंतर मात्र मराठी वैयाकरणांच्या संयुक्त क्रियापदांविषयीच्या विवेचनात आहे. (वादही विभक्तींवर आहे तितका नसला तरी पुष्कळ घातला आहे.) 'संयुक्त क्रियापद' हा विषय मराठी व्याकरणात आला तो इंग्रजी व्याकरणावरून. ('संयुक्त काळ / अर्थ' या विषयाचा कोणी स्वतंत्र परामर्श करतात, तर कोणी संयुक्त क्रियापदांतच समावेश करतात.) तो जास्तीत जास्त व्यापक स्वरूपात जेथे आढळतो, तेथे 'अंगात घालणे, मार खाणे, प्रीती करणे, बरे करणे, गोड लागणे, ठार करणे' यांचाही त्याच्या पोटात समावेश होतो. जास्तीत जास्त संकुचित स्वरूपात हा विषय 'अस, नस' इत्यादी पाचसातच सामान्यार्थक सहायधातूंपुरता मर्यादित आढळतो. या दोन मतांच्या मधला मार्ग स्वीकारणारे वैयाकरण 'आण, इच्छ, काढ' इत्यादी विशेषार्थक सहायधातूंचाही परामर्श करतात. या शेवटच्या दोन मतांत सहायधातूंशी केवळ काही मोजक्या धातुसाधितांचा संयोग संमत आहे; सरसकट सगळ्या नामांविशेषणांचा नाही. काही वैयाकरण संयुक्त क्रियापदे मानतच नाहीत. या सर्व प्रश्नांचा सविस्तर परामर्श मी एका स्वतंत्र लेखात साधार केला असून ['मराठी व्याकरणात संयुक्त क्रियापदे'— महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, जुलै-सप्टेंबर १९६८] या प्रश्नाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोणही या विषयावरच्या परिसंवादाच्या निमित्ताने मांडला आहे. [उक्त, ऑक्टोबर-डिसेंबर १९६८] तो जिज्ञासूंनी मुळातून वाचावा. तो वाचल्यावर असे ध्यानात येईल

की, हाही सर्व वाद अखेर व्याकरणाच्या मूलभूत प्रश्नांवर येऊन टेकतो : व्याकरण म्हणजे काय ? व्याकरणाची प्रमाणे कोणती ? त्यांचा तरतमभाव काय ? म्हणजे पुन्हा ‘ घट्टकुटीप्रभातन्याय ’. ‘ घोडा का बिघडला ? पाने का सडली ? भाकरी का करपली ? ’ या तिन्ही प्रश्नांचे उत्तर एकच : ‘ फिरवले नाही म्हणून.’ मराठी व्याकरणातल्या वादांचा तोच प्रकार. पण मराठी वैयाकरण मुळाशी न जाता वर वर चर्चा करतात, ठरावीक आक्षेप आणि त्यांची ठरावीक उत्तरे उगाळण्यातच प्रायः समाधान मानतात, हे दीडशे वर्षांच्या इतिहासाचे सार आहे.

‘ वाक्यपृथक्करण ’ (Analysis of Sentences) हा विषय मराठी व्याकरणात इंग्रजी व्याकरणावरून आला. तो मराठीत आगरकरांनी (‘ वाक्यमीमांसा ’) प्रथम सविस्तर मांडला; आणि तेथून तो मराठी व्याकरणात पक्के ठाण मांडून बसला. दामल्यांनी त्याला ‘ शास्त्रीयते ’चा परवाना मिळवून दिला. (‘ दिला ’ म्हणजे काय, तर तर्कशास्त्र आणि व्याकरणशास्त्र यांची ‘ तडजोड ’ केली ! शास्त्राची तडजोड आणि पतिव्रतेचा व्यभिचार,—दोन्ही सारखेच.) हा विषय मुळात इंग्रजी व्याकरणात कसा शिरला, याचा इतिहास सांगून सबनीस लिहितात : ‘ व्याकरण हे निव्वळ शब्दशास्त्र आहे व पृथक्करण हे एकप्रकारचे वाक्यशास्त्र आहे....पृथक्करणाचा व्याकरणाशी दूरतः का होईना, थोडासा संबंध असू शकेल व पृथक्करणास व्याकरणाची थोडीशी मदत होईल....पण व्याकरणाला पृथक्करणाच्या मदतीची मुळीच आवश्यकता नाही. ’ [सब २८] वामन मल्हार जोश्यांच्या मते वाक्यपृथक्करण ‘ हे तर व्याह्याच्या घोड्यासारखे फार अडचणीचे झाले आहे. ’ [उक्त २७] आता इंग्रज व्याही राहिलेला नाही. तेव्हा व्याह्याची भीती बाळगणाऱ्यांनीसुद्धा त्याचे घोडे दिवाणखान्यातून काढून तबेल्यात बांधायला हरकत नाही. (इंग्रजाने उभारलेले चांगले शिल्पातले घोडे तबेल्यात हलवण्यापेक्षा असले घोडे हलवणे खासच चांगले.)

मराठी व्याकरणाचा नव्हे, पण मराठी व्याकरणाच्या जिव्हाळ्याचा असा एक विषय म्हणजे त्याचा इतिहास. मराठीच्या (म्हणजे, प्रमाण मराठीच्या) व्याकरणाची परंपरा कायदेशीरपणे महानुभाव भीष्माचार्यांच्या (तेरावे-चौदावे शतक) ‘ पंचवार्तिका ’-पासून सुरू होत असली, तरी दखल घेण्यासारखी ग्रंथनिर्मिती केरीने १८०५-मध्ये प्रसिद्ध केलेल्या व्याकरणापासून पुढे होऊ लागली. या गोष्टीला आता दीडशे वर्षे होऊन गेली; आणि या अवधीत मराठी व्याकरणावर लहान, मोठी पुस्तकेही पुष्कळ लिहिली गेली. यांपैकी निव्वळ शालेय, परोपजीवी अशी अलीकडची पुस्तके जरी सोडली, (शालेय पुस्तकेसुद्धा जुनी—साधारणपणे १९३०-पूर्वीची—असतील, ती सोडून चालणार नाही.) तरी अन्य पुस्तके शंभराच्या घरात येतील. (यांत कोकणी इत्यादी बोलींची व्याकरणे जमेला धरलेली नाहीत.) या सर्व पुस्तकांची एकत्र साधी यादीसुद्धा कोठे नाही; मग त्यांची पद्धतशीर, बिनचूक माहिती आणि यथोचित मूल्यमापन या स्वरूपाचा इतिहास दूरच. या स्वरूपाचे नव्हेत, पण या दिशेने झालेले काही प्रयत्न

स्वतंत्र लेख, व्याकरणग्रंथांच्या प्रस्तावना, वाङ्मयेतिहासातील अल्पांश अशा रूपाने आढळात आहेत; पण ते अगदी त्रोटक, अपुरे, क्वचित चुकीचीही माहिती देणारे असे आहेत. संस्कृताचे व्याकरण मराठीचे म्हणून रुजू करणे यासारखी गफलत पीएच. डी.-साठी मान्य झालेल्या मुद्रित ग्रंथांतून आढळू लागल्यावर 'विसंबावे तरी कोणावर ?' असे वाटू लागते. ही परिस्थिती लाजिरवाणी आहे. मराठी व्याकरण प्रगत व्हायला हवे असेल, त्याची बाटली आणि बोट सुटायला हवी असतील, तर ही परिस्थिती पालटली पाहिजे. मराठी व्याकरणाचा उत्तम इतिहास लिहिला गेला पाहिजे, आणि त्याचा आडवा छेद—म्हणजे मराठी व्याकरणातल्या प्रत्येक विषयाचा समग्र परंपरेच्या संदर्भात प्रमाणपुरःसर, चिकित्सापूर्ण आढावा—घेतला गेला पाहिजे. यामुळे व्याकरणाच्या अध्येत्याला लक्ष्यांतर (पर्स्पेक्टिव्ह) येईल, आणि प्रौढ ग्रंथांत तरी तेच ते आक्षेप आणि तीच ती उत्तरे यांच्या चर्वणाला आणि निव्वळ अनुकरणाला खीळ बसून खरो-खरच मौलिक असे नवे लिखाण या विषयावर होण्याचा संभव निर्माण होईल. असे सत्त्व —प्रॉमिस—या परंपरेत खचीत आहे, असा भरवसा गेली पाचसात वर्षे या विषयावर केलेल्या परिश्रमांतून मला वाटू लागला आहे. त्याचा केवळ विसार जरी प्रस्तुत लेखातून मराठी व्याकरणाच्या अभ्यासकाला मिळाला, तरी मला समाधान वाटेल.

[या लेखातील संक्षेपांचे विवरण (वर्णानुक्रमाने)—संक्षेपापुढे नमूद केलेले आकडे = पृष्ठांक. पोकळ शून्यापुढचा आकडा = त्या त्या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागाचा पृष्ठांक.

आग / १	'वाक्यमीमांसा'—गोपाळ गणेश आगरकर पहिली आवृत्ती (१८८८)
उक्त	लगत आधी उल्लेखिलेला ग्रंथ, Ibidem.
गुंजी	'रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख' (प्रथम खंड, १९४२)
चिप / १	'मराठी व्याकरणावर निबंध'—कृष्णशास्त्री चिपळूणकर पहिली आवृत्ती (१८९३)
दादो / ७	'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण'—दादोबा पांडुरंग तर्खडकर सातवी आवृत्ती (१८७९)
दाम / ३	'शास्त्रीय मराठी व्याकरण'—मोरो केशव दामले संपादक : ग. वा. करंदीकर (१९६५)
दाम / ४	उक्त—संपादक : कृ. श्री. अर्जुनवाडकर (१९७०) यातल्या निर्देशांत पृष्ठांकांपुढे बिंदूने अलग करून दिलेला आकडा = ओळीचा क्रमांक.
पाध्ये	'स्वरव्यंजनव्यवस्था'—पांडुरंग जनार्दन पाध्ये (१९११)
मंग	'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार'—अरविंद मंगरूळकर (१९६४)

मोड	' मराठीचे अंतरंगदर्शन '—गोविंद कृष्ण मोडक (१९३२)
येस्प	THE PHILOSOPHY OF GRAMMAR— Otto Jespersen (1924 / 1963)
राज / सु	' सुबंतविचार '— विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१९१२)
लँब	MARATHI LANGUAGE COURSE— H. M. Lambert (1943)
वेंक	' महाराष्ट्रप्रयोगचंद्रिका '—वेंकटमाधव संपादक : कृ. श्री. अर्जुनवाडकर (१८२७ / १९७०)
सपी	LANGUAGE—Edward Sapir (1921 / 1949)
सब	' आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण '— महादेव पांडुरंग सबनीस (१९५१)]

लोकसाहित्य : संकलन व संशोधन

डॉ. सरोजिनी बाबर

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या गोष्टीची विचारवंतांकडून हेटाळणी झाली आणि जिची पोरकट म्हणून संभावना केली गेली तीच गोष्ट चालू शतकाच्या अखेरीच्या काळात उल्लेखनीय ठरावी आणि विचारवंतांनी तिचा सन्मान करावा ही घटना एखाद्या दैवी चमत्कारांपैकीच असावी ! एरव्ही वाडवडिलार्जित मौलिक धन म्हणून आणि परंपरागत विचारसौंदर्य म्हणून मानल्या गेलेल्या लोकसाहित्यविषयक कार्याला आज अपूर्वाईचे स्थान प्राप्त झालेच नसते. ज्या साहित्यधनाच्या बळावर वाडवडिलांनी आपल्या पुढच्या पिढीला सुसंस्कृत करावयाचा प्रयत्न केला आणि केवळ पाठांतराच्या आधारावर ज्याची जपणूक केली त्याचे संकलन करावे, संपादन करावे, प्रकाशन करावे हा प्रयत्नच मुळी एके काळी वेडेपणाचा मानला गेला. मागासलेपणात मोडला गेला. मूर्खपणात जमा झाला. जर्मनीतील बाप्पप्रभृती मंडळींना सुरुवातीच्या आपल्या या कार्याच्या जीवनात हे सारे चटके भोगावे लागले. पण त्यांनी माघार घेतली नाही. "वेडेवाकुडे तुज गाईन अनंता" या भूमिकेतून त्यांनी लोकसाहित्याचं वैचारिक धन कणाकणानं गोळा केलं. त्यातला उल्लेखनीय भाग जनताजनार्दनाच्या हवाली केला. त्यासाठी मुद्रणाचे संस्कार घडवून आणले. अपार कष्टाच्या पायघड्या घातल्या. रात्र-रात्रभर खेळगाण्यांनी घुमणारं अंगण साजरं केलं. ज्या विचारांचेवर, ज्या कल्पनांवर कोणी हे माझंच केवळ आहे असा दावा केला नाही तो भावनाविष्कार आम जनतेचा आहे हे बोलून दाखविलं. त्या आधारावरच तोंडानं काढलेलं हातानं पेरलं जाऊ लागलं. अलिखितावर लिखिताचा साज चढविला गेला. गावोगाव या प्रयत्नाचं पीक निघू लागलं. देशोदेशीचा मेवा दिला घेतला जाऊ लागला. हळूहळू याही प्रयत्नाचं स्वागत व्हावं अशी परिस्थिती येऊ लागली. एवढंच नाही तर या लोकसाहित्यावरच मुळी आमच्या देशाची उभारणी झाली आहे असं सांगणारांच्याबद्दल समाजानं आदराची,

अभिमानाची कल्पना पदरी बाळगावी अशी वेळ चालून आली.

परंपरेनं चालत आलेल्या, पिढ्यान्‌पिढ्यांनी सांभाळलेल्या, सर्वसामान्यांच्या ओठांवर खेळलेल्या, त्रिकालाबाधित सत्य घेऊन आलेल्या आणि चिरकाल टिकणाऱ्या लोकसाहित्याच्या विविध शाखा-उपशाखांची, निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांची जुळवा-जुळव सुरू झाली. त्यामुळं पदोपदी बोलण्यात येणाऱ्या म्हणी, वेळप्रसंगी वापरले जाणारे उखाणे, अक्कलेची पारख व्हावी म्हणून घातली जाणारी कोडी, लहान मुलाबाळांना वळण लागावं म्हणून सांगितल्या जाणाऱ्या कहाण्या; काम करताना, विसावा घेताना, बोलावंसं वाटताना, म्हटल्या जाणाऱ्या ओव्या; खेळताना, नाचताना गाइली जाणारी गीते; जीवनात हरघडी पाळले जाणारे लोकाचार; आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगी होणारे संस्कार; पूजाअर्चेच्या वेळी सांगितली गाइली जाणारी कथागीते इत्यादींचा शोध होत गेला. बोली भाषेतील सामर्थ्याची, अशिक्षितांच्या भाषेची आणि परंपरागत कल्पना-सौष्ठवाची पारख होऊ लागली. ऐकलेलं छापलं जाऊ लागलं. श्रवणातलं ग्रथित होत चाललं. कुळाचारातलं परिचयात येत गेलं. शिक्षितांच्या आणि अशिक्षितांच्या मधील वेगळेपणाची भिंत खाली बसू लागली. मधला अडसर काढावा अशी बोलणी होऊ लागली. चांगलं असेल ते घ्यावं, घेण्याजोगं असेल ते ठेवावं, आपलं असेल ते सांभाळावं हा समज दृढ होऊ शकला. इतर भाषाभगिनींच्यामधीलही ठेवरेव मराठीनंही स्वीकारली.

भारत देश हा लोककथांचं भांडार मानला गेला होता. त्यासाठी रामायण-महाभारतांचे, वेद-उपनिषदांचे आधार घेतले गेले होते. कथासरित्सागर, गुलबकावली, हातीमताई असली पुस्तकं लोक उत्साहानं वाचताहेत यातला आशय लक्षात घेण्यात आला होता. अद्‌भुताला गवसणी घालणाऱ्या मानवी मनाला असंच हुषारीत ठेवलं पाहिजे हा वाडवडिलांचा समज सर्वमान्य झाला होता. मराठीतही या गोष्टीला तोड नव्हती.

इथली मराठी बायकामाणसं म्हणींचा आधार घेऊन बोलत होती. उखाणे घेऊन पतीची ओळख सांगीत होती. कहाण्या सांगीत व ऐकवीत कुळाचार पाळीत होती. राजाराणींच्या कथा घेऊन शूरवीरांच्या गोष्टी मुलांना देत होती. गीतं गाऊन सणवार साजरे करीत होती. गर्भारपण, बाळंतपण, बारसं, लगीनहेव या गोष्टी ओवीगीतं घेऊन, खेळगाणी ऐकवून, पाळणे गाऊन साजरी करीत होती. त्यामागच्या श्रद्धेनं त्यांना भारलं होतं. आपलंतुपलं निघायला नको म्हणून अशा वेळी त्यांनी देवादिकांचे दाखले घेतले होते. स्वतः सूर्याची कन्या राधिका बनल्या होत्या. बत्तीस लक्षणी देवतेगत वागावं म्हणत होत्या. जात्याला देव मानून आपलं काळीज उकलीत होत्या. सणा-सुदीला खेळून वयमान विसरीत होत्या. तर अशातलंच शहाण्या, जाणत्या मंडळींनी नेमकं काय ते उचललं. ऐकता ऐकता टिपून घेतलं. संपादित करून छापलं. त्यासाठी वि. का. राजवाडे यांनी बोलणं केलं. दत्तो वामन पोतदारांनी खुलासा मांडला. साने गुरुजींनी पुढारपण घेतलं. नांदापूरकरांनी जिवाचं रान केलं. तशी माणसं भारून उठली. गजबजून बसली. मराठीच्या राउळात या त्रिकालबाधित भावनाविष्काराचा

मग जयजयकार झाला. अनेकांनी या कामाला वाहून घ्यायचं ठरवलं. शीणभाग जाणवस्तोवर प्रयत्न सुरू झाले. दुर्गा भागवत, महादेवशास्त्री जोशी, मालती दांडेकर, पां. श्रा. गोऱ्हे, ना. रा. शेंडे, वामन चोरघडे, विमल चोरघडे, वि. वा. जोशी, कमलाबाई देशपांडे, गिरिजाबाई केळकर, द. ग. बोरसे, नरेश कवडी, चिं. ग. कर्वे, सविता जाजोदिया अशी अनेक मंडळी आगेमागे या कामात गुंतली. आपापल्या परीनं हा प्रयत्न बाळसं धरील हे त्यांनी पाहिलं. अपार कष्ट उपसले. हळूहळू हे खाजगीतील काम सरकारीरीत्याही सुरू झालं आणि ही लोकसाहित्यातील जनगीतगंगा डामडौलानं प्रकाशात येत गेली.

पण लोकसाहित्य मिळविणं हे काम भारी अवघड आहे. सहजासहजी ते पदरी पडेल हे खोटं आणि चुटकीसरशी आलं मनात की, कुठंही ते गवसेल हे तर त्याहूनही फारच दुर्मिळ. त्यासाठी फार मोठ्या तपश्चर्येची, सहनशीलतेची, अविश्रांत मेहनतीची, चिकाटीची आणि श्रद्धेनं या कार्याला वाहून घेण्याची अत्यंत आवश्यकता असते. कारण ज्यांच्याकडून लोकसाहित्य जमा करावयाचे त्यांच्याच कलानं घेतल्याखेरीज काही कार्यभाग साधत नाही. त्यांची लहर, त्यांची सवड, त्यांची जिद्द, त्यांची हौस, त्यांची तंद्री आणि त्यांचीच पद्धत फार वेगळी असते. म्हणून प्रथम त्यांना समजावून घ्यावं लागतं. त्यांच्याशी एकजीव होणं अगत्याचं ठरतं. त्यांचं मानसशास्त्र लक्षात घेणं अत्यावश्यक होतं. आपलेपणाची जवळीक इथं निर्माण झाल्याखेरीज मुळी काही होतच नाही.

स्थळकाळाचं बंधन नसलेल्या या कार्याच्या मागं लागायचं तर वेड लावून घेत धावावं लागतं. ध्येयानं प्रेरित होऊन चालावं लागतं. स्वाभिमानाच्या विचारपुशीनं वागावं लागतं. आपलेपणाच्या भावनेनं जगावं लागतं. त्याशिवाय काही पदरात पडतच नाही. एकेका अक्षराची जशी भीक मागावी लागते. एकेका कल्पनेला कवटाळावं लागतं. एकेका भावनेला गवसणी घालावी लागते. तुझं माझं एकच आहे हे सिद्ध करीत प्रत्येक क्षण वेचावा लागतो; आणि एकदा सोडून शंभर वेळा हेलपाटे घालीत न कंटाळता लोकसाहित्य देतेल्या माणसांच्या घरांचे उंबरठे ओलांडावे लागतात. खात्री पटस्तोवर विनवण्या कराव्या लागतात, जसंच्या तसं साईनसंगीत ध्यानात धरण्याची जिद्द बाळगावी लागते. बोलीभाषेतले बारकावे ठाऊक असावे लागतात. बोलण्यातल्या लकबींना सांभाळून घ्यावं लागतं. उच्चार हेलकावले तरी हसून चालत नाही. पुन्हा पुन्हा तेच तेच विचारून जमत नाही. एकदा कानावर येईल ते ध्यानात घेतलंच पाहिजे नाहीतर पुन्हा सांगा, पुन्हा सांगा अशी दमणूक कुणालाच खपत नाही. तीच तीच ओळ पुन्हा पुन्हा आळविली तरी असं का म्हणायची सोय नसते. लगेच नकार मिळतो आणि पोत्यानं गीतं घ्या म्हणणाऱ्यांचं तोंड जणू शिवलं जातं ! भराभर भराभर त्यांनी सांगावं आणि हात दुखून गेला तरीही आपण त्याच गतीनं टिपून घ्यावं हे जमलं तर ठीक, नाहीतर फारकत झालीच म्हणा घेणादेणाऱ्यांच्यात ! म्हणून त्यांचं आणि आपलं

हे प्रथम जुळलं पाहिजे. मिळतंजुळतं घेण्याची आमची तयारी असली तरच काही लभ्यांश! नाहीतर या परीक्षेतील यश संपलंच म्हणा. तिथं बिलकूल हयगय चालत नाही ती!

मला तर माझ्या या असल्या छंदापायी अनेक दिव्यांतून पार पडावं लागलं आहे. सांगून खरं वाटणार नाही अशा वाटेल त्या परिस्थितीला तोंड देत मी पुढं गेले आहे! शाळा-कॉलेजच्या परीक्षेपेक्षा ही परीक्षा फार अवघड! फार अवघड!!

एकदा खूप गंमत झाली. हातात मुसळ घेऊन चारचौघींच्याबरोबर उभ्यानं उखळात तांदूळ सडणं मला जमेना. कधीच तसली सवय नव्हती तर यावं कसं? मला वाटलं लोकगीतांचा न् या कामाचा काय संबंध? म्हणून आपली बसले नुसतीच पाहात! तर त्यांपैकी एकीनं मला दाटलं की! "काम नाय करतांव तर गीतं कशाला गो?" आणि नाही ना दिली एक ओवीसुद्धा! दीडदोन तास तिच्याशी वाद घालून थकले मी! शेवटी तसंच घरी यावं लागलं आणि मग एक दिवस एकटीनं का होईना उखळात मुसळ नाचू दिलं तेव्हा कुठं ती मनापासून हसली! एवढंच नाही तर "आठशे खिडक्या नऊशे दार, कोण्या दरवाज्यानं गेली गो नार" या गीतासारखी खुशीत येऊन तिनं मला तिला येणारी गीतं दिली एका दमात! त्यासाठी मला तब्बल वर्ष-दीडवर्ष तिची विनवणी करावी लागली न् माझी उमेद खचू दिली नाही.

लोकगीत कोणाकडून मिळेल आणि केव्हा पदरी पडेल याला काही धरबंद नसतो. आलं मनात की, प्रयत्नात असावं एवढंच मला ठाऊक. म्हणून मी एकदा एका एकतारीवाल्याकडे "गवळणी" ची मागणी केली. वाटलं चटकिनी एखादी तरी गौळण मिळेल, मला घाई होती. त्या विषयावरील माझ्या एका लेखासाठी तातडीनं मला त्याच्याकडून गौळण हवी होती. पण त्यानं शब्द देण्याच्या भानगडीत न पडताना मला अनेक गौळणी आपल्या तालबद्ध आणि गोड सुरेल सुरावटीत ऐकवल्या. मला त्याच्याबरहुकूम गायला शिकवलं. तब्बल चार दिवस ओळीनं गेले या थाटात आणि मग मला त्याच्याकडून चारपाच गौळणी मिळाल्या!...एव्हाना लेख पाठवायची मुदत निघून गेली होती आणि "लोकांच्यासाठी आपली धांदल का गा?" या त्याच्या प्रश्नानं मला निरुत्तर व्हावं लागलं होतं!...शिवाय तो रोज दुपारी दीड-दोनला यायचा म्हणून सगळी निकडीची कामं पुढं ढकलीत मला त्याची वाट पाहावी लागली होती आणि त्या गौळणीतील कृष्णदेवाच्या सहवासात त्याच्याइतकंच समरस होऊन दाखवायच्या कसरतीत माझा जीव निम्मा झाला होता!...पण मिळालेल्या गौळणी माझ्या कंठात बेमालूम रुळल्या होत्या आणि वेळप्रसंगी त्या गाताना त्या एकतारीवाल्याच्या चेहऱ्यावरील समाधान माझ्याही नजरेत ओसंडत असल्याचा साक्षात्कार मला झाला होता!...नावाजलेल्या संगीतकारांनी मी गातेल्या या गौळणींची वाहवा केली होती आणि "कोणाकडून शिकलात?" हे विचारताना उत्तर ऐकून "शाबास" म्हटलं होतं! तर या सगळ्या उचापतीतला आनंद माझा मला लखलाभ झाला होता

आणि गावंढळपणाबरोबरच खुळेपणातही माझी गणना होऊन सांदीकोपऱ्यातल्या केरागत मला " शहाण्यांनी " फेकून द्यावं म्हटलं होतं !...

अशा वेळी मी खूप भुलून जायची. हाडबडून उठायची. पण मला माझा रंग कधीच यायचा नाही. अंहं ! उलट असू दे आपलं असंच या मस्तीनं गीतं गोळा करीत हिंडायला मला जोर यायचा.

संध्याकाळ झाली न् धारा निघाल्या की, मला नीजबाईनं घेरावं हे आज कितीक दिवसांचं ठरल्यागत हं ! पण वाढत्या वयाला हे शोभत नाही असं म्हणावं न् नाही शोभलं तरी त्यात फरक होऊच शकत नाही हे अनुभवीत मी बोलणी खावीत हेही जणू विधिलिखित व्हावं अशातला कारभार. त्यामुळं रात्रीची जेवणं व्हावीत, चांदणं अंगणात यावं, घोंगड्यावर बसून ओव्यांची चिमट तोंडात टाकीत एखाद्या म्हाताऱ्या आजीनं मला गीतं द्यायचा डाव मांडावा म्हणजे माझी धांदल अशी उडून जाते की, काय सांगावं देवा ! डोळ्यावरची झापड निघत नाही न् गीतांचा उपसा तर ठचाचून भरलेल्या दाण्याच्या पोत्याचं तोंड उघडल्यावर भसासा बाहेर पडणाऱ्या धान्यागत होत राहतो जसा ! त्या वेळी अशी तिरपीट उडून जाते की, त्या बाईपुढं प्रत्येक ओळीनंतर हुंकार घालायचं विसरून जातं आणि टिपून घेतलेल्या ओवीतील गळून गेलेल्या शब्दांबद्दल त्या बाईची सपाटून बोलणी खात जीव शरमिंदा होऊन जातो. त्या कारणानं " कसं माबळतं न् कसं उजाडतं " हे त्या बायकांचं बोलणं पक्कं कळून चुकतं आणि हुषारीनं सगळं पदरात पाडून घेण्यासाठी म्हणून दोनदोन चारचार दिवस उपाशीतापाशी काढीत झोपेला हाकलून द्यावी लागते ?...कधी कधी त्याच धांदलीत पायली पायली दळणाला जात्यावर हात देत त्यांच्या बरोबरीनं कळ काढावी लागते आणि मग त्यांच्या विश्वासाला उतरल्यावर त्यांच्याच हातची मऊ मऊ चवदार जोंधळ्याची भाकरी सायीच्या दुधाशी खात त्यांच्या कुशीतल्या त्यांच्या मिठीनं ब्रह्मानंदी टाळी लावीत आपल्यासारख्या आपणच सुखी या समाधानानं अस्मान ठेंगणं झाल्याचा प्रत्यय येतो !

पण मग असल्या सोपस्कारातून घेतली गोष्ट सवडीआवडीनं तपासत बसल्यावर मात्र आणखीनच गंमत उडून जाते. टिपून घेतल्या शब्दाचा अर्थ लागत नाहीसं झालं म्हणजे कशाचा कशाला मेळ लागत नाही आणि आपण हे काय करून बसलो याचाही उलगडा होत नाही ? अशा वेळी पुन्हा गीतं देणारांकडे जाऊन अर्थ गोळा करायचा मोह होतो. पण तोवर ही गीतं देणारी मंडळी बेपत्ता झालेली असतात आणि शब्दकोशांनी यातली माघार घेतलेली असते ?...त्यामुळं कुठंतरी कोणाकडून तरी सारं जुळवीत बसताना जीव मेटाकुटीला येतो. कसं तरी ठिगळं लावून जुनेरं चार दिवस नेसून भागवावं तशातली गत होते आणि पुन्हा वेळच्या वेळीच सगळं झालं पाहिजे अशी ताकीद मनाला देत वेळेचं बंधन या कामातून बेलाशक काढून टाकण्याची सक्त ताकीद स्वतःलाच देणं भाग पडतं. कारण या शब्दांचा अर्थ लावायचा कुणी ? आम्ही ? जे

त्यात वाढले नाहीत त्यांनी ? या शब्दांचे ईश्वर ते की, ज्यांनी समजून उमजून त्यांचा वापर केला ! त्यासाठी जाणूनबुजून ठराविक पार्श्वभूमी पत्करली. आपल्या परीनं मनातली गोष्ट व्यक्त करताना पक्की समजूत धारण केली. वाडवडिलांच्या रीतीनं या समजुतीला जोपासलं. घराण्याची म्हणून परंपरा सांभाळली. कुळाचाराला ते जागले तर ते ठाऊक नसताना त्या शब्दांचा अर्थ लावण्याचा अधिकार आम्हांला पोचावाच कसा मी म्हणते ! कशासाठी आम्ही स्वतःबरोबरच इतरांचीही फसवणूक होऊ द्यावी ? काय म्हणून ?

लोकसाहित्याच्या संशोधनाच्या अभ्यासाचा हा विषय अगदीच वेगळा. इथं आधार दुसऱ्याचा घेऊन चालत नाही तर आपण तो इतरांना देणार आहोत या भूमिकेतून " पांढरं वावर काळं बी न् चतुर म्हणतो पेरीन मी " या दिमाखानं जगायची हिंमत घ्यावी लागते म्हणून ही भाषा जशी वेगळी तसाच तिचा शब्दार्थही ! आणि म्हणूनच हा शब्दकोशही एकदम वेगळा. केवळ बोलीभाषेचा, ग्रामीण शब्दांचा असा नव्हे तर परंपरागत भावनाविष्कार ज्या रीतीनं झाला ती रीतभातही समजावून देणारा असा एकदम निराळा निराळा. म्हणून कधी एकच शब्द एका मुलखात वेगळा अर्थ घेऊन येईल तर कधी तो इतरत्र त्याहीपेक्षा वेगळाच अर्थ लावून मोकळा होईल ! त्यासाठी संदर्भ महत्त्वाचा ठरतो. उच्चाराचा ढंग लक्षात घेणं भाग पडतं. त्या त्या मुलखातलं त्याच शब्दाचं वेगळं रूप वेचणं अत्यावश्यक होतं. त्यासाठी ह्या गोष्टीचा ध्यास असावा लागतो. म्हणजे मग उपासमार होत नाही. विचारांचं दारिद्र्य उरत नाही. विद्येची अवहेलना होत नाही.

" आटपाट नगर होतं "—म्हणजे नेमकं काय होतं हे मग तेव्हा कळतं की, जेव्हा त्याच त्या जगात आम्ही वावरण्यास लायक ठरतो. म्हणून जिथलं तिथं त्याच त्या मापानं राहिलं तरच खरं सुख त्यातलं. नाहीतर जुनं कळत नाही म्हणून नव्याच्या मागं लागत हवा तसा बदल करून, हे लोकसाहित्यच आहे असा दावा करणं पाप ठरेल ! त्यातलं कोणतं एक समजत नसेल तर गप्प बसावं हे उत्तम, उगाच नको त्या क्षेत्रात केवळ फॅशन म्हणून कोणी शिरायची गरज नाही इथं ती तेवढ्यासाठीच. कारण ह्या खणखणीत अस्सल नाण्याला खोटी खोटी तकलुपी झालर शोभतच नाही. जरतारी रेशमी वस्त्राला एखाद्या बांडाचा पदर जोडावा आणि त्याचं प्रदर्शन व्हावं तशातली गोष्ट होते. नेमका तिथंच आवर घातला गेला पाहिजे, नाहीतर लोकसाहित्याच्या जिवावर आपलं विश्व उभारून ढोंगबाजी केल्याचा आरोप उरावर आलाच ! लोकसाहित्य हे नेमकं कशाला म्हणायचं आणि लोकसाहित्यासारखं अमूक एक आहे हे कशावरून ठरवायचं हे यातल्या जाणकाराला क्षणार्धात समजलं तरच तो खरा अभ्यास आणि तेव्हाच ते खरं संशोधनही !

आजकाल परदेशातील आणि परप्रांतातील लोकसाहित्यविषयक प्रकाशित ग्रंथ एकत्र करून त्या आधारावर आपणही काही करावं अशी अनेकांच्या मनाला उचल

घ्यावीशी वाटते आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामागं आपलं नाव या कार्यक्षेत्राच्या संदर्भात व्हावं हीही भूमिका मुख्यत्वानं आहे. पण पाहिजे म्हणून काही मिळत नाही तशातीलच अशा लोकांची गोष्ट होते! मृगजळाच्या मागं धावावं त्या रीतीनं हा प्रकार अस्तित्व धारण करतो. त्यामुळं त्या लोकांना हवं आहे ते तर मिळत नाहीच, उलट त्यांचंच हसं व्हायची वेळ येऊन ठेपते! शिवाय अभ्यासकांनाही हा बेंगरूळपणा सहन होत नाही, न् मग कधी कधी या लोकांना स्वतंत्र प्रतिभाच नाही या निर्णयाला जाणते लोक येऊन ठेपतात! अडगळीतल्या वस्तूगत मग त्यांचं लेखन बाजूला पडतं!... एकदम "काय छान आहे" म्हणणारेच "हं! कळलं!" या निर्णयाला येऊन ठेपतात!

तर तशातली गोष्ट होऊ नये म्हणून मेहनत घेऊन जमा केलेलं, पारखून घेतलेलं, समजून घेता आलेलं लोकसाहित्य विषयवार वेगळं करून संपादित करतानादेखील फार म्हणजे फारच काळजी घेणं अगत्याचं ठरतं!

पुनरावृत्ती हा लोकगीताचा आत्मा ठरत असला तरी संपादनाचे वेळी मात्र तीच तीच कल्पना काही वेगळं रूप धारण करून आल्याशिवाय घेणं वा स्वीकारणं इष्ट ठरत नाही. त्याचप्रमाणं चार चरणी ओवीतील एक चरण वेगळं घेऊन येणारी ओवी ही त्या त्या मुलखातील वेगळेपण दाखवणारी म्हणून आणि सर्वत्र दिसून येणारी विशिष्ट भावनाविष्काराची पावती म्हणूनही स्वीकारली गेली पाहिजे. कधी कधी प्रादेशिक शब्दसौष्ठवाचाही विचार विशेषत्वानं व्हावा अशी वेळ चालून येते आणि मग "Tears and smile constitute universal language" या सत्याचा शोध घेणं शक्य होतं. येथून तेथून मानवी मन हे सारखं आहे आणि भाषेचा अडसर मधे न येता माणूस आपल्या स्थायीभावांच्या बाहेर कसा जाऊ शकत नाही याचीही या संदर्भात कल्पना येते. आणि म्हणूनच "Nation lives in villages" ही विचारवंतांची, शास्त्रज्ञांची व तत्त्वज्ञानी माणसांची कल्पना खरी असल्याचा प्रत्यय येतो. तर तो यावा म्हणून लोकसाहित्याचं संपादन हे निष्काम सेवेसारखं झालं तरच खरी गोडी त्यातली. नाहीतर त्यामुळं आपल्याला काही मिळावं हा स्वार्थ घेऊन काम करणाराचे बारा वाजलेच म्हणून समजावं, अशातलं काही होऊन बसतं. म्हणून इथं लागते ती या कामामागची निष्ठा. इथं हवी असते ती या भावनाविष्काराबद्दलची श्रद्धा; इथं आवश्यक असते ती घराण्याचा कुळाचार समजून घेणारी कुवत आणि ही अपार मेहनत घेण्यासाठी अत्यावश्यक ठरणारी सहनशीलता. त्याशिवाय काही होणं नाहीच म्हणा!...

लोकगीत हे वाचायचं नसतं तर ते गायचं असतं आणि लोककथा ही केवळ ऐकायची नसते तर ती त्याच ढंगात सांगायचीही असते. हा लोकसाहित्याचा कुळाचार पाळता आल्याखेरीज या क्षेत्रातील काम झपाट्यानं पुढं जात नाही किंवा त्यातला रस घेणंही होत नाही. म्हणून श्रवणाचा महिना जसा श्रावण तसा गीतनृत्यांचा महिना भादवा ठरतो! रिमझिमत्या श्रावणसरींच्या शिडकाव्यानं रोमांचित होणारी काया आणि गौरीगणपतींच्या साक्षीनं उठणारे झंकार यांना मुळी तोडच नसते. या वेळी ही

गीतं मुली उमाळा घेऊनच ओठांवर खेळतात आणि तालासुरांच्या संगतीत पायांना बेभान होत नाचावंसं वाटतं! म्हणून तर रात्र रात्रभर खेड्यातील अंगण घुमत राहतं पारव्यागत! रुणझुणत्या पाखराप्रमाणं!! तर त्याच रीतीनं लोकसाहित्याचा मिळविलेला वानवळा संकलित करून डामडौलानं संपादित होत प्रकाशित झाला तरच 'भले भले'ची दाद मिळाली म्हणावी. नाहीतर ओबडधोबड मुद्रणानं कसल्यातरी कागदावर छापलेलं गिचमीड वाचणार तरी कोण आणि चित्रांचा आधार नसल्यावर त्यातलं नवख्यांना कळणार तरी काय? त्यासाठी माझं म्हणणं इन्द्रधनूच्या सातरंगी कमानीतले रंग चितारणारा कारागीर घडती गोष्ट नजरेत खेळवीन म्हणाला पाहिजे आणि ठळक अक्षरांतील स्वच्छ छपाईनं मला हे वाचलंच पाहिजे असा मोह उभा करण्याची ताकद निर्माण करणारा मुद्रणव्यवसायातील शिल्पकार पुढं झाला पाहिजे. म्हणजे गीतं गाणारांच्याप्रमाणं, कथा सांगणाऱ्यांच्या प्रमाणं हे सारं उत्कृष्ट रीतीनं छापलंही गेलं पाहिजे याची जाणीव कळत्या मनाला होईल.

मला कळतं की, हे केवळ खाजगीतलं काम नाही. स्वस्तातलं तर नाहीच नाही. एकट्यादुकट्यानं करीन म्हटलं तरी होणार नाही. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील लोकसाहित्यकारांची, जाणकारांची, रसिकांची, कलाकारांची आणि शासनाच्या पाठिंब्याचीही नितांत गरज आहे. पैशानं मोल व्हावं अशी ही गोष्ट नाहीच मुळी. इथं पारखीसाठी हवी आहे ती कसलेली नजर आणि भिजलेली रसिकता. तसं असेल तर सोन्याहून पिवळं होणं म्हणजे काय हे लगेच कळतं. त्याचबरोबर यातलं काहीतरी का होईना माझ्याजवळ असू दे असा मोह होतोच होतो माणसाला. त्या मोहातील अपूर्वाई सागणं शब्दापलीकडचं आहे. म्हणून माझ्यासारख्या लोकसाहित्यकाराला नेहमी वाटतं की, आपल्या अशा भावनेतील देखणेपणाबद्दल कधी बोलायचं असतं का माणसानं? आपण आपलं नेहमी मनात घ्यावं की, आपण मिळविलेलं वाचायला इंद्रसभा चंद्रसभा बसणार आहेत. आणि त्यासाठी वाटप करायला येणार आहेत त्या इंद्रसभेच्या राजबिंड्या पद्मिनी! तर अशा गोष्टीला दृष्ट लावायला धजणारांचे हात झडून पडतील हे काय सांगायला हवं मी? आपलं आपल्यालाच दंडू दे म्हणून येसबंदाला घातलेला हात आम्ही कशाला काढावा देवा! असू दे तो तिथंच. चंद्रसूर्यांनी दिवे होत ज्या गोष्टीची राखण केली आजपावेतो तिथं आमचा हो काय पाड लागावा? नव्हं खरं का खोटं?

पंचवीस वर्षांतील वाङ्मयीन वाद

प्रा. वसंत दावतर

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या आणि त्यानंतरच्या काळात जे ' वाङ्मयीन वाद ' मराठीत चर्चिले गेले व प्रतिपादिले गेले ते संख्येने अत्यल्प आहेत. शिवाय ते परस्पराहून पूर्णपणे विभक्त आहेत असेही नाही. असे विधान करताना ' वाङ्मयीन वाद ' या शब्द-संहितेत मी एक विशिष्ट सीमित अर्थ गृहीत धरला आहे. माझ्या विवेचनाची कक्षा निश्चित करण्यासाठी या अर्थाचे थोडेसे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

साहित्याच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न पुरातनच आहे. या शोधातून साहित्याचे वैशिष्ट्य निश्चित करण्याची निरनिराळ्या विचारवंतांची, प्रज्ञावंतांची भूमिका दिसून येते. कितीही निसरड्या क्षेत्रातून वाटचाल करावी लागली, तरी प्रत्येक काळात असे प्रयत्न झालेले दृष्टीस पडतात. साहित्यात लक्षणीय काय हे पाहण्याचा, त्याचे विवेचन करण्याचा हा मनोधर्म साहित्याला वा एखाद्या साहित्यकृतीला कोणत्या तरी जोखडात अडकविण्याचा निदर्शक खासच नाही. साहित्याच्या आस्वादासाठी व मूल्यमापनासाठी मानदंड निर्माण करण्याचे हे प्रयत्न होते. साहित्य-निर्मिती व साहित्यास्वाद या दोन प्रक्रिया आहेत. या प्रक्रियांचे व्यक्तिजीवनात व समाजजीवनात स्थान काय, वैशिष्ट्य काय या-संबंधीचा विचार मानदंड निश्चित करण्याच्या या प्रयत्नांत समाविष्ट होता. तसेच ज्या साहित्यकृतींच्या विश्लेषणातून ही निश्चिती करायची त्या साहित्यकृतींच्या संघटना-संयोजनांचा विचारही यात गृहीत असलेला दिसतो. साहित्यकृतींचे स्वरूप जास्तीत जास्त समजून घेणे व साहित्याचे ' क्षेत्र ' विशद करणे, यासंबंधीच्या विचारसरणी प्रस्थापित करणे, असे उद्देश हे मानदंड निर्माण करताना विचारवंतांनी व प्रज्ञावंतांनी बाळगलेले दिसतात. याचाच अर्थ असा की, या वैचारिक प्रक्रियेतून साहित्याचे वैशिष्ट्य, व्यव-च्छेदकत्व प्रस्थापित करणाऱ्या प्रणाली निर्माण झाल्या. या ' प्रणाली ' म्हणजेच माझ्या दृष्टीने ' वाङ्मयीन वाद '. वाङ्मयाच्या क्षेत्रात वाद वेळोवेळी उद्‌भवतात. सामान्यतः

असे वाद वाङ्मयाच्या निमित्ताने उद्भवतात. त्यांना चुकीने किंवा रूढीने वाङ्मयातले, वाङ्मयविषयक व म्हणून वाङ्मयीन वाद म्हटले जाते. वास्तविक हे वाङ्मयाच्या निमित्ताने वेळोवेळी उद्भवणारे विविध प्रश्न असतात. वाङ्मयाने रंजन करावे की बोध करावा, वाङ्मयाने नीतीची बूज राखावी की राखू नये, वाङ्मयातील श्लील-अश्लील, या प्रकारचे हे प्रश्न असतात. यात मते व्यक्त होतात. ही मते किंवा या प्रश्नासंबंधीचे विचार या ‘ प्रणाली ’ नसतात. कारण कोणत्याही साहित्यस्वरूपाचा संकलित वा या स्वरूपाच्या घटकांचा परस्पर संबंधित असा अर्थ वरीलसारख्या प्रश्नांच्या निनित्ताने होणाऱ्या चर्चेत वा प्रतिपादनात विशद झालेला सहसा दिसत नाही. आणि म्हणूनच या प्रकारच्या चर्चेतून साहित्याचे ‘ स्व ’रूप स्पष्ट होत नाही, साहित्याचे लक्षणीय, व्यवच्छेदक वैशिष्ट्य स्पष्ट होत नाही, किंवा साहित्याचे प्रभावी वैशिष्ट्य तत्त्वतः विशद होत नाही. याउलट साहित्यात अभिजात काय, वास्तव काय, अद्‌भुत काय, रम्य काय, इत्यादी प्रश्नांचा शोध घेताना साहित्याच्या स्वरूपाचा, ते स्वरूप सिद्ध करणाऱ्या घटकांचा विचार होतो आणि या विचारातून साहित्यविषयक प्रणाली जन्माला येतात. या प्रणाली म्हणजे ‘ वाङ्मयीन वाद ’. अभिजाततावाद, वास्तवतावाद, स्वप्नरम्यतावाद, संस्कार-वाद, अतिवास्तवतावाद इत्यादी अशा प्रणाली आहेत.

या प्रणाली कालपरत्वे निर्माण होतात. साहित्याच्या वैशिष्ट्याचा शोध घेताना त्या निर्माण होतात. साहित्यस्वरूपावर काही लक्षणीय प्रकाश टाकतात. विशिष्ट कालात साहित्यविषयक विचारावर व भूमिकेवर प्रभाव पाडतात, आणि कालान्तराने त्यांचा हा प्रभाव विराम पावतो. एखाद्या प्रणालीचा हा प्रभाव कालमानाने विराम पावला, तरी त्या प्रणालीचा अंत होत नसतो. असे म्हणण्याचा प्रघात आहे की, या प्रणालींनी साहित्याच्या एकेका अंगावर प्रकाश टाकलेला असतो आणि म्हणून त्या चिरंतन असतात. त्यांच्या निर्मितीनंतर सर्व काळात त्या अस्तित्वात असतात, कार्यक्षम असतात, लक्षणीय असतात. या सर्व प्रणाली व भविष्यकाळात यासारख्या आणखी निर्माण होणाऱ्या प्रणाली मिळूनच साहित्याचे स्वरूप व्यक्त वा स्पष्ट होते, असाही एक सिद्धान्त मांडला जातो. वास्तविक, माझ्या दृष्टीने परिस्थिती अशी असते की, निरनिराळ्या प्रणालींना प्रत्येक काळात त्राता भेटतो आणि या प्रणालींना प्रत्येक काळात वाङ्मयचर्चेत स्थान मिळते. विचारवंतांची व प्रज्ञावंतांची अस्मिता ही अशी जबरी की, अशा विविध प्रणालींचे कसून विश्लेषण करण्याऐवजी त्यांचे संमेलन भरविल्यानेच साहित्याचे संपूर्ण व साकल्याने आकलन होणे शक्य आहे असे मानले जाते. अशा प्रकारे निरनिराळ्या प्रणाली कसोटीच्या अग्निदिव्याची परीक्षा न देताच शंभर नंबरी सोने म्हणून झळकताना दिसतात. साहित्यातील ज्या अंगावर त्यांनी प्रकाश टाकला ती अंगे वाङ्मयीन अर्थाने प्रस्तुत आणि औचित्यपूर्ण आहेत की नाही, याचा कसून तार्किक विचार होत नाही. एखादी प्रणाली मानणे वा न मानणे हा बौद्धिक व्यापार होय. कोणतीही वास्तविक घटना त्याने बाधित होत नाही. गणितातील, पदार्थविज्ञानातील, रसायनशास्त्रातील, जीव-

शास्त्रातील, प्राणिशास्त्रातील किंवा अशाच स्वरूपाच्या अन्य शास्त्रांतील एखादी प्रणाली मानली नाही, तर वास्तविक घटना बाधित होतात. त्यामुळे या शास्त्रात विशिष्ट विषयांबद्दल एका वेळी अनेक प्रणाली अस्तित्वात असू शकत नाहीत. त्यामुळे साहित्यविषयक सिद्धान्त व प्रणाली आणि वरील विषयातील प्रणाली सारख्या स्वरूपाच्या नाहीत, असे मानण्याचा एक प्रघात आहे. साहित्यक्षेत्रात एका वेळी अनेक प्रणाली अस्तित्वात असू शकतात या विचारातून या प्रणालींना साहित्याच्या क्षेत्रात वाङ्मयीन - वा कलात्मक- स्थान काय, साहित्याचा केवळ कला म्हणून विचार करण्यासाठी, इतर विचारक्षेत्रात अतिक्रमण न करता यांपैकी कोणती विचारसरणी प्रस्तुत ठरेल, याचा विचार विशेष कटाक्षाने होत नाही. निरनिराळे समीक्षक निरनिराळ्या प्रणाली प्रस्तुत मानतात म्हणून त्या सार्‍यांचे वाङ्मयीन अस्तित्व मान्य केले जाते. त्या दुष्टचक्रात मराठी साहित्यविचारही सापडलेला दिसतो.

यांपैकी ज्या प्रणालींचा प्रभावकाल मराठीत दुसर्‍या महायुद्धाच्या आधीचा आहे, त्यांचा विचार व ऊहापोह मी या लेखाच्या मर्यादेत करीत नाही. मर्यादातिक्रमण मी केले, तर त्याचे समर्थन करणे कठीण नाही. कारण या नियोजित कालातही त्यांचे पुरस्कर्ते आहेत. पण हे स्वातंत्र्य न घेता ज्या प्रणालींची जाणीव मराठी मनाला, मराठी विचारवंतांना व प्रज्ञावंतांना दुसर्‍या महायुद्धाच्या आसपासच्या व नंतरच्या काळात नव्याने व तीव्रतेने विशेष झालेली दिसते, त्यांचाच विचार या लेखात करण्याची मर्यादा मी घालून घेत आहे.

अशा रीतीने प्रस्तुत विवेचनाची संज्ञा व व्याप्ती मी निश्चित करून घेतली आहे.

युद्ध (दुसरे जागतिक महायुद्ध) आणि युद्धोत्तर या घटनांच्या संधिकालात मराठी साहित्यात व साहित्यविचारात अतिवास्तवतावादाचा उदय झाला. पश्चिमात्य देशांत अतिवास्तवतावादाचा उदय झाला त्याला तिहेरी पार्श्वभूमी आहे. पहिल्या जागतिक महायुद्धातील अनुभव, त्यातून उद्‌भवलेला जीवनविषयक ' दादा 'वाद (प्रस्थापिताचा संहार करू इच्छिणारी कृतिशील प्रणाली) आणि फ्राइडचे मनोविश्लेषण (जागृत कृती आणि अंतर्मन यांच्या परस्पर संबंधांचे संशोधन) ही ती तिहेरी पार्श्वभूमी होय. मराठी- तील अतिवास्तवतावादाच्या उदयामागे ही संपूर्ण पार्श्वभूमी नाही. त्याला जी पार्श्वभूमी आहे ती यांपैकी एकाच अंगाची आहे. ते अंग म्हणजे फ्राइडचे मनोविश्लेषण. म्हणून मराठीतील अतिवास्तवतावादाची बैठक एवढीच मर्यादित राहिली आहे. साहजिकच मराठीतील अतिवास्तवतावाद पाश्चिमात्य अतिवास्तवतावादाच्या संदर्भात वा तुलनेने संकुचितच राहिला आहे. बाह्यतः होणार्‍या व्यवहाराचे मूळ, त्याची प्रेरणा व त्याचा संबंध व्याधींनी, मनोविकारांनी लडबडलेल्या कनिष्ठ किंवा लैंगिक आंतरिक मनो- व्यापारात आहे, या गृहीत कृत्यातून या अतिवास्तवतावादाचा आविष्कार घडला आहे. वाङ्मयीन जीवनचित्रातून व व्यक्तिदर्शनातून हे संबंध जुळवून दाखविल्याने श्रेष्ठ वास्तवाचे (superior reality चे) दर्शन घडविले जाते, खर्‍या वास्तवाचे चित्रण

होते, ही भूमिका यामागे आहे. हा सूक्ष्म वास्तवतावाद आहे. वास्तवाचे हे खोल दर्शन आहे. म्हणून ते तीव्र व उत्कट वास्तव आहे. असा हा दृष्टिकोण आहे. वास्तव जीवन-दर्शन हे ' साहित्याचे ' वैशिष्ट्य असेल, तर ते अशा स्वरूपात जीवनाचे दर्शन घड-विल्यानेच खरे निर्माण होते, अशी धारणा या विचारसरणीमागे आहे. वास्तवाचे हे अंतिम टोक आहे, असे मानले गेले आहे.

या दृष्टीने अतिवास्तवतावादी भूमिका ही सत्यान्वेषी व आत्मानुभवी भूमिका आहे. आधुनिक संस्कृती व तर्काधिष्ठितता या सत्याला व आत्मानुभवाला भ्रष्ट करतात. या भ्रष्टीकरणातून सारे प्रस्थापित व जागृतावस्थेथील आचारविचार निर्माण होतात. म्हणून ते नष्ट करून आंतरिक, अंतःप्रेरणात्मक सत्य जीवनदर्शन घडविणारा अनुभव साहित्यात व्यक्त करण्याची भूमिका अतिवास्तवतावादी लेखकांनी घेतली. जीवनाचे हे स्वरूप साहित्यात कितपत व कसे व्यक्त झाले आहे, या आधारावर साहित्याचे वैशिष्ट्य व यश निश्चित करणारी प्रणाली अतिवास्तवतावादी टीकेने स्वीकारली. प्रस्थापिताचा निषेध व नाश हा मार्क्स-हेगेल यांच्या तात्त्विक विचारसरणीचा विशेष म्हणजे अति-वास्तवतावादाची एक बाजू आहे, तर अंतःप्रेरणात्मक, निखळ, अभ्रष्ट सत्याविष्कारा-वर निर्बंध किंवा बंधन आणणाऱ्या समाजरचनेचा, समाजव्यवस्थेचा, सामुदायिकतेचा अव्हेर व व्यक्तिस्वातंत्र्यवादी जीवननिष्ठेचा स्वीकार ही त्याची दुसरी बाजू आहे. निर्बंधविरहित आत्माविष्कार हा उत्कट व तीव्र असतो. म्हणून तो जिवंत साहित्य-निर्मितीचा – कलानिर्मितीचा आधार आहे, असे गृहीतकृत्य अतिवास्तवतावादी भूमिकेत आहे. सुप्त मनाच्या आविष्कारात अतिवास्तवतावाद्यांना विशेष रस वाटतो, त्याचे मर्म व मूळ या भूमिकेत आहे. व्यक्तीचे स्वत्व आणि जीवनाचे अनिर्बंध निर्लेप स्वरूप यांचा आविष्कार हा अतिवास्तवतावादाचा मानदंड ठरला. या आत्मानुभवावर आरोपित बुद्धी, नीती, सौंदर्य यांची पुटे व अलंकरणे ही अतिवास्तवतावाद्यांच्या दृष्टीने अप्रस्तुत व टाकावू ठरली. मनोगताच्या स्वयंचलित चलनवलनात ही पुटे व अलंकरणे व्यत्यय आणतात आणि या व्यत्ययाने आत्मानुभव हिणकस बनतो, ही त्यांची धारणा बनली. स्वयंचलित व मुक्त मनोगताचा आविष्कार होण्यासाठी साहजिकच रूढ, सांकेतिक भाषा, निवेदनपद्धती किंवा वर्णनशैली ही अतिवास्तवतावाद्यांच्या दृष्टीने निरुपयोगी ठरली. गूढ, अर्ध-आकलनीय, अनाकलनीय, गुंतागुंतीचे मनोव्यापार, आनुभविक सत्ये व्यक्त करायला सर्वसामान्य, सामाजिक व सांकेतिक भाषा अपुरी पडते, असमर्थ ठरते. यासाठी अशा प्रकारचे जीवनदर्शन यथार्थतेने घडविण्याच्या प्रयत्नात अतिवास्तवता-वाद्यांनी नव्या शब्दांची निर्मिती केली, नवी निवेदनपद्धती अंगीकारली, नवी वर्णनशैली निर्माण केली. जुन्या शब्दांवर अतिवास्तवतावाद्यांनी नवी संस्करणे केली. अशा रीतीने शब्दांचे जुने ठसे बदलून त्यांचे अर्थ विकसनशील बनविले. या सर्व प्रयत्नांतून त्यांची नवी शैली निर्माण झाली. स्वाभाविकपणे ही शैली भाषेच्या सामाजिक स्तरावर दुर्बोध वा अनाकलनीय ठरली. पण त्यांना जो अनुभव व्यक्त करायचा होता त्याशी ती

सुसंवादी होती. निदान तशी ती राखण्याचा प्रयत्न होता. ह्यात आत्यंतिकता, एककल्ली-पणा आला नाही असे नाही. पण ही आत्यंतिकता व एककल्लीपणा म्हणजे अतिउत्साह होता. या अतिउत्साहाच्या आधारे या शैलीचे विश्लेषण व मूल्यमापन करणे विपर्यस्त आहे. पण अशी विपर्यस्तता पाश्चिमात्य भाषांत व मराठीतही घडली आहे.

संज्ञाप्रवाह हे अतिवास्तवतावादाचेच भावंड आहे. मनोव्यापाराच्या विविध थरांवरील आंदोलनांचे परस्परसंबंध, संवाद, विसंवाद व तोल मालिकाबद्ध स्वरूपात व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. आनुभविक व शास्त्रीय पद्धतीने दृग्गोचर होणाऱ्या मनोवास्तवाचे चित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे. स्वप्ने, निद्राभ्रमण, सुप्तावस्था, गूढ मनाचे संचलन, वेडातील असंबद्ध बोल, हे अतिवास्तवतावादाचे संचित व जागृत अवस्थेत जागरुकपणे केलेल्या कृती व काढलेला उद्‌गार या दोहोंचा संमिश्र मेळ घालून निरनिराळे अनुभवबंध व्यक्त झाल्याने जीवनाचे आंतरिक व बाह्य सत्यदर्शन घडते, हा सिद्धान्त यामागे दिसतो. या अनुभवाचे स्वरूप जात्याच अतिशय संमिश्र, गुंतागुंतीचे व व्यामिश्र असल्यामुळे सर्वांत अधिक दुर्बोध मानले गेले आहे. पण ही निव्वळ अस्ताव्यस्तता नाही. या संमिश्रतेला व व्यामिश्रतेला रचनाबंध असतो. माणसाच्या प्रत्येक अनुभवाला रचनाबंध असतो व अशा विविध रचनाबंधांचा एकत्र संकलित आलेख काढण्याचा प्रयत्न कोणत्याही रूढ, आकलनसुलभ निवेदनपद्धतीत व भाषासरणीत बसू नये, हे स्वाभाविक म्हणावे लागेल. पण ही स्वाभाविकता मराठी विवेचनात (आणि बहुधा अन्यत्रही) अतिवास्तवतावादाच्या टीकाकारांनी दुर्लक्षिलेली दिसते.

अतिवास्तवतावाद्यांचा व तदन्तर्गत संज्ञाप्रवाहवाद्यांचा सारा भर आंतरिक मनो-वास्तव व त्याचा बाह्य वास्तवाशी असलेला विरोध व संघर्ष यावर आहे. या विरोधातून व संघर्षातून निर्माण होणारी मनोऽवस्था, त्यांच्या क्रिया-प्रतिक्रिया, यांचा आविष्कार करून जीवनाचे सत्यदर्शन घडविण्याचा, मनोविश्लेशिताच्या आधारे जीवनाच्या विसंवादी स्वरूपावर विदारक प्रकाश टाकण्याचा, या प्रकाशातून रसिक मनाला चैतन्य-युक्त करण्याचा हा प्रयत्न असतो. अतिवास्तवतावादी यात साहित्याचे व कलेचे साफल्य मानतात. ही प्रणाली जीवनाभिमुख आहे. जीवनाभिमुखतेतही वास्तवाच्या व आदर्शाच्या ठसेबाज तार्किक अवगुंठणाला भेदून त्याला छिन्नविच्छिन्न करणारी ही प्रणाली आहे. या प्रक्रियेतून नव्हे चैतन्यपूर्ण साहित्यविषयक व कलाविषयक वातावरण व दृष्टिकोण या प्रणालीने निर्माण केला. अंतरवास्तव व बाह्यवास्तव आणि अंतःप्रेरणा व बुद्धी यांत मेळ, सुसंवाद असणे, त्यातून काही वास्तव, कलात्मक अनुभव निर्माण होणे या प्रणालीला कल्पनेच्या पलीकडचे, असंभवनीय वाटते. केवळ बाह्यवास्तवातीलही काही रचनाबंध कलात्मक दृष्ट्या लक्षणीय असू शकतात. हे या प्रणालीच्या आकलना-पलीकडे राहिले. बुद्ध्या जाणूनबुजून केलेल्या गोष्टींनाही त्यातील मनःपूर्वकता व त्या-संबंधीच्या निष्ठा यांच्या बळावर आंतरिक उत्कटतेचे स्वरूप प्राप्त होते व ते चैतन्यपूर्ण

सत्याचे स्वरूप असते. ते कृत्रिम, बनावट व निःसत्त्वच असले पाहिजे असे नाही. याची जाण या प्रणालीला राहिली नाही. इतकेच नव्हे तर या घटना व व्यवहार (कृत्रिम, बनावट, निःसत्त्व यासुद्धा) कलावंताच्या मनावर त्यांच्या विशिष्ट स्वरूपाचे जे ठसे उमटवतात, जी संस्करणे करतात, त्यांतही तीव्र मनःपूर्वक अनुभव ग्रथित होतो व तोही सत्य मनोव्यापार असतो, याची जाणीव या प्रणालीने बाळगलेली नाही.

मराठीत या प्रणालीचे विवरण – विवेचन अतिशय तुटपुंजे आहे, आणि जे आहे ते या प्रणालीचे यथार्थ स्वरूप विशद करणारेच आहे, असे निखालसपणे म्हणता येणार नाही. प्रा. मनोहर गोविंद भाटे यांच्या एका लेखात या प्रणालीचे बरेचसे अविपर्यस्त निवेदन परीक्षण आहे. हा लेख महाराष्ट्र-साहित्य-परिषद पुरस्कृत ग्रंथमालेतील 'वाङ्मयीन वाद' (१९४९) या पुस्तकात समाविष्ट झाला आहे (मुळात हे व्याख्यान १९४६ मध्ये दिलेले). अतिवास्तवतावादाचे पाश्चिमात्य मूळ या लेखात विशद केले आहे व या वादाच्या पाश्चिमात्य प्रवक्त्यांच्या वचनांनी त्यांची विचारसरणी स्पष्ट केली आहे. 'दादा' वादाच्या विध्वंसकतेला विधायकतेची, नवनिर्मितीची जोड अतिवास्तवतावादाने दिल्याची नोंद प्रा. भाटे यांनी केली आहे. "अधोगतीला गेलेली मानवी संस्कृती मनुष्य-स्वभावातील नैसर्गिक प्रवृत्तींची गळचेपी करते, म्हणून तिचे पाश मोडून मानवाने आपले स्वातंत्र्य मिळविले पाहिजे व 'मनस्वी' झाले पाहिजे" अशी अतिवास्तवता-वाद्यांची जीवननिष्ठा त्यांनी नमूद केली आहे.[1] "मती गुंग करून सोडणाऱ्या व अर्थशून्य वाटणाऱ्या उत्प्रेक्षादी उपमानांची (images ची) योजना, बुद्धीच्या व परंपरागत वाक्प्रयोगांच्या संदर्भात असंबद्ध व अप्रस्तुत वाटणाऱ्या शब्दांवर जबरीने लादलेले साहचर्य, यामुळे स्फूर्ति-लेखाला दुर्बोधता आली तरी अर्थहीनता येत नाही. उलट मनोगताचे नाजूक व अदृश्य बारकावे विशद करण्यास या अभूतपूर्व भाषांतरासारखे प्रभावी साधन वाङ्मयक्षेत्रात दुसरे कोणतेही नाही. शब्दांच्या अभिनव आणि विस्मय-जनक सहजीवनातून एक नवी सृष्टी – बुद्धीने न डागाळलेली व न हाताळलेली निर्माण होते व त्या सृष्टीतच अतिवास्तवतेचा (superior reality चा) साक्षात्कार होतो", अशी अतिवास्तवतावाद्यांची श्रद्धा प्रा. भाट्यांनी व्यक्त केली आहे.[2] अतिवास्तवता-वाद्यांच्या लेखनतंत्राचीही त्रोटक ओळख त्यांनी करून दिली आहे. आणि "गूढ मनोव्यापाराचे महत्त्व जाणून अतिवास्तववाद्यांनी त्याचा वाङ्मयीन पुरस्कार व उप-योग केला ही त्यांची कामगिरी महनीय आहे. जीवनाची गूढता व अवर्णनीयता पटवून देण्याचा अतिवास्तववाद्यांचा उपक्रम मानवी संस्कृतीच्या सद्यःपरिस्थितीत उपकारच ठरेल" अशी मते व्यक्त केली आहेत.[3] अतिवास्तवतावादी तत्त्वांची ही जीवशास्त्रीय

१. वाङ्मयीन वाद : १९४९ : पृ. ५४.
२. कित्ता : पृ. ५७–५८.
३. कित्ता : पृ. ६०.

भलावण करतानाही प्रा. भाटे यांनी अतिवास्तवतावाद्यांच्या भूमिकेत "बोधमनाचे व्यापार (conscious mind) व बुद्धीची विचारचक्रे उपेक्षणीय, असा काहीसा विकृत एकांगीपणाचा भास होतो; वास्तवतावाद्यांच्या 'वास्तवा'ची संकुचित व्याप्ती वाढविण्यासाठी गूढ मनोव्यापारांचा उपयोग करणाऱ्या अतिवास्तववाद्यांच्या पदरी एक नवीनच अवास्तवता आल्याचे दिसून येते;" असा अभिप्राय व्यक्त केला आहे,[४] तसेच वाङ्मयकलेच्या दृष्टीने अतिवास्तववादातील ढोबळ दोषस्थळ म्हणजे स्वैर लेखनतंत्र... गूढ मनाच्या स्वयंचलनावर विसंबून राहणाऱ्या अतिवास्तववाद्यांच्या लेखनात दुर्बोधता क्वचित निर्बुद्धता – संयमाचा अभाव, बेडौलपणा, इत्यादी दोषांनी घर केलेले दिसते... इतर कलावंतांप्रमाणे लेखकाने लेखनकलेची उपकरणे वापरण्याचे कौशल्य सततोद्योगाने, बुद्ध्या व जाणूनबुजून केलेल्या कसरतीने कमविले पाहिजे, लेखक शब्दाचा शिल्पकार बनला पाहिजे, या परंपरागत व अनुभवसिद्ध सिद्धांताला मान्यता दिल्याखेरीज अतिवास्तववादी वाङ्मयाला सौष्ठव येणार नाही. ते प्रामाणिक असले तरी प्रमाणबद्ध होणार नाही, असा अभिप्राय दिला आहे.[५]

हे अभिप्राय ऐतिहासिक व तात्त्विक दृष्ट्या समजण्यासारखे आहेत. पण अतिवास्तवतावादी साहित्यप्रणालीचा संदर्भ पाहिला, तर अतिवास्तवतावादी भूमिकेतील संबंधित वैशिष्ट्यांचाही अर्थ लागू शकतो. ढोबळ, त्याच त्याच निःसत्त्व सांकेतिकतेविरुद्ध आणि काल्पनिक आदर्शांच्या पोकळ स्वप्नरंजनाविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त करताना आणि बनावट सभ्यतेच्या आवरणाखाली असलेल्या पाशवी मनाचे विदारण करताना अतिवास्तवतावाद्यांची तात्त्विक भूमिका तयार झाली. या पार्श्वभूमीवर विचारग्रहणाच्या व मनोग्रहणाच्या प्रस्थापित पद्धतींच्या विरुद्ध दुसऱ्या टोकाला जाणे त्यांना आवश्यक वाटले असले पाहिजे. या एकान्तिकतेत विकृती नाही, ती एक स्वाभाविक क्रिया आहे. प्रस्थापित सांकेतिकतेत अडकलेल्या साहित्यव्यवहाराला त्यातून जागे करण्यासाठी ही टोकाची तीव्रता उपयोगी ठरली आहे. अतिवास्तवतावादी लेखनातील दुर्बोधता ही तिचा संदर्भ लक्षात घेऊनच विशद करावी लागेल. संयमाच्या अभावाचीसुद्धा हीच गोष्ट. कलावंताने उपयोजिलेल्या या उपकरणाचा संबंध त्याच्या अनुभवाशी कसा व किती संबंधित आहे, याचा विचार न करता त्यावर निर्बुद्धतेचा व बेडौलपणाचा शिक्का मारणे अन्याय्य व अयोग्य होईल. कोणत्याही विचारसरणीच्या बाष्कळ अनुकरणावर विसंबून त्या विचारसरणीला हास्यास्पद ठरविता येते. पण अनुकरण आणि अस्सल यांचा विवेक करूनच असले अभिप्राय मांडले पाहिजेत. ते विशिष्ट कृतीपुरते मर्यादित ठेवले पाहिजेत. त्यांचे सर्वसामान्य सिद्धान्तात रूपांतर करता कामा नये. हा प्रमाद काही प्रमाणात प्रा. भाटे यांच्याकडून घडला आहे. अतिवास्तवतावाद्यांचा आग्रह अनुभवाच्या सहज-

४. क्रित्ता : पृ. ६१.

५. क्रित्ता : पृ. ६२.

तीव्रतेचा आहे, (कारण त्यात सत्य व सामर्थ्य असते, असा त्यांचा दावा आहे). याला प्रतिबंधक किंवा निर्बंधक गोष्टींचा त्यांनी निषेध केला. पण आपला अनुभव व्यक्त करताना जी उपकरणे वापरायची ती कौशल्याने, निपुणतेने वापरली पाहिजेत, तरच त्या अनुभवाचा यथार्थ, अविकृत आविष्कार घडू शकतो. या गोष्टीकडे अतिवास्तवतावादी लेखकाचे दुर्लक्ष झालेले नाही. तसे दुर्लक्ष झाले असते, तर त्यांच्याकडून चैतन्ययुक्त नवी निवेदनपद्धती व शब्दसंपत्ती निर्माणच होऊ शकली नसती, किंबहुना अतिवास्तवतावादी लेखक आपल्या निवेदनपद्धतीबद्दल, वर्णनशैलीबद्दल व शब्द-भाषा-योजनेबद्दल त्यांचा आपल्या आशयाशी, निर्मितीशी सुसंवाद, मेळ, यथार्थता साधण्याच्या दृष्टीने इतरांपेक्षा अधिक जागृत व जागरूक दिसतात. यथार्थबोधाचा जास्तीत जास्त विचार करून शब्दशिल्पाचा अतिशय जागरूकतेने उपयोग करणारांमध्ये अतिवास्तवतावादी व संज्ञाप्रवाही लेखकांचा समावेश करावा लागेल. बेगडी जागरूकता व सजावट त्यांना मान्य नसली, तरी आपल्या अनुभवाच्या व्यक्तीकरणासाठी यथार्थ शब्दसंपत्तीच्या व निवेदनपद्धतीच्या निर्मितीबाबत ते विशेष जागरूक दिसतात. हे सारे संस्कार अंतः-प्रेरणेचे, बाह्य उपचारांनी न डागळलेले असले पाहिजेत. व्यक्तीकरणे ही सहजोद्भव असली पाहिजेत. तशी ती नसतील, तर त्यांचा अस्सलपणा बाधित होतो व ती सत्यापासून ढळतात. या विचारांच्या पार्श्वभूमीवर अतिवास्तवतावाद्यांच्या स्वैरलेखन-तंत्रावरचे प्रा. भाटे यांचे अभिप्राय अप्रस्तुत आणि अवास्तव ठरतात.

भाटे त्यांच्यानंतर पाश्चिमात्य विशेषतः इंग्रजी नवलेखकांच्या व टीकाकारांच्या साहित्यविषयक मतांच्या अवतरणांतून डॉ. वाळिंबे यांनी अतिवास्तवतावादासंबंधीचे विस्ताराने निरूपण केले आहे. पण तेही मूळ लेखकांच्या विचारसरणीच्या वस्तुनिष्ठ आकलनातून निष्पन्न झालेले नाही. अतिवास्तवतावाद्यांच्या प्रतिकूल टीकाकारांवर भिस्त ठेवून डॉ. वाळिंबे आपली मते बनवतात व त्या आधारावर अतिवास्तवतावाद्यांवर प्रखर टीका करतात. बुद्धी, तत्त्व, विचार यांचा अतिवास्तवतावादी विचारसरणीत साहित्यनिर्मितीशी काही संबंध नाही, असे त्यांनी बिनधोकपणे सांगितले आहे, ते याचमुळे. म्हणूनच अंतःस्फूर्तीवर बुद्धीचा, विवेकाचा कसलाही संस्कार होता कामा नये यावर अतिवास्तवतावाद्यांचा कटाक्ष आहे. सौंदर्यतत्त्वांचे संपूर्ण निराकरण ही अतिवास्तवतावाद्यांच्या प्रणालीतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, असे त्यांनी मानले आहे. विवेकशून्यता, वावदूकपणा, शब्दावडंबर या गोष्टी अतिवास्तवतावाद्यांना प्रिय असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अतिवास्तवतावादी विचारसरणी हा एक भ्रम आहे असे त्यांना वाटते. अतिवास्तवतावादासंबंधीचा हा व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोण आहे. सर हर्बर्ट रीड व आंद्र ब्रेताँ यांच्या आधारे आपण अतिवास्तवतावादाचे स्वरूप विशद करीत आहोत याची खात्री वाचकांनी बाळगावी अशी डॉ. वाळिंबे यांची अपेक्षा आहे. परंतु सर हर्बर्ट रीड किंवा आंद्र ब्रेताँ यांच्या विचारसरणीचा साक्षेपाने व अतिवास्तवतावादासंबंधी सहानुभूतीने विचार त्यांच्याकडून झाला नाही असे दिसून येते. अनेक

प्रणाली, त्यांचे प्रतिपादन व विवरण करणारे लेखक, टीकाकार, यांचा आधार घेत घेत आपण विवेचन करीत असल्यामुळे ते यथार्थ व साधार असल्याचे ते सांगतात. परंतु पाश्चिमात्य टीकाकारांच्या म्हणून मांडल्या जाणाऱ्या विवेचनात विवेचनविषयासंबंधी आपल्या प्रतिक्रिया पूर्वग्रह व मते ते अशा पद्धतीने मिसळून टाकतात की, त्यात मूळचे कोणते आणि डॉ. वाळिंब्यांच्या व्यक्तिनिष्ठ समजुतीतून उद्भवलेले कोणते यांचा नीर-क्षीरविवेक करण्यास अतिशय सावध राहावे लागते. हा सावधपणा नसला, तर प्रतिपाद्य विषयाबद्दल वाचकांची दिशाभूल करण्याचे सामर्थ्य डॉ. वाळिंबे यांच्या लेखणीत खासच आहे.

विध्वंस, विकृती, घृणा, दडपलेल्या प्रवृत्तींचा स्वैर आविष्कार, संस्कारशून्यता, असभ्यता आणि निर्बुद्धता हे अतिवास्तवतावादी प्रणालीचे आधारस्तंभ असल्याचे विरोधकांनी सांगितले आहे. सर्वसामान्यांच्या मानसात या प्रणालीची हीच प्रतिमा ठाण देऊन बसलेली आहे. या प्रतिमेचीच डागडुजी डॉ. वाळिंबे यांच्या विवेचनातून झाली आहे.

प्रा. श्री. के. क्षीरसागरांनी अतिवास्तवतावाद हा ‘ दादा ’वाद व फ्राइडचे मनो-विज्ञान यातून उद्भवल्याचे नमूद करून हे वास्तववादाचे पर्यवसान असल्याचे सांगितले आहे. अतिवास्तवतावाद्यांचा तर्कविरोध हा ‘ कलात्मक सुसंगती व रुढ संस्कृती यांच्यावर चिडून तर्कदुष्ट प्रलाप लिहून काढण्याची प्रतिज्ञा ’ होय, सबोधाची निष्फळता जाणून अबोध मनाच्या बरळण्याचा आश्रय होय[६] असे मानले आहे. प्रा. क्षीरसागरांनी ऐतिहासिक घटनाक्रम सांगितला व त्यावर आपला अभिप्राय आधारला आहे. या अभिप्रायावरच त्यांनी संज्ञाप्रवाह ही विचाराच्या मागची अवस्था मानून या अवस्थेला कलेत स्थान आहे अशी कल्पना करणे म्हणजे ‘ शुद्ध वैचारिक गोंधळ होय ’ असा निर्णय देऊन टाकला आहे.[७] ‘ फ्रेंच अतिवास्तववादी लेखकांची चळवळ कला व संस्कृती यांच्याच मुळावर उठली होती ’ असे त्यांनी नमूद केले आहे.[८] पण त्यात सांकेतिक कला व दंभावर आधारलेली प्रस्थापित संस्कृती ही विशेषणवचने घालावयाची राहून गेल्यामुळे हे अर्धसत्य, विपर्यस्त सत्य ठरले आहे. “ प्रत्येक अनुभवाला—मग तो जागृत मनाचा असो वा अर्धजागृत अबोध मनाचा असो—‘ बंध ’ असतो. ” व हा बंधच त्या अनु-भवाचे कलात्मक वैशिष्ट्य ठरविण्यास कारणीभूत होतो, याची जाणीव प्रा. क्षीरसागरांना नसावी असे दिसते. म्हणूनच संज्ञाप्रवाहाच्या नोंदी टिपल्यास त्यातून कला निष्पन्न होणार नाही, असे मत ते व्यक्त करतात.[९] प्रज्ञेला कलेत मौलिक स्थान देणाऱ्या प्रा. क्षीरसागरांना सहजस्फूर्त, साक्षात्कारी, आंतदर्शी अनुभवाचे कलेतील मोल

---

६. टीकाविवेक : १९६५ : पृ. ४२८.

७. कित्ता : पृ. ४२९.

८, ९. कित्ता पृ. ४३१.

समजू नये, हे स्वाभाविक आहे. साहित्य हे अखेर 'चित्र' असते व ते 'आनंददायक चित्र' व्हावे लागते असे म्हणताना चित्र कशाचे व ते आनंददायक कशामुळे ठरते, साहित्याची चित्ररूपता व त्या चित्ररूपतेच्या दर्शनाने होणाऱ्या आनंदाचे अन्य जीवनमूल्याव्यतिरिक्त मूल्य कोणते, वैशिष्ट्य काय, याची व्यवच्छेदक जाणीव प्रा. क्षीरसागरांनी बाळगलेली नाही. गोंधळातील परस्पर छेदकांमध्ये काही 'बंध' असतात, ते जाणवणे महत्त्वाचे असते–हा विचार त्यांना मानवत नाही. गोंधळातील संगती दाखवून देण्याचे पंतोजींचे कार्य साहित्यिकाने–कलावंताने करावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.[10] साहजिकच अतिवास्तवतावाद्यांची आत्मनिर्भर भूमिका ही त्यांना पोरकट बंडखोरी वाटते.[11] या बंडखोरीमागील अर्थ समजून घेण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. काझामियांचे मत उद्धृत केल्याने आपले मत आधारसंपन्न व पुष्ट होईल, असा विश्वास त्यांना वाटतो. पण या पद्धतीने आपल्या मनाला पोषक असे दुसरे मत सांगितल्यासारखे फक्त होते. त्यात मूळ मुद्द्याचे तर्कशुद्ध प्रतिपादन होत नाही व अतिवास्तवतावादी भूमिकेचे खंडनही होत नाही. मुद्देसूद व तर्काधिष्ठित युक्तिवादातून आपले मत सिद्ध करण्याऐवजी आपल्यासारखेच दुसऱ्या टीकाकाराचे मत समर्थनार्थ पुढे करणे म्हणजे बौद्धिक निकषाच्या विषयात संख्याप्रामाण्यावर भर देणे होय.

एखादी गोष्ट 'प्रेमाने हसतखेळत' दाखवावी की तिचा 'पोलिसाप्रमाणे पाठलाग करावा', की डॉक्टरप्रमाणे तिचे 'विच्छेदन करावे' याबद्दल सार्वत्रिक दंडक साहित्याच्या किंवा कलेच्या क्षेत्रात घालून देऊ पाहणे, कलावंताला कोणती गोष्ट कोणत्या उद्देशाने करायची आहे, याचा विचार न करता असे दंडक सांगणे, म्हणजे साहित्याच्या क्षेत्रात-कलेच्या क्षेत्रात अभिव्यक्ती व अभिव्यक्ति-पद्धती यांचा साहित्यिकाच्या कलावंतांच्या उद्देशाशी संबंध असतो या प्राथमिक प्रमेयाबद्दल अज्ञान दाखविणे होय. अतिवास्तवतावादावर आक्षेप घेताना प्रा. क्षीरसागरांनी असे केले आहे. हे त्यांनी जाणूनबुजून केलेले असावे. कारण असे करणे त्यांच्या साहित्यविषयक भूमिकेच्या समर्थनार्थ आवश्यक होते. चिडणे-चवताळणे हाही जीवनाचा एक अनुभव आहे आणि या अनुभवालाही जीवनातील सत्याचे व सौंदर्याचे 'बंध' असतात हे स्वप्नरम्यतावादाच्या आग्रही पुरस्कर्त्याला माहीत नसावे, ते त्याच्या कल्पनेच्या वा जाणिवेच्या कक्षेत येऊ नये, हे स्वाभाविकच आहे.

कसेही असो, पण अतिवास्तवतावादी प्रणालीने साहित्यविषयांचे क्षेत्र विस्तारले व वाङ्मयीन विचारात सृजनशील लेखकाच्या जीवनानुभवाचे अविकृत आविष्करण करण्याचा मार्ग मोकळा केला. भावी काळातील साहित्यनिर्मिती व साहित्यविचार यांत या ना त्या स्वरूपात अतिवास्तवतावादातील मूळ तत्त्वांचा समावेश झालेला आढळतो.

---

१०. कित्ता : पृ. ४३४.

११. कित्ता पृ. ४३३.

साहित्यनिर्मिती म्हणजे तंत्रकौशल्य किंवा कौशल्यपूर्ण मांडणी नव्हे, या प्रमेयाचे दृढी-करण करण्याचे प्राथमिक श्रेयही अतिवास्तववादी प्रणालीला आहे.

प्रस्तुत कालखंडात मराठी टीकेवर विशेष प्रभाव गाजवलेला दिसतो तो सौंदर्यवादाने. साहित्यकृती सुंदर असावी ही अपेक्षा नवी नाही. पण 'सुंदर' या पदाचे स्पष्टीकरण या काळात विवक्षित दृष्टिकोणातून केले गेले आहे. हा दृष्टिकोण आकृतिवादी आहे. हा दृष्टिकोण मराठी टीकेने व टीकाकारांनी पूर्णपणे स्वीकारला असे नाही. पण या-संबंधीची अनुकूल प्रतिकूल टीका होत राहिली व त्या अनुरोधाने साहित्याचे स्वरूप व श्रेणी हे विषय विशेष करून चर्चिले जाऊ लागले. यामुळे या कालखंडात मराठी टीकेवर सौंदर्यवादाने विशेष प्रभाव गाजवला असे मी म्हणत आहे.

आकृतिक सौंदर्यवादाचे प्रतिपादन मराठीत प्रथम बा. सी. मर्ढेकरांच्या मराठी साहित्याच्या टीकेतून झाले. एका बाजूला सामान्य जीवनातील अनुभव व त्याची परिणती आणि दुसऱ्या बाजूला कलावंताचा अनुभव व त्याची परिणती यांतील भेद विशद करीत मर्ढेकरांनी आकृतिक सौंदर्यवादाचे प्रतिपादन केले. लेखकाची भावना-नुभूती संघटनात्मक असते,[१२] कलात्मक अनुभव हा इंद्रियसंवेदनात्मक असतो, कलात्मक घटकांतील विविध घटकांची परस्परांतील सुसंगती किंवा विसंगती, अन्योन्य परिपोषकता, साम्य किंवा विरोध, त्यांची लयबद्ध प्रमाणबद्धता निर्माण करणे हे कलावंत लेखकाचे वैशिष्ट्य आहे.[१३] लेखकाच्या संघटनात्मक भावनानुभवातील भावनाघटकांचे संबंध साम्य, भेद, एकतानता, विरोध, समतोल, या तत्त्वांनी प्रेरित असतात, ज्ञानें-द्रियांच्यामार्फत येणाऱ्या अनुभवांची लयबद्ध रचना केली आणि तदनुरोधाने विधाने मांडली म्हणजे घटनांच्या सौंदर्यरूपांचे वर्णन होते.[१४] या आणि यासारख्या सूत्र-वचनांच्या विवरणातून आकृतिक सौंदर्यवादाच्या विवेचनाची पायाभरणी मर्ढेकरांनी केली आहे. ही पायाभरणी करताना कलात्मक संघटना हा अनुभव असतो व तो अविकृत स्वरूपात व्यक्त व्हावा लागतो, व त्याचे आंतरिक सामर्थ्य कलावंताच्या 'आत्मनिष्ठे'त–लेखनपूर्व व लेखनगर्भ 'आत्मनिष्ठे'त असते, हेही मर्ढेकरांनी विवरून सांगितले आहे. आपण वापरलेल्या प्रत्येक संज्ञेचे आणि पदाचे स्पष्टीकरण मर्ढेकरांनी केले आहे. मर्ढेकरांनी केलेल्या 'आत्मनिष्ठे'च्या स्पष्टीकरणाला अतिवास्तववादातील काही अंगांचा आधार आहे. स्फूर्तिकारणे, प्रेरक घटना व प्रतीके यांचे साहित्यकृतीच्या संघटनेतील स्थान व स्वरूप मर्ढेकरांनी विशद केले आहे. यांना कलाकृतीच्या घाटाशी त्यांनी अनुबंधित केले आहे.[१५]

१२. वाङ्मयीन महात्मता : १९४१ : पृ. ५४–५५.
१३. कित्ता : पृ. ३८–३९, ४९.
१४. सौंदर्य आणि साहित्य : आवृत्ति १ ली : १९५५; आवृत्ति २ री : १९६० : पृ. ४४–४६.
१५. वाङ्मयीन महात्मता : १९४१ : पृ. १२, १३, २१, २२, २३.

मर्ढेकरांनी आकृतिक सौंदर्यानुभवाच्या विशेषात ज्या इंद्रियसंवेदनात्मकतेचा, अनुभवघटकांच्या संघटनेचा, परस्पर गुंफणीचा व प्रमाणबद्धतेचा समावेश केला आहे त्यांचा स्वीकार आपल्या कलात्मकतेच्या विवेचनात श्री. प्रभाकर पाध्ये यांनीही केला.[१६] पण त्यांनी कलावंताच्या अंतःकरणात निरनिराळ्या अनुभवांची व त्यांच्या विभागांची यशस्वी गुंफण घालण्याची ही पद्धत मानली व तिला तंत्र हे नाव दिले.[१७] जगातील नानाविध दृश्यांच्या संवेदनेतून निर्माण झालेल्या अनुभवांकडे कलावंत भावानंदाच्या दृष्टीने पाहतो, जीवनात प्रत्यही येणाऱ्या अनुभवांचे विसर्जन सर्वसाधारण मनुष्य त्यांना अनुरूप अशा कृतीत करून मोकळा होतो, उलट क्रियावरोधाने या अनुभवाची उत्कटता साधून तीत रंगून जाणे, निरपेक्ष भावानंदाचा आस्वाद घेणे, हेच कलावंताला प्रिय असते, इंद्रियजन्य अनुभवात निरपेक्षपणे रंगून जाण्याची प्रवृत्ती रसिकाच्या अंतःकरणात निर्माण करण्याचे सामर्थ्य ज्या वस्तूत असते ती सुंदर वस्तू[१८] अशी आकृतिक सौंदर्यवादी विचारसरणीशी जुळतीमिळती विचारधारा मांडता मांडता श्री. प्रभाकर पाध्ये हे "मनुष्याच्या अनुभवभांडारात भर टाकून जीवनाची नवी नवी जाणीव त्याला करून देऊन नवनवोन्मेषशाली कला निसर्गाच्या या कार्यास (म्हणजे मनुष्याच्या 'जाणिवांची वाढ' करण्यास) हातभार लावीत असते, म्हणून निसर्ग विकासाच्या व्यापक दृष्टीने कलेला प्रगतिपरच म्हटले पाहिजे"[१९] अशा भौतिक (Pragmatic) मार्क्सवादी भूमिकेवर येतात. श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'संघर्षांतील जीवनगती' या सूत्रावर आधारलेल्या मार्क्सवादी साहित्यमीमांसेचा प्रतिवाद करीत आणि 'साहित्यिक हा संपूर्ण सत्य सांगतो' या श्री. अनंत काणेकरांच्या कल्पनेला विरोध करीत श्री. पाध्ये या भूमिकेवर येतात. या भूमिकेत व्यक्ती आणि वास्तव यांच्या नवनव्या संगतीतून निर्माण होणारे नवनवे साकल्य म्हणजेच नानाविध कलाकृती ही विचारधारा समाविष्ट आहे. कलाकृतीतून प्रचार होतो, तो अधिक हृदयस्पर्शी असतो, हे मार्क्सवादी प्रमेय त्यांना मान्य आहे. आपल्या नव्या भूमिकेत तर ते मानसशास्त्रीय मज्जाशास्त्रीय टीकेच्या दृष्टिकोणातून कलेला जीवशास्त्रीय प्रयोजन असते, या भूमिकेपर्यंत येऊन आकृतिक सौंदर्यवादाचे प्रखर टीकाकार बनले आहेत. 'आपल्या भावनांना कलात्मक स्वरूप देण्यापलीकडे कलावंताला अगर ललित लेखकाला दुसरी कसलीच विवंचना नसते.'[२०] ही आपली एकेकाळची, केवळ कलावादी भूमिका त्यांनी त्याज्य ठरविली आहे, असे म्हणायला हरकत नाही.

प्रा. माधव आचवल यांनीही आकृतिक सौंदर्यवादाचा स्वीकार आपल्या कलासमीक्षेत केला आहे. कलावस्तूंच्या हुबेहुब दर्शनात नाही. वास्तवाची मोडतोड व

१६, १७, १८. कलेच्छीं क्षितिजें : १९४२ : पृ. ३९–४२.

१९. कित्ता : पृ. १०७.

२०. कित्ता : पृ. ६१–६२.

पुनर्रचना कलाकृतीच्या लयतोलाच्या प्रमाणबद्धतेच्या दृष्टीने अपरिहार्य बनते. वस्तू केवल स्वरूपात पाहण्यात कलात्मकतेच्या जाणिवेचा आरंभ आहे. कलाकृतीसमोर उभे असताना ती कलाकृती एवढेच सत्य असते. त्या मागाचा इतिहास, भावना, उद्देश्य यांची जाणीव नको. कलाकृतीचे सौंदर्य प्रत्येक संवेदनांना सहजपणे जाणवते. कलाकृतीत जाणवणारे चैतन्यतत्त्व हे प्रत्यक्ष जीवनातील चैतन्यतत्त्वाहून निराळे असते. कलास्वादाचा अनुभव प्रत्यक्ष जीवनचैतन्याच्या ओघापासून मुक्त असल्यामुळे कालातीत असतो.[२१] या प्रकारची त्यांची विधाने त्यांच्या सौंदर्यवादी दृष्टिकोणाची कल्पना करण्यास समर्थ व पुरेशी आहेत. पण प्रा. आचवलही आपल्या या भूमिकेशी पुढे संवादी राहिलेले नाहीत. 'ललितसाहित्यात जीवनाच्या चैतन्याचा आभास असतो, जीवनातील व ललितकृतीतील सामान्य गोष्ट म्हणजे भावनात्मक आशय' असे विचार ते पुढे मांडू लागले.[२२]

मराठी साहित्यनिर्मितीला व समीक्षेला एक चांगले वळण लावण्याची कुवत मर्ढेकरांच्या उपपत्तीत व विचारात होती व एक विशुद्ध सौंदर्यशास्त्र त्यांच्या हातून निर्माण झाले, असा निर्वाळा प्रा. मे. पुं. रेगे यांच्यासारख्या मर्ढेकरांच्या एका प्रखर टीकाकाराने आणि मराठीतील व्यासंगी तार्किकाने व तत्त्वाचिंतकाने दिला आहे. पण मर्ढेकरांनी आपल्या उपपत्तीस सुसंगत असे तार्किक स्वरूप दिले नाही, ही त्यांची तक्रार आहे. मराठीतील सौंदर्यवादी विचारसरणीच्या गंगोत्रीतील ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी केला. (संदर्भ : सौंदर्याचे व्याकरण : १९५७.) या प्रयत्नात जी. इ. मूर यांच्या विवरणपद्धतीचा व मूल्यविचाराचा आधार घेतलेला आहे. असे विवेचन करताना 'सुंदर हे पद निरवयव आहे,' अनेक घटकांची गोळाबेरीज म्हणजे 'सुंदर' नव्हे, म्हणून 'सुंदर' या पदाचे विश्लेषण करता येत नाही, व्याख्या करता येत नाही, असा निष्कर्ष डॉ. बारलिंगे काढतात. ही भूमिका निष्पन्न करताना सौंदर्यवाचक विधान हे 'अस्तित्वविलक्षण' आहे, असे त्यांनी ठरवून टाकले आहे. पण अस्तित्वविलक्षण म्हणजे काय, याचे सुस्पष्ट विशदीकरण ते करू शकले नाहीत. 'सुंदर' म्हणजे काय, एखादी वस्तू सुंदर का व तिचा अनुभव आपणास कसा येतो, वर्णनपर विधान व सौंदर्यवाचक विधान यांच्यातील संबंधाचे स्वरूप काय, (यांच्यात संबंधच नाही, असे म्हणता येत नाही, कारण वर्णनपर विधानांवर सौंदर्यवाचक विधान आधारलेले असते, त्यापासून ते निष्पन्न होणारे असते, असे तार्किकांचे व तात्त्विकांचे मत आहे.) ते डॉ. बारलिंगे स्पष्ट करू शकले नाहीत. सौंदर्यवाचक विधान हे त्यांनी अस्तित्वविलक्षण मानल्यामुळे त्या पदाकडून एखादा गुण निर्देशित होतो, असे ते

२१. किमया : १९६५ (हे लेख 'तीन समकालीन' या लेखमालेच्या आधी 'सत्यकथे'तून प्रसिद्ध झाले. पुस्तकरूपाने ते संग्रहित झाले १९६५ मध्ये).

२२. तीन समकालीन सत्यकथा : १९५८ व १९६१.

म्हणू शकत नाहीत. अशा एका शृंगापत्तीत डॉ. बारलिंगे सापडले आहेत. त्याशिवाय हायड्रोजन व ऑक्सिजन यांची बेरीज म्हणजे पाणी नव्हे, पण यांच्या विशिष्ट संयोगाने 'पाणी' या पदाचे स्वरूप जसे सिद्ध होते, तसेच 'सुंदर' या पदाच्या कल्पित घटकांची बेरीज म्हणजे 'सुंदर' हे पद नव्हे; पण 'सुंदर' हे पद या घटकांच्या विशिष्ट संयोगातून निष्पन्न होते, या साम्य प्रक्रियेचा उपयोग डॉ. बारलिंगे करून घेत नाहीत. या सर्व घोटाळ्यामुळे जे मौलिक कार्य त्यांना अभिप्रेत होते व त्यांच्याकडून अपेक्षित होते, ते डॉ. बारलिंगे पार पाडू शकले नाहीत. त्यांच्या भूमिकेचे नीटस विश्लेषण व मूल्यमापन प्रा. मे. पुं. रेगे यांनी केले आहे. (संदर्भ : मराठी टीका : संपादक : वसंत दावतर : १९६६.)

प्रा. दि. के. बेडेकर हे मुळात मार्क्सवादी. तेव्हा, जीवनातील इतर व्यापारांप्रमाणे व अनुभवांप्रमाणे कलात्मक अनुभवही मनुष्याच्या उद्दिष्टपूर्तीच्या खांबाभोवती गोफाप्रमाणे विणले जात असतात[२३] असे त्यांनी मानणे स्वाभाविक आहे. कलावंताचा वेगळेपणा निर्मितिसामर्थ्यापुरता, इतरांपेक्षा कलावंताचे मन सामाजिक वास्तवाशी जास्त तीव्रतेने व उत्कटतेने तादात्म पावलेले असते[२४], एवढेच हे त्यांचे मत या पार्श्वभूमीला साजेसेच आहे. इतकेच नव्हे, तर कलेची मूल्ये सामाजिक आहेत, म्हणजे मानव-समाज सापेक्ष मूल्यांचाच विचार कलावंतालाही केला पाहिजे[२५], असे प्रा. बेडेकर सांगतात, ते या प्रथेला अनुसरूनच होय, असे म्हणणे प्राप्त आहे. तसेच कलावंताच्या प्रत्येक मूर्तीत त्याचे व्यक्तित्व गुंतलेले असते, म्हणजेच तिला देशकालादी मर्यादा असतात, त्या अपेक्षितच असतात[२६], वास्तव व व्यक्तित्व यांच्या द्वंद्वाची परिपूर्णता ही कलेची एक कसोटी आणि व्यक्तित्वाची उंची ही दुसरी कसोटी, व्यक्तित्वाच्या कसोटीत 'सत्य' व 'शिव' यांचा अंतर्भाव होतो, त्यामुळे कलानिर्मितीला सामाजिक परिणामाच्या दृष्टीने पुरोगामी व प्रतिगामी ठरवावे लागते[२७], ही विचारसरणी मार्क्सवादी प्रणालीशी सुसंवाद साधणारीच आहे. प्रत्येक काळातल्या, देशातल्या व वर्गातल्या कलावंताने मानवी व्यक्तित्वाची कोणती अवस्था व दशा मूर्त केली आहे ते समीक्षकांनी सांगितले पाहिजे व तसे करताना समाजाच्या विकासामध्ये प्रत्येक कलावंताचे स्थान कोणते होते हे स्पष्ट केले पाहिजे. पुरोगामी व प्रतिगामी दोन्ही तऱ्हेच्या व्यक्तित्वांची दखल घेणे, त्यांचे स्वरूप नीट संशोधित करून मांडणे, त्या व्यक्तित्वांची घडण वास्तवात, म्हणजे सामाजिक वास्तवात कशी झाली व का झाली हे शोधून

---

२३. साहित्य : निर्मिति आणि समीक्षा : आवृत्ति १ ली १९५४ : आवृत्ति २ री : १९६६. पृ. २.

२४. कित्ता : पृ. ३१.

२५. कित्ता : पृ. ४९.

२६. कित्ता : पृ. ६२.

२७. कित्ता : पृ. ६४.

काढणे, हे कलास्वरूपशास्त्राचे कार्य आहे. त्यात समीक्षकाने समाजशास्त्राशी सहकार्य करणे अपरिहार्य आहे[२८]. ही त्यांची अपेक्षा वरील प्रणालीला धरूनच आहे. हे कार्य मूलतः कलाशास्त्रीय आहे, ही त्यांची कल्पना मार्क्सवादी दृष्टिकोणाचीच परिणती आहे. अतिवास्तवतावादी साहित्य, नवकवितेतील तथाकथित 'जंतुवादी' जीवनदर्शन आणि गंगाधर गाडगिळांचा 'अनुभववाद' यांवर प्रा. बेडेकर आक्षेप घेतात तेही मार्क्सवादी भूमिकेतूनच.

पण प्रा. बेडेकरांनी प्रतिपादिलेल्या वाङ्मयीन प्रणालीची पूर्तता एवढ्यावरच नाही. तिला जीवशास्त्रीय किनारही आहे. मनुष्याचा सगळाच व्यापार (यात कलाव्यापार आला) हा वास्तवाला वांच्छित आकार देऊन स्वतःचे जीवन समृद्ध करण्याच्या अंतिम हेतूने चाललेला असतो[२९]. मनोरंजन करणे व जगण्यातला अर्थ पाहण्याची शक्ती देणे,[३०] ही प्रा. बेडेकरांची साहित्याकडून अपेक्षा आहे. ती अपेक्षा जीवशास्त्रीय म्हणावी लागेल. एकंदर मानवी जीवनाशी निगडित मूल्यांचा विचार कलाकृतीचे मोल ठरविताना करावाच लागतो,[३१] हा त्यांचा विचार मार्क्सवादी दृष्टिकोणातून अनेकमूल्यतावादाशी जवळीक करणारा आहे.

असे असूनही कलात्मकतेची प्रा. बेडेकरांना मान्य असलेली प्रणाली ही आकृतिक सौंदर्यवादाची आहे. म्हणूनच कलेची रचना ही लय, आकार साधण्यासाठी असते,[३२] कलात्मक विकल्पन म्हणजे प्रमाणबद्धता, सुसंवाद, इत्यादी कलात्मक अनुभवांचा प्रत्यय देणारी रचना. वाङ्मयीन कलाकृतीमध्ये शब्दांना, भावनांना व कल्पनांना नित्याच्या अर्थापेक्षा वेगळे कलात्मक घटकांचे नवरूप लाभते,[३३] कलात्मक कार्यकारणभाव म्हणजेच आकार, रंग, नाद, मानवी जीवनातील घटना, इत्यादी वस्तूंमध्ये कलावंताला उमजणारे संवाद, विसंवाद, व त्यांची अगणित अर्थरूपे (कलात्मक images, symbols व imagery) होत,[३४] कलावंताचे काम कोणत्याही भावनेचे व विचाराचे उद्दीपन किंवा वस्तूचे वर्णन करणे नाही असे ते सांगतात. हे सारे आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीशी जुळणारे आहे. कलाकृतीची विशिष्ट गुंफण व व्यूह यासंबंधीचे प्रा. बेडेकरांचे सारेच विवरण व प्रतिपादन हे आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीनुसार झालेले आहे. "भावनोद्दीपक रचनांना कलाकृतीचा लहान मोठा कोणताच

---

२८. कित्ता : पृ. २५.
२९. कित्ता : पृ. ५३.
३०. साहित्यविचार : १९६४ : पृ. ११५.
३१. कित्ता : पृ. १३६.
३२. साहित्य : निर्मिति आणि समीक्षा : आवृत्ति २ री : पृ. २.
३३. कित्ता : पृ. ३.
३४. साहित्यविचार : १९६४ : पृ. ५१.

दर्जा देता येणार नाही. मग उद्दीपित झालेल्या भावना सुष्ट असोत वा दुष्ट असोत.[३५] कलात्मकतेच्या संदर्भात, 'ज्याला सौंदर्यतत्त्वाचा अनुभव' किंवा 'रस' तत्त्वाचा प्रत्यय असे नव्याजुन्या समीक्षकांनी संबोधिले आहे अशा एका व्यापक तत्त्वापर्यंत पोचावे लागते.[३६]" ही सूत्रवाक्ये आणि बाहुल्यांच्या खेळातील बाहुली, नाटकातील पात्रे व प्रसंग यांची गुंफण, शंकर-पार्वतीच्या चित्राचे कॅलेंडर, घारापुरीच्या लेण्यांतील शिव-पार्वती विवाहाचे शिल्प, बुद्धिवादाचा डाव, या उदाहरणांनी कलात्मकतेसाठी तिच्यातील जीवनघटकांची व्यवहारापासून फारकत होण्याची आवश्यकता[३७] यासंबंधीचे प्रा. वेडेकरांनी केलेले प्रतिपादन आकृतिक सौंदर्यवादी दृष्टीचे द्योतक आहे. साहित्य-विचारांचे प्रतिपादन करण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या कवितांची जी विश्लेषणे केली आहेत व त्याद्वारा साहित्यकृतींचा जो गोफ व व्यूह स्पष्ट केला आहे, ते सारे आकृतिक सौंदर्य-वादी प्रणालीच्या निकषांना धरून आहे. शब्दांची ससंदर्भ अर्थप्रसरणाची शक्ती त्यांनी लक्षात घेऊन ही विश्लेषणे व स्पष्टीकरणे केली आहेत. साहित्यकृतीत शब्दांचे हे महत्त्व मर्ढेकरांच्या आकृतिक सौंदर्यवादालाही मान्य आहे. आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीच्या सगळ्याच विवेचकांना हे मान्य आहे. प्रा. वेडेकरांच्या मनात मार्क्सवादी प्रणाली व आकृतिक सौंदर्यवादी प्रणाली यांची रस्सीखेच चालली असावी.

प्रा. पु. शि. रेगे कलाकृतीतील आकृतिक संघटना व लय यांची निर्मिती व प्रक्रिया यांचा ऊहापोह आपल्या साहित्यविवेचनात करतात. त्यांची ही भूमिका आकृतिक सौंदर्यवादीच आहे. पण तिच्यात काही संस्कारवादाच्या छटा मिसळलेल्या आहेत.

प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या 'अनुभववादा'तही आकृतिक सौंदर्यवादाच्या छटा आढळतात. साहित्यात लेखकाचा अनुभव व्यक्त होतो, तो एकसंध असतो, त्याची तीन अंगे : संवेदना, भावना व विचार[३८], या अनुभवात संगीत, आकार, अर्थ असतो[३९], अनुभवाची विशिष्ट संगती निर्माण करणे हा साहित्यकृतीचा हेतू आहे[४०], कलाकृती मूल्य-निरपेक्ष असते, कलाकृतीचा अनुभव घेण्यापलीकडे अधिक कसलाच हेतू न ठेवता वाचक तिचा आस्वाद घेऊ लागला तरच ती आपले सारे रहस्य व सौंदर्य उघडे करील, सौंदर्यापासून होणारा आनंद वाचकाला देणे, सौंदर्याच्या प्रतीतीने त्याच्या अनुभवाचे विश्व संपन्न करणे एवढेच साहित्याचे कार्य असते[४१], ही आणि यासारखी विधाने त्यांच्य

३५. कित्ता : पृ. ९१.
३६. कित्ता : पृ. ९१–९२.
३७. कित्ता : पृ. ९२–९३.
३८. खडक आणि पाणी : १९६१ : पृ. ५९.
३९. कित्ता : पृ. १०.
४०. कित्ता : पृ. ३६.
४१. कित्ता : पृ. ३७.

विचारसरणीतील आकृतिक सौंदर्यवादी छटांची साक्ष देतात. पण 'अर्थ' व 'रहस्य' या संज्ञांनी सौंदर्याव्यतिरिक्त प्रा. गाडगिळांना काहीतरी सूचित करायचे आहे असे वाटते व त्यांनी निरनिराळ्या साहित्यकृतींची जी रसग्रहणे-समीक्षणे केली आहेत, ती पाहिल्यानंतर हा विचार दृढ होऊ लागतो. पण हा 'अर्थ' व हे 'रहस्य' काय ते प्रा. गाडगीळ आपल्या टीकालेखनात उलगडून दाखवू शकलेले नाहीत. त्यांना अभिप्रेत असलेल्या सौंदर्याचे किंवा सौंदर्यतत्त्वांचे विशदीकरणही ते करू शकलेले नाहीत. त्यामुळे प्रा. गाडगिळांचा 'अनुभववाद' ही काय चीज आहे, व आकृतिक सौंदर्यवादाहूनन तो कोणत्या अर्थाने कोणत्या स्वरूपामुळे भिन्न आहे, हे जाणणे वा त्याचे अनुमान करणे अशक्य आहे. पण आकृतिक सौंदर्यवादाचा विशेष परिणाम त्यांच्या साहित्यविषयक विचारसरणीवर व दृष्टिकोणावर आहे, हे त्यांना स्वतःलाही मान्य आहे.[४२]

श्री. प्रभाकर पाध्ये, प्रा. माधव आचवल, प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. पु. शि. रेगे व प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या विचारसरणीवर असलेले आकृतिक सौंदर्यवादाचे परिणाम पाहून असे म्हणावेसे वाटते की, आकृतिक सौंदर्यवाद हा या लेखातील विवेचनासाठी स्वीकारलेल्या कालखंडातील मराठी टीकेचा युगधर्म आहे. या युगधर्माचे तात्त्विक व तार्किक महत्त्व काय हे मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विचाराचे एक प्रखर टीकाकार प्रा. मे. पुं. रेगे यांच्याच दृष्टीने पाहणे मला सोईचे वाटते. प्रा. रेगे म्हणतात : ज्याला तात्त्विक सौंदर्यशास्त्र असे म्हणता येईल त्या ज्ञानशास्त्राची मराठीत सुरुवात मर्ढेकरांनी केली. असा एक सुप्त विचार मराठी समीक्षकात आढळतो की, मर्ढेकरांनी केलेली क्रांती केवळ मराठीतच नाही, तर एकंदर सौंदर्यशास्त्रातच केली आहे. मर्ढेकरांच्या या क्रांतीने मराठी साहित्यनिर्मितीला व समीक्षेला एक चांगले वळण लावले, पण दुर्दैवाने ते टिकले नाही, असे प्रा. दावतरांचे मत आहे. हे वळण लावण्याची कुवत मर्ढेकरांच्या उपपत्तीत व विचारात होती व एक विशुद्ध सौंदर्यशास्त्र त्यांच्या हातून निर्माण झाले हे मान्य केले पाहिजे. आपल्याला आवडो अथवा न आवडो, तात्त्विक सौंदर्यशास्त्र ही एक प्रस्थापित ज्ञानशाखा आहे हे आपण मान्य केले पाहिजे. मी समीक्षा करतो, म्हणजे काय करतो, हे समजावे म्हणून जे विवेचन करतो, निकष सांगतो, आपण काय करतो त्याचे समर्थन करायला जातो, तेव्हा सौंदर्यशास्त्रात येतो. आपण जे करतो त्याचे विश्वाच्या स्वरूपाशी – लयीशी संबंध जोडून समर्थन केले नाही, तर त्याला तात्त्विक सौंदर्यशास्त्र म्हणता येणार नाही.[४३] "सौंदर्यविषयक तात्त्विक उपपत्ती" हे पद जिला उद्देशून योग्य प्रकारे लावता येईल, अशी उपपत्ती मराठी साहित्यक्षेत्रात एकच आहे, आणि ती म्हणजे मर्ढेकरांची.[४४] मर्ढेकरांनी आपल्या उपपत्तीला सुसंगत असे तार्किक स्वरूप

४२. कित्ता : प्रास्ताविक.

४३. मराठी टीका : १९६६ : पृ. ८७.

४४. कित्ता : पृ. ७७.

दिले नाही. 'सुंदर' या पदाचे स्वरूप कोणते,[४५] 'सुंदर' या पदार्थांचा अर्थ काय, आणि कोणकोणत्या (प्रकारच्या) वस्तू सुंदर असतात, हे दोन प्रश्न भिन्न आहेत किंवा हे प्रश्न भिन्न नाहीत हे दाखवून मर्ढेकरांनी मीमांसा करायला हवी होती. कमीत कमी या दोन प्रश्नांतील भेद तार्किक दृष्ट्या फारसा महत्त्वाचा नाही आणि म्हणून त्याकडे दुर्लक्ष केल्याने फारशी हानी घडत नाही हे तरी पटवून द्यायचा प्रयत्न करायला हवा होता. सौंदर्यवाचक विधानाचा विचार करताना ह्यापैकी कोणतीच गोष्ट मर्ढेकरांनी केली नाही, ही त्यांच्या विचारातील एक मोठी उणीव आहे,[४६] असेही प्रा. रेगे यांनी नमूद करून ठेवले आहे. मर्ढेकरी विचारसरणीचे दुसरे एक प्रखर टीकाकार डॉ. रा. भा. पाटणकर यांना मर्ढेकरांच्या विवेचनात अनेक प्रलाप व तार्किक दोष आहेत असे वाटते आणि श्री. प्रभाकर पाध्ये यांना मर्ढेकरी सौंदर्यशास्त्रीय प्रणालीत गृहीत असलेले मनोव्यापार हे कृत्रिम व असत्य वाटतात. 'मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राने सांगाड्याची रचना समजेल, पण देहसौंदर्याची जादुगिरी उमजणार नाही.'[४७] असे श्री. पाध्ये यांना वाटते. कारण 'वाङ्मयीन महात्मता' या निबंधातील मर्ढेकरांची विचारसरणी व त्यानंतरच्या त्यांच्या सौंदर्यविषयक लेखनातील विचारसरणी यांत संगती आहे असे त्यांना वाटत नाही. किंबहुना या दोन विचारसरणी परस्पर विरोधी असल्याचे त्यांचे मत आहे. म्हणूनच ते म्हणतात की, मर्ढेकरांचा 'वाङ्मयीन महात्मता' हा निबंध धोक्याचा कंदील आहे[४८] मला मात्र असे वाटत नाही. कारण 'वाङ्मयीन महात्मता' व त्यानंतरचे 'सौंदर्य आणि साहित्य'मधील लेखन यात मला विसंवाद आढळत नाही. साहित्यकृतीतील सौंदर्यात्मस्वरूप हा अनुभव असला पाहिजे, आत्मनिष्ठ अनुभव असला पाहिजे असे म्हणणे आणि वाङ्मयीन अनुभव ही अनुभव घटकांची संघटना असते, ही संघटना लयबद्ध असते असे म्हणणे यात परस्पर विरोध वा विसंगती काहीच नाही.

मर्ढेकरांनी लयींची व कलात्मक संघटनेची जी स्पष्टीकरणे दिली आहेत त्यांच्याशी सर्वच मराठी टीकाकार सहमत नाहीत. पण 'अनुभव', 'लय' व 'संघटना' ही तत्त्वे बहुतांशी नव्या टीकाकारांनी स्वीकारलेली दिसतात. त्यांची या पदांची किंवा संज्ञांची स्पष्टीकरणे मर्ढेकरांच्या या पदांच्या स्पष्टीकरणांहून वेगळी असली वा मानली तरी तेवढ्यावरून त्यांनी आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीचा त्याग केला आहे, असे म्हणणे वास्तव ठरणार नाही. आकृतिक सौंदर्यवादी प्रणाली पायाभूत मानून त्यातील तत्त्वांची स्पष्टीकरणे आपापल्या कल्पनेप्रमाणे ते देतात, त्यांच्यातील पदांचे आपापले अर्थ विशद करतात. तेव्हा असे टीकाकार मूलतः आकृतिवादीच मानले पाहिजेत.

---

४५. कित्ता : पृ. ७९.
४६. कित्ता : पृ. ८०.
४७. कित्ता : पृ. ९४.
४८. कित्ता : पृ. ६९.

मराठी टीकालेखनात आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीबद्दल काही भ्रम कळत-नकळतपणे पोसले गेले आहेत. त्यातला एक असा की, काही टीकाकारांना आकृतिक सौंदर्यवादी टीका म्हणजे तंत्रवादी टीकाच होय असे वाटते. आकृतिक सौंदर्यवादी टीकेत शब्दांचे जे महत्त्व मानले आहे, त्यांच्या अर्थाच्या ससंदर्भ प्रसरणशीलतेवर व विविध-तेवर जो कटाक्ष आहे, त्यामुळे काही टीकाकारांना संस्कृत काव्यशास्त्रातील शब्दशक्तीवर आधारित टीकेचीच ही पुनरावृत्ती आहे असे वाटते. साहित्यकृतीतील आकृतिक बंध विशद व स्पष्ट करण्याची आकृतिक सौंदर्यवादी टीकेची जी पद्धत आहे, त्यामुळे काहींना ही टीका यांत्रिक व ठोकळेबाज वाटते. 'आशय' व आकृती ही या टीकाप्रणालीची परिभाषा मराठीत काही टीकाकार चुकीच्या संदर्भात वापरताना दिसतात. आशय म्हणजे विचार, जीवन व जीवनदृष्टी आणि आकृती म्हणजे हे व्यक्त करण्याची पद्धती असे सरधोपट समीकरण काही मराठी टीकाकारांनी केले आहे. आशय म्हणजे कलात्मक आशय आणि आकृती म्हणजे कलात्मक आकृती. कलात्मक आशय हा आकृतिबंधाचा घटक असतो; विचार, जीवन, दृष्टिकोण आदींचे कलात्मक विकल्पन झाल्याशिवाय साहित्यकृतीतील किंवा वाङ्मयातील आशय निर्माण होत नाही व आकृती म्हणजे या आशयाने परिपूर्ण केलेले कलाकृतीचे रूप, ही आशय-आकृतीसंबंधाची प्रक्रिया काही ख्यातनाम व अभ्यासू समजल्या जाणाऱ्या आणि असणाऱ्याही टीकाकारांच्या लक्षात येत नाही. या विपर्यासातूनही आकृतिक सौंदर्यवादासंबंधी भ्रम पोसले जातात. आकृतिक सौंदर्यवादी प्रणाली वाङ्मयकृतीची कलात्मकता सिद्ध करू शकेल, पण ती वाङ्मयकृतींची श्रेष्ठ-कनिष्ठता ठरवू शकणार नाही, हे मत हा आणखी एक भ्रम आहे. कलात्मक संघटनासाधनेतील यश, अपयश, अर्धयश आणि ही संघटना एकजीव होण्यासाठी त्यातील मूलघटकांचे साधे, गुंतागुंतीचे विविधधर्मस्पर्शी धागे, इत्यादींतून वाङ्मयकृतींचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरवता येणार नाही, ही समजूत भ्रामकच म्हणावी लागते. विविध अनुभवक्षेत्रात विविध अनुभवस्तरांवर लीलया विहार करू शकणारी लेखकांच्या वृत्तीची व प्रतिभेची स्थितिस्थापकता व लवचिकता कशी, किती व किती प्रमाणात साहित्यकृतीत दिसते वा प्रत्ययक्षम बनते यावरून आकृतिक सौंदर्यवादी प्रणालीच्या कक्षेतच कला-कृतीचे व कलावंताचे श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व का ठरविता येऊ नये, त्यांचा तौलनिक विचार का करता येऊ नये, त्यांच्यात क्रम लावणे का अशक्य व्हावे, ते समजत नाही.

आकृतिक सौंदर्यवाद ही एक प्रणाली आहे व कोणतीही एकच प्रणाली साहित्याचे किंवा कलेचे सारे स्वरूप विशद करू शकणार नाही, असा एक दृष्टिकोण आकृतिक सौंदर्यवादाला प्रतिरोध करण्यासाठी उदयास आला आहे.

साहित्य ही कला आहे, म्हणून साहित्याचे कलात्मक निकष हे इतर कलांतील कलात्मक निकषाशी सुसंवाद साधणारे असले पाहिजेत, हा विचार आकृतिक सौंदर्यवादी दृष्टिकोणाच्या मुळाशी आहे. याच्या उलट कोणत्याही एकाच प्रणालीच्या आधारे साहित्य-मूल्य निश्चित करता येणार नाही, असे मानणारांचा पक्ष पुढीलप्रमाणे आहे.

साहित्य हे इतर कलांच्या तुलनेने अधिक जीवनदर्शी असल्याने इतर ललित कलांहून एका महत्त्वपूर्ण दृष्टीने भिन्न आहे. साहित्यकृती तिच्या भोवती असणाऱ्या भावनिक आशयापासून अलग करणे शक्य नाही. या आशयाला चिकटून येणाऱ्या मूल्यकल्पनाही साहजिकच साहित्याच्या मूल्यमापनात येतात. साहित्य हे ज्ञानाची एक शाखा आहे आणि नैतिक व सामाजिक कार्यप्रवणतेचा एक घटकही आहे. त्यामुळे साहित्याच्या मूल्यमापनास निर्भेळ कलामूल्य पुरेसे पडत नाही, उपयुक्त ठरत नाही. वाङ्मयीन मूल्यमापनात आशयाची मूल्ये व जीवनमूल्ये अनिवार्य आहेत. ही मूल्ये सामुदायिक जीवनाचा परिपाक आहेत.

वरील दोन्ही प्रतिपाद्ये ही एकाच दृष्टिकोणाची दोन अंगे आहेत. हा दृष्टिकोण व्यापक दृष्टिकोण समजला जातो; आणि त्या तुलनेने आकृतिक सौंदर्यवादी दृष्टिकोण हा संकुचित किंवा मर्यादित, एकांगी दृष्टिकोण मानला जातो. पण काही मूलभूत तपशिलाकडे व्यापक समजल्या जाणाऱ्या या दृष्टिकोणाचे दुर्लक्ष झालेले दिसते. इतर ललितकला व साहित्यकला अभिन्न आहेत असे त्यात काही समानत्व पाहणाऱ्या आकृतिवाद्यांनाही वाटत नाही. विविध वाङ्मयकृतींतील प्रत्येक कृती ही अनन्यसाधारण असते, हे खरे. पण त्या प्रत्येकीत काही बाबतींत व काही प्रमाणात साम्य असते, असे गृहीत धरल्याखेरीज कसल्याच निकषांचा वापर अशक्य आहे. त्याप्रमाणे इतर ललितकला व साहित्यकला यांत प्राथमिक व मूलभूत असे साम्य मूलतःच काही बाबतींत व काही प्रमाणात गृहीत केल्यावाचून साहित्याला ललितकलांच्या पंक्तीत बसविणे अशक्य आहे. साहित्य हे इतर कलांच्या तुलनेने अधिक जीवनदर्शी असल्यामुळे जीवनमूल्ये साहित्यमूल्यांत अपरिहार्य मानण्याचे कारण नाही. कारण साहित्यात येणारे जीवनदर्शन जीवनातील मूल्यांच्या अनुरोधानेच येते असे नाही, ते कलात्मक वैशिष्ट्याशी प्रक्षेप साधून येते. हा प्रक्षेप किंवा प्रा. बेडेकरांचा शब्द वापरून सांगायचे तर हे 'विकल्पन' होत असताना जीवनरूपात होणाऱ्या स्थित्यंतराबरोबर त्या जीवनरूपांची सामाजिक, सामुदायिक मूल्ये आपोआपच बदलावी लागतात. जीवनाशय हा कलात्मक आशयात विकल्पित होतो, तेव्हा त्याची आशयमूल्येही बदलणे आवश्यक व अपरिहार्य ठरते. कोणत्याही प्रकारची जीवनविषयक कार्यप्रवणता-कृतिपरायणता-हे साहित्याचे प्रयोजन वा फलित न मानण्याचीच प्रवृत्ती साहित्यविचारात वाढत आहे व ही प्रवृत्ती साहित्याला जीवनव्यवहारात स्वयंपूर्ण स्थान प्राप्त करून द्यायला उपयुक्त ठरणारी आहे, साधनापलीकडे साहित्याला अस्तित्व देणारी आहे. अशा स्थितीत सामाजिक-नैतिक कार्यप्रवणतेबरोबर त्या क्षेत्रातील मूल्यांच्या कुबड्यांवर साहित्यमूल्य उभे करू पाहणे योग्य ठरणार नाही.

साहित्यविचारात इतर ललितकलाविचारांतील तत्त्वांचा आधार घेतल्याने साहित्य व इतर ललितकला या एकरूपच होत असे प्रमेय सिद्ध होत नाही. व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ (यात समाजनिष्ठ आले) जीवनार्थ, जीवनस्थिती, जीवनघटना, जीवनगती

इत्यादी आणि सामाजिक अर्थसंपन्न भाषा यांच्यातूनच साहित्य साकारते हे आकृति-वादाचा स्वीकार केल्याने अमान्य केल्यासारखे होत नाही. इतर ललितकलांचे माध्यम व साहित्याचे माध्यम ही वेगळी आहेत. त्यांचे गुणधर्म वेगळे आहेत, साहजिकच त्यांच्यातून साकारणाऱ्या कलात्मक संघटनांची वैशिष्ट्ये वेगळी असणार व या वेगळेपणानेच त्यांच्या मूल्यांचा तपशिलातला विचार व्हायला हवा, हेही आकृतिवादी दृष्टिकोणात अमान्य करण्याची गरज नाही. पण हा वेगळेपणा म्हणजे जीवनमूल्ये, आशयमूल्ये यांचा विचार होय, असे म्हणता येणार नाही. साहित्यात समाविष्ट होणारे सर्व प्रकारचे आशय, सर्व प्रकारचे जीवन, भावना इत्यादींचा साहित्यकृतीतील परस्पर-संबंध विकल्परूप वा प्रक्षेपरूप असल्यामुळे त्या विकल्पनाच्या किंवा प्रक्षेपाच्या बाहेर इतर जीवनमूल्यांचा विचार साहित्यकृतीच्या संबंधात करणे अप्रस्तुत ठरते. साहित्याचे निकष ठरविताना आणि साहित्यकृतींच्या घटकांचे विश्लेषण करताना व प्रयोजन पाहताना हे प्रस्तुताप्रस्तुत विचारार्ह ठरते. इतर अनेक मूल्ये अशा संक्रांतस्वरूपात कलात्मकतेची मूल्ये बनतात. त्यांचा आधार आकृतिक संघटना हाच असतो. म्हणून या मूल्यांचे हे संक्रांतस्वरूप आकृतिक मूल्याच्या स्वरूपाचेच असते. या विशिष्ट घटनेकडे अनेकमूल्यतेचा साहित्यविचारात पुरस्कार करणारांचे दुर्लक्ष झाले आहे.

अनेकमूल्यतावादी वाचकांच्या अनुभवाला प्राधान्य किंवा महत्त्व देतात. कोणतीही साहित्यकृती वाचताना वाचकाला जो अनुभव येतो तो त्या साहित्यकृतीत व्यक्त झालेल्या जीवनानुभवासकट कलात्मकतेचा अनुभव असतो. त्यात पहिल्याचा निरास व दुसऱ्याची संक्रांतावस्था असा प्रकार नसतो. म्हणून त्या साहित्यकृतीचा विचार करताना प्रथम निर्देशिलेल्या जीवनानुभवाचा विचारही आवश्यक ठरतो. त्यावाचून त्या साहित्यकृतीचा विचार पुरा होऊच शकत नाही, अशी ही भूमिका आहे. कोणताही अनुभव एकसंध असतो, संघातरूप असतो या ‘ गेस्टाल्ट ’ मानसशास्त्रीय प्रमेयाचा या भूमिकेला आधार आहे. पण अशी भूमिका घेताना साहित्यकृतीत लेखक ‘ सर्व काही ’ व्यक्त करीत असतो, त्यात उजवे डावे काही नसते, त्याच्या अनुभवा-विष्कारी कलात्मकतेच्या जाणिवेनुसार जीवनस्थितीची व जीवनरूपाच्या सादप्रति-सादांची पुनर्रचना नसते, असे गृहीतकृत्य आहे. साहित्यकृती हा पुनर्निर्मित ‘गेस्टाल्ट’ असतो, हे या भूमिकेत अमान्य ठरते. म्हणजे मग कलाकृती ही ‘गलका’ ठरते, सुस्थित अवस्था नव्हे.

आणखी एक विचार : साहित्य वा कला या क्षेत्रातील विचारात व समीक्षणात ज्या संज्ञा वापरल्या जातात त्या एकाच अर्थाच्या वा निश्चित अर्थाच्या नसतात आणि निरनिराळ्या विचारवंतांनी ज्या भूमिका या संज्ञांद्वारा मांडलेल्या असतात त्यांपैकी कोणतीही एक भूमिका व संज्ञेचा अर्थ त्याज्य मानता येत नाही, म्हणून हे सर्व साहित्याच्या वा कलेच्या क्षेत्रात टाकावू मानता येत नाही. हा विचारही अनेकमूल्यता-वादाचाच भाग आहे. पण इथेही विचारार्ह गोष्टीबद्दल पुरी जागरूकता दिसत नाही.

संज्ञा या नेहमी ससंदर्भार्थी असतात. संदर्भरहित अवस्थेत त्यांना निश्चित अर्थ नाही. पण ससंदर्भावस्थेत त्यांना निश्चित अर्थ असतो व तो एकच असतो. विचारवंतांनी मांडलेल्या भूमिकांचा विचार करायचा तो त्या आवश्यक व पुरेशा सर्वच गोष्टींचा समावेश करणाऱ्या आहेत की नाही या संदर्भात नाही, तर त्या अनिवार्य काय ते सांगतात की नाही या संदर्भात.

या अनिवार्याबाहेर कलाकृतीत अनंत गोष्टी असू शकतील, त्यांना मर्यादा नाहीत. त्या गोष्टी विशिष्ट कलाकृतीत किंवा विशिष्ट साहित्यात अनिवार्याचे पोषण करतात की विघटन करतात, त्यावर त्यांचे कलात्मक मूल्य ठरेल. या संदर्भाशिवाय वेगवेगळ्या भूमिकांतील प्रत्येक भूमिका स्वीकारार्ह ठरविणे, हा एक प्रकारे भोळेपणा आहे. साहित्य किंवा कला विचारातील भूमिका व मूल्ये यांना ऐच्छिक मानल्याने साहित्याच्या व कलेच्या संदर्भात चांगले, वाईट, दर्जेदार, कनिष्ठ, इत्यादी विचारांना तिलांजली देण्यासारखे होते. पण या विचाराला कुणीही कधीही तिलांजली दिलेली नाही. अगदी अनेकमूल्यतावाद्यांनीही. कलेबद्दल, साहित्याबद्दल वा कलाकृतीबद्दल जे जे बोलले–लिहिले जाते, व्यक्त केले जाते, ते केवळ वैयक्तिक आवडी-निवडीच्या स्तरावर नसते आणि वैयक्तिक आवडीनिवडीसुद्धा चर्चाविषय बनतात. या प्रक्रियेतच काही मूल्यांच्या अस्तित्वाची खूण आहे व ही मूल्ये साहित्यातील किंवा कलेतील अनिवार्यांच्या आधारांवरच ठरवावी लागतात. ती साहित्यातील किंवा कलेतील ‘ सर्वधना ’ला गवसणी घालणारी आहेत की नाहीत, हा विचार प्रस्तुत नाही. कारण या ‘ सर्वधना ’तील कित्येक गोष्टी कित्येक जीवनक्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या असतील, त्या त्या जीवनक्षेत्रात महत्त्वाच्याही असू शकतील, पण त्यांचा विचार ‘ वाङ्मयीन ’ चर्चेत वा संदर्भात करणे म्हणजे साहित्याला–सृजनशील, ललित साहित्याला त्या त्या जीवनक्षेत्राव्यतिरिक्त स्वतःचे असे स्थान, क्षेत्र नाही असे समजणे होय. असे समजण्यात साहित्याला दुय्यम लेखणे होय, त्याला इतर जीवनक्षेत्रांच्या पूर्तीचे साधन मानणे होय. साहित्याला मानवी जीवनात काही प्रधान कार्य आहे असे मानायचे असेल, तर त्याला असे दुय्यम, साधनात्मक स्थान देऊन चालणार नाही. ‘ सुंदर ’, ‘ चांगले ’ ही पदे अनेकार्थी असतात. पण त्या अनेक अर्थांतला साहित्यसापेक्ष अर्थ कोणता, याची चर्चा व निश्चिती करणे आवश्यक ठरते. निरनिराळे रसिक व टीकाकार निरनिराळ्या अर्थच्छटांची निदर्शक म्हणून ही पदे वापरतात व या पदांच्या एकाच ठिकाणच्या उपयोजनेतही निरनिराळे अर्थ व संदर्भ असतात, एवढे म्हणून व हे सारे अर्थ व संदर्भ साहित्यचर्चेत मान्य करून थांबणे म्हणजे विचाराला पायबंद घालणे होय. साहित्यनिर्मितीला कारणीभूत व साहित्यकृतीत समाविष्ट झालेले जे जे धन असेल, ते कलात्मकतेव्यतिरिक्त निरनिराळ्या विषयांच्या विचारांत मोलाचेही असू शकेल. पण प्रत्येक कृतीत ते सारे अनिवार्य नव्हे. तसेच त्याच्या भल्याबुऱ्यावर त्या त्या विषयातील भलेबुरे ठरले, तरी साहित्यकृतीतील कलात्मक किंवा वाङ्मयीन भलेपणावर त्यातून काहीच प्रकाश पडू शकत नाही, त्या

अर्थी ते अप्रस्तुत ठरते. म्हणजे विचारवंतांनी किंवा समीक्षकांनी आणि ललितलेखकांनीही मांडलेल्या भूमिकांत वाङ्मयीन दृष्टीने प्रस्तुत, अप्रस्तुत आहे. मग सारेच वाङ्मयीन म्हणून मान्य कसे करता येईल ?

जीवनमूल्यांशी घनिष्ठ संबंध राखून साहित्याच्या स्वरूपाचा व मूल्याचा विचार करणारी मराठीतील एक नवोदित प्रणाली म्हणून ' पोत ' सिद्धान्ताचा उल्लेख करावा लागेल. ' पोत ' सिद्धान्त साहित्यकृतीचा ' कलात्मक बंध ' मान्य करतो. पण या कलात्मक बंधात त्या बंधाचे घटक असे जे जीवनविशेष, त्यांचा या बंधावर परिणाम झालेला असतो व तो विचारार्ह असतो असे ' पोत ' सिद्धान्तानुसार ठरते. ' पोत ' सिद्धान्ताला मार्क्सवादी विचारधारेचा आधार आहे. कलानिर्मितीला विशिष्ट अर्थिक वर्गसमूहांच्या निष्ठांचे प्रचारयंत्र मानणारा मार्क्सवाद मात्र हा नव्हे.

चित्रकार द. ग. गोडसे यांनी हा सिद्धान्त विशद केला आहे. त्यांच्या विचारसरणीप्रमाणे कलाकृतीचे ' पोत ' ठरविणाऱ्या तीन गोष्टी. जीवनविषयक तत्त्वज्ञान, हे तत्त्व विशद करणाऱ्या जाणिवा आणि यंत्रणा. कलावंताचे जीवनविषयक तत्त्व, त्याच्या जाणिवा व त्याने वापरलेली यंत्रणा या सर्वांना ' पोत ' सिद्धान्ताप्रमाणे एक समूहसापेक्षता असते. या जीवननिष्ठांत समूहाच्या राजकीय, आर्थिक व धार्मिक जीवनाचा सारा परीघ व आशय येतो, असे ' पोत ' सिद्धान्ताच्या प्रवर्तकांचे मत आहे. जीवनाच्या सर्वांगांना व्यापणाऱ्या निष्ठांचा संदर्भ कलासमीक्षेत घेतला पाहिजे असे श्री. गोडसे यांना वाटते. निसर्गाशी सहजतेने आणि ईर्षेने एकरूप होणारा मानवसमूह हा प्राकृतिक, निकोप व कलात्मक आविष्कारांच्या बाबतीत समर्थ असतो. हाच मानवसमूह पुढे आपणच निर्माण केलेल्या आदर्शांना सांकेतिकतेचे निर्जीव रूप देतो. या संकेतावस्थेत कलेतील कृत्रिमपणा व जडता वाढत जाते व प्राकृतिक निकोप कलानिर्मितीऐवजी तंत्रमंत्राचे अवडंबर माजते व कलेची यंत्रणा जीवननिष्ठेपासून विलग होऊन मृतावशेषरूप उरते. श्री. गोडसे यांनी कलानिर्मितीच्या प्रक्रियेचे एक उथळ साधारणीकरण या सिद्धान्ताद्वारे केलेले आहे. कलेचे स्वरूप हे समकालीन समूहजीवनाशी सुसंगती साधणारे असते, ते समकालीन भौतिकतेशी नेहमी साधर्मी असते, हे यातले गृहीतकृत्य अनुभवसिद्ध नाही. तसेच, यंत्रनिविष्ट प्रक्रियेतून निर्माण होणारे विकासाचे टप्पे जसे पूर्णपणे भौतिक परिस्थितीवर अवलंबून असतात तसे कलेच्या स्थित्यन्तराचे नाहीत, हेही कलेच्या वा वाङ्मयाच्या क्षेत्रातले एक ऐतिहासिक व आनुभविक सत्य आहे. ' पोत ' सिद्धान्ताच्या प्रतिपादनासाठी श्री. गोडसे यांनी घेतलेली उदाहरणे निरपवाद नाहीत, हे वाङ्मयेतिहासज्ञांच्या सहज लक्षात येते. चित्रकार गोडसे यांच्यासारख्या कलावंतानेच या विचारप्रपंचात कलावंताला निव्वळ ' परिस्थिती 'शरण व एकसाची बनविले आहे. स्थित्यंतरात आधीच्या टप्प्याचे संपूर्ण विलगीकरण ' पटव्यवहारात ' होत असले तरी कलाव्यापारात ते तसे होते हे अनुभवसिद्ध नाही. ' पोत ' सिद्धान्ताने कलाकृतीच्या पोताचा एक नवा विचार मराठीत आणला असला, तरी त्याच्या

एकदेशीयतेमुळे तो अभ्यासकांच्या विचाराची पकड घेऊ शकलेला नाही. ही प्रणाली साहित्याच्या बाबतीत तर विशेष टीकास्पद ठरते. या प्रणालीची उभारणी चित्रकलेची तेवढी प्रक्रिया दृष्टीसमोर ठेवून केलेली आहे. ज्ञानेश्वरकालीन व रामदासकालीन काव्यातील तुरळक उदाहरणे स्पष्टीकरणासाठी व तत्त्वपरिपोषासाठी घेतलेली असली तरी ती तत्कालीन साहित्यनिर्मितीच्या स्वरूपाची व्यापक, निरपवाद व प्रातिनिधिक गमके नसल्यामुळे त्यांच्या आधारे मांडलेली विचारसरणी ठिसूळ ठरते व निराधार बनते. चित्राचा लहानसा भाग अलग पाहिला तरी सबंध चित्रातील रंग-रेषा-शैली यांचा 'पोत' जाणता येतो व त्यावरून चित्राचा कस ठरविता येतो. साहित्यकृतीचे असे नाही. तुकड्या-तुकड्यांनी जाणली, तरी साहित्यकृतीचे आकलन संपूर्ण म्हणून करावे लागते. तुकड्यांचे विशेष या आकलनाशी जुळवून घ्यावे लागतात. तुकड्यांतील विशेषांना या संपूर्ण आकलनाबाहेर, व्यतिरिक्त स्थान नाही. तसेच, चित्रासाठी वापरलेले रंग, वा अन्य साहित्य ज्या पदार्थांचे वा द्रवांचे बनलेले असते त्यांच्या गुणधर्मांचा त्या साहित्याच्या गुणधर्माशी साक्षात संबंध असतो. कारण पदार्थांचे वा द्रवांचे भौतिक गुणधर्म त्या साहित्याचे गुणधर्म ठरवितात, निश्चित करतात. साहित्यकृतीत साधन असतात शब्द. या शब्दांना भौतिक गुणधर्म नाहीत. शब्दांचे वळण व त्यांचे आकार सोडून त्यांचे गुणधर्म हे आरोपित व सामाजिक मान्यतेने निश्चित झालेले किंवा व्यक्तीच्या प्रतिभाबलाने घडवलेले. हे शब्द ज्या जीवनाचे निदर्शक असतात, त्या जीवनाच्या सांस्कृतिक-सामाजिक स्थानावर साहित्यकृतीला साहाय्यीभूत झालेल्या प्रतिजीवनाचे स्थान ठरत नाही. प्रक्षेपणात किंवा विकल्पनात सारे बदलते. त्यामुळे जी यंत्रणा चित्रनिर्मितीत प्रस्तुत ठरते, ती साहित्यनिर्मितीत प्रस्तुत ठरत नाही. यावरून 'पोत' सिद्धान्ताची एकदेशीयता, मर्यादा व वाङ्मयीन दृष्टीने अखेरीस साहित्यसंदर्भात अप्रस्तुतता सिद्ध होते.

आधुनिक काळात आणि समकालीन पाश्चिमात्य साहित्यसृष्टीत विशेष नावाजलेली पण मराठीत निर्मिती, समीक्षा आणि तत्त्वज्ञान या तीन्ही क्षेत्रांत फारशी मुळे न धरलेली अशी एक प्रणाली म्हणून अस्तित्ववादाचा उल्लेख करता येईल. अस्तित्ववादाचा मराठीतही गाजावाजा बराच आहे. पण त्याचे वैशिष्ट्य मराठीत साहित्यनिर्मितीद्वारा किंवा साहित्यसमीक्षेच्या संदर्भात विस्ताराने किंवा लक्षणीय स्वरूपात प्रकट झाले आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. तत्त्वज्ञान म्हणूनही मराठी लेखनात अस्तित्ववादाकडे नव्या-जुन्या विचारवंतांचे समग्रतेने लक्ष वेधले आहे, असेही म्हणता येणार नाही. तरीही मराठीतील वाङ्मयीन वादांचे विश्लेषण करताना अस्तित्ववादाचा विचार अजिबात टाळता येईल असे नाही. बंडखोर, संतप्त, तामसी इत्यादी नावांनी संबोधिले जाणारे मराठीतील नवे लेखक स्वतःस अस्तित्ववादाचे पाईक किंवा मराठीतील प्रतिनिधी म्हणवतात व मराठी साहित्यात सामान्यतः तसे मानले जाते. त्यांच्या काव्यलेखनातील चरणाचरणातील परस्पर असंबद्धता ही त्याचे निदर्शक म्हणून सांगितले जाते. 'कोसला' (भालचंद्र नेमाडे) ही मराठीत अस्तित्ववादाची प्राति-

निधिक कृती मानली जाते. त्यातला पांडुरंग सांगवीकर हा अस्तित्ववादी नायक समजला जातो. जीवनाच्या रामरगाड्यातून थंडपणे दूर जाणारा 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर' (भाऊ पाध्ये) हा अस्तित्ववादी नायकांचा मराठी नमुना होय, असे म्हटले जाते. इतकेच नव्हे, तर 'स्वगत' (जयवंत दळवी) हा अस्तित्ववादी कादंबरीचा एक लक्षणीय प्रयत्न, असा उल्लेखही कुणीतरी करीत असते.

हे झाले निर्मितीच्या क्षेत्रात. समीक्षाविचाराच्या दृष्टीने प्रा. अनंत काणेकर (अस्तित्ववादाचे फूल हुंगताना; नवयुग : दिवाळी १९६८.) आणि डॉ. सदा कऱ्हाडे (सार्त्र व अस्तित्ववाद : अस्मितादर्श : दिवाळी १९६९) यांनी काही तुटपुंजे विचार मांडले आहेत. तत्त्वज्ञानाच्या बाजूने श्री. विश्वास पाटील हे मुळापासून अस्तित्ववादी परंपरेची पाळेमुळे शोधणारे विस्तृत विवेचन करीत आहेत. (नवी क्षितिजे : जानेवारी, एप्रिल, जुलै, आक्टोबर १९६९ व जानेवारी १९७०) श्री. पाटील यांचा प्रयत्न पूर्णतः तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातला आहे व त्यानुसार खिस्तपूर्व काळातही अस्तित्ववादाची मूलतत्त्वे पाहता येतात. प्रा. रा. ग. जाधव हे अस्तित्ववादी मनोवृत्तीचे वर्णनात्मक स्थूल निरूपण करतात. अस्तित्ववादाचे मूळ, इतिहास व तात्त्विक परंपरा, कोणतीही असो, पण बुद्धीच्या पराजयात अस्तित्ववादाची प्रेरणा आहे हे कुठल्याही परंपरेला नाकारता येणार नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर संवेदनाक्षम माणसाला जाणवणारा जीवनातील पराभूतपणा, हताशपणा, एकाकीपणा आणि सृष्टी व जीवनघटनांतील आपली दुर्बलता व दूरता हे समकालीन जीवनदर्शन ही वाङ्मयातील अस्तित्ववादाची पार्श्वभूमी आहे. प्राप्त परिस्थितीत समकालीन जीवनरहाटीत माणसाच्या स्वातंत्र्याची आणि आत्मनिर्भर मानवी मूल्यांची होणारी ससेहोलपट व जाळणूक, ही अस्तित्ववादी साहित्याची व विचारसरणीची आधारभूमी आहे. साहजिकच आपण काही घडवितो वा घडविणार अशी धारणा बाळगणारा किंवा जोपासणारा नायक अस्तित्ववादी साहित्यधारेत तत्त्वतःच निर्माण होऊ शकत नाही. कृती आणि अ-कृती या दोन्ही बाबतींत निरपेक्ष, तटस्थ राहणारा व तरीही जीवनचक्रात जगणारा मानव या साहित्यधारेत आढळतो. त्याची जीवनस्पंदने (खरे म्हणजे अस्पंदने) हा अस्तित्ववादी दृष्टीने साहित्याचा विषय बनतो. तर्क-अ-संगत जीवनघटना हा अस्तित्ववादी आविष्काराचा कणा आहे. म्हणून वास्तवाच्या चित्रणात तार्किक वर्गीकरण व पृथक्करण नसावे, ही अस्तित्ववादी अपेक्षा आहे. स्वेच्छेने स्वतःच्या व्यक्तित्वाला आकार देणे पराधीन राहते. जीवनघटनेत व सृष्टिघटनेत स्वातंत्र्याला स्थान नाही. मानवाच्या संकल्पित अस्तित्वनिर्मितीला, म्हणजे स्वातंत्र्याला हतबलता येते. या हतबलतेतून विज्ञानाने, यंत्राने व तंत्रविज्ञानाने मानवाला मुक्त करावे, तर याच गोष्टी मानवाला आणखी बांधून टाकतात, संवेदनाशून्य बनवतात, हाच अस्तित्वावरचा आघात होय. या चिंतेने धास्तावलेले मन व जीवन हे अस्तित्ववादी दृष्टीने साहित्याचे संचारक्षेत्र ठरले आहे. यातून एकाकीपणा, आशयहीनतेची भावना, रितेपणा, आत्मदूरता, ही आविष्कारमूल्ये ठरली आहेत. मृत्यूची जाणीव व

भीती सर्व चिंताविषयात मूलगामी ठरते, पण यातून सुटका म्हणून धार्मिक-नैतिक आध्यात्मवादी किंवा स्टॉइकपंथीय यांपैकी कोणतीच दृष्टी अस्तित्ववाद स्वीकारू शकत नाही. भौतिकवादाने मानवी बुद्धीचा व भावनेचा निरास केला आहे. म्हणून बंधन आणि दूरता यांतून मुक्त होण्यासाठी भौतिकवादाची कास अस्तित्ववादाला धरता येत नाही. (पण या तिन्ही मार्गांनी किंवा यांपैकी कोणत्यातरी एका मार्गाने अस्तित्ववादी लेखक व त्याचे नायक जाताना दिसतात.) हा पेच आणि हे प्रारब्ध हा अस्तित्ववादाच्या दृष्टीने साहित्याचा मानदंड ठरतो. निष्क्रीयता ही विकृती ठरते आणि सक्रीयता वास्तवतः व तत्त्वतः हताशतेकडे नेते. या साऱ्या प्रारब्धाचे चित्रण हे 'वास्तव' ठरते, हे अस्तित्ववादाचे वाङ्मयीन मूल्य बनते. या दृष्टीने अस्तित्ववाद ही अतिवास्तववादाच्या नंतरची पायरी ठरते. भूत-भविष्याशी संबंधित नसणारे 'प्राप्त क्षणाचे वास्तव' व तेही वरील स्वरूपात हे अस्तित्ववादाला चिंतनीय, मननीय व दर्शनीय ठरते. असे हे आदि-अंतापासून तुटलेले वास्तव अस्तित्ववादी प्रणालीत मध्यवर्ती बनते. या वास्तवात जगताना कसलेच सारतत्त्व वा चैतन्यतत्त्व उपयोगी पडत नाही, मार्गदर्शक होत नाही, अस्तित्वात येत नाही. म्हणून जीवनघटनांना बांधणारे, सुसूत्र करणारे, सुसंगत करणारे तत्त्व अस्तित्ववादात अस्तित्वातच नाही. या अभावात जिवंतपणा, प्रवाहीपणा आहे, हे अस्तित्ववादाचे एक प्रतिपादन आहे.

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानातील जीवनाभिमुख दर्शनाचा वाङ्मयीन अन्वय साधण्याऐवजी निदान मराठीत तरी अस्तित्ववादी जीवनदृष्टी व मनोवृत्ती यांचे विश्लेषण करण्याचाच प्रयत्न होताना दिसतो. यातही समज-अपसमज यांचे रान आहेच. (अपवाद श्री. विश्वास पाटलांचे लेख.) श्री. विश्वास पाटलांनी अस्तित्ववादाचे तत्त्वज्ञानात्मक दर्शन घडविणारे विवेचन करताना अस्तित्व आणि अस्तित्ववादी प्रमेये यांचे अर्थपूर्ण विश्लेषण केले आहे. पण अनेक तात्त्विक परंपरा व उपपत्ती आणि त्यांचे अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाशी असणारे परस्पर संबंध विशद करण्याकडे त्यांचे लक्ष असल्यामुळे वाङ्मयीन दृष्टिकोण म्हणून अस्तित्ववादाचा अन्वयार्थ लावणे वा पाहणे त्यांच्या विषयकक्षेत येत नसावे. प्रा. काणेकरांनी अस्तित्ववादाचे वाङ्मयीन दर्शन घडविण्याचा पवित्रा घेतला आहे, पण अस्तित्ववादी मनोधर्माचा उलगडा व त्याचे मराठी संदर्भ निर्देशित करण्यापलीकडे एक वाङ्मयीन दृष्टिकोण म्हणून त्यांनी आपल्या लेखात विवेचनाला प्रारंभही केला नाही. 'स्वातंत्र्य', 'अस्तित्व' व 'सारतत्त्व' म्हणजे काय याचा अस्तित्ववादी संदर्भ त्रोटकपणाने का होईना, पण त्यांनी नेमका सांगितला आहे. पण आरंभीच मार्गी लागलेल्या गाडीने रूळ पुढे बदलले. बुद्धिप्रामाण्य, तर्कशुद्ध विचारसरणी यांनी विश्वाचे काही प्रश्न सुटले, तरी विश्वाच्या अनंत गूढ शक्तींचा अंतिम उलगडा या पद्धतीने होऊ शकत नाही या प्रतिक्रियेचा परिपाक अस्तित्ववादात आला असे प्रा. काणेकर सांगतात. अस्तित्ववादी विचारसरणीचाच भाग म्हणून 'जीवनाचा किंवा मृत्यूचा अर्थच लागत नाही, तेव्हा मृत्यूला असाहाय्यपणे शरण जाण्यापेक्षा

जाणूनबुजून आत्महत्या करणे बरे' असे ते कामूचे म्हणून मत सांगतात.[४९] पण मृत्यूने शरीराच्या वेदना संपल्या तरी मनोव्यथा संपत नाहीत, म्हणून स्टॉईक पंथीय आत्महत्येचा मार्ग अस्तित्ववाद्यांना मोकळा नाही. (काही अस्तित्ववादी व्यक्तींचा आत्महत्येच्या बाजूने कल असला, किंवा अशा आत्महत्या क्वचित घडत असल्या तरी) हे तात्त्विक सत्य प्रा. काणेकरांनी दुर्लक्षिले आहे. तार्किक आणि प्रत्यक्ष यांच्यातील विसंवाद, असंगती आणि दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेली परिस्थिती यांचा अस्तित्ववादी विचारसरणीच्या विकासात जो भाग आहे, त्याचे महत्त्व प्रा. काणेकरांनी लक्षात घेतलेले दिसत नाही. यंत्रयुगाने मानवाला गुलाम बनवले, अधिक बंधनात टाकले, यंत्र बनविले, तो गुदमरलेला (Solidaire) आणि एकाकी (Solitaire) असा बनला. यातून त्याचे दूरत्व निर्माण झाले. या अस्तित्ववादी तत्त्वज्ञानातील ठळक गोष्टी प्रा. काणेकरांनी लक्षात न घेता 'यंत्रयुगात माणसाची माणसापासून म्हणजे मानवतेपासून किंवा समाजापासून फारकत झाली[५०]' असा फारच सोपपत्तिक अर्थ अस्तित्ववादातील आत्मदूरत्वाचा केला आहे. याच सोपपत्तिक दृष्टीने मग त्यांना बालकवी, केशवसुत, यांच्या गूढ वादात, दुःखवादात अस्तित्ववादाच्या छटा सापडतात.[५१] याच सोपपत्तिक पद्धतीने प्रा. काणेकर समाजाभिमुख क्रांतिकारक आणि कळत-नकळत जीवनाची परिपूर्तता किंवा सत्त्वनिर्मिती करणारे[५२] असे अस्तित्ववाद्यांचे वर्ग करतात. पश्चिमात्य अस्तित्ववादी लेखक अनेक थरांवर वैयक्तिक व सामाजिक जीवन जगले. या जगलेल्या जीवनाच्या संदर्भात किंवा त्या अनुषंगाने त्यांनी कधी प्रक्षोभक, तर कधी जीवनाचा तळ घुसळून टाकणारे साहित्य निर्माण केले. पण जगाला किंवा मानवाला सुधारण्याची क्षमता आपल्यात आहे व हे कार्य करणे ही आपली भूमिका आहे, अशी विचारसरणी लेखक म्हणून किंवा अस्तित्ववादी तत्त्वचिंतक म्हणून त्यांनी स्वीकारलेली नाही. त्यांच्या साहित्याचे विश्लेषण व ग्रहण या पार्श्वभूमीवर करणे अवश्य आहे, हा दंडक प्रा. काणेकर मानीत नसावेत.

वाङ्मयातील वाद म्हणून सार्त्र आणि अस्तित्ववाद यांचा विचार करण्याचा संकल्प डॉ. कऱ्हाडे करतात. एक तत्त्वज्ञान, यापेक्षा एक तात्त्विक प्रवृत्ती या दृष्टीने अस्तित्ववादाचे महत्त्व त्यांना अधिक वाटते. या स्वतःला अभिप्रेत असलेल्या अस्तित्ववादाची तत्त्वसूत्री सरळ विशद करण्याऐवजी ते अस्तित्ववाद वाङ्मयात का आला, कोणत्या प्रणालींच्या पराभवातून वा असमाधानातून वाङ्मयात अस्तित्ववादाचा आश्रय घेतला गेला, याचा प्रपंच मांडतात. निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनी मांडलेल्या अस्तित्ववादी भूमिकांचे चार-सहा ओळींत ते श्राद्ध करतात. अस्तित्ववादाची तात्त्विक भूमिका जाणून घेण्यातही डॉ. कऱ्हाडे यांची गफलत झाली आहे, असे दिसते. अस्तित्ववादी फक्त

४९, ५०. अस्तित्ववादाचे फूल हुंगताना : नवयुग–दिवाळी : १९६८ : पृ. १९.
५१. कित्ता : पृ. २०, २१.
५२. कित्ता पृ. २१.

माणसाचे निरीक्षण करतात, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे, यातील ‘ समाजशील ’-तेतील ‘ स्वभाव ’ अर्थ अस्तित्ववादाला मान्य नाही, मनुष्य हा अमूर्त वस्तू म्हणून त्याचा विचार करता येईल, इत्यादी वचने या गफलतीची निदर्शक वाटतात. अस्तित्व-वाद काय मानतो, काय मानीत नाही, अस्तित्ववादाची पार्श्वभूमी काय, हे सांगताना मला वाटते डॉ. कऱ्हाड्यांनी अतिवास्तवतावाद आणि अस्तित्ववाद यांची गल्लत केली आहे. म्हणूनच ते, “ अंतःकरणप्रवृत्तीतच मनुष्यस्वभावाचे स्वरूप प्रकट होते हा अस्तित्ववादाचा विश्वास, मानवी संस्कृतीचा जिवंत झरा अंतःकरणप्रवृत्तीतच आहे, माण-चासा विकास व व्यक्तित्वाचे पोषण त्यावरच ‘ अवलंबून ’ आहे, ही अस्तित्ववादाची श्रद्धा, म्हणून ‘ अनिरुद्ध मानसिक आत्मचालना ’ला अस्तित्ववादात प्राधान्य मिळाले. बुद्धीच्या यांत्रिक चक्रात मनोगताचा चुराडा होतो, म्हणून बुद्धीचे निर्बंध दूर करून केवळ निर्लेप मनोगताचा मागोवा काढणे हेच साध्य अस्तित्ववादाने मानले, ” असे लिहून जातात.[५३] म्हणूनच या पार्श्वभूमीवर दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत ‘ अस्तित्व वाद थिटा पडला ’ असा अनैतिहासिक निष्कर्ष ते काढतात. इतके करूनही याच दमात या परिस्थितीत मानवाच्या असण्याचा अर्थ अस्तित्ववादच देऊ शकला असता, म्हणून सार्त्र अस्तित्ववादी वाङ्मयाकडे वळला, असे सांगून टाकतात. प्राप्त परिस्थितीतील एक गरज म्हणून सार्त्रचा अस्तित्ववाद वाङ्मयात आला[५४] असे सांगून त्यांनी अस्तित्व-वादाच्या मूलगामी तात्त्विक प्रणालीकडे कानाडोळा केला आहे. परिस्थितिजन्य जीवनाच्या चिंतनातून अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाला उजाळा आला, तत्त्ववादी वाङ्मय या उजाळ्यातून निर्माण झाले, हा झाला इतिहास. पण अस्तित्ववादाचा जीवनविषयक दृष्टिकोण काय, त्या दृष्टिकोणाची तात्त्विक मूल्ये कोणती, जीवनानुभवाचे स्वरूप, त्याची आविष्कारपद्धती यासंबंधीची अस्तित्ववादाची भूमिका काय, मानवाच्या जीवनशक्ती आणि विश्वाच्या जीवनशक्ती यांचा परस्पर संबंध काय आणि त्यांना कारणीभूत असलेली समकालीन संस्कृती व जीवनरीती इत्यादी तात्त्विक विचार टाळून वाङ्मयात दिसणाऱ्या अस्तित्ववादाचे ताण आणि पोत यांचा ऊहापोह करणे शक्य आहे का? याची समाधानकारक उत्तरे प्रा. कऱ्हाडे यांच्या विवेचनातून मिळत नाहीत. म्हणूनच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अस्तित्ववाद आणि वाङ्मयातील अस्तित्ववाद यांत डॉ. कऱ्हाडे यांनी कल्पिलेली भिन्नता स्पष्ट झालेली नाही. वाङ्मयातील अस्तित्ववादाचे स्वरूप विशद करण्याचा संकल्प करूनही त्यांनी तो विषय अस्पृष्टच ठेवला आहे. म्हणजे धड तत्त्वज्ञान म्हणूनही डॉ. कऱ्हाडे अस्तित्ववादाचा ऊहापोह करीत नाहीत (कारण त्यांना तो वाङ्मयीन संदर्भात आवश्यक वाटत नाही.) आणि वाङ्मयीन वाद म्हणूनही ते अस्तित्ववादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करीत नाहीत.

५३. सार्त्र आणि अस्तित्ववाद : अस्मितादर्श-दिवाळी : १९६९ : पृ. १३६.
५४. कित्ता : पृ. १४०.

तात्पर्य, मराठीत अस्तित्ववादाची वाङ्मयीन चर्चा म्हणण्यासारखी झालेली नाही.

जिचा विचार मराठीत अतिशय तुटपुंजा व अपुरा झाला आहे, अशी एक साहित्यप्रणाली म्हणून अध्यात्मवादी टीकेचा उल्लेख करता येईल. भक्ती, परमेश्वररूपाचा साक्षात्कार आणि ऐहिक जीवनमरणाच्या फेऱ्यातून मुक्ती, ही सर्वोच्च जीवनमूल्ये मराठी संतांनी मानली. त्यानुसार नियमित जीवनातून होणारा निःश्रेयस आनंद – पारलौकिक आनंद हे जीवितसाफल्य मानून काव्याचे गट प्राचीन मराठी कवींनी केले. या जीवननिष्ठेनुसार काव्य, काव्याविष्कार व काव्याचा दर्जा ठरविणारी मूल्येही त्यांनी सांगितली. धीट, पाठ, प्रासादिक अशी काव्याची वर्गवारीही त्यांच्यापैकी क्वचित एखाद्याने केली. पण या सर्व आनुषंगिक विचारांतून एखादी काव्यप्रणाली किंवा वाङ्मयीन वाद निर्माण झाला नाही. जीवनमूल्य आणि साहित्याचे स्वरूप व कार्य यांचा अन्योन्याश्रयी विचार या पार्श्वभूमीवर झाला नाही. साहित्याचे स्वरूप व साध्य यांचा या पायावर सुसंवादी मेळ घालणारी विचारसरणी प्राचीन वा मध्ययुगीन मराठी कवींनी आणि प्रज्ञावंतांनी जन्मास घातली नाही. वाणीचे, शब्दाचे, शारदेचे महत्त्व त्यांनी भावपूर्णतेने सांगितले. पण या जीवनप्रक्रियेचे तत्त्वज्ञान त्यांनी निर्माण केले नाही. त्यांच्या अंगीकृत कार्यात त्यांना तशी आवश्यकताही वाटली नाही.

आधुनिक काळात निरनिराळ्या पाश्चिमात्य विचारसरणीच्या चिंतनाला नव्या जीवनसंदर्भात स्वाभाविकच प्राधान्य मिळाल्यामुळे आध्यात्मिक प्रेरणेनुसार साहित्याचा विचार होऊ शकला नाही. अशा पार्श्वभूमीवर आणि परिस्थितीत या प्रणालीचा काहीसा जाणीवपूर्वक ऊहापोह आढळतो तो सुप्रसिद्ध कन्नड कवी व विचारवंत प्रा. द. रा. बेंद्रे यांच्या लेखनात.

साहित्य आणि तत्त्वज्ञान यांच्या परस्पर संबंधांचे व परस्पर समन्वयाच्या आवश्यकतेचे प्रश्न टाळण्यासारखे नाहीत, या भूमिकेतून प्रा. बेंद्रे यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या दृष्टीने तत्त्वज्ञान हे साहित्याचे अंतर्गत संजीवन आहे. साहित्यातील तत्त्वज्ञान हे त्याचे अंगभूत असते. या संजीवनाने साहित्याने आपल्याला नवीन केले पाहिजे, आपल्या रूपनावीन्याहून वरचढ असा आविष्कार केला पाहिजे,[५५] हा त्यांचा अभिप्राय आहे. कवीची कृतार्थता आणि जीवनाची कृतार्थता यात प्रा. बेंद्रे वेगळेपणा मानीत नाहीत.[५६] मानवी जीवनातील कलासृष्टीची खैरात ही त्याहून रम्य असू शकणाऱ्या जीवनाची पार्श्वभूमी आहे अशी प्रा. बेंद्रे यांची श्रद्धा आहे.

दैवी संपत्ती प्राप्त करून घेण्याचा एक कलात्मक कर्मयोग या दृष्टीने प्रा. बेंद्रे साहित्याकडे बघतात.[५७] तत्त्वज्ञान पांगळे आहे, विज्ञान आंधळे आहे, मतधर्म परस्पर

५५. संवाद : १९६५ : पृ. ३/४.

५६. कित्ता : पृ. ७, ८.

५७. कित्ता : पृ. २१.

दुष्टभाव आहेत, म्हणून केवळ मानवी हृदयावर भिस्त ठेवून रसपुरुषाची आराधना साहित्य करते, असा प्रा. बेंद्रे यांचा दृष्टिकोण आहे. साहित्य ही सहानुभूतिजन्य स्वानुभूती आहे,[५८] हे सिद्धान्तवचन त्यांच्या दृष्टिकोणाची यथार्थतेने कल्पना आणून देणारे आहे. आपणा प्रत्येकात प्राणकेंद्र, हृदयकेंद्र व बुद्धिकेंद्र अशी तीन केंद्रे आहेत. प्राणकेंद्रात साधुत्व व सामर्थ्य एकत्र आणावयाची आहेत. त्यांचा स्थायीभाव, सहभाव व सहनभाव आहे. हृदयकेंद्रात सौंदर्य व आनंद एकत्र आणावयाची आहेत. सौंदर्याचा सहचर केवळ आनंद आहे आणि आनंदाच्या अनुभवात रसिकता असते. बुद्धिकेंद्रात सत्य व प्रीती यांची सांगड घालावयाची आहे. कलेच्या साहाय्याने ही तिन्ही केंद्रे संपन्न करण्याची धडपड युगायुगातून चाललेली आहे, ही प्रा. बेंद्रे यांची चिकित्सा आहे.[५९] या चिकित्सेनुसार ते सांगतात की, 'या तीनही केंद्रांतून आपण एकवटू पाहिलेल्या साधुत्व-सामर्थ्य, सौंदर्य-आनंद आणि सत्य-प्रीती या सहाही मूल्यतत्त्वांची बरोबर वाढ झाली पाहिजे, तरच जीवनाच्या महा नाटकाचा योग्य परिपोष होऊन आपली चित्तपरिणती व्हावी या अपेक्षेने प्राचीन काळापासून आपण साहित्य वाढवीत आलो त्याची सार्थकता होईल व वागर्थ साहित्य (सहितता) शिवशक्ती संयोगाइतकेच प्रभावशाली होईल.[६०]

जीवनातील कोणत्याही सत्याचा तिरस्कार कवी करीत नाही. सुखदुःखाचे पर्याय तो सारख्याच आपलेपणाने स्वीकारतो आणि त्या सर्वांनी मिळून रम्य रचना करून दाखवितो. कलावंताची सुकृती रमणीय असल्याने ती रसिकास उपभोगक्षम होते. त्याच्या मांडणीतील रम्यतेस रसिकामधील आनंदाच्या आविष्काराने उत्तर मिळते. कविनिर्मित रम्याशी आनंदाने समरस होण्यासाठी त्याचे हृदय उन्मीलित होते. प्राणकेंद्रातील शिवत्व-सामर्थ्ययुक्त स्थितीस 'सृष्टिस्वरूप' म्हटले, तर हृदयकेंद्रातील सौंदर्याच्या आनंदाने केलेल्या स्वागतास 'स्थितिस्वरूप' म्हणता येईल. नाटकातील दैव-पौरुषाचा संघर्ष पाहून आपण सत्यदर्शनक्षम होतो. इतकेच नव्हे, तर सत्यप्रीती आपणात बाणते–सत्य-प्रीतिसंगमाच्या या स्थितीस 'लयस्वरूप'[६१] म्हणता येईल. अशी साहित्यान्तर्गत तीन स्थितींची प्रा. बेंद्रेप्रणीत मीमांसा आहे. या प्रक्रियेने जीवनातील पुरुषार्थाची निर्मिती साहित्यनिर्मितीत दृग्गोचर होणे आवश्यक असल्याचे प्रा. बेंद्रे मानतात. जीवनातील सात्त्विक भाव जागृत होण्यासाठी कलेचा-साहित्याचा हा प्रपंच आहे, अशी प्रा. बेंद्रे यांची धारणा आहे.

विराटपुरुषाशी इतर पुरुषांची सतत देवाण-घेवाण होत असल्याची प्रतीती[६२] ही

५८. कित्ता : पृ. ३९.
५९. कित्ता : पृ. ५१.
६० कित्ता : पृ. ५२.
६१. कित्ता : पृ. ५५, ५६.
६२. कित्ता : पृ. १५४.

साहित्यातील अनुभवाची जात आहे. सत्त्व, ईश, ईश्वर व पुरुषोत्तम या चतुर्मुख ऐक्याची महती[६३] प्रकट करणे हे साहित्याचे रहस्य आहे. कलांची सिद्धी योगात, जीवन परिणतीच्या रसायनात आहे.[६४] कला जीवनाची उकल करते, गुंतागुंत सोडविते.[६५] 'विश्वरूपदर्शन' आणि 'कलारूपदर्शन' यांत साम्य आहे.[६६] कला हे प्रजेच्या सहजीवनाच्या निर्मितीचे साधन आहे.[६७] कलेद्वारा भावजागृती, भावजागृतीद्वारा रस-परिणती, रसपरिणतीद्वारा चित्तप्रसाद व चित्तप्रसादद्वारा सत्त्वजागृती ही कलानुभवाची सोपानपरंपरा आहे.[६८] ही परंपरा पार करताच साहित्यकृतीतील सुखित पात्रांचे सुख पाहून त्यांच्याशी सौहार्द जोडू पाहणे, दुःखित पात्रांचे दुःख पाहून त्यांच्याविषयी करुणेने मन भरून येणे, पुण्यवानांची महत्कार्ये पाहून त्यांच्याविषयी मन सश्रद्ध राखणे, दुष्टांचा दुष्टावा अज्ञानाने निर्माण झाला आहे असे मानून त्यांच्याबद्दल 'मध्यस्थभाव' बाळगणे, ही साहित्यास्वादाची प्रक्रिया प्रा. बेंद्रे यांनी सांगितली आहे.[६९]

प्रा. बेंद्रे यांच्या विचारसरणीशी वाचक संपूर्णपणे असंमत होऊ शकतो. त्यांनी जीवनानुभवात साहित्यानुभवाची कक्षा सुनिश्चित केलेला नाही, असे म्हणू शकतो. पण त्यांना एक सुसूत्र, सुसंवादी दृष्टी आहे. त्या दृष्टीनुसार साहित्याच्या घटकांची परस्पर-संबद्ध मांडणी त्यांनी केली आहे, हे मान्य करावे लागेल. ही कक्षा-अभाव व निगूढता आधुनिक संदर्भात साहित्याचे क्षेत्र रेखीव करणारी नाही.

आध्यात्मवादी प्रणालीच्या अधिष्ठानाचा संकल्प करणारी मराठीतील आणखी समीक्षा प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या 'अंधारयात्रे'त आहे. पण ती संकल्पापुरतीच राहिली आहे. प्रा. सरदेशमुखांच्या प्रतिपादनात प्रा. बेंद्रयांची सुस्पष्टता व सुसूत्र संगती नाही. याचे एक कारण असे संभवते की, प्रा. सरदेशमुखांनी 'अंतरंगाच्या अधिकारा'ची भाषा वापरता वापरता आध्यात्मवादी प्रणालीच्या गृहीतकृत्यांची वाट सोडून काही प्रमाणात अस्तित्ववादी प्रणालीच्या गृहीतकृत्यांचा अंगीकार केल्याचा भास होतो. पण त्या प्रणालीचा स्वीकारही त्यांनी सातत्याने व संपूर्णपणे केलेला दिसत नाही. आधुनिक काळातील अग्रेसर मराठी कवीच्या काव्यामागील भावस्थितीचे विश्लेषण करताना ते अस्तित्ववादी दृष्टिकोणा-तील प्राथमिक गोष्टी स्वीकारतात असे वाटते, पण दुसऱ्या बाजूस प्रमेयास झोंबणे, सुकुमार संवेदनांनी कंपित होणारा जिव्हाळा, प्रीती आणि मांगल्याची ओढ, दिव्यरसी

६३. कित्ता : पृ. १३४
६४. कित्ता : पृ. ३०.
६५. कित्ता : पृ. ३४.
६६. कित्ता : पृ. ३५.
६७. कित्ता : पृ. ४०.
६८. कित्ता : पृ. ४८.
६९. कित्ता : पृ. ३९.

विरणे, अम्लानसुंदरता, आकाशाचा पाझर गाठणे, या प्रतीकसृष्टीत ते रममाण होतात. कवीचा वेगवेगळा प्रकृतिधर्म भावनानुभूतीत असतो हे त्यांना मान्य आहे. पण जीवनातील पौरुषार्थाच्या परिपोषाकडे या प्रकृतिधर्माची आध्यात्मवादी वाटचाल त्यांना मान्य नसावी असे वाटते. तरी 'चैतन्य' तत्त्व हे कलेचे मूलतत्त्व असल्याचे ते आग्रहाने सांगतात. पण प्रा. बेंद्रयांची 'लयस्वरूपाची' मीमांसा प्रा. सरदेशमुख यांना मान्य आहे असेही दिसत नाही. कवितेने जीवनरहस्याच्या सन्मुख उभे राहण्याची कल्पना प्रा. सरदेशमुखांना मान्य असावी, पण या सन्मुखतेची परिणती सात्त्विकतेत होण्याची प्रक्रिया त्यांना तितकीशी ग्राह्य आहे असे दिसत नाही. धड आध्यात्मवादी टीकादृष्टी नाही, धड अस्तित्ववादी दृष्टिकोण नाही आणि या दोहोंच्या संकरातून निर्माण होणारी 'नवी' विचारसरणी नाही, असे काहीसे रसायन प्रा. सरदेशमुखांच्या विचारात दिसते; आणि तेही भाषिक फुलोऱ्याने व निगूढतेने इतके भारलेले आहे की, त्याची तार्किक छाननी करण्याची कल्पनाही असह्य होते. आध्यात्मवाद तर्कप्रधान नाही असे मानावे, तर प्रा. बेंद्रयांच्या विवेचनात त्यांना मान्य असलेल्या भूमिकेत तर्काला व सुसंगत विवेचनाला फाटा दिला आहे, असे आढळत नाही. प्रा. सरदेशमुखांची प्रणाली ही एखाद्या स्वैर मनोविलासासारखी आहे, पण मनोविलसनातील सृजनशील प्रतीतिधर्मत्व तिच्यात नाही. सृजनशील प्रतीतिधर्माचा भास निर्माण करणारी भाषा मात्र भरपूर आहे. तेव्हा सृजनशील टीका म्हणूनही तिचा सुसंगत विचार करता येईल असे वाटत नाही. त्यांच्या प्रतिपादनामागे आध्यात्मवादी भूमिका असल्याचा भास होतो व प्रत्यक्षाप्रत्यक्षतेने त्यांनी तसे सूचितही केलेले आहे. एवढ्यासाठी त्यांच्या दृष्टिकोणाचा परामर्श केला आहे. त्यांच्या विचारांची सुसूत्र मांडणी येथे केलेली नाही, कारण एक तर तशी मांडणी करण्याइतकी सुसूत्रता त्यांच्या प्रतिपादनात नाही आणि दुसरे अधिक महत्त्वाचे कारण असे की, प्रा. बेंद्रयांच्या आध्यात्मवादी दृष्टिकोणाचा मागोवा किंवा परिपोष त्यांच्या विचारसरणीत सूचकतेनेही दिसत नाही. रवींद्रनाथ टागोर, अरविंद घोष, जे. कृष्णमूर्ती व प्रा. द. रा. बेंद्रे यांच्या विचारांशी, भूमिकेशी आपले काही नाते असल्याचे त्यांच्या विवेचनात अप्रत्यक्षरीत्या सूचित होते. पण या मान्यवरांच्या विचारांतून व भूमिकेतून आध्यात्मवादी टीकाप्रणालीचे व्यवस्थापन प्रा. सरदेशमुख करू शकले नाहीत. त्या दिशेने प्रयत्नसुद्धा ते करू शकले नाहीत.

गेल्या पाव शतकातील मराठी नाटक

माधव मनोहर

गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटकाचे इतिवृत्त सटीक सादर करण्याचा प्रस्तुत मानस आहे. पण गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटकाचा विचार म्हणजे केवळ गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटकाचा एकाकी अधांतरी विचार होऊ शकत नाही. कारण गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाट्यविशेषाला तत्पूर्वीच्या शतकाधिक वर्षांतील मराठी नाटकाची पार्श्वभूमी आहे; आणि या शतकाधिक वर्षांतील मराठी नाटकाचे विशेष समजून घेतल्याशिवाय तदनंतरच्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटकाचे विशेष व्यवस्थित समजणार नाहीत. कारण कोणत्याही काळातील वाङ्मयाचा विचार हा नेहमीच स्थलकालपरिस्थितिसापेक्ष असतो आणि तसाच तो असणे आवश्यक असते. कोणत्याही अपत्याचा विचार करताना ज्याप्रमाणे पितृदत्त वा आनुवंशिक गुणावगुणांचा विचार प्रथम करणे प्राप्त असते, त्याप्रमाणे कोणत्याही कालविशेषातील वाङ्मयविचार हा नेहमीच तौलनिक म्हणजेच तत्पूर्वकाळातील वाङ्मयविशेषाशी संबंधित असा असतो. एतदर्थ प्रथम पूर्वकाळातील मराठी नाट्यविशेष प्रथम समजून घेणे अगत्याचे आहे. अर्थात त्या नाट्यविशेषांची परिगणनाच काय ती प्रस्तुत अभिप्रेत आहे. तत्संबद्ध विचारणा प्रस्तुत विचारणेच्या कक्षेबाहेर आहे.

एकोणीसशे पंचेचाळीस साली मराठी रंगभूमी जशी अस्तित्वातच नव्हतो, म्हणजे अस्तित्वात असूनही नसल्यासारखी अशी तिची निश्चेष्ट अवस्था होती. मराठी रंगभूमीची जीवन्मृतावस्था अशी काही विलक्षण होती की, मराठी रंगभूमी मरणाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे, येथपासून ती मरण पावली आहे; येथपर्यंत मराठी नाट्यहितचिंतक अनेकविध अंदाज व्यक्त करीत होते. पण त्या सर्व विचारांतील प्रमुख सूत्र मरणाच्या संबंधातील काय ते होते. म्हणजे मराठी रंगभूमी मेली किंवा मरणार याव्यतिरिक्त अन्य काही मराठी नाट्यविचार विशेष उपलब्ध नव्हता. मरणोन्मुख

किंवा मरणाधीन या पलीकडे मराठी रंगभूमीची अन्य काही अवस्था संभवतच नाही, अशीच सार्वत्रिक समजूत होती. मराठी रंगभूमीच्या संबंधातील विचार मरणाविष्ट असावा, यासाठी त्या काळात तशीच काही कारणे घडलेली होती. त्या कारणांचा स्थूल-मानाने मागोवा घेणे आता प्राप्त आहे.

पंचेचाळीस सालापूर्वीच्या मराठी नाटकाचा अग्रगण्य विशेष म्हणजे संगीत हा होता. जन्मापासूनच मराठी नाटक हे संगीत नाटक होते. असंस्कृत पूर्वावस्था केवळ संगीत नाटकाचीच होती. केवळ संगीत असे मुद्दामच म्हटले. कारण त्या नाटकातून गद्य संवाद असे प्रायः नव्हतेच. होते ते फक्त रंगमंचावर एकीकडे घडणाऱ्या घटनांचे संगीत निवेदन. नंतरच्या काळातील मराठी रंगभूमीला अन्य नाट्यविशेष प्राप्त झाले, तरी संगीताचा हा मूलाधारविशेष मराठी नाटकाला नाळेसारखाच चिकटून होता. किर्लोस्कर-देवलांच्या काळापासून इष्ट असा जो बदल घडून आला तो एवढाच की, संगीत गद्य संवादाच्या आधाराने मराठी नाटकात नांदू लागले; आणि गद्य संवादाला काही विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. पण तरीही मराठी नाटक म्हणजे संगीत नाटक, हे समीकरण सापवाद कायम राहिलेच. अपवाद अर्थातच केवळ गद्य नाटकांचा. पण अशी केवळ गद्य नाटके संख्येने केवळ अत्यल्प आहेत; आणि या शताधिक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात केवळ गद्य नाटकांवरच निर्वाह करणारा एक तरी नाटककार सापडेल की नाही, याविषयी शंका बाळगण्यासारखी परिस्थिती नव्हती. त्या प्रश्नाचे उत्तर निःशंक नाही असेच द्यावे लागले असते. 'पंचशरे गद्यवरे' मराठी नाटक जिंकू पाहणाऱ्या 'कवि कृष्णा'लाही अखेरीस गद्याचा रस्ता सोडून संगीताच्या दिशेने वाटचाल करावीच लागली, आणि अन्य सर्व नाटकमंडळ्या संगीत नाटकांचे प्रयोग धडाक्याने करीत असताना एकमेव 'महाराष्ट्र नाटक मंडळी' तेवढी अशी दिसते की, तिने केवळ गद्य नाटकेच प्रयोगित केली. अन्यथा संगीत हेच मराठी नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण मानावे लागते.

मराठी नाटकातील संगीत किर्लोस्कर-देवलांच्या काळात सहेतुक आणि मर्यादित होते, तोपर्यंत मराठी नाटकात नाटक दुय्यम असले, तरी त्या नाटकाला काही अर्थ होता. हेतू अर्थातच रसोत्कर्षास अनुकूल असे संगीत नाटकातून समाविष्ट करण्याचा आणि मर्यादा अर्थातच नाट्यवस्तूला उपकारक असेच संगीत देण्याच्या संबंधातील. पण कालांतराने मराठी संगीत नाटकातील संगीताच्या अतिरेकाच्या परिणामी मराठी रंगभूमीवर नाटक लुप्त झाले; आणि राहिले ते फक्त रागदारीचे शास्त्रोक्त संगीत.. असे संगीत की ज्याच्या मैफली थाटण्यासाठी कोणत्यातरी नाटकाचा व नाट्यगृहाचा आधार शोधणे प्राप्तच होते. पुढच्या सरत्या काळात तर बालगंधर्वांसारखे प्रतिभाशाली संगीत नट वयोवृद्ध झाल्यानंतर त्यांची रंगमंचावरील उणीव सतत जाणवत राहिली, आणि गायननिपुण असलेल्या अभिनयकुशल नटनटींची वाण तदनंतर कधीच भरून आली नाही.

पंचेचाळीसपर्यंतचे नाटक सामान्यतः सहेतुक, साभिप्राय प्रचारक नाटक होते. प्रचार अर्थातच राजकीय (जसा खाडिलकरांच्या नाटकांतून आहे,) सामाजिक (जसा कोल्हटकर-देवल-वरेरकर-गडकरी यांच्या नाटकांतून आहे) वा असला कसलाच प्रचार अभिप्रेत नसेल, तर निदानपक्षी लोकप्रिय अशा नीतिमूल्यांचा प्रचार तर मराठी नाटकांतून निरंतर असेच. अगदी ‘ संशयकल्लोळ ’सारखा केवळ रंजक असा फार्स असला, तरी ‘ संशय खट झोटिंग महा ’ इत्यादी ‘ हृदयी धरा हा बोध खरा ’ हा बोध त्यात आहेच. तात्पर्य, तावत्कालपर्यंत मराठी नाटक हे स्वतः साध्य कधी नव्हतेच. होते ते केवळ कोणत्या ना कोणत्या प्रचाराचे अविभाज्य साधन.

तावत्कालपर्यंतची सर्व मराठी नाटके शेक्सपीअरच्या (खरे तर त्याच्याच केवळ नव्हे, कारण तो स्वतःही त्याला उपलब्ध असलेल्या नाट्यपरंपरेचा एक पाईक आहे;) नाट्यतंत्रानुसार घडवलेली आहेत. म्हणजे असे की प्रत्येक नाटकात (बहुत करून पाच किंवा क्वचित कधी पांचापेक्षाही अधिक) अंक, प्रत्येक अंकात अनेक प्रवेश, अधूनमधून स्वगते पेरलेली, प्रत्येक नाटकात एक प्रमुख कथानक आणि अन्य अनेक उपकथानके, आणि त्यातील एक पुन्हा नाट्यनिरपेक्ष केवळ विनोदी असे. नाटकाची रचना बहुत करून कव्हरवर हलकाफुलका विनोदी प्रवेश व डीपमध्ये प्रमुख कथानकाशी संबंधित असा एक प्रवेश; अशी एकूण या शेक्सपीअर तंत्रानुसारी मराठी नाटकांची रचना होती. वस्तुस्थिती अशी होती की, हे जे काय तंत्र म्हणून आहे, ते खास करून केवळ शेक्स-पीअरचेच असे कधीच नव्हते; आणि तंत्र सोडून मंत्राचे विचाराल, तर मराठी नाटकाला शेक्सपीअरचा नाट्यमंत्र कधीच गवसला-समजला नव्हता; असे दिसते. शेक्सपीअरची नाटके गूढ मानवजीवनाचा वेध घेणारी आणि मानवी मनाचे वा स्वभावाचे सूक्ष्म विश्लेषण करणारी अशी आहेत. आमच्या मराठी नाटककारांना त्यात काही गम्य नव्हते; आणि क्वचित काही गम्य असलेच, तर ते त्याचे काम्य तरी निश्चितच नव्हते.

मराठी नाटकाची संवादभाषा तोपर्यंत अमूकच एका वळणाची वा धाटणीची होती, असे निःशंक विधान करता येण्यासारखी परिस्थिती नाही. कधी ही भाषा देवलांच्या-सारखी साधी, सोपी, प्रासादिक आणि निर्व्याज-मनोरम आहे; तर कधी ती कोल्हटकर–गडकऱ्यांच्या भाषेसारखी अलंकारिक, कृत्रिम आणि क्लिष्ट आहे, तर कधी ती खाडिल-करांच्या भाषेसारखी सावेश, पल्लेदार, अल्पार्थ–शब्दबहुल अशी आहे. पण ती कशीही असो, ती स्वाभाविक मात्र केव्हाच नाही; आणि सामान्यतः असे एक विधान करण्यास हरकत नाही की, मराठी नाटकातून त्या काळात कानांवर आदळत ती केवळ भाषणेच. तत्कालीन मराठी नाटकांतून संभाषण असे कधी सहसा आढळतच नाही. असो.

तात्पर्य, पंचेचाळीस सालापूर्वीच्या मराठी नाट्यविशेषाचे विशेष उपर्युक्त होत. पंचेचाळीस हे साल मराठी नाट्येतिहासात विभाजक युगविशेषदर्शक म्हणून समजण्यास प्रत्यवाय नाही. चाळीस सालच्या सुमारास बहुतेक सर्व मराठी नाटककंपन्यांचे नाट्य-व्यवहार एक तर थंडावले होते, किंवा क्वचित कोठे काही धुगधुगी असेलच, तर तीही

थंडावत चालल्याची लक्षणे पूर्वनिश्चित अशी जाणवत होती. एका नव्या नाट्यमन्वंतराचे निर्देशक असे 'आंधळयांची शाळा' हे वर्तकांचे नाटक तत्पूर्वी रंगभूमीवर प्रयोगित होऊन चुकले होते. चुकले होते, म्हणजे खरे तर तेच बरोबर होते. बिनचूक होते. एका लोकप्रिय मराठी नाट्यपरंपरेचा अस्त आणि दुसऱ्या एका लोकप्रिय मराठी नाट्यपरंपरेचा उदय यांच्या सीमारेषेवरचे हे नाटक त्या काळात तरी अभूतपूर्व आणि भविष्यत्कालातील काही इष्ट अशा नाट्यविशेषांचे सूचक होते. या एकाच नाटकाने मराठी रंगभूमीला बरेच काही इष्ट असे नवे नाट्यविशेष दिले. इब्सेनच्या नाट्यसंप्रदायाचे द्योतक असे हे नाटक समजण्यात येते; आणि तरीही ते इब्सेनचे नव्हते. त्याचाच समकालीन असा एक स्कॅन्डिनेव्हिअन नाटककार ब्यर्नसन याच्या 'गॉन्टलेट'नामक नाटकाचा हा वर्तकानुवाद तितकासा प्रामाणिक नव्हता; आणि मूळच्या करुणभीषण अशा ट्रॅजेडीशी तर तो सर्वथा विसंगत होता. पण ते काही असो. त्याच्याशी तूर्त विवेचन कर्तव्य नाही. पण या एकाच नाट्यकृतीने वास्तव घटना, त्या घटनांस कारण झालेल्या स्त्री-पुरुषांचे मनोविश्लेषण, स्वाभाविक स्वभावदर्शन, स्वभावसहज पण नाट्यात्म असे संवादलेखन, स्त्रीभूमिकांत स्त्रीदर्शन, नाट्यवस्तूची मागणी जाणून तदनुसार घडवलेले नेपथ्यसंयोजन, नाट्यगत भाववृत्तीशी सुसंगत अशा भावार्थसंपन्न भावगीतांचे संगीतनियोजन, आणि एका सामाजिक समस्येचे विदारक दर्शन इत्यादी इब्सेन संप्रदायाचे सर्वच नाट्यविशेष प्रायशः प्रस्तुत नाट्यकृतीत एकीकृत होते; आणि मराठी नाट्यमन्वंतराचे श्रेय जर कोणत्या एका नाट्यकृतीस द्यावयाचेच असेल, तर ते 'नाट्यमन्वंतर'च्या 'आंधळयांच्या शाळे'सच लेखनप्रयोगदृष्ट्या निःशंक देण्यास प्रत्यवाय नसावा. आजच्या मराठी रंगभूमीवर जे.जे म्हणून इष्ट असे निर्देशनास येत आहे, ते ते सर्व 'नाट्यमन्वतरा'चेच अपत्यरूप आहे.

पण पंचेचाळीस साल हे अन्य एका घटनेच्या परिणामीही लक्षणीय समजावयास हवे. कारण पंचेचाळीस सालीच नागेश जोशी यांच्या 'देवमाणूस' नामक एका नाटकाचा अवतार मराठी रंगमंचावर घडला. 'आंधळयांची शाळा'ने नाट्यमन्वंतर घडवले, तर 'देवमाणूस'ने लोकप्रिय अशा एका सांकेतिक मराठी नाट्यपरंपरेस जन्म दिला. 'आंधळयांची शाळा' काय किंवा 'देवमाणूस'काय, या उभयविध नाट्यकृतींचे मराठी रंगभूमीवरील तात्कालिक परिणाम तथाकथित जाणकारासही विशेष जाणवले नसावेत, असे एतद्विषयक उपलब्ध विवेचन वाचताक्षणी आज लक्षात आल्यावाचून राहात नाही. वर्तक काय किंवा (नागेश) जोशी काय, हे दोघेही कोणी महासमर्थ नाटककार नव्हेत. 'आंधळयांची शाळा' तर विकृत रूपांतर आहे, आणि 'देवमाणूस' म्हणजे मोठ्या सामर्थ्याचे नाटक आहे, असेही नव्हे. ही दोन्ही नाटके असामान्य अशा नाट्यप्रतिभेचा प्रत्यय देणारी निश्चितच नव्हेत; आणि तरीही पंचेचाळीसनंतरच्या मराठी नाट्येतिहासातील या दोन सामान्य नाटकांचे स्थान अनन्यसामान्य असे निःसंशय आहे. नाट्यकृती सापेक्ष-सामान्य पण त्याच सामान्य नाट्यकृतींचे परिणाम मात्र अनन्यसामान्य, हे सकृद्दर्शनी न पटण्यासारखे अवास्तव वाटते. पण वस्तुतः ते तसे नाही.

'आंधळ्यांची शाळा' ही नाट्यकृती क्रान्तदर्शी, तर 'देवमाणूस' सर्वथा सर्वतोपरींनी सांकेतिक. 'आंधळ्यांची शाळा' नाटक म्हणून वा नाट्यप्रयोग म्हणूनही लोकप्रिय होऊ शकले नाही. तशी लोकप्रियता ज्या काळाचे ते अपत्य होते, त्या काळात लाभण्याची शक्यताच नव्हती; आणि तरीही 'आंधळ्यांची शाळा' याच एका नाटकाने 'वेड्याचे घर उन्हात' पासून अगदी आजच्या सत्तर सालातील 'मला काही सांगाचंय'पर्यंत सामाजिक वास्तवाचा वेध घेणाऱ्या प्रखर समस्याप्रधान नाट्यकृतींची एक अखंड नवपरंपरा निर्माण केली तर 'देवमाणूस'ने लोकप्रिय कौटुंबिक नाटकांचा एक साचा घडवला. बाळ कोल्हटकर आणि मधुसूदन कालेलकर हे आजचे लोकप्रिय नाटककार नागेश जोशी यांचे वंशज वारस होत.

याच कालखंडात असाही एक नाटककार उपलब्ध आहे की जो खाडिलकर, गडकरी यांच्यासारख्या जुन्या नाटककारांचे ऋण मोठ्या अभिमानाने मिरवतो, आणि त्याच वेळी 'मॉन्ना वन्ना'सारख्या (तथाकथित) भारतीय संस्कृतीशी सर्वथा विसंगत अशा नाट्यकृतीचेही ऋण तितक्याच अभिमानाने मिरवतो. 'दुसरा पेशवा' किंवा 'कौन्तेय' सारख्या कुसुमाग्रजांच्या नाट्यकृतीत जुन्यानव्याचे एक विलक्षण संमिश्रण आढळते; आणि विजय तेंडूलकर यांच्यासारखा असाही एक प्रतिभाशाली नाटककार आज उपलब्ध आहे की, जो निर्भेळ नव्याच्याच शोधात नित्य असतो; आणि जो प्रचलित नाट्यपरंपरेपासून तुटलेला असण्यात धन्यता मानतो. गेल्या पंचवीस वर्षांचा मराठी नाट्येतिहास असा काहीसा चित्रविचित्र धाग्यांनी विणलेला आहे. त्यात परंपरेशी असलेले अतूट नाते आहेही, आणि नाहीही. अशा या चित्रविचित्र नाट्यप्रवृत्तींचा अभ्यास आपणास प्रस्तुत प्राप्त कर्तव्य आहे.

संगीत हे पूर्वकालीन मराठी नाटकाचे एक व्यवच्छेदक लक्षण ठरल्यामुळे संगीत नाटकाचा प्रश्न प्रारंभीच निकालात काढणे युक्त ठरेल. गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटक सामान्यतः संगीतापासून फारकतलेले आहे, असे म्हटले; म्हणजे नाटकाच्या सत्यस्थितीचा बोध अचूक होईल. खरे बोलावयाचे, तर बालगंधर्व-(भाऊराव)कोल्हटकर-जोगळेकर-केशवराव भोसले-मास्टर दीनानाथ यांच्या अतुल नाट्यसंगीतगायकीचे वारसदार नंतरच्या काळात उपलब्ध न झाल्याच्या परिणामी ऐन उमेदीतील बालगंधर्व ज्या क्षणी संपले, त्याच क्षणापासून संगीत नाटकही संपले. नंतरच्या काळात स्मरणात राहिला, तो केवळ संगीत नाटकाचा वारसा,—असा वारसा की त्यावर हक्क सांगण्याची हिंमत तदनंतरच्या कोणत्याच मराठी गायक नटनटींमध्ये नव्हती. नटींचा प्रश्न प्रस्तुत संबंधात जरूर संभवतो. कारण बालगंधर्वांचे युग हे प्रामुख्याने स्त्री-भूमिका करणाऱ्या पुरुषनटांचे युग होते. 'आंधळ्यांच्या शाळे'पासून तो जमाना संपुष्टात आला. त्याचे एक कारण असे दिसते की, नटांच्या गायकीची जबरदस्त ताकद नटींच्या गळ्यात मुळातच नव्हती, हे एक; आणि दुसरे म्हणजे 'आंधळ्यांच्या शाळे'पासूनच नाट्यसंगीताचे विशेष आमूलाग्र बदलण्यास प्रारंभ झाला होता. 'आंधळ्यांच्या शाळे'त

ज्योत्स्नाबाई भोळे यांच्या तोंडी पूर्वीच्या नाटकातल्यासारखी 'पदे' नव्हती, तर काणेकरांची 'भावगीते' होती;–'प्रीतीची हूल' आणि 'एकलेपणाची आग'सारखी होती. ही दोन्ही भावगीते नाट्यगत रसोत्कर्षास परमावधीची उपकारक ठरतील, अशी होती. खरे तर येथून पुढे भावगीतसंपन्न अशा एका नव्याच संगीत नाटकाचे पुनरुत्थान घडून येण्यास हरकत नव्हती. पण दुर्दैवाने ते घडावयाचे नव्हते.

ज्योत्स्नाबाईंचा लाभ तदनंतर प्रामुख्याने रांगणेकरांच्या 'नाट्यनिकेतन'ला झाला, आणि 'कुलवधू'पासून रांगणेकरांनी जी संगीत नाटके ज्योत्स्नाबाईंसाठी लिहिली, त्यांतील संगीत जुन्या नाट्यसंगीतासारखे गायकी ढंगाचेही नव्हते; आणि भावगीतांच्या नव्या ढंगाचेही नव्हते. असे वाटते की, रांगणेकर स्वतःच कवी असते किंवा त्यांनी अन्य कवींची भावगीते आपल्या नाटकांसाठी प्रयोजनपूर्वक योजिली असती, तर मराठी नाटकाला एका भावगर्भ संगीताचे वरदान लाभले असते; आणि संगीत नाटकाचा श्रीमान उत्तराधिकार असा संपुष्टात आला नसता. पण प्रत्यक्षात घडले ते विपरीत होते. नंतरच्या काळात भालचंद्र पेंढारकर यांनी पितृदत्त संगीत नाटकाचा वारसा राखवण्यासाठी पुष्कळ कष्ट केले. पण तेव्हा केशवराव भोसल्यांसारखे समर्थ संगीत नट उपलब्ध नव्हते; आणि खाडिलकरांसारखे समर्थ नाटककारही. परिणामी विद्याधर गोखले यांच्या 'पंडितराज जगन्नाथ' आणि 'जय जय गौरीशंकर'सारख्या कमताकद नाटकांवर नव्या 'ललितकलादर्श'ला गुजराण करणे भाग पडले. 'सुवर्णतुला'सारखे एखादे रंगतदार संगीत नाटक अपवादादाखल गोखले यांनी लिहिलेले आढळले, तरी 'मंदारमाले'पासून 'मेघमल्हार'पर्यंत नाट्यगुणभावयुक्त अशी त्यांची संगीत नाटके पाहिली म्हणजे, रसिकमनाला उद्विग्नतेव्यतिरिक्त गत्यंतरच उरत नाही. येथून पुढे ध्वनिमुद्रिकांच्या अत्यल्प कालावधीत आटोपतील, अशा काव्य-गुणभावयुक्त पदांची चलती सुरू झाली, आणि संगीत नाटकातील नाटकात मुळातच दम नसल्यामुळे त्यातील पुष्कळशी तथाकथित संगीत नाटके जन्मतःच गतप्राण झाली. उदाहरणार्थ, विद्याधर गोखले यांचे 'मेघमल्हार' किंवा योगिनी जोगळेकर यांचे 'रंगात रंगला श्रीरंग.

अगदी अलीकडच्या काळात परंपराप्राप्त संगीत नाटकाला काही वेगळे वळण लावण्याचा सहेतुक यत्न जितेंद्र अभिषेकींसारखे काही महत्त्वाकांक्षी संगीतनियोजक करीत आहेत. पुरुषोत्तम दारव्हेकरांचे 'कट्यार काळजात घुसली' अशा नव्या संगीत नाटकाचे एक उल्लेखनीय उदाहरण. त्यापेक्षाही अधिक प्रयोगशील उदाहरण म्हणजे वसंत कानेटकरांचे 'लेकुरे उदंड झाली' या नाटकातील संगीत 'माय फेअर लेडी'-सारख्या ऑपेराची आठवण करून देणारे आहे. सयमक गद्यालाच एक श्रुतिमधुर असा ताल आणि ठेका देण्याची प्रवृत्ती या नाटकात दिसते, ती यापुढील नवजात संगीत नाटकाचे प्रसादचिन्ह ठरण्यास प्रत्यवाय नाही, असे वाटते.

या पंचवीस वर्षांच्या नाटकी कालखंडावर गडद छाया पडलेली दिसते, ती

आचार्य अत्रे यांची. 'साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, लग्नाची बेडी,' यासारखी फार्सिकल पण उपहासप्रचुर किंवा उपरोधप्रधान अशी नाटके ज्याप्रमाणे त्यांनी लिहिलेली आहेत, त्याचप्रमाणे 'घराबाहेर, उद्याचा संसार, जग काय म्हणेल' प्रभृती सामाजिक समस्यान्वित नाटकेही त्यांनी घडवलेली आहेत. अगदी अलीकडच्या काळात 'तो मी नव्हेच' किंवा 'डॉ. लागू' यांसारख्या नाट्यकृतीतून अत्रे एक नव्या प्रकारचे, गुन्हेगार मनाचा शोध घेणारे फालतू नाटक लिहू पाहात होते; असे दिसते. 'वन्दे भारतम्' किंवा 'मी मंत्री झालो' या त्यांच्या नाटकांतून उमटलेले तत्कालीन राजकीय परिस्थितीचे चित्र पारदर्शक आणि स्वच्छ आहे.

आचार्य अत्रे ह्यांच्या पहिल्या पहिल्या काही नाटकांतून त्यांचे वाङ्मयगुरु गडकरी यांचे ऋण ठायी ठायी प्रत्ययास येते. विशेषे करून भाषा गडकऱ्यांची, स्वभावदर्शनाची लकब गडकऱ्यांची, नाटकाची एकूण मांडणी गडकऱ्यांची; असाच सारा प्रकार प्रारंभी दिसतो. त्यांच्या समस्यान्वित नाटकांची जात एकूण मेलो-ड्रॅमॅटिक आहे. पण मध्यंतरी केव्हा तरी त्यांनी इब्सेनही वाचला-अभ्यासला होता, आणि त्यांच्या नंतरच्या काही नाटकांतून गडकरी विरुद्ध इब्सेन असा एक चमत्कारिक संघर्ष जाणवतो. 'मन इकडे, वपु तिकडे' ही नाट्यावस्था नाटकाला फारशी उपकारक ठरत नाही; आणि जुन्या नव्याच्या ओढाताणीत 'घराबाहेर' आणि 'उद्याचा संसार'-सारखी त्यांची काही लोकप्रिय नाटकेही काही अंशी केविलवाणी झाल्याचे जाणवते. (अन्यथा गळ्यातील मंगळसूत्र तोडून घराबाहेर गेलेली नायिका ची ची करीत 'असे पति देवचि ललनांना' म्हणत आणि 'कशि या त्यजू पदाला?' असा प्रश्न विचारत बुळ्या नवऱ्याचे पद धरण्यासाठी परत येतीच ना!) आणि अखेरच्या काळात गडकऱ्यांचा संस्कार मनावरून पुसून टाकल्यानंतर अत्र्यांनी जी नाटके लिहिली, ती काळाच्या ओघात तरण्यासारखी नव्हती. संभव आहे की 'लग्नाची बेडी'सारखे त्यांचे एखादेच नाटक क्वचित रंगभूमीवर काही काळ टिकाव धरून राहू शकेल.

अत्र्यांच्या पिंडाची जडणघडण प्रथमपासून अखेरपर्यंत साहित्यसंस्कारित होती. पण रांगणेकरांच्या संबंधात असे काही म्हणता येण्यासारखी परिस्थिती नाही. तरी पण मराठी रंगभूमीच्या विपन्नावस्थेत त्यांनी खास स्वतःच्याच अशा आपल्या लोकप्रिय नाटकांचा एक साचा घडवला. आणि ज्योत्स्नाबाईसारख्या एका गायनाभिनयनिपुण नटीचे साहाय्य घेऊन त्यांनी आपल्या 'नाट्यनिकेतन'च्या रंगमंचावर जे नाट्यप्रयोग घडवून आणले, त्यांनी त्या काळात नाट्यरसिकांना मोठाच दिलासा दिला असला पाहिजे. मध्यम वर्गातील एखादी लुटुपुटीची समस्या, त्या समस्येची लुटुपुटीचीच उकल, काही माफक संघर्ष, काही माफक गाणे, काही माफक हास्यविनोद, इत्यादींच्या बळावर रांगणेकरांनी एक सुटसुटीत, खेळकर, हलके फुलके नाटक घडवण्यात निःसंशय मोठे यश मिळवले, आणि ज्या काळात मराठी नाटक होते की नव्हते, अशीच परिस्थिती होती; त्या काळात नाटकाची माफक करमणूक नाटकवेड्यांसाठी त्यांनी उपलब्ध

करून दिली. त्यांचे ' कुलवधू ' हे नाटक सर्वाधिक लोकप्रिय ठरले असले, तरी 'वहिनी, एक होता म्हातारा, माझं घर, रंभा' किंवा ' हिमालयाची बायको ' अशी त्यांची काही नाटके ' कुलवधू 'च्या तुलनेने अधिक रंगतदार ठरणारी आहेत. पण त्यांचा एकूण जीवच फार लहान आहे, आणि असे वाटते की, रांगणेकरांची सर्व नाटके विसरली जातील, तेव्हाही ' भटाला दिली ओसरी ' सारखा त्यांचा फार्स काही काळ तग धरून राहील.

नागेश जोशी यांच्या ' देवमाणूस 'ने खरे म्हटले तर मराठी माणसाचे मन खऱ्या अर्थाने जिंकून घेतले, असेच आता म्हणावयास हवे. ' देवमाणूस ' नेमका पंचेचाळीस सालात बरोबर पंचवीस वर्षांपूर्वी–मराठी रंगमंचावर अवतरला, आणि तत्क्षणी त्याने मराठी माणसाच्या मनाची जबरदस्त पकड घेतली. हा ' देवमाणूस ' वयस्कर आहे, संस्कारसंपन्न आहे; जे जे म्हणून शिव, मंगल, पवित्र मानले जाते, त्यावर त्याची अढळ श्रद्धा आहे. एकत्र कुटुंबाच्या एकत्र धारणेसाठी प्रसंगी सर्वस्वाचा त्याग कःपदार्थ समजणारा असा तो आहे. सत्प्रवृत्त आहे, सच्छील आहे, सदाचारप्रवण आहे, थोडक्यात म्हणजे जुने ते प्राणपणाने जोपासणारा व नवे ते पोटतिडिकीने नाकारणारा असा तो आहे. अर्थातच ' देवमाणसा 'चा वारसा सांगणाऱ्या सर्व लोकप्रिय नाटकांचा नायक हा असा ' देवमाणूस 'च असतो. त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बहुत करून तो अशिक्षित असतो. नायक अशिक्षित म्हणून खलनायक सुशिक्षित असणार, हे उघड आहे. तो थोडाबहुत शिकलेला असला की ' देवमाणसा'लाही 'वेगळं व्हायचंय मला ' म्हणून तो ठणकावून सांगणार, आणि ' देवमाणसा'च्या अंतिम–बहुत करून प्राणान्तक त्यागानंतर पश्चात्तापदग्ध होत्साता तो देवमाणसाच्या पावलांनी मळलेल्या वाटेने जाणार; हे सारे कसे सहज समजण्यासारखे आहे. नागेश जोशी यांचे खरे उत्तराधिकारी म्हणजे बाळ कोल्हटकर. तेव्हा त्यांच्या ' दुर्वांच्या जुडी 'ने अलोट लोकप्रियता पैदा केली, तर त्यात-मराठी मनाला तरी निदान–आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. आश्चर्य वाटण्यासारखे काही असेलच, तर ते हे आहे की, नाट्यगत सत्प्रवृत्त देवमाणसाचा दुष्प्रवृत्त मुलगाही त्यांनी ज्यावर जीव जडेल, असा घडवला !

मधुसूदन कालेलकर हे तसे म्हटले, तर नागेश जोशींचेच वारसदार. आणि त्यांच्या ' दिवा जळू दे 'सारख्या लोकप्रिय नाटकाचे अंतरंग ' देवमाणसा 'नेच रंगवलेले आहे. त्यांच्या संवाद भाषेवर अजूनही गडकऱ्यांच्या चमत्कृतिसंपन्न अवास्तव भाषेचे संस्कार घडल्याचे जाणवत असले, तरी त्यांनी नवे नाटकही काही थोडेबहुत वाचले-अभ्यासलेले आहे. परिणामी बाळ कोल्हटकरांचे नाटक तसे निखळ जुनेच वाटते. ती गत कालेलकरी नाटकाची नाही. नवे हवे आहे आणि जुन्याची संगत तर सोडवत नाही, अशी द्विधा मनोवस्था या महत्त्वाकांक्षी नाटककाराची झाल्याचे आढळून येते. पण तरीही ' देवमाणसा 'चा मागोवा तो कधी सोडील, असे चिन्ह आज तरी दिसत नाही.

मराठी माणसाच्या मनावर नागेश जोशींच्या ' देवमाणसा 'चे अधिराज्य कसे

अप्रतिहत आणि सर्वंकष आहे, याचे प्रत्यंतर हवेच असेल, तर जिज्ञासूंनी कोल्हटकर-कालेलकरांची गिरगावी नाटके जशी पाहावीत, तशीच-किंबहुना अधिकच-आयरे-दुदवडकरांची गिरणगावी नाटकेही एकदा डोळ्यांखालून घालावीत. या सर्व गिरणगावी नाटकांतून ' देवमाणसा 'ची असंख्य विडंबित वा विटंबित दर्शने सहज घडतील.

नागेश जोशी--बाळ कोल्हटकर--मधुसूदन कालेलकर प्रभृतींच्या नाटकांची विचारणा चालू असतानाच शिरवाडकरांचा नामोच्चार कोणाला अहो अब्रह्मण्यम् वाटण्याचा संभव आहे. शेक्सपीअरचे ' मॅक्बेथ ' आणि ' ऑथेल्लो ', मेटरलिंक्चे ' मॉन्ना वन्ना ', वाइल्डचे ' आयडिअल हज्बंड ' इत्यादींचे शिरवाडकरकृत अनुवाद म्हणजे मराठी नाट्यसाहित्याची अम्लान अलंकरणे होत. कुसुमाग्रजांसारखा प्रतिभाशाली कवी जेव्हा नाट्यरचना करू लागला, तेव्हा कुसुमाग्रजांच्या संबंधात गोविंदाग्रजांचे स्मरण केवळ अपरिहार्य होते, आणि गोविंदाग्रजांचे उत्तराधिकारी अधिकारपरत्वे कुसुमाग्रजच होत, याविषयी कोणी जाणकार कसला म्हणून वाद घालील; हे संभवत नाही. गोविंदाग्रजांप्रमाणे कुसुमाग्रजही जुन्यातील जे भव्य त्याचे मूर्तिपूजक आहेत. पण त्याच बरोबर जुन्यातील जे त्याज्य आहे, त्याचे समर्थ मूर्तिभंजकही तेच होत. ' कौन्तेय, दुसरा पेशवा, ययाति-देवयानी, ' आणि ' वीज म्हणाली धरतीला ' या त्यांच्या स्वतंत्र नाट्यकृतीतून मूर्तिपूजनाचे शांत गंभीर ध्वनी आणि मूर्तिभंजनाचे रौद्र भीषण रव बहुशः एकाच क्षणी ऐकू येतात. कुसुमाग्रजांसारखा एक अस्सल जातिवंत कवी नाटके लिहू लागला, ही घटना परिणामी मराठी नाट्यप्रकृतीला हितावहच ठरेल. त्यांच्या नाट्यकृतीत काव्य अधिक आणि नाट्य तुलनेने कमी, असे जे व्यस्त प्रमाण दिसते; ते कालांतराने पुन्हा व्यस्त झाले, तर संभव आहे की मराठी नाट्यकृतीला प्रतिभेची संगत लाभेल. तूर्त तरी निदान कुसुमाग्रजांच्या कलावती वाणीतच समाधान शोधणे प्राप्त आहे.

पंचेचाळीस ते सत्तर या कालखंडाच्या उत्तरार्धावर वसंत कानेटकरांचे अनन्य-स्वामित्व आहे. त्यांची नाटके केवळ अनेकानेकच नाहीत, तर ती अनेकविधही आहेत. मराठी रंगभूमीवर काही नव्या उज्ज्वल परंपरा प्रस्थापित करण्याचे विशेष श्रेय संपादन करणारा असा हा मोठा नाटककार आहे. ' वेड्याचं घर उन्हात ' हे मराठी भाषेतील पहिले मनोविश्लेषणपर नाटक, ' देवांचं मनोराज्य ' हे पहिले कल्पनारंजित नाटक, ' रायगडाला जेव्हा जाग येते ' हे इतिहासात मृत होऊन पडलेल्या माणुसकीला जाग आणणारे पहिले नाटक; हे सर्व तर खरेच. पण याव्यतिरिक्त ' मत्स्यगंधा 'सारखे पौराणिक, ' इथे ओशाळला मृत्यू 'सारखे ऐतिहासिक आणि ' अश्रूंची झाली फुले '-सारखे सामाजिक नाटकही त्यांनी घडवलेले आहे. ' मला काही सांगायचंय ' हे त्यांचे सर्वाधिक बांधेसूद असे रहस्यप्रधान नाटक आहे. त्यांच्या नाट्यकृतीतून चमत्कृतिजनक अशा नानाविध नाट्यप्रवृत्तींचे दर्शन घडत असले, तरी मला वाटते; त्यांचे जे एक नाटक यापुढे दीर्घ काळपर्यंत रसिकांना आनंद देत राहणार आहे, ते नाटक म्हणजे निःसंशय ' प्रेमा तुझा रंग कसा ' हेच होय. कारण या नाटकातील प्रेमाचे नानाविध

रंग मनस्वी आकर्षक आणि (पुनः) प्रत्ययकारक आहेत. कानेटकर म्हणजे एका काळातील प्रायोगिक रंगभूमीचे सर्वाधिक बलिष्ठ असे आशास्थान होते. आजच्या व्यावसायिक रंगभूमीवरील त्यांचे स्थान पण तेच आहे. व्यावसायिक रंगभूमीच्या अर्थार्थी सेवेतून कानेटकरांनी कधी काळी स्वतःला खऱ्या अर्थाने मुक्त करून घेतले, तर कोणी सांगावे; कदाचित ते एखादी अविस्मरणीय अशी महान नाट्यकृती ते निर्माण करतीलही. करतीलच, असे नव्हे; पण करण्याचा या थोर नाटककाराचा आवाका अवश्य मंजूर करावयास हवा.

हे झाले मराठी रंगभूमीवर सत्ता गाजवणाऱ्या नाटककारांविषयी. हे सर्वच नाटककार कमी-अधिक प्रमाणात लोकप्रिय आहेत, आणि व्यक्तिशः त्यांच्यापैकी प्रत्येकाची (कदाचित शिरवाडकरांचा अपवाद करता) लोकप्रियता एवढी उदंड आहे की, केवळ त्यांच्यापैकी कोणाही एकाच्या नावावर असलेली नाटके प्रयोगतः काही काळ तरी निदान गर्दी खेचू शकतात आणि म्हणून त्यांच्या नाटकांचे प्रयोग त्यांच्या नावासाठी म्हणून झडत राहतात. त्यांच्यापैकी नागेश जोशी यांच्या ‘ देवमाणूस ’ची प्रथम आणि नंतर बाळ कोल्हटकरांच्या ‘ वेगळं व्हायचंय, दुरितांचे तिमिर, दुर्वांची जुडी ’-सारख्या नाटकांची पकड जनमानसावर एवढी जबरदस्त आहे की, त्यांची भ्रष्ट अनुकरणे प्रथम गिरणगावच्या आणि नंतर कोकणातील देवोत्सवाच्या रंगभूमीवर असंख्य बघावयास मिळतात. ला. कृ. आयरे, वसंत दुदवडकर, विनायक देवरुखकर, आबासाहेब आचरेकरप्रभृती नाटककार गिरगावापर्यंत पोचू शकत नसले, तरी गिरणगावात त्यांची चलती काही विशेषच आहे–निदान होती, हे त्यांच्या नाटकांच्या निघालेल्या दहा दहा आवृत्त्यांवरून आणि शेकड्यांनी घडणाऱ्या त्यांच्या प्रयोगसंख्यांवरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. वाङ्मय म्हणून त्यांची योग्यता शून्य किंवा क्वचित उणीच असली, तरी जनसामान्यांचे ते आवडते नाटककार होत आणि म्हणून तेही समजून घ्यावयास हवेत. निदान त्यांच्या अस्तित्वाची दखल तरी निःसंकोच घ्यावयास हवी.

गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाटकांचा इतिहास शोधता असे आढळून येते की, काही नाटककारांची केवळ एकच नाट्यकृती निरतिशय लोकप्रिय ठरलेली आहे. उदाहरणार्थ, पु. ल. देशपांडे यांची ‘ तुझे आहे तुजपाशी ’. वस्तुतः देशपांडे यांनी ‘अंमलदार’सारख्या एका मर्मभेदक रूपान्तराने आपल्या नाट्यलेखनास सुरुवात केली. गोगोलच्या ‘ इन्स्पेक्टर जनरल ’वरून घेतलेला हा मराठी अंमलदार इतका स्वदेशी आहे की तो परदेशी असेल, अशी कल्पनाही असंभव वाटावी. ‘ तुजपाशी ’ नंतरच्या काळातही ‘ सुंदर मी होणार ’सारख्या एखादा नाट्यानुवाद त्यांनी लिहिलेला आहे. पण नाटककार म्हणून त्यांना कीर्ती प्राप्त झाली, ती मात्र केवळ ‘ तुजपाशी’च्या परिणामी. मराठी मनाला विलक्षण पटलेले असे हे नाटक आहे. या नाटकाचा खरा नायक कोण, येथपासून या नाटकाची अखेरी तर्कसंगत अनिवार्य, अटळ आहे काय;

व आचार्य आणि काकाजी यांच्या जीवनविषयक दृष्टिकोणातील संघर्षांचे दर्शन निःपक्षपाती वृत्तीने घडवले आहे काय, येथपर्यंत अनेकानेक प्रश्न प्रस्तुत नाटकाच्या संदर्भात आजवर विचारले गेले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे काही असोत, या नाट्यकृतीची गुणवत्ता एकदम मान्य करावयास हवी. हे एक अवीट रंगतीचे सुरेख नाटक आहे, आणि या नाटकाच्या नाट्यगुणसंभव यशाचे श्रेय तदंतर्गत घटकांच्या सुयोग्य, सुस्थित, सुंदर रचनेस द्यावे लागेल. आचार्य आणि काकाजी यांच्या मातबर व्यक्तिरेखा, दोन नाजूक प्रणयप्रकरणे, स्फोटक हास्य आणि अनावर अश्रू यांचा सुसंगत समन्वय; आचार्यबाजीचा निर्दय उपहास, निखळ विनोद, परिणामकारक संवादभाषा इत्यादिकांच्या परिणामी हे नाटक विलक्षण परिणामकारक ठरले आहे. देशपांडे यांचे ' तुका म्हणे ' हेही एक चांगले नाटक आहे, आणि त्याचे प्रयोग करण्यास कोणी का धजावत नाही; हे समजत नाही.

विजय तेंडूलकर यांची ' माणूस नावाचे बेट ' किंवा ' मधल्या भिंती ' आणि ' मी जिंकलो, मी हरलो ' ही स्वतंत्र नाटकेही उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे ' सोन्याचे देव 'सारखी नाना जोग यांची व पुरुषोत्तम दारव्हेकरांची ' वऱ्हाडी मानसं 'ही याच संदर्भात स्मरण्यासारखी आहेत, एवढेच येथे सुचवण्यासारखे आहे. आणि विस्तारभयास्तव येथे आणखी काही चांगल्या नाटककारांच्या चांगल्या नाट्यकृतींचा निर्देश करणे अशक्य असले, तरी त्यांचे स्मरण कर्तव्यप्राप्त आहे. उदाहरणार्थ : ' झोपी गेलेला जागा झाला ' हा बबन प्रभूचा अविस्मरणीय फार्स म्हणजे फार्सच्या सर्वमान्य व्याख्येतील व्यवच्छेदक लक्षणांचाच अधिक्षेप करणारा आहे. आणि तरीही जगातील अत्युत्तम फार्सकृतीत त्याची गणना अवश्य करावयास हवी. फार्सच्या संबंधात नेहमी असे म्हटले जाते की, फार्सचा संबंध सदैव स्वभावविकृतीशी जडलेला असतो आणि म्हणून मानसिक वा स्वाभाविक प्रकृती ही फार्सची प्रतिपाद्य वस्तू असूच शकत नाही आणि फार्स नेहमीच व्हल्गर असतो. अतएव सखोल, सुप्त वासनांचे उद्‌घाटन फार्सच्या कक्षेबाहेरचे असते. ' झोपी गेलेला 'तील (किंवा खरे तर ' झोपी गेलेला 'स आधारभूत असलेल्या मूळच्या ' विल् एनी जन्टलमन् ' नामक नाटकातील) फार्सविषयक धारणा पुनश्च एकवार तपासून घ्यावयास हव्यात, असे जाणकारास निःसंशय वाटेल. पूर्वकाळात कारखानिसांचे ' राजाचे बंड ' किंवा वा. वा. भोळे यांचे ' सरलादेवी ' ही नाटके जशी तत्कालीन नाटकांमध्ये विशेष, लक्षणीय ठरली होती, तशीच नाना जोगांचे ' सोन्याचे देव ', तारा वनारसे यांचे ' कक्षा ', सरिता पदकींचे ' बाधा ' इत्यादी नाटकेही प्रयोगपरत्वे विशेष लक्षणीय ठरावीत, अशा योग्यतेची आहेत.

मराठी रंगभूमीचा इतिहास म्हणजे व्यावसायिक रंगभूमीचा इतिहास, असेच आजवर समजले-मानले जात असे, पण ते खरे नव्हे. आजच्या व्यावसायिक रंगभूमीवर प्रायोगिक रंगभूमीचे ऋण नाटकाच्या संविधानकापासून तो नेपथ्य-प्रकाशयोजनेपर्यंत इतके सर्वंकष आहे की, त्याची खास दखल घेतल्यावाचून मराठी नाटकाचा अत्यंत त्रोटक, अतिसंक्षिप्त इतिहासही पुरा होऊ शकणार नाही. आश्चर्याची गोष्ट अशी

की, व्यावसायिक रंगभूमीवर आपल्या सिद्धहस्त कुशल दिग्दर्शनाचा खोल ठसा उमटव-णारे आत्माराम भेंडे हेच प्रायोगिक रंगभूमीचे अग्रगण्य शिल्पकार होत. त्यांनी दिग्द-र्शित केलेले प्रीस्टलेच्या 'डेन्जरस कॉर्नर' आणि चॅपेकच्या 'मदर'चे नाट्यानुवाद 'झोपलेले नाग' व 'आई' म्हणजे प्रायोगिक रंगभूमीची प्रसादचिन्हेच होत. या किंवा असल्या नाटकांचे विषय त्या काळात एक निषिद्ध तरी मानले जात, किंवा निबिड तरी. निबिड या अर्थाने की ते मराठी रंगभूमीला पेलणार नाहीत, असे त्या काळात वाटत होते. 'वेटिंग फॉर लेफ्टी'चा नाट्यानुवाद 'डावरेची वाट' किंवा प्रीस्टलेच्याच 'ॲन इन्स्पेक्टर कॉल्स'चा नाट्यानुवाद 'सारेच सज्जन' आणि नंतरच्या काळातील टेनेसी विल्यम्सच्या 'ग्लास मेनॅजरी'चा नाट्यानुवाद 'काचेची खेळणी' या नाटकांची ही नावेच केवळ आठवली, तरी (त्यांनी ज्या काळात मराठी नाटकाला जे देणे दिले, त्याची कल्पना करता येणे आज कठीण असले; तरी त्यांचे स्मरण आवश्यक आहे. विषयाशयापासून नेपथ्यसंयोजनापर्यंत एकूण एक सर्व नाट्यां-गांच्या संबंधात सर्वतोपरींनी इष्ट अशा पुनर्विचाराची हवा निर्माण केली ती प्रामुख्याने याच अनुवादित नाटकांनी, यात काही एक शंका नाही. नंदकुमार रावते यांनी दिग्द-र्शित केलेल्या 'श्रीमंत', विजया जयवन्त (नंतरच्या खोटे–मेहता) यांनी दिग्दर्शित केलेल्या 'एक होती राणी', अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'बाकी इतिहास' किंवा माधव वाटवे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या मराठी नाट्यानुवादांनी मराठी रंगभूमीच्या कक्षा विस्तृत करण्याच्या कामी अविस्मरणीय साहाय्य केले आहे. अगदी आजचे उदा-हरण द्यावयाचे, तर प्रस्तुत संबंधात सत्यदेव दुबे यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आधे अधुरे' मराठी नाट्यानुवादाचे स्मरण करावे.

प्रस्तुत संबंधातील आणखी एक विचार वर्तकांच्या 'आंधळ्यांच्या शाळे'ने जसे इब्सेन-नाट्य मराठी रंगभूमीवर रुजू केले, त्याचप्रमाणे तदनंतर चालू पाव शतकाच्या अखेरीस माधव वाटवे यांनी 'सिक्स कॅरेक्टर्स'चा मराठी नाट्यानुवाद स्वतःच लिहून व दिग्दर्शित करून पिरान्दलोच्या नाट्य विशेषांची झलक मराठी रंगभूमीला दाखवली. अगदी आज सत्तर साली विजय तेंडूलकरांचे 'गिधाडे' हे नवे नाटक आज प्रायोगिक रंगभूमीवर रुजू होत असले, तरी टेनेसी विल्यम्सच्या परंपरेतील हे मनोविकृतिवाचक भीषण नाटक मराठी रंगभूमीच्या इतिहासात उल्लेखनीय व व्यावसायिक रंगभूमीला उपकारक ठरेल, असे भविष्य वर्तवण्यासाठी कोणा द्रष्ट्याचीच अवश्यकता आहे, असे नाही. प्रयोगिक नाट्यलेखन दर्शनासाठी सरकारी नाट्यस्पर्धेनेही एक अनपेक्षित आणि अमर्याद असे नवे क्षेत्र खुले करून दिले आहे. अलीकडच्या काळात या नाट्यस्पर्धेत जी नवी नाटके सादर केली जातात, त्यांच्यावर या प्रायोगिक रंगमंचाची छाप स्पष्ट उमटलेली आढळून येते. निखारे, शांतता! कोर्ट, ग्रॅन्ड रिडक्शन सेल, चक्रावर्तसारख्या नाट्यकृती नुसत्या आठवल्या, तरी उपर्युक्त विधानाची साक्ष सहज पटेल.

गेल्या दोन तपांतील मराठी नाटकांचा इतिहास मराठी एकांकांच्या कर्तृत्व-निवेदनाशिवाय पुरा होणार नाही, असे म्हटले, तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. एकांक हा एक सर्वस्वी स्वतंत्र असा नाट्यप्रकार आहे, आणि एक स्वतंत्र नाट्य-प्रकार म्हणूनच त्याची निर्मिती व जोपासना करावयास हवी; अशी जाण ज्यांनी प्रथम सप्रयोग व्यक्त केली, त्यांच्यामध्ये माधव मनोहर व अनंत काणेकर हे अग्रगण्य होत. परभाषांतील उत्तमोत्तम अशा अनेकानेक आदर्श एकांकांचे अनुवाद माधव मनोहर यांनी प्रथम लिहून प्रकाशित करावयास सुरुवात केली, तर काणेकरांनी ' बांदिवलीच्या मास्तरणी 'सारखे सरस एकांकानुवाद तर केलेच, पण त्याशिवाय ' घर 'सारखे काही मर्माशयसंपन्न असे स्वतंत्र एकांकही त्यांनी लिहिले आहेत. आजच्या प्रतिभासंपन्न एकांककारात पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी आणि महेश एल-कुंचवार यांचे एकांकलेखन लक्षणीय ठरावे, अशा योग्यतेचे आहे. सरकारी नाट्यस्पर्धेने जशी प्रायोगिक नाट्यकर्तृत्वास चालना दिली, तशीच ' भारतीय विद्याभवन 'ने प्रवर्तित केलेल्या आन्तरमहाविद्यालयीन एकांक स्पर्धेने स्वतंत्रपणे एकांककर्तृत्वास चालना दिली. आत्माराम भेंडे, विजया मेहता, अरविंद देशपांडे, दामू केंकरे, रमाकान्त देशपांडे प्रभृतींचे आवश्यक ते दिग्दर्शनसाहाय्य एकांकदर्शनास न लाभते, तर संभव आहे की एकांक हा नाट्यप्रकार लेखनापुरताच मर्यादित, अदृश्य व म्हणून काही अंशी उपेक्षित राहिला असता. न्याय्य नाटकापेक्षाही एकांकलेखनदर्शनात प्रयोगशीलता आधिक्याने प्रकट झालेली दिसते, आणि मराठी नाटकाच्या तुलनेने मराठी एकांक अधिक प्रयोगक्षम व ऐश्वर्यसंपन्न दिसतो; ही वस्तुस्थिती आहे.

मराठी नाट्यकर्तृत्वास प्रारंभ केव्हा झाला, कोण जाणे. पण तंजावरचे भोसले किंवा सांगलीचे भावे यांनी मराठी भाषेतील पहिली नाट्यरचना केली असेल, ही एक भ्रान्त समजूत आहे. त्या समजुतीचा अर्थ एवढाच की, दस्तऐवजी लेखी पुराव्याने सिद्ध करता येण्यासारखे हेच पहिले नाट्ययत्न कदाचित असतीलही. पण मराठी नाटक तत्पूर्वी अस्तित्वातच नसले पाहिजे, हे म्हणणे तर्कवादास रुचण्यासारखे नाही, हे अगदी उघड आहे. मराठी रंगभूमीच्या न्यायसिद्ध प्रस्थापनेस आज शतकाधिक कालावधी लोटला असला, तरी एक गोष्ट मात्र अगदी खरी. बालरंगभूमीचा उदय व तदनंतरचा विकास हा केवळ गेल्या पावशतकाच्या अन्तिम दशकातच घडून आला आहे. पन्नास वर्षांपूर्वीच गडकऱ्यांसारख्या एका प्रतिभाशाली नाटककाराने ' सकाळचा अभ्यास ' नावाचे एक अप्रतिम प्रहसन लिहून ठेवले होते, ही गोष्ट अगदी खरी. तदनंतरच्या काही दशकांत ह्या प्रहसनाचे प्रयोग शाळांच्या संमेलनप्रसंगी झडले असतीलही. पण ' सकाळचा अभ्यास ' हा एक एकाकी यत्न होता, आणि त्याला मराठी भाषेत पूर्वज तर नव्हताच, पण खऱ्या अर्थाने वंशजही कधी लाभला नाही. ते काही असो. बाल-स्वभावाचे असे अचूक मार्मिक व मर्मभेदक दर्शन मराठी साहित्यात अन्यत्र कोठेच उमटलेले आढळत नाही, या घटनेची नोंद करणे अगत्याचे आहे. बालरंगभूमीची

व्याख्या कशीही करा. ‘ सकाळच्या अभ्यास ’चा अन्तर्भाव व्याख्याकृत नाट्यकृतीत होणार नसेल, तर ती व्याख्याच सुधारून घ्यावयास हवी; असे म्हणणे प्राप्त आहे.

—आणि तरीही गेल्या दशकातील बालरंगभूमीचे उत्थापन–प्रस्थापन ही मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एक अवश्य उल्लेखनीय घटना समजावयास हवी. बालरंगभूमीची नितांत आवश्यकता ज्यांना प्रथम पटली व बालरंगभूमीच्या निर्मिती-साठी ज्यांनी अव्याहत निरंतर यत्न केले, अशा व्यक्ती दोनच होत. त्या म्हणजे सुधा करमरकर व रत्नाकर मतकरी. चालू दशकाच्या आरंभी केव्हा तरी सुधा करमरकर अमेरिकेतून बालरंगभूमीचे संकल्पन कल्पनेत घेऊन आल्या व रत्नाकर मतकरींचे लेखन-साहाय्य घेऊन त्यांनी ‘ मधुमंजिरी ’ची परीकथा रंगमंचावर आकारास आणली. बाल-रंगभूमीच्या प्रस्थापनेसाठी जाणीवपूर्वक केलेला हा पहिलाच नाट्ययत्न होय. नंतरच्या काळात या उभयतांनी बालनाट्याचे नानाविध प्रयोग केले, आणि काही एका प्रमाणात ते बालप्रिय अतएव यशस्वीही केले. ‘ काही एका प्रमाणात ’ असे मुद्दामच म्हटले. कारण बालरंगभूमी प्रौढ रंगभूमीच्या स्पर्धेत तगून जगावयाची असेल, तर त्यासाठी त्या दिशेने सरकारने वा धनिक व्यक्तिसंस्थांनी हेतुपूर्वक यत्न करावयास हवेत.

मराठी नाटकाच्या पूर्वकाळात संगीत हे जसे एक साहाय्यक नाट्यांग होते, तसेच अलीकडच्या काळात नेपथ्य आहे. त्यात काही फरक असेल तर तो एवढाच आहे की, संगीताशिवाय नाटक कल्पिता येते व ते कार्यक्षम तर ठरतेच ठरते; पण नेपथ्याशिवाय नाटकाची कल्पनाच करता येत नाही. जाता जाता नेपथ्याभावही नेपथ्याचाच एक प्रत्ययकारक आविष्कार असू शकतो, ही जाण प्रस्तुत संबंधात असणे अत्यावश्यक आहे. मराठी रंगभूमीच्या पूर्वकाळातील नेपथ्य म्हणजे केवळ पडदे, विंगा रंगवण्या-पुरतेच मर्यादित होते. नेपथ्य नाट्यवस्तूस उपकारक ठरावे, एतदर्थ मनःपूर्वक झटणारे वरेरकर-पेंढारकर-पु. श्री. काळे यांच्यासारखे जाणकार त्याही काळात होतेच. पण पडदे आणि नेपथ्य त्या काळात एकरूप असल्यामुळे नाट्योपकारक नेपथ्याचा विचार तेव्हा स्वतंत्रपणे फारसा होऊ शकला नाही, आणि तसा विचार झालाच असल्यास तो विचार आचारात कधी फारसा व्यक्त झाला नाही. नेपथ्यविचाराच्या संबंधात एक नवी जाण तज्ज्ञांच्या मनात निर्माण करण्याचे श्रेय प्रामुख्याने ‘ आंधळ्यांच्या शाळे ’च्या नाट्य-प्रयोगाचे व त्या नाट्यप्रयोगाचे नेपथ्यकार नी. म. केळकर यांचे आहे. तदनंतरच्या काळात वस्तुदर्शी नेपथ्याचे दर्शन रंगमंचावर घडवण्यात आत्माराम भेंडे यांचे सहकारी श्याम अडारकर यांचे नेपथ्यकर्तृत्व लक्षणीय ठरावे. अलीकडच्या काळात रघुबीर तळाशीलकर हे नाट्योपयुक्त नेपथ्यसंकल्पनाच्या संबंधात अग्रगण्य ठरतील. आनंद पै, श्रीधर राजगुरु, बाबा पार्सेकर, पांडुरंग कोठारे, राम शितूत, इत्यादी नेपथ्यकारांनी मराठी रंगमंच घडवण्याच्या कामी जे श्रम वेचले आहेत, त्यांची नोंद अवश्य करावयास हवी.

—पण एका काळी संगीताने जसा मराठी नाटकाचा गळा आवळला, तसाच

काहीसा प्रकार नेपथ्याच्या संबंधात घडणार किंवा काय, असा भयसंशय उत्पन्न होण्यासारखी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. सरकता रंगमंच, फिरता रंगमंच, जॅक-नाईफ रंगमंच वगैरे प्रकारच्या रंगमंचांचे मराठी रंगमंचावरील आक्रमण तर आज सहज दिसण्यासारखे आहे. सरकारी नाट्यस्पर्धेत सादर करावयाच्या नाट्यप्रयोगांसाठी स्पर्धक नाट्यसंस्था प्रत्येकी हजारो रुपयांचे नेपथ्य रंगमंचावर थाटत असल्याचे विस्मयकारक दृश्य आज दिसत आहे; आणि कित्येक व्यावसायिक नाट्यसंस्था तर नेपथ्यासाठी नेपथ्य अशी एक नवी घोषणा आकारास आणण्याच्या यत्नात असल्यासारख्या दिसत आहेत. परिणामी परिणाम असा होणार आहे की, भव्य नेपथ्याच्या मांडणीत बिचाऱ्या नटनटींनाच कळसूत्री बाहुल्यांची कळा प्राप्त होईल. परवापरवापर्यंत जगात सर्वत्र परिस्थिती अशी होती की, नेपथ्याभाव हेच रंगमंचावरील नेपथ्य होते. शेक्सपीअरच्या काळातील नागवा उघडा, मोकळा रंगमंच तर विख्यातच आहे. अशा रंगमंचावरच अभिनयाचा खरा कस लागतो. पण आज अन्य औद्योगिक क्षेत्रात जसा माणूस यंत्राधीन झाला आहे, तसाच नटही नेपथ्ययंत्राधीन होण्याचा संभव आज सर्वत्र दिसत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, संगीत काय किंवा नेपथ्य काय, मूलभूत नाट्यास ते साहाय्यक–उपकारक ठरावे. संगीतनेपथ्यादी घटकांनी नाट्यगत रस साक्षात प्रत्ययकारक करण्यासाठी झटावे. पण तसे होत नाही. दासीने आपली पायरी सोडून राज्ञीमंचाचा कबजा घेतल्यासारखी आजच्या मराठी रंगभूमीची नेपथ्यसंबंध नाट्यावस्था आहे.

ही झाली गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाट्यसंबद्ध घटनांची नोंद. ही नोंद जर त्रोटक झाली असेल, तर दिलेल्या पृष्ठमर्यादेत अशी त्रोटक नोंद अपरिहार्यच होती; हे सहज पटण्यासारखे आहे. पृष्ठमर्यादेची मर्यादा नसती, तर अत्रे-कानेटकर-तेंडूलकर यांच्यापैकी कोणाही एकाच्या एकाच नाटकाच्या संबंधात एक एक ग्रंथ सहज रचता आला असता. कोणतेही इतिवृत्त म्हटले की ते त्रोटक, संक्षिप्तच असणार. त्यातील नोंदींच्या स्पष्टीकरणासाठी अन्यत्र शोध घ्यावा. तसेच हे एक इतिवृत्त आहे. गेल्या पाव शतकातील मराठी नाटकाचे त्यातील न्यून काय, याची जाणीव प्रस्तुत लेखकाला आहे; आणि सहृदय वाचकांना त्याची अशी प्रार्थना आहे की, त्यांनी न्यून ते पुरते करून घ्यावे. इतउत्तर सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

महायुद्धोत्तर मराठी कादंबरी

नरहर कुरुंदकर

दुसऱ्या महायुद्धानंतर मराठी वाङ्मयात सगळाच बदल क्रमाने घट्ट लागला होता. १९४५ च्या आधीच्या १० वर्षांत, समकालीन कथा, काव्य, कादंबरी, नाटक, लघुनिबंध याविषयीचे असमाधान अधूनमधून व्यक्त होत होतेच. १९४५ नंतर हे असमाधान अधिक तीव्र स्वरूपात व्यक्त होऊ लागले. रंजनात्मक वाङ्मयाबाबत क्रमाने असे आढळून येऊ लागले की, ही भूक भागविण्याचे काम मासिकांच्यामधून, रहस्यकथामालां मधून, शृंगार व प्रणय यांना वाहिलेल्या पुस्तिकांकडून मोठ्या प्रमाणात होऊ लागले. १९४५ नंतर लवकरच स्वातंत्र्य प्राप्त झाले. पारतंत्र्याच्या काळात 'रंजनाची सामग्री' म्हणून 'ध्येयवादाला' जशी मागणी होती तशी पुढे राहिली नाही. स्वातंत्र्य येत असताना ज्या घडामोडी झाल्या, आणि १९४७ च्या नंतरच्या दोन-तीन वर्षांत भ्रमनिरा-साची जी एक प्रचंड लाट निर्माण झाली, त्यामुळे नायक 'देशभक्त' दाखविणे याची कुणाला हौस उरली नाही. स्वातंत्र्योत्तरकाळात मोठ्या प्रमाणात सुशिक्षित असणारा पण त्या प्रमाणात अभिरुचिसंपन्न नसलेला वाचकवर्ग झपाट्याने उदयाला आला. त्याच्या रंजनासाठी जो भडकपणा आणि कडकपणा आवश्यक होता तो उपलब्ध करून देणे फडके यांनाही शक्य नव्हते. वाङ्मयाविषयीची सुजाण जाणीवही नव्याने निर्माण होत होती. या बाबतीत मराठीतील पहिली प्रतिक्रिया ठसठशीतपणे नवकाव्यरूपाने दृग्गोचर झाली. नवकाव्याने आरंभीच्या काळात जो वाचकांच्या अभिरुचीला हादरा दिला त्याचे परिणाम एकूण वाङ्मयविषयक अपेक्षाच अधिक डोळस होण्यात झाले. नव-काव्याच्या पाठोपाठ नवकथाही जन्माला आली. त्या मानाने मराठीतील नव्या कादं-बरीचा जन्म बराच उशीरा झाला असे म्हणावे लागेल. काव्याच्या क्षेत्रात केशवसुत आणि मर्ढेकर यांच्यात जसा फरक जाणवतो तितका फरक पेंडसे व हरिभाऊ यांच्यात जाणवत नाही. रंजनाचे फडकेयुग संपल्यानंतर महायुद्धोत्तरकाळात मराठी कादंबरी

पुन्हा एकदा वास्तविक जीवनाकडे वळत असताना हरिभाऊंच्या जवळ सरकली, इकडे यापूर्वीच लक्ष वेधले गेले आहे.

ही नवी मराठी कादंबरी प्रामुख्याने श्री. ना. पेंडसे यांच्या लेखनातून साकार होत गेली. पेंडश्यांची पहिली कादंबरी ‘ एल्गार ’ अगदीच सुमार अशी होती. ‘हद्दपार’-पासून ते एकदम प्रकाशाच्या झोतात खेचले गेले, आणि ‘ गारंबीचा बापू ’ या कादंबरीत पेंडश्यांनी आपल्या यशाचा उच्चांक निर्माण केला. आपण स्वतःच निर्माण केलेले हे यश पुन्हा कधीही पेंडसे ओलांडू शकले नाहीत. साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेली त्यांची कादंबरी ‘ रथचक्र ’ हीसुद्धा ‘ गारंबीच्या बापू ’जवळ फिरकू शकली नाही. नव्या कादंबरीचे निर्माते म्हणून पेंडसे यांचे यश बव्हंशी ‘ गारंबीच्या बापू ’ वर अवलंबून आहे.

ज्या वेळी ही कादंबरी प्रथम प्रकाशित झाली त्या वेळी प्रामुख्याने गौरव झाला असेल तर तो पेंडसे यांच्या अत्यंत स्वाभाविक आणि तरीही तलम, मुलायम असणाऱ्या भाषाशैलीचा. कारण हरिभाऊ व वामन मल्हार यांच्या भाषाशैलीतील साधेपणाचे व अकृत्रिमतेचे सर्व सौंदर्य मान्य करूनही नाजूक व तरल अनुभवाच्या चित्रणाला ही शैली अपुरी पडते असे सर्वांना जाणवतच होते. फडके यांच्या आकर्षक शैलीची स्तुती करतानाही तिचा तटस्थ परकेपणा टीकाकारांना मधूनमधून खुपतच असे. त्यामुळे अकृत्रिमतेचे माधुर्य आणि निरोगीपणाची स्वाभाविक मुलायम कांती, जिवंत सौंदर्याचा सहज टवटवीतपणा असणारी पेंडसे यांची शैली जर सर्वांना कौतुकाचा प्रमुख विषय वाटली तर त्यात नवल मानण्याचे कारण नव्हते. फडकेयुगापासून संवाद व निसर्गवर्णने यांना कादंबरीत भाव आलेला होता. दिघे यांच्या उन्मादकारी निसर्गवर्णनांनीही एक छाप वाचकांच्यावर टाकलेलीच होती. याही बाबतीत पेंडसे हे भाग्यवान होते. त्यामुळे त्यांची निसर्गवर्णने व त्यांचे संवाद, त्यातील घरगुतीपणा हा कौतुकाचा दुसरा विषय ठरला. स्वतः पेंडसे यांनाही आपण निर्माण केलेल्या कलाकृतीचे पूर्ण आकलन झाले होते असे वाटत नाही. त्यांनी प्रस्तावनेत कादंबरी लिहितानाच्या बेहोषीचा जो उल्लेख केला आहे तो एरवी त्यांनी केला नसता. यामुळेच या कलाकृतीचे आकलन होण्यात फार मोठे अडथळे निर्माण झाले. काही जणांना तर ‘ नंदनवनाच्या ’ परिभाषेत ही कादंबरी समजून घेणे सोयिस्कर आहे असे वाटू लागले. पेंडसे यांच्या या कादंबरीकडे नंदनवन म्हणून पाहणे म्हणजे तिचे स्वरूप पुन्हा एकवार स्वप्नरंजनाचेच आहे याला मान्यता देणे हे होय; इकडेही कुणी फारसे ध्यान दिले नाही. हे सर्व करीत असताना एका महत्त्वाच्या बाबीकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले, ती बाब म्हणजे तंत्राच्या साऱ्या चौकटी या कादंबरीत पेंडश्यांनी ठिकठिकाणी मोडून टाकल्या आहेत. जे जे करू नये म्हणून फडकेयुगातील कादंबरीकार सांगत असत. बारकाईने पाहता, त्या सर्व बाबी या कादंबरीत आहेत ही गोष्ट दिसून येईल. उत्कंठा वाढविण्याच्या ऐवजी ती आधीच तृप्त करून टाकणे हे पेंडश्यांचे तंत्र आहे. अगदी उपान्त्य प्रकरण जरी घेतले तरी त्यात हा प्रकार

दिसून येतो. गारंबीचा सरपंच होण्याची बापूची महत्त्वाकांक्षा होती. क्रमाने एकेक डाव त्याच्या विरोधी जात राहिला, आणि शेवटी सरपंचपदाच्या लढ्यातून माघार घेण्यापर्यंत बापू आला. इतके सांगून झाल्यावर पेंडसे म्हणतात तरीही बापू सरपंच झाला. अण्णा खोतांनीच त्याचे नाव सुचवले. ही पद्धत म्हणजे उत्कंठा मारण्याची पद्धत नव्हे काय? बापू आणि राधा यांच्या मीलनावर कादंबरी संपविण्याच्याऐवजी नायक-नायिकांचे मीलन कादंबरीच्या मध्यावर घडवून आणणे हा तंत्राला अजून एक धक्का नव्हे काय? कथानकाच्या ओघात सहजगत्या नवनवी पात्रे आणण्याच्या ऐवजी महत्त्वाचे नवे पात्र प्रवेश करताना थोडे थांबून तपशिलाने त्या पात्राचे चरित्र सांगणे; हाही असाच तंत्र-विरोधी उद्योग नव्हे काय? पण पेंडश्यांनी हे सर्व प्रमाद आपल्या कादंबरीत लीलया पचवून दाखविले आहेत. कथानकाची मांडणी, त्यातील कलाटण्या, अनपेक्षित योगा-योग, हे या कादंबरीचे सामर्थ्यच नव्हते. जीवनाचा जो पट पेंडसे उलगडीत होते त्या पटाचा अस्सलपणा आणि एकजीवपणा हे या कादंबरीचे यश होते. याहीपेक्षा महत्त्वाची एक गोष्ट या कादंबरीत साकार झाली आहे. ती म्हणजे मराठीत प्रथमच निसर्ग आणि वातावरण हे, पार्श्वभूमी व सजावट म्हणून न येता, इथे पात्र म्हणून आले. नायक-नायिकांच्या मीलनाला उद्दीपन-विभाव म्हणून येणारे उद्यान निराळे कादंबरीभर रंजनाची सोय म्हणून येणारे निसर्गवर्णन निराळे आणि त्या कादंबरीतील प्रमुख पात्रांच्यापेक्षाही अधिक जिवंत असणारे एक पात्र म्हणून येणारे निसर्गाचे, समृद्ध सुव्यक्तिमत्त्वाचे संपन्न असे, रूप निराळे. पेंडश्यांच्या कादंबरीत एक भव्य, भीषण दर तितकाच क्षुद्र, निर्घृण पण परिणामकारक अशा विविध कडा असणारे व्यक्तिमत्त्व, निसर्गाला प्राप्त झाले आहे. पेंडश्यांच्यानंतर हा प्रयोग इतरांनीही करून पाहिला, पण त्यात पुन्हा कोणाला यश आलेले दिसत नाही.

पेंडश्यांच्या कादंबरीतील मुलायम शैलीमुळे व त्यांच्या विशिष्ट निवेदनपद्धतीमुळे जर मुख्य अडचण होत असेल तर ती ही की, वास्तवाचे किती भीषण दर्शन या कादंबरीत घडलेले आहे हेच मुळी समजत नाही. या कादंबरीत सारे 'रमणीय' ही क्षुद्र आणि भीषण या दोन पातळ्यांवरील वास्तवाच्या देहावर चढलेली झळाळी आहे. वास्तविक जीवनाच्या आकलन-अवलोकनात ठिकठिकाणी असणारा भयानकाचा जबडा मराठी कादंबरीने इतका उघडून कधी पाहिला नव्हता; आणि भयानकाला इतके लोभस आणि देखणे रूप यापूर्वी कधी कुणी आणून दिलेले नव्हते. एखाद्या फुलामधून दोन पराग बाहेर यावेत आणि ते वाऱ्यावर डुलावेत व या पुष्पसृष्टीचे दर्शन घेण्यासाठी जवळ जातानाच त्या नागिणीच्या विषारी जिभा आहेत हे ज्ञान व्हावे म्हणजे जसा धक्का बसतो, तसा धक्का 'गारंबीचा बापू' ही कादंबरी उलगडून पाहताना बसू लागतो, ही गोष्ट सामान्यत्वे कुणी ध्यानात घेत नाही.

महायुद्धोत्तरकाळात पेंडसे यांचे स्थान थोडेफार हरिभाऊंसारखे आहे. हरिभाऊंनी ज्याप्रमाणे मुक्तामालेपासून 'पण लक्षात कोण घेतो?' पर्यंत झेप घेऊन कलेचा एक

टप्पा गाठला तसा पेंडश्यांनी ' जादुगार ', ' दौलत ' वरून ' गारंबीचा बापू ' पर्यंत झेप घेऊन दुसरा टप्पा गाठला. हरिभाऊंची कादंबरी प्रयोजनवती होती. बोधवादाच्या कक्षा ओलांडून ती कलात्मक झाली हा हरिभाऊंच्या अस्सल प्रतिभेचा विजय आहे. पण पेंडश्यांची कादंबरी स्वयंभूच आहे. वास्तवाविषयी, मानवी जीवनाविषयी, त्याच्या बऱ्यावाईट स्वरूपाविषयी पेंडशांचे कुतूहल निर्भेळ आहे म्हणून ही कादंबरी जीवनाप्रमाणे अनेक पदरी अनेक थरी अशी होते. सुखान्त अगर शोकान्त असा किनारा या अफाट समुद्राला कधी नसतोच. याचा अर्थ पेंडश्यांना मर्यादा नाहीत असे नव्हे. चढउतार न होता बापूचे यश सारखे चढतच राहते हा भोळा स्वप्नाळूपणा इथे आहेच. यशोदेला पुन्हा मूल होत नाही आणि रावजी सोयीस्करवेळी मरून, विनापत्य राधा बापूला उपलब्ध करून देतो हाही भोळेपणा या कादंबरीत आहे. बापूच्या बेछूटपणाला कधी व्यावहारिक धक्का बसत नाही, व्यापारातील यश बापूला कधी व्यवहारी करीत नाही, राधेच्या मनात थोडासुद्धा कडवटपणा उत्पन्न होत नाही. सपाट बापूला कधी यशच मिळत नाही, यशोदेला तारुण्यात कधी पश्चात्ताप होत नाही, बापू कधी अधःपतित होतच नाही हा स्थूलपणा व स्वप्नाळूपणा या कादंबरीत आहेच. ज्या भयानकाच्या चित्रणाला आपण हात घालतो आहोत त्यातील सुप्त स्फोटकपणा आणि भेसूरपणा यावर पेंडश्यांची पकड पुरेशी मजबूत नाही हे ठिकठिकाणी जाणवते. पण हे दोष पचवूनही ज्या उंचीवर ही कलाकृती गेली आहे ती उंची अजून महायुद्धोत्तरकाळात इतर कुणी गाठली नाही हे सत्य शिल्लकच राहते.

गारंबीच्या बापूला मिळालेले यश पाहता थोरामोठ्यांना त्याच्या अनुकरणाचा मोह व्हावा ही गोष्ट स्वाभाविक होती. विशेषतः ' गारंबीच्या बापूचे ' निसर्गचित्रणाच्या बाबतीत फार मोठे कौतुक झाले. निसर्गचित्रण आणि ग्रामीण जीवन हा आपला खास प्रदेश मानणाऱ्या लेखकांनी पेंडश्यांवर मात करण्याची जिद्द मनात धरली असेल तर त्यात नवल नाही. अशा प्रकारची कादंबरी माडगूळकरांची ' बनगरवाडी ' ही एक आहे. पेंडश्यांच्या कादंबरीतील हळवेपणा, मुलायमपणा टाळून राकट व ओबडधोबड असे कणखर जीवन रंगवून आपण वास्तवाच्या अधिक जवळ जाऊ असे गणित माडगूळकरांनी मनाशी बांधलेले दिसते. या परिणामी ' बनगरवाडीत ' निसर्गाची अत्यंत तपशिलवार चित्रे आहेत. पण खराखुरा निसर्ग कितीही काळजीपूर्वक, कितीही तपशिलाने आणि कितीही बारकाईने चित्रित केला तरी तो फोटो होतो, वृत्तान्त होतो. त्यातील हुबेहूबपणा आणि बारकावा जिवंतपणाची जागा कधी घेऊच शकत नाही. ग्रामीण राकटपणा दाखविण्यासाठी रामोशी आणले, ऐबू आणला, उंचच उंच असणारी शेकूची बायको आणली, उनाड अंजीची तितकीच भडक प्रेमकथा घेतली, दणकट माणसाने हात धरताच ती पळाली असे सांगितले, बैलाऐवजी बायकांनी नांगर चालविला, मास्तरचे कर्तृत्व दाखविण्यासाठी पंत सरकारचे आगमन झाले तरी हे सारे चित्रण कधी भरीव होऊ शकत नाही. त्याचा एकेरीपणा कधी मावळत नाही. चांगल्या

रिपोर्टाजच्या ठिकाणी जी 'प्रत्ययकारिता' असते तिच्या पलीकडे जाऊन कादंबरीला कलात्मक पातळी गाठावी लागते. 'बनगरवाडी'चे कितीही कौतुक केले तरी तिचे हे स्वरूप झाकता येणे कठीण आहे. 'गारंबीचा बापू'च्या संदर्भात 'प्रादेशिक' व 'ग्रामीण' ही विशेषणे निरर्थक ठरतात. तेथील जीवन खास गारंबीचे असूनही गारंबीच्याच चौकटीत अडकत नाही; 'बनगरवाडीत' असे होत नाही. ग्रामीण जीवनाचा तपशील 'गारंबीच्या बापू'पेक्षा 'बनगरवाडीत' अधिक आहे, पण शेवटी ही कादंबरी आपल्या प्रदेशाच्या चौकटीत अडकून पडते. माडगूळकरांच्या जवळ हळवेपणा नाही हे खरे असले तरी भोळेपणा आहे. वास्तवाच्या आकलनाला हा भोळेपणा, हा नाटकी हळवेपणा इतकाच अपायकारक असतो. निसर्गचित्रणात माडगूळकरांच्यापुढे गो. नी. दांडेकर गेले आहेत.

पेंडसे, माडगूळकर हे एकेका प्रदेशात मुरलेले असतील, पण दांडेकरांचा व्याप यापेक्षा मोठा आहे. कोकण, सातारा, खानदेश, मराठवाडा, वऱ्हाड कुठलाही ग्रामीण भाग दांडेकरांना चालू शकतो. तेथील निसर्ग, ग्रामीण बोली, तिच्या लकबा दांडेकरांना सहजसाध्य आहेत. शरच्चंद्रांच्याप्रमाणे ते मानसिक आंदोलने रंगविण्याची पोज घेऊन आपली 'यशोदा' उभी करू शकतात. मुन्शी प्रेमचंदाच्या राकटपणासारखे 'पवनाकाठच्या धोंडीत' एक मानी चित्र रेखाटू शकतात. दांडेकरांचा हा व्याप मान्य करूनही ते कुठेच खऱ्या अर्थाने कलात्मक होऊ शकत नाहीत हे नोंदविणे भाग आहे. 'माचीवरल्या बुधात' वृक्षवेलींची, लतापुष्पांची जी तपशीलवार माहिती आहे तितकी यापूर्वी मराठीत कुठेच आलेली नव्हती. हा सर्व तपशील दांडेकर वाचनीय बनवितात हे त्यांचे यश. पण 'नीटस आणि देखणी' 'वाचनीय व वैविध्यपूर्ण' अशी शेकडो निसर्गवर्णने मिळूनही निसर्ग हे, व्यक्तिमत्त्व असणारे जिवंत पात्र होऊ शकत नाही ही दांडेकरांची मर्यादा आहे. निसर्गाच्या सहवासात सर्वस्वी स्वतःला हरवून जाणारा बुधा रंगवायला दांडेकर बसले पण त्यांना बुधाचे मन रंगवता आले नाही. बुधा शेती करतो, विमान पाहून जेवतो, कुत्र्यावर माया करतो, आवळीला मुलगी मानतो, खारींना भाकर घालतो हे खरे असले तरी निसर्गाच्या सूक्ष्म आकलनात बुधा हरवलेला नाही, निसर्गाचे सारे रंगरूप बुधा नव्हे, तर निवेदक कादंबरीकार टिपतो. ही निवेदने बुधाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करीत नाहीत, बुधाच्या चित्राला फक्त लांब रुंद अशी पार्श्वभूमी तयार करतात. दांडेकरांना दिसणारा निसर्ग विविध फुलांनी फुलणारा आहे. या निसर्गाला फुले आहेत, पालवी आहे, गंध आहे, पण काटेरीपणा, रुक्षपणा, भयाणपणा, अजस्रपणा हे थर या निसर्गाला नाहीत. कारण हा निसर्ग मायाळू आहे. कुत्र्याने पाठलाग केला तर ससा फार तर मागच्या पायाने माती उडवीत पळतो. एकमेकांच्या संहारावर आधारलेले भयाण निसर्गाचे चित्र आणि संहाराच्या विळख्यास नव्या जोमाने लसलसणारे प्राणिमात्र यांचे दर्शन दांडेकरांना होतच नाही. त्यांच्या निसर्गात उंच वृक्ष फक्त बसण्याची खुर्ची होतात आणि मधून मधून एखादा चित्ता बुधाला आपले प्राणिप्रेम दाखविण्याची

संधी उपलब्ध करून देतो. दांडेकरांच्या शैलीत असणारा प्रवाहीपणा, त्यांनी टिपलेला तपशील मान्य केला तरी त्या लेखणीत त्यांनी चित्रित केलेल्या जीवनात एक उथळ नकलीपणा आहे ही जाणीव कधी लपत नाही.

'गारंबीच्या बापू 'नंतर मराठी कादंबरीतील दुसरा प्रयोग रणजित देसाईंची 'स्वामी ' हाच म्हणावा लागेल. शुद्ध कलात्मक भूमिकेतून विचार करायचा तर समकालीन वास्तवाविषयी जसे निर्भेळ कुतूहल लेखकाला असू शकते, तसे निर्भेळ कुतूहल ऐतिहासिक कादंबरीला शक्य नसते. ज्या प्रसंगावर कादंबरी लिहायची त्या प्रसंगांचे ऐतिहासिक महत्त्व व नाट्य लेखकाला गृहीत धरावेच लागते. ज्या व्यक्तीविषयी आपण कादंबरी लिहितो तिच्याविषयीचा उत्कट आदर आणि अनादर त्या व्यक्तिरेखेवर परिणाम करतोच; आणि ऐतिहासिक वास्तव इतिहासाच्या पुराव्यांनी सिद्ध केलेले असते त्याची काही बंधने याही कादंबरीवर पडतातच. या सगळ्या मर्यादा मान्य करून 'स्वामी 'चे अपूर्वत्व लक्षात घ्यावे लागेल. 'स्वामी 'ला जे यश महाराष्ट्रात मिळाले त्याला कारण रणजित देसाईंच्या सामर्थ्याइतकेच थोरल्या माधवरावांचे सामर्थ्य हेही आहे. अशा प्रकारची वाचकप्रियता फार तर शिवाजी आणि पहिला बाजीराव यांच्यावर लिहिलेल्या कादंबऱ्यांनाच मिळू शकेल; उरलेल्या ठिकाणी असे वाचकप्रियतेचे यश मिळणे थोडे कठीणच आहे. या साऱ्या बाबी मान्य केल्या तरी एक गोष्ट शिल्लक राहते. ती म्हणजे 'स्वामी' ही कादंबरी रंजनात्मक कादंबरी नसून कलात्मक कादंबरी आहे. इतिहासाने गोळा करून दिलेला माधवरावांच्या जीवनाचा पट मनोरंजक करण्यासाठी संकटे, सुटका, साहसे आणि योगायोग यांना वाव करून देणारे कोणतेही उपकथानक घेण्याची गरज देसाईंना वाटली नाही. थोरले माधवराव या व्यक्तीच्या आकलनावर आणि ह्या व्यक्ती सर्व सामर्थ्याने जिवंत करून दाखविण्यावर या कादंबरीत सर्व भर दिलेला आहे याचा अर्थच हा की या कादंबरीचे सामर्थ्य कथानकात नसून किंवा कथानकाच्या मांडणीत नसून व्यक्तिरेखेच्या उभारणीत आहे. ही व्यक्तिरेखेची उभारणी करताना सारे ऐतिहासिक वास्तव गृहीतच धरलेले आहे. इतिहासाला ज्ञात असणारा कोणताही महत्त्वाचा प्रसंग लेखकाने टाळला नाही अगर इतिहासाला अज्ञात असणारा एखादा महत्त्वपूर्ण प्रसंग नाट्याची गरज म्हणून वापरून व्यक्तिरेखा शबलित केली नाही. कानेटकरांच्यासारख्या नाटककारालाही नाट्यपरिणामाच्यासाठी मोगलांच्या छावणीत वेष पालटून शिवाजी गेला व त्याने संभाजीला समजावून आणले हा प्रसंग घालण्याचा मोह सोडवत नाही. असा कुठलाही नाटकीपणा न करता 'स्वामी ' कादंबरी सामर्थ्याने उभी आहे. वास्तवाचे नुसते आकलन अगर अवलोकन कलाकृतीला पुरे पडत नाही. कलाकृतीत व्यक्त होणाऱ्या अनुभवाच्या ठिकाणी सलगता, स्वयंपूर्णता असावी लागते. यासाठी ऐतिहासिक वास्तवात कोणती तरी संगती शोधणे भाग असते. ही संगती शोधताना रणजित देसाईंनी आपले खरे कलात्मक मन प्रकट केलेले आहे. सर्व सामर्थ्यानिशी मराठी साम्राज्याची विस्कटलेली घडी पुन्हा मांडणारा करारी, दृढनिश्चयी आणि

कर्तबगार असा हा पेशवा आपल्या सामर्थ्याने कोसळणाऱ्या प्रवाहाला वळण लावून नव्याने सर्व घडी नीट बसवतो, पण हे करण्याच्या प्रयत्नात सर्वस्वाची किंमत त्याला द्यावी लागते. त्यामुळे विजय हाताशी आणताना सर्व शक्ती वापरून संपलेल्या आणि ऐन विजयाच्या क्षणी मरणाच्या दारात पडलेल्या एका सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्वाच्या जीवनातील महान दैवदुर्विलास ही माधवरावांच्या जीवनातील देसाईंना सापडलेली 'आकृती' आहे. विजयाची किंमत इतकी द्यावी लागावी की ही किंमत देऊन विजय मिळविताना तो प्याला ओठाशी आला असताना चव घेण्याचेही भान राहू नये आणि संधीही मिळू नये असे माधवरावांचे जीवन आहे. या कादंबरीत कल्पित नाही असे नाही. रमाबाईची सर्व जीवनगाथा कल्पितच आहे. इतिहासाला फक्त दोनच बाबी ज्ञात आहेत. पहिली म्हणजे रमाबाई माधवरावांची पत्नी होती आणि दुसरी म्हणजे ती त्यांच्याबरोबर सती गेली. रमाबाईच्या रूपाने जे एक संसारचित्र उभे आहे ते इतिहासाच्या संदर्भात संपूर्ण काल्पनिक आहे तरी मानवी जीवनाच्या संदर्भात ते माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा अधिक सत्य आहे. 'ऐतिहासिक कादंबरीत कल्पिताचा वापर ऐतिहासिक वास्तवाला अनुभवाच्या पातळीवर जिवंत करण्यासाठी व या वास्तवाला नवनवी परिमाणे देण्यासाठी होत असतो' हे विधान संपूर्णपणे लागू पडणारी ही मराठीतील पहिलीच कादंबरी. 'ऐतिहासिक कादंबरीचाही भर परिस्थिती व व्यक्ती यांच्या वास्तविक आकलनावरच असतो' हे विधानही याच कादंबरीला लागू पडते. या कादंबरीत ऐतिहासिक दृष्टीने घटनेच्या चुका नसल्या तरी लेखकाने पेशवाईचे जे वातावरण चित्रित केले आहे ते बरेच वादग्रस्त आहे हे कबूल करूनसुद्धा ऐतिहासिक हे नाव घेणारी आणि तरीही कलात्मक असणारी 'स्वामी' ही पहिलीच मराठी कादंबरी आहे हे नाकारता येणार नाही.

माधवरावांची व्यक्तिरेखा घेताना थोर व्यक्तींच्या ठिकाणी असणारा विलक्षण आग्रहीपणा लेखकाने अचूक टिपला आहे. प्राणघातासाठी तलवार मागणारा आणि ती मिळत नाही म्हणून आपल्या हुजऱ्याला फटके मारणारा माधवराव थोर माणूस असला तरी थोर व्यक्तींच्या बाबतीत ज्या 'सपक व मचूळ' कल्पना हरिभाऊ, नाथमाधव, हडपांनी निर्माण केल्या त्यात तो मावणारा नाही. हा माधवराव आजारीपणात चिडून काकांची अवहेलना करू शकतो. न आवडणारे डाग शरीरावर वागवावेच लागतात त्यात आवडणारा एखादा डाग कपड्यावर असावा असे म्हणू शकतो. तोफा ओतता येत नाहीत म्हणजे काय ? नाही म्हणून मला सांगण्यास येऊ नका, तोच पोलादी रस ओतकाम करणाऱ्यांच्या घशात ओता पण मला तोफा आणून द्या अशी क्रूरपणाची एखादी लकेर माधवरावांमध्ये दिसतेच. एखाद्या ध्येयाने झपाटलेली माणसे थोडीफार अमानुष व कठोर असतातच. तसा माधवरावही आहे. इतिहासातल्या माधवरावांच्या-इतके कादंबरीतील माधवरावांचे व्यक्तिमत्त्व भव्य आहे की नाही? यावर वाद होऊ शकेल. पण हा माधवराव हरिभाऊंनी रंगवलेल्या कौटिल्याप्रमाणे गावगल्लीतला

उचापतखोर भट नव्हे किंवा हरिभाऊंच्या शिवाजीसारखा भाबडा शाळकरी पोर नव्हे. सामर्थ्यशाली, भव्य, उत्कट, कठोर आणि दाहक व्यक्तिमत्त्व माधवरावांच्या व्यक्तिरेखेत यशस्वीपणे ओतण्यात आणि तितकीच करारी, प्रसन्न, एकनिष्ठ आणि सर्व जीवनाच्या उन्हाळ्यातसुद्धा तृप्त असणारी मृदु रमाबाई घडवण्यात रणजित देसाईंचे यश आहे. एका दृष्टीने पाहिले तर माधवरावांचे जीवन सार्थ झाले. इतिहासाने त्याच्यावर टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडताना विजेसारखा चमकून माधवराव खाक झाला. या आगीत आपणही राख होताना रमाबाईला धन्यता वाटली. दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर हे सगळे व्यर्थच गेले नाही काय ? माधवरावानी जो विजय मिळविला तो मिळविण्यातच त्याचा जीवनरस संपला. या विजयाची फळे भोगायला माधवराव राहिलाच नाही. किंबहुना जी मराठेशाही सावरून धरण्यासाठी माधवराव झुंजला ती त्याच्या मृत्यूमुळे शतपट वेगाने लवकर कोसळून पडली. रमाबाईच्याबरोबर सुखाने संसार करून तिचे जीवन आनंदित करणे, हेही माधवरावाला जमले नाही आणि मराठेशाहीची पक्क्या पायावर नवी मांडामांड करून या राजवटीला स्थिर करणे हेही माधवरावाला जमले नाही. मग हे सारे बलिदान व्यर्थच गेले नाही का ? शोकनाट्याची सारी भव्यता गूढता त्याचा सुन्न करणारा विषाद आणि त्यात धन्यतेची जाणीव देणारे जीवनमूल्य, त्यात असणारा दारुण, कठोर वास्तवाचा स्पर्श आणि तितकाच अम्लान माणुसकीचा दरवळणारा गंध यांचा एकत्रितपणे प्रत्यय आणून देणारी ‘ स्वामी ’ ही मराठीतील फारच विरळ अशी कादंबरी आहे.

आणि तरीही तिला मी एक प्रयोग इतकेच म्हटले आहे. कारण अशा कादंबरीची परंपरा निर्माण होणे शक्य नसते. वाङ्मयाच्या मध्यवर्ती प्रवाहावर तिचे ठसे फारसे उमटत नसतात. या प्रयोगासह सध्या मराठीत विविध प्रकारचे प्रयोग करण्याची धडपड दिसून येत आहे. रंजनाचे सूत्र मराठीतील प्रमुख कादंबरीकारांनी केव्हाच मागे टाकलेले आहे. बाह्य वास्तव किंवा अंतर्मनातील वास्तवातीत मानले जाणारे वास्तव शब्दात पकडण्याचा प्रयत्न फार मोठ्या प्रमाणात आज मराठीत घडत आहे. ही क्रिया घडताना वेगवेगळ्या पातळीवरून अनुभव घेण्याची व भिन्न भिन्न पद्धतीने तो व्यक्तविण्याची धडपड चालू आहे. या सर्वच प्रयोगांना कलाकृती म्हणून यश मिळणे कठीण असते, पण असा प्रत्येक प्रयोग त्या वाङ्मयाचा आवाका वाढवीत असतो. या प्रयोगातून मराठी कादंबरीला यापुढे कोणकोणते धुमारे फुटणार आहेत, याचे भविष्य आजच सांगणे कठीण आहे. पण ही प्रायोगिक धडपड मराठी कादंबरीत नवी जाणीव, नवे सामर्थ्य घेऊन येत आहे इतके मात्र म्हणता येईल. अशा सर्वच प्रयोगांचे आजच मूल्यमापन करणे शक्यही नाही, तशी त्याची आवश्यकताही नाही. पण या प्रयोगाच्या बाबतीत जाणवणाऱ्या काही बाबी नोंदवल्या पाहिजेत. त्यातली पहिली म्हणजे संपूर्ण मानवी जीवन हीच एक संपूर्ण कलात्मक कक्षा आहे. मानवी जीवनात विकृती असतेच म्हणून तिचे चित्रण वाङ्मयात येणे अपरिहार्यच आहे. पण विकृतीचेही चित्रण कलात्मक

पातळीवर जावे लागते. विकृतीच्या दर्शनानेही मानवी जीवनाचे आकलन अधिक डोळस व्हावे लागते. केवळ विकृतीला विकृती म्हणून वाङ्मयात जागा नाही. अनीती आणि विकृती यांचे कलेला वावडे नाही. पण तिथेही चित्रणाची सलगता पाहिजे, दर्शनाची अपरिहार्यता पाहिजे. फोटोग्राफी जशीच्या तशी कला म्हणून कधी स्वीकारली जात नाही, मग ती ग्रामीण जीवनाची असो, वऱ्हाडमधील अर्धनागरी जीवनाची असो, मुंबईतील बकाल वस्तीची असो, अगर अंतर्मनातील विकृतीची विचारात, वर्तनात व्यक्त झालेल्या वागणुकीची असो. या साऱ्यालाच कलेच्या पातळीवर न्यावे लागते. याची जाणीव प्रयोग करताना मराठीत क्रमाने कमी होत जाते आहे असा भास होऊ लागला आहे. मानवी जीवनातील भकासपणा, रुक्षपणा यांचे केवळ चित्रण कधी कलात्मक होत नाही. भकासपणा कलात्मक होण्यासाठी तोही उत्कटतेने वाचकांना जाणवावा लागतो. ही जाणीव ठेवून प्रयोग झाले आणि विकृतीच्या शोधार्थ वाङ्मयातून प्रकृती हद्दपार करण्याचा अट्टाहास जर आपण टाळू शकलो तर हे प्रयोग मराठी कादंबरीचा विकास घडवून आणू शकतील.

असे प्रयोग म्हणून खानोलकरांची ' रात्र काळी घागर काळी ', जयवंत दळवींची ' चक्र ', उद्धव शेळके यांची ' धग ', नेमाड्यांची ' कोसला ', एस्. यांची 'आदिमाया' आणि पु. शि. रेगे यांची ' सावित्री ' या कादंबऱ्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. त्यातल्या त्यात ' सावित्री ' हा प्रयोग मला विशेष लक्षणीय वाटतो. खऱ्या अर्थाने मराठी कादंबरी या ठिकाणी काव्याच्या सीमेला येऊन भिडलेली आहे. तसे पाहिले तर कल्पनाविलास, प्रतिभा, अलंकार, रसांचे उत्कट प्रसंग, निसर्गवर्णने या पद्धतीने या कादंबरीविषयी बोलता येणेच शक्य नाही, इतके हिचे स्वरूप संयमित, सूचक आणि नाजूक आहे. उत्कटता आणि सूचकपणा, आवेग आणि संयम हे परस्परविरोधी गुण आहेत ही समजूतच रेग्यांनी पार उधळून दिली आहे. या कादंबरीत संयमित आणि सूचक भाषाशैलीने भावनांची उत्कटता आणि त्यांचे आवेग जिवंतपणानिशी पकडले आहेत. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचे दहापाच पदर फक्त दिसावे आणि त्या व्यक्तिमत्त्वाचा सर्व पट केवळ ध्वनित व्हावा. ही ध्वनित व्यक्तिरेखा सर्व आवश्यक तपशिलाने वाचकांच्या मनात साकार व्हावी; मात्र या मूर्तीकरणाला कादंबरीतील कोणत्या शब्दाने अभिव्यक्त केले याचाच पत्ता लागू नये, असे या कादंबरीत होते. धूसर आणि तरीही रेखीव, तरल; निसटणारे आणि तरीही पूर्ण सापडल्यासारखे वाटणारे एकाच वेळी आशयघन, भावघन आणि विचारघन असणारे असे या कादंबरीतील निवेदनाचे स्वरूप आहे. आणि या कादंबरीतील नायिकाही न मागता मोकळेपणाने आपले सर्वस्व ओंजळीत घेऊन प्रियकरावर उधळणारी, त्याच्या चिंतनात स्वतःला हरवून घेणारी आणि म्हणूनच एकाच वेळी प्रियकराच्या व्यक्तिमत्त्वात इतकी पूर्ण लीन होणारी की प्रियकराच्या साहचर्याची अगर प्राप्तीचीही अपेक्षा न ठेवणारी अशी आहे. या कादंबरीतील लच्छीप्रमाणे मोर आला काय, आणि न आला काय सावित्री आपल्याच नृत्यात मग्न

झालेली ' आनंदभाविनी ' आहे, आणि म्हणून ती कितीही हुरळून गेली तरी खळखळत ओसंडून वाहत नाही, आणि केवढ्याही मोठ्या विफलतेत ती कधी दीन होत नाही. कुठल्याही प्रश्नाला ती विनासंकोच उत्तर देते. किंबहुना स्वतः तितकेच निःसंकोच प्रश्न निर्माण करते. पण सावित्रीने दिलेली उत्तरे निःसंकोच, प्रामाणिक स्वाधीनपतिकेची उत्तरे असे जरी म्हटले तरी त्यामुळे एकूण धूसरपणा कमी होत नाही; वाढला तर थोडा वाढतोच. ' स्वामी 'ची जशी परंपरा होणार नाही तशी ' सावित्री 'चीही परंपरा होणार नाही. महायुद्धोत्तर मराठी कादंबरीची जी वाटचाल झाली आहे तिचे स्वरूप प्रामुख्याने पेंडसे यांच्या कादंबरीचे अनुकरण करणे, अनुसरण करणे हेच आहे. त्यासाठी कुणी ग्रामीण भागात जातो, कुणी शहरात येतो, कुणी निसर्गाला महत्त्व देतो, कुणी माणसाला, कुठे विकृतींना पाहिले जाते तर कुठे विरळ व्यक्तींना. पण सर्वत्र मानवी जीवनातील भव्यता आणि क्षुद्रता, रुक्षपणा आणि रमणीयपणा, नीती आणि अनीती, प्रकृती आणि विकृती सलग करून पाहण्याची एकच प्रवृत्ती दिसून येते. या प्रवृत्तीचे नेतृत्व अजून तरी पेंडसे यांच्याकडे आहे असे म्हटले पाहिजे.

मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा

आनंद यादव

प्रादेशिक वाङ्मय म्हणजे एखाद्या प्रदेशातील लोकजीवन, तेथील संस्कृती त्या प्रदेशाशी निगडित असल्याने त्या संदर्भात निर्माण झालेल्या काही समस्या, काही जीवनसंकेत व रीती यांचे, तेथील लोकांच्या समूहांचे ज्या वाङ्मयात चित्रण होते ते वाङ्मय. प्रादेशिक वाङ्मयात त्या प्रदेशाचे जीवन-चित्रण अपेक्षित असल्याने स्वाभाविकच लोकसमूहांचे चित्रण त्यात अटळ होऊन बसते. ते काहीसे प्रातिनिधिक असावे अशी अपेक्षा राहते.

या प्रादेशिक वाङ्मयात त्या प्रदेशातील शहरी जीवन-चित्रण येऊ नये, अशीही नकळत अपेक्षा असते. वास्तविक 'प्रादेशिक' म्हटल्यानंतर त्या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ अभिप्रेत असतो. पण वाङ्मयाच्या संदर्भात प्रस्तुत शब्द वापरताना त्या प्रदेशातील ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. म्हणून प्रादेशिक वाङ्मय एका अर्थी 'ग्रामीण वाङ्मयच' असते. पण 'ग्रामीण वाङ्मय' असा शब्दप्रयोग मराठीत करीत असताना त्या वाङ्मयाकडून तेथील समूहाच्या ग्रामजीवनाची अपेक्षा नसते. तेथील एखाद्या व्यक्तीचे जीवनदर्शनही ग्रामीण वाङ्मयात चालते. 'बनगरवाडी'सारख्या एखाद्या ग्रामीण कादंबरीला प्रादेशिक स्वरूपही लाभते. शिवाय ग्रामीण वाङ्मयातील एखादी व्यक्तीसुद्धा त्या प्रदेशातील व्यक्तीचे प्रतिनिधित्व करू शकते. आणखी असे की, त्या त्या ग्रामीण लेखकाचे साहित्य एकत्र केले, संग्रहरूपात आले, तरीही ते सामान्याने प्रादेशिक स्वरूपाचे होऊ शकते. उदाहरणार्थ, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांचा कोणताही कथासंग्रह घेता येईल. सारांश, प्रादेशिक वाङ्मयात त्या त्या प्रदेशातील 'ग्राम'विभागाचेच समूह दर्शन अभिप्रेत असते आणि ग्रामीण वाङ्मयात त्या त्या ग्रामविभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते. तो त्या प्रदेशाचाच पर्यायाने एक भाग असतो. कित्येक वेळा ते प्रातिनिधिकही होऊ शकते. 'ग्रामीण' हा शब्द त्या

त्या प्रदेशातील शहरी वाङ्मयाला आपोआप व्याघात करणारा आहे. म्हणून 'प्रादेशिक वाङ्मय' असे न म्हणता या सर्वांना मिळून 'ग्रामीण वाङ्मय' असाच शब्दप्रयोग करणे जास्त योग्य वाटते.

मराठीतील ग्रामीण वाङ्मयाला १९४५ नंतर बहर आला असला तरी ते हरिभाऊ आपटे यांच्या कथा-कादंबऱ्यांइतके जुने आहे. हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा किंवा धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही कादंबरी घेता येईल. हे साहित्य मराठी वाङ्मयाच्या आधुनिकतेच्या जन्माच्या वेळीच निर्माण झालेले आहे. महाराष्ट्रातील ग्रामजीवन आणि तेथील व्यक्ती हाच त्यांचा विषय आहे.

असे असले तरी 'प्रादेशिक वाङ्मय' अगर 'ग्रामीण वाङ्मय' या वेगळ्या नावाखाली ते त्या वेळी ओळखले जात नव्हते. तसे ओळखले जाण्याची काही गरजही नव्हती. तसे ते लक्षात येण्याइतक्या विपुल प्रमाणात लिहिलेही गेले नाही. शिवाय ग्रामीण वाङ्मयाची वेगळी प्रेरणा घेऊन ते जन्माला आले नव्हते. ग्रामीण जीवन हे वेगळे जीवन आहे, ही जाणीवही त्याच्या पाठीमागे दिसत नाही. जीवनातील अनेक समस्यांवर व वस्तुस्थितीवर भर देऊन जसे इतर वाङ्मय जन्माला येत होते, त्याच सर्वसाधारण प्रेरणेतून हे वाङ्मयही जन्माला आले होते. हरिभाऊंचा काळ हा अनेक व्यापांबरोबरच मध्यमवर्गीय सामाजिक सुधारणांत गढलेला काळ होता. त्या वेळचे ललित वाङ्मयही त्याचाच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होते. अशा काळात वाङ्मयीन दृष्ट्या ग्रामीण जीवनाकडे लक्ष लागणे संभवनीय आणि अपेक्षितही नव्हते. म्हणून आपाततः घडलेल्या या वाङ्मयाला सर्वसाधारण वाङ्मयातच जमा करणे स्वाभाविक होते. 'ग्रामीण वाङ्मय' या वेगळ्या नावाने त्याला उल्लेखण्याची काही गरज भासलेली दिसत नाही.

१९२० नंतर ही परिस्थिती बदलली. राजकीय परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतराचा परिणाम सामाजिक दृष्टीवरही झाला. गांधीजींची दृष्टी राजकारणासह सर्व जीवनाला व्यापणारी होती. याच वेळी साम्यवादी, समाजवादी दृष्टीचेही आगमन होऊन त्यांचे मंथन सुरू झाले. गांधीजींनी खेड्यांचे भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणिवांसह पटवून दिले. या सर्वांचा परिणाम साहित्यावर होणे अपरिहार्य होते. तसा परिणाम व्हावा अशीच साहित्यविषयक अनुकूल भूमिका त्या वेळी साहित्यक्षेत्रातही प्रभावी होती.

वरील घटनांचा परिणाम होऊन साहित्यिकांची दृष्टी खेड्यापाड्याकडे वळली. 'तेथे आपले खरे भारतीय जीवन आहे. तेथील लोकांचा उद्धार झाला पाहिजे. त्यांच्या जीवनातील विषमता, दारिद्र्य, अज्ञान, परंपराप्रियता नाहीशी झाली पाहिजे. इतिहासाविषयीचा त्यांचा अभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्यसन्मुख केले पाहिजे. समानतेच्या भूमिकेवरून वागविले पाहिजे. तेथे समाजसुधारणा व समाजोद्धार करायला भरपूर वाव आहे.' अशा प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय जाणिवांनी 'प्रादेशिक साहित्य' या नावानिशी या काळात ग्रामीण वाङ्मय निर्माण होऊ लागले. वि. स.

सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या या काळातील आरंभीच्या कथा वाचू लागल्यावर किंवा ना. वि. कुलकर्णी, रामतनय, भा. वि. वरेरकर यांच्या याच काळातील ग्रामीण जीवनावरील कादंबऱ्या वाचत असताना वर निर्दिष्ट केलेल्या प्रेरणांचा त्यांच्या साहित्यावर प्रभाव असल्याचे स्पष्ट दिसून येते.

१९२५ ते १९४० पर्यंतच्या ग्रामीण साहित्याची प्रेरणा वरील स्वरूपाचीच होती. ग्रामीण जीवन निर्भेळपणे रेखाटावे, अशी वास्तवदर्शी प्रेरणा या काळात दिसून येत नाही. ग्रामीण जीवन रेखाटण्यापेक्षा या समाजाचे जे प्रश्न, समस्या आहेत, जी दुरवस्था आहे, ती लक्षात घेऊन तिच्यावरील उपायांची, सोडवणुकीची आणि उद्धार-कल्पनांची मनाशी खूणगाठ बांधून त्या अनुषंगानेच ते जीवन लेखकांनी रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या त्या ग्रामीण कथा–कादंबरीतील पात्रे तसे तसे उपाय योजून आपले प्रश्न सोडवतात असे दाखविले आहे. त्यासाठी त्या लेखकांना ग्रामीण जीवनातील वास्तव, बारकावे अगर तत्सम गोष्टी जाणून घेण्याची फारशी आवश्यकता वाटली नाही. यामुळे खेड्यातील निसर्ग, शेती करण्याची पद्धती, खेड्यातील मुक्त जीवन, खेड्यातील माणसांच्या भाव-भावना व विचार इत्यादीविषयी मध्यमवर्गीय कल्पनांचा आरोपच त्यांच्यावर करून तेच रेखाटलेले दिसते. या काळातील रविकिरणमंडळातील 'जानपद गीते' या नावाने लिहिली गेलेली ग्रामीण कविता त्या दृष्टीने तपासण्यासारखी आहे.

यामुळे या काळात ग्रामीण वाङ्मय जरी लिहिले गेले तरी ग्रामीण जीवन त्याला पारखेच राहिले, असे म्हणावेसे वाटते. अर्थात याला काही लेखकांचे काही साहित्य थोड्याबहुत प्रमाणात अपवाद हे असणारच. पण हा अपवाद ही तत्कालीन वाङ्मयीन प्रवृत्ती नव्हे, अपघातच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

मात्र या वाङ्मयाने ग्रामीण जीवनाचे अनुभवाचे क्षेत्र, त्याचा विस्तार, त्याचा वेगळेपणा, त्याचा मराठी वाङ्मयाला असलेला नवेपणा इत्यादींच्या स्थूल कक्षांची ओळख करून दिली. आजवर मराठी वाङ्मयाला पारखा असलेला पण मराठी जीवनाचा गाभा असलेला समाज दाखवून दिला. त्यामुळे ग्रामीण वाङ्मयाचे वेगले अस्तित्व मराठी वाङ्मयात शक्य आहे, ही फार मोठी शक्यता दाटपणे दाखवून दिली गेली. हे या काळातील ग्रामीण वाङ्मयाचे महत्त्वाचे वाङ्मयीन कार्य आहे. याच्या पायाभूत:आधारानेच पुढील ग्रामीण वाङ्मय वाढत गेले, हे जाणवते.

१९४० ते ४५ च्या काळात काही ग्रामीण लेखकांच्या दृष्टीत नेमका उलट्या दिशेने बदल झालेला दिसतो. आतापर्यंतच्या ग्रामीण वाङ्मयात लेखक आपली दृष्टी आणि तात्त्विक बैठक घेऊन ग्रामीण जीवनाकडे पाहताना दिसतो. म्हणजे ही दृष्टी आणि तात्त्विक बैठक ग्रामीण जीवनावर आरोपित होती. पण श्री. म. माटे यांची ग्रामीण वाङ्मयात प्रतिबिंबित झालेली दृष्टी निष्कर्षात्मक वाटते. माटे यांनी प्रथम ग्रामीण जीवन जवळून, प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहिले. ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, हरघडी नडणारे दारिद्र्य

आणि अज्ञान, तरीही दिसून येणारी माणुसकी, हे सर्व त्यांनी प्रथम पाहिले, आणि त्यातून आपली निष्कर्षवजा दृष्टी बनविली. त्यातून त्यांच्या सुधारणांची तात्त्विक भूमिका ठरविली. सारांशाने असे म्हणता येईल की, १९४० पर्यंतची दृष्टी आरोपित, बाहेरून लादलेली आणि गृहीतकल्पनात्मक होती, तर १९४० नंतरची दृष्टी निष्कर्षात्मक, आतून बाहेर आलेली, परिणामात्मक स्वरूपाची होती. त्यामुळे माटे यांनी लिहिलेली 'ग्रामीण कथा' अस्सलपणाचे एक वेगळेच तेज घेऊन जन्माला आली. तिने ग्रामीण जीवन स्थानिक वैशिष्ट्यांसह जोरकसपणे मांडले. ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन यथार्थपणे वाङ्मयात होण्याचा हा आरंभकाळ म्हणावा लागतो.

माटे यांनी सामाजिक कार्याच्या निमित्ताने हे ग्रामीण उपेक्षितांचे जीवन जरी अनुभवले असले तरी माणुसकीच्या भावनेने ते विचलित झाले. त्यांच्या मनात सामाजिकतेच्या पलीकडची सहानुभूती निर्माण झाली. ही सहानुभूती मानवी जीवन समजावून घेऊ पाहणारी होती, त्या जीवनाचा अर्थ लावून पाहणारी होती.—ती त्यांच्या लेखनापाठीमागची प्रेरणा त्यांच्या कथांना मौलिकतेचे परिमाण देऊ शकली. जीवनदर्शन हा तिचा गाभा ठरला. माट्यांच्या वरील स्वरुपाच्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या ग्रामीण कथेला मोठी व्यापक अर्थपूर्णता लाभली.

आतापर्यंत ग्रामीण वाङ्मयाला 'ग्रामीण जीवन' कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वंचितच राहिले होते. ते या कथांनी येऊ घातले. जणू या कथांनी त्याचे पहिले धडे प्रामाणिकपणे गिरविले. ही कथा पहिल्यांदाच अंतर्मुखतेतून आणि आत्मनिष्ठेतून आली. त्यामुळे तिची कळा-कांती वेगळी वाटते.

दुसऱ्या बाजूने विचार करता त्यांच्यावर वाङ्मयातील कोणत्याही तत्कालीन, अवांतर प्रवृत्तींचा परिणाम झालेला दिसत नाही. उलट 'आपणांस कथेचे तंत्रबिंत्र माहीत नाही. जे वाटले ते लिहिले.' हीच त्यांची प्रांजळ आणि आत्मनिष्ठ भूमिका होती. या त्यांच्या भूमिकेमुळे ग्रामीण जीवनदर्शन प्रखरपणे घडले. त्यांच्या कथांतून काही ठिकाणी पाल्हाळ, सामाजिकतेच्या दृष्टीने लावला जाणारा अन्वयार्थ, भाष्य, वैचारिकता या गोष्टी जास्त स्वरूपात जाणवत असल्याने त्या कित्येक वेळेला दोषरूप धारण करतात, पण हे दोष जीवनदर्शनाच्या दृष्टीने गौण आहेत.

माटे यांचा वाङ्मयीन काल हा मराठी वाङ्मयातील फडकेयुगाचा ऐन उत्कर्षाचा काळ होता. फडक्यांच्या साहित्याने आणि साहित्यदृष्टीने वाङ्मयाचा हेतू बदलला. त्यामुळे मनोरंजन आले. मनोरंजनासाठी वाङ्मयात तंत्र आले. मनोरंजकता हीच महत्त्वाची ठरली. मांडणीही तिच्या अनुषंगाने होऊ लागली. आत्मप्रत्यय बाजूला पडून शृंगार, वीर आदी रस, रोमँटिक वृत्ती, जीवनातील भडकपणा, भोगीपणा, लैंगिकता यांवर मनोरंजनासाठी भर दिला जाऊ लागला.

याचा परिणाम माटे यांच्या बरोबरीनेच लिहिणाऱ्या ठोकळ-दिघे यांच्या ग्रामीण साहित्यावर झालेला दिसतो. म्हणजे १९४०-४५ च्या काळात ग्रामीण कथेला दोन

दिशा लाभल्या : एक वास्तववादी आणि दुसरी मनोरंजनवादी.

माटे यांची कथा संख्येने कमी आहे. त्या मानाने ठोकळ-दिघे यांचे ग्रामीण साहित्य विपुल आहे. अद्‌भुतता, काव्यमयता, कल्पकता, निसर्गवर्णने यांचीही जोड त्यांनी आपआपल्या व्यक्तिमत्त्वानुसार आपल्या फडके-वळणाच्या साहित्याला दिली. हे सर्व मनोरंजन या हेतूसाठीच केलेले दिसून येते. कित्येक वेळा इंग्रजीतील ग्रामीण वाङ्मयात दिसून येणारे ग्रामजीवन आणि तेथील व्यक्तींच्या भावभावना मराठी ग्रामीण कथेत यांनी आणलेल्या दिसतात. त्यामुळे यांच्या बऱ्याच कथा-कादंबऱ्यांतून ग्राम-जीवनदर्शन बाजूला पडले. ' मनोरंजनासाठी नवा बदल ' हीच त्यांची प्रेरणा असलेली दिसून येते. फडके यांच्या साहित्यातील पात्रे, प्रसंग यांचा जसा प्रत्यक्ष मराठी जीवनाशी संबंध नसे, तसेच या काळातील ठोकळ-दिघे यांच्या बऱ्याच साहित्याचे झाले होते. ते सगळे जीवन आभासमय.

थोडक्यात असे म्हणता येईल की, ठोकळ-दिघे यांचे ग्रामीण वाङ्मय हे जीवन-प्रेरणांनी प्रेरित होण्यापेक्षा प्रामुख्याने तात्कालिक स्वरूपाच्या केवळ वाङ्मयीन भूमिकेने प्रेरित झालेले दिसते. ही वाङ्मयीन भूमिकाही अत्यंत तकलुपी स्वरूपाची होती, ही गोष्ट पुन्हा वेगळीच.

अशा स्वरूपाचे ग्रामीण वाङ्मय ठोकळ-दिघे यांनी या काळात विपुल प्रमाणात लिहिले. त्यामुळे ग्रामीण वाङ्मयाचा एक वाचकवर्ग या वाङ्मयाने निर्माण केला. या प्रकारच्या वाङ्मयाची लोकप्रियता वाढवून ठेवली. ग्रामीण वाङ्मयाच्या अस्तित्वाला विस्तार प्राप्त करून दिला. ग्रामीण जीवनाविषयी वाचकांची उत्सुकता वाढवून ठेवली. ठोकळ-दिघे यांच्या ग्रामीण साहित्याचे हे कार्य ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. म्हणून मी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, ' ग्रामीण साहित्याचे हरिभाऊ ' श्री. म. माटे हे मानले गेले तर ग. ल. ठोकळ यांना ' फडके ' मानले पाहिजे.

१९४५ च्या आसपास श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांनी ग्रामीण जीवना-वरील कथा-कादंबऱ्या लक्ष वेधतील अशा पद्धतीने लिहिल्या. त्यांच्या साहित्याला त्यांच्या विशिष्ट ग्रामप्रदेशातील वास्तवाची भक्कम बैठक दिसते. ग्रामीण जीवनाचा अनुभव त्यांच्या साहित्यातून समृद्धपणे आविष्कृत होतो. त्या जीवनातील एकूण समस्या, सामुदायिक स्वरूपाचे बारीक-मोठे ताणावे, निसर्ग, ग्रामीण भाषेची धाटणी यांचा अनुभव कसदारपणे व्यक्त झालेला आहे.

माटे यांचा दुवा या वाङ्मयाने सांधला आणि नवे ग्रामीण वाङ्मय ज्या वळणा-वर सुरू होते तेथपर्यंत याने प्रगती केली. नव्या ग्रामीण वाङ्मयातील प्रमुख लक्षणे यात अस्फुटपणे पण लक्षवेधी स्वरूपात उमलताना दिसतात.

असे म्हणण्याचे कारण की पेंडसे, दांडेकर यांच्या जीवनविषयक दृष्टीचा परिणाम त्यांच्या या साहित्यावर झालेला दिसतो. हिंदु-मुस्लीम संबंधाविषयीची त्यांची कल्पना, नव्या-जुन्याच्या संघर्षातील जयपराजय, जीवनमूल्यांची जोपासना, मांगल्यावरचा विश्वास,

अफाटतेची स्वप्ने वस्तुस्थितीमध्ये आणून पाहण्याची रोमँटिक वृत्ती इत्यादी गोष्टींचा परिणाम पेंडश्यांच्या त्या वेळच्या साहित्यावर झालेला दिसतो. एखाद्या अंतःप्रवाहाप्रमाणे या गोष्टी त्यांच्या साहित्यात जाणवतात. दांडेकरांच्या श्रद्धा, जुन्या संस्कृतीविषयीची त्यांची आपुलकी, माणुसकीविषयीच्या त्यांच्या कल्पना, नव्याविषयी त्यांना असलेले अनाकर्षण, जुने ते चांगले-दिव्य-भव्य, नवे डागळलेले, उथळ इ. त्यांची मते आणि समजुती त्यांच्या कादंबऱ्यांवर वरचष्मा गाजवतात.

एका अर्थी हे दोघेही त्यामुळे खांडेकरी वळणाचे पण अधिक सुजाण दृष्टी असलेले साहित्यिक वाटतात. खांडेकरांच्याप्रमाणेच त्यांची वृत्ती काही जीवनमूल्ये जोपासणारी वाटते. पण तिचा अतिरेकी आविष्कार पेंडश्यांच्यामध्ये नाही. दांडेकरांच्या साहित्यात तो कित्येक वेळेला होतो. पण अभिव्यक्ती, कलात्मक जाणीव या बाबतीत त्यांची वृत्ती नव्या ग्रामीण वाङ्मयाला फार जवळची आहे. त्यांच्या साहित्याने ग्रामीण वाङ्मयातील जुने पर्व संपवून नव्या पर्वाला आरंभावस्था प्राप्त करून दिली, असे म्हटले तर ते चूक होणार नाही असे वाटते.

१९४७ च्या आसपास नव्या चाकोरीतील व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथा–कादंबरी या पार्श्वभूमीवर लिहिली. त्यांचे साहित्य आगळेच तेज घेऊन जन्माला आले आणि ग्रामीण साहित्यात नवे पर्व सुरू झाले.

नवे पर्व एकूण मराठी साहित्यातच त्या वेळी सुरू झाले होते. ग्रामीण साहित्य त्याला समांतर गेले. मर्ढेकरांनी नवकवितेबरोबरच साहित्याच्या स्वरूपाचा विचार कलात्मकतेच्या दिशेने नव्याने मांडला. या विचारांचा परिणाम प्रत्यक्षाप्रत्यक्ष त्यांच्या आसपासच्या पिढीवर प्रभावीपणे झाला. अंतर्मुख आणि आत्मनिष्ठ, शुद्ध कलावादी प्रेरणेने अनेक कवी आणि कथाकार साहित्य निर्माण करू लागले. कथाक्षेत्रात गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, अरविंद गोखले आदी कथाकार वर उद्धृत केलेल्या नव्या प्रेरणेनेच कथा लिहीत होते. या कथाकारांचा त्या वेळच्या साहित्यावर युगधर्मासारखा परिणाम झाला.

ऐनभरात असलेल्या भावे–गाडगीळ–गोखले यांची कथा व्यंकटेश माडगूळकरांनी जवळून अनुभवली. स्वाभाविकच या लेखकांच्या व या वेळी प्रभावी असलेल्या कलावादी, आत्मनिष्ठ प्रेरणेचा परिणाम त्यांच्यावर झाला. वरील तीन कथाकार ऐनभरात असताना माडगूळकर त्यांना १९४६–४७ मध्ये जाऊन मिळाले.

या चारही जणांची साहित्यविषयक मूलभूत प्रेरणा कलात्मकच असली तरी प्रत्येकाचे अनुभवविश्व, अनुभव घेण्याची पातळी, ते व्यक्त करण्याची पद्धती आणि एकूण व्यक्तिमत्त्व ही वेगवेगळी होती हे विसरता येत नाही.

आतापर्यंतच्या ग्रामीण साहित्याचा इतिहास लक्षात घेऊन व्यंकटेश माडगूळकर यांच्याकडे वळले तर असे दिसून येते की, त्यांच्या प्रदेशाचे वैशिष्ट्य सोडले तर त्यांच्या कथा-कादंबरीच्या विषयांचा व्याप आणि विस्तार आतापर्यंतच्या ग्रामीण साहित्याच्या

विषयांपेक्षा वेगळा नाही. ग्रामजीवनातील रूढी, समजुती, अज्ञान, दारिद्र्य, जगण्यासाठी चाललेली तेथील अनेकविध व्यक्तींची धडपड इत्यादी विषयांशीच त्यांचे अनुभव निगडित आहेत. अशा प्रकारच्या विषयांची सुखटणकर-सरदेसाई, माटे, ठोकळ-दिघे, पेंडसे-दांडेकर यांनी ओळख करून दिलेली होती. माडगूळकर या कक्षेच्या बाहेर नाहीत. पण त्यांच्या अनुभवांत अधिक बारकावे आहेत, अधिक सच्चेपणा आहे, त्यांत अधिक खाचाखोची आहेत, बारीक-सारीक तणावे त्यांनी हेरलेले आहेत, त्यात विविधता आहे.

या अनुभवांना व्यक्त करताना कलेविषयीची मर्ढेकरांनी मराठी वाङ्मयाला दिलेली, अधिक समृद्ध जाणीव त्यांना लाभलेली आहे. ते अधिक आत्मनिष्ठेने अनुभव व्यक्त करतात. कोणत्याही प्रकारच्या 'वादा'च्या पकडीत ते नाहीत. त्यांच्या अनुभवांच्या रूपाला बाहेरची अशी कोणतीही छाया नसल्याने ते अधिक नितळपणे व्यक्त झाले आहेत. अनुभवांना त्यांचे असे माहात्म्य नव साहित्यात प्राप्त झाल्याने लेखकाच्या दृष्टिकोणाचा जाच त्यांना होऊन ते त्या रंगाने रंगले गेले नाहीत. त्यांचे असे मूलभूत रंग त्यांना राहिले. उलट लेखक जास्तीत जास्त अलिप्त राहिल्याने अनुभवच सहज स्वभावे अत्यंत प्रसन्नपणे पुढे सरकले आणि स्वतःच्या कांतीने झळकू लागले. साहित्यातील शुद्धकलावादी युगाचा हा जसा परिणाम म्हणता येईल, तसाच तो हे सर्व आत्मसात करून अनुभव व्यक्त करणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचाही परिणाम आहे. व्यंकटेश माडगूळकरांचे अनुभव वास्तवाच्या पातळीवरचे असूनही त्यांची कथा ' नवे रूप ' घेऊन जन्माला आली ती वरील कारणांनी. त्यांच्या ग्रामीण साहित्याने पुढे परंपरा निर्माण केली. माटे यांच्याप्रमाणे ते महत्त्वाचे प्रवर्तक ठरले.

१९५०-५१ मध्ये द. मा. मिरासदार ग्रामीण कथा लिहू लागले. त्यांनी ग्रामीण कथेला एक वेगळेच परिमाण दिले. मिरासदारांपर्यंत येऊन पोचलेली ग्रामीण कथा ही प्रामुख्याने गंभीर स्वरूपाची वास्तववादी होती. तिच्यात क्वचित विनोदी मिस्किलपणा अधून-मधून येत होता. पण तो कथेची प्रमुख प्रेरणा म्हणून नव्हे. पण मिरासदारांच्या कथेची विनोद हीच एकमेव प्रेरणा होती. या प्रेरणेने त्यांनी ग्रामीण शुद्ध विनोदी कथा लिहिली. त्यामुळे या कथेने ग्रामीण साहित्याला एक वेगळीच नवी दिशा दाखविली. तो प्रकार या कथेने लोकप्रियही केला.

मिरासदारांच्या विनोदी कथेची काही प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात. मिरासदार जीवनातील विसंगती, विरोध, वैचित्र्य, अद्‌भुतता, जगावेगळेपणा, विक्षिप्तपणा, बढाईखोर वृत्ती, भित्रटपणा, मिस्किलपणा, इरसालपणा, कावेबाजपणा, आदी गुण ज्या विषयांमध्ये दिसतात तेच विषय निवडतात. या गुणांना मग मिरासदारांच्या व्यक्तिमत्त्वातील अतिशयोक्ती, अतिरंजितता, व्यंजकता, उपहासगर्भता, उपरोध, गंभीरपणाचा आव आणणारी वृत्ती लाभते. ते मिस्किलपणे विसंगतिगुण सर्वत्र प्रधान ठेवून पुढे सरकणारी निवेदनपद्धती कथेच्या अभिव्यक्तीला वापरतात.

त्यांच्या या वैशिष्ट्यांच्या मर्यादाच त्यांच्या कथांतून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण जीवनाला पडलेल्या आहेत. वर सांगितलेल्या गुणवैशिष्ट्यांच्या कक्षेतच ते आपला कथा-विषय निवडतात. त्यामुळे त्यांची कथा जीवनदर्शनाच्या दृष्टीने वरवरची वाटते. खरे तर जीवनदर्शन हा तिचा हेतू नसून, जीवनातील फक्त विनोददर्शन घडवूनच ती बहुधा संपते. या विनोदाच्या आधाराने काही विदारक प्रकाश जीवनावर टाकावा असे तिला वाटत नाही. अनेक वेळेला ती जीवनातील इतक्या वरवरच्या थरावर स्थिर होते की, तिला केवळ किस्सेवजा स्वरूप प्राप्त होते. काहीही असले तरी त्यांच्या कथेने ग्रामीण कथेला विनोदाचे वेगळे परिमाण देऊन तिला वेगळी दिशा दाखवून दिली; हे विसरता येत नाही.

माडगूळकर–मिरासदार यांच्या पाठोपाठ शंकर पाटील हे नव्या दमाचे आणि वेगळ्या ताकदीचे कथाकार पुढे आले. त्यांची गंभीर स्वरूपाची ग्रामीण कथा लक्षणीय आहे. 'आभाळ', 'ऊन' या कथासंग्रहांतील त्यांच्या कथा त्या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत.

माडगूळकरांची कथा आणि पाटील यांची कथा भिन्न भिन्न स्वरूपांची आहे. त्या दोन्हींची जात वेगळी वाटते. दोघेही कथाकार आपआपल्या परीने मोठ्या ताकदीचे वाटतात. माडगूळकरांची कथा 'माणसे आणि त्यांच्या भोवतीची परिस्थिती' यांच्या संबंधांवर व संघर्षावर प्रामुख्याने स्थिर होते; तर पाटलांची कथा मानवी मनातील अंतर्गत संघर्षांवर व आंदोलनावर स्थिर होते. माडगूळकरांना 'माणसे' प्रिय आहेत म्हणून त्यांची कथा व्यापक होते; तर पाटलांना 'मने' प्रिय असल्याने त्यांची कथा व्यापकता सोडून सखोलतेकडे, सूक्ष्मतेकडे झुकते. माडगूळकरांची कथा एखाद्या तटस्थ आणि अलिप्त 'ऑब्झर्व्हरने' लिहिलेली वाटते; तर पाटलांची कथा झपाटलेल्या, अनुभवाशी झोंबी घेणाऱ्या कलावंताने लिहिलेली वाटते. माडगूळकर ऑब्झर्व्हर असल्याने त्यांचे निवेदन थंडपणे एका सरळ रेषेत जाते; तर पाटील अनुभवांच्या झपाटलेपणाने लिहीत असल्याने त्यांची निवेदनपद्धती अनुभवाच्या आंदोलनानुसार, त्याच्यातील कमीअधिक तप्ततेनुसार वेग आणि वळसे घेत जाते. माडगूळकरांच्या अलिप्ततेमुळे व तटस्थतेमुळे त्यांना कथा निवेदनपद्धतीला ग्रामीण वळणाची नागरभाषा पुरेशी वाटली; तर अनुभवाशी झोंबी घेण्याच्या वृत्तीमुळे पाटलांची भाषा सूक्ष्म स्वरूपात बंड करून उठली. तिने नागर भाषेचे संस्कार कमी प्रमाणात स्वीकारले. माडगूळकर हे साक्षी निवेदक असल्याने कथानुभवातील कालक्रमानुसार कथेला आरंभ करतात व निवेदन करीत करीत कथा शेवटापर्यंत नेतात, तर पाटील यांना मानवी मनातील ताण आणि आंदोलने व्यक्त करावयाची असल्याने ते अनुभवाचे ताण आणि आंदोलने जेथे आहेत तेथूनच कित्येक वेळेला कथेला सुरुवात करतात. ते ताण आणि आंदोलने कशी निर्माण झाली हे नंतर कथेच्या ओघात सांगतात. हा ताण, ही आंदोलने जेथे पुरी होतात तेथेच त्यांची कथा कित्येक वेळेला संपते.

घटनेच्या पूर्णतेच्या दृष्टीने ती कित्येक वेळा अपुरीच राहते. 'सारवण', 'भुजंग', 'कुस्ती', 'नांगरट' यासारख्या कथा त्या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. त्यांच्या या कथेच्या स्वभावामुळे ती जेथे संपते तेथे जाणीवपूर्वक संपल्यासारखी वाटते. घटनेच्या पूर्णतेच्या दृष्टीने ती अजून चालूच असल्यासारखी वाटते. माडगूळकरांची कथा घटनेच्या दृष्टीने नेहमी परिपूर्ण असते. सारांश, माडगूळकर आणि पाटील यांची कथा आपआपल्या परीने वेगळी आणि भिन्न भिन्न जातीची आहे. त्यामुळे पाटलांच्या या वेगळ्या कथेने एकूण ग्रामीण कथा अधिक समृद्ध केली आणि त्या क्षेत्रात वेगळ्या शक्यता निर्माण करून ठेवल्या असे म्हणता येईल.

वरील लेखत्रकयींचे लेखन होत असतानाच ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात अनेक नावे दाखल झाली. म. भा. भोसले, ग. दि. माडगूळकर, सरोजिनी बाबर इत्यादी लेखक पूर्वीपासून लिहीत होतेच. रणजित देसाई, उद्धव शेळके हेही मिरासदार, पाटील यांच्या आगे-मागे लिहीत होते. याशिवाय अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील, नामदेव व्हटकर, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक, द. का. हसमनीस, रा. रं. बोराडे, चंद्रकांत भालेराव, बा. भ. पाटील, आनंद यादव, चंद्रकुमार नळगे, चारुता सागर, बाबूराव बागूल ही सहज आठवलेली नावे. या लेखकांशिवाय अनेक लेखक अधूनमधून ग्रामीण लेखन करतात ते वेगळेच. नावांच्या संख्येवरून दिसून येईल की, या काळात ग्रामीण साहित्याची एक प्रचंड लाट आलेली आहे. १९६० च्या आसपास या लाटेने जास्तीत जास्त उंची गाठलेली दिसते. या लाटेला नुसते वाङ्मयीन कारण नाही. तिच्या पाठीमागे सामाजिक इतिहासातील काही कारणे लपलेली आहेत. ती पाहिल्याशिवाय या लाटेचे स्वरूप कळू शकणार नाही.

या लेखकांच्या आडनावांकडे सहज जरी दृष्टी टाकली तरी एक गोष्ट चटकन लक्षात येते. ग्रामीण साहित्य लिहिणारा हा बहुसंख्य लेखकवर्ग बहुजन समाजातील आहे. आजवरच्या आधुनिक मराठी साहित्यात – १८५० ते १९५० पर्यंतच्या शंभर वर्षांत जेवढी बहुजनसमाजातील लेखकांची नावे जमा झाली असतील; त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक नावे १९५५ ते १९७० च्या पंधरा वर्षांच्या काळात जमा झालेली दिसतात. एक प्रचंड पिढी आज ग्रामीण साहित्य वेड्यावाकड्या स्वरूपात निर्माण करीत आहे. तिला कलात्मकतेची जाणीव आणि भान या प्राथमिक अवस्थेत असणे कठीण आहे. मात्र साहित्यनिर्मितीचा उत्साह अनिवार आहे. सततची धडपड आहे. न्यूनगंड बाजूला हटून इतर प्रतिष्ठित लेखकांच्या मांडीला मांडी लावून बसण्याची एक प्रकारची जिद्द आणि आत्मविश्वास तिच्यात निर्माण झालेला आहे. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील आणि ग्रामीण समाजाच्या अनेक थरांतील लेखक आज सातत्याने लेखन करताना दिसत आहेत.

स्वातंत्र्योत्तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिकही परिस्थितीमध्ये जो फरक पडला आहे, जे संक्रमण चाललेले आहे, त्याचे हे फळ आहे.

लोकशाही आली आणि तिने बहुजनसमाजाची अस्मिता जागी केली. हा बहुजनसमाज संख्येने एकूण समाजाचा मोठा म्हणजे जवळजवळ ७५-८० टक्के भाग असला तरी, अनेक कारणांनी स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्याला लाजिरवाणे जिणे जगावे लागत होते. त्यामुळे साहित्यासारख्या अहंनिष्ठ आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्याला आत्मविश्वासाने काही करणे फारसे शक्य नव्हते. स्वातंत्र्यपूर्वकाळात या समाजातील ज्या लेखकांनी काही थोडेबहुत ललित वाङ्मय निर्माण केले ते लेखक एक तर उच्चभ्रू होते, बहुजनसमाजातील असून बहुजनसमाजापेक्षा वेगळे होते; किंवा त्यांनी आपल्या ललित वाङ्मयाचे स्वरूप इतर साहित्यिकांच्या नागर साहित्य स्वरूपाशी मिळतेजुळते राहील अशाच वळणाचे ठेवले होते. त्यात अनुकरण नसले तरी प्रत्यक्षात आपल्या समाजात आपण जे पाहिले, जे भोगले ते अनुभव व्यक्त करण्याचा आत्मविश्वास नव्हता किंवा वृत्ती नव्हती, असेच म्हणावे लागते. हा आत्मविश्वास किंवा ही वृत्ती कोणाही बहुजनसमाजातील साहित्यिकामध्ये न येण्याचे कारण त्या वेळची (म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळातील) सामाजिक परिस्थिती असावी. त्या वेळच्या समाजाची घडणच तशी दिसते. त्यामुळेच की काय स्वातंत्र्यपूर्वकाळातील ग्रामीण साहित्यामध्ये आत्मप्रत्यय, अस्सलपणा फारच कमी प्रमाणात दिसतो.

स्वातंत्र्यपूर्वकाळात या बहुजनसमाजातील बऱ्याच मोठ्या भागाला आपले जिणे लाजिरवाणे वाटत होते. ते व्यक्त करणे त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीमुळे व काही प्रमाणात साहित्यसंकेतांमुळेही शक्य नव्हते. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात ‘ हक्काचे ’ अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे लेणे या समाजाला लाभले. त्यामुळे त्याची न्यूनगंडाची भावना लोप पावून जागृती निर्माण झाली. लोकशाहीतील निवडणुकांनी राजसत्ता, अर्थसत्ता त्याला प्राप्त झाली. त्यांच्या योगाने नवे शिक्षण, नव्या सुधारणा, नवी ध्येये मनासमोर ठेवून त्यांच्या पूर्ततेसाठी नवे कायदे निर्माण झाले. त्यांच्या परिणामाने नवी अधिकारक्षेत्रे प्रस्थापित झाली. या सर्वांचा परिणाम स्वतःच्या परिस्थितीचे ज्ञान होण्यात झाला. त्यामुळे दारिद्र्यात जगणे, अज्ञानात खिचपत पडणे, मागासले राहणे, कमीपणाचे वाटू लागले. परिस्थितीशी नव्या जाणिवांनिशी झगडा सुरू झाला. आलेल्या व येणाऱ्या अनुभवांना आणि प्राप्त जीवनातील घटना-गोष्टींना नव्याने वाचा फुटली. ‘ हक्कां ’मुळे हा आत्मविश्वास निर्माण झाला होता. ग्रामीण समाजातील बहुतेक थरांत हे कमीअधिक प्रमाणात घडून आले.

दुसऱ्या बाजूने साहित्यात अनुभवनिष्ठा, आत्मनिष्ठा यांना विशेष स्थान प्राप्त झाले होते. त्याचाही वेडावाकडा परिणाम झाला. शिवाय माडगूळकर–पाटील-मिरासदार यांचे ग्रामीण साहित्य या नव्या पिढीला अनुकरणाला सोपे वाटले. त्यामुळेही भराभर अनुकरण होऊ लागले.

आणखी एक गोष्ट घडून आली. ह्या काळपर्यंत वाचक म्हणून बहुसंख्य असलेल्या शहरातील नागरिकाला हे ग्रामीण साहित्य नवे होते. साहित्यात अनुभवांची

केवळ नवीनता हे मूल्य मानले जात नसले तरी ह्या नव्याचे आकर्षण इतर क्षेत्रांतल्या प्रमाणेच सामान्य वाचकाला फार असते. त्यामुळे ह्या काळात ह्या ग्रामीण साहित्याला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. त्याचा फायदा अनेक सामान्य ग्रामीण लेखकांना मिळाला.

वरील कारणांमुळे ह्या काळात मराठी वाङ्मयात ग्रामीण साहित्याची एक प्रचंड लाट आली. ह्या लाटेने इतर साहित्य लोकमानसातून क्षणभर बाजूला फेकले गेले. ग्रामीण साहित्याच्या ह्या लोकप्रियतेमुळे महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतून त्याची निर्मिती होऊ लागली.

ह्या काळात कोकण, सांगली-सातारा-कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी भागांतून अनेक ग्रामीण लेखक निर्माण झाले.

या लाटेतील बहुसंख्य लेखकांची प्रेरणा प्रामुख्याने आपापला परिसर आपापल्या साहित्यात रेखाटण्याची दिसते. त्यात पुन्हा शक्य असेल तर आपण ज्या सामाजिक थरातून व वर्गातून आलो तेथील जीवनच जिद्दीने रेखाटावयाचे असा संकेतही काहींनी मनाशी जाणता-अजाणता बाळगलेला दिसतो. असे असले तरी सामग्र्याने या ग्रामीण साहित्यनिर्मितीमुळे कोकण, सांगली-सातारा-कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी प्रदेशांचे जीवनचित्रण झालेले दिसते. त्यातही प्रामुख्याने उच्च मराठा, शेतकरी-कामकरी, महार-मांग-चांभार, मराठा-मुस्लीम या थरांचे चित्रण विशेष झालेले आहे.

ग्रामीण साहित्याची ही लाट अजून पुरती ओसरलेली नाही. त्यामुळे तिचे निरीक्षण पुरतेपणाने आणि अलिप्ततेने करणे थोडे कठीणच आहे. तरीसुद्धा तिच्या आजपर्यंतच्या स्वरूपावरून काही ठळक गोष्टी जाणवतात. तेवढ्यातच नमूद करणे प्रस्तुत वाटते.—

व्यंकटेश माडगूळकरांच्या ग्रामीण कथा-कादंबरीने ग्रामीण साहित्याला जोराची चालना दिली. श्री. म. माटे यांनीही अशाच प्रकारच्या कथा लिहिल्या तरी त्यामुळे जोरकस स्वरूपात तशा प्रकारच्या साहित्याला चालना मिळू शकली नाही. याला कारण माटे यांच्या वेळची बहुजनसमाजाची स्थिती, हे तर आहेच, तसेच फडके-खांडेकर यांच्यासारख्यांनी साहित्यात निर्माण केलेले संकेतही कारणीभूत आहेतच. याशिवाय आणखी एक कारण संभवते. ते सूक्ष्म असले तरी महत्त्वाचे आहे. माटे यांची व्यक्ती म्हणून सामाजिक प्रतिष्ठा वेगळी आणि वरच्या दर्जाची होती. हरिजनांच्या उद्धारासाठी ते स्वतःच्या मार्गाने सामाजिक कार्य करीत होते. त्यांनी ज्या ग्रामीण कथा लिहिल्या त्यांना माट्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श होता. मानवी जीवनात ‘ या कथांतील व्यक्ति-जीवनाला असलेले स्थान ’ ते शोधण्याचा आणि निर्दिष्ट करण्याचा प्रयत्न करताना त्यांच्या कथांतून जाणवतात. त्यांच्या कथेला लाभलेला हा सामाजिक दर्जा व चिंतनपरता ही थोड्याबहुत प्रमाणात शिकलेल्या, नव्याने साहित्यलेखन करू पाहणाऱ्या बहुजनसमाजातील लेखकांना त्यांच्या लेखनाच्या आरंभीच्या अवस्थेत

अनुकरणाला कठीण वाटली असावी. माटे यांचे सामाजिक व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि प्रतिष्ठा व बहुजनसमाजातील नव्याने काही करू पाहणारे, पूर्वपरंपरा नसलेले आरंभीच्या अवस्थेतील सामान्य व्यक्तिमत्त्व, यांच्यामध्ये फार मोठी दरी होती. ही दरी सांधणे सामान्य व्यक्तिमत्त्वाला शक्य नव्हते. म्हणून कदाचित माटे यांच्या काळात त्यांच्या आसपास जातिवंत ग्रामीण कथा इतर कुणी निर्माण करू शकला नसावा. त्या मानाने फडके-खांडेकरांचे अनुकरण सहज शक्य होते. हे दोन साहित्यिक त्या वेळी लोकप्रियही होते. त्यांच्या इतके विपुल लेखन माटे-यांनी केलेलेही नव्हते. या सर्वांचा परिणाम होऊन ठोकळ-दिघे माटे यांच्या मार्गाने गेलेले नसावेत. फडके-खांडेकरांचे वळण त्यांना जवळचे वाटले असावे.

पण पुढे व्यंकटेश माडगूळकरांची कथा-कादंबरी जन्माला आली आणि तिने ही ‘दरी’ बरोबर सांधली. आज ग्रामीण साहित्याची जी लाट निर्माण झालेली आहे तिला माडगूळकरांच्या ग्रामीण साहित्याचे वरवर दिसणारे स्वरूप कारणीभूत आहे.

‘वरवर दिसणारे स्वरूप’ थोडक्यात असे सांगता येईल : माडगूळकरांची कथा ही खेड्यातील लोकांच्या जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारी आहे. खेड्यातील ‘सामान्य माणसाला’ आलेले अनुभव ती वस्तुनिष्ठपणे रेखाटण्याचा प्रयत्न करते. त्यांची कथा प्रत्यक्षातील एखादी घटना जशी घडत जावी, तशी ती शक्य तो घडत जाते. म्हणजे तिच्यात सरळ निवेदन आहे. कालक्रम धरून निवेदन करीत करीत ती एखाद्या गोष्टी (Tale) प्रमाणे पुढे जाते. तिच्यात निसर्गाची हुबेहूब वर्णने असतात. त्यांची भाषा अत्यंत साधी, सोपी आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये माटे-वळणाचे भाष्य नसते, की जे सामान्य माणसाला अनुकरण करता करता आत्मसात करणे प्रारंभी तरी कठीण वाटते.

माडगूळकर यांच्या कथेचे वरंवर दिसणारे हे विशेष नव्याने लेखन करू पाहणाऱ्या ग्रामीण लेखकांना अनुकरण करायला सहज शक्य वाटले असावेत. ज्या बहुजनसमाजातील लेखकांच्या घराण्यात शिक्षणाचा पूर्वी गंध नव्हता, ज्यांच्या वाडवडिलांनी शेतीसदृश ग्रामीण धंदेच पोटापाण्यासाठी केले होते, ज्यांना वाङ्मयीन पूर्वपरंपराच नव्हती, ज्यांच्या घरात पहिल्यांदाच पाटी-पेन्सिल आली होती, ज्यांचे व्यक्तिमत्त्व सामाजिक आणि वाङ्मयीन दृष्ट्या तसे सामान्यच होते, ज्यांना वाङ्मयातील बारकावे, वाङ्मयाचा इतिहास, कलातत्त्वे बहुधा ठाऊक नव्हती; मात्र ज्यांच्याजवळ ग्रामीण अनुभवांचे भरपूर मोठे गाठोडे होते, अशा या पिढीला माडगूळकरांची कथा-कादंबरी वरवरच्या वरील विशेषांमुळे फार जवळची आणि प्रेरणादायक वाटली.

माडगूळकरांच्या मागून विनोदी शैलीने लिहिणारे मिरासदार आणि ‘वळीव’, ‘गाठीभेटी’मधील कथा लिहिणारे पाटील यांच्याही ग्रामीण कथेचे वरवरचे स्वरूप माडगूळकरांच्या कथेच्या वरवरच्या स्वरूपापेक्षा फारसे वेगळे नाही.

या लेखक-त्रयींच्या साहित्याच्या अशा स्वरूपाचा परिणाम या लाटेतील

ग्रामीण साहित्यावर इतका मोठा झाला की, या साहित्याचे ते ' मूळ स्वरूपच ' होऊन राहिले.—या लाटेतील साहित्यात ग्रामीण जीवनाचे आलेले अनुभव उत्साहाने मांडले गेले. सरळ–धोपट निवेदने कथा–कादंबरीला व्यापून राहिली. निसर्गवर्णने ठिगळांप्रमाणे अधून–मधून ठाण मांडून बसली. पसरटपद्धतीने एकूण कथा लिहिणे आणि मिस्किल-पणे कथा सांगणे ही तिची तऱ्हा होऊन बसली. ग्रामीण भाषेतील चटकदार आणि खटकेबाज संवाद लज्जत निर्माण करण्यासाठी भरपूर येऊ लागले. शेवटी अनपेक्षित कलाटण्या हमखासपणे येऊ लागल्या. व्यक्तींची शरीरवर्णने आणि शारीरिक हालचाली यांचे (शिव्यांसह) भरपूर तपशील येऊ लागले. किस्से पिकू लागले. यात पुन्हा शंकरराव खरात यांची माटेवळणाची आणि अण्णाभाऊ साठे यांची ठोकळवळणाची कथा–कादंबरी होतीच. जुन्या वळणाची जीवनमूल्यवादी, कौटुंबिक कथाही होती.

या घाईगर्दीत कथेचे मूळ स्वरूप हरवले. ही लाट आज ओसरत आहे; याला कारणही हेच असावे. कारण निरनिराळ्या प्रदेशातील नवेनवे अनुभव एकदाचे ग्रामीण साहित्यात जमा झाले. आज घडीला या अनुभवांतील नावीन्य फारसे राहिले नाही. साहजिकच कलेची फारशी फिकीर नसलेला आणि ' नव्या 'चे सदैव आकर्षण असलेला सामान्य वाचकवर्ग आज ग्रामीण साहित्यापासून दुसरीकडे खेचला जाताना दिसत आहे. ऐतिहासिक, पौराणिक आणि झोपडपट्टीच्या जीवनावरील साहित्याकडे तो वळलेला दिसतो.

काही तथाकथित टीकाकारही, ' आज खेडे संपूर्ण बदललेले आहे. या नव्या खेड्याचे चित्रण आजच्या ग्रामीण साहित्यात नाही. सबब ते साहित्य जुने ! ' अशी जाता जाता टीका करीत आहेत. यामुळे नव्याने उदयाला येणारे काही लेखक ही टीका लक्षात घेऊन नवीनवी अनुभवक्षेत्रे ग्रामीण साहित्यात आणण्यासाठी धडपडताना दिसतात.

यातून एक घातचक्र निर्माण झालेले आहे. ग्रामीण कथा–कादंबरीकडून कलात्मकतेची अपेक्षा सामान्य वाचकाची आरंभापासूनच राहिलेली नव्हती. त्यामुळे बहुसंख्य सामान्य ग्रामीण साहित्यिकही लोकप्रिय झाले. त्यांच्या या लोकप्रियतेमुळे त्यांनाही कलात्मकतेची फारशी आवश्यकता वाटली नाही. ती कुवतही त्यांच्यामध्ये कदाचित नसण्याची शक्यता आहे. ते सतत आपले धोपट अनुभवच लिहीत राहिले. या अनुभवांचे नवेपण जेव्हा संपुष्टात येऊ लागले तेव्हा ग्रामीण साहित्याची लोक-प्रियता ओसरू लागली. लोकप्रियता ओसरू लागताच काही नवे उमेदवार लेखक पुन्हा नवे अनुभव आणून सोडण्याचा प्रयत्न करू लागले, आणि ग्रामीण साहित्य कलेच्या दृष्टीने पूर्वी होते त्याच ठिकाणी घोटाळू लागले.

या प्रकारामुळे ग्रामीण कथा-कादंबरी एका कोंडीत सापडली. ग्रामीण जीवनाच्या अजून निरनिराळ्या थरांतील नव्या नव्या अनुभवांचे व कालमानानुसार बदललेल्या ग्रामजीवनाचे केवळ चित्रण करणे, हीच ' ग्रामीण साहित्याची दिशा ' ठरल्यासारखी झालेली आहे. अनेक टीकाकारांनी ह्या नव्या अनुभवांच्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत.

वास्तविक हे वाङ्मयीन कारण किंवा मूल्य मुळीच नाही. उलट ते वाङ्मयातील सामाजिक मूल्य आहे. या सामाजिक मूल्याने आजची कथा-कादंबरी नियंत्रित झालेली आहे. तिच्या कलात्मक वाटचालीकडे पाहण्याच्या अवस्थेत वाचकवर्ग आणि बहुतेक टीकाकार आज तरी दिसत नाहीत.

साहित्यदृष्ट्या असे म्हणता येईल की, माडगूळकर-मिरासदार-पाटील यांच्या ग्रामीण साहित्याने जो टप्पा गाठला आहे, तेथपर्यंत येऊनच ते घोटाळत राहिलेले आहे. नंतर कितीतरी नवे ग्रामीण अनुभव त्यात येऊन जमा झालेले असले तरी साहित्याच्या दृष्टीने ग्रामीण साहित्य मैदानातल्या पाण्याप्रमाणे फक्त विस्तारत आहे.

याला काही अपवाद हे आहेतच. लोकप्रियतेची लाटही ओसरत चालल्याने तिला बळी पडण्याचा धोका कमी झालेला आहे. अधिक मनःपूर्वक ग्रामीण साहित्यनिर्मिती करायला हा काळ अनुकूल आहे. नवीनतेचे चलणी नाणे मिळणे आता कठीण झाल्याने ग्रामीण साहित्यनिर्मिती ही बाब अधिक जोखमीची आणि अधिक कस पाहणारी झाली आहे.

हे ओळखून आज काही ग्रामीण लेखक साहित्यनिर्मिती करीत आहेत. त्यांचे ग्रामीण साहित्य अनेक लहान-मोठ्या मोहांतून मुक्त होऊन कलात्मकतेच्या दिशेने ते अधिक जागरूकतेने वाटचाल करताना दिसते. ते अधिकाधिक आत्मनिष्ठ आणि अंतर्मुख होताना जाणवते. अनुभवांच्या निरनिराळ्या पातळ्या शोधत, कलात्मकतेची जाणीव राखत त्याने वाटचाल करणे आज अटळही आहे. या दिशेनेच त्याला पुढे जावे लागेल. वेगळ्या परिसरांतील, वेगळ्या जमातींतील वस्तुनिष्ठ अनुभवांच्या भरीची मातब्बरी त्याला आज राहिली नाही. अनुभवांच्या नवेपणाचे आकर्षण असलेले साहित्य काही काळ चमकते आणि ते अनुभव ओळखीचे झाल्यावर ते गंजूनही जाते; हे ‘ लाटे ’-तील ग्रामीण साहित्यानेच त्याला दाखवून दिलेले आहे; आज साहित्य हे जीवनाचे व समाजाचे साधन नसून, ती एक कलेच्या क्षेत्रातील बाब आहे; हे निर्विवाद सिद्ध झाले आहे. म्हणूनच आज वाटचाल करू पाहणाऱ्या ग्रामीण साहित्याला मातब्बरी वाटते ती प्रथम कलात्मकतेची; नंतर तिच्या अनुषंगाने येणाऱ्या अनुभवांची.

ग्रामीण साहित्यातून गतजीवन येते का आजच्या खेड्याचे जीवन येते हे फारसे महत्त्वाचे नाही. तसेच ते नागर भाषा वापरते का ग्रामीण भाषा वापरते, हेही कलावंताच्या आणि कलेच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही. गतजीवन साहित्यात आल्याने त्याचा दर्जा मुळीच कमी होत नाही किंवा आजचे खेडे आल्याने त्याचा दर्जा वाढतही नाही. कारण ग्रामीण साहित्याला कलेच्या क्षेत्रात उभे राहायचे आहे. त्याला कुठल्याही काळाचे जीवन दाखविण्याची जिद्द नाही, अगर विधिनिषेधही नाही. त्याला सगळेच अनुभव सारखे. ग्रामीण साहित्याची ओढ आणि दिशा असली पाहिजे ती यापलीकडे असलेले मानवी जीवन, मानवी मनाचे अनेक पापुद्रे, मनामनाचे संबंध; त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या भावना, संवेदना, विचार-आंदोलने यांच्याकडे. त्याने अनुभवांच्या तारखांत

न सापडता कालनिरपेक्ष राहून या मनाशी संवाद, विरोध, तोल साधला पाहिजे. चित्रीकरणापेक्षा अनुभवातील सौंदर्यदर्शनाकडे त्याची ओढ असली पाहिजे. अशा सौंदर्यनिर्मितीच्या वेळी मग नागर भाषा आवश्यक असेल तर ग्रामीण साहित्याने ती अवश्य वापरावी आणि ग्रामीण बोलीच आवश्यक आणि अपरिहार्य वाटत असेल तर ती नागर भाषेच्या वाचकांना न भिता अवश्य मनःपूर्वकतेने वापरावी. सारांश, आज निर्माण होणाऱ्या ग्रामीण साहित्याने अधिक मनःपूर्वक, अधिक कलानिष्ठ होणे प्रथम आवश्यक आहे. अन्यथा वाचकांच्या मनोरंजनात गुंतून ते कलाक्षेत्राला पारखेच राहील.

काही नवे वाङ्मयीन प्रवाह

भीमराव कुलकर्णी

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत मराठी वाङ्मयामध्ये फार मोठ्या प्रमाणात फरक पडत गेले. मराठी कथा, कविता, कादंबरी, ललितलेखन, समीक्षा व नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांत झपाट्याने व अनेकांगांनी हे फरक पडत गेले. ह्या फरकामुळे विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्ध शतकात आणि नंतरच्या पाच-पंचवीस वर्षांत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयात आश्चर्यकारक बदल झालेले आढळतात.$

ह्या बदलाच्या खुणा १९४० पूर्वीच्या वाङ्मयात कुठे ना कुठे आढळतात, नाही असे नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर हे बदल नव्या रूपाने, नव्या जाणिवांनी आणि नव्या प्रकाराने मराठी वाङ्मय समृद्ध करताना आढळून येतात.

१९४० च्या सुमारास मराठीत जे नववाङ्मय निर्माण होऊ लागले, ते त्यापूर्वीच्या वाङ्मयापेक्षा कलात्मक आणि महायुद्धोत्तर समाजजीवनाने अंतर्मुख झालेले होते. ह्या जाणिवांचे आणि अभिव्यक्तीचे मूलस्रोत पाश्चात्त्य वाङ्मयातून कालांतराने इथपर्यंत येऊन पोचले होते आणि त्यामुळे ह्या कालखंडातील वाङ्मयनिर्मितीमध्ये एक प्रकारचा अभिनिवेश होता आणि ह्या अभिनिवेशामागे काहीतरी नवे आणि निराळे करून दाखविण्याची विलक्षण अशी धडपड होती. ह्या नव्या प्रेरणेमुळे १९४० नंतरच्या १०-१५ वर्षांत मराठी वाङ्मयात जे परिवर्तन झाले, ते वाङ्मयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून चिरस्मरणीय ठरले आहे.

कथा आणि कविता या क्षेत्रांत ह्या परिवर्तनाने फार मोठे चैतन्य निर्माण केले. विशेषत: कवितेच्या क्षेत्रात बा. सी. मर्ढेकरांसारख्या कवीचा उदय ही अनेक दृष्टींनी

....

$ कादंबरी, नाटक व ग्रामीण वाङ्मय व वाङ्मयीन वाद यांसंबंधी स्वतंत्र लेख असल्याने त्यांचा विचार या लेखात केला नाही.

क्रांतिकारी घटना ठरली. मर्ढेकर जे करू पाहात होते, त्याचा पाया रविकिरण मंडळानंतर उदयास आलेल्या कवींनी म्हणजे अनिल, कुसुमाग्रज व बोरकर यांच्या कवितेने घातला होता. त्यांच्याहीपूर्वी बालकवींच्या कवितेने निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार घडविताना शब्दाशब्दांतून शब्द-रस-रूप-गंधादिकांच्या संवेदनांचे विश्व उभे केले होते. अनिलांनी मुक्तपद्याच्या रूपाने आणि नव्या सामाजिक जाणिवा सहजगत्या व्यक्त करण्याच्या मिषाने जुन्या काव्याचे बंद कितीतरी प्रमाणात मुक्त करून ठेवले होते. कुसुमाग्रजांनी वैयक्तिक प्रेमभावनेची उत्कटता आणि सामाजिक अन्यायाबद्दलची चीड अशांसारख्या परस्पर विरुद्ध वैशिष्ट्यांतून परिणामकारक अशा अंतःकरणाला भिडणाऱ्या काव्याचा साक्षात्कार घडविला होता आणि कविवर्य तांब्यांचा झेंडा खांद्यावर घेऊन काव्यप्रांतात उतरलेल्या बोरकरांनी बघता बघता तांब्यांच्या पुढे मजल मारून मराठी प्रतिमासृष्टीचे दालन जातिवंत शब्दकळेने भारून टाकले होते. अशा वेळी मर्ढेकरांच्या कवितेने आपल्या पदन्यासाने बघता बघता साऱ्यांना स्तंभित करून टाकले. मर्ढेकरी कविता ही मुख्यत्वेकरून नव्या यंत्रयुगाच्या जाणिवा अशा काही रीतीने आविष्कृत करीत होती की, त्या यंत्रयुगाच्या नव्या आकलनाने आणि कवीच्या अभिव्यक्तीच्या सर्वस्वी नव्या प्रकाराने, (अशा दुहेरी रीतीने) मर्ढेकरांच्या कवितेने मराठी मनाला चांगलाच धक्का दिला होता. हा धक्का जबरदस्त होता आणि त्याने मराठी कवितेला चांगलीच गती दिली. नव्या प्रतिमा, यंत्रयुगाने निर्माण केलेल्या नव्या विश्वातील संवेदनांचे नव्या मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून उभे केलेले विश्व आणि ते उभे करण्यासाठी मुद्दाम रूढ सांकेतिक अशा कित्येक प्रकारच्या काव्यलेखनपद्धतींची काही वेळा विदूपकी वाटावी अशी मांडणी यांमुळे ही कविता एकदम निराळी व वादविषयक ठरावी, हे साहजिकच होते. ह्या नव्या वैशिष्ट्यांमुळे ती कित्येक ठिकाणी दुर्बोध, अनाकलनीय वाटू लागली. तिच्यातील प्रतिमासृष्टी ही संमिश्रतेमुळे अत्यंत आत्मनिष्ठ होती. या दुर्बोधतेपेक्षा यंत्रयुगाची चित्रे रंगविताना तिने जे ‘ उघड ’ स्वरूप धारण केले होते, यामुळे ती कित्येकांना ओंगळ, बीभत्स व कलेतील सौंदर्यास विघातक अशी वाटली. मर्ढेकरांच्या आगेमागे यंत्रयुगीन जीवनाचे व संज्ञाशून्यतेचे चित्रण मोठ्या प्रमाणात होऊ लागले. मात्र मूळ मर्ढेकरांची कविता ही केवळ चूष म्हणून आलेली नव्हती. तिच्या मागे नव्या युगाच्या विफलतेवरचे जाणीवपूर्वक केलेले भाष्य होते. अशा एखाद्या तत्त्वज्ञानाची बैठक नवकाव्य म्हणून लिहिल्या गेलेल्या साऱ्याच कवितांमधून आढळत नाही. त्यामुळे ती मोठ्या प्रमाणात वाचकांपासून दुरावली आहे.

जीवनाच्या उत्कट ओढीतून निर्माण झालेल्या विशुद्ध काव्याची निर्मिती मर्ढेकरानंतरच्या कवितेत मोठ्या प्रमाणात झालेली आढळते. अर्थातच यातील सारीच कविता नवकाव्यात मोडण्यासारखी नाही. बापट, पाडगावकर, कांत इत्यादिकांच्या कवितेवर नवकाव्याचा परिणाम निश्चितपणे झालेला आहे, परंतु तरीही ती मुख्यत्वेकरून बोरकर–कुसुमाग्रजांच्या परंपरेचे अनुसरण करणारी वाटते. इंदिरा संत, पद्मा इत्यादी

कवयित्रींच्या कवितेतील सूक्ष्मताही मागच्या कवितेपेक्षा मराठी कविता किती पुढे गेलेली आहे, हे लक्षात आणून देते. विंदा करंदीकरांची कविता तर दुहेरी स्वरूपाची आहे. सुरुवातीच्या त्यांच्या कवितेत साम्यवादी विचारसरणीमुळे ती प्रचारकी वळणाची वाटते तर त्यानंतर ती अलीकडे गेल्या दहा वर्षांत कात टाकल्याप्रमाणे नाना तऱ्हेचे नवे प्रयोग करण्यात दंग झाली आहे, आणि त्यामुळे त्यांची नंतरची कविता अगोदरच्या कवितेपेक्षा चांगलीच परिणामकारक ठरली आहे. करंदीकरांप्रमाणेच साम्यवादी विचाराने प्रभावित झालेली मुक्तिबोधांची मुक्तच्छंदातील कविता मध्यंतरीच्या काळात लक्ष वेधून घेणारी ठरली आहे. या सर्वांमधे आपला एक तिसराच प्रवाह आहे असे सांगणारी पु. शि. रेगे यांची कविता नवकाव्यासंबंधीच्या कित्येक कल्पनांचा भ्रमनिरास करणारी आहे. संस्कृत शब्द आणि संस्कृत-संस्कृती यांच्यावर पोसलेली आणि तरीही समृद्ध अशा नव्या जाणिवांचा प्रत्यय देणारी ही कविता वाचल्यानंतर कित्येकांना गाथा सत्तसईची; संस्कृतातल्या शृंगारप्रधान अशा ध्वनिकाव्याची आणि लावणीतल्या मदभरी वातावरणाची आठवण करून देते. रेग्यांच्या कवितेने ह्या साऱ्या संस्कारांतून एक नवेच विश्व उभे केले आहे, आणि म्हणूनच नव कविता ही केवळ वैफल्यगर्भ नव्या प्रतिमांच्या जाळ्यात गुरफटलेली, जीवनातल्या काळ्या अंगाचेच दर्शन घडविणारी हे समीकरण बरोबर नसून, यातील काही कवितेत नव्या जाणिवा, नव्या प्रतिमा यांमधून सौंदर्याचे नवे आकृतिबंध निर्माण करण्याची कलात्मक दृष्टी आढळते.

रेगे, करंदीकर, बापट, पाडगावकर यांचे कवितालेखन बहरात आले असतानाच चित्रे, खानोलकरादिकांची एक नवी पिढी मराठी काव्यप्रांतात उदयास आली आणि त्यांच्या पिढीने काव्यलेखनाच्या परंपरांचा जाणूनबुजून विच्छेद करण्याचे काही नवे प्रयोग केले आहेत. चिं. त्र्यं. खानोलकर व दिलीप चित्रे ह्या दोघांच्या कवितेतील झेप बापट-पाडगावकरांपेक्षा कितीतरी मोठी आहे, इतकेच नव्हे तर त्यांच्यानंतर येणाऱ्या अनेक कवींमध्येही ती दिसते, हेही तितकेच खरे आहे. परंतु या नव्या पिढीमध्ये विदूषकीपणा व आक्रस्ताळेपणा विलक्षण आहे. त्यामुळे दुर्बोधतेची तिने परिसीमा गाठली आहे. लैंगिक भावना व कल्पना यांचा अतिरिक्त वापर म्हणजेच बंडखोरी अशी त्यांच्या मनाने समजूत करून घेतलेली दिसते. विशेषतः अलीकडे संतप्त तरुणांनी चालविलेल्या लघुनियतकालिकांतील व अनियतकालिकांतील कविता पाहिल्या तर प्रतिभाशून्य मनाचे हे विकृत खेळ आहेत असे वाटायला लागते. अशोक शहाणे, चंद्रकांत खोत, सतीश काळशेकर यांसारख्या काही हातांच्या बोटांवर मोजणाऱ्या कवींमध्ये प्रतिभेचा आणि कल्पकतेचा प्रादुर्भाव आढळतो. बाकी बहुसंख्य कविता ही कविता म्हणण्याच्याही योग्यतेची नाही असे म्हटले पाहिजे. कवितेसाठी हल्ली कसलीही तयारी, व्यासंग करावा लागत नाही. त्यामुळे हल्ली 'कविता' बारेमाप, वेडीवाकडी आणि सर्वार्थाने मुक्त झाली आहे. सर्वांत अवघड असा हा वाङ्मयप्रकार अलीकडे सर्वांत सोपा झाला आहे, आणि कविता खूप लिहिली जात असली तरी ती सामान्य वाचकांपासून एकदम दुरावली

आहे. रसिक वाचक आणि कवी यांमध्ये यापूर्वी एवढी मोठी दरी कधीच पडली नसेल ! अनियतकालिकांचा किंवा लघुनियतकालिकांचा उदय हा बंडखोरीतून किंवा प्रस्थापिताविरुद्धच्या असंतोषातून झालेला नसून मुक्तच्छंदामुळे काव्यलेखन फार सुलभ व सोपे झाले आहे म्हणून झाला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कारण प्रस्थापिताविरुद्ध बंड करण्यासाठी जी एक अलौकिक अशी प्रतिभेची धारणा लागते, ती येथे नसून नवोदित, होतकरू साहित्यिकांची ही एक सोय आहे.

नवकवितेबरोबरच १९४० च्या आगेमागे मराठीत नवकथेचा जन्म झाला आणि गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, अरविंद गोखले यांच्या रूपाने एकदम मराठी कथा चांगलीच समृद्ध बनली. त्यांच्यानंतर व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रांनी या समृद्धतेत चांगलीच भर घातली. कवितेमध्ये मर्ढेकरांचे जे स्थान तेच मराठी कथेमध्ये गंगाधर गाडगिळांचे. त्यांच्या कथांनी मराठी कथेला जडलेले कृत्रिम तंत्रपाटवाचे आणि तकलादूपणाचे बंद तोडून टाकले. अनेक अंगांनी, अनेक प्रकाराने आणि अतिशय समर्थपणे त्यांनी मराठी कथालेखनात आमूलाग्र फरक घडवून आणला. त्यामुळे मराठी कथा किती विविध प्रकारांनी लिहू जाऊ शकते आणि गाडगिळांसारखा समर्थ कथाकार मानवी जीवनातील साध्यासुध्या घटनांना किती मोठा अर्थ प्राप्त करून देऊ शकतो याचे प्रत्यंतर आले. गोखल्यांच्या कथांतील मध्यममार्गानुसरणामुळे नवी कथा तात्काळ लोकप्रिय झाली तर भाव्यांच्या कथांतील झपाटलेल्या प्रवृत्तीच्या उत्तुंग कल्पनाविलासामुळे मराठी वाचक क्षणभर दिपून गेल्यासारखे झाले. मात्र गाडगिळांच्या कथेतील मनोवगाहनामुळे कवितेप्रमाणेच मराठी कथेवरही दुर्बोधतेचा, अश्लीलतेचा, अभद्रतेचा आरोप आला. नव्या कथेवरचा हा आरोप पुढेही चढतावाढता राहिला. कारण यानंतर येणाऱ्या काही कथालेखकांचा तो एक हव्यासच होऊन बसला. मर्यादित अनुभवविश्वामुळे कित्येक दुय्यम-तिय्यम दर्जाच्या कथाकारांनी विकृतीचेच भांडवल केले. गाडगीळ-गोखल्यांच्या पिढीनंतर जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, पानवलकर, विद्याधर पुंडलिक, जयवंत दळवी, व नव्या दमाच्या इतर अनेक लेखकांनी मराठी कथेच्या प्रांतात अल्पावधीत मोठी दौड केली आहे. परंतु गेल्या काही वर्षांतील दिवाळी अंकांच्या चढत्यावाढत्या निर्मितीबरोबर कथालेखन उदंड प्रमाणात चालले असले तरी १०–१५ वर्षांपूर्वीची जिद्द, उत्सुकता व चैतन्य नाहीसे झाले आहे. या कथालेखनातील बहुसंख्य लेखन अतिशय सामान्य आहे आणि त्यामुळे कथा या वाङ्मयप्रकाराला हल्ली मोठीच मरगळ आल्यासारखे वाटते.

गेल्या २५–३० वर्षांत मराठी समीक्षेच्या क्षेत्रातही लक्षणीय प्रगती झाली आहे. केशवसुतांनी काव्याच्या माध्यमातून कवी आणि काव्यविषयक प्रश्नांची चर्चा केली आणि ती मराठीमध्ये अनेक वर्षे चालू राहिली. त्यानंतर साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून हरि नारायण आपटे यांनी कलाविषयक काही प्रश्नांचा विचार केला आणि त्यापुढच्या अनेक साहित्यिकांनी ती प्रथा पुढे चालू ठेविली. त्यातूनच प्रेरणा घेऊन

पौर्वात्य व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रांची ओळख करून देण्याच्या दृष्टीने रा. श्री. जोग, द. के. केळकर, रा. शं. वाळिंबे, ग. त्र्यं. देशपांडे व श्री. के. क्षीरसागर यांचे काव्यशास्त्राची चिकित्सा करणारे ग्रंथ निर्माण झाले. या ग्रंथांच्या निमित्ताने समीक्षाविषयक कितीतरी मूलभूत प्रश्नांचा विचार झाला. कवीचे काव्य, त्याचे व्यक्तिमत्त्व व त्याच्या भोवतालची परिस्थिती यांचा अन्योन्य संबंध लक्षात घेऊन कवीच्या काव्यावर मोठा प्रकाश टाकण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. वाळिंबे यांनी केले. जोगांचा केशवसुतविषयक ग्रंथ आणि त्यानंतर डॉ. वाळिंबे व मराठे यांचे बालकवींविषयक प्रबंध यांनी समीक्षेच्या क्षेत्रात एक नवी वाङ्मयविषयक जाण आणली. पाश्चात्त्य साहित्यविषयक प्रणालींचा व टीकामूल्यांचा परिचय डॉ. वाळिंबे यांनी करून दिला. प्रा. रा. श्री. जोगांनी वाङ्मयातील सौंदर्यकल्पनेची व त्यापासून मिळणाऱ्या आनंदाची चिकित्सा केली. श्री. के. क्षीरसागरांनी अभिजात वाङ्मयाची वैशिष्ट्ये विशद केली. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी आस्थेने वाङ्मयविषयक अनेक प्रश्नांचे स्वरूप उलगडण्याचा प्रयत्न केला आणि मराठी वाङ्मयात निर्माण होत असलेल्या नव्या प्रवाहांचे स्वागत करून या नव्या वाङ्मयाचे ते भाष्यकार बनले. नवकवितेच्या प्रवर्तकत्वाबरोबरच नव्या समीक्षेचे उद्‌गाते म्हणूनही मर्ढेकरांनी महत्त्वाचे कार्य केले. कलेतील सौंदर्याचे घटक त्यांनी नव्या सौंदर्यशास्त्राच्या (इस्थेटिक्स) आधाराने स्पष्ट केले. त्यासाठी त्यांनी नवी परिभाषा, नवा दृष्टिकोण आणि सर्वस्वी नवा विचार मांडला. त्याचा मराठी समीक्षेवर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्या विचारावर फार मोठा प्रतिवाद झाला, तो दोषपूर्ण आहे हे अनेकांनी अनेक प्रकारांनी सांगितले तरी मर्ढेकरी विचाराचा प्रभाव मात्र समीक्षेच्या क्षेत्रात वाढता राहिला. मर्ढेकरांच्या पद्धतीने कलाकृतींची चिकित्सा करणाऱ्या नव्या समीक्षकांचा एक नवा वर्गच निर्माण झाला. गंगाधर गाडगीळ, दि. के. बेडेकर, माधव आचवल, दिलीप चित्रे यांचा त्यामध्ये समावेश होतो.

या नव्या दृष्टीच्या समीक्षकांतही नववाङ्मयाकडे पाहणाऱ्या समीक्षकांचे दोन तट पडले. संस्कृत साहित्यशास्त्राच्या व्यासंगामुळे समीक्षा-लेखनामध्ये ऐतिहासिक दृष्टीचा, औचित्याचा, सदभिरुचीचा आग्रह धरणारे व काटेकोर संशोधकीय बाणा बाळगणारे वाळिंबे-जोग यांसारखे व अभिजातवादी कलेचा आग्रह करणारे क्षीरसागरांसारखे समीक्षक यांनी नव्या वाङ्मयातील कित्येक अनिष्ट गोष्टींचा ऊहापोह केला. विशेषतः वाळिंबे-क्षीरसागरादिकांनी सामाजिक दृष्ट्या ह्या वाङ्मयातील अश्लील, बीभत्स आणि ग्राम्यता यांवर कडाडून हल्ला केला; तर जोगांनी श्रेष्ठ वाङ्मयाचे घटक म्हणून जी वैशिष्ट्ये या नव्या वाङ्मयातून दिसावयास हवीत, त्यांचाच अभाव कसा जाणवतो याची चर्चा केली. नवे वाङ्मय समजून न घेताच ही टीका केली जाते, असा एक आक्षेप हल्ली सर्रास घेतला जातो, परंतु ह्या नववाङ्मयाच्या प्रवर्तकांनीही ह्या समीक्षकांची मूलभूत दृष्टी समजावून घेतली पाहिजे. आजच्या नव्या समीक्षेमध्ये मर्ढेकरी समीक्षेचा एक प्रवाह सोडला तर मराठी समीक्षा व्यापक, विस्तृत, रसोद्‌ग्राही व विशुद्ध प्रवृत्तीची

बनविणाऱ्यांमध्ये जोग, वाळिंबे, क्षीरसागर, वा. ल. कुलकर्णी, कुसुमावती देशपांडे यांचा वाटा फार मोठा आहे. मराठी समीक्षेमध्ये वारंवार निर्माण झालेल्या अवाङ्मयीन व बांडगूळवजा प्रश्नांचा त्यांनी वेळोवेळी निरास केला आहे.

त्यांच्याच बरोबरीने भवानीशंकर पंडित, मा. गो. देशमुख व अ. ना. देशपांडे या वैदर्भीय समीक्षकांनी आपल्या व्यासंगपूर्ण लेखनाने मोलाची भर घातली आहे. पाश्चात्त्य, पौर्वात्य व मराठी नाट्यवाङ्मय व रंगभूमी यांचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्या समीक्षकांमध्ये आज माधव मनोहर हे नाव अग्रभागी आहे. मराठी रंगभूमीचे त्यांचे अवलोकन अद्ययावत आहे. रा. भि. जोशी, गं. ब. ग्रामोपाध्ये, स. गं. मालशे, ल. ग. जोग, वसंत दावतर, धों. वि. देशपांडे, व. दि. कुलकर्णी, नरहर कुरुंदकर ही सहजगत्या आठविलेली अलीकडच्या पिढीतील काही जाणकार समीक्षकांची नावे. या सर्वांच्या समीक्षणविषयक कार्याने मराठी समीक्षा विस्तारलेली व विकासलेली आहे.

कथा, कविता, कादंबरी इ. क्षेत्रांत जी एक नवता आली, ती मराठीतल्या ललितनिबंध, प्रवासवर्णन व विनोद यांतूनही प्रगटली आहे. विनोदाच्या क्षेत्रात पु. ल. देशपांडे यांनी आपले स्वतंत्र युगच सुरू केले. केवळ विनोदासाठी विनोद ही त्यांची भूमिका नसून त्यांच्या लेखनाची सारी बैठकच वैचारिक आहे.

आपली संस्कृती, आपले संस्कार, आपल्या कला, आपले वाङ्मय, आपले राजकारण आणि समाजकारण यांचे अतिशय डोळस निरीक्षण, या त्यांच्या वैचारिकते-मुळेच त्यांना करणे अत्यावश्यक वाटते. या वैचारिकतेमागे त्यांचे अत्यंत संपन्न, अष्टपैलू आणि जागरूक अशा कलावंताचे व्यक्तिमत्त्व उभे असल्याने त्यांची ही वैचारिकता अतिशय आत्मनिष्ठ अशा स्वरूपात सदैव आविष्कृत होते. या जागरूकते-पोटी समाजातील सर्व क्षेत्रांतील असंख्य विसंगती, अगणित सोंगे–ढोंगे, विपरीत कल्पना आणि अपरिमित मुखवटे, इ. रोगट प्रवृत्तींचा ते सदैव समाचार घेताना दिसतात. त्यांचे अवलोकन जसे सूक्ष्म आणि तीक्ष्ण असते, तसेच ते सदैव अद्ययावत असते. दृष्टी जशी चौफेर तसाच तिचा हेतू अतिशय उदात्त आणि संस्कृतिनिष्ठ असतो. समाजाचे मोहरे 'श्रेयस' कडून झपाट्याने 'प्रेयस' कडे वळत असलेले पाहून ते अस्वस्थ होतात आणि उपहास-उपरोधाच्या प्रखर वाग्बाणांनी ते अशा प्रवृत्तींवर तुटून पडतात. प्रखर वैचारिकता हुकमी विनोदाच्या साहाय्याने इतक्या सहजगत्या अगदी सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचविण्यात पु. ल. देशपांड्यांइतके यश आतापर्यंत कोणालाच प्राप्त झाले नव्हते.

उत्कट सामाजिक जाणिवेतून वैचारिक लेखन करणाऱ्या कोणत्याही लेखकाला काही उदात्त, भव्य-दिव्य भूमिकांपोटी काही क्षुद्र, किरकोळ आणि विपरीत कल्पनांवर आसूड ओढताना 'असहिष्णु' वृत्ती ही धारण करावीच लागते. पु. ल. त्याला अप-वाद नाहीत. आपल्याला पटणाऱ्या, न आवडणाऱ्या गोष्टींमागे दुसरी काही चांगली भूमिका असू शकते, हे या बुद्धिवादी परंतु रसिक पुरुषोत्तमाला पाहण्याची आवश्यकता

वाटत नाही. त्याला ते क्षणभरदेखील खपत नाही. एखाद्या तेजस्वी, सळसळत्या, फूत्कार काढून उभ्या असलेल्या नागाप्रमाणे रस्ता चुकला रे चुकला की, क्षणार्धात तो फणा टाकतो. सहानुभूतीपेक्षा प्रखर बुद्धिवादी पिंडप्रकृतीचे ते अभिजात लेखक आहेत.

त्यामुळे पु. ल. देशपांडे आपल्या ह्या वैचारिकतेपोटी कोणत्या तऱ्हेच्या वाङ्मय-प्रकाराचा आश्रय घेतात, याला फारसे महत्त्व नसते. कारण कोणत्याही तऱ्हेच्या वाङ्मयप्रकारातून ते समर्थपणे आपली वरील भूमिका पार पाडताना दिसतात. अर्थातच कोणत्याही वाङ्मयप्रकाराचे माध्यम स्वीकारून तितक्याच आत्मविश्वासाने ते त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या प्रांगणातून लीलेने विहार करतात.

देशपांडे यांचा खरा पिंड कलावंताइतकाच समाजधुरीणाचा आहे. त्यांना कलावंताची भूमिका पत्करून त्याला सामाजिक उन्नयनाची आपल्या अंतःकरणातील तगमग आणि तळमळ व्यक्त करावयाची आहे, हे स्पष्टपणे आज सांगण्याची आवश्यकता आहे. विनोदी-लेखक म्हणून त्यांची श्रेष्ठता ही वादातीत आहे. कोल्हटकर–गडकऱ्यांच्या पक्तीत बसल्यामुळे त्यांनाही कल्पनाचमत्कृतीचे आणि शब्दचमत्कृतीचे वावडे नाही, आणि त्यामुळेच कित्येक वेळा त्यांनाही विनोदामध्ये वाहवत जाण्याचा मोह होतो. परंतु त्यांच्या कल्पनाशक्तीचे पाय सदैव भुईवर आहेत, आणि त्यांना संयमाची चांगलीच जाण आहे.

मराठी प्रवासवर्णनात्मक लेखनामध्ये आज लालित्याचा साक्षात्कार होतो तो मूलतः त्यातील व्यक्तिमत्त्वांच्या दर्शनाने आणि आकर्षक मांडणीमुळे. रुक्ष आणि रटाळ प्रवासवर्णनांच्या मार्गातून लालित्याच्या नितांतसुंदर प्रांगणात प्रवासवर्णनांना आणून सोडण्याचे सारे श्रेय काणेकरांचे; आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गाने प्रवासवर्णने कशी डौलदार आणि आकर्षक गतीने चाललेली आहेत.

काणेकरांचे पुस्तक त्याच्या नावापासूनच मोठे वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यामधून त्यांची कोणत्याही गोष्टीचे चटकन आकलन करण्याची आणि ते अगदी थोडक्या शब्दांत सहजगत्या मांडण्याची अभिजात दृष्टी ठायीठायी प्रत्ययाला येते. निरनिराळ्या प्रदेशातील मानवामानवामधील आढळणारे काही ‘मानवी’ गुण, त्यांची भारताकडे पाहण्याची भूमिका, त्यांचा जीवनक्रम, निरनिराळ्या प्रदेशांना प्राप्त झालेले पृथक व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन काणेकरांनी आपल्या संयमपूर्ण आणि सौम्य परंतु कलात्मक लेखनशैलीत घडविले आहे. त्यामध्ये जशी अतीव जिज्ञासा आहे, तसाच व्यापक सहानुभाव आहे. कोणतेही वैभवसंपन्न जीवन पाहताना काणेकरांची भूमिका ही निव्वळ नवलाईची, कौतुकाची किंवा तेथल्या भव्यतेने आपल्याकडल्या जीवनाला कमी लेखण्याची कधीच नसते. त्यांना देशादेशातील संस्कृतीमधले अंतर यथार्थ रीतीने पाहण्याची जी दृष्टी लाभली आहे त्यामुळे पाश्चात्त्य जीवनाचे निरीक्षण फार थोड्या शब्दांत त्यांच्याबद्दल अगदी नेमकी दृष्टी देऊन जाते. काणेकरांचे जागतिक राजकारणाचे यथार्थ आकलन येथे तात्काळ लक्षात येते. राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास असूनही राजकीय भानगडीपासून अलिप्त

असणारे काणेकर हे मराठीतले एकमेव साहित्यिक होत. त्यांच्या प्रवासवर्णनात्मक पुस्तकांतून त्यांच्या या वैशिष्ट्याचे वेळोवेळी दर्शन घडले आहे. त्यांमध्ये गेल्या कित्येक वर्षांच्या व्यापक अनुभवांमुळे, त्यांच्या साध्यासुध्या परंतु नाट्यपूर्ण निवेदनामुळे चांगलीच मार्मिकता आली आहे.

काणेकरांनंतर प्रवासवर्णनाच्या क्षेत्रात लक्षात राहील असे नाव म्हणजे रा. भि. जोशी यांचे. त्यांची प्रवासवर्णने ही पाश्चात्त्य व अन्य देशांच्या अवलोकनातून वा केवळ निसर्गसौंदर्याच्या जाणिवेने लिहिली गेली नाहीत. ती मुख्यत्वेकरून स्फुट स्वरूपाची आहेत, परंतु जातिवंत रसिकाच्या आस्वादकतेची ती साक्ष देणारी आहेत.

परकीय देशांच्या प्रवासामुळे व निसर्गसौंदर्याच्या ओढीपोटी निर्माण झालेल्या प्रवासवर्णनामध्ये आज चांगलेच वैचित्र्य निर्माण झाले आहे. गंगाधर गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, बाळ गाडगीळ, जयवंत दळवी, रमेश मंत्री यांच्या कृती त्या दृष्टीने लक्षणीय आहेत. दळवी, गाडगीळ (बाळ) व रमेश मंत्री यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात अलीकडे विशुद्ध विनोदाचे (Humour) दालन उघडले आहे; आणि त्याचा प्रत्यय त्यांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनामध्येही येतो.

१९२६ पासून १९५० पर्यंत मराठीमध्ये फडके, खांडेकर, काणेकर, दांडेकर, ना. म. संत इत्यादिकांनी ‘ लघुनिबंध ’ हा नवा वाङ्मयप्रकार रूढ केला होता.

आणि मराठीतल्या या आघाडीच्या लघुनिबंधकारांनी ज्या पद्धतीने हे लघुनिबंध लिहिले, ती पद्धतच या वाङ्मयप्रकाराचे तंत्र बनले, त्याचे व्यवच्छेदक लक्षण बनले. त्या लक्षणांची-तंत्रमंत्रांची-चौकट या प्रकाराभोवती पक्की बसली. साध्यासुध्या विषयातून मोठा आशय शोधण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी आपल्या जीवनातील काही घटना, अनुभव वाचकांना विश्वासात घेऊन सांगण्याची भूमिका घेणे, खेळकरपणाने वाचकांशी हितगुज करता करता परिचित, सार्वकालीन आणि सर्वमान्य अशा विषयाची दुसरी बाजू दाखवून वाचकांना चकित करणे, असा साधारणपणे या वाङ्मयप्रकाराचा खाक्या ठरून गेला. फडके-खांडेकर-काणेकरांसारख्या समर्थ लेखकांनी आपल्या श्रेष्ठ प्रतिभाशक्तीच्या साहाय्याने कलात्मकतेने युक्त असे, त्या चौकटीत राहूनही उत्तमोत्तम लघुनिबंध लिहिले. परंतु त्यांनी आपण होऊन आपणच निर्माण केलेली कोंडी फोडण्याचा प्रयत्न मात्र केला नाही. त्यामुळे या वाङ्मयप्रकाराचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सामान्य लेखकांनी ज्या वेळी केला, त्या वेळी त्याचे बेगडी स्वरूप जाणविण्यास अवधी लागला नाही.

१९५० नंतर मराठी वाङ्मयातील या लेखन-प्रकारात काही इष्ट ते बदल घडून येत असल्याची चिन्हे दिसू लागली. कारण लघुनिबंध म्हणून जी काही बंधने या वाङ्मयप्रकाराने आपल्यावर लादून घेतली होती, ती हळूहळू सुटू लागली. हा नवा निबंध नव्या प्रवृत्तींचा, नव्या समाजरचनेचा, नव्या जाणिवांचा निदर्शक आहे. जीवनात मोठमोठ्या विषयांइतकेच नित्यनैमित्तिक विषयांना महत्त्व आहे. खेळकरपणा

हा निव्वळ बहाण्याच्या स्वरूपात किंवा समाजात वावरताना यशस्वी होण्यासाठी वापरावयाचा मुखवटा नसून अत्यंत श्रेष्ठ व व्यक्तित्वसंपन्नतेचा तो सहजसुंदर आविष्कार आहे. त्यासाठी नेहमीच गमतीचे विचार मनात येण्याची आवश्यकता नसून अत्यंत गंभीर अशा चिंतनशील दृष्टिकोणातूनही तो अवतरू शकतो. परिचित अशा विषयांतील अपरिचित बाजू पाहण्याच्या हव्यासातूनच लघुनिबंध अवतरतो असे नसून, कोणत्याही भाववृत्तीचा, किंवा मनोभावनेचा आविष्कारही लेखकाच्या व्यक्तित्वानुसार अनेकविध रूपे धारण करू शकतो....

थोडक्यात सांगायचे म्हणजे हा नवा निबंध—मग त्याला लघुनिबंध म्हणा वा ललितनिबंध म्हणा, मोठा बहुढंगी, बहुरंगी व बहुरूपी आहे. समुद्रात आदळणाऱ्या लाटांप्रमाणे क्षणोक्षणी नित्य नवी रूपे धारण करण्याचे, त्या नव्या रूपांचे जीवनाच्या संदर्भात नवे अर्थ शोधण्याचे त्याला वेड आहे आणि म्हणूनच या नव्या रूपात कितीही प्रकारांनी तो अवतरला तरी तो कधी शिळा व्हायचा नाही, कधी आवर्तात सापडायचा नाही. सुदैवाने गेल्या काही वर्षांमध्ये जे काही मोजके लेखन या दृष्टीने झाले आहे, त्यामुळेच या नव्या वाङ्मयप्रकारचे सामर्थ्य आपल्या लक्षात येऊ लागले आहे. ह्या नव्या कालखंडातील या वाङ्मयप्रकाराची निपज मागच्यापेक्षा कमी प्रमाणात असली तरी तिने कात टाकण्याचे प्रयत्न केलेले आहेत. काहींनी रूढ चाकोरीचा अवलंब केला आहे, काहींनी रूढ चाकोरीत राहूनही त्यामध्ये निरनिराळे प्रयत्न करण्याचे काही नेटके प्रयत्न केले आहेत, कित्येक वेळेला या लघुनिबंधाने इतर वाङ्मयीन प्रकारांत हळूच शिरून आपल्या चंचल स्वरूपाची कल्पना दिली आहे. आजच्या नव्या मराठी कथालेखनातील कित्येक कथांचा तोंडवळा लघुनिबंधांसारखा आहे. प्रवासवर्णने, विनोदी लेखन, व्यक्तिचित्रणात्मक लेखन इ. प्रकारांतून या लघुनिबंधाने स्वतःचा शिरकाव करून स्वतःला अभिवृद्ध केले आहे.

हा वाङ्मयप्रकार मोठा लवचिक आहे, मोठा समावेशक आहे, मोठा नाजूक आहे आणि तितकाच राकटही आहे. सामान्य लेखकाला तो कशी हुलकावणी देईल आणि समर्थ लेखकाच्या हातामध्ये किती प्रकारचे पदन्यास करील हे सांगणे कठीण आहे. तो क्षणात फुलासारखा नाजूक व हलकाफुलका वाटेल, तर क्षणात मोठे प्रक्षोभक रूप धारण करील. मुंगीपासून मेरूपर्वतापर्यंत त्याला कोणताही विषय वर्ज्य नाही, आणि तरीही तो त्या त्या विषयाला कलाटणी देऊन लेखकाच्या अंतरंगाचे दर्शन घडवील. व्यक्तिव्यक्तिगणिक वेगवेगळे दृष्टिकोण हा निबंध व्यक्त करील. त्यातही त्या त्या क्षणाच्या भाववृत्तीनुरूप त्याला प्रत्येक वेळी आगळेपणा प्राप्त होईल. व्यक्तित्वसंपन्नतेच्या प्रमाणात, अनुभवांची मांडणी करण्याच्या कुवतीनुसार त्या त्या निबंधात वेधकता येईल, आकर्षितपणा येईल.

जीवनानुभव, जीवनावलोकन, जीवनचिंतन ही या निबंधाची मुख्य व महत्त्वाची साधने. लेखकाचा दृष्टिकोण, त्याच्या चिंतनाची व्यापकता, अंतःकरणाची सदयता व

ऋजुता आणि जीवनाबद्दलचे बालसुलभ उदंड कुतूहल, श्रेष्ठ प्रतीची संवेदनक्षमता इत्यादी वैशिष्ट्ये जेवढ्या अधिकाधिक प्रमाणात आढळतील, तेवढा हा निबंधप्रकार अधिकाधिक व्यक्तिनिष्ठ व परिणामकारक होईल. त्याच्या वैचारिक स्वरूपामुळे त्याला शुद्ध असे कलात्मक स्वरूप सहजासहजी प्राप्त होणार नाही. त्यासाठी जातिवंत अशा प्रतिभावंताचीच आवश्यकता आहे. अलीकडच्या काही लेखकांनी सुदैवाने त्यांच्या अतिशय शुद्ध स्वरूपाचा आविष्कार घडविण्यात चांगलेच यश मिळविले आहे. मराठी निबंधलेखनातील हा शुद्ध स्वरूपाचा आविष्कार हा लघुनिबंधाच्या रूढ चाकोरीपेक्षा ललितनिबंधाच्या द्वारा आविष्कृत झाला आहे. त्याने लघुनिबंध म्हणून मराठीत अवतरलेल्या वाङ्मयप्रकारापेक्षाही आपले सामर्थ्य फार मोठे आहे, हे ओळखले आहे. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, माधव आचवल यांच्या ललितलेखनामध्ये हे सामर्थ्य प्रगट झाले आहे.

या वरील लेखकांमध्ये आणखी एका लेखकाचा अंतर्भाव करावा लागेल तो म्हणजे मधुकर केचे यांचा. केचे यांचे कविमन आपल्या अनुभवांची सरळ सरळ मांडणी करते. त्यांचे अनुभवविश्वच मुळी आगळे आहे. त्याला विदर्भाच्या मातीचा कस आहे आणि वास आहे. त्या आपल्या अनुभवविश्वाची मांडणी करण्यासाठी आवश्यक असलेली पारदर्शक अशी भाषाशैली त्यांना वश झाली आहे. त्यांच्या अनुभवांचे वऱ्हाडी बोलीशी जणू अतूट असे नाते आहे.

इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर, माधव आचवल, मधुकर केचे यांच्या निबंधांनी, ललित-निबंध किंवा लघुनिबंध हा केवळ हलकाफुलका असतो, हा समज सर्वस्वी खोटा पाडला आहे. विशेषतः दुर्गा भागवत, करंदीकर, आचवल, केचे यांच्या निबंधांना सर्जनशील निबंध म्हणावयास हरकत नाही.

मराठीतील समीक्षा, नवकाव्य, नवकथा आणि ललितवाङ्मय यांनी गेल्या २५ वर्षांत केलेली ही प्रगती लक्षणीय आहे असे म्हटले तरी, गेल्या पाच-सहा वर्षांत या सर्वच क्षेत्रांत बरेच चैतन्यशून्य वातावरण निर्माण झाले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. समीक्षेच्या क्षेत्रात ऐतिहासिक दृष्टिकोणाच्या व व्यासंगाच्या अभावामुळे आजकालच्या काही नाणावलेल्या अशा समीक्षकांच्या लेखनातूनही उरली आहे ती केवळ प्रदर्शनीयता (exhibitionism). आशयाच्या भेदकतेपेक्षा आणि कोणत्याही कलाकृतीचे वा कालखंडातील वाङ्मयाचे वस्तुनिष्ठ चित्र उभे करण्यापेक्षा आनुषंगिक अशा गौण विचारांचे प्रदर्शन अलीकडे मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. कलाकृतीच्या बाह्यांगाकडे लक्ष पुरविण्यात येऊ लागल्याने अलीकडच्या समीक्षेत रूपविच्छेदन विशेष प्रमाणात होऊ लागले आहे. अशा अनेक गैरलागू व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोणाच्या सातत्यामुळे आजची नवी समीक्षा एका नव्या प्रकारच्या पाल्हाळाला बळी पडली आहे.

ही प्रदर्शनीयता व हा पाल्हाळ कथेच्या क्षेत्रातही शिरला आहे. त्यामुळे आजची प्रयोगशील म्हटली जाणारी कथा ही मुळात कथाच राहिली नाही. ती ललितनिबंधाच्या

आणि नवकाव्याच्या इतकी जवळ गेली आहे की, त्यामुळे ललितनिबंध, काव्य व कथा या वाङ्मयप्रकारांतील पृथगात्मता झपाट्याने लोपत चालली आहे. ' लघुनिबंधा 'च्या पुढे जाऊन ' ललितनिबंधा 'चे स्वयंरूप घेऊ पाहणारे कर्वे-भागवत-करंदीकरांचे लेखन जवळ जवळ इतिहासजमा झाल्यासारखे झाले आहे. विनोदी व इतर ललितलेखनाच्या प्रांतातील मानदंड म्हणून ठरणाऱ्या कृतीही पाच-दहा वर्षांपूर्वीच्या कालखंडातीलच आहेत.

असे का व्हावे ? आजच्या राजकीय व सामाजिक जीवनप्रणालीतील संज्ञाशून्यतेमुळे तर नव्हे ना ?

दुर्मिळ ग्रंथसंग्रह : एक अनुभव

पा. रा. ढमढेरे

माझे एक स्वप्न आहे.

इंग्लंड–अमेरिकेमध्ये 'ख्रिस्टीज्'सारखे नाणावलेले प्रमुख पुस्तकविक्रेते पुस्तकांच्या पहिल्या आवृत्त्या किंवा इतर काही विशेष असलेल्या पुस्तकांचा, स्वाक्षरी असलेल्या पुस्तकांचा लिलाव करतात. तसेच मराठी पुस्तकांचेही आपण प्रदर्शन मांडून विक्री करावी, त्यांची माहिती अचूक व व्यवस्थित रीतीने देणारे सूचिपत्र काढावे इ. इ.

अद्यापि ते स्वप्न खरे व्हावयास फार अवकाश आहे.

पुस्तके म्हणजे घरातील अडगळ असे समजणारे बहुसंख्य लोक. पुस्तकांची किंमत ओळखणारे फारच थोडे. दिवसेंदिवस मराठी पुस्तकांची आबाळ व त्यामुळे नाश—हेच अजून फार वेळा दिसते. आता हळूहळू काळ बदलत आहे. पुस्तकांविषयी आस्था असणारी पिढी दिसावयास लागली आहे. त्यांच्याशी बोलताना, व्यवहार करताना मला मनातून फार आनंद वाटतो. आस्था वाटते. या नव्या पिढीत ग्रंथ-संपत्तीचे संरक्षण व संवर्धन व्यवस्थित झालेले पाहण्याचे भाग्य मला लाभू दे असे वाटते.

मी जुन्या पुस्तकांच्या व्यवहारात पडलो तो परिस्थितीमुळे. मला स्वतःला अगदी लहानपणापासून ग्रंथांचे प्रेम फार होते. आमच्या घरीही वातावरण फार अनुकूल होते. पुस्तके वाचावयाची ती विकत घेऊन असे आमचे आई-वडील सांगत व त्याप्रमाणे आमचे घरी अनेक तऱ्हेची पुस्तके व मासिके येत असत. त्यांचे ग्रंथांवरील प्रेम थोड्या-फार अंशाने का होईना माझ्यामध्ये आले. कॉलेजमध्ये असल्यापासून अशा जुन्या व दुर्मिळ पुस्तकांचा माझ्या कुवतीनुसार मी संग्रह करीत असे. परंतु दैवगती विचित्र–कारणे काही का असेनात मी ती सांगत बसत नाही. परंतु मात्र जुन्या व दुर्मिळ पुस्तकांच्या खरेदी-विक्रीवरच आज उपजीविका चालवावी लागते व अल्पसंतुष्ट म्हणा किंवा आळशी, निरुद्योगी म्हणा त्यात जे काही थोडेफार मिळते त्यावर मी आजपर्यंत

गुजराण केली आहे व माझे ग्रंथ मला वाऱ्यावर सोडून न देता आयुष्यभर साथ करणार आहेत एवढा विश्वास वाटत आहे.

इतर काही उद्योगधंदा जमला नाही म्हणजे पुस्तकाचे दुकान काढून बसावे व पोटभर मिळवावे; या धंद्यात अक्कलहुषारी फार कमी लागते असे लोक म्हणतात. पुस्तक-प्रकाशन हा धंदा पोटासाठी करणारे शालेय पुस्तके काढून श्रीमंत झाले तरी ललित वाङ्मयाचे प्रकाशन तोट्यातच असते, अशी चर्चा नुकतीच होऊन गेली आहे. केवळ ललित वाङ्मयाचे प्रकाशन व त्याबरोबर मराठी वाङ्मयाची समृद्धीसारखे काही तरी अव्यवहारी ध्येय बाळगून त्यातून पराभव पत्करून बाहेर पडणारे आहेत. माझा व्यवहारही असाच झाला. मी प्रकाशित केलेल्या पुस्तकावर अभिप्राय चांगले आले. त्यातील २/३ चांगलीच गाजली. (उदा०—" आणि माणसाचा मुडदा पडला ", " खोगीर-भरती ") परंतु व्यावहारिक दृष्टीने मी धंद्यातून बाहेर फेकला गेलो. ग्रंथाबद्दल वाटणारे माझे प्रेम शेवटी माझ्या उपयोगी पडले आणि जुनी व दुर्मिळ पुस्तके विकण्यास मी सुरुवात केली. पहिले काही दिवस हेटाळणी, अवहेलना व कुत्सित बोलणी सहन केल्यानंतर आज मला धंद्यात प्रतिष्ठा मिळाली आहे, असे वाटण्याइतपत लोक माझ्याकडे येतात.

रोज जुन्या बाजारात, जुन्या पुस्तकांच्या दुकानात व रद्दीवाल्यांच्याकडे जाऊन त्यांच्याकडे असलेली पुस्तके चाळायची, त्यातील आपल्याला उपयुक्त वाटतील ती निवडावयाची व घरी आल्यानंतर त्यांना ठाकठीक करून संग्रहालयांना, ग्रंथालयांना दाखवावयाची. जी खपली नाहीत ती घरी ठेवावयाची व समाधान करून घ्यायचे. आपला स्टॉक तर वाढला. आज नाही तर उद्या कधी तरी ह्या पुस्तकाला योग्य ते गिऱ्हाईक मिळेल. असे होता होता माझ्याकडे खरोखरच काही चांगल्या पुस्तकांचा संग्रह झाला व त्याचीही जाहिरात झाली. पुस्तक मिळण्यापेक्षा अनेक वेळा गिऱ्हाईक मिळविणे हेच माझे काम असते. या धंद्यातील नाणावलेले व आमच्या धंद्याच्या आद्यस्थानी असलेले कै. नानासाहेब गोंधळेकर आम्हास सांगत, " अरे बाबा ! पुस्तके विकली गेली नाहीत तर खाऊ काय म्हणू नको. दम खा. म्हणजे तुझ्या कष्टांचे चीज होईलच. " एखादे दिवशी अभ्यासक संशोधक येतो व बरीचशी पुस्तके चाळून त्यांतील काही निवडून नेतो व आपण पुस्तके सांभाळली, त्याचे फळ मिळते. बरीचशी जुनी पुस्तके चाळण्यास मिळाल्यामुळे अभ्यासक संतुष्ट होतो व आपलेपणाने चौकशी करतो, ' काय, धंदा बरा चालला आहे ना ? ' त्या वेळी मला ' दम खा ' या शब्दाचा खरा अर्थ कळतो.

कोणते पुस्तक केव्हा कुठे मिळेल हे कधीच सांगता येणार नाही. एकदा नवसारीच्या एका गुजराती ग्रंथप्रेमी गृहस्थाने गोळा केलेली अत्यंत दुर्मिळ म्हणून नोंदलेली अनेक गुजराती आद्यमुद्रिते मला मिळाली. मी चौकशी केली, ही पुस्तके येथे कशी आली ? त्याने सांगितले नवसारीच्या एका पारशी गृहस्थाचा वारस अहमदनगर

येथे राहात असे. त्याने ती सर्व पुस्तके नगरला आणली. त्यातील महत्त्वाचे ग्रंथ त्याने मुंबईस नेऊन विकले व ही पुस्तके रद्दी म्हणून आली व ती कागद गिरणीकडे गेली असती; ती मला पाहायला मिळाल्यामुळे बचावली. दोन दिवस उशीरा गेलो असतो तर ती पुस्तके पुन्हा पाहण्यासही मिळाली नसती. ती आज आता राष्ट्रीय ग्रंथालयात सुखरूप राहिली ! ग्रंथांच्या लेखनाच्या प्रेमाचे चीज करणारा कोणी केव्हा तरी उगवेल व या ग्रंथांचे मूल्यमापन होईल ! चांगली वाईट कशीही असोत लेखकाने आटविलेल्या रक्ताचे श्रम कारणी लागतील.

पुण्या-मुंबईकडे आज दीडशे वर्षे तरी ग्रंथलेखन व ग्रंथव्यवसाय चालला आहे. जुन्या लेखकांची त्यांच्या वेळी अद्ययावत म्हणून लिहिलेली व जपून ठेवलेली पुस्तके अज्ञानाने, आकसाने व असूयेने नाहीशी होत चालली आहेत. विद्वान लेखक दिवंगत झाला म्हणजे त्यांचे चिरंजीव पुस्तकांचे माहीतगार किंवा सांभाळ करणारे नसले तर त्यांना पाय फुटतात, व ती ग्रंथसंपत्ती कोठे तरी भरकटत जाते. अशी पुस्तके रद्दीवाल्या-कडे पाहिली म्हणजे मला पुस्तके चांगली मिळाली यापेक्षा त्यांची झालेली दुर्दशा पाहून वाईट वाटते. कृष्णशास्त्री चिपळूणकर, ना. गो. कृ. गोखले, रा. ब. का. ना. साने यांची पुस्तके मला मिळाली व ती मलाच मिळाल्याबद्दल मला धन्यता वाटते. पाश्चात्त्य राष्ट्रांत सह्या असलेल्या पुस्तकांची विशेष चहा असते त्यामुळे त्याला किंमतही बरी येते. आपल्या-कडे अजून असा श्रीमंत वर्ग निर्माण व्हावयाचा आहे म्हणून त्यांचे फारसे मोल नसते. परंतु भविष्यकाळात त्या पुस्तकावरील सह्यांचे मोलही व्यवस्थित येईल !

जुन्या पुस्तकांची माहिती मिळविण्यास मात्र कष्ट करावे लागतात. पुस्तक मिळाले म्हणजे अनायासे चाळून होते, त्यातील विषय कळतो, त्याचा उपयोग कोणास होईल याचा अंदाज करून गिऱ्हाइकी करता येते. पुस्तक आवडले तर संपूर्ण वाचावे नाहीतर ठेवून द्यावे. जुन्या पुस्तकांच्या व्यवहारांचा मला आणखी एक फायदा झाला आहे. अनेक विद्वानांची ओळख झाली. त्यांच्या सहवासामुळे ग्रंथांचे व नवनवीन विषयांचे ज्ञान झाले असे अनेक विद्वान माझे आश्रयदाते आहेत. त्या सर्वांनाच माझे धन्यवाद असतात.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदुस्थानातील लष्करी युरोपियन अधि-काऱ्यांचे बरेच क्लब बंद झाले. त्या क्लबमधून अनेक उत्तमोत्तम पुस्तके ठेवलेली असत ती सर्व पुस्तके बाजारात आली होती. त्या वेळी मला अशा बऱ्याच पुस्तकांचा साठा करता आला.

रोज फेरी मारल्यामुळे अनेक जुनी पुस्तके व रद्दीवाले माझ्या ओळखीचे झाले आहेत. ते मला कळवतात, 'चला पुस्तके पाहायला'. अशी बरीच पुस्तके मला पाहावयास मिळतात.

अशाच रद्दीवाल्यांकडे अनेक हस्तलिखित पोथ्या येत असतात. मला कित्येक वेळा त्यातून महत्त्वाची हस्तलिखिते मिळाली आहेत.

आजकाल जुन्या पुस्तकांचे महत्त्व लोकांना कळू लागले आहे. त्यामुळे १८७० च्या पूर्वी छापली गेलेली सर्व पुस्तके मी जमा करीत असतो. कुठल्या वेळी कोणत्या पुस्तकाला मागणी येईल हे सांगता येत नाही. मी सहज गंमत म्हणून एकदा जुने कित्ते गोळा केले होते. ते सुद्धा आता संशोधकांना मोडी शिकण्यास आवश्यक म्हणून खपू लागले आहेत.

महाराष्ट्रात गेल्या शतकात गाजलेली काही प्रकरणे आहेत. त्यासंबंधी त्या त्या वेळी पुस्तिका, मेळ्यातील गाणी, संवाद, परिपत्रके हीदेखील आता सामाजिक उत्क्रांतीच्या इतिहासास आवश्यक म्हणून लोक आवर्जून मागतात. माझ्याजवळील क्रॉफर्ड महाकाव्य, खान-पाणंदीकर विवाह, फारशी मुसलमानांचे दंगे, राघो भांगऱ्याचा पोवाडा अशा अनेक प्रकरणांच्या पुस्तिका अभ्यासकांना मी पुरविल्या आहेत. पूर्वी जप्त झालेल्या जुन्या पुस्तकांच्या आवृत्त्याही हल्ली दुष्प्राप्य आहेत. जुन्या पुस्तकांच्या आवृत्त्या मिळाल्या तर मला फारच आनंद वाटेल.

महाराष्ट्राबाहेरही मराठी पुस्तके छापली जातात, त्यांची माहिती इकडील फारच थोड्या लोकांना असते. अशा पूर्वी छापल्या गेलेल्या पुस्तकांच्या प्रती मला तरी फारच मोलाच्या वाटतात. काशी, धार, इंदूर, पाटणा, जबलपूर येथेही मराठी लेखक प्रकाशक आहेत व त्यांनी आपल्या पदरास खार लावून पुस्तके छापलेली असतात. त्यांची माहिती तरी निदान आपणांस असावी म्हणून त्यांची नोंद करणे आवश्यक आहे. धारच्या महाराजांनी साहाय्य देऊन राजनीतीवरील पुस्तक १८६७ साली छापले होते ! सरंजामे यानी शिंदेशाही घराण्याचा इतिहास ग्वालेरलाच १८७० च्या सुमारास छापला होता. काशीस धार्मिक पुस्तकांचे भाषांतर करून मासिक रूपाने ग्राहकास देण्याचा प्रयत्नही ' आर्यधर्म ' नावाच्या मासिकाने केला होता ! हा सर्व भाग वाङ्मयेतिहासात यावा असे मला वाटते.

आपल्या आवडीच्या विषयाचे पुस्तक मराठी भाषेमध्ये असावे म्हणून कित्येक हौशी लोकांनी पुस्तक खपण्याची फारशी शक्यता नसतानाही पुस्तक प्रसिद्ध केले व प्रस्तावनेत पुढे कधी तरी मराठी बांधव या विषयाचा अभ्यास करील त्याला उपयोगी पडण्यासाठी म्हणूनच मी हे श्रम केले आहेत असे नमूद करीत असत.

शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. सर्व जनता सुशिक्षित व्हावयाच्या मार्गावर आहे. आपल्याकडे चांगला ग्रंथसंग्रह असावा अशी इच्छा अनेक हौशी लोकांना वाटू लागली आहे. त्यामुळे यापुढे जुन्या पुस्तकांचा खप वाढणार अशी चिन्हे दिसत आहेत. विद्वानांनीच केवळ ग्रंथसंग्रह करावा असे नाही. सुबुद्ध (cultured) जनतेनेही वाङ्मयाच्या संग्रहास जपावे असे वाटू लागले आहे. अशा वेळी त्यांची आवड व इच्छा पूर्ण करण्यासाठी जुन्या पुस्तकांचा साठा करणे आवश्यक आहे. परंतु गेले शतक दीड शतक जी आबाळ झाली व दारिद्र्याने व परावलंबनाने जो दुबळेपणा आला होता, त्या काळात अमूल्य ग्रंथसंग्रह वाऱ्यावर सोडला गेला, नाहीसा झाला. त्याची जागा

भरून काढणे कठीण झाले आहे. पुस्तके मिळण्याचे मान कमी झाले आहे. परंतु हा स्वार्थ व परमार्थ दोनही साधणारा व्यवसाय करावयाला अनेक लोकांनी लागावे व मराठी ग्रंथसंपत्तीचे अमोल वैभव टिकवून धरावे. आज मिळू शकणारी पुस्तके उद्याला नाहीशी होणार म्हणून दिसेल ते सांभाळून ठेवा असेच सांगावेसे वाटते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर करावयाच्या महत्त्वाच्या गोष्टींपैकी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जुन्या दुर्मिळ मराठी पुस्तकांची मुंबई-पुणे-नागपूर–औरंगाबाद–अमरावती–कोल्हापूर–सांगली–सातारा यांसारख्या शहरी संदर्भ ग्रंथालये काढणे. या ग्रंथालयांतून अत्यंत कसोशीने दुर्मिळ ग्रंथ जमवून त्यांचा साठा केला पाहिजे. एकेक पुस्तकांच्या किती म्हणून आवृत्त्या निघाल्या तेवढ्या सगळ्यांचा संग्रह तेथे असावयास हवा. प्रभाकर, केसरी, सुधारक, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश यांच्या साऱ्याच्या साऱ्या फायली आज कुठे पाहायला मिळतात? आणि ते सारे मोठमोठ्या शहरी देखील मिळत नसल्यामुळे अभ्यासक अभ्यास काय करणार?

या देशातील सुबुद्ध जनतेने याचा साक्षेपाने विचार करायला हवा.

कोणत्याही राष्ट्राची संस्कृती ही त्याच्या ग्रंथालयावरून ओळखिली जाते, असे म्हणतात. महाराष्ट्रात या दृष्टीने अलीकडे काही प्रयत्न सुरू झाले आहेत. परंतु ते सारे अपुरे आहेत.

साऱ्या दुर्मिळ ग्रंथांचे, साऱ्या प्राचीन हस्तलिखितांचे, साऱ्या जुन्या नियतकालिकांचे अंक एखाद्या ग्रंथालयात बसून पाहता यावे, अशी सोय समाजाने, शासनाने करण्याकडे लक्ष पुरविणे अत्यंत आवश्यक आहे. या बाबतीत होणाऱ्या दुर्लक्षाकडे काळ कधीही क्षमाशील दृष्टीने पाहणार नाही, हे लक्षात ठेवावे.

जुन्या दुर्मिळ ग्रंथांची होणारी दुर्दशा थांबविण्यासाठी संघटित प्रयत्नांची फार गरज आहे.

शिक्षण व संस्कार—विधायक विचार

गजानन श्री. खैर

शिकलेला मनुष्य संस्कारसंपन्न असावयाचाच अशी सामान्यपणे रूढ कल्पना आहे. सुशिक्षित माणसाकडून गैरवर्तन झाले म्हणजे, सहज आपल्या तोंडून उद्‌गार बाहेर पडतात : 'शिकलेला माणूस असून कसे वागतो पाहा ?' शिकलेल्या माणसाने चांगले वागले पाहिजे, त्याने शिक्षण घेतले म्हणजे ज्ञान घेतले आणि ज्ञानाबरोबर संस्कार येतातच अशी पूर्वापार समजूत आहे. याचे कारण गेल्या चार-पाच हजार वर्षांत चांगले शिक्षण म्हणजे चांगले संस्कार असे समीकरण आपल्या मनावर बिंबले आहे.

प्राचीन काळी जी शिक्षणपद्धती अस्तित्वात होती तिच्यात ज्ञान आणि संस्कार यांना सारखेच महत्त्व होते. ज्ञानाचा परिपाक चांगल्या वागणुकीत झालाच पाहिजे अशी अपेक्षा होती. शिक्षणातील बराचसा भाग धार्मिक व नैतिक ग्रंथांच्या अध्ययनाचा असल्यामुळे चांगला आचार काय याची कल्पनाही शिक्षणातून मिळत असे. शिक्षण घेणारे विद्यार्थी कुलगुरूंच्या आश्रमात अथवा विद्यापीठांच्या वसतिगृहात राहात असल्यामुळे काही परंपरागत शिस्तीतून त्यांना जावे लागत असे. विद्यार्जनाचे व्रत घेतलेल्या विद्यार्थ्यांने विद्यार्थी अवस्था संपेपर्यंत म्हणजे ब्रह्मचर्य आश्रमात कशा तऱ्हेने वागावे याची शिस्त प्राचीन ग्रंथांतून घालून दिलेली होती. रोजच्या कार्यक्रमात त्याचे खाणे-पिणे, स्वतःची व आश्रमाची कामे, स्वाध्याय, वडील माणसांशी वागणे, इतर विद्यार्थ्यांशी वागणे अशा सर्व गोष्टींविषयी नियम घालून दिलेले असत. त्यांचा उद्देश ज्ञानार्जनाबरोबर शीलसंवर्धनही व्हावे हा असे. भगवद्‌गीतेच्या तेराव्या अध्यायात जी ज्ञानाची व्याख्या दिली आहे तिच्यात प्रत्यक्ष ज्ञानापेक्षा ज्ञानी व्यक्तीच्या ठिकाणी कोणते गुण व कोणत्या प्रवृत्ती असाव्यात याचेच वर्णन केलेले आहे. अहिंसा, क्षमा, विनय, गुरूविषयी आदर, आत्मसंयमन, अनहंकार, समतोल वृत्ती, ईश्वरभक्ती, तत्त्वज्ञान, चिंतन अशा प्रकारचे सद्‌गुण ज्ञानसंपन्न व्यक्तीच्या ठिकाणी असावेत अशी प्राचीन शिक्षणात अपेक्षा होती.

प्राचीन काळच्या गृहजीवनातही धार्मिक आणि नैतिक संस्कारांना प्राधान्य होते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतचा दैनिक कार्यक्रम आणि वर्षातील बारा महिन्यांचे वेळापत्रक या सर्वांची अशी योजना करून ठेवली होती की, कुटुंबियांच्या मनावर सदाचाराचे व चारित्र्याचे संस्कार व्हावेत. प्रार्थना, पूजा, स्तोत्रे, सण, व्रतवकल्ये इ. गोष्टींची योजना चांगल्या संस्काराकरता होती. अतिथि-सत्कार, विद्वान लोकांच्या गौरव, वडिलांचा मान, परोपकार, कुटुंबातील माणसांविषयी प्रेम, समाजहिताची जाणीव, दानधर्माची सवय, अशा प्रकारच्या सदाचाराची सवय लागावी अशी योजना पूर्वापार चालत आलेली होती. कथाकीर्तने, प्रवचने इ. कार्यक्रमांचा अंतर्भाव रोजच्या जीवनात असल्यामुळे चांगले विचार कानावरून जात आणि त्यांचा आचारावर परिणाम होई.

प्राचीन काळी सार्वत्रिक शिक्षणाचा अभाव होता. बहुसंख्य समाज निरक्षर होता. सर्व समाज साक्षर झाला पाहिजे अशा प्रकारची कल्पना अलीकडील काळातील आहे. अगदी परवा-परवापर्यंत समाजातील बहुसंख्य लोक निरक्षर होते. परंतु हे निरक्षर लोक सुसंस्कृत होते. त्यांच्या ठिकाणी साक्षरता नव्हती पण चांगले संस्कार होते. पूर्वीच्या समाजशास्त्रज्ञांनी समाजामध्ये प्रौढ शिक्षणाची अनेक साधने निर्माण करून ठेवलेली होती. या साधनांचा उद्देश चांगले विचार, चांगले आचार व चांगल्या प्रवृत्ती यांचे संगोपन समाजात व्हावे असा होता. कथा–कीर्तने, प्रवचने, भजने, भारुडे, चित्रकथा, ललिते, दशावतार खेळ, उपदेश करीत फिरणारे भिक्षेकरी, रामदासी, वारकरी, रामकृष्ण इत्यादी थोर पुरुषांच्या जयंत्या, सामुदायिक सण-समारंभ या सर्वांचा उद्देश आबालवृद्धांची करमणूक करून त्याबरोबरच त्यांना चांगले संस्कार द्यावेत हा होता. रामायण आणि महाभारत ही सामाजिक शिक्षणाची क्रमिक पुस्तके होती. या दोन महान ग्रंथांतील गोष्टींनी आज शेकडो वर्षे निरक्षर भारतीयांचे शिक्षण केलेले आहे आणि उदात्त विचारांची व सदाचाराची परंपरा अखंड टिकविली आहे. अगदी आधुनिक शिक्षण घेतलेल्या आजच्या सुशिक्षित व्यक्तींना देखील हे दोन ग्रंथ वाचनीय आणि संस्कारप्रद आहेत असे वाटते.

गेल्या दीडशे वर्षांत भारतातील प्राचीन शिक्षणपद्धती नष्ट होऊन तिच्या जागी आधुनिक इंग्रजी शिक्षणपद्धती आलेली आहे. या दोन-शिक्षणपद्धतींचे मूळ हेतूच अगदी भिन्न-भिन्न आहेत. ज्ञानाबरोबरच चांगले संस्कार द्यावेत या हेतूने प्राचीन शिक्षणपद्धतींचा विकास झाला.

याउलट इंग्रज सरकारच्या कारभारात चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाव्यात या हेतूने भारतातील लोक इंग्रजी शिक्षणाकडे वळले. आधुनिक पाश्चात्त्य ज्ञानामुळे भारतीयांची दृष्टीही आधुनिक होईल अशी अपेक्षा काही हिंदी व इंग्रजी तत्त्ववेत्त्यांची होती. परंतु बहुसंख्य विद्यार्थी आणि पालक या शिक्षणाकडे व्यावहारिक दृष्टिकोणातूनच पाहात होते. चांगले संस्कार व चांगले विचार या शिक्षणातून मिळतील अशा हेतूने

शाळा-कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या थोडी. व्यवसाय किंवा नोकरी यांना इंग्रजी शिक्षण उपयोगी पडते म्हणून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली व वाढत आहे. इंग्रजी शिक्षण घेतले म्हणजे नोकरी मिळते आणि आयुष्यात आपली सांपत्तिक स्थिती सुधारता येते ही कल्पना अद्यापही आपल्या शिक्षणात प्रभावी आहे. सुशिक्षित आणि अशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मनावर या कल्पनेचा अद्यापही पगडा आहे.

आधुनिक शिक्षण-पद्धतीचा अभ्यासक्रम हादेखील अशा रीतीने आखलेला आहे की, त्यात ज्ञानार्जनाला म्हणजे पुस्तकी शिक्षणाला खूप महत्त्व आहे. परंतु चारित्र्य, शील आणि सदाचार या गुणांचा उत्कर्ष होण्याच्या दृष्टीने फारशी योजना नाही व फार आग्रह नाही.

पुस्तकी ज्ञानही अशा तऱ्हेने दिले जाते की, त्यात विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर जास्त ताण पडतो आणि स्वतंत्र विचार व चिकित्सक वृत्ती यांची फारशी वाढ होत नाही. या अभ्यासक्रमात आधुनिक भाषा, समाजशास्त्रे आणि विज्ञान यांना महत्त्वाचे स्थान आहे. परंतु धर्मज्ञान आणि नीतिविचार यांचा समावेश त्यात झालेला नाही. सारांश, प्राचीन शिक्षण प्राधान्यतः धार्मिक आणि नैतिक स्वरूपाचे होते, तर आधुनिक शिक्षण प्राधान्यतः ऐहिक स्वरूपाचे आहे. आधुनिक शिक्षणाचे मूल्यमापन करताना त्यात संस्कारांना आणि विचारांना मुळीच स्थान नाही, असा अर्थ अभिप्रेत नाही. भाषा, वाङ्मय, इतिहास आणि नागरिकशास्त्र अशा विषयांच्या द्वारे अप्रत्यक्ष रीतीने चांगले संस्कार देण्याची सोय या शिक्षणात आहे. असे संस्कार अप्रत्यक्षपणे मिळाले म्हणूनच या शिक्षणपद्धतीतून अनेक थोर नागरिक बाहेर पडले, पण महत्त्वाचा मुद्दा हा की संस्कार, चारित्र्य, शील आणि सदाचार हे शिक्षणाचे प्रधान अंग नसून ती एक गौण प्राप्ती झालेली आहे. शिक्षणात या गोष्टींना प्राधान्य असे नाही. त्यांच्याविषयी आग्रह नाही. त्या न घेताही पदवीधर बाहेर पडू शकतो.

आधुनिक परीक्षापद्धतीने शिक्षणाची यांत्रिकता अधिकच वाढविलेली आहे. मोठ्या प्रमाणावर ज्या परीक्षा होतात त्यांत मुख्यतः विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीचीच कसोटी पाहिली जाते. शिक्षणाचा आनुषंगिक भाग म्हणून विद्यार्थ्याने सदाचाराचे संस्कार काय घेतले आहेत याची परीक्षा घेता येत नाही. संस्काराचे मोजमाप परीक्षेत होऊ शकत नाही त्यामुळे प्रत्यक्ष शिक्षणाच्या प्रक्रियेत देखील संस्काराचा विकास या गोष्टीला गौणत्व आले आहे.

एखाद्या चांगल्या शिक्षकाने आपल्या इतर विषयांबरोबर नैतिक व सदाचाराचे शिक्षण द्यावयाचे ठरविले तरी त्याला फार कमी वाव आहे. आजच्या शिक्षणात विषयांची गर्दी इतकी झाली आहे की, धर्मज्ञान आणि नीतिविचार अशा प्रकारच्या एका नवीन विषयाला वेळ शिल्लक नाही. प्रत्येक विषयाचाच अभ्यासक्रम इतका वाढलेला आहे की, तोच अभ्यासक्रम पुरा करण्याला वेळापत्रकातील तास पुरत नाहीत. अशा

परिस्थितीतून आधुनिक शिक्षणतज्ज्ञांना आणि विचारवंतांना मार्ग काढावयाचा आहे. प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे तिचे वर्णन केलेले आहे. या अडचणीतूनच आपणाला मार्ग काढला पाहिजे. दीडशे वर्षांपूर्वी इंग्रज राज्यकर्त्यांनी घालून दिलेली शिक्षणपद्धती आणि तिच्या मुळाशी असलेले हेतू यांमध्ये विचारपूर्वक व परिणामकारक फेरबदल व सुधारणा करणे आवश्यक आहे.

आपल्या कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने संस्काराचा विचार करणेही आवश्यक आहे. कारण चांगले संस्कार देण्याच्या दृष्टीने शाळेप्रमाणेच कुटुंबदेखील एक महत्त्वाचे साधन आहे. कुटुंबपद्धतीत होत असलेले संक्रमण संस्कार–संवर्धनाला फारसे अनुकूल नाही. संयुक्त कुटुंबपद्धती मोडून विभक्त कुटुंबांची संख्या वाढत आहे. शहरात प्रामुख्याने विभक्त कुटुंबेच आहेत. ग्रामीण भागातून संयुक्त कुटुंबे आहेत, पण त्यांचीही संख्या हळूहळू कमी होत जाईल. चारित्र्य-शिक्षणाच्या दृष्टीने विभक्त कुटुंबपद्धतीपेक्षा संयुक्त कुटुंब-पद्धती अधिक अनुकूल होती. संयुक्त कुटुंबात ६०–७० वर्षांच्या वृद्ध व्यक्तीं-पासून बालवयापर्यंत सर्व वयाची माणसे एकत्र राहात. त्यामुळे वाडवडिलांकडून परंपरागत चालत आलेले कुलधर्म आणि कुलाचार यांचा वारसा मागील पिढीकडून पुढच्या पिढीला मिळत राही. घरातील आजा-आजी व इतर वृद्ध नातेवाईक यांना रिकामा वेळ भरपूर असल्यामुळे लहान मुलांना चांगले संस्कार देण्याचे काम त्यांच्या-कडून होत असे. विभक्त कुटुंबात ते काम करण्याला वृद्ध माणसे नाहीत आणि तरुण आई-बापांना वेळ नाही. आई सकाळपासून संध्याकाळपर्यंत चहा-जेवण-फराळ आणि चहा-जेवण-करमणूक अशा कामात सतत गुंतलेली राहते. अधून-मधून बाळंतपणे आणि बालसंगोपन यात वेळ जातो. मुले उठायच्या आधी बाप कामाला निघून जातो आणि मुले झोपी गेल्यावर तो परत येतो. त्याची आणि मुलांची गाठभेट होण्याची मारामार. रविवार व इतर सुटीच्या दिवशी काही वेळ मिळण्याचा संभव, पण तोही दिवस पत्ते खेळण्याला व करमणुकीला आवश्यक असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ मिळत नाही. सारांश, विभक्त कुटुंबातील मुलामुलींना चांगल्या संस्कारांचे शिक्षण द्यायला व्यक्ती नाही, वेळ नाही, जाणीव नाही आणि तयारीही नाही.

शाळा-कॉलेजांत शिक्षण घेणारे बहुसंख्य विद्यार्थी जनता वर्गातील आहेत. आजपर्यंत अशिक्षित व निरक्षर राहिलेल्या समाजाला सर्व प्रकारच्या सवलती मिळत असल्यामुळे अशिक्षित घराण्यातील मुले-मुली शिक्षण घेत आहेत. त्यांच्या कुटुंबात शिक्षणाचा प्रवेश प्रथमच झाल्याकारणाने हेच विद्यार्थी कुटुंबात अधिक शिक्षित आहेत. त्यांच्या आईबापांपेक्षा त्यांचे शिक्षण जास्त झाले आहे. त्यांना चार इंग्रजी शब्द येतात. त्यांचा पोषाख आधुनिक आहे, त्यांना घड्याळ पाहून वेळ सांगता येते, रेडिओ वाजविता येतो, आधुनिक सिनेमातील गाणी येतात; म्हणजे आईबापांपेक्षा कितीतरी गोष्टी अधिक येतात! मुले नवीन जमान्यातील व आईबाप जुन्या जमान्यातील अशी स्थिती सर्वत्र झालेली आहे. त्यामुळे पालकांच्या ठिकाणी एक न्यूनगंड निर्माण

झाला आहे. अधिक शिक्षणामुळे व ज्ञानामुळे पालकाला जो अधिकार मिळतो तो त्यांच्याजवळ नाही. मुलामुलींना अधिकारवाणीने ते काही सांगू शकत नाहीत. त्यांच्यावर वचक ठेवू शकत नाहीत. या सर्वांचा परिणाम कुटुंबावर झालेला आहे. थोडे शिक्षण घेतलेल्या मुलामुलींचा घरात वरचष्मा झाला आहे. आज्ञाधारकपणा हा कुटुंबाचा मुख्य आधार. त्यालाच सुरुंग लागला आहे. वडिलांचा मान आणि आदर ठेवावा असे अधिकारवाणीने सांगणारा घरात कोणी नाही. मुलामुलींना नैतिक मार्गदर्शन करण्याकरता त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ अधिकारसंपन्न अशा व्यक्ती घरात नाहीत. अशा कौटुंबिक वातावरणात आजचे तरुण वाढत आहेत. त्यांना घरचे संस्कार देण्याला आज तरी घरी कोणी नाही. त्यामुळे आजची पिढी संस्कारहीनच राहील. या पिढीला संस्कार देण्याची काही सोय झाली तर २०-२५ वर्षांनी ते आपल्या मुलाबाळांना काही संस्कार देऊ शकतील. परंतु अशा प्रकारची योजना आज झाली नाही तर संस्कार-संवर्धनाच्या दृष्टीने कुटुंबात आज जी स्थिती आहे तीच पुढे अनेक पिढ्या चालू राहील.

सारांश, संस्कार-संवर्धनाचे एक स्थान व साधन म्हणून कुटुंब-संस्था आज हतबल झालेली आहे. तिचे काम समाजातील इतर एखाद्या संस्थेने अगर संघटनेने घेणे अवश्य झाले आहे.

प्राचीन शिक्षण-पद्धतीतील आश्रमीय जीवन हे एक संस्कारात्मक शिक्षणाचे महत्त्वाचे साधन होते. आजची शाळा-कॉलेजांची वसतिगृहे ही आधुनिक पद्धतीचे आश्रमच आहेत. पण या जुन्या-नव्या आश्रमांत फार मोठा फरक आहे. आजच्या वसतिगृहांचा उपयोग संस्कारदानाच्या दृष्टीने पुष्कळ होऊ शकेल, परंतु तसा करून घ्यावा ही योजना व जाणीव जितक्या प्रमाणात असावयास पाहिजे तितकी नाही. बहुसंख्य वसतिगृहांना ' लॉजिंग-बोर्डिंग 'चे स्वरूप आले आहे. विद्यार्थी दरमहा पैसे देतात. त्याच्या मोबदल्यात वसतिगृहे राहण्याची व जेवणाची सोय करतात. निवाऱ्याची जागा व दोन वेळचे जेवण यापेक्षा वसतिगृहांना अधिक अर्थ राहिलेला नाही. सांस्कृतिक शिक्षणाची त्या ठिकाणी काही सोय नाही. तशी कल्पनाच नाही. सक्तीची गोष्ट दूरच राहिली. पैसे घेऊन व्यवस्था करणारी दार विद्यार्थ्यांची वसतिगृहे आहेत. तेथे विद्यार्थ्यां-वर कोणाचा अधिकार चालत नाही. दरमहाचे पैसे घ्या आणि स्वस्थ बसा, अशी वृत्ती आहे. नादार विद्यार्थ्यांकरता चाललेली वसतिगृहे याच पद्धतीने काम करतात. जनता-वर्गातील मुलां-मुलींकरता सरकारी खर्चाने किंवा सार्वजनिक निधीतून अनेक वसतिगृहे चालविली जातात आणि त्यातून हजारो मुलामुलींचे शिक्षण होत आहे. परंतु या वसति-गृहांतून देखील संस्कार-संवर्धनाचा असा विशेष प्रभावी कार्यक्रम नाही. जनतावर्गातील आजच्या विद्यार्थि-विद्यार्थिनींना म्हणजे उद्याच्या नागरिकांना व पालकांना संस्कारसंपन्न करावयाचे आहे ही जाणीव चालक वर्गात फारशी नाही. अपवादात्मक दृष्टीने एखाद्या चालकात ती जाणीव असली तरी इतर बहुसंख्य वसतिगृहांपेक्षा त्याला अधिक काही करता येत नाही. त्यामुळे वसतिगृह ही संस्था एक प्रभावी साधन असून तिचा

संस्कारदानाच्या कामी उपयोग करून घेतला जात नाही. विद्यार्थ्यांना कुटुंबापासून लांब राहण्याची संधी मिळते, आईबापांचे नियंत्रण नाहीसे होते, मनासारखा खर्च करता येतो, कपडे-लत्ते, सिनेमा-नाटके, आधुनिक फॅशन्स, संचारस्वातंत्र्य इ. सवलती मिळतात. याचा परिणाम असा होतो की अनियंत्रित, स्वैर आणि संयमरहित जीवन याला उत्तेजन मिळते. काही अपवादात्मक विद्यार्थी अशाही परिस्थितीतून चांगले शिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यांच्या घरचे चांगले संस्कार बलवत्तर असतात किंवा एखाद्या वसतिगृहात चागले संस्कार देण्याची योजना केलेली असते.

मूलोद्योग शिक्षणाचे म्हणजे बेसिक शिक्षणाचे शिक्षक तयार करण्याकरता जी अध्यापक महाविद्यालये निघाली आहेत त्यांचा कार्यक्रम मात्र संस्कार-संवर्धनाच्या दृष्टीने आखलेला असतो. परंतु एका विशिष्ट संस्थेतच ही सोय असल्यामुळे तिचे अनुकरण अन्यत्र होत नाही. मूलोद्योग शिक्षणाच्या महाविद्यालयांच्या वसतिगृहातून जो संस्कारात्मक कार्यक्रम चालू असतो तोच शासनाने त्यांच्या इंजिनिअरिंग, मेडिकल, आर्ट्स इ. कॉलेजांच्या वसतिगृहांतूनही सुरू करावयास काही हरकत नाही. जी गोष्ट मूलोद्योग शिक्षणातील तरुणांना चांगली तीच इतरांनाही चांगली. परंतु ही पद्धती सार्वत्रिक प्रचारात आली नाही ही गोष्ट खरी.

चांगले संस्कार देण्याची सोय जशी कुटुंबात करता येते तशीच वसतिगृहात करता येईल. परंतु चालकांच्या ठिकाणी तशा प्रकारची जाणीव नसल्याकारणाने वसतिगृहे म्हणजे राहण्याची जागा असलेल्या खाणावळी, एवढेच स्वरूप त्यांना आले आहे. विद्यार्थी आणि पालकदेखील वसतिगृहाच्या चालकांकडे कुलगुरू या नात्याने न पाहता लॉजिंग-बोर्डिंगचे एक मॅनेजर या दृष्टीने पाहतात. यात चालकांचा आणि पालकांचा दोघांचाही थोडा थोडा दोष आहे.

विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व घडविण्याला सामाजिक वातावरण हेही एक मोठे साधन आहे. गल्लीतील व रस्त्यातील घडामोडी, चाळीतील व शेजारील वातावरण, मुलांची टोळकी (गॅंग), सिनेमा, नाटके, लोकनाट्ये, तमाशे, वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथालये, व्याख्यानमाला, मिरवणुकी, सार्वजनिक सण-समारंभ, पुढाऱ्यांची भाषणे व त्यांचे वागणे, पक्षोपपक्षांची राजकारणे, नगरपालिका, जिल्हा परिषदा, कायदेमंडळे इत्यादी ठिकाणच्या सभासदांची भाषणे व त्यांचे वागणे, इत्यादी अनेकविध मार्गांनी मुला-मुलीवर संस्कार होत असतात. घरातील आणि शाळेतील शिक्षणाची वजाबाकी करण्या-इतका प्रभाव या सामाजिक संस्कारांमध्ये आहे. ही साधने अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही प्रकारांची असू शकतात. समाजातील लेखक, विचारवंत, कलावंत, पुढारी, व्याख्याते, या सर्वांच्या हातात सामाजिक वातावरण चांगले किंवा वाईट करण्याचा अधिकार आहे. लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधींसारखा एखादाच पुढारी अथांग देशाचे वातावरण तेजस्वी आणि सत्त्वसंपन्न करू शकतो. पुढाऱ्यांच्या चारित्र्याचा आणि विचारांचा परिणाम तरुण पिढीवर फार मोठ्या प्रमाणावर होतो.

ज्या पिढीला तिच्या उमेदीच्या वयात असे पुढारी मिळतात ती धन्य होय ! आजच्या पिढीला तो फायदा नाही. या दृष्टीने ती दुर्दैवी आहे. एखाद्या उत्तुंग चारित्र्याच्या व्यक्तीकडे बोट दाखवून, 'या व्यक्तीचे तुम्ही अनुकरण करा' असे तरुण पिढीला सांगण्याची आज सोय नाही. किंबहुना सार्वजनिक किंवा वैयक्तिक जीवनात कोणत्या गोष्टी टाळाव्यात याचा दाखला देण्याच्या दृष्टीनेच काही विद्यमान पुढाऱ्यांच्या जीवनाचा उपयोग होऊ शकेल. सामाजिक शिक्षण देणाऱ्या विविध संस्थांचा उपयोग अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही तऱ्हांनी होऊ शकतो. या साधनांच्या स्वरूपात आज फारच अनिष्ट गोष्टी शिरल्यासारख्या दिसतात. तरुण पिढीचे लक्ष चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टींकडे लवकर जाऊ शकते. चांगले संस्कार घेण्याला प्रयत्न करावा लागतो; वाईट सवयी प्रयत्न न करता लवकर लागू शकतात. आजही चित्रपट, नाटके, वृत्तपत्र-मासिके, सार्वजनिक समारंभ, सार्वजनिक पुढाऱ्यांचे विचार व आचार यांच्यापासून तरुण-पिढीला अनेक चांगल्या गोष्टी घेता येतील. प्रत्येक कालखंडामध्ये समाजात चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी एकाच वेळी असतात. त्यांच्या प्रमाणात फेरबदल व चढ-उतार होत असतो. आज तरी प्रतिकूल गोष्टींचे प्रमाण वाढत्या स्वरूपात आहे. प्रकाशन आणि करमणुकीच्या संस्था हे फायदेशीर धंदे असल्याकारणाने त्यांचा दुरुपयोग करून स्वतःच्या फायद्याकडे त्यांना राबविणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. आपल्या कामामुळे समाजावर व तरुणपिढीवर होणाऱ्या संस्काराविषयी हे स्वार्थांध लोक बेफिकीर असतात. त्यामुळे लोकशिक्षणाच्या या सर्व साधनांमध्ये व संस्थांमध्ये लैंगिकता, हिंसात्मक प्रवृत्ती, जुगार, खर्चिकता, गुंडगिरी, व्यसनांची आवड, स्वार्थपरायणता या अनिष्ट दुर्गुणांची वाढ होत आहे. लोकशिक्षणाच्या या साधनांचा उपयोग विधायक दृष्टीने कसा होईल, याचा आमूलाग्र विचार करण्याची वेळ आलेली आहे.

तरुण पिढीच्या चारित्र्याला विधायक वळण देणाऱ्या अनेक युवक संघटना समाजात आहेत. त्यात भाग घेणाऱ्या युवकांचे प्रमाण थोडे असले तरी शील आणि चारित्र्य-संवर्धनाच्या दृष्टीने या सर्व संघटना चांगले कार्य करीत आहेत यात शंका नाही. बालवीर पथके, राजकीय पक्षांच्या युवक संघटना, नॅशनल कॅडेट कोअर इत्यादी संघटनांमध्ये तरुणांचे जीवन चांगल्या रीतीने घडविले जाते. चारित्र्यनिष्ठ आचार, कष्टाची प्रवृत्ती, लोकसेवेचा अनुभव, सामाजिक हितदृष्टी इत्यादी अनेक सद्गुणांचा विकास या संस्थांच्या कार्यक्रमामुळे होतो. त्यांच्या गुणाबरोबरच त्यांचा एक दोषही लक्षात घ्यावयास हवा. राजकीय पक्षांच्या नेतृत्वाने चाललेल्या युवक संघटनांमध्ये तरुणांच्या मनात सारासार विचार प्रवृत्ती जागृत होण्याआधीच पक्षनिष्ठ, एकांगी, असहिष्णू आणि आकुंचित अशी दृष्टी निर्माण होते. अशा राजकीय युवक संघटनांपेक्षा राजकारणापासून अलिप्त आणि पक्षनिरपेक्ष अशी राष्ट्रीय संघटना देशात निर्माण झाल्यास ती तरुण पिढीचे हे आजचे स्वरूप बदलून टाकू शकेल.

तरुण पिढीला संस्कार, शिक्षण, शील, चारित्र्य आणि सदाचार देणाऱ्या परंपरा-

गत संस्थांचे सिंहावलोकन केल्यास असे दिसते की, त्यांचा प्रभाव हळूहळू कमी होत आहे आणि अनिष्ट गुणांचे बीजारोपण त्यांच्यात अधिक प्रमाणात होत आहे. या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन विद्याखाते, पालक संघटना, संस्था चालक, शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत यांनी एकत्र येऊन काहीतरी विधायक कार्यक्रम आखण्याची व समाजाला मार्गदर्शन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. या दृष्टीने पुढील विधायक कार्यक्रमाचा विचार केल्यास आणखी काही अधिक विधायक कल्पनाही सुचू शकतील;

(१) बहुसंख्य पालकवर्ग अशिक्षित आहे, आणि संस्कारप्रधान गृहशिक्षण देण्याला तो असमर्थ आहे ही गोष्ट शाळा–कॉलेजच्या चालकांनी ओळखली पाहिजे व ही गृहशिक्षणाची उणीव भरून काढली पाहिजे. एज्युकेशन कमिशनने या गोष्टीचा विचार करून काही विधायक सूचना केलेल्या आहेत त्यांची कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा-कॉलेजांतून नैतिक शिक्षणाचा एक तास असावा आणि धर्मतत्त्वांचे ज्ञान अभ्यासातून द्यावे अशी कमिशनची शिफारस आहे. तिची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम समित्या, ग्रंथ प्रकाशन योजना व शिक्षण–प्रशिक्षण योजना लवकर करणे अगत्याचे आहे.

(२) सुशिक्षित पालकांनी आपापल्या कुटुंबामध्ये मुला-मुलींचे विचार व आचार यांना वळण लावण्याच्या दृष्टीने काही सांस्कृतिक कार्यक्रम ठेवावेत. आपापल्या धर्मपंथांना व विचारांना अनुसरून चांगल्या विचारांचे वाचन, सुभाषितांचे पाठांतर, प्रार्थना, उपासना इत्यादी गोष्टी ठेवाव्यात. बुद्धीला व विचारांना पटणाऱ्या गोष्टींचाच अंतर्भाव कौटुंबिक कार्यक्रमात करावा; त्यात अंधश्रद्धा नसावी. नैतिक आचाराला व विचाराला आणि सामाजिक हितदृष्टीला प्राधान्य देणारा कार्यक्रम कुटुंबात सुरू करावा.

(३) युवक संघटनांचे प्रमाण व संख्या वाढायला हवी. राजकीय पक्षांच्या युवक संघटनांपेक्षा बालवीर संघटना आणि एन्. सी. सी. यासारख्या पक्षनिरपेक्ष, राष्ट्रव्यापी संघटनांची वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. इटलीत, जर्मनीत आणि रशियात राजकीय दृष्टीने अशा संघटनांची वाढ झालेली होती, व आहे. त्यांच्यातील राजकीय अभिनिवेश वगळून, बाकीचा विधायक कार्यक्रम युवक संघटनेत अमलात आणण्यासारखा आहे.

(४) मुंबई–पुणे–नागपूर–सोलापूरसारख्या शहरांमध्ये रस्त्यांवर भटकणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण वाढत आहे. यात शालेय आणि शालाबाह्य अशा दोन्हीही प्रकारच्या मुला–मुलींचा समावेश आहे. या मुलांची टोळकी (गँग्ज) लवकर तयार होतात आणि त्यांना वाममार्गाला लावणारे म्होरकेही लवकर मिळतात. शहरातील गुंडगिरी वाढण्याला ह्या भटकणाऱ्या मुलांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होतो. शहरातील प्रत्येक वस्तीत युवक मंदिरे काढायला पाहिजेत. सुधारलेल्या देशातील शहरांतून यूथक्लब्ज, बॉईज् टाऊन्स, यूथ हाऊसेस, अशासारख्या संस्था असतात. ख्रिस्ती धर्मातील चर्चेसमार्फत ‘ संडे स्कूल ’सारख्या शाळाही चालतात. या ठिकाणी खेळ, करमणुकी, छंद,

व्यवसायशिक्षण, वाचन, कलाशिक्षण इत्यादी गोष्टींच्या सोयी करून मुलामुलींच्या विधायक प्रवृत्तींना उत्तेजन दिले जाते.

(५) अंशकाल सायंशाळा (पार्ट टाईम ईव्हिनिंग स्कूल्स) ही एक युवकांना संस्कार देणारी चांगली शिक्षणपद्धती आहे. सक्तीचे प्राथमिक शिक्षण झाले तरी प्राथमिक चौथी किंवा सातवीनंतर बहुसंख्य विद्यार्थी शाळा सोडून देतात. मिळाला तर नोकरी-धंदा करतात नाहीतर गावात भटकत राहतात. अशा मुलांकरिता सायंकाळी किंवा रात्री दीड-दोन तास शिक्षण देण्याकरिता अंशकाल सायंशाळा पद्धती (पार्ट टाईम इव्हिनिंग स्कूल) आपल्याकडे निघणे अत्यंत आवश्यक आहे. या शाळेत विद्यार्थ्यांवर फार बौद्धिक बोजा न टाकता भाषा, इतिहास, नागरिकशास्त्र, हस्तव्यवसाय, चित्रकला, संगीत इत्यादी विषयांचे शिक्षण देता येईल.

(६) शिक्षणसंस्थांना जोडून जी वसतिगृहे आहेत त्यांच्या दैनिक कार्यक्रमाला संस्कारात्मक व विधायक वळण देणे आवश्यक आहे. काही चांगल्या विचारांचे वाचन व विवक्षित आचारसंहितेचे पालन वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आवश्यक असावे. काही वसतिगृहे भोजन व निद्राविरहित म्हणजे डे-बोर्डिंग्ज किंवा ड्राय बोर्डिंग्ज असावीत. तेथे भोजन व झोपण्याच्या सोयीव्यतिरिक्त इतर सर्व आचार-विचार वसतिगृहाप्रमाणेच असावेत.

(७) मुला-मुलींची वाढती संख्या विचारात घेता व्यायाम, खेळ आणि करमणुकी याकरिता अधिक क्रीडांगणे, मोकळी मैदाने आणि पॅव्हिलियन्स यांची आवश्यकता आहे. सायंकाळच्या वेळी मुलांना उपयुक्त कार्यक्रमात गुंतवून ठेवण्याकरिता वेतनधारी शिक्षकांचीही जरुरी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांचा या कामी उपयोग करून घेता येईल.

(८) शाळेव्यतिरिक्त वेळात आणि दीर्घकाल सुटीच्या मुदतीत विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची कामे देण्याची सोय करणे जरुरीचे आहे. त्यामुळे मुलांच्या रिकाम्या वेळेचा विधायक उपयोग होऊन द्रव्यप्राप्तीकरता मेहनत करावी लागते या तत्त्वाची त्यांना जाणीव होईल. तरुणांमधील खुशालचेंडू वृत्तीमध्ये बदल घडवून आणण्याच्या कामी अशा प्रकारच्या स्वावलंबन प्रथेचा मोठा उपयोग होईल.

(९) तरुणांच्या सांस्कृतिक शिक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे ही गोष्ट धर्मसंस्थेच्या पुढाऱ्यांना आकलन व्हावयाला पाहिजे. खिस्ती-धर्म-मंदिरामध्ये चालू असलेल्या पाश्चिमात्य देशातील सण्डे-स्कूलचा उल्लेख वर केलेलाच आहे. प्रत्येक धर्मात चांगल्या नीतितत्त्वांचा समावेश झालेला आहे. व्यक्तीचे वैयक्तिक वर्तन शुद्ध असावे आणि तिने समाजहिताची परोपकारी वृत्ती ठेवावी अशी प्रत्येक धर्माची शिकवण आहे. इतर धर्मांविषयी सहिष्णुवृत्ती ठेवून आणि आपल्या धर्माविषयी अंधश्रद्धा उत्पन्न न करता शुद्ध नैतिक आचाराचे शिक्षण प्रत्येक धर्मातील प्रार्थनामंदिरांना त्यांच्या आवारात अथवा अन्यत्र देता येईल. अलीकडे काही ठिकाणी गीता-वर्ग चालू आहेत. त्या

ठिकाणी केवळ पाठांतरावर भर न देता गीतेतील उदात्त विचार आणि त्यांचा व्यवहारात आचार या गोष्टींवर अधिक भर द्यावा.

(१०) सार्वजनिक शिक्षणाची व करमणुकीची साधने बहुतांशी व्यापारी वृत्तीच्या चालकांचे हातात आहेत. समाजातील बऱ्या-वाईट प्रवृत्तींना उत्तेजन देऊन त्यांतून आपला स्वार्थ साधणे हे त्यांचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. यातील काही चालक समाजहिताची दृष्टी ठेवूनही आपला स्वार्थ साधतात; कधी समाजाकरिता झीजही सोसतात. परंतु सामान्यपणे असे म्हणावेसे वाटते की शिक्षणाची आणि करमणुकीची बहुसंख्य साधने समाजहिताची पर्वा न करणाऱ्या स्वार्थी चालकांच्या हातात गेलेली आहेत. शाळा-कॉलेजांतील शिक्षणावर ज्याप्रमाणे समाजाचे नियंत्रण असते, त्याप्रमाणे समाजातील अनौपचारिक (इन्फॉर्मल) संस्थांवर देखील समाजाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. समाजातील अजाण व्यक्तींना अनिष्ट संस्कारांपासून वाचविणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्याकरिता लोकशाहीच्या चौकटीत राहून, व्यक्तिस्वातंत्र्यावर फार आक्रमण न करता अनिष्ट प्रवृत्तीवर नियंत्रण घालण्याकरिता काही यंत्रणा असणे आवश्यक आहे.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे पालक आहेत, भावी समाजाचे ते घटक आहेत, नगरपालिका, ग्रामपंचायती, तालुका-जिल्हापरिषदा, कायदेमंडळे, यांचे भावी सभासद या वर्गातूनच तयार होणार आहेत. भावी पिढीतील लेखक, शिक्षक, संशोधक, कलावंत आजच्या पिढीतूनच निर्माण होणार आहेत. या पिढीला आपण आज जे संस्कार देऊ, तेच ती पिढी आपल्या पुढील वारसदारांना देईल. हीच परंपरा पुढे चालू राहील. आपल्या समाजातील तरुणांचे शिक्षण, शील आणि संस्कार याविषयी आपण आज जो विचार व जी योजना करू तिचा परिणाम अनेक भावी पिढ्यांवर होणार आहे.

ग्रामीण शिक्षण : काही विचार

कृ. भा. बाबर

१. शिक्षणाचा साधा अर्थ

माझ्या लहानपणची गोष्ट. एके दिवशी सायंकाळी आकाशात दिसणाऱ्या चंद्राकडे व तारांगणाकडे बघून माझी आत्या मला म्हणाली, ' परातभर लाह्या त्यात एक रुपया. ' म्हणजे काय म्हणून मी विचारता ती म्हणाली, ' चांदण्या आणि चांदोबा. ' मी त्यावर काही बोललो नाही, पण तिच्या बोलण्याची प्रचीती पाहण्यासाठी आकाशाकडे टक लावून बघतमात्र राहिलो. खेड्यातील अडाणी बाईने आपल्या नित्याच्या पाहण्यातल्या वस्तूंच्या दृष्टांताने मला आकाशाची करून दिलेली ओळख, मी चौथ्या-पाचव्या इयत्तेत शाळेत शिकेपर्यंत तशीच राहिलेली होती. पाचव्या इयत्तेत असताना त्या वर्गाच्या गुरुजींनी रात्री शाळेत बोलावून जेव्हा आम्हां काही विद्यार्थ्यांना नक्षत्रांची माहिती दिली आणि त्या वेळी दिसणारे ग्रह, सप्तर्षी, व्याध, अगस्ती वगैरे ठळक तारे दाखविले तेव्हा आकाशाकडे पाहात असताना आम्हाला अधिक काही दिसायला लागले, कळायला लागले. आकाशातील त्या पांढऱ्या लाह्या आता मला निराळ्या दिसायला लागल्या. तो रुपयाही आता वेगळा दिसायला लागला आणि नक्षत्रांची ओळख पटून त्यांच्या साह्याने घड्याळाशिवाय रात्रीच्या वेळी आता किती वाजले असतील हे मी जवळ जवळ बिनचूक ओळखू लागलो. मी त्या बाबतीत थोडा शहाणा झालो. माझी आत्या अखेरपर्यंत पूर्ववत आडाणीच राहिली आणि अजूनही खेड्या-पाड्यातील बहुतेक लोक असेच असलेले आढळून येतील !

यानंतर मी जसजसा मोठा होत गेलो, तसतसा आकाशस्थ ज्योतींबाबत अधिक माहिती मिळवू लागलो आणि शेतावर वस्तीला असताना रात्रीच्या वेळी आकाशाकडे पाहताना मला गंमत वाटायला लागली. पुढे ट्रेनिंग कॉलेजात शिकत असताना

ज्योतिषशास्त्र विषयाचा काही अभ्यास झाला. ग्रह आणि तारे यांच्याबद्दल अधिक माहिती मिळाली, आणि पुढे बऱ्याच वर्षांनी प्रसिद्ध लेखक आचार्य काका कालेलकर यांचे 'जीवनातील आनंद' हे पुस्तक जेव्हा वाचायला मिळाले, तेव्हा आकाशातील त्याच परातभर लाह्यांची लज्जत चाखायला मिळाली आणि समाधान वाटले. कालेलकरांनी 'सृष्टीचे रहस्य' उकलून दाखविताना म्हटले आहे की, "ज्यात कमी दिसते तो अंधार व जास्त दिसते तो प्रकाश; ही व्याख्या बरोबर असेल, तर असे म्हटले पाहिजे की, दिवसा पांढरा अंधार असतो, त्यामुळे आपल्याला फक्त पृथ्वी व सूर्य ही दोघे दिसतात; परंतु रात्री काळा उजेड पडतो, तेव्हाच ईश्वराची अनंत सृष्टी आपल्यापुढे प्रगट होते व विश्व किती अफाट आहे, याची थोडीशी कल्पना येते."

आकाशातील तारे आणि चंद्र यांच्यासंबंधी मला फार थोडे कळते आहे, पण मला माझ्या आत्येपेक्षा बरेच अधिक कळते आहे. माझ्यासारखेच तिलाही डोळे होते, ती आकाशात पाहात होती आणि तिला तारे व चंद्र दिसत होते. पण फक्त दिसतच होते. त्यांच्यासंबंधी तिला अधिक काही कळत नव्हते. केवळ जोंधळ्याच्या किंवा मक्याच्या भाजलेल्या लाह्या आणि त्या काळी वापरात होता तो चांदीचा रुपया, ह्यांच्या इतकेच तिला आकाशस्थ ज्योतीबद्दल कळत होते. तिच्या डोळ्याला ह्यापेक्षा अधिक दिसत नव्हते. मला तिच्यापेक्षा थोडे अधिक दिसायला लागले. गुरुजींच्या सांगण्यावरून आणि पुस्तके वाचून मला हे अधिक दिसायला लागले. ह्यालाच शिक्षण म्हणतात आणि ह्यालाच ज्ञान म्हणतात. शिक्षणाचा हा अगदी साधा अर्थ आहे.

आपल्या डोळ्याला एखादा पदार्थ दिसला म्हणजे त्या पदार्थाचे आपणाला जे ज्ञान होते, त्यासंबंधी आपण हा विचार केला. पण हे ज्ञान होते कसे तेही पाहिले पाहिजे. एखाद्या पदार्थापासून निघालेले प्रकाशकिरण आपल्या डोळ्यात शिरले, म्हणजे डोळ्याच्या पडद्यापर्यंत आलेले जे ज्ञानतंतू असतात, त्यांच्याद्वारे ह्या किरणांचा संबंध आपल्या मेंदूशी पोचतो व मग तेथे त्याचे ज्ञान होते.

सर्व प्रकारचे ज्ञान आपणाला असेच मेंदूच्या योगाने होते. कानाला निरनिराळ्या प्रकारचे आवाज समजतात, नाकाला वासाचे ज्ञान होते, जिभेला चव कळते आणि आपल्या त्वचेला स्पर्शज्ञान होते म्हणजेच पदार्थाची उष्णता, थंडी, जडपणा किंवा हलकेपणा इ. कळतो—हे सारे असेच घडते. डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा ह्या आपल्या इंद्रियाला बाहेरच्या जगाचे ज्ञान असेच—जगातील पदार्थांचा ह्या इंद्रियाशी संबंध जडून—होत असते. म्हणूनच ह्या इंद्रियांना ज्ञानेंद्रिये म्हणतात.

ज्ञानेंद्रियांच्या द्वारे माणसाला शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध वगैरेंचे ज्ञान स्वाभाविकपणे होत असते. म्हणजे ह्या इंद्रियांच्या ठायी तो गुण उपजतच आलेला असतो. हे ज्ञान मामुली स्वरूपाचे—अगदी साधे—साधे—असते. ज्ञानेंद्रियांच्या योगाने मेंदूला जेव्हा ज्ञान होते, तेव्हा मेंदूच्या ठायी विचार करण्याची किंवा कल्पना करण्याची जी शक्ती असते, ती जागी होते व मग मूळचे मामुली स्वरूपाचे ज्ञान वाढीला लागते.

आकाशात दिसणारे तारे, ग्रह वगैरेंचे अधिक ज्ञान माणसाला अशा त्याच्या कल्पनेच्या व विचाराच्या योगानेच झालेले आहे. आपली पृथ्वी कशी उत्पन्न झालेली असावी, आकाशातील तारे व ग्रह वगैरे कसे निर्माण झाले असतील, त्यांचा पृथ्वीशी कसा व किती संबंध येत असतो, ह्या ताऱ्यांचे व ग्रहांचे पृथ्वीपासून अंतर किती असावे, ह्या ताऱ्यांतील व ग्रहांतील आपल्याशी नित्य परिचित असलेल्या सूर्यचंद्रांचा आपणावर काय परिणाम घडत असतो, इत्यादी ज्ञान माणसांनी मिळविलेले आहे, इतकेच नव्हे तर आता काही माणसे चंद्रावर जाऊन आली असून, मंगळ ग्रहाचा शोध घेण्याच्या तयारीत आहेत. हे सारे अधिक ज्ञानाने घडून आलेले आहे. हे अधिक ज्ञान सहजासहजी मिळत नाही, त्याला शिक्षण घ्यावे लागते.

शिक्षणाने माणसाच्या इंद्रियांचा विकास होतो, त्यांना अधिक दिसायला लागते, अधिक कळायला लागते, साध्या डोळ्याला जे दिसते, त्यापेक्षा माणसाने तयार केलेल्या साधनांच्या योगाने ह्याच डोळ्याला अधिक दिसायला लागते. पृथ्वीपासून २ लक्ष २६ हजार मैलांवर असलेल्या चंद्रावर उतरलेल्या माणसांच्या साऱ्या हालचाली पृथ्वीवरील माणसांना दिसत होत्या हे केवढे आश्चर्य !

डोळ्याप्रमाणे इतर इंद्रियांचाही असाच विकास करता येतो. केवळ 'कुळ्ळीव कुळ्ळीव' म्हणून कोकिळाचा आवाज ऐकणाऱ्या, 'कु कू कू ऽऽ' किंवा 'कसा गा इऊ ?' म्हणून कोंबड्याचा आवाज ऐकणाऱ्या अथवा 'ऑकूडूर' म्हणून तरण्या खोंडाचा आवाज ऐकणाऱ्या माणसाला अभ्यासाने–शिक्षणाने–निरनिराळ्या वाद्यांचे सूर समजायला लागतात. इतर इंद्रियांचेही असेच.

इंद्रियांचा विकास होत असताना दुसऱ्या माणसाच्या अनुभवाचा आपणाला मोठा उपयोग होतो. लहानपणी आईबाप किंवा घरातील इतर मोठी माणसे आणि मोठेपणी गुरू किंवा शिक्षक अथवा कथाकीर्तनकार, शाहीर-तमासगीर हे आपल्या अनुभवाच्या अनेक गोष्टी आपणाला सांगतात किंवा आपणाकडून करून घेतात आणि अशा रीतीने आपणाला समाजाकडून शिक्षण मिळत असते. साध्या प्रकारचेच हे शिक्षण असते.

२. ग्रामीण जनतेचे पूर्वीचे शिक्षण

ग्रामीण जनता म्हणजे शहरापासून किंवा उद्योगधंद्यांच्या केंद्रापासून दूर खेड्यापाड्यातून राहणारी जनता. अशा खेड्यापाड्यातील लोक हे मुख्यतः शेतीवर उपजीविका करणारे असतात. शेतांच्या आश्रयानेच खेड्यांची वसाहत झालेली असते. म्हणून खेड्यामध्ये शेतकरी, शेतमजूर आणि शेतकऱ्यांना उपयोगी पडणारे किंवा शेतकऱ्यांच्या जिवावर जगणारे इतर कामकरी—सुतार, लोहार, चांभार, कुंभार इ०—लोक राहात असतात. पोटापुरते मिळवावे आणि कसेतरी दिवस काढीत जगावे एवढेच ह्या लोकांना माहीत असते. त्यामुळे मोठ्या उद्योगधंद्यांशी किंवा ज्ञानाच्या क्षेत्राशी ह्या लोकांचा

संबंधच येत नाही.

शिक्षणाशी केवळ व्यापक अर्थानेच ह्या लोकांचा संबंध येतो. वडिलोपार्जित मिळकतीवर जगणारे हे लोक वाडवडिलांच्याकडूनच त्यांच्या धंद्यांचे शिक्षण घेत. धंद्याचे शिक्षण हेच त्यांचे शिक्षण, धंद्याचे ज्ञान हेच त्यांचे ज्ञान. पुस्तकी शिक्षणाची त्यांना ह्यामुळे कधी जरुरीच वाटली नाही. आपल्या धंद्यात आपण तरबेज असले म्हणजे झाले असे त्यांना वाटते. शेतीची मशागत करणे, कुळवकाठी, नांगरणी, पेरणी, काढणी, मळणी चांगली करता आली म्हणजे झाले. म्हणूनच काही खेडूत लोक केवळ पुस्तकी ज्ञान मिळविलेल्या ब्राह्मणांना 'अडाणी' म्हणताना आढळतात.

खरी गोष्ट आहे ही. १९४० सालची गोष्ट. नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागात एका गावी व्हालंटरी शाळा तपासायला मी गेलो असताना, तेथे शाळेत एकही ब्राह्मणाचे पोर दिसले नाही. तेव्हा मी पंचांना विचारले, 'शाळेत ब्राह्मणाचे एकही पोर कसे नाही?' तेव्हा त्यांपैकी एकजण म्हणाला, 'साहेब आमच्या गावात अडाण्याचे घर नाही.' मला आश्चर्य वाटल्याचे दिसताच त्याने खुलासा केला, 'आमी बामणाला अडाणी म्हणतो.' त्यावर मी हसलो, तेव्हा दुसरा एकजण म्हणाला, 'खरेच आहे ते. त्यास्नी आमच्या धंद्यातलं काय येतंय?'

ग्रामीण जनतेची शिक्षणाची किंवा ज्ञानाची ही कल्पना ४०/५० वर्षांपूर्वी सर्रास सर्वत्र होती, असे म्हणावयास हरकत नाही. पुस्तकी ज्ञानाचे त्यांना त्या काळी काही महत्त्व वाटत नव्हते. त्यावाचून त्यांचे अडतही नव्हते. पोथ्या-पुस्तकांचा संबंध त्या काळी धार्मिक क्रियाकर्मांपुरता किंवा पुराण-कथा-कीर्तनापुरता यायचा आणि ते काम भटाबामणांकडून भागत असे. म्हणून 'लिवणं पुसणं हे बामणाचं काम हाय' असे हे लोक समजत. नाही म्हणायला मोठ्या घराण्यातील काही माणसे थोडे लिहायलावाचायला शिकत आणि तेवढ्यापुरता गुरुजी म्हणून बामणाचा उपयोग करून घेत. पण अशी माणसे फार थोडी निघत. आपल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर पूर्वी मुसलमानांच्या कारकीर्दीत आणि पुढे मराठेशाहीतही असेच चाललेले होते.

आपल्यावर इंग्रजांचे राज्य आल्यापासून थोडा बदल घडून येऊ लागला. त्यांनी प्रजेला शहाणे करायचे ठरविले; आणि गावागावातून शाळा काढायला सुरुवात केली. आपल्या नोकरीत काम करण्यासाठी का होईना पण त्यांनी शिकलेली माणसे तयार केली. त्यासाठी त्यांनी विद्यापीठे निर्माण केली आणि म्युनिसिपालिट्या व लोकल-बोर्डे स्थापन करून लोकांना थोड्या प्रमाणात का होईना राज्यकारभाराचे ज्ञान द्यायलाही आरंभ केला. इंग्रजांच्या या योजनेचा फायदा आरंभी तरी शहरातील आणि विशेषतः ब्राह्मणादि पुढारलेल्या वर्गातील लोकांनी घेतला. ग्रामीण जनता पुष्कळ काळ अशिक्षितच राहिली.

पुढे औद्योगिक क्रांतीचे लोण युरोपातून हिंदुस्थानातही आले; आणि मोठ्या मोठ्या शहरांतून गिरण्या व कारखाने निघू लागले. त्यासाठी मजूर किंवा कामकरी

लोकांची जरुरी उत्पन्न झाली व ही गरज भागविण्यासाठी ग्रामीण जनता पुढे सरसावली. लोकसंख्या वाढायला लागली आणि शेतीवर उदरनिर्वाह होणे कठिण पडू लागले. तेव्हा खेड्यापाड्यातील तरणीताठी आणि धट्टीकट्टी माणसे शहराकडे धाव घेऊ लागली, गिरण्या-कारखान्यांतून आणि हॉटेल व लाकडाच्या वखारी यांच्यामधून कष्टाची कामे करण्यासाठी ही माणसे उपयोगी पडू लागली. त्या लोकांनाही काम करून का होईना घरच्यापेक्षा बरे खायलाप्यायला मिळू लागले. पाव बिस्कूट आणि च्या-पाणी भेटायला लागले. धडूत पांघरूणही बऱ्यांपैकी अंगावर घेता यायला लागले. आणि त्यामुळे त्या शहरी जीवनाची त्यांना चटक लागायला लागली. ही शहरात गेलेली माणसे जेव्हा रजेवर आपल्या गावी परतू लागली, तेव्हा पांढरी शुभ्र धडुते घातलेली आणि पायात बूट चपला असलेली अशी दिसू लागली. विडी-सिगारेट मजेने शिलगावतानाही ती इतरांना पाहायला मिळू लागली. त्यामुळे खेड्यातील इतर तरुणांना ते एक आकर्षण झाले आणि त्यांच्यापैकी काहीजण आपल्या सोबत्याबरोबर शहराचा रस्ता धरू लागले. शहरवासी होऊ लागलेल्या ह्या खेडुतांना शिक्षणाची किंमत थोडी थोडी कळायला लागली. शहरात आपले जिथे तिथे अडते, असे त्यांना दिसून येऊ लागले. म्हणून आपण नाहीतरी आपली मुलेबाळे तरी शिकावीत याची जाणीव त्यांना व्हायला लागली,

१९१४ ते १९१८ पर्यंत झालेल्या पहिल्या जागतिक महायुद्धानेही थोडी क्रांती केली. ह्या महायुद्धात इतर ठिकाणांप्रमाणे महाराष्ट्रातील पुष्कळ सैनिक सामील झालेले होते. आपल्या देशातील अनेक प्रांतांत आणि परदेशातही त्यांना जावे लागले. ह्यांपैकी बरेचजण आरंभी अशिक्षितच होते. पुढे लष्करात भरती झाल्यावर त्यांना हळूहळू शिक्षण मिळाले. लिहिता वाचता येऊ लागले व आपले ऑफिसर आणि इतर मोठे लोक वर्तमानपत्रे व पुस्तके वाचताना आणि निरनिराळ्या अनेक विषयांवर चर्चा करताना दिसू लागले. तेव्हा ह्या सैनिकांनाही आपोआप शिक्षणाचे महत्त्व कळू लागले. जसजसे शिक्षण जास्त तसतशी बढती जास्त व पगार आणि अधिकारही जास्त हे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा शिक्षणाची किंमत सहजच त्यांच्या ध्यानात आली. आपल्या गावी परत आल्यावर आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास त्यांनी सुरुवात केली.

आणि शिक्षण घेऊन अधिक दर्जाच्या नोकऱ्या मिळविणारे, निरनिराळे उद्योगधंदे करणारे व पैसा मिळवून सुखाने राहणारे ब्राह्मण व इतर पुढारलेले लोक पाहून ग्रामीण जनतेला शिक्षण देणे जरूर आहे याची जाणीव त्यांच्यापैकी काही महाभागांना व्हायला लागली. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वीच महात्मा जोतीराव फुले यांनी त्या दिशेने कार्य करायला आरंभ केला. मुलींच्या शिक्षणाकडे त्यांनीच पहिल्या प्रथम लक्ष दिले आणि केवळ ब्राह्मणेतरांसाठी नव्हे तर अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांसाठीही त्यांनी शाळा काढून चालविली. लेख लिहिले, व्याख्याने दिली आणि सत्यशोधक समाजाची स्थापनाही केली.

विसाव्या शतकाच्या आरंभी ह्या सत्यशोधक समाजाच्या कार्याला आणि एकूण

बहुजनसमाजाच्या शिक्षणाला राजर्षी शाहू छत्रपती महाराज व श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी शाळा व वसतिगृहे काढून चांगले उत्तेजन दिले. ग्रामीण जनतेच्या शिक्षणाला खऱ्या अर्थाने त्या वेळी सुरुवात झाली, असे म्हटले तरी चालेल.

शाहू महाराजांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात–विशेषतः दक्षिण महाराष्ट्रात सत्य-शोधक समाजाने शैक्षणिक दृष्ट्या फार मोठी चळवळ केली. सभासंमेलने भरवून माहिती दिलीच व जलशांच्या रूपाने फारच मोठी जागृती केली. गावच्या गावे आणि खेडीच्या खेडी ह्या चळवळीने खडबडून जागी झाली आणि मुलांना शाळेत घालण्यास त्यांनी आरंभ केला. ४० । ५० वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. खेड्यापाड्यातून अधिक शाळा निघू लागल्या आणि शाळागृहे व शिक्षक कमी पडू लागले. जागृतीची ही ज्योत मग दिवसें-दिवस एवढी पेटत आणि मोठी होत गेली की, ग्रामीण जनतेच्या शिक्षणाकडे सरकारलाही मोठ्या प्रमाणावर लक्ष द्यावे लागले.

पूर्वीच्या काळची गोष्ट लक्षात आली म्हणजे आज झालेली क्रांती केवढी मोठी आहे याची कल्पना येते. १९१० साली मी मराठी सातव्या इयत्तेची परीक्षा पास झालो. त्या साली सातारा जिल्ह्यातून (आजच्या सांगली जिल्ह्याचा पुष्कळसा भाग त्यामध्ये सामील होताच) २६० विद्यार्थी परीक्षाला बसलेले होते. आज ही संख्या शंभरपटीहून मोठी झालेली आहे. १९१५ साली मी पुण्याच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेजमधून तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास झालो, त्या साली आमच्या वसतिगृहात भोजनगृहात (हरिजनांचे व मुसलमानांचे वसतिगृह वेगळे होते—त्यात विद्यार्थीही थोडेच होते) ३०० विद्यार्थी जेवत होतो. त्यामध्ये २७० ब्राह्मण होते. राहिलेल्या ३० मध्ये १७ मराठे व १३ इतर (सारस्वत ब्राह्मणांसह) होते. ग्रामीण भागातील व अगदी खेड्यापाड्यातील किती लोक त्या काळी शिक्षक होण्यासाठी येत होते हे यावरून दिसून येईल व ग्रामीण जन-तेच्या शिक्षणाची स्थिती त्या काळी कशी होती, हेही त्यावरून दिसून येईल.

ही स्थिती पालटावी आणि मराठादी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून ह्या समाजातील काही थोर लोकांनी बराच प्रयत्न केला. ह्यासाठीच १८८५ साली पुण्यातील कँप भागात राहणारे, कै. गंगाराम भाऊ म्हस्के यांनी डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी स्थापन केली; आणि बहुजनसमाजातील गरीब विद्यार्थ्यांना शिष्य-वृत्तीच्या रूपाने मदत देण्याला सुरुवात केली. आजही ही संस्था हे कार्य करीत आहे. १९०७ साली धारवाड येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. कै. खासेराव जाधव हे ह्या परिषदेचे अध्यक्ष होते आणि कै. भास्करराव जाधव हे स्वागताध्यक्ष होते. मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य ह्या संस्थेने चांगले केले. वेळोवेळी ह्या संस्थेच्या परिषदा निरनिराळ्या जिल्ह्यांतून व संस्थानांतूनही भरत गेल्या; आणि त्या त्या ठिकाणी विद्याप्रसारक समाज स्थापन झाले. आरंभी ह्या समाजांनी वसतिगृहे स्थापन केली आणि आता अलीकडे हायस्कुले व कॉलेजेही निर्माण केली आहेत.

कै. शाहू महाराजांच्यापासून स्फूर्ती घेऊन भाऊराव पाटलांनी साताऱ्याला रयत शिक्षणसंस्था स्थापन केली व हरिजनांपासून सर्व जनतेच्या हितासाठी शिक्षणप्रसार केला. आज ह्या संस्थेच्या कितीतरी शाळा व कॉलेजे आहेत. वऱ्हाडात अमरावतीला डॉ. पंजाबराव देशमुखांनी अशाच प्रकारचे फार मोठे कार्य केले आहे. नाशिक जिल्ह्यात रावसाहेब थोरात आणि भाऊसाहेब हिरे यांनीही असेच काम केले आहे. आज ही माणसे हयात नाहीत, पण त्यांचे कार्य जिवंत आहे. धुळ्याला डॉ. घोगरे आजही ह्याच प्रकारचे कार्य करीत आहेत. जळगाव, नगर, सोलापूर, कोल्हापूर इत्यादी ठिकाणीही कार्य-कर्ती माणसे निर्माण झाली आहेत; आणि ग्रामीण शिक्षणाचा गाडा पुढे रेटण्याचे कार्य करीत आहेत. आज कार्य मोठे दिसते आहे, पण त्याची सुरुवात अगदी लहान प्रमाणात झालेली होती, हे विसरता येणार नाही,

फार पूर्वीची गोष्ट सोडून दिली, तरी सुमारे ३५ वर्षांपूर्वीच्या एक-दोन गोष्टी सांगण्यासारख्या वाटतात. मराठा शिक्षण परिषदेच्या आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे शिक्षणप्रसाराला चालना मिळाली आणि ग्रामीण भागातही पुष्कळ शाळा निघून मुले शिकायला लागली, तरी मुलांच्या शिक्षणाकडे ग्रामीण लोकांनी जितके लक्ष दिले, तितके मुलींच्या शिक्षणाकडे काही दिले नाही. ३५ वर्षांपूर्वी आजच्या सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील एका गावी मी शाळा तपासण्यास गेलो असता, शाळेत एकही मुलगी दिसली नाही, तेव्हा मी जमलेल्या पुढारी मंडळींना विचारले, ‘ शाळेत मुलगी का एकही दिसत नाही ? ’ तेव्हा एका प्रमुख पुढाऱ्याने–पाटलाने–सांगितले, ‘ काय बिशाद हाय मी जिवंत असस्तोवर साळत पोरगी येतीया ? ’ ही मुलींच्या शिक्षणाबद्दलची त्या लोकांची कल्पना !

त्यानंतर दोनतीन वर्षांनी सातारा तालुक्यातील मेढ्याशेजारच्या एका गावी वेगळीच गंमत ऐकायला मिळाली. ह्या गावच्या शाळेतही मुलगी नव्हती. पंच मंडळींना विचारता ते म्हणाले, ‘ सायेब, आम्ही पोरीस्नी साळत घालत नाही ! ’ ‘ का ? ’ म्हणून पुन्हा विचारता त्यातील एकजण म्हणाला, ‘ साळत घातलेल्या पोरीला पैसं लई येत न्हाईत ? ’ ‘ म्हणजे काय ? ’ म्हणून विचारले तेव्हा त्याने खुलासा केला की, ‘ आम्ही पोरीचं लगीन करताना पैसं घेतो. आन् साळा शिकलेली पोरगी कुनी पतकरत न्हाई आनि पैसंबी कमी करत्याती. ’ ह्या लोकांचे बोलणे ऐकून मी गारच झालो. त्यांना बोलणार तरी काय ? त्यांचा तो आर्थिकदृष्ट्या जिव्हाळ्याचा प्रश्न होता.

आज आता ही परिस्थिती राहिलेली नाही. आता मुलीही बऱ्याच शिकू लागलेल्या आहेत, तथापि मुलांपेक्षा मुलींकडे पाहण्याची ग्रामीण लोकांची दृष्टी वेगळी असल्याने अजूनही मुलींचे शिक्षण मुलांच्या शिक्षणाच्या मानाने बरेच मागे आहे.

३. आजचे ग्रामीण शिक्षण

ग्रामीण जनतेत पूर्वीच्या मानाने आता शैक्षणिक जागृती झालेली आहे. आपल्या

मुलांना शाळेत घाला, म्हणून आता फारसे कोणाला सांगावे लागत नाही. खेड्यापाड्यातून काही वाड्यांवरही–आता शाळा निघाल्या आहेत. पूर्वी जेथे चौथ्या इयत्तेपर्यंतची एक मास्तराची शाळा नीट चालत नव्हती, तेथे आता सातव्या इयत्तेपर्यंतची शाळा सुरू झालेली आहे. इतकेच नव्हे तर असल्या काही गावांतून आता दुय्यम शाळा म्हणजे इंग्रजी शिक्षण देणारी हायस्कुले सुरू झालेली आहेत, आणि पूर्वी जिल्ह्याच्या ठिकाणी सुद्धा जेथे एखादे महाविद्यालय नव्हते, तेथे आता तालुकानिहाय एक अथवा अधिक महाविद्यालये निघाली आहेत किंवा निघू पाहात आहेत.

इंग्रजांनी शंभर वर्षांपूर्वी काढलेल्या इंग्रजी शाळांतून चारपाच बुके शिकून बाहेर पडलेली त्या काळची माणसे–विशेषतः ब्राह्मणादी पुढारलेल्या वर्गांतील–पुढे मोठमोठ्या हुद्द्यावर चढत होती. मामलेदार मुन्सफ होत होती, आणि ६०–७० वर्षांपूर्वी शिक्षकाच्या नोकरीसाठी स्पेशल स्कॉलरशिपा देऊन काही लोकांना बोलवावे लागत होते, ती स्थिती आता राहिलेली नाही. पूर्वी मराठी सहावी इयत्ता हीच शाळेतील शेवटची परीक्षा होती. त्यानंतर सातव्या इयत्तेला महत्त्व प्राप्त झाले, पण आज प्राथमिक शाळेतील सातव्या इयत्तेला काही महत्त्व राहिलेले नाही. इंग्रजी सातवी किंवा हल्लीची अकरावी परीक्षा म्हणजे एस. एस. सी. परीक्षा पास होणारेही विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्रात लाखांच्या वर गेलेले असल्याने ह्या परीक्षेची सुद्धा किंमत आता फारशी राहिलेली नाही. इतकेच नव्हे तर पदवी परीक्षा पास झालेले–इंजिनियरिंग परीक्षा दिलेले लोकसुद्धा आता बेकार असलेले आढळून येऊ लागले आहेत. परिस्थितीत एवढा झपाट्याचा बदल होत चालला आहे.

असे असले तरी शहरी जनतेपेक्षा ग्रामीण जनता अजून शिक्षणात पुष्कळच मागे आहे. प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी आता खेड्यातील मुलांना फारशी सक्ती करावी लागत नाही, तथापि ३।४ इयत्तांच्या पुढे जाणारे विद्यार्थी अजूनही तेथे निम्म्याच्या पुढे जात नाहीत; आणि हायस्कुलात किंवा कॉलेजात जाणारांची संख्या फारच कमी दिसून येते.

शहरामध्ये शिक्षणाच्या सोई मुबलक झालेल्या आहेत. मोठया शहरातून तर खूपच हायस्कुले आणि कॉलेजे निघालेली आहेत, त्यामुळे गोरगरिबांची मुलेही कशीबशी का होईना त्यांचा फायदा सहजासहजी घेत आहेत. खेड्यातील मुलांना हायस्कूलचे किंवा कॉलेजातील शिक्षण घेण्यासाठी आपल्या गावापासून दूर चारसहा मैलांच्या पेक्षा जास्त अंतरावर चालत जाऊन किंवा यापेक्षा लांब असलेल्या गावी तेथे राहूनच शिक्षण पुरे करावे लागते. जाण्यायेण्यात त्यांचा जास्त वेळ जातो. दूरच्या गावी खाण्यापिण्याचे हाल होतात. घरचे जेवण डब्यातून आले तरी ते वेळेवर व ताजे मिळत नाही; आणि चांगल्या खाणावळीतून खाण्याइतकी आर्थिक स्थिती चांगली नसते. शाळा-कॉलेजांची फी देण्यास व पुस्तके विकत घेण्यास त्यांना काय जिकीर पडते, हे इतरांना कळायचे नाही. असे असल्यामुळे वरच्या दर्जाचे शिक्षण अजूनही ग्रामीण विद्यार्थ्यांना नीटसे घेता येत नाही.

अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, रशिया, जपान इत्यादी पुढारलेल्या देशांच्या मानाने आपला भारत जसा शिक्षणात व त्यामुळेच आर्थिक दृष्ट्या मागासलेला राहिला आहे, त्याचप्रमाणे ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या मानाने मागासलेले राहिलेले आहेत. प्राथमिक शिक्षण घेण्याकडे आताशी त्यांची प्रवृत्ती झालेली आहे, पण आजच्या सुधारलेल्या जगात त्याला काहीच महत्त्व राहिलेले नाही. प्राथमिक शिक्षण हा इतर शिक्षणाचा पाया आहे. पण पाया म्हणजे काही मंदिर नव्हे.

शिक्षणाने इंद्रियांचा विकास व्हावयाचा असतो. हा विकास काही प्राथमिक शिक्षणाने होत नाही. त्यासाठी उच्च दर्जाचे शिक्षण घ्यावे लागते. उच्च दर्जाच्या शिक्षणातही केवळ पुस्तकी ज्ञानाचे शिक्षण हे काही खरे शिक्षण असत नाही. शास्त्रीय ज्ञान आणि विशेषतः तांत्रिक व यांत्रिक ज्ञान जरुरीचे असते. ज्ञानेंद्रियांना आणि हातालाही काही तरी करण्याचे वळण लागले पाहिजे. नवीन काही करून दाखविता आले पाहिजे. म्हणजेच शिक्षण हे क्रियात्मक असले पाहिजे. अशा प्रकारच्या शिक्षणाकडे खेड्यातील विद्यार्थ्यांची दृष्टी अजून वळलेली नाही. एस. एस. सी. होऊन पुढे शिक्षक किंवा कारकून होत असलेला आणि बी. ए. बी. कॉम. किंवा साधा बी. एससी. होण्याच्या—फार तर वकील होण्याच्या—महत्त्वाकांक्षा बाळगणाराच विद्यार्थी अजून खेड्यातून आढळून येत आहे. असलेही विद्यार्थी थोडेच निघतात, पण काही का होईना थोडेतरी निघत आहेत. अगदीच थोडे डॉक्टर किंवा इंजिनियर झालेलेही सापडतील; पण ह्याहून ज्ञानाच्या काही निराळ्या शाखा आहेत, संशोधनाची काही वेगळी क्षेत्रे आहेत, याची कल्पनाही अजून ग्रामीण जनतेपर्यंत पोचलेली नाही. त्यामुळे त्यांची दृष्टी अजून फाकलेली नाही. खऱ्या अर्थाने अजून ज्ञान वाढलेले नाही. त्यामुळे नोकरी-पेशाचे किंवा बैठ्या स्वरूपाचेच काम ग्रामीण जनतेतील शिकलेले लोक अजून करीत आहेत.

सध्याचे युग हे औद्योगिक युग आहे. शेकडो हजारो उद्योगधंदे आता सुरू झालेले आहेत आणि त्यांना अनुसरून कारखानदारीही वाढलेली आहे. मानवी जीवनच त्यामुळे बदलत चालले आहे. केवळ शेतीवर जगायचे युग आता संपलेले आहे. अमेरिका, इंग्लंड वगैरे देशांतील फार थोडे लोक शेती करीत आहेत. हे थोडे शेतकरीही नवीन ज्ञानाचा, नवीन शोधांचा व नवीन साधनांचा उपयोग करून सबंध देशाची गरज भागेल असे उत्पादन करीत आहेत. आपल्या देशात अजूनही ७०टक्के लोक शेतीवरच जगत आहेत, तेही जुन्या पुराण्या पद्धतीने शेती करून. आता कोठे थोड्या लोकांचे लक्ष सुधारलेल्या शेतीकडे वळलेले आहे. त्यामुळे सुधारलेल्या देशातील लोकांच्या व आपल्या राहणीत मोठा फरक पडलेला आहे.

आपल्या देशातीलही श्रीमंत व शहरी लोकांच्या आणि खेड्यातील लोकांच्या राहणीत हा फरक जाणवल्याशिवाय राहात नाही. अजूनही बाजूच्या खेड्यातील स्त्री आपल्या घरातील चुलीत गोवऱ्या (शेणकुटे), शेवऱ्या, पळकाट्या, चिपाटे किंवा लाकडे घालून धुराने भरलेल्या डोळ्याने भाकरी भाजत असलेली दिसेल. ह्याउलट

आता मोठ्या शहरांतून गॅसच्या किंवा विजेच्या शेगड्यांचा उपयोग स्वयंपाकासाठी होत असलेला आढळून येईल. आजही पुण्याला आजूबाजूच्या ४।५ मैलांवरील खेड्यांतून ओल्या हरभऱ्याचे डहाळे–दोघा गड्यांच्या उचलणीचे–डोक्यावरून विक्रीसाठी घेऊन येत असलेल्या बायका दिसतात; आणि पुण्यातील पुष्कळ स्त्रियांना अंगावरच्या कपड्यांचेही ओझे वाटत असलेले आढळते ! !

शिक्षण आणि त्यामुळे प्राप्त झालेली आर्थिक सुबत्ता यांच्यामुळे शहरी जीवन हे ग्रामीण जीवनाहून वरच्या दर्जाचे झालेले आहे. सर्व सुखसोईंनी युक्त असलेले बंगले, मोटारी, रेडिओ, रेफ्रिजरेटर, टेलिफोन, नोकरचाकर यांचा उपयोग करीत असलेले शहरी लोक शालेय व औद्योगिक शिक्षणामुळेच सुधारलेले आहेत, यात शंका नाही.

ग्रामीण शिक्षणात आणखी एक उणीव जाणवल्याशिवाय राहात नाही. हे शिक्षण एकांगी व अपुरे असल्यामुळे ते घेतलेले लोक खेड्यात राहूच शकत नाहीत. जास्त आणि विविध प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी व नोकरी आणि कामधंद्यासाठी ते गाव सोडून शहरातच राहायला जातात. पुष्कळ खेडी रेल्वेपासून आणि मोटारीच्या रहदारीपासूनही दूर असल्याने त्यांना आपल्या खेड्यामध्ये राहून एखादा धंदा उभारणे शक्यच होत नाही.

दुसरी गोष्ट अशी की, खेड्यामध्ये शालेय शिक्षणाशिवाय परंपरागत किंवा सांस्कृतिक शिक्षण जे वडीलधाऱ्यांकडून मिळते, ते निवृत्तिपर असल्यामुळे अंधश्रद्धा निर्माण करणारे आणि देवावर व दैवावर विश्वास ठेवून वागायला शिकविणारे असल्यामुळे लोक सामान्यतः आळशी, उदासीन, परावलंबी व काम न करता खायला मिळावे अशा प्रवृत्तीचे बनलेले आहेत. त्यामुळे कामकरी किंवा रोजगारी लोक अंग मोडून काम करीत नाहीत आणि मालक शेतकरीही पुष्कळ काळ गप्पागोष्टीत, पानतंबाखू खाण्यात, यात्रा-जत्रा करण्यात किंवा सिनेमा-तमाशे पाहण्यात घालवितात. अशा लोकांच्यासाठी योग्य शिक्षणाचा विचार अजून व्हायचाच आहे असे म्हटले तरी चालेल.

४. शिक्षणाचा व्यापक अर्थ

शिक्षणाचा साधा अर्थ म्हणून जो आरंभी सांगितला आहे, त्याचा संबंध मुख्यतः बुद्धीशी असतो. ज्ञानेंद्रियांचा विकास होऊन बुद्धीची वाढ झाली आणि जगाचे अधिक ज्ञान व्हायला लागले की, शिक्षण मिळाले असे सामान्यतः समजले जाते. पूर्वापार चालत आलेल्या शिक्षणाची कल्पना मुख्यतः असलीच आहे. लिहितावाचता येणे आणि हिशेबठिशेब ठेवता येणे हे ह्या शिक्षणातील महत्त्वाचे अंग असते.

औद्योगिक क्रांतीच्या पूर्वकाळापर्यंत ही शैक्षणिक समजूत काहीशी बरोबर होती. पण उद्योगधंदे वाढीला लागले आणि अनेक प्रकारचे कारखाने निघाले, तेव्हा केवळ पुस्तकी ज्ञानाचे युग संपले. कृतीच्या युगाला सुरुवात झाली; आणि बुद्धीच्या बरोबरच हातालाही शिक्षणात प्राधान्य आले. कारखान्यात काम करणारी माणसे, हाताने काम करणारी म्हणजे श्रम करणारी पाहिजेतच, पण ती बुद्धिमान आणि सुशिक्षितही हवीत.

मानवी शक्ती ही जाणती हवी. जाणीवपूर्वक काम करणारे कामगार हवेत. म्हणून डॉ. झकिर हुसेन व महात्मा गांधी यानी बेसिक एज्युकेशनची, जीवन-शिक्षणाची कल्पना समाजापुढे मांडली व गेली काही वर्षे ती आपल्या देशात चालूही राहिली. पण ती यशस्वी मात्र झाली नाही. हाताने कामे करायला कोणाला नको आहे, फुकट बसून ऐतखाऊपणाने गिळायला हवे आहे, इंग्रजांनी ह्या देशात सुरू केलेल्या कारकुनी पेशाच्या शिक्षणाने आपणाला हे असले वळण लागलेले आहे. गांधीजींच्या मूलभूत शिक्षणाच्या कल्पनेने मूळ धरले नाही. मूलभूत उद्योग म्हणून त्यांनी सूतकताई व शेती यांना प्राधान्य दिले, पण लोकांना ते आवडले नाही. सूतकताई व्यवहार्य ठरली नाही. यांत्रिक युगात सूत कातणे आणि मागावर त्याचे कापड विणणे ही चेष्टेची बाब झाली. ह्या कामाला वेळ फार लागायला लागला आणि उत्पादन त्या मानाने फार थोडे व निकृष्ट प्रतीचे व्हायला लागले. शेतीची जोड सर्व शाळांना देणे शक्य झाले नाही. त्यामुळे आपोआपच ही योजना मागे पडली.

ही गांधींची योजना मागे पडली, तरी त्या योजनेतील तत्त्व दुर्लक्ष करण्यासारखे नाही. कामातून शिक्षण मिळायला हवे यात वाद नाही. फार वर्षांपूर्वी मी आग्र्याजवळ दयाळबाग इथे राधास्वामी पंथाच्या लोकांनी चालविलेली एक शिक्षण संस्था पाहिली होती. हे एक कॉलेज होते. ह्या कॉलेजातील विद्यार्थी शेजारी जोडलेल्या वर्कशॉपमध्ये काम करून पोटापुरते मिळवीत होते आणि बौद्धिक शिक्षणही पुरे करीत होते. चामड्याच्या वस्तू–चपला, बूट, बॅग्ज इ. – व चाकू, कात्र्या, सुऱ्या आणि इतर हत्यारे हे विद्यार्थी करायला शिकत होते. इतकेच नव्हे तर ते त्या कामात तरबेज होत होते. असे अनेक उद्योग शाळेला जोडून विद्यार्थ्यांकडून करून घेतले जात होते. बेसिक एज्युकेशनची योजना प्राथमिक शाळेतच न राबविता ती वरच्या शिक्षणाच्या संस्थांतून राबविली गेली असती आणि शिक्षणाला सरळ औद्योगिक शिक्षणाचे स्वरूप दिले गेले असते, तर बरे झाले असते, असे मला वाटते.

मानवी गरजांना उपयोगी पडेल असे, शिक्षणाला रूप देता आले, तर ते खरे उपयुक्त शिक्षण होईल आणि ग्रामीण जनतेसाठी त्याचीच जरुरी आहे. कोल्हापूर-सारख्या शहरात लहानलहान शेकडो धंदे सुरू झालेले आहेत. ह्या धंद्यांत काम करीत असलेली माणसे सारीच काही उच्च शिक्षण किंवा शास्त्रीय ज्ञान मिळालेली आहेत असे नाही. त्यांतील पुष्कळजण अनुभवातून शहाणपण मिळविलेली आहेत. मोटारीच्या धंद्यात ड्रायव्हर किंवा मेकॅनिक म्हणून काम करणारांपैकी पुष्कळजण सुरुवातीला क्लीनर किंवा साधा झाडलोट करणारा गडी म्हणून कामाला लागलेले आढळून येतील. आपल्या महाराष्ट्रात आता साखर कारखाने पुष्कळ निघाले आहेत आणि विजेचे उद्योगधंदेही अनेक सुरू झालेले आहेत. यातील पुष्कळ कारागीर असेच अनुभव घेऊन तज्ज्ञ बनलेले आहेत. पुण्यात, मुंबईत किंवा इतर लहानमोठ्या शहरांत रेडिओ विक्रीची व दुरुस्तीची अनेक दुकाने निघाली आहेत. यांतील कारागीर काही पदवीधर नाहीत!

तेव्हा काळाच्या प्रवाहाबरोबर चालण्याची ताकद उत्पन्न करणारे शिक्षण ग्रामीण जनतेला मिळायला हवे. नवे नवे धंदे निघत आहेत, त्यांच्याकडे त्यांची दृष्टी जायला हवी आणि ह्या धंद्याला उपयोगी पडण्याची तयारी त्यांनी करायला हवी. ही त्यांची तयारी करणारे शिक्षण त्यांना द्यायला हवे.

केवळ सरकारी शाळांतून असले विविध विषयांचे शिक्षण मिळणार नाही. खासगी शिक्षण संस्थांनी आणि कारखान्यांनी असल्या शिक्षणाची सोय करायला हवी. कामापुरते लिहिता वाचता येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आता बदलत्या काळाला अनुरूप असे शिक्षण घेण्याची तयारी दर्शविली पाहिजे.

आता आपल्या देशात लोकशाही पद्धतीचा राज्यकारभार सुरू झालेला आहे. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आता ग्रामपंचायतीत, जिल्हा परिषदेत किंवा विधान सभेत काम करू लागले आहेत. ह्यातील बहुतेक प्रतिनिधी ग्रामीण भागातून आलेले आणि ग्रामीण जनतेने निवडलेले असतात. आपल्या भागाची आणि आपल्या देशाची प्रगती करणे न करणे आता ह्या लोकांच्या हाती आलेले आहे. तेव्हा हे लोक सुजाण असणे आवश्यक आहे. ग्रामीण शिक्षणात ह्या प्रकारच्या दृष्टीला यापुढे पहिले स्थान द्यावयास हवे. कारखान्यातील कामगार जसा सुशिक्षित पाहिजे, तसा राज्यकारभार करणारा प्रतिनिधीही सुशिक्षित पाहिजे. इतकेच नव्हे तर त्यांना निवडून देणारे मतदारही सुशिक्षित पाहिजेत.

येथे सुशिक्षित शब्द व्यापक अर्थाने वापरलेला आहे. पुस्तकी ज्ञान अधिक मिळविलेला माणूसच सुशिक्षित असे नव्हे. शिक्षण थोडे कमी असले, तर विचाराने व अनुभवाने मिळविलेले ज्ञान ज्याच्याजवळ अधिक तो खरा सुशिक्षित.

पूर्वीच्या काळी गावातील सर्व लोक—शेतकरी व कामकरी म्हणजे बैतीबलुती—आपआपल्या धंद्यात त्या त्या काळच्या ज्ञानाप्रमाणे वाकबगार असत. म्हणून लहान-मोठी सर्व गावे बहुधा स्वावलंबी जीवन जगत.

त्या काळच्या लोकांच्या गरजा कमी होत्या. आता आपल्या गरजा फार वाढल्या आहेत. आता आपले ज्ञानही वाढलेले आहे आणि आता आपले उद्योगधंदेही खूपच झालेले आहेत. तेव्हा ह्या आपल्या गरजांना पुरे पडणारे आणि आपल्या उद्योगधंद्यात यशस्वी होता येईल अशा प्रकारचे शिक्षण आम्हांला हवे आहे. ग्रामीण जनतेलाही हे असले शिक्षण पाहिजे. शिक्षणाचा व्यापक अर्थ तो हा.

उच्च शिक्षण : काही समस्या

ग. प्र. प्रधान

महाराष्ट्राची जी वैशिष्टये आहेत त्यांमध्ये शिक्षणाची भूक हे एक प्रमुख वैशिष्टय आहे. महाराष्ट्रात राजकीय चळवळ ज्या नेत्यांनी सुरू केली त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि शाळा, प्रशाळा आणि महाविद्यालये स्थापनेस आपल्या कार्यक्रमात अग्रस्थान दिले. येथील समाज-सुधारकांनी शिक्षण हेच सुधारणेचे प्रमुख साधन मानले. महात्मा फुले, लो. टिळक, प्रि. आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील या थोर नेत्यांनी मराठी मनावर जो संस्कार केला त्यामधूनच विद्या संपादन केल्याशिवाय विकास होऊ शकणार नाही हे सत्य महाराष्ट्रातील जनतेला पुरते समजले, आणि स्वाभाविकपणेच आपल्या समाजातील हुशार व महत्त्वाकांक्षी तरुणांना शिक्षणाची अधिकाधिक संधी मिळावी यासाठी अनेक व्यक्ती व संस्था यांनी दीर्घकाल सतत परिश्रम केले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात हे प्रयत्न अतिशय मर्यादित होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या जीवनावरची बंधने दूर झाल्यावर शैक्षणिक कार्याला खूपच चालना मिळाली. लोकशाही राजवटीत राज्य चालवावयाचे असेल तर नागरिक जाणते आणि सुबुद्ध असले पाहिजेत हे अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी ओळखले. सरकारी मदतीचा ओघही खूप वाढला आणि शिक्षणप्रसाराच्या चळवळीने आपल्या समाजात मूळ धरले. या सर्व प्रयत्नांचे मूल्यमापन करणे सोपे नाही. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीचे ओझरते दर्शन पान क्रमांक ५१६ व ५१७ या तक्त्यांच्या वरून येऊ शकेल.

या तक्त्यातील माहितीवरून प्रगतीच्या दिशेने कशी पावले पडत आहेत याची स्थूल कल्पना येऊ शकेल. परंतु आकडे म्हणजे प्रगती नव्हे. उच्च शिक्षणाचा प्रसार होत असताना ज्या काही नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

आज महाराष्ट्रातील बहुतेक सर्व तालुक्यांच्या गावी महाविद्यालये आहेत आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक पुनर्रचनेसंबंधी जे धोरणविषयक निवेदन शासनातर्फे फेब्रुवारी महिन्यात प्रसिद्ध करण्यात आले आहे त्यामध्ये पुढील घोषणा केली आहे. "महाविद्यालयीन शिक्षणाची समान संधी विशेषतः ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने साधारणपणे १० ते १५ मैल अंतरापर्यंत एक तरी महाविद्यालय अस्तित्वात यावे असे उद्दिष्ट राहील."

उच्च शिक्षणाची ही जी संधी उपलब्ध होणार आहे तिचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. ही संधी वाढत जावी अशीच सर्वांची इच्छा असली पाहिजे आणि जनतेच्या व सरकारच्या एकत्र प्रयत्नातून हे कार्य खासच होऊ शकेल. परंतु हे करताना ज्या समस्या निर्माण होत असतात त्यांचे भान राहिले पाहिजे. उच्च शिक्षणाचा हा जो प्रसार होत आहे त्याचे मी मनःपूर्वक स्वागत करतो आणि उच्च शिक्षणाची संधी ज्या कोणास आकांक्षा असेल त्याला नाकारण्यात येऊ नये असेच माझे मत आहे. परंतु उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात जे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत ते मात्र तज्ज्ञांना, अध्यापकांना व शासनकर्त्यांना अस्वस्थ करतील असे आहेत. यातील मुख्य प्रश्न असा आहे की, ज्यांना शिक्षण दिले जात आहे त्यांच्या मनात त्याबद्दल समाधान नाही. त्यांच्यापैकी अनेकांना आपल्या आयुष्यातील काही वर्षे फुकट चालली आहेत असे वाटते. याचे एक कारण हे की, विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर, पदवी मिळाल्यानंतर नोकरीधंदा करून स्वाभिमानाचे जिणे जगावयाचे आहे आणि ही शक्यता आपल्या समाजात दुर्दैवाने दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. तीन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्या तरी बेकारीचा प्रश्न अधिकाधिक तीव्रच होत चालला आहे. पूर्वी एक अशी हाकाटी केली जात असे की, आर्टस्कडील पदवीधरांची संख्या वाढून उपयोगी नाही. कारण समाजात एका मर्यादेपलीकडे त्यांची आवश्यकता असणार नाही. त्या वेळी सर्व जण 'तांत्रिक' शिक्षणाच्या सोयी खूप वाढल्या पाहिजेत असे म्हणत. परंतु मध्यंतरी इंजिनिअरिंगच्या व्यवसायात मंदीची लाट उसळली आणि आज हजारो इंजिनिअर बेकार असल्यामुळे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये जाणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांच्या मनातही भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कृषिप्रधान देशात रोजगार किती वाढू शकेल याला मर्यादा आहे. त्यामुळे कोणत्या क्षेत्रात किती लोकांची पुढील दहा वर्षांत आवश्यकता असेल हे लक्षात घेऊन (मॅन पॉवर नीड्स) उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विविध शाखांत प्रवेश द्यावा अशी सूचना शिक्षण आयोगात करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने शिक्षणविषयक जी श्वेतपत्रिका काढली होती तिच्यामध्येही या सूचनेचा पुनरुच्चार करण्यात आला होता. या सूचनेवर महाराष्ट्रात मोठे वादळ उठले. बहुजनसमाजाला उच्च शिक्षणाची संधी नाकारण्याचा हा धूर्त डाव आहे असा आक्षेप घेण्यात आला आणि ज्याला जे शिक्षण हवे असेल ते देण्याचे सरकारचे कर्तव्य आहे असे आग्रहाने प्रतिपादन करण्यात आले. सरकारनेही या टीकेची तीव्रता लक्षात घेऊन हे सूत्र जवळजवळ सोडा-

उच्च शिक्षणाची आकडेवारी

वर्ष	मुद्दा	विद्यापीठ	संशोधन-संस्था	साहित्य, शास्त्र महाविद्यालये	कृषी महाविद्या.	वाणिज्य महाविद्यालये
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
	संस्था	४	१०	४१	२	५
१९५०-५१ ...	विद्यार्थिसंख्या	१,६१२	६७	३०,०००	५५५	३,६१९
	खर्च	४,९९०	१,०७५	१०,८५०	४३५	७३३
	संस्था	४	१३	४९	३	७
१९५५-५६ ...	विद्यार्थिसंख्या	१,७०८	१८७	४९,७८८	८४५	५,७१९
	खर्च	६,३७१	१,९७२	१४,८८६	८४९	१,१९७
	संस्था	५	१५	८२	५	१४
१९६०-६१ ...	विद्यार्थिसंख्या	३,०५८	२९८	७५,३८८	१,६६६	१०,८४२
	खर्च	१३,४०३	२,१७६	२५,०२८	२,३०७	२,४६७
	संस्था	६	१४	१७२	७	१९
१९६५-६६ ...	विद्यार्थिसंख्या ...	४,९०९	३४४	१,३४,८०१	३,७०२	१५,८१९
	खर्च	२१,६१४	२,२०३	४४,०२७	३,९८३	३,८२२
	सरासरी वार्षिक शे० वाढ					
	संस्था ...	२.७	२.३	१०.०	८.७	९.३
	विद्यार्थिसंख्या ...	७.७	११.५	१०.५	१३.५	१०.३
	खर्च...	१०.३	४.९	९.८	१५.९	११.६

(१९५०-५१ ते १९६५-६६) (खर्च हजार रुपयांमध्ये)

अभियांत्रिकी तांत्रिक वास्तुशास्त्र	ललितकला	विधी (कायदा)	वैद्यक	पशुवैद्यक-शास्त्र	शिक्षक प्रशिक्षण* शा. शि. सहित	इतर	एकूण
(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)
६	१	४	१२	१	७	३	९६
१,३६३	७६७	१,९१३	१,६५२	१५४	४८५	१,१९७	४३,३८४
१,२८१	३३९	३८२	८४३	९९	४१०	२,२४७	२३,६८४
६	१	६	१२	१	११	२	११४
४,५२४	१,३३३	३,४८३	४,०५४	२५२	१,११८	६४	७३,०७५
२,८०३	४३०	५०९	४,५४१	१८१	६७०	१०५	३४,५१४
९	३	८	१५	२	२०	९	१८७
५,०४८	१,५६७	४,३४२	४,८५०	३३२	१,७३९	१,५२९	१,१०,६५९
८,२९६	५३१	७९९	७,४९६	७०२	१,३४६	७७४	६५,३२५
१३	५	९	२२	३	३२	१७	३१९
९,११६	१,५२३	५,२६३	८,०५१	३९२	२,८९२	१,८७५	१,८८,६८७
१२,९८४	१,२६३	९०५	१३,५१०	९९२	२,११३	१,३०३	१,०८,७१९
५.३	११.३	५.५	४.१	७.६	१०.६	१२.३	८.३
१३.५	४.७	७.०	११.१	६.४	१२,६	३.१	१०.३
१६.७	९.२	५.९	२०.०	१६.६	११.५	...	१०.७

* यावरून दिसून येईल की, १९५०-५१ मध्ये ज्या शिक्षणाच्या एकूण ९६ संस्था होत्या त्या १९६५-६६ मध्ये ३१९ झाल्या किंवा त्यांची सरासरी वार्षिक वाढ शेकडा ८·३ प्रमाणे झाली. याच कालात उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची पटसंख्या ४३,३८४ वरून १,८८,६८७ इतकी अगर दरवर्षी शेकडा १०·३ या प्रमाणात वाढलेली आहे, आणि उच्च शिक्षणाचा एकूण खर्च रुपये २·३७ कोटीवरून रुपये १०·८७ कोटीपर्यंत अगर दरवर्षी शेकडा १०·७ या प्रमाणात वाढलेला आहे.

संशोधन संस्था, कृषी महाविद्यालये, स्थापत्य महाविद्यालये, शिक्षक-प्रशिक्षण संस्था आणि वैद्यकीय महाविद्यालये यांमधून सरासरी प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात पटसंख्या वाढलेली दिसते. ही वाढीची दिशा अखिल भारतीय धोरणाप्रमाणे असून ती अधिक चांगली आहे.

वयाचे असा निर्णय घेतलेला दिसतो. हा निर्णय चूक की बरोबर याची चर्चा करण्याचे हे स्थल नव्हे. मात्र विद्यार्थ्यांच्या डोक्यावर बेकारीची तलवार लटकत असल्यामुळे उच्च शिक्षण घेताना मनाला आवश्यक ते स्वास्थ्य त्यांना लाभत नाही ही समस्या समाजाने लक्षात घेतली पाहिजे असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते.

उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना पुरेसे समाधान वाटत नाही याचे दुसरे एक प्रमुख कारण हे की बहुतेक शाखांत दिले जाणारे शिक्षण जीवनातील प्रश्नांपासून फार दूर असते असा आक्षेप घेतला जातो. हा आक्षेप नवा नाही. तो प्राचीन काळापासून चालत आहे. हॅम्लेट या शेक्सपिअरच्या नाटकात हॅम्लेट म्हणतो, "There are more things in Heaven and Earth than are dremt of in Philosophy." ही तत्त्वज्ञानाची मर्यादा अर्थशास्त्र, राज्यशास्त्र यांच्या बाबतही खरी आहे. राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना लोकशाहीसंबंधी जो तात्त्विक विचार केला जातो त्या विचाराच्या आधारे तो विद्यार्थी प्रचलित भारतीय राजकारणाकडे पाहू लागला तर तो भांबावून जाणारच. पदवीपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी वाचलेले 'मतस्वातंत्र्य' या विषयावरील विवेचन आणि आयाराम गयाराम यांचे मतांतर याचा मेळ असणेच शक्य नाही. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला समाजातील नफ्याची प्रेरणा कमी करून उत्पादनाच्या साधनाचे राष्ट्रीयीकरण करावे हा सिद्धांत समजतो. परंतु प्रत्यक्षात राष्ट्रीयीकरण झालेल्या मोठ्या कारखान्यात उत्पादन अपेक्षेप्रमाणे वाढलेले नाही हे पाहिले की, त्याचा पुस्तकी ज्ञानावरील विश्वास उडतो. परंतु याबद्दल पुस्तकी ज्ञानास दोष देणे इष्ट ठरणार नाही. समाजाची स्थिती, तेथील राजकीय परंपरा, तेथील लोकांची मनोवृत्ती आदी गोष्टींमुळे तेथील राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रश्नांचे स्वरूप ठरत असते. या सर्व गोष्टींचे विवेचन एका विषयाच्या अभ्यासात येणे शक्य नाही. जीवन हे इतके गुंतागुंतीचे आहे की, तत्त्वज्ञांच्या आणि अन्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या विचारांच्या कक्षा ओलांडून ते सुसाट धावत असते. या जीवनाचे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवातूनच होऊ शकणार. प्रश्न इतकाच आहे की, हे विविध अनुभव निर्भयतेने घेण्याचे सामर्थ्य शिक्षणाने मनाला प्राप्त होते का ? वास्तवाचे स्वरूप बिकटच असणार. ते समजून घेण्यासाठी माणसांचे अंगभूत शहाणपण (कॉमन् सेन्स) पुरे आहे असे बऱ्याच जणांना वाटते ते खरे नाही. या किमान शहाणपणाच्या जोडीस जर ज्ञान असेल तर जीवन अधिक चांगल्या रीतीने समजू शकेल. परंतु यासाठी जे तात्त्विक विवेचन कॉलेजातील वर्गात प्राध्यापक करतात ते विवेचन करताना या तत्त्वांचा निकष म्हणून जीवनात कसा उपयोग करता येईल हे नेमके सांगितले असेल तर विद्यार्थ्याला फायदा होऊ शकेल. विख्यात तत्त्ववेत्ते बर्ट्रॉण्ड रसेल यांनी आपल्या एका शिक्षणविषयक लेखात "बॅचलर ऑफ आर्टस", "बॅचलर ऑफ लॉज" अगर "मास्टर आफ आर्टस", "मास्टर ऑफ सायन्स" या सर्व पदव्या रद्द करून एल. टी. लायसेन्सिएट टु थिंक अशी पदवी परिपक्व विद्यार्थ्यांना चार वर्षांच्या चांगल्या अभ्यासानंतर द्यावी असे सुचविले आहे. स्वतंत्रपणे विचार

करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यात आले, त्याने अंधश्रद्धा टाकली, एखादी व्यक्ती व एखादा ग्रंथ यांच्या साह्याने सबंध विश्वाचे ज्ञान होऊ शकेल अशी भूमिका त्याने घेतली नाही व तो स्वतः चिकित्सक वृत्तीने जगाकडे पाहू लागला की त्याला रसेल म्हणतात त्या-प्रमाणे " विचार करण्याची सनद " देण्यात यावी. कॉलेजमधील चार वर्षांत विद्यार्थ्याला त्याच्या विषयाची संपूर्ण माहिती मिळावी ही अपेक्षाही आधुनिक काळात करणे योग्य नाही. विद्यार्थ्याला विषयाची मूलतत्त्वे नीट समजली, महत्त्वाची माहिती दिली आणि अन्य ज्ञान कोठे व कसे गोळा करावयाचे हे दाखवून देऊन ते मिळविण्याची इच्छा त्याच्या मनात निर्माण केली गेली की, उच्च शिक्षणाचे काम बव्हंशाने यशस्वी झाले असे मानावे लागेल.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील दुसरी समस्या ही की, ते शिक्षण घेताना जो आनंद मिळावा असे अपेक्षित असते तो आनंद न लाभल्यामुळे, विद्यार्थ्यांचे शिकण्यात लक्ष लागत नाही. या समस्येचा विचार करताना हा आनंद का लाभत नाही याची कारणे शोधली पाहिजेत. यांपैकी एक कारण हे की, शिकविण्याची पद्धती सदोष असते. हे विधान करताना मला व्याख्यानपद्धती अभिप्रेत आहे. शिक्षणशास्त्राप्रमाणे विद्यार्थ्यांचे कुतूहल जागृत करण्यासाठी त्याला प्रक्षोभक (प्रोव्होकेटिव्) प्रश्न विचारावे लागतात. हे करणे ज्या वर्गात विद्यार्थिसंख्या २५–३० पर्यंत मर्यादित आहे तेथेच शक्य असते. जेथे १०० ते १५० विद्यार्थी असतात अशा वर्गात कोणाही शिक्षकास हे करणे शक्य नाही. त्यामुळे प्राध्यापक व्याख्यान देतात, ते बऱ्याच विद्यार्थ्यांना अल्पांशाने समजते व त्यामुळे वर्गात असमाधान निर्माण होते. हे थांबावयाचे असेल तर वर्गातील संख्येवर नियंत्रण घातले पाहिजे. म्हणजेच शिक्षकांची संख्या आजच्यापेक्षा खूप वाढवून विद्यार्थी-शिक्षक प्रमाण (रेशिओ) समाधानकारक केला पाहिजे. आपल्या गरीब देशात नजीकच्या भविष्यकाळात हे शक्य नाही. प्राध्यापकांची संख्या वाढविणे हे कॉलेजांना परवडण्यासारखे नाही.

दुसरा एक भाग असा आहे की, केवळ शिक्षणपद्धतीच सदोष आहे असे नव्हे तर प्राध्यापकही आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडू शकत नाहीत. आज महाराष्ट्रात जी महाविद्यालयांची संख्या आहे ती लक्षात घेतली तर त्यांना उत्तम प्राध्यापक पुरविणे कठिण आहे हे मान्य करावे लागेल. जवळ जवळ ८० टक्के कॉलेजांत बहुसंख्य प्राध्यापक तिशीच्या आतले—म्हणजे एम्. ए. अगर एम्. एससी. होऊन चार-पाच वर्षे झालेले असतात. या प्राध्यापकांना अनुभवानंतरच काय शिकवावे व कसे शिकवावे याचे ज्ञान येणार हे बव्हंशाने खरे असले तरी त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करून हा दोष बराचसा टाळता येईल.

विद्यार्थ्यांना शिकण्यात आनंद वाटत नाही. याचे दुसरेही एक कारण म्हणजे उच्च प्रतीचे ज्ञान संपादन करण्यातील आनंद उपभोगण्याचे सामर्थ्यच त्यांच्या बुद्धीला आलेले नसते. हे सामर्थ्य येण्यासाठी प्रथम कष्ट करावे लागतात. रागदारीचे

संगीत समजण्यासाठी जसे अनेक दिवस मैफली ऐकून कान तयार व्हावा लागतो, तद्वत साहित्य, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित आणि अन्य भौतिक शास्त्रविषय यातील मूलभूत कल्पना (कन्सेप्ट्स्) कळण्यासाठी अभ्यास करून मनाची व बुद्धीची तयारी व्हावी लागते. या बाबतीत जवळचा मार्ग नाही. टीका टिप्पणी (गाइड्स्) वाचून परीक्षा जेमतेम पास होणाऱ्या विद्यार्थ्याला हा आनंद मिळू शकणार नाही. यासाठी विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये आल्यावर अभ्यासाची पद्धत प्रथम शिकवावी लागेल. ही पद्धत त्यांना समजली, वाचनाची त्यांना गोडी लागली आणि एकाग्र चित्ताने बराच वेळ अभ्यास ते करू शकले म्हणजेच उच्च शिक्षणक्षेत्रातील त्यांची विद्यार्थिदशा खऱ्या अर्थाने सुरू झाली असे म्हणता येईल.

उच्च शिक्षणक्षेत्रातील दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न शैक्षणिक वातावरण हा आहे. विद्यार्थी जे शिकतो ते केवळ पाठ्यपुस्तकातून वा लेक्चर्समधून नाही. त्याच्या भोवताली जे वातावरण असेल त्याचा फार मोठा संस्कार त्याच्या मनावर होतो. या संस्कारासाठी शैक्षणिक वातावरणाची आवश्यकता असते आणि हे वातावरण तालुक्याच्या गावी मिळणे सहज शक्य नाही. या संदर्भात ग्रामीण भागातून निवडून आलेल्या माझ्या एका आमदार मित्राने मजजवळ जे परखड स्पष्ट विचार मांडले ते ऐकून मीही अस्वस्थ झाले. हे आमदार मला म्हणाले, "मी सातारा जिल्ह्यातील एका खेड्यातला विद्यार्थी. फायनलच्या परीक्षेच्या वेळी मी मोटारीत बसलो व मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी सातारा शहर पाहिले. पुढे मी पुण्यात आलो. बोर्डिंगमध्ये राहिलो. काही बाबतीत मला ठेचा लागल्या, माझी फजिती झाली. पण मी अनेक मोठी माणसे पाहिली. हुशार विद्यार्थ्यांच्या जवळ वावरलो. विद्वानांची व्याख्याने ऐकली आणि नंतर शैक्षणिक वातावरणात मी रुळलो. यामधून मी स्वतः फार विद्वान वा मोठा झालो नाही तरी विद्वत्ता म्हणजे काय व मोठेपण म्हणजे काय हे मला समजू लागले. मी यालाच शिक्षण म्हणतो आणि असे शिक्षण मी माझ्या तालुक्याच्या गावी काढलेल्या कॉलेजात शिकणाऱ्या मुलांना मिळत नाही याचे मला वाईट वाटते. त्या मुलांच्या समोर लहान माणसेच वावरतात आणि शिक्षणामुळे या विद्यार्थ्यांना 'मूल्ये', 'ध्येयवाद' वगैरे शब्द कळले तरी त्यांचा साक्षात्कार त्यांना होत नाही."

सदर आमदारांचे वरील विचार शंभर टक्के बरोबर नसले तरी त्यांच्यात काही तथ्य आहे हे खास. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करताना शैक्षणिक वातावरण कसे निर्माण करावे यासाठी खास विचार व प्रयत्न करावे लागतील. अनुभवी प्राध्यापकांनी अनेक केंद्रांवर जाणे आणि विद्यार्थ्यांच्या गटांना मोठ्या महाविद्यालयात जाण्याची काही दिवस संधी देणे हे दोन उपाय मोठ्या प्रमाणावर योजावे लागतील.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील या समस्या कठीण असल्या तरी मुख्य मूलभूत प्रश्नांचे उत्तर दिल्याशिवाय त्या समस्यांची उकल करण्यात अर्थ नाही. तो मूलभूत प्रश्न हा की, उच्च शिक्षणाचा प्रसार आपल्या देशात किती प्रमाणात इष्ट आहे. काही

जणांना असे वाटते की, शिक्षण घेतले की आकांक्षा वाढणार; आणि आपल्या गरीब देशात या आकांक्षा पूर्ण होण्याची फारशी शक्यता नसल्यामुळे केवळ असमाधानी व असंतुष्ट तरुणांचा वर्ग वाढून देशातील स्थैर्य व शांतता धोक्यात येणार. ही मंडळी या आपत्तीस भितात व असे सुचवितात की, उच्च शिक्षणाची संधीच मर्यादित ठेवावी. मला हा विचार मुळीच मान्य नाही. तो केवळ पळपुटेपणाचा आहे. लोक शिक्षित वा अल्पशिक्षित राहिले आणि ह्यांच्या मूलभूत गरजा भागल्या नाहीत तर ते असंतुष्ट राहणारच; आणि मला असे वाटते की, अशिक्षित असंतुष्ट लोकांपेक्षा सुशिक्षित असंतुष्टांचा वर्ग निर्माण होणेच प्रगतीला उपकारक ठरेल. या डोळस असंतोषाचा भडका उडू नये यासाठी समाजजीवनात मंथन सुरू होऊन विषमता नष्ट करण्याच्या दिशेने पावले टाकावी लागतील. अन्यथा या असंतोषाच्या स्फोटातून अनेक गोष्टी उद्ध्वस्त होतील. समाजधुरीणांना हे आव्हानच आहे. उच्च शिक्षण हा रक्तपाती क्रांतीचा मालमसाला आहे असे मानणारा वर्ग प्रतिगामी व दिवाभीत वृत्तीचा ठरेल. उच्च शिक्षणातून निर्माण होणारे प्रश्न सोडविण्याची ताकद आपल्या समाजात आहे की नाही हे अद्याप ठरावयाचे आहे. प्रगत दृष्टिकोण ठेवून नेत्यांनी योग्य कृती केल्यास हे आव्हान स्वीकारता येईल असे मला वाटते.

सैनिकी शिक्षण व महाराष्ट्र

शि. वि. दामले

१८८५ ते १९१० व १९१० ते १९४५ पर्यंत कॉंग्रेसने सैनिकी शिक्षणाकडे अजिबात दुर्लक्ष केलेले दिसेल. १९१० ते १९२० च्या दरम्यान पहिले महायुद्ध झाल्या-कारणाने हा विषय चर्चिला गेला. सर शिवस्वामी अय्यर, सर इब्राहीम रहिमतुला, सर रघुनाथ परांजपे वगैरे मंडळींनी प्रचार करून या विषयाकडे जनतेचे लक्ष वेधले. १९१३ सालच्या सुमारास इंग्लंडमध्ये सैनिकी शिक्षण सक्तीचे करावे म्हणून लॉर्ड रॉबर्टस यांनी प्रथम प्रयत्न केला. त्यामुळे आपल्या देशातील पुढाऱ्यांचे लक्ष या विषयाकडे गेले. सर रघुनाथ परांजपे यांचा लेख स्टेट्समनमधे त्यानंतर प्रसिद्ध झाला. सैनिकी शिक्षणाचा प्रश्न मवाळ लोकांनीच चिकाटीने हाती घेऊन त्याबद्दल चळवळ केली. १९४५ च्या मार्चमधे लाहोर येथे त्यांच्या रौप्य ज्युबिलीचे वेळी या प्रश्नाला त्यांनी प्राधान्य दिलेच, पण शिवाय सैन्याचे हिंदीकरण एका विशिष्ट कालातच व्हावयास पाहिजे, अशी मागणी केली. दुसऱ्या महायुद्धामुळे या विषयाकडे बघण्याची सर्व लोकांची दृष्टी बदलली. इंग्लंडमधील मुत्सद्दी हिंदुस्थानच्या वसाहतीच्या स्वराज्याचा हक्कही कबूल करत नव्हते [Act 1935]. परंतु तेच आता संपूर्ण स्वराज्याचा हक्कही कबूल करतात. हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशावर पुष्कळ गोष्टी अवलंबून आहेत. युरोपमधील सर्व घडामोडी इंग्लंडवर अवलंबून; त्याचप्रमाणे आशियामधीलच नव्हे तर जगातील घडामोडी हिंदुस्थानावर अवलंबून आहेत.

दुसऱ्या महायुद्धात स्टालिनग्राड व एल. आलमीन या लढाया सर्वांत महत्त्वाच्या झाल्या. या दोन लढायांमुळे युद्धाचे पारडे फिरले. पहिल्याचे सर्व श्रेय रशियाला तर दुसऱ्याचे सर्व हिंदुस्थानाला, व विशेषतः ८ व्या आर्मीला. युरोपमधील सर्वांत लांब संरक्षणाची फळी रशियाने संभाळली तर ब्रह्मदेशातील हिंदी लोकांनी. पूर्वीच्या काळी संरक्षण फक्त भूदलाकडे असे; परंतु आता प्रत्येक राष्ट्रास भूदल, नाविकदल व हवाईदल

अशी तिन्ही दले असलीच पाहिजेत.

१९१७ पूर्वी हिंदी लोकांना कमिशन्स दिली जात नव्हती. त्या वेळच्या आपल्या पुढाऱ्यांनी पार्लमेंटमधे सरकारचे वाभाडे काढल्यामुळे १९१८ साली हिंदी लोकांना सँढर्स्ट येथे दहा जागा देण्यात आल्या. १९२७ साली या जागा वीस करण्यात आल्या. १९२१ साली यू. टी. सी. स्थापण्याचा कायदा करण्यात आला.

१९३४ साली डेहराडून येथे लष्करी महाविद्यालय स्थापण्यात आले. सर रघुनाथराव परांजपे यांनी सक्तीचे लष्करी शिक्षण देण्यात यावे म्हणून बिल आणले होते, पण ते नापास झाले. मात्र १९३८ साली सर्व महाविद्यालयांतून सक्तीचे सैनिकी शिक्षण देण्यात यावे, हा डॉ. ग. स. महाजनि यांचा ठराव मुंबई विधिमंडळात पसार झाला.

पहिल्या महायुद्धाचे वेळी लोकमान्य टिळक व डॉ. र. पु. परांजपे यांनी सैन्यात शिरण्याबद्दल तरुणांना आवाहन केले व त्याप्रमाणे प्रि. डॉ. डी. डी. कर्वे, प्रा. बोंडाळे, शंकरराव किर्लोस्कर वगैरे पुष्कळ मंडळींनी इंडियन टेरिटोरिअल फोर्समध्ये नावे घातली व सैनिकी शिक्षण घेतले. तेव्हापासून महाराष्ट्रात सैनिकी शिक्षणास सुरुवात झाली. कॉलेजातून यु. टी. सी. सुरू झाली व त्यामध्ये पुष्कळ हौशी तरुणांनी भाग घेऊन ते शिक्षण घेतले. यातील हौशी तरुणांनी राखीव फौजेत भरती होऊन कमिशन्स मिळविली. यु. टी. सी. मधून एन. सी. सी. निघाली. शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही सैनिकी शिक्षण सुरू करण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, या शिक्षणाचा दर्जा खाली आला. विद्यार्थ्यांना जे गणवेष दिले गेले ते चांगले नव्हते. गणवेष असा पाहिजे की, पाहणाऱ्यामध्ये आवड उत्पन्न होईल व घालणाऱ्यास अभिमान वाटेल. यु. टी. सी. मधून शिक्षण घेतलेले पुष्कळ तरुण सैन्यात अधिकारी झाले. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी डेहराडून येथील सैनिकी महाविद्यालयातून ४००।५०० हिंदी लोक सैन्यातील अधिकारी म्हणून बाहेर पडले होते. युद्धापूर्वी सैन्य २॥ लाख होते ते २५ लाख झाले. ४००।५०० आपले अधिकारी होते ते १४ हजार झाले. त्यातून पाच हजार वैद्यकीय अधिकारी सोडले तरी नऊ हजार लष्करी अधिकारी होते. बंगलोर, महू, बेळगाव वगैरे ठिकाणी अधिकारी तयार करण्याची सैनिकी महाविद्यालये काढण्यात आली व त्याचा फायदा हजारो तरुणांनी घेतला. कै. ल. ब. भोपटकर वकील यांच्या नेतृत्वाखाली प्रा. र. बा. फडके, शि. वि. दामले यांनी सैनिकीकरण मंडळ म्हणून सुरू केले व त्याच्यामार्फत भरपूर प्रचार करून सैन्यात बहुसंख्येने महाराष्ट्रातील तरुणांनी घुसावे व हे शिक्षण आत्मसात करावे असे आवाहान केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे खास व्याख्यान करण्यात आले. तसेच मर्दुमकी गाजविलेल्या, अचाट धाडस दाखवून बहुमोल कामगिरी केलेल्या मर्दांचे अभिनंदन करण्याचे समारंभ घडवून आणले. कै. डॉ. र. पु. परांजपे, डॉ. ग. स. महाजनि यांची खास व्याख्याने केली. निवड समितीपुढे जाणाऱ्या उमेदवारांनी काय काय केले पाहिजे, निवड होण्यासाठी कशी तयारी करावी याबद्दल महाराष्ट्र

सैनिकीकरण मंडळाने तरुणांचेसाठी वर्ग चालविले व तरुणांना भरपूर कमिशन्स मिळवून दिली. लेखनद्वारा व व्याख्यानद्वारा भरपूर प्रचार केला, इतकेच नव्हे तर मुंबई, नाशिक रोड, महू, बेळगाव, बंगलोर, कराची वगैरे ठिकाणी जे सैनिकी शिक्षण देण्यात येत असे ते प्रत्यक्ष जाऊन श्री. शि. वि. दामले, प्रा. फडके, मामाराव दाते वगैरे कार्यकर्ते पाहून आले. स्कीन कमिटी, सैन्याचे हिंदीकरण करण्यासाठी नेमलेली कमिटी, डॉ. कुंझरू कमिटी वगैरे सर्व कमिट्यांबरोबर कार्यकर्त्यांनी विचारविनिमय केला, चर्चा केली, अडीअडचणी दाखविल्या व सांगितल्या.

दुसऱ्या महायुद्धाचे वेळी कॉंग्रेसने सरकारशी असहकार पुकारला होता. तरी २॥ लाखांचे पंचवीस लाख सैन्य झाले. दोन हजारांचे आरमार वीस हजारांचे झाले. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी काळा-गोरा, लढाऊ-बिनलढाऊ हे सर्व ब्रिटिशांनी लबाडीने केलेले भेद काढण्यात आले. कोणत्याही जातीच्या, धर्माच्या तरुणास सैन्याचे दरवाजे मोकळे होते. त्याचा भरपूर फायदा महाराष्ट्रातील तरुणांनी घेतला. बादशाही कमिशन्स व व्हाईसरॉय कमिशन्स शेकडो तरुणांनी मिळविली. इतकेच नव्हे तर हजारो तरुण भूदल, आरमार व हवाईदल यांमधे भरती होऊन त्यांनी सैनिकी शिक्षण चांगले तर घेतलेच, शिवाय लढाई-मध्ये उत्तम कामगिरीही करून दाखवली. मराठे, महार या पलटणींनी उत्तम लढवय्ये म्हणून नावलौकिक मिळविला आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करताना ले. ज. थोरात, ले. ज. बेवूर, मेजर जनरल साठे, मेजर जनरल परांजपे, मेजर जनरल नरवणे वगैरे पुष्कळ तरुणांची निवड होऊन त्यांनी सैनिकी शिक्षण घेण्याचा पाया मजबूत केला. त्यांची उदाहरणे अनेक तरुणांनी गिरविली आहेत. ब्रिगेडियर हेंगरफोर्ड यांची नेमणूक वाडिया कॉलेजात Diploma in Military Studies या विभागासाठी करण्यात आली होती. एन्. सी. सी. मधे गेलेल्या पैकी काही तरुणांची निवड करण्यात येऊन त्यांना पुढे अधिकारी करावयाचे खास शिक्षण देण्यासाठी ही सोय करण्यात आली आहे. प्रादेशिक सेनाही सुरू करण्यात आली असून त्याचाही फायदा अनेक तरुण घेत आहेत. सैनिकी शिक्षण घेण्याची मनापासून इच्छा असल्यास आता भरपूर सोई उपलब्ध आहेत. शाळेतील, कॉलेजातील व इतर व्यवसायातील स्त्री-पुरुषांना आज सैनिकी शिक्षण देण्यात येत आहे.

पूर्वी सैन्यात अधिकारी व्हायचे म्हणजे भारतातर्फे निवड होऊन सँढर्स्टला पाठविण्यात येई. त्यासाठी उमेदवारास वीस हजार रुपये खर्च येई. आज एक पैही खर्च न होता तुम्ही सरसेनापतीही होऊ शकाल. सिंहगडाच्या पायथ्याशी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिका सुरू झाली असून त्यामधे इतक्या दिवस मॅट्रिक झालेल्यास व या वर्षापासून प्रीडिग्री झालेल्यास प्रवेश मिळतो. त्यासाठी युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनमार्फत मे व डिसेंबर या महिन्यांत अशी वर्षातून दोन वेळा परीक्षा घेण्यात येते. प्रश्नपत्रिका इंग्रजीत असतात व उत्तरे इंग्रजीतच द्यावी लागतात. महाराष्ट्रातून लेखणीच्या फटकाऱ्याने कै. बाळासाहेब खेर यांनी इंग्रजी काढून टाकले. इतकी मोठी घोडचूक महाराष्ट्राच्या इतिहासात दुसरी झालेली नाही. परीक्षा इंग्रजीत व शिक्षण मराठीत त्यामुळे ॲकॅडमी

महाराष्ट्रात येऊन ॲकॅडमीत महाराष्ट्र दिसत नाही. या ॲकॅडमीचे वैशिष्ट्य असे की, येथे तिन्ही दलांचे एकत्र शिक्षण दिले जाते. या ॲकॅडमीत शिक्षण घेणाऱ्यास खर्च नाही. सर्व खर्च आपला देश सोसतो. शिक्षणक्रम संपल्यावर तो अधिकारी होतो व तो पदवीधरही होतो. शिक्षण तज्ज्ञांचेकरवी, जेवणखाण, कपडालत्ता, राहावयास जागा, उत्कृष्ट अन्न, प्रसन्न ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली जागा, त्यामुळे हेवा वाटेल अशी ही संस्था महाराष्ट्रात आहे. या संस्थेत प्रवेश मिळविण्यासाठी तरतरीत बुद्धी व आरोग्यसंपन्न तरुण लागतात (Mentally alert and physically fit). बहुश्रुतपणा, धडाडी, नेतृत्व, धाडस वगैरे गुणांची वाढ तेथे करण्यात येते. आपल्या तरुणांना इंग्रजीमध्ये बोलता येत नसल्यामुळे ते नापास होतात. व Coment स्कूल मधील तरुणांची बहुसंख्येने निवड होते. आमचे तरुण कोणताही खेळ खेळत नाहीत, तर राजकारणाची रिकामटेकडी चर्चा करीत असतात. सायंकाळी क्रीडांगणावर घाम गाळण्याचे ऐवजी कोपऱ्याकोपऱ्या-वरील हॉटेलपुढे उभे राहून सिनेमाबद्दल चर्चा करताना दिसतील. पुणे विद्या-पीठाच्या हॉकी व फूटबॉल या सामन्यात एकही मराठा दिसत नाही. हे काय दर्शविते ? आपल्या तरुणांना प्रथम हे सांगितले पाहिजे की, वाचन जेवढे करता येईल तेवढे करा. इंग्रजीत बोलण्याचा सराव ठेवा. ‘आय इज’ म्हणा, ‘हजबंड ऑफ ए काउ’ असे म्हणा पण इंग्रजीत बोला. टाइम्स रोज वाचल्याशिवाय राहू नका. मध्यवर्ती सरकारच्या योजना कोठे व कसल्या चालू आहेत हे नकाशात पाहात जा. आमचे तरुण बुद्धिमत्तेने कमी नाहीत, पण बोलण्यात कमी पडतात. त्यांच्या अंगातील सुप्त गुण पाहण्यासाठी त्यांना निरनिराळ्या कसोट्या देण्यात येतात. त्यामध्ये ते पास होत नाहीत. मराठा ब्राह्मणाचे नावाने, ब्राह्मण गुजराथ्याचे नावाने नापास झाल्यावर फक्त टीका करताना दिसतो. इतकी दैना आज झाली आहे. महाविद्यालये आता तालुक्याचे ठिकाणी निघाली आहेत. महाराष्ट्रात आज सहा विद्यापीठे आहेत. विद्येचे फक्त पीठ करीत आहेत. परंतु चढाओढीच्या परीक्षेत एकही तरुण यशस्वी झाला नाही. मग हे हजारो प्राध्यापक काय करतात ? कुलगुरू कशात मग्न आहेत. विद्वान, त्यागी लोकांची परंपरा कशी नाहीशी झाली याचा विचार कोण करतोय ? जो तो स्वतःचे आसन कसे बळकट होईल एवढेच पाहतो. मग तरुणांचे काही का होईना ! समाजाचे नेते, मंत्री आपल्या मुलांना इंग्लंड वा अमेरिकेस पाठवितात व शनिवारवाड्यापुढे मात्र मोठमोठ्याने इंग्रजी नको म्हणून सांगत असतात. इतका ढोंगीपणा महाराष्ट्रात दिसतो. या सर्व पुढाऱ्यांना अगोदर वस्तुस्थितीची व कर्तव्याची जाणीव देण्यासाठी आता तरुणांनीच पुढे आले पाहिजे तरच महाराष्ट्र पुढे येईल, मानाने जगेल व पूर्वीचा दरारा उत्पन्न करील. आज कोणत्याही क्षेत्रात–विज्ञान असो अगर खेळ असो–आम्ही फारच मागे पडलो आहो. सैनिकी क्षेत्रात जर महाराष्ट्र पुढे आणावयाचा असेल तर इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय सक्तीचे केले पाहिजेत.

आज शाळेत ६ व्या वर्षी प्रवेश दिला जातो तो ५ व्या वर्षी देण्यात यावा.

१०वी इयत्ता ही मॅट्रिक समजण्यात यावी व ११ वी ही हायर सेकंडरी. तरच महाराष्ट्रातील तरुण ॲकडमीत दिसतील. काटकपणा, सहनशक्ती, चौकसबुद्धी, बहुश्रुतपणा अंगी बाणेल असे शिक्षण देण्यात आले पाहिजे. हेच सैनिकी शिक्षण होय.

" महाराष्ट्रातील साक्षरता "

गंगाधर काकासाहेब गावकर

अलीकडील काही वर्षांत निरक्षरता निर्मूलनाच्या कार्याला गतिमान करण्याविषयीचे विचार तीव्रतेने भासू लागले आहेत, आणि ते यथायोग्यच आहे. कारण आजच्या विज्ञान युगात साक्षरता हे ज्ञानप्राप्तीचे मूलभूत साधन जवळ असल्याशिवाय माणसाला आपली प्रगती करून घेता येणार नाही. विशेषतः भारतासारख्या प्रगतिशील राष्ट्राला निरक्षरतेचा प्रश्न त्वरित सोडविणे अगत्याचे झाले आहे. जगातील प्रत्येक देशात कमी अधिक प्रमाणात निरक्षरता आहे. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका या देशांतील निरक्षरता प्रचंड प्रमाणात आहे. यूनेस्को या आंतरराष्ट्रीय संघटनेने उपलब्ध केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, जगातील एकूण प्रौढ निरक्षरांची संख्या आज सुमारे ७५ कोटी आहे, आणि त्यातले अर्धे अधिक लोक वर निर्देश केलेल्या विभागात आहेत, आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या भारतातील एकूण प्रौढ निरक्षरांची संख्या आज अंदाजे १६ कोटी आहे.

भारतातील साक्षरता प्रसाराची कूर्मगति : भारतातील साक्षरतेचे प्रमाण कूर्मगतीने वाढत आहे, असेच म्हणावे लागेल. १९०१ साली भारतातील साक्षरतेचे प्रमाण ६·२ टक्के होते, ते १९११ साली ७ टक्के झाले. १९११ नंतर १९४१ पर्यंत हे प्रमाण १० वर्षांच्या काळात अनुक्रमे ८·३, ९·१ आणि १४·६ या प्रमाणात वाढले. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणे देशातील साक्षरतेचे प्रमाण १६·५ टक्के होते. हे प्रमाण १९६१ साली २४ टक्क्यांवर गेले. साधारणतः ६० वर्षांच्या काळात एकूण निरक्षरतेचे प्रमाण २३ टक्क्यांनीच वाढले. एक समाधानाची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील साक्षरतेची वाढ स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा अधिक आहे.

देशातील साक्षरता प्रसाराचे बाबतीत आणखी एक दुर्दैवी परिस्थिती म्हणजे एकूण साक्षरता प्रत्यक्षात वाढतच नाही. केवळ टक्केवारी साक्षरताच वाढत आहे.

१९५१ च्या शिरगणतीप्रमाणे देशातील एकूण निरक्षरांची संख्या २९.८ कोटी एवढी होती. ही संख्या १९६१ साली ३३.४ कोटी एवढी झाली. हे दुष्टचक्र निर्माण करण्याचे कार्य भरमसाट प्रमाणात वाढणारी लोकसंख्या करते असे दिसून आले.

साक्षरता आणि राष्ट्रविकास : शिक्षित जनताच राष्ट्रविकासाचे कार्यक्रम यशस्वी रीतीने राबवू शकते, आणि हे सत्य भारतात आपण तीन पंचवार्षिक योजना राबविल्यानंतर अधिक तीव्रतेने जाणवू लागले आहे. ज्या गतीने आपण शेती उत्पादन आणि औद्योगिक उत्पादनाची अपेक्षा केली होती ती भ्रामक ठरली. कारण शोधता असे आढळून आले की, देशातील प्रचंड प्रमाणावरील निरक्षर जनता राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमांना यशस्वीपणे राबवू शकली नाही, आणि म्हणूनच आपल्याला धान्योत्पादन, कार्यांत आणि औद्योगिक उत्पादनकार्यांत निराशा पत्करावी लागली. आपण जरा आसपासच्या राष्ट्रांकडे नजर टाकली तर असे दिसून येईल की, चीन, रशिया, इराणसारखी भारताप्रमाणेच काही वर्षांपूर्वी अप्रगत असलेली राष्ट्रे आता घोडदौडीने आपला विकास करून घेत आहेत. या राष्ट्रांतील लोकांनी नैसर्गिक साधने व शक्तीबरोबरच आपल्यातील मानवी शक्तीचा भरपूर उपयोग करून घेऊन, प्रगतीचा वरचा टप्पा गाठला. या देशात निरक्षरतेविरुद्ध राष्ट्रीय स्वरूपाची आंदोलने सुरू करण्यात आली. सुशिक्षित जनताच विकासाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबवू शकते, ही गोष्ट लोकांना पटली आणि म्हणूनच त्यांनी अज्ञानाविरुद्ध जणू युद्धच पुकारले. जे रशिया, चीन आणि इराणसारख्या देशांत घडून येते, ते भारतात का घडू नये ?

वैज्ञानिक युगात वावरणाऱ्या प्रत्येक माणसाला ज्ञानाचा लाभ करून घेण्यासाठी साक्षरता हे मूलभूत साधन जवळ बाळगलेच पाहिजे. आपल्या देशातील किसानाने नवीन साधनांचा उपयोग करून घेण्याचे ज्ञान मिळविलेच पाहिजे. कारखान्यात वावरणाऱ्या कामगाराने नवीन यंत्राचा वापर करण्याचे कसब शिकलेच पाहिजे. असे झाले तरच आपल्या देशातील प्रचंड मानवी शक्तीचा उपयोग राष्ट्रविकासासाठी करून घेता येईल. प्रो. गालब्रेथ यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, "जे राष्ट्र स्वतःच्या विकासाच्या व्यवसायात आपल्यातील मानवी शक्तिरूपी भांडवल अधिक प्रमाणात गुंतविते, त्या राष्ट्राला यांत्रिक शक्तीपेक्षा मानवी शक्तीच्या आधारे, चक्रवाढ व्याजाने फायदा मिळू शकतो."

महाराष्ट्रातील कार्य : भारतात निरक्षरता निर्मूलनाचे कार्य कित्येक वर्षे चालू आहे. साधारणतः १९१२ सालापासून प्रौढ शिक्षण कार्याला पद्धतशीर सुरुवात झाली. त्या वेळेपासून राष्ट्रभर प्रौढ शिक्षण मोहिमेचा कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमाचे स्वरूप प्रायः प्रौढ साक्षरता प्रसारापुरतेच मर्यादित होते, आणि हे कार्यक्रम लोकांच्या सवडीप्रमाणे सुरू व्हायचे आणि कार्यकर्त्यांतील उत्साह मावळला की बंद पडायचे. याशिवाय प्रौढ साक्षरता प्रसाराचा कार्यक्रम मूलतःच कठीण असा आहे, आणि यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्यावर बरेचसे कार्यक्रम अर्ध्यावरच सोडून देण्यात

यायचे. आपल्या महाराष्ट्रातील कार्यक्रम विशेष स्वरूपात सुरू झाला तो १९३७ साली. १९३८ साली त्या वेळच्या मुंबई प्रांतिक सरकारने एक प्रौढ शिक्षण समिती स्थापन केली. महाराष्ट्राची एक व मुंबई शहराची खास एक समिती स्थापन करण्यात आली. या वेळेपासून महाराष्ट्रातील प्रौढ शिक्षण कार्याला रीतसर चालना मिळाली. तरी पण या कार्याची व्हावी तशी प्रगती झाली नाही. १९६१ च्या शिरगणतीत असे दिसून आले की, महाराष्ट्राची निरक्षरता ७१·१ टक्के आहे, आणि म्हणूनच महाराष्ट्रात "**ग्राम शिक्षण मोहिमेच्या**" स्वरूपात एक जनता आंदोलन सुरू करण्यात आले. मुंबई शहरात देखील एक **निरक्षरता निर्मूलन आंदोलन** सुरू करण्यात आले. ग्राम शिक्षण मोहिमेची सुरुवात स्वातंत्र्य संग्रामात विख्यात झालेल्या सातारा जिल्ह्यात करण्यात आली. "एकाने एकास शिकवावे" हा मंत्र शिक्षित जनतेला देण्यात आला. संबंध गावाने संपूर्ण साक्षर व्हायचा विडाच उचलला. या जनता आंदोलनाचा प्रभावी असा परिणाम झाला. खेड्यातील जनतेनेच साक्षरता प्रसार कार्य आपल्या हाती घेतले. एकदा जनतेचा उठाव झाला की कोणतेही कटीण कार्य सुलभ होते हे ग्राम शिक्षण मोहिमेने दाखवून दिले. गावातील शिक्षित लोक व विद्यार्थी तथा शिक्षक निरक्षर प्रौढांना शिकवू लागले. गावातील देवळे, ग्रामपंचायतीच्या कचेऱ्या, शाळा आणि धर्मशाळा प्रौढ साक्षरता वर्गांनी फुलून गेल्या. साक्षरता वर्गाच्या दिव्यांनी खेड्यातील निरक्षरतेचा अंधार नाहीसा केला. नवसंपादित साक्षरता ज्ञानाच्या प्रकाशात लोकांना आपले स्वतःचे व गावचे हित स्पष्ट दिसू लागले. ग्रामविकासाचे व लोकजीवनसमृद्धीचे मार्ग सुस्पष्ट झाले आणि याचा परिणाम म्हणून राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमांना महाराष्ट्रात अधिक चालना मिळू लागली.

ग्राम शिक्षण मोहीम सुरू झाल्यानंतरच्या सुमारे १० वर्षांच्या काळातील महाराष्ट्राची प्रगती वाखाणण्यासारखी आहे, हे पुढील आकड्यांवरून दिसून येईल:—

१९६१ ते १९७० अखेर महाराष्ट्रात साक्षर

झालेले प्रौढ —

पुरुष—३५, ७५, ३७९
स्त्रिया- ·४२, ०५, ४४२
एकूण—७७, ८०, ८२१

संपूर्ण साक्षर झालेल्या वाड्या, गावे व शहरे—१६, ६९३.

यात एकट्या मुंबई शहरात एकूण सुमारे साडेपाच लाख स्त्रीपुरुष साक्षर झाले आहेत. हे आकडे पाहिल्यानंतर आपल्याला खचित समाधान वाटेल. त्याचप्रमाणे साक्षरता प्रसाराने साधलेले इतर कार्यदेखील निश्चित समाधानाचे आहे. साक्षर झालेले आई-वडील आपल्या मुलांना अगत्यपूर्वक शाळेत पाठवितात. ते गावच्या कारभारात आस्थेने भाग घेतात. ग्रामीण विभागात सरकारी कार्यक्रमांना भरपूर चालना मिळत

आहे. नवीन यांत्रिक साधनांचा व रासायनिक खतांचा भरपूर उपयोग शेतकरी लोक करू लागले आहेत. ग्राम–शिक्षण मोहिमेने लोकजीवनदेखील पार बदलून टाकले आहे. ग्रामपंचायतीत महिलादेखील भाग घेऊ लागल्या आहेत. स्थानिक जनतेतून नेतृत्व उदयास येत आहे. हे एवढे क्रांतिकारक बदल घडून आले असले तरी, लोकजीवन व्हावे तेवढे समृद्ध आणि सुदृढ झाले असे म्हणणे धाडसाचे होईल. कारण महाराष्ट्रातील दारिद्र्य, बेकारी आणि रोगराई पार नष्ट झाली असे म्हणता येत नाही.

कार्याची नवीन दिशा : राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक हालचालीत महाराष्ट्राचे नेहमीच पुढचे पाऊल असते. राजकीय आंदोलनात महाराष्ट्राने देशाला नेहमीच आघाडीवर राहून मार्गदर्शन केले आहे. सामाजिक जीवनात देखील महाराष्ट्राचे स्थान अग्रभागी असते. जे राजकीय व सामाजिक जीवनात तेच शैक्षणिक जीवनात देखील. महाराष्ट्राची **ग्रामशिक्षण मोहीम** ही सबंध देशाला मार्गदर्शक ठरली आहे. ‘ Maharashtra shows the way,’ असे उद्गार आजचे केंद्रीय शिक्षणमंत्री, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी काढले आहेत. त्याचप्रमाणे नागरी विभागातील प्रौढ शिक्षण कार्यासाठी, मुंबई शहर समाज शिक्षण समितीची कार्यपद्धती आदर्श समजण्यात यावी असेही उद्‌गार डॉ. राव यांनी काढले, हे आपल्याला खास भूषणावह आहे. परंतु आजची गरज लक्षात घेता प्रौढ साक्षरतेचे झालेले कार्य अपुरे आहे असेच मानावे लागेल. महाराष्ट्रातील निरक्षरतानिर्मूलन कार्याचे मूल्यांकन करता असे आढळून आले की, साक्षर झालेल्यांपैकी फक्त ४४ टक्के लोकच आपली साक्षरता टिकवून धरतात. बाकीचे ती विसरून जातात, अगर तिचा व्यवहारात उपयोग करू शकत नाहीत, आणि यामुळे ५६ टक्के नवसाक्षर लोक पुन्हा निरक्षरांच्या मोठ्या हौदात जमा होतात. आपल्या देशातील निरक्षरतेचा हौद दोन तोट्यांचा आहे. एका तोटीतून नवसाक्षर बाहेर घालवायचे तर दुसऱ्या तोटीतून तितकेच किंबहुना अधिकतर निरक्षर जमा करायचे, आणि यामुळे हा निरक्षरतेचा हौद कधीच रिकामा होत नाही. उलट लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीमुळे तो भरून वाहू लागतो. हे दुष्टचक्र थांबविलेच पाहिजे. यावर उपाय शोधण्याचे कार्य चालूच आहे. महाराष्ट्र राज्य समाज शिक्षण समितीने काही मार्ग शोधून काढले आहेत.

कार्यवाही साक्षरता : निरक्षरांचा हौद कायमचा रिकामा करून त्यात नवसाक्षर भरावयाचे असतील तर नवसंपादित साक्षरता **कार्यवाही** अगर **व्यवहारोपयोगी** व्हायला हवी. साक्षरतेचा संबंध जीवनाशी निगडित करायला हवा. नवसाक्षर शेतकऱ्याला या साक्षरतेद्वारा आपली शेती सुधारण्याचे मार्ग स्वतः होऊन शोधून काढता आले पाहिजेत. त्याचप्रमाणे साक्षर कामगार आपले काम साक्षरतेद्वारा अधिक कुशलतेने व कार्यक्षमतेने करू शकला पाहिजे. तरच त्यांची साक्षरता जीवनोपयोगी व टिकाऊ अशी ठरेल. साक्षरता टिकाऊ स्वरूपाची करण्यासाठी महाराष्ट्रात पुढील प्रकारचे काही नवीन कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत.

(१) **विकास शाळा :** नवसाक्षरांना पुढील शिक्षण देण्यासाठी खास

शाळा चालविणे.

(२) **महिला विकास शाळा** : महिलांसाठी खास गृहोद्योग व ग्रामीण उद्योगांचे शिक्षण देऊन, त्यांची साक्षरता कार्यवाही स्वरूपाची करणे.

(३) **किसान शिक्षण योजना** : शेतकऱ्यांना साक्षर करण्यासाठी शेती व्यवसायावर आधारलेली खास क्रमिक पुस्तके तयार करून, त्यांना शिक्षण देणे व त्यांची साक्षरता व्यवहारोपयोगी करणे.

(४) **नवसाक्षर वाङ्मय निर्मिति व वाचनालय** : नवसाक्षर प्रौढांच्या जीवनाशी निगडित विषयावर खास पुस्तिका तयार करून घेऊन, त्यांचा पुरवठा ग्रामीण वाचनालयांतर्फे करीत राहणे.

मुंबई शहरातील कार्य : वर उल्लेख केल्याप्रमाणे, मुंबई शहरातील कार्य, भारतातील इतर शहरांना आदर्श म्हणून अवलंबिण्याचा आदेश केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी दिला आहे; आणि ते रास्तच आहे. मुंबई शहर समाज-शिक्षण समितीचे कार्य हे विस्तृत स्वरूपाचे आहे. निरक्षरांना साक्षर करण्यापासून तो त्यांना पुढील शिक्षण देणे, महिलांना गृहोद्योग शिकविणे आणि कामगारांसाठी व्यावसायिक मार्गदर्शनाचे प्रशिक्षण वर्ग चालविणे इत्यादी विविध स्वरूपी कार्य ही समिती सातत्याने करीत असते. साधारणतः पुढील प्रकारचे कार्यक्रम मुंबई शहर समाज शिक्षण-समिती संघटित करीत असते.

(१) निरक्षरांसाठी साक्षरता वर्ग चालविणे व विद्यार्थ्यांमार्फत (Each one teach one) " एक निरक्षर, कर साक्षर " ची मोहीम चालविणे.

(२) साक्षरोत्तर वर्ग चालविणे.

(३) पुढील शिक्षणाचे—सातवीपर्यंत व एस्. एस्. सी. पर्यंतचे शिक्षण देणे.

(४) महिलांसाठी—शिवणवर्ग, मातृ-विकास केंद्रे, इत्यादी व्यावसायिक शिक्षणाचे वर्ग चालविणे.

(५) नवसाक्षरांसाठी वाचनालये चालविणे, साक्षरता दीप मासिक प्रसिद्ध करणे.

(६) नागरिक शिक्षणासाठी विविधस्वरूपी सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची संघटना करणे.

(७) नवसाक्षरांसाठी खास पुस्तिका प्रसिद्ध करणे.

(८) श्रमिक विद्यापीठातर्फे —कामगारांसाठी व्यावसायिक मार्गदर्शनाची प्रशिक्षण केंद्रे चालविणे.

साक्षरतेची व्याप्ती व उपयुक्तता कालमानाप्रमाणे सारखी बदलत राहते व राहणार. आजच्या औद्योगिक क्रांतीच्या व वैज्ञानिक प्रगतीच्या काळात जीवनोपयोगी अर्थात व्यवहारी वा कार्यवाही साक्षरताच अधिक परिणामकारक ठरेल, आणि अशी साक्षरता शिकविण्यासाठी नवीन अभ्यासक्रम आणि अध्यापनपद्धती:शोधून काढीत राहायला हवे. केंद्र सरकारने हल्लीच एक **राष्ट्रीय प्रौढशिक्षण मंडळ** स्थापन केले असून,

त्या मंडळामार्फत हे कार्य होणार आहे. प्रायः प्रौढ साक्षरता प्रसारकार्यात लोकांचा मोठा वाटा आहे. जे निरक्षर आहेत त्यांनी साक्षर व्हावयास तयार झाले पाहिजे, आणि जे साक्षर व शिक्षित आहेत त्यांनी निरक्षरांना साक्षर केले पाहिजे. तरच देशातील निरक्षरतेचा महासागर हटविता येईल.

महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

भारत संपूर्ण अर्थाने राजकीय पारतंत्र्यात ज्ञात इतिहासात दोन वेळा सापडला : (१) मुसलमानी आमदानीत व (२) ब्रिटिश आमदानीत. मुसलमानी आमदानीत संतांचा विश्वव्यापक, नीतिनिष्ठ व भक्तिप्रधान भागवत धर्म भारतभर पसरला व त्याने प्रभावित झालेला हिंदुसमाज सर्वांगीण इस्लामी आक्रमणाखाली धार्मिक दृष्टीने तगून राहिला. संतांनी परकीय राजकीय सत्तेने पराभूत झालेल्या समाजाचा धार्मिक पराभव होऊ दिला नाही, हे जरी खरे असले तरी, हिंदुसमाजाच्या सामाजिक गतिशीलतेला सामर्थ्य मात्र १९ व्या शतकापर्यंत प्राप्त झाले नाही. सामाजिक फुटीरपणा वाढत गेला. अंध रूढींच्या अगाध अंधारात हिंदू समाज शेकडो वर्षे चाचपडत राहिला. मराठे व शीख यांनी राजकीय बंधमुक्तीचा यशस्वी प्रयत्न केला तरी सामाजिक गतिशीलतेला प्रेरणा मिळू शकली नाही. त्यामुळे सबंध भारत पुनः पश्चिमी साम्राज्यशाही आक्रमणाखाली पराभूत झाला. पश्चिमी साम्राज्यशाहीच्या पाठीशी वैज्ञानिक व औद्योगिक क्रांतीच्या अधिष्ठानावर निर्माण झालेली सतत प्रगतिशील अशी आधुनिक बुद्धिवादी संस्कृती होती.

या संस्कृतीचे मुख्य साधन व वाहन आधुनिक शिक्षणपद्धती हे होय. इंग्रजी शिक्षणपद्धतीने परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी निर्माण झाली. ब्रिटिश राज्याची भारतात स्थापना झाली व नव्या शिक्षणपद्धतीचा पाया घातला गेला. त्यामुळे भारतीयांची अंधश्रद्धेत गुरफटलेली व अगतिकतेत सापडलेली विवेचक बुद्धी मुक्त झाली. ब्रिटिश राज्याच्या स्थापनेच्या अगोदर ब्रिटिशांचा व इतर युरोपियनांचा संपर्क सतत वाढत होता. त्यांच्या औद्योगिक क्रांतीचे वारेही भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांवर येऊन आदळत होते, तरी त्याचे वैशिष्ट्य मात्र येथील राज्यकर्त्यांना व किनाऱ्यालगतच्या जनतेला जाणवले नाही. इतक्या भयंकर सुस्तीने

येथील नेत्यांची व जनतेची मने सुस्त व मूढ झाली होती. ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेनंतरच आधुनिक शिक्षणाच्या द्वारे प्रबोधनाची प्रभात येथे उजाडली. आधुनिक विद्या, वाङ्मय व कला यांच्या शिक्षणाचा लाभ काही थोड्या भारतीयांना झाल्याबरोबरच त्यांच्यातील प्रतिभाशाली व संवेदनशील अशा अत्यंत अल्प शिक्षितांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलून गेला. विद्युत्-संचाराने यंत्र थरारावे त्याप्रमाणे यांची मने नवविचारांनी थरारू लागली. बुद्धीला व विचाराला अगदी विलक्षण असे नवे अधिष्ठान प्राप्त झाले. जीवनाचा अर्थ करण्याची रीतीच बदलून गेली. समाजाला घसटून टाकणारी अनेक सामर्थ्ये या नव्या अधिष्ठानामध्ये होती. सामाजिक, धार्मिक संस्था बदलण्यास व तशा नव्या संस्था उभारण्यास आवश्यक असलेली आधुनिक दृष्टी लाभली. केवळ कर्णगोचर असे परंपरागत धार्मिक साहित्य व दृष्टिगोचर होणारे नवे औद्योगिक युग यांच्यातील अंतर्विरोध या नव्या शिक्षणामुळे स्पष्ट झाला.

कर्णगोचर ज्ञानाचा आधार अंधश्रद्धा होती. ही श्रद्धा प्रत्यक्ष प्रत्ययावर आधारलेल्या विचारांशी कशी विसंगत आहे, याची मीमांसा सुरू झाली.

नवविचाराचा व भारतीय प्रबोधनाचा पहिला प्रेषित पूर्वेस बंगाल्यात १८ व्या शतकाच्या अखेरीस उदयास आला. तो म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. कारण बंगाल्यात आधुनिक शिक्षणाचा पाया महाराष्ट्रापेक्षा सुमारे पाऊणशे वर्षे अगोदर घातला गेला होता. महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात आधुनिक जीवनदृष्टी देणारे प्रबोधनाचे दोन मोठे उद्गाते पुढे आले. ते म्हणजे लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख व जोतिबा फुले हे होत. या वेळी हिंदी मनुष्याचा परंपरागत जीवनक्रम हा संपूर्णपणे सनातन रूढीच्या बंधनात बंदिस्त होता. धार्मिक आणि सामाजिक या दोन कल्पनांत भेद दाखविणारी सीमारेषा सापडत नव्हती. जन्मापासून मरणापर्यंतचे महत्त्वाचे व्यवहार धर्म-रूढींच्या मर्यादेतच बद्ध होते. या सकाळपासून त्या सकाळपर्यंतचे कार्यक्रमही धर्मग्रंथांनी व परंपरागत रूढींनी ठरवून दिलेलेच असत. स्नान, पान, भोजन, उपजीविकेचे व्यवसाय, विवाहपद्धती, समाजातील भिन्न भिन्न उच्चनीच स्तरांवरील वा समान स्तरांवरील जातिजमातींचे आचारविचार, विवाहपद्धती, उपासनापद्धती, अंत्यक्रिया इत्यादी सर्व मानवी क्रिया सनातन रूढीने डोळ्यावर ढापण बांधलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणे एकाच चक्रात चालत असत. भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, स्पृश्यास्पृश्य इत्यादी निर्बंध विवेक व विचार न करता परंपरेप्रमाणे चालत असत. कोणाबरोबर जेवावे व काय जेवावे, झोपताना डोके कोणीकडे करावे व पाय कोणत्या दिशेस असावेत, प्रवास केव्हा करावा, कोणत्या समयी व कोणत्या दिशेस प्रवासास निघावे किंवा निघू नये, हजामत कोणत्या वारी व तिथीस वर्ज्य वा विहित इत्यादी गोष्टी धर्म सांगत असे. जांभई, शिंक, इत्यादी स्वाभाविक क्रियांच्या बाबतीतही धर्माने सांगितलेले आचार पाळत असत. प्रत्येक जातीचे, उपजातीचे व कुळांचे आचार ठरलेले असत. बारीकसारीक रूढींचा भंग होऊ नये म्हणून पितर, देव, यक्ष, राक्षस, पिशाच सर्व ठिकाणी बंदोबस्ता-

करिता हजर असत. प्रत्येक महिन्याचे, ऋतूचे व काही तिथ्यांचे वा पक्षांचे निरनिराळे आचार आणि व्रते पाळावी लागत. नवस, व्रते, उद्यापने, श्राद्ध, तीर्थोत्सव, यात्रा यांची महती अपूर्व असे. घरात कोणी आजारी पडले, नातेवाइकांवर वा आपणावर काही आपत्ती आली, आपले जनावर अकस्मात मेले, धंद्यात अपयश आले, गृहदाह झाला, इमारत पडली, रोगाची साथ आली, अवर्षण पडले, अतिवृष्टी झाली, तर व्रतभंग, आचारातील घोटाळा, जातिभेदविषयक नियमांच्या पालनातील प्रमाद, विटाळ, चांडाळ इत्यादी कारणांनी देवता, पितर इत्यादिकांचा प्रकोप झाला, असे मानून शांती करीत. त्या वेळचा हिंदू माणूस चोवीस तास व बारा महिने देवता, पितर, राक्षस, भुते, पिशाचे इत्यादिकांच्या कडक पहाऱ्यात राहत असे. जादूटोण्याची त्याला सारखी भीती असे. घर, विहीर, दरवाजा, चूल, भिंती, आढे, ओसाड जागा, नदी, तलाव, वृक्ष, शेताचा बांध, पर्वत, आकाश व पाताळ यांत दाही दिशांस, तीनही काळ या अदृश्य शक्तीचा भरणा व प्रताप त्या माणसास दिसत असे. त्याचे मन या अलौकिक शक्तींच्या भयाने पूर्णपणे व्यापलेले होते. कुलाचार, जात्याचार, देवतांसंबंधी कर्तव्ये यासंबंधी अनेक प्रमाद घडत असत व त्याकरिता प्रायश्चित्त व दंड भोगण्यास तो तयार असे. राजाचे, गावचे, जमातीचे व कुळाचे आधिपत्य व जुलूम मानण्यास व सहन करण्यास तो तयार असे. त्यांचा अंमल त्याच्या मनावर जितका होता त्यापेक्षा या काल्पनिक, स्वप्नमय व भ्रांतिकृत शक्तींचा अधिक असे. तो त्या भुताटकीच्या विश्वात जगत असे.

आधुनिक शिक्षणाने व सुधारलेल्या इंग्रजी राज्याने या भ्रामक विश्वाला भूकंपाचा हादरा दिला. हा हादरा देण्यात मुख्यतः आधुनिक संस्कृतीचे व सुशिक्षितांचे प्रतिनिधी पुढारीपणा करीत होते. पाश्चात्य विद्येने तीन नवीन मूलभूत मूल्ये या देशात प्रथमतः आणली. बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्व मानवांची राष्ट्रभेदनिरपेक्ष व वंशभेदनिरपेक्ष नैसर्गिक समता ही ती तीन मूल्ये होत. बुद्धिवादामुळे जुन्या परंपरेतील गुणदोषांचा विवेक करणारी दृष्टी लाभली आणि वैज्ञानिक दृष्टीने आचारविचारपद्धती सुधारण्याची आणि विश्वरचनेचा परंपरागत अर्थ तपासण्याची प्रेरणा मिळाली. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराने जुन्या समाजव्यवस्थेतील व्यक्तीच्या आत्मविकासावरील बंधनाचा उच्छेद करणारी स्फूर्ती मिळाली. मानवाच्या मूलभूत समतेच्या कल्पनेमुळे जगातील इतर राष्ट्रांच्या संस्कृतीबद्दल असलेला पूर्वग्रह नष्ट झाला व सर्व संस्कृतींचा सारभूत अंश ग्रहण करण्याइतकी उदारतापूर्ण सारासार बुद्धी जागृत झाली. या त्रिविध मूल्यांमुळे ऐहिकताप्रधान विचारसरणी उत्पन्न झाली. त्यामुळे इहलोकातील जीवनक्रमाचा ऐहिक मानवी हिताच्या कसोटीवर बुद्धिवादी विचार सुरू झाला आणि पारलौकिक हिताहिताचा संबंध केवळ शुद्ध व व्यापक अशा नैतिक तत्त्वाशीच जोडला गेला. धर्मग्रंथांमधील व रूढीमधील अंधश्रद्धेवर आधारलेले आचारविचारांचे नियमन म्हणजे खरा धर्म नव्हे, अशी जाणीवही दृढ होऊ लागली.

या नवीन मूल्यांच्या निकषावर हिंदुधर्मसंस्थेचे आणि जगातील अन्य धर्मसंस्थांचे परिशीलन व समीक्षण करणाऱ्या महाराष्ट्रीय काही थोड्या विविक्षित सुशिक्षितांनी धर्म-परिवर्तनवादाचा पाया घातला. या धर्मपरिवर्तनवादाचे दोन प्रवाह भारतात व महाराष्ट्रात वाहू लागले. एक प्रवाह म्हणजे विश्वधर्मविषयक विचारसरणी व दुसरा प्रवाह म्हणजे हिंदु-धर्म सुधारणेच्या मूलभूत सिद्धान्ताची मांडणी करणारी विचारसरणी. या दोन्ही विचार-सरणी एकमेकींशी गुंतलेल्या व काही बाबतीत एकरूप होत्या. धर्मसंस्थांच्या गाभ्यामध्ये बुद्धिवादाचा प्रकाश टाकून एकमेकांहून भिन्न असलेल्या स्पर्धाशील असलेल्या आणि प्रसंगी युध्यमान होणाऱ्या विविध धर्मनिष्ठ समाजसंस्थांमध्ये म्हणजे हिंदुसमाज, ख्रिश्चन-समाज, मुसलमानसमाज इत्यादी समाजसंस्थांमध्ये परिवर्तन केल्याशिवाय मानवी समाजां-मधील अनिष्ट विग्रह संपणार नाही व मानवी समतेकडे जगाचा प्रवास होणार नाही, हे राजा राममोहन रॉय यांच्या ध्यानात आले. त्याकरिता विश्वधर्माची कल्पना त्यांनी मांडली व तदनुसार आंदोलन प्रथम भारतात बंगालमध्ये प्रारंभले. त्यानंतर त्या आंदो-लनाचे लोण कलकत्त्याहून मुंबईला पोहोचले. राजा राममोहन रॉय यांनी विश्वधर्म या शब्दाला पर्याय–शब्द सार्वत्रिक धर्म हा वापरला. राजा राममोहन रॉय यांचे विश्वधर्माचे विचार वेद व विशेषतः प्राचीन उपनिषदे यांच्यावर प्रथमतः आधारलेले होते. हे जरी खरे असले तरी त्यांना वेदोपनिषदांत गवसलेली मूलभूत तत्त्वे जगातील इतर धर्मग्रंथां-तही दिसली. त्यांनी कुराण, बायबल इत्यादी जगातील इतर पवित्र ग्रंथांचेही अध्ययन केले होते. जगातील सर्व विकसित धर्मांचा गाभा शुद्ध नैतिक तत्त्वे होत व त्यांचा परि-पालक एकच परमेश्वर आहे. मानव समाजातील धार्मिक भेदावर आधारलेले भेद हे केवळ भ्रममूलक आहेत. त्याचप्रमाणे मूळ नैतिक तत्त्वांशी विरोधी असलेले आचार व कायदे हे मूलभूत धर्मतत्त्वाच्या व ईश्वराच्या विरोधी आहेत; म्हणून ते आचार किंवा रूढी नष्ट केल्या पाहिजेत, अशी राजा राममोहन रॉय यांनी विश्वधर्मविषयक विचारसरणी मांडली. हिंदुधर्माचे अधिष्ठानही हाच विश्वधर्म होय असे प्रतिपादून त्यांनी मूर्तिपूजा, बालविवाह, सतीची चाल, जातींचा उच्चनीच भेद यांच्यावर हल्ला सुरू केला.

हे विश्वधर्मविषयक आंदोलन भारताच्या इतिहासातच नव्हे तर जागतिक इति-हासातही अभूतपूर्व असे मानले जाते. महाराष्ट्रातील पहिल्या दोन महान समाजसुधारक व धर्मसुधारक व्यक्तींनीही या आंदोलनाचे स्वागत केले. लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख (१८–२–१८२३ ते ९–१०–१८९२) व जोतिबा फुले (१८२७ ते २७–११–१८९०) या त्या दोन व्यक्ती होत. लोकहितवादींची विद्वत्ता फार मोठी होती. संस्कृत व इंग्लिश या दोन्ही भाषांतील साहित्याचे त्यांनी सखोल अध्ययन केले होते. धर्म, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानवशास्त्र इत्यादी विषयांवर स्वतंत्र निबंध व स्फुट लेख त्यांनी लिहिले. चरित्रे, प्रादेशिक इतिहास, अर्थशास्त्र, भाषांतरे, अनुवाद इत्यादी विपुल लेखन त्यांनी केले. धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणा यांच्या आंदो-लनाला आवश्यक अशी वैचारिक लेखनात्मक बैठक निर्माण केली. ब्राह्मसमाज, प्रार्थना-

समाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्या पाठीशी ते उभे राहिले. नव्या सामाजिक शिक्षणास आवश्यक अशा वृत्तपत्रे, ग्रंथालये इत्यादी संस्थांना उत्तेजन दिले. परंपरेविरुद्ध फार मोठे बंड उभारण्याचा जीवनभर प्रयत्न केला.

हिंदुसमाजसंस्था ज्या धर्मग्रंथांवर उभारली गेली त्या धर्मग्रंथांचे प्रणेते दिव्य-दृष्टीचे लोक होते, किंवा वेद हे अपौरुषेय अथवा ईश्वरोक्त आहेत या श्रद्धेवर प्रहार करण्याकरिता समाजनेता व धर्मनेता जो ब्राह्मणवर्ग त्याच्या विद्या कशा अपूर्ण आहेत व सद्यःकालीन समाजप्रगतीला कशा विरोधी आहेत, हे चिकित्सक दृष्टीने दाखवून दिले. धर्मग्रंथ हे स्वयंभू किंवा ईश्वरकृत नसून ते मनुष्यकृत आहेत हे मानल्याशिवाय समाज-सुधारणा व धर्मसुधारणा अशक्य आहे, असा विचार मांडताना ते म्हणतात–" एकट्या ऋषीने, आपल्या अकलेने लिहिलेल्या शास्त्रापेक्षा चार मते पाहून जे शास्त्र आपण तयार करू ते सर्वांपेक्षा उत्तम होईल यात संशय नाही. शे-दोनशे लोकांना याप्रमाणे नाव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपलेमध्ये हा धर्म चांगला असे पाहून पुष्कळ लोक येतील... हिंदुधर्मात सांप्रत ज्यांस अडचणी पडतील ते सर्व ... या शुद्ध धर्मात मिळ-तील. मग आपली मंडळी प्रबळ झाली म्हणजे जे पाहिजे ते कार्य करिता येईल ... असे केल्यावाचून सांप्रतकाळी हिंदुधर्म भ्रष्ट झाला, याचे हातून आम्ही सुटणार नाही. हा धर्म सुधारला पाहिजे." (शतपत्रे, पत्र क्र. ६४) " परंपरागत धर्मांचे वेड माजून आम्हा भारतीयांचा शेकडो वर्षे अधःपात झाला आहे. आम्ही आर्यावर्तातील लोक पूर्वी फार प्रगत झालो होतो. परंतु कालांतराने निद्रावश झालो, आमच्या धर्मसमजुतीला विकृत वळण लागले, लोकभ्रमावर आधारलेले क्रियाकांड वाढत गेले आणि अखेरीस आमचा पूर्ण नैतिक अधःपात झाला " असे त्यांनी निर्भयपणे सांगितले. लोकहितवादी म्हणतात, " आमच्या अर्यावर्तातील लोक जे पूर्वी सर्व जगावर गाजले होते ते अगदीच निद्रावश झाले... या निद्रेत त्यांचे सर्व ऐश्वर्य, त्यांचे सर्व तेज, त्यांचे सर्व कर्तव्य आणि त्यांच्या सर्व महत्त्वाकांक्षा याही झोपल्या गेल्या ... राज्यव्यवस्था, शोध आणि विद्यावृद्धी याविषयीची काळजी यांचा नाटके जणू काय उत्सर्ग करून:नाच, तमाशे, भोजन, नाटके, आणि वेश्याच्छंद यांचे तरंगातच सर्व ऐपतदार व तदनुषंगिक लोक दरोबस्त दंग होऊन गेले. तशात त्यांच्या कृत्यांची नावाजणी करणारे अनुद्योगी व परोपजीवी असे आर्जवी व धर्माधिकारी लोक यांनी तर त्यास त्यांच्या छंदात व फंदात अधिकाधिक गाडून टाकले आणि अशा या अज्ञानप्रसाराने एतद्देशियांमध्ये अनेक निंद्य व तिर-स्करणीय चालीरीतींचे मनस्वी प्राबल्य माजले."

" धर्मांचे वेड तर विलक्षण माजून त्याखाली अनेक अनन्वित कृत्ये बेलाशक गोवून त्याला हे धर्मवेडे लोक बेधडक अनुसरून त्यातच आपली, आपल्या कुलाची आणि आपल्या देशाची धन्यता मानू लागले...सारांश, खरा पुरुषार्थ, खरे कर्तव्य, खरा धर्म आणि खरे तप ही जाणण्याविषयी येथून तेथवर सर्वत्र अज्ञानपणाचे अभ्र पसरले व सर्वांस भुरळ पडून दिशाभूल झाली " (राजस्थानाचा इतिहास, पृष्ठ ८).

पुराणे हे बाष्कळ ग्रंथ आहेत असे विधान करून ते पुढे म्हणतात – " नीती, सदाचार, धर्म आणि भक्ती याजवर अगदी माती टाकून स्थलांचे, नद्यांचे व महिन्यांचे वगैरे भाराभर वर्णन करण्याने सदाचरणावरील सुबुद्धी आणि त्यांचे महत्त्व अगदी उडवून दिले हे फार अनिष्ट झाले. " (स्वाध्याय पृ. ११२ व ११३). " अज्ञान फार वाढले व त्यास साधन मुख्य पुराणे आणि माहात्म्ये लिहावयाची हाच काही दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हा त्यांनी मनास येईल ते लिहिले. कोणी कावेरीमाहात्म्य, कोणी करवीरमाहात्म्य, कोणी शालिवाहन-चरित्र, कोणी नाशिक-माहात्म्य, कोणी अग्निपुराण, कोणी गणपतिपुराण अशी लिहिली. प्रत्येकात त्यांचा हेतू इतकाच होता की एखाद्या देवाचे किंवा एखाद्या नदीचे वर्णन करून ईश्वर त्यात आणून ठेवून ब्राह्मणांस पैसा मिळण्याची तजवीज पाहावी. " (शतपत्रे, पत्र क्र. ९३).

लोकहितवादींनी ' धर्मसुधारणा ' या लेखात धर्मसुधारणेची कलमे मांडली आहेत. या लेखात विश्वधर्माच्या अधिष्ठानावर आधारलेल्या व हिंदु-समाजास उपयुक्त अशा मुद्द्यांची मांडणी केली आहे. त्यांचा सारांश असा : (१) ईश्वराची मानसिक पूजा, (२) आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव, (३) ईश्वरोपासना स्वभाषेत म्हणजे ज्या भाषेचा अर्थ समजेल त्या भाषेतच करावी, (४) आचारस्वातंत्र्य व विचार-प्रदर्शनाचे स्वातंत्र्य, (५) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मात व व्यवहारात समान असावेत व स्त्रियांस प्रौढ विवाहाची व पुनर्विवाहाची मोकळीक असावी, (६) रूढी व इतर आचार यांच्यापेक्षा नीती ही प्रमुख असावी, आचारधर्म गौण धरावेत, (७) कोणत्याही जातीच्या, धर्माच्या वा राष्ट्राच्या मनुष्यास तुच्छ मानू नये, दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान व दरिद्री जनांस द्रव्य शक्त्यनुसार देण्यास तत्पर असावे, (८) सत्यनिष्ठा, (९) विद्येमध्ये सत्याचा शोध करण्यास आळस करू नये व विद्या वा ज्ञान संपादन करण्यास सर्वांस समान संधी असावी.

हिंदू समाजात साधू, बैरागी, बुवा, साक्षात्कारी महंत यांचे फारच प्रस्थ माजलेले असते. ते खरे साधूच नव्हते असा इशारा लोकहितवादींनी दिला आहे. धर्मशील साधू म्हणजे काय याविषयी ते म्हणतात – " आम्हांस असे साधू पाहिजेत की सर्व ज्ञातींत व सर्व देशांत जे जे अनर्थ घात करणारे आहेत ते काढणारे, जगात सद्गती देणारे, नीतीचा व सदुद्योगाचा ठसा दाखविणारे. " (निबंधसंग्रह–संपा. प्रियोळकर पृ. ४५७).

देवळे बांधणे, तीर्थयात्रा करणे, दाने देणे यात संपत्तीचा विनियोग पुष्कळ लोक करतात व त्यात धार्मिकता आहे असे मानतात. या प्रकारच्या धर्मादायाला लोक-हितवादींचा विरोध आहे–" जिवंत लोकांस सुखी करण्याचे सोडून यात्रा कराव्या हे उचित नाही व याणे काही हित होत नाही. " यासंबंधी त्यांचे स्पष्टीकरण असे– " आमचे श्रीमंत लोक. . .येथून उठून काशीस जातात आणि शेकडो रुपये धर्मास बरोबर नेतात व देवळे बांधतात. परंतु त्या रुपयांनी जर एखादा कापड किंवा कापूस किंवा काच करण्याची यंत्रे आणून कारखाना घातला तर हजारो माणसांना रोजगार

उत्पन्न होऊन खावयास मिळेल, सुख होईल. नंतर काशीयात्रेपेक्षा ते रुपये सार्थकी गेले असे म्हणावे की नाही ? ” (शतपत्रे, पत्र क्र. ८२).

लोकहितवादींचे समाजचिंतन व धर्म-चिंतन ज्या साहित्यात ग्रथित केले आहे ते साहित्य आधुनिक मराठी साहित्याचे एक उत्कृष्ट प्रारंभस्थान आहे. लोकहितवादींच्या काळी अत्यंत प्रखर विचाराचे दुसरे विश्वधर्मी म्हणजे जोतिबा फुले होत. जोतिबा फुले जातिबद्ध व उच्चनीच भावाने भरलेल्या समाजरचनेच्या विरुद्ध प्रत्यक्ष बंडाचा उठाव करण्याकरिता सिद्ध झाले होते. त्यांनी आधुनिक युगाला आवाहन देऊन प्रथमतः ब्राह्मणाच्या धार्मिक सत्तेविरुद्ध युद्ध पुकारले. सामाजिक जन्मसिद्ध उच्चनीच भाव ईश्वरी संकेताने व माणसाच्या पूर्वकर्माने निर्माण झालेला आहे अशा, हिंदुसमाजात कायम घर करून राहिलेल्या श्रद्धेला त्यांनी जबरदस्त धक्का दिला. जातिभेदाविरुद्ध प्रयत्न करणे व अस्पृश्य समाजाची अस्पृश्यता नष्ट करणे हे महापाप आहे अशी समजूत होती. ही खोलपणे सहस्रावधी वर्षे रुजलेली भीती घालविणारी जबरदस्त प्रेरणा जोतिबा फुले यांना मिळाली. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचा प्रारंभ जोतिबांनी केला. या चळवळीला पहिले नाव सत्यशोधक चळवळ असे होते. हे सत्य म्हणजे मानवी जीवनाचे नैतिक सत्य होय. त्यातूनच मानवाच्या सामाजिक मुक्ततेचा सिद्धान्त निघतो. सत्य-शोधक चळवळीला व्यापक अशा बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचा आधार होता. नवीन ध्येये त्या बुद्धिवादाने प्रेरली होती. नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय, परंपरागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही. केवळ विनाशाकरिता विनाश करण्याची प्रवृत्ती हे विध्वंसक अतएव विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. जोतिबा यांनी अनेक पुस्तके व निबंध लिहिले. सत्यशोधक समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचा प्रयत्न केला. ते आंदोलन शेवटी संकुचित अशा ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतर पावले; त्यातील वैचारिक शक्ती कमजोर झाली, त्यामुळे नवा विचार खालपर्यंत रुजला नाही. ज्या जातिभेदाविरुद्ध जोतिबांचे बंड होते तो जातिभेद नष्ट करण्याचे धैर्य त्यांच्या अनुयायां-मध्ये निपजले नाही, रुजले नाही. जातिभेदाच्या, स्त्री-बंधनाच्या व स्पृश्यास्पृश्य भेदाच्या रूढी बहुजनसमाजात तशाच कायम राहिल्या. मूर्तिपूजा, बालविवाह, स्त्रियांचे कुटुंबातील दुय्यम स्थान, नवस, तीर्थयात्रा, विटाळ-चांडाळाच्या कल्पना इत्यादी सर्व काही परंपरागत रूढिबंधनांचे जंजाळ तसेच कायम राहिले. याचे कारण आधुनिक मौलिक मानवी हक्कांचा विचार बहुजनसमाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न शिथिल झाला.

समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय. ‘ गुलामगिरी ’ व ‘ सार्वजनिक सत्यधर्म ’ ही दोन पुस्तके जोतिबांची मूलभूत पुस्तके होत. ‘ गुलामगिरी ’ मधील विचार हे मुख्यतः विध्वंसक आहेत. या विध्वंसक विचारांतून समाजरचना कशा प्रका-रची निर्माण करावी या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या विधायक

विचारात म्हणजेच ‘ सार्वजनिक सत्यधर्म ’ या पुस्तकात मिळते. पहिल्या पुस्तकातील सत्याचा अर्धा भागच मान्य केला तर तो धोकादायक ठरतो. आता भारताला यादवी युद्धाचा अधिक धोका आहे. त्याला सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकातील विधायक सत्याची जोड देणे आवश्यक आहे. नव्या सामाजिक रचनेची तत्त्वे त्यात सांगितली आहेत. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही ती तत्त्वे होत. भारतीय लोकशाही क्रांतीची हीच मूलभूत तत्त्वे होत. लोकहितवादींनी विश्वधर्माच्या तत्त्वानुसारे हिंदुधर्मामध्ये सुधारणा कशी करावी, हे सांगितले आहे. जोतिबांनी विश्वकुटुंबवादाचा पुरस्कार करून जगातील हिंदुधर्म, इस्लाम, ख्रिश्चनधर्म इत्यादी धर्मसंस्था नव्या मानवी जगाच्या स्वास्थ्याला व प्रगतीला निरुपयोगी व घातक आहेत म्हणून नवा सत्यधर्म प्रतिपादिला. जगातील सर्व धर्मसंस्था गैरसमजावर व अंधश्रद्धेवर उभारल्या आहेत. त्यांच्यामध्ये जे जे काही सांगितले आहे ते सत्य आहे असे आपण म्हणता कामा नये, असे ते म्हणतात. हिंदुधर्मापेक्षा ख्रिश्चनधर्म व इस्लाम हे धर्म जातिभेद मानीत नाहीत म्हणून ते अधिक उदार आहेत असेही ते ठासून सांगतात. परंतु तेही धर्म संकुचित वृत्तीचेच आहेत व बुद्धिवादाच्या निकषावर टिकणारे नाहीत, ते मानवामानवामध्ये फूट पाडणारे आहेत. म्हणून त्यांचेही विसर्जन व्हावयास पाहिजे, त्याशिवाय मानवी समतेची स्थापना होणार नाही, अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. सगळेच धर्मग्रंथ म्हणजे वेद, स्मृती, पुराणे, बायबल, कुराण इत्यादी मानवप्रणीत असल्यामुळे त्यांचा संपूर्ण सत्य म्हणून स्वीकार करणे अयोग्य होय असे ते मानत. राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, ब्राह्मसमाजी व प्रार्थनासमाजी विचारवंत यांच्या मते जगातील प्रसिद्ध धर्मग्रंथांमध्ये एक सर्वसामान्य ईश्वराच्या अस्तित्वाचे सत्य प्रतिपादिलेले आहे, म्हणून सर्व धर्मांचा समन्वय करणे जरूर आहे; असा विचार त्यांनी सांगितला. धर्मग्रंथांना बाजूला ठेवा; त्यात असत्यही पुष्कळ आहे, म्हणूनही त्यातील एकेश्वराच्या अस्तित्वाचे सत्य गृहीत धरून समन्वय करण्याचा प्रयत्न करू नये, असा दृष्टिकोण जोतिबांनी सांगितला. जोतिबांचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. त्याकरिता त्यांनी ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म इत्यादी ईश्वरवाचक रूढ शब्द बाजूला टाकून विश्वनिर्माणकर्त्यास, ‘ निर्मिक ’ हा नवीन शब्द बापरला आहे, याचे कारण जगातील सर्व ईश्वरवाचक रूढ शब्दांच्या पाठीमागे आराधना, भक्ती किंवा पूजा करण्याचे एक निरनिराळे कर्मकांड आहे, ते कर्मकांड व्यर्थ असून मानवांच्यामध्ये सामाजिक फूट पाडणारे आहे, असे त्यांचे मत होते. मानवांची सेवा आणि मानवी समतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पूजा होय असे ते म्हणतात.

मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारची वैचारिक भूमिका व कशा प्रकारचा वर्तनक्रम स्वीकारला पाहिजे यासंबंधी ‘ सार्वजनिक सत्यधर्म ’ या पुस्तकात त्यांनी ३३ कलमी नियम मांडले आहेत. त्यांचा सारांश असा : आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने मनुष्यास जन्मतःच स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात सारख्या हक्कांचा उपभोग

घेण्यास समर्थ केले आहे. स्त्री आणि पुरुष यांचे हक्क समान आहेत. स्त्रियांस व पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांच्या विषयी पाहिजे तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास निर्माणकर्त्याने स्वतंत्रता दिली आहे. हे स्वातंत्र्य एकमेकास बाधक होणार नाही अशी मात्र खबरदारी घेतलीच पाहिजे. त्यास सत्यवर्तन म्हणतात. एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी दुसऱ्या व्यक्तीवर वा दुसऱ्या टोळीवर जबरदस्ती करू शकत नाही. जबरदस्ती न करणे हा सत्यवर्तनाचा भाग आहे. सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्मस्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य निर्माणकर्त्याने दिले आहे म्हणून एकाने दुसऱ्याचे नुकसान न करणे व मूलभूत हक्क समजून इतरांस पीडा न देणे हा सत्यवर्तनाचा भाग आहे. या पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण झालेल्या प्रत्येक धर्मपुस्तकात आरंभापासून शेवटपर्यंत सांगितलेले सर्व सार्वजनिक सत्य होय असे म्हटले आहे. परंतु हा हेकटपणा आहे. या धर्मग्रंथांना भिन्नभिन्न मानवी समाजात हेवा व द्वेष निर्माण करण्याचे काम चालविले आहे. पृथ्वीचा निर्माणकर्ता एक आहे, तो अनेक देशांतील लोकांमध्ये वैरभाव निर्माण करणारे देशाभिमानाचे व धर्माभिमानाचे खूळ कसा माजवील ? एकाच देशातील नदी तेवढी पवित्र कशी होऊ शकेल ? सर्व मानवी प्राणी समान आहेत म्हणून काही लोकच पिढीजात पवित्र व श्रेष्ठ कसे असू शकतील ? आर्य व अनार्य यांपैकी जे कोणी भेदाभेद न करता जगाच्या कल्याणासाठी कर्म करीत असतात तेच मानास व दानास पात्र होत. सर्व स्त्री-पुरुषांनी या भूखंडावर गावाचे, प्रांताचे वा देशाचे भेद न मानता व धर्मभेद न मानता आपले एक कुटुंब समजून एकजुटीने एकमेकांशी सत्यवर्तन करून राहावे. यामुळेच निर्माणकर्त्याला आनंद होणार आहे.

जोतिबा फुले यांनी सामाजिक सुधारणेचा विशिष्ट कार्यक्रम आखून त्यांचा प्रचार सुरू केला. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील सर्व सुधारकांच्या पंथांना समान असा होता. विधवा-पुनर्विवाह, प्रौढ कुमारी विवाह, विधवा केशवपनबंदी, बालहत्याप्रतिबंध करून गर्भार झालेल्या विधवा व कुमारी यांच्या बालकांचे व अनाथांचे संरक्षण व पालन करणाऱ्या संस्था काढणे, भिन्न जातीत रोटीव्यवहार म्हणजे सहभोजन, अस्पृश्यता निवारण इत्यादी तपशील या कार्यक्रमात समाविष्ट होतात.

हिंदुधर्मग्रंथांच्या आधारे समाजसुधारणेचे प्रयत्नही या काळी होत होते. प्रौढ विवाह व विधवाविवाह याला अनुकूल किंवा इतर अनेक सामाजिक सुधारणांना अनुकूल अशी धर्मशास्त्रवचने पुष्कळ सापडतात. त्यांच्या आधारे आम्ही धर्मसुधारणा करीत आहोत अशी भूमिका घेणारे सुधारकही सुधारक पंथात होते. या भूमिकेला विरोधीही धर्मशास्त्रप्रवचने पुष्कळच सापडतात. सुधारक व सनातनी यांच्यात त्या काळी वादविवादाच्या सभा भरत. परस्परांच्या विचारांचे खंडण व मंडन करणारे वादविवाद वृत्तपत्रात वा पुस्तक-पुस्तिकांच्या द्वारे प्रसिद्ध होत. विधवा विवाहांचे, प्रौढविवाहांचे, जातीजातीत सहभोजनाचे समारंभ घडवून आणले जात. अशा प्रकारचे बंगाल व महाराष्ट्र

या प्रदेशातील शिक्षित व पांढरपेशा समाजात आंदोलन सुरू झाले. सनातनी वर्ग बहु-संख्य असल्यामुळे सुधारकांवर बहिष्कार पडू लागले. त्यात कच्च्या दिलाचे सुधारक माघार घेत. धर्मशास्त्रवचनांच्या आधारे समाज-सुधारण्याच्या प्रयत्नात राममोहन रॉय, विद्यासागर, इत्यादी मंडळींनी प्रथम पुढाकार घेतला. त्याचे लोण महाराष्ट्रातही पोहोचले. महाराष्ट्रात शंकराचार्यांचा धर्मपीठ म्हणून फार मोठा अधिकार पांढरपेशा वर्गात मानला जात होता. परंपरागत धर्मपीठे समाजसुधारणेच्या विरुद्ध होती. त्यांचे फतवे किंवा धर्माज्ञा समाजसुधारकांच्या विरुद्ध निघत.

समाजसुधारणेस धर्मशास्त्रवचने अनुकूल जशी सापडतात तशी प्रतिकूलही पुष्कळ आहेत. त्यांचे एकदोन नमुने पुढीलप्रमाणे आहेत—

त्रिंशद्वर्षः षोडशाब्दां भार्यां विंदेत नग्निकाम् ।

(महाभारत, अनुशासन पर्व ४४–१४)

त्रिणि वर्षायु दीक्षेत कुमारिऋतुती सती ।
चतुर्थे त्वथ संप्राप्ते स्वयं भर्तारमाव्रजेत् ॥

(कित्ता ४४–१६)

" तीस वर्षांच्या पुरुषाने सोळा वर्षांची भार्या करावी, ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेपर्यंत कन्येने वाट पाहून चौथ्या वर्षी स्वतः वर वरावा. "

माताचैव पिताचैव ज्येष्ठभ्राता तथैव च ।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ।

(अष्टाविंशतिस्मृतिसंग्रह)

" बाराव्या वर्षी कन्या ऋतुमती होते. त्याच्या अगोदर लग्न न झाल्यास माता-पिता व ज्येष्ठ भ्राता नरकात जातात. "

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते

—(नारदस्मृति)

" पती नष्ट, मृत, संन्याशी, नपुंसक किंवा पतित झाला असल्यास स्त्रीने दुसरा पती करावा. "

न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥

—(मनु. ९-६५)

" विवाहशास्त्रात विधवाविवाह सांगितलेला नाही. "

परंतु अत्यंत मौलिक दृष्टीने विचार करणाऱ्या काही सुधारक पंडितांना हा मार्ग योग्य वाटत नव्हता. धर्मशास्त्रांच्या आधारे समाजसुधारणा करणे कठीण आहे, कारण त्यांच्यात परस्परविरोध आढळतो, असे ज्या पंडितांच्या लक्षात आले त्यांनी धर्म-शास्त्राचा आधार मिळाला तर ठीकच आहे; न मिळाल्यास धर्मशास्त्रवचनांच्या आधारा-वाचून अडू नये व विवेकबुद्धीच्या आधारे धर्मसुधारणेचा प्रयत्न जारी राखावा, असे

ठरविले व याकरिता स्वतंत्र संघटना निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रातील अगदी पहिली संघटना म्हणजे परमहंस सभा होय. इ. स. १८४० साली परमहंस सभेची स्थापना झाली. दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, मोरोबा विनोबा, आत्माराम पांडुरंग, तुकाराम तात्या, बाळा भाऊ शिंत्रे, सखारामशास्त्री, लक्ष्मणशास्त्री हळबे, भिकोबा लक्ष्मण, सखाराम लक्ष्मण चव्हाण यांनी यासंबंधी पुढाकार घेतला. या सभेचे अध्यक्ष रामकृष्ण बाळकृष्ण जयकर हे होते. या मंडळींना पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी प्रोत्साहन दिले. ईश्वरचंद्रांची आस्था, विद्वत्ता, सत्यनिष्ठा, विचारगांभीर्य व पावित्र्य यांचा खोल परिणाम या मंडळींच्या मनावर झाला. सर्व धर्मांचे सार एकच आहे, शुद्ध परमेश्वरनिष्ठा हृदयात बाळगून मानवांनी परस्परस्नेहभावाने वागावे, हेच ते सार होय; अशा परमार्थबुद्धीला मुख्य स्थानापन्न करून केवळ तदर्थ साधनभूत ज्या क्रिया असतील त्यांचाच अवलंब करावा आणि इतर बाह्याचार हे सोंग आहे, तो खरा धर्म नव्हे, असे मानावे; हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्मभेद वरपांगी आहेत, म्हणून धार्मिक भेदभाव विसरावा. प्रसिद्ध असलेले धर्मग्रंथ मनुष्यकृत आहेत, ईश्वरकृत नाहीत म्हणून त्यांचा आग्रह सोडावा; अशा तऱ्हेच्या विचारांचा प्रचार गुप्तपणे परमहंस सभेचे सदस्य करू लागले. श्री. दादोबा पांडुरंगांनी परमहंसिक ब्राह्मधर्म या नावाचे एक ओवीबद्ध छोटे प्रकरण तयार केले. त्यात (१) ईश्वरभक्ती व भूतदया, (२) आचार, (३) उपनयन, (४) विवाह, (५) उत्तरक्रिया, (६) भक्ष्याभक्ष्य, (७) शुद्धाशुद्ध-पापपुण्य, (८) धार्मिक ग्रंथ व महद्वाक्य, (९) धर्मबंड, (१०) दांभिक आचार इत्यादी प्रकरणे आहेत. परमहंस सभा किंवा परमहंस मंडळी केवळ मुंबईपुरतीच नव्हती. तिच्या शाखा पुणे, अहमदनगर, सातारा, बेळगाव, रत्नागिरी इत्यादी ठिकाणी पसरल्या होत्या. एकंदर सभासदांची संख्या हजारापर्यंत गेली होती. परंतु ती संख्या पांढरपेशा समाजात तीव्र प्रतिक्रिया उत्पन्न होऊन घटत गेली व शेवटी ह्या सभेचा अंत झाला. याच सभेच्या तत्त्वावर आधारलेली वेदसमाज नामक संस्था इ. स. १८६५ साली पुन्हा मुंबई व मद्रास येथे स्थापन झाली. परंतु ती फार दिवस चालली नाही.

इ. स. १८६४ साली कलकत्त्याचे ब्राह्मसमाजाच्या एका शाखेचे महान धर्मोपदेशक केशवचंद्र सेन यांचे मुंबई येथे डॉ. भाऊ दाजी यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. धर्मसुधारणेच्या चळवळीला पुनः प्रेरणा मिळाली. इ. स. १८६७ मार्च तारीख ३१ रोजी प्रार्थनासमाजाची स्थापना झाली. परमहंस सभेचे व वेदसमाजाचे पुरस्कर्ते प्रार्थनासमाजास येऊन मिळाले. आत्माराम पांडुरंग, परमानंद, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे, महादेव गोविंद रानडे, मोरोबा विनोबा, भास्कर हरी भागवत, वासुदेव बाबाजी नवरंगे इत्यादी सुशिक्षित विद्वान मंडळींनी जाहीरपणे प्रार्थनासमाजाचे नेतृत्व पत्करले. प्रथम भिकोबा लक्ष्मण चव्हाण यांनी प्रार्थना व उपदेश करण्यास सुरुवात केली. सनातनी मंडळींच्या आणि ख्रिस्ती लोकांच्या वृत्तपत्रात प्रार्थनासमाजावर टीकेचा भडिमार सुरू झाला. ख्रिस्ती लोकांच्या प्रचारात

दुष्पीरणा होता, हे खिस्ती लोकांच्या 'ज्ञानोदय' नामक वृत्तपत्रातील लेखांवरून दिसून येते 'ज्ञानप्रकाश' व 'केसरी' या वृत्तपत्रांमध्येही प्रार्थनासमाजावर वारंवार टीकालेख प्रसिद्ध होत असत. या टीकांतील महत्त्वाचे मुद्दे असे होते :– (१) प्रार्थनासमाजाची मते व आचरण केवळ युरोपियन पाद्री लोकांचे अनुकरण आहे. इंग्रजी शिकलेल्या हिंदूंची स्वधर्मावरून श्रद्धा उडते व खिस्त व मुसलमानी धर्मही ते स्वीकारीत नाहीत, म्हणून त्यांची मने रिकामी पडतात. रिकामी पडलेली मने भरून टाकण्याकरिता प्रार्थनासमाज ही तोड काढली आहे. या पंथाचा मूळ जो पाया तोच निरर्थक होय. (२) मूर्तिपूजेचा दुष्टावा का हेही आम्हास समजत नाही. केवळ इंग्रज जसे बोलतात तसे ते बोलतात इतकेच म्हणणे भाग आहे. (३) मूर्तीची गंधादिकांनी पूजा करणे व जगत्कर्ता अदृश्य जो ईश्वर त्याची शुद्धभावे स्तुती व प्रार्थना करून उपकार मानणे हे एकच आहे. प्रार्थनासमाजाने एक वेड सोडले व दुसरे वेड उचलले. प्रार्थना करणे हे खिस्ती लोकांचे वेड आहे.

बंगालमध्ये आदिब्रह्मसमाज स्थापन झाल्यानंतर बहुत वर्षांनी (जवळजवळ ४० वर्षांनी) प्रार्थनासमाजाची मुंबईत स्थापना झाली. दोन्हीही समाजांचे मूलभूत सिद्धांत एकच होते; प्रार्थनासमाज हे नाव तेवढे निराळे. ब्राह्मोसमाजाची मूर्तिपूजेवर श्रद्धा नव्हती. परंतु मूर्तिपूजेचा कडवा विरोधही ते करू शकत नव्हते. याचे कारण बंगाली समाजात मूर्तिपूजेचे प्रस्थ फार होते. महाराष्ट्रात वारकरी समाजात संप्रदायाच्या प्रभावाने मूर्तिपूजा हे भक्तीचे दुय्यम साधन मानले गेले. हिंदुधर्मातच एकंदरीत तत्त्वतः मूर्तिपूजा दुय्यम साधनच मानलेले आहे. हे जरी खरे असले तरी मूर्तिपूजेचा आग्रह बंगाली समाजात तीव्र व दृढ झाला होता. महाराष्ट्रात तसे नव्हते. येथे मूर्तिपूजा हे वैकल्पिक साधन म्हणून सर्वमान्य झाले. त्यामुळे प्रार्थनासमाज मूर्तिपूजेला विरोध करण्यास उघडपणे धजावत होता. महाराष्ट्रातील प्रार्थनासमाजाला भांडारकर व रानडे यांच्यासारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या विद्वान तत्त्ववेत्त्याचे नेतृत्व लाभले. गाढ विद्वत्ता, आधुनिक जीवनदृष्टी, औदार्य व शुद्ध चारित्र्य यांमुळे हे दोघे अखिल भारतात वंद्य झाले. रानडे हे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, संस्कृती व इतिहास या विषयांत निष्णात पंडित होते, आणि भांडारकर हे धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, संस्कृत व प्राकृत साहित्य आणि संस्कृती यांच्यामध्ये अगाढ विद्वत्ता लाभलेले ऋषितुल्य पुरुष होते. प्रार्थनासमाजाचे धर्मविषयक तत्त्वज्ञान विस्ताराने व्याख्यानद्वारा व निबंधद्वारा या दोघांनी अधिकारपूर्ण रीतीने मांडले. नवयुगधर्मप्रवर्तकांच्या मालिकेत हे दोघे प्रमुख होते. त्यांच्या जोडीला १९ व्या शतकातील मुंबई प्रांतातील अनेक कर्तबगार लोकांचा प्रार्थनासमाजात समावेश झाला होता. आधुनिक भारताचे ते प्रबोधनकार होते. आत्माराम पांडुरंग, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, रामचंद्र विष्णु माडगावकर, बाळ मंगेश वागळे, भास्कर हरी भागवत, वामन आबाजी मोडक, दामोदरदास गोवर्धनदास, लालशंकर मियाशंकर, सदाशिव पांडुरंग केळकर, शंकर पांडुरंग पंडित,

श्रीधर रामकृष्ण भांडारकर, प्रभाकर रामकृष्ण भांडारकर, नारायण गणेश चंदावरकर, भोलानाथ साराभाई, विठ्ठल रामजी शिंदे, गोपीनाथ सदाशिव हाटे, बाळकृष्ण निळाजी पितळे, वासुदेव बापूजी कानिटकर, नानाजी वासलेकर, बाळकृष्ण मोरोबा घोत्रे, आनंदराव हरिशंकर, बाळकृष्ण गोविंदजी भाटिवडेकर इत्यादी कितीतरी मंडळी या नवयुगधर्मस्थापनेच्या कार्याला हातभार लावण्यास सरसावली होती.

ब्राह्मसमाजाचा व प्रार्थनासमाजाचाही ध्येयवाद एकच होता. या आदर्श वादाचे पुढील श्लोकात सम्यक् सूत्रीकरण केले आहे :—

सुविशालमिदं विश्वं पवित्रं ब्रह्ममंदिरम् ।
चेतः सुनिर्मलं तीर्थं सत्यं शास्त्रमनश्वरम् ।
विश्वासो धर्ममूलं हि प्रीतिः परमसाधनम् ।
स्वार्थनाशस्तु वैराग्यं ब्राह्मैरेवं प्रकीर्त्यते ॥

अर्थ : " हे खूप विशाल विश्व ब्रह्माचे पवित्र मंदिर, शुद्धचित्त हेच पुण्यक्षेत्र, सत्य हेच शाश्वत धर्मशास्त्र, श्रद्धा हेच धर्ममूल, प्रेम हेच परमसाधन व स्वार्थनाश हेच वैराग्य होय, असे ब्राह्मसमाजी सांगतात."

या समाजाच्या अनेक शाखा पंढरपूर, नाशिक, सातारा, अहमदनगर, पुणे, अहमदाबाद, बडोदे, सुरत, इंदूर, बंगलोर इत्यादी लहानमोठ्या शहरांत स्थापन झाल्या. धर्मप्रचाराचे कार्य करीत असता, समाजसेवेकरताही अनेक संस्था प्रार्थनासमाजाने चालविल्या. गरीब स्त्रीपुरुषाकरिता रात्रीच्या शाळा काढल्या. स्त्रीशिक्षणाकरिता आर्य महिला समाज स्थापन केले. बालहत्याप्रतिबंधक गृहे, अनाथबालकाश्रम, पुस्तकालये व वाचनालये काढली.

ब्राह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज हे विश्वधर्मी असले तरी त्यांच्यातील बहुतेक सदस्य हिंदुधर्मीय समाजातील असल्यामुळे त्यांच्या धार्मिक व नैतिक प्रेरणेचा मुख्य स्रोत उपनिषदे व संतसाहित्यातूनच निघत होता.

महाराष्ट्राच्या धर्मसुधारणेच्या आंदोलनाला प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांनी तात्त्विक अधिष्ठान दिले. त्याचा अर्थ असा. मनुष्याच्या शुद्ध नैतिक जीवनाला ईश्वराचे अधिष्ठान आवश्यक आहे. कारण ईश्वराच्या प्रार्थनेने मनुष्याच्या हृदयातील नैतिक निष्ठा दृढ होते. ईश्वराचे ज्ञान होण्याकरिता धर्मग्रंथ किंवा गुरू यांची अपरिहार्यपणे आवश्यकता नाही. मूळ धर्मग्रंथांचे प्रणेते हेही मनुष्यच होते; ऋषी, प्रेषित, साधू किंवा संत यांना ईश्वराचा प्रत्यय आला ह्याचे कारण, विश्वरचनेचा चमत्कार त्यांना प्रत्ययास आला आणि सर्व मानवांबद्दल व प्राणिमात्रांबद्दल गंभीर सहानुभूती त्यांच्या हृदयात प्रकट झाली, हे होय. शुद्ध नैतिक जाणीव व विश्वरचनेच्या चमत्काराची अनुभूती हीच ईश्वराच्या जाणिवेला प्रकट करते असा ह्या तात्त्विक भूमिकेचा आशय आहे. दुष्ट चालीरीती, गुलामगिरी आणि स्त्री-पुरुषांतील विषमता नष्ट करण्याचे सामर्थ्य अशी तात्त्विक भूमिका दृढ झाल्यामुळेच प्राप्त होते. सामाजिक सुधारणा हे त्याचे प्रत्यक्ष

प्रत्यंतर होय. अशी प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांची भूमिका होती.

या भूमिकेच्या विरुद्ध असा समाजसुधारकांचा भिन्न दृष्टिकोण त्याच वेळी पुढे आला. कै. गोपाळ गणेश आगरकर यांनी तो प्रथम मांडला. कुशाग्र बुद्धिमत्ता व ध्येयवादी जीवन जगण्याची ओढ त्यांना होती. आगरकरांना घरच्या गरिबीमुळे व ध्येयवादी त्यागवृत्तीमुळे निरंतर कष्टाचेच जीवन जगावे लागले. खडतर जीवन व व्याधिग्रस्त शरीर असतानाही त्यांचे मन कधी पिचले नाही. त्यांनी मिल्ल व स्पेन्सर यांचे तत्त्वज्ञानविषयक विचार आत्मसात केले. रूसो, वॉल्तेर, दिद्रो, यांच्या ग्रंथांचे वाचन व चिंतन केले. आगरकर यांनी मानवी इतिहासाचे परिशीलन करून धर्म, राजकारण, समाजरचना व कायदा यांत सतत होत असतो तो बदल इष्ट दिशेने घडून आणण्याकरिता बुद्धिवादाचा अवलंब करावा लागतो असा सिद्धांत निश्चित केला. धर्मतत्त्व व धर्मसंस्था ह्या दोघांनाही बुद्धिवादाचा निकष लावला तरच त्यांच्या गतीचे व स्थितीचे यथार्थ ज्ञान होते, म्हणून बुद्धिवादाचा निकष लावून धर्मांची व हिंदुधर्माची सुंदर समीक्षा आगरकरांनी केली. आगरकर हे अत्यंत समर्थ असे मराठी गद्याचे लेखक होते. केसरी पत्राचे ते प्रथम संपादक होते. १८८७ सालापासून मतभेदामुळे त्यांचा केसरीशी संबंध सुटला व १८८८ मध्ये मोठ्या धडाडीने ‘ सुधारक ’ साप्ताहिक त्यांनी सुरू केले. “ इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार ” या ब्रीदाला अनुसरून त्यांनी सुधारक चालविला. महाराष्ट्रातील मूर्तिभंजकांच्या परंपरेतील आगरकर हे श्रेष्ठ मूर्तिभंजक होते. सामाजिक छळ, दम्याचा विकार आणि दारिद्र्य या मरणांतिक शत्रूंना त्यांनी अखेरपर्यंत तोंड दिले. बौद्धिक प्रामाणिकपणा व निष्कलंक चारित्र्य या गुणांची आगरकर हे मंगलमूर्ती होते.

धर्मसंस्थेबद्दल ते म्हणतात : मॉनवी समाजाला धर्मसंस्थेची यापुढे गरज नाही, कारण धर्मसंस्थेचा मूळ आरंभ अज्ञान व भीती यांतून झालेला आहे. धर्मविषयक कल्पना या माणसाच्या वस्तुस्थितीच्या अज्ञानातून आणि परिस्थितीतील अज्ञात संकटांच्या भीतीतून झालेली आहे. मनुष्यजातीचे ज्ञान जसजसे विकसित होत गेले तसतसा धर्मकल्पनांत परिवर्तन व विकास होत गेला आहे. एकेश्वरवाद ही धर्मकल्पनांच्या विकासाची अंतिम पायरी आहे. मानवजातीने आता या एकेश्वरवादाच्या अंतिम अवस्थेतून आत्मविकासाकरिता व समाजविकासाकरिता बाहेर पडले पाहिजे. असा विचार ‘ सुधारक ’ साप्ताहिकात आगरकरांनी प्रथम मांडला. ‘ धर्मकल्पना आली कोठून ?, ’ ‘ देवता, ’ ‘ देवतोत्पत्ती, ’ ‘ मूर्तिपूजेचा उद्भव, ’ ‘ मूर्तिपूजेचा प्रकार, ’ ‘ देवोत्पत्तीविषयी शेवटचे चार शब्द ’ या लेखांमध्ये धर्मपरिवर्तन व धर्मविकास यासंबंधाची मीमांसा त्यांनी मांडली. शेवटच्या लेखाचा उपसंहार करताना ते म्हणतात, “ मनुष्यांच्या सर्व जातींत अशा प्रकारच्या एका जातीच्या कल्पनांचा प्रादुर्भाव होण्यास सर्वसामान्य असे काहीतरी नैसर्गिक कारण असावे, असे अनुमान करणे प्रशस्त आहे. हे कारण मनुष्याची विशेष प्रकारची शारीरिक व मानसिक रचना होय, दुसरे

काही नाही. वेद, कुराण, बायबल वगैरे सर्व प्रकारच्या धर्म-पुस्तकांत आणि मनू, महंमद, ख्रिस्त, कन्फ्यूसियस वगैरे सर्व देशांतील धर्मकर्त्यांच्या किंवा धर्मसंस्थापकांच्या डोक्यात ज्या कल्पना आल्या त्या मनुष्याच्या अशा प्रकारच्या प्रकृतीमुळे आल्या, आणि म्हणूनच त्यात इतके साम्य आहे. यासारखीच पुराणांची अवस्था आहे. आकाशातून देव येथे कधी आले नाहीत व येथून परत कधी गेले नाहीत. आम्हीच त्यांना येथल्या येथे निर्माण करतो, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातो, आणि चाहील तेव्हा त्यांस नाहीसे करतो. जो जो बुद्धीचा विकास होत जाऊन कार्यकारणांचा संबंध चांगला कळू लागतो, तो तो प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासू लागून भूत–पिशाच, देव–दानव, वगैरे शुद्ध कल्पनेने उत्पन्न केलेल्या शक्तींची असत्यता प्रत्ययास येते. पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते आणि काही वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचे परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढे वेदांत-विचारांच्या कुंडात पेटलेल्या अग्नीत हे द्वैतही खाक होऊन जाते आणि 'अहं ब्रह्मास्मि' एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो. व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत" अशा प्रकारे आगरकरांनी धर्माधिष्ठित समाजसुधारणेचा विचार अमान्य करून मानवी स्वातंत्र्य व समता या मूल्यांवर आधारलेला सामाजिक सुधारणेचा विचार विस्ताराने मांडला. या सामाजिक सुधारणेत राजकीय सुधारणाही त्यांनी अंतर्भूत केली होती.

आगरकरांच्या सामाजिक सुधारणांच्या विचारसरणीची प्रेरक शक्ती एका दृष्टीने जबरदस्त ठरली व दुसऱ्या दृष्टीने निर्बल ठरली. आगरकरांच्या उदयापासून मराठी साहित्याचे नवे युग निर्माण झाले. कविता, कादंबरी व नाटक यांना नवा सामाजिक आशय आगरकरांच्या मुळे प्राप्त झाला. नवा सामाजिक आशय ज्या साहित्याला प्राप्त झाला ते अग्रस्थानी विराजमान होऊ लागले. तीच परंपरा आतापर्यंत चालू आहे. परंतु प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तन करण्यात आगरकरांच्या विचाराला आवश्यक तेवढे यश मिळाले नाही.

हजारो वर्षांचे हिंदुसमाजाचे रूढिनिष्ठ, चैतन्यशून्य, दगडासारखे अगतिकत्व मोडण्यास हे आंदोलन असमर्थ ठरले. सत्यशोधक चळवळीचे नंतर ब्राह्मणेतर चळवळीत रूपांतर झाले. सुशिक्षित पांढरपेशा समाज फारसा बदलला नाही किंवा हालला नाही, खेड्यातील व शहरातील बहुजनसमाजाला या आंदोलनाची दादही लागली नाही. याचे कारण तो निरक्षरतेच्या अंधकारात निद्रावश झाला होता. जोतिबा फुले यांची सत्यशोधक चळवळ ग्रामीण बहुजनसमाजाला अंधश्रद्धेच्या तंद्रीतून जागृत करण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु १८९० मध्ये जोतिबा फुले निवर्तले व त्यांच्या चळवळीची ज्योतही त्यांच्याबरोबरच मालवली. ही १९ व्या शतकाच्या अखेरची परिस्थिती होय.

कोल्हापूर येथे श्रीछत्रपती शाहूमहाराजांची कारकीर्द २० व्या शतकाचे प्रारंभी चमकू लागली. शाहूमहाराजांच्या कारकीर्दीत सत्यशोधक चळवळीची ज्योत पुन्हा

पेटू लागली. शाहूमहाराजांना जातिभेद नको होता, परंतु गुणकर्मांवर आधारलेली चार्तुवर्ण्य व्यवस्था पुनरुज्जीवित करावयाची होती. जोतिबा फुल्यांच्या वेदशास्त्रे वा कोणतेही धर्मग्रंथ प्रमाण न मानणाऱ्या विश्वधर्मापेक्षा वेदनिष्ठ आर्यसमाजाचा हिंदू समाजाला आधुनिक सामाजिक सुधारणेच्या द्वारे पुनरुज्जीवित करण्याचा व जाति-भेदरहित अशा केवळ गुणकर्मांवर आधारलेल्या चातुर्वर्ण्याच्या तत्त्वावर हिंदू समाजाची पुनर्घटना करण्याचा विचार व कार्यक्रम अधिक पसंत होता. या कलियुगात ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण अस्तित्वात आहेत; क्षत्रिय व वैश्य हे वर्ण कलियुगात नाहीत; अशी दक्षिण भारतात व महाराष्ट्रात समजूत होती. या समजुतीप्रमाणे ब्राह्मण पुरोहित ब्राह्मणेतरांच्या घरी वेदोक्त कर्म करण्यास विरोध करीत. पुनः चातुर्वर्ण्य स्थापण्याकरिता गुणधर्मांनी क्षत्रिय व वैश्य असलेल्यांच्या घरी ब्राह्मणांनी वेदोक्त कर्मे चालू करावी, वेदमंत्रांनी ब्राह्मणेतरांच्या घरची उपनयन, विवाह, अंत्यकर्म, पूजा, प्रतिष्ठा, उत्सव-समारंभ ब्राह्मणांनी पार पाडावेत याकरिता वेदोक्ताचे आंदोलन श्रीछत्रपती शाहू-महाराजांनी सुरू केले. संकेश्वर येथील शंकराचार्यांच्या पीठाची जहागिरी मोठ्या प्रमाणात कोल्हापूर संस्थानच्या हद्दीत होती. संकेश्वर येथील शंकराचार्यपीठास करवीर-पीठ म्हणत. या पीठाच्या आचार्यांनो वेदोक्तास मान्यता द्यावी, असा प्रयत्न शाहू-महाराजांनी केला. त्याकरिता त्यांनी वेदोक्तास मान्यता देणारे श्री. कुर्तकोटी यांची त्या पीठावर स्थापना केली. आर्यसमाजाची एक शाखाही कोल्हापूर येथे निर्माण झाली. परंतु पुण्यातील व एकंदर महाराष्ट्रातील ब्राह्मणजातीय पुरोहितांचा व पंडितांचा वर्ग व पुण्यातील लो. टिळकांसारखे नेते किंवा सुशिक्षित ब्राह्मण पुढारी या वेदोक्ताच्या विरोधी होते. वाई येथे वैदिक ब्राह्मणांचा मोठा वर्गही वेदोक्ताच्या विरोधी होता. त्यामुळे शाहूमहाराजांची ही वेदोक्त चळवळ मूळ धरेना. त्यामुळे भास्करराव जाधवांच्या वैचारिक नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळ प्रबळ झाली व वाढली. ह्या चळवळीत बहुजनसमाजातील सुशिक्षित लोक सामील झाले व या चळवळीचा परीघ वाढला. त्यात जैन, मुसलमान यांच्यातील प्रतिष्ठित मंडळीही सामील झाली. भास्करराव जाधव यांना पोथीप्रामाण्य मान्य नव्हते. परंतु या चळवळीच्या कार्यक्रमात हिंदुधर्मसुधारणेचाही कार्यक्रम अंतर्भूत झाला होता. मार्टिन ल्यूथरने ज्याप्रमाणे पुरोहित वर्चस्वाविरुद्ध आंदोलन केले तसेच हे आंदोलन आहे असे भास्करराव जाधव म्हणत. ब्राह्मणेतर पुरोहितवर्ग वेदोक्त संस्कार करण्याकरिता तयार करण्याचा प्रयत्न झाला. त्याकरिता क्षात्र जगद्‌गुरूचे पीठही तयार करण्यात आले. परंतु या हिंदुधर्मसुधारणेच्या कार्यक्रमापेक्षा बहुजनसमाजाच्या ब्राह्मणविरोधी जागृतीलाच अधिक महत्त्व आले. ब्राह्मण, गुजराती व मारवाडी सावकार यांच्या जबरदस्त सावकारी पिळवणुकीने चिडलेले ग्रामीण शेतकरी व उदीमधंद्याचे लोक या चळवळीत सामील झाले. ब्राह्मणांच्या हाती राजकीय चळवळीचे नेतृत्व होते व सरकारी नोकरवर्गात ब्राह्मणवर्गाचाच वाजवीपेक्षा अधिक भरणा झालेला होता. ब्राह्मण सरकारी नोकरांमुळे सावकारी पिळवणूक अखंडपणे चालू

होती. सावकारी कर्जाचा बोजा वाढत जाई व कर्ज न फिटल्यामुळे शेतजमिनी सावकारांच्या घशात पडत. ब्राह्मणांचे राजकीय नेतृत्व व ब्राह्मणांनी व वाण्यांनी चालविलेले आर्थिक शोषण याच्याविरुद्ध सत्यशोधक चळवळीला उग्र स्वरूप प्राप्त झाले, ती ब्राह्मणेतर चळवळ बनली. त्यामुळे जोतिबा फुल्यांचा स्वातंत्र्य, समता व मानवी बंधुत्व यांच्यावर आधारलेला विश्वधर्म दृष्टिआड झाला. परंतु या ब्राह्मणेतर चळवळीबरोबर धर्मसुधारणेच्या चळवळीने महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजातही १९२० नंतर पुनः मान वर काढली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत ही चळवळ दडपली गेली होती. परंपरागत समाजरचनेचे समर्थन व प्राचीन संस्कृतीतील शाश्वत अध्यात्मवादाचा पुनरुद्धार करणारी प्रवृत्ती या सुमारास फार बळावली. स्वामी विवेकानंद यांनी भारतीय संस्कृतीच्या भारतीय वेदान्ताच्या व अध्यात्मवादी रहस्याच्या उदात्ततेचे उत्कृष्ट व भव्य समर्थन केले; त्यामुळे विवेकानंदांना दिगंत कीर्ती लाभली. स्वामी रामतीर्थ, योगी अरविंद घोष, लो. टिळक, राधाकृष्णन् इत्यादिकांनी भगवद्गीता व उपनिषदे यांच्या आधारे देदीप्यमान असे प्रबंध व निबंध प्रसिद्ध केले. विवेकानंदादी तत्त्वज्ञ समाज-सुधारणेच्या विरुद्ध नव्हते, परंतु त्यांच्या अध्यात्मवादाच्या नव्या मांडणीमुळे हिंदु-धर्मावर अधिष्ठित असलेल्या सामाजिक रूढी व जातिभेद यांचे समर्थन करणारे निबंध व प्रबंधही प्रसिद्ध होऊ लागले. विधवाविवाह, जातिभेदनिरास, प्रौढविवाह, इत्यादिकांना उत्तेजन देणाऱ्या संस्थांची व सुधारकांची अवहेलनाही सुरू झाली. नास्तिक्य, व्यभिचार, सुरापान आणि मांसाहार या पापांनी सुधारक पछाडले आहेत असाही आरोप निंदकांनी सुरू केला. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकारचे आरोप सुधारकांवर होऊ लागले. किंबहुना समाजसुधारणेच्या प्रवृत्तीच्या मुळाशी या पापाचाराची वासनाच आहे, असाही प्रचार होऊ लागला. या प्रतिक्रियेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य महादेव शिवराम गोळे यांनी लिहून १८९८ मध्ये प्रसिद्ध केलेले "हिंदुधर्म आणि सुधारणा" हे पुस्तक (पृ. ४०७) होय. 'श्री. विद्याधर पंडित' या टोपण नावाखाली त्यांनी हे पुस्तक लिहिले. हा मराठी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ म्हणून त्या वेळेस ठरविला गेला होता. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ग्रंथकार प्रा. गोळे म्हणतात की, "जुन्या धर्मास व रूढीस जेवढे उदात्त व उत्कृष्ट स्वरूप देण्याचा प्रयत्न करवेल तेवढा या ग्रंथात विद्याधराने केला आहे. सुधारकांचीही सुधारणा झालीच पाहिजे; सुधारक युरोपीय तत्त्ववेत्त्यांची मते सामाजिक संस्थांस लावून त्यांचे गुण नाकारतात; स्वधर्माच्या तत्त्वांचे पुष्कळसे अज्ञान व परदेशीय तत्त्ववेत्त्यांच्या विचाराचे पुष्कळसे ज्ञान अशी ही स्थिती या आमच्या देशात राजकीय कारणांमुळे उत्पन्न झाली आहे. इंग्रजी शिक्षणाचे सामाजिक दुष्परिणाम होऊन सुधारणावाद उत्पन्न झाला आहे." या ग्रंथात जातिभेद व त्यातील उच्चनीच भाव हे मानवी सद्गुणास अत्यंत पोषक व विकासवादाशी सुसंगत आहेत, असे समर्थन केले आहे; आणि स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही तत्त्वे अव्यवहार्य व विकास-

वादविरोधी आहेत म्हणून त्याज्य ठरविली आहेत; बालविवाह, विधवाविवाह-निषेध इत्यादी चाली कौटुंबिक स्थैर्यास कशा कारण झाल्या आहेत याचे प्रगल्भपणे विवरण केले आहे.

१९२० सालानंतर ही सुधारणाविरोधी प्रतिक्रिया विराम पावू लागली. महाराष्ट्रातील ब्राह्मण संस्कृत पंडितांमध्ये धर्मसुधारणेचा व समाजसुधारणेचा पुरस्कार करणारे काही पंडित उदयाला आले व त्यांनी तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी मंडळ स्थापिले. वाई येथील ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती, मुंबईतील भारतरत्न पां. वा. काणे व नागपूर येथील विद्वद्रत्न कै. के. ल. दप्तरी हे तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी मंडळाचे अग्रणी होत. हिंदुधर्मग्रंथांचेच आलोडन करून धार्मिक व सामाजिक सुधारणा कशा इष्ट आहेत याचे समर्थन या मंडळींनी सुरू केले व सर्व हिंदूंना समान असे वेदोक्त कर्मकांड संक्षेपाने सुरू केले. स्वामी केवलानंद यांनी असा विचार मांडला : वेद व स्मृती यांचा अर्थ करण्याच्या मीमांसापद्धती व ऐतिहासिक पद्धती अशा दोन पद्धती आहेत. सर्व वेद व सर्व स्मृतिग्रंथ यांच्यामध्ये परस्परविरोध नाही; विरोध दिसतो तो पूर्वमीमांसाशास्त्राच्या आधारे निरसन करता येतो; सर्व धर्मशास्त्रग्रंथांच्या मध्ये एकवाक्यता आहे; असा मीमांसापद्धतीचा आशय आहे. परंतु ही पद्धत बरोबर नाही; वेद व स्मृतिग्रंथ हे भिन्न भिन्न देशकालपरिस्थितीमध्ये उत्पन्न झाले असून, त्या त्या देशकालपरिस्थितीप्रमाणे ऋषिमुनींनी किंवा तज्ज्ञांनी धर्मपरिवर्तन केले असल्यामुळे वेद व इतर धर्मशास्त्रे यांच्यामध्ये परस्परविरोध आढळतो व त्यांचा समन्वय होऊ शकत नाही. म्हणून मीमांसापद्धती टाकून ऐतिहासिक पद्धतीने धर्मग्रंथांचा अर्थ करावा. स्वामी केवलानंदांनी ऐतिहासिक पद्धती स्वीकारून जातिभेद ही संस्था व स्मृत्युक्त किंवा रूढिप्राप्त स्त्री-पुरुषसंबंधांचे नियम सद्यःपरिस्थितीत समाजकल्याणाच्या अनुरोधाने बदलले पाहिजेत असा सिद्धांत मांडला. श्री. पां. वा. काणे यांनी इंग्लिशमध्ये अनेक खंडात्मक धर्मशास्त्राचा इतिहास विस्ताराने लिहून या ऐतिहासिक पद्धतीचे समर्थन केले. या ग्रंथास आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली आहे.

विद्वद्रत्न कै. के. ल. दप्तरी यांनी अधिक खोलात जाऊन 'धर्मरहस्य' व 'धर्मविवादस्वरूप' ह्या दोन ग्रंथांत धर्ममीमांसा मांडली आहे. धर्माचे चोदनालक्षण व निःश्रेयस लक्षण अशी दोन स्वरूपे त्यांनी सांगितली. विद्वान, शीलसंपन्न, त्यागी व निष्काम बुद्धीचे समाजनेते म्हणजे ऋषी, समाजहिताकरिता जे धर्मनियम सांगतात ते धर्मनियम म्हणजे चोदनालक्षण धर्म होय. चोदना म्हणजे आज्ञा. या आज्ञा काळ बदलला किंवा मन्वन्तर झाले म्हणजे बदलतात. शीलसंपन्न साधू लोक समाजाची धारणा होण्याकरिता व समाजाची अवनती टाळण्याकरिता वेळोवेळी एकत्र येऊन प्राचीन काळी विचारविनिमय करीत व जुने धर्म बदलून नवे धर्मनियम सादर करीत. हे साधू म्हणजेच ऋषी होत. मनू म्हणजे त्या ऋषींनी सांगितलेल्या नियमांना धरून समाजाचे प्रशासन चालविणारा समाजशास्ता होय. भारतात प्राचीन काळी सप्तर्षिसंस्था व मनुसंस्था होती. काळ पालटला म्हणजे मन्वन्तर होई. असे अनेक मनू झाले व अनेक सप्तर्षी झाले. या सप्तर्षिसंस्थेने वारंवार विवाहपद्धती बदलली व चातुर्वर्ण्यव्यवस्थ

गुणकर्मानुसार पुनःपुनः स्थापन केली. मनुसंस्था व सप्तर्षिसंस्था बंद पडल्यावरच जातिभेदसंस्था अस्तित्वात आली व दृढ झाली. असा हा मन्वतंरांचा, सप्तर्षिसंस्थेचा आणि धर्मपरिवर्तनाचा इतिहास धर्मग्रंथाच्या आधारे वरील दोन ग्रंथांत विशद करून सांगितला आहे. चोदनालक्षणधर्माचे स्वरूप व इतिहास सांगण्याच्या अगोदर श्री. दप्तरी यांनी निःश्रेयस लक्षणधर्म म्हणजे काय याचे प्रतिपादन केले आहे. ते म्हणतात :– एकंदरीत अतिशय उच्चतर सुखाची प्राप्ती ज्यापासून होते ते कर्म म्हणजे निःश्रेयसलक्षणधर्म होय; चोदनालक्षणधर्म कोणते व कोणते नाहीत याचे गमक प्रमाण निःश्रेयसलक्षणधर्म होय. श्री. दप्तरी यांनी ईश्वरविषयक व परलोकविषयक चर्चा धर्मविषयक निर्णयाच्या प्रसंगी टाळावी असे म्हटले आहे, कारण ईश्वराचे वा परलोकाचे ज्ञान होण्याचे कोणतेही साधन मानवास उपलब्ध नाही. इहलोकी मानवसमाजाची ज्याच्या योगाने धारणा व उत्कर्ष होतो त्यानेच परलोकी हित वा कल्याण होते, असे गृहीतकृत्य स्वीकारूनच धर्मचिंतन करावे असा श्री. दप्तरी यांचा आशय आहे. ईश्वरविषयक विचार वगळल्यास प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांच्या धर्मचिंतनाशी सुसंगत असलेलाच हा धर्मविचार आहे.

गेल्या दीडशे वर्षांतील धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या आंदोलनामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणेचे पाऊल वेगाने पुढे पडत आहे. कायद्याच्या क्षेत्रावर याचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. कायद्याने सतीची व बालविवाहाची चाल बंद पाडली. कायद्याने विधवा–विवाह मान्य झाला. घटस्फोटाचा हक्क स्त्री-पुरुषांना कायद्याने प्राप्त झाला. हिंदू, बौद्ध व जैन यांची आंतरजातीय लग्ने कायदेशीर ठरली. कायद्याने स्त्रियांना संपत्तीचा वारसाहक्क पुरुषांसमान मिळाला. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली व सर्व जाती व धर्म यांचे सहभोजन समाजमान्य झाले. दीडशे वर्षांपूर्वीच्या हिंदूसमाजाच्या रूढी व कायदे व विद्यमान हिंदू समाजाच्या रूढी व कायदे यांच्यात जमीन अस्मानाइतकी तफावत झाली. याचे श्रेय भारतातील व महाराष्ट्रातील धर्मपरिवर्तनाच्या आंदोलनाला आहे.

महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाज

एलायस बी. रॉड्रिग्ज

पूर्वापार संदर्भ :

येशू ख्रिस्ताने स्थापन केलेल्या ख्रिस्तमंडळाचा वेध जेव्हा आपण पवित्र बायबल आणि जिवंत ख्रिस्ती परंपरा यांची कास धरून घेऊ लागतो तेव्हा ख्रिस्ती धर्माच्या इतिहासाच्या कोंदणात ख्रिस्तमंडळाचे स्वरूप आणि कार्य सत्याच्या प्रकाशात उजळून निघते. ज्या इस्राएली प्रजेतून दाविद घराण्यात मरिया नावाच्या कुमारिकेच्या उदरी येशू जन्माला येतो त्या प्रजेला स्वतः परमेश्वराने स्वतःच्या अतर्क्य पद्धतीने धार्मिक स्वरूपाची तालीम देऊन येशूच्या आगमनासाठी 'माझी लाडकी प्रजा' 'पवित्र जनता' म्हणून एकसंघटित केले होते. येशू ख्रिस्त जन्माला आला त्या काळाचे वर्णन पवित्र बायबलमध्ये परिपक्व वेळ[1] म्हणून करण्यात आले आहे, यावरून अखिल जगाला मंत्रमुग्ध करणारे येशू ख्रिस्ताच्या जीवनाचे नाटक अनेक शतकांच्या जगड्व्याळ पूर्वतयारीने सुसज्ज केलेल्या सृष्टीच्या रंगमंचावर सुरू होते हेच सिद्ध होते. बाळ, कामगार, हितचिंतक, मदतनीस, मित्र, शेजारी, नातेवाईक, नेता, गुरू इत्यादी कौटुंबिक आणि सामाजिक नाती जोडून मानवी जीवन-झगड्याशी, संसारलढ्याशी तो समरस होतो, तादात्म्य पावतो. जगाला अध्यात्मनिष्ठ प्रेमाचा, ऐक्याचा आणि शांतीचा संदेश देताना हे त्याचे कार्य अविरतपणे पुढे चालू ठेवण्यासाठी व्यक्तिशः बारा प्रेषितांची निवड करून त्यांच्या भरभक्कम पायावर त्याचे पवित्र ख्रिस्तमंडळ उभारतो. त्या ख्रिस्तमंडळाला धार्मिक आणि नैतिक प्रांगणात अधिकार देऊन अखिल मानवतेतून नव्या इस्राएलची (ISRAEL KATA PNEUMA) म्हणजेच देवसमाजाची निर्मिती, जोपा-

....

१. The New English Bible (1970) Galasians 4 : 4

सना नि वाढ करण्याचे कार्य त्याच्यावर सोपवितो. येशूच्या जीवननाटकावर पडदा पडतो तेव्हा त्याने स्थापिलेले खिस्तमंडळ त्याच्या पुनरुत्थानाच्या दिग्विजयाने म्हणजेच पवित्र आत्म्याच्या प्रभावाने भारले जाऊन जगभर पसरते. गेली दोन हजार वर्षे ह्या विश्वव्यापी खिस्तमंडळाचे मातृवात्सल्य मानवतेला जातिवंत समाजवृत्तीचे बाळकडू पाजून मानवतेतून नवसमाज निर्माण करण्यात क्रियाशील असलेला आढळात येतो. उभ्या महाराष्ट्रातील ७२६ हजार[२] लोकांचा खिस्ती समाज याच महान परंपरेचा अविभाज्य घटक म्हणून वारस आहे हे लक्षात घेतले म्हणजेच या समाजाचे जगातील एकशे पावणेतीन कोटी[३] विद्यमान खिस्ती लोकांशी आणि आजपर्यंत ज्यांना ज्यांना खिस्तावरील श्रद्धेत मृत्यू आला त्या सर्वांशी असलेल्या खिस्ताधिष्ठित ऐक्याचे स्वरूप समजून घेणे सुलभ जाईल, आणि जागतिक खिस्तमंडळाचे स्वरूप व कार्य लक्षात घेता पर्यायाने महाराष्ट्रातील खिस्ती समाजाच्या रचनास्वरूपावरही प्रकाश पडेल.

खिस्ती समाज : देवाचे राज्य

देवाघरचा जो जीवनदायक संदेश जगाला देण्यासाठी देवपुत्र मानव झाला होता त्या संदेशाची अस्सल कल्पना असल्याशिवाय खिस्तमंडळाची खरी आवश्यकता आणि त्याचे स्वरूप व महत्त्व कळणे दुर्घट आहे. जे 'शुभवर्तमान' (Gospel) प्रकट करण्यासाठी येशू ख्रिस्ताने त्याचे आयुष्य घालविले त्याचा गोषवारा किंवा त्याची मध्यवर्ती कल्पना शुभवर्तमानकार मार्क याच्या भाषेत "देवाचे राज्य जवळ येऊन ठेपले आहे"[४] अशाप्रकारे शब्दांकित करण्यात आली आहे. 'देवाचे राज्य' (Basileia tou theou) या संकल्पनेभोवती आपला संदेश केंद्रित करून येशूला नक्की काय सशब्द करायचे होते ? इस्रायलच्या इतिहासातून आपणास कळते की, 'तुम्ही माझी प्रजा आहात; आणि मी तुमचा स्वामी आहे'[५] हे सत्य प्रत्येक व्यक्तीच्या हृदयावर कोरून ठेवण्यासाठी, प्रत्येक व्यक्तीला आपल्या स्वतःच्या आधिपत्याखाली आणण्यासाठी, प्रत्येकाचे संपूर्ण जीवन देवनिष्ठ करण्यासाठी याहवे (=देवप्रभु) अनेक मार्गसाधनांची उपयोजना करतो. 'पुढे भावी काळात "देवाचे राज्य" सुरू होणार, अशी आकांक्षा तो हळूहळू इस्राएली जनतेत निर्माण करतो. देवाच्या राज्याविषयीची ही आध्यात्मिक आकांक्षा मूर्त रूप कधी घेईल अशी मार्गप्रतीक्षा करीत राहिलेल्या इस्राएली जनतेस येशू ठामपणे सांगतो की देवाच्या राज्याची वाट बघण्याची वेळ

२. Maharashtra Government Census of 1960 with addition of 10% increase for the last ten years.

३. L'osservatore Romano, English edition Oct. 15, 1970.

४. NEB, Mark 1 : 15.

५. Ibid, Exodus 6 : 6–8.

आता टळली आहे. ते तुम्हामध्ये आले आहे. 'देवाचे राज्य' ही जी कल्पना येशूने त्याच्या संदेशाची गंगोत्री म्हणून उपयोजिली तिच्या सामाजिक आशयावर मुख्यत्वे-करून येशूला भर द्यावयाचा होता. देवावर आपल्या जीवनाचा पूर्ण हवाला टाकून देव आपला खराखुरा पिता आहे ह्या सत्यावर जीवन उभारून आपण सर्वजण-बंधुभगिनी म्हणून एक परिवार, एक समाज म्हणून जगणे; देवाला आणि अन्या माणसांना सामोरे जाण्यास सिद्ध असणे; देवासाठी आणि माणसासाठी निःस्वार्थ प्रीती बाळगणे; आपल्या वैयक्तिक जीवनात खिस्तावर अव्यभिचारी श्रद्धा ठेवून त्याच्याशी एकनिष्ठ राहणे; त्याचे प्रभुत्व मान्य करणे; पाप आणि सैतान यांना आपल्या जीवनात थारा न देता नम्रता, सौजन्य, प्रामाणिकपणा, निरपेक्ष प्रेम, आणि पावित्र्य संपादन करण्यासाठी प्रयत्नशील उत्सुकता दाखविणे म्हणजेच देवाचे राज्य सुरु झाल्याची ग्वाही देणे होय. येशूचे पर्वतावरील प्रवचन[६] याच संदेशाचा खुलासा करते. "आमचे पित्या"[७] ह्या सहजसुंदर आणि अर्थनिर्भर प्रार्थनेद्वारे येशूने हेच सत्य अत्यंत प्रभावाने प्रतिभाशाली रूपात प्रकट केले आहे. परंतु अशा प्रकारचे देवनिष्ठ, पवित्र जीवन माणसाला स्वतःच्या दुबळ्या सामर्थ्यावर विसंबून जगता येणे शक्य नसते. तर केवळ खिस्ताच्या सामर्थ्यामुळे ते शक्य होते. सैतानाचा, पापाचा, दुष्ट शक्तींचा पराभव करणे वळ देवालाच शक्य आहे. महाराष्ट्रीय संतांपैकी नामदेव–तुकोबांनी आपल्या अभंगांतर के सत्य मोठ्या शरणागतीने भावपूर्ण शब्दांत व्यक्त केले आहे. प्रत्यक्ष देवाच्या जीव नाचा रसार्द्र प्याला विकल, स्खलनशील माणसाला आस्वादिण्यास देणे केवळ देवाच्य, दयेवर, कृपेवर अवलंबून असते. म्हणून जो कोणी खिस्ताच्या जीवन-मरण-पुनरुत्था-नाच्या मूल्यावर श्रद्धा ठेवतो, स्वतःच्या मरणगर्भ जीवनाचे खिस्ताच्या पुनरुत्थित मरणातीत जीवनावर कलम करतो तोच खिस्तामध्ये साकार झालेल्या देवराज्याचा नागरिक बनू शकतो; त्याच्याच जीवनात देवाचे राज्य येते. म्हणजेच देवराज्यात सामील होण्यासाठी खिस्ताच्या नेतृत्वाखाली आपण गोळा झाले पाहिजे. खिस्ताने दिक्कालाची लक्षणे ओळखून त्याचे नेतृत्व त्याच्या प्रेषितांना आणि प्रेषितांच्या आश्रयावर आधारलेल्या खिस्तमंडळाला देऊन ठेवले असल्यामुळे, खिस्तमंडळ हाच येशूद्वारे देवराज्यात सामील होण्याचा मार्ग आहे. देवाच्या तारणयोजनेचे प्रकटीकरण आणि ती योजना पा पाडण्यासाठी लागणारे सामर्थ्य येशूने खिस्तमंडळाच्या स्वाधीन केल्यामुळे खिस्तमंडळ हें एकाच वेळी खिस्ताठायी साकार झालेल्या देवराज्याची फलश्रुती आणि जगात देवराज्य प्रस्थापित करण्याचे अधिकृत साधन आहे.[८]

६. Ibid, Mathew 5 : 7

७. Ibid, Mathew 6 : 9-13.

८. Tractatus De Ecclesia, By J. Lerch. P. 12 f.

ख्रिस्ती समाजाचे आध्यात्मिक स्वरूप

श्रद्धावंत व्यक्ती जेव्हा स्नानसंस्कार (बाप्तिस्मा) स्वीकारते तेव्हा स्नानसंस्काराच्या विधिद्वारे ती व्यक्ती ख्रिस्ताच्या मरण-पुनरुत्थानात सहभाग मिळवीत असते. परंतु ख्रिस्ताच्या शरीराचा विचार केल्याशिवाय त्याच्या मरण-पुनरुत्थानाची कल्पनाच करता येणार नाही. म्हणून स्नानसंस्काराद्वारे ख्रिस्ती मनुष्य ख्रिस्तशरीराचा घटक बनत असतो असे संत पॉल यास म्हणावयाचे आहे.[९] मात्र या कल्पनेद्वारे त्यास नक्की कोणता आशय व्यक्त करायचा आहे हे समजून घेण्यासाठी आपण संत पॉलच्या यहुदी संस्कृतीच्या संदर्भात ' शरीर ' या प्रतिमेचा विचार करावयास हवा. आत्म्याच्या विरुद्ध शरीर या ग्रीक अर्थाने शरीर समजून चालणार नाही तर यहुदी लोकांना शरीर हा शब्द व्यक्ती, संपूर्ण व्यक्तिगत जीवन या पूर्णार्थाने अभिप्रेत होता हे लक्षात घेऊन ख्रिस्ती मनुष्य ख्रिस्ताशी एकशरीर होतो असे जेव्हा संत पॉल म्हणतो तेव्हा ख्रिस्ती मनुष्य पुनरुत्थित ख्रिस्ताच्या जीवनरसावर जगत असतो, पुनरुत्थित ख्रिस्ताशी तो एकार्थाने एकात्म झालेला असतो, हाच अर्थ त्याला अभिमत असलेला दिसतो. पुनरुत्थित ख्रिस्ताला पॉल जेव्हा ' जीवनदायक आत्मा '[१०] असे संबोधितो तेव्हा ख्रिस्ती माणसाचे जीवन व पुनरुत्थित ख्रिस्ताचे जीवन एकाच उगमातून जन्म घेत असते ही गोष्ट स्पष्ट होते. अर्थात, ख्रिस्ताशी जीवननिष्ठ ऐक्य साधलेल्या ख्रिस्ती समाजात जात, लिंग, सामाजिक दर्जा, वर्ण या भेदक गोष्टींना मुळीच वाव नसतो हे आणखी निराळे सांगायला नको आहे. स्नान-संस्कारातून जन्मास आलेले ख्रिस्ती माणसाचे हे ख्रिस्त जीवननिष्ठ ऐक्य ख्रिस्तप्रसाद संस्काराने (कम्युनियनद्वारे) पोसले जाते, घनिष्ठ केले जाते. " आम्ही जरी अनेकजण असलो तरी एकाच शरीरात व एकाच रक्तप्याल्यात सहभाग घेणारे आम्ही ख्रिस्ताठायी ' एकशरीर ' म्हणून जडले-घडलेलो आहोत. '[११] आणि म्हणूनच शरीरातील निरनिराळ्या अवयवांप्रमाणे आम्ही ख्रिस्ताशी तसेच परस्परांशी देखील निगडित झालो आहोत.[१२]

पुढे हाच प्रेषितमुकुटमणी जेव्हा ख्रिस्ताला ख्रिस्तमंडळाचे शिर म्हणून संबोधितो तेव्हा सर्व अधिकार आणि प्रभुत्व प्रभू ख्रिस्ताच्या हाती आहे हे तर त्याला सुचवायचे असतेच पण त्याचबरोबर ख्रिस्ताचे ख्रिस्तमंडळावरील अतोनात प्रेमही त्या प्रतिमेत अनुस्यूत असते. ज्याप्रमाणे पती आपल्या पत्नीवर एकप्रकारे अधिकार आणि प्रभुत्व चालवून तिच्यावर संपूर्ण अंतःकरणाने प्रीती करीत असतो त्याचप्रमाणे प्रभू ख्रिस्त

९. NEB, Romans 6 : 1–11.

१०. Ibid, 1 Corinthians 15 : 45; Ephesians 2 : 5.

११. Ibid, 1 Corinthians 10 : 16 f.

१२. Ibid, Romans 12 : 5.

ख्रिस्तमंडळावर प्रेमाची बरसात करीत असतो.[१३]

ख्रिस्ती समाजाचे काही लक्षणीय विशेष

शांतताप्रियता, धर्मसंस्थांची सुव्यवस्थित रचना, धर्म, विज्ञान आणि राजकारण यांची सांगड घालू इच्छिणारी जागरूकता, परिशुद्ध नीतिमत्तेची चाड इत्यादी गुणांबरोबर महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजात प्रखरतेने जाणवणाऱ्या तीन विलोभनीय वैशिष्ट्यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. प्रार्थनापरायणता, प्रेमपूर्ण सेवावृत्ती आणि धर्मप्रचाराची तळमळ.

आयुष्यात मनुष्य प्रार्थनेपेक्षा उत्कृष्ट असे काही करू शकतो हे ख्रिस्ती माणसाला तरी पटत नसते. परमेश्वराशी हृदयसंवाद करून त्याच्या प्रकाशात आपल्या निरर्थक वाटणाऱ्या जीवनाला परमेश्वराचा परमेश्वराइतका मोठा ध्यास लावून घेणे हीच खऱ्या अर्थी मोठे होण्याची सुरुवात असते. ख्रिस्ती मनुष्य निरनिराळ्या विधी किंवा प्रार्थना करीत असतो तेव्हा जिवंत, पुनरुत्थित येशू ख्रिस्तामध्ये प्रत्यक्ष परमेश्वराला भेटण्याचा प्रयत्न तो करीत असतो, नव्हे, भेटत असतो. कारण ख्रिस्ताच्या 'मागा म्हणजे मिळेल' आणि 'जेव्हा तुम्ही माझ्या नावे एकत्र येता तेव्हा मी तुमच्यामध्ये उपस्थित असतो' या वचनावर त्याची श्रद्धा असते. म्हणूनच वैयक्तिक प्रार्थनेबरोबर सामुदायिक, सांघिक प्रार्थनेला ख्रिस्ती समाजात महत्त्वपूर्ण स्थान मिळत असते. शिवाय ख्रिस्ती माणसाची प्रत्येक प्रार्थना येशूद्वारे आणि येशूसह होत असते हे लक्षात घेतल्यावर त्याच्या प्रार्थनेकडे परमेश्वराचे दुर्लक्ष होणे शक्यच नाही; अशीही त्याची धारणा असते. प्रार्थना माणसाला आणि समाजाला कृतीपासून पराङ्मुख करीत नसते तर उलट माणसाच्या आणि समाजाच्या कार्यक्षमतेला ती नवीन दिशा व धार देत असते असा ख्रिस्ती समाजाचा अनुभव आहे. प्रार्थना हे मानवातील महोत्तम गुण विकसित करण्याचे दिव्य तरीही मनुष्यसुलभ असे साधन आहे. हे ख्रिस्ती समाजाला पटलेले असते. प्रार्थना ही एक मानवी गरज आहे, प्रार्थना म्हणजे मानवी व्यक्तित्वाला अभिजात सात्त्विकतेचे नि भव्योदात्ततेचे लेणे प्रदान करणारे मानवाचे ऊर्ध्वगामी जीवनांग (Vertical Dimension) आहे ही आधुनिक मानसशास्त्रातील सत्ये ख्रिस्ती समाज सुरुवातीपासून जगत आला आहे.

पददलिताची प्रेमपूर्ण सेवा आणि शिक्षणक्षेत्रातील नेत्रदीपक कर्तृत्व हा ख्रिस्ती समाजाचा पैलू रथीमहारथीपासून सामान्यजनापर्यंत सर्वांनाच लोभसवाणा वाटत असतो. महाराष्ट्राला 'सुदाम्याचे पोहे' वाटणारे विनोदी वाङ्मयाचे आद्य प्रवर्तक कोल्हटकर यांना 'धर्मांतर' या त्यांच्या काहीशा अतिरिक्त हिंदुत्वनिष्ठेने भारावून लिहिलेल्या टीकात्मक लेखातही ख्रिस्ती व्यक्तींच्या आणि संस्थांच्या या सेवावृत्तीची मुक्तकंठाने स्तुती करणे भाग पडते. हा एकच पुरावा वरील विधानाच्या प्रत्यंतरासाठी पुरे

१३. Ibid, Ephesians 5 : 25-27.

आहे. गं. बा सरदार संपादित 'महाराष्ट्र जीवन' या दोन खंडी ग्रंथातही त्याचा निर्देश येऊन गेला आहे. इथे, ख्रिस्ती समाजाकडून हे जे अतुलनीय समाजसेवाकार्य होत आहे त्यामागची अंतःप्रेरणा कोणती हे पाहणे उद्बोधक ठरेल. झोपडपट्ट्यांतील दारिद्र्य साक्षात मृत्यूपेक्षाही भयानक असते. गरिबी, रोगराई, आणि नैराश्य यांनी बरबटलेल्या येथील अगतिकतेत, दिवसेंदिवस तीव्र होत असलेला शरीर आणि आत्मा यांचा मूर्त झगडा फारच हृदयविदारक आणि दारुण असतो. अशा या भीषण परिस्थितीत मोठ्या उत्साहाने, हसऱ्या चेहऱ्याने आणि दुर्दम्य आशावादाने, निःस्वार्थ प्रेमाने सेवाव्रती जीवन ख्रिस्ती लोक जगू शकतात, कारण मानवतेसाठी क्रूसावर स्वतःच्या रक्ताचा थेंब नि थेंब आत्मबलिदानात अर्पण करणाऱ्या विश्वसख्याच्या प्रेमझऱ्यातून त्यांच्या मानवावरील प्रेमाचा उगम होत असतो. येशूच्या आणि प्रत्येक माणसाच्या पुनरुत्थानावर त्यांची नितांत श्रद्धा असते हे लक्षात घेतल्याशिवाय त्यांच्या जगावेगळ्या सेवेचे गमक हाती लागणार नाही. "जेव्हा तुम्ही गरिबातल्या गरीब व्यक्तीवर प्रेम करीत असता तेव्हा तुम्ही प्रत्यक्ष माझ्यावर प्रेम करीत असता" हे देवपुत्राचे शब्द हेच त्यांच्या जाज्वल्य श्रद्धेचे, पोलादी जिद्दीचे अधिष्ठान आहे, आणि म्हणूनच भारताच्या राजधानीत मदर तेरेझांचा दलितांची कैवारीण म्हणून गौरव करताना मोठमोठ्या सरकारी महाशयांनी आश्चर्यचकित होऊन जेव्हा मदर तेरेझांना त्यांच्या निरपेक्ष सेवेचे रहस्य कोणते म्हणून विचारले तेव्हा त्या उत्स्फूर्तपणे उत्तरल्या : "आम्ही ख्रिस्ताची सेवा करीत आहोत, ख्रिस्तावर प्रेम करीत आहोत. वस्तुतः ख्रिस्ताच्या करुणेचा हा आविष्कार आहे."

धर्मप्रचाराच्या नावाखाली ख्रिस्ती समाजावर आणि व्यक्तींवर अनेक निरर्गल स्वरूपाचे आरोप होत असले तरीही "जगाने जर तुमचा छळ केला तर त्याने त्यापूर्वी माझा छळ केला आहे हे लक्षात ठेवा" ह्या त्यांच्या स्वामींच्या सूचनेचे स्मरण आणि "जा आणि जगभर देवाच्या प्रेमाचा संदेश पसरवा" हा ख्रिस्ताचा आदेश ख्रिस्ती लोकांना उदात्त हेतूने धर्मप्रचार करण्यासाठी सातत्याने चालना देत आला आहे. आपण कोणत्या धर्मात आहोत यापेक्षा सत्याची साधना किती प्रामाणिकपणे आपण करीत असतो हा एकच ध्यास ख्रिस्ती लोकांना धर्मप्रचारासाठी उद्युक्त करीत असतो. इतिहासात आणि आजच्या जगात विवक्षित व्यक्तींच्या हातून या बाबतीत हलगर्जीपणा मुळीच झाला नाही अशी ग्वाही देणे म्हणजे मनुष्यस्वभावाविषयीचे अज्ञान प्रगट करणे होय. परंतु सुसंस्कृत माणसाने अशा तुरळक उदाहरणांवरून धर्मप्रचारामागच्या उदात्त विचारसरणीला किंवा त्या धर्माला ठपका लावणे उचित ठरते काय ? माणसाला अधिकाधिक स्वतंत्र, मुक्तसंचारी करण्यात ख्रिस्तप्रभूने जीवनाची सार्थकता मानली, ही जाणीव असणाऱ्या ख्रिस्तमंडळाला अयोग्य मार्गसाधनांनी किंवा व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर दडपण आणून धर्मांतर घडवून आणणे मुळीच संमत नाही. अशा प्रकारच्या अनुचित धर्मांतराचा ते तीव्रतेने निषेध करते.

इतर धर्मांकडे पाहण्याचा ख्रिस्ती दृष्टिकोण[१४] :

आपल्या या आजच्या जगात माणसे अधिकाधिक जवळ येत आहेत. निरनिराळ्या लोकांतील संबंध घनिष्ठ होत आहेत. ख्रिस्तमंडळ तर सर्व लोकांमध्ये ऐक्य व शांतता निर्माण करणे आपले कर्तव्य समजते, आणि म्हणूनच राष्ट्राराष्ट्रांतून आपल्याला एकत्र आणणाऱ्या, आपला स्नेह वाढविणाऱ्या धाग्यादोऱ्यांचा विचार करताना हिंदू, मुस्लिम, बौद्ध इत्यादी धर्मांमध्ये जे जे काही सात्त्विक व पवित्र आहे त्याचा ख्रिस्तमंडळ मुळीच अव्हेर करीत नाही. " खऱ्या प्रकाशा "चे किरण तिथे प्रतिबिंबित झालेले आढळतात म्हणून त्यांची शिकवण, त्यांचे रीतिरिवाज, आचार व धार्मिक विधी आपल्यापासून भिन्न असूनही ख्रिस्तमंडळ त्यांच्याकडे प्रांजल आदराने पाहते. ज्या ख्रिस्तामध्ये माणसांना आध्यात्मिक जीवनाची परिपूर्णता साध्य होऊ शकते, ज्या ख्रिस्तबलिदानात (= ख्रिस्ताच्या जीवन–मरण–पुनरुत्थानात) यच्चयावत सृष्टीचा समेट घडवून आणण्यात आला आहे, तिचे नूतनीकरण करण्यात आले आहे; तो ख्रिस्तप्रभू " मार्ग सत्य आणि जीवन " आहे हे जगजाहीर करणे ख्रिस्तमंडळ आपले सार्वकालिक मिशन (स्वभावधर्म) समजते; म्हणूनच ख्रिस्तमंडळ आपल्या लेकरांना इतर धर्मीय लोकांशी संवाद व सहकार्य करण्यास प्रोत्साहन देते. ख्रिस्ती श्रद्धेची साक्ष पटवीत दक्षतेने परंतु स्नेहभावाने नैतिक आणि आध्यात्मिक तसेच समाज-सांस्कृतिक मूल्यांची जोपासना आणि वाढ करण्यास त्यांनी बद्धपरिकर व्हावे असेच ख्रिस्तमंडळाचे त्यांना आग्रहपूर्वक आवाहन आहे.

महाराष्ट्राच्या ऊर्जस्वल महात्मतेला आव्हान :

भारतवर्षभर आज जीवनाची होळी करीत स्वामी अभिषिक्तानंद, अमलानंद, अखिलानंद, आचार्य फ्रान्सिस ऑफ ऋषूमला, डॉम बीड ग्रिफिथ्स प्रभृतीसारखे अनेक ख्रिस्ती पुण्यपुरुष वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथराजांतून अभिव्यक्त झालेल्या महान भारतीय धार्मिक परंपरेचा ख्रिस्ताच्या सत्यान्वेषक प्रकाशात साक्षात्कार घडविणारी आणि पर्यायाने अस्तित्व, चैतन्य आणि आनंद ह्या मानवी जीवनाच्या सनातन तत्त्वांना समृद्ध करणारी परमेश्वराच्या प्रत्ययकारी अनुभूतीची सुळावरची पोळी आत्मसात करू पाहात आहेत. आंतरधर्मीय आश्रमांना चालना देणे; दीपावली, ईद, नाताळ इत्यादी महान उत्सवप्रसंगी सामुदायिक प्रार्थना आयोजित करणे, शाळांमधून धार्मिक एकात्मता साधू पाहणे इत्यादी प्रकारच्या प्रयत्नांतून ख्रिस्तमंडळाचा समावेशक, आध्यात्मिक दृष्टिकोण कार्यरत झालेला दिसतो. मानवाच्या उत्तुंग कल्याणासाठी होत असलेल्या ह्या महत्कार्यी महाराष्ट्राने ' सिंहाचा वाटा ' उचलावा अशी अपेक्षा करणे त्याचा स्वभाव लक्षात घेता अवास्तव ठरणार

---

१४. Nostra Aetate (St. Paul Publication, 1966) § No. 1, 2.

नाही. परवाच महाबळेश्वर येथे भरलेल्या साहित्य संमेलनात त्याच्या अध्यक्षीय भाषणात कविवर्य बोरकरांनी ' महान ध्यासांनी सहज झपाटले जाणारे राष्ट्र ' अशी महाराष्ट्राची व्याख्या सुचविली. ' ब्रह्मविद्येचा सुकाळ ' करून आणणे, इंग्रजी सत्तेला उलथून टाकणे, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र घडवून आणणे इत्यादी हिमालयापेक्षा महान ध्यासासाठी उभा महाराष्ट्र ' बचेंगे तो और भी लढेंगे ' या मराठमोळ्या जिद्दीने लढत राहिला आहे म्हणूनच तो उत्तरोत्तर अस्मितासंपन्न होत आहे. महाराष्ट्राच्या ह्या अस्मितेला व्यापक करण्यासाठी, फुलविण्यासाठी, उंचविण्यासाठी, मुक्तसंचारी करण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रतिभाशक्तीचा, प्रज्ञाशक्तीचा आणि भावशक्तीचा येशू ख्रिस्ताशी आणि त्याने सुरू केलेल्या नवनिर्मितीच्या प्रभावशाली परंपरेशी अधिक बुद्धिपुरस्सर हृदयसंवाद घडवून आणण्याचा महादिव्य ध्यास महाराष्ट्राने लावून घ्यावा असे आव्हान त्याच्या उज्ज्वल भवितव्याची आकांक्षा बाळगणारा ख्रिस्ती धर्म त्याला करीत आहे. सदर आव्हानाला एका विशेष प्रकारे प्रतिसाद देणे ' महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळा ' ला शक्य आहे आणि तसा प्रतिसाद प्रस्तुत मंडळाकडून हमखास मिळेल अशी आशा ख्रिस्ती समाज उराशी बाळगून आहे.

" जेरुशालेमा,
सुसज्ज होऊन महत्पदी उभा राहा
आणि देवाकडून तुझ्याकडे येणारा सुखसोहळा डोळे भरून पाहून घे.[१५] "

अशा आशयाचे जेरुशालेम नगरास उद्देशून काढलेले उद्गार तोच विधाता आज महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजाद्वारे अखिल महाराष्ट्राकरिता ध्वनित करू इच्छित आहे असे वाटू लागते.

Maharashtra, surge et Sta in excelso, et vide jucunditatem, quae veniet tibi a Deo tuo.

१५. As quoted in St. Andrew Daily Missal, p, 18.

बृहन्महाराष्ट्रातील ‘ महा-राष्ट्र ’

दादूमिया

गुजराथी भाषेत एक म्हण आहे, “ ज्या वसे गुजराथी, त्या वसे गर्बी गुजराथ,” (जेथे जेथे म्हणून गुजराथी माणूस आढळेल तेथे असेल गुजराथ.)

ह्याच शब्दात बृहन्महाराष्ट्राची व्याख्या करणे सोपे जाईल. जेथे जेथे म्हणून मराठी माणूस आढळेल तो बृहन्महाराष्ट्र. मग ती संख्या कितीही असो.

मराठी माणूस जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने आपली दैवते, आपल्या चालीरीती आणि आपले गुणदोष आपल्याबरोबर नेले व महाराष्ट्राच्या बाहेर एक छोटे महाराष्ट्र वसविण्याचा त्याने प्रयत्न केला.

एके काळी मराठी भाषेची व मराठी माणसाची शान होती, कारण त्यामागे राजसत्ता उभी ठाकली होती. राजसत्ता एके काळी सर्वोच्च शक्ती होती. त्या काळी राजसत्ता अंतिम असे. तिच्या निर्णयाविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही हिंमत नव्हती. या अशा सर्वोच्च पाठिंब्यामुळे मराठी भाषा, मराठी संस्कृती व मराठी अहंकार सर्व भारतात एके काळी कसा फुलून निघाला होता.

राजेशाही गेली. त्याचबरोबर राजाश्रयदेखील. जमाना लोकशाहीचा आला. लोकशाहीत सर्वच राजे, सर्वत्र शहाणे. साहजिकच एकाच जातीस, एकाच जमातीस प्राधान्य मिळणे या बदलत्या जमान्यात अशक्य आहे. नव्या मतस्वातंत्र्याबरोबर शिक्षण व वृत्तपत्रे दोन्ही वाढली. या दोहोंनी प्रत्येक प्रांताची अस्मिता जागृत केली. अस्मिता जागृत झाली यात वाईट काहीच नाही. परंतु राजकीय स्पर्धेमुळे लोकशाहीत प्रांतवाद, भाषावाद व जातपातवाद यांना दुर्दैवाने खतपाणी मिळू लागले. त्यामुळे अस्मितेच्या रोपट्याऐवजी इतरच विषवल्ली जोपासल्या जाऊ लागल्या.

त्यातून एक नवीन प्रश्न उभा राहिला : “ बृहन्महाराष्ट्रीयनांचे भवितव्य. ”

राजाश्रय नाही, पैशाचे पाठबळ नाही, शिक्षणाच्या क्षेत्रात स्पर्धा भयंकर

वाढलेली, अतिशय कष्टाची सवय नाही, थोड्याशा अरेरावीची, चैनबाजीची सवय लागलेली व सर्वत्र प्रांतवादामुळे परप्रांतीयास सर्वांत शेवटी संधी द्यावयाची प्रवृत्ती वाढीस लागलेली. अशा परिस्थितीत बृहन्महाराष्ट्रीयनांच्या भवितव्याची समस्या उभी राहिली तर नवल नाही. इतकी की एका मुंबईकर मित्राने पुढील उद्‌गार काढले, “ तुमच्या बृहन्महाराष्ट्राच्या यादीत आमच्या मुंबईचे नाव नाही ! तुमच्या आमच्या समस्या अलग नाहीत !! ”

मराठी भाषेचा, मराठी इतिहासाचा, मराठी अस्मितेचा मी मोठा अभिमानी आहे. जवळजवळ सारा देश डोळ्यांखालून घातलेला आहे. इतर भाषिकांशी माझे चांगले संबंध आहेत. त्यामुळे बृहन्महाराष्ट्रीयनांच्या समस्या मला निःपक्षपाती दृष्टि-कोणातून नीट बघावयास, समजून घेण्यास संधी मिळाली. इतर प्रांतीयांच्या मनात मराठी लोकांविषयी कोणत्या अढी, कोणत्या कल्पना, कोणत्या गैरसमजुती वसत आहेत याचा मी जसजसा सूक्ष्म अभ्यास सुरू केला तसतसा मी जास्त अस्वस्थ होऊ लागलो. कारण परप्रांतीयांच्या गैरसमजुतींमागे मला आपल्या गुणदोषांचा सबळ पुरावा दिसू लागला.

माणसाची वागणूक म्हणजे, त्याच्या गुणदोषांची बेरीज. ही बेरीज ‘पॉझिटिव्ह’ असली तर त्यास इतरांकडून चांगली वागणूक मिळते. कारण इतरांना त्याच्याकडून मदत होण्याची शक्यता असते. ही बेरीज ‘नेगेटिव्ह’ होत गेली तर इतरांना उगाच ताप होऊन बसतो व तो माणूस अप्रिय होतो.

आज मराठी माणूस फारसा अप्रिय नाही, पण तो लोकप्रिय नाही, तो समृद्ध नाही, समर्थ नाही, सशक्त नाही. याचाच अर्थ, त्याच्या गुणदोषांची बेरीज फारशी उपयोगी व ‘ पॉझिटिव्ह ’ नाही. मला वाटते, याचा पक्षपातीपणा न ठेवता, हृदय उघडे ठेवून नीट अभ्यास झाला पाहिजे. आत्मसंशोधन वाटते तेवढे सोपे नाही.

त्याआधी हे बृहन्महाराष्ट्र निर्माण कसे झाले, का झाले ते पाहणे वास्तविक ठरेल. कारण, माणसाची वागणूक तो कोणत्या परिस्थितीत तेथे गेला यावर बरीच अवलंबून राहते.

मराठी लोक महाराष्ट्राच्या बाहेर पडले ते कालखंड तीन आहेत :

(१) बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीपर्यंत.

(२) स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत.

(३) स्वातंत्र्योत्तर गेली दोन दशके.

बाहेर पडणाऱ्या मराठी लोकांचे जातीय वर्गीकरण पुढीलप्रमाणे :

(१) ब्राह्मण, (२) मराठा, (३) हरिजन वर्ग, (४) गोमंतकीय खिस्ती, (५) मराठी मुसलमान, आणि (६) इतर पंथीय.

बृहन्महाराष्ट्रात शिवाजी ते शाहू कालापर्यंत असंख्य मराठी लोक तीर्थयात्रेच्या निमित्ताने सर्व आपत्तींना तोंड देत देत साऱ्या भारतवर्षात पुण्यसंचय करताना आढळून

येत. या प्रवाश्यांना जागोजागी तीन अडचणींना तोंड देणे आवश्यक होई :(१) धर्मकृत्ये करण्यासाठी त्यांना मराठी पुरोहित मिळाला तर बरेच सोयीचे जाई, (२) मराठी अन्न देणारा आचारी व (३) आजारीपणात मराठी वैद्य भेटला तर त्यांना दिलासा वाटे. ही अडचण समर्थ रामदासांनी नेमकी ओळखली व बृहन्महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी त्यांनी आपले मठ स्थापले. एवढे सांगितले की पुरे को, रामदासांचे उत्तर व मध्य भारतात हे मठ नसते तर शिवाजी व संभाजी आग्र्याहून सुरक्षित महाराष्ट्रात परत न येते! समर्थांनो आपल्या माणसांना एवढे पक्के शिक्षण देऊन परदेशी पाठविले होते की, विचारण्याची सोय नाही. म्हणून छाती ठोकून त्यांनी गर्जना केली, "समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे?" संभाजीने व रामदासांच्या तालमीत तयार झालेल्या त्या वेळच्या ब्राह्मणाने एका ताटात जेवण घेतले यावरून समर्थांच्या शिकवणुकीतील व दृष्टीतील वास्तवता व प्रागतिकता दिसून येते.

समर्थ्यांनी ३६ वर्षांत सुमारे ११०० प्रकट मराठी महंत तयार केले. गुप्त महंत किती असतील ते कळण्यास आज काहीच साधन नाही. प्रत्येक मठात दोनपासून आठपर्यंत सबनीस, कारखाननीस वगैरे अधिकारी असत. मठातील काही अनुयायांचे काम कोरडी भिक्षा गोळा करून या धान्यादी पदार्थांवर व रोकड रकमेवर मठाची रोजची उपजीविका व उत्सव चालविणे हे होते. गुप्त समुदायी कोण व प्रकट समुदायी कोण हे मठाधिपती किंवा समर्थ यांखेरीज इतरांना माहीत नसे. समर्थांच्या पूर्वीचे विचारी पुरुष प्राक्तनाला बोल लावून स्वस्थ बसत किंवा हरिभजन करून संन्यास घेऊन अप्रत्यक्षपणे आत्महत्या करीत व स्वप्नाळू समभावाचा आदर्शनाद सांगीत फिरत. हे मार्ग दुर्बल म्हणून समर्थांनी सोडून दिले व लोकोद्धार करण्याचा यत्न आरंभिला. सबंध भारतवर्षाच्या उद्धाराला हात न घालता समाजिक, राजकीय, धार्मिक, भौमिक व लौकिक अडचणी ओळखून त्यांनी आपले क्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवले व अव्यवहारी कल्पना उराशी न बाळगता, निराश न होता, भय, क्रौर्य, असूया, कार्पण्य, अज्ञान व लोभ यांना बळी पडलेल्या समाजास नवकल्पनांनी व नवविचारांनी भारून टाकून त्यात नवजागृती आणून ह्या सडत चाललेल्या समाजाचा उद्धार केला. ही नवक्रांती शिवाजी व रामदास या जोडगोडीमुळे शक्य झाली. "मराठा तेतुका मिळवावा" हा अमर संदेश देणाऱ्या या प्रेषकास जातीयवादी राजकारणामुळे आज वाईट दिवस आले आहेत. तरीही महाराष्ट्राच्या व बृहन्महाराष्ट्राच्या उद्धाराचा विचार करण्याच्या प्रारंभी या श्रेष्ठीला मानाचा मुजरा न करणे नादानपणाचे लक्षण ठरेल. अजमीरसारख्या दूर स्थळी रामदासांनी एका रम्य टेकडीवर हनुमान मंदिर स्थापले आहे. अशा "स्ट्रॅटेजिक" ठिकाणी आपल्या मठाची स्थापना करणाऱ्या रामदासांचे कौतुक ते स्थळ प्रत्यक्ष पाहिल्यावाचून समजणे अशक्य होय. बृहन्महाराष्ट्र समाजाचे पहिले समर्थ संस्थापक श्रीसद्गुरु रामदास होते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती मुळीच होणार नाही.

दुर्दैवाने, रामदासांच्या शिष्यांनीच रामदासांचा पराभव घडवून आणला. राम-

दासांच्या मठांनी शक्ती व युक्ती यांची पूजा सोडली. मठाधिपती देशाच्या राजकारणा-ऐवजी मठामठाच्या कलहात गुंतले व भिक्षेवरील प्राप्त होणाऱ्या शिध्यातून आज कोणत्या लाडवांचे भोजन करायचे ह्या योजनेतच गर्क राहू लागले. पहिल्या बाजीरावाने “ चलो दिल्ली ”ची गर्जना केली नसती तर हे मठ व हा बृहन्महाराष्ट्राचा विचार कालाच्या उदरात केव्हा गडप झाला असता ते कळलेदेखिल नसते. पहिल्या बाजी-रावाने छत्रसालास मदत करून बुंदेलखंडाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात मराठ्यांचा प्रवेश करुन मराठ्यांसाठी एक आगळे द्वार खुले केले.

पेशव्यांच्या आधी मराठेशाहीत मराठे महाराष्ट्राबाहेर पडले ते उत्तरेस नव्हे, पण दक्षिणेत. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी राजे यांस विजापूरच्या मोगल बादशहा-कडून कर्नाटकात तंजावरकडे जहागीर मिळाली होती. तजावरातील बृहन्महाराष्ट्राची स्थापना अशा रीतीने ३५० वर्षांची जुनी आहे. कर्नाटकी जहागिरीतील ज्या किल्ल्याने संभाजीमहाराजांच्या वधानंतर, महाराष्ट्र मोगलमय झालेल्या दिवसांत, राजाराममहाराजांचे कित्येक वर्षे संरक्षण केले व मराठ्यांची गादी बचावण्यास बिनमोल मदत केली तो जंजीचा किल्ला मद्रासहून फार दूर नाही. कर्नाटकातील मराठ्यांच्या स्वाऱ्यांना व अंमलास खरी सुरुवात अर्थातच नानासाहेब पेशव्यांच्या काळापासून झाली व ती दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत चालू होती. केरळात पुष्कळ चित्पावन मंडळी पेश-व्यांचे गुप्त हेर वा वार्ताहर म्हणून धाडली गेली. पुढे हे लोक खिस्ती झाले. उदाहरणार्थ, आजच्या शिक्षणावर परखडपणे लिहणारे व्ही. व्ही. (विष्णु विनायक)जॉन.

मद्रासकडील दक्षिणी मराठे बाह्य चिन्हांवरून ओळखणे अवघड आहे. कर्नाटक, तामीळनाड व आंध्र यातील पाव ‘ राव ’ लोक मराठी असावेत. राव म्हणजे जंटलमन्. राजाश्रयाचा पाठिंबा मिळालेले मऱ्हाटे संपन्न व ‘ जंटलमन् ’ समजले गेले तर त्यात नवल कोणते ? आज जनसंघाचे बरेच मद्रासी स्थानिक पुढारी मूळचे मराठी शिंपी आहेत. त्यांनी मला सांगितले, “ येथील लोक दळिद्री. केवळ लुंगी नेसणारे. त्यामुळे मराठी सत्ताधीशांना व त्यांच्या सरदारांना जुन्या काळी उंची कपडे शिवून देणारे शिंपी येथे मिळेनात. आमच्या पूर्वजांना मोठ्या पगारावर येथे महाराष्ट्रातून आणण्यात आले.” ही सर्व तामिळी दक्षिणी कुटुंबे ज्ञानदेवाच्या काळचे मराठी बोलतात. ते आपल्या कानाला विचित्र वाटते, कारण गेल्या तीनशे वर्षात आपले मराठी बदलले आहे. पुरुषां-पेक्षा स्त्रीवर्ग जास्त सनातनी असतो. यांच्या स्त्रियांच्या तोंडी अजून बरीच प्राचीन स्तोत्रे व धार्मिक काव्ये आपल्याला ऐकू येतात. दिवाणबहादूर सर टी. माधवराव व दि. ब. आर. रघुनाथराव हे दक्षिणी समजले जाणारे मुत्सद्दी मूळचे मराठीच. राजा सर टी. माधवरावांचे कवितांचे मराठी पुस्तक अजून उपलब्ध आहे. ह्याच दक्षिणी लोकांमुळे मुंबई विश्वविद्यालयात मराठीचा प्रवेश होण्यापूर्वी मद्रास युनिव्हर्सिटीत मराठीचा प्रवेश झाला.

पहिल्या बाजीरावांच्या वेळेपासून मराठी वीरांबरोबर मराठी यात्रेकरूंचाही

उत्तरेस ओघ आपोआपच वाढू लागला. यातील बरेचसे यात्रेकरू तेथील स्वस्ताई, तेथील चांगले हवापाणी व तेथील धर्मक्षेत्रातील संपन्नता यांच्यामुळे तेथेच स्थायिक झाले असावेत. प्रयाग, काशी, आयोध्या, मथुरा, गोकुळ, वृंदावन, हृषीकेश, बद्रीनारायण, केदारनाथ, वगैरे स्थळी आजही आपण तेथील निसर्गसौंदर्याने व धार्मिक पावित्र्यामुळे भारावून जातो; तेथे कायमचे राहावे असे वाटू लागते. आजच्यापेक्षा पूर्वीचे लोक जास्त धर्मप्रिय, निसर्गवेडे व देवभीरू होते. पेशव्यांच्या अमदानीत या लोकांना एक नवीन सुरक्षितता मिळत गेली. या यात्रेकरूंत ब्राह्मणांबरोबर मराठा यात्रेकरूंचे प्रमाण किती होते हे सांगणे आज अवघड आहे. पण पंढरी व आळंदी येथे जमणाऱ्या बहुजन-समाजाच्या गर्दीकडे पाहता आर्थिक परिस्थिती व शिक्षण याद्दष्टया जास्त नशिबवान असलेले उच्चवर्णीय मराठा स्त्रीपुरुष या यात्रेच्या पुण्यसंचयात मागे राहात नसावेत असे वाटते. भारतातील व नेपाळातील बारा ज्योतिर्लिंगाचे प्रमुख पुजारी सारेच्या सारे मराठी ब्राह्मण आहेत हे सांगावेसे वाटते. ब्राह्मणांचा उत्तर भारताशी संबंध पेशवाई बुडाल्यानंतरही टिकून होता. दुसऱ्या बाजीरावाने मराठी राज्याचे उदक इंग्रजांच्या हाती घातल्यावर ते ब्रह्मावर्तास जाऊन राहिले होते. त्यामुळे अलाहाबाद प्रांतात मराठी बोलणाऱ्या त्यांच्या आश्रित व ऋणानुबंधी कुटुंबांची तेथे कायम वस्ती झाली. १८५७ च्या स्वातंत्र्यासमरानंतर त्यातील बरेचसे लोक हालले.

पेशवाईत मराठे भारताच्या अन्य प्रांतात प्रामुख्याने गेले ते त्यांच्या संरक्षणा-साठी. "शिवाजी न होत तो होत सबकी सुन्नत" हे भूषणकवीचे काव्य शिवाजीच्या ब्राह्मण वारसांना जास्त लागू पडते. पेशव्यांच्या वेळी मराठे लोक गंगायमुना नद्यांच्या आसपास प्रामुख्याने राहात. बुंदेलखंडात मराठ्यांची सर्वांत मोठी वसाहत झाली होती. शिंद्यांच्या पराक्रमाची भूमी व जहागीर ही यमुना नदीच्या आसपास असल्याने तेथे मराठ्यांची वसती कायमची होणे स्वाभाविक होते. इंदूरास होळकर, देवास येथे पवार, धारचे धारकर, नरगुद येथे भावे, मुधोळ येथे घोरपडे, जमाखिंडी येथे पटवर्धन अशी मराठी राजसत्तेची अनेक उदाहरणे देता येतील. बाजीरावाने मस्तानीस घरात घेतले. शिवाजीमहाराज व रामदास यांची 'प्रागतिकता' पेशवाईत टिकती तर ब्राह्मण-मराठा व हिंदू-मुसलमान यांचे शरीरसंबंध अधिकृत (Official) होऊन आज दिसणारी जातीयता केव्हाच नष्ट झाली असती. दुर्दैवाने, ते होणे नव्हते. लष्करात रोटी व्यवहारा-पर्यंत सुधारणा अंशतः आली. मात्र बेटीव्यवहार झाला तर त्यास अनधिकृतपणाचा शिक्का बसून 'पत्नी'च्या ऐवजी 'रखेली' हे नामाभिधान प्राप्त होत असे.

शिवाजीने स्वराज्य-संस्थापना 'गोब्राह्मणां'चे प्रतिपालन करण्यासाठी चालू केली. हिंदू धर्मातील 'पावित्र्य व पाडित्य' यांचे संरक्षण म्हणजे गोब्राह्मण-प्रतिपाल-कत्व! ही परंपरा बहुतेक सर्व मराठ्यांनी सांभाळली. उदाहरणार्थ, गायकवाड बडोद्यास आले ते मुळी बडोद्याच्या दला पटेलाच्या दोन सुंदर मुलींच्या अब्रूरक्षणासाठी! येथील मोगलांचा मीर बाकर अली नावाच्या स्थानिक राजप्रतिनिधीची दुष्ट नजर या मुलींवर

होती. त्याचे पारिपत्य केल्यावर गायकवाडांच्या पूर्वजांस त्यांतील एक मुलगी ‘ ऑफर’ करण्यात आली. “ दोन्ही मुली माझ्या बहिणी आहेत, बहिणीचे शीलरक्षण करण्यासाठी भाऊ येथे धावून आला, ” असे सांगून गायकवाडांनी ती ‘ ऑफर ’ विनयाने नाकारली. आजच्या ‘ कॅबेरे ’ व ‘ हिप्पी ’ युगात ह्या विनयाचे कदाचित कौतुक होणार नाही. पण त्यामुळे त्याचे महत्त्व कमी होत नाही. ब्रिटिश जमान्यातील मुसलमानी नबाबापेक्षा मराठी संस्थानिक शतपटीने न्यायी व संस्कारी होते हे खुद्द निरनिराळ्या रेसिडेंटांनी नमूद करून ठेवलेले आहे. अहिल्याबाई होळकरांची दानप्रियता किंवा सयाजीराव गायकवाडांची व्यासंगी पंडित, नट वा गायकास आश्रय देण्याची दानत शिवाजीच्या गोब्राह्मणप्रतिपालकत्वाच्या परंपरेत बसत नाही काय ?

पेशवाईत व पुढे आंग्लाईत मराठे कोठे गेले हे पाहणे मनोरंजक ठरेल. काश्मीर, बंगाल, बिहार, ओरिसा किंवा आसाम येथे मराठे गेले नाहीत. कारण भौगोलिक व सैनिकी दृष्ट्या या प्रांतात गेल्यावर मराठ्यांना मायभूशी संबंध ठेवणे अवघड गेले असते. नागपूर पूर्वी मध्यप्रांतात असे. तेथून खाली कर्नाटकात व वर उत्तर प्रदेशात मुसंडी मारणे मराठ्यांना सोपे होते. पंजाबी व राजपूत या दोन मर्द वीरांना धर्मरक्षणासाठी दुसऱ्या सेनेची आवश्यकता भासली नाही. कधी गरजच पडली तर जादा कुमकीची (रीएनफोर्समेंट्), पण मुळातूनच मराठी सैन्याचे तेथे काम नसल्यामुळे राजस्थान व पंजाब येथे मराठे फारसे गेले नाहीत. साहजिकच कायमची वस्ती करण्याचा प्रश्न उद्‌भवतच नव्हता. महाराष्ट्रास लागून असलेल्या सर्व प्रांतांत पेशवाईत मराठ्यांनी कायमची वसाहत करण्याचा उद्योग केलेला आढळतो.

काही ठिकाणी मराठे गेले ते संपत्ती गोळा करण्यासाठी. राजकारणात पैशाचे स्थान फार उच्च दर्जाचे आहे. पैशाशिवाय राजकारण खेळणे आत्महत्या करण्यासारखे आहे. शिवाजीमहाराजांनी सुरतेवर स्वाऱ्या तेवढ्यासाठी केल्या. शून्यापासून राज्यवर्धनास सुरुवात करणे हे एक अशक्य ‘ स्वप्न ’ होते. पेशव्यांनी हे राज्य प्रसार करण्याच्या योजना हाती घेताच हा खर्च पाचपट वाढला. त्यामानाने, खुद्द राज्यात शेतीचे वा इतर उद्योगांचे उत्पन्न अगदीच कमी असे. गायकवाडांचे साम्राज्य मोठे. पण त्यांच्या उत्पन्नाचा पाऊण भाग पेशव्यांना दिला जाई ! त्यातून रावजी गुत्ते व बाबाजी गुत्ते यांनी सौराष्ट्रावर स्वाऱ्या चालू केल्या व बडोदे संस्थानाचा खजिना तुडुंब भरून टाकला ! बंगालवरील स्वाऱ्या या पैशाच्या चणचणीतूनच जन्मास आल्या. त्यामुळे मराठे हे लुटारू व पिंडारी होत हे काही वाईकर विद्वानांचे विधान हास्यास्पद ठरते. साम्राज्य वाढविण्याचा व ते टिकवून धरण्याचा खार्चिक हिशेब प्रत्येकास माहीत असावा असा आग्रह नाही. पण त्यासाठी आमच्या पराक्रमी व गोब्राह्मणप्रतिपालक पूर्वजांना उगीचच गालिप्रदान करण्याचा धंदा निश्चित प्रशंसनीय नाही. नाहीतरी तेथील नादान व दुबळी हिंदू प्रजा जुलमी मुसलमान सत्ताधीशांना जिझिया किंवा तत्सम कराच्या रूपाने नाखुषीने संपत्ती दान करीतच होती, मग हिंदवी स्वराज्यसंस्थापनेसाठी

थोडासा आर्थिक त्याग केला तर बिघडले कोठे ? पेशव्यांचे सरदार लुटारू तर सुभाप्र-बाबूही चोर व दरोडेखोर ठरतील, कारण त्यांनीदेखिल पूर्वेकडील श्रीमंतांकडून अशाच मोठ्या रकमा उकळविल्या होत्या ! त्या काळच्या घटना आजच्या परिस्थितीच्या प्रकाशात पाहिल्या की चुकीचे निदान व्हावयाचे हेच खरे.

पेशवाईत व आंग्लाईत पुष्कळसे मराठी भाषिक परप्रांती नोकऱ्यांसाठी गेले हे खास नमूद करावेसे वाटते. ही नोकऱ्यांची गरज आजही संपलेली नाही. नोकरीदार माणूस परप्रांती गेला तरी तेथे तो कायमची वस्ती करून राहात नाही. मुंबई प्रांत व सिंध अगदी जवळ असल्याकारणाने आंग्लाईत सुमारे दहा हजार मराठी भाषिक सिंध प्रांतात होते. पूर्वी मंडलीक, नूलकर, वैद्य, परमानंद, भांडारकर, देशपांडे, मोडक, कुंटे, राजवाडे वगैरे सुशिक्षितांच्या पहिल्या दुसऱ्या पिढीतले लोक सिंध प्रांतात नोकरीस गेले होते. पी. डब्ल्यू. डी. व शिक्षण खाते या दोहोंत मराठी नावाची एके काळी गर्दी असे. नोकऱ्यांची मुदत संपताच ही मंडळी परत येऊन पुण्यात घर बांधण्याच्या खटपटीत असत. ह्या दृष्टीने पुणे शहराच्या वस्तीचा कोणी अभ्यास केला तर तो फार मनोरंजक होईल. बडोद्यातील चिं. वि. जोशी, वा. त्रि. जोशी वगैरे मंडळी निवृत्त होताच ताबडतोब त्यांनी सदाशिव पेठेचा रस्ता पकडला. चिं. वि. जोश्यांनी तर आपले एक पुस्तक ‘ सदाशिव पेठे ’स अर्पण केले आहे. ही चिं. वि. जोशी-वा. वि. जोशी यांची ‘ सेंट्रिपेटल ’ परंपरा कलकत्त्याचे लेबर कमिशनर श्यामकांत गोखले वा दिल्लीच्या हिंदुस्थान समाचारचे आपटे यांनी आजही चालू ठेवली आहे.

स्वातंत्र्योत्तर हा नोकरीदारांच्या परप्रांतगमनाचा ओघ जास्तच वाढला. सुशि-क्षितांना परप्रांती जाणे म्हणजे पूर्वी काळ्या पाण्याची शिक्षा वाटत असे. ही सुशिक्षि-तांची अपकल्पना तीन कारणांमुळे बदलली : (१) ब्राह्मणब्राह्मणेतर वादामुळे बऱ्याच ब्राह्मणांना महाराष्ट्राच्या बाहेर पडणे जास्त सोयिस्कर व जास्त ‘ सुरक्षित ’ वाटू लागले. हा वाद महाराष्ट्रातच नव्हता, त्याने सर्व दक्षिण भारतास ग्रासून टाकले आहे. मुंबईत तामीळ व कर्नाटकी वस्तीत प्रामुख्याने ब्राह्मण लोकच आहेत. ब्राह्मणांना इतर क्षेत्रांत व इतर प्रांतांत फेकून सधनतेची साधने शोधून काढण्यासाठी अप्रत्यक्षपणे जे उत्तेजन ब्राह्मणेतर समाजाने दिले आहे त्याचे ब्राह्मणवर्गाने उपकार कधीही विसरता कामा नयेत. (२) आधुनिक जेट विमानाच्या युगात अंतर आपोआप कमी होत आहे. लग्न, मुंजी वा जन्ममरणाच्या प्रसंगी त्यामुळे तार हाती पडल्यापासून अठ्ठेचाळीस तासांत पुण्या-मुंबईत हजर राहणे आज सहजसाध्य झाले आहे. (३) महाराष्ट्रात सुशिक्षित जास्त व नोकऱ्या त्या मानाने कमी असे व्यस्त प्रमाण आहे. नोकऱ्यांत गुणांच्या स्पर्धेत वशिला व लाचलुचपतीस अग्रहक्क असल्यामुळे नोकरी मिळविणे आजच्या तरुणास एक डोकेदुखी होऊन बसली आहे. त्या मानाने चांगल्या दर्जाच्या व गुणवत्तेच्या कर्तबगार मराठी तरुणास इतर प्रांती नोकरी मिळविणे सोपे जाते. (दहा वर्षांनंतर हे चित्र कदाचित बदलेल.) हजरजबाबीपणा, इंग्रजीचे ज्ञान व परप्रांती टक्केटोणपे खाण्यासाठी

लागणारा योग्य तो रंगेलपणा एवढी शिदोरीमात्र जवळ पाहिजे. लष्कर, हवाई खाते, वैद्यकीय खाते, आर्किटेक्ट व इंजिनियरिंग खात्यात आज परप्रांतातून हजारो मराठी भाषिक नोकऱ्यांत दिसून येतात.

सहसा मराठी माणूस मराठी भाषिकांना नोकरी देण्याचे टाळतो. यास काही अपवाद आढळतात. उदाहरणार्थ, काकासाहेब गाडगिळांमुळे इंजिनियरिंग खात्यात व बाबासाहेब आंबेडकरांमुळे रेल्वे खात्यात असंख्य मराठी भाषिकांना चिकटविले गेले! किर्लोस्करांचा धंदाच तसा लहान आहे. नाहीतर वितरक किंवा पगारी माणसे नेमताना त्यांची मेहेरनजर मराठी भाषिकांवर खरी. मराठी माणूस पैसा खात नाही (व खात असला तर खूप कमी खातो!) असा लौकिक एकेकाळी मराठी पगारदारांचा होता. त्यामुळे बिर्ला, साराभाई वगैरे शेठ लोकांचा उदार आश्रय मराठी माणसांना बराच मिळाला. एके काळी कलकत्त्यात किंवा अहमदाबादेत मॅनेजर, विव्हिंग किंवा स्पिनिंग मास्तर वगैरे लठ्ठ पगाराच्या नोकऱ्यांवर हटकून मराठी माणसे सापडत असत.

नवीन युगात तंत्रज्ञांना न भूतो न भविष्यति महत्त्व आले आहे. लष्करी तसेच नागरी जीवनात आज यंत्रांना व म्हणून त्यांच्या तंत्रज्ञांना फार मोठा भाव आहे. त्यामुळे जुनी मूल्ये बदलत चालली आहेत. पूर्वी लष्करात उंच, धिप्पाड यष्टीची जरुरी असे. आज काटकुळा, अशक्त पण डोक्याने तल्लख असलेला मल्याळी वा बंगाली तंत्रज्ञ अँटी एअरक्राफ्ट गन् किंवा कॉम्प्युटरमागे बसून थाटात आधुनिक युद्ध खेळू शकतो. ह्या नव्या बदलाचा मराठी ब्राह्मणाने कानोसा घेतलेला दिसून येतो. थोड्या प्रमाणात कायस्थ व इतर मराठी तरुण लष्कर व हवाई दलात आढळतात. नाविक दलात रत्नागिरीचा यच्चयावत मुसलमान तरुणवर्ग आढळतो. त्या मानाने मराठा तरुण आज ह्या क्षेत्रात मागे आहे. बृहन्महाराष्ट्रात तर इतर लोकांकडून पुढील टिंगल ऐकू येते. "इन्होको शिवाजी भक्ती खाली नाम की दिखती है!" त्या मानाने महार पलटणीने चांगली आघाडी मारली आहे. १९६२ व १९६५ च्या युद्धात मराठाबांगडी फार मोठ्या संख्येने फुटली होती. त्याने तर या वर्गांत 'नर्व्हसनेस्' आला नसेल ना? बृहन्महाराष्ट्राच्या नागरी जीवनात मराठी तंत्रज्ञ असेच मागे पडलेले दिसतात. मोटर व स्कूटर रीपेरिंगच्या धंद्यात अंगठेबहाद्दूर सरदारजी व मुसलमान पोरे फिटरचे मेकॅनिक् व मेकॅनिकचे गॅरेजमालक मोठ्या वेगाने होताना आढळतात. या क्षेत्रात तसेच पंप्स्, ट्रॅक्टर्स, डिझेल् ट्रक्स वगैरे रिपेअरिंगच्या क्षेत्रात मराठी तरुण का मागे पडतात तेच कळत नाही. त्याउलट, खास पुढारलेल्या तंत्रात (उदा. इलेक्ट्रॉनिक्स) मराठी तरुण चांगला पुढे आहे.

बृहन्महाराष्ट्रात बऱ्याच मराठी तरुणींनी परप्रांतीय तरुणांशी लग्ने करून बृहन्महाराष्ट्रीयन सामाजिक क्षेत्रात प्रवेश मिळविला आहे. त्या मानाने मराठी तरुणांनी फार कमी परप्रांतीय मुलींचा स्वीकार केलेला आढळतो. परप्रांतीय तरुणांना मराठी मुली का आवडतात याची चौकशी केली असता चार कारणे आढळली : (१) मराठी

मुली सुंदर, स्मार्ट व हुशार असतात. इतर प्रांतीयांत, उदा. गुजराथी पटेलांत, ह्या दर्जाच्या मुली आढळत नाहीत. त्यामुळे परप्रांतीय तरुणांना या मुलींची भुरळ न पडली तर नवल. (२) शुद्ध चारित्र्य व सौम्य, विनयशील आणि जुळवून घेणाऱ्या मराठी मुली सासरच्या मंडळींत आपुलकी निर्माण करतात. (३) मराठी मुली काटकसरी असल्यामुळे मुलांना त्या डोकेदुखी होत नाहीत. (४) त्या कामसू असतात. काम सांभाळून बाहेरचे सामाजिक जीवन योग्य प्रकारे जगण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

गुजराथी पटेलांत या मराठी तरुणी भलत्याच प्रिय दिसतात. उदाहरणार्थ, बॅरिस्टर रजनी पटेल, बडोद्याचे मेयर डॉ. ठाकोरभाई, उपमेयर डॉ. मोदी, काँग्रेस प्रमुखांचे बंधू पटेल, अलेंबिकचे एक डायरेक्टर दिनूभाई अमीन वगैरे सर्व लोकांच्या बायका मराठी आहेत. बंगाली, बिहारी, उत्तर प्रदेशी, तामीळ किंवा कर्नाटकी अशी अनेक उदाहरणे देता येतील. या मराठी मुली परप्रांतीय तरुणांना किती महाराष्ट्राळतात ह्या प्रश्नास मात्र नकारात्मक उत्तर मिळाले. जुळते घेण्याच्या स्वभावात या मुलींचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व बरेचसे मागे पडते. व्यापारी ,वा औद्योगिक संबंध वाढविण्यासाठी होणाऱ्या लग्नाचे प्रमाण किती या प्रश्नास "ही क्षुद्र मने असलेल्या लोकांच्या कल्पनाशक्तीची भरारी आहे, त्यात असूयाच जास्त दिसून येते." असे उत्तर मिळाले.

या परप्रांती वस्तीला असलेल्या मराठी मंडळींनी एकत्र येऊन चार घटका सुखात घालविण्यासाठी महाराष्ट्र समाज वा मंडळे जागोजागी स्थापिली आहेत. मंडळे वा समाज स्थापण्यासाठी अमुकच वस्ती असावी असा नियम नाही. गुजराथ रिफायनरी असलेल्या जवाहरनगर (बाजवा) या ठिकाणी जेमतेम १५० मराठी भाषिक आहेत. मेहसाणा येथे सहाशे, बलसाड येथे पाचशे, दोहद येथे ५०० तर डभोई येथे ४०० मराठी भाषिक आहेत, पण या सर्व ठिकाणी महाराष्ट्र समाज जोरात चालू आहेत. थंड ठिकाणी उत्साह दुणावतो की काय ते कोण जाणे, पण सिमल्याला मूठभर मराठी मंडळी असूनही त्यांचा समाज तर आहेच त्याशिवाय 'अंकुर' नावाचे हस्तलिखित मासिकदेखील ही मंडळी नियमित प्रकाशित करतात. जयपूरचे मराठी मंडळ एक माहिती केंद्र चालवते तर इंदूरचे 'यंग गार्डस्' तेथील लोकांना एकत्र आणून शारदोत्सव साजरा करतात. भिलाईच्या महाराष्ट्र समाजाचा उत्साह खरोखर वाखाणण्यासारखा आहे. ते लोक स्वतःच्या मालकीची इमारत व्हावी या खटपटीत आहेत. दिल्लीत तर खूपच मराठी भाषिक आहेत. तेथे गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होईल यात नवल नाही. पण अजमेर, बिकानेर, झांशी, वाराणशी, फार काय लंडन येथेदेखील मराठी मंडळी जमून गणेशोत्सवात मराठी नाटक व संगीताचा जलसा मोठ्या थाटाने साजरा करतात !

हे सारे का व कसे घडते ? त्याचे उत्तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्रिवेंद्रमच्या महाराष्ट्र मंडळाच्या द्वितीय सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त धाडलेल्या

संदेशात सांगितले आहे : “ महाराष्ट्रीय संस्कृतीची ओळख केरळीय जनतेला करून देण्याची महत्त्वाची कामगिरी गणेशोत्सवासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे करून त्रिवेंद्रमचे महाराष्ट्र मंडळ महाराष्ट्राची एक प्रकारे सेवा बजावीत आहे. अशा प्रकारचे उत्सव राष्ट्रीय एकात्मतेला पूरक आहेत. गणेशोत्सवासारख्या कार्यक्रमाद्वारे केरळ महाराष्ट्र यामधील प्राचीन सांस्कृतिक संबंध अधिक दृढ व्हावेत असे मला वाटते. ” त्रिवेंद्रमच्या १६ मराठी कुटुंबांच्या संख्येने निरुत्साही न होता तेथे मंडळ स्थापून गणेशोत्सव साजरे करणाऱ्या वासुदेवराव अभ्यंकर व डॉ. कुलकर्णींची प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे.

दोन गुजराथी एकत्र आले की ते आळीपाळीने काम बघतात व थाटलेले दुकान व्यवस्थित चालवितात. दोन पंजाबी एकत्र आले की ते ‘ शेरे पंजाब ’ सारखे हॉटेल खोलून नान-मुर्गीवर तुटून पडतात व वर लस्सी पितात. दोन मराठी एकत्र आले की मंडळ सुरू करतात.

एक नाही, तीन मंडळे !

एक स्वतःला, दुसरे दुसऱ्याला व तिसरे दोघांना भांडायला ! !

मराठी मंडळांतील भांडणे देशात प्रसिद्ध आहेत. याचे कारण या मंडळाचा सभासद कोण असतो ? मराठी माणूस. मराठी माणूस जात्याच बंडखोर असतो. विचार-स्वातंत्र्यापेक्षा त्याला “ स्वातंत्र्याचा विचार ” भलताच प्रिय. “ मला असे वाटते ” किंवा “ आय थिंक् ” हा त्याच्या विचारांचा स्थायीभाव असतो. स्वातंत्र्याचा स्वतंत्र विचार प्रत्येकालाच. प्रत्येकजण “ मला सर्व समजते ” असा अहंकार बाळगणारा. प्रत्येकजण दरिद्री नारायणाचा प्रतिनिधी व म्हणून समाजवादी. तितकाच धर्मप्रेमी पण प्रागतिक म्हणून शेखी मिरवणारा. या सर्वांत साहजिकच उत्पादन फक्त एकाच कमोडीटीचे. भरमसाट उत्पादन. ते म्हणजे शब्दांचे.

शब्द, शब्द आणि शब्द ! !

इतर प्रांतीय मंडळी मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने-गिरण्या स्थापन करून नफ्याचे उत्पादन करण्यात गुंतली आहेत. मराठी मंडळींनी पूर्वी उत्साहाने स्थापन केलेले समाज व मंडळे आज शाब्दिक काथ्याकुटीचे व प्रहार-प्रतिप्रहारांचे आखाडे बनलेले आहेत. आज या संस्थांमध्ये शब्दांचा कीस पडून एकमेकांत वितुष्टता वाढविण्याचे कार्य होते. त्यात अमूल्य वेळ विनाकारण खर्ची पडतो व सुज्ञ आणि उत्साही कार्यकर्त्यांचे सतत हाल होतात. कार्य गतिमान होत नाही, सहसा ते पार पडत नाही व पडलेच तर ‘ पुढच्या वर्षी बघून घेईन ’ या इर्षेत दुखावलेल्या मनाने कसेतरी ते पार पडते. मला एका संघटक मित्राने त्याचा अनुभव सांगितला, “ दर उत्सवाला मी पशु-शिक्षक आहे असे समजतो. सारे मराठी सभासद हिंस्र श्वापदे आहेत, असे समजावे लागते. सहसा कोणी त्रास देत नाही. पण कोणाचे केव्हा डोके फिरेल त्याचा भरवसा नाही. एक उत्सव संपला व ‘ जनगणमन ’ पुरे झाले की सर्कसच्या एका खेळाची

समाप्ती झाली म्हणून मी सुटकेचा निःश्वास सोडतो व दुसऱ्या खेळाची मनातल्या मनात तयारी सुरू करतो. " मराठी माणसाचा उत्सव निर्विघ्न पार पडला की श्रेय खुशाल कुशल संघटकास द्यावे. त्यावाचून ही ' हिंस्र श्वापदे ' एकत्र काम करणे जवळजवळ अशक्य आहे.

दुर्दैवाने, संघटनकौशल्य असणारे कार्यकर्ते दुर्मिळ आहेत. तीनशे वर्षांपूर्वी समर्थ रामदासांनी संघटनकलेचे तंत्र व मंत्र दासबोधात सांगून ठेवले आहे. त्यात सांगितलेली तत्त्वे मानसशास्त्राप्रमाणे आजही अचूक ठरतात हे मोठे आश्चर्य आहे. पैसे गोळा कसे करावेत, स्त्रियांकडून कामे करून घ्यायची असल्यास त्यांच्या मुलांचे कोडकौतुक करावे, मूर्खांना चढवून त्यांच्यापासून माहिती कशी काढावी वगैरे रामदासांचे सूक्ष्म निरीक्षण बृहन्महाराष्ट्राचे उत्साही कार्यकर्ते नीट शिकून घेतील तर केवढे फायद्याचे होईल ? मितभाषी, सुभाषी, सतत राबणारे, दुसऱ्याचा कल पाहून वागणारे, डोक्याने व हाताने कामे करणारे एक दोन कार्यकर्ते संस्थेजवळ असले तर ती संस्था वर येते. नाही तर तिचे अस्तित्व धोक्यात असते. कारण संस्थेजवळ नुसतेच ' साहेब ' असून चालत नाही. त्याचप्रमाणे नुसते हडेलहप्पी कार्यकर्तेही संस्थेचा खजिना व कार्यक्रमांचे वैचित्र्य वाढवू शकत नाहीत.

माझ्या माहितीप्रमाणे बहुतेक महाराष्ट्र समाज वा मंडळे एकखांबी सर्कशीचे तंबू आहेत. कार्यकर्त्यांची ' सेकंड लाईन ' आपल्या अहंकारी वृत्तीने आपण वाढू देत नाही. वाढते ती शत्रु-गोटातील संघटना, पूरक ठरणारी ' सेकंड लाईन ' नाही. उदाहरणार्थ, इंदूरच्या महाराष्ट्र समाजास ' यंग गार्डस ' नाव का यावरून कलह होण्याची काही गरज आहे का ? बडोद्याच्या देवळालीकर गटाने ग्रंथप्रकाशनाचा सोहळा साजरा केला पण त्याचा नामोल्लेखदेखील मराठी वाङ्मय मंडळाने त्यांच्या अधिवेशनात केला नाही ! माणसाप्रमाणे त्यांचे देवही भांडकुदळ. तेही राजधानीतील ! सर्व ठिकाणचा मिळून एखादा प्रातिनिधिक कार्यक्रम होण्यास दिल्लीत हरकत कोणती आहे ? रामलीलेशी तुलना सोडा, पण दुर्गापूजेच्या उत्सवासमोर मराठी गणपतीचा प्रभाव कमी का पडावा ? बिनमराठी लोकांना गणेशोत्सवाचे महत्त्व समजावे यासाठी दिल्ली वा अन्य शहरांतील कार्यकर्ते कोणते प्रयत्न करतात ? दिल्लीतील चिल्लर गणेशोत्सवांच्या भाऊगर्दीत टिळकांनी सांगितलेला राष्ट्रीयत्व जोपासनेचा खरा हेतू दूरच राहतो. कदाचित दिल्लीच्या राजकारणाशी गणेशोत्सवाचे राजकारण विसंगत वाटू नये, यासाठी दिल्लीकर मराठी भाषिकांचा हा पद्धतशीर प्रयत्न असेल. कानपूर येथे अशाच अडचणी आहेत. हे सारे प्रकार पाहिल्यावर साऱ्या राज्यशाखांशी सुलभ संबंध राखू शकणारी एक केंद्र शाखा दिल्ली वा पुणे येथे चालू करावी असे वाटते. दिल्लीच्या राजकारणाचा विटाळ या केंद्र शाखेस लागून तेथेही दोन सुंदोपसुंद केंद्र संस्था निर्माण होणार नाहीत याची अर्थात खबरदारी घेतली पाहिजे.

बृहन्महाराष्ट्र एका दृष्टीने सुखी आहे. मराठी माणसे महाराष्ट्राच्या बाहेर पडल्या-

वर आपली जातपात विसरून जातात. महाराष्ट्राच्या बाहेर स्थायिक झालेल्या लोकांना मराठी भाषिक महाराष्ट्रात जातीवरून भांडतात का हे कळत नाही. बृहन्महाराष्ट्राचे साहित्यिक या दृष्टीने विशाल अंतःकरणाचे व वास्तववादी आहेत. बडोद्यात बरीच वर्षे राहिलेले विठ्ठलराव घाटे ब्राह्मणेतरांनी भाषा शुद्ध व समृद्ध करण्यासाठी संस्कृत शिकणे आवश्यक आहे असे जेव्हा आग्रहाने प्रतिपादन करतात त्या वेळी मन भरून येते. बडोद्याचा रेडिओ पूर्वी मराठी भाषिकांनाही बंद नव्हता. तेव्हा नलिनी मोरे तेथील कार्यक्रम आखीत. आंबेगावकर, मोरे व त्यांच्या दिमतीस जोशी, कप्तान वगैरे ब्राह्मण मंडळी ! असे जातीय व भावनांचे ऐक्य महाराष्ट्रात दुर्मिळ आहे. भारतातील प्रत्येक प्रांत आज जातीयवाद व प्रांतवाद अधिकृतपणे जोपासून राहिला आहे. त्या नव्या युगाची हवा बृहन्महाराष्ट्रास लागली तर आधीच झगडणाऱ्या या समाजाचे काय होईल ते कळत नाही. अल्पसंख्याक बहुधा एकजूट करून राहतात, कारण त्यांना त्यांचे अस्तित्व टिकवून धरावयाचे असते. ही मानसिक आस्था, सुबत्ता व शिक्षण यामुळे या दृष्टीने बृहन्महाराष्ट्राचे भवितव्य वाईट नाही.

आर्थिक दृष्टीने बृहन्महाराष्ट्राचा विचार केला की मनास दुःख होते. बृहन्महाराष्ट्रात बहुधा मध्यम वर्ग प्रामुख्याने आढळतो. बदलत्या काळात मध्यम वर्ग कंगाल व म्हणून कोत्या मनाचा झाला आहे. बृहन्महाराष्ट्राचे हे आर्थिक मानसशास्त्रीय चित्र समजून घेतले पाहिजे. प्रत्येक मोठ्या शहरात पाच-पंचवीस चांगले पगारदार (पण नोकरच !) दिसतात. त्यांच्या जोडीला शेकडो मध्यमवर्गीय कुटुंबे त्या शहरात जेमतेम गुजराण करीत असतात, हे आपण विसरून चालणार नाही. पूर्वीचा गरीब मजूरवर्ग आज प्रत्येक घटक चांगले उत्पन्न मिळवीत असल्याकारणाने आर्थिक दृष्ट्या मध्यमवर्गापेक्षा पुष्कळ सुखी आहे. ह्यापूर्वीच्या गरीब वर्गातील शिक्षित व नीतिमान लोक आज चांगल्या अवस्थेत आहेत पण त्यांचे प्रमाण पंचवीस टक्के. बाकीचे सारे विडीकाडी व बाईबाटलीचे पुजारी. गोळाबेरीज केली असता बृहन्महाराष्ट्रीयन समाज एकंदरीत गरीबच. थोडेसे व्यापारी, थोडेसे तंत्रज्ञ, थोडेसे वकील वा डॉक्टर्स व थोडेसे लष्करी वा सिव्हिल सर्व्हिसचे बडे अधिकारी. हे अपवाद वगळले तर बाकीचे सारे " हँड टू माऊथ "च. मग ते बडोद्याचे असोत, ग्वालेरचे असोत का दिल्लीचे मराठी भाषिक असोत. दिल्लीचा मराठी पगारदार इतर प्रांतीय अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक दृष्टीने डावाच ठरतो या दुर्दैवाला काय करणार ?

बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणूस आर्थिक दृष्टीने मागासलेला का ?

मला वाटते, महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रातील आर्थिक पीछेहाटीची कारणे सारखीच असावीत.

पहिले कारण, मराठी माणसाची धारदार जीभ. शिवाजीमहाराजांची ती जणू भवानी तलवार आहे असे समजून मराठी माणूस आपल्या जिभेचा पट्टा फिरवून समोरच्या गोटात दाणादाण उडवून देतो. यशवंतराव चव्हाण या दृष्टीने 'सावरकर' असते तर

त्यांना केव्हाच दिल्लीतून चंबूगबाळे आवरून परत पाठविण्यात आले असते. गुजराथी, पंजाबी किंवा उत्तर प्रदेशाचा माणूस त्या मानाने आपल्याहून गुणाने कमी असून मिठ्या जबानीवर आपले घोडे पुढे दामटून आपल्यापेक्षा जास्त यशवंत होतो. "येस्स सर" म्हणणारा मल्याळी वा तामीळी स्टेनो टिकतो व "नो सर" किंवा "सॉरी, आय वोंट" (सरबिर मी म्हणत नाही साहेबाला!) असे बजावणारा मराठी स्टेनो टाईम्सच्या "वाँटेड"च्या जाहिराती बघत फिरतो, यात सारे काय ते समजा. मराठी माणूस म्हणून अहंकारी व कोत्या मनाचा परप्रांतीयांना वाटतो. खरे आहे, गोड शब्दही जेथे मिळणार नाहीत, तेथे दुसरी अपेक्षा कसली करणार?

ऊठसूठ दुसऱ्यांच्या कृत्यांवर शेरे मारणे हा तर मराठी माणसाचा जन्मसिद्ध हक्क आहे व तो हक्क मराठी माणूस गाजविल्याशिवाय राहात नाही. कारणाशिवाय शेरे मारून इतरांना दुखवण्याची वाईट खोड मराठी माणसाच्या स्वभावातून जाईल तर फार बरे होईल. पुष्कळ वेळा मराठी माणूस 'नकळत' दुसऱ्यास दुखावून बसतो, इतकी ही खोड त्याच्या रक्तात भिनली आहे. नंतर सारवासारवी करणे जास्त खर्चिक, जास्त कटकटीचे व कित्येक वेळा स्वतःस अपमानास्पद वाटेल एवढे बिकट होऊन बसते. नंतर पश्चात्ताप करून फायदा काहीही नसतो. समोरच्या माणसाचा अहंकार आधीच दुखावला गेलेला असतो. मला मराठी माणसाच्या स्वभावातील एका विरोधाभासाचे नेहमीच आश्चर्य वाटते. तो पाहिजे तेथे नेमका मूग गिळून निमूट बसतो व नको तेथे बडबड करून आपली छाप बिघडवितो. हा संयम तो का पाळू शकत नाही हे कोडे मला अजून उकललेले नाही. थोड्याशा ज्ञानाने व संपत्तीने तो एकदम चढतो व नशेत असल्यासारखा बोलू लागतो. आमचा व्यापारी आपण बिर्ला आहोत असे समजतो तर कारकून आय. सी. एस. अधिकारी! ह्या एका जिभेमुळे मराठी संस्थांचे संसार विस्कळीत झाले आहेत, व्यापारधंदा बसला आहे व राजकारणात अनेक शत्रु निर्माण झाले आहेत।!

दुसरे कारण, मराठी माणसाचे स्वतःचा उद्योग सोडून इतर धंदेच फार. लष्करच्या भाकरी भाजण्याची मराठी माणसास भलतीच 'खाज' असते. त्यामुळे डॉक्टर गायक बनण्याचा प्रयत्न करतो, इंजिनियर लेखक, केमिस्ट समाजसुधारक तर व्यापारी राजकीय पक्षाचा विरोधी पुढारी. ह्या फालतू व पैसे न देणाऱ्या इतर धंद्यांमुळे मराठी माणसास आपल्या नोकरीकडे किंवा धंद्याकडे संपूर्ण वेळ किंवा पुरे लक्ष देण्यास सवडच होत नाही. विशेषतः, धंदा हा 'फुलटाईम् जॉब' असतो. त्याची तुलना मत्सरी बायकोशी करता येईल. तिला दुसरी सवत चालणारच नाही. गुर्जर माणूस किंवा सरदार शेठजी 'धंदा एके धंदा' करतो ते आपल्या स्वभावास मानवले तर आपणही तेवढेच समृद्ध व संपन्न बनू.

तिसरे कारण आमचा अल्पसंतोषीपणा. लक्ष्मीदेवीस महत्त्वाकांक्षी व आर्थिक हाव असणारी मर्द मंडळी जास्त पसंत पडतात. बडोदे किंवा ग्वाल्हेर शहरात मराठी

भाषिक हजारोंच्या संख्येने असूनदेखील व्यापारी चार-पाचच आढळतात. तेही कापडाचे व्यापारी म्हणजे दक्षिणी लोकांसाठी लागणाऱ्या नऊ वारी पातळांचे कमिशन एजंट्स्! त्यांचा व्यापार परप्रांतीयांशी किती होतो हे पाहिले तर मन निराश होते. सिंधी व्यापारीही कमी टक्क्यावर व्यापार करतो. पण तो मिठ्ठया जबानीच्या बळावर व्यापारा ' टर्न ओव्हर ' एवढे वाढवितो की, त्याच्या एकंदर नफ्याचे प्रमाण दुपटीने वाढते. आमच्या शहरी मराठी वाङ्मय मंडळातर्फे गडकरी स्कॉलरशिप ठेवण्यात आली. मंडळाच्या चिटणिसांना सौ. अमीन (पूर्वाश्रमीच्या किर्लोस्कर) जास्त फंड जमविण्यास मदत करावयास तयार होत्या. पण चिटणिसांनी त्यांना सांगितले, " नाही, आमचा फंड फक्त १५०० रुपयांचाच आहे. आम्हाला जास्त पैसे नकोत ! " असे किस्से शेकड्यांनी सांगता येतील.

चौथे कारण, नो रिस्क पॉलिसी.

धोका न पत्करण्याच्या वृत्तीतून आमचा अल्पसंतोषीपणा जन्म घेत असावा. " साहसे श्रीः प्रतिवसति " हे वचन धंदा, राजकारण व समाजकारण या सर्वांना सारखेच लागू आहे. साहस केल्याशिवाय बरकत नाही. मराठी माणूस रणांगणावर साहसाने लढू शकतो; पण व्यावहारिक जगात साहस म्हटले की त्याचा पाय मागे. आज स्टेट बँक प्रायव्हेट टॅक्सी चालविण्यासाठी भराभर कर्ज देत आहे. परंतु किती मराठी लोक टॅक्सी विकत घेण्यासाठी पुढे येत आहेत ? मुंबईत अशा शेकडो टॅक्सीज मल्याळी लोकांच्या ताब्यात आहेत. मराठी माणूस धोका पत्करू शकत नाही. कारण अडीअडचणीत त्याला व्यवस्थित मदत करू शकतील असे नातेवाईक वा मित्र तो त्याच्या स्वभावामुळे गोळा करू शकत नाही.

पाचवे कारण मराठी माणूस परधार्जिणा असतो, तो स्वकीयांना सहसा मदत करीत नाही. गुजराथी पटेल आफ्रिकेत गेला तर त्यास धंदा सुरू करून देण्यासाठी पटेल लोकांत अहमहमिका लागे. मल्याळी वा तामीळ माणूस आपल्या नातेवाइकांना गावाहून बोलावेल, आपले घर व स्वैपाकघर त्यांना वापरू देईल व त्याचे संसार उभे राहण्यासाठी शक्य ती मदत करील. अगरवाल बनियांचे असे कैक लक्ष फंड त्यांच्या जातीच्या मुलांना परदेशी उच्च शिक्षणासाठी जमविण्यात आले आहेत. मिझो, नागा वा गारो ख्रिस्ती एके काळचे रानटी लोक असून देखील आपापसात बरेच सहकार्य देतात. त्याउलट मराठी माणूस इतर स्वकीयांना टाळतो. उच्च तत्त्वाच्या गोष्टी सांगून निःपक्षपातीपणाचा आव आणून तो दुसऱ्यांना स्वीकारेल; पण स्वकीयांना मदतीचा हात देणे टाळेल. स्वतः उपाशी राहून इंग्रज फौजेस आपले तांदुळाचे रेशन देण्याचा हा परधार्जिणेपणा आजचा नाही. हा निःपक्षपातीपणा किंवा उच्च तत्त्वज्ञानाच्या गोष्टी दुसऱ्यासाठी असतात. स्वतःची वेळ येताच हे सारे तत्त्वज्ञान कोठे पळते ते समजत नाही. मराठी माणसांची ' ॲलर्जी ' असणाऱ्या मराठी अधिकाऱ्यांजवळ चौकशी केली असता ही माणसे नेमकी विरोधी गटाच्या जाळ्यात फसतात व उपकारकर्त्यांच्या पाठीत वार

मारतात असे उत्तर मिळाले. वार मारणाऱ्यांचे तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे, "एकदा उपकार केले म्हणजे काय जन्माचे गुलाम बनलो वाटते ?"

सहावे कारण मराठी माणसाचे कोते मन. त्यातून असूया, हेवेदावे, मत्सर आदी दुर्गुण जन्मास येतात. मराठी माणसास हे दुर्गुण वाटत नाहीत. तो त्याच्या बौद्धिक अहंकाराचा एक भाग असतो. म्हणून मराठी माणूस परप्रांतात वाईट आदरातिथ्याबद्दल टिंगलीस कारण होतो. "तो कामासाठी येतो, चहासाठी नाही," असे खास मराठी उत्तर या कोरड्या लोकांकडून ऐकावयास मिळते. त्यास अपवाद नागपूर-विदर्भाकडील मंडळी. मराठ्यांपेक्षा ब्राह्मणाचा अनुभव कटुच. आजच्या बदलत्या जगात बुद्धी ही मराठी माणसाची 'मनोपोली' राहिली नाही. प्रत्येक क्षेत्रात परप्रांतीय आमच्या शेकडो योजने पुढे गेले आहेत. तरीही आमचा अहंकार सोडावयास आम्ही तयार नाही. आमचा मत्सरग्रस्त स्वभाव आमच्या आर्थिक कंगालपणाचे 'बायप्रॉडक्ट' आहे. सारे दळिद्री त्यामुळे सारेच याचक; त्यामुळे 'श्वानवत् गुरगुरायते' ही वृत्ती साहाजिक आहे.

हे मराठी माणसाचे 'षड्रिपू' मराठी अभ्युदयास फार मोठे अडथळे बनले आहेत. बृहन्महाराष्ट्रीयन माणूस डोळ्यासमोर परप्रांतीय व स्वकीय यांचा परस्परविरोधी विकास बघतो व त्यामुळे त्यास हे षड्रिपूंचे अडथळे जास्तच जाणवतात.

बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसाची दैवते तीन आहेत. राजकारणात पूर्वीच्या पिढीचे लो. टिळक व आजच्या पिढीचे दैवत यशवंतराव चव्हाण आहे. समाजकारणात काहींचे आगरकर तर काहींचे ज्योतिबा फुले हे दैवत आहे. धार्मिक क्षेत्रात रामदास–तुकाराम ही दैवतांची जोडी अमर आहे. सावरकर हे ज्वलंत व जहाल दैवत सर्वांनाच मानवते असे नाही. चित्पावनांचा ओढा सावरकरांकडे तर चांद्रसेनी प्रभूंचा चिंतामणराव देशमुखांकडे, हरीजन एकजात भीमराव आंबेडकरांचे भगत आहेत. सर्वसाधारणपणे पाहता, मराठी माणसास—मग तो कोणत्याही पक्षाचा असो—हिंदुत्ववाद (जय शिवाजी महाराज!), त्याग (साने गुरुजी झिंदाबाद) व समाजवाद (सारेच डाऊन ट्रॉडन्, त्यांनी त्यांना मत द्यायचे नाही तर कोणी मलबारहिलवरील शेठीयांना मत टाकायचे ?) यांचे 'कॉकटेल्' जास्त पसंत आहे. परप्रांतीयांना या 'सेट् पॅटर्न" ची आता चांगली ओळख झाली आहे.

टिळक स्वतः ब्राह्मण होते. तरीही आळशी ब्राह्मणांना त्यांनी धारेवर धरले. १५ जुलै १८९० च्या केसरीत त्यांनी लिहिले, "ज्या वस्तूंची आपणास बिलकूल माहिती नाही अशा वस्तूचे गुणधर्म केवळ आपल्या बुद्धिसामर्थ्यावर शोधून काढणारा ब्राह्मणवर्ग निवृत्तिमार्गामध्ये रत झाल्यामुळे बुद्धीचा फायदा जो देशास व्हावयाचा तो ब्राह्मणांकडून यत्किंचितही झाला नाही. कच्चे पदार्थ उत्पन्न करणारे शेतकरी आणि या कच्च्या मालाचा पक्का माल करणारे व तो जिकडे तिकडे वाटून देणारे यांच्यामध्ये योग्य प्रमाण असल्याशिवाय राष्ट्रामध्ये संपत्ती स्वच्छंदाने कधीही खेळत नाही. आमच्या दुर्दैवाने बुद्धिमान निराळ्या धंद्याकडे गेल्यामुळे कारखानदारांचा वर्ग पुष्कळत्वाने

आमच्याकडे कधीही झाला नाही. " स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपले उद्योगधंदे वाढविले पाहिजेत व त्यासाठी स्वदेशीचा पुरस्कार झाला पाहिजे असे लोकमान्यांनी प्रतिपादन केले. गांधीजींनीदेखिल स्वदेशीचा आग्रह धरला. पण आज जमाना ' इंपोर्टेड् ' व ' स्मगल्ड् ' चिजांचा असल्यामुळे पुरेशा भांडवलाचा व उत्तेजनाचा सदाच खडखडाट असलेल्या मराठी कारखानदारांना वाटते तेवढा नफा होत नाही.

एवढे अडथळे असूनही बृहन्महाराष्ट्रात बुद्धिमान ब्राह्मणांचा कल कारखानदारीकडे वाढला आहे हे कबूल करावयास पाहिजे. ब्राह्मणांनी केले की उद्या थोड्याशा ईर्षेने, थोड्याशा श्रद्धेने इतर वर्ग ते धंदे यशस्वी रीत्या हाताळू लागतील. आजपर्यंत मराठी ब्राह्मण कारखानदारांचे उत्तम मॅनेजर्स असत, त्यांना कारखानदारीच्या संघटनेची व व्यापाची डोकेदुखी स्वतःला नकोशी वाटे. गेल्या पन्नास वर्षांत ही परिस्थिती बदलत चालली आहे. याचे श्रेय गुजराथेतील मराठी ब्राह्मणांना जाईल. गुर्जर शेठीयांनी उद्योगधंद्यांचा विचार करावयाच्या पन्नास वर्षे आधी शेठ परशुराम गणपुले यांनी सौराष्ट्र व गुजराथ येथे पॉटरीचा धंदा सुरू केला. कोटीभास्करांनी त्या सुमारास अलेंबिक कारखाना टाकून औषधींच्या कारखानदारीस सुरुवात केली. त्या कोटीभास्करांचे अलेंबिकमध्ये आज नावही शिल्लक नाही ! सरदेसाई व दांडेकर यांनी दक्षिण गुजराथेत तर विजयालक्ष्मीवाल्या पंडित कुटुंबाने सौराष्ट्रात ऑईल इंजिनांचा उद्योग सुरू केला. बडोद्याच्या फत्तेसिंगराव गायकवाडांनीही गुजराथेत कारखानदारीस हातभार लावला आहे. अर्थात ते श्रेय मामासाहेब घोरपड्यांना दिले पाहिजे.

इंदूर येथे दिवाणबहादूर पळशीकर व सरदार किबे, हैद्राबादेत देशपांडे, कलकत्ता येथे सांवत व जाधव या मंडळींनी भारतीय कारखानदारीस चांगला हातभार लावला आहे. महाराष्ट्रातील कारखानदारांनी आपल्या काही शाखा बृहन्महाराष्ट्रात काढल्या आहेत. उदाहरणार्थ, दांडेकरांनी मद्रास येथे, त्रावणकोर येथे ओगल्यांनी व बंगलोर येथे किर्लोस्करांनी आपले उद्योग थाटले आहेत. त्याहीपेक्षा परदेशात उद्योग सुरू करून तेथील पैसा भारतात आणण्याचा भगीरथ प्रयत्न करणाऱ्या मराठी भाषिकांचे मला कौतुक करावेसे वाटते. किर्लोस्कर जर्मनीनंतर सिंगापूर येथे आपली शाखा चालू करण्याच्या प्रयत्नात आहेत. प. जर्मनीत कोणी कर्णिक टेप रेकॉर्डस बनवितात. एस. के. कबूर यांचे नाव महाराष्ट्रीयन कारखानदारात अमर राहील. ह्यांचा मँचेस्टर येथे रंगाचा मोठा कारखाना होता. त्यांना इंग्लंडमध्ये ' कलर किंग ' म्हणून ओळखत. हे निपुत्रिक मरण पावले. ' कबूर ट्रस्ट ' मोठा असून त्याचा फायदा मराठी भाषिकांनी जरूर घ्यावा.

याशिवाय असंख्य छोटेमोठे मराठी भाषिक व्यापारी बृहन्महाराष्ट्रात आहेत. पण सर्वांची या छोट्या लेखात हजेरी कशी लावणार ? नोकरी सोडून व्यापारात मराठी लोक शिरत आहेत ती मोठी भाग्याची गोष्ट आहे. माणूस मेला व तो नोकरीदार असला तर त्याची बायकामुले रस्त्यावर येतात. व्यापार असेल तर बायकामुलांनी तो चालविला

तर कमीतकमी अर्धे तरी उत्पन्न मिळतेच. पण ही दृष्टी महाराष्ट्रीयनांत नाही. सत्ताधीशांच्या कृपेमुळे मराठी माणसांना शेतीसाठी मोठमोठ्या जमिनी मिळाल्या. पण मराठी माणूस या शेतीत टिकूच शकला नाही. त्याने आपल्या सर्व जमिनी घालविल्या ! धंदा करावयाचे आम्हांला शिकवलेलेच नाही. महाराष्ट्रात देहू येथे एकच वाणी झाला पण त्याने व्यापार केला तो अभंगांचा ! आमच्याकडे भाषाही पाहा कशी 'शुभ बोल नाऱ्या'ची वापरतात, म्हणे, महाराष्ट्रीयनांनो, धंद्यात पडा ! पडा काय शिरा नाही का ? बडोद्यास अन्योन्य सहाय्यकारी कंपनी थाटात चालते. पण तेथील मराठी अध्यक्षांनी ठराव कोणता आणला तर कंपनीच्या मालकीची 'जयरत्न' ही भली मोठी इमारत विकण्याचा ! गायकवाडांनी सुंदर 'ऑटो सेंटर' उघडले, ते नीट चालविले व शेवटी एका मुसलमानास विकून टाकले !

यास दुसरी बाजू आहे. बडोद्याचे डॉ. आंबेगावकर या गटाचे प्रतिनिधी आहेत. त्यांचे म्हणणे "मराठी माणसाच्या जीवनास काही विशिष्ट अर्थ आहे. तो पैशासाठी जगत नाही. लक्ष्मी त्याची देवी नव्हे. त्याच्या जीवनमूल्यांसाठी तो झगडतो, जगतो. पैशास महत्त्व आज आले आहे, पूर्वी नव्हते. कबीराच्या वेळचे किंवा राजा अकबराच्या कारकीर्दीतील सावकार कोणते ते कोणी सांगू शकेल काय ? आम्हीही पैसे खूप मिळवितो. पण ते येण्याआधी त्यापेक्षा जास्त रकमेच्या खर्चाच्या योजना आमच्याजवळ तयार असतात. आमचे पैसे कसे गुंतवावेत म्हणजे त्यातून जास्त पैसा गोळा होतील हे ज्ञान आम्हाला नाही. कारण पैसा हे आमचे साधन आहे, साध्य नाही." अशाच एका दुसऱ्या विचारवंताचे म्हणणे पुढीलप्रमाणे : "मराठी माणूस कोणत्या न् कोणत्या वेडाच्या तंद्रीत मग्न असतो. त्या मस्तीत त्या नशेत तो जगतो, त्याला पैशाने मिळणारी सुखे विशेष आनंद देऊ शकत नाहीत."

वरील विचार पाव टक्के लोकांसाठी कदाचित खरे असतील. पण प्रत्येक मराठी माणूस डॉ. सहस्रबुद्धे, इरावती कर्वे किंवा मामासाहेब दांडेकर कसा होऊ शकेल ? प्रत्येकास पैशाचा हव्यास वाटतो पण पैसा जास्त कमवण्याची कला व सामर्थ्य नसल्यामुळे, तो भांडवलविरोधी तत्त्वज्ञान बोलू लागतो, भांडवलशहाचा मत्सराने, असूयेने द्वेष करू लागतो. वृत्तीने व प्रत्यक्ष व्यवहारात तो जमीनदार वा जहागीरदार असल्यासारखा वागतो.

महाराष्ट्राप्रमाणे बृहन्महाराष्ट्रातही संगीतकार व नाट्यशास्त्रातील निपुण लोक मोठ्या संख्येने आढळतात. आजकाल तर प्रत्येक खानदान कुटुंबात मोठ्या मुलीस संगीतशास्त्राचे धडे देण्याची टूमच आढळते. प्रत्येक गावी महाराष्ट्र समाजात कोठे न कोठे 'लग्नाची बेडी' किंवा 'तुझे आहे तुजपाशी'चे प्रयोग चालूच असतात. महाराष्ट्रातील नाट्यप्रेम बृहन्महाराष्ट्रातही तेवढ्याच पराकोटीस गेलेले आढळते. मात्र बृहन्महाराष्ट्राने फार उच्च दर्जाचे नट, बजवय्ये किंवा गवई मोठ्या संख्येने निर्माण केल्याचे उदाहरण दिसत नाही. चिल्लर, हौसे व गवसे यांचीच संख्या जास्त. व्यापारा-

प्रमाणे संगीत व नाट्य यांच्यावरही गेल्या पिढीत बहिष्कारच होता. संगीत व नाट्य या क्षेत्रावरील ही सामाजिक बंदी हळूहळू उठत चालली आहे. मात्र व्यापारावरील बंदी मराठी मनात अजून पक्कीच आहे. व्यापाऱ्याच्या मुलास सहसा चांगली मुलगी पसंत करत नाही, तिला डॉक्टर, इंजिनिअर किंवा ऑफिसर लागतो. तत्कालीन वाङ्मय त्या वेळच्या सामाजिक चालीरीतींचा आरसा असते. पण एकाही दिवाळी अंकातील कथेचा नायक व्यापारी नसतो ! पूर्वी तर शेतकऱ्यासही ते स्थान नसे. नायक म्हणजे फक्त पांढरपेशा—शिवाजी पार्क, गिरगांव किंवा सदाशिव-नारायण पेठेतला ! आता मात्र चित्र बदलले असून ' कराकरा खाजवणारा ' व ' पचकन् थुंकणारा ' शेतकरी नाही असे मासिकच प्रसिद्ध होत नाही ! !

बृहन्महाराष्ट्राचा विस्तार फार जंगी आहे. त्यामुळे प्रत्येक वैयक्तिक स्थळाच्या काही विशिष्ट समस्या आहेत. उदाहरणार्थ, गुजराथेत बडोदे संस्थान विलीन झाल्यावर तेथील मराठी भाषिकांचे एकदम डीव्हॅल्युएशन् झाले. राजा मराठी पण राजपद व जनताप्रेम नसलेला. त्यामुळे बडोदा-अहमदाबाद रेडिओवरील बहुसंख्य कर्मचारी मराठी असले तरी मराठी गीतांना तेथे बंदी आहे, मराठी नाट्य किंवा इतर कार्य-क्रमांची गोष्टच नको. तेथे सिंधी कार्यक्रम होतो, पण मराठी नाही. पूर्वी बडोद्यास फार बडी मराठी मंडळी असत, सरकारात त्यांचे वजन असे. आजचा बडोदे वा अहमदा-बादेतील मराठी भाषिक नोकरीमुळे लाचार झाला आहे. तेथील मराठी लोकांना उत्तम गुजराथी येते, पण या पिढीतील गुर्जर साहित्यिकांत एकाही मराठी भाषिकाची हजेरी नाही. एक चांगला अपवाद म्हणजे पुरुषोत्तम मावळंकरांचा. मराठी शाळा व मराठी माध्यम काही मोठी शहरे सोडली तर मिळत नाही. मराठी माणसाचे बजेट नेमलेले. त्यामुळे मुलांना इतर ठिकाणी फक्त मराठी शिक्षणासाठी ठेवणे परवडत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळाही परवडत नाहीत, त्यामुळे सर्वसामान्य मराठी मुलाचे इंग्रजी, मराठी व गुजराथी—सारेच यथातथा· शारीरिक खेळात मात्र या मुलांचा पहिला क्रमांक असतो.

ग्वालेर-इंदूर येथे हीच रड आहे. नाइलाजाने मुलांना हिंदी माध्यमाच्या शाळेत धाडावे लागते. तेथील लोकांचा पुण्यामुंबईच्या लोकांवर मोठा घुस्सा आहे. कारण त्यांच्या काळेले व तांबे या कवींना पाहिजे तेवढी मान्यता पुणे वा मुंबई यांनी दिलेली नाही. येथे मराठी राजकारणी पुढारी जनसंघामुळे बरेच प्रसिद्धी पावले आहेत. ग्वालेरची राजमाता किंवा शेजवलकर आज अखिल भारतीय कीर्ती मिळवून आहेत. मराठी माणसाची दुही येथेही पाहावयास मिळते. उज्जैनचे गोविंद पांडुरंग हिरवे वकील व ग्वालेरचे डॉ. पुस्तके आज अखिल भारतीय पुढारी म्हणून सहज चमकले असते, केंद्रमंत्री झाले असते, पण दोघांनी आपापसात झगडून एकमेकांचे पाय खेचून ' इतरांना ' पुढे जाण्याची संधी दिली ! मध्यप्रदेश ॲसेंब्लीत स्पीकर म्हणून गाजलेले पटवर्धन व जनसंघात कुशल कार्यकर्ते म्हणून प्रसिद्धी पावलेले कुशाभाऊ ठाकरे

अनुक्रमे देवास व इंदूरचे आहेत. वसंतराव प्रधान हे एम. एल. ए. पूर्वीच्या गोविंदसिंगांच्या मध्यप्रदेशाच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. रामबागेत राहणाऱ्या दिगंबरशास्त्री नेने या सामाजिक पुढाऱ्यांना तर तेथील मुख्य मंत्र्यांपेक्षाही जास्त मान होता! पण या सर्व मराठी पुढाऱ्यांचे लक्ष्मीशी सख्य नसल्यामुळे भारतात सोडा, पण महाराष्ट्रातही यांचे नाव कोणास ठाऊक नाही. इंदूरचे काळेले किंवा तांबे पुण्यात असते तर महाराष्ट्राने त्यांना डोक्यावर घेतले असते, असे तेथील साहित्यप्रेमी लोकांना वाटते. दक्षिणी माणूस बचितला की त्यास उत्तेजन द्यायचे असे येथील लोकांचे धोरण असते. पेणकर जोशींच्या कटलरी कारखान्यात इंदूरचे महाराज गेले तेव्हा दुप्पट किंमत देऊन खूप माल त्यांनी विकत घेतला. हेतू हा की जोश्यांना जास्त कमाई व्हावी : पण हे प्रेम, ही सहानुभूती, हा लोकाश्रय आम्हांस पुण्या-मुंबईचे लोक का दाखवीत नाहीत, असा त्यांचा परखड सवाल आहे.

मराठी माणसाविषयी लागणी असणे हे मराठी रक्तात एकंदरीने कमीच. मला कलकत्त्याच्या महाराष्ट्र-समाजात हाच अनुभव आला. माझ्याबरोबर एक पटेल उद्योगपती होते. ते म्हणाले, “ शूं तमारा चटणा लोको ? आमच्याकडे असा लांबून कोणी एखादा पाहुणा आला की आम्हाला केवढा आनंद होतो ! नाहीतर तुमचे माणूसघाणे लोक ! ! ” पंजाबमध्ये, केरळात, कलकत्त्यात इतर प्रांतीयांकडे आतिथ्याचा जो भडिमार होतो, जे आपुलकीने स्वागत होते ते आपले मराठी लोक आपल्यास देत नाहीत असा माझा अनुभव आहे. ‘ मित्रांपासून वाचवा ’ हे वाक्य मूळ मराठी लोकांच्या अनुभवातून जन्म पावले की काय कोण जाणे. दिल्लीत मला एका यू.पी.यनने सुनावले, “ महाराष्ट्राच्या संपूर्ण पाठिंब्याशिवाय आज इंदिरेचे राजकारण चालू शकणार नाही. पण त्याचा फायदा घेऊन तुमच्या यशवंतरावांनी दुसऱ्या मराठी मंत्र्यांस संधी दिली का ? आमच्याकडे एकाच वेळी पंत, नेहरू, किडवाई, मालवीय, शास्त्री, महावीरशास्त्री ही आमची यु.पी.यन मंडळी मिनिस्ट्रीत असत ! ” दिल्लीतील एका उच्च अधिकाऱ्याने मला सांगितले, “ तुमचे सी. डी. ! खूप विद्वान असतील. पण दिल्ली युनिवर्सिटीचे व्हाईसचान्सेलर असताना एकाही मराठी माणसाला त्यांनी मदत केली नाही ! बायको शोधून काढली तीही आंध्रातली ! ! ” अशी अनेक उदाहरणे देता येतील.

१८५७ नंतर असंख्य क्रांतिवीर महाराष्ट्राच्या बाहेर, विशेषतः मुसलमानी संस्थानात जाऊन बसले. अजमीरमध्ये पाचसहा तरी नावे देता येतील. निजामच्या हैदराबादेत तेच घडले. त्यामुळे निजामीतील सारी राजकीय, सामाजिक, धार्मिक सूत्रे मराठी माणसांच्या हाती असत. १९४२ च्या लढ्यात रेड्डी कंपनी ब्रिटिशांना मदत करीत असे. स्वातंत्र्याच्या चळवळीत खरे लढले ते एकजात मराठी जिल्ह्यांतील आपले वीर ! आज त्यांची नावेदेखील ऐकू येत नाहीत. एक खुर्ची बनवितो, दुसरा तीवर बसतो. हे दुर्दैव नेमके मराठ्यांच्याच वाट्याला का यावे ? आमचे शिंदे बादशहास खेळवतात, पण दिल्ली काबीज करून बादशहा म्हणून स्वतः सत्तेवर येण्यास का

बिचकतात ? का मराठी अस्मिता ती हीच ?

मराठे शूर आहेत, कर्तबगार आहेत, उद्योगी आहेत, नीतिमान आहेत—या साऱ्या गोष्टी परप्रांतीयांना मान्य आहेत. पण मराठे त्यांच्या कर्तबगारीच्या प्रमाणात पुढे येत नाहीत हेच खरे. मग ते मराठे महाराष्ट्राचे असोत नाहीतर बृहन्महाराष्ट्राचे असोत. कदाचित आम्ही आमचा जयजयकार जास्त करून घेतो व त्यात ध्येयाकडे पाहिजे तेवढे आमचे लक्ष लागत नाही. गोविंदराव काळ्यांनी १७९२ मध्ये एका पत्रात नाना आणि महादजीबद्दल काढलेले उद्गार सार्थ आहेत : " झाल्या गोष्टी त्यात केवळ मुलूख, राज्यप्राप्त, इतकेच नाही, तरी वेदशास्त्ररक्षण, धर्मसंस्थापन, गोब्राह्मण प्रतिपालन, सार्वभौमत्व हाती लागणे, कीर्ती, यश, यांचे नगारे वाजणे, इतक्या गोष्टी आहेत. हे किमया संभाळणे हक्क आपला व पाटीलबाबांचा ! " आमच्या मराठ्यांना भविष्यात उज्ज्वल काल आहे अशी चिन्हे आज दिसत आहेत. आमच्यासाठी पुढील उपदेश योग्य आहे : " अगर मुसलमान कोणी असे, तरी मोठे मोठे तवारीखनामे आले असते. यवनांच्या जातीत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगनाबरोबर करून शोभवावी. आमचे हिंदूत गगनाइतकी जाली असता उच्चार न करावे हे चाल आहे. "

मराठ्यांचा भविष्यकाल उज्ज्वल आहे पण मराठे फार लौकर झोपी जातात, स्वप्ने पाहतात व शेख महमदाप्रमाणे स्वप्नामध्ये स्वकीयांना लाथा मारून आपलाच कार्यनाश करतात. १६५५ मध्ये शिवाजीराजांनी तुळजापूरच्या भवानीची प्रतापगडी स्थापना केली तेव्हा समर्थांनी ज्या शब्दात आनंद व्यक्त केला ते शब्द पुन्हा सांगावेसे वाटतात :

येकचि मागणे आता । द्यावे ते मजकारणे ।
तुझा तू वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखता ॥
दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो ।
परंतु रोकडे कांही । मूळ सामर्थ्य दाखवी ॥

हा माझा विदर्भ

मधुकर केचे

कोणत्याही प्रदेशाचा महिमा वर्णन करायचा झाला तर पहिले वाक्य असे असते : आमच्या प्रदेशाला इतिहास आहे! विदर्भाबद्दलही तसे म्हणायला हवेच. विदर्भाला नुसता इतिहास नाही; हा प्रदेश प्राचीन आहे. आज पश्चिम महाराष्ट्र या नावाने ओळखला जातो त्या प्रदेशात जेव्हा निबिड रान होते त्या काळात विदर्भ नागरी जीवन जगत होता.

इतिहास-पुराणाचे अभिमानी रुक्मिणीच्या काळाकडे बोट दाखवतात. त्या कारणाने या भुईचा जुनेपणा सिद्ध होतो. मला मात्र अनेकदा प्रश्न पडतो की शिवाजी, राणा प्रताप, अकबर यांच्या तोडीचा मुत्सद्दी व झुंजार माणूस या प्रदेशात झाला की नाही? नाही म्हणायला गोंड राणी दुर्गावती हिचे नाव घेतले जाते. तरीही शेवटी हेच म्हणावे लागते की, विदर्भानंतर उदयास आलेले अनेक प्रदेश फार वेगाने भरभराटले आणि विदर्भमात्र जुन्याचा अभिमानच जपत राहिला.

वेगळा महाविदर्भ मागणारे कै. लोकनायक बापूजी अणे यांनी प्रांतपुनर्रचनेच्या शिफारशी करणाऱ्या मंडळासमोर एक अतिशय महत्त्वाचे निवेदन वाचले होते. ते निवेदन म्हणजे एक थोराड पुस्तकच आहे. त्यामध्ये विदर्भाच्या जुनेपणाच्या काही साक्षी त्यांनी सादर केल्या होत्या. विदर्भाचा मूळ विस्तार म्हणजे उत्तरेची हद्द नर्मदामाई आणि दक्षिणेची हद्द म्हणजे गोदावरी. या दोन नद्यांमध्ये नांदणाऱ्या लोकजीवनाला वैदर्भी संस्कृती म्हणायचे.

विदर्भाच्या त्या प्रचंड विस्ताराची आजच्या दैनंदिन जीवनात कोणाला जाणीव होत नाही. आज तो आठ जिल्ह्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यातही पुन्हा निजामाने इंग्रजांना दिलेले अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा हे चार जिल्हे म्हणजेच खरा विदर्भ समजला जातो. महाविदर्भ या शब्दातला विदर्भ हा एवढाच.

त्याचा ‘ महा ’ झाला. भोसल्यांच्या ताब्यातून इंग्रजांनी घेतलेल्या चार जिल्ह्यांमुळे. नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा हे चार जिल्हे तसे पाहिले तर ‘ विदर्भ ’ नव्हे. तेही विदर्भाच्या स्वतंत्र राज्यात समाविष्ट व्हायला हवे म्हणून महाविदर्भाची मागणी. महाविदर्भ या शब्दालाच ‘ नागविदर्भ ’ हेही एक नाव आहे. नागपूर प्रदेशाचे चार जिल्हे म्हणजे नाग.

या प्रदेशाला प्रामुख्याने गोंडवन असे जुने नाव आहे. शेतीविकासासाठी येथले दर्भ काढले म्हणून त्याला ‘ विदर्भ ’ म्हणतात असेही एक मत आहे. त्याचे बोलभाषेतले नाव वऱ्हाड. त्याची व्युत्पत्ती वरहाट (उत्तम प्रतीची बाजारपेठ) किंवा वर राष्ट्र > वर राठ > वराड अशी लावतात.

येथले मूळचे रहिवाशी भोई असावे. भोई हा शब्द भूस्वामी या शब्दाला जवळचा आहे. गोसाई जसे गोस्वामीचे तसेच हे भोई असावे. भोई जमात कोळ्यासारखी नदीवर मासे मारणारी व डोंगे (नाव) चालवणारी.

मुसलमान व इंग्रज यांच्या अमलाखाली हा प्रदेश महाराष्ट्रापेक्षा अधिक काळ होता. पैकी मुसलमानांचा गुण व वाण या प्रदेशाने बराच घेतला. भाषा, रीतिरिवाज, मानसन्मानाच्या कल्पना यांवर इस्लामाची फारच मोठी छाया आहे. त्याचे वर्णन योग्य वेळी येईलच. बाराव्या शतकात यादवांच्या राजवटीचा ऱ्हास झाल्यानंतर अल्लाउद्दीन खिलजी ते लॉर्ड मौन्टबॅटनपर्यंत या प्रदेशावर परका अंमल चालला. १५ ऑगस्ट १९४७ पासून पुन्हा शुक्ला व मिश्रा यांची परकीय राजवट या प्रदेशावर आली. हिंदी भाषिकांची ही राजवट पुन्हा या प्रदेशावर परिणाम करून गेली. आजची वसंतराव नाइकांच्या नावाने चालणारी प. महाराष्ट्राची राजवटही अनेक वैदर्भियांना परकीयच वाटते. त्याची कारणे ओघाने पाहू. पण या आठशे वर्षांच्या गुलामी आधी विदर्भाला स्वतःची अशी राजवट होती. आजचे विद्वान म. म. वा. वि. मिराशी यांच्या लेखनात ‘ वाकाटक नृपती ’ हा मोठ्या आवडीने येणारा शब्द किंवा अकोला जिल्ह्यातील वाशीम या गावाचे वत्सगुल्म हे ऐतिहासिक नाव व त्या गावाची राजधानी वगैरे माहिती इकडे मोठ्या प्रेमाने जपली जात आहे. तसेच भोजकोट (आजचे भातकुली), कुंडिनपुर, गाविलगड, वगैरे ठिकाणेही राजधानीची व म्हणून स्वतःच्या राजवटीची निदर्शक आहेत.

आज विचार करायचा तो आजच्या टीचभर विदर्भाचा. इकडचे लोक शतकानुशतके महाराष्ट्राच्या अलग व परकीय छत्राखाली राहिले म्हणूनच विदर्भाच्या वेगळ्या संस्कृतीचा प्रश्न निर्माण झाला. राजकीय कारण तेवढेच काही त्या अलगपणाचे निमित्त नव्हे. विदर्भाचा भूगोलदेखील महाराष्ट्रापेक्षा वेगळा आहे.

येथली विशेषतः भंडारा व चंद्रपूर हे दोन जिल्हे वगळून इतर सहा जिल्ह्यांची जमीन गहन शांत रात्रीसारखी काळीभोर आहे. ती रवाळ आहे. ज्वालामुखीतून निघालेल्या लाव्हा या तप्तरसातून ती झाली असे भूगोल सांगतो. चंद्रपूरची जमीन तांदळाला उपयुक्त. तेथे पूर्वी समुद्र असावा. कारण तिकडे सुपारीच्या व नारळाच्या आकाराचे

दगड आहेत. सुपारीसारखे दगड फोडले म्हणजे त्यातून सुपारीच्यामध्ये असते तशी नक्षीही आढळते. भंडारा जिल्हा तांदळाच्या आणि विड्याच्या तेंदू पत्तीचा.

काळ्या जमिनीचा विकास हादेखील आज इकडे महत्त्वाचा प्रश्न आहे; आणि ती समस्या महाराष्ट्राच्या जमिनीहून वेगळी आहे. येथे पावसाचे प्रमाण दिवसानुदिवस रोडावत आहे. शिवाय शेकडो मैलांचा काळा सलाईन ट्रॅक आहे. तेथे पाण्याची व्यवस्था करतो म्हटले तरी उपयोगाचे नाही. कारण तो खारा पट्टा ओलितामुळे पुन्हा खराब होणार. तेथे ओलीत न करता पावसाच्या भरवशावर पिके काढली तर नव्हे तरच ती उत्तम निघतात. त्या भागात होणारा गहू व ज्वारी यांची प्रत अतिशय उच्च आहे. त्या जमिनीत ओलीत करण्याचा अनुभव मात्र नेमका उलटा आहे.

इकडे विहिरी, तळी, बंधारे, धरणे यांची टंचाई आहे. त्यामुळे शेतकऱ्याचा कल पावसाची नव्वद दिवसांची किंवा त्याहूनही कमी अवधीची (early variety) पिके घेण्याकडे आहे. बागबगीच्यापेक्षा बियाणे निर्माण करण्याच्या कार्यक्रमात मात्र हा प्रदेश अतिशय आघाडीवर आहे. संकरित ज्वारी, कापूसबियांच्या वेगवेगळ्या जाती व बोरू (ज्यूट) ही बियाणे निर्माण करण्यात हा प्रदेश समस्त भारतात नाव काढणार. बंगाल हे ज्यूटचे माहेर. पण तेथे येथून बी पुरवले जाते !

चांदा व भंडारा या दोन जिल्ह्यांत तांदूळ होतो. त्याचे प्रमाण लक्षात घेण्या-इतपत नसले तरी तांदळाचे प्रकार व प्रती बघितल्या की भान हारपते. हिरानखी, काली कमोद, चिनौर, वगैरे नावे जशी काव्यमय तसाच त्या तांदळांचा गोडवाही !

सातपुडा व चांद्याकडचा पहाड ही या छोट्या प्रदेशाची अरण्ये. चांद्याला सागाचा एक प्रकार जगप्रसिद्ध आहे. हिरडा, रिठे, बेहाडे, महू, आवळे यांची वसती त्या पहाडांवर मैलोंगणती आहे. ताडोबाचे राष्ट्रीय उद्यानही त्यामुळेच होऊ शकले.

विदर्भाला कारखानेप्रधान संस्कृती सध्या तरी नाही. म्हणूनच येथे कामगारावर आधारलेल्या चळवळी किंवा डाव्या गटाचे राजकारण वगैरे डोळ्यांत भरण्याजोगे नाही. येथे मुख्य व्यवसाय शेती. आता आताशा साखरेचे कारखाने द्या वगैरे मागण्या हळूहळू कड घेरीत आहेत; पण ऊस वगैरे पश्चिम महाराष्ट्राइतका इकडे होईल असे म्हणता येत नाही. नाही म्हणायला नागपूर जिल्हा संत्र्यांसाठी नावाजलेला आहे. ही फळे किंवा वरूडची केळी हेही पुढे पुढे कोरडे स्वप्न ठरणार. कारण तिकडची विहिरीची पाणपातळी सपाट्याने खालावत आहे. शेतीला जोडूनचे उद्योग म्हणजे फळांचे डबा-बंद पदार्थ, दूधदुभते वगैरे बाबतीत फार तर येथे कारखाने होतीलही. तरी पण विदर्भाची खरी संस्कृती ही शेतीचीच.

संस्कृतीच्या अर्थाने संस्कृतीबद्दल बोलायचे तर या प्रदेशपुरुषाचे मन तपासले पाहिजे. जागृतीची उणीव, त्या उणिवेची जाणीव व मग आळोखेपिळोखे देणे हे या मनाचे रहाटगाडगे आहे. पूर्वीच्या काळी प्रसिद्ध गणिती दैवज्ञ, विद्वान बोपदेव वगैरे मंडळी इकडे होती. भवभूती व कालिदास हेही इकडचेच. नंतर पुन्हा हे मन अंधारात गेले.

खूप वर्षे आळस, व्यसने, कर्जबाजारीपणा, कज्जेखोरीमुळे कोर्टकचेरीची चटक, आपसी भांडणे, घराण्याचे अभिमान अशी या प्रदेशाची संस्कृती राहिली. त्याची जाणीव म्हणजे संत गाडगेबाबा, संत तुकडोजी, डॉ. पंजाबराव या व्यक्ती येथे निर्माण झाल्या. विदर्भ वर वर्णिलेल्या आपत्तींनी ग्रासला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणूनच हे लोक जन्माला आले. गाडगेबाबांची जप्ती घेऊन आलेल्या सावकाराशी मारामारी म्हणजे त्या वेळच्या कर्जाने बेजार झालेल्या विदर्भाचे दर्शन. सारे आयुष्य गाडगेबाबांनी "लोकहो, बैलांचे शंकर पट खेळू नका, कर्ज काढू नका" यात घेले. तुकडोजी महाराज गांधीजींचे तत्त्वज्ञान भजनातून सांगत राहिले आणि बेशिस्त वऱ्हाडातून एक शिस्तशीर तरुण पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. डॉ. पंजाबरावांनी शिक्षणाचे व्रत घेतले.

या मंडळींच्या टोचण्यामुळे विदर्भ जागा झाला. डॉ. पंजाबरावांनी परजातीच्या स्त्रीशी विवाह करून देशमुखी दिमाखाला, घराण्याच्या खोट्या मोठेपणाला जोरदार धक्का दिला व आजच्या जातिनिरपेक्ष तरुण पिढीची सोय करून दिली. त्यांनीच कर्जलवाद कायदा पास करून गाडगेबाबांना हवा असलेला कर्जमुक्त शेतकरी उभा करण्याचा प्रयत्न आरंभला. शिक्षण-प्रयत्नांची तर डॉ. पंजाबराव गंगोत्रीच. आज शिक्षणाचे इकडे जाळेच पसरले आहे. त्याचे श्रेय व आदर्श म्हणजे डॉ. पंजाबराव. अमरावती जिल्हा भारतात (शिक्षणाच्या दृष्टीने) दुसरा आहे. सिनेमाची गाणी किंवा तमाशाच्या लावण्या ऐकणारा वऱ्हाड आज तुकडोजींची भजने गात आहे. पण हे सारे सांगायचे म्हणून सांगितले. तसे पाहिले तर अजूनही विदर्भाचा कर्जबाजारीपणा, भोळेपणा आणि बुजरेपणा गेलेला नाही. I A. S. च्या नोकऱ्यांमध्ये तो बिचकतोच.

वरूडचे एक अशिक्षित गृहस्थ श्री. जागोबाची आंडे यांनी संत्रा व केळी यांची मुहूर्तमेढ त्या प्रदेशात केली. आज करोडो रुपयांची उलथापालथ होण्याचे श्रेय त्या अज्ञात इसमास आहे. गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव यांच्या तोडीचेच कार्य त्यांनी शेती-विकासात केले. ही गोष्ट आजच्या हरित क्रांतीच्या पन्नास वर्षे आधीची आहे. आज वडगावचे गणेडीवाल हे विदर्भाला कोरड्या पिकांच्या बियाण्यांचा मंत्र देऊन आघाडी-वर नेत आहेत.

तरीही विदर्भ स्वतःला मागासलेला समजतो. न्यूनगंड हा त्याचा स्वभावच आहे, आणि त्यातच पुढे जाण्याचीही बीजे आहेत.

असे आहे विदर्भाचे कृषिमन. रोजची डाळभाकर तो चवीने खातो. दुसऱ्याशी भांडण्याची त्याची प्रवृत्तीच नाही. त्याच्या मनमिळाऊ स्वभावाचा भोळेपणा झाला. राजस्थानी लोक त्याच्या या स्वभावाचा फायदा घेऊन इकडे गब्बर झाले. बरीचशी शेती व व्यापार त्यांच्या हाती गेला. विदर्भाला अनेक वर्षे त्याचे भान नव्हते. इंग्रजी काळात कोकणस्थ लोक इकडे आले. नाणावलेले वकील झाले. मग विदर्भ शेटजी व भटजी यांच्या नावाने खडे फोडू लागला. इकडचे राजकारण त्या दोन गोष्टींवर आकारले गेले.

विदर्भाला धार्मिकतेचाही फार मोठा वारसा आहे. संस्कृतीची वैशिष्ट्येच सांगायची तर नागपंचमीला होणारी नागाची पूजा व पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी होणारी मारबत यांची उदाहरणे द्यावी लागतील. वऱ्हाड पंढरीच्या विठोबाचा भक्त आहे. तसे म्हटले तर विदर्भाचा महाराष्ट्राशी अलगपणा केवळ याच ठिकाणी खुंटतो. विदर्भातले महार बुद्ध होण्याआधी मीराबाई व विठोबा यांचे भक्त होते. त्यांची भली मोठी संख्या पंढरीची वारी करून येई. त्याचा पुरावा विनोबांनीही एका ठिकाणी दिला आहे. वारकरीपणा सोडला तर मात्र विदर्भाचे नाते मोठ्या महादेवाशी. "महादेवाच्या रस्त्यानं घोटा घोटा पाणी ऽऽ नंदी लागला पोहणी ऽऽ ॥ किंवा महादेवा जातो गा ऽऽ शंकरराया ऽऽ" वगैरे वाटचालीची गीते गाणारा वऱ्हाड आजही आढळतो. तो पखवाजावर अवधूती भजने गातो.

शिवाय विदर्भाला पंढरपूर व महादेवाचा डोंगर ही दूरची ठिकाणे सोडली तरी स्वतःचा असा धर्म आहे. रिद्धपूर, कांतिये नगर, वगैरे ठिकाणी महानुभावांनी आपला पंथ गाजवला. भांदक (भद्रावती), कारंजा, मुक्तागिरी, भातकुली येथे जैन धर्माची क्षेत्रे आहेत. वर्षांनुवर्षे विदर्भ असे धार्मिक जीवन जगत आहे. त्या पारंपरिक धर्म-कल्पनांतच अवलियांचे वेड हेही आहेच.

कोणत्याही अवलियाच्या मागे लागणे हा विदर्भाचा फार जुना स्वभाव; आणि बरेचसे योग्य अवलिये या भोळ्या विदर्भाच्या कल्याणासाठी पाठवणे हा त्या दयाघन देवाचा स्वभाव. महानुभावीय पिसा अवतार गुंडम् राऊळ, बालान्ध संत गुलाबराव महाराज, शेगावचे गजानन महाराज, वरखेडचे आडकोजी महाराज हे सर्व अवलियेच आणि ते या प्रदेशाचे कल्याण करून गेले. याच धर्मभोळ्या प्रदेशाने महात्मा गांधी, विनोबा हेही स्वीकारले हे नवलच !

विदर्भ श्रीमंत म्हणून प्रसिद्ध आहे. पण ही जुनी गोष्ट झाली. वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड अशी म्हणच होती. पण ही म्हण अखंड्या भारतातूनच सोन्याचा धूर निघण्याच्या दंतकथा पसरत होत्या तेव्हाची असावी. आज महाराष्ट्रातला शेतकरी उसाच्या भरवशावर स्कूटर-मोटारने फिरतो, तिकडे कारखान्यांची रेलचेल आहे वगैरे बातम्या ऐकल्या म्हणजे आमच्या पोटात गलबलते. महाराष्ट्राचा विदर्भाशी सावत्रपणा असे या भरभराटीच्या विषमतेचे कारण मग चोहीकडे पसरते.

पुरेसे अन्न पिकवणारी जमीन विदर्भाजवळ आहे हे खरे; पण आजच्या कार-खान्यांच्या युगात ती काही श्रीमंती नव्हे. निदान एकमेव श्रीमंती नव्हेच. कारखान्यांच्या व गर्दीच्यापासून हा प्रदेश कित्येक कोस दूर आहे. त्यातूनच त्याचे पुन्हा एक मन दिसून येते. विदर्भ हा एकांडा, एकलकोंडा नाही; पण बिचकणारा आहे त्याला शांतता हवी. स्वस्थ जीवन हवे. आजही विदर्भाच्या कौलारू जीवनात खेडूत एकमेकांना टेकर देत विचारतात, "का गा झालं काय जेवन ?" जेवण होणे, ते शांतपणे होणे एवढेच स्वरूप जीवनाचे लक्षण आहे. त्याला ती मुंबईची धावपळ नको. हलाखी नको. तो अल्पसंतुष्ट आहे.

घाईगर्दी आणि गाजावाजा त्याला नको. पुण्याला पूर आला. केवढा आरडाओरडा. त्याच्याच दोन-तीन वर्षे आधी आकोटला पुराचे असेच थैमान झाले होते. विदर्भाने कोणाहीपुढे तोंड वेंगाडले नाही. द्विभाषिकाच्या वेळी नागपूरची मंडळी मुंबईच्या ऑफिसात गेली व तिथल्या यांत्रिकपणाला, धावपळीला त्रासली हेही विदर्भाचे वैशिष्ट्यच.

वैदर्भी जीवनाचा अवाढव्यपणा, सैलपणा, गोष्टीवेल्हाळपणा, आणि धालेपणा हे त्याच्या भोळेपणा, बिचकेपणा वगैरे गुणां (!)च्याच जोडीला सांगावे लागतील. त्यामुळे भाषाही तशीच बनली आहे. "काऽऽय राजे हो" शिवाय गोष्ट नाही. प्रत्येक माणूस राजा. 'भल्ले व्हान' हा शब्द आश्चर्य, अविश्वास, आनंद यासाठी हजार वेळा वापरला जातो. विदर्भाच्या भाषेला आज 'बोली' म्हटले जाते. छापखाना पहिल्यांदा पुण्याकोकणाच्या बोल्यांना मिळाला म्हणून त्या भाषा झाल्या व त्यांचे व्याकरणही झाले, याचा विदर्भाला विषाद आहे म्हणूनच दुरावाही आहे. तसे पाहिले तर वऱ्हाडी व मराठी या एकच भाषा. विदर्भाला मात्र हिंदीशीही जवळीक वाटते. उर्दू शब्द तर खेड्यातला माणूस उठल्याबसल्या वापरतो. तख्तपोस, मालूम असणे, मुकदमा, बरखास्त वगैरे शब्द भाषेत व जीवनातही येऊन बसले आहेत.

वैदर्भी भाषेचा अभ्यास करणाराला तिच्यात बऱ्याच उपयुक्त गोष्टी आढळतील. उदा. 'मी तेव्हाच तरकलो' हे 'तर्क'चे क्रियापद, 'कायहून म्हणतोस,' 'कायनं आला' 'कायचं शिक्षण' वगैरे 'काय'ला लागणारे प्रत्यय किंवा संस्कृतशी व ज्ञानेश्वरीशी असणारे शब्दसाम्य (उदा. पजाळा > प्रज्वाळा, येंगणे-येंघणे वगैरे) हे आता मराठीत समाविष्ट व्हायला हवे. मीने ते काम केले, तूने नाही हेही प्रत्यय मराठीला नवे पण उपयुक्त आहेत. म्या, मले, तुले, याबद्दलही विदर्भाला अभिमान आहे.

वेदातला प्लुताचा (तीन मात्रा) उच्चार वऱ्हाडीत आहे. बैलऽऽ, लोकऽऽ वगैरे शब्दांत तो प्रगट होतो.

विदर्भाचे सहजीवन हे फार मोठे वैशिष्ट्य म्हणता येईल. आष्टीचे बावन्न गावांचे मालगुजार श्री. धोंगडी हे जातीने ब्राह्मण, पण रोज न चुकता नमाज पढत असत. आणि सवारीला नवस बोलणाऱ्या बाया व माणसे इकडे हजारोंनी आहेत. त्याचप्रमाणे दिवाळीला गवळण होऊन नाचणारे मुसलमान आणि मोहरमला वाघ बनून नाचणारे हिंदू हे तर कित्येकच.

महाराष्ट्राचा गणपती उत्सव वऱ्हाडाने आताआताशा उचलला. पण त्याचा खरा सण म्हणजे दिवाळी व तिच्यातली गवळण. दंढार हा नाचगाण्याचा प्रकार अक्षरशः रात्र रंगवतो. त्यात संवादही असतात. आजची समाजस्थिती दाखवणाऱ्या लावण्या, सोंगे त्यात बरीच करमणूक करतात.

जुन्या काळात विदर्भ वैभवी होता. बैलगाडीला वंगण म्हणून अत्तर लावणारा वऱ्हाड! दिवसरात्र गांजाच्या तारेतला वऱ्हाड! पारड्यांनी रुपये मोजणारा वऱ्हाड. पण त्याच वेळी त्याची दुसरीही बाजू होती. भंडाऱ्याकडे नेसत्या साडीचा अर्धा भाग

भिजवून वाळत घालायचा. तो सुकल्यावर अंगाभोवती गुंडाळून स्नान करायचे व उरलेला भाग पुन्हा धुऊन वाळवायचा. अशी दरिद्री कुटुंबेही इकडे होती. श्रीमंती व दारिद्र्य यांच्या दरम्यान एक औदार्यही होते. वर्षभर या ना त्या कारणाने पंगती देत राहणारे लोकही इकडे झाले.

मुसलमानी राजवटीचा फार मोठा असर या प्रदेशावर आहे. देशमुख, पाटील वगैरे घरंदाज लोकांच्या बायकांमध्ये गोषा असतो. पश्चिम महाराष्ट्रातल्या कामकरी मराठा कुटुंबात तो फारसा दिसत नाही. इस्लामी संस्कृती आम्ही ही अशी घेतली आहे. तख्तपोसावर ऐसपैस पहुडणे, अत्तरे, नाचगाणे यांचे शोक करणे हेही त्यातलेच.

आज सगळ्याच देशाची परिस्थिती सारखी आहे. त्यात विदर्भ वेगळा कोठून दाखवायचा ? परवा हैदराबादचे एक मंत्री ' महाराष्ट्र दर्शन ' हा सांस्कृतिक कार्यक्रम पाहून म्हणाले, " ही तर आमचीही संस्कृती ! " विदर्भाचा वेगळेपणाही असाच साऱ्या महाराष्ट्रात सामावून जाईल. तरीही आमचा अथी तथी, मले तुले, चांद्याचा वडाभात वगैरे वेगळे काढून दाखवता येईलच. वडलांना ' दादाजी ' म्हणणारा कोणी भेटला की आम्ही नक्की समजतो, " हा वर्धा-चांदा जिल्ह्यांतला ! "

बालमृत्यू, महारोग ही दुर्दैवी वैशिष्ट्येही वऱ्हाडला आहेत. बाबा आमटे, कुंदर दिवाण, डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे त्याच दुःसह रोगांशी सामना देत आहेत.

खेड्यातला विदर्भ अशिक्षित असेल पण सुसंस्कृत आहे. गरिबीचा पाहुणचार करणारा आहे. ऐपत न बघता खर्च करणाराही. त्याच्या परीने तो गमतीही आहे. थट्टा ही त्याची करमणूक आहे. चिडला तर भयानकही; पण फार कमी चिडतो. स्वातंत्र्य-युद्धात त्याने फार मोठी आहुती दिलेली आहे. आष्टी-चिमूरसारखी गावे इंग्लंडपर्यंत गाजली होती.

थोडक्यात हे की विदर्भ सध्या रोग, व्यसने, कर्ज, निरुद्योग यांच्याशी झगडत व लगटतही आहे. तो भोळा, बुजरा आणि लगेच शंकेखोर, हिमतीही आहे. सुसंस्कृत आहे—सुशिक्षित आहे. आणि तरीही अधूनमधून एखाद्या अवलियाच्या मागे जाणारा आहे. तो खरे म्हणजे योग्य नेत्याची वाट पाहात आहे. तो नेता या कोरड्या जमिनीची, भोळ्या मनाची दाद घेणार आहे.

विदर्भात कोणी पाहुणा आला आणि त्याने इथला वेगळेपणा व वैशिष्ट्ये मागितली तर त्याला ज्वारीची भाकरी व जवसाचे तेल मी सादर करीन. साऱ्या महाराष्ट्रात विस्ताराने मोठा असा गाविलगड दाखवीन. संत्रा, वडाभात त्याने मागितलाच तर देईन. बहुधा मागणारच नाही. आजकाल हे सर्व सर्वांकडे मिळते. अर्थात तरीही प्रदेशाचा फरक आहेच. गुजराती पक्वान्न वऱ्हाडात यायचे तर त्याला आमच्या चवीसाठी थेज्ज तिखट झालेच पाहिजे. असो.

▭

अस्पृश्यता

शंकरराव खरात

अस्पृश्यता ही भारतीय हिंदु-समाजाला शतकानुशतके लागलेली समाजघातकी, राष्ट्रघातकी कीड आहे. अस्पृश्यतेच्या भयंकर गुलामगिरीमुळे अस्पृश्यवर्ग सामाजिकदृष्ट्या हीन, आर्थिकदृष्ट्या दरिद्री, राजकीयदृष्ट्या वरिष्ठांचा सेवक-चाकर बनला होता आणि शिक्षण-संस्कृतीपासून कायमचा दूर फेकला गेला होता.

अस्पृश्यांची ही भयानक आणि हृदयद्रावक अवस्था पाहून त्यांना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व त्यांची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य थोर पुरुषांनी आपल्या हयातीत भगीरथ प्रयत्न केले. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या विचारप्रणालीने व प्रत्यक्ष कार्याने अस्पृश्यवर्गात स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा व जागृती निर्माण केली. 'स्वतःचा उद्धार स्वतः केला पाहिजे, आपण स्वयंप्रकाशित झाले पाहिजे' याची पूर्ण शिकवण त्यांनी दलित-वर्गाला दिली. त्यामुळेच अस्पृश्यवर्ग मुक्तिसंग्रामात उतरला आणि आपल्या सर्वांगीण उद्धाराच्या दिशेने वाटचाल करू लागला. म. गांधींनी आपल्या विचारांनी व कृतींनी भारतीय स्पृश्य-समाजात अस्पृश्यवर्गाबद्दल एक प्रकारची दया, सहानुभूती व जागृती निर्माण केली. त्यामुळे स्पृश्यवर्गातील विचारी, जाणकार लोकांना, अस्पृश्यांना, अस्पृश्यतेमुळे भोगावी लागणारी दुःखे, छळ व अन्याय याची जाणीव होऊ लागली.

स्वातंत्र्याच्या काळात आपल्या भारतीय राज्यघटनेने १७ व्या आर्टिकलने (कलमाने) अस्पृश्यता नष्ट करून, ती मानणे हा गुन्हा ठरविला. भारत सरकारने १९५५ साली अस्पृश्यता नष्ट करणारा भारतव्यापी असा कायदा केला. भारत सरकारचा हा कायदा अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने योग्य दिशा दाखविणारा आहे.

या कायद्यातील तरतुदीविरुद्ध जो जो वर्तन करील त्याला कायद्याने दंडाची किंवा कैदेची, किंवा दंड आणि कैद याप्रमाणे शिक्षा देण्याची तरतूद केलेली आहे.

सरकारने अतिशय उदात्त हेतूने, उच्च ध्येयाने प्रेरित होऊन अस्पृश्यता नष्ट करणारा हा कायदा केला. पण केलेला हा कायदा किती स्वरूपात अंमलात येतो ? प्रत्यक्ष व्यवहारात या कायद्याच्या अंमलबजावणीची काय अवस्था होते ? अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या या कायद्याची अंमलबजावणी करण्याची कोण कोण टाळाटाळ करतो ? असे अनेक महत्त्वाचे प्रश्न उभे राहतात.

अद्यापही खेडोपाडी या कायद्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होत नाही असे आढळून येते. ग्रामीण भागातील अनेक खेड्यांत अस्पृश्यतेचा राक्षस नंगानाच घालीत आहे. खेड्यापाड्यात राहणाऱ्या बौद्ध, मांग, महार, आदी अस्पृश्य, दलित बंधुभगिनींच्यावर अन्याय, अत्याचार होत आहेत, आणि या होणाऱ्या अन्याय–अत्याचारांचे निवारण कायद्याला धरून म्हणावे तसे समाधानकारक होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधी यांच्या महानिर्वाणानंतर त्यांना कोणी वाली राहिला नाही.

मंदिरप्रवेशाची कहाणी : खेडोपाडी बौद्ध धम्माची दीक्षा घेतलेले बौद्ध (पूर्वाश्रमीची महार-मंडळी) याना मंदिरप्रवेशाची आवश्यकताच वाटत नाही. त्यामुळे हा बौद्ध–समाज मंदिर-प्रवेशापासून अलिप्त आहे.

बाकी राहिलेल्या अस्पृश्यांना, हरिजनांना कायद्याने देवळात जाण्याची मोकळीक आहे. अशा हरिजन–दलित मंडळींनी जर मान्यवर पुढाऱ्यांच्या बरोबर, अधिकाऱ्याच्या-बरोबर समारंभपूर्वक मंदिरप्रवेश केला, तर तेवढ्यापुरता समारंभ म्हणून पार पडतो. पण, स्पृश्य गावकरी दुसऱ्याच दिवशी–समारंभ संपल्यावर अस्पृश्य मंडळींना धारेवर धरतात. त्यांना मारपीटा, दम–धमक्या देतात. आणि शेवटी हरिजन–दलितांना स्पृश्य-गावकरी स्पष्टपणे दम देतात की,

> " लेकांनो ! या गावात तुम्हाला राहायचं असेल तर तुमच्या पायरीनं वागा ! सरकारानं कायदा केला म्हणून काय झालं ! तुम्ही आपली पायरी सोडता कामा नये. नाहीतर या गावात तुमची–आमची गाठ आहे ध्यानात ठेवा ! "

मंदिरप्रवेशाचा असा करुण शेवट होतो.

आजही काही खेड्यांत गावच्या देवळातच शाळा भरते. देवळातील शाळेत या अस्पृश्य–दलितांच्या मुलांना बसू दिले जात नाही. ती मुले देवळाच्या बाहेरच बसलेली असतात. काही ठिकाणी अशा देवळातील शाळेत दलित-हरिजनांची मुले व्हरांड्यात बसतात, काही ठिकाणी व्हरांड्याच्या आत बसतात; तेथे मात्र देवाच्या गाभाऱ्याला गावकऱ्यांनी कुलूप घातलेले असते. त्यामुळे अस्पृश्यांची मुले देवाला बाटवणार नाहीत अशी गावकऱ्यांना खात्री वाटते.

हॉटेलप्रवेश : ग्रामीण भागातील हॉटेलात जाताना दलित-हरिजन मंडळींना अनेक अडचणी येतात. वास्तविक अशा हॉटेलात हरिजनांना कायद्याने प्रवेश आहे.

तसेच अशा हॉटेलच्या बाहेर ' हे हॉटेल सर्व जाती, धर्माच्या लोकांना खुले आहे ' असेही बोर्ड लावलेले असतात. अशा हॉटेलात गावचा दलित–अस्पृश्य माणूस जाण्याचे धाडस करीत नाही. त्यातच कुणी धीट मनाने, धाडस करून अशा हॉटेलात गेला व त्याने चहाची मागणी केली, तर त्याला हॉटेलवाला म्हणतो,

" ठीक आहे ! सरकारनं हॉटेलप्रवेशाचा कायदा केला, आम्हाला कबूल. तुम्ही हॉटेलात या. पण चहा-साठी कप- बशी तुमच्या घरची आणा. सर्वांना कप-बशा आम्ही पुरवू शकणार नाही. "

—असे जर हॉटेलवाल्यानं उत्तर दिलं तर तो दलित-माणूस काय उत्तर देणार ? काही काही खेडेगावी तर विचित्र अनुभव येतात. दलित-माणसानं चहा–मागितला तर त्याला कपाचा दर वाढवून सांगितला जातो. त्या दरवाढीला सवाल केला, तर हॉटेलवाला म्हणतो,

" सरकारनं हॉटेलात येण्याचा कायदा केला. पण कपाचा दर कुणाला काय सांगावा हा आमचा प्रश्न आहे. मी सांगितलेला दर तुला मान्य असेल तर चहा पी ! नाहीतर बाहेर जा ! "

सडकेपासून आतल्या अंगाला असणाऱ्या खेड्यातील हॉटेलच्या बाहेर एक बाकडे आणि त्याखाली उपड्या कप-बश्या दिसतात. हे बाहेरचे बाकडे अस्पृश्य हरिजनांसाठीच ठेवलेले असते.

एस. टी. नाक्यावरील हॉटेलात मात्र हरिजन अस्पृश्यमंडळींना मुक्त-प्रवेश असतो. तेथे हा अस्पृश्य, हरिजन हॉटेलात आला, म्हणून कुणी डोळ्यांनी खुणवीत नसते. का कुणी रागाने डोळेही वटारत नसते. सडकेवरच्या माणसांच्या घाई-गर्दीच्या ये–जा-मध्ये हा प्रश्न निर्माण होत नाही.

" पाणी वाढा हो ! " : कायद्याने सार्वजनिक पाणवठे, सार्वजनिक विहिरी अस्पृश्य–हरिजनांना खुल्या झाल्या आहेत. पण प्रत्यक्षात मात्र गावकऱ्याच्या रूढीचा कायदा सरकारी कायद्यापेक्षा (आजही) भारी होऊन बसला आहे. खेडेगावात स्पृश्य-वस्तीत असलेल्या सार्वजनिक मालकीच्या विहिरीवर आजही बहुतेक खेडेगावी बौद्ध, व अस्पृश्य–हरिजन यांना स्वतःच्या हाताने पाणी भरता येत नाही. कडक उन्हाळ्यात अस्पृश्यांचे पाणवठे पूर्णपणे आटल्यावर सार्वजनिक विहिरीवर पिण्यासाठी पाणी आणावयास जाण्याचा बौद्ध व अस्पृश्यांवर प्रसंग येतो. त्या वेळी त्यांची अवस्था फारच केविलवाणी होते. त्यांना प्रत्यक्ष सार्वजनिक सरकारी विहिरीच्या राहाटाला घागर बांधून पाणी ओढून काढता येत नाही. त्यांना त्या विहिरीच्या पाण्याला स्पर्शच करता येत नाही. त्यांना विहिरीपासून लांब–दूर पाण्याची घागर घेऊन उभे राहावे लागते. आपणाला कोण कधी पाणी वाढते का ? याची वाट पाहात बराच वेळ तिष्ठत उभे राहण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो. बाजूला उभे राहून " आम्हाला पाणी वाढा ! मला पाणी वाढा ! " अशा केविलवाण्या विनवण्या कराव्या लागतात.

ही झाली सार्वजनिक सरकारी मालकीच्या विहिरीची कथा. खाजगी विहिरीवर त्यांना कोण फुकट पाणी वाढणार ? त्यासाठी आणा-दोन आणे एका घागरीमागे देणे भाग पडते. तेव्हा कुठे स्पृश्यांची शेरडराखी-गुराखी पोरे किंवा रिकामी माणसे पैसे घेऊन पाणी वाढतात.

गावोगावच्या बौद्ध व अस्पृश्यांच्या पाण्याचा प्रश्न बिकट आहे. उन्हाळ्यात तो अधिक बिकट होतो. पिण्याच्या पाण्यासाठी डोईवर घागर घेऊन रानोमाळ हिंडण्याचा या दलित-मंडळींवर प्रसंग येतो.

काही काही गावी बौद्ध व अस्पृश्य लोक मोठ्या धाडसाने अशा सार्वजनिक विहिरीचे पाणी स्वतः भरतात. पण त्यांना हमखास स्पृश्य-गावकरी मार-पीट करतात. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जातो. काही काही वेळा अस्पृश्यांनी अशा बाटवलेल्या विहिरीत स्पृश्य मंडळी विष्ठा टाकतात, घाण टाकतात व विहिरीचे पाणी घाण करून टाकतात. अशा गावात बौद्ध व अस्पृश्यांवर जीवावरचे प्रसंग येतात.

काही सुधारलेल्या प्रगत खेडेगावात एकाच सार्वजनिक विहिरीचे पाणी गावची स्पृश्य व अस्पृश्य मंडळी गुण्या-गोविंदाने भरतात. पण अशी गावे कितीशी असणार ?

गावच्या रस्त्याने लग्नाची वरात जात नाही : आजही बहुतेक खेडेगावांत गावच्या अस्पृश्य किंवा बौद्धांच्या लग्नाच्या वरातीची मिरवणूक गावच्या वेशीच्या आत गावातील रस्त्याने वाजत-गाजत जाऊ शकत नाही. काही गावांत अशी वरात किंवा अन्य प्रसंगाची मिरवणूक गावातून वाजत-गाजत अस्पृश्य मंडळींनी काढली तर स्पृश्य गावकऱ्यांनी त्यांना लाठ्या-काठ्यांनी झोडपल्याची अनेक उदाहरणे आढळतात. याला काही गावे अपवाद असतील, पण हा प्रश्नही प्रत्येक खेडोपाडी निदर्शनास येतो.

एका खेड्यात - खेडी - दोन : वास्तविक आपल्या खेडेगावात एका खेड्यात दोन खेडी असतात. एक गाववेशीच्या आतले खेडे आणि दुसरे गावच्या वेशीच्या बाहेरचे खेडे. आजही खेडेगावात वेशीच्या आतल्या स्पृश्य-वस्तीत अस्पृश्यांना राहावयाला जागा मिळत नाही. खेडेगावात बदलून आलेले बौद्ध व हरिजन शाळा-मास्तर, तलाटी किंवा ग्रामसेवकाला गावात स्पृश्यांच्या घरी राहावयास (भाड्याने) जागा मिळत नाही. त्यामुळे अस्पृश्यांच्या वस्तीत त्यांना कोठेतरी कसेतरी राहणे भाग पडते. अशा खेडेगावात अस्पृश्य-नोकरांचे राहण्याच्या व पाण्याच्या गैरसोयीमुळे फारच हाल होतात. त्यामुळे काही काही वेळा असे नोकर आपली 'जात' चोरून राहतात. पण त्याची का जात उघड झाली तर काय प्रसंग येतील याची कल्पनाच न केलेली बरी ! स्वाभिमानाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दावलेल्या 'स्वयं-प्रकाशित' होण्याच्या मार्गाने बौद्ध व अस्पृश्यांनी दैनंदिन जीवनात वागले तर त्यांच्यावर खेडोपाडी सामाजिक बहिष्कार पडतात. त्यांचे तेलमीठ बंद केले जाते. त्यांना खेड्यात राहणे अशक्य केले जाते. दलित व बौद्ध माता-भगिनींची विटंबना केली जाते. बलात्कार होतात. त्यांचे खून केले जातात. त्यांना जाळून मारले जाते. त्यांना खेड्यात माणुस-

कीने जगता येत नाही. माणुसकीचे हक्क भोगता येत नाहीत. दलितांच्या मालकीच्या विहिरीत विष्ठा व मेलेली जनावरे टाकली जातात. उभी पिके दांडगाईने डोळ्यादेखत कापून नेली जातात. या अशाच प्रकारच्या अमानुष अत्याचारांमुळे खेड्यांतील दलित व बौद्ध बांधवांना जीवन जगणे अशक्य होऊन जाते. या प्रकारचे अत्याचार धार्मिक, सनातनी, प्रतिगामी कल्पनेवर व परंपरागत रूढीवर, उच्चनीच भेदभावावर आधारलेले असतात.

विद्यार्थ्यांचे हाल : विद्यालयात, महाविद्यालयात, विद्यपीठात, विशेषतः जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या बौद्ध व अस्पृश्य-हरिजन विद्यार्थ्यांकडे आज जातीय भावनेने पाहिले जाते. त्यांनी महाविद्यालयात प्रवेश करून डिग्री मिळेपर्यंत अशा दलित विद्यार्थ्यांचा मानसिक कोंडमारा होतो. त्याच्या बुद्धीपेक्षा त्यांची जातच पाहिली जाते, व त्यांचे शिक्षक त्यांचे खच्चीकरण करतात. कांबळे, बनसोडे, वाघमारे ही आडनावेच जातिवाचक आहेत. या नावाचे विद्यार्थी कॉलेजच्या क्लार्कपासून प्राध्यापकांना दिसले तर ते नाकडोळे मोडतात, आणि त्यांची जात पाहून त्यांना वागणूक मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मानभंग होतो. कोंडमारा होतो. त्यांना शिकताना स्वतंत्रतेचा वारा मिळत नाही. मान-सन्मानाने वागता येत नाही. शास्त्राच्या युगात विकृतबुद्धीचा शिक्षक असलेला आज दिसू लागला आहे.

म्हणूनच आज बौद्ध व दलित समाजातील कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशा **डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाची आवश्यकता** भासू लागली आहे. अशा स्वतंत्र विद्यापीठात असा दलितांचा विद्यार्थिवर्ग किमान मानसन्मानाने विद्यार्जन करू शकेल, आणि त्याची विद्यार्जनाच्या बाबतीत आगळी प्रगतीही दिसू लागेल.

दलित-नोकरांचे हाल : दलित व बौद्ध समाजातील नोकरवर्गाच्या हालाला तर पारावार नाही. दलित वर्गातील साध्या क्लार्कपासून ते गॅझेटेड ऑफिसर्सपर्यंत सर्वच थरातल्या नोकरांचे हाल असतात. दलित-वर्गीय नोकराला (सर्वच थरांतल्या) आज कोणी वाली नाही. त्यांच्या बदलीपासून ते प्रमोशनपर्यंत त्यांच्यावर अन्याय होतात. त्यांचे हाल होतात. या वर्गातील विशेषतः गॅझेटेड ऑफिसर्स यांना त्यांच्या खात्यातील चांगल्या 'एक्झिक्युटिव्ह-पोस्टवर' ठेवले जात नाही. त्यांना शक्यतो 'साईडिंग'च्या जागेवरच ठेवले गेल्याचे दृष्टीस पडते. लोककल्याण, जनतेचे कल्याण करण्याचे जागांवर काम करण्याची सहसा संधी दिली जात नाही, पण जेथे जेथे जनतेची अप्रियता ओढवली जाईल, लोकांना नाराज करावे लागेल, अशाच जागांवर त्यांना काम करण्याचा प्रसंग आल्याचे दिसते.

यामुळेच बौद्ध व दलितवर्गातील नोकरवर्ग (सर्व थरांतील) यांचा नोकरीत असताना मोठाच कोंडमारा होतो. त्यांच्यावर अन्याय होतो. अशा बिकट परिस्थितीत त्यांनी कोणाकडे जावे ? त्यांनी कोणाचा आधार शोधावा ? मग अशा परिस्थितीत

त्याच्या हृदयातला असंतोषाचा अग्नी भडकला, तर त्याला कोण जबाबदार राहणार ?

दलित-अस्पृश्यांचे खेडोपाडी काय हाल होतात याचे विवेचन वर केले आहेच.

कायदा संरक्षण देऊ शकत नाही : अशा परिस्थितीत बौद्ध व अस्पृश्य-हरिजनांना अस्पृश्यता नष्ट करणारा कायदा संरक्षण देत नाही. तो त्यांच्यासाठी धावून जात नाही. वास्तविक अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या कायद्याला खऱ्या अर्थाने गावच्या वेशीच्या आत प्रवेशच मिळू शकला नाही. याला अनेक कारणे आहेत. एक तर या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याला या कायद्याचा उदात्त असा मूलभूत हेतूच समजलेला नसतो, किंवा अशा अधिकाऱ्यांना या कायद्याचा मूलभूत हेतू कळूनही, त्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत ते टंगळमंगळ करतात, किंवा हा अधिकारीवर्ग जाणूनबुजून स्पृश्य-समाजापुढे आपली इभ्रत ठेवण्यासाठी आणि स्पृश्य-समाजाची मर्जी राखण्यासाठी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या कामी चुकारपणा केला जात असावा असे दिसते. म्हणून हा कायदा तसाच कागदोपत्री कपाटात धूळ खात पडलेला आहे. अर्थात या विधानाला काही चांगले कर्तव्यदक्ष अधिकारी अपवाद ठरतील हेही ध्यानात घेतले पाहिजे.

पंचायत राज्याचे नेतृत्व : पंचायत राज्याच्या नवीन प्रयोगामुळे जिल्हा, तालुका व खेडे येथे नवीन नेतृत्व उदयाला येत आहे व आले आहे. परंतु या नव्या नेतृत्वाला अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रश्नाबाबत विशेष आस्था वाटत नाही. सामाजिक समतेचा प्रश्न हे नेतृत्व आपल्या हाती घेण्याचे धाडस करीत नाही. आपल्याला ते समजो वा न समजो हे नवे नेतृत्व आर्थिक प्रश्नावर समाजसत्तावादाची भाषा बोलेल. तरुण लोकशाही-समाजवादाची भाषा बोलेल; परंतु सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे धाडस हे नवे नेतृत्व करत असल्याचे दिसत नाही. हे नवे नेतृत्व स्वतःला पुरोगामी मानते व म्हणते, पण सामाजिक दृष्ट्या—अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रश्नाच्या दृष्टीने ते दैनंदिन व्यवहारात मात्र प्रतिगामी दिसते. हे नवे नेतृत्व जुन्या रूढीचे बंद तोडून अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रश्नाला हात घालीत असल्याचे दिसत नाही.

खेड्यातील शेतकरी : ग्रामीण भागात खेडोपाडी राहणारी स्पृश्य जनता आपल्या रूढीची चाकोरी व आपल्या वाडवडिलांची पायरी सोडण्याची त्याच्या मनाची तयारी दिसत नाही. त्यामुळेच त्यांची अस्पृश्यतेच्या प्रश्नावर सनातनी प्रतिगामी मने उफाळून उठतात. त्यांना या प्रश्नाच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने जाणीव झालेली दिसत नाही.

खेड्यातील जो स्पृश्य शेतकरी शेतीच्या प्रगतीसाठी इंजिन वापरतो, इलेक्ट्रिक पॉवर वापरतो, आधुनिक खते वापरतो, तोच शेतकरी मात्र खेड्यात सनातनी-रूढी पाळतो व अस्पृश्यताही पाळतो; हे एक सामाजिक दृष्ट्या मोठे दुर्दैव आहे. असा हा विकृत माणूस निर्माण होत आहे.

या अस्पृश्यतेच्या प्रश्नावर त्याच्यात काही विवेक, विचार व तर्कशास्त्र दिसत

नाही. फक्त त्याच्या सामाजिक वागण्यात रूढीची दृष्टी आहे.

राजकीय पक्ष : मताचे गणित : आजच्या काळात निवडणुकीत निवडून येण्यासाठी मतदारांची मते मिळवणे हा राजकीय पक्षाचा प्रमाण हेतू झालेला आहे. त्यामुळे राजकीय नेत्याकडे व पक्षाकडे आपल्या पक्षाचे उमेदवार कसे निवडून येतील हे एक व्यवहारी गणित असते. हे मताचे गणित सोडविण्यासाठी राजकीय पक्षाचे राजकीय कार्यकर्ते विचार करतात व धडपडतात. त्यात अस्पृश्यता नष्ट करण्याचा, सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रश्नच मागे पडतो व अस्पृश्यता नष्ट करण्याच्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. हा प्रश्न आहे तसाच राहतो. अस्पृश्यतेचा हा राक्षस आजही खेडोपाडी तसाच नाचत आहे. त्याला अद्याप पुरा गाडलेला नाही.

अस्पृश्यांचा प्रश्न : अस्पृश्यांचा प्रश्न मूलतः सामाजिक आहे, तसाच तो आर्थिकही आहे.

हा प्रश्न सोडविण्यासाठी अस्पृश्यता निवारणाच्या कायद्याची अंमलबजावणी उभारीने केली पाहिजे. त्यासाठी सरकारने खालील गोष्टी करणे आवश्यक आहे :—

१. आजच्या अस्पृश्यता नष्ट करण्याच्या कायद्यात दुरुस्ती करून अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या कायद्याच्या विरुद्ध गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारास कमीत कमी पाच वर्षे सक्त-मजुरीची शिक्षा ठेवावी.

२. अस्पृश्यता जो जो कोणी हस्ते-परहस्ते पाळील, अशा गुन्हेगार व्यक्तीस ग्राम-पंचायतीपासून ते लोकसभेच्या निवडणुकीस उभे राहण्यास (उमेदवार म्हणून) बंदी करावी.

३. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांचे एक स्वतंत्र फिरते पथक ठेवावे. त्याने सी. आय. डी. खात्यासारखे काम पाहावे.

४. या कायद्याखालील खटले स्वतंत्र मॅजिस्ट्रेटकडे सोपवावेत. या मॅजिस्ट्रेटला स्वतंत्र सामाजिक दृष्टी असली पाहिजे.

५. या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जे जे पोलिस व अधिकारी टाळा-टाळ करतील, त्यांना त्यांच्या नोकरीतून बडतर्फ करण्यात यावे.

६. प्रत्येक तालुक्याच्या राजकीय पक्षाने कार्यकर्ते, अधिकारी व समाजकार्यकर्ते यांच्या एकत्र बैठकी घेऊन या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी; व त्याबाबत योग्य ते सहकार्यही द्यावे. अशा कार्यकर्त्यांकडून खेडोपाडी या कायद्याचा प्रचार करावा.

७. गाववेशीच्या बाहेर असलेल्या बौद्ध, दलित अस्पृश्य बांधवांस गावच्या वेशीच्या आत स्पृश्य वस्तीत राहण्यासाठी जागा द्याव्यात. वेशीच्या बाहेरील गाव व वेशीच्या आतील गाव यातील अंतर नष्ट करावे.

८. जो गावकरी, स्पृश्य व्यक्ती स्वतः किंवा दुसऱ्यामार्फत अस्पृश्यता पाळील किंवा ती पाळण्यास मदत करील, उत्तेजन देईल अशा व्यक्तीस सरकारी, तालुका

पंचायत समितीची, किंवा जिल्हा परिषदेची, बँकांची कसलीच मदत वा कर्ज मग ती इंजीन, खत, पत्रा, सीमेंट, तगाई कर्जे वा अन्य मदत सरकारने देऊ नये. अशा मदतीस तो अपात्र ठरवावा.

९. अस्पृश्य, दलित व बौद्ध भूमिहीनांना सरकारी वा बिनसरकारी जमीन सरकारने द्यावी.

१०. या वर्गांना उद्योगधंद्यासाठी कर्जे द्यावीत.

११. दलितांना सरकारी नोकरीत जे राखीव प्रमाण, तेच राखीव प्रमाण बिन-सरकारी उद्योगधंदे, तसेच सहकारी साखरकारखाने, सहकारी बँका, राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका इत्यादी सहकारसंबंधित व्यवसायात नोकरीत खास राखीव प्रमाण ठेवावे व त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने योग्य तो कायदेशीर बंदोबस्त करावा.

१२. बौद्ध, दलित, अस्पृश्य वर्ग यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सरकारने हाती घ्यावा व यांच्या विद्यार्थ्यांना जीवन-उपयोगी सर्व प्रकारचे शिक्षण द्यावे.

या व अशाच स्वरूपाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक स्वरूपाचे उपाय अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी व अस्पृश्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी – त्यांची सर्व दृष्टींनी प्रगती करण्यासाठी करावेत.

म्हणजे हा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल.

आपल्याकडील परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न¶

कृष्णाबाई मोटे

त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयम्
त्वं कौमुदी नयनयोरमृतम् त्वमंगे ॥
इत्यादिभिः परिशतैः परिमुह्यमुग्धाम्
तामेव !– शांतमथवा किमिहोत्तरेण ॥ १ ॥

—उत्तररामचरित

मनसा कर्मणा वाचा यथा रामं समर्चये ।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति ॥ २ ॥

—वाल्मीकि रामायण

वरील अवतरणांवरून दिसून येईल की, परित्यक्ता स्त्रीचा प्रश्न काही आधुनिक काळात कलियुगात उत्पन्न झालेला नाही. त्रेतायुगापासून, कदाचित त्याच्याही आधीपासून तो किंबहुना पूर्वसूरींनी समाजाची धारणा नीट व्हावी याकरता स्त्रीपुरुषसंबंधाचे नियमन करणारी विवाहसंस्था सुरू केली तेव्हापासूनच तो अस्तित्वात आला असेल. कारण लग्नसंस्थेप्रमाणेच परित्यक्तेचाही प्रश्न सर्व संस्कृतींत सर्वकडे आढळून येतो. त्या त्या समाजांत त्याची तीव्रता कमी व्हावी म्हणून विचारवंतांकडून प्रयत्नही केले जातात.

परित्यक्ता स्त्री म्हणजे नवऱ्याने टाकून दिलेली स्त्री. हा त्याग एका दृष्टीने दोन व्यक्तींपुरता कायद्याची संमती नसलेला पण स्वयंनिर्णीत असा लग्नविच्छेदच असतो. अशा वेळी टाकणारी व्यक्ती जोडीच्या व्यक्तीला तो मान्य आहे की नाही, किंवा तिचे पुढे काय होईल याचाही विचार करायला थांबत नसते. "काहीही झाले तरी अतःपर

¶ या लेखात महाराष्ट्रातील हिंदू परित्यक्त स्त्रियांचाच विचार केलेला आहे.

दोघांनी एकत्र राहणे शक्य नाही." या मनाने घेतलेल्या निर्णयाच्या पोटी, मने फाटली की, अशी वागणूक-त्याग घडून येतो. त्या वेळी देवाब्राह्मणांसमोर एकमेकाला न दुखविण्याच्या वा न सोडण्याच्या घेतलेल्या शपथांचा विसर पडतो. लग्न हे एक धार्मिक पवित्र बंधन आहे, याचीही आठवण राहात नाही. राहतो तो एकच विचार तो म्हणजे कसे तोडायचे? आणि त्या विचाराच्या थैमानातच टाकण्याची क्रिया घडून येते. किंबहुना ती झाल्याखेरीज विवाहबंधनाचा एक जोडीदार स्वस्थचित्त होत नाही.

लग्नाने संबंधित अशा दोन व्यक्तींच्या संघर्षात अत्यंत आपत्तीत येते ती स्त्री. कारण आपल्याकडील ९० टक्के स्त्रिया– श्रीमंत, गरीब कोणत्याही वर्गातील असो, अजूनही सर्वस्वी पुरुषांवरच अवलंबून असतात. त्यातून मुले असल्यास पतीने त्याग केल्यावर तिच्या विपत्तींना सीमा उरत नाही. पुरुषाला आपल्याकडे तरी लग्नाचे बंधन फारसे कधीच आडवे आले नाही. त्याला धर्माची, समाजाची कोणतीच आडकाठी नव्हती. त्यामुळे एकीचा त्याग केल्यावर तो दुसरे लग्न करून सहज मोकळा होई व आपले जीवन नव्याने फिरून सुरू करी. पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत हिंदू स्त्रीचा नवऱ्याने त्याग केल्यावर, मृत्यू तिची सोडवणूक करीपर्यंत सामाजिक, धार्मिक दृष्ट्या ती मात्र लग्नबंधनातच अडकलेली राही, तिची सुटका होत नसे व अत्यंत कुचंबणा होई. स्वातंत्र्यानंतर झालेल्या कायद्यांनी आपल्या स्त्रीला बंधमुक्त होणे आता कायदेशीर दृष्ट्या शक्य झालेले आहे. त्यामुळे पूर्वी घटस्फोट मिळत नसलेल्या जातींत (काही थोड्या जातींत स्वातंत्र्यपूर्व कालीही पंचांसमोर काडीमोड किंवा सोडचिठ्ठी घेता येत असे) लग्नविच्छेदनाच्या अथवा घटस्फोटाच्या केसेस कोर्टासमोर प्रतिवर्षी वाढत आहेत असे दृश्य दिसत असले, तरी ज्या मानाने मने फाटून जोडप्यात विभक्तता येते, त्या मानाने लग्नविच्छेदाचे प्रमाण काहीच नाही. अजूनही पूर्व संस्काराचे, लोकमताचे, स्त्रियांना वाटणारे दडपण लग्नविच्छेदाच्या किंवा गृहत्यागाच्या आड येते, मुलांचाही विचार येतो. अर्थात नव्या पिढ्यांतून हे दडपण उत्तरोत्तर कमी कमी होत जाईल-जातच आहे असे दिसून येते.

काहीही असले तरी एक गोष्ट निश्चित की, लग्नबंधन हे जरी दोन व्यक्तींना एकत्र बांधणारे बंधन असले तरी लग्नबंधनानंतर एकमेकांपासून तुटू पाहणाऱ्या व्यक्तींचा प्रश्नमात्र दोघांपुरता मर्यादित राहात नाही. त्यात मुले येतात, कुटुंबसंस्थेला धक्का बसतो व त्याचे इतरही समाजाला अनिष्ट असे परिणाम घडत असतात. म्हणून त्याकडे एक वैयक्तिक प्रश्न म्हणून न पाहता सामाजिक प्रश्न म्हणून पाहणे योग्य होईल. एखादी व्यक्ती अशी का वागते, कोणत्या परिस्थितीत अशी वागते, त्याचे परिणाम काय, इत्यादी गोष्टींचे निरीक्षण करून, या गोष्टी मनुष्यस्वभाव म्हणून अजिबात टाळता आल्या नाहीत तरी कमी कशा करता येतील हे पाहणे अगत्याचे झाले आहे.

आपण विचाराकरिता जरी परित्यक्त स्त्रियांचाच प्रश्न घेतला असला तरी परित्यक्ता म्हणजे केवळ नवऱ्याने टाकलेली एवढाच त्याचा संकुचित शब्दार्थ घेऊन भागणार

नाही. कित्येक वेळा बाईला टाकण्यात येत नाही, पण तिचा असा अनन्वित छळ करण्यात येतो की, तिला पतीचे घर सोडल्याशिवाय गत्यंतरच उरत नाही. अशा स्त्रीचाही आपल्याला परित्यक्ता स्त्रियांत विचार करावा लागेल. कारण ती शरीराने परित्यक्त नसली तरी मनाने परित्यक्त असते, नकोशी झालेली असते. आणि तिला छळण्यात नवरा किंवा इतर छळणारी माणसे एक प्रकारचा अमानुष राक्षसी आनंद घेत असतात. या ठिकाणी एका निराश्रित बायकांच्या संस्थेच्या आश्रयाला आलेल्या एका असहाय भगिनीचे उदाहरण दिल्याशिवाय राहावत नाही.

पतीचे घर सोडून अशीच एक स्त्री मुंबईत स्त्रियांसाठी असलेल्या संस्थेच्या आश्रयाला आली. तिला नवऱ्याने मारहाण केली होती. लोकांना दिसू नये म्हणून मारताना नवऱ्याने तिच्या पोटावर, मांड्यांवर, नाजुक भागी गुरासारख्या उत्ती घातल्या होत्या. संस्थेच्या पद्धतीप्रमाणे तिचे वादळ थोडेसे शांत झाल्यावर, तिचा व नवऱ्याचा समझोता करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नवराही तिला न्यायला तयार झाला, आपण फिरून अशी मारहाण करणार नाही असे त्याने संस्थाचालकांना आश्वासनही दिले. पण त्याच्या बाबतीत त्या स्त्रीचा अनुभव निराळा होता. पूर्वी एकदा ती अशीच मार खाऊन माहेरी गेली होती. तेव्हाही नवऱ्याने असेच तिच्या नातेवाइकांना आश्वासन देऊन घरी नेले. पण एक सहा महिने लोटतात न लोटतात तो परत स्वारी उलटली व बायकोला बेदम मारहाण करू लागली. यामुळेच आता ती माहेरी न जाता संस्थेच्या आश्रयाला आली होती. पण या संस्थेने समाझोत्याचे प्रयत्न करून तिला परत पाठविण्याचे ठरविल्यावर तिने त्याच्याकडे परत जाण्याचे साफ नाकारले. “ याउप्पर तुम्ही मला जबरदस्तीने या माणसाबरोबर पाठविणार असाल तर आगगाडीखाली उडी टाकून, नाहीतर पळून जाऊन मी समुद्रात जीव देईन. पण या माणसाकडे जाणार नाही.” असे तिने नवऱ्याच्या तोंडावर सर्वांसमक्ष उत्तर केले. नवराबायकोची मने एकदा फाटली गेल्यावर काही स्त्रियांना जीवंतपणी जाळल्याची उदाहरणे खेडेगावातूनच नव्हे तर शहरातूनही ऐकू येतात. ती पाहिली की परित्यक्ता स्त्रीचा अर्थ नवऱ्याने टाकलेली एवढाच न घेता जेथे पतिपत्नीची मने इतकी फाटून गेली आहेत की, एकमेकापासून विभक्त होण्याखेरीज गत्यंतर उरले नाही अशी सारी परिस्थिती विभक्तीचा विचार करताना लक्षात घेतली पाहिजे.

शिवाय लग्नविच्छेदाच्या बाबतीत विशेषतः परित्यक्ता स्त्रियांचा विचार करताना आणखीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. नवऱ्याने मनाने किंवा प्रत्यक्ष शरीराने टाकल्यानंतर लग्नविच्छेदन घेण्याची जरी आता कायद्याने बाईला मोकळीक मिळाली असली तरी तो मिळण्याकरता लागणारा कोर्ट-कचेरी खर्च करणारे बाईच्या बाजूला कोणी नसेल, तर तिला पैशाअभावी विच्छेद मिळू शकत नाही. ज्या संस्थेच्या आश्रयाला ती येऊन राहते, ती संस्था असा खर्च करू शकत नाही. त्यामुळे विच्छेदनाची मोकळीक मिळाली असताही कितीक स्त्रिया लग्नविच्छेद घेऊ शकत

नाहीत. शिवाय बाईच्या बाबतीत दुसऱ्याही अडचणी असतात. उध्वलेली स्त्री पुनर्लग्नाच्या दृष्टीने तितकी आकर्षक राहिलेली नसते. त्यातून मुले असल्यास आदिवासी नवऱ्याप्रमाणे अशी सवत्स धेनू घ्यायला इतर वर्गांतील लोक तयार होत नाहीत. पण नवरा कधीच उध्वला जात नाही. त्याला दुसरे लग्न करायचे असले तरच तो लग्नविच्छेदाची आपण होऊन पुष्कळदा उचल खातो. पण कित्येक हरीचे लाल असेही असतात की, ते लग्नविच्छेदाची काहीच उचल न करता समाजातील स्वतःच्या प्रतिष्ठेला एवढाही धक्का न लागू देता आपले पहिले लग्न झाले ही गोष्ट लपवून ठेवून खुश्शाल बेकायदा दुसऱ्या मुलीशी लग्न करतात व तिलाही खोड्यात टाकतात. खालच्या गरीब वर्गात लग्नविच्छेदनाला लागणारा कोर्ट-कचेरी खर्च करायची ताकद नसल्याने पुष्कळ परित्यक्ता स्त्रिया पंचांपुढे सोडचिठ्ठी घेऊन आपला मार्ग मोकळा करतात, पण तो तितका कायदेशीर नसतो. पण आर्थिक ताकद असता, बेकायदा लग्न करतो अशी जाणीव असताही, सुशिक्षित पुरुष कित्येकदा स्वतःच्या मानमान्यतेला व प्रतिष्ठेला धक्का न लावता या मार्गाचा अवलंब करतो. बाई मात्र तशीच अडकलेली राहते किंवा तिला कोर्टकचेरी करावी लागते. पण ते शक्य नसते. नवऱ्याने त्याग केल्यावर स्त्रीची सर्वच बाजूंनी बाई म्हणून कुचंबणा होतेच. त्यातच तिच्या अर्थार्जनाक्षमतेमुळे तिच्या आयुष्याची परवड होऊन ती अनैतिक मार्गाकडे ओढली जाण्याचाही संभव असतो. म्हणून शक्यतोवर वैवाहिक आयुष्यात प्रथमपासूनच विसंवादाचे, संघर्षाचे प्रश्न टाळता येतील का हे पाहणे आवश्यक आहे.

यावर साहजिकच कोणी प्रश्न करील की हे कसे शक्य आहे ? दोन, परस्परांशी अपरिचित, निराळ्या सवयीच्या, निराळ्या पार्श्वभूमीच्या व्यक्ती एकत्र आल्यावर संघर्ष हा होणारच. हे जरी खरे असले तरी विवाह यशस्वी करावयाचा असेल तर एकमेकांना समजून घेऊन, परस्पर देवाणघेवाण करून, जुळते घ्यायला शिकायला लागते. एखादे फळ आपोआप पक्व होत जावे, तसा विवाह आपोआप यशस्वी होत नाही. तो यशस्वी करण्याची दोन्ही बाजूंनी इच्छा असावी लागते, प्रयत्न पाहिजे असतात. तरच आपुलकीचे तणावे चांगले मूळ धरून वाढतात. जीवनात प्रसंगोपात्त बसणारा ताण सहन करूनही एकमेकांना ओढून धरतील इतकी लवचिकता व दृढता त्यांच्यात येते. पण ही जुळणी झाली नाही, आपुलकीच्या तणाव्यांनी मुळे धरली नाहीत तर मात्र दोघांतील खटके, विसंवाद, संघर्ष वाढत जाऊन अखेर विकोपाला जातात.

टाकण्याची क्रिया अर्थात स्वयंनिणात लग्नविच्छेद किंवा कायदेशीर लग्नविच्छेद या गोष्टी जरी मानसिक वितुष्टाने घडत असल्या तरी ते वितुष्ट उद्भवण्याची कारणे शारीरिक, मानसिक व बाह्यपरिस्थितीजन्यही असतात, आणि त्याचा अभ्यास करण्याची ठिकाणे म्हणजे लग्नविच्छेदाची कोर्टे, बाप नू घर किंवा श्रद्धानंद महिलाश्रम अथवा जिल्होजिल्ही सरकारने उघडलेले महिलाश्रम अशा संस्था होत. अशा संस्था म्हणजे सामाजिक रोगाची हॉस्पिटलेच असतात. त्यांत निरनिराळे सामाजिक रोग व त्यांची

नाना उदाहरणे एकत्र पाहावयाला मिळतात. त्यांतील व्यक्तिगत उदाहरणे पाहिली की, लग्नसंबंधात खटके उडून पतिपत्नीचा विसंवाद होण्यास किंवा मने पार फाटून जाण्यास खालील गोष्टी कारणीभूत होतात असे आढळते. त्या यथानुक्रमे पुढे देत आहे. १. नवऱ्याकडून होणारी मारहाण किंवा छळ, २. सासरच्या माणसाकडून होणारा छळ, ३. एकनिष्ठतेचा अभाव, किंवा व्यभिचार, ४. वेड व इतर वैयक्तिक दोष, ५. आर्थिक अडचणी, ६. व्यसनाधीनता, ७. विरोधी स्वभाव अथवा स्वभावभिन्नता, ८. रतिसुख-विषयक अडचणी, ९ अनारोग्य, १०. राह्यची परिस्थिती, ११. फसवणूक वगैरे इतर कारणे, १२. कारणाशिवाय पतीकडून त्याग, १३. अज्ञात कारणांनी त्याग.

कोर्टात किंवा संस्थेच्या आश्रयाखाली येणाऱ्या स्त्रियांपैकी जवळ जवळ निम्म्या स्त्रिया पहिल्या कारणाने येतात. नवऱ्याची मारहाण किंवा छळ फक्त अडाणी अशिक्षित वर्गात असतो, अशी पुष्कळांची समजूत असते, पण तितकी ती खरी नाही. सुशिक्षित श्रीमंतवर्गातही पुष्कळ वेळा मारहाण व इतर मानसिक छळ इतक्या प्रमाणावर होतो की, काही बायका आनंदाने मृत्यूला मिठी मारू पाहतात. कित्येक वेळा कुळाच्या समाजातील प्रतिष्ठेने, सन्मानाने व नावलौकिकाने बाईची भयंकर मुस्कटदाबी होते. अशा वेळी सारा छळ सहन करून राहण्याचे दिव्य करताना बायकांना पाहिले की, केवळ भारतीय स्त्रियाच असे दिव्य करू शकतात, असे मनात आल्याशिवाय राहात नाही. अर्थात अशा घराण्यांतून वितुष्ट विकोपाला गेले की अखेर ती प्रकरणे कोर्टात येतातच; पण थोडी. लग्नविच्छेदापर्यंत येणारा संघर्ष आत तोंड असलेल्या उपड्या गळवा-सारखा आहे. भयंकर ठणका लागला की विच्छेदाची शस्त्रक्रिया केल्याशिवाय तरणोपाय नसतो. पण तो उपाय होऊन जखम बरी झाली तरी त्याचे मनावर पडलेले खोल वण कायमचे राहतात. ते नाहीसे होत नाहीत. कित्येक वेळा एकाच लग्नाचा अनुभव पुन-र्लग्नापासून बाईला निवृत्त करतो.

सासरच्या माणसांकडून होणारा छळवाद : आपल्याकडे विभक्त कुटुंब-पद्धती वाढत असली तरी मूळ घर अगदी तुटलेले नसते. अगदी मोठी शहरे सोडली तर अजूनही कुटुंबे एकत्रच असतात. छळाची कारणे हुंडा, मानपान, करणी, देणीघेणी अशी नेहमीचीच असतात. त्यात कित्येक वेळा प्रत्यक्ष छळ होतो किंवा कित्येक वेळा नवऱ्याचे कान भरून त्याच्या मनात नावड उत्पन्न व्हावी असे प्रयत्न करण्यात येतात. अशा कारणांनी कोर्टात वा संस्थेत येणाऱ्या बादकांची संख्याही काही कमी नसते.

प्रत्यक्ष व्यभिचार किंवा व्यभिचाराचा संशय : हे कारण नवऱ्याने बायकोला टाकण्यास पुरेसे आहे असे एकदम कोणालाही पटेल. पण कोर्टात येणाऱ्या केसेस किंवा संस्थेच्या आश्रयाला दाखल झालेल्या बायकांच्या बाबतीत नंतर झालेला पत्रव्यवहार पाहिला की, पत्नीने पतीवर व पतीने पत्नीवर केलेल्या या आरोपांची संख्या जवळ जवळ सारखीच भरते. जास्त खोलात गेले की, सध्याच्या परिस्थितीने अशा कारणाने येणाऱ्या संख्येत फार मोठी भर पडत आहे असे दिसते. खेडेगावातून कितीक श्रमजीवी माणसे

मुंबईला पोटापाण्याचा धंदा पाहण्याकरता येतात. खोलीच्या अभावी बायको ‘ न्हाती-धुती ’ झाल्यावर त्यांना मुंबईस बिऱ्हाड करता येत नाही की बायकोला मुंबईला आणता येत नाही. अशी ‘ नव्या नवतीची नार ’ गावी असता तिचा फायदा घेण्यास टपलेले आप्त व गावातील लोक काही कमी नसतात. अशा परिस्थितीत कधी चुका होतात; कधी नुसत्या संशयपिशाच्चानेच नवऱ्याचे मन बिथरते व बाईला टाकली जाते. साधारण प्राकृतिक (Normal) आयुष्य स्त्री-पुरुषांना उपभोगू न देता त्यांना उपासमार करावयास लावणारी ही मुंबईसारख्या शहरातील परिस्थिती सामाजिकदृष्ट्या चिंतनीय आहे.

व्यसनाधीनता, अनारोग्य, फसवणूक वगैरे कारणे वैवाहिक खटके कसे उत्पन्न करतात हे सहज समजण्याजोगे आहे. तेव्हा विरोधी किंवा विजोड स्वभाव व रतिसुख-विषयक अडचणी या दोन कारणांचाच येथे विचार केल्यास पुरे होईल. पति-पत्नीच्या स्वभावातील विजोड ही गोष्ट दिसण्यात लहान दिसली तरी प्रत्यक्ष सारे जीवन त्याने काळ्यावर घातल्यासारखे होत असल्याने त्याचे परिणाम पति-पत्नींना भोगावे लागतात, असे किती तरी वेळा दिसून येते. स्त्रीत असणारा अकाल पोरकटपणा (immaturity), हट्टी स्वभाव, आक्रस्ताळेपणा, सारखी कुरकुरण्याची सवय, समजून घेण्याची अपात्रता इत्यादी बारीक गोष्टींनी वैवाहिक जीवन उद्‌ध्वस्त होताना दिसते. पति-पत्नीतील विसंवाद वाढत जातो व त्याचा परिणाम एकमेकापासून विभक्त होण्यात होतो. लग्नाआधी एक-मेकांचा परिचय, प्रेम असताही अशा विजोड स्वभावाने एकेकाळी ६३ सारखी असलेली तोंडे ३६ चा आकडा धरून बसतात.

आपल्या समाजात अजूनही एखाद्या पुरुषाचे किंवा स्त्रीचे लग्न झाले नाही की तो एक प्रकारचा कमीपणा समजण्यात येतो. आपल्यातील ९० टक्के लग्ने वडलांनी पाहूनच करून दिली जातात. शिवाय काही देशांत प्रचलित असलेली वैद्यकीय तपासणीही आपल्याकडे होत नाही. अशा परिस्थितीत कित्येक वेळा, शारीरिकदृष्ट्या विवाह-संबंधाला अपात्र किंवा अक्षम असलेल्या स्त्रीपुरुषांची लग्ने होतात व लग्न झाल्यावर पश्चात्तापाची पाळी येते, आणि मुली टाकल्या जातात. कित्येक वेळा बाह्यात्कारी शरीरें-द्रियात काही दोष दिसत नाही पण रतिसुखाची इतकी मानसिक अढी किंवा घृणा असते की, जोडीदारास कामपूर्ती, रतिसुख मिळणे अशक्यप्राय होऊन बसते. पति-पत्नीतील संघर्षाचे ते एक जबरदस्त कारण असते. त्यात तीव्र निराशेने नवीनच उत्पन्न होणारी आपुलकी पार जळून जाते. तोंडसुद्धा पाहण्याची इच्छा राहात नाही. कधी स्त्रीच्या बाबतीत थोडीशी अपुरी वाढ असते, वैद्यकीय सल्ल्याने व सबुरीने गोष्टी घेतल्यास दोघांचे जमण्यासारखे असते. पण हा विचार होण्यापूर्वीच ‘ नालायक ’ ‘ अपात्र ’ म्हणून मुली टाकल्या जातात. पूर्वीच्या काळी पुरुषातील अशी प्रजनन-अक्षमता स्त्रीवर लादली जाई. तिलाच वांझ म्हणून नावे ठेवून तिच्या उरावर दुसरी आणून नाचविण्याची घरात भाषा सुरू होई. मुलीचा छळ होई. अशा छळाने वैताग-

लेल्या व वांझ म्हटल्याने चिडलेल्या एका तरुणीने सूडाच्या भावनेने व्यभिचार करून आपली प्रजननक्षमता सिद्ध केली. याचा परिणाम तिला टाकण्यात झाला. पण जाताना " माझ्या उरावर एकच काय छप्पन्न आणखी बायका आणून नाचविल्यात तरी यांच्यापासून त्यांना मूल होणार नाही " असा उघड चारचौघांत आरोप करून सूड उगवल्याचे समाधान घेऊन ती तरुणी घराबाहेर पडली व एका संस्थेच्या आश्रयाला आली, हे सांगणे नकोच. कारण माहेर-सासरचे दरवाजे तिला बंदच झाले.

वरील कारणे परित्यक्ता स्त्रीचा विचार करीत आहोत म्हणून स्त्रीच्या बाजूने पाहिली. पण पुरुषाला हीच कारणे लागू होतात. फक्त पहिली दोन कारणे त्यात येत नाहीत एवढेच.

याशिवाय स्त्री-पुरुषांच्या वयोमानातील, शिक्षणातील तफावत, व्यवसाय (नट-नटी, सिनेमाचा व्यवसाय, बिझिनेस) इत्यादी गोष्टीही वैवाहिक जीवनात संघर्ष आणू शकतात. मध्ये एके काळी फार प्रचारात आलेला बौद्धिक मैत्री हा प्रकार या तफावतीतूनच उद्भवत असे.

मुलांच्याही वैवाहिक जीवनावर परिणाम होतो. मात्र मुलांनी वैवाहिक जीवनाला स्थैर्य येण्यास मदत होते. बारीकमोठे फटके, विसंवाद नाहीसे झाले नाही तरी अगदी विकोपाला जाण्याचा संभव कमी होतो. बायकोला सोडण्यापूर्वी किंवा नवऱ्याला सोडण्यापूर्वी स्त्री-पुरुष दोनदा विचार करतात. कारण दोघांचाही जीव मुलांच्यात गुंतलेला असतो. पण काही जोडप्यांच्या बाबतीत आपसातील वितुष्ट, विसंवाद इतका विकोपाला गेलेला असतो की, अशा संघर्षात मुले वाढण्यापेक्षा कोणा एकाकडे जाऊन ती शांतपणे सुरक्षिततेच्या भावनेने वाढली तर बरी असे म्हणण्याची पाळी येते. बहुधा अशा वेळी पति-पत्नींचे संबंध तुटलेलेच असतात.

आईबापांच्यात जबरदस्त खटके उडू लागले की, मुलांची फारच चमत्कारिक अवस्था होते. त्यांचे मन व्यक्तिपरत्वे दोघांकडेही ओढ घेत असते. पण त्यांना काय करावे, कसे बोलावे ते कळत नाही. एकंदर सर्व प्रकाराने त्यांच्यात असुरक्षिततेची भावना बळावते. अशा परिस्थितीत अगदी लहान मुलेसुद्धा घाबरून जाऊन रडू लागतात. जरा कळू लागलेल्या मुलांना झोप येत नाही. पायाखालचा आधार ढासळून पडावा इतका त्यांना धक्का बसतो. ती चमत्कारिक वागू लागतात. कित्येक वेळा त्यांचे अभ्यासावरचे लक्षही उडते. ती उन्मार्गगामी होतात. घरात दुसरे कोणी वडीलधारे माणूस असल्यास सुरक्षिततेसाठी ती त्याला चिकटतात; पण आईबापांच्याकडचा ओढा कमी झालेला नसतो. अमेरिकेत उन्मार्गगामी मुलांचा (Juvenile Delinquent) अभ्यास करताना असे अढळून आले आहे की, अशा मुलांतील बहुसंख्य मुले भंगलेल्या घरातूनच आलेली असतात.

लग्न ही संस्था मूलतः समाजसातत्याकरिता, मुलांकरिता अस्तित्वात आली. मुलांची वाढ, जोपासना, शिक्षण, सांस्कृतिक जतन उत्तम रीतीने व्हावे म्हणून कुटुंब

आले, पण पति-पत्नींतील विसंवादाने, खटक्यामुळे स्वयंनिर्णीत वा कायदेसंमत लग्न-विच्छेदामुळे कुटुंबाचा पायाच ढासळून कुटुंब हादरून जाते. त्यातले सातत्य, सुरक्षितता, आपुलकीची भावना खलास होते. या सगळयाचा मुलांवर म्हणजेच समाजाच्या भावी पिढीवर फार अनिष्ट परिणाम घडतो. म्हणूनच लग्नविच्छेदाचे प्रमाण वाढू लागले की, समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने तो प्रश्न विचारवंतांना व समाजनेत्यांना भेडसावू लागतो.

आपल्याकडील बहुतांश परित्यक्तांना स्वतःचेच पोषण करण्याची पात्रता नसते. अशा वेळी मुलांचे पालनपोषण करण्याची त्यांच्यावर जबाबदारी पडली की बाईचे अतोनात हाल होतात व त्याबरोबरच मुलांचेही हाल होतात. अशा परिस्थितीत लग्नविच्छेदाचा कायदेशीर आधार घेऊन मुलांच्या पोषणाकरता नवऱ्याकडून काही पैसे मिळाले तर बरे. नाही तर मुले-बायका देशोधडीला लागतात. पूर्वी अशा विपत्तीत माहेरची माणसे, आईबाप, भाऊबहीण वगैरे धावून येत. घरी राहा व दोन कष्ट कर, आम्ही करतो मुलांचे, असे म्हणू शकत. पण दिवसानुदिवस विभक्त कुटुंबपद्धती वाढू लागल्याने आपले व आपल्यापुरतेच पाहण्याची वृत्ती वाढू लागली. वाढत्या महागाईनेही बाईला कोणाच्या आश्रयाला जाणे कठीण होते. बाईने आपली अर्थार्जनक्षमता कधी सोडून का देऊ नये हे अशा वेळी फार जाणवते. सुशिक्षित शिकलेल्या बाईला ती नोकरी करीत नसली तर वाढत्या वयात एकदम नोकरी मिळवणे जड जाते. अर्थात आधीपासूनच नोकरी करीत असली तर तिला अगदी न मिळणाऱ्या बाईइतके जड जात नाही. पण परित्यक्ता बाईचे नष्टचर्य एवढ्यावरच संपत नाही हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

एका तरुण मुलीने आपल्या आईबापांच्या मर्जीविरुद्ध एका गृहस्थाशी विवाह केला. ती S. S. C. असून मिळवती होती. एक-दोन वर्षांनी तिला मूल झाले. मूल झाल्यानंतर एक-दोन महिन्यांच्या आतच तिचे व नवऱ्याचे बिनसू लागले. एके दिवशी सारे प्रकरण विकोपाला जाऊन (तो दुसऱ्या मुलीच्या नादी लागला होता) नवऱ्याने तिला घराबाहेर मुलासकट काढून दिले. आईबापांच्या मनाविरुद्ध लग्न केले असल्याने त्यांनीही तिला आश्रय दिला नाही. अखेर तिला निराश्रित बायकांच्या संस्थेच्या आश्रयाला यावे लागले. संस्थेने तिला आश्रय दिला, पण तात्पुरता; कारण मुलाला ठेवून बाईने नोकरीधंद्याला जाणे त्या संस्थेच्या नियमांत बसत नव्हते. अशा नोकरीवाल्या स्त्रियांकरता ती संस्था नव्हतीच मुळी. त्यामुळे तिला थोडेच दिवसांत फिरून दुसरी व्यवस्था करण्याकरता बाहेर पडावे लागले. मनुष्याला अन्न, वस्त्र, निवारा या तिहींचीही जरुरी असते. पण कित्येक परित्यक्ता बायका या तिहींनाही पारख्या होतात व उघड्यावर पडतात. सुदैव हे की, स्वातंत्र्यानंतर कायदेकानू करीत असता परित्यक्ता स्त्रीच्या होणाऱ्या दैन्यावस्थेकडे आपल्यातील विचारवंतांचे व नेत्यांचे लक्ष वेधले होते. त्यामुळे प्रथम हिंदुकोड बिल पास करून लग्नविच्छेदाच्या बाबतीतील कायद्याची अडचण त्यांनी काढून टाकली. शिवाय एक पत्नी हयात असताना किंवा तिला लग्नविच्छेद दिला

नसता दुसरे लग्न करणे पुरुषाच्या बाबतीतही गुन्हा ठरविण्यात आले. मागे उल्लेखिलेल्या गुपचुप दुसरे लग्न करणाऱ्या या पतिराजांना बायकोने मनात आणले तर न्यायासनासमोर खेचून तुरुंगात पाठविता येईल. पण काही केसशिवाय असे कोणी केल्याचे ऐकिवात नाही. पण हळूहळू अशा बायका पुढे येऊन त्यांनी नवऱ्यांना धडा शिकवणे तितकेच गरजेचे आहे. कारण त्याशिवाय आपल्या समाजातील पुरुष धडा शिकणार नाहीत.

टाकलेल्या बायकांचा विचार करीत असता परित्यक्तेचा प्रश्न हा आर्थिक दृष्टीने किती महत्त्वाचा प्रश्न आहे, याची कल्पना आलेली असेलच. दिवसानुदिवस बायका अर्थार्जन करून स्वतःच्या पायावर उभ्या राहात आहेत, हे निःसंशय त्यांच्या हिताचे आहे. पण अजूनही कितीतरी परित्यक्ता अशा आहेत की, नवऱ्याचा आधार तुटला की त्या अगदी रस्त्यावरच येऊन पडतात. अशा स्त्रियांना थोडातरी आश्रय मिळावा म्हणून आतापावेतो श्रद्धानंद महिलाश्रम, बाप नू घर अशाच फक्त खासगी संस्था होत्या, पण आता स्वातंत्र्यानंतर जिल्ह्याच्या ठिकाणी महिलाश्रम काढून सरकार त्यांना आसरा देत आहे. शिवाय Condensed कोर्सेस काढून, त्यांनी शिकून व्यवसायाला लागावे याकरताही समाज कल्याणखात्यातर्फे सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पण त्यांची खरी गरज असते साधे प्राकृतिक (Normal) आयुष्य घालविण्याची. असे टाकलेल्या बायकांच्या प्रश्नांचा विचार करीत असता लक्षात येते. कोर्टातील व संस्थेच्या आश्रयाला आलेल्या स्त्रियांची मनःस्थिती लक्षात घेतली तर त्यांतील काहींना तरी लग्नविच्छेदापेक्षा आपले नवऱ्याशी परत जुळले तर पाहिजे असते. संस्थांतून नेहमीच तसा प्रयत्न करण्यात येतो व त्यात काही वेळा यशही येते. कोर्टातसुद्धा एकमेकांच्या विरुद्ध अटीतटीने विच्छेदासाठी उभ्या राहिलेल्या वादीप्रतिवादीतही केस करणाराच पुढे न आल्याने काही केसेस काढून टाकल्या जातात व त्यांचा अखेर समेट होतो. हे सर्व लक्षात घेतले तर या बाकीच्या सोयींबरोबरच नवराबायकोतील संघर्ष विकोपाला जाण्याच्या आधी शहाणपणाचे दोघांना चार शब्द सांगणारे डॉक्टरसारखे तज्ज्ञ असे कोणी तरी पाहिजे असते हे उघड आहे. त्या दृष्टीने Marriage Councelling ची जी काही ठिकाणी सोय उपलब्ध करण्यात आली आहे, ती खरोखर स्वागतार्ह आहे. पाश्चात्त्य देशांत अशा सोयी उपलब्ध झालेल्या आहेत व त्यांचा फायदा बरीचशी नवविवाहित जोडपी घेत असतात. पण हे सारे लिहीत असता, पाश्चात्त्य देशांत वाढणारे लग्नविच्छेद मी दृष्टीआड करू शकत नाही. शिवाय एका जबाबदार स्त्री-संस्थेच्या चालकांनी काढलेले उद्गार अजूनही मला आठवले की, थोडासा धसकाच बसतो. ते म्हणाले, सध्या "एक-दोन मुले झाली की प्रेमविवाह असो, की जुळवलले लग्न असो; बरेच तरुण पती आपल्या बायकांना टाकून देतात व दुसऱ्या बायकांच्या नादाला लागतात". ही प्रवृत्ती खरोखर वाढत असेल तर का ? याचा समाजनेत्यांनी व विचारवंतांनी खरोखर विचारच केला पाहिजे.

दिवसानुदिवस निघणाऱ्या नवीन शास्त्रीय शोधांनी बदलत्या आर्थिक, सामाजिक

परिस्थितीने, आपण एक प्रकारच्या संक्रमणावस्थेतून जात आहोत. लग्न हे मानवी बंधन आहे; त्यात दैवी, धार्मिक, पवित्र, काही नाही. त्यात काही वेळा आपुलकी उत्पन्न न होता निष्प्रेम, वितुष्टही येते. अशा वेळी विवाहसंबंध चालू ठेवणे म्हणजे शुद्ध व्यभिचार आहे. व्यक्तीला अशा बंधनातून सुटण्याचा अधिकार आहे अशा कल्पना बळावत आहेत. नैतिक मूल्येही बदलत आहेत. नवीन अर्थव्यवस्थेने समाजपरिवर्तनाने कुटुंबाचे, घराचे, महत्त्व एकेकाळी होते तसे न राहता भराभर कमी होत आहे. शास्त्रीय शोधांनी अपत्यजन्म आता पूर्वीप्रमाणे मानवाच्या आटोक्यापलीकडचा न राहता मानवाधीन झालेला आहे. लोकांची व्यक्तिगत सुख प्राप्त करून घेण्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. हे सगळे बदल, सामाजिक परिवर्तन लक्षात घेता, स्त्रीने सुद्धा आता पूर्वी-सारखे केवळ पुरुषाधीन, पुरुषावलंबी न राहता स्वाधीन, स्वावलंबी व्हावयास पाहिजे. त्याने परित्यक्ता स्त्रीचे सारे प्रश्न सुटतील अशातील प्रकार नाही. पण आतापर्यंत तिची जी परवड होत होती ती तरी टळेल. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांची अर्थार्जनाच्या बाबतीत बरीच प्रगती झाली आहे ही एका दृष्टीने इष्ट प्रगतीच आहे, असे म्हणता येईल.

स्त्रीजीवनाचा विकास व समस्या

सौ. यमुनाबाई हिर्लेकर

गेल्या शतकाचा उत्तरार्ध व चालू शतकाचा पूर्वार्ध यामध्ये ज्या अनेक थोर व विचारवंत पुरुषांनी स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अत्यंत परिश्रम केले व सर्वसाधारण सामाजिक विरोध व निंदा यांना तोंड देऊनही स्त्रीजीवनाचा विकास करण्यास मदत केली त्यांचे आधुनिक स्त्रियांनी अत्यंत कृतज्ञ राहिले पाहिजे. आज जो आपल्याला स्त्री-जीवनाचा विकास व प्रगती दिसत आहे त्याला या थोर व्यक्तींचे अर्धशतकाहून अधिक काळचे प्रयत्न कारणीभूत आहेत. त्यांचा धावता नामोल्लेख येथे करणे जरूर आहे, असे मला वाटते.

राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, पंजाबचे दयानंद सरस्वती, गुजराथचे दलपतराय उमियाशंकर यांसारख्या अनेक व्यक्तींनी स्त्रियांची सामाजिक सुधारणा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. महाराष्ट्रात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, आगरकर, महादेव गोविंद रानडे, जगन्नाथ शंकरशेट, ज्योतिबा फुले, गोपाळ कृष्ण देवधर, महर्षी कर्वे, महात्मा गांधी यांनी स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, अनिष्ट रूढींचे उच्चाटन यासाठी खूप प्रयत्न केले. संस्था स्थापन केल्या. महर्षी कर्वे यांचे संबंध जीवन या कार्याचा प्रत्यक्ष आचार, विचार व प्रचार यांमध्ये व्यतीत झाले. कर्वे यांनी स्वतः केशवपन झालेल्या एका बालविधवेशी विवाह करून समाजाला उदाहरण घालून दिले. स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करून बहुसंख्य स्त्रियांना खास उपयुक्त अशा उच्च शिक्षणाची द्वारे उघडून दिली. प्राचीन काळी भगीरथराजाने गंगा भूतलावर आणण्यासाठी जसे आटोकाट प्रयत्न केले तसेच भगीरथ प्रयत्न कर्वे यांनी स्त्रीशिक्षणा-साठी केले. महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रांत कामे करण्यासाठी बहु-संख्येने तयार झाल्या. घराच्या चार भिंतींमागे दडलेली त्यांची कर्तृत्वशक्ती बहरली. अंगी निर्भयता व साधेपणा बाणला. स्वातंत्र्याच्या चळवळीत लहानथोर, श्रीमंत-गरीब

सर्व थरांतील स्त्रियांनी न भूतो न भविष्यति अशा प्रमाणात भाग घेतला. हा इतिहास अगदी ताजाच आहे.

थोड्याबहुत स्त्रियांनाही या श्रेयाचा वाटा आहे, नाही असे नाही. पतीच्या ध्येयाला साथ देऊन गेल्या शतकातील आनंदीबाई जोशी, न्यायमूर्ती रानडे यांच्या पत्नी रमाबाई, स्वामी विवेकानंद यांची शिष्या भगिनी निवेदिता, पंडिता रमाबाई यांसारख्या काही तुरळक स्त्रियांनीही या कार्याला हातभार स्वतंत्रपणे लावला. अशा प्रकारे अनेक लहानथोर, ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी गेल्या शतकात स्त्रीजीवनविकासासाठी परिश्रम केले. त्यामध्ये आमच्या बंधुवर्गाचे प्रमाण खूप जास्त आहे ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

इंग्लंड, अमेरिका या परदेशात स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ १८४८ च्या सुमारास सुरू झाली. ती सफ्रेजेट चळवळ या नावाने प्रसिद्ध आहे. स्त्रियांना स्वतःला त्यासाठी खूप झगडावे लागले. या स्त्रियांप्रमाणे आम्हाला आमच्या हक्कासाठी किंवा सामाजिक समतेसाठी लढा द्यावा लागला नाही. अन्यायाची जाणीव असणाऱ्या ध्येयनिष्ठ व दूरदर्शी बंधुवर्गाने प्रारंभीचे कष्ट करून स्त्रियांना जीवनात विकासाच्या समान संधीचा लाभ करून दिला. त्याचा परिणाम म्हणूनच गेल्या २५–३० वर्षांत शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत स्त्रियांची वाटचाल खूपच झपाट्याने झालेली आहे असे आपणास दिसून येईल. स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण १९३१ साली सारे २ टक्के होते तर १९६१ साली ते १३ टक्के झाले. १३ टक्के हे प्रमाण प्रथमदर्शनी फार जास्त वाटत नाही, पण खेड्यांतील स्त्रियांचा त्यात समावेश असल्यामुळे ते एवढे कमी दिसते. शहरांतील स्त्रियांत ते प्रमाण खूपच वाढले आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत १९४७ साली विद्यापीठात २ लक्ष ४४ हजार मुलगे होते व २३ हजार मुली होत्या तर १९६६ साली विद्यापीठात १६ लक्ष ८९ हजार मुलगे व ३ लक्ष २१ हजार मुली शिक्षण घेत होत्या. यावरून मुलांच्या मानाने मुलींच्या शिक्षणाचा प्रसार किती प्रमाणात वाढला आहे हे दिसून येईल. तसेच परीक्षांमध्ये अलीकडे मुलांपेक्षा मुलीच अधिक उत्तम यश मिळवू लागल्या आहेत. यावरून त्यांच्या बुद्धिमत्तेच्या विकासाची कल्पना यावयास हरकत नाही.

प्रथमतः स्त्रिया साधारणपणे शिक्षक, प्राध्यापक, रुग्णपरिचर्या, डॉक्टरी, अशा व्यवसायात पडत असत. पण आता त्या एंजिनियरिंग, केमिस्ट, वकील, टेलिफोन, पोस्ट, रेल्वे, पोलीस, पायलट, एअरहोस्टेस, टेलरिंग, केटरिंग, टायपिस्ट, सेक्रेटरी इत्यादी नाना प्रकारच्या व्यवसायाचे शिक्षण घेऊन आर्थिक क्षेत्रात धडाडीने काम करीत आहेत. साध्या कामगारवर्गात, श्रमिक व शेतकी व्यवसायात तर स्त्रिया खूपच आहेत. खालच्या वर्गातील कुटुंबांतील स्त्री-पुरुष व मोठी मुले सर्वच मिळवू लागली आहेत. मात्र शिक्षणाच्या अभावी या कामाला दर्जा प्राप्त झालेला नाही. तरीपण कामगारवर्गात देखील शिक्षणाची आवड व इच्छा निर्माण झालेली असून घटनेमधील सार्वत्रिक व

मोफत शिक्षणाच्या धोरणामुळे मुलींमध्येही शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. इतका की, या सर्वांना शिक्षण देण्याला शाळा व शिक्षक कसे पुरवावे हाच सरकारला प्रश्न पडला आहे. शहरातील मध्यमवर्गीय मुली तर सर्रास शिक्षण घेत आहेत. मात्र शिक्षणाच्या चुकीच्या धोरणामुळे अर्थोत्पादनाला या शिक्षणाचा फारसा उपयोग मुलांनाही होत नाही, तर मुलींना कोठून होणार ?

सामाजिक क्षेत्रात भारतात स्त्रियांना मतदानाचा हक्क १९२१ साली मिळाला. १९२६ पासून त्यांना काही प्रांतांच्या कायदेकौन्सिलात सरकारनियुक्तीच्या जागा राखून ठेवण्यात आल्या. १९३१ सालापासून त्यांना निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे राहता येऊ लागले. याचा फायदा काही स्त्रियांनी घेतलाही. पण सांसारिक अडचणींमुळे स्त्रियांना पुरुषाइतक्या मोकळेपणाने निवडणुकी लढवणे शक्य नव्हते. १९२२ साली संततिनियमनाच्या प्रसारार्थ सँगरबाईंनी भारताचा दौरा केला. त्या वेळी त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. गांधींचाही त्या गोष्टीला विरोध होता. पण महर्षी कर्वे यांचे पुत्र र. धों. कर्वे यांनी संततिनियमनाच्या कार्याचा जोराने पुरस्कार केला. त्यासाठी 'समाजस्वास्थ्य' नावाचे एक नियतकालिक चालू केले. कालांतराने संततिनियमनाचे कुटुंबनियोजनात रूपांतर होऊन तो कार्यक्रम सरकारमान्य झाल्यावर त्याला खूप चालना मिळाली. कुटुंबनियोजनाचा फक्त लोकसंख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीनेच विचार केला जातो. पण स्त्रीजीवनावर त्याचा अनेक प्रकारचा परिणाम झाला आहे. थोडी मुले झालेल्या स्त्रियांचे संसारातून थोडे तरी वर डोके निघू लागले. बाळंतपणातील अपमृत्यू व प्रकृतीची हानी कमी झाली. मुले थोडी मोठी झाल्यावर थोडा बौद्धिक व्यवसाय, सार्वजनिक कामे वगैरे करण्यास सवड मिळू लागली. वैयक्तिक आवड, महत्त्वाकांक्षा, समाजसेवा इत्यादी करण्यास मोकळीक मिळाली. १९५५ साली हिंदू कोड बिल पास झाल्यामुळे स्त्रियांना वारसा हक्क, घटस्फोट इत्यादी कायद्याच्या बाबतीत समानता प्राप्त झाली. देशाला १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्याच्या श्रेयामध्ये स्त्रियांचाही थोडाफार वाटा होता व त्याची त्यांना फळे मिळाली. राजकारणात त्यांनी खूप भाग घ्यावयास सुरुवात केली. १९५० साली भारतीय घटनेमध्ये स्त्रीपुरुषांना समान हक्क व समानसंधी देण्यात आली आहे. आज देशातील विविध राज्यांच्या विधिमंडळातून व केंद्रीय पार्लमेंटमधून बऱ्याच स्त्रिया निवडून आलेल्या आहेत. काही राज्यांत त्या मंत्री, उपमंत्री व उपाध्यक्षा आहेत. I A S व I F S सारख्या अखिल भारतीय परीक्षा पास होऊन स्त्रिया जबाबदारीची कामे करीत आहेत. विद्यापीठाचे शैक्षणिक क्षेत्रातील कुलगुरुपदाचे श्रेष्ठ स्थानही स्त्रीने भूषवले आहे. स्त्रिया प्रांतांच्या गव्हर्नर झालेल्या आहेत. इतकेच नव्हे तर युनोसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेचे अध्यक्षपदही प्रथमतःच हिंदी स्त्रीला मिळाले. सध्या भारताच्या अत्युच्च अशा प्रधानमंत्रिपदावरही स्त्रीच आहे. अशी घटना प्रगतिशील समजल्या गेलेल्या पाश्चात्त्य देशांमध्येही घडून आलेली नाही. सिलोनमध्ये सिरीमावो भंडारनायके किंवा इस्राएलमध्ये गोल्डा मायर

या जरी पंतप्रधान झालेल्या असल्या तरी आकाराने व लोकसंख्येने हे देश कितीतरी लहान आहेत. परदेशातील राजदूतपदही हिंदी स्त्रीने भूषविलेले आहे. यावरून राजकीय क्षेत्रात हिंदी स्त्रियांनी मिळविलेल्या असामान्य आघाडीची कल्पना येईल.

स्त्रियांना सर्व बाबतीत समानतेची घटनेत जरी तरतूद केलेली असली तरी प्रत्यक्षात मात्र ती फारशा प्रमाणात अमलात आलेली नाही. मात्र याला पुरुषवर्ग जबाबदार नसून परमेश्वराने स्त्रीवर अपत्यधारणेची जी जबाबदारी टाकली आहे ती कारणीभूत आहे. त्यामुळे स्त्रीचे व पुरुषाचे कार्यक्षेत्र आपोआपच भिन्न झालेले आहे. स्त्रीवर घरची जबाबदारी अधिक तर पुरुषावर अर्थार्जन व कुटुंबाचे संरक्षण याची जबाबदारी अधिक असे सर्वसामान्यतः भाग पडले आहेत. तरीपण स्त्रीचा सर्व जन्म चूल व मूल यातच जाणे बरोबर नाही. हितावहही नाही. त्यामुळे स्त्रीमधील बुद्धी व कार्यक्षमता याचा समाजाला व देशाला फायदा होणार नाही. शिवाय हल्लीच्या आर्थिक ओढगस्तीच्या काळात स्त्रीनेही अर्थार्जन करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच विवाह न झाल्यास किंवा न केल्यास तिला वडिलांवर किंवा भावावर आर्थिक दृष्ट्या अवलंबून राहण्याची पाळी येऊ नये हे उचितच आहे. पण नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या पुरुषाहून वेगळ्या अशा काही समस्या आहेत. त्या सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

प्रथम अविवाहित स्त्रियांच्या समस्या पाहू. अविवाहित स्त्रीला एक तर वडिलांच्या किंवा भावाच्या घरी राहावे लागते त्यामुळे तिची थोडीतरी कुचंबणा होतेच. पूर्वीचे मोठ्या अविभक्त कुटुंबाचे दिवस आता बदलत्या जमान्यात गेले आहेत. जागेची टंचाई, आर्थिक अडचण, स्वातंत्र्याच्या काहीशा अवास्तव कल्पना, परस्परव्यवहारात काहीशी असहिष्णुता यामुळे प्रौढ अविवाहित स्त्रीला नातेवाइकांकडे राहणे परस्पर सुखकारक होऊ शकत नाही. मग स्वतंत्र राहावे तर तिला सुरक्षितता हवी. एखाद्या वसतिगृहात (असलेच तर) कायम राहणेही सुखावह नसते. बाहेरगावी किंवा लहान मोठ्या शहरी एकटे-दुकटे राहण्यात धोका आहे हे अलीकडील काही घटनांवरून स्पष्ट होते. नोकरीतून निवृत्त झाल्यावरही अविवाहित स्त्रीला एकाकी जीवन कंठणे फार कठीण आहे. यासाठी तिने तरुण वयापासूनच समाजसेवा, किंवा लेखन किंवा इतर काही छंद स्वतःला लावून घेऊन निवृत्तीनंतरचे जीवन कंटाळवाणे होणार नाही याची आधीपासून योजना आखली पाहिजे. अशा नाना प्रकारच्या समस्या अविवाहित स्त्रीसमोर उभ्या आहेत याचा समाजानेही विचार करून त्यातून काहीतरी मार्ग काढणे जरूर आहे.

आता विवाहितेच्या समस्यांकडे वळू. सुशिक्षित स्त्रीने निव्वळ संसार व मुलेबाळे यांच्यामध्ये मन रमणे शक्य नाही. आपल्या शिक्षणाचा अर्थोत्पादनाच्या दृष्टीने किंवा सामाजिक कार्याच्या दृष्टीने काही तरी उपयोग व्हावा असे तिला स्वाभाविकपणे वाटते व तत्त्वतः यात काही गैर आहे असेही नाही. पण जोपर्यंत तिची मुले लहान आहेत तोपर्यंत तिला नोकरी केल्यास संसार, मुले व नोकरी सर्व संभाळणे अत्यंत कष्टाचे होते.

चांगले नोकर मिळत नाहीत. मिळालेच तर परवडत नाहीत. परवडले तरी मुलांच्या भावनिक गरजा त्यामुळे भागत नाहीत. मुलांच्या मनावर त्या वयात जे चांगले संस्कार घडावयाचे ते घडत नाहीत. आईच्या सहवासासाठी व प्रेमासाठी आसुसलेल्या मुलांची व काही प्रमाणात मातेचीही या काळात फारच मानसिक उपासमार होते. घरकाम व नोकरीचे काम यांपैकी एकही ती स्वतःच्या मनाला समाधान होईल अशा प्रकारे करू शकत नाही व या गोष्टी साध्य करण्याच्या प्रयत्नात ती अगदी भरडून निघते. हल्ली बहुतेक घरात वडिलधारे मनुष्य असत नाही. त्यामुळेच नोकरी करणारी स्त्री निदान मुले लहान असेपर्यंत सर्वस्वी नोकरमाणसावर अवलंबून असते. नोकरही या परिस्थितीचा फायदा घेत नाहीत असे म्हणता येणार नाही. अर्थात काही अपवाद असू शकतात. त्यामुळे नोकर टिकविण्यासाठी तिला फार मन मारावे लागते.

नोकरीच्या किंवा बाहेरील कामाच्या वेळा कोणत्या आहेत यावरही सांसारिक सुख बरेच अवलंबून असते. सामान्यतः पुरुष घरी असतात त्या वेळी स्त्रीनेही घरी असणे योग्य असते. पण ते जमेल असे सर्वच व्यवसायांच्या बाबतीत सांगता येणे कठीण आहे. नोकरीपेक्षा कौटुंबिक सौख्य व समाधान हे अधिक हिताचे आहे असे मला वाटते. म्हणजे ‘ उद्‌ध्वस्त संसार ’ (Broken homes) ही अमेरिकेतील समस्या आपल्याकडे फोफावणार नाही. या विवाहित स्त्रीच्या घरगुती समस्या झाल्या. बाह्य जगातही काही कमी समस्या नाहीत.

नोकरीपेशा पत्करणाऱ्या स्त्रीला आपले वरिष्ठ व सहकारी यांच्याबरोबर योग्य त्या मर्यादेतच स्नेहसंबंध ठेवणे हा एक तारेवरील नाच आहे. बाह्य जगातील अडचणी, मानापमानाचे प्रसंग, नाना प्रकारची प्रलोभने, काहीशी असुरक्षितता ही पाहिली म्हणजे खरोखरीच आधुनिक स्त्रीचे जीवन एका दृष्टीने पूर्वीच्या स्त्रियांच्या मानाने पुष्कळच स्वतंत्र व सुखकर दिसत असले तरी काही अंशी धोक्याचे व मनस्तापाचे झाले आहे असे म्हणावेसे वाटते. याचा अर्थ पूर्वीच्या सर्वस्वी घरास वाहिलेल्या बंदिस्त जीवनाचा स्त्रीने फिरून अंगिकार करावा असे मुळीच नाही. परंतु यातूनही काही मार्ग काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे एवढाच आहे. त्यासाठी खालील काही सूचना विचारात घेण्यासारख्या आहेत.

(१) विवाहित स्त्रियांना अर्धवेळ नोकरी करण्याची सवलत असावी. अशा नोकरीला जरूर ती मान्यता, पगार व योग्य त्या अटी कायद्याने ठरविल्या जाव्या.

(२) स्त्रियांना घरगुती उद्योगधंदे उपलब्ध करून दिले जावे. स्त्रियांना घरी काम पुरवून ते बाजारात खपवण्याचे काम दुसऱ्यावर सोपवले जावे म्हणजे दुपारी स्त्रियांना घरीच फुरसतीचा वेळ मिळतो त्याचा त्या उपयोग करू शकतील. जपानमध्ये या पद्धतीने पुष्कळ स्त्रिया अर्थार्जन करू शकतात.

(३) नोकरीसाठी बाहेर कामाला जावेच लागते अशा स्त्रियांच्या कामाच्या वेळात त्यांच्या लहान मुलांना चांगल्या तऱ्हेने संभाळण्यासाठी विश्वासार्ह अशी संगोपनगृहे

मोठ्या प्रमाणात स्थापन करावीत. सध्या गिरणी कामगार स्त्रियांच्या मुलासाठी अशी 'क्रेश' असतात. पण त्यामध्ये संभाळणाऱ्या दाया प्रशिक्षित नसतात. तसेच ही सोय फक्त गिरणी कामगार स्त्रियांपुरतीच मर्यादित न ठेवता इतर व्यवसायांतील स्त्रियांनासुद्धा उपलब्ध असावी.

(४) खेड्यापाड्यातून परिचारिका, समाजसेविका, कुटुंबनियोजन-प्रचारिका व अन्य व्यवसायासाठी जाणाऱ्या स्त्रियांना जरूर ते संरक्षण देण्याची संबंधित खाती व शासन यांनी व्यवस्था करावी.

अर्थात सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे स्त्रीला हवी तेवढी म्हणजे दोन किंवा तीन मुले होऊन ती अगदी लहान असेपर्यंत तिला बाहेरची नोकरी करण्याची गरजच पडू नये. सर्वांत धाकटे मूल बालमंदिरात तरी जाण्याच्या वयाचे झाले म्हणजे मगच तिने अर्थार्जनास सुरुवात करावी. मुले लहान असेतो नवऱ्याच्या मिळकतीवर संसार करून घरचा प्रपंच जरी तिने काटकसरीने व समर्थपणे केला तरी पुढे मुले मोठी झाल्यावर तिला नोकरी करण्यास किंवा सामाजिक कामे करण्यास भरपूर वेळ शिल्लक राहील.

आनंदाची गोष्ट ही आहे की, भारतातील पुरुषांनीच स्त्रीशिक्षणाची व स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ सुरू केली व त्यांच्या सहकार्यानेच स्त्रीजीवनाचा विकास होत आहे. स्त्रीपुरुष-विरोध असा झगडा भारतात झालेला नाही. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नसून स्त्री-पुरुषांच्या सामाजिक, बौद्धिक व अध्यात्मिक सहकार्यानेच मानवी जीवन समृद्ध होईल असा विश्वास वाटावा अशीच भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. समाज हा गतिमान आहे. विज्ञानाची प्रगती व कालमानपरिस्थितीप्रमाणे समाजजीवनात, समाजाच्या आचारात व रूढीत बदल होणे जरूर आहे. योग्य आहे. अपरिहार्य आहे. जीवन आहे तोपर्यंत समस्या आहेत. त्यांचे स्वरूप बदलते इतकेच. तरी बदलत्या समस्यांतून मार्ग काढणे व तोही शाश्वत व उच्च अशा मानवी मूल्यांचे जतन करून काढणे यातच मानवी जीवनाचे सार्थक आहे.

अंध-अपंगांचा प्रश्न

शरच्चंद्र गोखले

आजच्या भारतापुढे ज्या काही कठीण समस्या उभ्या आहेत, त्यांपैकी अपंगांचा प्रश्न ही अतिशय करुण परंतु अतिशय दारुण अशी समस्या आहे. खुद्द महाराष्ट्रातच अपंग माणसांची संख्या ८० हजारांच्या वर असून, त्यांमध्ये मुके, बहिरे, आंधळे व अन्य तऱ्हेने दुर्बल व पराधीन असलेल्यांचा समावेश आहे. भारतातील कुष्ठरोगी धरून अपंगांच्या संख्येचा स्थूल अंदाज २५ लक्षांच्या आसपास केला जातो.

परंतु अंध अपंगांचा विचार करीत असताना त्या ठिकाणी केवळ सामाजिक अपंगत्वाचा विचार अभिप्रेत नाही. परंतु केवळ बुद्धिजन्य वा इंद्रियजन्य अपंगता लक्षात घेतली तरी ती इतक्या विविध प्रकारांत प्रगट होते की, ह्यांचे प्रश्न सोडवणे म्हणजे महा कर्म कठीण वाटू लागते. किती विविध प्रकारच्या व्यथा असतात त्यांच्या ! कुणाला दिसत नाही, कुणाला ऐकू येत नाही, कुणाला एखादा हात किंवा पाय नाही, कुणाचे हातपाय असून लुळे आहेत, कुणाला बोलता येत नाही, तर कुणाची बुद्धीच पांगुळल्यासारखी वाटते. महारोगासारख्या रोगाने पीडित होऊन मानवाने जन्मभर शापित जीवन जगावे, हा काय त्याचा अपराध ? अपंगांची भारतातील प्रचंड संख्या पाहिली, त्यांचे विविध प्रश्न पाहिले, त्यांना समाजात पुन्हा स्थान मिळवून देणे किती कठीण आहे ह्याचा विचार केला म्हणजे 'पंगुं लंघयते गिरिम्' हे ईश्वरी अधिष्ठाना-शिवाय शक्य नाही, अशी खात्री पटते आणि हा ईश्वर केवळ आध्यात्मिक असून भागत नाही, तर त्याचे प्रकटन आत्मसाक्षात्कारामध्ये व्हावे लागते.

एखादे सुंदर दृश्य पाहिले की माझ्या अंतःकरणातील ही खंत अधिकच तीव्रपणे बोचू लागते. एखाद्या अर्भकाचे निरागस हास्य, काश्मिरला मैलोगणती लागलेले गुलाब, दक्षिणेत मीनाक्षीच्या मंदिरात अगर गोपुरात कोरलेले अप्रतिम शिल्प, वेरूळच्या लेण्यांमधील जिवंत शिल्पचित्र—हे आणि असेच केवढे विविध दृष्टिसौंदर्य जगात पसर-

लेले आहे. आमच्या अंधशाळेतील अंध मुले चाचपून ब्रेल वाचतील, परंतु त्यांना ह्या सौंदर्याचा साक्षात्कार कसा होणार! जीवनातील हे विविध सौंदर्य त्यांना कसे पाहायला मिळणार! त्यांच्या जीवनविश्वावर केवढ्या ह्या मर्यादा! त्यांच्या मनावर पडणारा केवढा हा ताण! आणि ज्यांचे जीवनविश्वच एवढे मर्यादित त्यांचे भावविश्व तरी कसे असणार? त्यांना स्वप्ने तरी कसली पडत असतील?

डोळस मुले जेव्हा प्रथम शाळेत येतात तेव्हा आपणाबरोबर केवढे मोठे अनुभवाचे विश्व घेऊन येतात. मूल व शिक्षक ह्यांच्यामधे समान अनुभवाचे फार मोठे भांडवल असल्यामुळे त्यांच्यात मनमोकळा संबंध निर्माण होऊ शकतो. डोळस मुलाला भोवतालचे अनेक अनुभव नकळत जाणवत असतात. त्यामुळे एखादे सामान्य नाम उच्चारताच त्या पाठीमागच्या साऱ्या आठवणी आणि अनुभव जागे होऊन मुलाच्या मनश्चक्षूंपुढे एक प्रतीक उभे राहते. त्या शब्दाला जोडलेले एक भावविश्व त्याच्या मनात तरारून फुलते. परंतु आंधळ्या मुलांच्या बाबतीत ही प्रतीके पुष्कळदा अस्तित्वातच नसतात. असलीच तर ती धूसर सावलीत गढुळल्यासारखी असतात. ह्यामुळे शब्दापाठीमागचे भव्य असे अनुभवाचे विश्व अंध मुलांच्या संकुचित जीवनात कसे सामावणार? जे पूर्वी कधी अनुभवलेच नाही ते केवळ शब्दोच्चाराने मनात उमटणार कसे?

केवळ अंधत्वच नव्हे तर मूकबधिरत्व, शरीराचा एखादा अवयव निकामी होणे, महारोगासारख्या रोगाने व्याधिग्रस्त होणे, मनोदुर्बलता वा मतिमंदपणा असे अपंगत्वाचे अनेक प्रकार आहेत. भावनिक वा सामाजिक दृष्ट्या सामाजिक चौकटीत न बसणारी मुले हीसुद्धा अपंग मुलेच होत. ह्या ठिकाणी उणीव आणि अपंगत्व ह्यातील फरक लक्षात ठेवणे अगत्याचे आहे. कारण उणीव ही प्राथमिक स्वरूपाची असते तर अपंगता ही मुख्यतः सामाजिक चौकटीमुळे निर्माण होते. आनुवंशिकता, विकसनातील अपुरेपण, विविध अपघात ही अपंगत्वाची शारीरिक कारणे होत.

साहजिकच ह्या सर्व प्रकारच्या अपंगत्वावर मात करूनही अधिकाधिक अर्थपूर्ण व यशस्वी जीवन जगण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच अपंगांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न करणे. पुनर्वसन ही एक गतिशील संज्ञा आहे. अपंगाला आपल्या भोवतालच्या वातावरणात, घरात आणि व्यवसायात ठेवण्याचा किंवा तेथे परत पाठवण्याचा प्रयत्न म्हणजे पुनर्वसन. पुनर्वसन म्हणजे समाजात मानाने परत जाणे. अपंगत्व नजरेला आल्या दिवसापासून पुनर्वसनाची क्रिया चालू होते. त्यामध्ये वैद्यकीय सल्ला व उपचार, व्यक्तिकार्य, शरीरोपचार, व्यवसायोपचार, शिक्षण, अनुचिंतन ह्यांचा समावेश होतो. रोजच्या दैनंदिन जीवनातील हालचाली, अर्थार्जन आणि सामाजिक जीवन ह्यामध्ये जास्तीत जास्त भाग घेणे व त्यासाठी आवश्यक असणारे सुसंगत नियोजन करणे म्हणजेच पुनर्वसन.

पुनर्वसनाचा अगदी प्राथमिक भाग म्हणजे वैद्यकीय उपचार व वैद्यकीय पुनर्वसन

असलेल्या अपंगतेचे स्वरूप मर्यादित करणे, तिचे परिणाम संकुचित करणे, आणि समाजात मान ताठ ठेवून परत जाण्याइतकी शरीराची तयारी करवून घेणे हे ह्या प्रक्रियेतील मुख्य घटक. अर्थात व्यावसायिक घटकांचेही महत्त्व आहेच. परंतु त्यापूर्वी शरीराच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या अशा गोष्टींमध्ये यांत्रिक अवयवांचा समावेश होतो. आंधळे, मूक, बधिर, मनोदुर्बल ह्यांना पुनर्वसनासाठी श्रवणसाधने, ब्रेल पुस्तके, इत्यादी शरीरबाह्य अवजारांची गरज लागते.

एकेकाळी अपंगाने व्यावसायिक शिक्षण घेण्याची गरज आहे असे कोणालाच वाटत नसे. परंतु विकसनशील देशांत मानवी संपत्ती आणि श्रमशक्ती वाया घालवणे सुज्ञपणाचे होणार नाही, अशी जाणीव भारतात निर्माण होऊ लागली आहे. केवळ शरीराने अपंग आहेत म्हणून देशाची एक मोठी लोकसंख्या परिश्रमहीन आणि लाचार जीवनात गुंतवून ठेवायची हे केव्हाही योग्य नव्हे. अपंगता कोणत्या स्वरूपाची आहे ह्यापेक्षाही अपंगतेमुळे माणसाच्या मनोरचनेवर केवढा विकृत परिणाम होत आहे आणि त्यामुळे मानसिक आणि भावजीवन किती मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त होत आहे हे पाहणे जरुरीचे आहे. कारण अपंगत्वाचा परिणाम केवळ अपंगाच्या स्वतःच्याच जीवनावर होतो असे नव्हे तर त्याची अर्थोत्पादनशक्ती सीमित झाल्यामुळे समाजावरही नकळत होत असतो. व्यक्ती व समाज ह्यांचे समाधान आणि स्वास्थ्य परस्परांशी एवढे निगडित झालेले असते की, कल्याणकारी राज्यात अपंगांचे पुनर्वसन न झाल्यास सामाजिक कल्याण सर्वार्थाने साधले असे होणार नाही.

जीवनातील हेतू, आवडीनिवडी आणि ध्येय यांच्या पूर्तीसाठी प्रत्येक माणूस प्रयत्न करीत असतो. आपल्या जीवनाचे क्षितिज विस्तारण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. ह्या मार्गात जे शारीरिक, सामाजिक आणि मानसिक अडथळे येतात, अपंगता उद्भवतात, त्या दूर करून देशात असलेली श्रमशक्ती राष्ट्रीय विकासाच्या कामी राबविणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे. अपंगांजवळही जी बुद्धी, शरीरशक्ती आणि प्रवृत्ती आहे त्याची ओळख पटवून घेऊन अपंगांना अपंगतेवर मात करण्याची संधी देणे हे कर्तव्य जाणले पाहिजे. समाजाच्या अर्थार्जनाच्या कामी अपंगतेच्या चौकटीतील का होईना आपली शक्ती राबवावी असे अपंगांना वाटावे असे वातावरण समाजात निर्माण व्हावयास हवे. समाज व शासन दोघांनीही अपंगांना अपंगत्वावर विजय मिळविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य व मदत करायला हवी. अपंगांनाही शासनाने समान संधी दिली पाहिजे, त्यासाठी उपकारक उचित कार्यक्रम घेतला पाहिजे आणि तसे वातावरण निर्माण केले पाहिजे. त्यासाठी केवळ संस्था काढणे हे ध्येय न ठेवता संरक्षित कारखाने, संरक्षित शिक्षण व उत्पादन केंद्रे, प्रतिबंधक कारखाने, शिक्षणासाठी अनुदान इत्यादी द्वारा समान संधी देणे आवश्यक आहे. अपंगतेबरोबर येणारी सामाजिक व मानसिक अपंगता जर कमी करता आली, तद्विषयक समाजाचा व अपंगांचा दृष्टिकोण जर बदलता आला तरच अपंगतेविरुद्धची ही लढाई जिंकता येईल.

साहजिकच विविध प्रकारचे अपंगत्व आलेल्यांच्या शिक्षणाला ह्या पुनर्वसनात अतिशय महत्त्व प्राप्त होते. काही वेळा अपंगतेमुळे व शाळेतील वातावरणाशी समवाय न झाल्यामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक गरजांनुसार शिक्षणाचेच वळण बदलावे लागते तर काही वेळा तीव्र अपंगतेखातर शाळाच त्यांच्या घरापर्यंत न्यावी लागते. काहींवर त्यांच्या दुर्बलतेनुसार विशेष वैद्यकीय वा शैक्षणिक उपचार करावे लागतात. सामान्य शाळेच्या चौकटीत न बसणाऱ्यांसाठी वेगळ्या शाळा काढाव्या लागतात. अपंगांच्या शिक्षणाचे हे सारे प्रश्न अभ्यासून त्यांच्या शैक्षणिक प्रमेयांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करावा लागतो. अपंग मुलांच्या शिक्षणामध्ये शिक्षकाच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर मुलांची विभागणी वेगळ्या तऱ्हेने करावी लागते. वैद्यकीय आणि उपचारात्मक दृष्टीने पाहिले तर अपंगांच्या शिक्षणाचा वेगळा विचार व्हायला हवा. त्यासाठी मुलांचे वर्गीकरण वेगळ्या रीतीने करायला हवे. शारीरिक अपंगत्व असलेल्यांना इंद्रियजन्य अपंगत्व असलेल्यांपेक्षा वेगळे शिक्षण हवे. हे शिक्षण मुलांच्या गरजेनुसार आणि अशा मानसशास्त्रीय पद्धतीने दिले गेले पाहिजे की, मुलांच्या मनातील सारे गंड आणि विकृती झिजून जाव्या. समाजात अर्थार्जन करणारा स्वावलंबी घटक म्हणून त्यांना पुन्हा जगता यावे.

अपंग मुलांच्या बाबतीत शिकवणे किंवा ज्ञान देणे ह्यापेक्षाही ज्ञान मनात रुजवणे, आणि मन विकसित करणे ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. मुलाची मानसिक वाढ ही स्वशिक्षणाची प्रक्रिया आहे. प्रत्येक अवस्थेमध्ये मुलाच्या शिक्षणाचा केंद्रबिंदू बदलत जातो. इंद्रियजन्य हालचाली, भावना, जाणीव, विश्लेषणाची शक्ती आणि बऱ्यावाईटाचा विवेक अशी वाढ होत असते. प्रत्येक मुलाच्या विकासाचा वेग वेगवेगळा असतो. प्रत्येक अवस्थेत मूल चुका करून, धडपडून, परिस्थितीवर विजय मिळवून एकेक केंद्र हस्तगत करीत असते. सुरुवातीला आपल्या आवडीच्या हालचालीसाठी मूल अनावर उत्सुकता आणि विचित्र प्रीती दाखवीत असते. हळूहळू एकेक क्रिया आत्मसात करीत मूल त्या क्रियेवर बुद्धिजन्य ताबा मिळवते. त्यावर जर बाहेरून दडपण आले तर ही स्वशिक्षणाची क्रिया खुंटते. त्यासाठी वरवरच्या अनुभूतीच्या साचेबंद जखडपट्टीतून त्याला मोकळे केले पाहिजे. त्यासाठी मुक्त शिक्षणाची सोय केली पाहिजे. ' सा विद्या या विमुक्तये ' ह्या वचनाचा अर्थ ह्या दृष्टिकोणातून लावला पाहिजे.

साहजिकच त्यासाठी गरज असते ती अपंगांचे मानसशास्त्र समजावून घेण्याची. अपंगांच्या संपूर्ण मानसिक हालचालींचा विचार त्यांना शिक्षण देताना करावा लागतो. कारण अपंगता ही उत्कृष्ट बुद्धीचे वरदान असलेल्यांच्या बाबतीतही असू शकते. त्या मुलांनाही इतरांच्याच चौकटीत मापणे म्हणजे त्यांच्यावर अधिकच अपंगत्व लादण्यासारखे आहे. ह्यासाठी मुलांच्या बौद्धिक कुवतीचे मापन करण्याची आवश्यकता असते.

अपंग मुलांबाबतचा दृष्टिकोण त्यांचे जीवनशिल्प घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे त्याचाही अभ्यास करणे अगत्याचे आहे. परंतु त्यापेक्षाही

महत्त्वाचा भाग म्हणजे शरीररचना व मनोरचना ह्यांचा अपंगतेच्या संदर्भात परस्परांशी काय संबंध आहे हे शोधून काढणे. ह्याबाबत काही महत्त्वाची तत्त्वे अशी : (१) अपंग मुलांच्या शरीररचनेचा मनोरचनेशी प्रत्यक्षतः संबंध नसतो. केवळ अपंग आहे म्हणून मुलांच्या मनात विकृती आहे किंवा शरीराने चांगला आहे म्हणून त्याचा व्यक्तिविकास उत्तम झाला आहे असे मानणे चुकीचे होईल. (२) एकेकाळी अशी एक समजूत होती की शरीररचनेनुसार माणसाचे व्यक्तिमत्त्व आणि मनोरचना बदलत जाते. त्याच्या शारीररसायनानुसार माणसाच्या वागण्यात फरक होऊ शकतो हे मानायला हवे. (३) माणसाचे वागणे आणि शरीररचना हे घटक केवळ परस्परांवर अवलंबून नसून त्यांच्यावर इतरही शारीरिक आणि सामाजिक घटकांचा परिणाम होत असतो. (४) माणसाची वर्तणूक म्हणजे माणूस आणि भोवतालचे वातावरण यामधील परस्परावलंबी संबंधांचे आणि परिणामांचे प्रकटीकरण होय.

ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल की, इतर मुलांच्या मानाने अपंग मुलांच्यामध्ये सामाजिक कारणामुळे वारंवार आणि अधिक तीव्र असे भावनिक संघर्ष निर्माण होत असतात. मुलांच्या मनाचा गोफ चित्रविचित्र भावना, प्रवृत्ती आणि गुणविशेष ह्यांनी विणलेला असतो. मुलांचे संगोपन ही केवळ सामाजिक नव्हे तर आध्यात्मिक जबाबदारी आहे. म्हणूनच आईबापांनी मुलांच्या मनावर मायेचे पांघरूण घालून त्यांना जपले पाहिजे. अपंग मुलांच्या बाबतीत ही गरज अधिकच मोठी आहे. कारण त्या मुलांना अधिक काळ परावलंबी राहावे लागते. अपंगत्वावर विजय मिळविण्याकरता प्रथम स्वतः-शीच आणि नंतर सभोतालच्या परिस्थितीशी झुंज घ्यावी लागते. स्वतःच्या मनातील हीनगंड, राग, विकार-तांडव, भीती इत्यादी सारे तण आणि कुसळे काढून मगच मनामध्ये नव्या जीवनाचे बीज पेरावे लागते. विरुद्ध परिस्थितीशी झगडून वर येणारा अंकुर जगवावा लागतो. ह्यासाठी त्याला अपरंपार धैर्य, अमाप श्रद्धा असावी लागते. ती असेल तरच अपंगत्वावरचा विजय हे स्वप्न उरत नाही तर रोखठोक वास्तवता बनते.

अपंग मुलांच्यामध्ये उत्पादन घटक बनण्याची शक्ती आहे. पण ही शक्ती व्यक्तिकार्याने जागृत करायला हवी. त्यांचे व्यक्तिमत्त्व हळूहळू फुलवावयाला हवे. त्यासाठी अपंगतेचे दुःख समजावून घेतले पाहिजे. दुःखाची संवेदना कशी असते हे जाणण्यासाठी स्वतः अपंग व्हायला नको. परंतु दुसऱ्याच्या मनातील वेदना आपल्या मनावर उमटायला हव्यात, ह्यासाठी करुणा नको, प्रेम हवे आहे. हा प्रेममंत्र जर आम्हाला घेता आला, साऱ्या दुःखितांशी समरस होता आले, त्यांच्या सुखासाठी एक क्षण खर्चता आला तरी समाजसेवेच्या तंत्रज्ञाला आध्यात्मिक पाठबळ मिळते. कारण समाजसेवा हे केवळ तांत्रिक आणि भौतिक नव्हे तर आध्यात्मिक अधिकारपत्र आहे.

महाराष्ट्रातील मुद्रणव्यवसाय

बापुराव नाईक

हिंदुस्थानात मुद्रणाची सुरुवात

१. हिंदुस्थानात मुद्रणास सुरुवात झाली ती इ. स. १५५६ मध्ये. खिस्त धर्मविषयक वाङ्मय मुद्रित करण्यासाठी ॲबिसीनियातील खिस्ती धर्मोपदेशकांच्या खास मागणीवरून पोर्तुगालमधून एक छापखाना पाठविण्यात आला होता. तो घेऊन येणारे जहाज गोव्याच्या किनाऱ्यास लागले, आणि तिथे तो छापखाना उतरविण्यात आला. हिंदुस्थानातील पहिला छापखाना सुरू करण्याचा मान गोव्यास मिळाला. छापखान्यातील मुद्रक होता ज्युआंव द बुस्तामान्ति (१५३६-८८). या छापखान्यात छापलेले पुस्तक *Conclusoes* हे हिंदुस्थानातील पहिले मुद्रण होय. युरोपात मुद्रणकलेचा जन्म १४५६ मध्ये झाला. त्यानंतर बरोबर शंभर वर्षांनी मुद्रणकलेचे हिंदुस्थानात आगमन झाले. असे असले तरी एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत इथे मुद्रणकलेची फारशी वाढ होऊ शकली नाही. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे एतद्देशीय भाषांमध्ये मुद्रण करण्यास आवश्यक अशी मुद्राक्षरे तयार करणे सोपे नव्हते. गोव्यात स्थापन झालेल्या मुद्रणालयामध्ये फादर स्टीफन्स याचे *खिस्त-पुराण* हे मराठी भाषेतील पहिले पुस्तक १६१६ मध्ये मुद्रित झाले. ते रोमन लिपीमध्ये होते. खिस्त-पुराण मराठीमध्येच छापण्याची फादर स्टीफन्सची इच्छा होती. पण त्यासाठी लागणारी सुमारे ६०० मुद्राक्षरे तयार करण्याचे काम अतिशय कठीण असल्यामुळे, त्याला हा ग्रंथ रोमन लिपीमध्येच मुद्रित करणे भाग पडले. याच कारणामुळे, मराठीच काय परंतु संस्कृत, हिंदी, बंगाली, गुजराती, गुरुमुखी, आसामी यांसारख्या देवनागरी आणि तत्सदृश लिप्यांमधून लिहिल्या जाणाऱ्या भाषांतील मुद्रणास इथे तेव्हा सुरुवातही झाली नाही. एतद्देशीय भाषांतील मुद्रणाचा अग्रमान तत्पूर्वीच तामीळ भाषेला मिळाला होता.

Doctrina Christiana...ē lingoa Tamul & Portugues ह्या १५५४ मध्ये लिस्बनला छापलेल्या पुस्तकात तामीळ मजकूर लॅटिन टाइपांत छापला होता.[१] ज्युआंव गाँसालविस (जन्म १५२५) या स्पॅनिश कारागिराने गोव्यात (१५७७) आणि नंतर फारियाने क्विलॉनला (१५७८) तामीळ टाइप पाडले. त्या ' मलबार ' टाइपात इ. स. १५७८ मध्ये क्विलॉनला *दौत्रिना ख्रिस्तां* हे सोळा पानी पुस्तक मुद्रित झाले. हे हिंदवी भाषेतील टाइपांत छापलेले पहिले उपलब्ध पुस्तक. इ. स. १५५६ पासून १६७४ पर्यंत गोव्यात अनेक पुस्तके छापून निघाली. ती रोमन लिपीत होती. ॲमस्टरडॅम येथे १६७८ मध्ये मुद्रित झालेल्या *Hortus Indicus Malabaricus* या पुस्तकात कोकणी भाषेत व देवनागरी लिपीत अकरा ओळी मजकूर ताम्रपट-मुद्रण पद्धतीने छापला आहे. देशी भाषांतून ख्रिस्ती धर्मवाङ्मय मुद्रित करावे आणि त्याचा प्रसार इथे करावा असे धर्मोपदेशकांस वाटणे स्वाभाविक होते. परंतु राज्यकर्त्यांची दृष्टी वेगळी होती. त्याचा परिणाम होऊन १६८४ मध्ये पोर्तुगीजांनी एक ठराव केला. त्या अन्वये देशी भाषांच्या व्यवहारावर बंदी घातली गेली. आणि त्यामुळे मराठीतून मुद्रण सुरू होण्याचा जो इष्ट असा संभव निर्माण झाला होता तो मात्र लांबणीवर पडला.

सर चार्लस विल्किन्स यांची कामगिरी

२. मराठी भाषेतील आणि बालबोध लिपीतील पहिले मुद्रित पुस्तक छापण्यात आले ते श्रीरामपूरला डॉ. कॅरे (१७६१–१८३४) यांनी सुरू केलेल्या ' श्रीरामपूर मिशन प्रेस '-मध्ये. हे पुस्तक छापण्यासाठी डॉ. कॅरे यांनी विल्किन्स्‌चा शिष्य पंचानन कर्मकार यांच्या मदतीने मराठी मुद्राक्षरे पाडली. त्यांचे वळण फारसे चांगले उतरलेले नाही. शिवाय कॅरेचे भाषांतरही नागपुरी बोलीमध्ये असल्यामुळे लोकप्रिय होऊ शकले नाही. तत्पूर्वी बंगाल्यात सर विल्किन्स (१७४९–१८३६) याने तयार केलेल्या बंगाली मुद्राक्षरांचा उपयोग हॉल्हेडच्या *बंगाली व्याकरणात* करण्यात आला होता. विल्किन्सच्या देवनागरी

---

1. "It should be noted that the first known printing in the Tamil language is to be found in a Doctrina Christiana, *Cartilha que contẽ breuemẽte ho q todo christão deue aprẽder pera sua saluaçam... ẽ lingoa Tamul and Portugues,* printed in Lisbon in 1554. In this work, however, the Tamil is transliterated by Latin characters."

George Schurhammer and G. W. Cottrell "The First Printing in Indic characters." *Harvard Library Bulletin Vol. VI No. 2,* Spring 1952, foot-note 22, page 151.

मुद्राक्षरांची निर्मिती जरी हिंदुस्थानात झाली होती, तरी त्या टाइपांत पहिले पुस्तक छापण्याचा मान मात्र हिंदुस्थानातील छापखान्यास मिळू शकला नाही. त्यात छापलेले विल्किन्सचे *संस्कृत ग्रामर* हे पुस्तक १८०८ मध्ये इंग्लंडमध्ये बल्मरने प्रसिद्ध केले. विल्किन्स्चा टाइप हिंदुस्थानात प्रथम तंजावरास राजे सर्फोजी भोसले यांनी स्थापन केलेल्या दरबारी मुद्रणालयात आणण्यात आला. १८०८–९ च्या सुमारास या छापखान्यात *बालबोध मुक्तावली* हे पुस्तक छापण्यात आले. त्याची प्रत अलीकडे ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयात माझ्या पाहण्यात आली. ही प्रत सर अलेक्झांडर जॉन्स्टन यांना खुद्द राजाने १८१७ मध्ये भेट दिली होती. सर अलेकनी ती १८२१ मध्ये ब्रिटिश म्यूझियमला नजर केली. पुस्तकात एक पत्र ठेवले आहे. त्यात सर अलेक् सांगतात :

> "*The work was printed in the Raja's palace by his own printers who are all Brahmins. The wood cuts were made, the paper was manufactured and the book itself was bound in the palace.*" (30-7-1821)

युरोपखंडात मुद्रणकलेचा प्रसार आणि देवनागरी मुद्रण

३. जॉन गटेनबर्गने १४५६ मध्ये **बेचाळीस ओळींचे बायबल** छापून पूर्ण केले. त्यानंतरच्या पंचवीस-तीस वर्षांत युरोपात मुद्रणकलेचा सर्वत्र प्रसार झाला. रोमजवळ, स्वीनहॅम आणि पॅनार्टझ यांनी १४६५ मध्ये रोमन लिपीत लॅटीनमध्ये मुद्रणास सुरुवात केली. व्हेनिस येथे निकोलस जेन्सन (१४००-८१) आणि अल्डस मॅन्युशियस (१४५०-१५१५) यांनी अक्षरमुद्रणाचा भक्कम पाया घातला. अल्डसने १५०१ मध्ये इटालियन टाइपास जन्म दिला. त्यात तेव्हा अडुसष्ट जोड-अक्षरे होती. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात या प्रकारच्या इटॅलिक टाइपात संपूर्ण पुस्तके छापली जात असत. याच काळात प्रसिद्धीस आलेल्या पॅरीसच्या क्लॉड गॅरेभांटने रोमन आणि इटालियन टाइपांचा एकत्र वापर प्रचारात आणला. रॉबर्ट ग्रॅन्जॉन हा पॅरीसचा प्रसिद्ध पंचीगार १५७८ मध्ये पोप ग्रेगरी तेरावा, यांच्या आमंत्रणावरून रोमला गेला, तेथे त्याने अनेक 'ओरिएन्टल टाइप' तयार केले असा उल्लेख सापडतो. त्यात देवनागरी टाइप होते किंवा कसे ते आज ज्ञात नाही. ग्रॅन्जॉनचा समकालीन प्लॅन्टीन याने फ्रान्समध्ये अनेक ग्रंथ छापले. :त्यातील *Polyglot Bible* (१५६८-७२) हे पुस्तक मुद्राक्षर कलेचा उत्तम नमुना म्हणून प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकात ख्रिस्तोफर व्हॅन डायक या डच पंचीगाराने गॅरेमांट व ग्रॅन्जॉनच्या रोमन टाइपावरून सुंदर मुद्राक्षरे पाडली. आठराव्या शतकाच्या सुरुवातीस (१७२०) जर्मनीत लायप्झीगच्या एरहार्ड टाइप फौंडरीमध्ये युरोपमधील उत्तमोत्तम टाइप पाडले जात. याच काळात फोर्नियर (१७१२–६८) आणि बोदोनी (१७४०–१८१३) यांनी, आज ज्याला आपण मॉडर्न टाइप म्हणतो, ते टाइप प्रचारात आणले. इंग्लंडमध्ये विल्यम कॅस्लॉनने १७२०

ते १७२६ या काळात 'ओल्डफेस टाइप' पाडला आणि बास्करव्हीलेने ट्रॅन्झीशीनल म्हणून ओळखला जाणारा एकमेव रोमन टाइप १७६१ मध्ये प्रचारात आणला. वर उल्लेखिलेल्या, गैम बॅप्टिस्ता बोदोनी याने देवनागरी टाइप पाडला होता. त्याचा नमुना तत्कालीन कॅटलॉगमध्ये पाहावयास मिळतो. *Davidis Millii Dissertatioaes* या १७४३ मध्ये रोमला छापलेल्या पुस्तकात देवनागरी टाइप वापरलेला आहे. देवनागरी टाइपातील *Alphabetum Brammhanicum Seu Indostanum* (हिंदी व्याकरण) हे लॅटीनमधील पहिले उपलब्ध पुस्तक याच टाइपात रोममध्ये १७७१ मध्ये छापले आहे.

मुद्रणकलेच्या प्रसाराबाबत आमची अनास्था

४. वरील माहितीवरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे १४५० पासून १७५० पर्यंतचा सुमारे तीनशे वर्षांचा काळ हा उत्तमोत्तम मुद्राक्षरे पाडण्याचा काळ होता. ग्रंथमुद्रणाचा इतिहास हा मुद्रणालयांच्या विकासाचाच नव्हे, तर मुद्राक्षरनिर्मितीचाही इतिहास आहे. अशा प्रकारे, युरोपमध्ये मुद्रणकलेची प्रगती होत असताना हिंदुस्थानात मात्र त्याचा मागमूसही दिसत नाही. या बाबतीतील आमच्या अनास्थेवर कै. वि. का. राजवाडे यांनी टीका केली आहे.

> " मराठ्यांच्या संस्कृतीत प्रथम व्यंग म्हटले म्हणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती, व ती माहीत करून घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्नही केला नाही...
>
> " मुंबईतील प्रभू, शेणवाई, पारशी, भाटे व वाळकेश्वरचे छत्रे, भातखंडे वगैरे ब्राह्मण पुजारी व बैरागी, इंग्लिश लोकांशी हरहमेश दळणवळण ठेवीत. कित्येकांना इंग्रजी चांगले लिहिता व बोलता येत असे. त्यांनी छापील पुस्तके पाहिली होती, यात संशय नाही. नाना फडणिसांच्या दप्तरात छापील इंग्रजी नकाशे अद्यापही आहेत. मोरोबादादाच्या घरच्या पुस्तकालयात एक इंग्रजी चोपडी होती, असे त्यांच्या पुस्तकांच्या यादीवरून कळते. असे असून, म्हणजे युरोपातील सर्व देशचे लोक त्यांच्या दारी उभे असून, मराठ्यांनी छापण्याची कला कशी घेतली नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यात योग्य कल्पनांचे बी पेरण्यास ह्या कलेचाच प्रवेश महाराष्ट्रात झाला पाहिजे होता. घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, कोल्हापूरकर, सावंत, आंग्रे वगैरे सरदारांच्या पदरी फिरंगी, फराशिस, इंग्रज वगैरे बरेच देशचे लोक पेशवाई जाईतोपर्यंत व पुढे देखील होते; असे असून ज्या अर्थी मराठ्यांनी ही कला उचलली नाही, त्याअर्थी त्यांच्या ग्राहकशक्तीच्या कीर्तीला बराच कमीपणा येतो हे निर्विवाद आहे. "[२]

---

२. राजवाडे वि. का., *मराठ्यांच्या इतिहासाची साधने*, भाग १ ला, पान १००.

५. राजवाड्यांची ही टीका जरी खरी असली, तरी हिंदुस्थानात मुद्रणालयांची बाढ होण्यास मुद्राक्षर-निर्मितीची जी सुविधा निर्माण व्हावयास पाहिजे होती, ती झाली नाही, ही खरी अडचण होती. पुढे जी देवनागरी वा अन्य भाषांच्या मुद्रणास योग्य अशी मुद्राक्षरे उपलब्ध झाली, ती इंग्लिश, डच, जर्मन आणि इटालियन मुद्रणतज्ज्ञांमुळे. प्रथम धार्मिक ग्रंथ छापण्यासाठी युरोपमध्ये मुद्रणकलेचा विकास झाला. आपल्याकडेही धार्मिक ग्रंथ छापण्यासाठी मुद्रणालये निघाली. पण ते ग्रंथ खिस्ती धर्मियांचे होते. त्यानंतरच आमचे लक्ष मुद्रणकलेकडे वळले.

मुंबईतील मुद्रणकलेची सुरुवात

६. मुंबईतील एक गुजराथी कपोल बनिया भिमजी पारेख यांनी 'ब्राह्मणी' ग्रंथांच्या (Ancient Braminy writings) मुद्रणासाठी एक छापखाना स्थापन करण्याच्या बाबतीत १६७१ ते १६७६ च्या दरम्यान जो प्रयत्न केला त्याची नोंद शिवकालीन पत्रव्यवहारात सापडते.[3] यापैकी ८ मार्च १६७७ च्या पत्रातील उल्लेख महत्त्वाचा आहे.

> "*We should gladly hear that Bingees design about the printing do take effect, that it may be a means to propagate our religion whereby souls may be gained as well as Estates.*"

भिमजीच्या मनात गुजराथी (Banian Character) मुद्राक्षरे तयार करण्याचा विचार होता. त्याच्या छापखान्यात काम करावयास आलेल्या इंग्रजी तंत्रज्ञाला मुद्राक्षरे तयार करता येत नव्हती. परंतु १६७४-७५ मध्ये सुरू झालेला पश्चिम महाराष्ट्रातील हा पहिला छापखाना होता, ही गोष्ट स्पष्ट आहे. कॅरे यांनी १८०५ मध्ये प्रसिद्ध केलेले '*मॅथ्यूज गॉस्पेल इन् महराटा*' हे मराठीतील पहिले मुद्रित पुस्तक. कॅरेने पंचानन कर्मकाराच्या मदतीने मुळात संस्कृतसाठी १८०३ च्या दरम्यान तयार केलेला देवनागरी टाइप या पुस्तकासाठी वापरलेला आहे. तत्पूर्वी कलकत्त्यास १७९६ मध्ये छापलेल्या ग्रीलखाईझच्या '*ग्रामर ऑफ दि हिंदुस्थानी लँग्वेज*' या पुस्तकात देवनागरी टाइप वापरलेला होता.

७. मुंबई शहरात इ. स. १७७९ मध्ये मुद्रण होत होते, असा स्पष्ट उल्लेख सापडतो. दोन रुपये किंमत असलेले 'कॅलेंडर फॉर दि इयर ऑफ अवर लॉर्ड १७८०' हे बत्तीस पानांचे पुस्तक रुस्तुम कोरेसजी यांनी मुद्रित केले होते. '*बॉम्बे हेराल्ड*' हे नियतकालिक १७८९ मध्ये सुरू झाले, असे *बॉंबे सिटी गॅझिटियर*मध्ये म्हटले आहे. परंतु त्याची प्रत किंवा इतर पुरावा श्री. प्रियोळकरांना शोध करूनही सापडला नाही. *बॉम्बे*

3. *English Records on Shivaji,* Vol. I, (Doc. 153). 9 January 1671 p. 187 (Doc. 450) 3 April 1674, p. 327, Vol. II (Doc. 148), 8 March 1676 p. 83.

ग्याझेट १७९० मध्ये मॅक्लीनने सुरू केले. *बाँबे कुरियर* नियतकालिक यानंतर (१७९२) सुरू झाले. त्याचे दुसऱ्या वर्षाचे अंक उपलब्ध आहेत. मुंबईत छापलेले '*रिमार्क्स अँड ऑकरन्सेस ऑफ मि. हेन्री बिचर*' हे पहिले पुस्तक उपलब्ध आहे. परंतु त्यावर मुद्रणालयाचा उल्लेख नाही. क्युरिअर प्रेसमध्ये जीजीभाई छापगार याने तयार केलेल्या गुजराथी मुद्राक्षरातील एक जाहिरात १९ जानेवारी १७९७ च्या अंकात छापलेली आहे. जीजीभाई छापगारांच्या उत्तेजनाने फर्दुंजी मर्झबान (१७८७–१८४७) या पारशी गृहस्थाने १८१२ मध्ये गुजराथी छापखाना सुरू केला. या छापखान्यातून *दाबेस्थान* (१८१५), *खोर्दे अवेस्ता* (१८१७) ही पुस्तके छापून निघाली, आणि १ जुलै १८२२ पासून '*मुंबई समाचार*' साप्ताहिक निघू लागले.

८. डॉ. कॅरेने आपल्या मराठी व्याकरणाच्या पहिल्या आवृत्तीला (१८०५) जी प्रस्तावना लिहिली आहे, त्यात मराठी पुस्तके बहुधा देवनागरी लिपीत लिहिली जात असे म्हटले आहे. परंतु व्यवहारात मोडीचे प्राबल्य होते. तरी कॅरेचे व्याकरण देवनागरीत छापण्याचे कारण मोडी टाइप त्याला बंगालमध्ये उपलब्ध झाला नव्हता असे त्याने दिले आहे. त्यावरून अशी समजूत होते की, महाराष्ट्रामध्ये तेव्हा मोडी लिपीमध्ये छपाई होत असे. *कुरिअर*च्या १७ जुलै १८०२ च्या अंकामध्ये प्रसिद्ध झालेली मराठी जाहिरात मोडीमध्ये छापली आहे. ड्रमांडच्या '*इलस्ट्रेशन्स् ऑफ दि ग्रॅमॅटिकल पार्ट्स ऑफ दि गुजराती, मराठी अँड इंग्लिश लँग्वेजेस*' या पुस्तकात वरील मोडी टाइपच वापरले आहेत. प्रस्तावनेत इकडच्या भागातील अगदी अल्पसंख्याकांनाच नागरी किंवा बालबोध समजते असे ड्रमांड म्हणतो. पण ते खरे नसावे. बाँबे एज्युकेशन सोसायटीने १८२५–२६ च्या दरम्यान मुद्रित पुस्तकासाठी देवनागरीचा स्वीकार केला. तेव्हापासून मराठीमध्ये मुद्रण करण्यासाठी देवनागरी टाइपाचा उपयोग निश्चित झाला आणि मुद्रण व्यवसायास जरूर ते मार्गदर्शन झाले. सुरुवातीस गुजराथीसुद्धा देवनागरी किंवा शास्त्री लिपीत छापण्याची प्रथा होती. परंतु नंतर गुजराथी किंवा महाजनी लिपीने जोर केला. मोडी मात्र मागे पडली ती पडलीच. सुरुवातीच्या काळात मुद्रणकलेचा उपयोग फक्त धार्मिक पुस्तके छापण्यासाठीच होई. परंतु नंतरच्या काळात वृत्तपत्रांसाठी छापखाने निघाले. त्यात *मुंबई समाचार* या गुजराथी वृत्तपत्राचा समावेश होतो. याशिवाय या छापखान्यांचा उपयोग शासकीय आणि राजकीय कामासाठी होई.

मुद्रण उद्योगात महाराष्ट्राचे उशिरा पदार्पण

९. कुरियर छापखाना हा मुख्यतः नियतकालिकासाठी स्थापन करण्यात आला होता. तरी मराठीतील काही सात सुरुवातीची मुद्रित पुस्तके तेथे छापण्यात आली होती. अमेरिकन मिशन प्रेस स्थापन झाल्यावर मराठी मुद्रणाची चांगली सोय झाली. महाराष्ट्रातील ग्रंथमुद्रण आणि प्रकाशन या व्यवसायाची खाजगी क्षेत्रातील सुरुवात अमेरिकन मिशन प्रेसच्या स्थापनेपासून झाली असे निश्चितपणे म्हणता येते. तत्पूर्वीचा ग्रंथमुद्रणाचा

महाराष्ट्रातील प्रयत्न म्हणजे नाना फडणिसांनी प्रवृत्त केलेला गीता-मुद्रणाचा उद्योग. तांब्याच्या पत्र्यावर उभार अक्षरे जोडून तयार केलेल्या तक्त्यांनी समग्र गीता १८०५ मध्ये मुद्रित करण्यात आली. यात एवढा खटाटोप होता की, तो प्रयत्न तिथेच बंद पडला. १८००च्या सुमारास कलकत्त्यास आणि जवळच्या, डचांच्या अखत्यारातील, श्रीरामपूर येथे देवनागरी मुद्रण सुरू झाले होते. तत्पूर्वी अडीचशे वर्षे गोव्यास छापखाना सुरू होऊन रोमन आणि मलबार (तामीळ) हे टाइप पाडले होते. मलबार लिपीत मुद्रण सुरू (१५७८) होऊन सव्वादोनशे वर्षे झाली होती. कलकत्त्यास देवनागरीतील मुद्रणास सुरुवात होण्यापूर्वी पन्नास वर्षे अगोदर (१७४३) रोमला देवनागरी टाइप तयार करण्यात आले होते. त्यात काही मजकूरही छापला गेला होता. ज्या वेळी महाराष्ट्रात तांब्याच्या पत्र्यावरून गीता मुद्रणाचा प्रयोग होत होता त्याच वेळी कलकत्त्यात विल्यम कॅरे मराठी बायबल नव्याने तयार केलेल्या देवनागरी टाइपावरून छापीत होता. त्याचे मराठी व्याकरण (१८०५) तेव्हा छापत होते. परंतु महाराष्ट्रात मात्र व्यवस्थित पायावर मुद्रण उद्योग सुरू व्हायला १८१८ साल उजाडावे लागले. शिवकाळातील भिमजी पारिखांचा देशी भाषांतील ‘ब्राह्मणी ग्रंथांच्या’ मुद्रणाचा प्रयत्न असफल झाला होता. त्याचप्रमाणे पेशवाईच्या अखेरीस गीता मुद्रणाने सुरू झालेला धार्मिक ग्रंथ मुद्रणाचा प्रयत्नही सुरुवातीसच खुंटला होता.

१०. अगदी सुरुवातीच्या काळामध्ये मिशनरी लोकांनी काढलेल्या छापखान्याव्यतिरिक्त जे छापखाने निघाले ते प्रामुख्याने वृत्तपत्रे छापण्यासाठी होते. कुरिअर या इंग्रजी वृत्तपत्राप्रमाणेच *जामे जमशेद, मुंबई समाचार* ही गुजराती वृत्तपत्रे छापण्यासाठी छापखाने स्थापण्यात आले. मुख्यतः वृत्तपत्रमुद्रण आणि तुरळक ग्रंथमुद्रण ही या छापखान्याच्या कामाची व्याप्ती होती. इंग्रजी वृत्तपत्रे सुरुवातीपासूनच अक्षरमुद्रण पद्धतीने छापली जात होती. मराठी ग्रंथमुद्रणासाठी मात्र प्रामुख्याने शिळा मुद्रणाचा उपयोग होत होता. विल्किन्सचा टाईप हिंदुस्थानात सुमारे १८०८-९ पासून उपलब्ध झाला आणि तंजावरी मराठी ग्रंथ अक्षरमुद्रण पद्धतीने छापण्यात आले. तरी खुद्द महाराष्ट्रात पुष्कळ काळपर्यंत बहुसंख्य ग्रंथ शिळामुद्रण पद्धतीनेच छापले जात. उत्तम उत्तम हस्तलेखनकलाकार या कामासाठी लावले जात. त्यांनी लिहिलेल्या मजकुरावरून केलेले मुद्रण आजही मराठीतील उपलब्ध मुद्राक्षरांशी तुलना करता सुंदर वाटते.

अमेरिकन मिशनऱ्यांची कामगिरी

११. महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसायास खरी सुरुवात झाली ती अमेरिकन मिशनऱ्यांनी स्थापन केलेल्या मुद्रणालयापासून. अमेरिकन मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारास मुंबईत १८१३ मध्ये सुरुवात झाली. त्यानंतर १८१६ च्या अखेरीस किंवा १८१७ च्या सुरुवातीस त्यांचा छापखाना निघाला. सुरुवातीस फक्त एक लाकडी हँडप्रेस होता आणि एक मराठी फौंट कलकत्त्याहून मागविला होता. पुढे १८२५ मध्ये नवीन फौंट

मागविण्यात आला. प्रेसमधील लोहार खात्यात काम करणारा एक हिंदी ख्रिस्ती मुलगा टॉमस ग्रॅहॅम याची हुषारी पाहून ग्रिव्हजने त्याला मराठी पंच करण्यास प्रवृत्त केले. ते १८३१-३२ च्या दरम्यान तयार झाले. ग्रिव्हजने मेट्रिसी करण्यासाठी हे पंच अमेरिकेस नेले होते. परंतु गंजून ते निकामी झाले. १८३५ मध्ये वेबस्टरने पंच आणि मेट्रिसी बनविण्याची हत्यारे आणल्यावर टॉमस ग्रॅहॅमने सर्व पंच नव्याने तयार केले आणि वेबस्टरने त्यावरून मातृका आणि साचे (Mould) बनविले. ग्रॅहॅमच्या टाइपात छापलेले पहिले पुस्तक १८३६ मध्ये प्रसिद्ध झाले. १८५४ मध्ये मिशन छापखान्यात सात हँडप्रेस, एक शिळा प्रेस, आणि इंग्लिशशिवाय सात बालबोध, एक मोडी, तीन गुजराथी, दोन हिंदी आणि एक झेंद असे मातृकांचे संच होते. १२५ माणसे नोकरीस होती. १८५२ पूर्वीच्या आठ वर्षांत तेरा हजार रुपये नफा झाला होता. या छापखान्यात तेरा कोटी साठ लक्ष पाने छापली होती, अशी श्री. प्रियोळकरांची नोंद आहे. मिशन प्रेसमध्ये छापलेले पहिले उपलब्ध पुस्तक *इंग्लिश भाषेचे ज्ञान मिळविण्यासाठी शीघ्र आणि सोपा उपाय* हे १८१८ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यापासून १८५८ पर्यंत छापलेल्या मराठी पुस्तकांपैकी ८० पुस्तके आज ग्रंथालयांतून उपलब्ध आहेत. १८४५ पासून टॉमस ग्रॅहॅमचे नाव मुद्रक म्हणून येऊ लागले. त्यालाच हा छापखाना १८५५ मध्ये एक भाग आणि १८५८ मध्ये दुसरा भाग असा विकून टाकण्यात आला. टॉमस ग्रॅहॅमच्या छापखान्यात १८५६ पासून १८६० पर्यंत तेवीस मराठी पुस्तके छापलेली उपलब्ध आहेत. पुढील काळामध्ये मुद्रण क्षेत्रामध्ये ज्यांनी कामगिरी बजावली ते जावजी दादाजी, या अमेरिकन मिशन छापखान्यातच शिकून तयार झाले होते.

बॉम्बे एज्युकेशन सोसायटी आणि सरकारी छापखाना

१२. मुंबई प्रांतामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने १८१५ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. या सोसायटीचा सुरुवातीचा उद्देश गोऱ्या सोजिरांपासून हिंदी स्त्रियांना झालेल्या संततीचे शिक्षण हा होता. संस्थेच्या सहाव्या वार्षिक अहवालात खालील उल्लेख आहे :

> "*One of the first objects therefore towards improving the Education of the natives must be the preparing and publishing some unexceptionable school tracts in the native language. These Languages will be for the most part the Mahratta and Guzerattee.*" [4]

त्याच वर्षी १८२० मध्ये 'नेटिव स्कूल अँड स्कूल बुक कमिटी'ची स्थापना

---

4 Sixth Annual Report, (1821) See *Printing Press in India*, p. 88,

करण्यात आली. त्या वेळी मुलांच्या शिक्षणास योग्य अशी पुस्तके नव्हती. म्हणून सोसायटीने ती तयार करून घेण्याचे ठरविले. पुढील वर्षापर्यंत मुळाक्षरांचा तक्ता, लहान वाक्यांचा संग्रह आणि गोष्टींचे एक पुस्तक इतकेच साहित्य प्रसिद्ध झाले. '*पंचोपाख्यान*' छापण्याचे ठरले तेव्हा त्यासाठी इंग्लंडहून नवीन फौंट आणण्यात आला. हे पुस्तक कुरियर छापखान्यातून १८२२ मध्ये बाहेर पडले. पुढील वर्षी *विदुरनीति* प्रसिद्ध झाली. या पुस्तकांची किंमत अनुक्रमे युरोपीयनास रु. ८ व रु. ६ आणि नेटीवास रु. ३ व रु. २ अशी होती. *सिंहासनबत्तिशी* १८२४ मध्ये निघाली.

१३. मुद्रणव्यवसायास आवश्यक अशा मराठी टाइपाची टंचाई सोसायटीचा कार्यवाह जॉर्ज जर्विस याच्या लक्षात आली होती. त्याने ४ आक्टोबर १८२३ ला सरकारात विनंती केली की,

> "*The Society deems it a great object to obtain a larger supply of Mahratha types and a new fount of Guzerathee; the latter to be executed like the new Balbodh; drawings of the letters might be sent home. They might afterwards be disposed of on moderate terms to the native presses, as the words could be most conveniently printed. The Society would solicit moreover lithographic press*"[5]

यापैकी नवीन टाइप करणे लांबणीवर पडले. परंतु लिथोग्राफिक प्रेस मात्र स्थापण्याचे ठरले. त्याप्रमाणे प्रत्यक्षात सहा शिळायंत्रे आणण्यात आली. कुरिअर प्रेसमध्ये त्या वेळी सरकारी कामे होत. ती या छापखान्यात करावीत आणि काम नसेल तेव्हा बाहेरचे काम घ्यावे, शिवाय 'स्कूल बुक सोसायटी'चे काम फुकट करून द्यावे, असा बेत होता. हा मुंबईचा सरकारी छापखाना १८२४ मध्ये सुरू झाला.

१४. सरकारने उदारपणे सोसायटीचे काम फुकट छापण्याची व्यवस्था केली होती. तरी प्रत्यक्षात सरकारी छापखान्यावर अन्य कामाचा भार असल्यामुळे सोसायटीचे काम तुंबून राहिले. त्यावर उपाय म्हणून सरकारने सोसायटीला चार शिळायंत्रे आणवून दिली. टाइपांचे दोन फौंट कलकत्त्याहून मागविले. शिवाय इंग्लंडहून इंग्रजी आणि बालबोध टाइपांचे फौंट आणि हँडप्रेस मागविले. पुढील वर्षापासून सोसायटीचा प्रेस सुरू झाला. याशिवाय तीन शिळायंत्रे इथेच तयार करण्याची व्यवस्था झाली. १८२९ मध्ये कॅप्टन जर्विसची सरकारी शिळा छापखान्याचा सुप्रिन्टेंडंट म्हणून नेमणूक झाली. त्याचा इंजिनियरिंग कॉलेजशी शिक्षक म्हणून संबंध होता. हे कॉलेज १८३० मध्ये पुण्यास गेले, तेव्हा जर्विसही पुण्यास गेला. त्याने आपल्याबरोबर एक शिळायंत्र नेले आणि पुण्यात प्रेस सुरू केला. हा पुण्यातील पहिला छापखाना असा श्री. प्रियोळकरांचा अंदाज आहे.

5 *The Bombay Secretariat Records*, G. D. Vol. 8 (63) of 1824 pp. 93-94.

मराठी ग्रंथमुद्रणाची भक्कम पायावर उभारणी

१५. मराठीतील ग्रंथ-मुद्रणास सेरामपूर येथे १८०५ मध्ये सुरुवात झाल्यापासून १८६७ मध्ये ग्रंथालयाचा कायदा होईपर्यंत प्रसिद्ध झालेले मराठी ग्रंथ *दोलामुद्रिते*[६] ह्या पुस्तकामध्ये नोंदलेले आहेत. अमेरिकन मिशन प्रेसमध्ये धार्मिक पुस्तके छापली जात त्याचप्रमाणे श्रीरामपूर येथील मिशनरी छापखान्यामध्ये धार्मिक पुस्तके आणि भाषाविषयक पुस्तके छापली जात होती. त्यापासून स्फूर्ती घेऊन गणपत कृष्णाजीने मराठी ग्रंथमुद्रणास सुरुवात केली. तत्पूर्वी २५–३० वर्षे मराठी ग्रंथमुद्रणाची सुरुवात महाराष्ट्राबाहेर श्रीरामपूरला झाली होती. मुंबईमध्ये काही पुस्तके 'कुरियर' प्रेसमध्ये छापण्यात आल्याचा उल्लेख वर केलाच आहे. भक्कम पायावर मराठी ग्रंथमुद्रणाची उभारणी मात्र 'अमेरिकन मिशन प्रेस'मध्येच झाली. त्यातील प्रेरणा केवळ खिस्ती धर्मविषयक साहित्य छापण्याची होती. परंतु टॉमस ग्रॅहॅम हे छापखान्यामध्ये जबाबदारीच्या जागेवर आल्यानंतर त्यांना मराठी ग्रंथमुद्रणास आवश्यक अशी मुद्राक्षरांची उणीव जाणवली, आणि हरप्रयत्नाने ही मुद्राक्षरे पाडण्यास त्यांनी सुरुवात केली. १८१७ पासून 'मिशन प्रेस'मध्ये इंग्रजी आणि मराठीत मुद्रण होई. त्यासाठी कलकत्त्याहून मराठी टाइप मागविले होते. ग्रॅहॅमने प्रथम १८३०-३१ च्या सुमारास मराठी पंच बनविले. परंतु त्यापासून मातृका ठोकण्याची कला त्याला अवगत नव्हती. हे पंच घेऊन ग्रीव्ह्ज मायदेशी गेला. वाटेत ते गंजून गेले. म्हणून नंतर मातृका ठोकण्यासाठी आणि प्रत्यक्ष टाइप पाडण्यासाठी इथेच व्यवस्था करावी असे ठरले. १८३५ मध्ये वेबस्टर हा मुद्राक्षर-निर्मिती-तज्ज्ञ इथे आला. त्याने बरोबर मुद्राक्षरे तयार करण्याची हत्यारे आणली आणि मातृका तयार करण्याची कला टॉमस ग्रॅहॅम यास शिकविली. याच छापखान्यात टॉमस ग्रॅहॅमने छापलेले, १८५६ मध्ये प्रसिद्ध झालेले, संपूर्ण बायबल, सुरुवातीच्या काळातील मराठी मुद्राक्षरकलेचा आणि जुळणीचा एक नमुना म्हणून आजही उल्लेखनीय आहे.

गणपत कृष्णाजीचा मुद्रण उद्योग

१६. गणपत कृष्णाजीचे अधिकृत चरित्र लिहिले गेलेले नाही. उपलब्ध त्रोटक माहितीवरून त्यांचा जन्म इ. स. १८०० मध्ये झाला आणि त्यांनी १८३१ मध्ये छापखाना काढला असे समजते. त्यापूर्वी ते अमेरिकन मिशन प्रेसमध्ये होते आणि तिथे टॉमस ग्रॅहॅमकडे मुद्राक्षर-निर्मितीची कला शिकले असे '*अक्षरसाधना*'कर्ते कुळकर्णी म्हणतात. ही माहिती त्यांनी कै. माडगावकरांच्या *मुंबईवर्णना*वरून घेतलेली दिसते,

६ *मराठी दोलामुद्रिते* सं. प्रा. सु. आ. गावस्कर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, आवृत्ती दुसरी १९६१.

परंतु ती मला संभवनीय वाटत नाही. टॉमस ग्रॅहॅमचा मुद्राक्षर-निर्मितीचा उद्योग १८३५ पर्यंत व्यवस्थितपणे कार्यान्वित झालेला नव्हता. गणपत कृष्णाजी सुरुवातीस मिशन प्रेसमध्ये असले तरी त्यांनी तो छापखाना सोडीपर्यंत तिथे मराठी मातृका तयार झाल्या नव्हत्या, ही गोष्ट स्पष्ट आहे. १८३१।३२ च्या सुमारास ग्रॅहॅमने प्रथम मराठी पंच तयार केले होते. परंतु प्रत्यक्षात ते उपयोगात आले नाहीत, हे वर सांगितले आहे. ग्रॅहॅमचा मराठी टाइप पुढे १८३६ मध्ये तयार झाला तेव्हा 'गणपत कृष्णाजीचा छापखाना' सुरू होऊन पाच वर्षे झाली होती म्हणून गणपत कृष्णाजीचा उद्योग हा स्वयंभू होता असे म्हटले पाहिजे. त्यांनी स्वतः लाकडी शिळा प्रेस बनविला (१८३१-३२). शाईही गणपत कृष्णाजीनी स्वतःच बनविली आणि पुढे (१८४३) टाइप पाडण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी सात वर्षे इंग्लंडहून शिळाप्रेस मागविण्यात आले होते. ते चालविण्यास इंग्रज सुप्रिंटेन्डंटच पाहिजे अशी तेव्हा समजूत होती.[८]

> "...*a more able superintendence than is likely to be obtained from natives and a more constant employment than would thus be ensured is essential, to render the establishment expert. One European superintendent would be required for one press...*"

१७. गणपत कृष्णाजींनी मूळ छापखाना स्थापन केला तो हिंदूधर्मविषयक साहित्य मुद्रित करून प्रसिद्ध करण्याकरिता. त्यांचे पहिले प्रकाशन पंचांग होते. दरम्यानच्या काळामध्ये 'स्कूल बुक सोसायटी'चा छापखाना, 'डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन'चा छापखाना, आणि 'सरकारी शिळा छापखाना' यातून शिळायंत्रावर शालोपयोगी पुस्तके छापण्याचे काम सुरू झाले होते. पाठ्यपुस्तके अगदी सुरुवातीच्या काळामध्ये सरकारी क्षेत्रातच प्रसिद्ध होत होती. त्यानंतर पाठ्यपुस्तकेच नव्हे तर शैक्षणिक महत्त्वाचे ग्रंथ सुद्धा मोठ्या प्रमाणावर छापण्याची सुरुवात गणपत कृष्णाजींनी केली. ह्या छापखान्यामध्ये *दादोबांचे व्याकरण* १८३६ मध्ये प्रसिद्ध झाले. ते शिळाप्रेसवर छापले होते. त्यानंतर अनेक, भाषाविषयक आणि इतर विविध विषयांवरील, ग्रंथ प्रसिद्ध झाल्याची नोंद *शोलामुद्रिते* या यादीमध्ये केलेली आहे. सात-आठ नियतकालिके गणपत कृष्णाजींच्या छापखान्यातून निघू लागली होती. गणपत कृष्णाजींच्या निधनानंतर (१८६०) त्यांचे सुपुत्र कान्होबा यांना जर जास्त आयुष्य लाभले असते तर मराठी मुद्रण व्यवसायाचे भले झाले असते. कान्होबाच्या मृत्यूनंतर (१८६५) मुद्रणालयाची

---

7 Quoted in the "*Printing Press in India*" by A. K. Priolkar, Bombay 1955, p. 92.

8 *The Bombay Secretariat* Records, G. D. Vol. 14/70 of 1824, pp. 57-59 uu 1 p. 12.

व्यवस्था रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक आणि गंगाधर गोविंद फडके या ट्रस्टींकडे गेली. त्यांच्या कारकीर्दीत 'जैसे थे' परिस्थिती होती. गणपत कृष्णाजींचे नातू आत्माराम वयात आल्यानंतर छापखान्याची व्यवस्था त्यांनी आपल्या हातात घेतली. परंतु आठदहा वर्षांतच (१८७१-१८८०) त्यांच्या निधनानंतर छापखान्याची व्यवस्था पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांजकडे गेली. त्यांनी १९०० पर्यंत चांगली देखभाल केली, परंतु नंतर मात्र गणपत कृष्णाजीचा छापखाना डबघाईस आला. १९१४ मध्ये बेकायदेशीर मजकूर छापल्यामुळे छापखान्यावर जप्ती आली आणि त्याचा लिलाव झाला.

१८. गणपत कृष्णाजींनी आपल्या कामगिरीस सुरुवात केली तेव्हा मुद्रणकलेची इथे फारशी माहिती नव्हती. मुंबईवर्णनकर्ते कै. माडगावकर म्हणतात :

> " भरतखंडातील लोकांस शिळाछाप म्हणजे काय व ठसेछाप म्हणजे काय, हे पुष्कळ वर्षेपर्यंत ठाऊक नव्हते. छापल्याने कागदावर अक्षरे निघतात व त्यापासून पुस्तके होतात म्हटले म्हणजे या लोकांस मोठे अद्भुतच वाटे. एकदा छापलेला कागद पाहिला म्हणजे स्वर्गाहून विमान आल्यासारखे लोक पाहायला जमत. "[९]

अशा परिस्थितीत अनेक आपत्तींशी तोंड देत महाराष्ट्रात मुद्रणोद्योगाचा भक्कम पाया घालण्याचे श्रेय हे गणपत कृष्णाजीसच द्यावयास पाहिजे. ते टॉमस ग्रॅहॅमचे समकालीन होते. मिशन छापखान्यात तयार झालेली मुद्राक्षरे पाहून गणपत कृष्णाजींस देवनागरी मुद्राक्षरे तयार करण्याची स्फूर्ती झाली असे एकवार म्हणता येईल. परंतु त्यांच्या छापखान्यात तयार झालेली मुद्राक्षरे विविध वळणाची आणि आकाराची आहेत ही गोष्ट लक्षात घेता त्यांच्या निर्मितीचे श्रेय त्यांनाच द्यावयास पाहिजे. महाराष्ट्रात सुबक मुद्रणाचा पाया गणपत कृष्णाजींनीच घातला ही गोष्ट त्या छापखान्यात छापलेल्या उपलब्ध पुस्तकांवरून आजही लक्षात येण्याजोगी आहे. १८३१ ते १८६७ या कालात छापलेल्या आणि आज उपलब्ध असलेल्या ९०० मराठी पुस्तकांपैकी सर्वांत जास्त म्हणजे १८४ पुस्तके गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात छापलेली आहेत.

सनातन्यांचा मुद्रण विरोध

१९. गणपत कृष्णाजींच्या मराठी प्रकाशनापूर्वी 'कुरियर प्रेस' आणि 'अमेरिकन मिशन प्रेस' मधून शालोपयोगी पुस्तके छापली गेली होती. त्यांचा मूळ हेतू एतद्देशीय गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा होता. शिवाय 'मिशन प्रेस' मधून खिस्ती धार्मिक पुस्तके प्रसिद्ध होत. त्यामुळे आणि आपल्या एकंदर मुद्रित पुस्तकांबाबतच्या अनास्थेमुळे नवीन पुस्तकांना लोक बिचकत. मुद्रणात लागणारी शाई चरबीयुक्त असते हेही एक

---

९ माडगावकर, गोविंद नारायण., *मुंबईचे वर्णन*, १८६३, पृ. २४६

कारण तेव्हा देण्यात येई. कै. माडगावकर लिहितात :

"आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण, छापलेल्या कागदास स्पर्श करण्यास भीत असत, आणि अद्याप मुंबईत व बाहेर छापील कागदास शिवत नाहीत व छापलेले पुस्तक वाचीत नाहीत, असे पुष्कळ सापडतील."[१०]

२०. अशा या परिस्थितीत वर सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणांच्या उपयोगाचे पंचांग गणपत कृष्णाजींनी १८३१ साली छापून प्रसिद्ध केले. त्यात त्यांना त्यांच्या ज्या ज्योतिषी मित्राने मदत केली ते रखमाजी संस्कृतज्ञ होते. जातीने शिंपी होते. या पंचांगासंबंधी *विविधज्ञान विस्तारा*चे संपादक कै. हरी माधव पंडित म्हणतात :

"ते पंचांग प्रसिद्ध करणारे छापखान्याचे मालक ब्राह्मणच असले पाहिजेत असे मुंबईच्या बाह्यप्रदेशीय लोकांस वाटे व ते त्यास वेदशास्त्रसंपन्न रा. रा. अशा मायन्यांची पत्रे लिहीत. त्या परस्थांस जर कोणी हे भंडारी आहेत असे सांगितले, तर ते त्यांस खरे वाटत नसे, कारण अशा जातीतल्या पुरुषाचे अंगी असले ब्राह्मणी गुण असंभाव्य आहेत, अशी त्यांची दृढ समजूत होती. प्रथमतः जेव्हा हे पंचांग प्रसिद्ध होऊ लागले, तेव्हा मुंबईतील ब्राह्मण मंडळी ते शिंप्याने तयार केलेले पंचांग म्हणून त्याचा उपयोग करण्याचा कंटाळा करीत. परंतु स्थळ पडले मुंबई व राज्य पडले इंग्रजांचे! म्हणून आमची जुन्या समजुतीची मंडळी गप्प बसली, नाही तर हे पंचांग :वर्तविणारे ज्योतिषी व त्यांचे पुरस्कर्ते छापखान्याचे मालक यांचे आमच्या कर्मठ राजांच्या कारकीर्दीत खचित हात कलम केले गेले असते."[११]

२१. गणपत कृष्णाजींचे पंचांग १८३१ नंतर दरवर्षी निघू लागले, आणि विद्वानांच्या हातात पडू लागले. तरी मुद्रित ग्रंथाविषयीचा विरोध काही कमी झाला नव्हता. कै. जांभेकरांनी '*दिग्दर्शन*' नियतकालिक सुरू केले. त्यात ते लिहितात :

"या छापाच्या शाईत चर्बी पडत असते. त्यामुळे छापलेले पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे, म्हणून याविषयी काही लिहिले पाहिजे. घरजिनसाच्या याद्या लिहिल्या आहेत. त्यात तूप अथवा चर्बी असे आहे. परंतु हे *दिग्दर्शन* ज्या छापखान्यात छापतात, तेथे चर्बीच्या ठिकाणी तुपाचा उपयोग करितात व तेणेकरून काम चर्बीप्रमाणे होते. परंतु तुपामध्ये चर्बीप्रमाणे तेज नाही म्हणोन मेहनत जास्त पडती."[१२]

---

१० *मुंबई वर्णन*, पृ. २४८.

११ पंडित हरी माधव, *विविधज्ञानविस्तार*,
पुस्तक २४, जून १८९२.

१२ *दिग्दर्शन*, पुस्तक १ ले. पृ. २१२-१८४०

२२. यानंतर अनेक वर्षांनी रा. सा. मंडलिक यांनी *तुकाराम गाथा* गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात छापविला. त्याबाबत त्यांचे स्नेही रावजी सखाराम लिमये, २७ मार्च १८६७ च्या पत्रात लिहितात :

> " तुकारामाच्या गाथांच्या प्रती घेण्यास लोकांचा अंदेशा आहे. कारण शाईत काही वर्ज्य पदार्थ आहेत, असे त्यांच्या मनाने घेतले आहे. अक्षर मोठे, सुवाच्य व शिळा-छाप असावे व शाईची खात्री असावी. " [१३]

' अक्षर शिळाछाप असावे ' या वाक्यास महत्त्व आहे. त्या काळी विल्किन्सूचा *विदुरनीति*मध्ये वापरलेला टाइप, कलकत्त्याहून मागविलेला टाइप आणि अमेरिकन मिशन प्रेस मध्ये नुकताच पाडलेला टॉमस ग्रॅहॅमचा टाइप, असे तीन प्रकारचे टाइप उपलब्ध होते. ते जरी शक्यतो तात्कालीन हस्तलिखितातील अक्षरवटिकेप्रमाणे केलेले होते, तरी त्या काळी शिळाप्रेसवर छापण्यात येणाऱ्या उत्तम हस्ताक्षरांची त्यांना सर नव्हती. पुढे १८४३ मध्ये गणपत कृष्णाजीने देवनागरी मुद्राक्षरांचा वापर सुरू केला, ती मुद्राक्षरे उत्तरोत्तर सुबक होत गेली.

मराठीतील १८६७ पर्यंतचे ग्रंथमुद्रण

२३. इ. स. १८६७ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या मराठी ग्रंथांची जी एक यादी '*दोलामुद्रिते*' म्हणून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रसिद्ध केली आहे, त्यातील एकंदर ८४४ पुस्तकांपैकी बहुसंख्य म्हणजे १८४ ग्रंथ गणपत कृष्णाजींच्या छापखान्यात मुद्रित झालेले आहेत, ही गोष्ट वर उल्लेखिली आहे. त्याखालोखाल अमेरिकन मिशन प्रेसमध्ये १८१७ ते १८६० पर्यंत १०३ पुस्तके छापिली आहेत. या यादीत सुमारे ९० छापखान्यांची नोंद आहे. त्यात मुंबईचे छापखाने निम्याहून अधिक म्हणजे ५३ आहेत. केवळ इंग्रजी किंवा गुजराथी पुस्तके छापणारे छापखाने या यादीत आलेले नाहीत. पुण्यास या मुदतीत पंधरा छापखान्यांतून पुस्तके छापली आहेत. अहमदनगरला (१८४२ ते १८६७) या काळात पाच छापखान्यांतून पुस्तके छापलेली आहेत. नाशिकसारख्या ठिकाणी मिशनऱ्यांच्या खटपटीमुळे १८३५ मध्येच छापखाना सुरू झाला होता. रत्नागिरीसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या जगन्मित्र छापखान्यात १८५४ पासून १८६९ पर्यंत १९ पुस्तके छापण्यात आली होती. बेळगाव (१८५०), कोल्हापूर (१८५७), भोर (१८६७) या ठिकाणीच केवळ नव्हे तर कराची (१८६७) आणि धारवाड (१८५८) सारख्या महाराष्ट्राबाहेरच्या शहरातील छापखान्यांतूनही एकेक मराठी पुस्तक छापलेले आढळते. १८६७ च्यापूर्वी ग्रंथमुद्रण करीत असलेल्या आणि दहाहून जास्त पुस्तके छापलेल्या प्रमुख छापखान्यांची खालील यादी उद्बोधक ठरेल.

१३ हवालदार ग. रा., *रा. सा. मंडलीक यांचे चरित्र*, खंड दुसरा, पृ. ९५९

मुद्रणालय	गाव	काळ	पुस्तके
अमेरिकन मिशन प्रेस,	मुंबई	१८१७–१८५८	८०
सरकारी शिळा छापखाना,	मुंबई	१८२८-१८४४	१२
आर् प्रेरा यांचा छापखाना,	मुंबई	१८३२–१८३९	१२
गणपत कृष्णाजीचा छापखाना,	मुंबई	१८३६–१८९७	१८४
सरकारी पाठशाळेचा छापखाना,	पुणे	१८४०–१८५८	४०
विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा प्रेस,	मुंबई	१८४६–१८६३	३०
ज्ञानप्रकाश छापखाना,	पुणे	१८४९-१८६७	३८
ज्ञानदर्पण छापखाना,	मुंबई	१८५१-१८६३	२८
बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा छापखाना,	मुंबई	१८५२-१८६७	२२
जगन्मित्र छापखाना,	रत्नागिरी	१८५४–१८६७	१९
टॉमस ग्रॅहॅम यांचा छापखाना,	मुंबई	१८५६–१८६०	२३
एक्स्चेंज प्रेस,	मुंबई	१८५९-१८६४	११
माधव चंद्रोबा डुकले यांचा छापखाना,	मुंबई	१८६०-१८६७	३७
इंदुप्रकाश छापखाना,	मुंबई	१८६२–१८६७	३२
नारो आप्पाजी गोडबोले यांचा छापखाना,	पुणे	१८६२-१८६५	१०
ओरिएंटल छापखाना,	मुंबई	१८६४–१८६७	१९

ग्रंथमुद्रणातील निर्णयसागर युग : जावजी आणि आरूची अक्षरसाधना

२४. इ. स. १८१८ ते १८५६ पर्यंतच्या काळास ‘ अमेरिकन मिशन प्रेसचे युग ’ म्हणता येईल. १८५६ ते १८६९ पर्यंतचा काळ हे ‘गणपत कृष्णाजी युग’ होय. १८६९ ते १९१२ पर्यंतचा काळ हे ‘ निर्णयसागर युग ’ म्हणून गणले पाहिजे. अमेरिकन मिशन छापखान्यामध्ये शिक्षण घेतलेले जावजी दादाजी चौधरी (जन्म १८३९) यांनी इंदुप्रकाश, ओरिएन्टल, टाईम्स, ब्रिटिश इंडिया इत्यादी छापखान्यांत उमेदवारी केल्यानंतर स्वतःची ‘जावजी दादाजी टाइप फौंडरी’ काढली ती १८६४ मध्ये. आणि त्यानंतर पाचच वर्षांनी त्यांनी ‘ निर्णयसागर ’ छापखान्याची स्थापना केली. या छापखान्यामध्ये छापलेले पहिले पुस्तक *गरुड पुराण*. त्याची प्रत मला उपलब्ध झालेली नाही. १८६९ पासून १८९२ मध्ये जावजींचे निधन होईपर्यंतच्या काळात, शेकडो पुस्तके आणि मासिके निर्णयसागरमध्ये छापून प्रसिद्ध झाली. त्याची संपूर्ण गणती अजून व्हावयाची आहे. जावजींच्या काळात १९३ संस्कृत आणि २२८ मराठी पुस्तके निर्णयसागरने प्रसिद्ध केली. शिवाय गुजराती आणि हिंदी भाषेत १५ पुस्तके प्रसिद्ध केली. हा तेवीस वर्षांचा काळ मराठी ग्रंथमुद्रण आणि प्रकाशन व्यवसाय यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. जावजींचे सहकारी राणोजी आरू यांची मुद्राक्षर-निर्मितीतील कारागिरी अजोड आहे. जावजींच्या कारकीर्दीत त्यांनी वीस नवीन फाऊंट तयार केले आणि नंतर तुकाराम जावजींच्या काळात

(१८९२–१९१८) आणखी वीस फाऊंट तयार केले. तुकाराम जावजींच्या काळात निर्णयसागरने २०० संस्कृत, १७० मराठी आणि ३५ हिन्दी-गुजराती नवी प्रकाशने केली. दोन कानडी पुस्तकेही त्यांनी छापली. निर्णयसागरमधून जी उत्तमोत्तम पुस्तकें छापून निघाली त्याचे पुष्कळसे श्रेय आरूंच्या सुबक वळणास आहे. नंतरच्या काळात या टाइपांची नक्कल सर्वत्र झाली.

२५. राणूजी रावजी आरू यांचा जन्म केव्हा झाला हे निश्चित माहीत नाही. ते स्वतः आपल्या आत्मवृत्तपर निवेदनात सांगतात की, त्यांचा जन्म १८४८ मधला. परंतु ते सांगतात जावजी आपल्यापेक्षा सहा वर्षांनी वडील. म्हणजे त्यांचा जन्म १८४४–४५ मधला असावा. मुंबईस आल्यावर त्यांनी प्रथम हेलकऱ्याची कामे केली. वयाच्या पंधराव्या वर्षी ते टाइम्स प्रेसमध्ये, फौंडरी खात्यात, टाइप घासण्याच्या कामावर राहिले. पगार महिना तीन रुपये ! एज्युकेशन सोसायटीच्या प्रेसमध्ये त्यांनी १८६१ च्या सुमारास नोकरी पत्करली. तेव्हा तिथे देवनागरी, गुजराती, कानडी, तामिळ, इत्यादी लिप्यांचे टाइप पाडून देत. इथे आरू मातृका तयार करण्याचे काम शिकले. अमेरिकन मिशन प्रेसमध्ये, जीवन वल्लभ लोहार हे टॉमस ग्रॅहॅमच्या बरोबर, पंच मातृका तयार करीत. नंतरच्या काळात रामजी नावाचे एक पंचीगार गणपत कृष्णाजीसाठी पंच मातृका करून देत. जावजी स्वतः पंचीगार होते. परंतु या सर्वांहून राणूजींचे पंच सरस असत. कला त्यांच्या हातातच होती. प्रकाश-लेखनाची कला तेव्हा माहीत नव्हती. त्या काळात आठ पॉइंटचे देवनागरी पंच तयार करणे आणि तेही इतके सुबक नि प्रमाणबद्ध की आज पॅन्टोग्राफची मदत असूनही अशी मुद्राक्षरे तयार होत नाहीत. आरूंच्या कलेची तुलना, कैलास लेणे खोदणाऱ्या शिल्पकारांच्या कलेशीच करता येईल. आराखडे, ब्ल्यूप्रिन्ट इत्यादींची मदत नसताना कातळात वरून खाली खोदीत हे अजरामर शिल्प निर्माण करण्यातील कौशल्य आणि पोलादाच्या तुकड्याच्या, मोहरीएवढ्या टोकावर, देवनागरी जोडाक्षरे कोरण्यातील कौशल्य, एकाच जातीचे आहे. आरूंनी निर्माण केलेल्या संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती आणि कानडी मुद्राक्षरांवर या भाषांतील मुद्रणाचा आज पाऊणशे वर्षे निर्वाह होतो आहे; आणि यापुढेही होत राहील यात शंका नाही.

२६. *पुणे शहराचे वर्णन*[14] या १८६८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात पुण्यातील मुद्रणालये, ग्रंथालये आणि वृत्तपत्रे याबाबत काही माहिती प्रसिद्ध झाली आहे ती अशी :

> " सन १८५८ या साली पुण्यातील पुस्तकगृहात जी पुस्तकें होती, त्यात ३८१ इंग्रजी, २६ संस्कृत, १८ गुजराथी, ३ हिंदुस्थानी, १८० मराठी, ८ पारशी, ५ कानडी (एकूण ६२१) पुस्तकें होती. या वेळेस *ज्ञानप्रकाश* व *प्रभाकर* ही वर्तमानपत्रे येथे येत असत." (पृ. १२६) " शिवाय सात छाप-

१४ जोशी, नारायण विष्णु, *पुणे शहराचे वर्णन*–१८६८

खाने आहेत, पैकी दोन इंग्रजी आहेत." (पृ. १३६) ज्ञानप्रकाश नामक एक मराठी वर्तमानपत्र याच वर्षी (१८४९) पुण्यात सुरु झाले. त्याचे अगोदर पुना क्रॉनिकल म्हणून इंग्रजी पत्र निघत होते. ते सन १८५१ त बंद झाले. ज्ञानप्रकाश सुरू झाला त्या वेळेस दुसरे मराठी वर्तमानपत्र दक्षिण प्रांती नव्हते. या पत्रास प्रथम आश्रय रा. रा. मोरो रघुनाथ ढमढेरे व रा. रा. गोपाळराव हरी देशमुख यांचा होता. त्यांनी मनःपूर्वक श्रम घेऊन हे काम चालविले. ते काम बरेच दिवस रेंगाळत चालले होते. कारण लोकांस वर्तमानपत्र वाचण्याची त्या वेळेस गोडी नव्हती व उपयोग काय हाही माहीत नव्हता, तरी त्यांच्या कर्त्यांनी धैर्य सोडले नाही. एकाने द्रव्यबळ व दुसऱ्याने विद्याबळ खर्चून त्याला उत्तम स्थितीस आणिले. परंतु कर्त्यांची अदलाबदल झाल्यामुळे त्यांचा पूर्वीचा सोज्वळ प्रकाशही बदलला व आता ते न्यूनप्रकाश झाले आहे. (पृ. १२१)

मुद्रणाचा पुण्यातील विकास

२७. इ. स. १८८१ मध्ये केसरी निघाला. किरण छापखान्याचे सामान शनिवारातील शिवाजी छापखान्यात पडले होते, ते हप्तेबंदीने केसरीच्या संस्थापकांनी घेतले आणि मोरोबादादांच्या वाड्यात 'आर्यभूषण' छापखान्याची (१८८१) स्थापना केली. १८८८ मध्ये केसरीचे वर्गणीदार ५०० वर वाढले, म्हणून नवीन टाइपाची गरज भासू लागली. टिळकांनी कै. सहदेवराव पिंपळे यांना आर्यभूषणमध्ये ठेवून घेतले आणि फौंडरीची वाढ केली. १९०५ मध्ये गायकवाडवाड्यात आल्यावर टिळकांनी ' केसरी ' टाइप फौंडरीची जुळवाजुळव केली. १८९७ मध्ये 'केसरी' छापखान्याची स्थापना झाली, तत्पूर्वी १८९१ मध्ये टिळकांनी गणपत कृष्णाजीच्या छापखान्यातून टाइप मागविला होता. त्या वेळी पुण्यामध्ये ग्रंथमुद्रणासाठी फारच थोडे छापखाने होते. शाळाखात्याच्या पुण्यातील छापखान्यात १८३२ मध्ये एक पुस्तक छापलेले आढळते. ' सरकारी पाठशाळेचा छापखाना ' विश्रामबाग वाड्यातून १८४० पूर्वीपासून पुस्तक-प्रकाशन करीत होता. सरकारी छापखान्याव्यतिरिक्त *ज्ञानप्रकाश* (१८४९) छापखान्यात ग्रंथमुद्रण होई. शिवाय *मित्रोदय* (१८४४), *बाळकृष्ण रामचंद्र ठकार* (१८५८), *नारो आप्पाजी गोडबोले* (१८६२), *बुद्धिप्रकाश* (१८६२), *सापकर बंधू* (१८६४), *वृत्तप्रकाश* (१८६४), *वृत्तप्रसारक* (१८६६), *ज्ञानचक्षु* (१८६६), ह्या छापखान्यांची नोंद सापडते. १८६६ पासून 'जगद्धितेच्छू' छापखान्यातून ग्रंथ बाहेर पडू लागले. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी लोकशिक्षणाचा जो मोठा उद्योग पुण्यात मांडला, त्यामध्ये दुय्यम शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालय, वृत्तपत्र, नियतकालिक, इतकेच नव्हे तर छापखान्याचाही समावेश होता. पुस्तकविक्रीसाठी त्यांनी किताबखाना काढला आणि ग्रंथमुद्रणासाठी व चित्रछपाईसाठी चित्रशाळा छापखाना स्थापन केला. या छापखान्यातून

शालोपयोगी तक्के, नकाशे आणि चित्रे छापण्याची सोय करण्यात आली. आर्यभूषण छापखान्याच्या जन्मप्रसंगी मालाकार चिपळूणकर म्हणतात :

"आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणे छापखान्याचा उद्योगही अविद्वान व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत. त्यामुळे अज्ञानध्वंसनाविषयी केवळ वज्रच असे जे मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रगट झालेला नाही. तो झाला असता, आता उघडमाथ्यांनी जे आपले उन्नतत्व निर्भयपणे खुशाल मिरवीत आहेत अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळी जाऊन दडून बसावे लागेल."[१५]

मालाकारांचे हे विधान मुंबईतील छापखान्यांना लागू नाही. त्यांच्या समोर पुण्यातीलच छापखाने असावे.

मुद्रणव्यवसायातील कर्नाटक आणि मौज युग

२८. 'निर्णयसागर' छापखान्यानंतर मुंबईस स्थापन झालेला 'कर्नाटक छापखाना' आणि 'कर्नाटक प्रकाशन' यांनी मुद्रणाच्या व्यवसायामध्ये नेत्रदीपक प्रगती केली. कर्नाटक संस्थेची स्थापना १९०२ साली झाली. तरी १९१६ मध्ये कै. मंगेशराव कुलकर्णी यांनी त्याची व्यवस्थापकीय जबाबदारी अंगावर घेईपर्यंत संस्थेची फारशी प्रगती होऊ शकली नव्हती. कै. मंगेशरावांनी उत्तम व्यवसायाच्या ज्या दोन बाजू, कामाचा उच्च दर्जा आणि आर्थिक स्थैर्य, ही दोन्ही साध्य केली. म्हणून १९१६ ते १९४५ हे 'कर्नाटक युग' म्हणावयास पाहिजे. 'निर्णयसागर' आणि 'कर्नाटक' यांनी मराठी सुबक मुद्रणाचे जे मानदंड निर्माण केले ते मुंबईचा एक 'मौज प्रिंटिंग ब्यूरो', अलीकडे पुण्याचे 'कल्पना मुद्रणालय' आणि इतर तुरळक अपवाद सोडता इतर कोणी मोठ्या प्रमाणावर गाठलेले दिसत नाहीत, आणि म्हणून सध्या ग्रंथमुद्रणात 'मौज-युग' चालू आहे असे म्हटले पाहिजे.

रविवर्मा प्रेस आणि राजा रविवर्म्यांची चित्रे

२९. गेले शतक उलटण्यापूर्वीच 'रविवर्मा प्रेस'ची मुंबईस स्थापना झाली होती. राजा रविवर्म्यांची चित्रे छापण्यासाठी हा प्रेस निघाला. त्यात श्लायशर हे जर्मन तंत्रज्ञ भागीदार होते. त्यातील दुसरे एक भागीदार पुढे बाहेर पडले. त्यांनी मुंबईस रविउदय प्रेसची स्थापना केली. मुंबईच्या प्लेगला कंटाळून रविवर्मा प्रेसचे मळवलीस स्थलांतर झाले. या मुद्रणालयात आजही राजा रविवर्म्यांची मूळ चित्रे आणि त्यावरून श्लायशरने तयार केलेल्या चित्रांकित शिळा पाहायला मिळतात. या मुद्रणालयात छापून

१५ चिपळूणकर विष्णुशास्त्री, *निबंधमाला*, वर्ष ६ वे.

निघालेल्या चित्रांचे वितरण प्रसिद्ध उद्योगपती अनंत शिवाजी देसाई टोपीवाले करीत. रविवर्मा प्रेसमधून त्या काळात बाहेर पडलेल्या चित्रास हिंदुस्थानात इतरत्र तोड नाही.

व्यापारी मुद्रणाची सुरुवात आणि विकास

३०. गेले शतक उलटण्याचे सुमारास ग्रंथेतर मुद्रणासाठी छापखाने निघू लागले त्यात शिळा मुद्रणयंत्रे (Lithographic) प्रमुख होती. त्यानंतर प्रतिरूप मुद्रणयंत्रे (Offset) प्रचारात आली. शिळायंत्राची मुख्यतः पोस्टर छापणे, जाहिराती छापणे आणि विड्यांची लेबले छापणे ही प्रमुख कामे असत. या ग्रंथेतर मुद्रणालयाचा व्यवसाय ग्रंथ-मुद्रण करणाऱ्या मुद्रणालयापासून अगदी वेगळा पडतो. त्यामुळे दोघांची वाढ स्वतंत्रपणे होत राहिली. याव्यतिरिक्त औषधी वस्तू, सौंदर्यसाधने आणि इतर ग्राहकोपयोगी (Consumers) वस्तूंच्या विक्रीमध्ये ' वेष्टनमुद्रणाचा ' (Packaging) एक नवीनच धंदा सुरू झाला. त्यासाठी वेगळी मुद्रणसामग्री लागते आणि ती कामे करणाऱ्या मुद्रणालयांची तांत्रिक रचनाही वेगळी असावी लागते. अलिकडच्या काही वर्षांत औद्योगिक आणि गृहोपयोगी कागद (Industrial and wall papers) यांच्या मुद्रणासाठी, ताम्रपट मुद्रणाचे (Photogravure printing) कारखाने निघाले आहेत. या ग्रंथेतर मुद्रणासाठी निघालेल्या छापखान्यांची आर्थिक स्थिती जास्त चांगली असते. कारण त्यात ' प्रॉफिट मार्जिन ' जास्त असतो आणि म्हणून अनेक मुद्रक त्या व्यवसायाकडे वळतात. परिणामी ग्रंथमुद्रणाची आबाळ होते असे आढळून येते. निर्णयसागरादी जुने छापखाने पुढील काळात तग धरून राहिले ते मुख्यतः केवळ धार्मिक ग्रंथांच्या मुद्रणावरच.

सुबक ग्रंथमुद्रणाचे आजचे मानकरी

३१. मुंबईचा 'कर्नाटक छापखाना' श्री. बा. ग ढवळे यांनी १९४५ मध्ये विकत घेतला आणि काही वर्षे उत्तम प्रकारे चालविला. तो नंतर हस्तांतरित झाला तरी त्या काळातील श्री. ढवळे यांची मुद्रण कलोपासना अतुलनीयच म्हणावी लागेल. पण ती अपवादात्मक होती. मुंबईस प्रथम वृत्तपत्रासाठी निघालेला आणि नंतर ग्रंथमुद्रणासाठी प्रसिद्धीस आलेला 'मौज प्रिंटिंग ब्यूरो', टाइम्स वृत्तपत्र संस्थेचा 'टाइम्स प्रेस', त्याचप्रमाणे केवळ इंग्रजी ग्रंथमुद्रणासांठी स्थापन झालेला आणि आज इंग्रजी ग्रंथमुद्रणात अग्रेसर असलेला ' इंडिया प्रिंटिंग वर्क्स ', श्री. जी. यू. मेहता यांनी संपादिल्यावर भरभराटीस आलेला ' वकील अँड सन्स् ' इत्यादी छापखाने आज सुबक ग्रंथमुद्रणासाठी प्रसिद्ध आहेत. ग्रंथमुद्रणाशी संबद्ध अशा पुस्तक-बांधणीचा व्यवसाय आपल्याकडे वाढला असला तरी सुबक बांधणीच्या बाबतीत आपण फारशी प्रगती करू शकलेलो नाही. वर उल्लेखिलेल्या मुद्रणालयांव्यतिरिक्त 'के. एल. भार्गव', 'उषा प्रिंटर्स' आणि 'फोर ओशन्स' यांनी सुबक बांधणीत बराच वरचा दर्जा मिळविला आहे. 'फोर ओशन्स्' ही हिंदुस्थानातील प्रमुख प्रबंधन संस्था (Bindery) प्रसूति-वेदना दीर्घकाळ लांबल्यामुळे स्थिर

व्हायला विलंब होतो आहे.

३२. 'टाईम्स छापखाना' ही संस्था महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतात अग्रेसर आहे. वृत्तपत्र आणि ग्रंथमुद्रणाप्रमाणेच इतर विविध प्रकारचे मुद्रण करण्याची तिथे सोय आहे. परंतु देशी भाषांतून मात्र तिथे ग्रंथमुद्रण होत नाही ही मोठी उणीव होय. पाठ्यपुस्तकांच्या व्यतिरिक्त जे ग्रंथमुद्रण होते, त्यातील धार्मिक पुस्तके सोडली तर फायद्याची माया अनुल्लेखनीयच असते. पाठ्यपुस्तके छापण्याचा उद्योग करणारी अनेक मुद्रणालये गेल्या काही दशकांत पुण्यास निघाली आणि जुनी वाढीस लागली. यांपैकी ज्या मुद्रणालयांनी सुबक मुद्रणाची दृष्टी ठेवली असे मोजके छापखाने सोडले तर मुद्रणधंद्यात झालेली ही वाढ दर्जापेक्षा विस्ताराचीच आहे असे दिसून येते. मुंबईच्या कर्नाटक छापखान्याचा वारसा आता पुण्यास लाभला आहे. 'श्रीसरस्वती' मुद्रणालयात आता संशोधनात्मक नियतकालिके आणि ग्रंथ छापले जातात. महाराष्ट्रातील सुबक मुद्रणाची चर्चा करणारा *लेखनकला* हा ग्रंथ ज्या आनंद मुद्रणालयात छापला गेला (१९२६) तिथे आजही *मराठीतील शिलालेख* यांसारखी मुद्रकांच्या सोशिकपणाचा अंत पाहणारी पुस्तके मुद्रित होत आहेत. प्रस्तुत लेखकाचे गुरुतुल्य ज्येष्ठ स्नेही मामाराव दाते यांच्या कारकीर्दीपासून ग्रंथमुद्रणास वाहिलेले 'लोकसंग्रह' मुद्रणालय, श्री. जोशी-लोखंडे यांचे ' प्रतिभा ' मुद्रणालय, इत्यादी मुद्रणालयांतून ग्रंथमुद्रण चालू आहे. जुन्या 'आर्यभूषण' प्रमाणेच नवे 'संगम' मुद्रणालय प्रामुख्याने ग्रंथमुद्रणच करीत आहे. त्यात आता किर्लोस्करवाडीहून स्थलांतरित झालेल्या किर्लोस्कर छापखान्याची भर पडली आहे. 'राजगुरु' मुद्रणालयाने एकेकाळी श्री. गानूंच्या व्यवस्थापनाखाली दर्जेदार मुद्रणाची पताका पुण्यात फडकविली होती. ते मुद्रणालय 'विश्वकर्मा' नावाने ग्रंथमुद्रणाची वाटचाल करीत आहे.

मराठी-मुद्रणात टाइप फौंडरीचे महत्त्व

३३. पहिल्या महायुद्धापर्यंतचा काळ हा वृत्तपत्र-मुद्रण आणि ग्रंथमुद्रण यांचाच काळ होता. लायनोटाइप आणि मोनोटाइप यंत्रावर इंग्रजी जुळणीस इ. स. १९०० पूर्वी दशकभर सुरुवात झाली होती. तरी मराठी आणि इतर देशी भाषांतील मुद्रणासाठी हातजुळणीवरच विसंबून राहावे लागे. म्हणून छापखान्यास टाइपफौंडरीची मदत आवश्यक होती. महाराष्ट्रातील फौंडरीचा उद्योग 'अमेरिकन मिशन' प्रेसनंतर गणपत कृष्णाजीने सुरू केला आणि जावजी दादाजींनी तो वाढीस लावला. त्याच दरम्यान पुण्यास 'आर्यभूषण' टाइपफौंडरीचा जन्म झाला आणि मुंबईस 'गुजराथी' टाइपफौंडरी निघाली ती १९०० मध्ये. 'गुजराथी' टाईपफौंडरीने ग्रंथेतर मुद्रणास आवश्यक असलेले सर्व प्रकारचे टाइप उपलब्ध करून दिले. या काळात जे जे म्हणून नवीन छापखाने निघाले आणि ग्रंथमुद्रणाची कामे करू लागले त्यांनी टाइपफौंडरीचे महत्त्व ओळखून आपल्या ग्रंथमुद्रणाच्या कारखान्यात फौंडरीचा समावेश केला होता.

मुद्रणकलेतील सुंदर मुद्राक्षरांचे महत्त्व

३४. ग्रंथमुद्रणासाठी फार मोठ्या प्रमाणावर टाइप उपलब्ध होणे आवश्यक असल्यामुळे ज्यांची स्वतःची टाइपफौंडरी आहे किंवा ज्यांना उत्तम टाइप उपलब्ध होतो अशी मुद्रणालयेच दर्जा टिकवून राहू शकली. अशा काळामध्ये १९३३ मध्ये मराठी मुद्रणासाठी मोनोटाइप यंत्रे उपलब्ध झाल्यानंतरचा इतिहास केवळ विस्ताराचा असून दर्जाच्या बाबतीमध्ये फारसा आशादायक ठरला नाही. ही गोष्ट समजावून घेण्याकरिता जुळणीतील यांत्रिक सुविधा आणि भारतीय लिप्यांतील मुद्रण यांचा थोडा विचार केला पाहिजे.

३५. युरोप खंडातील मुद्रणकलेचा इतिहास म्हणजे प्रामुख्याने मुद्राक्षरलेखनकलेचा, वळणे तयार करण्याच्या प्रयत्नाचा इतिहास आहे. छापखाना सुरू करायचा याचा अर्थ नवीन वळण तयार करून त्यावरून ग्रंथमुद्रण सुरू करावयाचे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत युरोप-अमेरिकेमध्येही अशी स्थिती होती. १८९० च्या सुमारास लायनो आणि मोनो यंत्रे प्रचारात आल्यानंतर ही स्थिती पालटली. त्यानंतरच्या काळात टाइप फौंड्र्या हळूहळू बंद होत गेल्या किंवा एकत्रित झाल्या. आपल्याकडेसुद्धा 'सेरामपूर मिशन', 'अमेरिकन मिशन', 'गणपत कृष्णाजी', 'निर्णयसागर', 'कर्नाटक' या मुद्रणलयांच्या स्वतःच्या टाइप-फौंड्र्या होत्या; आणि आजही 'मौज', 'सरस्वती', 'आर्यभूषण', 'प्रतिभा', 'चित्रशाळा' इत्यादी मुद्रणालयांमध्ये स्वतःच्या टाइप-फौंड्र्या आहेत. उत्तम टाइप उपलब्ध होण्याची हुकमी व्यवस्था असल्याशिवाय ग्रंथमुद्रण व्यवस्थितपणे करणे कठीण असते आणि म्हणून टाइप-फौंडरीची जोड आवश्यक ठरते.

मोनोटाइप-देवनागरी आणि मराठी ग्रंथमुद्रण

३६. इ. स. १९३३ मध्ये श्री. मामाराव दाते यांच्या प्रयत्नाने मोनोटाइप यंत्रावर देवनागरी लिपी उपलब्ध झाली. तत्पूर्वी अनेक वर्षे मोनोटाइप व लायनोटाइप यंत्रावर देवनागरी लिपी बसविण्याचा प्रयत्न होत होता. वृत्तपत्र मुद्रणासाठी लायनोटाइप किंवा मोनोटाइप यंत्रावर देवनागरी उपलब्ध करून देण्याची खटपट लो. टिळकांनी सुरू केली. ही गोष्ट इ. स. १९०४–१९०६ मधली. लोकमान्य विलायतेस गेले तेव्हा ते य प्रयत्नात होते. कै. बाबासाहेब विद्वांस यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "आता फक्त एक लहान मशीन मराठ्याकरिता व लिनो अगर मोनोटाइप घेणे आहे. चौकशीत आहे." वृत्तपत्रमुद्रण सुकर आणि वेगवान व्हावे म्हणून कै. टिळक प्रयत्न करीत होते. टिळकांची लिपीसुधारणा कै. सहदेवराव पिंपळे यांच्या मदतीने कै. तात्यासाहेब केळकर यांनी पुढे चालविली. याविषयीच्या वृत्तांतात ते म्हणतात :

"लायनोटाइपवर केसरीचे टाइप जुळविण्याची व्यवस्था ही मात्र परतंत्र असल्यामुळे ती टिळकांना आपल्या हयातीत अमलात आणता आली नाही.

त्यापुढेही ती आजवर अमलात आलेली नाही. तथापि लायनोटाइपवर केसरी निघावयाचा तर त्याला आधी त्या यंत्रावर बसविता येतील असे अखंड टाइप बनवावे लागणार, व असे टाइप आपण करून दिले तरच विलायतचे कारखानदार ते स्वीकारून लायनोटाइप बनवून देणार, म्हणून टिळकांनीच आपल्या कारखान्यात हे अखंड टाइप तयार केले. ही योजना टिळकांच्या मनात इ. स. १९०६ पासून घोळत होती व त्यांच्या अखंड टाइपाचा एक संपूर्ण संच त्या साली तयार झाला. फिरून त्याची सुधारणा इ. स. १९१४ साली त्यांच्याच देखरेखीखाली झाली आणि त्यानंतर त्यात आणखी सुधारणा १९२६ पासून सुरू आहे. या अखंड टाइपात कंपोज केलेला मजकूर केसरीत वेळोवेळी देण्यात येत असतो, ही गोष्ट त्या टाइपांचे वळण व इतर टाइपांचे वळण यांतील फरकावरून वाचकांच्या लक्षात आलीच आहे. या टाइपांतील सुधारणा पूर्ण झाली म्हणजे पुढेमागे कदाचित तोच टाइप संबंध 'केसरी'करता वापरण्याचा विचार आहे आणि वाचकांच्या दृष्टीने तो रूढ झाला म्हणजे तोच लायनोटाइप यंत्रावर बसवून घेण्याची योजना होईल."

३७. टिळकांच्या योजनेप्रमाणे 'निर्णयसागर'ने नवीन वळण यंत्रसुलभ होईल अशा पद्धतीने बनविले. जत संस्थानातील सेवानिवृत्त न्यायाधीश कै. के. के. गोखले, बरीच वर्षे देवनागरी लिपी मोनोटाइप यंत्रावर बसविण्याची खटपट करीत होते. त्यांचा मोनोटाइप कंपनीशी पत्रव्यवहार होत होता. परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत. त्याचा वृत्तांत त्यांनी १९२७ साली पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनापुढे निबंधरूपाने मांडला होता. श्री. गोबिल यांनी अमेरिकेत जाऊन लो. टिळकांच्या पद्धतीने लायनोटाइप यंत्रावर देवनागरी बसविली होती. देवनागरीचे निर्णयसागरी रूप कायम ठेवण्याचे या सर्वांचे प्रयत्न होते. परंतु यंत्राच्या मर्यादेमुळे ही गोष्ट साधणे शक्य नव्हते. लोकमान्य टिळकांनी अक्षरांना उभा छेद देऊन देवनागरी एकरेखीक बनविण्याची खटपट केली. त्यानंतर श्री. गणपतराव विजापुरे यांनी दीर्घ प्रयत्नाने ही योजना पूर्णत्वास नेली ती आता लायनोटाइपवर स्वीकारली आहे. श्री. मामाराव दाते यांनी निर्णयसागरी वळण कायम ठेवून मोनोटाइप यंत्रावर देवनागरी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीमध्ये असामान्य यश मिळवले. त्यांची कामगिरी ही हिंदी मुद्रण-व्यवसायातील एक क्रांतिकारक घटना ठरली, ही गोष्ट स्पष्ट आहे.

उत्तम जुळणी करण्यातील बहुविध अडचणी

३८. मोनोटाइप यंत्रावर ही जी देवनागरी उपलब्ध झाली, तिचे १२ पॉइंटमधील रूप निर्णयसागरच्या 'पायका नं. १' वरून बनविले होते. मोनोवर मोठ्या आकाराचा, १४ पॉइंट व १६ पॉइंट टाइप उपलब्ध करून देण्यात आला, तो त्याच पायका नं. १ च्या रेखाचित्रावरून मोठा केलेला होता. मोनोटाइप १२ पॉइंट टाइपामध्ये मात्रेचा

किरटेपणा, उकार, वेलांटी आणि अक्षर यांमधील अंतर इत्यादी उणिवा आहेत. ऱ्हस्व वेलांटीचे उजवे टोक शिरोरेषेस मिळत नाही. परंतु सामान्य वाचकास हातजुळणीची छपाई आणि मोनोवरील छपाई यांतील फरक जाणवत नाही. १२ पॉइंटमधे रूपाच्या दृष्टीने सिद्धता प्राप्त झाली असली तरी असंख्य कर्णयुक्त अक्षरांमुळे जुळणीमध्ये दोष उत्पन्न झाले. 'निर्णयसागरी' किंवा 'कर्नाटकी अखंड पायका', 'इंग्लिश बॉडी' इत्यादी फाउंटमधील अक्षरे सुबक दिसतात, पण त्यांची खिळेघरातील संख्या जास्त आहे. डिग्री पद्धतीने खिळाक्षरे कमी करता येतात, परंतु जस्टिफिकेशनचा किचकटपणा टाळता येत नाही म्हणून आधीच अल्पवेतनाने नाखूष असलेले जुळारी डिग्री-कंपोज करण्यास कंटाळतात. जे नवीन जुळारी तयार झाले आहेत त्यांना डिग्री-कंपोजची सवय नसते. फौंडरी टाइप मोनोटाइपच्या तुलनेने महाग पडतो. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य छापखान्यांनी मोनोटाइपचा आश्रय घेतला, आणि १२ पॉइंट आकारात, विशेषतः वृत्तपत्र-मुद्रणामध्ये तो फारच उपयोगी ठरला.

३९. मोनोटाइपवर देवनागरी बसविण्याची खटपट करण्याच्या उद्योगामध्ये त्वरित जुळणीसाठी मोनो जुळणी यंत्राचा वापर करता यावा हा हेतू होता. प्रत्यक्षात जिथे मोनो जुळणीयंत्रे होती अशा फारच थोड्या ठिकाणी तो साध्य झाला. इतर ठिकाणी मोनोवर पाडलेला टाइप सोडवून पुन्हा जुळणीस घेण्याची प्रथा रूढ झाली. मोनोटाइपच्या वापरामुळे हातजुळणीसाठी डिग्री-टाइपाचा वापर कमी झाला. जुन्या टाइप फौंडरींना वेगवेगळ्या वळणाचे टाइप पुरविण्याचा धंदा चालू ठेवणे किफायतशीर होईना. अशा प्रकारे सुबक ग्रंथमुद्रणास आवश्यक असे उत्तमोत्तम टाइप पाडणाऱ्या फौंड्ऱ्या हळूहळू संकोचू लागल्या. तरीही नामवंत छापखान्यांनी स्वतःची टाइप-फौंडरी ठेवली होती. प्रतिकूल परिस्थितीमधेही ज्यांनी महाग असूनही फौंडरी-टाइपाचा वापर चालू ठेवला त्यांना मुद्रणाचा दर्जा टिकविणे सोपे झाले. मोनो किंवा लायनोचे जे वैशिष्ट्य, की प्रत्येक वेळी नवा टाइप, ते मोनोवर पाडलेला टाइप हाताने जुळवून पुनःपुन्हा वापरण्याच्या प्रथेत नष्ट झाले.

४०. या मोनोटाइपवर जुळणी सुलभ होते, स्वस्त पडते असे सांगतात. परंतु त्यामुळे छापील पुस्तकाचा निर्मितिखर्च काही कमी होत नाही. मोनोवर देवनागरी बसविताना मुळापेक्षा वळण जरा पसरट घेणे आवश्यक ठरले. त्यामुळे त्याच आकाराच्या टंकातील मुद्रणास जागा जास्त लागू लागली. उदाहरणार्थ 'मोनोटाइप १२ पॉईंट', 'इंग्लिश फेस पायका बॉडी'पेक्षा लहान असूनही तेवढीच जागा व्यापतो. 'ग्रेट फेस इंग्लिश बॉडी' हातजुळणीचा टाइप '१४ पॉईंट मोनोटाइप'पेक्षा कमी जागा व्यापतो. हीच गोष्ट '१६ पॉईंट' टाइपाची. परंतु मुद्रण सोपे करण्याच्या खटपटीत ही गोष्ट कोणी ध्यानात घेतली नाही, आणि परिणामतः पुस्तकांची पाने वाढून वाचकावरील आर्थिक भार वाढला. हातजुळणीच्या टाइपामधेही कंत्राटी पद्धती रूढ झाल्यामुळे शब्दांमध्ये जास्त जागा टाकण्याची अनिष्ट प्रथा प्रचलित झाली. यात पानांचा भाव कमी देण्याच्या चढाओढीची

आणखी भर पडली. त्यामुळे आज महाराष्ट्रामध्ये काही मोजके छापखाने सोडले तर चांगली जुळणी होत नाही. मुद्रणालयांची वाढ फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यात व्यापारी मुद्रण जास्त आहे. ग्रंथमुद्रणाची मागणी वाढत आहे. परंतु पुरेशा प्रमाणात डिग्रीजुळणी करणारे कामगार मिळत नाहीत, ही एक चिंता करण्यासारखी गोष्ट आहे.

मोनोवर नवीन वळणाचा अभाव

४१. अखिल हिंदुस्थानात भारतीय लिप्यांतून होणाऱ्या मुद्रणाशी तुलना केली असता महाराष्ट्रात मुद्रणाचा जो दर्जा पूर्वसूरींनी उंचावला होता व समकालीन मान्यवरांनी सांभाळला आहे, तो खात्रीने उच्च आहे. परंतु हा कपिध्वज उंच ठेवावयाचा असेल, तर मुद्राक्षरलेखनकलेच्या व्यासंगात विशेष लक्ष घालून काही योजनाबद्ध कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. फौंडरीटाइपाचा वापर मोठ्या प्रमाणात हातजुळणीसाठी होत राहिला तर फौंडरींचा धंदा किफायतशीर ठरून नवीन नवीन सुबक वळणे निघू शकली असती. या शतकाच्या पूर्वार्धात नवीन वळणे करण्याच्या कामात लक्ष घालणाऱ्या पंचीगारांना या कलेवर उदरनिर्वाह करणे कठीण झाले. नवीन पंचीगार पुढे आले नाहीत. मोनोटाइपवरचे काम वाढत असल्यामुळे आणि यांत्रिक जुळणीतील फायदे पटल्यामुळे मोनोटाइप यंत्राची आयात वाढली. दर मोनोटाइप यंत्राला द्यावयाच्या किमतीत रोमन व इतर भाषांतील नवीन वळणे तयार करण्यासाठी करावा लागणारा भांडवली खर्च अंतर्भूत असतो. त्याचा फायदा देवनागरी मोनोचा वापर करणारांस नवीन वळणाच्या रूपाने मिळाला पाहिजे. त्यासाठी आग्रह धरला पाहिजे. मोनोच्या खरेदीत दीड-दोन लाख रुपये गुंतवूनसुद्धा ग्राहकांना फक्त एकच वळण उपलब्ध व्हावे, तेही मोठ्या आकारात सुबक नसावे, आणि तरीही आम्ही मोनोटाइपाचा हातजुळणीसाठी वापर करावा, ही गोष्ट देशी भाषांच्या मुद्रणविकासास खात्रीने पोषक नाही, हे अप्रिय सत्य स्पष्टपणे कोणीतरी सांगितले पाहिजे.

४२. हिंदुस्थानातील राजमान्य भाषांत उत्तरोत्तर मुद्रणाची फार मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे, ही गोष्ट ध्यानी घेऊन परदेशी कंपन्या नवीन वळणे उपलब्ध करून देतील. या नवीन वळणे करण्याच्या उद्योगात मोनो कंपनी मुळीच मागे पडणार नाही. ही गोष्ट त्यांनी जगातील शेकडो भाषांतील टाइपांची वळणे बनवून सिद्ध केली आहे. परंतु एतद्देशीय ग्रंथमुद्रकांनी नेट धरला पाहिजे. यशोगिरीवर पोहोचण्याची वाट सपाट भूमीवरून असत नाही. तद्वत सुबक मुद्रण सोपे करता येत नाही. त्यासाठी उत्तम मुद्राक्षरांचा आग्रह धरला पाहिजे, आणि जोवर सुबक वळणे जुळणीयंत्रावर उपलब्ध होत नाहीत तोवर फौंडरीटाइपात हातजुळणी करण्यात कमीपणा मानू नये.

पाठ्यपुस्तक प्रकाशन आणि मुद्रण-व्यवसाय

४३. धार्मिक पुस्तके आणि पाठ्यपुस्तके यांची छपाई प्रकाशकांस पैसा मिळवून

देते. इतर प्रकाशनांत प्रकाशकांनाच फारसा पैसा मिळत नाही. त्यामुळे लेखक आणि मुद्रकांना त्यांची झळ लागणे स्वाभाविक आहे. अशा प्रकारे वाङ्मयोत्पादन हा व्यवसायच नव्हता असे डॉ. केतकरांचे त्यांच्या काळाविषयी म्हणणे होते.

> "वाङ्मयोत्पादन हा महाराष्ट्रात अजून धंदा झाला नाही. लेखक, मुद्रक व प्रकाशक या तिघांची कार्ये जेव्हा एखाद्या व्यक्तीत एकवटतात, तेव्हा त्या व्यक्तीस आपली उपजीविका चांगल्या तऱ्हेने करता येते अशी काही उदाहरणे महाराष्ट्रात सापडतील. तथापि निव्वळ लेखक म्हणून कोणी आपली उपजीविका करू शकला अशा गोष्टी झाल्या नाहीत."[१६]

डॉ. केतकरांचे वरील विधान उद्‌धृत करून कै. आपटे आपल्या *लेखनकला* या ग्रंथात म्हणतात :

> "या विधानास काही अपवाद असेलच तर ते शालोपयोगी पुस्तक लिहिणारांचे होत. सरकारी किंवा निमसरकारी शाळांतल्या अभ्यासक्रमातली पुस्तके लिहून मोठ्या खटपटीने त्यांना विद्या खात्याची मंजुरी मिळविण्याचे भाग्य ज्यांना लाभते ते मात्र थोड्या वर्षांत स्वतंत्रपणे निर्वाह चालवून घरेदारेही बांधू शकतात. पण अशा भाग्यवान व्यक्ती फार थोड्या असतात. बहुधा ट्रेनिंग कॉलेजात किंवा विद्या खात्याशी निकट संबंध असलेल्याच लेखकांची तेथे वर्णी लागते आणि इतरांनी लिहिलेली पुस्तके चांगली असूनही ती शाळांतून चालविण्यासाठी बहुधा मंजूर केली जात नाहीत अशी तक्रार सात-आठ वर्षांपूर्वी रँग्लर परांजपे यांनी मुंबईच्या कायदे कौन्सिलापुढे सप्रमाण मांडली होती. आजही (१९२६) त्या स्थितीत विशेषसा फरक झालेला दिसून येत नाही. शालोपयोगी पुस्तकांचा वाङ्मयात अंतर्भाव होत नसल्यामुळे डॉ. केतकरांच्या विधानास बाध येत नाही."[१७]

४४. पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा हुकमी उत्पन्नाचा व्यवसाय मुद्रणालयास पावलोपावली पुरवतो आणि पर्यायाने ग्रंथमुद्रणासाठी त्यांना तंदुरुस्तीत ठेवतो. 'कर्नाटक प्रेस'सारख्या महाराष्ट्रीय मुद्रण-व्यवसायात अग्रेसरत्व संपादिलेल्या संस्थांनीच नव्हे, तर तत्पूर्वी 'निर्णयसागर'सारख्या संस्थांनीही पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा धंदा यशस्वीपणे केला आहे. पुण्याच्या 'लोकसंग्रह' मुद्रणालयास आलेल्या स्थैर्यास पाठ्यपुस्तक प्रकाशनाने हातभार लावलेला आहे. महाराष्ट्रातील एक नामांकित प्रकाशक श्री. स. कृ. पाध्ये

---

१६. केतकर, श्रीधर व्यंकटेश, *विद्यासेवक*, वर्ष १, अं. १

१७ आपटे, कै. वासुदेव गोविंद, *लेखनकला आणि लेखन व्यवसाय*, पुणे, १९२६, पृष्ठ ३०४.

अलिकडच्या एका परिसंवादामध्ये प्रकाशन-व्यवसायावर लिहिताना म्हणतात :

"पाठ्यपुस्तकांमुळे लेखकांना लाभ होतो. छापखान्यांनाही किफायतशीर काम मिळते, आणि या पुस्तकांची पद्धतशीर विक्री करून धंदा चालतो ही जाणीव प्रभावीपणाने झाली, ती तीन प्रकारच्या पुस्तकांनी. भांडारकरांची संस्कृत पुस्तके, तर्खडकरांची भाषांतरमाला आणि ना. गोखल्यांचे अंकगणित. ब्रिटिश प्रकाशकांनी राजकीय पुढाऱ्यांकरवी पाठ्यपुस्तक लिहून घेतले, ही भारतीय प्रकाशन-व्यवसायातील मोठी घटना होय. तिजमुळे अनेक लेखक–प्रकाशकांना स्फूर्ती लाभली. पद्धतशीर व्यवसाय करण्याच्या आकांक्षा उद्भवल्या आणि हा एक नवा, शिष्टसंमत व्यवसाय असल्याची खात्री पटली."

असा हा पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा धंदा लोकांच्याच हाती राहिला पाहिजे, त्याचे कारण श्री. पाध्ये असे सांगतात :

"कारण त्यामुळे धंदेवाईक प्रकाशक तयार होतो. पाठ्यपुस्तकांच्या अनुषंगाने इतर प्रकाशने पत्करता येतात. कारण साहित्यिक-प्रकाशन हे लाभदायक नसते. त्याला आधार म्हणून हक्काच्या खपाचे प्रकाशन हवे असते."[१८]

४५. प्रकाशकांचा वर्ग निर्माण होऊन सुस्थितीत आला म्हणजे पर्यायाने मुद्रण-व्यवसायास स्थैर्य प्राप्त व्हावे. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे घडलेले दिसत नाही. महाराष्ट्रातील एक अग्रेसर ग्रंथमुद्रक आणि पाठ्यपुस्तकेतर ग्रंथांचे प्रकाशक श्री. विष्णुपंत भागवत यांनी याबाबत वरील परिसंवादात केलेले विवेचन उद्बोधक ठरेल :

"मराठी प्रकाशन-व्यवसायासमोर आज उभी असलेली व दिवसेंदिवस अधिक गंभीर होत जाणारी दुसरी समस्या चांगल्या मुद्रण सोयीच्या उपलब्धतेची आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शुद्ध स्वरूपात नीटनेटके ग्रंथमुद्रण करणारी पाचपंचवीस मुद्रणालये पुण्या-मुंबईत होती. आज त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी थोडी राहिली आहे...पण नव्याने सुरू झालेली जवळजवळ सर्व मुद्रणालये इतर विविध प्रकारचे व्यापारी मुद्रण करण्यासाठी स्थापन झालेली आहेत. त्यांचा विकासही त्या दिशेनेच झालेला आहे. अगदी याच्या उलट परिस्थिती ग्रंथमुद्रणाच्या बाबतीत घडली आहे. फक्त याच कामासाठी नवी मुद्रणालये निघाल्याचे उदाहरण विरळच आहे. उलट अनेक नामवंत ग्रंथ-मुद्रणालये एकतर काळाच्या उदरात विलीन झाली आहेत, किंवा जो काही जीव धरून आहेत, त्यांचा संसार टुकूटुकू चालल्यामुळे त्यांचा विकास झालेला नाही. आज सबंध महाराष्ट्रात दोन-चार अपवाद सोडले तर ग्रंथमुद्रण करणारी

१८. पाध्ये, स. कृ., "महाराष्ट्रातील प्रकाशन–इतिहास" *परचुरे प्रकाशन पंचविशी*, मुंबई, १९७०, पृष्ठ ३५ ते ४०

बहुतेक मुद्रणालये तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या समाधानकारक नाहीत.

" साधन-सामग्रीने सुसज्ज आणि चांगले कसबी तंत्रज्ञ व कारागीर असलेले ग्रंथ-मुद्रणालय विकसित करण्यासाठी फार मोठे भांडवल व दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतात आणि असे पाठ मोडणारे प्रयत्न करून मुद्रणालय नावारूपाला आणल्यानंतर ते करणाऱ्या व्यक्तीस त्यापासून जो आर्थिक मोबदला मिळतो तो व्यापारी मुद्रकाला मिळणाऱ्या मोबदल्याशी तुलना करता फारसा समाधानकारक नसतो आणि येथेच हे असमाधान थांबत नाही. हा **मोबदलाही त्याला वेळच्या वेळी मिळत नाही.**

" व्यापारी मुद्रणाच्या कामाचे पैसे मिळण्यासाठी लागणारा अल्पकाळ व त्या उलट ग्रंथमुद्रणाच्या कामाचे पैसे मिळण्यास लागणारा काळ यांमुळे मुद्रणाच्या व्यवसायात पडू इच्छिणारा नव तरुण व्यापारी मुद्रणशाखेची निवड करतो. "[१९]

उत्कृष्ट मुद्रणाचे मानदंड

४६. ग्रंथमुद्रण व्यवसायाच्या या विशिष्ट परिस्थितीमुळे मुद्रणाच्या दर्जावर परिणाम होतो असे वरील विवेचनावरून दिसते. मुद्रणाचा दर्जा चांगला राहावा म्हणून नेहमीच प्रयत्न होत राहिलेले आहेत. विविध प्रकारची मुद्राक्षरे वापरून गणपत कृष्णाजींनी आपल्याकडे प्रथमतः दर्जेदार मुद्रणास सुरुवात केली. त्या काळात शिळायंत्रावरील छपाईत उत्तमोत्तम हस्ताक्षरांचा उपयोग होत असे. त्या सुलेखनाच्या तुलनेने मुद्राक्षर-मुद्रण लोकप्रिय करण्यासाठी अशा प्रयत्नांची जरुरी होती. 'निर्णयसागर'च्या सुरुवाती-पासूनच तेथील सुंदर मुद्राक्षरांमुळे मराठी, संस्कृत, हिंदी या भाषांच्या छपाईस सुबक-पणा येत गेला आणि उत्कृष्ट मुद्रणाचे मानदंड निर्माण झाले. वर म्हटल्याप्रमाणे सर्व-साधारण प्रकाशनात नफा नसला तरी सुबक मुद्रण करण्याकडे तेव्हा प्रवृत्ती असे.

४७. *लेखनकला* या पुस्तकात कै. वा. गो. आपटे यांनी सुंदर मुद्रण का आव-श्यक आहे आणि ते साधण्यासाठी काय करावे याचे उद्‌बोधक विवेचन केले आहे :

" पुस्तक दिसण्यात सुंदर व चित्ताकर्षक दिसले म्हणजे ते साहजिकच हातात घेऊन वाचावेसे वाटते. पुस्तकाची पहिली परीक्षा त्याच्या बाह्य सौंदर्यावरून होते. म्हणून त्याचे बाह्यांग चित्ताकर्षक करणे अवश्य असते. पुस्तकाचे बाह्यांग सुंदर व चित्ताकर्षक करावयाचे म्हणजे अर्थात त्याचा आकार त्याला शोभेल असा ठेवणे, कागद पांढरा स्वच्छ व चांगला वापरणे, टाइप चांगला वळणदार आणि कोरा घालणे, आणि छपाई डोळ्याला सुंदर दिसेल व पाहणारांचे मन

१९ भागवत, वि. पु., "प्रकाशन-व्यवसाया-पुढील काही समया", *परचुरे प्रकाशन पंचविशी*–१९७०, पृष्ठ ४१ ते ४४.

प्रसन्न होईल अशी करणे, या सगळ्या गोष्टींकडे पाहावे लागते. पुस्तकांचे अंतरंग कितीही चांगले असले तरी त्याचे बाह्यांग चित्ताकर्षक नसल्यास ते वाचण्याची बुद्धी माणसाला लवकर होत नाही.

" चांगल्या छपाईला थोडा अधिक खर्च लागतो. पण हा केलेला अधिक खर्च अनाठायी झाला असे समजू नये. कारण, त्याच्या योगाने पुस्तकाच्या सौंदर्यात, आणि चित्ताकर्षकतेत भर पडते व त्यामुळे पुस्तकाच्या खपालाही साह्य होते.

" एखादा मुद्रक कमी दराने पण छपाईचे काम वाईट रीतीने करणारा असला, तर त्याच्याकडे काम न देता थोड्या अधिक दराने पण चांगले काम करणाऱ्या छापखान्याकडूनच छपाईचे काम करवून घ्यावे. तेथे कंजूषपणा केल्यास पुस्तकाचे अंतरंग चांगले असताही केवळ छपाई वाईट झाल्यामुळे पुस्तकाचा आदर व्हावा तसा होत नाही, आणि लेखकाचा हिरमोड होतो व असला कंजूषपणा एकंदरीने पश्चात्तापाला कारण होतो. "[२०]

महाराष्ट्रातील मुद्रक संघटना

४८. महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मुद्रक संघटना. १९१९ मध्ये पुणे येथे मुद्रक संघाचा जन्म झाला, ही गोष्ट तेव्हा अखिल हिंदुस्थानात अपूर्व होती. १९३७ आणि त्यानंतर १९३९ मध्ये महाराष्ट्रातच पुण्यात अखिल भारतीय मुद्रण परिषदा भरविण्यास आल्या. १९३९ मध्ये प्रसिद्ध पत्रपंडित तुषारकांती घोष यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या, मुद्रण परिषदेस मी उपस्थित होतो. या परिषदेपुढे ' महाराष्ट्रातील मुद्रण व्यवसाय ' या विषयावर मी एक निबंध वाचला होता. मुद्रण संघटनेमधील अग्रेसर अशा पुणे मुद्रक संघाने १९४९ मध्ये महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे अधिवेशन पुण्यामध्ये भरविले व त्या वेळेपासून महाराष्ट्रामध्ये जिल्हा मुद्रण संघटनांची स्थापना होऊ लागली. तत्पूर्वी फक्त पुणे व सांगली येथे मुद्रक संघ होते.

मुद्रण-परिषद अध्यक्षांचे विचार

४९. महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे पहिले अधिवेशन (१९४९) श्री. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. श्री. चितळ्यांच्या या अध्यक्षीय भाषणामध्ये लिपिविचार, ग्रंथकार व प्रकाशक यांचे संबंध, अशा मूलभूत प्रश्नांशिवाय हस्तलिखिते कशी तयार करावीत अशा अत्यंत महत्त्वाच्या परंतु मामुली वाटणारे विषयसुद्धा चर्चिले होते. या परिषदेच्या द्वितीय अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. य. रा. दाते. त्यांनी मुद्रण-शिक्षणाची सोय करण्याची

---

२०. *लेखनकला आणि लेखन व्यवसाय*, पृष्ठे ३२३–५

आवश्यकता, भारतात यंत्रसामग्री उपलब्ध होणे आणि मुद्रणातील प्रगती, याकडे लक्ष वेधले तर तिसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. विठ्ठलराव बागळे यांनी मुद्रणाच्या व्यावसायिक बाजूंचा विचार केला. चौथ्या आणि पाचव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. विष्णुपंत भागवत हे स्वतः ग्रंथमुद्रक होते. त्यांनी मुद्रण-दर्जाचा मूलभूत प्रश्न उपस्थित केला.[२१]

"......छपाईचा दर्जा सुधारलेला नाही, उलट तो खालावलेला आहे. (त्याला अनेक कारणे आहेत.)...त्यांच्याबरोबर दुसरे एक महत्त्वाचे कारण माझ्या मते आहे. ते म्हणजे आपण मुद्रक आपल्या व्यवसायाशी पूर्वीच्या इतके सच्चे राहिलेलो नाही. आपल्याकडे होणारे काम रोजच्या रोज अधिकाधिक चांगले व्हावे असे मनापासून आपल्याला आज वाटत नाही. युद्धकाळात काम मिळत होते; कसेही केले तरी खपून जात होते; त्यामुळे आपल्या मनाला त्याची सवय लागली; आणि आपले काम वाईट झाले.

"आपल्या छापखान्यात छापलेले पुस्तक वाचकांना नीट वाचताही येणार नाही असे असले तरी त्याबद्दल आपल्याला काही वाटेनासे झाले.... शालोपयोगी पुस्तकांच्या बाबतीत प्रकाशकांप्रमाणेच मुद्रकावरही फार मोठी नैतिक जबाबदारी आहे असे मी म्हणतो. आज आपण आपली जबाबदारी हे नैतिक कर्तव्य पुरेशा कसोशीने पार पाडतो आहो, असे काही आपल्याला म्हणता यावयाचे नाही.

"......प्रकाशकांना जर त्यांच्या कर्तव्याची जाणीव नसेल तर ती त्यांना करून दिली पाहिजे. धंद्यात चढाओढ अवश्य करावी, पण ती मुद्रणमूल्यांचा बळी न देता करावी. प्रथम कमी दर घ्यावयाचा आणि मागाहून त्या दरात परवडत नाही म्हणून कामाचा दर्जा खालवावयाचा असे करू नये."

५०. वरीलप्रमाणे आत्मपरीक्षण केल्यावर श्री. भागवतांनी निर्दोष मुद्रणप्रत, यंत्रज्ञ आणि शाई-कागदाचे उत्पादक यांच्याशी संपर्क, योग्य निर्मिती मूल्य काढण्याची व्यवस्था इत्यादींचे विवेचन केले असून शेवटी सुबक मुद्रणास आवश्यक अशी टाइपांच्या विविध वळणांची आवश्यकता प्रतिपादली आहे :

"देवनागरी लिपीतील मुद्रणाची कलात्मकता वाढायला हवी असेल तर इतर प्रयत्नांबरोबर नव्या नव्या वळणाचे टाइप प्रचारात आणण्याची खटपट करणेही आवश्यक आहे पण ते बोलणे जितके सोपे आहे तितके ते प्रत्यक्षात आणणे कठीण आहे. अक्षरांचे एक नवे वळण टाइपावर बसवावयाचे हे अतिशय

---

२१. भागवत, विष्णु पुरुषोत्तम, *अध्यक्षीय भाषण*, महाराष्ट्र मुद्रण परिषद अधिवेशन चौथे – सोलापूर – १९५५

जिकिरीचे, कौशल्याचे व खर्चाचे काम आहे...आतापर्यंतचे त्याबाबतचे सर्व काम व्यक्तिगत जबाबदारीवर झालेले आहे.

"मराठी मुद्रण-व्यवसाय त्या सर्व व्यक्तींचा कायमचा ऋणी आहे. पण यापुढे हे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व सतत झाले पाहिजेत. सहकारी पायावर झाल्यासच ते प्रयत्न होणे शक्य आहे व ते तसे झाले तरच त्यात यश मिळण्याची शक्यता अधिक आहे. परिषदेच्या छायेखाली तसा काही प्रयत्न करणे शक्य आहे का ?"

५१. श्री. भागवतांचा हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे. सातव्या अधिवेशनाचे अध्यक्ष आर्यभूषणचे श्री. वि. अ. तथा शासाहेब पटवर्धन सांगतात :

"आजवरच्या सवईने असले (चोखंदळ) गिऱ्हाईक नकोसे वाटते. ही वृत्ती जितक्या लवकर आपण बदलू, तितक्या द्रुत गतीने आपल्या मुद्रणाचा दर्जा वाढणार आहे....दाम तसे काम या तत्त्वावर दाम कमी मिळतात म्हणून निकृष्ट कामे करणे योग्य ठरणार नाही. व्यावसायिक सचोटी सुटली की, व्यवसायाला उतरती कळा लागेल."

नंतरचे अध्यक्ष महाराष्ट्रातील मुद्रणशिक्षणाचे एक प्रवर्तक श्री. गांगल. त्यांनी मुद्रण शिक्षणाची जबाबदारी मुद्रण व्यावसायिकांची आहे हे महत्त्वाचे सूत्र सांगितले. त्याच बरोबर किमान वेतन कायद्याने मुद्रकांवर आर्थिक ओझे घालीत असताना सरकारवर जी जबाबदारी येत होती ती सरकारने साफ टाळली आहे असे विधान केले. आठव्या व नवव्या अधिवेशनांचे अध्यक्ष कै. बांबर्डेकर यांनी "वेतनाचा संबंध उत्पादनाशी जोडला जाईल तो दिवस देशाच्या औद्योगिक इतिहासात क्रांतिकारक समजावा लागेल" असे सांगताना उत्पदनातील दुसरा महत्त्वाचा घटक यंत्रसामग्री त्याच्या सुस्थितीसाठी योजना आखून अखिल महाराष्ट्रात पायपिटी केली. दहाव्या आणि अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष मामाराव दाते हे स्वतः मुद्राक्षरतज्ज्ञ. त्यांनी नागरी लिपी यंत्रसुलभ करण्याच्या यक्षप्रश्नावर भर दिला. बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. शेंबेकर म्हणतात, "आपण व्यवसायाशी समरस झाल्याशिवाय धंदा ऊर्जितावस्थेस आणू शकणार नाही."

इथवर कामाचा दर्जा वाढविण्याकडे सर्वच अध्यक्षांचे लक्ष होते असे दिसते.

परिषदांनी दुर्लक्षिलेला महत्त्वाचा विषय

५२. पुढील अध्यक्षांनी मुद्रण-व्यवसायास कर्ज देणे, सरकारी मुद्रणालयांचा विस्तार थांबविणे, सरकारी कामाची टेंडरे न मागविणे, क्रमिक पुस्तके खाजगी छापखान्यांकडून छापवून घेणे इत्यादी आर्थिक आणि निव्वळ व्यावसायिक अडचणींवर आणि मागण्यांवर भर दिला असे दिसून येईल. मुद्रण परिषदेच्या कामगिरीचा आढावा घेताना एक गोष्ट मान्यवर मुद्रकांच्या चर्चेतून पूर्णतया सुटलेली दिसते आणि ती

म्हणजे 'मार्केट सर्व्हे' किंवा नवीननवीन निर्माण होणाऱ्या आणि होऊ शकणाऱ्या कामाचा आढावा घेऊन ती चांगल्या रीतीने कशी करून देता येतील यासाठी मुद्रकांना मार्गदर्शन करणे. जी कामे आधीच खाजगी क्षेत्रात होत आहेत त्यावर भर देण्याऐवजी महाराष्ट्रात जी नवीन कामे उपलब्ध होऊ शकतील त्यांचा विचार करण्याची व त्यासाठी मुद्रकांना तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. सरकारी खात्यांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी छापकामासाठी टेंडरे मागवू नयेत, दर ठरवून कामे द्यावीत, असे ठराव मुद्रण परिषदांतून पास होत आले आहेत. टेंडर मागविण्याचे दोन हेतू असतात. चढाओढीत (Competition) ज्यांची इच्छा असेल त्यांना भाग घेऊ द्यावा आणि त्यायोगे शक्य तो कमी भाव मिळवावा. दुसरा हेतू छापखाना किंवा छापखाने वस्तुनिष्ठ पद्धतीने निवडता यावेत. दर ठरवून कामे देण्याची पद्धती अवलंबिली तर संबंधित अधिकाऱ्यांच्या निवड बुद्धीवर विश्वास ठेविला पाहिजे. त्याचप्रमाणे जास्त काम मिळविण्यासाठी प्रसंगी कमी दर देण्याची तयारी दाखविणाऱ्या मुद्रकांना मुद्रक संघटनांनी रोखले पाहिजे. त्यासाठी संघटनेचे मुद्रकांत वजन असले पाहिजे. याबाबत मुद्रण परिषद जागरूक आहे. याबाबत परिषदेच्या तळेगाव अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. सोनार यांच्या मार्गदर्शनाखालील कार्यकारणीने केलेल्या ठरावातील उतारा देतो.

> "सुरुवातीस मुद्रणाच्या कामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. निविदांतील तज्ज्ञांच्या मदतीने विचार करून मंडळाने मुद्रणाचे व पुस्तक-बांधणीचे दर ठरविले. त्यामुळे मुद्रण-धंद्यातील अनिष्ट व जीवघेणी स्पर्धा टळली. मंडळाने गेली तीन वर्षे अवलंबिलेले दर निश्चित करून त्यानुसार निविदा न मागविता काम करण्याची पद्धत, यापुढेही चालू ठेवणे सर्वांच्या हिताचे आहे असे परिषदेचे निश्चित मत आहे."

मुद्रण व्यवसायाची खानेसुमारी

५३. दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र राज्यातील मुद्रणालयांच्या जंत्री मध्ये ३१४४ मुद्रणालयांची नोंद आहे. यांपैकी पश्चिम महाराष्ट्रांत ११४१, विदर्भात ५०२ तर मराठवाड्यात फक्त १६८ मुद्रणालये होती. या धंद्यात एकूण ३९,००० कामगार होते, या व्यतिरिक्त बांधणी खात्यातून आणि न नोंदलेल्या मुद्रणालयांतून अनेक कामगार होते. आज मुद्रणालयांची संख्या सुमारे ४,००० असावी, आणि त्यांतून सुमारे ५०,००० कामगार काम करीत असावेत, असा माझा अंदाज आहे. आमचे ज्येष्ठ स्नेही श्री. शासाहेब पटवर्धन यांनी महत्प्रयासाने संपादिलेल्या जंत्रीत त्यांनी दिलेला तक्ता इथे उतरून घेतो.[२२]

---

२२. पटवर्धन, वि. अ. *Maharashtra State Printers Directory 1968*

महाराष्ट्रातील मुद्रणालये आणि कामगार

प्रदेश	मुद्रणालये		कामगार संख्या	मुद्रणालयांची वर्गवारी : कामगार			
	नोंदलेली	माहिती पाठविलेली		१-२	३-९	१०-४९	५० वर
पश्चिम महाराष्ट्र	११४१	१०७६	९८१०	२५९ (२५%)	६४५ (६१%)	१४४ (१२%)	२७ (२%)
मराठवाडा	१६८	१६१	८७९	५१ (३२%)	९९ (६१%)	१० (६%)	१ (१%)
विदर्भ	५०२	४३४	४१३१	१३६ (३२%)	२४७ (५७%)	४१ (९%)	८ (२%)
एकूण	१८११	१६७१	१४८२०	४४६	९९१	१९५	३६
मुंबई	१३१३	१११७	२४१०४	८० (७०%)	६७२ (६०%)	२८९ (२६%)	७३ (७०%)
एकूण	३१२४	२७८८	३८९२४	५२६	१६६३	४८४	१०६

महाराष्ट्रातील मुद्रणालयांचे स्वरूप

५४. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांव्यतिरिक्त भागातील मुद्रणालये लहान असणे स्वाभाविक आहे. अशा मुद्रणालयांतून एखाददुसरे ट्रेडल असते. एकदोन कामगार असतात. अशा प्रकारची मुद्रणालये सुमारे वीस टक्के आहेत तर सुमारे साठ टक्के मुद्रणालये दहाहून कमी कामगार असलेली अशी आहेत. ग्रंथमुद्रण करणारी मुद्रणालये याहून जास्त कामगार असलेल्या गटात येतात. दहा ते पंचेचाळीस कामगार असलेली एकूण मुद्रणालये पाचशेहून कमी आहेत. या वर्गातील मुद्रणालयांचा आकार किफायतशीर मुद्रणास अनुकूल असतो. अशा मुद्रणालयांस चांगली यंत्रसामग्री आणि टाइपांचे प्रकार बाळगणे सोपे असते. ही गोष्ट ध्यानात घेता या गटातील मुद्रणालयाची वाढ करण्याचे प्रयत्न व्हावयास पहिजेत. ग्रंथमुद्रणालयास चांगले जुळणी खाते लागते आणि ग्रांथिक मुद्राक्षरांचा (Book faces) साठा असावा लागतो.

मुद्रण यंत्रसामग्रीची मोजदाद

५५. महाराष्ट्रातील मुद्रणालयांतून एकंदर मुद्रणसाहित्य किती प्रमाणात उपलब्ध आहे त्याची नोंद झालेली नाही, परंतु उपरिनिर्दिष्ट जंत्रीमध्ये एकूण कामगार आणि मुद्रणयंत्रे यांची नोंद आहे त्याचा तक्ता खाली देतो.

विभाग	एकूण मुद्रणालये	प्लेटन यंत्रे एकूण	प्लेटन यंत्रे स्वयंचलित	सिलिंडर यंत्रे एकूण	सिलिंडर यंत्रे स्वयंचलित	एक ट्रेडल मुद्रणालये	सिलिंडर-विना मुद्रणालये
पश्चिम महाराष्ट्र	११४१	१६८८	७७	४०२	८७	५८२	८८६
मराठवाडा	१६८	२२८	२	१७	२	१०४	१४९
विदर्भ	५०२	८११	१४	१९७	४७	२३३	३५८
मुंबई	१३१३	२७५२	२९३	१०४४	६१३	१५३	७७६
एकूण	३१४४	५४७९	३८६	१६६०	७४९	१०७२	२१६९

या तक्त्यावरून विदर्भ आणि मराठवाड्यात स्वयंचलित प्लेटन यंत्रे आणि सिलिंडर यंत्रे अत्यंत कमी प्रमाणात आहेत ही गोष्ट स्पष्ट होते. या भागातून ग्रंथमुद्रणाची चांगली सोय नाही आणि म्हणून ती व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत असे दिसून येते. कारण, गेल्या नऊ-दहा वर्षांत मराठवाड्यात आणि विदर्भात मुद्रणालयांत झालेली वाढ अनुक्रमे १४० टक्के आणि ७० टक्के आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

मुद्रण व्यवसायातील कामगारांचा तुटवडा

विभाग	१९६१ मुद्रणालये	१९६१ कामगार	१९६८ मुद्रणालये	१९६८ कामगार	टक्के वाढ मुद्रणालये	टक्के वाढ कामगार	मुद्रणालये असलेली गावे
पश्चिम महाराष्ट्र	६८९	७७८५	११४१	९८१०	६६ टक्के	२६ टक्के	१७२
मराठवाडा	७०	३७९	१६८	८७९	१४० टक्के	१३२ टक्के	३४
विदर्भ	२८८	३८६५	५०२	४१३१	७० टक्के	७० टक्के	६३
मुंबई	८१३	१८३८९	१३१३	२४१०४	७१ टक्के	३१ टक्के	—
एकूण	१८६०	२९४१८	३१२४	३८९२४	६८ टक्के	३६ टक्के	२६९

५६. वरील तक्ता फार उद्‌बोधक आहे. एकूण मुद्रणालयांत ६८ टक्के वाढ झाली असली तरी मुद्रण-कामगारांतील वाढ फक्त ३६ टक्के आहे. याचा अर्थ नवीन मुद्रणालयांनी त्यांना लागणारे कामगार जुन्या मुद्रणालयातून पळविले असा दिसतो.

स्वयंचलित यंत्रसामग्री बसविल्यामुळे पूर्वीच्या प्रमाणात कामगारांची संख्या वाढत नाही, हे मुद्दा एक कारण असावे. कामगार पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत याचे कारण मुद्रणशिक्षणाची सोय नाही. मुद्रणालयांची वाढ झपाट्याने होत राहिल्यामुळे चालू छापखान्यातून कामगार तयार होण्यास वेळच नसतो. याशिवाय मुंबईसारख्या ठिकाणी यंत्रचालकांना आणि काही विशिष्ट मुद्रण विभागातील कामगारांना मिळणारे वेतन सोडले तर बहुसंख्य मुद्रण कामगारांना मिळणारे वेतन पुरेसे आकर्षक नाही. इंग्लंडमध्ये जुळणिसाला मिळणारे वेतन इतर धंद्यांतील कुशल कामगाराला मिळणाऱ्या वेतनाहून जास्त असते. आपल्याकडे हे प्रमाण व्यस्त आहे. त्यामुळे जुळणीसाठी माणसे मिळत नाहीत.

मुद्रण शिक्षणाची व्यवस्था

५७. मुद्रकांची संघटना उभारण्यास जसा पुण्याने पुढाकार घेतला त्याचप्रमाणे मुद्रणशिक्षणासही पुण्यानेच सुरुवात केली. 'पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन'मार्फत मुद्रणशिक्षणाचे वर्ग चालतात. पुण्याच्या विद्यार्थी गृहातर्फे मुद्रणशाळेचा उपक्रम करण्यात आला आहे. १९३७ पासून मुंबईच्या व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटमध्ये शासकीय उद्योग खात्यामार्फत मुद्रणशिक्षणाचे वर्ग सुरू झाले. त्यानंतर हिंदुस्थान सरकारच्या मुद्रणशिक्षण योजनेप्रमाणे ' पश्चिम विभागीय मुद्रणशाळे'ची मुंबईत स्थापना झाली. या संस्थेत दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. तीन वर्षांचा पूर्ण वेळ आणि चार वर्षांचा अर्ध वेळ अभ्यासक्रम असून त्याचे अक्षरमुद्रण आणि प्रतिरूपमुद्रण असे दोन विभाग आहेत. या संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी थोड्या अभ्यासाने मुद्रणालयात खातेप्रमुखांची कामे करू शकतील. अलिकडे उमेदवार कायद्यानुसार मुद्रणातील प्रत्येक विभागात प्रत्यक्ष काम करण्याचे शिक्षण घेण्यासाठी उमेदवार घेण्यात येऊ लागले आहेत. ही योजना मुंबईव्यतिरिक्त इतर शहरांना अजून लागू व्हावयाची आहे.

सरकारी क्षेत्रातील मुद्रणालये

५८. महाराष्ट्रात मुद्रणधंद्यात गुंतलेल्या सुमारे ५० हजार कामगारांपैकी सरकारी क्षेत्रामध्ये येणाऱ्या छापखान्यांत सुमारे ४५३३ म्हणजे ९ टक्के कामगार गुंतलेले आहेत.[२३] त्याशिवाय सुमारे ७०० कैदी-येरवडा व नागपूर येथील कारागृह मुद्रणालयात काम करतात. यंत्रसामग्रीच्या बाबतीत सरकारी छापखाने खाजगी छापखान्यांना तुल्यबल असे आहेत. या सरकारी छापखान्यांची वाढ होऊ नये, जास्तीत जास्त छापकाम खाजगी क्षेत्रात करून देण्यात यावे अशी मागणी मुद्रण परिषदांमधून होत असते. या संदर्भातील सरकारी क्षेत्रातील छापखान्यात होणाऱ्या कामाचा तथाकथित

23. *Activities and Progress of Government Presses in Maharashtra*, Government Central Press, Bombay, 1967.

निकृष्ट दर्जा, जास्त खर्च आणि विलंब याचा उल्लेख करण्यात येतो. महाराष्ट्रातील मुद्रण उद्योगाचा जो इतिहास वर दिला आहे. त्यावरून एक गोष्ट लक्षात येईल ती ही की, अगदी सुरुवातीच्या काळामध्ये सरकारचे काम एकदोन खाजगी मुद्रणालयांत होत असे. तरी त्यानंतरच्या काळामध्ये सरकारी छापखान्यांनी सरकारी कामाच्या बाबतीतच नव्हे तर पाठ्यपुस्तक आणि इतर ग्रंथमुद्रणातही मोलाची कामगिरी केलेली आहे. ज्या काळी खाजगी क्षेत्रामध्ये मुद्रण आणि वितरण व्यवस्थित प्रमाणात सुरू झाले नव्हते, त्या वेळी सरकारी क्षेत्रातील मुद्रण आणि वितरण समाजाची गरज भागवीत असे. १८८९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या '*मुंबईचा वृत्तांत*' या पुस्तकामध्ये खालील उल्लेख आढळतो.

> " गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डेपो हे हल्ली काळबादेवीच्या रस्त्यावर आहे. ह्यात सरकारी शालोपयोगी व दुसरी अनेक भाषांतील पुस्तके व उत्तम तऱ्हेचे नकाशे येथे विकत मिळतात. " २४

दुसऱ्या महायुद्धापूर्वी सरकारी छापखान्यांतून बाहेर पडलेली काही पुस्तके, विशेषतः गॅझेटियर, पेशवा दफ्तर आणि रेसिडेन्सी रेकॉर्डस इत्यादी पुस्तके सुबक मुद्रणाचा नमुना म्हणून उल्लेखता येतील. यांच्या मुद्रणात टाइप, कागद आणि प्रत्यक्ष मुद्रण या बाबतीमध्ये सौंदर्यदृष्टी आणि योजना दिसून येते.

शासकीय मुद्रणालयाची कामगिरी

५९. ज्या काळात महाराष्ट्रामध्ये शिळामुद्रण आणि नंतर प्रतिरूप मुद्रण खाजगी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नव्हते, अशा काळात पुण्याच्या शासकीय फोटो झिंको प्रेसमध्ये उत्तम मुद्रण होते असे. नकाशे छापण्यात हे मुद्रणालय अग्रेसर होते. ठसे करणे आणि त्यापासून रंगीत छपाई करणे या बाबतीतही हा छापखाना वाकबगार होता. ' सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट 'मध्ये पारितोषिकपात्र झालेली चित्रे वार्षिक अहवालात तेव्हा छापण्यात येत. ते काम फोटो झिंको प्रेसमध्ये होई. येरवडा येथील कारागृह मुद्रणालयात कैद्यांकडून चांगली छपाई करून घेण्यात येई. तेथे अद्ययावत यंत्रसामग्री आणि अशा प्रकारचे काम करणारे हे मुद्रणालय अखिल हिंदुस्थानात एकमेव असावे. याच मुद्रणालयात प्रथम सरकारी छापकामाचे निर्मिती मूल्य काढण्याची पद्धती, कौशल्याधिष्ठित वेतनपद्धती (Efficiency Wage) इत्यादी व्यवस्थापकीय प्रश्नाबाबत चांगला विचार झाला होता. ही गोष्ट १९१३ ते १९२६ या काळातील आहे.

६०. दुसऱ्या महायुद्धाच्या काळामध्ये सर्व सरकारी छापखान्यांवर कामाचा ताण पडल्यामुळे दर्जापेक्षा विस्ताराकडे जास्त लक्ष पुरवले गेले ही गोष्ट साहजिकच होती. यंत्रसामग्री नवी आली नाही. त्वरित वाढ झाल्यामुळे उत्तम कारागीर शिकून

२४. आचार्य बाळकृष्ण बापू आणि शिंगणे मोरो विनायक : *मुंबईचा वृत्तांत*. मुंबई, १८८९, पान २६८

तयार व्हायला वेळ मिळाला नाही. इत्यादी कारणांमुळे कामाचा दर्जा खालावला. नंतरच्या काळामध्ये, विशेषतः स्वातंत्र्यानंतरच्या लोकशाही कारभारामध्ये, नित्य वाढते काम वेळेवर करून देण्याची कामगिरी या छापखान्यांनी बजावली आहे. विधान-सभेची आणि विधान परिषदेची कामे मराठीत होऊ लागल्यानंतर, अंदाजपत्रके, कायदे-कानू आणि इतर शासकीय कामे इंग्रजीबरोबरच मराठी आणि हिंदी भाषांमध्ये करून देण्याची प्रचंड जबाबदारी या छापखान्यांनी उचलली आहे.

६१. सरकारी छापखाने कशा परिस्थितीत कामे करतात त्याची योग्य माहिती नसल्यामुळे या छापखान्यांच्या कामाबाबत सर्वसामान्यांमध्येच केवळ नव्हे तर मुद्रकां-मध्येही बराच गैरसमज आढळून येतो. खाजगी मुद्रकाचा शासकीय मुद्रण खात्याशी संबंध येतो तो बहुधा छापखान्याची बिले पास करून घेण्याच्या बाबतीत. त्यामुळे सरकारी छापखान्याच्या वाढीमुळे खाजगी क्षेत्रातील कामे कमी होतात असाच सर्वत्र गैरसमज असल्याचे आढळते. अलीकडे मुद्रण परिषदेने पुढाकार घेऊन वार्षिक अधिवेशनात सरकारी प्रतिनिधी बोलविण्याचे ठरविले. नागपूर अधिवेशनापासून अशा अनेक मुद्रण परिषदांच्या अधिवेशनात मी स्वतः शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री खात्याचा उपसंचालक या नात्याने उपस्थित राहिलो. शासकीय मुद्रण विभागाने राज्य-पातळीवर दोन मुद्रक संमेलने भरविली आणि त्यात ठरलेली धोरणे अमलात आणण्या-साठी स्थाई समिती नेमली तिचा मी पहिला कार्यवाह होतो. या संमेलनाच्या निर्णयाप्रमाणे उत्तम मुद्रणासाठी पारितोषिके देण्याची प्रथा शासनाने रूढ केली. या सर्व गोष्टींमुळे खाजगी क्षेत्रातील मुद्रकांचा शासकीय मुद्रण खात्याशी, पर्यायाने शासनाशी, संबंध दृढ झाला. गेल्या निवडणुकांपूर्वी मतदारांच्या याद्या छापण्याच्या कामात मुद्रण परिषदेने सहकार्य दिले. पानाचे दर ठरवून कामे करून घेण्यास मदत केली. त्यामुळे एरवी चालणारी जीवघेणी स्पर्धा टळली आणि महाराष्ट्रातील खाजगी मुद्रणालयास त्याचा फायदा मिळाला.

शासकीय आणि खाजगी मुद्रणातील सहकार्य क्षेत्र

६२. सरकारी विभागातील मुद्रण आणि खाजगी मुद्रण क्षेत्र यामध्ये कामाबाबतच नव्हे तर काम करण्याच्या पद्धतीमध्ये आणि कामाच्या स्वरूपामध्ये मध्यंतरीच्या काळामध्ये जे फार मोठे अंतर निर्माण झाले होते ते आता नष्ट होण्याच्या मार्गात आहे. शासनाच्या विविध विभागांचे जे छापकाम शासकीय मुद्रणालयांतून होते त्यांतील अनावश्यक मुद्रणास आळा बसावा म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रत्यक्ष शासकीय कामा-व्यतिरिक्त जे प्रकाशन होते त्याचा खर्च त्या त्या खात्याच्या अंदाजपत्रकातून "द्यावा असा आदेश काढला, यामुळे शासकीय छापखाने आणि खाजगी मुद्रणक्षेत्र यामध्ये कामाच्या दर्जाच्या बाबतीतच नव्हे तर निर्मिती मूल्यांच्या बाबतही समान पातळी निर्माण होणार आहे असे दिसते. याबाबत मुंबईच्या शासकीय मुद्राणालयाचे व्यवस्थापक श्री. स. आ. सप्रे म्हणतात :

"The role that Presses in the public sector are called upon to play is a most complex one. It is quasi-commercial, A purely commercial approach is totally inappropriate. For instance, when important decisions are to be implemented the cost of printing tends to be a very minor matter and what is essential is to execute the printing work with maximum speed, irrespective of the cost, but this does not mean that printing costs should always be ignored, which is obviously wasteful.

"To ensure this, Government of Maharashtra has recently adopted certain measures as recommended by the Administrative Recognition Committee. Briefly, printing work is now classified as nonchargeable (Bills, Acts, Budget etc.) and chargeable (Ad hoc reports, publicity, material etc.) For chargeable work, departments are required to pay the printing charges from their own grants. In addition the departments are to pay extra charges for urgent work. A penalty is also imposed for delay in returning the proofs. The Government Presses in Maharashtra, which were hitherto purely a service department, have now become a quasi-commercial department.

"The range of Government Printing and publishing is ever-widening. It is therefore inevitable that it should overlap to some extent the normal sphere of activities of the private sector. Consider, for instance, the printing of Textbooks. The requirements of Textbooks are simply vast and the production facilities available in both sectors, public and private, are hardly adequate to fulfil the requirements. All these facilities must be utilised to the utmost in meeting our requirements. Apparently the two sectors may compete with each other but such competition should prove to be healthy in the long run. It should lead to greater efficiency and economy in both sectors. At any rate, it seems inevitable that the presses in the public sector will have to adopt 'the competitive public enterprise approach.'"[25]

---

25. Shri Sapre S. A., 'Problems of Presses in the public sector' *Excerpts from India A challenge to printers.* 13th All India Printers Conference, Bombay, 1969, pp. 38-39.

ग्रंथ-मुद्रण व्यवसायापुढील अडचणी

६३. महाराष्ट्रातील एकंदर मुद्रण-व्यवसायाची पाहणी करताना ग्रंथमुद्रणाच्या चर्चेस विशेष महत्त्व दिलेले आढळून येईल. त्याचे कारण असे की, व्यापारी मुद्रण त्यातील फायद्याच्या ओढीने आपोआप वाढत असते. त्याचे गिऱ्हाईक म्हणजे कारखानदार. विक्री करण्यासारख्या वस्तू तयार करणारे, चोखंदळ असल्यामुळे व त्या कामाची व्यवस्था करणाऱ्या जाहिरातसंस्था संघटित असल्यामुळे कामाचा दर्जा टिकतो आणि वाढतो. कामास भाव चांगला मिळतो आणि तो दर्जावर अवलंबून असतो. म्हणून उत्तम व्यापारी मुद्रणकाम करणारी मुद्रणालये वाढीस लागतात. ग्रंथ-मुद्रणाचे तसे नाही. त्याचे कारण ग्रंथमुद्रण करून घेणारे जे प्रकाशक आहेत, त्यांपैकी काही सुबुद्ध प्रकाशक सोडून दिले तर भावात घासाघीस, पैसा देण्यात विलंब, अशी सर्वत्र परिस्थिती असल्याचे दिसून येते. याचा व्यवसायावर अनिष्ट परिणाम होतो. ग्रंथमुद्रणास विपुल भांडवल लागते. ते गुंतविलेले छापखाने जेरीस येतात आणि त्यांना कामाचा दर्जा टिकविणे कठीण जाते, भांडवलाची टंचाई भासू लागते; अंतर्गत तांत्रिक व्यवस्थेत अडथळे निर्माण होतात; व शेवटी त्याचे पर्यवसान छापखाना हस्तांतरित होण्यात किंवा सुटी सुटी यंत्रे विकण्यात होते. एकदोन दशकांपूर्वी भरभराटीस असलेली ग्रंथमुद्रणाची कितीएक कार्यालये याप्रकारे निकालात निघाली आहेत. गेल्या तीन वर्षांच्या खाजगी मुद्रण-व्यवसायाशी आलेल्या साक्षात संबंधाने माझे असे मत बनले आहे की, महाराष्ट्रात चांगले मुद्रण करू इच्छिणारी अशी स्थापित मुद्रणालये आहेत त्यांना जर योग्य भाव, चोखंदळ गिऱ्हाईक व अविलंबाने मोबदला मिळाला तर मुद्रणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राहू शकेल.

मुद्रण-व्यवस्थापनातील तांत्रिक संघटनेचे महत्त्व

६४. मुद्रणालयाच्या तांत्रिक संघटनेच्या (technical organization) बाबतीत आज होतो आहे त्यापेक्षा जास्त विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. विशिष्ट प्रकारची कामे करण्यास विशिष्ट यंत्रसामग्री लागते, एवढेच नव्हे तर, कामगारांची एक विशिष्ट मनोवृत्ती बनवावी लागते. म्हणून वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळ्या प्रकारे मुद्रणालयांची योजना करणे आवश्यक ठरते. केवळ नमुने छापणारी मुद्रणालये कोणा एका भल्या पहाटे ग्रंथमुद्रणास तयार होऊ शकणार नाहीत. उत्तम ग्रंथमुद्रण करणारी मुद्रणालये उत्तम दिनदर्शिका छापण्यास तात्काळ सिद्ध होणार नाहीत. त्याचप्रमाणे ग्रंथमुद्रणात कौशल्य मिळविलेल्या मुद्रणालयांस लग्नपत्रिका, निमंत्रण-पत्रिका, बिलफॉर्म्स अशासारखी मामुली दिसणारी कामे किफायतशीररीत्या करता येणार नाही. तद्वतच, अशा प्रकारची कामे करणाऱ्या मुद्रणालयांस ग्रंथनिर्मितीसाठी त्वरित सिद्ध होता येणार नाही.

मुद्रणालयाच्या विकासात दूरदृष्टीची आवश्यकता

६५. परंपरेने जी कामे ज्या पद्धतीच्या मुद्रणालयात करण्यात येतात त्या कामाचे स्वरूप बदलताच एक वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता उत्पन्न होते, त्याचा विचार व्हावयास हवा. उदाहरणार्थ, खाजगी प्रकाशनक्षेत्रात पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करीत असताना ज्या प्रकारची मुद्रणव्यवस्था सोयीची होती तीच मुद्रण-व्यवस्था फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रीयीकरण झालेल्या पुस्तकांच्या मुद्रणात टिकू शकणार नाही. प्रकाशकांमध्ये स्पर्धा असल्यामुळे प्रत्येक प्रकाशकाला छापावयाच्या पुस्तकांची संख्या तोकडी असल्यामुळे काही विशिष्ट मुद्रणपद्धती, टाइपावरून लेटर प्रेस पद्धतीची छपाई, जास्त सोयीची ठरली; परंतु फार मोठ्या प्रमाणात पुस्तकांची निर्मिती करून घ्यावयाची असली तर ज्याप्रमाणे ऑफसेट पद्धती सोयीची पडते, त्याप्रमाणे अलीकडे प्रचारात आलेली रबरी किंवा प्लॅस्टिक ठशांनी लेटरप्रेस पद्धतीने रोटरी यंत्रावर छपाई करून घेण्याची पद्धती सोईची ठरते. या गोष्टी अजून उमगलेल्या दिसत नाहीत.

६६. केवळ मुद्रणव्यवसायातच नव्हे तर इतर व्यवसायांतही आपल्याकडे एक अनिष्ट प्रवृत्ती दिसते की, जे काम सध्या डोळ्यासमोर दिसते व आपले काही व्यवसायबंधू ज्यात थोडा पैसा मिळवतात त्या कामाकडेच सामान्यतः मुद्रक धाव घेतात. याउलट नवीन धंद्याची वाढ होत आहे, तिथे त्यास लागणाऱ्या मुद्रण-कामाची पाहणी करून ते मिळविण्याचा प्रयत्न करणे घडत नाही असे दिसते. उदाहरणार्थ, नाशिक भागात व पुणे भागात वाढीस लागलेल्या कारखानदारीस आवश्यक असे मुद्रणसाहित्य पुरविण्याच्या दृष्टीने त्या त्या भागातील मुद्रकांनी काही विशेष प्रयत्न केला आहे असे दिसत नाही. गोदावरी प्रकल्पानंतर औरंगाबाद विभागामध्ये जी कारखानदारी वाढीस लागणार आहे त्याची आगाऊ सूचना घेऊन मुद्रणालये सिद्ध करण्याचा विचार अजून सुरू झाला आहे असे दिसत नाही. यात्रांची कामे, पाठ्यपुस्तके, सरकारी कामे याच वर्तुळात सर्वसामान्य मुद्रकांची भ्रमंती जास्त दिसते.

६७. महाराष्ट्रामध्ये पुस्तकांची उत्तम बांधणी होत असे, असे काही जुनी पुस्तके पाहिली असता दिसून येते. जुळणी, छपाई व बांधणी या दृष्टीने काही उत्कृष्ट पुस्तके कर्नाटक छापखान्यातून बाहेर पडली आहेत. त्यांपैकी माझ्या संग्रही असलेले *मराठी नियत-कालिकांचा इतिहास* हे पुस्तक उत्कृष्ट वाटते. दुर्दैवाने अशा प्रकारची छपाई आणि पुस्तक-बांधणी होणे आज कठीण झाले आहे. सामान्यतः कापडपुठ्ठ्याची बांधणी कमी प्रमाणात होत आहे. कागद-वेष्टनाच्या बांधणीत योग्य ती मजबुती राहात नाही. परंतु खर्च कमी ठेवण्यापोटी ती आज रूढ झाली आहे. काही मुद्रणालयांतून उत्तम बांधणी होत असल्यामुळे परदेशांतून आलेले फॉर्म्स येथे पुस्तके बांधण्यासाठी वापरण्यात येतात, ही माहिती असूनही मी वरील विधाने करतो आहे. याचे कारण महाराष्ट्रातील छापखान्यातून बाहेर पडणारी बहुसंख्य पुस्तके निकृष्ट बांधणीची असतात. काही परदेशी प्रकाशक एक-दोन वर्षांपूर्वी मुंबईत आले होते आणि इथे पुस्तक छापून घेण्यास उत्सुक

होते. त्यांनी या पुस्तक-बांधणीच्या बाबत चिंता व्यक्त केलेली मला माहीत आहे.

मुद्रण संवत्सराची योजना

६८. इ. स. १९६८ च्या जानेवारी महिन्यात जळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र मुद्रण परिषदेमध्ये शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी येते वर्ष हे मुद्रण संवत्सर म्हणून पाळावे अशी सूचना पुढे मांडली होती, आणि ती मुद्रण परिषदेने तात्काळ मान्यही केली होती. निर्णयसागर शताब्दी साजरी करण्यास 'मुद्रण संवत्सर' पाळण्यापेक्षा जास्त सुयोग्य असा कार्यक्रम तो काय असणार! या मुद्रण संवत्सरामध्ये निर्णयसागरने केलेल्या कामगिरीचा आढावा घेता आला असता. एकंदर मुद्रणव्यवसायाची भक्कम पायावर प्रतिष्ठापना करण्यासाठी काही भरीव कार्यक्रम आखला पाहिजे होता. मुद्रणाने आधुनिक समाजजीवनावर काय परिणाम केला आहे याचा आढावा घेऊन मुद्रणासारख्या सामर्थ्यवान ज्ञानवाहनाचा राष्ट्राच्या उत्कर्षासाठी जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल याचा सर्वांगीण विचार या मुद्रणसंवत्सरात करता आला असता.

मुद्रणसंवत्सरामध्ये हाती घेता येण्याजोगे काही कार्यक्रम त्या वेळी मी सांगितले होते :

(१) महाराष्ट्रातील, शक्य तर हिंदुस्थानातील, मुद्रणाच्या इतिहासाची साधने जमविणे व त्यावर लेख प्रसिद्ध करणे, व्याख्याने आयोजित करणे.

(२) मराठी पुस्तक-प्रकाशनाच्या इतिहासावर व्याख्याने करविणे, लेख लिहून घेणे.

(३) देवनागरी आणि इतर भारतीय लिप्यांमध्ये सुलभतेने मुद्रण करता यावे याकरिता संशोधन करण्याची व्यवस्था करणे.

(४) महाराष्ट्रातील मुद्रणधंदा वाढीस लागावा म्हणून व्यावहारिक योजना आखून त्या कार्यान्वित करणे.

(५) हिंदुस्थानातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील मुद्रणाच्या प्रगतीच्या इतिहासाची साधने, मुद्रणाशी संबंधित व्यक्तींची माहिती, छायाचित्रे, जुनी मुद्रित पुस्तके, शंभर वर्षांपूर्वी मुद्रणात वापरण्यात येणारी यांत्रिक सामग्री, इत्यादींचा संग्रह करून मुंबईसारख्या मध्यवर्ती ठिकाणी एक, जावजी दादाजी मुद्रण वस्तुसंग्रहालय स्थापन करणे.

(६) मुद्रणविषयक वाङ्मय प्रसिद्ध करणे. विशेषतः मराठीतून मुद्रणशिक्षण घेणारांस उपयुक्त होतील अशी पुस्तके लिहून प्रसिद्ध करणे.

वरील गोष्टींकडे अजूनही लक्ष देणे शक्य आहे.

मुद्रण व्यवसायाच्या विविध बाजू

६९. मुद्रणनिर्मितीत अनेक गोष्टींचा समावेश होतो. मजकुर-जुळणी, प्रत्यक्ष मुद्रण, त्यात अक्षरमुद्रण, प्रतिरूप मुद्रण (शिळाछाप-ऑफसेट), ताम्रपट–मुद्रण

(ग्रेव्ह्यूअर), रेशमी जाळीतून खडीछाप मुद्रण (सिल्क-स्क्रीन) वगैरे मुद्रणाच्या पद्धती, प्रबंधन (बाइंडिंग), व्हार्निशिंग, स्पायरल बाइंडिंग, ठसे बनविणे, प्रतिरूप मुद्रणासाठी पॉझिटिव्ह व प्लेट बनविणे इत्यादी अनेक गोष्टी येतात. या सर्व एकाच छापखान्यात होतात किंवा व्हाव्या असे नव्हे. तसे करण्याचा प्रयत्न आतबट्ट्याचा होतो. उलट वेगवेगळया ठिकाणी ती कामे करून घ्यायची तर कालापव्यय होतो; वाहतूक आणि इतर निर्मितिखर्चही वाढतो. या अडचणी टाळवयाच्या असतील तर वरील विविध कामे करणारे कारखाने एकाच अंगणात एकत्र आणता आले पाहिजेत. औद्योगिक वसाहती स्थापण्याच्या या काळात मुद्रणसंस्था एकत्र आणणे कठीण पडू नये. त्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजेत. तसा तो मुंबईस होऊ घातला आहे आणि त्याच्या पूर्ततेसाठी *मुद्रायतन*ची योजना करण्यात आली आहे.

मुद्रण व्यवसायाचे भवितव्य आणि ग्रंथमुद्रणाचे महत्त्व

७०. मुद्रणव्यवसाय हा एक अत्यंत 'खास' व्यवसाय झाला आहे. त्यात लागणारे तांत्रिक ज्ञान बहुविध तऱ्हेचे असावे लागते हे तर खरेच, पण यशस्वी मुद्रक होण्यासाठी कामाच्या खर्चाचा हिशेब करून खर्चाचा अंदाज ग्राहकास देणे (Estimating), निर्मितिमूल्यांकन (कॉस्टिंग), यंत्रसामग्रीची देखभाल, व्यवस्थापकीय आखणी, कामगारविषयक कायदे, इत्यादींबाबत योग्य सल्ला मिळण्याची सोय उपलब्ध असणे, आवश्यक ठरते. अशा तऱ्हेच्या सोई आपल्याकडे फारशा उपलब्ध नाहीत. त्याबाबत काही योजना करणे शक्य आहे.

७१. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जनतेच्या आकांक्षा वाढल्या आहेत. जनतेचे राहणीमान वाढविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. समाजाला साक्षर करून सुसंस्कृत करण्याचे उद्दिष्ट सरकार व समाजनेते यांनी मान्य केले आहे. सार्वत्रिक शिक्षणाची सोय करणे हे सरकारचे एक प्रमुख कर्तव्य सर्वमान्य झाले आहे. अशा परिस्थितीत वाढलेल्या व वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या प्रचंड प्रमाणातच त्यांच्या शिक्षणाची सोय करण्याची आपणास व्यवस्था करावयाची आहे. शिक्षणासाठी मुद्रित साहित्याची फार मोठ्या प्रमाणात आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य आणि शिक्षितांसाठी वाचनीय पुस्तके यांच्या आवश्यकतेची मोजदाद केली तर हे काम किती प्रचंड आहे याची कल्पना येईल. स्वभाषेत शिक्षण हे तत्त्व मान्य झाल्यानंतर सर्व भाषेत विद्यापीठीय स्तरापर्यंत पुस्तके मुद्रित करणे क्रमप्राप्त आहे. संख्येचा विचार करताना यांत्रिकीकरणाशिवाय हे काम साध्य होणे बिकट आहे. ग्रंथमुद्रणाबरोबरच इतर जीवनोपयोगी साधनासाठीही मुद्रणाची आवश्यकता वाढती असल्यामुळे व्यावहारिक मुद्रणाचीही वाढ मोठ्या प्रमाणात होणे अटळ आहे. परदेशातून मुद्रित होऊन येणारे ग्रंथ अगर इतर मुद्रिते कालानुरूप कमी कमी होणार आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला तर आपणास केवढे मोठे काम अंगावर घ्यावयाचे आहे

याची कल्पना येईल. व्यावहारिक मुद्रणातील समस्यांचे स्वरूप वेगळ्या प्रकारचे आहे. या मुद्रणामुळे त्वरित अर्थोत्पादनाची शक्यता असल्यामुळे उद्योगपती या समस्या सोडविण्यासाठी खटपट करतीलच. मात्र ग्रंथ-मुद्रणामुळे होणारे समाजाचे फायदे अदृश्य असल्यामुळे या विभागाकडे उद्योगपतींचे लक्ष कितपत जाईल याची शंका आहे. या विभागातील समस्या सोडविणे हे बव्हंशी समाजहितैषी व्यक्तींना करावे लागणार आहे, म्हणूनच ग्रंथ-मुद्रणाच्या विभागाकडे आपण अधिक लक्ष दिले पाहिजे.

अजूनही कळस चढवावयाचाच आहे !

रा. ज. देशमुख

---

१. लेखक वाचकांसाठी लिहितो.

२. प्रकाशक वाचकांसाठीच प्रकाशित करतो.

३. लेखक समाजातील घेतो आणि समाजाचे समाजालाच परत देतो.

प्रकाशन-व्यवसायाचे योग्य ते मूल्यमापन होऊन, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाला हातभार लावण्याचे जे कार्य प्रकाशन-व्यवसायाने केले आहे, त्याची दखल आज महाराष्ट्र घेत आहे याचा मनाला संतोष आहे, कृतज्ञता आहे.

आपल्या व्यवसायाला कोणी प्रतिष्ठेने वागवत नाही, ही बाब गेली कित्येक वर्षे मनात सलत होती.

प्रतिष्ठेची अपेक्षा करताना हेही माहीत होते की, भीक मागून काही मिळत नाही. मिळवावयाचे ते सामर्थ्याने मिळवावे लागते. मग ते सामर्थ्य स्वतःचे असो किंवा वंश-परंपरेने मिळालेले असो, पण सामर्थ्य असावे लागते एवढेमात्र माहीत होते.

ही प्रतिष्ठा आम्हाला वंशपरंपरेच्या सामर्थ्याने मिळाली ! का ती आम्हीच मिळविली ? का नेपोलियनप्रमाणे आमच्यापासूनच ही वंशपरंपरा सुरू झाली ? हाच काय तो कठोर आत्मपरीक्षणाचा आणि निरीक्षणाचा विषय आहे.

गेल्या ३५ वर्षांच्या प्रगतीचा इतिहास पाहताना सुरुवातीस असे वाटले की, आपण फार मोठे कार्य केले आहे.

माझ्या प्रकाशकबंधूंनी गेल्या ३५ वर्षांत या प्रकाशन-मंदिराचा घुमट जवळ जवळ पुरा करीत आणला आहे, या कल्पनेने मन सुखावले; पण या घुमटाचा विचार करताना:मंदिराचा पाया कोणी घातला याचाही विचार करावयास पाहिजे होता.

घुमटाकडून खाली उतरताना कितीतरी नावे डोळयांसमोर येतात आणि तेथे

निमिषमात्र थांबल्याशिवाय पुढे जाणे शक्य नाही.

हरीभाऊ मोटे हे प्रकाशन-व्यवसायातील एक दर्दी प्रकाशक.

प्रतिभेचा शोध घेण्याचे त्यांचे सामर्थ्य मोठे, म्हणूनच विभावरीसारखी लेखिका महाराष्ट्राला लाभली.

श्री. मोटे यांच्यासारखेच अभिनव प्रकाशनचे वामन वि. भट हेही असेच प्रतिभावान, लेखकांचा अचूक शोध घेणारे प्रकाशक.

परंतु ही वाटचाल इथेच थांबत नाही. कारण जायचे आहे ते आमची परंपरा स्थापन करणाऱ्या महान पुरुषाकडे.

मोटे आणि अभिनव प्रकाशनचे वा. वि. भट यांचे नाव घेताना मनाला समाधान आहे. त्यांनी केलेल्या कामाची पोच त्यांना थोड्याबहुत प्रमाणात का होईना मिळाली आहे.

गणेश महादेव वीरकरांचे नाव घेतानामात्र मन व्यथित होते. वीरकरांनी "गणेश महादेव आणि कंपनी" नावाने ग्रंथमाला सुरू करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासामध्ये आपल्या परीने भर घातलेली आहे.

गणेश महादेव कंपनीने स्वामी रामतीर्थांचे सहा खंड, रियासतकार सरदेसाई यांच्या रियासती, नाथमाधव यांच्या शिवकालीन कादंबऱ्या, वाङ्मयीन विकासाला वाहून घेणारे यशवंत मासिक आणि सृष्टिज्ञानसारखे वैज्ञानिक मासिक प्रकाशित केले.

राष्ट्रप्रेमाने भारलेल्या या माणसाला व्यवहाराचे भान न राहिल्याने या प्रकाशन-संस्थेची नावनिशाणीही कुठे राहिली नाही. दुःख आहे ते याचेच !

'गणेश महादेव आणि कंपनी'ची स्थापना करताना श्री. वीरकरांच्या समोर भसे, काशिनाथ रघुनाथ मित्र आणि हरी नारायण आपटे यांचा आदर्श असावा. कारण हरी नारायण आपटे यांचे किंवा भसे, मित्र यांपैकी कोणाचेही स्वतःच्या समाजासंबंधीचे भान कधीही सुटलेले नाही.

मित्र बहुभाषिक होते. मराठी ६ वी पर्यंत शिकलेल्या कोकणातून आलेल्या या बुद्धिवान माणसाने अनेक भाषा शिकून त्यांतील उत्कृष्ट वाङ्मय आपल्या भाषेत आणण्याची धडपड केली. मनोरंजनसारखे मासिक संपादित व प्रकाशित करून ललित वाङ्मयाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

मित्र प्रागतिक विचाराचे असून सामाजिक सुधारणेचे ध्येय त्यांच्या समोर होते. स्त्री-लेखिकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील अस्मिता जागी करून मित्रांनी त्यांना लेखिका बनविले.

हरी नारायण आपटे ह्यांच्या कामगिरीबद्दल आवर्जून सांगण्याचे काही कारणचा नाही. आपटे लेखक होते तसे प्रकाशक होते. त्यांनी केशवसुतांसारखा कवी प्रकाशात आणला व 'आनंदाश्रमा'च्या प्रकाशनांची धुरा वाहिली.

भसे यांचीही कामगिरी बहुमोल आहे. त्यांनी भारत गौरव ग्रंथमाला स्थापन

केली. या मालेने राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन सर्व विषयांतून ग्रंथ प्रकाशित करून समाजाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावला

ही भारत गौरव ग्रंथमाला भसे यांनी मंगेशराव कुलकर्ण्यांच्या पदरात घातली. मंगेशराव कुलकर्ण्यांनी तिचे चांगले संगोपन केले.

प्रकाशकांनी जसे वाङ्मयीन, राजकीय, सामाजिक कार्य केले, तसेच कोशकारांचे कार्यही फार मोठे आहे. त्यांना प्रकाशक म्हणणे म्हणजे त्यांच्या कामाचे चुकीचे मूल्यमापन करण्यासारखे आहे. तीच गोष्ट आनंदाश्रम, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर व भारत इतिहास संशोधक मंडळ प्रकाशने यांची आहे. त्यांच्याकार्याचे मूल्यमापन करणे हे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे.

ज्ञानकोशकार श्री. केतकर, कोशकार श्री. य. रा. दाते, श्री. शं. ग. दाते, श्री. कर्वे, श्री. आपटे, श्री. चित्रावशास्त्री, श्री. ग. रं. भिडे, धर्मकोशकार लक्ष्मणशास्त्री जोशी, प्राज्ञ-पाठशाळा वाई व त्यांचे प्रकाशन, महादेवशास्त्री जोशी यांची कामगिरी बहुमोल आहे.

वासुदेव गोविंद आपटे यांनी मुलांसाठी म्हणून स्वतंत्र निराळे बालवाङ्मय लिहिले पाहिजे याचा विचार करून खास मुलांच्यासाठीच संस्कारक्षम बालवाङ्मय प्रसिद्ध केले.

श्री. आपटे यांच्यानंतर मालवणचे पारुजी नारायण मिसाळ हा बालवाङ्मय-क्षेत्रातला फार मोठा माणूस.

केशव भिकाजी ढवळे यांनी भरपूर चित्रे घालून बालवाङ्मय अत्यंत नेटक्या आणि आकर्षक स्वरूपात प्रकाशित केले.

श्री. ढवळे यांनी बालवाङ्मय आकर्षक स्वरूपात प्रकाशित केले असले तरी मजकुराबाबत त्यांनी फार विचार केलेला होता असे वाटत नाही. खपते म्हणूनच त्यांनी बालवाङ्मय प्रकाशित केले.

याच शतकात धार्मिक प्रकाशनाचे काम निरनिराळे प्रकाशक आपल्या परीने करीतच होते. रामचंद्र आबाजी सावंत (रामतत्त्व प्रेस), दामोदर सावळाराम यंदे, श्री. केशव भिकाजी ढवळे, बा. ल. पाठक, संतवाङ्मय प्रकाशक इंदिरा प्रेसचे आवटी आणि पुरुषार्थाचे संपादक स्वाध्याय मंडळ चालविणारे पं. सातवळेकर.

यांपैकी सातवळेकरांची सामाजिक जाणीव सतत जागृत होती असे तीव्रतेने जाणवते. कारण धार्मिक वाङ्मय प्रसिद्ध करताना त्यांची विवेचकबुद्धी आणि विवेक-बुद्धी जागी आहे. आणि म्हणूनच समाजविघातक किंवा आजच्या कालानुरूप समाजाला निरुपयोगी ठरणारे धार्मिक वाङ्मय त्यांनी प्रकाशित केले नाही.

केशव भिकाजी ढवळे हे एक धार्मिक ग्रंथप्रकाशक म्हणून त्यांचा उल्लेख निराळा करावा लागतो. त्याचे कारण धार्मिक पुस्तकांना, त्याच मजकुराला त्यांनी पुस्तकामध्ये किंवा पोथीमध्ये निराळे सौंदर्य आणून दिले.

वैचारिक वाङ्मय प्रकाशित करणारे श्री. भादुले, श्री. शिवराम महादेव परांजपे, १. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला २. नवभारत ग्रंथमाला ३. प्राज्ञ पाठशाळा वाई, ४. समाज-

प्रबोधन यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या प्रकाशकांनी महाराष्ट्राच्या वैचारिक प्रगतीला चालना दिली आहे.

विसाव्या शतकातील या खंद्या प्रकाशकांची नावे घेतली, तर या सर्व प्रकाशकांनी त्यांच्या पूर्वसूरींचा आणि परंपरेचाच पाठपुरावा केला असे म्हणावे लागेल. कारण या सर्व विविध प्रकारच्या प्रकाशन-प्रकारांची सुरुवात एकोणिसाव्या शतकातच झालेली आहे.

प्रकाशन-व्यवसायाचा मागोवा येथपर्यंत घेतला तरी अजून आपणास त्याचे मूळ सापडत नाही.

घराण्याचा इतिहास पाहताना मूळ पुरुषापर्यंत जावे लागते. त्याशिवाय परंपरेचा अर्थ कळत नाही.

एकोणिसाव्या शतकातही प्रकाशनाचे काम चालूच होते. निर्णयसागरचे जावजी दादाजी यांची भरीव कामगिरी निर्णयसागर प्रेसच्या स्वरूपात आज उभीच आहे. त्यांची शतसंवत्सरी नुकतीच साजरी झाली आहे.

त्यांचे हे ऋण मान्य केले तरीही प्रकाशक म्हणून अजूनही आपल्याला २०–२५ वर्षे तरी मागे जाऊन या व्यवसायाच्या मूळ पुरुषाचा शोध घ्यावयास पाहिजे.

मुद्रणकला व प्रकाशनव्यवसाय आत्मसात करून अत्यंत निष्ठेने प्रकाशन व्यवसायाचा पाया घालणारे कर्तबगार पुरुष म्हणजे गणपत कृष्णाजी व माधव चंद्रोबा डुकले हे होत. डुकल्यांनी शिळाप्रेस काढून संत व पंडितकवींची प्रचंड काव्यसंपदा मराठी लोकांना प्राप्त करून दिली. त्यासाठी त्यांनी केलेले परिश्रम आणि झीजलेली झीज मराठी माणसाच्या ध्येयवादातून निर्माण झाली होती.

ह्या ध्येयवादानेच प्रेरित होऊन विष्णुशास्त्र्यांनी चित्रशाळा प्रकाशन संस्था काढली व रावबहादुर का. ना. साने यांनी 'काव्येतिहास संग्रहातू'न मराठी बखरी व ऐतिहासिक साधने प्रसिद्ध केली. न्या. मू. रानडे व विजापूरकर यांच्या प्रेरणेने शास्त्रीय ग्रंथ प्रकाशित करणारे दाभोळकरही असेच ध्येयवेडे होते.

जावजी दादाजी ज्यांना मानत होते असा एक महापुरुष आहे की ज्याने महाराष्ट्रात प्रकाशन आणि मुद्रण या दोन्हींचा पाया घालून आम्हाला परंपरेचा वारसा दिला. त्याचे नाव गणपत कृष्णाजी.

गणपत कृष्णाजी ज्या काळात वावरले तो काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने मोठा आणीबाणीचा होता.

आणीबाणीचा काळ म्हणण्यापेक्षा तो नैराश्याचा, काळोखाचा काळ होता, असेच म्हणावे लागेल.

पेशवाईचा अस्त झाला होता. परकीय आक्रमणाने राजकीयच नव्हे तर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, व्यापारी असे सर्वांगांनी महाराष्ट्राला ग्रासून टाकले होते.

सामान्य माणूस नैराश्य व परावलंबन यांनी भांबावला होता. पराभूत वृत्तीमुळे त्याचे स्वकर्तव्याचे भान नाहीसे झाले होते.

समाज आणि समाजातील समाजपुरुष जडशील झाला होता, आणि त्या जडशीलतेतून सगळीकडे आळस, कर्तव्यपराङ्मुखता आणि एक प्रकारची बधीरता या समाजाला आली होती.

संस्कृत पंडित आपल्या ज्ञानाच्या अभिमानात आणि त्या प्रतिष्ठेच्या कोशातच गुरफटून बसले होते.

सर्वसामान्य जनतेकडे त्यांनी पाठ फिरविली होती. आणि या भोळ्याभाबड्या मराठी बोलणाऱ्या समाजाला त्याचा असा शास्ता नव्हता. त्याला हाताला धरून शिकविणारा कळकळीचा कोणी गुरूही नव्हता.

अशा वेळी स्वाभाविकच परकीय पाद्री स्वतःच्या सर्व सामर्थ्यानिशी या समाजाला धर्मांतर करण्यासाठी प्रवृत्त करीत होते.

त्यांच्या धर्माचे तत्त्वज्ञान इथल्या बोली भाषेत त्यांनी भाषांतरित केले होते. त्यासाठी त्यांनी मराठीचा अभ्यासही केला.

धर्माचा प्रसार करण्यासाठी त्यांनी शिळा प्रेसवर बायबलसारखी धार्मिक पुस्तके छापून ती प्रकाशित करून समाजात वाटण्यास सुरुवात केली.

निश्चेष्ट पडलेला असला, काळोखात असला तरी हा जिवंत माणसांचा समाज होता.

एकेकाळी स्वातंत्र्य उपभोगलेल्या माणसाचा तो होता, म्हणूनच तो जिवंत होता.

स्वाभाविकच या समाजात क्षीण, पण चळवळ सुरू होती.

गणपत कृष्णाजी हा असाच एक त्या समाजातला चळवळ्या, अस्मिता असलेला तरुण कुलाबा जिल्ह्यातील थळ गावी १८०० साली जन्मला.

अक्षरओळखीच्या पलीकडे शिक्षण नव्हते. म्हणून पोट भरण्यासाठी हा कोवळा मुलगा मुंबईस येऊन अमेरिकन मिशन प्रेसमध्ये (मुद्रिका) टाईप घासून साफसूफ करण्याच्या कामावर महिना दोन रुपये मजुरीवर लागला.

बुद्धिमत्ता, धारणाशक्ती ही काही कुठल्या जातीची मिरास नाही.

भंडारी जातीत जन्मलेल्या अक्षरओळख झालेल्या या मुलाची धारणाशक्ती, बुद्धिमत्ता असाधारण होती; आणि धर्माभिमान प्रखर होता.

आपण जे काम करतो ते आपल्या धर्माला घातक होते आहे, आपणच आपल्या पायावर दगड पाडून घेतो आहोत, ही बोच त्या कर्तबगार तरुणाला असह्य होत होती. परंतु त्याचे काळ आणि परिस्थितीचे भान सुटलेले नव्हते. या प्रेसमध्ये राहूनच आपणास मुद्रणाचे ज्ञान करून घेतले पाहिजे, हे तो विसरत नव्हता.

आपल्या धर्माचे, आपल्या समाजाचे काही भले करावयाचे असेल तर सर्वप्रथम ही मुद्रणकला आपण आत्मसात केली पाहिजे ही खूणगाठ त्याच्या मनाशी पक्की होती.

थोड्याच काळात आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावरती त्यांनी मिशनरी प्रेसमध्ये सर्व खात्यांमधून शिक्षण घेतले.

आत्मसात केलेल्या या मुद्रणकलेचा उपयोग हिंदू धर्मप्रसाराच्या आणि

समाजोन्नतीच्या कामासाठी करावयाचा असा पक्का निर्धार असल्याने छपाईच्या कामाकडे ते बारकाईने व चौकस बुद्धीने लक्ष पुरवू लागले.

कागद, शाई, शिळा, मुद्रिका आणि मशिन हे आपणास कसे प्राप्त करून घेता येईल यातच त्यांचा दिवस उगवे आणि मावळे.

१८२५ ते १८३० ही वर्षे त्यांनी अक्षरशः शिळाप्रेसची उभारणी करण्यात खर्च केली.

आपल्या समाजाला जे द्यावयाचे आहे ते त्याच्या पचनी पडण्यासाठी काय करावयाचे याचे चिंतनही रात्रंदिवस चालू होते.

छापील कागद हे एक ज्ञानप्रसाराचे अमोघ अस्त्र त्यांच्या हातात होते. परंतु सोवळेओवळे, शिवाशिवी, भ्रष्टाकार या अंधःश्रद्धेने घेरलेल्या समाजाला चरबी लावलेली शाई आणि कापडी बांधणीची ही पुस्तके वाचायला प्रवृत्त करणे हे सोपे काम नव्हते. भ्रष्टाचार होईल या भीतीने पुस्तके वाचण्यास कोणी तयार नसे.

समाजाला शिक्षणाभिमुख करताना तो बिचकून जाऊ नये याची काळजी घेणे ही एक अत्यंत आवश्यक गोष्ट असते.

गणपत कृष्णाजींना याची जाणीव होती. त्यांचा पिंडच समाजसुधारकाचा होता. म्हणून त्यांनी समाजाच्या अंधःश्रद्धेची टवाळी केली नाही. तर सोवळ्याओवळ्यात ग्रंथ चालावेत (आपला धर्म नामशेष होऊ नये) म्हणून तुपात खललेली शाई आणि कागदी बांधणीची पुस्तके स्वतःच्या छापखान्यात छापून प्रकाशित करावयाची ठरविली.

१८३१ च्या सुमारास तुपाच्या शाईचा शोध गणपत कृष्णाजींनी लावला.

१८३१ साली पहिले स्तोत्र प्रकाशित केले.

गणपत कृष्णाजी हे मुद्रक नाहीत तर ते प्रकाशक आहेत.

समाजाला उपयोगी पडणारी पुस्तके प्रकाशित करावयाची म्हणून त्यांनी मुद्रणकला राबविली.

इंग्रजी कॅलेंडर हे ख्रिश्चनांच्या गरजा भागवते. आपल्या समाजाची गरज भागविण्यासाठी आपल्या धर्माचे पंचांग असले पाहिजे म्हणून त्यांनी आपल्या शिंपी मित्राकडून पंचांग तयार करून घेतले आणि ते स्वतःच्या सुंदर हस्ताक्षरात वेलबुट्टीने सजवून स्वतःच प्रकाशित केले.

स्वतःचे सुबक पंचांग ते इतरांपेक्षा महाग पण त्यांनी पंचांगावर केलेल्या खर्चाच्या मानाने अत्यंत अल्प मोबदला घेऊन विकत.

प्रकाशकाला लागणारे, स्वतःच्या समाजाचे प्रेम, सामाजिक हिताची कळकळ, त्याची गरज अचूक ओळखण्याचे सामर्थ्य, त्याप्रमाणे माणसे हेरण्याची अस्मिता आणि सौंदर्यदृष्टी हे सर्व गुण आमच्या मूळ पुरुषामध्ये एकवटलेले होते.

तीव्र बुद्धिमत्ता, असाधारण धारणाशक्ती, सचोटी, दीर्घोद्योग आणि प्रयोगशीलता आणि त्याचबरोबर निर्लोभीपणा हे गुणही त्यांच्यात होते.

या सर्व प्रयोगात आणि समाजसेवेत गणपत कृष्णाजींना आर्थिक लाभ काहीच झाला नाही. दादोबा पांडुरंगांचे व्याकरण त्यांनीच प्रसिद्ध केले. मराठीतले पहिले व्याकरण, पहिले ऐतिहासिक नाटक, पहिला काव्यग्रंथ इत्यादी आद्यत्वाचा मान गणपत कृष्णाजींचाच.

त्या काळी महाराष्ट्रातील विद्वानांची पहिली पिढी नुकतीच कुठे उभी राहू लागली होती. अशा विद्वानांना आणि त्यांच्या वाङ्मय-प्रकाशनाला गणपत कृष्णाजीं-चाच फार मोठा आधार होता.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर, गोविंद नारायण माडगावकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग वगैरे.

पुस्तक शुद्ध छापले पाहिजे याची गणपत कृष्णाजींना तीव्र जाणीव होती. संस्कृत आणि मराठी ग्रंथ शुद्ध छापले जावेत म्हणून विद्वान शास्त्री-पंडितांची मदत आवश्यक असते, आणि त्यासाठी त्यांना भरपूर मोबदलाही दिला पाहिजे हे त्यांना माहीत होते.

शुद्ध छपाईची चाड बाळगणारे किती प्रकाशक आज मिळतील ?

परंतु १४० वर्षांपूर्वी अक्षर-ओळख असलेल्या या माणसाला मात्र याचे मर्म बरोबर कळले होते.

करावयाचे ते चांगलेच करावयाचे, समाजाला उपयोगी असेल तेच करावयाचे आणि ते समाजाला पचविण्यासाठी म्हणून जितक्या प्रकाराने त्यात प्रयोग करून सहजता आणता येईल, ती आणावयाची या विचारांनी आणि कृतीने भारलेल्या गणपत कृष्णाजींजवळ पैसाअडका राहिला नाही तर त्यात विशेष काहीच नव्हते. हाडाचा प्रकाशक असेच करणार.

अशा या गणपत कृष्णाजींची परंपरा आम्हा प्रकाशकांना लाभलेली आहे. आमची मान ताठ आहे ती यामुळेच !

' स्वस्त योजना ' हा शब्द आता गुळगुळीत झाला आहे. परंतु १९३० साली ' स्वस्त ' पुस्तक देणे हे एक खूळच समजले जात होते.

श्री. दत्तो अप्पाजी तुळजापुरकर यांनी १९३० मध्ये एक अभूतपूर्व प्रयोग करून पाहिला. तुळजापुरकर हे स्वतः लेखक व प्रकाशक होते.

' माझे रामायण ' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती सव्वा रुपयास धाडस करून फक्त त्यांनी समासेवेच्या भावनेने प्रकाशित केली.

' माझे रामायण ' या पुस्तकाची पृष्ठे ६०० असून डेमी अष्टपत्री चांगला कागद वापरलेला आहे. आर्ट पेपरवरील दोन रंगीत चित्रे छापलेली आहेत व अर्धकापडी बांधणी केली आहे. किंमत मात्र फक्त सव्वा रुपया ठेविली आहे.

हे पुस्तक १९३० साली सव्वा रुपयास दिले गेले आहे. पुस्तकाच्या वर्णनावरून हे पुस्तक ' पेपरबॅक ' पद्धतीतले नाही हे लक्षात येईलच.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रकाशक लिहितात, एवढ्या पुस्तकाची किंमत १। रु.

ठेवणे हे एक प्रकारचे ' खूळ ' आहे. पण त्याचे चीज करणे महाराष्ट्राच्या हातात आहे.

या प्रयोगात लक्षात ठेवण्याजोगी आणखी एक महत्त्वाची व न विसरण्याजोगी बाब आहे.

' माझे रामायण ' या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती समाजासाठी म्हणून स्वस्त काढलेली आहे. पहिल्या आवृत्तीची किंमत २॥ रु. होती.

गणपत कृष्णाजींच्या या बावनकशी सोन्याचा कस लावून आम्हा प्रकाशकांची १९३५ ते १९७० या कालावधीतील झालेली प्रगती पाहावयाची हा विचार मनात आला की परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्याप्रमाणे मनात थोडी धाकधूकच वाटते आहे.

य. गो. जोशी यांच्यापासून मॅजेस्टिक प्रकाशन संस्थेपर्यंत अनेक प्रकाशक झाले आहेत, पण ज्यांनी विचारपूर्वक प्रकाशन केले आहे अशा दोनच प्रकाशकांची नावे घेता येतील.

एका अर्थाने लेखक-प्रकाशकांचा हा सुकाळ आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढल्या· मुळे वाचकांची कमतरता नाही.

या सगळ्यांच्या मते या व्यवसायाला बरे दिवस आले आहेत; आणि उद्या येणार आहेत, परंतु ३५ वर्षांच्या या कालखंडात उदमेखून नाव घ्यावे अशी चार-पाचच नावे डोळ्यांसमोर येतात. श्री. मोटे व अभिनव प्रकाशनचे वामन वि. भट. यांच्याशिवाय दोनच प्रकाशनसंस्था माझ्या डोळ्यापुढे आहेत : १. मौज प्रकाशन संस्था. २. पॉप्युलर प्रकाशन संस्था.

पॉप्युलर प्रकाशन संस्थेने आकर्षक आणि विचारपूर्वक असे बालवाङ्मय छापले आहे.

पॉप्युलर प्रकाशनने स्वतःचा काव्यविभाग जाणीवपूर्वक जोपासला आहे. नव्या कवींनी निःशंकपणे पॉप्युलरकडे जावे. तिथे त्यांचा आदरसत्कार कवींच्या अपेक्षे-प्रमाणे होईल.

जाणीवपूर्वक ललितसाहित्य आणि काही टीकात्मक ग्रंथही पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केले.

मौज आणि पॉप्युलर या दोन्ही प्रकाशन संस्थांनी नवीन प्रतिभावान लेखकांचा मागोवा घेत आपल्या प्रकाशनसंस्था गौरविल्या.

मौज प्रकाशन-संस्थाही वाङ्मयीन प्रयोग करणाऱ्या लेखकांचे माहेरघर आहे. नव्या लेखकांना मौज प्रकाशन हा एक दिलासा आहे. मौज प्रकाशनाबद्दल त्यांना आपुलकी आहे. परंतु खेदाने एक गोष्ट नमूद करावी लागते की, हे लेखक आणि ही प्रकाशनसंस्था सर्वसामान्य वाचकांसाठी नाही.

लिटल मॅगेझिनचे संपादक, लेखक आणि प्रकाशक बंडखोर आहेत. ते स्वतःस तसे म्हणवतात. परंतु हेही प्रकाशक आणि लेखक मौज प्रकाशनप्रमाणे बहुजन-समाजाचे नाहीत.

सामान्य वाचकाला कळले नाही तर त्याची कुवतच एवढी असे म्हणून त्यांना

हिणवून ही विद्वान मंडळी आपल्या स्वतःच्या वलयात तळपत असतात. ते तळपणे, तो प्रकाश हाही त्यांच्या खास वाचकांच्या पुरताच.

सामान्य समाज त्यापासून वंचितच आहे. वंचित म्हणण्याचेही कारण नाही. कारण ही मंडळी त्याकडे पाठ फिरवून बसली आहेत.

थोडक्यात आज हे उल्लेखनीय प्रकाशक आणि सामान्य समाज यांच्यामध्ये फार मोठी दरी उभी आहे.

सामान्य समाज अजून शिक्षित व्हावयाचा आहे. त्याचा विकास व्हावयाचा आहे.

शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी किंवा त्याहीमागे समाज जसा जडशीळ झाला होता तसा आज तो जडशीळ झाला नसला तरी वरपासून खालपर्यंत आज तो दुभंगलेला आहे.

समाजातील सर्व थरांत आज एक प्रकारची भयाण पोकळी निर्माण झाली आहे.

जुनी मूल्ये, जुन्या श्रद्धा नष्ट झाल्या आहेत. त्यांची जागा नव्या श्रद्धा, नवी मूल्ये अजून घेत नाहीत.

नवी पिढी तर जीवनाला काही अर्थ नाही म्हणून हाकाटी पिटते आहे. अशा वेळेस आजच्या परिस्थितीत गांगरून न जाता हाती असेल त्या साधनाने, परिस्थितीवर मात करून, लोकशिक्षणाचे काम आजच्या प्रकाशकाने करावयास पाहिजे, असे मला मनापासून वाटते.

या परिस्थितीला वळण लावण्यास प्रकाशकाचे सामर्थ्य पुरे पडेल अशी खोटी आशा मी बाळगून नाही, परंतु आम्हाला प्रयत्न करता येईल.

आमच्या मूळ पुरुषांनी हेच केले आहे. तीच वाट आम्ही चोखाळली पाहिजे असे मला वाटते.

अजूनही कळस चढवावयाचाच आहे असे मी म्हणतो ते म्हणूनच.

माझ्या या कठोर आत्मपरीक्षणाबद्दल सर्व प्रकाशकांची क्षमा मागून मी एवढेच म्हणतो की, हा मी लावलेला कस आहे.

लेखक-परिचय

(लेखानुक्रमाने)

१. डॉ. ह. धी. सांकलिया (१०–१२–१९०८) : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुरातत्त्व शास्त्रज्ञ. १९५६ ते १९५९ पर्यंत पुणे येथील डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्थेचे संचालक व त्यापुढे सहसंचालक. सांप्रत तिथेच इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक विषयाचे प्राध्यापक आणि पुणे विद्यापीठाचे पुरातत्त्व विभागप्रमुख. आतापर्यंत त्यांनी १० इंग्रजी ग्रंथ, १४ सहकार्याने लिहिलेले ग्रंथ व दोनशेच्यावर संशोधकीय लेख लिहिले आहेत. डॉ. सांकलिया यांचा मूळ लेख इंग्रजीत असून त्याचा अनुवाद त्यांचे सहकारी प्रभाकर कुलकर्णी यांनी केला आहे.

२. न्या. मू. वि. अ. नाईक (१९–४–१९०५) : मुंबई हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश व महाराष्ट्रातील एक पुरोगामी विचारवंत. अठरा वर्षे बेळगाव येथे वकिली व आठ वर्षे लॉ. कॉलेजमध्ये प्राध्यापक. सामाजिक आणि साहित्यविषयक चळवळींबद्दल आस्था. साहित्य संमेलन (१९४४) आणि नाट्यसंमेलन (१९५४) चे कार्याध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष. ' मानवी स्वातंत्र्य : प्रेरणा व साधना ' या ग्रंथाचे लेखक.

३. श्री. व. भ. कर्णिक (२०–५–१९०३) : कामगार व ट्रेड युनियन चळवळीला वाहून घेतलेले सामाजिक कार्यकर्ते. मजूर चळवळी, संप, राजकारण इत्यादी विषयांवर इंग्रजीत ग्रंथलेखन. लेबर एज्यु. सर्व्हिसचे डायरेक्टर, इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडमचे चिटणीस, फ्रीडम फर्स्ट मासिकाचे संपादक इत्यादी पदे आजवर भूषविली.

४. श्री. पां. वा. गाडगीळ (३–४–१८९९) : सुप्रसिद्ध पत्रपंडित आणि राजकारण, अर्थकारण, समाजशास्त्र इत्यादी विषयांवर व्यासंगयुक्त लेखन करणारे ग्रंथकार. समाजवादाचा ओनामा, कॅपिटल सारग्रंथ, फॅसिझम, भारताचे आर्थिक नियोजन इत्यादी महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध.

५. प्रा. श्री. के. क्षीरसागर (६-११-१९०१) : अभिजात टीकाकार व नामवंत निवृत्त प्राध्यापक. मिरज येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, म. सा. परिषदेचे माजी कार्याध्यक्ष, म. सा. पत्रिकेचे माजी संपादक. साहित्य आणि समाजजीवनातील घडामोडींचा जागरूकपणे परामर्श घेणारे स्तंभलेखक. अनेक वाङ्मय-विमर्शात्मक लेखसंग्रहांचे व ' टीकाविवेक ' या ग्रंथाचे लेखक.

६. श्री. श्री. रा. टिकेकर (१६-८-१९०१) : सुप्रसिद्ध पत्रपंडित, ग्रंथकार व इतिहासज्ञ. आजकालचा महाराष्ट्र (सहकार्याने), अनागोंदी अंदाधुंदी, सरकार आणि सरदेसाई ही स्वरचित, श्यामकांताची पत्रे, सरदेसाई स्मारक ग्रंथ, शत-पत्रे, चापेकर संस्मृति ही संपादित आणि भारतीय-विदेशी लोककथा ही अनुवादित अशी सुमारे पंचवीस पुस्तके प्रसिद्ध. इतिहास, प्रवास व संशोधनात्मक लेखन यांची विशेष आवड.

७. प्रा. अनंत काणेकर (१९०४) : मराठीतील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ कलामूल्यांची जाणीव असलेले साहित्यिक म्हणून काणेकरांची ख्याती असली तरी काणेकरांचा पिंड हा मूलतः जगातील राजकारणाचा मागोवा घेणाऱ्या चिकित्सकाचा आहे. त्यांच्या चिंतनाच्या व आस्थेच्या मानाने त्यांनी यासंबंधी फार थोडे लेखन केलेले असले तरी जे काही थोडेसे लिहिले आहे ते मूलभूत दृष्टिकोणाचा प्रत्यय देणारे आहे.

८. श्री. यदुनाथ थत्ते (५-१०-१९२२) : साने गुरुजींनी स्थापन केलेल्या ' साधना ' या ध्येयवादी साप्ताहिकाचे संपादक. साने गुरुजींच्या निकटच्या ' धडपड-णाऱ्या मुलां 'मध्ये त्यांचा तरुणपणी समावेश होत असे. त्यामुळेच साधन-शुचिता, आंतरभारती, समाजवादी निष्ठा यांचे पुरस्कर्ते म्हणून ते ज्ञात आहेत. थत्ते हे विज्ञानाचे पदवीधर आहेत आणि ' विज्ञाना 'बद्दल महाराष्ट्रात इष्ट ती जाणीव निर्माण व्हावी, यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात.

९. श्री. म. ना. गोगटे (१०-९-१९३२) : कन्सल्टिंग इंजिनिअर व आर्किटेक्ट. मराठीसाठी रोमन लिपी व आंतरराष्ट्रीय अंकांचा वापर हे प्रचारकार्य. मराठी विज्ञान परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते व विज्ञान पत्रिकेचे संपादक. ' देवनागरी टंकलेखक कसा असावा ' ही पुस्तिका.

१०. श्री. ग. वि. केतकर (११-८-१८९८) केसरी व तरुणभारत (पुणे) या वृत्तपत्रांचे माजी संपादक, लोकमान्यांचे नातू आणि हिंदुत्वाच्या चळवळीला वाहिलेले व्यासंगी ग्रंथकार. लोकमान्य टिळकांची भाषाशैली, मर्मभेद, डॉ. खानखोजे-चरित्र, खिस्तीधर्म इत्यादी आठ पुस्तके.

११. प्रा. डॉ. (कु.) (लीला गोळे) २९-६-१९३१ : पुणे येथील स. प. महाविद्यालयात तर्कशास्त्र, मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांच्या प्राध्यापिका. तत्त्व-ज्ञान विषयातील पुणे विद्यापीठाच्या पहिल्या पी.एच. डी. १९६४-६५ साली अमेरिकेत

व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून काम केले. 'सुगम सामाजिक मानसशास्त्र' (सहकार्याने) या ग्रंथाचे लेखन.

१२. प्रा. डॉ. पां. श्री. घारे (८-११-१९२४) : पुणे येथील स. प. व वाडिया कॉलेजात आणि सांप्रत नांदेड येथील पीपल्स कॉलेजात राज्यशास्त्राचे प्राध्यापक. काही वर्षे अ. वि. गृहाच्या प्रकाशनविभागात कार्य. राज्यशास्त्र, भारतीय राज्यघटनेचा सोपपत्तिक इतिहास, आधुनिक जग या ग्रंथांचे लेखक.

१३. श्री. न. वा. लिमये (८-११-१९०९) : नरुभाऊ लिमये या नावाने सर्वपरिचित. १९३९ पासून कॉंग्रेसच्या द्वारे राष्ट्रीय चळवळीत भाग. पत्रकार आणि मुद्रक हा व्यवसाय. सांप्रत विधानसभेचे सदस्य. हौशी रंगभूमीचे आधारस्तंभ. पुण्याच्या भरत नाट्य मंदिराच्या नव्या वास्तू उभारणीत यांचा मोठा वाटा होता.

१४. श्री. पन्नालाल सुराणा (९-७-१९३३) : राष्ट्रसेवादल, भूदान-आंदोलन, संयुक्त समाजवादी पक्ष, समाज प्रबोधन संस्था इत्यादी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते. आपला महाराष्ट्र, चीनचे आक्रमण, रुपयाचे अवमूल्यन, राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता इत्यादी पुस्तकांचे लेखक.

१५. डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ (६-७-१९२१) : महाराष्ट्रातील सहकार चळवळीला गती देणारे अभ्यासू प्रशासक. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शना-खाली पीएच. डी. पदवी. सांप्रत महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे जनरल मॅनेजर. सहकारी बँका, शेती आणि उद्योग या क्षेत्रातील एक तज्ज्ञ अधिकारी लेखक. अनेक संस्थांशी पदाधिकारी म्हणून निगडित आणि युरोप, अमेरिका, जपान आदी देशांतील सहकारी चळवळींची पाहणी.

१६. श्री. भा. र. साबडे (५-५-१९३३) : उद्योगक्षेत्रातील एक नामवंत अभ्यासू अधिकारी आणि लेखक. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणे, या संस्थेचे कार्यवाह. 'चेंबर ऑफ कॉमर्स इन् इंडिया' हा ग्रंथ प्रकाशित. याशिवाय 'महाराष्ट्राचे औद्योगीकरण' व 'ग्रामीण विकास' हे दोन ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर.

१७. श्री. आ. बा. पाटील (२५-२-१९३६) : कृषितज्ज्ञ आणि 'शेतकरी' मासिकाचे संपादक. कृषिपत्रव्यवसायाचे अमेरिकेत शिक्षण. शेती आणि शेतकरी या विषयावर आजवर सोळा पुस्तके प्रसिद्ध. त्यांतील दोनांना सरकारी पारितोषिकांचा मान लाभला.

१८. डॉ. वि. ना. भावे (२४-२-१९०३ : मृत्यू २८ मे १९७१) : चाळीस वर्षे पुण्यात वैद्यकीय व्यवसाय. शरीरविज्ञान व आरोग्यशास्त्र या विषयांचे अध्यापक व अनेक शालेय पुस्तकांचे लेखक. पुणे महानगरपालिका आणि पुणे विद्यापीठ कार्यकारिणी आणि विधिसमितीचे सदस्य म्हणून महत्त्वाचे कार्य. याशिवाय अनेक शिक्षणसंस्थांच्या उभारणीसाठी त्यांनी फार मोठे श्रम घेतले.

१८. डॉ. ह. वि. सरदेसाई (१०–४–१९३४) : पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये ऑननरी फिजिशिअन व पदव्युत्तर प्राध्यापक. १९५९ पासून कन्सल्टिंग फिजिशियन या नात्याने व्यवसाय. मज्जातंतुविज्ञान (न्यूरॉलॉजी) या विषयात नैपुण्य.

१९. श्री. ल. ना. गोखले (२४–११–१९२२) केसरी, सह्याद्रि आणि किर्लोस्करचे माजी उपसंपादक व सांप्रत पुणे विद्यापीठातील वृत्तपत्र विद्यालयाचे संचालक. वक्तृत्वोत्तेजक सभा, पत्रकार संघ, श्रमिक पत्रकार संघटना या संस्थांशी घनिष्ठ संबंध. वाट्टेल ते, सनसनाटी या चुरचुरीत पुस्तकांचे लेखक.

२०. डॉ. मो. वा. ऊर्फ वसंत पटवर्धन (२४–४–१९२८) : मूळचे ललितलेखक व नंतर अर्थशास्त्राची पदवी घेऊन बँकक्षेत्रात प्रवेश. सांप्रत बँक ऑफ महाराष्ट्राचे जॉईंट जनरल मॅनेजर. अर्थशास्त्र आणि बँका या क्षेत्रातील घडामोडींसंबंधी अनेक नियतकालिकांतून नित्य लेखन. सोन्याचे हरीण आणि विदेश विनिमय या दोन पुस्तकांना सरकारची प्रथम पारितोषिके.

२१. प्रा. अ. गं. मंगरूळकर (२९–४–१९१०) : स. प. महाविद्यालयातील संस्कृत-अर्धमागधीचे निवृत्त प्राध्यापक आणि संगीत क्षेत्रातील एक अधिकारी लेखक. भाषा, व्याकरण, ज्ञानेश्वरी हे व्यासंगाचे विषय. काव्यप्रकाश, ज्ञानदेवी, मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार आदी सातआठ संस्कृत–मराठी ग्रंथ प्रकाशित. त्यातील काही सहकार्याने. नू. म. वि. शिक्षण प्रसारक मंडळ, साहित्य परिषद व संगीतविषयक संस्थांशी व व्यक्तींशी निकटचा संबंध.

२२. श्री. ज. द. गोंधळेकर (२१–४–१९०९) : नामवंत चित्रकार. जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे माजी डीन आणि टाइम्स ऑफ इंडियाचे आर्ट डायरेक्टर. सांप्रत मराठी विश्वकोशाचे कलाविभागाचे संपादन करीत आहेत.

२३. प्रा. संभाजी कदम (१५–११–१९३२) : जे. जे. स्कूलमध्ये चित्रकलेचे प्राध्यापक. चित्रकला, साहित्य, संगीत, नाट्यविषयक समीक्षालेखन. व्यक्तिचित्रणकार म्हणून लौकिक. सत्यकथा आणि म. सा. पत्रिकेत अधूनमधून लेखन.

२४. श्री. देवीदास बागूल (२८–१२–१९३१) : शैशवदूत, मोहोरणारी झाडे, विभ्रमा इत्यादी ललित पुस्तकांचे लेखक. काही वर्षे मराठीचे प्राध्यापक व ' साधने ' चे सहसंपादक. सांप्रत ग्रंथप्रकाशनाच्या बाह्यांग सजावटीचा व्यवसाय. (बुक डिझायनर).

२५. प्रा. माधव आचवल (३–११–१९२५) : वास्तुकला आणि वाङ्मयसमीक्षा या क्षेत्रातील एक व्यासंगी लेखक. महाराज समाजीराव विद्यापीठ, बडोदा येथे वास्तूकला विभागाचे प्रमुख. किमया (ललितलेख) अमेरिकेतील चित्रकला (अनुवादित), ताजमहाल इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

२६. श्री. मु. रा. ऊर्फ बापू वाटवे (१५-६-१९२४) : ' कथालक्ष्मी ' मासिकाचे संपादक व ' प्रभात ' चित्रपटसृष्टीशी संबंध असणारे लेखक. चार अनुबोध-पट व एक प्रसिद्धीपट दिग्दर्शित. प्रमुख दैनिके, साप्ताहिके यांमधून चित्रपट व नाट्य व तत्संबंधित कलावंतांसंबंधी सातत्याने लेखन.

२७. प्रा. सुरेंद्र वडगावकर (२१-४-१९२२) : ' किंकिणीवृन्द' पुणे या नृत्यसंस्थेचे संचालक व नृत्यविषयावरील एक अधिकारी लेखक. अंजलि, आलोचना इत्यादी नियतकालिकांत समीक्षणात्मक लेखन. मूळचे कथाकली नर्तक, नंतर इतर शाखांचाही अभ्यास. मुंबईच्या रूपारेल कॉलेजात जर्मन भाषेचे प्राध्यापक.

२८. श्री. व्यंकटेश माडगूळकर (६-७-१९२७) सुप्रसिद्ध कथालेखक आणि पुणे नभोवाणीच्या ग्रामीण कार्यक्रमाचे संयोजक. आजवर नऊ कथासंग्रह, तीन कादंबऱ्या आणि तीन नाटके प्रसिद्ध. चित्रपटकथा लेखनातही नैपुण्य.

२९. श्री. विश्वनाथराव वाबळे (३०-३-१९१७) : बहुजन समाजातील एक तळमळीचे कार्यकर्ते आणि ' शिवनेर ' या साप्ताहिकाचे संपादक. अनेक शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी. चरित्रात्मक लेखनाची व लोकवाङ्मयाची विशेष आवड.

३०. प्रा. डॉ. ना. गो. कालेलकर (११-१२-१९०९) : डेक्कन कॉलेज व पुणे विद्यापीठातील सुप्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ आणि फ्रेंच भाषेचे अध्यापक. ध्वनिविचार, भाषांच्या क्षेत्रमर्यादा, भाषा बोली आणि लेखन, भाषा-इतिहास आणि भूगोल इत्यादी ग्रंथ प्रकाशित. साहित्य अकादमीच्या पारितोषिकाचे मानकरी.

३१. प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर (३१-१०-१९२६) : पुणे येथील स. प. महाविद्यालयात संस्कृतेचे प्राध्यापक. भाषा, व्याकरण हे व्यासंगाचे विषय. काव्यप्रकाश (सहकार्याने), शास्त्रीय मराठी व्याकरण, वेंकटमाधव : महाराष्ट्रप्रयोग चंद्रिका या ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्तींची मौलिक संपादणी. याशिवाय मराठी व्याकरणासंबंधी स्वतंत्र ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर,

३२. डॉ. सरोजिनी बाबर (७-१-१९२०) : समाजशिक्षणमाला आणि सरकारी लोकशिक्षण समितीच्या संपादिका. राज्यसभेच्या सदस्य आणि माजी आमदार. ग्रामीण कथा-कादंबरी-शब्दचित्रे-काव्य इत्यादी स्वरूपाची सुमारे पन्नास पुस्तके प्रसिद्ध. लोकसंगीताची विशेष आवड.

३३. प्रा. वसंत दावतर (१९२५) : मुंबईच्या के. जे. सौमेया कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक, नामवंत टीकाकार आणि ' आलोचना ' या वाङ्मयीन मासिकाचे १९६२ पासून संपादक. मराठी टीका, केशवसुत गाउनि गेले, गीतकाव्य इत्यादी संपादित पुस्तके.

३४. श्री. माधव मनोहर (२०-३-१९१३) : सुप्रसिद्ध नाट्य-चित्रपट व ग्रंथ समीक्षक. सशाची शिंगे, आई (नाटके), ज्वाळा, एका दोन रात्रीची रात्रीची गोष्ट (कादंबऱ्या) इत्यादी पुस्तके. शेकडो कथा व एकांकिका यांचे अनुवाद. सांप्रत 'सोबत' व 'नवशक्ति'मध्ये नियमित लेखन.

३५. प्रा. नरहर कुरुंदकर (१५-७-१९३२) : नांदेड येथील पीपल्स कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक. नामवंत टीकाकार, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतील एक विचारवंत लेखक, प्रभावी वक्ते. मागोवा, रूपवेध, जागर, शिवरात्र, धार आणि काठ इत्यादी ग्रंथ प्रकाशित.

३६. प्रा. आनंद यादव (३०-११-१९३५) : शाहूमंदिर महाविद्यालय, पुणे येथे मराठीचे प्राध्यापक. यशस्वी ग्रामीण कथाकार आणि कवी. हिरवे जग, मातीखालची माती, खळाळ, गोतावळा इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

३७. प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी (४-११-१९३३) : पुणे येथील स. प. महाविद्यालयात व सांप्रत मॉडर्न कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक. कथा, कादंबरी, चरित्र, टीका इत्यादी ती पुस्तके प्रसिद्ध. मुर्दाड, हरी नारायण, ओंकार, स्वामी विवेकानंद ही पुस्तके विशेष गाजली. बखरसंपादणीत हातोटी. साहित्यपरिषदेचे कार्यवाह.

३८. श्री. पां. रा. ढमढेरे (२५-७-१९१३) : जुन्या दुर्मिळ पुस्तकांचे, नियतकालिकांचे आणि हस्तलिखितांचे पुण्यातील एक साक्षेपी संग्राहक आणि विक्रेते. एम्. ए. पर्यंत शिक्षण. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना यांचे नेहमीच मार्गदर्शन लाभते.

३९. डॉ. ग. श्री. खैर (१५-६-१८९८) : पुणे अ. वि. गृहाच्या विद्यालयाचे प्रमुख, शिक्षणशास्त्रज्ञ आणि समाजसेवक. शिक्षणपद्धतींच्या अभ्यासाकरिता प्राय जगभर प्रवास. आदर्श शिक्षक म्हणून भारत सरकारकडून गौरव. सदाचारचिंतनी, मूळ गीतेचा शोध, जगातील समाजक्रांति व हिंदुस्थान इत्यादी दहा पुस्तकांचे कर्ते.

४०. श्री. कृ. भा. बाबर (३-४-१८९५) : बहुजनसमाजातील तळमळीचे आदर्श सेवानिवृत्त शिक्षक आणि समाजशिक्षणमालेचे संचालक. आजवर लहानमोठी १०० पुस्तके प्रसिद्ध. त्यांच्या आत्मचरित्राला सरकारी पारितोषिकही लाभले.

४१. प्रा. ग. प्र. प्रधान (२६-८-१९२२) : सांप्रत विधानसभेतील एक प्रभावी आमदार. फर्ग्युसन कॉलेजात पंधरावीस वर्षे इंग्रजीचे प्राध्यापक. प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते. हाजीपीर, कांजरकोट या पुस्तकांचे लेखक. लो. टिळक या इंग्रजी चरित्रास (प्रा. श. के. भागवत यांच्या सहकार्याने) पारितोषिक.

४२. कॅ. शि. वि. दामले (१४-४-१९००) शारीरिक व सैनिकी शिक्षणाचे महाराष्ट्रातील एक खंदे प्रचारक. महाराष्ट्र मंडळ, पुणे या नावारूपाला आलेल्या संस्थेचे संस्थापक व प्रमुख कार्यकर्ते. इंग्रजी माध्यमाचे पुरस्कर्ते.

४३. श्री. गं. का. गावकर (१५-७-१९१६) : समाजशिक्षण अधिकारी, जे. पी. आणि ' साक्षरतादीप ' मासिकाचे संपादक. प्रौढ साक्षरता या विषयावर सहा पुस्तके प्रसिद्ध. प्रौढ शिक्षणासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी युरोपचा दौरा. ऑनररी मॅजिस्ट्रेट.

४४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (२७-१-१९०१) : वाई येथील प्राज्ञपाठशाळेचे संचालक, मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, साहित्यसंस्कृति मंडळाचे अध्यक्ष, साहित्यसंमेलनाचे पूर्वाध्यक्ष. विद्वान, प्रगमनशील व पुरोगामी विचारवंत-लेखक म्हणून सर्वश्रुत. जडवाद, हिंदुधर्माची समीक्षा, वैदिक संस्कृतीचा विकास इत्यादी स्वतंत्र ग्रंथ, तसेच धर्मकोश, मीमांसाकोश, केवलानंद अभिनंदन इत्यादी ग्रंथांची संपादणी. साहित्यअकादमी पारितोषिकाचे मानकरी.

४५ श्री. एलायस. बी. रॉड्रिग्ज (६-११-१९४४) : पुण्यातील एक नामवंत साहित्यप्रेमी ख्रिस्ती अध्यापक. साहित्य-परिषदेची आचार्य परीक्षा उत्तीर्ण. पेपल सेमिनरीचे तत्त्वज्ञान विषय घेऊन पदवीधर इंग्रजी, लॅटिन, जगाचा इतिहास हे आवडीचे विषय.

४६. श्री. दादूमिया : राष्ट्रवादी दृष्टिकोणातून भारतीय राजकारणावर अनेक नियतकालिकांतून सातत्याने लिहिणारे एक खंदे लेखक.

४७. ॲड. मधुकर केचे (१८-१-१९३२) : वैदर्भी अस्मिता जागवणारे अमरावतीचे एक सिद्धहस्त ललितलेखक. दिंडी गेली पुढे, पुनवेचा थेंब (कविता), एक भटकंती (प्रवास), वेगळे कुटुंब, चेहरेमोहरे (व्यक्तिचित्रे), आखर आंगण (ललित लेख), डॉ. पंजाबराव, संत तुकडोजी (चरित्र) इत्यादी पुस्तकांचे लेखक.

४८. श्री. शंकरराव खरात (११-७-१९२१) : नवबुद्ध समाजातील एक अभ्यासू कार्यकर्ते आणि लोकप्रिय ललितलेखक. बारा बलुतेदार, तडीपार, सांगावा, दौंडी, आडगावचं पाणी इत्यादी कथासंग्रह, हातभट्टी व गावचा टिनोपाल गुरुजी या कादंबऱ्या, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, डॉ. आंबेडकरांच्या सहवासात इत्यादी अन्य पुस्तके. पुणे विद्यापीठ कोर्टाचे सदस्य.

४९. कृष्णाबाई मोटे (२८-७-१९०३) : समाज कार्यकर्त्या व लेखिका. स्त्रीजीवनाचा व बालमानसशास्त्राचा विशेष अभ्यास. दृष्टि आडच्या सृष्टीत, मीनाक्षीचे जीवन, लग्नानंतरचे पहिले वर्ष (संपादित) इत्यादी गाजलेली पुस्तके. याशिवाय काहीं अनुवादित पुस्तके.

५०. सौ. यमुनाबाई हिर्लेकर (२५-९-१९०१) : नामवंत शिक्षणतज्ज्ञ. निवृत्त प्रिन्सिपॉल. युरोप, अमेरिका, पूर्व अशियात शैक्षणिक दौरे. शिक्षण विषयावर सातआठ इंग्रजी-मराठी पुस्तके प्रसिद्ध. नव्या जगात, विचारधारा, आजीव शिक्षण इत्यादी.

५१. श्री. शरच्चंद्र गोखले (१२-९-१९२५) महाराष्ट्र राज्याच्या समाज-कल्याण खात्यातील एक तळमळीचे अभ्यासू अधिकारी. जगभर प्रवास. समाजपत्रिकांचे संपादन. निर्वासितांचे प्रश्न, नावडती मुले, अन्नासाठी दाही दिशा, अपंगांची हाक, माझी कहाणी (हेलन केलरच्या पुस्तकाचा अनुवाद) इत्यादी दहा पुस्तकांचे लेखक.

५२. श्री. बापूराव नाईक (१-३-१९२०) : सुप्रसिद्ध मुद्रणतज्ज्ञ आणि रंगभूमीचे अभ्यासू उपासक. मुं. म. साहित्यसंघ, म. सा. परिषद, मराठी साहित्य महामंडळ, साहित्य संस्कृति मंडळ इत्यादी संस्थांशी घनिष्ठ संबंध. महाराष्ट्र राज्याच्या पाठ्यपुस्तक मंडळाचे नियंत्रक, भारतीय मानस संस्था व रॉयल सोसायटी ऑफ आर्ट लंडन या संस्थांचे फेलो व इन्स्टिटयूट ऑफ प्रिंटिंग मॅनेजमेंट लंडन या संस्थेचे सभासद. कागद, टायफोग्राफी ऑफ देवनागरी, स्टॅनिस्लावस्की अभिनय पद्धती, नाट्य-वास्तू रचना व रंगभूमी इत्यादी पुस्तकांचे कर्ते.

५३. श्री. रा. ज. देशमुख (३१-३-१९१७) : पुण्यातील देशमुख आणि कं. या सुप्रसिद्ध प्रकाशनसंस्थेचे धनी. मुद्रण, सजावट आणि वाङ्मयीन दर्जा या तिन्ही गोष्टींवर साक्षेपी नजर ठेवून ‘ जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ’ सार्थ करणारे यशस्वी प्रकाशक. म. सा. परिषद कार्यकारिणीचे सभासद.

सूची

शुद्धिपत्र

या शुद्धिपत्रात महत्त्वाचे मुद्रणदोष दाखविले आहेत. मुद्रणसमयी कमीजास्त झालेल्या किरकोळ कानामात्रा सहजगत्या लक्षात येतील.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०२	१	होईल	होईल.
१०३	१०	पण	मन
१०३	१७	बनत आहे."	बनत आहे.
१०३	३१	करीत नाही !	करीत नाही !"
१०४	२२, २३	प्रभाव	अभाव
१३३	८	अमदानातील	अमदानीतेल
१३५	६, ७	संस्थांबरोबर	संस्थांचा केवळ नामनिर्देश करून
१३५	२३	व्हॉ. सूर्यकांत	व्ही. सूर्यकान्त
१३७	३१	युगपर्व	व्यासपर्व
१४१	७	या सर्व	यांपैकी काही
१४५	१६	परमर्श	परामर्श
१४५	३२	येलथी	येथील
३०६	१४	साडवेलकर	सडवेलकर
३१०	७	सालोमन	जेरार्डच
३१७	२९	वैधिकता	वैश्विकता
३३५	१५	मसि	मीस
३३७	७	" स्थूल व	स्लथू न

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३३७	१४	‘ चारं ’	‘ चांद ’
३३७	१७	दगड	डोंगर
३३७	२९	वैदिक	ब्राह्मणी
३३९	१४	यांचा	यांचे
३३९	१५	कायामतम्	मायामतम्,
३३९	१५	समरांगणसूत्रधार	समरांगणसूत्रधार,
३४०	१	अभिलाजितार्थ	अभिलषितार्थ
३४०	३	समग्र	काही इतर
३४२	१	कारणातून	गरजांतून
४८७	लेखक	पा. ग. ढमढेरे	पां. रा. ढमढेरे
५२५	९	Coment	Convent
५३४	७	घसटून	घुसळून
५३६	२८	(१८२७ ते २७–	(१८२७ ते २८–
५४२	१२	वर्षायु	वर्षाव्यु
५४४	१८	हिंदुघर्यातच	हिंदुधर्मातच
५५४	५	अन्या	अन्य
५५४	१६	अभंगां तर	अभंगांत
५५४	१७	के	हे
५५४	२६	पा	पार
५६९	१	त्याच्या	त्यांच्या
६७३	१७	ॲड. मधुकर केचे	प्रा. मधुकर केचे
६७३	२१	श्री. शंकरराव खरात	ॲड. शंकरराव खरात

●

श्री शिवछत्रपति

कै. त्र्यंबक शंकर शेजवलकर

महाराष्ट्राने सदैव अभिमान बाळगावा असा शिवचरित्रविषयक साधनग्रंथ.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या आयुष्यभराच्या व्यासंगाचा परिपाक. कै. शेजवलकरांनी शिवचरित्रलेखनासाठी केलेली साधनांची जमवाजमव, शिवचरित्रातील काही वादग्रस्त घटनांसंबंधीची त्यांची महत्त्वपूर्ण टिपणे, राष्ट्रीय दृष्टिकोणातून त्यांनी लिहिलेली शंभर पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना, शिवचरित्रलेखनाचा त्यांनी मांडलेला विस्तृत आराखडा व शिवचरित्रलेखनासाठी उपलब्ध अशा संदर्भसाहित्याची सूची यांनी युक्त असा मौलिक ग्रंथ.

साहित्य अकादमीने रौप्य करंडक व पाच सहस्र रुपयांचे मरणोत्तर पारितोषिक देऊन या ग्रंथाचा गौरव केला आहे. ग्रंथास उत्तम छपाईबद्दल केंद्र सरकारचे प्रशस्तिपत्र मिळाले आहे.

साहित्य अकादमीचे ज्येष्ठ सभासद कविवर्य अनिल यांनी पारितोषिकप्रसंगी या ग्रंथाबद्दल म्हटले आहे : " महाभारताला जे वैशिष्ट्य लाभले आहे तसेच काहीसे या ग्रंथाचे आहे. महाभारतावर अनेकांनी काव्ये, नाटके, कथा, कादंबऱ्या लिहिल्या. महाभारत स्फूर्तिपद ठरले. कै. शेजवलकर यांचा " श्री शिवछत्रपति " हा ग्रंथ असाच पुढील इतिहासलेखकांना स्फूर्तिप्रद व मार्गदर्शक ठरणार आहे. प्रस्तुत ग्रंथाचे श्रेष्ठत्व त्यांच्या या वैशिष्ट्यातच सामावलेले आहे."

रॉयल आकाराची सहाशे छपन्न पृष्ठे / संपूर्ण कापडी बांधणी. मूल्य फक्त तीस रुपये. रौप्यमहोत्सवानिमित्त सवलतीची किंमत पंचवीस रुपये. २५ रु. ची मनीऑर्डर करणारांस घरपोच.

मराठा मंदिर, डॉ. आनंदराव नायर रोड, मुंबई ८